
मेहता पब्लिशिंग हाउस

# शिवाजी सावंत

# मृत्युंजय



कर्णाच्या दानशूरत्वाला तोड नाही हेच खरं! 'मृत्युंजय' एवढी अमाप लोकप्रियता कुठल्याही मराठी कादंबरीकाराच्या पहिल्याच कादंबरीला लाभलेली नाही.

भारताच्या राजकीय पुनरुत्थानाबरोबरच महाभारताचे आणि विशेषत: त्यातील प्रसंगांचे आणि व्यक्तिरेखांचे नव्या, व्यापक, मानवतावादी दृष्टिकोनातून साहित्यिक पुनरुज्जीवन झाले. कुंतीपुत्र राधेयाविषयी तर विशेष आस्था व्यक्त झाली आणि कुसुमाग्रजांच्या 'कौंतेय'सारख्या अनन्यसाधारण साहित्यकृतींचा लाभही मराठी साहित्याला याच आस्थेतून झाला. 'कौंतेय'ने नाट्यक्षेत्रात जी यशस्वी कामगिरी केली, त्यासारखी कामगिरी तशा यशस्वी तऱ्हेने कादंबरीच्या क्षेत्रात 'मृत्युंजय'ने केली आहे, हे आता सर्वमान्य झाले आहे.

'अनिवार्य नियतीचं गरगर फिरणं महान संयमानं सहन करीत जगायचं असतं,' हे कर्णाचं सांगणं आहे. कृष्णाप्रमाणेच कर्ण पौरुष चैतन्याचे आणि वर्णनिर्भयतेचे समर्थ आविष्करण आहे. जो कोणी जीवनसंघर्षात पिचला आहे, त्याच्या संघर्षात आणि पिचण्यातसुद्धा पुरुषार्थी आणि शक्तिशाली 'जीवन' सामावले आहे, हा कर्णाचा तेजस्वी संदेश आहे. पांडवांच्या विजयाचे डांगोरे फिके पाडणारा हा संदेश आहे; मौनाच्या विलक्षण रूपांत! या मौनाच्याच जोरावर मृत्यूच्या महाद्वारातसुद्धा जीवनाचा धुंद विजय कर्णाने अनुभविला. म्हणूनच त्याच्या या भावकथेचे नावही आहे, 'मृत्युंजय' हेच!





कर्णाच्या दानशूरत्वाला तोड नाही हेच खरं! 'मृत्युंजय' एवढी अमाप लोकप्रियता कुठल्याही मराठी कादंबरीकाराच्या पहिल्याच कादंबरीला लाभलेली नाही.

भारताच्या राजकीय पुनरुत्थानाबरोबरच महाभारताचे आणि विशेषत: त्यातील प्रसंगांचे आणि व्यक्तिरेखांचे नव्या, व्यापक, मानवतावादी दृष्टिकोनातून साहित्यिक पुनरुज्जीवन झाले. कुंतीपुत्र राधेयाविषयी तर विशेष आस्था व्यक्त झाली आणि कुसुमाग्रजांच्या 'कौंतेय'सारख्या अनन्यसाधारण साहित्यकृतीचा लाभही मराठी साहित्याला याच आस्थेतून झाला. 'कौंतेय'ने नाट्यक्षेत्रात जी यशस्वी कामगिरी केली, त्यासारखी कामगिरी तशा यशस्वी तऱ्हेने कादंबरीच्या क्षेत्रात 'मृत्युंजय'ने केली आहे, हे आता सर्वमान्य झाले आहे.

'अनिवार्य नियतीचं गरगर फिरणं महान संयमानं सहन करीत जगायचं असतं,' हे कर्णाचं सांगणं आहे. कृष्णाप्रमाणेच कर्ण पौरुष चैतन्याचे आणि वर्णनिर्भयतेचे समर्थ आविष्करण आहे. जो कोणी जीवनसंघर्षात पिचला आहे, त्याच्या संघर्षात आणि पिचण्यातसुद्धा पुरुषार्थी आणि शक्तिशाली 'जीवन' सामावले आहे, हा कर्णाचा तेजस्वी संदेश आहे. पांडवांच्या विजयाचे डांगोरे फिके पाडणारा हा संदेश आहे; मौनाच्या विलक्षण रूपांत! या मौनाच्याच जोरावर मृत्यूच्या महाद्वारातसुद्धा जीवनाचा धुंद विजय कर्णाने अनुभविला. म्हणूनच त्याच्या या भावकथेचे नावही आहे, 'मृत्युंजय' हेच!




# मृत्युंजय



**शिवाजी सावंत यांची ग्रंथसंपदा**

**मृत्युंजय** (कादंबरी)
**छावा** (कादंबरी)
**युगंधर** (कादंबरी)
**मृत्युंजय** (नाटक)
**छावा** (नाटक)
**लढत** (कादंबरी)
**अशी मने असे नमुने** (व्यक्तिचित्रे)
**मोरावळा** (व्यक्तिचित्रे)
**संघर्ष** (चरित कहाणी)
**शेलका साज** (ललित लेख)
**कांचनकण** (ललित लेख)
**कवडसे** (ललित लेख)
**क्रांतिसिंहाची गावरान बोली** (संपादन)
**युगंधर एक चिंतन** (प्रस्तावना)



# मृत्युंजय

शिवाजी सावंत

मेहता
पब्लिशिंग
हाऊस

**मृत्युंजय**


शिवाजी सावंत
© शिवाजी सावंत

**प्रकाशक**

सुनील अनिल मेहता,
मेहता पब्लिशिंग हाऊस,
१९४१, सदाशिव पेठ,
माडीवाले कॉलनी, पुणे ३०.
‘ ०२०-२४४७६९२४

E-mail: infoGmehtapublishinghouse.com
Website: www.mehtapublishinghouse.com

पहिली आवृत्ती
**ISBN 81-7766**



# मृत्युंजय

शिवाजी सावंत

मेहता
पब्लिशिंग
हाऊस

# कर्ण





# कुंती


कर्ण


दुर्योधन

# वृषाली




कर्ण





# कर्ण




श्रीकृष्ण
८

मायभूमीच्या संरक्षणार्थ धारातीर्थी पतन पावणा-या शूर वीरांस





## अर्घ्यदान!

त्या दिग्विजयी, दानविक्रमी, अशरण सूर्यपुत्र कर्णाला हे एकविसावे अर्घ्य देण्यासाठी जलांजली उचलली– लेखणी हाती घेतली मात्र, कुठूनतरी सरसरत एक विचारलहर आली आहे. नेहमीसारखी ही ओंजळ गंगेच्या जलानं भरून ओसंडत नाहीय. ते तर आहेच पण त्यात लोकगंगेच्या निरपेक्ष प्रेमाचं सुगंधित केशरही नकळत मिसळलं आहे!

नव्या एकविसाव्या शतकाच्या भूकंपासारखे हादरे देत देऊ घातलेल्या घटनांच्या सुरुवातीस मृत्युंजयाची ही 'एकविसावी' आवृत्ती पूर्वीच्याच उत्साहाने प्रकाशित होत आहे!


वीस व एकवीस हे अंक आपापतः जुळून आले आहेत. म्हणूनच मनात विचार येऊन गेला. येणाऱ्या शतकात या सूर्यपुत्राच्या कथेचं स्वागत कसं होईल! ती वाचकांना शिळी म्हणून नकोशी वाटेल? अंतरंगातला मलाच अपरिचित असलेला एक आदिम आवाज ठासून सांगतो आहे– ''मुळीच नाऽही! मृत्युंजय शिळी होणार नाही. तो पूर्णतः वाचकांचा ऐवज आहे.

ती सूर्यपुत्रकथा आहे, उलट दिवसागणिक, तासागणिक, क्षणागणिक झपाट्यानं विकसित

होणाऱ्या विज्ञानाच्या पाठबळावरच वाचकाला या कलाकृतीच्या दोन ओळींमधला अव्यक्त आशय अधिक मात्रेनं भिडत जाणार आहे!'' मी या विषयी मनोमन पूर्णतः निश्चित आहे.

दोन वर्षांपूर्वीच 'युगंधर' ही श्रीकृष्णचरित्रावरील महाकादंबरी शब्दबद्ध करून कॉन्टिनेन्टलकारांना दिली. तिची दुसरी आवृत्तीही प्रकाशित झाली आहे. तिच्यासाठी 'आचमन' या शीर्षकाचं मनोगत लिहून द्यावं लागलं. ते लिहिताना मन असंख्य स्मृतींनी शिगोशीग भरले होते. काही काळ लेखणीच स्तब्ध झाली होती. त्याहून कितीतरी सखोलपणे एका अवर्णनीय रितेपणाच्या भावानं, दोन सुहृदयांच्या जाण्यामुळं या क्षणीही मन सुन्न आहे; तात्यासाहेब व भय्यासाहेब यांच्या– (स्व.) कुसुमाग्रज व अनंतराव यांच्या– खरोखरच दोघांनीही माझ्यावर निखळ-निरपेक्ष व अकृत्रिम-निरलस प्रेमच केलं. ज्या कृष्णकथेबद्दल दोघांनीही मला प्रत्येक भेटीत विचारलं ती 'युगंधर' बघायला-वाचायला दोघेही खरोखरच हवे होते.

नूतन शतकाच्या तोंडावर हे लिहिताना ज्यांनी मृत्युंजयाचं शारदाप्रसादात घरगुती पद्धतीनं अगदी आटोपशीर साधं पूजन केलं, त्या महाराष्ट्र वाल्मीकी (स्व.) अण्णांची (गदिमांची) प्रकर्षानं आठवण होत आहे. एका साध्या पोस्टकार्डानं दिलेल्या आग्रही आमंत्रणावरून दिल्लीहून येऊन माझ्या 'छावा' कादंबरीचं पुण्यात असंच साधं पूजन करणारे (स्व.) यशवंतराव चव्हाण यांची अभिजात साहित्यरसज्ञता मी कसा काय विसरणार? 'मृत्युंजय'वर आपल्या जनप्रिय दै. मराठात 'मृत्युंजय' नावाचा 'प्रचंड' अग्रलेख लिहिणाऱ्या आचार्य अत्र्यांची आठवण कशी काय पुसली जाणार? गेली तीस वर्षे ज्यांच्या मुखपृष्ठानं व आतील सजावटचित्रांनी 'मृत्युंजय' मराठी स्त्री-पुरुष वाचकांच्या घरोघरी पोहोचली, ती तीन पिढ्यांनी साहित्यानंद आस्वादत वाचली ते



अद्वितीय (स्व.) दीनानाथ दलाल यांच्या मुखपृष्ठासारखेच आजही माझ्या मनात टवटवीत आहेत.

'युगंधर'च्या निमित्ताने लेख लिहिताना ज्यांनी 'न मावळणारा सूर्य!' अशा मला चक्रावून टाकणाऱ्या ग्रंथसदृश शीर्षकातच त्या श्रीकृष्णकथेबद्दल सर्व काही सांगून टाकलं ते मला ज्येष्ठ बंधुतुल्य असलेले प्राचार्य शिवाजीराव भोसले; मुंबईच्या आपल्या 'प्रभुकुंज' या निवासावर 'मृत्युंजय'साठी मूकपणे हसतच माझ्या हातावर धन भरलं (कुठल्याही पुरस्काराला मागे टाकेल असं) शुभ्र-धवल पाकीट ठेवणाऱ्या– यासाठीच कोल्हापूरला नुकत्याच झालेल्या भूषणसोहळ्यात अंतर्बाह्य अभिजात श्रीकृष्णभक्त ज्या दीदींना 'युगंधर'ची कच्ची प्रत तशाच मूकपणे दाखवावीशी वाटली, त्या स्वरसम्राज्ञी लता मंगेशकर यांचे व अशा शब्दश: अनेक सुहृदांचे प्रेमऋण मी मनोमन वागवून आहे.

कॉन्टिनेन्टलचे अनिरुद्ध व रत्नाकर कुलकर्णी यांना मी बंधूच मानतो. त्यांचे आभार कसले मानायचे? कॉन्टिनेन्टलचे परिवारासारखे सर्व सहकारी, मराठीचे सर्वदूर पसरलेले स्त्री-पुरुष वाचक, या संस्कारित आवृत्तीच्या अक्षरजुळणीचे जोखमीचे काम पार पाडणाऱ्या सौ. रेखा कुलकर्णी आणि मुद्रक श्री. निगुडकर बंधू यांचा मी मन:पूर्वक आभारी आहे.

युगंधरचा वेग घेताना ऋग्वेदातील एका आशयश्रीमंत ऋचेचा पलिता हाती घेतला आहे.

'ॐ हिरण्मयेन पात्रेन–
सत्यस्यापिहितम् मुखम्
तत्वम् पुषण्णपावृणु–
सत्यधर्माय दृष्टये!'

तुम्हा सर्वांच्या सदिच्छांमुळे– माझ्या आचेला बळ मिळाले आहे. प्रत्यक्ष श्रीकृष्णच, सत्यमुखावरील दिपवणारं झाकण काढून, चमत्काराशिवाय आपलं 'पूर्णपुरुष' हे सार्थ दर्शन युगंधरातून नक्कीच घडवेल!

त्यानं मनी आणलं आणि कृपा केली तर अशक्य ते काय आहे?

या नम्र विश्वासासह त्या श्रीकृष्णभक्ताला व दानवीर कर्णाला हे एकविसावे 'अर्घ्यदान' नम्रभावे अपर्ण करतो.

इति शुभं भवतु!
दि. १३ एप्रिल, २००२
गुढी पाडवा

**शिवाजी सावंत**
C-2/26 स्टेट बँक नगर, पंचवटी, पाषाण, पुणे ४११ ००८, फोन : २५८८२२५८



# कुंती


कर्ण


दुर्योधन

# वृषाली




ಕರ್ಣ



# कर्ण




श्रीकृष्ण
८

# मजकूर


- कर्ण
  - एक
  - दोन
  - तीन
  - चार
  - पाच
  - सहा
  - सात
  - आठ
  - नऊ
  - दहा
  - अकरा
  - बारा
  - तेरा
  - चौदा
  - पंधरा
  - सोळा
  - सतरा
  - अठरा
  - एकोणीस
  - वीस
  - एकवीस
  - बावीस
  - तेवीस
  - चोवीस
  - पंचवीस
  - सव्वीस
  - सत्तावीस
  - अठ्ठावीस
  - एकोणतीस
  - तीस
  - एकतीस
  - बत्तीस
  - तेहतीस
  - चौतीस

पस्तीस
छत्तीस
सदतीस
अडतीस

कुंती

एक
दोन
तीन
चार
पाच
सहा
सात
आठ
नऊ
दहा
अकरा
बारा
तेरा
चौदा
पंधरा
सोळा
सतरा
अठरा
एकोणीस
वीस
एकवीस
बावीस
तेवीस
चोवीस
पंचवीस
सव्वीस
सत्तावीस
अठ्ठावीस
एकोणतीस
तीस
एकतीस
बत्तीस
तेहेतीस

- चौतीस
- पस्तीस
- छत्तीस
- सदतीस
- अडतीस
- एकोणचाळीस
- चाळीस
- एक्केचाळीस
- बेचाळीस
- त्रेचाळीस

कर्ण

- एक
- दोन
- तीन
- चार
- पाच
- सहा
- सात
- आठ
- नऊ
- दहा
- अकरा
- बारा
- तेरा
- चौदा

दुर्योधन

- एक
- दोन
- तीन
- चार
- पाच
- सहा
- सात
- आठ
- नऊ
- दहा
- अकरा

- बारा
- तेरा
- चौदा

वृषाली

- एक
- दोन
- तीन
- चार
- पाच
- सहा
- सात
- आठ
- नऊ
- दहा
- अकरा
- बारा
- तेरा
- चौदा
- पंधरा
- सोळा
- सतरा
- अठरा
- एकोणीस
- वीस
- एकवीस
- बावीस
- तेवीस
- चोवीस
- पंचवीस
- सव्वीस
- सत्तावीस
- अठ्ठावीस
- एकोणतीस

कर्ण

- एक
- दोन
- तीन

- चार
- पाच
- सहा
- सात
- आठ
- नऊ
- दहा
- अकरा
- बारा
- तेरा
- चौदा
- पंधरा
- सोळा
- सतरा
- अठरा
- एकोणीस
- वीस
- एकवीस
- बावीस
- तेवीस
- चोवीस
- पंचवीस
- सव्वीस

शोण

- एक
- दोन
- तीन
- चार
- पाच
- सहा
- सात
- आठ
- नऊ
- दहा
- अकरा
- बारा
- तेरा
- चौदा

- पंधरा
- सोळा
- सतरा
- अठरा
- एकोणीस
- वीस
- एकवीस
- बावीस
- तेवीस
- चोवीस
- पंचवीस
- सव्वीस
- सत्तावीस
- अठ्ठाव्वीस

कर्ण

- एक
- दोन
- तीन
- चार
- पाच
- सहा
- सात
- आठ
- नऊ
- दहा
- अकरा
- बारा
- तेरा
- चौदा
- पंधरा
- सोळा
- सतरा
- अठरा
- एकोणीस
- वीस
- एकवीस
- बावीस

श्रीकृष्ण

- एक
- दोन
- तीन
- चार
- पाच
- सहा
- सात
- आठ
- नऊ
- दहा
- अकरा
- बारा
- तेरा
- चौदा
- पंधरा

# कर्ण

# एक

आज मला थोडं बोलायचं आहे! मी बोलणार म्हणून काही लोक दचकतील! म्हणतील कालवश माणसं केव्हापासून बोलायला लागली? पण केव्हा-केव्हा अशांनाही बोलावं लागतं! जेव्हा-जेव्हा हाडामांसाची जिवंत माणसं मृतांसारखी वागायला लागतात, तेव्हा-तेव्हा मृतांना जिवंत होऊन बोलावं लागतं. छे! मी काही आज इतरांसाठी बोलणार नाही; कारण मला चांगलं माहीत आहे की, तसं बोलणारा मी काही कोणी मोठा तत्वचिंतक नाही. माझ्यापुढं जग उभं राहिलं तेच मुळी समरांगण म्हणून! आणि माझं जीवन म्हणजे तर त्या समरांगणावरचा केवळ एक बाणांचा भाता! अनेक प्रकारच्या, अनेक आकारांच्या विविध घटनांचे बाण ज्यात अगदी काठोकाठ ठासून भरले आहेत असा एक भाता!!

आज मला माझ्या आयुष्याचा तो भाता सर्वांसमोर स्पष्ट उघडा करावयाचा आहे! स्वत:च्या हातांनी त्यातील विविध घटनांचे बाण – अगदी एकजात सगळ्या घटनांचे बाण – आज मला मोकळ्या मनानं सर्वांना दाखवायचे आहेत! आपल्या दिव्य पात्यांनी तळपणारे, आपल्या बांधीव आणि आकर्षक आकारानं चटकन डोळ्यांत भरणारे, तसेच मोडलेल्या शेपटांमुळे केविलवाणे दिसणारे आणि ठिकठिकाणी तुटलेल्या पात्यांमुळे उघडे-बोडके, कसेतरीच, कलाहीन वाटणारे – अगदी सर्वच्या सर्व बाण – आणि तेही जसेच्या तसे – आज मला सर्वांना दाखवायचे आहेत!

जगातील एकजात वीरतेकडून मला ते पारखून घ्यायचे आहेत. धरणीतलावरील यच्चयावत मातृत्वाकडून आज मला त्यांचं खरंखुरं मोल ठरवून घ्यायचं आहे. पृथ्वीतलावरील एकूणएक गुरुत्वाकडून मला त्यांचं खरंखुरं स्थान ठरवून घ्यायचं आहे. जिवाला जीव देणाऱ्या मित्रत्वाकडून आज मला त्यांची परीक्षा करवून घ्यायची आहे. जिव्हाळ्याच्या प्रेमसरींनी ओथंबून जाणाऱ्या बंधुत्वाकडून आज मला त्यांचं खरंखुरं मूल्यमापन करायचं आहे.

आतून – अगदी माझ्या मनाच्या सखोल आणि गहनगंभीर गाभाऱ्यातून एक आवाज अलीकडे मला वारंवार स्पष्टपणे ऐकू येतो. जो-जो मनाच्या निर्धारानं मी तो आवाज थोपविण्याचा प्रयत्न करतो, तो-तो वायूच्या सुसाट झोतानं अग्नीची ज्वाला विझण्याऐवजी पूर्वीपेक्षा अधिक जोमानं जास्तच भडकत जावी, तसा तो आवाज मला पुन:पुन्हा गर्जून सांगतो, 'सांग कर्णा, तुझी जीवनकथा आज सर्वांना सांग. आज ती तू सर्वांना समजेल अशा भाषेत सांगावी अशीच आजची परिस्थिती आहे. सगळं जग म्हणतं, 'कर्णा, तुझं जीवन म्हणजे एक लक्तर होतं!' सांग, सर्वांना गर्जून सांग की, ते लक्तर नव्हतं; तर ते जरीकाठाचं एक तलम राजवस्त्र होतं. केवळ – केवळ परिस्थितीच्या निर्दय काटेरी कुंपणात अडकून त्याच्या सहस्त्र-सहस्त्र चिंध्या झाल्या. ज्याला मिळेल त्यानं त्या आपल्या वेशीवर हव्या तशा टांगल्या आणि तरीही तुला त्या राजवस्त्राचा एवढा अभिमान का वाटतो?

'कुठल्यातरी अडगळीत, सुंदर संदुकेच्या तळाशी पडून राहणाऱ्या नव्याकोऱ्या

आणि अखंड राजवस्त्रापेक्षा, अक्राळविक्राळ तांडव करणाऱ्या काळाच्या झंझावाताशी केवळ एकाकीपणानं झुंजताना फाटून गेलेलं तुझं ते राजवस्त्र कमी मोलाचं होतं काय ते आज सर्वांना नीट डोळे उघडे ठेवून पाहू दे. नीट कान उघडे ठेवून ऐकू दे. वीरांच्या कथा नेहमीच चवीनं ऐकणाऱ्या आणि दुसऱ्याच क्षणी – अगदी दुसऱ्याच क्षणी त्या तितक्याच सहजपणे आणि निष्काळजीपणे सरळ विसरून जाणाऱ्या या वेड्या जगाला तुझी ही कथा कधीतरी गदागदा हलवून सोडील काय? आहे का तिच्यात एवढं प्रचंड सामर्थ्य?

'विश्वाच्या अंतिम सत्यतेवर ज्यांचा-ज्यांचा नितान्त विश्वास आहे, ज्यांना – ज्यांना 'मृत्यू' हे एक खेळणं वाटतं, अशा जगातील अजूनही अस्तित्वात असलेल्या सिंहाच्या छातीच्या वीरांना तरी आज तुझी ही कथा ऐकावीशी वाटेल. छे! ही काय केवळ कथा आहे? ते एक महान सत्य आहे!! आणि सत्य हे पाहणाऱ्यांच्या वा ऐकणाऱ्यांच्या इच्छेचा विचार कधीच करीत नसतं! ते नेहमीच जसं असतं तसंच पुढे येत असतं. उगवत्या सूर्यदेवासारखं!'

कोणतीही कथा ऐकत असताना ती ऐकणाऱ्यांची अशी कल्पना असते की, तिच्यात मद्याचे मधुर चषक असावेत, नर्तिकांचे नादमय पदन्यास असावेत, स्त्री – पुरुषांची आवेगपूर्ण आलिंगनं असावीत. क्षणभंगुर जीवनाची जाणीव कुठंतरी विसरायला लावणारी धुंदी त्यात असावी. मी सांगणार आहे, त्या माझ्या या जीवनकथेत असले मद्याचे चषक नाहीत. मनाला हळुवारपणे गुदगुल्या करणारे नर्तिकांचे पदन्यास नाहीत. तिच्यात आहे केवळ संग्राम! निरनिराळ्या भावभावनांचा थरारून सोडणारा संग्राम!

प्राणपणानं लढणारा मी केवळ एक रांगडा सैनिक! मी माझी कथा आज केवळ माझ्या – केवळ माझ्याच समाधानाकरिता सांगतो आहे! माणसाला कुठंतरी आपलं मन मोकळं केल्याशिवाय आपण मुक्त झाल्यासारखं वाटतच नाही! म्हणूनच माझी ही कथा मी मोकळ्या मनानं सांगणार आहे.

पण माझी ही संग्रामकथा संगतवार कशी सांगावी, हीच आता माझ्यापुढची खरी अडचण आहे! कारण कडाडणाऱ्या विजेचा कानठळ्या बसविणारा मर्मभेदक आवाज ऐकल्यानंतर रानटी घोड्यांच्या कळपातील अनेक घोडे जसे वाट फुटेल तिकडे इतस्तत: धावू लागतात, तशा अनेक घटना आता स्पष्टपणे माझ्या डोळ्यांसमोर काळाचा क्रम सोडून हव्या तशा धावताहेत, त्यांची संगतवार रचना कशी करावी, ते माझं मलाच आता सुचेनासं झालं आहे! का कुणास ठाऊक; पण या वेळी पुन:पुन्हा माझ्या डोळ्यांसमोर उभी आहे ती गंगामातेच्या पवित्र आणि रमणीय तीरावर वसलेली चंपानगरी! चंपानगरी हे माझ्या जीवनसरितेतील मला आवडणारं सर्वांत सुबक असं वळण आहे.

त्या नगरीच्या नुसत्या आठवणीबरोबर माझ्या स्मृतींचं अरण्य एकदम चाळवलं जातं आणि घटनांच्या हरणांचे कळपच्या कळप धपाधप उड्या घेत धावू लागतात. कुणी म्हणतात, आठवणी म्हणजे मोरपिसांसारख्या असतात, तर कुणी म्हणतात, त्या बकुलपुलांसारख्या आपला सुगंध मागं दरवळत ठेवणाऱ्या असतात! पण मला मात्र ते कधीच पटत नाही. आठवणी या नेहमीच हत्तीच्या पायांसारख्या असतात! त्या आपला खोलवर असा ठसा मनाच्या ओलसर भूमीवर मागं ठेवूनच जातात. निदान माझ्या सर्व आठवणी तरी या अशाच आहेत. चंपानगरी हा माझ्या जीवनाच्या मरुभूमीवरील काळाच्या गजराजानं उठविलेला एक असाच खोलवर आणि स्पष्ट असा ठसा आहे.

माझ्या जीवनप्रवासातील हे सर्वांत शांत नि हवंहवंसं वाटणारं आश्रयस्थान आहे. काही-काही लोक जीवनाला 'मंदिर' म्हणतात. मला माहीत आहे, माझं जीवन तसं मंदिर मुळीच नाही आणि असलंच तर 'चंपानगरी' ही त्या मंदिरातील सर्वांत मंजूळ अशी एकमेव घंटा आहे!

गंगामातेच्या विशाल आणि रमणीय किनाऱ्यावर वसलेलं ते एक छोटंसं गाव आहे. आहे कसलं? होतं!

**

# दोन

लतावृक्षांनी आणि पशुपक्षयांनी बहरून गेलेल्या निसर्गदेवतेच्या कुशीत पहुडलेलं माझं ते चिमुकलं गाव चंपानगर! चकोर, चातक, कोकीळ, भारद्वाज आणि सारंग अशा असंख्य पक्षिराजांच्या मधुर कलकलाटानं भल्या पहाटे जागं होणारं, गायींच्या हंबरण्याबरोबर सकाळी रोजच्या कामाला लागणारं, दोन प्रहराच्या रणरणत्यावेळी कदंबाच्या गर्द-गर्द गार छायेत निवांतपणे विसावणारं, घंटांच्या तालबद्ध आवाजांसह गायींबरोबर संध्याकाळी धुळीचे लोळ उडवीत परतणारं आणि रात्री गंगामातेच्या किनाऱ्यावरून येणाऱ्या मंद-मंद शीतल वायुलहरी अंगावर पांघरून एखाद्या निरागस अर्भकासारखं शांत झोपी जाणारं, इथं – या चंपानगरीत – माझं ते रम्य बालपण गेलं! हो, अक्षरश: गेलंच. धनुष्यातून एकदा सुटलेल्या बाणासारखं ते कधीच पुन्हा माझ्याकडे परतून काही आलं नाही.

पण त्याच्या नुसत्या स्मृतीनंच गंगामातेचं क्षितिजापर्यंत पसरलेलं विस्तीर्ण पात्र माझ्या डोळ्यांसमोर उभं आहे. पांढरट निळ्या पाण्याचं ते क्षितिजापर्यंत पसरलेलं अफाट साम्राज्य! त्यातल्या पाण्याच्या बिंदू-बिंदूला माझा दाट परिचय आहे आणि मलाही त्याच्या थेंबाथेंबाची दाट ओळख आहे. याच गंगामातेच्या काठी पसरलेल्या ओलसर वाळूच्या मऊ-मऊ पाठीवर धावताना माझी निर्भीड चिमुकली पावलं उमटली आहेत. या इथल्या अवखळ वायुलहरींनी मी अंगावर लपेटीत असलेलं माझं उत्तरीय अनेक वेळा खटचाळपणानं उडवून लावलं आहे आणि म्हणूनच चंपानगरीच्या आठवणींबरोबरच मी बालपणी पाहिलेली, या कडेपासून त्या कडेपर्यंत पसरलेली गंगामाता माझ्या डोळ्यांसमोर उभी राहते.

बालपण म्हणजे तरी काय? कुणालातरी ते व्यवस्थितपणे नीट सांगता येईल काय? अनेक लोक, अनेक कल्पनांनी त्याचं वर्णन करतात, पण मला म्हणाल तर ते नेहमीच रथासारखं वाटत आलं आहे. मुक्त आणि अनिर्बंध कल्पनांचे घोडे जोडलेला एक स्वैर रथ असावा असं. दूरवर दिसणारं गंगेचं पाणी खरोखरच कुठंतरी निळ्याभोर आकाशाला टेकलं आहे काय, हे पाहण्यासाठी तो रथ तिच्या अगणित लाटालाटांवरून फेरफटका मारून क्षणात क्षितिजापर्यंतची धाव करून येई. तर कधी – कधी तो रथ – आकाशातल्या लुकलुकणाऱ्या असंख्य तारका कसल्या कोंदणात बसविलेल्या असतात, की ज्यामुळे त्या निळं छत सोडून पृथ्वीतलावर खळकन निखळून का पडत नाहीत याची खात्री करून घेण्यासाठी – अवकाशात उंच-उंच झेपावून येई.

**

# तीन

मी आणि माझा छोटा भाऊ शोण – आमचं ते चिमुकलं जग. शोण! होय शोणच! त्याचं मूळ नाव शत्रुंतप होतं, पण सर्व जण त्याला ‘शोण’च म्हणत. शोण माझा धाकटा भाऊ. तसा वृकरथ नावाचा आणखी एक भाऊ होता मला, पण तो लहानपणीच मावशीकडे विकटांच्या राज्यात निघून गेला होता. शोण आणि मी दोघेच उरलो होतो. त्याच्या आणि माझ्या स्मृतींनीच माझं बालपणीचं जग भरलं होतं. चंपानगरीच्या विशुद्ध हवेत वाढणाऱ्या दोन भोळ्याभाबड्या जिवांचं आणि अचाट कल्पनांनी भरलेलं चिमुकलं जग होतं ते. तिथं खोट्या प्रतिष्ठेचे नकली संकेत नव्हते की, स्वार्थासाठी एकमेकांना पाण्यात पाहणारी असूया नव्हती. ते केवळ दोन भावांचं निर्हेतुक जग होतं आणि त्या जगाचे केवळ दोनच द्वारपाल होते. एक आमची आई – राधा आणि आमचे बाबा – अधिरथ! आजही त्या दोघांच्या स्मृतींनी माझ्या अंत:करणातील एक अत्यंत कोमल अशी तार छेडली जाते आणि नकळतच काहीसे कृतज्ञनेनं भारलेले, काहीसे मायेनं ओथंबलेले असे दोन अश्रुबिंदू माझ्या डोळ्यांत टचकन उभे राहतात, पण हे क्षणभरच. लागलीच मी ते टिपतो, कारण मला माहीत आहे, अश्रू हे दुबळ्या मनाचं प्रतीक आहे. जगातील कोणत्याही दु:खाची आग अश्रूंच्या पाण्यानं कधीच विझत नसते आणि तरीही हे दोन अश्रुबिंदू पाझरल्याशिवाय माझं मन हलकं झालं आहे, असं मला कधीच वाटत नाही, कारण या दोन अश्रुबिंदूंशिवाय मोठ्या मोलाचं असं मी त्यांना माझ्या आयुष्यात काहीच देऊ शकलो नाही. यापेक्षा जास्त मौल्यवान असं आपल्या आईबापांच्या प्रेमाची जाणीव म्हणून देता येण्यासारखं काही अस्तित्वात असेल असंही मला वाटत नाही. माझ्या आईबापांकडून माझ्या बाबतीत कसलीच अपेक्षा कधीही केली गेली नाही. त्यांनी मला दिलं ते केवळ निर्भेळ प्रेमच! आणि म्हणूनच त्यांच्या स्मृतीनं माझ्या डोळ्यांत काहीसे कृतज्ञतेनं भरलेले, काहीसे मायेनं ओथंबलेले असे केवळ दोनच अश्रुबिंदू उभे राहतात.

**

# चार

माझी आई म्हणजे तर मायेचा विशाल सागरच होता! मला लहानपणी नगरातील सर्व जण वसुसेन म्हणत. माझा छोटा भाऊ शोण मला नेहमी 'वसुदादा' म्हणे. तर आई मला दिवसातून हजार वेळा 'वसू, वसू' म्हणून बोलावी. तिनं मला केवळ आपलं दूधच पाजलं नव्हतं, तर तिच्या प्रेमाचं विशुद्ध अमृतही मी सतत मनसोक्तपणे पीत आलो होतो. एकजात सर्वांवर प्रेम करण्यासाठीच जणू तिचा जन्म होता. सगळं चंपानगर तिला 'राधामाता' म्हणत होतं. सर्वांसाठी अविरत कष्ट आणि पोटी अमाप माया यांमुळे तिचा शब्द कधीच खाली पडत नव्हता. माझ्या कानात जन्मजातच दोन कुंडलं होती! त्यांची ती नगरातील लोकांशी बोलताना अनेक वेळा चर्चा करी. मी क्षणभर जरी दृष्टिआड झालो तरी तिचा जीव घाबरा होई; कासावीस होई. शेजाऱ्यांकडे जाऊन ती मला शोधण्याचा प्रयत्न करी. घटकान्‌घटका मला समोर बसवून माझ्या कानातील कुंडलांकडे स्वत:ला विसरून उगाच एकटक पाहत बसे. अनेक वेळा माझ्या मस्तकावरून हात फिरवून ती मला प्रेमानं म्हणे, "वसू, गंगेच्या बाजूला कध्धीकध्धी जायचं नाही हं."

"का नाही जायचं?" मी विचारी.

"हे बघ, वडीलमाणसांचं ऐकावं. जाऊ नको म्हटलं की, जाऊ नये आपण."

"किती भित्री आहेस गं तू? अगं, काय होतंय गेलं तर?"

"नाही रे वसू!" मला एकदम जवळ ओढून घेत माझ्या केसातून आपली लांबडी बोटं पिरवीत ती मला विचारी, "वसू, मी तुला आवडते की नाही?"

"हो" म्हणून मी मान डोलवी. माझ्या कानातील लयीत डोलणाऱ्या कुंडलांकडे कौतुकानं पाहत ती म्हणे, "मग माझी आज्ञा समजून जायचं नाहीस कधी गंगेकडे." ती मला कळवळून सांगे. तिच्या डोळ्यांतून त्या वेळी भीतीचे भाव प्रकट होत.

तिला बरं वाटावं म्हणून मी म्हणे, "तू म्हणतेस तर नाही जाणार, मग तर झालं?" ते ऐकताच आत्यंतिक प्रेमानं ती मला एकदम जवळ ओढून घेई आणि कडकडून मिठी मारी. माझ्या मस्तकाचे नि कानांचे पटापट मुके घेई. मला त्या वेळी वाटे की, आपण असंच तिच्या कुशीत कायमच घुसमटत राहावं.

तिच्या कुशीत राहूनच मी विचार करी, गंगामातेच्या पाण्याला आईनं एवढं का बरं घाबरावं? आणि मला तर गंगामातेच्या पाण्याची अनिवार ओढ होती! तिच्या लपलपणाऱ्या असंख्य लाटांशी घटकान्‌घटका बोलत बसणं हा माझा सर्वांत आवडता छंद होता. आईला तो कळला असता तर? मला शोधीत ती नक्कीच सरळ गंगेच्या किनाऱ्यापर्यंत आली असती. छे! काही झालं तरी आपण नेहमी नदीकिनाऱ्यावर जातो हे हिला कधीच समजता कामा नये! मी निश्चय करून टाकी आणि तो पुरा करण्यासाठी शोणाला रंगीत शिंपले आणि पिकलेल्या पिवळ्या बकुलफलांच्या मुठी भरून देई!

**

# पाच

माझे बाबा कौरवराज धृतराष्ट्रांच्या रथाचे सारथी होते. त्यांचा रहिवास बहुतेक हस्तिनापुरात – कौरवांच्या राजधानीत – होत असे. ते नगर कितीतरी दूरवर होतं. कधी-कधी ते तेथून एक मोठा रथ घेऊन चंपानगरीत येत असत. त्या वेळी माझा आणि शोणाचा उत्साह काही वेगळाच असे. पर्णकुटीच्या दारात रथ उभा राहिला रे राहिला की, त्यात शोण पटकन उडी मारी आणि घोडचाचे वेग बाबांच्या हातातून बळेबळेच आपल्या हातात घेत मोठ्यानं मला हाक मारी, "वसुदादा, अरे लवकर ये. ये, आपण गंगेच्या काठावरचे शिंपले आणू या." त्याची हाक ऐकून अपूप खायचे तसेच सोडून मी धावतच पर्णकुटीबाहेर येई.

तो नि मी मग बाबांच्या रथात बसून सुसाट वेगात नगराबाहेर गंगेच्या किनाऱ्याकडे जात असू. पिंगट रंगाचे ते पाच घोडे पुष्ट शेपटचांचे पिसारे फुलवीत कानात वारा भरल्यासारखे स्वच्छंदानं उधळत जात. त्यांना आवरताना चिमुकल्या शोणाची फारच त्रेधातिरपीट उडे. वरच्या दातांनी खालचा ओठ जोरानं चावत तो त्यांना आवरून मार्गावरची वळणं सफाईदारपणे घेण्याचा उगाच प्रयत्न करी आणि शेवटी दमून जाऊन मला मदतीला बोलावी. त्याच्या हातांवर वेगांचे काच उमटलेले असत. त्याच्या आवाजात त्या वेळी इतकं मार्दव असे की, मला त्याच्याबद्दल विलक्षण प्रेम वाटे. त्याच्या हातातील वेग मग मी माझ्या हातात घेई आणि आसुडाचा दंड उलटा करून त्यानं घोडचांची आयाळ विसकटून देई. 'हाऽऽ हाऽऽ' करून त्यांना धावडण्यासाठी आसुडाच्या दंडानं डिवचलं की, मग चेतावून ते पूर्वीपेक्षाही भरधाव वेगानं धावत सुटत. आपल्या मनासारखं झालं हे पाहून शोण आनंदातिशयानं टाळ्या पिटून मला प्रोत्साहन देई आणि हां-हां म्हणता आम्ही दोघं अर्ध्या एक योजनाचं अंतर कापून गंगामातेच्या किनाऱ्यावर येऊन थांबत असू. शोण पटकन रथातून उडी मारून हरणासारखा उडचा घेत किनाऱ्याकडे धावत जाई. त्याच्या चिमुकल्या पायांची एक रांगच रांग कडेच्या ओलसर वाळूत उमटताना दिसे. मी मात्र भारावल्यासारखा तसाच रथातून एकटक त्या पाण्याकडे पाहत राही. या पाण्याशी आपलं न सांगता येण्यासारखं काहीतरी नातं असावं असं मला उगाच वाटे! लागलीच दुसरा विचार येई. छे, पाण्याशी माणसाचं कसलं असणार नातं? तहानलेल्या व्याकूळ जिवाला क्षणकाल तृप्त करणारं ते एक साधन आहे. हातातील वेग नकळत सुटून खाली पडत. आपल्या छोटचा डोळ्यांनी मी ते गंगापात्र शक्य असेल तेवढं घटघटा पिऊन घेई! आपल्या सर्वांगाला डोळे असते तर किती बरं झालं असतं असं त्या वेळी मला वाटे!

माझ्या त्या तंद्रीतून मी जागा होई तो शोणाच्या प्रश्नांनी! अनेक रंगांचे शिंपले मिळाल्यामुळे त्याचा उत्साह नुसता ओसंडून जात असे. तो एकसारखा मला प्रश्नावर प्रश्न विचारी,

"दादा, हे शिंपले पाण्यापासूनच होतात काय रे?"

"होय."

तेवढ्यानं त्याचं समाधान होत नसे. तो परत विचारी,

"मग यांच्यावरचे हे सगळे रंग पाणीच देत असेल नाही?"

"होय."

"मग पाण्यात ते रंग का नाही दिसत?"

त्याच्या प्रश्नाला उत्तर देण्याचं कधी-कधी मी टाळीत असे, कारण त्याचे प्रश्नानंतर प्रश्न तयारच असणार हे मला माहीत असे आणि खरं म्हटलं तर त्याच्या प्रश्नाचं उत्तर मलाही काही वेळी माहीत नसे!

"चल, आपणाला बराच वेळ झाला आहे," असं सांगून मी त्याच्या मस्तकातील ते प्रश्नांचं काहूर काढून टाकण्याचा प्रयत्न करी.

मी आणि तो मग परतत असू. येताना संध्याकाळ झाल्यामुळे श्येन, कोकीळ, कपोत, भारद्वाज, पत्ररथ क्रौंच असे निरनिराळ्या पक्षयांचे थवेच्या थवे चित्रविचित्र आवाज काढीत कलकलत घरट्यांकडे परत जाताना दिसत. शोणाचं थोडा वेळ गप्प झालेलं कुतूहल परत झटकन जागं होत असे. रथनीडाच्या बाहेर डोकावून त्यांच्या थव्यांकडे एकटक पाहत तो मला अनेक प्रश्न विचारीत असे. माझं मात्र त्या वेळी त्याच्याकडे मुळीच लक्ष नसे. पश्चिमेकडच्या दोन उंचच उंच पर्वतांमध्ये सूर्यदेव त्या वेळी प्रवेश करीत असत. दिवसभर अविश्रांत धावूनही त्यांच्या रथाचे घोडे जरासुद्धा दमलेले नसत. ते दोन पर्वत त्यांच्या वाड्याच्या भव्य महाद्वारावरील दोन द्वारपालांसारखे मला वाटत! त्या तेज:पुंज बिंबाकडे पाहिलं की, मला एक प्रकारची आगळीच हुरहुर वाटू लागे. आता क्षणार्धात ते तेज आपल्या दृष्टिआड होणार या जाणिवेनं तर वियोगाची एक प्रचंड लाट उगाच माझ्या नसानसांतून उमटून जाई. मी एकटक त्या बिंबाकडे पाही. शोण मला गदागदा हलवून आकाशातून रोंरावत जाणाऱ्या गरुड पक्षयांचा थवा दाखवी. मी क्षणभर त्या धिप्पाड नि राकट पक्षयांकडे पाही. इतर सगळ्या पक्षयांपेक्षा ते खूपच उंचावरून भिरभिरत जात असत. शोण विचारी, "दादा, कोणते रे हे पक्षी?"

"गरुड! सगळ्या पक्षयांचे राजे!"

"दादा, तू जाशील का रे त्या गरुडांच्यासारखा खूप-खूप उंच?" तो उगाच काहीतरी विचारी.

"वेड्या, उंच जायला मी काय पक्षी आहे?"

"नसशील... मग मघाशी एवढ्या मोठ्यानं धावणारे घोडे कसे काय आवरलेस?"

"बरं बाबा, मी जाईन त्या गरुडासारखा उंच-उंच. इतका उंच की, तुला कधीच दिसणारही नाही! मग तर झालं?" त्या उत्तरानं त्याचं समाधान होई. माझ्याबद्दलच्या आदराचा एक भाबडा भाव त्याच्या डोळ्यांत स्पष्ट चमकू लागे.

मी परत पश्चिम क्षितिजाकडे पाही आणि शेवटी मीच त्याला एक प्रश्न विचारी, "शोणा, ते सूर्यबिंब पाहिलंस काय? काय वाटतं तुला त्या बिंबाकडे पाहिल्यावर?"

मला वाटे तो क्षणभर बारकाईनं त्या बिंबाकडे पाहील आणि मला जसं वाटतं तसंच वाटतंय असंच, पण जरा वेगळ्या शब्दांत सांगेल, पण तो सूर्यदेवाकडे पाहू लागला की, त्याचे चिमुकले डोळे त्या तेजानं एकदम मिटत आणि थोड्या वेळानं माझ्या कानांकडे डोळे चोळीत पाहत तो झटकन म्हणे, "तुझ्या चेहऱ्यासारखं वाटतंय ते!"

मी माझ्या कानांना हात लावी. दोन मांसल कुंडलं हाताला लागत. माझ्या

जन्मापासूनच ती होती म्हणे!

शोणाची तक्रार सुरू होई, ''आईची तुझ्यावरच जास्त माया आहे बघ. म्हणूनच तिनं तुलाच तेवढी कुंडलं दिली आहेत! मला कुठं आहेत ती कुंडलं?''

त्याच्या त्या उद्‌गारांनी मी क्षणभर विचारात पडे. परत एकदा पश्चिमेकडच्या डोळ्यांआड होऊ पाहणाऱ्या त्या तेजस्वी बिंबाकडे मी बारकाईनं एकटक पाही. माझ्या छोट्या मनात भावनांचे हलकल्लोळ माजत. एका हातानं घोड्यांचे वेग आवरीत, शोणाची दृष्टी चुकवून दृष्टिआड होणाऱ्या त्या तेजाला मी दुसऱ्या हातानं निरोप देई. मनात एक वेगळ्याच प्रकारची हुरहूर लागे. आपल्याजवळचं काहीतरी आता दूर-दूर जातं आहे, असं वाटे. आवेगानं मी हातातील आसुडाचा एक जबरदस्त फटकारा घोड्यांच्या पाठीवर ओढी. आपले खूर झाडीत, मार्गावरची धूळ उडवीत ते खिंकाळत वायुवेगानं धावू लागत. जवळ बसलेला शोण, धावणारे घोडे, मागं पडणारे अशोक, ताल, किंशुक, मधुक, पाटल, तमाल, कदंब, शाल, सांतवण यांचे उंच-उंच, गर्द-पानावळींचे वृक्ष यांपैकी कशाचंच मला भान नसे. केवळ समोरचा सरपटत मागं जाणारा मार्ग आणि त्यावरची वळणं तेवढीच दिसत. माझ्या मनात एक विचार तरळून जाई. 'मागं पडणाऱ्या या मार्गाबरोबरच मी प्रकाशाच्या साम्राज्यातून कुठंतरी अंधाराच्या भयाण समुद्राकडे जातो आहे.'

आता रात्रीच्या बारा घटका अशाच एकाकीपणात जाणार असं वाटे.

पर्णकुटीत आल्याबरोबर शोण आपल्याकडील रंगीबेरंगी शिंपल्यांची कमाई मोठ्या उत्साहानं आईला दाखवी. त्याचं कौतुक करीत आई मला विचारी, ''वसू, तू रे काय आणलंस?'' प्रथम मी गोंधळून जाई, काय उत्तर द्यावं ते मला चटकन समजत नसे; कारण मी काहीच आणलेलं नसे! कसंतरी स्वत:ला सावरून मी म्हणत असे, ''मी शोणाला परत आणलंय हेच मोठं समज, आई! अगं, हा तिथंच बसला असता रात्रभर शिंपले गोळा करीत.''

''हो-हो तर. तू आणलंस काय रे मला? मीच आणलंय गं याला परत, नाहीतर हाच तिथं बसला असता सकाळपर्यंत; त्या सूर्यबिंबाची वाट बघत!'' शोण मान वेळावून आपली बाजू मांडी. आई माझ्याकडे बारकाईनं पाहू लागे. माझ्या चेहऱ्याकडे तिनं इतकं निरखून का पाहावं, तेच मला समजत नसे. मी तेथून सरळ बाहेर येई.

**

# सहा

आमच्या पर्णकुटीत बाबांनी आणलेली अनेक प्रकारांची, अनेक आकारांची धनुष्यं होती. का कुणास ठाऊक; पण जेव्हा मी पहिल्या प्रथम त्यांतील एक धनुष्य पाहिलं तेव्हा त्याबद्दल मला वाटलेलं आकर्षण विलक्षण होतं. त्याची कपोताच्या मानेसारखी वळण घेतलेली धनुकली नि नुसतं नखांनीच छेडलं तरी झणत्कार करणारी प्रत्यंचा मला अतिशय आवडली होती. बाबांच्या हातातून जवळ-जवळ मी ते हिसकावूनच घेतलं. हातात ते नाचवीत, उड्या मारीत, अंगणात घोड्याच्या शेपटीशी खेळत असलेल्या शोणाजवळ मी क्षणात आलो. तो घोड्याच्या शेपटीच्या झुबकेदार गोंड्यातील चमकदार नि लांब केस काढण्यात गुंतला होता. काहीतरी गुणगुणत होता. त्याला ते धनुष्य दाखवीत मी म्हणालो, ''शोण, हे बघ आपलं खेळणं. आता घोड्याचे केस उपटायचं सोडून दे. आत्तापासून आपला नवा खेळ सुरू.'' त्यानं हातातील केस झटकन फेकून दिले. ''बघू, बघू,'' म्हणत मोठ्या उत्सुकतेनं तो नाचतच माझ्याजवळ आला. माझ्या हातातील धनुष्य त्यानं आपल्या हातात घेतलं आणि डोळे मोठे करून तो म्हणाला, ''बरंच जड आहे की रे हे?''

''हट्ऽ हे कसलं जड? आण इकडे आणि आतून एक बाण घेऊन ये.'' मी त्याला बाण आणायला पिटाळला. ''दादाला बाण द्या. दादाला बाण,'' म्हणत तो ओरडतच आत पळाला. मी माझ्या उत्तरीयानं त्या धनुष्याच्या दंडावरची धूळ हळुवारपणे पुसली. हातात ते पेलून पाहिलं. इतक्यात शोण एक बाण घेऊन उड्या मारीत बाहेर आलाही. माझ्या हातात तो देऊन समोरच्या वडाच्या झाडाकडे बोट दाखवीत म्हणाला, ''दादा, मार बघू त्या झाडात हा बाण.'' मी झटकन प्रत्यंचा चढविली आणि बाण लावून ती ताकदीनं खेचली. एका ठिकाणी हात स्थिर करून डावा डोळा मिटून ती सोडून दिली. खंड्या पक्षयाच्या झेपेसारखा तो बाण एका सरळ रेषेत पुढं गेला नि कचकन पुढच्या वडाच्या झाडात घुसला. क्षणभरातच बाण घुसला होता त्या जागेतून दूधवर्णी रस ठिबकू लागला. शोण टाळ्या पिटून उड्या मारू लागला. माझा वेध त्याला आवडला होता!

त्या दिवसापासून माझा नि शोणाचा तो एक नित्याचा खेळच झाला होता. आकाशात भराऱ्या मारणाऱ्या श्येन पक्षयाला बाणानं अचूक टिपणं, वाऱ्याच्या झोताबरोबर इकडे-तिकडे हलणाऱ्या शेंड्यावरच्या आम्रफलाचा देठ तोडणं, एकाच वेळी दोन बाण सोडून दोन वेगवेगळी लक्षयं साधणं, असे विविध खेळ स्वत:ला विसरून आम्ही घटकान्‌घटका खेळू लागलो. या सगळ्या खेळांचे पंच होते, आमचे बाबा! ते सांगतील तेवढ्या गोष्टी आम्ही दोघं नम्रपणे पाळीत होतो, पण माझ्या मनात नेहमी एकच विचार येई. आपणाला हवा तसा नि हवा त्या ठिकाणी बाण सोडता आला पाहिजे. लक्षय न पाहता नुसत्या आवाजाच्या रोखानं बाण सोडता आला पाहिजे. साळिंदर प्राणी जसा आपल्या संरक्षणासाठी आपल्या अंगावरील शे-दोनशे नलिका एकाच वेळी सोडू शकतो, तसं आपणालाही असंख्य बाण एकाच वेळी सोडता आले पाहिजेत.

**

# सात

स्वप्न म्हणजे काय आहे हे कुणालातरी व्यवस्थित सांगता येईल काय? मला तरी ते अतृप्त मनाच्या इच्छा पुरविणाऱ्या कल्पवृक्षासारखं वाटतं, कारण त्या दिवशी रात्री माझ्या स्वप्नात अनेक धनुष्यं नाचत होती. फुलांनी सजविलेली, वळणदार आकाराची, टणक; पण लवचीक धनुकलीची अशी अनेक धनुष्यं मी एकामागून एक अशी हाताळीत होतो. दिसेल त्या वस्तूवर एकामागोमाग एक असे अचूक बाण सटासट टाकीत होतो. स्वत:च्या लक्षयवेधावर स्वत:च खूश होत आनंदानं टाळ्या पिटीतच मी जागा झालो होतो!

एके दिवशी सकाळी मी आणि शोण नगराजवळच्या अरण्यात रथासाठी लागणारी किकरवृक्षाची कठीण आणि टिकाऊ अशी लाकडं आणण्यासाठी गेलो होतो. शोण तर त्या दिवशी फारच आनंदात होता. अरण्यात फिरायला मिळणं ही त्याच्या दृष्टीनं फारच भाग्याची गोष्ट! तिथल्या अनेक पक्षयांचे निरनिराळे मंजूळ आवाज, झाडांच्या फांद्यांची एकमेकांवर घासून होणारी करकर, झऱ्यांची नाजूक खळखळ, प्रचंड वृक्षांच्या आधारानं वर चढणाऱ्या वेलींची अविरत सळसळ या सगळ्यांबद्दल त्याला एक वेगळंच आकर्षण होतं. त्याचं वर्णन न थकता तो घटकान्‌घटका करी. मला मात्र अरण्यात जाणं तितकंसं आवडत नसे; कारण तिथं सूर्यदेवांचं ओझरतंही दर्शन होत नसे! मग माझं मन उगाचच अस्वस्थ होई. तिथं उगाचच कोंदटल्यासारखं वाटे. शक्य तितक्या लवकर मी तेथून बाहेर पडण्याचा विचार करी. मोकळ्या पठारावर आल्यावर मगच मला जरा हलकं नि मोकळं वाटे. आदित्यनारायणाचं दर्शन घेतल्यावर तर माझा सगळा शीण कुठल्या कुठं क्षणात दूर पळून जाई.

त्या दिवशी किकराची लाकडं घेऊन आम्ही नेहमीप्रमाणं परतलो. अरण्याबाहेर लवकर जाण्यासाठी मी झपाझप पावलं उचलू लागलो. शोण माझ्या मागोमाग येतच होता. जवळच्या एका मोकळ्या पठारावर आल्यावर मी थांबलो. खांद्यावरची लाकडं एका झाडाच्या बुंध्याला टेकवून ठेवीत शोणनं तोंडावरचा घाम उत्तरीयानं पुसला. समोरच्या इतस्तत: वाढलेल्या शराच्या कुरणात गव्या म्हशींचा एक काळ्या-पांढऱ्या रंगाचा कळप चरत होता. त्यातच एक थोराड सांबर मिसळलं होतं. आपली ऐटदार शिंगं टवकारून ते आमच्याकडे पाहू लागलं. शोणाला प्रश्न विचारायला तेवढं कारण पुरेसं होतं! त्यानं लागलीच मला विचारलं, "दादा, ते एकटंच सांबर या कळपात कसं रे आलं आहे?" मी तरी त्याला काय उत्तर देणार होतो? काहीतरी सांगायचं म्हणून मी म्हणालो, "वाट चुकली असेल रे त्याची! नाहीतर त्याच्या कळपातील इतर साथीदार विसरले असतील त्याला, पण त्या सगळ्या कळपात ते किती वेगळं नि उठून दिसतंय नाही?" पण आपले साथीदार सोडून ते एकटंच का भटकत असावं, याचं कारण बराच वेळ विचार करूनही मला सापडलं नाही.

त्या सांबराकडे पाहतच आम्ही पुढचा मार्ग धरला. मला त्या सांबराची ऐटदार शिंगं फारच आवडली होती. मी जाता-जाता सहज कानांना हात लावला. मांसल कुंडलं

हाताला लागली. मीही त्या ऐटदार सांबरासारखा दिसत असेन का या माझ्या कुंडलांमुळे? एक विचार माझ्या मनात तरळून गेला!

तसं कुंडलांविषयी मी अनेक वेळा आईला खोदून-खोदून विचारलं होतं, पण तिला कधीच त्याबद्दल नीट उत्तर देता आलं नाही. एकदा तर मी तिला स्पष्टच विचारलं होतं, ‘‘शोण आणि मी सख्खे भाऊ आहोत, मग त्याला का नाहीत कुंडलं?'' क्षणभर भेदरलेल्या डोळ्यांनी माझ्या कुंडलांकडे पाहत ती गप्पच बसली नि मग भानावर येत म्हणाली, ‘‘ते मला विचारू नकोस! तुझ्या तातांना विचार.'' हे सांगताना ती गोंधळली होती.

मी तसाच बाबांच्याकडे गेलो. त्यांनाही मी तोच प्रश्न विचारला, पण त्यांनी अगदी विचित्रच उत्तर दिलं. ते म्हणाले, ‘‘गंगामातेलाच विचार त्याचं कारण! तीच कधीतरी तुला त्याचं उत्तर देईल!'' मी विचार करू लागलो. गंगामाता याचं उत्तर कसं बरं देईल? नदीला का कधी तरी बोलता येईल? छे, ही मोठी माणसं अशी का वागतात? लहानांशी ती असं का बोलतात?

त्या दिवशी संध्याकाळी सगळ्यांची दृष्टी चुकवून मी एकटाच गंगामातेच्या काठावर जाऊन बसलो. येणाऱ्या तिच्या प्रत्येक लाटेला मी प्रश्न विचारला, ‘‘एकट्या माझ्याच कानात कुंडलं का?'' पण एकही लाट माझ्या त्या प्रश्नाचं उत्तर काही देऊ शकली नाही! जगातील सगळीच मोठी माणसं फसवी असतात, असं त्या दिवशी मला वाटलं! लहानांना अज्ञानात ठेवणं एवढंच ती करीत असावीत, नाहीतर मग एवढी मोठी गंगामाता गप्प कशी?

दुसऱ्या दिवशी संध्याकाळी धनुष्यानं खेळताना मी तोच प्रश्न शोणाला विचारला, ‘‘शोणा, खरं खरं सांग तुला का नाहीत कुंडलं?'' त्यानं दिलेलं उत्तर ऐकून मी तर स्तब्धच झालो. तो म्हणाला, ‘‘मलाही ते माहीत नाही. मला तुझी कुंडलं मात्र फार-फार आवडतात. रात्री तू झोपलेला असतोस त्या वेळी तर ती मंद – मंद झगमगत असतात! त्यांचा निळसर प्रकाश तुझ्या तांबसर गालांवर पडलेला असतो! उगवतीच्या किरणांत नुकत्याच उमललेल्या सुवर्ण कमळासारखी दिसते तेव्हा तुझी चर्या!''

मी अवाक् होऊन त्याच्याकडे पाहू लागलो. तो खोटं बोलत नव्हता आणि माझ्या बाबतीत तर ते कधीच शक्य नव्हतं. माझ्या मनात एकदम अनेक प्रश्नांचं काहूर उठलं. इतर कुणालाही नव्हती अशी माझ्या कानात दोन मांसल कुंडलं होती. इतकंच नव्हे तर ती प्रकाशत होती! मलाच ती का मिळाली होती? कोण आहे मी? शोणाचे दोन्ही खांदे गदागदा हलवीत मी त्याला कळवळून विचारलं, ‘‘शोण, कोण आहे मी?''

माझ्या डुलणाऱ्या कुंडलांकडे शांतपणे डोळाभर पाहत तो निरागसपणे म्हणाला, ‘‘माझा मोठा भाऊ वसुदादा!''

त्याचे खांदे मी तसेच झटकून दिले. त्याच्या उत्तरानं माझं समाधान झालं नव्हतं. मी समोर पाहिलं. सूर्यनारायण आपल्या असंख्य कुंचल्यांनी आकाशाचं छत नानाविध रंगांत रंगवीत अदृश्य होत होते आणि माझ्या मनात कुंडलांचं कुतूहल दाटत होतं.

**

# आठ

त्या रात्री काही केल्या मला झोप येईना. कुतूहल हे अवखळ घोड्यासारखं असतं. संयमाचे कितीही वेग लावले तरी ते धावतच सुटतं. या कुशीवरून त्या कुशीवर असा सारखा मी तळमळत होतो. एकच एक प्रश्न पुन:पुन्हा सारखा माझ्या डोळ्यांसमोर नाचू लागला. "माझ्या कानातच तेवढी कुंडलं का?" रात्री ती चमकतात म्हणे! कशी चमकतात ती? का चमकतात? तसाच ताडकन उठून अंथरुणावर बसलो. डोळ्यांची बुब्बुळं कानांच्या कोपऱ्यापर्यंत खेचून खरोखरच कुंडलं चमकतात काय, हे पाहण्याचा व्यर्थ प्रयत्न करू लागलो. काही केल्या कान डोळ्यांच्या कक्षेत येईनात! अस्वस्थ – अस्वस्थ झालो. आपले कान आपणाला कसे दिसतील याचा बराच वेळ विचार केला. मला काहीच सुचेना. क्षणभर वाटलं शोणाला उठवावं आणि 'माझी कुंडलं चमकतात काय ते पाहा', असं त्याला विचारावं, पण आईच्या कुशीत तो निर्धास्तपणे झोपला होता. त्याला उठविलं असतं तर आईही जागी झाली असती. बाबा तर हस्तिनापुरात होते. काय करावं हे समजेना. इतक्यात मला बाबांचे शब्द आठवले. "गंगामाताच तुला त्याचं कधीतरी उत्तर देईल!"

मी हळूच अंथरुणावरून उठलो. अलगद पर्णकुटीचं दार उघडलं आणि गंगामातेच्या रोखानं चालू लागलो. आकाश पांढऱ्याशुभ्र लुकलुकणाऱ्या तारकांनी नुसतं खचाखच बहरून गेलं होतं. शोण म्हणाला होता, "तुझी कुंडलं चांदण्यांसारखी चमकतात." म्हणून मधून-मधून चांदण्या कशा चमकतात ते निरखून पाहू लागलो! पण तेवढ्यानं काही माझं समाधान होईना. रात्रीच्या किड्यांची किरकिर सतत चालू होती. सगळं चंपानगर मंदिराच्या गाभाऱ्यासारखं निचळ शांत होतं. चुकूनच कोणाच्यातरी अश्वशालेतील घोड्यांची फुरफुर काय ती ऐकू येत होती. तारकांच्या अंधूक नि अस्पष्ट प्रकाशात समोरचा मार्ग अस्पष्ट दिसत होता. मी झपाझप पावलं उचलीत चालू लागलो. मधूनच थंडगार वायूच्या लहरी अंगावर आदळत होत्या. उत्तरीय पांघरायलाही मी विसरलो होतो. बराच वेळ चालल्यानंतर गंगाकाठावर आलो. दिवसा चैतन्यानं उफाळणारं ते पात्र रात्री मात्र अतिशय गंभीर आणि शांत वाटत होतं. दिवसा आकाशाला भिडलेलं दिसणारं ते विशाल पात्र अंधाराच्या साम्राज्यात पार मिसळून गेलं होतं. केवळ किनाऱ्यावरच्या खडकावर नि वाळूवर आदळणाऱ्या अविरत लाटांची लपलप तेवढी ऐकू येऊ लागली. त्या आवाजानं तिथल्या शांततेला फारच गंभीरता आणली होती. मी तसाच उभा राहून त्या शांततेचा कानोसा घेऊ लागलो. क्षणभर आपण इथं काहीतरी विचारायला आलो आहोत, हेही मी पार विसरून गेलो.

विचारांच्या तंद्रीत तसाच गंगामातेच्या पात्रात उतरलो. आकाशातील तारकांचं स्वच्छ प्रतिबिंब त्या संथ पात्रात पडलं होतं. त्यांतील दोन तारकांचं प्रतिबिंब हिंदकळत लांबट होई. ओंजळीत पाणी घेण्यासाठी म्हणून खाली वाकलो. त्या दोन तारका जास्तच चमचमू लागल्या! मी माझं तोंड पाण्याच्या अगदीच जवळ नेलं. त्या दोन तारका म्हणजे माझ्या कानातील दोन कुंडलंच होती! खालच्या गंगेच्या पाण्याच्या

दर्पणात ती मंदपणे चमकत होती. मधूनच लाटेबरोबर लांबट आकार घेत होती. मी माझा चेहरा पाण्यात एकटक निरखू लागलो. ती दोन कुंडलं निळसर प्रकाशाची एकलग वलयं फेकीत होती. ते माझ्या चेहऱ्याचं अस्पष्ट स्वरूप होतं. माझी कुंडलं रात्री चमकतात ते रहस्य गंगामातेनं मला सांगितलं, पण चमकणारी कुंडलं मला एकट्यालाच का मिळाली होती? कोण आहे मी?

तसाच पाण्यात उभा होतो. माझ्या मनातील एक शंका दूर झालेली होती, पण दुसरी तशीच होती, 'का मिळालीत मला ही चमकदार कुंडलं?' तीन-चार घटका तसाच पाण्यात उभा होतो. पहाटे कोणीतरी काठावरच्या मंदिरातील घंटा वाजविली! एकदम पर्णकुटीची आठवण झाली! मी नाही, हे पाहून आई घाबरून गेली असेल. लवकर परतावं म्हणून समोर पाहिलं. पूर्वेकडची बाजू हळूहळू उजळू लागली होती! अंधाराच्या साम्राज्यात विरलेलं गंगामातेचं पात्र पुन्हा निळ्याभोर आकाशाच्या हातात हात घालून उभं होतं! पहिल्याच पर्जन्याच्या सरीनंतर एखादा पिवळसर कोंब धरतीमातेच्या कुशीतून हळूच बाहेर डोकावू लागावा, तसे दूरवर सूर्यदेव गंगामातेच्या उदरातून वर येत होते. मी त्यांच्याकडे पाहिलं, माझं मन शांत झालं होतं. नकळत ओंजळभर पाणी घेतलं. डोळे मिटून त्या पाण्याचं अर्घ्य हळुवारपणे मी सूर्यदेवांना दिलं आणि परतलो.

रात्री अस्पष्ट दिसणारा मार्ग आता उजळून निघत होता! रात्री मंदिराच्या गाभाऱ्यासारखं शांत वाटणारं चंपानगर आता मंदिराच्या कळसावर फडफडणाऱ्या त्रिकोणी ध्वजासारखं चैतन्यमय वाटत होतं! परत आल्याबरोबर आईनं मला विचारलं, "कुठं गेला होतास?" ती किती घाबरली होती.

"गंगामातेच्या काठावर! तू नाहीस, पण तिनं दाखविलं मला, माझ्या कानातील कुंडलं कशी चमकतात ते!" अतिशय भेदरलेल्या दृष्टीनं तिनं माझ्याकडे पाहिलं. मधून-मधून ती माझ्याकडे अशाच विचित्र दृष्टीनं पाहत असे. ती मला आणखी काहीतरी विचारणार होती. ते टाळण्यासाठी म्हणून लागलीच मी बाहेर आलो.

**

## नऊ

आमच्या पर्णकुटीसमोर एका मोठा वटवृक्ष होता. वृक्ष कसला, अनेक रंगांच्या, अनेक आवाज काढणाऱ्या पक्षयांनी अधिकारानं वसाहत केलेलं, ते एक छोटंसं पक्षिनगरच होतं! ग्रीष्मात तो वृक्ष लहान-लहान तांबड्या फळांनी डवरून जाई, त्या वेळी तो लुकलुकणाऱ्या असंख्य तारकांनी बहरून गेलेल्या आकाशासारखाच दिसे. त्याच्यावरचे पक्षी त्या वेळी फारच आनंदात असत. निरनिराळे आवाज काढून आपला आनंद ते एकमेकांना बोलून दाखवीत असावेत! त्यांचा तो किलबिलाट मी स्वत:ला विसरून घटकान्‌घटका कान देऊन ऐकत असे. मला वाटे आपणही या वृक्षासारखं व्हावं. आपल्या अंगावरची सगळी फळं पक्षयांनी खावीत. कोणत्याही वृक्षावर न बसणारा सर्वश्रेष्ठ पक्षिराज गरुडसुद्धा माझ्याकडे यावा.

सळसळणाऱ्या जिवंत सर्पाशिवाय काही न खाणाऱ्या त्या पक्षिराजानं प्रथम मोठ्या ऐटीनं म्हणावं, ‘‘छी! असली लिबलिबीत फळं खाण्यासाठी माझा जन्म नाही.’’ मी माझ्या हिरव्यागार पानांचे हात जोडून त्याला वंदन करून म्हणावं, ‘‘फळं नको खाऊ पक्षिराज, पण विश्रांतीसाठी तरी जरा थांबशील की नाही?’’

थोडा वेळ त्यानं थांबावं आणि भर्रकन उंच भरारी मारण्यापूर्वी जाता-जाता माझ्या अंगावरचं एक फळ त्यानं हळूच टिपावं. पक्षिराजाच्या त्या पराभवावर आनंदित होऊन मी माझ्या पानांच्या असंख्य हातांनी टाळ्या पिटाव्यात! अंगावरच्या उत्तरीयाच्या वेली करून त्या आनंदातिशयानं अवकाशात उडवाव्यात!

मी त्या वृक्षाकडे पाहत होतो. त्याचा आकार गदेसारखा होता! वर फांद्यांचा गोलाकार घेर नि खाली बुंध्याचा बळकट दंड! इतक्यात ‘खाऽड’ असा कसलातरी आवाज झाला म्हणून तिकडे पाहिलं. भगदत्त नावाचा आमच्या शेजारी राहणारा एक सारथी आपल्या हातातील आसुडाचे फटकारे काढीत येत होता. मी त्याच्याकडे आश्चर्यानं पाहिलं. हातातील आसूड मानेभोवती लपेटीत तो म्हणाला, ‘‘काय वसू, काय पाहतो आहेस?’’

‘‘काही नाही, पक्षी पाहतो आहे.’’ मी उत्तर दिलं.

‘‘या वटवृक्षावर कसले पाहतोस पक्षी? पक्षी पाहायचे असतील, तर अरण्यात अशोकाच्या वृक्षाजवळ जायला पाहिजे. या वटवृक्षावर कावळेच जास्त असतात! ही लिबलिबीत फळं खाण्यासाठी ते जमतात!’’ हातातील आसुडाच्या दंडानं खाली पडलेली काही फळं उडवीत तो म्हणाला.

‘‘कावळे?’’

‘‘होय. भारद्वाज, श्येन, कोकीळ असले पक्षी चुकूनच असावयाचे इथं! एखादा कोकीळ असतो तोही कोकिळेच्या धूर्तपणामुळे.’’

‘‘कसला धूर्तपणा?’’ मी त्याला कुतूहलानं विचारलं.

‘‘अरे, कोकीळा आपलं अंडं कावळी नसताना हळूच तिच्या घरट्यात नेऊन ठेवते, अंड्याचा रंग नि आकार कावळीच्या अंड्यासारखाच असतो. त्यामुळे कावळीला

आपल्या घरट्यात दुसऱ्या कुणाचंतरी अंडे असावं, याची शंकाच नाही येत. मग कावळी कोकिळेचं अंडे उबविते आणि मग सप्तस्वरांत ताना मारून आसमंत भारून टाकणारा एक कोकीळ कावळीच्या घरट्यात आपसूक वाढू लागतो!" त्यानं आसूड मानेभोवती लपेटला.

'कोकीळ नि कावळीच्या घरट्यात?' मी विचार करू लागलो. कसं शक्य आहे ते? भगदत्ताची कल्पना खोटी नसेल कशावरून? आणि क्षणभर तो म्हणतो ते खरंही मानलं तरी कुठं बिघडतंय? कावळीच्या घरट्यात कोकीळ वाढतही असेल! पण तो काही कावळा म्हणून तर वाढत नाही! वसंतऋतूचा योग्य काळ येताच त्याची सप्तस्वरांतील तान इतर पक्षयांना गर्जून सांगतेच सांगते की, 'मी कोकीळ आहे! मी कोकीळ आहे!'

**

# दहा

एके दिवशी नगरातील सगळी मुलं एकत्र जमून नगराबाहेरच्या पठारावर खेळत होती. राजसभेचा खेळ खेळण्याची कल्पना कुणीतरी काढली होती! खरंच मुलं म्हणजे प्रतिसृष्टी निर्माण करणारे ॠषीच नसतात का? त्या दिवशी सगळ्यांनी राजसभेचा थाट उभा केला होता. जे-जे दणकट होते ते ते सभेतील कोशपाल, अश्वपाल, सेनापती, अमात्य, सचिव असे बहुमान स्वत:च पटकावून बसले होते! सभेची ही माहिती त्यांनी कशी काढली होती, हे एक मोठं आश्चर्यच होतं.

मध्येच एक उभट असा मोठा पाषाण होता. ते त्यांनी राजसिंहासन ठरविलं होतं! त्यांच्यामध्ये सेनापती झालेल्या शोणाला मी परत बोलवून आणण्यासाठी चाललो होतो, कारण बाबा त्या वेळी नुकतेच हस्तिनापुराहून गावी आले होते. आल्याबरोबर त्यांनी मला एक अत्यंत आनंदाची वार्ता सांगितली. परत जाताना ते मला आपल्याबरोबर हस्तिनापुराला नेणार होते! तिथं 'द्रोण' नावाचे एक अत्यंत युद्धकुशल आणि विद्वान गुरुदेव आहेत, असं त्यांनी मला सांगितलं. त्यांच्या हाताखाली ते मलाही युद्धविद्येचं शिक्षण घेण्यासाठी ठेवणार होते. ती वार्ता ऐकताच मला एकदम शोणाची आठवण झाली, पण तो पर्णकुटीत नव्हता. त्याला समजुतीनं ही वार्ता सांगायची असं मी ठरविलं होतं, कारण त्या वार्तेनं तो आई – बाबांच्याजवळ 'हस्तिनापुराला स्वत:ही जाण्याबाबत' हट्ट धरील अशी भीती होती. त्याची समजूत काढताना आम्हा सर्वांनाच अवघड जाणार होतं.

मी पठारावर आलो तसा सर्व मुलांनी एकदम मोठ्यानं गलका केला, "वसूला बोलवा! वसूला बोलवा!" शोणानं तर आनंदानं हात उंचावून मला हाकच घातली. "वसुदादा लवकर ये." मी झपाझप चालत त्यांच्याकडे गेलो. मी गेल्याबरोबर सर्वांनी मला गराडा घातला. सगळे एकदम मोठ्यानं ओरडू लागले. त्यामुळे ते काय म्हणताहेत ते मला चटकन समजेना. "राजा – वसू – कुंडलं – सेनापती" विचित्र सरमिसळ होत, शब्द गरगरत कानांवर आदळू लागले. दोन्ही हात उंचावून शेवटी मी ओरडलो, "सगळे गप्प बसा बघू!" आणि मग लागलीच सगळे शांत झाले.

"आम्ही सर्वांनी राजसभा तयार केली आहे. एकटा राजाच तेवढा आम्हाला योग्यसा मिळत नव्हता! तुझ्या कुंडलांमुळे आम्ही तुलाच राजा करायचं ठरविलं आहे!" सर्वांच्या वतीनं ब्रह्मदत्त म्हणाला. सर्वांनी एकदम ओरडून त्याला प्रतिसाद दिला.

"अरे, पण मी शोणाला बोलावून न्यायला आलो आहे." मी म्हणालो.

"अंहं, शोण नव्हे सेनापती! आणि सेनापतींना बोलवायला महाराजांनी जायचं नसतं. आम्हा सेवकांना तशी आज्ञा करायची असते." बाहुकेत उगाच खट्याळपणे म्हणाला.

"आणि आपण हो सेनापती, आपण महाराजांना अशी नावानं हाक मारायची असते का? म्हणे, अरे वसू इकडे ये! सेनापतीच नियम मोडू लागले तर मग सेनेनं काय करावं?" अमात्य झालेल्या ब्रह्मदत्तानं शोणाला दटावणी दिली.

मी आढेवेढे घेत असतानाच त्यांनी मला दंडाला धरून सरळ त्या काळ्या

पाषाणावर नेऊन बसविलं! अत्यंत आदरानं वाकत ब्रह्मदत्त म्हणाला, ‘‘चंपानगराधिपती वसुसेन महाराजांचा –’’ सर्वांनी आनंदातिशयानं त्याला प्रतिसाद दिला, ‘‘– विजय असो!’’ सगळे खाली बसले. माझी आता सुटका होणं शक्यच नव्हतं म्हणून मीही राजाच्या ऐटीत म्हणालो, ‘‘अमात्य, सभेचं कामकाज सभेपुढं सादर करण्यास अनुज्ञा आहे!’’ असं आमचं बोलणं चाललं आहे – इतक्यात शेजारी चरणाऱ्या गुरांतील एक धिप्पाड खोंड जयजयकाराच्या मोठ्या आवाजानं बिथरून गेला. आपली गोंडेदार शेपटी त्यानं ताठ उंच केली. कानांनी आवाजाचा वेध घेतला, फुसकारत नाकपुड्या विस्फारल्या आणि शिंगं रोखून तो सरळ आम्ही बसलो होतो त्या दिशेनं कानात वारा भरल्यासारखा धावून येऊ लागला. ब्रह्मदत्तानं त्याचं ते अक्राळविक्राळ स्वरूप पाहिलं आणि भेदरून जीव घेऊन स्वैरपणे पळता-पळता हात उंचावून तो ओरडला, ‘‘सेनापती – महाराज – पळा, पळा – राज्यावर – संकट –’’

पावसाचं पाणी जमिनीवर पडल्याबरोबर जसं क्षणभरातच पांगतं, तसे सगळे क्षणात कुठल्या कुठं पसार झाले! शोण माझ्याजवळ येऊन पळून जाण्यासाठी मला हाताला धरून ओढू लागला. मी झटकन त्या पाषाणावर ताठ उभा राहिलो. शोणाला वर घेऊन माझ्या मागं त्याला उभं केलं. झंझावातासारखा तो खोंड आमच्या दिशेनं येऊ लागला. त्याचे डोळे गरगर फिरत होते. समोर दिसेल त्या वस्तूला धडक मारून तिच्या ठिकऱ्या-ठिकऱ्या उडविण्यासाठी त्याच्या मस्तकातील नसन्नस उतावीळ झाली असावी. त्याच्या तोंडातून लाळेची लपलपती धार लोंबत होती. मध्येच ती किरणात चमकत होती. पाषाणासमोर आल्याबरोबर तो थोडा वेळ थांबला. पुढच्या पायांच्या खुरांनी त्यानं खरखर माती उकरली आणि शिंगं रोखून तो सूची बाणासारखा एकदम उसळला. मी क्षणभर आकाशात पाहिलं. सूर्यदेव आपल्या रथाचे असंख्य घोडे केवळ आपल्या दोन हातांनीच सहज आवरीत होते! काही समजायच्या आतच मी शोणाला मागं सारलं आणि दुसऱ्याच क्षणी माझ्या हातांची जबरदस्त पक्कड खोंडाच्या शिंगांभोवती पडली! शोणानं ‘दाऽऽदा!’ म्हणून हंबरडा फोडल्याचं अस्पष्टपणे मला ऐकू आलं. पुढं काय-काय झालं ते मला स्पष्टपणे आठवत नाही, पण जसजसे मला उडवून लावण्यासाठी त्या जनावरानं जबरदस्त हिसके मारले होते, तसतसे माझे दोन्ही हात त्याच्या शिंगांभोवती जास्तच आवळत गेले होते. माझं शरीर रथचक्राच्या लोखंडी धावा तापल्यावर जशा रसरशीत होतात तसं झालं आहे, असं मला वाटलं! त्यानंतर वसू कोण होता, कुठं होता, मला काहीच समजलं नाही.

जागा झालो त्या वेळी मी त्याच पठारावर होतो, पण माझं डोकं आईच्या मांडीवर होतं! जवळच बाबा उभे होते, त्यांनी हातात त्या खोंडाचे वेग धरले होते. मघाशी डोळे विस्फारून उधळणारा तो खोंड आता दमून धापा टाकीत उभा होता. त्याच्या तोंडातून फेस येत असावा! माझ्या डोक्याजवळ शोण उभा होता. एकटक तो माझ्याकडे पाहू लागला. मी डोळे उघडताच त्याच्या मुखावर हास्याची एक लकेर चमकून गेली. मी आजूबाजूला पाहिलं. मघाच्या खेळांतील ब्रह्मदत्त, वीरबाहू आणि त्याचे सोबती पुन्हा सभोवती जमले होते! मला एकदम राजसभेची आठवण झाली आणि क्षणापूर्वी आपल्या अंगात एक कसलीतरी तप्तशक्ती होती, असं वाटू लागलं. क्षणात ती शक्ती कुठंतरी निघून गेली होती. मला अतिशय थकल्यासारखं वाटू लागलं होतं, पण माझं अंग कुठंही ठणकत नव्हतं. मी झटकन उठून बसलो. आपणाला कुठंतरी लागलं असेल म्हणून मी

माझ्या शरीराकडे पाहिलं. अंगावर कुठंही एक साधा ओरखडासुद्धा नव्हता! मी उठून उभा राहिलो. बाबांजवळ जात त्यांच्या हातातील वेग हातात घेतले. त्या धापावणाऱ्या खोंडाच्या पाठीवर एक सणसणीत थाप मारली. त्याचं कातडं भीतीनं क्षणभर थरथरलं! आपली शेपटी आत ओढीत तो माझ्यापासून झटकन दूर झाला! शेजारीच त्या खोंडाचा गोपाल उभा होता. त्याच्या हातात मी त्या खोंडाचे वेग दिले. तो गोपाल डोळे फाडून माझ्याकडे पाहत आपला खोंड घेऊन निघून गेला!

राजसभाही संपली!

**

# अकरा

झालेल्या सर्व घटनेचं वर्णन संध्याकाळी ऐकलं. शोणानं सांगितलं की, त्या खोंडानं मला उडवून लावण्यासाठी अनेक प्रकार केले होते, पण माझ्यापुढं त्याचं काहीच चाललं नाही. चांगल्या दोन घटका तो चारी पाय उधळीत मान झटकत होता. त्यानं आपल्या शरीराला अनेक विचित्र झटके दिले होते. मधूनच तो उंच उडी मारी. पायांच्या खुरांनी जमीन उकरी, पण शेवटी तो दमला आणि गप्प उभा राहिला. त्याच्या तोंडातून फेसाची धार लागली. तो एकसारखा फुसफुसू लागला. एवढ्यात शोणानं धावत जाऊन बाबांना बोलावून आणलं. त्यांनीच त्याला वेग घातले, पण माझ्या हातांची पक्कड सोडविताना मात्र त्यांना फारच त्रास झाला. माझ्या अंगाला हात लावला की, अग्नीसारखा चटका बसत होता म्हणे!

मी विचार करू लागलो. दोन घटका एका रानटी शक्तीशी झटापट खेळूनही माझ्या अंगावर एकसुद्धा ओरखडा कसा नव्हता! माझं शरीर हाताला चटका बसण्याइतपत कसं तापू शकलं!

शोणाला मी कुतूहलानं विचारलं, "शोणा, तुला कधी खेळताना लागलं होतं काय रे?" तो म्हणाला, "अनेकदा. एकदा तर गंगेच्या पाण्यात मी खोलवर सूरकांडी मारली. पाण्यात टोकदार शिळा होती. माझं डोकं नेमकं तिच्यावरच आदळलं! एकदम डोळ्यांसमोर काजवे चमकले. पाण्याबाहेर आलो, तो पाण्याचा रंग लालभडक करीतच. माझ्या डोक्याला खोक पडली होती. ब्रह्मदत्तानंच मला पाण्याबाहेर काढलं होतं. कसलातरी औषधी पाला दगडानं वाटून त्यानं त्याचा रस माझ्या डोक्यावर सोडला होता! आई रागावेल म्हणून मी हे तिला कधीच सांगितलं नाही. तूही सांगू नकोस!" माझ्यापुढं डोकं वाकवून त्यानं डोक्यावरची जखमेची खूण मला दाखविली.

शोणाला खोक पडते. त्याच्या अंगातून रक्त वाहतं. मग माझ्याही अंगातून ते वाहणारच! मी ताडकन उठलो नि तसाच पर्णकुटीत गेलो. तिथं अनेक बाण नि धनुष्यं रांगेत ठेवलेली होती. त्यातला एक बाण सर्रकन खेचून घेतला. त्याचं धारदार पातं चंद्रकोरीसारखं चमकन चमकलं. हातातला तो बाण मी निर्धारानं डोक्याच्याही वर उचलला. त्याचं धारदार टोक बरोबर पायाच्या चंप्यावर येईल असं धरलं आणि बाण हातातून सोडून दिला! आपल्या पायात तो आता कचकन रुतणार या कल्पनेनं शहारून मी गपकन डोळे मिटून घेतले. डोळ्यांपुढं शुभ्र तेजस्वी प्रकाशाची तरळणारी वलयं उभी राहिली! बाण पायावर पडला; पण नुसतं गवताच्या काडीनं काहीतरी टोचल्यासारखं मला वाटलं. बाणाचं टोक माझ्या पायाच्या कातडीत घुसलं नव्हतं! मला वाटलं मी तो सोडायलाच चुकलो असेन म्हणून पुन:पुन्हा मी तो माझ्या पायावर सोडला, पण एकदाही त्याचं टोक माझ्या पायाच्या कातडीत घुसलं नाही! बारकाईनं मी पायाकडे पाहिलं. तिथे एखादा साधा व्रणही उठलेला नव्हता. कुतूहलाचं नि शंकेचं पिशाच्च माझ्यासमोर अनेक प्रश्नांच्या झिंज्या पसरून नाचू लागलं. मी माझ्या हातातील बाणाचं टोक वेड्यासारखं मांडी, दंड, छाती, पोट जिथं मिळेल तिथं जोमानं खुपसण्याचा प्रयत्न करू लागलो, पण

ते कुठंच शरीराच्या आत तसूभरही शिरू शकत नव्हतं! का शिरू शकत नव्हतं ते? का? का??

माझ्या शरीरावरचं कातडं अभेद्य आहे की काय? मनाच्या आकाशातून शंकेची एक वीज या कडेपासून त्या कडेपर्यंत कडाडत गेली. होय! माझ्या सर्वांगाभोवती एक कशानंही न तुटणारं अभेद्य कवचच असलं पाहिजे. अभेद्य कवच! वा! मग धावत्या रथातूनही मी जरी खाली उडी मारली, तरी कधी मला लागणार नाही! दगड, धोंडे, किंवा कसलंही शस्त्र यांपासून माझ्यावर कधीच घाव होणार नाही. घाव होणार नाही म्हणजेच मी कधीही मरणार नाही! कधीही मरणार नाही! माझी ही सोनेरी रंगाची त्वचा अशीच सदैव झळाळत राहणार! मी अमर राहणार! माझी त्वचा अभेद्य आहे म्हणूनच आज त्या उन्मत्त खोंडाशी झगडताना मला कुठंच नाही लागलं. मला कवच आहे. माझ्या कानात झगझगणारी कुंडलं आहेत. शोण माझा सख्खा भाऊ आहे; तरीही त्याला मात्र कवच किंवा कुंडलं यांपैकी काहीच नाही. मला एकटयालाच ती का मिळालीत? मी कोण आहे? कोण आहे मी? शंकेची टिटवी माझ्या मनाच्या आकाशात कर्कशपणे केकाटू लागली. उलट-सुलट विचारांचा अग्नी धुमसू लागला. वाटलं, आपण या सर्वांहून कोणीतरी वेगळे आहोत, त्यांच्यात नि आपल्यात फारच मोठं अंतर आहे, पण या विचारांची माझी मलाच खंत वाटू लागली. ज्या राधामातेचं दूध मी प्यालो होतो, जिच्या रक्तामांसाचा वसा घेऊन मी वाढलो होतो, जिनं माझ्यासाठी काबाडकष्टांचा पर्वत उपसला होता, तिच्या प्रेमाशी, त्या विचारांनी मी कृतघ्नच होत नव्हतो काय? ‘वसुदादा... वसुदादा...’ म्हणून ज्यानं माझ्या नावाचा निरागसपणे एकसारखा जप केला होता, त्या माझ्या प्रेमळ भावाशी ती प्रतारणा नव्हती काय? माझं मन बंड करून उठलं नि मला कठोर जाणीव देऊ लागलं, ‘मी कोण आहे? मी कोण आहे? असा वेडयासारखा किंचाळू नकोस! लक्षात ठेव, तू अधिरथबाबा नि राधामाता यांचा मुलगा आहेस! सूतपुत्र कर्ण आहेस! शोणाचा वडील बंधू कर्ण आहेस! सारथ्यांच्या कुलातील एक सारथी आहेस! एक सारथी!’

**

# बारा

दुसऱ्या दिवशी बाबांनी मला हस्तिनापूरला निघण्याची तयारी करून ठेवायला सांगितलं. मी त्यांच्या आज्ञेप्रमाणं लागणारं एक-एक साहित्य एकत्र करू लागलो. मनात अनेक विचारांचं काहूर दाटलं होतं. आता चंपानगर सोडावं लागणार होतं. इथले हे आकाशाशी स्पर्धा करणारे किंशुक, सांतवण, डंडणी, मधुक, पाटल नि खदिराचे वृक्ष आता मला अंतरणार होते. इथल्या पत्ररथ, श्येन, कोकीळ, क्रौंच, कपोत या पक्षयांपासून मी आता दूर-दूर जाणार होतो! इथल्या ब्रह्मदत्त, वीरमित्र, बाहुकेत ह्या मित्रांना मी दुरावणार होतो. वटवृक्षाच्या गर्द छायेत असलेल्या नि मला गेली चौदा वर्षं आपल्या प्रेमाचा उबारा देणाऱ्या त्या सुंदर पर्णकुटीला मी आता आचवणार होतो. जिनं मला तळहाताच्या फोडाप्रमाणे जपलं होतं, गाईच्या वासरासारखं वाढविलं होतं, हरिणीच्या शावकासारखं जतन केलं होतं त्या राधामातेला सोडून मी आता दूर कुठंतरी जाणार होतो. जिच्या दुधाचे तुषार अजूनही माझ्या ओठांवरून सुकले नव्हते, त्या माझ्या प्रिय मातेला अश्रूंशिवाय दुसरं काहीही न देता मी जाणार होतो. 'वसुदादा, वसुदादा' या नावाचा उच्चार करताना ज्याचे ओठ कधीही थकले नव्हते, त्या चौकस, निरागस नि भाबड्या शोणाची आणि माझी आता ताटातूट होणार होती आणि सगळ्यांत मोठी अशी एक गोष्ट मला एकसारखी जाणवू लागली की, इथल्या गंगामातेच्या अफाट पाण्यातून वर येताना माझ्यासाठी उत्साहाचे प्रचंड स्त्रोत घेऊन येणाऱ्या सूर्यदेवांना पुन्हा त्याच स्वरूपात मी इथून पुढं पाहणार नव्हतो. मी हस्तिनापूरला जाणार होतो. कसं असेल ते हस्तिनापूर? तिथं मोठमोठे वाडे आहेत म्हणे. प्रचंड व्यायामशाला, अनेकविध शस्त्रास्त्रांनी ठासून भरलेल्या शस्त्रशाला, फुरफुरणाऱ्या धिप्पाड घोड्यांच्या रांगांनी भरून गेलेल्या अश्वशाला, सांतवण वृक्षांसारखे आकाशाच्या पोटात ज्यांचे कळस गेले आहेत, अशी भव्य मंदिरं तिथं आहेत, आणि दाराच्या कवाडासारखी छाती असलेले, पीळदार दंड आणि मांड्या असलेले असंख्य योद्धे यांनी ते गजबजून गेलेलं आहे. कुरुकुलातील पराक्रमी राजांच्या राजधानीचं नगर आहे म्हणे ते! कोणत्या दिशेला असेल ते?

विचारांच्या तंद्रीत हाती लागेल ते साहित्य मी भराभर रथाजवळ आणून ठेवीत होतो. तेवढ्यात शोण बाहेरून आला. त्यानंही मला मदत करायला सुरुवात केली. त्याला अजूनही कल्पना नव्हती की, आज मीही जाणार होतो. तो म्हणाला, "वसुदादा, बाबा नेहमीच रथ घेऊन इथं येतील तर किती छान होईल नाही? आपणाला मग नेहमीच रथातून फिरायला मिळेल." मी काहीच बोललो नाही. 'आज मी तुला सोडून जाणार' हे त्याला कसं सांगावं तेच मला समजत नव्हतं. शेवटी जाण्यासाठी म्हणून बाबा रथाला घोडे जोडू लागले. शोणच त्यांना एक-एक घोडा आणून देऊ लागला. दारात उभ्या राहिलेल्या आईला मी वाकून वंदन केलं. मला वर उठवीत तिनं माझ्या मस्तकाचं दीर्घ अवघ्राण केलं. मला उराशी कवटाळीत भारावून ती गदगदून म्हणाली, "एकच लक्षात ठेव वसू, गंगेच्या पाण्यात कधीच खोलवर जाऊ नकोस!" तिच्या डोळ्यांतून अश्रूंच्या

सरी ओघळू लागल्या. त्यांतील दोन अश्रुबिंदू माझ्या मस्तकावर पडले. माझ्या सर्वांगावर रोमांच उभे राहिले. वायुगतीनं शरीरातील रक्त जोरानं फिरू लागलं. माझ्या रक्तातील बिंदून्‌बिंदू त्या अश्रूंना आत्यंतिक प्रेमानं सांगत होता, 'माते, तुझ्या या उपदेशाचं मोल कसं जतन करू? केवळ एवढंच सांगतो की, साक्षात मृत्यू आला तरी तुझा वसू कधीच सत्यापासून किंचितही ढळणार नाही!'

काहीतरी आठवल्यामुळे ती पुन्हा पर्णकुटीत गेली. लागलीच बाहेर येत तिनं माझ्या हातावर एक चांदीची लहान पेटी ठेवली! अत्यंत भारावलेल्या स्वरात ती म्हणाली, "वसू, जेव्हा-जेव्हा तुला माझी आठवण होईल तेव्हा-तेव्हा तू या पेटीचं दर्शन घे. माझ्या जागी तिलाच मान! तुझी आईच आहे, असं समजून तिला सांभाळ!"

मी पेटी उत्तरीयात व्यवस्थित बांधून घेतली. आणखी एकदा आईला वंदन केलं. तिनं थरथरत्या हातानं दह्याचे चार थेंब माझ्या हातावर घातले. मी ते घेतले. एकदा त्या सगळ्या पर्णकुटीवर दृष्टिक्षेप टाकून मी ती डोळ्यांत सामावून घेतली आणि वळलो. रथ तयारच होता. शोण बाबांना काहीतरी विचारीत होता. बाबांनी मला रथात बसायला सांगितलं.

मी रथात बसताच शोणानं बाबांना विचारलं, "दादा कुठं निघालाय?" त्याचे डोळे बावरले होते. रडवेले झाले होते.

"तो माझ्याबरोबर हस्तिनापूरला येणार आहे. तू जा आत." बाबांनी घोड्यांचे वेग आपल्या हातात घेऊन एकदम त्यांच्या पाठीवर जोरदार आसूड मारीत त्याला सांगितलं. घोडे चौखूर उधळले आणि वेगानं धावू लागले. शोण हात उंचावीत "दादा थांबऽऽ दादा थांब," म्हणत रथामागून धावू लागला. आईनं पुढं होत, चटकन त्याला पकडलं! मी सुटकेचा निःश्वास टाकला. रथ पुढं धावू लागला, पण शोण पुन्हा आईच्या हातातून निसटला होता! दूरवर त्याची लहानशी आकृती पुढं – पुढं सरकताना दिसत होती. उत्तरीय सावरीत, एक हात वर उंच करीत तो धावतच होता. नगरीच्या सीमेपर्यंत आम्ही आलो! मला वाटलं होतं, शोण दमून शेवटी तसाच परत जाईल, पण हात उंचावीत तो अजूनही धावतच होता. मी बाबांना रथ थांबवायला सांगितलं. आम्ही थांबलेले पाहून जो जास्तच वेगानं धावू लागला. भोळ्या-भाबड्या नि पोरकट वाटणाऱ्या शोणाच्या अंगीसुद्धा किती मोठी चिकाटी होती! त्याला माझ्याबरोबर यायचं होतं म्हणून तो भान विसरून धावतच होता. किती हट्टी होता तो? पण हट्टी तरी कसा? किती सहज नि निर्भेळ प्रेम होतं त्याचं माझ्यावर! थोड्या वेळातच तो धापावत आमच्याजवळ आला. त्याची कोवळी मुद्रा घामानं डवरून गेली होती. फारच दमला होता तो, पण तशा स्थितीतही चटकन पुढं होत त्यानं वेगानं रथात झेप घेत उडी मारली. चेहरा रडवेला करून धाप लागल्यामुळे तुटक-तुटक शब्दांत तो म्हणाला, "म – मला – मला सोडून जातोस की काय रे दादा? तू – तू गेलास तर – तर मीही तुझ्याबरोबरच येणार; परत जाणार नाहीय!" मी बाबांच्याकडे पाहिलं. क्षणभरच थांबून कसलातरी निश्चय केल्यासारखं ते म्हणाले, "ठीक आहे, चल तूही!" शोणानं आनंदानं मला एकदम कडकडून मिठी मारली. मी उत्तरीयानं त्याच्या तोंडावरचा घाम पुसला. खरंच किती भाग्यवान होतो मी? मला शोणासारखा प्रेमळ भाऊ लाभला होता!

नगरीजवळची एक-एक खुणेची ठिकाणं मागं पडू लागली. आजूबाजूच्या गर्द वनराईत चंपानगरी अस्पष्ट होऊ लागली. माझं बालपणही अस्पष्ट होऊ लागलं.

माझ्या बालपणाचे ठसे उमटलेला तो हिरवा आसमंत क्षणाक्षणाला डोळ्यांआड होऊ लागला. बकुल, खदिर, डंडणींचे वृक्ष मागं पडू लागले. भूछत्रासारख्या दिसणाऱ्या चंपानगरीतील आमच्या शेजाऱ्यांच्या पर्णकुटचा मागं पडू लागल्या. दोन दिवसांपूर्वी ज्या पठारावर आम्ही राजसभेचा खेळ मांडला होता ते नगरीबाहेरचं पठार आलं! त्यावरचा काळा पाषाण मध्यभागी एकाकीपणे तापत उभा होता. मला राजा म्हणून मान देणारं ते लुटुपुटीचं, पाषाणाचं सिंहासन – महाराज वसुसेनांचं ते सिंहासन – मला मूकपणे निरोप देऊ लागलं. हात उंचावून मी त्याला नि चंपानगरीला वंदन केलं. माझं जीवन बालपणाची हिरवळ सोडून धावू लागलं! चंपानगरीकडून हस्तिनापुराकडे!

**

# तेरा

हस्तिनापूर! कुरुराजांची सामर्थ्यशाली नि संपन्न राजनगरी! महापराक्रमी योद्ध्यांची नगरी! अनेकविध कलाकारांची नगरी! ज्या नगरीची मी मनोमन चित्रं रेखाटत होतो, ज्या नगरीबद्दल मी बाबांच्या तोंडून आजपर्यंत नुसतं ऐकतच आलो होतो, ते हस्तिनापूर एक मासानंतर दृष्टिक्षेपात येऊ लागलं. वाड्यांचे आणि मंदिरांचे कळस आकाशाच्या उदरात घुसल्यासारखे उभे होते. नगराला चंदेरी पाण्याचा विळखा देऊन गंगा संथपणे वाहत होती. तिच्या पात्रावर असंख्य पक्षी चीत्कारत होते. आजूबाजूच्या दोन-तीन योजनांत फक्त उंचच उंच वाडे, गोशाला, अश्वशाला, मंदिरं नि व्यायामशाला यांची गर्दी उडाली होती. महाप्रतापी नि पुण्यवान कौरवराज धृतराष्ट्रांच्या नगरात आमचा रथ प्रवेश करीत होता. माझ्या आयुष्याचा रथसुद्धा आता या नगराच्या मार्गावरूनच धावणार होता. चंपानगरीत गंगामातेनं जशी मला सोबत दिली होती तशीच ती इथंही देईल काय? मी स्वत:लाच विचारलं. मार्गावरची धूळ उडवीत रथ नगराच्या सीमेत घुसला. घोडे पाण्याला घेऊन जाणारे अश्वपाल, गाईंच्या घंटांच्या तालावर परत फिरणारे गोपाल, पाण्याकरिता गंगेकडे कलश घेऊन चाललेल्या स्त्रिया, शेतातील मशागत करून खांद्यावर नांगर टाकून परत फिरणारे कृषिजन... माझे डोळे तेथील एक-एक दृश्य टिपू लागले. पश्चिम क्षितिजावर सूर्यदेव नगराचा निरोप घेण्यासाठी रेंगाळत होते. त्यांनी फेकलेल्या किरणांनी क्षितिजावरच्या ढगांना गुलाबी, केसरी, रुपेरी असे अनेक रंग चढले होते. आपल्या किरणांनी ती मनोहर किमया करणाऱ्या सूर्यदेवांकडे मी आदरानं पाहू लागलो! आपली काहीतरी मौल्यवान वस्तू दुसऱ्याच्या हाती देताना एखाद्या कुलललनेच्या मुखावर जसा विरहाचा भाव असतो, तसलाच काहीतरी विचित्र भाव त्यांच्या त्या स्वरूपात मला दिसत होता! त्यांच्या शेजारीच एक काळाकुट्ट ढग होता. त्यामुळे मला कदाचित तसा भास झाला असेल! आपल्या मावळत्या किरणांची असंख्य लांबट बोटं हस्तिनापुराच्या मुखावर फिरवून जणू ते त्याला सांगत होते, "आता आपली भेट उद्या!"

आमचा रथ राजवाड्याच्या महाद्वारातून आत शिरला. द्वारपालांनी वाकून बाबांना अभिवादन केलं. रथ अश्वशालेपाशी थांबला. नेहमीप्रमाणं शोण पटकन उडी मारून खाली उतरला. मी रथातूनच राजवाडा पाहू लागलो. नुकत्याच जन्मलेल्या मुलासारखा तो गोंडस दिसत होता! तो संपूर्ण राजवाडा पांढऱ्या संगमरवरी पाषाणांनी बांधला होता. सगळी चंपानगरी सहज त्या राजवाड्याच्या तटात बसू शकली असती इतका त्याचा घेर मोठा होता! तट घडविलेल्या काळ्या पाषाणांनी बांधलेला होता. काळ्या तटांत असलेला तो धवल राजवाडा मातीच्या काळ्या मडक्यात काठोकाठ भरलेल्या लोण्याच्या गोळ्यासारखा दिसत होता! आत दुहाती अनेक दालनं होती. मध्ये एक गोलाकार असा पाण्याचा तलाव होता. त्यात मावळत्या सूर्यदेवांची असंख्य किरणं मन मानेल तसा विहार करीत होती. निरनिराळ्या रंगांचे मासे नि शुभ्र, ऐटदार मानेचे राजहंस विहरत होते. निळ्या-पांढऱ्या रंगांची कमळं वायुलहरींबरोबर इकडे-तिकडे डोलत

होती. त्या तलावाच्या चारी कोपऱ्यांवर शुभ्र पाषाणांत कोरलेल्या चार सिंहाकृती होत्या. समोरच राजवाड्यात जाण्यासाठी वर चढलेल्या असंख्य पायदंड्या होत्या. चाळा म्हणून मी त्या सहज मोजल्या. एकेश पाच होत्या त्या! एखादी पायदंडी चुकली तर नाही ना? या शंकेनं मी त्या परत मोजू लागलो. एक – दोन – चार – दहा – वीस – पन्नास – शंभर – एकशे एक – दोन – चार – पाच नि एकशे सहा! अरे मघाशी तर एकशे पाच होत्या. आता एकशे सहा कशा झाल्या? मी विचार करू लागलो. 'असेनात का एकशे पाच, नाहीतर एकशे सहा! आपणाला काय?' असा विचार करीत उत्तरीय सावरीत मी हस्तिनापुराच्या त्या वैभवशाली नि पवित्र भूमीवर पाय ठेवणार, इतक्यात काळ्याभोर सात घोड्यांचा एक रथ वायूच्या गतीनं धडाधड आवाज करीत महाद्वारातून आत शिरला! कुणीतरी पोटतिडकीनं ललकारी दिली – "हस्तिनापुराधिपती महाराज धृतराष्ट्रपुत्र युवराज शिरोमणी दुर्योधनऽऽ!" सगळे सेवक नि द्वारपाल एकदम अंग झटकून उभे राहिले. बाबांनीही रथाच्या दिशेनं वाकून अभिवादन केलं.

"काय काका? केव्हा आलात चंपानगरीहून?" युवराजानं रथातून उतरताना हसत-हसत विचारलं.

"हा आत्ताच येतो आहे युवराज." बाबांनी विनयानं उत्तर दिलं.

मी रथातून युवराज दुर्योधनाकडे पाहू लागलो. त्याच्या अंगावर योद्धयाचा वेष होता. त्यात तो विष्णूसारखा शोभून दिसत होता. हातातील डेरेदार गदेमुळे तर तो फारच ऐटदार दिसत होता. एकाच झटक्यात उडी मारून तो खाली उतरला आणि बाबांजवळ आला. त्याच्या चालीत कोणातही न आढळणारी ऐट होती. त्याचं प्रत्येक पाऊल मत्त हत्तीप्रमाणं भूमीत भक्कमपणे रुतत होतं. हातावरून वारंवार घसरणारं उत्तरीय सावरताना तो आपल्या हाताला दमदार झटके देत होता. त्याचे घारसट डोळे विलक्षण भेदक नि पाणीदार होते. नाक भाल्याच्या पात्यासारखं सरळ तरतरीत होतं, पण का कुणास ठाऊक त्याच्यातील एकच गोष्ट मात्र मला खटकली; ती ही की, सगळ्या जगाला विळखा घालू पाहणाऱ्या एखाद्या अजगरासारख्या त्याच्या भुवया फारच जाड नि वक्र होत्या!

आमच्याकडे पाहत त्यानं बाबांना विचारलं, "काका, हे कोण?"

"हा माझा मुलगा कर्ण आणि हा त्याचा छोटा बंधू शोण; युवराज!" बाबांनी उत्तर दिलं.

"कर्ण आणि शोण! छान लय आहे! पण यांना कसं काय आणलंत आज?"

"आपली राजनगरी दाखवायला."

"ठीक आहे. अमात्यांना भेटा. ते दाखवतील त्यांना सगळं नगर."

झंझावातासारखा तो आला तसा वळला नि विजेसारखा झपाझप राजवाड्याच्या पायदंड्या चढू लागला. जवळ-जवळ सगळ्या पायदंड्या तो चढूनही गेला. आता एकच पायदंडी शिल्लक राहिली, पण तेथेच थांबून तो पुन्हा माघारी वळला नि पावसाच्या सरीसारखा क्षणार्धात सरसर त्या सगळ्या पायदंड्या उतरून तो परत आमच्याजवळ आला. माझ्याजवळ येऊन माझ्या कुंडलांकडे एकटक पाहत तो म्हणाला, "ही तुझी कुंडलं तुला जन्मजातच आहेत काय?"

"होय." मी त्याच्या घाऱ्या डोळ्यांत खोलवर पाहत उत्तर दिलं.

"फारच सुंदर दिसतोस तू या कुंडलांमुळे! इतका की, तू या काकांचा मुलगा आहेस

यावर कुणाचाही विश्वास बसणार नाही! काय काका?'' माझ्या खांद्यावर हात ठेवीत त्यानं मान मागं टाकून खदखदा हसत बाबांना प्रश्न विचारला. ते गडबडून गेले असावेत. काहीच उत्तर न देता ते तसेच गप्प उभे राहिले!

मघाच्या त्या काळ्याकुट्ट ढगानं बहुधा सूर्यदेवांना झाकलं असावं! कारण पांढऱ्याशुभ्र दगडांचा तो सगळा राजवाडा क्षणात पांढरट फिकट दिसू लागला! मला त्यामुळे थोडंसं कोंदटल्यासारखं वाटलं! युवराज दुर्योधन आला तसा परत झपाझप पावलं टाकीत पायदंड्या चढून निघूनही गेला. आम्ही दोघंही त्याच्याकडे पाहतच राहिलो. त्याची पाठमोरी आकृती हळूहळू अस्पष्ट होत गेली.

थोड्या वेळापूर्वी झाकाळलेलं आकाश आता निवळलं असावं, कारण अस्पष्ट दिसणाऱ्या पायदंड्या पुन्हा स्पष्ट दिसू लागल्या!

बाबा रथशाळेत रथ सोडून आले. पायदंड्या चढण्याचा त्रास नको म्हणून शोणाला त्यांनी आपल्या दालनात पोहोचतं केलं. महाराज धृतराष्ट्रांना भेटण्यासाठी म्हणून आम्ही त्या भव्य राजवाड्याच्या पायदंड्या चढू लागलो. त्या पायदंड्या चढताना माझ्या मनाच्या मंदिरात स्मृतींच्या घंटा घणघणू लागल्या. बाबांनी अशाच केव्हातरी सांगितलेल्या कुरुवंशातील पराक्रमी पूर्वजांच्या गोष्टी मनाच्या खोल गाभाऱ्यातून उफाळून एकाएकी वर येऊ लागल्या. भीती, कुतूहल, आदर, संकोच नि श्रद्धा अशा अनेक विचित्र भावनांनी माझं मन भरून येऊ लागलं.

सोमवंशातील पराक्रमी महाराज हस्ती यांनीच हे नगर गंगेचं विपुल आणि स्वच्छ पाणी पाहून फार वर्षांपूर्वी इथं वसविलं होतं. त्यांचे पणतू 'महाराज कुरू' इतके पराक्रमी निघाले की, त्यांच्या नावानंच प्रजाजन पूर्वीच्या सोमवंशाला कुरुवंश म्हणून ओळखू लागले. त्यांच्या वंशजांना कौरव म्हणून मानू लागले. त्या महापराक्रमी महाराज कुरूंनीच हा वाडा बांधला होता.

ज्या सोमवंशात बुद्धिमान मनू, पुरुषश्रेष्ठ पुरुरवा, इंद्रालासुद्धा शरणागती पत्करायला लावणारे नहुष, आपल्या दिग्विजयानं सारा आर्यावर्त दणाणून सोडणारे ययाती, त्यांचे पराक्रमी पुत्र यदू नि पुरू, जनमेजय, अहंयाती, देवातिथी, दुष्यंत, भरत, हस्ती आणि अजमीढ यांसारखे तेजस्वी महाराज झाले होते, त्या सोमवंशाचा आपल्या कर्तृत्वानं प्रजाजनांना विसर पाडायला लावणारे महाराज कुरू किती विक्रमी नि गुणसंपन्न असले पाहिजेत! कसे असतील ते महाराज कुरू? पण महाराज कुरूच का? त्यांच्यानंतर तरी या राजवाड्यावर काय कमी पराक्रमी राहिले होते? विदूरथ, अनश्वन, परीक्षित, भीमसेन, परिश्रवस् अशी एकापेक्षा एक पराक्रमी महाराजांची मालिकाच या कुरुकुलात तयार झाली होती. महाराज कुरू म्हणजे तर कुरुकुलाचं भूषणच होतं. एका मत्स्यकन्येशी विवाह करणारे परिश्रवस् महाराजांचे पुत्र शंतनू यांनी तर कुरुकुलात एक नवाच आदर्श घालून दिला होता. एवढ्या अमाप राज्यवैभवावर यःकश्चित म्हणून लाथ मारणारे त्यांचे बंधू महाराज देवापी म्हणजे तर कुरुकुलाच्या परंपरेचा साक्षात कळसच!

किती विविध प्रकारच्या विजयाच्या आनंदानं धुंद झालेले एकेक दिवस या राजवाड्यानं पाहिले असतील!

एक-एक कक्ष मागं टाकीत आम्ही चाललो. माझे डोळे जाता-जाता जेवढं – जेवढं शक्य होतं तेवढं टिपू लागले. राजवाडा अनेक सुघड कक्षांनी सुशोभित दिसत होता. कक्षातील प्रत्येक पाषाणी खांबावर सुबक नक्षी कोरली होती. खांब एकेका अखंड

गंडकी पाषाणातच घडविले होते. कक्षांच्या भित्तींवर कुरुकुलातील पूर्वजांच्या जीवनप्रसंगांवरील अनेक सुंदर-सुंदर चित्रं रेखाटली होती. प्रत्येक कक्षाच्या द्वारावर दास-दासी विनयानं उभ्या होत्या. त्यांच्या प्रत्येक हालचाली तत्परतेनं होत होत्या. जागोजागी योद्धयांचे सुबक असे निरनिराळ्या पावित्र्यातले घोटीव पाषाणी पुतळे उभे होते. ठिकठिकाणी लाकडी पिंजऱ्यात मयूर, कोकीळ, कपोत, भारद्वाज असे पक्षी कोंडले होते. ते चित्रविचित्र आवाज काढीत होते. कौरवांच्या पराक्रमाचं जिवंत शिल्प होतं, ती राजवास्तू!

आम्ही महाराजांच्या रक्षित कक्षात आलो. सगळी उत्सुकता डोळ्यांत आणून मी पाहू लागलो. सोन्यानं मढविलेल्या एका उंच नक्षीदार आसनावर महाराज धृतराष्ट्र बसले होते. त्यांच्या मस्तकावर नक्षीदार सोनेरी मुकुट होता. अंगात मधूनच चमचमणारी तलम राजवस्त्रं होती. गळ्यात माणिक, मोती, वैदूर्य यांच्या टपोऱ्या माळा होत्या. त्यांतून बाहेर पडलेली प्रकाशाची निळसर वलयं त्यांच्या पुष्ट गळ्याभोवती दाटली होती. रुंद छातीचे महाराज दाट, भरदार, पांढऱ्या दाढीमुळे ऐटदार दिसत होते, पण त्यांच्या डोळ्यांभोवती काळी-काळी वलयं होती! डोळे मिटल्यासारखे दिसत होते. त्यांच्या उजव्या हाताला – पण थोडंसं खाली – एका साध्या लाकडी आसनावर एक सौम्य नि नितळ चेहऱ्याची व्यक्ती बसली होती. शुभ्र उत्तरीयाचं एक टोक तिनं डाव्या खांद्यावरून मागं टाकलं होतं. त्यातून उघडे पडलेले गोरे पुष्ट दंड केळीच्या गाभ्यासारखे सतेज होते. चेहरा कुंभासारखा गोल होता. डोळे शांत नि गंभीर होते. कपाळावर गंधाचा एक ठसठशीत टिळा होता. महाराजांच्या डाव्या बाजूला आणखी एक उंचीपुरी व्यक्ती हातात दंड घेऊन उभी होती.

आत्यंतिक आदरानं बाबांनी महाराजांना वाकून वंदन केलं. मलाही त्यांनी तसं करण्यासाठी खुणावलं. मीही वाकून प्रणाम केला.

"मी आपला सेवक सूतराज अधिरथ, आपणाला क्षेम इच्छून वंदन करीत आहे. माझा हा पुत्र कर्णही अत्यंत आदरानं आपणाला वंदन करत आहे, महाराज." वाकूनच बाबा म्हणाले.

"ये. सूतराज अधिरथा, काय म्हणतेय तुझी चंपानगरी? आणि तुझ्याबरोबर तुझा तो कवच-कुंडलं असलेला पुत्रही आहे की काय? आम्ही पुष्कळ ऐकलं आहे, त्याच्या त्या कवचकुंडलांबद्दल!"

"होय महाराज, तोच तो कर्ण."

"अस्सं! बाळ कर्णा, जवळ ये." त्यांनी अचूक माझ्याकडे हात केला.

बाबांनी मला जवळ जाण्यासाठी खुणावलं. मी झटकन पुढं झालो. महाराजांनी चाचपडत माझा हात हातात धरला. मी त्यांच्या चेहऱ्याकडे पाहिलं. त्यांच्या दोन्ही डोळ्यांच्या लिबलिबीत, तांबसर कडा पाणावल्या होत्या. पापण्यांजवळचे स्नायू पापण्या उघडण्यासाठी अतिशय अधीरतेनं वळवळू लागले, पण पापण्या उघडण्याऐवजी डोळ्यांच्या कडांवर साचलेलं पाणी मात्र घरंगळून गालांवरच्या शुभ्र दाढीत मिसळलं! मी वाकून त्यांच्या चरणांना स्पर्श केला. त्यांनी दंडाला धरून मला झटकन वर उठविलं. आपल्या थरथरत्या हातांनी त्यांनी माझा चेहरा आपल्या ओंजळीत धरला. बोटांनी कानातील कुंडलं चाचपून पाहिली. त्यांच्या त्या थरथरत्या स्पर्शात कसलीतरी विलक्षण ओढ होती. भुवया उंचावीत उजवीकडे वळून ते म्हणाले, "विदुर, खरोखरच आश्चर्य आहे.

याची ही मांसल कुंडलं म्हणजे असामान्य गोष्ट आहे.”

“होय महाराज आणि त्याच्या अंगावर हिरण्यवर्णाचं कवचही आहे!” विदुरानं बाबांकडे पाहत विचारलं, “अधिरथा, तू तर शामवर्णी आहेस, मग तुझा हा पुत्र हिरण्यवर्णी कसा?”

“तो मातृवर्णी आहे गुरुदेव!” बाबा हात जोडून महाराजांना म्हणाले, “एक विंनती आहे महाराज.”

“बोल अधिरथा, काय आहे?”

“राजकुमारांच्या बरोबर माझ्या पुत्रांनाही काही युद्धशास्त्र शिकायला मिळालं तर –”

“अवश्य. अधिरथा, असाच जा आणि गुरू द्रोणांना भेटून यांची नावं त्यांच्या युद्धशालेत आत्ताच घालून टाक.”

डावीकडे उभ्या असलेल्या उंच व्यक्तीला महाराज म्हणाले, “वृषवर्मा, यांना लागेल ती मदत करा.”

“आज्ञा महाराज” राजदंड जराही न वाकविता अमात्य वृषवर्मांनी वंदन केलं.

महाराजांना वंदन करून आम्ही बाहेर पडलो. वळवण्यापूर्वी मी विदुरांकडे पाहिलं. त्यांच्या भव्य कपाळावर एक बारीकशी आठी उठलेली मला दिसली! कुठंतरी लांबवर पाऊस पडत असला की, कधी-कधी निरभ्र आकाशातसुद्धा नुसतीच वीज चमकून जाते, तशी ती मला वाटली!

**

# चौदा

आम्ही नगरातून युद्धशालेकडे चाललो. मी बाबांना विचारलं, ‘‘महाराजांच्या डोळ्यांना काय झालं आहे?’’

‘‘ते अंध आहेत बाळ! आणि म्हणूनच त्यांच्या पत्नी – राजामाता गांधारीदेवीसुद्धा समदु:खी होण्यासाठी डोळ्यांना वस्त्र बांधून हे जग पाहण्याचं टाळतात!’’

‘‘राजमाता गांधारीदेवी?’’

‘‘होय! युवराज दुर्योधनाची माता. त्यांना आणखी नव्याण्णव पुत्र आहेत. आता युद्धशालेत तू त्या सर्वांना पाहशीलच. महाराज पांडूंचे पुत्र पांडवही तुला आता पाहायला मिळतील!”

“पांडव?”

‘‘होय. या राज्याचे खरे अधिकारी कौरवराज महाराज पांडू होते, पण ते अकालीच वारल्यामुळे हे राज्य त्यांचे बंधू महाराज धृतराष्ट्र यांच्याकडे आलं. त्या महाराज पांडूंचे जे पाच पुत्र आहेत त्यांनाच नगरजन पांडव म्हणतात.”

‘‘म्हणजे कुरुकुलात एकशे पाच राजकुमार आहेत तर एकूण! पाच पांडव आणि शंभर धार्तराष्ट्र!” इतके राजकुमार एकमेकांशी कसे वागत असतील, याचं कुतूहल माझ्या मनात निर्माण झालं.

‘‘आणि दोन महाराज आणि एक पितामह – पितामह भीष्म!” बाबा म्हणाले.

‘‘दोन महाराज कोण?’’

‘‘एक महाराज धृतराष्ट्र आणि दुसरे विदुर.”

‘‘विदुर महाराज कसे? मघाशी तर तुम्ही त्यांना गुरुदेव म्हणालात?’’

‘‘होय बाळ, महाराज धृतराष्ट्रांचे गुरुदेव विदुर हे बंधू आहेत, पण त्यांनी राजसंन्यास घेतला आहे.”

‘‘संन्यास? ‘संन्यास’ म्हणजे काय?”

‘‘संन्यास म्हणजे त्यांनी सगळ्या गोष्टी सोडून दिल्या आहेत. हे राज्य, हा राजवाडा, हे वैभव यांपैकी कशावरच त्यांनी अधिकार सांगितला नाही.”

‘‘मग ते इथं कसे राहतात?”

‘‘आपल्या आंधळ्या भावाचा राज्यकारभार लंगडा पडू नये म्हणून. त्यांच्या प्रत्येक शब्दाला इथं मान आहे. तसाच पांडवांची माता – राजमाता कुंतीदेवींनाही.”

‘‘राजमाता कुंतीदेवी!” मी काहीतरी प्रश्न विचारणार होतो, इतक्यात कडेच्या कुंजातून एक कोकीळ जोरजोरानं कुहूऽ कुहूऽ करीत अशोकाच्या झाडावरून भुर्रकन उडाला नि आमच्या डोक्यावरून निघूनही गेला! मी त्याच्याकडे पाहिलं. मला भगदत्ताची आठवण झाली! तो एकदा म्हणाला होता की, ‘‘सप्तस्वरांत ताना मारणारा कोकीळ कावळीच्या घरट्यात वाढत असतो, कारण त्याच्या आईनंच त्याला कावळीच्या घरट्यात जन्म घ्यायला लावलेलं असतं.” किती वेडा आहे भगदत्त. अरे, कोकीळ कुठं

वाढतो याच्याशी काय करायचं आहे? योग्य काल येताच आसमंत दणाणून सोडणारी त्याची तान ऐकू आली म्हणजे झालं!

चालत-चालत आम्ही एका भव्य मंदिराजवळ आलो. ते मंदिर भगवान विष्णूचं होतं. त्याचा कळस सोन्याचा होता. मावळत्या किरणांत तो कळस आकाशाच्या निळ्या पार्श्वभूमीवर झळाळत होता. सोनेरी किरण परावर्तित होत होते.

''महाराजांनीच तो कळस बसविला आहे,'' त्या कळसाकडे बोट दाखवीत बाबा म्हणाले.

मी विचार करू लागलो. या मंदिराला सोन्याचा कळस बसविणारा इथला राजा आंधळा आहे. हे अफाट वैभव त्याचं आहे, पण ते त्याला डोळाभर कधीच पाहता येत नाही! आंधळ्या राजाला एवढं वैभव देऊन ते न पाहता येईल अशी क्रूर व्यवस्था करणारं दैवच आंधळं नाही काय? शंभर मुलगे आणि हे एवढं अमाप राजवैभव असलेल्या या राजाला भाग्यवान म्हणायचं की, हे सगळं पाहण्यासाठी डोळे नाहीत म्हणून अभागी म्हणायचं! आपले शंभर पुत्र हा आंधळा पिता कसा काय ओळखत असेल? आणि सर्वांत महत्त्वाचं म्हणजे डोळे नसतानाही या एवढ्या अफाट साम्राज्यावर तो लक्ष कसं ठेवीत असेल? छे, काही-काही प्रश्नांचं उत्तरच देता येत नाही!

''बाळ, गेल्याबरोबर गुरुदेवांना लागलीच वंदन कर.'' बाबांनी जाता-जाताच मला सूचना केली.

''बाबा, कसे दिसतात हो गुरुदेव?'' मी औत्सुक्यानं विचारलं.

''कसे म्हणून सांगू? आता बघशीलच तू त्यांना.''

आम्ही लगबगीनं चालू लागलो. नगरातील रस्ते नगरजनांनी फुलून गेले होते. दोहो बाजूंस उंचच उंच प्रासाद उभे होते. मंदिराचे कळस आकाशाच्या पोटात घुसले होते. तिथल्या घंटांनी वातावरण भारून टाकलं होतं. मार्गावरून अश्वपाल घोडे घेऊन आणि स्त्रिया घडे घेऊन पाण्यासाठी गंगेकडे जात होत्या. व्यापारपेठा गजबजून गेल्या होत्या.

पुष्कळ चालून आल्यानंतर आम्ही एका प्रचंड लोखंडी महाद्वाराजवळ आलो. त्याच्या दोन्ही बाजूंना काळ्या रंगाच्या पाषाणांचा तट दूरवर निमुळता होत गेला होता. महाद्वारावरच्या भव्य कमानीवर त्रिकोणी भगवा ध्वज फडफडत होता. द्वारपालांनी आम्हाला पाहताच वंदन केलं. आम्ही वाकून आत गेलो. ती कुरूंची युद्धशाला होती.

आत सभोवती मोठी दालनं होती आणि मधोमध एक योजन घेराचा एक भव्य आखाडा होता. त्याचे अनेक भाग पडले होते. एका बाजूला मल्लांसाठी आखाडा होता. त्यात तांबड्या रंगाची बारीक माती गोलाकार पसरली होती. अनेक मल्ल – युवकांच्या जोड्या त्यात एकमेकांवर डाव-प्रतिडाव करीत झुंजत होत्या. त्या आखाड्यात मध्यभागी एक थोराड अंगाचा गौरवर्णी युवक दंड थोपटीत गोलाकर नाचताना दिसला. त्याच्या जवळपास कोणीच फिरकत नव्हतं! हात उंचावून तो आखाडाभर थयथय नाचत होता.

''कर्णा, तो राजपुत्र भीम, बघ आखाड्यात कसा सर्वांना आव्हान देत फिरतो आहे.'' त्याच्याकडे बोट दाखवीत बाबा म्हणाले.

दुसऱ्या बाजूला अश्वारोहणासाठी भव्य जागा मोकळी सोडली होती. त्या जागेत घोड्यांना रांगेत धावता यावं म्हणून चकोऱ्या आखल्या होत्या. त्यांना धावताना

सतत अडथळा व्हावा म्हणून जागोजागी खंदक खणले होते. काही खंदक पाण्यानं भरलेले होते, ठिकठिकाणी उंचच उंच कुंपणे उभी केली होती. अनेक युवक ते सर्व अडथळे लीलया ओलांडून घोडी शिकविताना दिसले. पूर्वेकडील बाजूला खड्गांचे हात करण्यासाठी असंच एक पटांगण केलं होतं. त्याच्या कडेच्या सळयांवर विविध आकारांची चिलखतं आणि लहान-मोठ्या ढाली टांगल्या होत्या. अनेक योद्धे खड्गांचा खणखणाट करीत होते. एकमेकांवर दात-ओठ खात तुटून पडत होते. पश्चिमेच्या बाजूला त्याच आकाराचं एक गोलाकार पटांगण होतं. गदेच्या सरावासाठी त्यात काही युवक गदा पेलत होते. गर्जना करीत मंडलं घेत होते! शूल, तोमर, शतघ्नी यांसाठी लहान-मोठी अशी अनेक क्रीडांगणं त्या भव्य जागेत तयार केली होती. सभोवतीची दगडी दालनं अनेकविध शस्त्रास्त्रांनी ठासून भरली होती. त्या आखाड्यावर कुठूनही पाहिलं तरी अगदी मध्यावर दिसेल असा एक उंच व लांबरुंद असा लक्ष्यवेधाचा दगडी चौथरा होता. त्या चौथऱ्यावर निरनिराळ्या आकारांची फुलांनी सजवलेली धनुष्यं मांडली होती. एका बाजूला बाणांचे असंख्य भाते मांडून ठेवले होते. समोर अनेक लक्ष्यं ठेवली होती. त्या चौथऱ्यावर एक सावळ्या रंगाचा युवक वीरासन घालून उजव्या पायाच्या चवड्यावर शरीर पेलून बसला होता! हातातील धनुष्याची प्रत्यंचा त्यानं कानापर्यंत खेचली होती. एक डोळा मिटून दुसऱ्या डोळ्याची बाहुली त्यानं बाणाच्या टोकासमोर स्थिर केली होती. त्याच्याजवळ एक सैलसर वस्त्रं घातलेला, शुभ्र दाढी असलेला, डोक्यावरचे केस एकत्र बांधलेला, उंच असा एक वृद्ध उभा होता. त्याची मुद्रा नदीच्या डोहासारखी शांत होती. त्या सावळ्या युवकाच्या प्रत्यंचेवरचा हात त्यानं सरळ केला. तो त्याला काहीतरी समजावून सांगू लागला. युवक ते लक्षपूर्वक ऐकत होता.

बाबा त्या युवकाकडे बोट दाखवीत म्हणाले, ‘‘बाळ, तोच तो पांडुपुत्र धनुर्धर राजकुमार अर्जुन! आणि त्याला सूचना करताहेत तेच ते पूजनीय गुरुदेव द्रोण!’’

‘धनुर्धर अर्जुन! असेना का – पण त्याला यापेक्षा ऐटदार वीरासन नाही का घालता येणार?’ एक विचार माझ्या मनात येऊन गेला.

गुरुदेव द्रोण मात्र अशोक वृक्षासारखे भव्य वाटत होते. त्यांच्या अंगावरील शुभ्र वस्त्रं त्यांच्या उंच शरीराला शोभून दिसत होती.

आम्ही आखाड्यातील मार्गानं चौथऱ्याकडे चालू लागलो. भोवतीची पटांगणं पाहून उगाच अंगातील उष्णता आपोआप वाढत असल्यासारखं मला वाटायला लागलं – आपणही आत उतरावं नि मंडलं घेत आवेशानं गदेचे नि खड्गांचे प्रहार समोरच्या प्रतिस्पर्ध्यावर करावेत, आपणही नाठाळ घोड्यांना नमवून त्यांच्या तोंडांतून फेस येईपर्यंत त्यांना दामटावं, हत्तीची सोंड धरून त्याला पिसळवावा आणि त्याला दमवून शेवटी त्याच्या पाठीवर आरूढ व्हावं. चौथऱ्यावर बसलेल्या त्या युवकाला दंडाला धरून उठवावं नि वीरासन कसं ऐटदार घालायला हवं, हे एकदा नीटपणे त्याला दाखवून द्यावं. मल्लविद्येच्या आखाड्यात उगाच रानवट रेड्यासारख्या फेऱ्या मारणाऱ्या त्या दांडगट भीमाशी हौदा खेळून त्याची रगही जिरवावी.

आम्ही धनुर्विद्येच्या त्या उंच चौथऱ्यावर आलो. वर बसलेल्या राजकुमार अर्जुनानं एक बाण सोडला. समोरच्या दूरवरच्या लाकडी लक्ष्यात तो सपकन घुसला. गुरुवर्य द्रोणांनी त्याच्या पाठीवर एकदम थाप मारली आणि ते आनंदानं गरजले, ‘‘साधु! अर्जुना, पण जवळ जाऊन तुझा तो सूचिपर्ण बाण लक्ष्यात कितपत घुसला आहे ते नीट

पाहा." अर्जुन आज्ञाधारकपणे उठला नि दमदार पावलं टाकीत लक्षयाच्या दिशेनं निघून गेला. इतक्यात बाबा पुढं झाले. चौथऱ्याखालीच उभं राहून त्यांनी गुरुवर्य द्रोणांना वंदन केलं. मी गुरुवर्य द्रोणांकडे पाहिलं. ते पश्चिमेकडे तोंड करून उभे होते. संध्याकाळची मावळती किरणं त्यांच्या दाट, शुभ्र दाढीवर पडल्यामुळे ती रुपेरी रंगात चमकत होती. दाढीचे भरगच्च, लांबसडक केस सरळ पोटापर्यंत उतरले होते. त्यातील काही बटा वाऱ्यामुळे इकडे-तिकडे भुरभुर उडत होत्या. कपाळावर, दंडावर नि उघड्या पोटावर भस्माचे पट्टे होते. भव्य कपाळावर वार्धक्यामुळे आठ्यांचं जाळं पसरलं होतं, नाक सरळ नि तरतरीत होतं. त्यांच्या भुवयासुद्धा पांढऱ्याशुभ्र होत्या. त्यांखालचे डोळे मात्र विलक्षण आत्मविश्वासानं तळपत होते. तरीही त्यांत शांतता होती. मोठ्या आदरानं वाकून मी त्यांना वंदन केलं. त्या गुरुवर्यांच्या देखरेखीखालीच माझं युद्धशास्त्राचं अध्ययन व्हावं, अशी बाबांची इच्छा होती.

"हा माझा पुत्र कर्ण!" बाबांनी त्यांना सांगितलं.

माझी फार मोठी अपेक्षा होती की, माझ्या कानातील कुंडलांबद्दल ते आता मला काहीतरी विचारतील, पण निर्विकारपणे ते नुसतेच म्हणाले, "तुझा पुत्र अधिरथा? मग आज युद्धशालेत कसं काय आणलंस त्याला?"

"आपल्या चरणांवर घालण्यासाठी."

"माझ्या चरणांवर कशासाठी?"

"राजकुमारांबरोबर यालाही थोडंसं युद्धविद्येचं शिक्षण मिळालं तर –"

"राजकुमारांबरोबर? अधिरथा, युद्धविद्या हे केवळ क्षत्रियांचं कर्तव्य आहे! तुझ्या पुत्राला हवं तर या युद्धशालेत शिष्य कर कृपांच्या पथकात, पण त्याला राजकुमारांबरोबर कसं येईल शिकता?"

बाबांचा चेहरा क्षणकाल काळवंडला. काय बोलावं तेच त्यांना थोडा वेळ समजेना, शेवटी ते कसंतरी म्हणाले, "जशी आज्ञा गुरुदेव."

गुरुदेवांना परत वंदन करून आम्ही परतू लागलो. वाटेत राजकुमार अर्जुन लक्षयातील बाण काढून परतताना आम्हाला भेटला. मी त्याला निरखून पाहिलं. त्याचा रंग आकाशासारखा निळसर होता. हनुवटी भाल्याच्या टोकासारखी निमुळती होती. त्याचे पाणीदार डोळे दोन्ही कानशिलांकडे निरुंद निमुळते होत गेले होते. त्याचं नाक सरळ तरतरीत होतं. कपाट थाळीसारखं भव्य होतं, भुवया रेखीव होत्या. त्याचा सगळा चेहराच कमालीचा बोलका होता. घंटेसारखा मधुर आवाज काढीत त्यानं बाबांना विचारलं, "काय काका, आजच आलात काय चंपानगरीहून?"

"होय. या माझ्या पुत्राला – कर्णाला घेऊन आलो."

अर्जुनानं माझ्याकडे पाहिलं. माझ्या डोळ्यांपेक्षा माझ्या कानातील कुंडलांकडेच तो जास्त आश्चर्यानं पाहत असावा! तो मला काहीतरी विचारणार होता एवढ्यात आकाशातून एक कसलंतरी वेटोळं आम्हा दोघांमध्ये येऊन सपकन आदळलं! आम्ही सर्व जण दचकून दोन पावलं मागं झालो. सर्वांनी काहीशा भीतीनं आणि बऱ्याचशा कुतूहलानं वर पाहिलं. वर राकट रंगाचा एक गरुड आपले धिप्पाड पंख फडफडवीत आकाशातून उभ्या-आडव्या फेऱ्या मारीत होता. मध्येच आपली भरगच्च मान वाकडी करून किनारी दृष्टीनं खाली जमिनीकडे पाहत होता. एक शामवर्णी भुजंग अगदी निपचित पडला होता! त्याला परत उचलण्यासाठीच बहुधा तो गरुड आकाशात फेऱ्या मारीत असावा.

आकाशातून पडल्यामुळे बधिर झालेला तो सर्प थोडा वेळ तसाच पडून राहिला, पण क्षणभरातच वळवळत त्यानं हाताच्या पंजासारखी फणा काढली; दोन-तीन वेळा फुत्कार सोडत त्यानं आपली ऐटदार फणा इकडे-तिकडे डोलविली आणि मग मात्र तो भिऊन जिवाच्या आकांतानं वाटेल तशी वेडी-वाकडी वळणं घेत वाट फुटेल तिकडे पळू लागला. विजेच्या गतीनं राजकुमार अर्जुनानं हातातील बाण धनुष्यावर चढविला नि तो त्या सुसाट धावणाऱ्या सर्पाचा वेध घेऊ लागला. एवढ्यात चौथऱ्यावरून कोणीतरी ओरडलं, “अर्जुना, हात खाली कर!” त्या आवाजात मोठी शक्ती होती. अग्नीचा झटका बसल्यासारखा अर्जुनानं हात खाली घेतला. बाणाच्या वेगानं धावणारा तो सर्प क्षणार्धातच कडेच्या दगडी तटात कुठं दिसेनासा झाला. चौथऱ्यावरून परत ध्वनी घुमला, “अर्जुना, त्या यःकश्चित सर्पाला मारण्यापेक्षा प्रथम तुझ्या स्वतःमधल्या सर्पाला ठेचून काढ. क्रोधाचा सर्प महाभयानक असतो! दुर्बलावर हात उचलू नकोस.”

आम्ही चौथऱ्याकडे पाहिलं – ते गुरुदेव द्रोण होते!

एक उंच; पण अत्यंत सौम्य चेहऱ्याचा युवक लगबगीनं अर्जुनाजवळ आला. त्याच्या पाठीवर हात ठेवत त्यानं त्याला अत्यंत मृदू स्वरात विचारलं, “असं कसं एकदम धनुष्य उचललंस पार्था?”

अर्जुन गप्पच उभा राहिला. मी बाबांना तो उंच युवक कोण म्हणून डोळ्यांनीच विचारलं. ते माझ्या कानाजवळ हळूच पुटपुटले, “ज्येष्ठ पांडव युधिष्ठिर!”

क्षणार्धातच त्या भव्य आखाड्यावरचे सगळे शिष्य अर्जुनाभोवती जमा झाले. सगळे जण एकदमच त्याला “काय झालं? काय झालं?” म्हणून प्रश्न विचारू लागले. मी त्या घोळक्यातून बाहेर आलो. आजूबाजूचा आखाडा बारकाईनं पाहू लागलो, कारण उद्यापासून मला तिथं शिकायचं होतं, पण एकच एक प्रश्न माझ्या मनात एकसारखा घोळत होता. मला राजकुमारांबरोबर का नाही शिकता येणार? गुरुदेव मघा म्हणाले की, युद्धविद्या हे केवळ क्षत्रियाचं काम आहे. क्षत्रिय म्हणजे तरी काय? मी क्षत्रिय नाही काय? आणि नसल्यास होऊ शकणार नाही काय?

माझं नि शोणाचं नाव शालेत नोंदवून आम्ही त्या भव्य महाद्वाराबाहेर आलो. बाबा काहीच बोलत नव्हते. शेवटी मीच त्यांना विचारले, “बाबा, मला का नाही राजपुत्रांबरोबर शिकता येणार?”

“कारण तू क्षत्रिय नाहीस बाळ.” ते म्हणाले.

“क्षत्रिय? क्षत्रिय म्हणजे काय?”

“जो राजकुलात जन्म घेतो तो क्षत्रिय. तू एका सूतकुलात जन्मला आहेस बाळ!” समजावणीसाठी त्यांनी माझा खांदा हळुवारपणे थोपटला.

“कुल! राजकुलात जन्मणाऱ्यांना काय सहस्त्र हात असतात? त्यांनाच का एवढं महत्त्व?”

“तुला कळायचं नाही ते. उद्यापासून नियमितपणे या शालेत येत जा. जे-जे मिळेल ते शिकत जा.”

त्यांच्या उत्तरानं माझं समाधान झालं नाही. माझं मन वेड्यासारखं महाराज धृतराष्ट्र आणि गुरुदेव द्रोण यांची तुलना करू लागलं. प्रेमभरानं माझा चेहरा आपल्या ओंजळीत घेऊन आपल्या नसलेल्या डोळ्यांनी माझी कुंडलं पाहण्याचा प्रयत्न करणारे या हस्तिनापूरचे महाराज धृतराष्ट्र कुणीकडे आणि माझ्या सुंदर कुंडलांचा साधा

निर्देशसुद्धा न करणारे हे गुरुवर्य द्रोण कुणीकडे! खरोखरच या महाराजांपेक्षा हे गुरुदेव कितीतरी वेगळे वाटतात. काय तर म्हणे, 'दुर्बलावर हात उचलू नकोस.' सर्पाला दुर्बल म्हणणारे हे कौरवांचे गुरुदेव शहाणे की व्यवहारशून्य? त्यांना माहीत नव्हतं काय की, तोच काळा सर्प क्षणार्धात त्या राजपुत्र अर्जुनाला काळा-निळा करू शकला असता? अर्जुन आणि माझ्यात एक सर्प पडावा ही घटना मात्र अशुभच नव्हती काय? छे, मन तरी किती विचित्र असतं? तो केवळ एक योगायोग होता; पण गरुडाला पाहिलं की, मला तो शोणाचा प्रश्न नेहमीच होता तसा आठवत होता, "दादा, तू जाशील का रे गरुड पक्षयासारखा उंच-उंच?" वेड्या शोणा, मी प्रत्यक्ष पाहिलं आहे की, कधी-कधी त्या गरुडालासुद्धा आपल्या भक्षयाच्या शोधासाठी कावळ्यासारखं या धरतीभोवती घोटाळावं लागतं! नाहीपेक्षा तो नक्कीच आकाशात नेहमी उंच राहिला असता!

आम्ही राजवाड्यावर परत आलो. आमची वाट पाहत शोण तसाच दालनात बसला होता. त्याच्या शेजारीच अमात्य वृषवर्मा उभे होते. संध्याकाळची धूसर छटा त्या सगळ्या राजवाड्यात पडल्यामुळे तो आकाशासारखा भव्य; पण उदास वाटत होता. मी, अमात्य, बाबा आणि शोण राजवाड्याच्या दक्षिण दिशेच्या एका दालनात गेलो. बाबा त्या दालनात राहत असत. त्या दालनाला पूर्वेकडच्या बाजूला एक गवाक्ष होतं. त्याच्यातून मी बाहेर डोकावून पाहिलं. दूरवर युद्धशालेच्या भव्य आखाड्याभोवती दगडी तट अस्पष्ट दिसत होता. त्याला वळसा घालून गंगेचं पात्र शांतपणे वाहत होतं. सगळं हस्तिनापूर – दिवसभर खेळून दमलेलं एखादं लहान मूल जसं झोपी जातं तसं – हळूहळू शांत होऊ लागलं होतं. एक सेवक आत आला नि त्यानं हातातील पलित्यानं कोपऱ्यातील, इंगुदीचं तेल घातलेली, मोठी दगडी समई पेटवली. अमात्य, बाबा आणि शोण यांचे अस्पष्ट चेहरे उजळून निघाले.

"सूतराज, काय झालं? नाव नोंद केलं का तुमच्या पुत्रांचं?" अमात्यांनी आस्थेनं बाबांना विचारलं.

"होय." बाबांनी नुसतंच उत्तर दिलं. त्यांचं मन कसल्यातरी सखोल विचारात गुंतलं असावं.

"ठीक आहे. तुम्हाला जे लागेल त्याची सूचना बाहेरच्या सेवकाला द्या. मी येतो आता." अमात्य निघून गेले.

पाकशालेतून एक सेवक आमचं भोजन घेऊन आला. भोजन करून आम्ही बोलत बसलो. नेहमीच्या सवयीप्रमाणं शोण अनेक प्रश्न विचारीत होता, पण माझं त्याच्या प्रश्नांकडे मुळीच लक्ष नव्हतं. मंचकावर बसल्या-बसल्या मी कोपऱ्यातील दगडी समईतील इवल्याशा ज्योतीकडे पाहत होतो. जे-जे प्रकाशमय होतं त्या-त्या सर्वांची मला अशीच विलक्षण ओढ वाटे. त्या ज्योतीकडे पाहता-पाहताच घडलेल्या घटना एका मागोमाग एक अशा डोळ्यांपुढं उभ्या राहिल्या. त्या सगळ्यांची एक विचित्र मालिका गुंफण्याचा प्रयत्न माझं मन करू लागलं. आपले दोन्ही हात उंचावून माझ्याबरोबर येण्यासाठी रथामागोमाग रडवेला होऊन धावणारा शोण... सहसा आपला निर्णय न बदलणारे, पण शोणाची ती अवस्था बघून विरघळलेले बाबा... या हस्तिनापूरच्या राजवाड्याचं महाद्वार आम्ही ओलांडताच झंझावातासारखा बाहेरून येऊन आमच्या पुढ्यात सर्वांत प्रथम उभा राहणारा ज्येष्ठ राजपुत्र दुर्योधन आणि ती त्याची ऐटदार चाल! कुरुवंशातील मी पाहिलेला तो सर्वांत पहिला वीर होता. किती आस्थेनं माझ्या

कुंडलांबद्दल त्यानं स्वत:चं मत सांगितलं! माझ्या खांद्यावर हात ठेवून तो किती आत्मीयतेनं माझ्याकडे पाहत होता! बस्स, राजपुत्र असावा तर तो दुर्योधनासारखा ऐटदार! माझा चेहरा ओंजळीत घेऊन तो आपल्या हाताच्या स्पर्शानं पाहणारे त्याचे वडील महाराज धृतराष्ट्र! राजवाड्याच्या समोरील तलावातल्या शुभ्र कमळासारखे दिसणारे विदुर! आम्हाला येथपर्यंत पोहोचवायला येणारे कौरवांच्या अफाट साम्राज्याचे अमात्य वृषवर्मा! आपल्याच तालात वेड लागल्यासारखा मल्लविद्येच्या आखाड्यात एक पाय वर करून मंडलं घेणारा भीम. वेंधळ्यासारखं वीरासन घालून धनुर्धराचा आव आणणारा अर्जुन. ज्यांच्या मनाचा काहीच थांगपत्ता लागत नव्हता, ते सागरासारखे गुरुवर्य द्रोण! लहान वयातच प्रौढासारखा बोलणारा युधिष्ठिर!

माझं मन चाळा म्हणून उगाच युवराज दुर्योधन आणि अर्जुन, महाराज धृतराष्ट्र आणि गुरुदेव द्रोण, विदुर आणि युधिष्ठिर यांची तुलना करण्याचा प्रयत्न करू लागलं, पण त्या कुणाचीच एकमेकांशी तुलना होत नव्हती. सगळे कसे स्वतंत्र आणि आपलं असं वेगळंच अस्तित्व असलेले होते. जगात किती प्रकारची आणि कशाकशा स्वभावाची माणसं आहेत कोण जाणे! कुणाच्या कल्पनेतून ती निर्माण होतात? कशासाठी ती निर्माण होतात? या जगाचा तो कल्पक कारागीर तरी कोण आहे? त्याचा हे सगळे मासले निर्माण करण्यात काय हेतू असावा? कारण एकासारखा दुसरा इथं दिसत नाही, आणि दिसला तरी असत नाही. छे, या प्रश्नांची कधीच आणि कुणालाही संगतवार उत्तरं देता येणार नाहीत!

समोरच्या दगडी समईतील इंगुदीचं तेल आता संपत आलं होतं. तिची ज्योत मंदावत होती. शोण केव्हाच झोपी गेला होता. दिवसभराच्या प्रवासानं नि राजनगरीतल्या पायपिटीनं थकलेले बाबाही निद्राधीन झाले होते. मी हळूच उठलो नि विझू पाहणाऱ्या त्या ज्योतीवर एक हळुवार पुंकर घातली. त्या विझणाऱ्या वातीतील तेलाचा जळकट धूर माझ्या नाकाला जाणवला. मंचकावर येऊन आडवा झालो. तो माझा हस्तिनापुरातला पहिलाच दिवस होता! स्मृती ही अतिथीसारखी लहरी असावी! ती केव्हाही मनाच्या द्वारात येऊन उभी राहू शकते. मला एकदम राधामातेची आठवण झाली. आज ती चंपानगरीतल्या आमच्या पर्णकुटीत एकटीच असणार या जाणिवेनं मी अस्वस्थ झालो. सगळी पर्णकुटी दिवसभर तिला खायला उठली असेल. मी तिथं नाही हे विसरून तिनं नेहमीप्रमाणं, ‘‘वसू, वसू’’ म्हणून मला अनेक वेळा हाका मारल्या असतील! खरोखरीच आईचं मन म्हणजे त्रिभुवनातल्या सगळ्या प्रेमाचं आगारच नाही काय? येताना तिनं मला आठवण म्हणून एक चांदीची पेटी दिली होती. सगळं सोडून तिनं आपल्या लाडक्या पुत्राला ही जगावेगळी वस्तू का दिली होती? ती म्हणाली होती की, ‘‘जेव्हा-जेव्हा तुला माझी आठवण येईल तेव्हा-तेव्हा या पेटीचं दर्शन घे. आपल्या आईच्या जागी तिला मान!” खरंच किती भाबडं मन आहे तिचं! तिला काय कल्पना असणार की, एक निर्जीव पेटी आईची जागा कशी भरून काढणार? माते, दुधाची तहान ताकावर कधीतरी भागली आहे काय? पण काही झालं तरी तुझ्या भावना मला जपल्याच पाहिजेत. काही झालं तरी तुझी आठवण जीवनाच्या अंतापर्यंत मी अशीच जपीन. उत्तरीयात बांधलेली ती पेटी मी हळुवार हातानं सोडली. आत्यंतिक श्रद्धेनं मी ती मस्तकी लावली आणि मंचकावरच्या एका कोपऱ्यात हळुवारपणे ठेवून दिली. जगातल्या तीन व्यक्तींवर माझं नितान्त प्रेम होतं. एक माझी आई, दुसरे बाबा नि तिसरा निरागस

शोण. तशीच तीन गोष्टींबद्दल मला विलक्षण ओढ होती. एक आपल्या असंख्य लहरींच्या असंख्य मुखांनी माझ्याशी घटकान्घटका बोलणारी गंगामाता, दुसरे माझ्यासाठी केव्हाही उत्साहाचे प्रचंड स्त्रोत घेऊन येणारे आदित्यनारायण आणि आता तिसरी ही आईनं दिलेली एक साधी खूण – चांदीची छोटीशी पेटी! त्या पेटीमुळे मला चंपानगरीची आठवण झाली. माझ्या मनाचं वासरू मातृभूमीच्या कासेला ढुसण्या देऊ लागलं. त्यातून आठवणींच्या अनेक मधुर दुग्धधारा वाहू लागल्या. त्यांची गोडी चाखत-चाखत मी तसाच केव्हातरी झोपी गेलो.

**

# पंधरा

भल्या पहाटे पक्षयांच्या किलबिलाटानं मी जागा झालो. गवाक्ष उघडून बाहेर पाहिलं. आकाशाच्या कडा नुकत्याच उजळत होत्या. गंगेच्या चंदेरी वळणानं धुक्याचं अंशुक पांघरलं होतं. सगळं हस्तिनापूर हळूहळू जागं होत होतं. दुसरं एक कोरडं उत्तरीय घेतलं आणि दालनाबाहेर पडलो. गंगेच्या पाण्यात कोणी नसताना शांतपणे मनसोक्त स्नान करून यावं, असं योजून मी तिच्या घाटाकडे चालू लागलो. आजूबाजूचं सगळं जग धुक्याची दुलई अजूनही सोडायला तयार नव्हतं. सगळे मार्ग नि प्रासाद अंधूक नि अस्पष्ट धुक्यात फारच मजेदार दिसत होते. गंगेच्या किनाऱ्यावर मंदिरात एक घंटा वाजत होती. तेवढीच त्या नीरव शांततेत स्पष्टपणे ऐकू येत होती. त्या आवाजाच्या रोखानं चाललो. मला आईनं केलेली सूचना आठवली, "गंगेच्या पाण्यात जाऊ नकोस." मी स्वत:शीच हसलो. किती भित्री आहे आई! ती काय मला लहान मूल समजते? मला कसली त्या पाण्याची भीती? विचारांच्या तंद्रीतच घाटावर आलो. बरोबर आणलेलं उत्तरीय एका पायदंडीवर ठेवलं. अंगावरच्या अधरीयाचा काचा मारला नि समोर पाहिलं. दहा-बारा हातांवरचं पात्र तेवढं स्पष्ट दिसत होतं. बाकीचं सर्व पात्र पांढरट भुरक्या धुक्यात झाकलं होतं. त्या पात्राला आदरानं नमस्कार केला नि पाण्यात सूरकांडी मारली. पाण्याचा स्पर्श उबदार होता. जवळ-जवळ घटकाभर मी त्या पाण्यात मनसोक्त डुंबत होतो. घटकाभरानं धुकं निवळलं. मी पाण्यातून घाटाच्या दिशेनं पाणी कापत आलो. अंगावरचं उत्तरीय बदललं. ओलं वस्त्र पाण्यात बुचकळून ते पिळून पायदंडीवर ठेवलं. समोर पाहिलं. सूर्यदेव दूरवर आकाशात हळूहळू वर येत होते. त्यांची कोवळी किरणं गंगेच्या पाण्याला गुदगुल्या करून जागं करीत होती. ओंजळभर पाणी घेऊन त्याचं अर्घ्य भक्तिभावानं मी सूर्यदेवांना दिलं. किती रमणीय रूप दिसत होतं त्यांचं! मला दिसणारी त्यांच्या रोजच्या तेजाची वलयं. एका दिवसाची दर्शनशोभा दुसऱ्या दिवशी तशीच नसे. तिच्यात दुसऱ्या दिवशी आगळीच खुमारी चढे. ती पाहिली की, मला नेहमीच हुरूप येई. हजारो योजनं दूर असलेल्या त्या तेजात नि आपल्यात काहीच अंतर नाही असं वाटे! शरीर हलकं झाल्यासारखं वाटे नि माझे हात आपोआपच जोडले जात! डोळे आपोआपच मिटले जात! मी त्या तेजाचं मनोमन चिंतन करू लागे. लाखो योजनं मला केवळ, प्रकाशच प्रकाश दिसू लागे. अत्यंत तेजस्वी असा प्रकाश! तेजस्वी तरीही शीतल आणि हवाहवासा वाटणारा प्रकाश! उगाचच वाटू लागे की, त्या तेजाशी आपलं कसलंतरी नातं आहे! जगातील सगळा अंधकार उजळणारा तो अखंड महादीप आपल्याशी कसल्यातरी धाग्यांनी जोडला गेला आहे! मी स्वत:ला विसरे आणि त्या धाग्याच्या आधारानं दूरदूर उंच-उंच जाऊ लागे.

आजचं त्या तेजाचं रूप तर अतिशयच मनोहारी होतं. मी शांतपणे हात जोडले नि डोळे मिटले. मी म्हणजे प्रकाशाच्या असीम समुद्रातील केवळ एक लाट झालो! त्या लाटेला कोणतंही स्वत:चं असं अस्तित्व नव्हतं आणि ते असावं असंही तिला वाटत नव्हतं. त्या अमाप सागरातील ती केवळ अनेकांपैकी एक लाट होती.

कुणाचातरी स्पर्श माझ्या खांद्याला झाला असावा. प्रथम, प्रथम त्याची स्पष्टपणे जाणीवच झाली नाही, पण कोणीतरी माझा खांदा गदागदा हलवीत होतं. मी हळुवारपणे डोळे उघडले नि वळून पाहिलं. एक अत्यंत शांत चेहऱ्याचा वृद्ध माझ्याकडे पाहत होता! त्याच्या दाढीचे, डोक्याचे नि भुवईचे सर्व केस ढगासारखे पांढरेशुभ्र होते. भव्य कपाळावर भस्माचे लांब पट्टे होते. त्याचा माझ्या खांद्यावरचा हात तसाच होता. तो हात मात्र अतिशय वजनदार नि भारदस्त वाटला मला! कोण असावा हा वृद्ध? लागलीच मी प्रश्नांचे बाण मनाच्या धनुष्यावर चढवू लागलो! छे, कुठंच पाहिलं नाही कधी यांना.

अतिशय प्रेमळ आवाजात त्यानं मला विचारलं, ‘‘बाळ, तू कोण?’’

‘‘मी सूतपुत्र कर्ण!’’

‘‘सूतपुत्र? कोणत्या सूताचा पुत्र तू?’’

‘‘चंपानगरीच्या अधिरथाचा.’’

‘‘अधिरथाचा?’’

‘‘होय, पण आपण?’’ मी अत्यंत उत्सुकतेनं विचारलं.

‘‘मी भीष्म!’’ त्यांच्या दाढीचे केस वायुलहरीवर हिंदोळत होते.

भीष्म! पितामह भीष्म! कौरव-पांडवांचे वंदनीय भीष्म! गंगापुत्र भीष्म! कुरुकुलाच्या मंदिराचे कळस भीष्म! योद्धयांच्या राज्यातील ध्वज भीष्म! माझं मन क्षणकाल गोंधळून गेलं. कुरुकुलातील साक्षात पराक्रम माझ्यासमोर गंगाकाठी उभा होता.

एका विशाल वटवृक्षासमोर एक लहानसं गवताचं पातं असा मी उभा होतो. काय करावं तेच मला समजेना. लागलीच कसंतरी स्वत:ला सावरून मी वाकून त्यांना वंदन केलं. त्यांनी मला झटकन वर उठविलं. अत्यंत मृदू स्वरात ते म्हणाले, ‘‘तुला तुझ्या पूजेतून जागं केलं म्हणून तू नाराज तर झाला नाहीस?’’

‘‘नाही.’’ मी म्हणालो.

‘‘खरंच बाळ, पण तुला जागं करण्याचा मोह मी आवरू शकलो नाही!’’

मी आश्चर्यानं त्यांच्याकडे पाहू लागलो. थोडचा वेळानं ते म्हणाले, ‘‘आज तीन तपं झाली. न चुकता रोज मी या वेळी गंगेच्या घाटावर येतो, पण या हस्तिनापुरातला एकही माणूस कधीच माझ्या अगोदर इथं आलेला मी पाहिला नाही. आज पाहत असलेला तू तो पहिला माणूस आहेस!’’

‘‘मी?’’ मला पुढं काय बोलावं ते सुचेना.

‘‘होय! आणि म्हणूनच मी बराच वेळ वाट पाहून शेवटी तुला जागं केलं.’’ माझ्या कानातील कुंडलांकडे पाहत ते म्हणाले, ‘‘ही कुंडलं तुला फारच शोभून दिसतात.’’

‘‘हो, जन्मजातच आहेत ती.’’ मी म्हणालो.

‘‘त्यांना नेहमीच जपत जा!’’ धीमी पावलं टाकीत ते घाटाच्या पायदंडचा हळूहळू उतरू लागले. भव्य पर्वतासारखा दिसणारा त्यांचा तो उंच देह अस्पष्ट होऊ लागला. गळाभर पाण्यात जाऊन ते उभे राहिले. त्यांच्या डोक्यावरचे केस पाण्याच्या लाटांबरोबर हिंदकळू लागले. त्यांचं शुभ्र केसांनी झाकलेलं मस्तक गंगेच्या पाण्यावर शुभ्र कमलासारखं शोभून दिसू लागलं! मी उभा होतो तेथूनच त्यांना वंदन केलं. उत्तरीयाचा ओला पिळा खांद्यावर टाकून राजवाडचाकडे परतलो. माझ्या

हस्तिनापुरातील पहिल्याच पहाटेची सुरुवात पितामह भीष्मांच्या दर्शनानं झाली होती.

मला त्या विचित्र योगायोगाचं नवल वाटलं. ज्या पितामह भीष्मांना पाहावं म्हणून काल दिवसभर योजित होतो, ते स्वत:च आज मला भेटले होते. तेही एकटे नि या गंगेच्या घाटावर आणि अशा या रम्य प्रभातकाली! किती गोड आहे त्यांचा आवाज! चेहरा कसा मंदिराच्या गाभाऱ्यासारखा शांत नि पवित्र आहे! माझ्यासारख्या एखाद्या सामान्य सूतपुत्राची एखादी गोष्ट त्यांना आवडते. कौरवांचे ज्येष्ठ महाराज माझ्यासारख्या सूतपुत्राच्या खांद्यावर हात ठेवून त्याची आस्थेनं विचारपूस करतात! खरोखरच वीरपुरुषाच्या ठिकाणी निगर्विता असली की, तो किती थोर वाटू लागतो! ज्या कुरुकुलात पितामहांसारखे वीर नि निगर्वी पुरुषश्रेष्ठ निर्माण झाले ते कुल धन्यच होय. मीही किती भाग्यवान आहे की, अशा राजवाड्यात राहण्याचं भाग्य मला मिळालं! आता वारंवार या पुरुषश्रेष्ठाचं आपणाला दर्शन घडेल. ते दोन शांत नि बोलके डोळे आपल्यावरही कृपादृष्टी ठेवतील. माझ्या जीवनातील ज्या तीन व्यक्तींवर माझं प्रेम होतं, त्यात आणखी एका व्यक्तीची भर पडली. पितामह भीष्म!

**

# सोळा

राजवाडयावर येताच बाबांनी मला तयार राहायला सांगितलं. युद्धशालेत जायचं होतं म्हणून मी लागलीच तयार झालो. शोण तर जाण्यासाठी तयार होऊन केव्हापासून माझी वाट पाहत होता. आईनं दिलेली पेटी मी एका कोनाडयात जपून ठेवली होती. तिच्यावर प्राजक्ताची चार फुलं वाहिली. तिला वंदन करून मी पुटपुटलो, ''आई, मला आशीर्वाद दे. तुझा वसू जीवनाच्या मार्गावरचं महत्त्वाचं वळण आज घेतो आहे. त्याचा युद्धशालेत जाण्याचा हा पहिला दिवस आहे.''

बाबांनी बाहेरूनच हाक मारली, ''कर्ण, शोण लवकर चला.'' मी गवाक्षातून बाहेर डोकावून बघितलं. सूर्यदेव पूर्वक्षितिजावरचा सगळा प्रदेश उजळत हसत उभे होते. त्यांचं प्रतिबिंब गंगेच्या पाण्यात पडल्यामुळे त्यांची दोन रूपं दूरवर स्पष्ट दिसत होती. एका आकाशातील सूर्यदेव! आणि एक पृथ्वीवरील सूर्यदेव! मी शोणाचा हात हातात धरला नि दालनाच्या बाहेर पडलो.

आम्ही तिघं युद्धशालेत आलो. कालच्यापेक्षा आज तर तिथं पुष्कळच युवक जमले होते. सगळे जण त्या मधल्या चौथऱ्याभोवती शांतपणे बसले होते. सर्वांचा मिळून एक शांत नि गंभीर आवाज येत होता. बहुतेक सकाळची प्रार्थना चालली होती,

''ॐ ईशाऽवास्यम् इदम् सर्वम्...'' प्रार्थना बराच वेळ चालली होती. मी बाबांना परत जायला सांगितलं.

''नीट वाग,'' असं सांगून ते परत गेले.

मी त्या भव्य आखाडयावर दृष्टी फिरवली. ते संपूर्ण पटांगण शांत होतं, पण आता क्षणातच ते वळीव पावसापूर्वी गर्जणाऱ्या आकाशासारखं अंगात आल्याप्रमाणं कुदणार होतं. निरनिराळ्या शस्त्रांचे आवाज एकमेकांत मिसळून त्यांचा एक वेगळाच आवाज होणार होता. सगळ्या युवकांच्या प्रोत्साहनाच्या आरोळ्यांनी तर त्यात आणखीच भर पडणार होती.

प्रार्थना संपली. मध्ये बसलेले गुरुदेव द्रोण शांतपणे उठून उभे राहिले. त्यांनी आपले दोन्ही हात उंचावून आपल्या सर्व शिष्यांना आशीर्वाद दिला. मी शोणाला घेऊन पुढं झालो. मी नि त्यानं गुरुदेवांना वाकून वंदन केलं. माझी अपेक्षा होती की, आपला हात उंचावून ते आम्हालाही आशीर्वाद देतील, पण तेवढयात त्यांच्यापुढं आलेल्या अर्जुनाच्या खांद्यावर हात टाकून त्याच्याशी काहीतरी बोलत ते तेथून निघून गेले! आमच्याकडे साधं बघण्याइतकाही गुरुदेवांना वेळ मिळाला नाही.

तो माझा त्या युद्धशालेतील पहिलाच दिवस होता. गुरूच्या आशीर्वादाशिवाय विद्या सफल होत नाही, असं मला कुणीतरी सांगितलं होतं. त्याप्रमाणं कौरवांच्या त्या महान गुरूंचा आशीर्वाद घ्यावा म्हणून मी त्यांना वंदन केलं, पण हा राजकुमार अर्जुन त्याच वेळी कुठून मध्ये कडमडला? त्याला काय दुसरी वेळ नव्हती इथं यायला? की गुरुदेव हे त्याचे एकटयाचेच होते? की गुरुदेव काल म्हणाले, त्याप्रमाणे त्यांचा आशीर्वादही केवळ क्षत्रियांसाठीच होता? असला तर माझ्यासारख्या सूतपुत्राला तो

कसा मिळणार? आणि मिळाला तरी त्यामुळे काय मी थोडाच क्षत्रिय होणार? आणि करायचं आहे तरी काय मला क्षत्रिय होऊन? केवळ या गुरूंचा आशीर्वाद मिळविण्यासाठी मी क्षत्रिय होण्याचं का पत्करू? नाही मिळाला आशीर्वाद तरी चालेल; पण मी सूतपुत्रच राहीन. अधिरथबाबा नि राधामाता यांचा सूतपुत्र कर्णच राहीन! या गुरूंचा आशीर्वाद क्षत्रियांसाठी आहे, या गुरूंचं ज्ञान क्षत्रियांसाठी आहे, हे गुरूच क्षत्रियांसाठी आहेत! आपणाला ते कसे मिळणार? मग आजच्या या पहिल्या दिवशी कुणाला गुरू करायचं? कुणाच्या आशीर्वादानं मिळविण्यासाठी पुढं सरसावयाचं? या जगात या सूतपुत्राचा गुरू होण्यासाठी कोण तयार होणार? कोणीच नाही? का आला अर्जुन नेमका याच वेळी? का एवढं मानतात त्याला हे गुरुदेव द्रोण? ते दोघं गुरुशिष्य आहेत. माझं मन खिन्न झालं.

खाली मान घालून मी विचार करू लागलो. मी राजकुलात जन्माला आलो नाही हा काय माझा दोष आहे? जन्म हा जन्माला येणाऱ्यांच्या इच्छेप्रमाणं कधीतरी मिळाला आहे काय? कुणी निर्माण केली ही जन्मासंबंधीची उच्च-नीचता? माणूस कशामुळे श्रेष्ठ ठरतो? त्याच्या अंगच्या श्रेष्ठ गुणांवरूनच ना? पण माझं म्हणणं इथं कोण मानणार? आपला आजचा हा दिवस असाच फुकट जाणार की काय? मला तर केव्हापासून धनुष्याच्या बाणाच्या निरनिराळ्या फेकी अचूक करीन, असं झालं आहे... छे, काही-काही दिवस माणसाची परीक्षा पाहण्यासाठीच येत असावेत! काय करावं?... काय करावं?

निराश मनानं मी त्या दगडी चौथऱ्याभोवती भ्रमिष्टासारखा फिरू लागलो. क्षणात वाटे जिथं गुरुदेव द्रोण आहेत तिथं असंच धावत जावं नि त्यांना सरळ – सरळ विचारावं, 'शिष्यांची मनं जाणतो तो गुरू असतो, तर मग एक शिष्य आपल्या आशीर्वादासाठी पाण्याबाहेरच्या माशासारखा तडफडतो आहे हे आपणांला अजूनही कसं कळत नाही? त्या अर्जुनालाच एवढं महत्त्व का देता तुम्ही? काय आहे विशेष त्याच्यामध्ये? माझ्याकडे पाहा. माझ्या कानात चमकणारी कुंडलं आहेत. माझं हे कर्दळीसारखं पिवळंधमक कातडं अभेद्य आहे!'

दुसऱ्याच क्षणी बाबांचे ते उद्गार आठवले, "नीट वाग!" कसा वागू नीट? की गुरुदेव द्रोणांनी माझ्याकडे ढुंकूनही पाहिलं नाही, असं रडगाणं सांगत तुमच्याकडे परत येऊ? काय करू?... काय करू?

मी नेहमीप्रमाणं पूर्वेकडच्या दिशेला आकाशात पाहिलं. रसरशीत लाल तापलेल्या लोखंडी गोळ्यासारखे सूर्यदेव आकाशाचं निळं छत जाळून काढीत होते. माझं नैराश्य क्षणात कुठल्या कुठं दूर पळालं. बस्स, या महासामर्थ्यशाली तेजाशिवाय आणखीन योग्य असा गुरू या त्रिभुवनात दुसरा कोणता असणार? दुसऱ्या कुणाच्या आशीर्वादाची कशाला भीक मागण्याची गरज आहे? आजपासून आपले खरे गुरू हेच! आजपासून तुमची पूजा! आजपासून तुमची आज्ञा! झटकन मी त्या दगडी चौथऱ्यावर चढलो. तिथं फुलांनी सजवलेलं धनुष्य होतं. ते मी हातात घेतलं नि शक्य असेल तेवढा हात उंचावून मी म्हणालो, "जगातला सगळा अंधकार उजळणाऱ्या सूर्यदेवा, मी आजपासून तुझा शिष्य आहे! मला आशीर्वाद दे! मला मार्ग दाखव!" ते धनुष्य मस्तकाला लावून मी वाकून त्या तेजाला वंदन केलं. शोण केव्हाच माझ्यामागं येऊन उभा राहिला होता. त्यालाही मी सांगितलं, "शोणा, सूर्यदेवांना वंदन कर. त्यांचा आशीर्वाद माग."

त्यानंही नम्रपणे हात जोडले. थोड्या वेळानं मी हातातील धनुष्य खाली ठेवलं.

आम्ही चौथऱ्याच्या पायदंड्या उतरू लागलो. माझं मन आता शांत झालं होतं. समोरून गुरुवर्य द्रोण नि राजकुमार अर्जुन चौथऱ्याकडेच येत होते. अर्जुन माझ्याकडे पाहून हसला, मला हसावंसं वाटलं नाही. त्याच्या त्या हसण्यात काहीतरी खोच असावी, असं मला वाटलं.

पितामह भीष्मांची आठवण झाली. या अर्जुनाचे ते पितामह होते, पण दोघांत कुठंच साम्य नव्हतं. किती भिन्नता होती दोघांच्या स्वभावात नि वागणुकीत! जाता – जाता विचारायचं म्हणून अर्जुनानं मला विचारलं, ''हा कोण?''

''माझा धाकटा भाऊ!'' मी अभिमानानं म्हणालो.

''हाही येणार आहे काय या शाळेत?'' गुरुवर्य द्रोणांनी विचारलं.

''होय.'' मी उत्तर दिलं.

''जा, पलीकडे कृप आहेत; त्यांच्या पथकात दाखल व्हा.''

मी काहीच बोललो नाही. त्यांना वंदन करावं, असंही मला वाटलं नाही. जाता-जाता मी अर्जुनाकडे वळून पाहिलं. तो माझ्या कानातील कुंडलांकडे मात्र आश्चर्यानं एकटक पाहत होता.

कृपाचार्यांच्या पथकात आलो. कृपाचार्य द्रोणांचे मेहुणे होते. त्यांच्या हाताखाली अनेक युवक धनुर्विद्येचं शिक्षण घेत होते. मला क्षणभर वाटलं हे ढीगभर राजपुत्र कशाला जिथं-तिथं मिरवतात? एकात तरी त्या दुर्योधनाची ऐट आहे काय? एकाची तरी चाल त्याच्यासारखी ऐटदार आहे काय? एकाची तरी दृष्टी त्याच्यासारखी भेदक आहे काय? इतक्यात युवराज दुर्योधनच समोरून येताना मला दिसला. त्याच्याजवळ जावं म्हणजे तो निश्चितच आपली विचारपूस करील या कल्पनेनं मी त्याच्या दिशेनं चालू लागलो. त्याच्या जवळ गेलोही, पण तो युवराज दुर्योधन नव्हता! त्याच्यात नि दुर्योधनात किती विलक्षण साम्य होतं! राजहंसाची दोन पिलं जशी एकापासून दुसरं अशी ओळखता येत नाहीत तसेच ते दोघे होते. कोण असावा हा? मी विचार करू लागलो. त्याच्या अंगावरच्या वस्त्रामुळे तर तो राजकुमार असणार हे नक्कीच होतं, पण हा कुणापैकी राजकुमार होता? कौरवांपैकी की पांडवांपैकी? दुर्योधनात नि याच्यात साम्य आहे त्याअर्थी हा कौरवांपैकीच असणार, पण हा कौरवांपैकी कोण? इतक्यात कृपार्यांनी त्याला हाक मारली ''दु:शासन!'' तोही लगबगीनं त्यांच्याकडे निघून गेला. म्हणजे तो दु:शासन होता तर. बस्स, दुर्योधनात नि त्याच्यात किती साम्य होतं! एकाला लपवावा नि दुसऱ्याला काढावा. युवराज दुर्योधन नि राजपुत्र दु:शासन! दोघांच्याही चालीत एकच ऐट. दोघांच्याही दृष्टीत एकच भेदकता! दु:शासन म्हणजे दुर्योधनाची पडछाया तर नाही ना?

**

# सतरा

पहिले पंधरा दिवस मी युद्धशालेतील केवळ शस्त्रांची माहिती करून घेतली, कारण काही शिकावं या मन:स्थितीत मी नव्हतोच. गुरुवर्य द्रोणांनी जी जगावेगळी वागणूक मला पहिल्याच दिवशी दिली होती; त्यामुळे मन कशातच रमत नव्हतं. क्षणात वाटे राजपुत्रांच्या या फाफटपसाऱ्यात केवळ एक सूतपुत्र म्हणून उपेक्षिला जाण्यापेक्षा सरळ उठावं नि तडक चंपानगरीला परत जावं. काय करायचं आहे आपणाला युद्धविद्येचं शिक्षण घेऊन? कोणतं महायुद्ध आता पेटणार आहे? आणि पेटलं तरी आपला त्यात काय उपयोग? केवळ एक सारथी म्हणूनच ना? मग सारथ्याला कशाला पाहिजे हे युद्धविद्येचं शिक्षण? त्यानं घोडे पारखावेत नि त्यांच्या नाठाळ सवयींना जरब बसवावी. मग ते काय आपणाला चंपानगरीत राहूनही करता येणार नाही? पण लागलीच वाटे असं करून कसं चालेल? केवळ युद्धासाठीच का युद्धविद्या शिकायची असते? ज्याच्या दंडात बल असतं तो नेहमीच श्रेष्ठ ठरत असतो.

या युद्धशालेत आपणाला बलदंड बनता येईल. त्या राजकुमार अर्जुनालाही दाखविता येईल की, जगात तोच एकटा धनुर्धर नाही, पण त्यानं बिचाऱ्यानं तरी काय केलं आहे माझं? कशाला त्याच्याशी ही स्पर्धा करायची? स्पर्धा ही नेहमीच माणसाला आंधळं करते. गुरुवर्य त्याच्यावर प्रेम करतात हा काय त्याचा दोष आहे? माझ्यासारखाच तोही एक युवक आहे. आपल्या गुरूचं आपल्यावर प्रेम असावं असं कोणत्या शिष्याला वाटणार नाही? आणि कोणता गुरू शिष्याला नीट पारखल्याशिवाय इतका जवळ घेईल? असंच जर असेल तर गुरुदेव मीही तुमच्या कसोटीला उतरेन, केवळ एक धनुर्धर म्हणूनच तुम्ही त्या अर्जुनाला एवढं मानत असाल, तर मीही त्याहून श्रेष्ठ धनुर्धर होईन, पण मी धनुर्धर होऊन तरी त्याचा काय उपयोग? मला तुम्ही कधीच आपला मानणार नाही. माझ्या पाठीवरून तुमचा हात कधीच मायेनं फिरणार नाही, कारण मी सूतपुत्र आहे. अर्जुन क्षत्रियपुत्र आहे. काय वैशिष्टय असतं एवढं क्षत्रियकुलात? कशाला पाहिजे ही कुलाची कसोटी? पण असं तरी कसं म्हणता येईल? ज्या कुलातील पूर्वजांनी आपल्या पराक्रमानं शत्रूचं निखंदन करून हे कुरुकुल आणि राज्य यांची कीर्ती वाढविली ते कुल श्रेष्ठच ठरणार. आपल्या कुलातील पूर्वजांनी पिढ्यान्‌पिढ्या घोड्यांना खरारा केला नि त्यांचे वेग आवरले. आपली आणि क्षत्रियांची तुलना कशी होणार? खरोखरच मी एखाद्या राजकुलात जन्माला आलो असतो, तर किती बरं झालं असतं? पण कसं शक्य होतं ते? वडाच्या झाडावर बसणाऱ्या कावळ्यानं राजवाड्याच्या कळसावर बसणाऱ्या कपोताची स्वप्नं कशाला रंगवावीत? जाऊ द्या. जे बदलणं माणसाच्या हातात नसतं, त्याचा त्यानं इतका विचार करू नये आणि अपसमज करून एखाद्याबद्दल अनादर तर कधीच बाळगू नये. वास्तविक राजपुत्र अर्जुन गुरुवर्यांचा एवढा लाडका होता, याबद्दल फार तर त्याच्या भावांना काहीतरी वाटावं, मला त्यात खटकण्यासारखं असं काहीतरी का वाटावं? माझं आणि राजकुमार अर्जुनाचं असं काय नातं आहे? काहीच नाही. मी एक सूतपुत्र आहे. तो एक राजपुत्र आहे. त्याचा मार्ग

वेगळा अन् माझा वेगळा. जीवनाच्या मार्गावरून चालणारे आम्ही दोन संपूर्णत: वेगळे असे यात्रेकरू आहोत. जा, राजकुमार अर्जुना, असाच मोठा हो. अजिंक्य धनुर्धर हो. कधीतरी प्रसंग पडल्यास हा सूतपुत्र कर्ण तुझ्या रथाचे घोडे आवरण्यासाठी सारथ्य करील.

मी मनात निर्धार करून टाकला की, अर्जुन काय किंवा कोणीच काय मी कोणाबद्दलही मनात किंतू बाळगणार नाही. या इथल्या सगळ्या राजपुत्रांचे नि माझे मार्ग भिन्न आहेत. जन्मानंच ते ठरविले आहेत. केवळ खरी आवड म्हणून मात्र मी धनुर्विद्या शिकेन, कारण मलाही वाटतं की, नुसत्या आवाजाच्या रोखानं कुठंही बाण सोडावा. एकाच वेळी असंख्य बाण दाही दिशांना सोडावेत. गुरू कोण आहेत याला काय महत्त्व आहे? शिष्याच्या अंगात विद्येबद्दल किती आत्मीयता आहे याला खरं महत्त्व आहे. मी एक हाडाचा शिष्य होईन. विद्येसाठी विद्या घेईन! मी निर्धार करून टाकला.

**

# अठरा

माझा युद्धशालेतील कार्यक्रम ठरून गेला. एक मासातच मी शूल, तोमर, परीघ, प्रास, शतघ्नी, खड्ग, पट्टे, भृशुंडी, गदा आणि चक्र अशा अनेक शस्त्रांची माहिती करून घेतली. माझी विशेष आवड धनुष्याकडे असल्यानं धनुर्विद्येला लागणारी सर्व शस्त्रं काळजीपूर्वक अभ्यासली. केवळ बाणच कितीतरी प्रकारचे होते. दोन शूलाग्रे असलेला कर्णी बाण. तो पोटात घुसला की, बाहेर काढताना आतडी बाहेर पडत! नालीक बाण जाड पात्याचा असून त्याला वाकडे दात होते. त्यामुळे शरीरात घुसलेला तो बाण काढताना आपल्या आसपासच्या धमन्या तोडूनच बाहेर पडे. लीप्त या बाणाच्या अग्राला विषारी वनस्पतिरस लावल्यामुळे तो अतिशय दाहक असे. बस्तिक हा बाण शरीरात घुसे, पण बाहेर खेचला की, त्याचा केवळ दंडच हातात येई आणि सगळं पातं तसंच लक्षयाच्या शरीरात राही. सूची या बाणाची शेपटी निमुळती आणि टोकदार असल्यामुळे अगदी बारीक अशा लक्षयाचासुद्धा त्यानं अचूक वेध घेता येई. विशेषत: डोळ्याचं बुब्बुळ या बाणानं अचूक टिपता येई. जिद्म हा बाण जाताना वाकडा – तिकडा जाई, पण लक्षयात मात्र बरोबर घुसे. याशिवाय गवास्थी म्हणजे बैलाच्या हाडाचा, गजास्थी म्हणजे हत्तीच्या हाडाचा, कपीश म्हणजे काळ्या रंगाचा, पूती म्हणजे उग्र गंधाचा, कंकमुख, सुवर्णपंख, नाराच, अश्वास्थी, उष्ट्रास्थी, अंजलिक, सन्नतपर्व, सर्पमुखी असे बाणांचे कितीतरी प्रकार होते. हे सगळे बाण कसे फेकावेत, याचं शिक्षण मी मनापासून घेणार होतो. माझ्या शिष्यावस्थेतील क्षणन्क्षण मी त्यासाठी वेचणार होतो. पूर्वी मला तीन वस्तूंविषयी प्रेम वाटत होतं. गंगामाता, सूर्यदेव, आणि आईनं – राधामातेनं – आत्यंतिक प्रेमानं दिलेली ती चांदीची पेटी; पण युद्धशालेत आल्यापासून मात्र त्या वस्तूंत आणखी एकीची भर पडली. ती वस्तू म्हणजे धनुष्य आणि बाण!

**

# एकोणीस

महाराजांच्या रथाचं सारथ्य बाबांनी पुष्कळ वर्षं उत्साहानं केलं होतं, पण अलीकडे वृद्धत्वामुळे त्यांच्या अंगी पूर्वीसारखी चपळता राहिली नव्हती. त्यांच्या साहाय्यासाठी महाराजांनी गवल्गण नावाच्या सारथ्याच्या आणखी एका निष्णात पुत्रालाही आपल्या खास सेवेसाठी नेमून घेतलं होतं. कधी – कधी महाराज त्यांना हाक मारीत ते ऐकून त्यांचं नाव 'संजय' आहे हे आम्हालाही समजलं होतं, पण ते वडीलधारी असल्यानं आम्ही त्यांना 'संजयकाका' म्हणू लागलो. त्यांच्या आणि आचार्य विदुरांच्या चर्येत फार साम्य होतं. त्यांचं संजय हे नाव मला फार आवडलं. ते सारथी आहेत हे तर त्याहूनही अधिक आवडलं मला! उगाच काहीतरी निमित्त काढून मी त्यांच्याशी त्यांना 'काका' म्हणत बोलण्याचा प्रयत्न करी.

रथशालेत ते आणि बाबा, जातिवंत घोडे, रथाचं सर्वांत उपयोगी वंगण, चक्रासाठी कोणती लाकडं टिकाऊ, रथचक्रांच्या आऱ्यांची संख्या कमी असावी की अधिक, त्यांचा गतीवर काय परिणाम होतो, यांसारख्या असंख्य मनोरंजक विषयांवर चर्चा करीत. मला तर ते नेहमी सांगत, "कर्णा, तू सूतपुत्र आहेस. तू नेहमीच हे लक्षात ठेव की, जातिवंत घोडा कधीच धरतीवर बसत नाही. रात्री निद्रेसाठीसुद्धा! आणि जातिवंत सारथी कधीच रथनीड सोडत नाही! प्राण गेला तरीसुद्धा! एकदा धरली ती जागा कायमची!"

"काय म्हणता काका, घोडा कधीच खाली बसत नाही?" मी आश्चर्यानं विचारी.

"हो. एवढंच नाही तर उभ्याउभ्या निद्रा घेणारा घोडा जेव्हा चार खुरांपैकी एक खूर मुडपून निद्रावश होण्याचा प्रयत्न करतो तेव्हा तो दीर्घ प्रवासाला निकामी झाला म्हणून समजावा! लक्षात ठेव, घोडा हा सर्व प्राण्यांत गतिमान प्राणी आहे."

"गतिमान?" ते तसेच एकसारखे बोलत राहावेत म्हणून मी उगाच काहीतरी विचारी. भारद्वाज पक्षयासारखा त्यांचा मधुर आवाज एकसारखा ऐकत राहावा असाच होता.

"नुसताच गतिमान नाही तर बुद्धिमानही! कर्णा, कधीतरी घोड्यावरून घनदाट अरण्यात गेलास आणि बाहेर येण्यासाठी मार्ग सापडेनासा झाला तर हातातील वेग खुशाल सोडून दे! हा बुद्धिमान प्राणी तुला अचूकपणे तू जिथून निघाला असशील तिथं परत आणून सोडील!" घोड्यांच्या अशा कितीतरी लकबी काका गप्पा मारताना सांगून जात.

त्यांच्याकडून घोड्यांच्या अशा विविध सवयी, व्याधी व गती या विषयांचं वर्णन ऐकताना आमचा काल आनंदात जाऊ लागला. आम्हा सारथ्यांची कर्तव्यकर्मे, धार्मिक विधी, सभागृहाचे नियम यांची ते आम्हाला सूक्ष्मपणे माहिती देऊ लागले. अकला, अकूर अशा घोड्यांच्या खुरांच्या रोगांवर कोणकोणती औषधी वनस्पती चालते, हे त्यांनी व्याधिग्रस्त घोड्यावर प्रत्यक्ष प्रयोग करून आम्हाला दाखवून दिलं.

संजयकाका म्हणजे राजवाड्यावरील सर्व सारथ्यांचे नायक होते. महाराज

धृतराष्ट्र, पितामह, महामंत्री विदुर, राजमाता आणि अमात्य वृषवर्मा सर्व जण सभागृहातही त्यांचा आदर राखत. असे सर्वांचे आवडते संजयकाका माझ्याशी घटकाघटका गप्पात रंगत होते. सारथ्यकर्मातील खुबीचे बारकावे सांगत होते. कधी – कधी मालांनी आणि घंटांनी सुशोभित अशा आपल्या रथातून मला व शोणाला राजनगरात फिरवून आणीत होते.

**

# वीस

एके दिवशी मी नि शोण असेच नगरात फिरायला गेलो होतो. नेहमीप्रमाणं फेरफटका मारून आम्ही परतलो. राजवाड्याजवळ आम्ही आलो होतो. एवढ्यात एक राजरथ समोरून येताना आम्हाला दिसला. त्या रथाला चोहोबाजूंनी झिरमिरीत वस्त्रांचे पडदे लावलेले होते. रथाचे घोडे पांढरेशुभ्र होते. मला त्यांचा रंग फारच आवडला. ते पाच पांढरे भरीव, पुष्ट ठिपके खालीवर हिंदकळत समोरून येत होते. मी त्या घोड्यांकडे भारावून पाहत होतो. मध्येच त्यांतला एक घोडा आपल्या मानेला मजेदार झटका देई. अगदी सहजरीत्या ते तो रथ पुढं आणीत होते.

एवढ्यात शोण एकाएकी माझ्या हातातील आपला हात झटकून त्या रथाच्याच दिशेनं धावू लागला. मला काहीच कळेना की, तो वेड्यासारखा त्या रथाच्या दिशेनं का धावत होता. क्षणात तो रथाच्या समोर गेला. मला त्याच्या मूर्खपणाची चीड आली. मी त्याच्याजवळ पोहोचण्यापूर्वीच तो रथाखाली सापडणार होता! काय करावं? भयानं अंगावर रोमांच उभे राहिले. क्षणातच तो तेथून हलला नाही, तर रथाखाली सापडणार म्हणून जिवाच्या आकांतानं अंगातली सगळी शक्ती एकवटून मी जोरानं ओरडलो, “शोणाऽऽ थांब!” एवढ्यात झटकन खाली वाकून त्यानं चपळाईनं काळसर रंगाचं काहीतरी उचललं. शोणाला पाहून सारथ्यानं अत्यंत कौशल्यानं सगळे घोडे आवरले. जेमतेम ते त्याच्या अंगाला टेकून कसेतरी थांबले! एका घोड्याच्या तोंडातील फेस तर सरळ शोणाच्या डोक्यावर पडत होता! पण त्याला त्या कशाचंच भान नव्हतं. हातातील काळसर ठिपका तो प्रेमानं गोंजारत होता. मी धापा टाकीतच त्याच्याजवळ आलो. मला बघताच हातातील ती वस्तू मला दाखवीत तो अधीरपणे म्हणाला, “दादा, हे बघ. आता कसं रथाखाली सापडत होतं!” मी त्याच्या ओंजळीत पाहिलं. ते एक मांजरीचं पिल्लू होतं! आपले बारीक डोळे मध्येच मिटून ते अत्यंत केविलवाण्या स्वरात ओरडू लागलं. शोणाला काय म्हणावं तेच मला कळेना. त्याच्यावर रागवावं असंही वाटेना. मी त्याच्याकडे काहीशा कौतुकानं पाहू लागलो. आमच्या रथामागून रडवेला होऊन धावणारा हाच तो शोण होता काय?

त्यानं हातातील पिल्लाच्या पाठीवरून प्रेमानं हात फिरवायला सुरुवात केली. स्वर्ग हाताशी आल्याचा आनंद झाला होता त्याला. त्याच्या खांद्यावरून घरंगळलेलं उत्तरीय खालच्या धुळीत पडलं होतं, याचंही त्याला भान नव्हतं. इतक्यात त्या पिल्लाची आई कर्कश आवाज काढीत कुठूनतरी ओरडत आली. आपल्या चिमुकल्याला ती इकडे – तिकडे शोधू लागली. गुरगुरत आमच्या पायांत घुटमळू लागली. ते पिल्लू खाली ठेवायला मी शोणाला सांगितलं.

त्यानं ते तिच्या पुढ्यात ठेवताच गपकन त्याची मान आपल्या तोंडात पकडून क्षणार्धातच ती गुरगुरत कुठच्या कुठं पसार झाली! आपल्या पोराला एकटं टाकून ती मघापासून कुठं भटकत होती? आता शोणानं धाडस केलं नसतं तर तिचं ते कोवळं लुसलुशीत पोर राजमार्गावरच्या धुळीत मिसळलं नसतं का? त्याचा तो केविलवाणा

आवाज कुणालातरी ऐकू गेला असता काय?

त्या सगळ्या प्रकारानं मला एकदम राधामातेची आठवण झाली. तिची प्रेमळ मूर्ती डोळ्यांसमोर उभी राहिली. किती जपलं होतं तिनं मला आजवर! आई असावी तर राधामातेसारखी! मी चंपानगरीच्या आठवणीत दंग झालो; इतक्यात त्या राजरथाच्या रथनीडावरचा सारथी म्हणाला, ''आटपा, बाजूला व्हा लवकर! रथात राजमाता कुंतीदेवी आहेत!''

''राजमाता कुंतीदेवी!''

मी शोणाच्या दंडाला धरून त्याला चटकन एका बाजूला ओढून घेतलं. रथ धडाधड आवाज करीत, धूळ उडवीत धावू लागला. मी त्याच्या पांढऱ्याशुभ्र घोड्यांकडे पुन्हा कौतुकानं पाहिलं. मला आश्चर्य वाटलं! त्या रथाला सहा घोडे जोडण्याची नीट व्यवस्था असतानाही केवळ पाचच घोडे जोडले होते! एका घोड्याची जागा तशीच मोकळी सोडली होती!

"राजवाड्यावरचे घोडे संपले की काय?" मी स्वत:शीच पुटपुटलो. रथ निघून गेला. त्याच्या चक्राखाली सापडलेलं आपलं उत्तरीय शोणानं उचललं! त्यावरची धूळ झटकून परत खांद्यावर लपेटलं! आम्ही आमच्या निवासस्थानाच्या दालनाकडे चालू लागलो. कधी नव्हे ते माझा हात शोणाच्या खांद्यावर होता.

**

# एकवीस

माझे हस्तिनापुरातले दिवस मजेत जाऊ लागले. पहिले थोडं दिवस एकसारखी चंपानगरीची आठवण येई. पुढं – पुढं तीही काही कारण घडल्याशिवाय येईनाशी झाली. माझ्याजवळच्या पेटीमुळे मात्र आईचा प्रेमळ चेहरा माझ्या डोळ्यांसमोर नेहमीच उभा राही. ती आता दूर होती, पण त्यामुळेच तिचं खरं महत्त्व आता मला समजलं होतं. मी रोज झोपताना म्हणे, "माते, मायेच्या धाग्यानं जोडलेले जीव कितीही लांब असले तरी ते एकत्रच असतात. तू या पेटीतच आहेस. नाही – तू दोन पेटचांत आहेतस! एक या तू दिलेल्या आणि दुसऱ्या माझ्या मनाच्या पेटीत!"

आठवणी या झंझावातासारख्या असतात! त्या कुठूनही आणि कशाही येऊ शकतात, इतकंच नाही तर काही वेळा तर त्या मनाचं शांत सरोवर पार घुसळून सोडतात! कधी – कधी अशीच चंपानगरीची तीव्रतेनं आठवण होई. मन नाराज होई. ते कशातच रमत नसे. अशा वेळी मी शोणाला घेऊन नगरात एक फेरफटका मारून येई. त्यामुळे आलेला सगळा शीण नाहीसा होई. बऱ्याच वेळा असा फेरफटका मारल्यामुळे सगळं नगर आम्हाला आता चिरपरिचयाचं झालं होतं. कुठले मार्ग कुठं जातात, कोणत्या देवतेचं मंदिर कुठं आहे, कुठं तलाव आहेत, कुठं अश्वशाला आहेत, कुठं धान्यागारं आहेत, कुठं शस्त्रागारं आहेत, हे आम्हाला आता पाठ झालं होतं. हस्तिनापूर म्हणजे निरनिराळ्या आकारांच्या नि रंगांच्या फुलांनी डवरलेल्या एखाद्या उद्यानासारखं होतं. किती प्रकारची माणसं या नगरात राहत होती! गायक, नर्तक, योद्धे, व्यापारी, कृषिजन, कलाकार, पंडित; शिवाय चर्मकार, लोहकार, उपलेपक, कुंभकार, महार असे अठरापगड कष्टकरीसुद्धा इथं होते. केव्हाही गेलं तरी नगर गजबजलेलं दिसे. हे सगळं नगर पाहताना मला कधीच कंटाळा आला नाही. काही – काही वेळा तरी वाटे की, युद्धशालेत जायचं सोडून नगरातच फिरायला जावं. पण ते कधीच शक्य नव्हतं, कारण मी इथं फिरायला आलो नव्हतो. शिकायला आलो होतो.

**

# बावीस

हस्तिनापुरातला माझा कार्यक्रम ठरल्यासारखा होता. मी रोज भल्या पहाटे उठत असे. नियमानं गंगेच्या किनाऱ्यावर जात असे. कुणाचाही त्रास नको म्हणून कधीच घाटावर जात नसे. दुसरी एक छान निवान्त अशी जागा मी माझ्यासाठी निवडली होती. तिथं कुणीच येण्याची शक्यता नव्हती. तिथं जाऊन मी मनसोक्त डुंबत असे. नंतर कंबरभर पाण्यात येऊन उभा राही. माझ्या पायांना लहान – लहान मासे येऊन लुचत, पण मला माहीत होतं की, त्यांना त्यापासून काहीच खायला मिळणार नव्हतं. माझ्या अभेद्य कातडीला चावून – चावून ते कंटाळत आणि शेवटी निघून जात. पुढं – पुढं तर ते माझ्या आसपास फिरकेनात. माझे पाय म्हणजे पाण्यातील दोन नित्याचे खडकच आहेत, असा त्यांनी समज करून घेतला असावा!

ओंजळीत पाणी घेऊन मी सूर्यदेवांची वाट पाही. दूरवर गंगेच्या पाण्यातून ते हळूच डोकावत. त्यांच्या किरणांनी, तिच्या असंख्य चिमुकल्या लहरी डोक्यावर सोनेरी वस्त्रं घेऊन नाचताहेत असं वाटे. मध्येच एखादा कारंडव पक्षी आम्हा दोघांमध्ये फेऱ्या घाली. त्याच्या इकडे – तिकडे फिरण्यानं त्या तेजाची तेवढीच जागा दिसायची बंद होई. मी मनात म्हणे, 'या एवढ्या चिमुकल्या पक्षयातसुद्धा काही शक्ती आहे! आपल्या अस्तित्वानं तो सूर्यबिंबालासुद्धा झाकू पाहतो आहे.' तो पक्षी दूर निघून जाई. बिंब पुन्हा तळपू लागे.

हातातील पाण्याचं अर्घ्य मी त्या तेजाला देई आणि म्हणे, 'आपला शिष्य, हा सूतपुत्र कर्ण, आपल्या आशीर्वादाची इच्छा करतो आहे. गुरुदेव, त्याच्यावर अनुग्रह करा!' मग एकटक मी त्या तेजाकडे पाही. चमचमणारे असंख्य तेजस्वी कण मला दिसत. प्रचंड वेगात फिरणारे तेजाचे कण! जगातील अंधकार उजळणारे तेजाचे कण! जगाला उत्साहाची कारंजी पुरविणारे अमर तेजाचे कण! एक दिवसच जर हे कण आपलं मुख जगाला न दाखवतील तर काय होईल? हे हस्तिनापूर, हे इथले प्रासाद नि ही मंदिरं, ऐटीत छाती पुढं काढून चालणारे हे योद्धे, तो अर्जुन, तो भीम, ते द्रोण, काय होईल या सर्वांचं? छे, किती कर्तव्यदक्ष आहेत हे तेजाचे कण! मी मनात म्हणे, 'हा कर्णसुद्धा त्या तेजाच्या कणांतील एक कण झाला असता तर किती बरं झालं असतं! मग त्यानंसुद्धा जगातला सगळा अंधकार उजळला असता आणि तोसुद्धा स्वत:ला जाळून घेत!' पण ते शक्य नव्हतं.

माझं भान हरपून जाई. अंगावरचं कवच, कानातील कुंडलं या कशाचीच मला जाणीव उरत नसे. डोळे सताड उघडे ठेवून ते तेज मी शक्य असेल तेवढं डोळ्यांनी पिऊन घेई. कितीही प्यालो तरीही माझं समाधान होत नसे.

अशा अनेक घटका निघून जात. ते तेज माझ्या डोक्यावरून मागं जाई. आता ते पाहता येणं शक्यच नसे. माझी मान अवघडलेली असे. मग मी शांतपणे डोळे मिटून घेई. डोळ्यांपुढं तेजाची नुसती वलयंच वलयं गरगर फिरू लागत. शरीरातील रक्ताचा थेंबन्थेंब त्या तेजातील कणासारखा फिरतो आहे असं वाटे. बऱ्याच वेळानंतर मी डोळे

उघडी. माझी पाठ चांगली खरपूस तापलेली असे. किनाऱ्यावरची वाळूही तापलेली असे. मी लगबगीनं पाण्याबाहेर येई आणि वस्त्रं बदलून झपाझप पावलं उचलीत राजवाड्याकडे चालू लागे.

**

# तेवीस

राजवाड्यावर येताच युद्धशालेत घालण्याची वस्त्रं अंगावर चढवून मी शोणाला घेऊन युद्धशालेकडे जाई. तिथं आमचा सगळा दिवस निरनिराळी शस्त्रं हाताळण्यात जाई. कधी मंडलं घेत गदा फिरवावी, कधी खड्गाचे हात करावे, कधी शूल फेकावं, जे – जे शस्त्र हाताला लागेल ते – ते सफाईदारपणे चालविल्याशिवाय माझं कधीच समाधान होत नसे. विशेषत: धनुष्याच्या सरावासाठी तर मी घटकान्‌घटका घालविल्या होत्या; कारण कोणतीही विद्या ही एखाद्या रोपासारखी असते. तिला निष्ठेचं खत नि मनाच्या एकाग्रतेचं पाणी मिळालं तरच ती वाढते. याअभावी उलट ती मरण्याची शक्यता असते. दिवसभर मी या निष्ठेची आणि मनाच्या एकाग्रतेची पराकाष्ठा करी. जे – जे अवघड असे ते – ते प्रथम शिकावं असं मला वाटे. ते – ते मी शिकून घेई. संध्याकाळी सगळे जण गुरुवर्य द्रोणांची आज्ञा होताच हातातील शस्त्र खाली ठेवून आपापल्या निवासस्थानाकडे निघून जात. मी शोणाला तिथंच थांबायला सांगून लगबगीनं गंगेच्या किनाऱ्यावर येई. युद्धशालेच्या मागूनच ती वाहत पुढे नगरात गेली होती. त्या ठिकाणी उभा राहून मी पश्चिमेकडे पाही. हस्तिनापूरचा निरोप घेणाऱ्या सूर्यदेवांना मी वंदन करी. माझ्या अंगावरून आपली सोनेरी बोटं फिरवीत ते जणू म्हणत, "आता आपली भेट उद्या!" दिवसभर निरनिराळी शस्त्रं फिरवून आलेला शीण क्षणातच निघून जाई.

रात्री अंथरुणाला पाठ लागताच दिवसभराच्या कष्टामुळे मला ताबडतोब झोप येई, पण कधी – कधी ती रुसलेल्या मुलासारखी रुष्ट होई. गुरुवर्य द्रोणांचे ते शब्द आठवत, "राजकुमारांबरोबर कसं शिकता येईल त्याला?" मी माझ्या मनाची समजूत घालण्याचा प्रयत्न करी. ते म्हणाले त्यात काहीच चूक नाही. आपण राजकुमार नाही. आपणाला त्यांच्याबरोबर शिकता येणार नाही. पण मन ते मानायला तयार होत नसे. या कुशीवरून त्या कुशीवर मी एकसारखा तळमळत राही. या माझ्या तळमळीचं माझं मलाच आश्चर्य वाटे. राजपुत्रांबरोबर शिकायला न मिळणारे असंख्य युवक नगरात होते. ते सगळे युद्धशालेत येत होते. ते काय असेच विचार करीत असतील? मग आपणालाच तेवढं हे असं का वाटावं? कंटाळून मी बाहेर येई. राजवाड्यासमोरच्या तलावाच्या कठड्यावर येऊन बसे. त्या नितळ पाण्यात वरच्या आकाशाचं प्रतिबिंब पडलेलं असे. चंद्राची कोर तर आकाशातल्या निर्जीव चांदण्यांशी खेळायचं सोडून त्या तलावातील चपळ माशांशी खेळण्यासाठी आकाशाचा एवढा उंच सोपान हळूच उतरून बसलेली असे! तलावातील निर्भीड मासे त्या कोरीशी एकसारखा पाठशिवणीचा मजेदार खेळ खेळत. बराच वेळ मी ती माशांची लाडिक नि चपळ धावपळ पाहत राही. सभोवतालच्या तटबंदीत कुठंतरी घर करून राहिलेल्या कपोतांपैकी एखादा चुकून क्षणभर घुमून शांत होई. चंद्रकोरीकडे पाहत – पाहत सोपान चढून मी परत दालनात येई आणि शांत मनानं झोपी जाई.

**

# चोवीस

राजवाड्यापासून युद्धशाला फार दूर होती म्हणून आम्ही काही दिवसांनंतर युद्धशालेतच राहायला सुरुवात केली. आता राजवाड्याचा आणि आमचा संबंध तुटलाच होता. वर्षातून कधीतरी एकदा शारदोत्सवासाठी आम्ही राजवाड्यावर जात असू. तेही युवराज दुर्योधनाच्या आग्रहामुळे. त्यानं आणि अमात्य वृषवर्मा यांनी आम्हाला फारच मदत केली होती. त्याला नव्याण्णव भाऊ होते, पण एकट्या दुर्योधनाशिवाय माझी कुणी कधीच विचारपूस केली नव्हती! मलाही त्यांच्याबद्दल कधीही ओढ वाटली नव्हती. किती विचित्र होती एकेकांची नावं! दुर्मर्ष, दुर्मुख, अंत्यनार! नाही म्हणायला मला आणखीन एक व्यक्ती आवडली होती. ती म्हणजे अश्वत्थामा! गुरू द्रोणांचा पुत्र! किती सरळ नि साधा स्वभाव होता त्याचा! एवढ्या लहान वयातही धर्म, आत्मा, पराक्रम, कर्तव्य, प्रेम या सगळ्या विषयांवर तो किती सहजपणे बोलत होता! मिळालेला सगळा वेळ मी त्याच्याशी चर्चा करण्यात घालवी. त्याला माझं केवळ कर्ण हे नावच माहीत होतं. मी कोण, कुठला, इथं कशासाठी आलो? याची त्यानं कधीच चौकशी केली नाही आणि म्हणूनच तो मला सर्वांत अधिक आवडला.

एके दिवशी मी त्याला सहज विचारलं, ‘‘तुझं नाव ‘अश्वत्थामा’ हे जरा विचित्रच नाही का वाटत तुला?’’

लहान मुलासारखं खळाळून हसत तो म्हणाला, ‘‘बरोबर आहे तुझं. मला तरी कुठं ते पटतंय? माझ्या नावाबद्दल मी सर्वांना विचारलं तर ते काय सांगतात, असं तुला वाटतंय?’’

‘‘दुसरं काय सांगणार? तू घोड्यासारखा ऐटदार दिसतोस, असंच काहीतरी सांगत असतील?’’

‘‘नाही! ते म्हणतात की, मी जन्माला आल्याबरोबर म्हणे एकदम घोड्यासारखा खिंकाळलो! आणि म्हणूनच माझं नाव ‘अश्वत्थामा’ ठेवलं आहे! पण मला नाही ते पटत. एखादं लहान मूल घोड्यासारखं खिंकाळणं कधीतरी शक्य आहे? पण खरं म्हणशील, तर माझं नाव मला आवडतं, कारण माझे बाबा मला ‘अशू’ म्हणतात, पण मी एकटा असलो तरच! सर्वांदेखत मात्र ते मला अश्वत्थामाच म्हणतात.’’

मलाही त्याचं ‘अशू’ हे नाव फार आवडलं.

त्याच्या संगतीत माझे दिवस मजेत जात. तो माझ्या कानातल्या कुंडलांना हात लावून म्हणे, ‘‘कर्णा, तुझी ही कुंडलं दिवसेंदिवस फारच सोनेरी रंगाची दिसताहेत रे! नगरातल्या कुठल्या सुवर्णकाराकडे जाऊन त्याला हा सोनेरी वर्ख देतोस?’’

‘‘माझी ही कुंडलं रंगविणारा तो सुवर्णकार कोण आहे, हे मला तरी कुठं माहीत आहे? नाही तर मी त्याला सांगितलं असतं की, या माझ्या मित्राला – अश्वत्थामालाही एक सोनेरी कुंडलांची जोडी देऊन टाक! फार चांगला आहे तो.’’

तो हसत म्हणे, ‘‘नको रे बाबा, तुझी कुंडलं तुलाच लखलाभ होवोत! कानात सोनेरी कुंडलं पाहून माझ्यासारख्या पर्णकुटीत झोपणाऱ्या ऋषिकुमाराचा कानच

कुठलातरी चोर कापून न्यायचा! मग कुंडलंही नाहीत नि कानही नाहीत!'' आम्ही दोघंही खळाळून हसताना स्वत:ला विसरून जात असू. मी नेहमीच विचार करी. गुरू द्रोणांचा हा मुलगा किती निरागस आणि मनमोकळा! त्याच्यात नि शोणात काय फरक आहे? पण त्याचे वडील किती गंभीर नि शांत! त्यांच्या मनाचा अंतच लागत नाही, की जबाबदारी ही माणसाला प्रौढ बनविते? की काही – काही माणसं जन्मत:च प्रौढ असतात? तो युधिष्ठिर नाही का – सदैव गंभीर! कधी चुकून हसेल तर शपथ! पण किती मानतात त्याला या शालेतील सर्व शिष्य! त्याचा भाऊ अर्जुन म्हणजे तर सर्वांचा प्राणच! जिथं तिथं अर्जुन! या अश्वत्थाम्यावर जेवढं प्रेम नसेल तेवढं गुरू द्रोणांचं त्या अर्जुनावर आहे! अर्जुनाला ते एवढं का मानतात? तसं पाहायला गेलं तर अश्वत्थाम्याइतका श्रेष्ठ युवक युद्धशालेत दुसरा कुणीच नव्हता, पण त्या अर्जुनाशिवाय दुसऱ्या कुणालाच इथं मान नव्हता. एखाद्या व्यक्तीचं इतकं महत्त्व वाढविणं हे कितपत योग्य आहे? त्यामुळे ती व्यक्ती उन्मत्त नाही का होणार? कोणती कसोटी लावली आहे गुरुदेवांनी अर्जुनाला इतका जवळ करण्यात? अश्वत्थाम्यालाच तो प्रश्न विचारावा, असं मला अनेक वेळा वाटलं तरी ते मी संयमानं टाळलं होतं. न जाणो आपल्या पित्याचा अपमान झाला, असंही त्याला वाटेल. म्हणून तसं मी त्याला कधी विचारू शकत नव्हतो, पण एक मित्र म्हणून अश्वत्थामानं मला युद्धशालेतील सर्व शिष्यांहून अधिक जवळचा वाटत असे, आवडत असे.

**

# पंचवीस

मध्यंतरी एकदा मी आईला भेटण्यासाठी चंपानगरीला गेलो होतो. आठ दिवसांनंतर परत आलो तेव्हा मला अश्वत्थाम्याकडून कळलं की, गुरू द्रोणांनी आपल्या सर्व शिष्यांची परीक्षा घेतली होती. त्यांनी एका अशोकाच्या उंच शेंड्यावर पेंढ्यानं भरलेला एक पक्षी टांगला होता. त्या पक्षयाचा नेमका डावा डोळा अचूक टिपेल त्याला ते प्रशंसेची शाबासकी देणार होते. त्यांनी सर्व शिष्यांना एकत्र बोलावलं आणि एकेकाला त्या दगडी चौथऱ्यावर बोलावून त्याच्या हातात धनुष्य देऊन वेध घ्यायला सांगितलं. प्रत्येक जण येई. धनुष्य घेई, प्रत्यंचा ताणी, एवढ्यात गुरुवर्य त्याला विचारत, ‘‘बाण सोडण्यापूर्वी तुला काय – काय दिसतंय?’’

अनेक जण अनेक उत्तरं देत. त्या मूर्ख भीमानं तर सांगितलं की, ‘‘मला पलीकडचे हिरवे डोंगर दिसतात!’’ कुणी म्हणत ढग दिसतात, कुणी म्हणत झाडाची हिरवी पानं दिसतात, कुणी म्हणत तो पक्षी दिसतो.

गुरुवर्यांचं त्यानं समाधान होत नसे, ते त्याला धनुष्य खाली ठेवून तसंच परत जायला सांगत. सगळ्यांत शेवटी अर्जुन आला. त्याला गुरुवर्यांनी विचारलं, ‘‘अर्जुना, तुला काय – काय दिसतंय?’’

अर्जुन म्हणाला, ‘‘मला केवळ त्या पक्षयाचा डोळाच दिसतो.’’

गुरुवर्य प्रसन्न झाले. त्यांनी त्याच्या पाठीवर थाप मारली नि सांगितलं, ‘‘साधु! मग टीप तो डोळा!’’ त्यानं लागलीच बाण सोडला नि डोळा टिपला. गुरुवर्यांनी परत त्याच्या पाठीवर थाप मारली.

ही सगळी घटना आपले टपोरे डोळे वेळोवेळी मोठे करून मला अश्वत्थाम्यानं सांगितली. शेवटी त्यानं मला एकदम विचारलं, ‘‘कर्णा, तू त्या वेळी असतास तर त्या दिवशी काय उत्तर दिलं असतंस बाबांना?’’

मी थोडा वेळ थांबलो. मनानंच मी त्या दगडी चौथऱ्यावर आहे, असं समजून वीरासन घातलं. डोळ्यांसमोरच्या त्या पक्षयाच्या डोळ्यावर दृष्टी अचल ठेवली नि त्याला म्हणालो, ‘‘अश्वत्थामा, मी असतो तर म्हणालो असतो, ‘मला काहीच दिसत नाही!’ कारण लक्षय समोर असलं की, कर्ण हा कर्ण उरतच नाही! त्याच्या सर्वांगाचा बाण होतो. नुसता बाणच नाही. बाणाचं टोक नि लक्षयाचा छेदबिंदू! मी म्हणालो असतो, ‘माझ्या टोकदार शरीराला एक तिळाएवढी जागा समोर चिकटली आहे!’’’

माझ्या त्या उत्तरानं आनंदित होऊन अश्वत्थाम्यानं मला मिठीच मारली. तो म्हणाला, ‘‘कर्णा, तू सर्वांत श्रेष्ठ धनुर्धर होशील.’’ त्याच्या मिठीतून स्वत:ला सोडवून घेत मी मनाशी ठरवीत होतो, ज्या राजकुमार अर्जुनाला त्या पक्षयाचा डोळा फोडल्याबद्दल गुरुवर्यांनी एवढी शाबासकी दिली होती तोच लक्षयवेध आज मी करीन. तसा केला तर मग कधीतरी का होईना, गुरू द्रोण मलाही जवळ घेतील. माझीही पाठ थोपटतील.

त्या दिवशी संध्याकाळी मी नगरात आलो. एक पेंढा भरणाऱ्या माणसाकडून एक

पेंढा भरलेला पक्षी घेतला नि परत आलो. रात्री सगळीकडे सामसूम होताच शोणाला जागं केलं. तो आणि मी आमच्या दालनाबाहेर आलो. माझ्या हातात तो पक्षी होता. सगळी युद्धशाला शांत होती. दिवसभर शस्त्रांच्या खणखणाटांनी हादरणारी ती जागा आता नि:शब्द होती. जागोजागी इंगुदीचे पलिते त्या भव्य पटांगणाला धीर देत पेटत होते. त्यांतला एक पलिता मी हातात घेतला आणि मधल्या धनुर्वेदाच्या दगडी चौथऱ्यावर चढलो. समोरच तो विशाल अशोकवृक्ष होता. त्याच्याकडे बोट दाखवीत मी हातातील पक्षी शोणाच्या हाती देत म्हणालो, "हा पक्षी त्या झाडावर उंच ठिकाणी बांध नि तू तिथंच पलिता घेऊन थांब."

"कशाला?" त्यानं आश्चार्यानं विचारलं.

"ते नंतर सांगतो. जा लवकर."

माझ्या हातातील पलिता पक्षी घेऊन तो झाडाकडे गेला. सरसर खारोटीसारखं सरपटत क्षणार्धातच तो वर चढला. थोड्या वेळानं तो म्हणाला, "दादा, इथं एका फांदीला एक धागा बांधलेला दिसतो. इथं बांधू काय?"

"शक्य असेल तेवढं वर जा अजून." मी खालून ओरडलो.

तो तेथून भरपूर उंच गेला. त्याला त्यापेक्षा वर जाता येणं शक्यच नव्हतं. त्यानं हातातील पक्षी एका फांदीला बांधला तो एका दुसऱ्या फांदीवर बसला. मी त्याला ओरडून सांगितलं, "मला तो पक्षी दिसेल असा हातातील पलिता धर. जरासुद्धा हलवू नकोस." त्यानं हातातील पलिता घट्ट धरला. मी धनुष्य उचललं नि वीरासन घातलं. त्या चौथऱ्यावर उभं राहूनच मी सूर्यदेवाचं शिष्यत्व पत्करलं होतं. माझं मन मला सांगू लागलं, 'लक्षात ठेव, राजकुमार अर्जुनानं लक्षयाचा दिसणारा एकच डोळा फोडला होता. तुला दोन्ही डोळे फोडायचे आहेत! दिसणारा आणि न दिसणाराही! कसा? पहिला बाण लागताच तो पक्षी गिरकी घेईल. त्याची उलटी बाजू वरती येईल. तेवढ्यात दुसरा बाण त्याच्या दुसऱ्या डोळ्यात घुसला पाहिजे. हे दोन्ही बाण एकाच वेळी सोडायचे आहेत आणि तेही पलित्याच्या या धूसर प्रकाशात!'

मी झाडाकडे पाहिलं. पलित्याच्या फरफरणाऱ्या ज्योतीवरून वाऱ्याचा कानोसा घेतला. शेजारच्या भात्यातील दोन सूची बाण सर्रकन खेचून हातात घेतले. धनुष्य पेललं नि ते दोन्ही बाण त्यावर चढविले. प्रत्यंचा खेचली. आता मी... मी उरलो नव्हतो. माझं शरीर, मन, दृष्टी, श्वास, बाणांची दोन अग्रं, नि पक्षयाचे दोन्ही डोळे एक झाले! खेचलेल्या प्रत्यंचेवरची दोन्ही बोटं स्थिर झाली. दोन बोटांवर दोन वेगवेगळे प्रभाव होते. त्यातला एक बाण थोडासा पुढं जायला हवा होता नि एक लगेच त्याच्या मागोमाग. एका क्षणाची स्थिरता झाली नि दोन्ही बाण सुंऽऽऽ करीत एकामागून एक धनुष्यातून सुटले. एक तडाखा बसला नि तो पक्षी उलटा फिरला. इतक्यात दुसऱ्या बाणाचा आणखी एक तडाखा त्याला बसला आणि शोणानं गडबडीत कसातरी बांधलेला तो पक्षी दोर तुटल्यामुळे धाडकन खाली कोसळला. हातातील धनुष्य फेकून देऊन चौथऱ्याच्या चार – चार पायदंड्या एकदम उतरत मी धावतच त्या झाडाखाली गेलो. पक्षी हातात घेऊन कडेच्या पलित्याजवळ नेऊन बघितला. त्याच्या दोन्ही डोळ्यांच्या बाहुल्यांत दोन बाण घुसले होते! माझे डोळे यशाच्या आनंदानं चमकू लागले. शोण झाडावरून उतरून खाली आला. दूरवर रात्री पहारा देणाऱ्या एका पहारेकऱ्यानं मध्यरात्रीच्या घटकांचे ठोके लोहतबकावर दिले. आम्ही परत येऊन दालनात झोपी गेलो.

त्या दिवसापासून लक्षयवेधाचा एखादा अवघड हात आम्ही दोघं गुप्तपणे रात्री कोणीच आखाड्यात नसताना करू लागलो, कारण रात्रीच्या नि:शब्द शांत वेळी मनाची एकाग्रता छान करता येई. कुणाचाच व्यत्यय नसे.

वर्षांमागून वर्षं अशा सरावात केव्हा निघून गेली ते मला आणि शोणालाही समजलं नाही. मल्लविद्येचे हात शिकल्यामुळे माझं शरीर भक्कम झालं होतं. दंडांच्या स्नायूंवर भक्कम मुष्टिप्रहार करून अश्वत्थामा मला म्हणे, ‘‘कर्णा, हे मांस आहे की लोखंड?’’

**

# सव्वीस

असाच एकदा मी अश्वत्थाम्याबरोबर राजवाड्यावर गेलो होतो. राजवाड्यासमोरच्या तलावाच्या कठड्यावर, दुर्योधनाचे मामा – शकुनी हातात एक पांढराशुभ्र राजहंस घेऊन बसले होते. मला त्या पांढऱ्या पक्षयाबद्दल फारच आकर्षण होतं. पाण्यातून आपल्या पायांची वल्ही मारत मानेला किती ऐटदार झटके देत फिरत असतो तो! जणू जलसाम्राज्याचा तो एकटाच सम्राट असतो! आम्ही दोघे शकुनीमामांजवळ गेलो. ते जवळ – जवळ महाराज धृतराष्ट्रांसारखेच दिसत होते, पण त्यांना एक सवय होती. बोलताना ते नेहमी भुवया उडवीत. त्यांच्या बारीक डोळ्यांवरच्या जाड भुवयांकडे त्यांच्याशी बोलणाऱ्याचं वारंवार लक्ष जाई! हातातील राजहंसाला गोंजारत त्यांनी अश्वत्थाम्याला विचारलं, "काय अश्वत्थाम्या, कुठपर्यंत आलेत सगळे राजकुमार युद्धशास्त्रात?"

"अर्जुन धनुष्यात, दुर्योधन गदेत, भीम कुस्तीत, नकुल खड्गात, दु:शासन मुष्टियुद्धात, सहदेव चक्रात आणि युधिष्ठिर युद्धनीतीत अगदी निपुण झालेत." अश्वत्थाम्यानं उत्तर दिलं.

"मग एकदा सगळ्यांची परीक्षा घ्यायलाच पाहिजे लवकर."

"हो तर, बाबा त्याच विचारात आहेत." अश्वत्थाम्यानं सांगितलं. एवढ्यात एक सेवक दगडी पात्रातून दूध घेऊन आला. त्यानं ते पात्र तलावाच्या कठड्यावर ठेवलं. शकुनीमामांनी हातातील राजहंस अश्वत्थाम्याच्या हाती दिला. वाकून त्यांनी तलावातील ओंजळीभर पाणी घेतलं आणि त्या दगडी पात्रात ओतलं.

"ही दुधाची काटकसर आहे की काय मामा?" अश्वत्थाम्यानं विचारलं. "नाही. हा राजहंस आहे. या पात्रात कितीही पाणी घातलं तरी तो ते पिणार नाही." उत्तरीयाला हात पुसत शकुनीमामांनी भुवया उडवीत सांगितलं.

"ते कसं काय?"

"बघच आता प्रत्यक्ष," असं म्हणत मामांनी राजहंसाला हळूच अश्वत्थाम्याच्या हातातून घेतलं नि त्या दगडी पात्राजवळ ठेवलं. लागलीच त्या पक्षयानं आपली ऐटदार मान त्या दगडी पात्रात खुपसली. चुरचुर आवाज करीत तो दूध पिऊ लागला. थोड्या वेळानं त्यानं मान बाहेर काढून ती एकदा झटकली. त्याच्या चोचीत अडकलेल्या दुधाचे चार तुषार उडाले. आम्ही सर्वांनी कुतूहलानं डोकावून त्या दगडी पात्रात बघितलं. त्यात ओंजळभर पाणी तसंच शिल्लक होतं! नुसतं निव्वळ पाणी! शकुनीमामांनी ते परत तलावात ओतलं! आणि भुवया उडविल्या!

मला त्या सर्व घटनेचं अतिशय आश्चर्य वाटलं. विचारांचे घोडे माझ्या मनाचा रथ ओढू लागले. माणूससुद्धा त्या राजहंसासारखाच नसतो का? आपणाला हवं तेवढंच घेणारा आणि नको ते टाकणारा. मी नाही का तसंच केलेलं? युवराज दुर्योधन आणि अश्वत्थामा या दोघांशिवाय त्या अफाट राजनगरीतील मी इतर कुणाला जवळ केलं होतं? का वाटत नव्हता इतरांबद्दल जिव्हाळा? कसं उत्तर देता येईल त्याचं? त्या

राजहंसाला कधी सांगता येईल काय की, त्यानं पाणी सोडून बरोबर अचूक दूधच कसं निवडलं? पण यात माझा तरी काय दोष आहे? युवराज दुर्योधनानं माझी आस्थेनं विचारपूस केली म्हणून त्याच्याबद्दल मला प्रेम वाटतंय. माणसाचं प्रेम हे धरतीसारखं असतं. अगोदर एक दाणा पेरावा लागतो. तेव्हाच धरती अनेक दाण्यांची टिचून भरलेलं कणीस देते. माणूसही तसाच असतो. प्रेमाचा एक शब्द मिळाला तर त्यासाठी प्रेमाची शब्दगंगा मुक्तपणे उधळायला तो तयार असतो. म्हणूनच मला दुर्योधनाबद्दल प्रेम वाटत होतं. अश्वत्थामा तर निरागस आणि मनमोकळा होता. त्याच्यात आणि शोणात मला कधीच काही फरक वाटला नाही. बाकीच्या कुणाचीही माझ्याशी ओळख नव्हती. ती करून घेता येणं शक्यही नव्हतं, कारण तेवढा वेळ मला नव्हता.

तो भीम तर आपल्याच ताकदीच्या तोऱ्यात नेहमी त्या आखाड्यात मातीत लोळत पडलेला असे. जेव्हा बाहेर पडलेला असे तेव्हा नुसता काहीना काही खाई. किती भसाडा होता त्याचा आवाज! डोळे भोकरासारखे मोठे आणि झोपला की, वादळी वाऱ्यासारखा घोरे! तो ज्येष्ठ पांडव युधिष्ठिर तर अश्वत्थाम्याशी नुसता घटकान्‌घटका युद्ध, नीती, कर्तव्य असल्या अवघड विचारांवर बोलत राही. तो स्वत:ला कुरूंचा युवराज मानी. विदुर, पितामहही तसं मानत असावेत. दुर्योधनाला काही ते मान्य नव्हतं. तो स्वत:ला आग्रहानं 'युवराज' म्हणवून घेई! नकुल आणि सहदेव म्हणजे तरी कोण आहेत, कसे दिसतात आणि काय करतात, हेही मला माहीत नव्हतं. युवराज दुर्योधन आणि दु:शासन सोडले तर बाकीचे सर्व जण म्हणजे निष्कारण वाढलेली बांडगुळं वाटत. काय करायची होती त्यांची ओळख? माणसानं त्या राजहंसासारखं असावं. जे आपणाला पटेल तेच घ्यावं. नाही ते सोडून द्यावं. असंच मला वाटत आलं होतं.

मी आणि अश्वत्थामा राजवाड्यावरून परत आलो. येताना काहीतरी आठवल्यामुळे अश्वत्थामा मध्येच म्हणाला, "कर्णा, मी तुझ्याबद्दल काहीच बोललो नाही मामांना."

"त्यांनी तुला राजकुमारांची तयारी विचारली होती. सगळ्या युद्धशालेतील शिष्यांची नाही."

"तरी पण मला पुष्कळच सांगता आलं असतं तुझ्याबद्दल."

"काय – काय सांगितलं असतंस तू माझ्याबद्दल? या कुंडलांबद्दल आणि कवचाबद्दलच ना? त्याची माहिती आता नगरातील सर्वांनाच झाली आहे!"

"नाही. मी म्हणालो असतो अर्जुन धनुष्यात, दुर्योधन गदेत, भीम मल्लविद्येत, नकुल खड्गात, दु:शासन मुष्टियुद्धात, सहदेव चक्रात, युधिष्ठिर युद्धनीतीत आणि – आणि कर्ण या सर्वांच्या सर्व प्रकारांत अगदी प्रवीण झाला आहे!"

तो स्तुती म्हणून बोलत होता की, सत्य बोलत होता हे समजणं कठीण होतं; कारण प्रेम माणसाला अंध करतं. मी त्याचा मित्र होतो. त्याचं मित्रप्रेम त्याला का अंध करू शकणार नाही? म्हणून मी काहीच बोललो नाही.

**

# सत्तावीस

अर्ध्या तपाचा काल पक्षयांचा थवा उडून जातो तसा केव्हा उडून गेला, हे कळलंही नाही. युद्धशास्त्रातील शिकायचं काहीच शिल्लक राहिलं नाही. उलट मी आणि शोणानं केलेल्या रात्रीच्या जादा सरावामुळे आमच्याजवळ स्वत:चे असे प्रत्येक शस्त्रातले खास वेगळे हात होते. मल्लविद्येच्या आखाड्यात मी घटकाघटकाभर नुसती मेहनतच घेतली नव्हती, तर एकाच वेळी चार – चार मल्ल युवकांबरोबर मंडल खेळलो होतो. का कुणाला ठाऊक; पण व्यायाम करताना मला दमल्यासारखं कधीच वाटत नसे. उलट जसजसा मी व्यायाम करी तसतसं माझं अंग तापत जाई. कधी – कधी ते इतकं तापत असे की, माझ्याबरोबर हौद खेळणारे जोडीदार म्हणत, ''कर्णा, असाच जा आणि दोन घटका गंगेच्या पाण्यात पडून अगोदर आपलं अंग थंड कर आणि मगच आम्हाला तुझ्याबरोबर मल्लमंडल खेळायला बोलव. तुझं शरीर आहे की, रथाची रसरशीत तापलेली धाव?''

माझ्या बाहुकंटक डावाला तर ते इतके घाबरत की, तो डाव घालण्यासाठी मी शरीराची चपळाईनं हालचाल करू लागलो की, ते सरळ आपण होऊनच उताणे पडत. या डावाचं एक वैशिष्ट्य होतं. प्रतिस्पर्ध्याची मान या डावात अशी सापडलेली असे की, अंगातली सगळी शक्ती हातात एकवटून तिचा दबाव हळूहळू वाढवीत गेलं की, श्वास कोंडून प्रतिस्पर्धी घुसमटून मरून जाई! त्याचे हात आणि पाय पाठीवर त्या वेळी मोळीसारखे असे बांधलेले असत की, मानेवरचा हात काढून घेण्याची शक्ती त्याच्यात असली तरीही त्याला ते शक्य होत नसे. हा माझ्या खास ठेवणीतला डाव होता आणि युद्धशास्त्राच्या नियमाप्रमाणं तो केवळ द्वंद्वाच्यावेळीच इतक्या क्रूरपणानं वापरता येई. द्वंद्वाची कल्पना एकच होती. दोन योद्धयांपैकी त्यात एकच शिल्लक उरे! या युद्धाचा एकच निकाल असे. विजय किंवा मरण! एखादा योद्धा मरणाच्या भीतीनं शरण आलाच तर त्याला जीवदान मिळे, पण ते जीवदान म्हणजे विधवा स्त्रीच्या जगण्यासारखंच असे! योद्धयांच्या राज्यात अशा जीवदान मागणाऱ्याला काडीचीही किंमत नसे! अशा द्वंद्वयुद्धासाठी लागणारे सगळे डाव मी शिकलो होतो, पण माझा सगळ्यांत अधिक भरवसा होता तो एकाच डावावर – बाहुकंटकावर!

**

# अठ्ठावीस

काळाच्या वाऱ्याबरोबर अशी दिवस – रात्रीची अनेक ओली – सुकी पानं निघून गेली. रोज भल्या पहाटे उठणं, गंगेत मनसोक्त डुंबणं, सकाळपासून दुपारपर्यंत पाठ चांगली तापेपर्यंत गंगेत राहूनच सूर्यदेवांची आराधना करणं, दिवसभर युद्धशालेत शूल, तोमर, शतघ्नी, प्रास, परिघ, भृशुंडी, खड्ग, गदा, पट्टे अशी निरनिराळी शस्त्रं फिरवणं, वेळ अपुरा वाटला तर रात्री शोणाला घेऊन पलित्याच्या धूसर प्रकाशात अचूक लक्ष्यवेध करणं आणि शेवटी दिवसभर घडलेल्या घटनांचं चिंतन करीत, कधी – कधी चंपानगरीच्या आठवणी मनात घोळवीत झोपी जाणं. या चाकोरीत आता अर्धं तप गेलं. बालपणातील वसू आता मनाच्या प्रांगणातून दौडेनासा झाला. चंपानगरीची जागा आता हस्तिनापुरानं घेतली. कुतूहल आणि शंका यांची जागा आता संयम आणि सामर्थ्य यांनी घेतली. चंपानगरीत गंगाकिनारी वाळूत उमटणारी चिमुकली पावलं आता हस्तिनापुराच्या भूमीवर भक्कमपणे रुतू लागली. काळाच्या अजगरानं सहा वर्षांचा काळ गिळला होता! सहा वर्षं!

या सहा वर्षांत काय घडलं आणि काय नाही; ते सांगायचं म्हटलं तर ती एक स्वतंत्र कथाच होईल. या सहा वर्षांत मी म्हणजे युद्धशालेतला केवळ एक शिष्य होतो. इथं शिष्यासारखं कुणीही मला कधीही वागवलं नाही. द्रोणाचार्यांच्या दृष्टीखाली, माझं कृपाचार्यांच्या पथकात नाव होतं. त्या पथकात हस्तिनापुरातले सगळे सामान्य शिष्य होते. त्या सामान्य शिष्यांतला मी सर्वांत सामान्य होतो! शिष्यांच्या गर्दीत कृपाचार्यांनी किंवा द्रोणाचार्यांनी माझी कधीच विचारपूस केली नव्हती आणि खरं सांगायचं म्हटलं, तर त्यांनी मला विचारावं, माझ्या पाठीवरून हात फिरवावा, असं मलाही कधी वाटलं नव्हतं. ज्या – ज्या वेळी मला शस्त्रातला एखादा अवघड हात समजत नसे त्या – त्या वेळी क्षणभर मी डोळे मिटून माझ्या गुरूंचं – सूर्यदेवांचं स्मरण करी, आणि यक्षिणीची – जादूची कांडी फिरल्याप्रमाणं पळात मी तो हात करून मोकळा होई. श्रद्धा ही सामर्थ्यवान असते. कशावरतरी श्रद्धा असल्याशिवाय माणूस जिवंत असूच शकत नाही. शिष्यावस्थेत माझी सर्व श्रद्धा माझ्या गुरूवर होती. भीतीचा कधी लवलेशही मला शिवला नाही, पण मधून – मधून माझं मन बंड करून उठे ते एवढ्याचसाठी की, शालेतील हे दोन्ही गुरुदेव माझी कधीच का विचारपूस करीत नाहीत? कर्ण म्हणजे एक दगडाचा पुतळा आहे, असं त्यांना वाटतंय काय? तहानलेल्या माणसाला समुद्रात असून पाण्याचा एक थेंबसुद्धा प्यायला मिळत नसतो तशी माझी अवस्था होई. माझे हे विचार कुणाजवळतरी बोलून दाखवावेत म्हटलं, तर शोणाशिवाय दुसरं कोण होतं? माझं मन घुसमटून गेलं होतं. मोठ्या माणसांनी जवळ घेऊन लहानांचे दोष दाखविले तर बरं असतं, पण त्यांची उपेक्षा केली तर? त्यांचा अनुल्लेख केला तर? त्यांच्या मनाचा अंकुर कोंदटतो. मग वाट फुटेल तिकडून तो बाहेर पडतो! या सहा वर्षांत मला काय मिळालं होतं? निव्वळ घोर उपेक्षा! जळजळीत अनुल्लेख! कर्ण नावाचा कुणी एक शिष्य या युद्धशालेत आहे, हे कुणालाही माहीत नव्हतं. पुढं – पुढं करण्याची मला सवय नव्हती.

त्यामुळे माझं आणि शोणाचं एक वेगळं असं जग हस्तिनापुरातल्या युद्धशालेतसुद्धा आपोआपच निर्माण झालं होतं. कृपाचार्य आणि द्रोणाचार्य यांच्यावरच्या आदराऐवजी ती जागा शंकेनं घेतली होती. आपले हे नावाचेच गुरू आहेत, असं वाटे. जे शिष्यांची मनं ओळखत नाहीत ते कसले गुरू? जे त्यांच्या मनाची कळी प्रेमाच्या फुंकरीनं फुलवीत नसतात ते कसले गुरू? माझं मन गुरुप्रेमासाठी तळमळे आणि म्हणूनच मी माझी पाठ रोज उन्हात तापेपर्यंत माझ्या गुरूंचा हात पाठीवरून फिरवून घेई! सूर्यदेवांना अर्घ्य देत राही! असा रोज तापून निघत असल्यामुळे माझी पाठ आता रसरशीत झाली होती!

याच्या उलट शालेतील सर्व राजपुत्र – शिष्यांची स्थिती होती. कृपाचार्य आणि द्रोणाचार्य यांचा अतिशय आवडता होता पांडुपुत्र अर्जुन! तो एकटाच का लाडका, म्हणून युवराज दुर्योधन मुद्दाम दुसरंच काहीतरी कारण काढून आपली बाजू मांडण्याचा प्रयत्न करी. त्याचं पर्यवसन भांडणात होई. आपल्या भावाला छेडल्याबद्दल भीमाला राग येई. तो त्याला कधीच आवरता येत नसे. दात – ओठ खाऊन तो मिळेल त्याला झोडपून काढी. द्रोणाचार्यांच्या भीतीनं भांडणाची कागाळी कुणीही त्यांच्यापर्यंत पोहोचवीत नसत!

एकदा तर असं ऐकायला मिळालं की, ते सगळे जण मिळून वनविहारासाठी नगराबाहेर गेले असताना दुर्योधनानं दु:शासनाच्या मदतीनं भीमाचे हातपाय, तो झोपला असताना, रानवेलींनी करकचून बांधून त्याला सरळ एका तळ्यात फेकला. परंतु भीमाला काही झालं नाही; त्याला जलदेवतांनी सोडविला म्हणे!

मला तर हे कधीच खरं वाटलं नाही, कारण एक तर भीमाला त्यांनी तसा तळ्यात टाकला असता तर तो कधीच जिवंत राहिला नसता, कारण तळ्यात जलदेवता नसतात, तिथं विशाल जबड्याचे मासे आणि क्रूर मगरी असतात. दुसरं म्हणजे आपल्याला ठार मारण्याचा कट कुणीतरी केला आहे, हे त्याला तळ्याबाहेर आल्यावर समजलं असतं. हे काम दुर्योधनाशिवाय दुसऱ्या कुणाचं नाही, हे जाणून त्यानं त्याला बाहेर येताच सरळ आपल्या गदेनं ठेचून काढलं असतं, कारण भीमाला राग कधीच आवरत नव्हता. कुणीही सांगितलेलं तत्त्वज्ञान त्यानं मानलं नसतं आणि कुणीही केलेल्या सांत्वनानं त्याचं कधीच समाधान झालं नसतं!

राजकुमारांची भांडणं सोडविताना आणि त्यांच्या सामर्थ्याचं तोंडभरून वर्णन करताना सारथ्याच्या य:कश्चित दोन मुलांकडे लक्ष द्यायला कुणाला सवड असणार? अशी ही सहा वर्षं गेली. एका किशोराचं तरुणात रूपांतर झालं! धाडसाची आणि आव्हान देणारी प्रत्येक गोष्ट आता अंगावर घ्यावी असं वाटू लागलं!

तारुण्य! ज्वलंत धमन्यांचं अविरत स्पंदन! निसर्गानं मानवाला दिलेला सर्वांत श्रेष्ठ वर! जीवनाच्या नगरातील एकमेव राजमार्ग! निसर्गाच्या साम्राज्यातला वसंत! मनाच्या मयूराचा पूर्ण पसरलेला पिसारा! फुललेल्या शरीर – भुजंगाचा डौलदार असा ठिपकेदार फणा! भावनांच्या उद्यानातील धुंद केवडा! विश्वकर्त्याच्या अविरत धावणाऱ्या रथातील सर्वांत ऐटदार घोडा! माणसानं मानानं मिरवायचा काळ! काहीतरी मिळवायचा काळ! शक्तीचा आणि स्फूर्तीचा काळ! काहीतरी करावं, असं खऱ्या – खऱ्या अर्थानं वाटणारा ध्येयवेडा काळ!

बालपणातील सर्व वस्तूंना हिरवा रंग असतो. तारुण्यातील सर्व वस्तूंना गुलाबी, केशरी रंग असतो. क्षितिजाला भिडणाऱ्या आकाशाच्याही पलीकडे तरुणाच्या दृष्टीची

झेप जात असते. जे – जे गतिमान आणि प्रकाशमान असतं त्याची त्याला सहज – सुंदर ओढ असते. जिथं – जिथं आणि जे – जे अशक्य असेल ते – ते शक्य करण्याची अंगभूत ऊर्मी त्याच्यात असते. अशक्य हा शब्दच नसतो त्याच्या कोशात!

अलीकडे मला माझ्याच लहानपणीच्या आणि किशोरावस्थेतील काही गोष्टींचं हसू होई. गंगेला 'गंगामाता' म्हणणारा कर्ण, तिच्या काठी उत्तरीयात शिंपले वेचणारा कर्ण, गरुडासारखा आकाशात जातो म्हणणारा कर्ण, पोरांच्या आग्रहाला मान देऊन राजा म्हणून पाषाणी सिंहासनावर बसणारा कर्ण, आपली कुंडलं कशी चमकतात हे गंगेच्या पाण्यात न्याहाळणारा कर्ण! किती फसवा होता त्या – त्या वेळचा आनंद! किती फसव्या होत्या त्या वेळच्या श्रद्धा! किती संदिग्धता! किती अज्ञान!

हे सगळं पुसट होत गेलं. काळाच्या टोळानं हे सगळं फस्त केलं! जीवनाच्या रथाचे वेग तारुण्याच्या सारथ्यानं आपल्या हाती घेतले. या रथाला पाच घोडे असतात! सामर्थ्य, महत्त्वाकांक्षा, निर्भयता, अभिमान आणि औदार्य!

जे सामर्थ्यशाली असतं तेच तारुण्य! प्रकाश कधीतरी काळा असतो काय? असलं सामर्थ्यशाली तारुण्यच आपल्याबरोबर इतरांचा मान वाढवितं.

महत्त्वाकांक्षा हा तर तरुणाचा स्थायिभाव! मी मोठा होईन. परिस्थितीच्या डोक्यावर पाय ठेवून मी तिला वाकवीन ही तरुणाची उभारीची ऊर्मी असते!

निर्भयता म्हणजे तरुणाच्या जीवन – संगीतातला सगळ्यांत उंच स्वर! भय हा या स्वराचा फुटलेला चिरका आवाज! चिरका आवाज कुणाला कधीतरी आवडेल का? जग उंच स्वराची तान ऐकायला उत्सुक असतं, चिरका आवाज नाही!

अभिमान असतो तारुण्याचा आत्मा! ज्या माणसात श्रद्धा नाही तो माणूस नाही आणि ज्या तरुणात अभिमान नाही तो तरुण नाही. तरुण माणूस हा आपल्या श्रद्धांचा नेहमीच अभिमान बाळगतो. त्यांच्यासाठी प्रसंगी प्राण द्यायलाही त्याला तयार असावं लागतं.

आणि औदार्य म्हणजे तर तरुणाचा अलंकार! आपल्या शक्तीचा इतर दुर्बलांच्या संरक्षणासाठी केलेला वापर. आपण जगून इतरांना जगविण्याचं अमोल साधन!

असं असतं हे तारुण्य! जिथं ते असतं तिथं अपमानाची चीड असते! जिथं ते असतं तिथं आपल्या न्याय्य हक्कावर झालेल्या आक्रमणाची भिरड असते! जिथं ते असतं तिथं ते अन्यायाचा पक्ष निखंदून काढतं! जिथं ते असतं तिथंच खऱ्या अर्थानं विजय असतो! तिथंच प्रकाश असतो! प्रकाश नसेल तर मग अंधकार! अपमानाला कवटाळणारा अंधकार! पराजयाचं विष अमृत म्हणून पचविणारा अंधकार! अन्यायाचं समर्थन करणारा अंधकार! आक्रमणाला भिणारा अंधकार!!

**

# एकोणतीस

आता अश्वत्थाम्यावरच्या प्रेमाचं गाढ स्नेहात रूपांतर झालं होतं. सगळ्या हस्तिनापुरात तो एकटाच आता माझा जिव्हाळ्याचा मित्र झाला होता.

एकदा तो आणि मी गंगेच्या काठी बोलत बसलो होतो. सहज बोलता – बोलता तो म्हणाला, ''कर्णा, तू मला आवडतोस याचं कारण केवळ तुझा स्वभाव हेच नाही, तर तुझं हे सुंदर शरीरही त्याला कारण आहे.''

''इतका सुंदर दिसतो की काय मी?''

''होय. तुला याची कल्पनाही नसेल की, तू रोज ज्या वेळी स्नान करून भर उन्हातून गंगेवरून येत असतोस तेव्हा सगळे सामाजिक बंधनांचे नियम धाब्यावर बसवून या नगरातील स्त्रिया काहीतरी कारण काढून सौधावरची गवाक्षं उघडतात. केवळ तुला पाहण्यासाठी!''

''काय म्हणतोस काय अश्वत्थाम्या? असं असेल तर मग आजपासून मला गंगेचा मार्ग बदलावा लागेल.''

''होय कर्णा, तुझे वृषभासारखे भरगच्च खांदे, जास्वंदीच्या फुलासारखे लाल गाल, त्यावर तुझ्या कानातील कुंडलांतून पडणारी तेजाची निळसर वलयं, खड्गाच्या पात्यासारखं सरळ आणि धारदार नाक, धनुष्याच्या दंडासारख्या वक्र आणि रेखीव भुवया, काटेभोवरीच्या फुलासारखे निळेशार डोळे, थाळीसारखं भव्य कपाळ, मानेवरून खांद्यावर रुळणारे, महाराजांच्या मुकुटातील सोन्यालाही लाजवतील असे सोनेरी, कुरळे, दाट केश आणि रथाच्या खांबासारखे शरीराचे पीळदार स्नायू असं सारं स्वर्गवैभव असल्यावर कुणाला तू आवडणार नाहीस?''

''अश्वत्थामन्, खरं बोललो तर तू रागावणार नाहीस अशी माझी खात्री आहे.''

''सांग कर्णा.''

''तुझ्या वडिलांना का नाही यांपैकी एकही गोष्ट कधी आवडली? या सहा वर्षांत त्यांना आणि त्यांच्या लाडक्या अर्जुनाला कर्ण म्हणजे कोण आणि कुठं आहे हे तरी माहीत आहे काय?''

''खरं आहे कर्णा! पण तू एकटाच असा नाहीस. शस्त्रविद्या शिकण्याच्या निमित्तानं निषाध पर्वतावरून शेकडो योजनं तुडवीत आलेल्या निषाधराज हिरण्यधनूच्या पुत्राचं – एकलव्याचंही हेच दु:ख आहे. तुला तुझं मन मोकळं करायला निदान इथं मी तरी आहे, पण त्या एकलव्याला काय वाटलं असेल माझ्या बाबांच्याविषयी? कल्पनाही करवत नाही. बाबा असे का वागले, ते मी कसं सांगू? सगळ्याच पुत्रांना आपल्या पित्यांची अंतरंगं ओळखता येत नाहीत वसू!''

त्याचं उत्तर सहज सत्य होतं आणि म्हणूनच ते मला अतिशय आवडलं. मला तरी अधिरथबाबांच्या मनात काय – काय कल्पना आहेत, हे कधी सांगता आलं असतं काय? अश्वत्थाम्यानं करून दिलेल्या एकलव्याच्या आठवणीमुळे एक समदु:खी म्हणून कधीही न पाहिलेल्या एकलव्याबद्दल मला नकळत एक प्रकारचा अननुभूत आदर वाटू लागला.

**

# तीस

एकदा मी आणि अश्वत्थामा खड्गाच्या आखाड्याजवळ उभे होतो. त्या आखाड्याभोवती पहारेसारख्या सळयांचं भक्कम कुंपण होतं. त्या कुंपणातील एका सळईचं टोक वाकवून कुणीतरी जमिनीला टेकविलं होतं. ते तसंच होतं. ती एकच सळई त्या कुंपणातून बाहेर पडल्यामुळे विद्रूप दिसे. ती सरळ करावी म्हणून मी तिला हात लावला. तेव्हा चटकन अश्वत्थामा म्हणाला, ''नको कर्णा, सगळ्यांनी तिच्यावर प्रयोग केले आहेत. एके दिवशी रागाच्या भरात भीमानं ती वाकविली आहे. दुसऱ्या कोणालाही ती सरळ करता आलेली नाही! तोच कधीतरी ती सरळ करील!''

''असं! मग मी करू काय ती सरळ?'' मी त्याच्या डोळ्यांत पाहत विचारलं.

''नाही जमायचं तुला ते.''

''अस्सं?'' मी पायांतली पादत्राणं बंध सोडवून काढून बाजूला ठेवली. उत्तरीय कमरेला गुंडाळलं आणि त्याला म्हणालो, ''ही सळई डाव्या हातानं पुन्हा होती तशी सरळ करून त्या कुंपणात बसवितो बघ.''

मी त्या सळईजवळ गेलो. एकदा आकाशात पाहिलं. गुरुदेव तळपत होते. डाव्या हातात सगळी शक्ती एकवटली. डोळे मिटून ताकदीनं ती सळई डाव्या हातानं झटक्यात वर ओढली. पहिल्या झटक्यात ती कमरेइतकी वर आली. तिचं वर आलेलं टोक खांद्यावर घेऊन डाव्या हाताच्या पंजानं हळूहळू ते होतं तसं कुंपणाच्या मंडलात मी पुन्हा बसविलं. अश्वत्थामा गप्पच बसला. माझ्या पाठीवर थाप मारण्यासाठी त्यानं आपला हात पाठीवर टेकविला, पण लागलीच त्यानं तो वरच्यावर उचलला.

''काय झालं रे अश्वत्थामन्?'' मी त्याला आश्चर्यानं विचारलं

''अरे, तुझ्या अंगाचा अग्नीसारखा चटका बसतोय!'' भेदरट नजरेनं माझ्याकडे पाहत त्यानं उत्तर दिलं.

त्यानंतर कधीतरी भीमानं ती सरळ केलेली सळई पाहिली असावी. तो रोज एक सळई वाकडी करून जात होता. मी रोज रात्री त्यानं वाकडी केलेली सळई डाव्या हातानं सरळ करीत होतो!

हे छुपं सत्र चांगलं एक मास चाललं.

**

# एकतीस

प्रत्येक वर्षाच्या शेवटी युद्धशालेत एक मोठा यज्ञ होत असे. त्या यज्ञासाठी एक विचित्र प्रथा गुरू द्रोणांनी घालून दिली होती. युद्धशालेतल्या प्रत्येक शिष्याला बळी देण्यासाठी एक – एक जिवंत प्राणी अरण्यातून पकडून आणून अर्पण करावा लागे. कुणीतरी त्यांना या प्रथेबद्दल विचारलं होतं. त्याला उत्तर देताना ते म्हणाले, "त्यामुळे विद्यार्थी स्वावलंबी आणि धैर्यशील होतो."

एका वर्षीच्या यज्ञाच्या वेळी एक अविस्मरणीय गोष्ट घडली. आम्ही सर्व जण राजनगरातून जिवंत प्राणी आणण्यासाठी म्हणून अरण्याकडे निघालो. अरण्य लागताच सगळे जण दाहीदिशांना पांगलो. मी पूर्वेकडची बाजू धरली. चालत असताना मला वाटलं, यापूर्वी आपण हरिण, सांबर, रानवराह असे प्राणी अर्पण केले आहेत. या वर्षी आपण यापेक्षा बलवान प्राणी अर्पण करायला पाहिजे. यापेक्षा बलिष्ठ प्राणी कोणता? हत्ती? छे, लाकडं फोडणारा अवजड नि बेंगरूळ प्राणी तो! अश्व? छे छे, अश्वाला पकडता येईल, पण त्यासाठी दोन – चार दिवस तरी लागतील तोपर्यंत यज्ञ होऊनही जाईल. मग कोणता प्राणी? चितळ, लांडगा, तरस? छे, सगळ्यांत सामर्थ्यवान प्राणी कोणता? वाघ! बस्स, या वर्षी आपण वाघच अर्पण करायचा! त्यासाठी घोर अरण्यात जावं लागणार. काही हरकत नाही; जायचंच. मी सीमा सोडतानाच निश्चय केला.

झपझप पावलं उचलीत डोळे चारीकडे गरगर फिरवीत चाललो. दिवसभर भटकल्यामुळे तहान मात्र भरपूर लागली होती. संध्याकाळ होत आली होती. पाखरं घरट्याकडे परतत होती. तोंडावरचा घाम पुशीत बहुदा नदीच्या काठी आलो. तिथं उभा राहून मी सूर्यदेवांना वंदन केलं आणि मनोमन म्हणालो, 'आज तुमच्या शिष्याचा निर्धार वाया जाणार...'

एका काळ्या दगडावर बसून ओंजळीत पाणी घेतलं. ते तोंडाला लावणार इतक्यात एक प्रचंड धूड पाठीमागून माझ्या अंगावर आदळलं! तोल जाऊन मी समोरच्या बहुदेच्या पाण्यात पडलो. माझ्याबरोबरच ते धूडही पाण्यात कोसळलं. बहुदेचं पाणी गढूळ झालं. मी त्या धूडाकडे बघितलं. काळे – पांढरे, चितर असे ठिपके असलेला तो एक चित्त्या वाघ होता! पाणी पिण्यासाठी तो संध्याकाळ साधून पाणवठ्यावर आला होता. भोपळ्यासारखं त्याचं तोंड गोल गरगरीत होतं. डोळे गुंजेसारखे लाल होते.

माझे डोळे आनंदानं चमकू लागले! मी पाण्यात आहे, माझी वस्त्रं भिजली आहेत या कशाचंच मला भान राहिलं नाही. त्यानं उगारलेला पंजा तसाच वरच्यावर हातात धरला आणि त्याला फराफर ओढीत सरळ पाण्याबाहेर आणलं, पण पाण्याबाहेर येताच त्याला जास्तच चेव चढला. माझ्या हातातला पंजा त्यानं झिडकारून काढून घेतला. पाण्याचा स्पर्श आणि माझा विरोध यांनी तो पिसाळून गेला होता. त्याचे डोळे अग्नीचा क्रोधपूर्ण वर्षाव करू लागले. जोरजोरात डरकाळ्या मारून तो पुन:पुन्हा माझ्या अंगावर एकापेक्षा एक भयानक आघात चढवू लागला. मध्येच तो पाच – सहा हात उंच उमाळी मारी. त्याची लालभडक जीभ माझं रक्त पिण्यासाठी एकसारखी वळवळू

लागली. जबडा वासून तो माझ्या अंगावर येऊ लागला. मी त्याचे आघात थोपवू लागलो. अर्धाघटका मी आपलं रक्षण करण्यासाठी धडपडत होतो, पण तो मला आवरत नव्हता. मी माझ्या अंगाकडे पाहिलं. त्या क्रूर रानश्वापदानं शे – दोनशे आघात चढवूनसुद्धा त्याच्या तीक्ष्ण दातांचं किंवा नखाचं एक टोकसुद्धा माझ्या शरीरात घुसलं नव्हतं! माझं कातडं अभेद्य आहे! हा एकच काय पण असले दहा वाघ मला झोपेतसुद्धा खाऊ शकणार नाहीत! एक विजेची लहर माझ्या सर्वांगातून कशी सर्रकन चमकून गेली. क्षणात माझं शरीर रथाच्या तापलेल्या धावेसारखं रसरशीत झालं. सर्वांगावरचं कातडं अभेद्य आहे या नुसत्या जाणिवेनंच शरीर अंगारासारखं फुलून निघालं. एकाएकी मी त्या प्राण्याच्या खाडकन थोबाडीत मारली. कळवळत तो दूर गेला. आता मीच त्यावर एकापेक्षा एक भयानक आघात चढविले! वळलेल्या मुठीचे भक्कम प्रहार त्याच्या पाठीवर, पोटावर, मानेवर जिथं जागा मिळेल तिथं मारू लागलो. तोही पूर्वीपेक्षा आता जास्त खवळला. माझ्यावर प्राणांतिक आघात चढवू लागला. चांगल्या दोन घटका त्याची आणि माझी झुंज चालली. शेवटी तो दमला. माझ्या रक्ताचा एक साधा थेंबही त्याच्या जिभेला लागला नव्हता! क्षणापूर्वी डरकाळ्या मारणारा तो वाघ आता आतल्या आत गुरगुरू लागला. त्यानं आपली शेपटी भयामुळे पायांत ओढली! मी त्याच्या छातीवर बसलो. आजूबाजूच्या पंधरावीस हात जागेतील गवत पार उद्ध्वस्त झालं होतं. शेजारच्या झुडपातून काटदरीची एक वेल माझ्या पायांजवळ आली होती. एका हातानं मी ती ओढून घेतली. एक दमदार झटका मारताच ती दहा – वीस हात लांबीची चिवट वेल मुळासकट उपसून हातात आली. त्या वेलीनं त्या चित्त्याचे दोन – दोन पाय मी एका ठिकाणी करकचून आवळून बांधले. एक हाडामांसाची काळी – पांढरी भारमय मोळीच तयार झाली.

अंधार पडला होता. ते प्रचंड धूड खांद्यावर घेऊन मी चंद्रकोरीच्या धूसर प्रकाशात नगराकडे वळलो. नगरात आलो त्या वेळी मध्यान्हरात्र झाली होती. थंडगार वारा अंगाला झोंबत होता. माझं उत्तरीय बहुदेच्या पाण्यातच मागं विसरून राहिलं होतं. अंगावरच्या भिजलेल्या अधरीयाला धुळीचा लेप बसला होता. सगळं नगर गाढ निद्राधीन झालं होतं. वाघाच्या गुरगुरण्याचा ढगासारखा आवाज तेवढाच येत होता. मी युद्धशालेत आलो. बाकीच्या सगळ्या शिष्यांनी वणवण भटकून आणलेले प्राणी एका लाकडी खुराडयात कोंडले होते. त्यात मी ते माझ्या मानेला मिशांच्या केसांनी सारख्या गुदगुल्या करणारं खांद्यावरचं धूड फेकून दिलं. खुराडयातील सगळ्या प्राण्यांनी भीतीनं केकाटायला सुरुवात केली. मी गडबडीत आमच्या दालनात आलो आणि वस्त्रं बदलून झोपी गेलो.

सकाळी यज्ञाच्या विधीला सुरुवात झाली. शेवटी वेदीवर बळी देण्याचा विधी आला. बळी आणण्यासाठी सगळे खुराडयाकडे धावले. त्यांतला एक शिष्य आत जाऊन घाबरून तसाच परत यज्ञकुंडाजवळ आला. त्यानं गुरू द्रोणांना सांगितलं, ‘‘कुणीतरी बळी देण्यासाठी वाघ आणला आहे गुरुदेव!’’

‘‘वाघ! चल बघू.’’ आश्चर्यानं त्यांनी पांढऱ्या भुवया उडविल्या. गुरू द्रोणांबरोबर आम्ही सर्व जण खुराडयाजवळ गेलो. तो वाघ बघताच माझी अपेक्षा होती की, गुरुदेव विचारणा करून माझी पाठ थोपटतील. पण कपाळावर आठयांचं जाळं फेकीत ते म्हणाले, ‘‘हा वाघ कोणी कशाला आणला? अरे, यज्ञ हा शांतीसाठी करायचा असतो, यज्ञात वाघ

बळी देणं निषिद्ध मानलं गेलंय. सोडून द्या त्या व्याघ्राला!”

पण त्याला सोडण्यासाठी कोणीच पुढं जाईना. शेवटी एकटा भीम पुढं झाला. त्यानं मी बांधलेल्या त्या वेली सोडल्या. झालेल्या सर्व प्रकारानं अतिशय भ्यालेला तो वाघ जिवाच्या आकांतानं खुराड्याच्या कुंपणावरून कितीतरी उंच उडी मारून क्षणार्धात कुठच्या कुठं पसार झाला!

मला अपेक्षाभंगाचं दु:ख तर झालंच, पण खरंतर मला गुरू द्रोणांच्या त्या पाणचट तत्त्वज्ञानाची चीड आली. यज्ञात क्रूर आणि हिंस्त्र पशू का बळी द्यायचे नाहीत? निरपराधी बोकडापेक्षा वास्तविक वाघासारखेच पशू बळी द्यायला पाहिजेत!

**

# बत्तीस

बरेच दिवस झाले होते. हस्तिनापुरात आल्यापासून केवळ एकदाच मी चंपानगरीला जाऊ आलो होतो. तेही गुरू द्रोणांनी आपल्या शिष्यांची परीक्षा घेतली होती त्या वेळी. त्यानंतर पाच वर्षं उलटली होती, मनात असूनसुद्धा एकदाही मला या पाच वर्षांत चंपानगरीला जाता आलं नव्हतं, कारण येथे मी एक विद्यार्थी म्हणून आलो होतो.

सुदैवानं मला माझे गुरू चांगले लाभले होते. 'गुरूंचे गुरू' असं ज्यांचं वर्णन करता येईल असे ते होते. साक्षात सूर्यदेव माझे गुरू होते. हस्तिनापुरातल्या आखाड्यातील दगडी चौथऱ्यावर उभं राहून मनाच्या निर्धारानं मी त्यांचं शिष्यत्व पत्करलं होतं. त्यांनीही मला आतापर्यंत आपल्या लाडक्या शिष्यासारखं वागविलं होतं. या सहा वर्षांच्या कालात – या अर्ध्या तपात त्यांनी किती अवघड रहस्यं मला सांगितली होती! त्यांची सांगण्याची भाषा कशी होती हे मला सांगता येणार नाही, पण त्यांनी जे – जे मला सांगितलं होतं ते – ते मला चटकन पटलं होतं. काय शिकविलं नव्हतं त्यांनी मला? बाणाच्या अवघड फेकी, द्वंद्वाचे अवघड हात, घोडा, हत्ती, उंट यांच्या नाठाळ सवयींना ताळ्यावर आणण्याच्या कला. सगळं सगळं त्यांनी माझ्या कानात सांगितलं होतं. गुपचूप! मूकपणे!

रोज सकाळी आपल्या कोवळ्या किरणांनी असंख्य कळ्यांच्या मिटलेल्या पापण्या उघडताना ते मला सांगत, "कर्णा, तूही असंच झालं पाहिजेस. आपल्या जवळचं सर्वस्व मुक्त हस्तानं भेटेल त्याला देऊन तू तुझ्या सान्निध्यातील सगळ्यांचं जीवन उजळलं पाहिजेस."

किती श्रेष्ठ होता माझा गुरू! जगातल्या कोणत्या गुरूनं आपल्या शिष्याला इतक्या लहान – सहान गोष्टीतून एवढी उदात्त शिकवण कधी दिली आहे? आता एकदा चंपानगरीला जाऊन त्या गुरूचे पाय गंगेच्या नितळ पाण्यानं धुतलेच पाहिजेत! आता मी गंगामाता म्हणत नाही, गंगा म्हणतो, कारण बालपणातील श्रद्धा आता व्यवहाराच्या दगडावर बोथट झाली होती. आई एकच असते, जी जन्म देते आणि पालनपोषण करते ती. नदी ही नदी आहे. ती आई कशी होईल? माझी आई एकच होती – राधामाता! तिला भेटूनही बरेच दिवस झाले होते. काय वाटेल तिला आता मला पाहिल्यावर? माझी खात्री होती, मी गेल्याबरोबर तिनं मला पहिलाच प्रश्न विचारला असता, "किती वाळलास रे वसू तू? आणि गंगेच्या पाण्यात नाही ना गेलास कध्धी?" कारण पुत्र, मग तो कितीही मोठा झाला तरी मातेला नेहमीच लहान वाटत असतो. माता ही जगातील अशी एकच व्यक्ती असते की, जिच्या प्रेमाला व्यवहाराची तुला कधीच माहीत नसते. तिला माहीत असतं आपल्या पुत्रावर खरंखुरं प्रेम करणं.

मी शोणाला बोलावून सांगितलं, "शोणा, प्रवासाची तयारी कर. उद्या चंपानगरीला जायचं आहे." त्याचा चेहरा आनंदानं उजळून गेला. फार वर्षांनी आम्ही शालवृक्षासारखे धिप्पाड होऊन प्रथमच चंपानगरीकडे जाणार होतो. आमच्या

**

# तेहतीस

दुसऱ्या दिवशीच मी आणि शोण हस्तिनापुराहून निघालो. प्रवास बराच लांबचा होता म्हणून आम्ही दोन पांढरे तरतरीत घोडे घेतले होते. आम्हा दोघांनाही आता अश्वारोहणाची चांगली सवय झाली होती. मला तर सर्व प्राण्यांत अश्व हा प्राणी फारच आवडत होता. तो कधीच खाली बसत नाही. झोपतो सुद्धा फक्त उभ्याउभ्याच. अश्वांच्या सर्व सवयींचा मी बारकाईनं अभ्यास केला होता. कितीही नाठाळ असो त्याला कसं ताळ्यावर आणावं, हे आता मला चांगलं अवगत झालं होतं. शिवाय आमचा तो पिढ्यान्पिढ्यांचा व्यवसाय होता. ''प्रत्येकानं आपल्या व्यवसायात प्रवीण असलंच पाहिजे.'' संजयकाकांनी सारथी म्हणून केलेला हा उपदेश मी कसा विसरू शकलो असतो?

आम्ही हस्तिनापुराच्या सीमेबाहेर पडलो. ते दिवस वसंतऋतूचे होते! आजूबाजूचा सारा परिसर निरनिराळ्या रंगांच्या फुलांनी नुसता नटलेला होता. बाव्याची झाडे लहान – लहान पिवळ्या फुलांनी जर्द झाली होती, खैराची झाडे तांबडसर फुलांनी डवरली होती, अंजनीची झुडपं निळ्या फुलांनी शोभिवंत दिसत होती. त्या सगळ्या झाडांवर निसर्गदेवतेची झालेली कृपादृष्टी पाहून पळसाला फारच राग आला असावा. त्याचं सगळं अंग रक्तवर्णी तांबड्या फुलांनी फुललेलं होतं. सगळ्या झाडांत तो त्यामुळे एकटाच उठून दिसत होता!

त्या सगळ्या फुलांचा मिळून एक संमिश्र सुवास आसमंतात दरवळत होता. श्येन, क्रौंच, भारद्वाज, कोकीळ, कपोत अशा निरनिराळ्या पक्षयांचा हा संमेलनाचाच काळ होता. आपणाला माहीत असलेली सगळी गाणी ते उंच स्वरात म्हणत होते. वसंत! वसंत म्हणजे निसर्गदेवतेची मुक्त रंगपंचमी! वसंत म्हणजे सप्तस्वरांचा एकमेकांच्या हातात हात घालून उभा राहिलेल्या खेळगड्यांचा हुतूतूचा संच! वसंत म्हणजे निसर्गदेवतेच्या तलम वस्त्राचा काळाच्या कुंपणात मध्येच अडकलेला एक सर्वांत देखणा धागा! की वर्षाऋतूत खोडकर पावसानं सतत आपल्या सरींच्या असंख्य बोटांनी गुदगुल्या केल्यामुळे हसतेवेळी इकडे – तिकडे पाय झटकताना पडलेला तिच्या पायातला तो मंजूळ पैंजण? छे, कशानंच त्याचं वर्णन करता येत नाही. वसंत म्हणजे वसंत!

आम्ही ती निसर्गदेवतेची मनोहर रूपं पाहत आमचा प्रवास मजेत करीत होतो. रात्र पडताच जवळच्या नगरात मुक्काम करीत होतो. असे आठ दिवस गेले. अनेक नद्या आणि पर्वत ओलांडून आम्ही नवव्या दिवशी प्रयागला आलो. प्रयाग! इथं गंगा, यमुना आणि सरस्वती या तीन नद्यांचा संगम होतो. इथून चंपानगरी आता केवळ काही योजनं दूर राहिली होती.

संगमावर जावं आणि ते तीन नद्यांचं मीलन एकदा पाहून यावं म्हणून नगरात प्रवेश करताच आम्ही आमचे अश्व संगमाकडे वळविले. वेळ संध्याकाळची होती. आम्ही संगमावर आलो. मथुरेच्या बाजूनं यमुना येत होती, कांपिल्यनगराच्या बाजूनं गंगा

प्रवेशत होती, अयोध्येच्या बाजूनं सरस्वती धावत होती. तिघींच्या पाण्याचे तीन वेगवेगळे ओघ स्पष्ट दिसत होते. गंगेचं पाणी पांढरंशुभ्र, यमुनेचं पाणी काळसर, तर सरस्वतीचं तांबडसर. तीन भिन्न – भिन्न स्थायिभाव असूनही त्या तिघी एकमेकींच्या हातात हात घालून सागराला मिळायला चालल्या होत्या; तेही पुढं गंगा हे एकच सुटसुटीत नाव स्वीकारून! तो त्रिवेणी संगम पाहताना माझ्या मनात एक विचित्र विचार चमकून गेला. या नद्यांना जे निसर्गानं शिकवलं ते माणसांना शिकवायला तो कसं काय विसरला? माणसानं जातीचे आणि उच्चनीचतेचे खोटचा कल्पनांचे ओघ एकमेकांविरुद्ध का वळवावेत? कोणत्या समुद्राला जाऊन मिळणार हे ओघ? काय निघणार आहे या भेदांच्या भगदाडांतून? विनाशच की नाही? एकमेकांना समजावून घेऊन मानव हातात हात घालून आपल्या सगळ्या ओघांचा एकच प्रवाह करील तर? पण ते शक्य नाही! कारण नद्या या नद्या असतात आणि माणसं ही माणसं असतात. आपल्या मूर्खपणानं आपल्याच विनाशाचे खड्डे खणणारा मानव हा या जगातला एकमेव प्राणी असावा!

मी त्या तिन्ही नद्यांचं एकत्र झालेलं ओंजळभर पाणी घेतलं आणि त्याचं अर्घ्य सूर्यदेवांना देत मनोमन म्हणालो, ‘देवन्, या तीन नद्यांच्या अंगी आहे ती सहनशक्ती मला द्या. इतरांना नीट समजावून घेण्याची बुद्धी मला द्या. अहंकाराचा स्पर्शसुद्धा माझ्या मनाला कधी होऊ नये.’

अश्वांना पाणी पाजून आम्ही नगरात येण्यासाठी वळलो. अश्वांचे वेग हातात घेऊन आम्ही चाललो होतो. काही स्त्रिया पाणी घेऊन नगराकडे परत जात होत्या. मी पश्चिम क्षितिजाकडे पाहत चाललो होतो. एवढ्यात शोणाच्या अश्वानं पाणी घेऊन परतणाऱ्या पुढ्यातील एका स्त्रीच्या मानेला मागून आपले फुरफुरणारे ओठ लावले. त्यांच्या थंडगार अशा स्पर्शानं ती स्त्री घाबरली. किंकाळी फोडीत तिनं डोक्यावरचा घडा सरळ फेकून दिला. तो घडा माझ्या पायांत पडला आणि फुटला. माझं उत्तरीय भिजलं. ती स्त्री घाबरून गेली होती. माझ्याकडे पाहताच तर ती अधिकच गोंधळून गेली. क्षणभर आपल्या पापण्यांची तिनं मजेदार फडफड केली आणि मग आपल्या पायाच्या अंगठ्यानं माती उकरत ती खाली मान घालून स्तब्ध उभी राहिली. घड्यातील पाणी तिच्या अंगावरही सांडलं होतं. त्यामुळे जागजागी तिचं वस्त्र तिच्या अंगाला चिकटलं होतं. संगमावरून येणाऱ्या वायुलहरींबरोबर तिच्या केसांतील चार – सहा बटा मुक्तपणे इकडे – तिकडे भुरभुर उडत होत्या. बरेचसे केश पाण्यामुळे गालांना चिकटले होते. तिचा रंग केवड्यासारखा पिवळाधमक होता. मी पाहिलेली ती सर्वांत सुंदर स्त्री होती! वादळी वाऱ्यात आपल्या घरट्यात अंग चोरून बसणाऱ्या पक्षिणीसारखी अंग सावरून ती उभी होती.

मी शोणाला काहीतरी बोलणार होतो तेवढ्यात तिच्या मैत्रिणींपैकी एक पुढं होत वाकून म्हणाली, “महाराज, क्षमा असावी. हिच्या धांदरटपणामुळे आपली वस्त्रं भिजली!”

“मी महाराज आहे म्हणून कोणी सांगितलं? मी कर्ण आहे! माझ्या भावाच्या – या शोणाच्या – धांदरटपणामुळे तुमचा घडा फुटला यासाठी मीच तुमची क्षमा मागायला पाहिजे.” मी म्हणालो.

“नाही – पण – आपण तर महाराजांसारखे दिसता!” ती गोंधळून म्हणाली.

"नाही. मी सूतपुत्र कर्ण आहे! चंपानगरीच्या अधिरथांचा ज्येष्ठ पुत्र."

"सूतपुत्र? मग हीसुद्धा सूतकन्या आहे." ती त्या सुंदर स्त्रीला दंडाला धरून पुढं ओढीत म्हणाली.

"सूतकन्या?" मी आश्चर्यानं विचारलं, कारण आमच्या कुलात असलं सौंदर्य असणं कसं शक्य होतं?

"होय. या प्रयागातील सर्वश्रेष्ठ सारथी सत्यसेन यांची बहीण वृषाली!"

मी तिच्याकडे पाहिलं. तिनं अजूनही आपलं मुख काही वर उचललंच नव्हतं. रात्रंदिवस युद्धशालेत शिक्षण घेणाऱ्या माझ्यासारख्या रांगड्या माणसाला स्त्रीविषयी तसं काहीच सांगता आलं नसतं, पण तिला पाहिल्यावर मात्र मला प्रकर्षानं वाटलं की, स्त्री म्हणजे विश्वकर्त्यानं आपल्या पहिल्याच साखरझोपेच्या वेळी टाकलेला एक हळुवार नि:श्वास असावा!

सूर्यदेवांनी आकाशात गुलाबी रंगाचा घडाच फोडला होता. कशाला आनंदित झाले होते ते एवढे? त्या गुलाबी रंगाची ती स्वैर उधळपट्टी पाहत मी शोणाला म्हणालो, "शोण, चल वेळ होतो आहे."

निघण्यापूर्वी सहज चाळा म्हणून मी त्या फुटलेल्या घड्यातील एक खापराचा तुकडा उचलून घेतला!

**

# चौतीस

दुसऱ्या दिवशी आमचे अश्व चंपानगरीच्या सीमेत घुसले. नगराबाहेरचं ते विशाल पठार आलं. माझ्या मनाच्या वारुळातून त्याच्या दर्शनानं आठवणींच्या मुंग्या इकडे – तिकडे नाचू लागल्या. सहा वर्षांपूर्वी याच पठारावर माझी एका माजलेल्या खोंडाशी जुंपली होती. त्या वेळी मी मूर्च्छित पडलो होतो. आता तसलाच एखादा खोंड माझ्यासमोर उभा राहिला असता तर! माझी खात्री होती की, माझ्या पुष्ट हातांनी त्याला मी असा काही रोखून धरला असता की, एक तसूभरही इकडे – तिकडे हलू दिला नसता.

पर्णकुटीच्या दारात आलो. घोड्यांच्या टापांचा आवाज ऐकून राधामाता पर्णकुटीबाहेर आली. आम्हाला पाहताच तिची चर्या आनंदानं नुसती उजळून निघाली. तिच्या सर्वच हालचाली गडबडीत सुरू झाल्या. चटकन आत जाऊन तिनं थोडं रसरसते अंगार एका थाळीतून आणले. मी उंबरठ्यावर राहूनच तिला विचारलं, "जाताना एक चांदीची पेटी दिली होतीस. आता हे अंगार कशाला आणलेस?"

काही न बोलताच तिनं हातातील मिरच्यांची मूठ त्या अंगारांवर मोकळी केली. थाळी आमच्याभोवती फिरविली. मिरचीच्या उग्र धुराचा शोणाला ठसका लागला. तिनं ती थाळी बाहेर लांब नेऊन ओतली. पाच वर्षांनंतर मी माझ्या पर्णकुटीत पाऊल टाकलं, पण आत जाताना दाराच्या महिरपीला मस्तक धाडकन आदळलं.

"किती उंच झालस रे कर्णा?" राधामाता कौतुकानं म्हणाली.

"अंहं – कर्णा नव्हे – वसू!" मी तिच्या पायांना हात लावून म्हणालो. तिनं झटकन उठवून मला छातीशी कवटाळलं. कानातील कुंडलांना हात लावून ती वारंवार चाचपून पाहिली. तिच्या डोळ्यांत अश्रुबिंदू तरळले. शेवटी अंशुकाचा शेव आपल्या डोळ्यांना लावताना तिनं मला विचारलंच, "गंगेच्या पाण्यात नाही ना कध्धी गेलास?"

"ते आता शोणालाच विचार सगळं!" मी तिच्या पायांवर माझं मस्तक ठेवलं. माझ्या जीवनातील तेच एक सर्वांत पवित्र प्रयाग होतं. तीच माझी गंगा, यमुना आणि सरस्वती होती. माझी पर्णकुटी हेच माझं मंदिर होतं.

**

# पस्तीस

पंधरा दिवस चंपानगरीत राहून आम्ही हस्तिनापुराला परत आलो, पण युद्धशालेत चिटपाखरूसुद्धा नव्हतं. सगळं कसं शांत; पण उजाड वाटत होतं. वास्तविक या वेळी इथं युद्धशालेत शस्त्रांचा खणखणाट चालू असायचा. मग आजच हे असं का? राजनगरीत एखादी अनिष्ट घटना तर घडली नसेल? शंकेचं कासव वारंवार आपली मान बाहेर काढू लागलं. आम्ही अश्वशालेत घोडे बांधले. आता राजवाड्यावर गेल्याशिवाय या सगळ्या शांततेचं रहस्य उकलणार नाही या विचारात मी होतो. इतक्यात महाद्वारातून अश्वत्थामा आत आलेला मी पाहिला. आमच्याजवळ तो येताच मी त्याला पहिला प्रश्न विचारला, ''अश्वत्थामन्, आज ही सगळी युद्धशाला अशी थंड का?''

''सगळे योद्धे नगराबाहेर गेलेत.'' त्यानं उत्तर दिलं.

''कशाला?''

''स्पर्धेचा आखाडा तयार करायला.''

''स्पर्धा? कसल्या स्पर्धा?''

''सर्व योद्धयांच्या! सर्व शस्त्रांच्या! इथल्या शिक्षणातली शेवटची कसोटी. यात जो सर्वश्रेष्ठ ठरेल त्याला सगळं हस्तिनापूर अजिंक्य वीर म्हणून मान देईल. राजमाता त्याला कुंकुमतिलक लावतील. नगरजन वाजत – गाजत हत्तीवरून त्याची मिरवणूक काढतील.''

''केव्हा होणार या स्पर्धा?'' मी औत्सुक्यानं विचारलं.

''येत्या वासंतिक पौर्णिमेला! आजच अमात्य वृषवर्मांनी सगळ्या देशांच्या राजांना तशी आमंत्रणं पाठविली आहेत. हा युद्धशालेचा आखाडा फारच अपुरा पडेल म्हणून नगराबाहेर एक भव्य आखाडा तयार करायचं चाललं आहे! गेले पंधरा दिवस सगळे तिकडेच आहेत. रात्रंदिवस अविश्रांत खपताहेत.''

स्पर्धा! केवळ आठच दिवसांनी! आता गुणावगुणांची खरी कसोटी लागेल. स्पर्धा म्हणजे गुणावगुणांचं मूल्यमापन करणारी तुला. ठीक आहे. आता या हस्तिनापुराला कळून येईल की कोण – कोण आणि कशाकशात निपुण आहेत! आत्ताच त्या गुरू द्रोणांच्या लाडक्या शिष्याचा... त्या अर्जुनाच्या खोट्या प्रतिष्ठेचा घडा त्या आखाड्यात ताडकन फुटेल. गुरू द्रोणांशिवाय या जगात दुसरं काही आहे, याची त्याला जाणीव तरी आहे काय? स्पर्धेचा नि:पक्षपाती न्यायाधीशच त्याचं माप त्याच्या पदरात घालील.

जिथं तिथं मी... मी म्हणून पुढं मिरविणाऱ्या अर्जुना, आत्ताच तुला कळून येईल की, लोकप्रियतेच्या ज्या सवंग भूमीवर तू उभा आहेस ती किती निसरडी आहे! गुरू द्रोणांच्या छायेत वाढलेल्या भूछत्रा, आत्ताच तुला कळून येईल की, तुझ्या गुरूपेक्षा हजारोपटींनी माझा गुरू श्रेष्ठ आहे! माझं मन विचारांचं जाळं गुंफू लागलं! युद्धशालेत घडलेल्या आजवरच्या सर्व घटनांचा काळा धागा मनाच्या हाती होता!

ही स्पर्धा झालीच पाहिजे. ते आठ दिवस मला आठ युगांसारखे वाटू लागले,

कारण गेली सहा वर्षं त्या अर्जुनानं माझा मार्ग रोखून धरला होता. माझा एकटचाचाच नव्हे तर सर्वांचाच. त्यामुळे दुसऱ्याकडे लक्ष द्यायलासुद्धा गुरू द्रोणांना सवड मिळालेली नव्हती. कधीही त्यांनी त्याच्याशिवाय कुणाच्याही पाठीवरून मायेनं हात फिरविलेला नव्हता. एक नाही, दोन नाही चांगली सहा वर्षं त्यांनी उपेक्षेच्या अग्नीत माझ्या कोवळ्या मनाचे अंकुर अक्षरश: जाळून टाकले होते. माझ्या जागी दुसरा कोणीही असता, तर हे हस्तिनापूर आणि या हस्तिनापुरातील आत्मप्रौढीची ही साचलेली सगळी डबकी यांवर लाथ मारून उद्वेगानं इथून केव्हाच चालता झाला असता, पण मोठ्या कष्टानं मी हे कढ आजवर पचविले होते. मला माहीत होतं की, जगात भीक मागून काहीच मिळत नसतं. मला साफ विसरून गेलेल्या त्या गुरुशिष्यांना मी दाखवून देईन की, अजून हस्तिनापुरात कर्ण जिवंत आहे. आत्ताच गुरू द्रोणांना कळून येईल की, हिरा म्हणून त्यांनी प्रेमानं जवळ केलेला अर्जुन म्हणजे एक गारगोटीचा खडा आहे.

कारण मीही शिष्य होतो. मलाही वाटत होतं की, माझ्या पाठीवरून हात फिरवून कुणीतरी मलाही शिकवावं. मलाही वाटत होतं की, माझ्या कौशल्याचंसुद्धा कुणीतरी कौतुक करावं, पण ते मला मिळालेलं नव्हतं. मला मिळाली होती ती घोर उपेक्षा! पण कधी – कधी वाईटातूनच चांगलं निघतं, त्याप्रमाणं एक गोष्ट मात्र बरी झाली होती, या उपेक्षेतून मला तेजस्वी गुरू मिळाला होता. साक्षात सूर्यदेवांना मी गुरू केलं होतं. गेली सहा वर्षं सकाळच्या चार – चार घटका एकटक मी त्यांच्याकडे पाहिलं होतं. गेलं अर्धं तप आपली सोनेरी बोटं त्यांनी मायेनं माझ्या पाठीवरून सातत्यानं फिरविली होती. जीवनाचं तेजस्वी तत्त्वज्ञान मूकपणे शिकविलं होतं! माझ्या हृदयाचा कुंभ आपल्या दिव्य तेजानं काठोकाठ भरून दिला होता!

गुरुदेव, या स्पर्धेत यशस्वी झालो तर गुरुदक्षिणा म्हणून मी तुम्हाला काय द्यायला पाहिजे? या विश्वाचा कानाकोपरा उजळणाऱ्या तुमच्यासारख्या तेजाच्या निधीला मी पृथ्वीवरचा एक य:कश्चित सूतपुत्र काय देऊ शकणार? देण्यासारखं माझं असं माझ्याकडे केवळ शरीरच आहे. ते तर मी तुमचा शिष्य झालो त्याच दिवशी तुमच्या स्वाधीन केलं आहे. आता तुमच्या शिष्याची गुरुदक्षिणा तुम्ही कुणाकडे मागणार?

शोणाला घेऊन मी आणि अश्वत्थामा नगराबाहेरच्या त्या स्पर्धेच्या आखाडचात आलो. सगळे शिष्य – योद्धे तो आखाडा सुशोभित करण्यासाठी अविश्रांत खपत होते. आता जवळ – जवळ सर्व तयारी झाली होती. किती भव्य होता तो आखाडा! एक योजनाची जागा त्यानं गोलाकार व्यापलेली होती! प्रत्येक शस्त्रविभागासाठी मध्यभागी एक – एक असा स्वतंत्र आखाडा होता. ते सगळे तेरा पोट – आखाडे शस्त्रास्त्रांनी सुसज्ज होते. पूर्वेकडच्या महाद्वाराच्या बाजूला गदा, खड्ग, भाला, चक्र, प्रास यांचे पाच आखाडे होते. पश्चिमेच्या बाजूला शतघ्नी, भृशुंडी, तोमर, पट्टे आणि शूल यांचे पाच आखाडे होते. दक्षिणेकडे अश्वारोहण आणि गजारोहण यांसाठी भव्य पटांगणं होती.

उत्तरेकडे मल्लांसाठी आणि द्वंद्वासाठी एक आखाडा होता. त्यात ताक आणि चंदनी तेल यांत मळलेली मगधांच्या राज्यातून आणलेली निवडक तांबडी माती पसरलेली होती. आखाडचावर कुठंही उभं राहून पाहिलं तरी बरोबर मध्ये दिसेल असा धनुर्विद्येचा भव्य पोट – आखाडा दिसे. त्याच्यावर धनुर्धरासाठी वीस हात उंच आणि वीस हात लांब असा संगमरवरी दगडांचा चौथरा होता. त्याचे दगड निषाधांच्या राज्यातून

मागविले होते. त्या चौथऱ्यावर कौरवांचा त्रिकोणी भगवा ध्वज निळ्या आकाशाला थपडा देत उभा होता. या दगडी चौथऱ्यावर स्पर्धा संपेपर्यंत गुरुवर्य द्रोण पंच म्हणून उभे राहणार होते. याच स्पर्धांत सर्वश्रेष्ठ ठरेल त्याच्या गळ्यात ते नीलकमलांची सुवर्णधाग्यात गुंफलेली, पुरुष उंचीची, मानाची गौरवमाला घालणार होते. सगळं नगर त्याची सजविलेल्या हत्तीवरून, अंबारीतून मिरवणूक काढणार होतं. राजमाता त्याला केशरी टिळा लावून आदरानं ओवाळणार होत्या. हस्तिनापुरातील सर्वश्रेष्ठ अजिंक्य वीर म्हणून साऱ्या आर्यावर्तात तो मानानं मिरवणार होता. आदरला जाणार होता.

त्या सर्व आखाड्यांभोवती प्रेक्षकांची गोलाकार जागा होती. पूर्वेकडील बाजूला राजकुलांतील लोकांसाठी उंच जागेवर प्रशस्त बैठकी तयार केल्या होत्या. त्यांच्या मध्यभागी पितामह भीष्मांचं भव्य आसन उभं होतं. त्याच्या उजव्या हाताला विदुरांचं आणि डाव्या हाताला महाराज धृतराष्ट्रांचं आसन होतं. त्या सर्व आसनांच्या डाव्या बाजूला एक प्रशस्त डेरा उभा केला होता. त्याला झिरमिरीत वस्त्रांचे पडदे लावले होते. त्या डेऱ्यात सर्व राजस्त्रिया बसणार होत्या.

तो आखाडा पाहण्यासाठी नगरातील लोक आपली दैनंदिन कामं टाकून येत होते. तो भव्य आखाडा पाहून चकित होत होते. ते आपआपसांत कुजबुजत, "कुरुकुलातील एकाही राजाच्या कारकिर्दीत एवढा मोठा आखाडा एकाच वेळी भरविलेला ऐकिवात नाही. कोण पटकावणार सर्वश्रेष्ठ, अजिंक्य वीर म्हणून मानाचा तुरा? भीम – अर्जुन – दुर्योधन – दु:शासन?"

आम्ही परतणार होतो कारण शंभर योजनांचा प्रवास करून आम्ही नुकतेच चंपानगरीहून आलो होतो, पण अश्वत्थामा म्हणाला, "कर्णा, सगळ्या शिष्य – योद्ध्यांनी हे पटांगण सजविण्यासाठी काही ना काही हातभार लावला आहे. तुम्ही दोघांनी काय केलं आहे?"

"काय करायला पाहिजे सांग." आश्रमकुमार असल्यामुळे कामाची समविभागणी त्याच्या अंगवळणी पडली होती. तो मला तसा सोडणार नव्हता!

तो विचारात पडला, कारण काही सांगावं असं काम आमच्यासाठी शिल्लकच नव्हतं! एक सेवक एका तलम वस्त्राची गुंडाळी काखोटीला मारून समोरून आत चालला होता. त्याला त्यानं बोलावलं आणि विचारलं, "काय रे, काय आहे तुझ्या काखेत? आण ते इकडे. या दोघांना काहीतरी काम लावू या."

त्याच्या काखेतील गुंडाळी अश्वत्थाम्यानं ओढून घेतली. तिची दोन टोकं हातात धरून ती त्यानं सरळ केली. ते कौरवांचं राजचिन्ह होतं! एका तलम रेशमी वस्त्रावर जरीच्या सोनेरी धाग्यांनी विणलेलं! माझे डोळे आनंदानं चमकले. माझ्या हातात ते राजचिन्ह देत अश्वत्थामा म्हणाला, "कर्णा जा. हे राजचिन्ह मधल्या त्या दगडी चौथऱ्यावर उभ्या केलेल्या लाकडी बैठकीत बसवून ये."

मी ते राजचिन्ह हातात घेतलं आणि दगडी चौथऱ्यावर चढलो. लाकडी बैठकीत पूर्वेकडे तोंड करून ते मी बसविलं. मी बसविलेल्या त्या ऐटदार राजचिन्हाला शोणानं फुलांची एक माला घातली.

**

# छत्तीस

शेवटी तो वासंतिक पौणिमेचा नियोजित दिवस उजाडला! सगळं हस्तिनापूर आमंत्रितांनी नुसतं गजबजून गेलं. तो दिवस सगळ्या योद्धयांच्या परीक्षेचा दिवस होता. स्पर्धेत भाग घेणाऱ्या प्रत्येक शिष्य – योद्धयानं आपल्या गुरूचा आशीर्वाद घेऊनच आखाड्याकडे जायला पाहिजे होतं, पण – पण मी काय करणार होतो? कारण त्या दिवशी एकाएकी आकाश सकाळपासूनच पांढरट भुरक्या ढगांनी झाकोळून गेलं होतं! माझं मन त्यामुळे अगदी खिन्न झालं. त्या दिवशी भल्या पहाटे उठून गंगेच्या पाण्यात उभा राहून मी दोन घटका माझ्या दिव्य गुरूंचं एकदा तरी दर्शन घडेल म्हणून डोळ्यांत प्राण आणून तिष्ठलो, पण त्यांच्या आणि माझ्यामध्ये दुष्ट ढगांची निगरगट्ट अशी एक घनदाट चवड निर्दयपणे उभी होती. खरोखरच लहानपणी मी शोणाला म्हणत असे त्याप्रमाणं मी एखादा गरुड पक्षी झालो असतो; तर क्षणातच आपल्या बळकट पंखांच्या साहाय्यानं एक उंचच उंच भरारी घेतली असती आणि आपल्या तीक्ष्ण टोकदार नखांनी त्या निर्दय ढगांचं पोट फाडलं असतं. पडलेल्या भगदाडातून माझ्या गुरूंचा एक तरी हात बाहेर आला असता! त्यांनी तो आत्यंतिक प्रेमानं माझ्या पाठीवरून फिरविला असता, पण ते शक्य नव्हतं. काही – काही वेळा मनुष्य हा पशुपक्षयापेक्षाही अगतिक आणि असाहाय्य असतो.

सकाळच्या तीन घटका संपल्या. आकाश जसंच्या तसंच होतं. ढगाळलेलं! गंगेच्या काठावरच्या वाळूत उभा राहून शोण माझी वाट पाहत होता. मी पाण्यात उभा होतो. मला तो चुकूनही हाक मारणार नव्हता. मी जरी दिवसभर पाण्यातच उभा राहिलो असतो, तरी तोही तसाच दिवसभर किनाऱ्यावर उभा राहिला असता. मला आता अधिक काल थांबता येणार नव्हतं. शेवटी निरुपायानं मी डोळे मिटले. काही केल्या डोळ्यांसमोर नेहमीसारखे परिचित असे तेजाचे कण उभे राहिले नाहीत. का असं झालं होतं? हे काही अशुभ लक्षण तर नाही? छे, मन हे वेडं असतं. ते नेहमीच नको त्या शंकाकुशंका घेत असतं. मी नित्याप्रमाणं हात जोडले आणि मनोमन म्हणालो, 'देवन्, नेमके आजच तुम्ही माझ्यावर असे रुष्ट का? आज मला आशीर्वाद द्या. आज मी या नगरीतील सर्वश्रेष्ठ वीर म्हणून गौरविला गेल्याचं तुम्हांला पाह्यला मिळेल.' शेवटच्या एका ओंजळीचं अर्घ्य त्यांना अर्पण केलं आणि वळलो. मनात एक अनामिक हुरहुर होती. किनाऱ्यावर शोण माझीच वाट पाहत होता. त्याला आपण केव्हा एकदा आखाड्याकडे जाऊ असं झालं होतं, पण – पण माझ्याकडे पाहताच त्याच्या कपाळावर एक बारीकशी आठी उठली. मला ती लागलीच खटकली. म्हणून त्याला विचारलं, "का – काय झालं शोणा? तुझ्या कपाळावर आज आठी का?" तो गप्पच उभा राहिला. त्याचं मौन मला मात्र अगदी असह्य झालं. त्याचे भरगच्च खांदे दोन्ही तळहातांनी गच्च पकडून ते गदागदा हलवीत मी ओरडलो, "शोणा, अरे तू असा गप्प का?" तो काहीही उत्तर न देता माझ्या कानांकडे डोळे विस्फारून नुसताच पाहत राहिला! त्याचे डोळे क्षणात निस्तेज दिसू लागले. मला त्याचं ते विचित्र पाहणं असह्य झालं. त्याचा चेहरा हातात घेऊन त्याच्या डोळ्यांत

खोलवर पाहत मी त्याला कळवळून विचारलं, ‘‘शोणा, आपल्या दादाला तू एवढाही मानीत नाहीस? सांग शोणा, असं कोणतं जीवघेणं रहस्य आहे की, जे तुला आज माझ्यापासून लपवून ठेवावं, असं वाटतं आहे?”

तो विरघळला. आपल्या गालांवरचे माझे हात आपल्या थरथरत्या हातांनी घट्ट पकडीत तो म्हणाला, ‘‘दादा, आज तू आखाड्याकडे जाऊ नकोस! तुझ्या गुरूनं तुला दर्शन दिलेलं नाही! तू परत चल!”

‘‘वेड्या, माझे गुरू काय रोज मला दर्शन देतात? पावसाळ्यात ते चार – चार महिने दडी मारून बसतात तेव्हा?”

‘‘पण हे दिवस पावसाळ्याचे नाहीत. वसंतऋतूचा काल आहे हा. त्यांनी आजच असं मुख लपवायचं काही कारण नाही.’’

‘‘असू देत. माझ्या गुरूंचा आशीर्वाद मला मिळाला आहे. तो मला कळतो. चल तू.’’ त्याच्या दंडाला धरून मी त्याला पुढं ढकललं.

‘‘नको दादा, मी तुला जाऊ देणार नाही!” त्याच्या स्वरात भय होतं.

“का? आज हस्तिनापुरातल्या सर्वश्रेष्ठ, अजिंक्य वीराची निवड आहे, हे तुला माहीत नाही काय? आज तर मला गेलंच पाहिजे!”

‘‘नको. आज जाऊ नकोस.’’ त्यानं माझे हात अधिकच घट्ट धरले. त्याची पकड धडधड स्पंदत होती.

‘‘शोणा, लहानपणातला पोरकट हट्ट सोडून दे. वयाबरोबर आता थोडा बदलायला शीक. लक्षात ठेव, तू कर्णाचा भाऊ आहेस.’’ मी आयुष्यात पहिल्या प्रथमच त्याला एवढ्या कठोर शब्दांत समज दिली.

आपलं तोंड माझ्या ओंजळीतून त्यानं काढून घेतलं. चार पावलं दूर जात खाली मान घालून तो म्हणाला, ‘‘मी तुझा भाऊ आहे हे कधीच विसरलो नाही आणि विसरणार नाही. म्हणूनच माझं मन मला सांगतं आहे की, तू आज आखाड्याकडे जाऊ नये, कारण – कारण तुझ्या कानातील कुंडलं आज निस्तेज पडली आहेत! त्यांच्याभोवती काळी – काळी वलयं दाटली आहेत!!”

त्याचे ते उद्‌गार तापलेल्या शिशाच्या रसासारखे माझ्या कानात घुसले. ते उद्‌गार ऐकून मी खिन्न झालो. मनाच्या घायाळ भुजंगाला शंकांच्या असंख्य मुंग्यांनी कडकडून डसायला सुरुवात केली. ‘का काळी पडली आहेत माझी कुंडलं आज? का ढगाळलं आहे आज आकाश? कोणत्या महान विनाशाची ही निशाणी आहे? कोणत्या विषवृक्षाचं बीज आज लावलं जाणार आहे? या कर्णाचं काय होणार आहे? कशाला मिळाली आहेत ही कुंडलं? काय उपयोग आहे ह्यांचा? कशाला मिरवतो मी ही?’ असंख्य प्रश्नांचे काजवे डोळ्यांपुढे चमकू लागले. शेवटी आतून एक आवाज आला. त्यानं मला धीर दिला. मी ठरवून टाकलं की, शोण म्हणतो ते ठीक आहे, पण नुसतं आखाड्याकडे जायला काय हरकत आहे? मी त्याला खिन्नपणे म्हणालो, ‘‘ठीक आहे शोणा, मी आखाड्यात उतरणार नाही! पण एकाच अटीवर. मी आखाड्याबाहेर महाद्वारात उभा राहीन. माझ्या गुरूनं मला दर्शन दिलं, तरच मी आखाड्यात उतरेन.’’

शोणानं आनंदानं मान डोलावून मला संमती दिली. वाळू तुडवीत आम्ही चालू लागलो.

राजनगरीतले सगळे मार्ग सुने – सुने होते. लहान मुलांपासून वृद्धांपर्यंत झाडून

सगळे आखाड्याकडे गेले होते. त्या वेळी बाहेरचा एखादा वाटसरू आला असता तर त्याला हे नगर पाहून ही कौरवांची राजनगरी हस्तिनापूर आहे, हे सांगूनही पटलं नसतं. कारण नगरात एकही माणूस शिल्लक नव्हतं! ढगाळलेल्या आकाशामुळे हस्तिनापूर बळी देण्यापूर्वी खुराड्यात कोंडलेल्या कोंबड्यासारखं दिसत होतं.

आम्ही आखाड्याजवळ आलो. नगरजनांच्या टाळ्या आणि आरोळ्या आता अधिक स्पष्ट ऐकू येऊ लागल्या. त्या ऐकताच माझ्या अंगातील रक्त आपोआप सरसर तापू लागलं, पण त्याचा काही उपयोग नव्हता. शोणाला सांगितलं होतं त्याप्रमाणं आखाड्याबाहेरच उभं राहणं मला भाग होतं. आम्ही आखाड्याच्या प्रवेशद्वारापाशी आलो. स्पर्धेला केव्हाच सुरुवात झाली होती. आत कुणीतरी प्रतिस्पर्ध्यावर प्रेक्षणीय हल्ला चढविला असावा. एकसारख्या टाळ्या वाजत होत्या. माझ्या पराक्रमोत्सुक मनाची अवस्था पिंजऱ्यात कोंडलेल्या वाघासारखी झाली. देहाच्या पिंजऱ्याला फोडण्यासाठी ते चोहोबाजूंनी धडका मारू लागलं. गाईला बघितलेल्या; पण गळ्यात कंठबंध असलेल्या वासरासारखं ते तडफडू लागलं. मोठ्या कष्टानं स्वत:ला आवरीत मी शोणाला म्हणालो, "तू जा आत. मी इथंच थांबतो." तो तसाच थांबला. त्याची कल्पना होती की, त्याच्या मागोमाग मी लागलीच आत येणारच. त्याच्या खांद्यावर हात ठेवून मी त्याला सांगितलं, "शोणा, विश्वास ठेव, मी आत येणार नाही. हा कर्णाचा शब्द आहे, जा." तो माझ्या कानांकडे पाहत निघून गेला.

माझ्या मनाच्या मोहोळातून विचाराच्या असंख्य लाल मधमाश्या इकडे – तिकडे नाचू लागल्या. या कुंडलांमुळेच जर माझी ही अवस्था असेल, तर ती कापून धुळीत फेकून द्यावीत आणि तुटलेल्या कानांनीच आत जावं – पण तेही शक्य नव्हतं, कारण कान कापण्याचा कितीही प्रयत्न केला असता तरी ते कापले जाणार नव्हते! 'कशाला मिळालीत मला ही कवच – कुंडलं? काय उपयोग आहे यांचा? कशाला मिरवतो मी ही?' माझ्या मस्तकाच्या वारुळात विचारांचे असंख्य साप सुळसुळत इकडे – तिकडे फिरू लागले. आखाड्यातलं तर मला काहीच दिसत नव्हतं. केवळ प्रवेशद्वारापाशी उभ्या राहिलेल्या प्रेक्षकांचे काही अस्पष्ट संवाद ऐकू येत होते, तेही त्रोटक. इतक्यात एक प्रचंड गदारोळ उठला. त्यानं मन उतू जाणाऱ्या दुधासारखं भरून आलं. कानात जीव आणून मी ऐकू लागलो. तुटक – तुटक शब्द कानांवर गोळा होत होते.

"दु:शासनाला भीमानं लोळविलं! डोक्याइतकं उंच उचलून त्याला सरळ दाणकन खाली आपटून त्याच्या छातीवर तो बसला आहे! आपल्या भक्कम मुष्टिप्रहारांनी त्याला यथेच्छ पिटतो आहे."

माझे दंड एकदम टरारून फुगले! काळजाची धडधड कानांवर स्पष्ट ऐकू येऊ लागली. माझं रक्त मला गरगरा फिरत सांगू लागलं, "कर्णा ऊठ. आत जा. सामर्थ्याचं सोनं स्पर्धेच्या पाषाणावर पारखून घे. आजच ही संधी आहे!"

डोळ्यांच्या बाहुल्यांत प्राण एकवटून मी आकाशाकडे पाहिलं. त्या निर्दय ढगांची चवड अजूनही तशीच होती! पंख तुटलेल्या असाहाय्य पाखरासारखं माझं मन तडफडू लागलं. प्रवेशद्वारापाशी इकडे – तिकडे अस्वस्थपणे मी एकसारख्या फेऱ्या मारू लागलो. माझं मन आक्रंदून ओरडू लागलं, "सूर्यदेवा, एकदाच दर्शन द्या! हस्तिनापुरातल्या कोणत्याही शक्तिशाली तरुणानं जिवाचं मोल लावून जिंकावा असा हा आजचा एकच दिवस आहे! एकदाच आपल्या या लाडक्या शिष्यावर आपले सहस्त्र

तेजस्वी डोळे उघडून कृपादृष्टी टाका. फक्त एकदाच!"

परत टाळ्यांचा कडकडाट झाला. माझे कान आपोआपच टवकारले गेले.

"वा वा! नकुल किती चपळ आहे! एकाच वेळी दोन – दोन गतिमान घोड्यांच्या पाठीवर एक – एक पाय ठेवून त्यांना तो एकाच गतीनं कुशलतेनं पळवितो आहे. साधु! पांडुपुत्रा धन्य आहेस."

माझं मन घोड्यापेक्षाही अधिक गतीनं धावू लागलं. त्याच्या खुरांखाली विचारांची धूळ उडू लागली. प्रवेशद्वाराच्या उंबरठ्यापाशी मी तळमळत घुटमळू लागलो. क्षणात वाटे कसलं वचन आणि कसली प्रतिज्ञा? झटकन आत शिरावं – पण अजूनही एक आवाज मला सांगत होता, "कर्णा, वचन हे केव्हाही पाळण्यासाठीच असतं. ज्याला दिला शब्द पाळता येत नाही तो माणूस नव्हे, तो पशू!" मी उंबरठ्यावरून पुन्हा मागं आलो!

परत टाळ्यांचा आणि आरोळ्यांचा आवाज आला. पाठोपाठ तुटक संवाद ऐकू येऊ लागले.

"भले भले भीमा, गदायुद्धातल्या अजिंक्य दुर्योधनालासुद्धा किती सहज तू आज जिंकलंस. किती भक्कम आहेत तुझे प्रहार! नेत्रांचं पारणं फिटलं – वायुपुत्रा, धन्य-धन्य!"

माझं मन गदावीरासारखं मंडलं घेऊ लागलं. अंगावरचं उत्तरीय अगतिकतेनं मी मनगटाला करकचून आवळलं. शरीरातला कणन्‌कण तापून उकळू लागला होता. आकाशाकडे बघितलं. ढगांची हालचाल होऊ लागली, पण नुसतीच हालचाल! क्षणभर वाटलं, तेथून शक्य असेल तेवढ्या वेगात गंगेच्या दिशेनं धावत सुटावं आणि तिच्यात घालून घेऊन तापलेल्या शरीराची धाव थंडगार करावी. त्या विचारानं मनगटावरचं उत्तरीय सोडलं आणि ते खांद्यावर टाकून गंगेच्या दिशेनं मी चालूही लागलो.

"दादा, थांब." मागून शोणानं हाक मारली.

मी मागं वळून पाहिलं. प्रवेशद्वाराच्या उंबरठ्यात उभा राहून हात उंचावून तो मला थांब म्हणून सांगत होता. परत वळलो. आकाशाकडे पुन:पुन्हा पाहून मानेचे मणके शिणले होते.

आता तर एकसारखा टाळ्यांचा अविरत वर्षाव होत होता. नुसत्या टाळ्या. घोडदौडीसारख्या! मुसळधार पावसाच्या सरींसारख्या!

"दादा, आता अर्जुन आखाड्यात उतरला आहे!"

अर्जुन! अर्जुन! अर्जुन! का मानतात त्याला एवढं? काय करणार आहे तो पराक्रम?

माझ्या कानात चोहोबाजूंनी शब्दांचे बाण घुसू लागले. आतला आखाडा क्षणाक्षणाला रटरटत होता. घोषणांच्या शब्द – पुष्पांचा सडा पडत होता!

"तो बघा अर्जुन घोड्याच्या पाठीवरून हत्तीवर, हत्तीवरून परत घोड्याच्या पाठीवर असे धावते पराक्रम करतो आहे!"

"दोन खड्गं एकदम घेऊन ते दोन्ही हात सफाईनं समोरच्या बलाढ्य दुष्करावर चालवतो आहे. क्षणात त्यानं दुष्कराची खड्गं दूर उडवून लावली आहेत. खाली मान घालून तो दुष्कर आखाड्याबाहेर चालला आहे. अर्जुनासारखा खड्गवीर नाही."

"तो पाहा तो अर्जुन चक्राच्या आखाड्यात केव्हाच आला आहे. ते भव्य चक्र

एखाद्या थाळीसारखं तो सहज फिरवतो. मध्येच ते आकाशात लीलया उंच उडवितो आहे. परत ते केवळ एका बाणाच्या टोकावर पेलून धरतो आहे! बाणानंच त्याचं पुन्हा प्रक्षेपण करतो आहे!''

''आता तो मल्लांच्या आखाड्यात उतरला आहे. किती पीळदार आहे त्याचं शरीर! छाती कशी आखाड्याच्या महाद्वारासारखी आहे. दंड आणि पोटऱ्या ऱ्या कवंडाळ्याच्या वेलीसारख्या पीळदार आहेत! आखाड्यातल्या तांबड्या मातीवर त्याचं निळसर, पीळदार शरीर शोभून दिसतं आहे. अरे व्वा! क्षणार्धात त्यानं आपल्या प्रतिस्पर्ध्याला, त्या दुर्मुखाला रजकपृष्ठावर सरळ उताणाही केला आहे!''

''हा अर्जुन हे आखाडे केव्हा बदलतो आहे आणि केव्हा वेगवेगळे पराक्रम करतो आहे तेच समजत नाही. इथं एकच अर्जुन आहे की तेरा आहेत? आता तो धनुर्धराचा वेष घालून धर्नुविद्येच्या आखाड्याकडे चालला आहे, विष्णूसारखा! भले अर्जुना! साधु पांडुपुत्रा! तुझ्यासारखा धनुर्धर शोधूनही अखंड आर्यावर्तात मिळणार नाही! आज तूच हस्तिनापुरातील सर्वश्रेष्ठ अजिंक्य वीर ठरणार!''

टाळ्या! अविरत टाळ्या! पावसाच्या सरींना लाजवतील अशा कडकडीत टाळ्या! आरोळ्या! हल्लकल्लोळ! गदारोळ! अर्जुन! अर्जुन! उकळलेलं रक्त! धनुर्धर! कोंदटलेले ढग! काळी पडलेली निस्तेज कुंडलं! सर्वश्रेष्ठ अजिंक्य वीर! नीलकमलांची गौरवमाला! मिरवणूक! राजमाता...

''शोणा, हे असं काय होतं आहे मला? जाऊ दे मला गंगेकडे नाहीतर मी जळून खाक होईन!'' कुंडलांचे बोळे कानात कोंबून त्यावर असह्यपणे तळहात दाबून मान वर करीत मी केवढ्यातरी मोठ्यानं ओरडलो. माझ्या शरीरातील कणन्कण कडकडीत तापला. असाहाय्यपणे मी शोणाच्या खांद्यावर संतप्त मस्तक टेकलं. माझ्या अंगातून कडकडीत घामाच्या धारा वाहू लागल्या. त्या कडकडीत पाण्यानं शोणाच्या खांद्याचं कातडं पोळू लागलं. शब्दांच्या इंगळांनी माझं मन पोळू लागलं. आत मात्र हलकल्लोळ चालला होता. माझ्या डोळ्यांतून अगतिकतेचे जळजळीत उष्ण अश्रू वाहत होते.

''तो बघ, अर्जुन एकाच वेळी असंख्य बाण असंख्य लक्षयांत मारतो आहे.'' टाळ्या.

''आकाशात उडविलेली फळं वरच्यावर छेदतो आहे. त्या दोन तुकड्यांचे चार – चारीचे आठ असे असंख्य तुकडे वरच्यावर करतो आहे. वर आकाशात फेकलेलं फळ असंख्य तुकडे होऊनच खाली पडतं आहे!'' टाळ्याच टाळ्या.

''तो पाहा, त्यानं फेकलेला जीद्म बाण वाकडा – तिकडा होत मधले असंख्य अडथळे चुकवून बरोबर लक्षयात घुसला आहे!'' असंख्य टाळ्या.

''आकाशात असंख्य बाण सोडून पावसाचं दृश्य तो दाखवितो आहे. मध्येच एखादा चंदेरी जीद्म बाण वाकडा – तिकडा सोडून त्यात विजेचं दृश्य निर्माण करतो आहे!'' टाळ्या व जल्लोष.

''आज आमच्या डोळ्यांचं पारणं फिटलं. या अर्जुनासारखा वीर हस्तिनापुरातच काय, पण साऱ्या आर्यावर्तात मिळणार नाही.''

''आता तो शेवटचा हात दाखवतो आहे. केवळ आवाज ऐकून तो लक्षयवेध करणार आहे. त्याचे डोळे वस्त्रानं बांधलेले आहेत. एक सूची बाण हाती घेऊन त्यानं तो ओठाला लावून डोळे मिटले आहेत. आपल्या गुरूचं तो स्मरण करतो आहे. त्याच्या

गुरूसारखा – त्या द्रोणांसारखा गुरू त्रिभुवनात मिळणार नाही!"

"भले वीर अर्जुना! वारे पांडुपुत्रा! कोणालाही समजायच्या आतच त्यानं केवळ आवाज ऐकून तो सूचीबाण पाठीमागच्या भुंकणाऱ्या कुत्र्याच्या तोंडात अचूक मारला! त्याचं तोंड त्यानं बंद केलं आहे. शाब्बास सर्वश्रेष्ठ धनुर्वीरा."

"ते बघा, गुरू द्रोण त्या कुत्र्याला सोडवून घेऊन सर्वांना तो बाण दाखवीत आहेत!"

"कुणीतरी त्यांच्या हातात नीलकमलांची ती मानाची माला दिली आहे!"

नीलकमलांची माला! अजिंक्य धनुर्धर! ढगाळलेलं आकाश! एकच क्षण! कीर्तीचा आणि मानाचा एकच क्षण! काय करू? काय करू?

माझं मन चोहोबाजूंनी आग लागलेल्या वणव्यातील पाखरासारखं तडफडू लागलं. शरीराचा कुंभ आता तापून – तापून तडकणार की काय?

माझ्या डोळ्यांची अधीर पाखरं ढगांच्या ढिगाऱ्यावर टपाटप टोचा मारू लागली. त्या टोचांतून आवाज येऊ लागला. 'एकच क्षण! या कर्णाच्या जीवनातील हा एकच क्षण आहे! केवळ एकच क्षण!' किती प्रचंड वेगानं हलताहेत हे सगळे ढग! आकाशाचा समुद्र आज ते घुसळून काढणार आहेत की काय? शोणाचे खांदे गदागदा हलवीत मी आनंदानं ओरडलो, "शोणा, तो बघ आकाशाचा सम्राट – माझा गुरू माझी लाज राखण्यासाठी ढगांच्या ढिगांना मेंढरांच्या कळपासारखा पिटाळतो आहे!" तोही आनंदानं मला कडकडून मिठी मारून ओरडला, "दादा, जा, आत जा. तुझी कुंडलं परत चमकताहेत. रोजच्यासारखी ती केवळ निळा प्रकाशाच फेकीत नाहीत, तर आता ती लाल झाली आहेत!"

"काय म्हणतोस काय शोणा? माझी कुंडलं परत चमकताहेत?"

"होय दादा आणि तो बघ तुझा गुरुदेव आकाशाचं निळं – निळं छत जाळीत उभा आहे!" त्यानं धुंदपणे दोन्ही हात आकाशाकडे उंचावले.

मी वर पाहिलं. तेच तेजाचे असंख्य कण हसत उभे होते. आपल्या रथाचे हजारो घोडे आवरीत माझे गुरुदेव मला आशीर्वाद देत होते.

सकाळपासून खुराड्यात कोंडलेल्या कोंबड्यासारखा दिसणारा हस्तिनापूरचा आसमंत बांग देणाऱ्या कोंबड्यासारखा ऐटदार दिसू लागला! झाडांची पानं थरारली. गंगेचं दूरवरचं पात्र झळाळू लागलं. सगळे पक्षी आनंदानं एकदम ओरडू लागले. दूरवर अजूनही एक ढग रेंगाळत होता. त्याच्या सावलीत कुरू राजांचा तो वैभवसंपन्न प्राचीन पांढरा राजवाडा मात्र रुग्णासारखा फिका दिसत होता!

आत आरडाओरडा झाला. गगनाला भेदेल असा कितीतरी मोठा!

"तो बघा, सूर्यसुद्धा अर्जुनाचं स्वागत करण्यासाठी ढगांचा आंतरपाट बाजूला सारून उपस्थित झाला आहे. धन्य आहे अर्जुनाची! ते बघा, गुरू द्रोण त्या भव्य चौथऱ्याच्या पायदंड्या चढताहेत. सूर्याला साक्षी ठेवून आता ते ती नीलकमलांची माला अर्जुनाच्या गळ्यात घालणार आहेत. राजकुमार अर्जुनाचाऽऽऽऽ विजय असो!" प्रचंड आवाजानं आसमंतातील कणन्‌कण थरारला.

खांद्यावरचं उत्तरीय काढून मी शोणाच्या अंगावर फेकलं! त्या वेळी मी कोण होतो हे माझं मलाच सांगता आलं नसतं. शोणाचा भाऊ? अश्वत्थाम्याचा मित्र? की सारथ्याचा पुत्र? छे, मी त्यांपैकी कोणीच नव्हतो. मी म्हणजे रसरसलेल्या लोखंडाचा

तप्त रस होतो! मी म्हणजे कडाडणाऱ्या विजेचा लोळ होतो! मी म्हणजे सहस्त्र अश्वांचं बल असलेला प्रतिसूर्य होतो!

त्या प्रवेशद्वारात लाचार भिकाऱ्यासारखं उभा राहण्यासाठी माझा जन्म नव्हता! समोर येईल त्याला जाळून काढण्यासाठी माझ्या शरीरातील कणाकणांची मशाल पेटली होती. कधी न ऐकू येणारा एक महासमार्थ्यशाली आवाज मला सांगू लागला, ‘‘चल कर्णा, झटक्यात आत चल. हा निर्वाणीचा क्षण आहे.’’ एकदम मी प्रवेशद्वारातून आत घुसलो. गुरू द्रोणांनी आपल्या हातातील माला उंचावलेली मला दिसली. दोन्ही हात उंचावून अंगातली सगळी शक्ती एकवटून मी मोठ्यानं ओरडलो, “थांऽऽबाऽ!”

तो आवाज लक्षयाचं काळीज कापत आत शिरणाऱ्या बाणासारखा सगळ्या आखाड्याच्या काळजात घुसला. कडाडणाऱ्या विजेलाही लाजवील इतका तो मोठा होता. हजारो डोळे प्रवेशद्वाराकडे वळले. गुरू द्रोणांच्या थरथरत्या हातातील माला पटकन खाली कोसळली! सगळीकडे शांतता पसरली. एकवार भक्कम तळहातानं मी माझ्या डाव्या पुष्ट दंडावर जोरात थोपटून एक दणदणीत शड्डू ठोकला! त्याचा ध्वनी आसमंतात थरथरत निनादला.

माझ्या तप्त अंगातून धगधगणाऱ्या लहरी बाहेर पडू लागल्या. नगरजन मला आपोआपच वाट करून देऊ लागले. जे देत नव्हते त्यांना चटके बसत होते! क्षणार्धातच मी त्या दगडी चौथऱ्याच्या पायथ्याशी आलो. तिथं कृपाचार्य उभे होते. केवळ औपचारिकता आणि वयाचा मान म्हणून त्यांना मी कसातरी नमस्कार केला आणि एकदम चार – चार अशा पायदंडच्या झेप घेऊन चढत क्षणात चौथऱ्यावर उभा राहिलो. चमत्कारिक दृष्टीनं गुरू द्रोण माझ्याकडे पाहत होते. सहा वर्षांनंतर केवळ आजच पहिल्या प्रथमच मी त्यांच्यापुढं एवढ्या ताठपणानं उभा होतो! नापसंतीच्या जाळ्यात त्यांच्या चर्येची माशी गुरफटली होती. कपाळाचं कातडं उंचावत त्यांनी मला विचारलं, ‘‘कोण तू?’’

एक वेळ आकाशात पाहून त्यांच्या वयाचा मान राखण्यासाठी वाकून त्यांना नमस्कार करून ताठ मानेनं मी म्हणालो, ‘‘कर्ण!’’

दोन्ही हात उंचावून नगरजनांना उद्देशून गोल फिरून मोठ्यानं ओरडून सांगितलं, ‘‘सामर्थ्याची पूजा करणाऱ्या या हस्तिनापुरातल्या न्यायप्रिय नगरवासियांनो, मी कर्ण, या राजकुमार अर्जुनानं आता इथं केलेले सर्व – सर्व पराक्रम करण्यास तयार आहे. तुम्ही मला संधी द्याल काय?’’

आखाड्यातले सगळे नगरजन एकदम उठून उभे राहिले. सगळे जण हात उंचावीत उत्तरीय उडवीत आरोळ्या मारू लागले, ‘‘त्याला संधी द्या! त्याला संधी द्या! राजकुमार अर्जुन निर्विवाद अजिंक्य ठरू द्या!’’

आरोळ्या ऐकून महाराज धृतराष्ट्र उभे राहिले. त्यांनी शेजारी बसलेल्या पितामह भीष्मांना काहीतरी विचारलं. हातातील राजदंड त्यांनी उंचावताच सगळं पटांगण शांत झालं. घनगंभीर आवाजात महाराज मोठ्यानं म्हणाले, ‘‘हा सामर्थ्याची कसोटी लावणारा आखाडा आहे. इथं हस्तिनापुरातील कुठलाही वीर आपलं सामर्थ्य प्रकट करू शकतो. गुरुदेव, त्या धाडसी तरुणाला संधी द्या!’’

चोहोबाजूंनी टाळ्या आणि घोषणा यांनी त्या भाषणाचं उत्स्फूर्त स्वागत झालं. सगळा आखाडा उतू जाणाऱ्या दुधासारखा क्षणाक्षणाला आत्यंतिक उत्सुकतेनं फुगू

लागला. उठलेले प्रेक्षक पुन्हा मांड ठोकून खाली बसले. गुरुदेव द्रोण, कृपाचार्य आणि अर्जुन चौथऱ्यापासून दूर जाऊन उभे राहिले.

मी राजकुलातील लोकांच्याकडे एकदा पाहिलं. तिथं विदुर, महाराज धृतराष्ट्र, पितामह भीष्म, शकुनीमामा, अमात्य वृषवर्मा आणि आमंत्रित राजे बसले होते. त्यांच्या पायथ्याशी सगळे राजकुमार बसले होते. त्यात दुर्योधन, दुःशासन, दुर्मुख, दुष्कर, विकर्ण, भीम, नकुल, सहदेव आणि युधिष्ठिर होते. सर्व राजपुत्रांच्याबरोबर मध्ये अश्वत्थामा बसला होता. त्या सगळ्यांपैकी केवळ चौघांची मुखं आनंदानं उजळून गेली होती. त्यात महाराज धृतराष्ट्र, ज्येष्ठ कौरव दुर्योधन, दुःशासन आणि माझा मित्र अश्वत्थामा होता. अश्वत्थाम्यानं हात उंचावला. मी त्याच्या प्रेमाचा तेथूनच मूकपणे स्वीकार केला. त्या तसल्या आणीबाणीच्या वेळीही माझ्या मनात एक विचार चमकून गेला, 'या गुरू द्रोणांचा हा अश्वत्थामा पुत्र आहे, पण दोघांत किती अंतर! एक निवळशंख खळखळणारा झरा, तर दुसरा सदैव घनगंभीर वाटणारा महासागर! खारट आणि अंत न लागणारा! बाहेरून येणारं पाणी आपल्या अंतरात सामावून घ्यायला तयार नसलेला.'

मी राजस्त्रियांच्या डेऱ्याकडे बघितलं, पण तिथं काहीच दिसत नव्हतं. केवळ एक पडदा होता. तलम वाटणारा पण झिरमिरीत पडदा!

गुडघे टेकून मी चौथऱ्यावरूनच पितामह भीष्म आणि महाराज धृतराष्ट्र यांना वंदन केलं. त्या झिरमिरीत पडद्यालाही वंदन केलं.

आता एकमेकांचा श्वासोच्छ्वास ऐकू येईल अशी शांतता पसरली.

ज्या क्षणासाठी हा कर्ण सहा वर्षं तळमळत होता, ज्या क्षणासाठी त्यानं रात्रीचा दिवस केला होता, त्या क्षणाची वाट पाहताना त्याच्या धीराचे सर्व बांध फुटले होते तो हा क्षण होता. उपेक्षेच्या मुशीत सहा वर्षं तापून निघालेला क्षण! अनुल्लेखाच्या वणव्यात गेलं अर्धं तप होरपळून निघालेला हा क्षण! भेदाभेदाच्या द्वंद्वात आजवर पायदळी तुडविला गेलेला हा क्षण! कर्तृत्वाला घुसमटवून ठेवणारा हा क्षण! आजपर्यंत पौरुषाचा निर्घृण अधिक्षेप करणारा हा क्षण!

आज एकतर हा कर्ण ती नीलकमलांची माला गळ्यात घालून विजयी वीर म्हणून परतेल, नाहीतर पराभूत झालेल्या कर्णाचं प्रेत तुडवून मगच नगरजन परत जातील! अन्य काही घडणार नाही. या स्पर्धेचा शेवट हाच असेल. निखळ विजय किंवा मरण! माझ्या गुरूनं अर्ध्या तपाच्या ज्ञानसाधनेत मला एकच शिकवलं होतं, "विजय किंवा मरण!"

आशीर्वाद घेण्यासाठी हात जोडून मी आकाशात पाहिलं. डोळे उघडे ठेवून ते तेज मी घटाघटा पिऊ लागलो. एक अत्यंत तेजस्वी प्रकाशझोत माझ्या सर्वांगात संचारला. आता कर्ण – कर्ण नव्हता. तो लोखंडाचा तप्त रस नव्हता, विजेचा लोळ नव्हता, तो शोणाचा भाऊ नव्हता, अश्वत्थाम्याचा मित्र नव्हता, कुणाचा पुत्र नव्हता, या स्पर्धेत भाग घेणारा तो एक हस्तिनापुरातील वीरही नव्हता, अर्जुन आणि गुरू द्रोण यांना आपला पराक्रम दाखविण्याची संधी पाहणारा एक अतृप्त शिष्यही नव्हता. तो कुठं आहे तेच त्याला माहीत नव्हतं. माहीत व्हावं; असं त्याला वाटत नव्हतं, कारण आता तो सूर्यदेवांचा एक प्रकाशमान किरण होता. गतिमान आणि तप्त असा किरण! धरतीला चिरणारा किरण! आता त्याला समोरचे हजारो जन दिसत नव्हते. आता त्याला कानातील धडधड ऐकू येत नव्हती. आता त्याला टाळ्यांचा पाऊस ऐकू येत नव्हता. आपलं शरीर

उकळलेलं आहे म्हणून तो अस्वस्थ होत नव्हता! कारण तो म्हणजे केवळ प्रकाशाचा किरण होता! असीम, अमित आणि अनंत प्रकाशाशी जोडलेला किरण! स्वत:चं स्वतंत्र अस्तित्व नसलेला किरण! त्रिभुवनात स्वैर संचार करणारा किरण! जगाचे डोळे दिपविणारा किरण! अंधाराचं पोट चिरणारा किरण! नुसता किरण! प्रकाशाचा किरण!

चौथऱ्यावरून उडी मारून मी झटकन खाली उतरलो. माझ्या शरीराला एक साधी झिणझिणीसुद्धा आली नाही! क्षणात अश्वारोहणाच्या पटांगणात आलो. सात पांढरे घोडे एकत्र बांधले होते. त्यातल्या मधल्या एका घोड्याच्या पाठीवर उभा राहिलो. त्या घोड्यांवरून सगळे घोडे पिटाळू लागलो. माझ्या संकेतावर थांबलेले ते सातही घोडे पुढचे खूर उंचावून मोठ्यानं खिंकाळू लागले. वेगाचं बंधन त्यांना उरलं नाही. माझ्या हातातील दोरीवर नाचणारी ती सात खेळणी होती! त्या धावत्या घोड्यांवरून सहज हत्तीवर चढलो. दोन्ही सुळ्यांवर दोन पाय देऊन उभा राहिलो. त्या प्रचंड प्राण्याला अंकुश नसताना हवा तसा खेळवू लागलो.

नंतर चक्राच्या आखाड्यात आलो. ते भव्य चक्र हातात घेऊन न सहज थाळीसारखं गरगर फिरविलं. मध्येच ते आकाशात उंच उडविलं. खाली येणारं ते चक्र हाताच्या करंगळीवर तोलून धरलं. ते चक्र पायांखाली घेतलं. पायांच्या नुसत्या अंगठ्यांनी गोल फिरवलं. दूर फेकून दिलं.

तिथून खड्गाच्या आखाड्यात आलो. माझ्यापूर्वीच दोन योद्धे तिथं हातात दोन – दोन खड्ग घेऊन उभे होते. माझ्या हातात एकच खड्ग कसंतरी लागलं. त्यानंच खणाखणी सुरू झाली माझ्या एका – एका भक्कम प्रहाराबरोबर त्यांच्या हातातील खड्गं दूर उडून पडली. हात खांद्यातून उखडल्याप्रमाणं ते खांदे चोळत आखाड्याबाहेर निघून गेले.

नंतर भाल्याच्या आखाड्यात आलो. पाच वेगवेगळे भाले एकाच हातात घेऊन दुरून धावत येऊन समोरच्या पाच लक्षयांत ते मी एकाच वेळी अचूकपणे मारले. परत धावत येऊन पाच भाले पूर्वीच्या घुसलेल्या भाल्यांच्या लाकडी शेपटांत मारले. भाल्यांची फेक आणि भाल्यांची चवड तयार होऊ लागली.

राजस्त्रियांच्या डेऱ्यासमोर असलेल्या मल्लांच्या आखाड्यात आलो. त्या आखाड्यात तीन प्रतिस्पर्धी उभे होते, पण ते तिघेही मला मातीच्या ढिगासारखे वाटले. अंगावरचं पांघरलेलं तांबडे वस्त्र मी दूर फेकताच त्यातल्या दोन ढिगांनी माझं पिकलेल्या लिंबासारखं पिवळंधमक शरीर बघून न खेळताच हात वर करून आपला पराभव मान्य केला. एकानं मात्र सरळ मला द्वंद्वासाठी आव्हान दिलं. द्वंद्व! विजय किंवा मरण! तो माझ्या अंगावर दात – ओठ खात धावून आला, पण क्षणात माझा बाहुकंटक डाव त्याच्या गळ्याभोवती पडला! हातपाय झाडत तो तडफडून महाराजांकडे जीवदान मागू लागला. राजस्त्रियांच्या डेऱ्याचा पडदा उगाच क्षणभर थरथरला! महाराजांनी राजदंड उचलला. त्याला जीवदान मिळालं.

शेवटी धनुर्धराचा वेष चढवून मी त्या मधल्या चौथऱ्याकडे चालू लागलो. माझ्या अंगावर पिवळं वस्त्रं होतं. खांद्यावर निळं उत्तरीय होतं. धीमी पावलं टाकीत मी चौथऱ्याच्या पायदंड्या चढू लागलो.

साळिंद्राच्या शरीरातून शेकडो टोकदार नलिका एकाच वेळी बाहेर सुटतात तसे अनेक बाण माझ्या धनुष्यातून वेगानं सुटू लागले. वारुळात नाग घुसतात तसे ते

लक्षयात घुसू लागले.

एक जिद्म बाण मी सोडला. मधले असंख्य अडथळे चुकवून तो वाकडा – तिकडा होत समोरच्या लक्षयात अचूक घुसला.

आकाशात फेकलेल्या पळांचे माझ्या बाणांनी असंख्य तुकडे होऊ लागले. इतके बारीक तुकडे की, वर जाताना फळ दिसे, पण खाली मात्र बारीक चूर्ण पडू लागलं.

आता शेवटचा हात मला करावयाचा होता. आवाजाचा लक्षयभेद! केवळ आवाज ऐकून लक्षय टिपायचं! हा महत्त्वाचा लक्षयभेद होता. सगळं वातावरण शांत होतं. लक्षयभेदापूर्वी माझे डोळे वस्त्रानं बांधले गेले! एक सूची बाण हातात घेऊन मी तो ओठाला लावला. मला आता गुरूचं स्मरण करावं असंसुद्धा वाटलं नाही! कारण मी कोण होतो ते माझं मलाच माहीत नव्हतं. प्रकाशाच्या किरणाला गुरू कोण आणि आशीर्वाद कसला?

ते कुत्रं माझ्या मागं बांधण्यात आलं, ते भुंकावं म्हणून एक सेवक त्याला तीक्ष्ण भाल्याच्या पात्यानं दुरून टोचणार होता, पण टोचणारा, कुत्रं, भाला यांपैकी काहीच विचारात घ्यायचं नाही. आता फक्त आवाजाचा लक्षयभेद! फुटून कानावर आदळणाऱ्या ध्वनिलहरींवर मन केंद्रित!

माझ्या सर्वांगाचे कान झाले. सावधानतेचा संकेत मला मिळाला. माझ्या कानांचे डोळे आवाजाचं लक्षय शोधू लागले. आता कानांवर पडेल तो आवाजाचा पहिलाच स्पंद झटक्यात टिपायचा होता. सगळीकडे स्मशानशांतता पसरली. श्वाससुद्धा रोखले होते. एकमेकांच्या हृदयांची धडधड ऐकू यावी अशी नीरव, निश्चल शांतता होती. आवाजाचा एक मंजूळ स्वर माझ्या कानांवर आदळला. बाण धनुष्यातून सुटला नाही तोच कुत्र्याचं भुंकणं ऐकू आलं. सगळं एका क्षणात होऊन गेलं. बाण धनुष्यातून सुटला होता. मी डोळ्यांवरचं वस्त्र अधीरपणे बाजूला सारून कुत्र्याकडे पाहिलं. ते अजूनही भुंकत होतं. तो बाण कुत्र्याच्या तोंडात बसला नव्हता! माझा लक्षयवेध चुकला होता! जीवन गरगरलं होतं!

अंगातील तो तेजाचा झोत कुठंतरी निघून गेला. मला एकदम थकल्या – थकल्यासारखं वाटू लागलं. ग्लानी येऊ लागली. सगळीकडे घोषणांचा पाऊस पडू लागला. "पांडुपुत्र अर्जुनाचाऽऽऽ विजय असो! गुरुवर्य द्रोणांचाऽऽ विजय असो!" मर्मभेद करणाऱ्या लक्ष – लक्ष ओठांतून स्फुरलेल्या लक्ष – लक्ष घोषणा!

असं कसं झालं? आवाजाचा लक्षयभेद चुकला कसा? तो मंजूळ आवाज कसला? कुत्र्यानं आपला स्वर बदलला की काय? मग माझा बाण कुठं गेला? असंख्य प्रश्नांच्या विजा माझ्या मनाच्या कोंदटलेल्या ढगाळ आकाशात चमकू लागल्या. पायांखालचा चौथरा सरकतो आहे, असं वाटू लागलं. मी कुठं होतो? पृथ्वीवर? स्वर्गात? की नरकात? पांडुपुत्र अर्जुनाचा जयजयकार करणारी ही नरकातील भुतावळ आहे की काय? सगळा आखाडा माझ्याभोवती गोल गरगर फिरू लागला. मस्तक मांडीत खुपसत मटकन खालीच बसलो. माझ्या पायात ती नीलकमलांची माला होती. मानाची माला. तिचे हजारो तुकडे करून ते स्वैर फेकून द्यावेत म्हणून ती मी उचलली. इतक्यात गुरू द्रोण आणि अर्जुन चौथऱ्यावर आले! कसातरी उठून उभा राहिलो. माझ्या हातातील माला गुरू द्रोणांनी आपल्या हातात घेतली! अर्जुनाचं अभिनंदन करण्यासाठी! भीम, युधिष्ठिर सगळे चौथऱ्याकडे ओरडत धावले.

कर्ण योद्धयांच्या राज्यातील भिकारी ठरला! कर्ण समर्थांच्या जगातील कीटक ठरला! कारण त्याच्याजवळ आवाजाचा लक्षयभेद नाही. जगाला थरारून सोडणारा तो अचूक बाण त्याच्याजवळ नाही, हा बाण ज्याच्याजवळ त्यालाच जगात किंमत. जग हे सामर्थ्याची पूजा करतं. ते सामर्थ्याचं पाय धुतं. जगात मानानं मिरवायचं असेल तर – तर हा आवाजाचा लक्षयभेद शिकलाच पाहिजे. जिथं असेल तिथं जाऊन त्यानं ही विद्या घेतली पाहिजे. तरच त्याला जग मानेल – अन्यथा तो उपेक्षितच राहील. वंचितच राहील. मी चौथऱ्यावरून तोंडघशी उडी मारली असती तरी माझं कपाळ फुटलं नसतं. माझं मन असाहाय्यपणे आक्रंदन करू लागलं. काय करू? काय करू? चौथऱ्यावरून खाली सरळ तोंडावर उडी मारावी आणि कपाळमोक्ष करून घ्यावा असं मला पुन:पुन्हा वाटलं, पण वास्तवता ही क्रूर असते. कधी – कधी ती माणसाला सरळ मरूसुद्धा देत नाही, कारण माझं शरीर अभेद्य होतं! या धुंद मानवांच्या राज्यात या कर्णाला आता कोण सावरणार? एकटा त्याचा भाऊ शोण! माझे डोळे गरगरत शोणाला शोधू लागले. महाद्वारापाशी उभा राहून तो अक्षरश: उत्तरीयानं आपले डोळे पुसत होता! त्याच्या भावाचा हा जीवघेणा मर्मभेदी पराभव त्याच्या भावनाप्रधान हृदयाचे शतश: तुकडे करीत होता! त्याची समजूत घातली पाहिजे. मी सावरून चौथऱ्याच्या पायदंड्या उतरू लागलो.

गुरू द्रोणांनी नीलकमलांची माला अर्जुनाच्या गळ्यात घालण्यासाठी हात उंचावला. सगळीकडे एकच कल्लोळ झाला. 'पांडुपुत्र अर्जुनाचाऽऽऽ विजय असोऽ!', 'गुरुवर्य द्रोणांचाऽऽऽ विजय असो' इतक्यात महाराज धृतराष्ट्रांच्या हातातील राजदंड आपल्या हातात घेऊन तो आकाशात उंचावीत पितामह भीष्म थरथरत्या स्वरात मोठ्यानं ओरडले, "थांबा!" पण त्या गदारोळात त्यांचा आवाज कुणालाही स्पष्टपणे ऐकू गेला नाही. गुरू द्रोणांनी नीलकमलांची माला अर्जुनाच्या गळ्यात घातली! टाळ्यांचा प्रचंड कडकडाट झाला. एक – एक जण चौथरा उतरू लागला. मी जिवंत आहे की मृत ते माझं मलाच नीट कळेना एवढा संभ्रम माझ्याभोवती दाटला होता!

पितामह भीष्म थरथर कापत होते. त्यांच्या हातातील कुरुकुलाचा सोनेरी राजदंड डळमळू लागला. हातातील राजदंड उंच – उंच उचलून एकसारखे हात हालवीत ते नगरजनांना संकेत करू लागले. राजकुमार अर्जुनानं ते बघितलं. त्यानं हात उंच करून सर्वांना थांबण्याचा निकराचा संकेत करताच सगळा आखाडा शांत झाला. पितामह भीष्मांचा कंपित; पण कणीमय धारदार आवाज ती शांतता चिरू लागला. "गुरू द्रोण आणि हस्तिनापुरातल्या नगरवासियांनो, मी गंगापुत्र ज्येष्ठ कौरव भीष्म सांगतो आहे, अर्जुन आजचा सर्वश्रेष्ठ धनुर्धर नाही!"

सगळ्यांची हृदयं पुन्हा धडकू लागली! सगळ्या आखाड्यावर कुतूहलाचं किचकट जाळं पसरलं. नगरजन कुजबुज करू लागले. कोणीतरी मोठ्यानं ओरडलं, "मग पितामह, कोण आहे सर्वश्रेष्ठ धनुर्धर? तुम्हीच सांगा!"

"कर्ण!" पितामहांचा घनगंभीर आवाज सगळ्यांच्या कानात बाणासारखा घुसला.

मी आणि शोण महाद्वारातून बाहेर पडणार होतो, पण तो आवाज ऐकताच आम्ही परतलो!

"तो कसा?" गुरू द्रोणांनी त्यांना लागलीच विचारलं.

"गुरू द्रोण, अर्जुनाच्या प्रेमानं तुम्हाला आंधळं बनविलं आहे! नुसतंच आंधळं

नाही तर बहिरंसुद्धा! प्रेम – मग ते वाजवीपेक्षा अधिक असेल तर तोही दुर्गणच!''

''सांगा पितामह, काय झालं?'' चारीकडून आवाज उठला.

''आवाजाचा लक्षयभेद जाणण्याची पात्रता या आखाड्यात केवळ चारच लोकांत आहे. एक कर्ण, दुसरे द्रोण, तिसरा अर्जुन आणि – आणि चौथा मी!'' हात उंचावून पितामह म्हणाले.

आता आखाड्यात एकट्या पितामह भीष्मांकडे लोक पाहू लागले. कुरुकुलाचं ते निखळ सत्य आपल्या धारदार जिभेनं सगळ्या लोकांचे लचके तोडू लागले. दाढीचे पांढरेशुभ्र केस हलू लागले.

''या चौघांपैकी कर्ण अर्जुनाप्रमाणं स्पर्धक होता. त्याला डोळ्यांवरच्या वस्त्रांमुळे त्याचे बाण स्वत:ला पाहता आले नाहीत. राहिलो अर्जुन, मी आणि द्रोण, पण अर्जुनाचं आणि द्रोणांचं लक्ष केवळ कुत्र्याच्या भुंकण्याकडे राहिलं. त्यांनी दुसरं काहीच ऐकलं नाही, पण मी सांगतो. कुत्र्याच्या भुंकण्यापूर्वी एक मंजूळ आवाज आला होता. त्या वीर कर्णानं तो आवाज अचूक टिपला आहे!! म्हणून कुरुकुलाचं भूषण असलेली ती माला आज कर्णाच्या गळ्यात पडायला पाहिजे होती.''

''कसला आवाज पितामह?'' सगळीकडून प्रश्नांचा वर्षाव झाला. ''कसला आवाज? कसला आवाज?''

मला गंगेकाठी पहिल्या प्रथम पितामह भीष्मांची गाठ पडली होती तो प्रसंग आठवला. त्या वेळी ते म्हणाले होते, ''या गंगेवर माझ्यापूर्वी येणारा तू पहिलाच माणूस आहेस.'' माझं मन भरून आलं. ते मला आतून सांगू लागलं, ''पितामह, या हस्तिनापुरात मी पाहिलेले तुम्हीच पहिले निगर्वी आणि सत्यवचनी पुरुषश्रेष्ठ आहात! धन्य आहे तुमच्या सत्यनिष्ठेची!''

आपला आवाज स्थिर करून तो उंचावीत ते म्हणाले,

''कुत्र्याच्या भुंकण्यापूर्वी समोरच्या तमाल वृक्षावर एक पत्ररथ पक्षीण आपल्या पिलाच्या चोचीत चारा घालून चिवचिवली होती. कर्णानं तो आवाज कानावर पडताच क्षणात अचूक टिपला आहे! अजूनही समोरच्या वृक्षावर ती पक्षीण भेदरून आपल्या तोंडात तसाच तो सूची बाण घेऊन बसलेली मला इथून स्पष्ट दिसते आहे! हा लक्षयभेद अर्जुनापेक्षा कितीतरी सरस आणि श्रेष्ठ आहे. कर्ण आजचा सर्वश्रेष्ठ वीर आहे!'' एका तमालाच्या झाडाकडे त्यांनी बोट केलं. त्यांच्या बोटाच्या दिशेनं हजारो डोळे सरसर धावले!

एक उत्सुक पारधी त्या झाडाकडे धावला. आरोळ्यांच्या आवाजानं गांगरून गेलेल्या एका पक्षिणीला त्यानं कौशल्यानं पकडून आणलं. ती पक्षीण त्यानं पितामहांच्या हातात दिली. त्यांनी तिच्या चोचीत अडकलेला माझा सूची बाण उपसला! परत तिनं तोच नाजूक मंजूळ चिवचिवाट केला. मला तो ऐकताच सर्व प्रकाराची संगती लागली. तिला त्यांनी आकाशात सोडून दिलं. चिवचिवत ती आपल्या घरट्याकडे, फडफड करीत निघून गेली. सगळीकडे टाळ्यांचा कडकडाट झाला. शोणानं महाद्वारात मला आनंदानं कडकडून मिठी मारली. सगळीकडे घोषणांचा पाऊस पडला. ''वीर कर्णाचाऽऽऽ विजय असोऽ! पितामह भीष्मांचाऽऽऽ विजय असोऽ!'' वातावरणातला कणन्कण गंगेतल्या जलबिंदूसारखा थुईथुई नाचू लागला. कुठल्यातरी अशोकावर एक कोकीळ तानांवर ताना घेऊ लागला! माझ्या मनात अनेक परस्परविरोधी भावनांचा संमिश्र गोंधळ झाला.

पितामह भीष्मांबद्दलच्या आदरानं क्षणात मन भरून येऊ लागलं, तर क्षणात घाईघाईनं अर्जुनाच्या गळ्यात अजिंक्यपदाची, मानाची माला घालणाऱ्या द्रोणांच्या तिरस्कारानं ते पेटू लागलं. क्षणात माझ्यासाठी डोळे पुसणाऱ्या माझ्या प्रेमळ भावाच्या निर्भेळ प्रेमानं माझं मन गहिवरू लागलं, तर क्षणात स्वत:च्या कंठात ती माला अडकविणाऱ्या राजपुत्र अर्जुनावरच्या संतापानं ते थरथरू लागलं. मन म्हणजे रंग बदलणारा सरडा असतो की काय नकळे! अशा विविध भावनांच्या वेळी एकच भावना श्रेष्ठ ठरते आणि ती म्हणजे क्रोधाची. क्रोध! क्रोध हा अग्नीसारखा असतो. अपसमजाचा वारा त्याला लागला तर त्याचा वणवा होतो. त्या वणव्यात इतर सर्व कोमल भावनांची जळून राख होते आणि हा वणवा एकदम पेटला की, आवरत नसतो. माझे ओठ रागानं थरथरू लागले. कानातील कुंडलं लाल झाली. मी सर्वश्रेष्ठ असतानाही अर्जुनाच्या गळ्यात नीलकमलांची माला का? पितामह भीष्मांसारख्या सत्यवचनी आणि नि:पक्ष पंचाच्या निर्णयाला इथं काय मान आहे?

माझ्या कानांवर शब्दांचे आघात पडू लागले.

''आज आम्ही धन्य झालो. कर्णासारखा धनुर्धर निखिल आर्यावर्तात मिळणार नाही, पण बिचाऱ्याचा यथोचित सत्कार झाला नाही!'' समाज तरी किती ढोंगी असतो. तो एकदा एकाला तर एकदा भलत्यालाच शिरावर घेऊन नाचायला तयार असतो.

''आज आमच्या डोळ्यांचं पारणं फिटलं. असला लक्षयभेद आम्ही पाहिला नाही आणि ऐकलाही नाही, पण ती माला कर्णाच्या गळ्यात पडायला हवी होती!''

त्यांची पोकळ सहानुभूती माझी लाही – लाही करू लागली.

अंगातील रक्त जोरात फिरत मला गर्जून सांगू लागलं, 'जगाच्या सहानुभूतीवर जगण्यासाठी तुझा जन्म नाही कर्णा! ऊठ आणि स्वत:चा निखळ विजय सिद्ध कर!'

खांद्यावरचं उत्तरीय मी परत शोणाच्या अंगावर फेकलं आणि चौथऱ्याच्या दिशेनं नगरजनांच्या जमावात घुसलो. आता आखाड्याला यात्रेचं स्वरूप आलं. न्याय – अन्याय, सत्य – असत्य काय हे आखाड्यातील बऱ्याच लोकांना समजेना. मी हात उंचावून थांबण्याचा संकेत करताच माझ्यावरच्या प्रेमानं भारावलेला तो अफाट जनसमुदाय खाली बसला. मी काय म्हणतो ते ऐकण्यासाठी हजारो कान टवकारले गेले. हात उंचावून उच्च स्वरात मी म्हणालो, ''माझ्या गळ्यात नीलकमलांची माला पडली नाही म्हणून माझा विजय कलंकित आहे असं जर अजूनही कुणाला वाटत असेल तर मी... तर मी कर्ण, हस्तिनापुरातल्या चौथऱ्यावर उभा राहून पांडुपुत्र अर्जुनाला द्वंद्वासाठी स्पष्ट आव्हान देतो आहे! द्वंद्वयुद्धच ठरवील की सर्वश्रेष्ठ कोण?''

मला कुणाचीही भिक्षा नको होती.

सगळे लोक परत उठले. त्यांनी घोषणा केल्या, ''बरोबर आहे. बरोबर आहे.'' सगळ्या लोकांचे कान महाराज धृतराष्ट्र काय निर्णय देतात इकडे लागले. सगळीकडे शांतता पसरली. इतक्यात कृपाचार्य मध्येच आपल्या आसनावरून उठले आणि तरातरा चालत चौथऱ्यावर आले. माझ्यावर एक तिरस्काराचा भेदक कटाक्ष टाकून महाराजांना अभिवादन करून ते म्हणाले, ''महाराज, मी कर्णाच्या पथकाचा गुरुदेव कृपाचार्य बोलतो आहे. कर्ण हा तसा माझा शिष्य आहे, पण मला त्याचं कुल माहीत नाही! त्यानंही कधी ते कुणाला सांगितलं नाही. राजपुत्र अर्जुन हा क्षत्रिय कुलोत्पन्न आहे. युद्धशास्त्राच्या आणि धर्माच्या नीतीप्रमाणं केवळ समान कुलातील योद्ध्यांतच द्वंद्व खेळलं जाऊ

शकतं!! या हस्तिनापुरातल्या सर्व नगरजनांना कर्णानं प्रथम आपल्या त्या दिव्य, तेजस्वी कुलाचं नाव सांगावं म्हणजे राजपुत्र अर्जुन त्याच्याशी केव्हाही द्वंद्व खेळेल, कारण द्वंद्वाचा निकाल एकच असतो विजय किंवा मरण!''

त्यांचे ते शब्द भाल्याच्या टोकासारखे मला विद्ध करू लागले. कोणत्या कुलाचं नाव मी त्या हस्तिनापुरातल्या सामर्थ्याची परीक्षा लावणाऱ्या चौथऱ्यावर उभा राहून सांगू? मी एका सारथ्याचा पुत्र आहे, असं या सोमवंशातल्या तेजस्वी पुरुषश्रेष्ठांच्या समोर कसं सांगू? क्षणभर माझं मन विचाराच्या वादळात सापडलं. मान खाली घालून विचार करू लागलो. मनात दोन प्रबळ विचारांचं द्वंद्व सुरू झालं. एक मन ओरडून म्हणत होतं, 'सांग कर्णा, तुझी उघडी छाती फुगवून, ताठपणे सांग की, मी अधिरथबाबा आणि राधामाता यांचा पुत्र – सूतपुत्र – कर्ण आहे! मी शोणाचा भाऊ कर्ण आहे. मी सारथी कर्ण आहे!' पण दुसरं मन म्हणत होतं, 'या सगळ्या कोत्या मनाच्या माणसांत तुझ्या कुलाचं कोणत्या शब्दांत आता स्वागत होईल? सगळे जण तुच्छतेनं म्हणतील, 'काय सारथ्याचा पुत्र? मग इथं कशाला आला? घोड्याच्या शाळेत पाठवा त्याला.''

माझ्या मनाचं रोपटं विचारांच्या वादळी वाऱ्यात इकडे – तिकडे डोलू लागलं. पावसानं झोडपलेल्या, देठ मोडलेल्या कमलाच्या फुलासारखी माझी मान आपोआपच खाली झाली. कोणीतरी चौथऱ्यावर येत होतं. मी अधीरतेनं मान उंचावून पाहिलं. तो युवराज दुर्योधन होता! तीच ऐटदार चाल! तेच तरतरीत नाक! तेच भेदक घारे डोळे! तेच घरंगळणाऱ्या उत्तरीयाला दिलेले दमदार झटके! आसुडासारखा कडकडीत आवाज काढीत, हाताची भक्कम मूठ वळून, आपले घारे डोळे सर्वांवर गरगर फिरवीत मंडलं घेत तो म्हणाला, ''गुरुदेव कृपाचार्यांनी ही पराक्रमाची क्रूर चेष्टा चालवली आहे. क्षत्रिय! क्षत्रिय म्हणून या कर्णात काय कमी आहे? धर्मशास्त्राप्रमाणं क्षत्रिय कुणाला म्हणतात? ज्याच्या दंडात प्रचंड सामर्थ्य असतं त्याला, जो स्वत:चं असं राज्य धारण करतो त्याला आणि जो राजकुलात जन्माला येतो त्याला. या कर्णानं आपलं सामर्थ्य या ठिकाणी प्रकट करून आपण क्षत्रिय आहोत हे स्पष्ट सिद्ध केलं. तेवढ्यानंही कुणाचं समाधान होणार नसेल तर मी दुर्योधन आता याच ठिकाणी हे सिद्ध करतो की, कर्ण हा एक क्षत्रियच आहे, पण हे द्वंद्व झालंच पाहिजे! मी कुरुश्रेष्ठ युवराज दुर्योधन घोषित करतो की, आत्ताच आणि या चौथऱ्यावर सर्वांसमक्ष मी या वीर, तेजस्वी आणि पराक्रमी कर्णाला अंगदेशचा अभिषिक्त राजा करणार आहे!! आजपर्यंत कौरवांच्या अधिपत्याखाली मगध देशाजवळ असलेला अंगदेश आता या क्षणापासून कर्णाचा होईल! कर्ण अंगराज होईल!''

त्यानं आपली पुष्ट मान गरगर फिरविली आणि सर्वांचा प्रतिसाद घेतला. सगळीकडे शांतता होती. आपल्या वाकड्या आणि जाड भुवया जास्तच वाकड्या करीत त्यानं सेवकाला हाकारण्यासाठी टाळी वाजवली. एक म्हणता दहा सेवक चौथऱ्यावर गोळा झाले. त्यानं सर्वांना तोंडाला येईल त्या आज्ञा दिल्या, ''सिंहासन आणा! अभिषेकाचं जल आणा! पुरोहितांना बोलावून घ्या!''

थोड्याच वेळात चौथऱ्यावर एक सोन्याचं सिंहासन आलं. पाठोपाठ अभिषेकाचं जल आणि राजवस्त्रं आली. त्यांच्यावर एक सोनेरी मुकुट आणि रुपेरी खड्ग होतं. पाठोपाठ दोन वृद्ध ब्राह्मण आले. सगळ्या लोकांना फुलं वाटण्यात आली. सगळीकडे चंदन, कस्तुरी तेलांचा सुगंध दरवळू लागला. दुंदुभी आणि नगारे वाजू लागले. सगळ्या

आखाड्याला मंगलकार्याची कलाटणी मिळाली! काय घडतंय तेच कळेना!

लोक कुजबुजू लागले, "असला राज्याभिषेक महाराज मनूपासून महाराज धृतराष्ट्रांपर्यंत या हस्तिनापुरात झाल्याचं कधीच ऐकिवात नाही."

"ठीक झालं. त्या वीर पुरुषाचा आता योग्य सत्कार चालला आहे."

"पण या राज्याभिषेकानंतर काय? द्वंद्वात काय होणार?"

सर्व तयारी होताच युवराज दुर्योधनानं माझ्या दंडाला धरून मला त्या सिंहासनवर बसविलं. वृद्ध ब्राह्मणांनी सुस्वर सुरात पवित्र मंत्र म्हणावयास सुरुवात केली. थोड्या वेळापूर्वी तिथं आरोळ्या, टाळ्या, संवाद, प्रतिसंवाद चालले होते; तिथंच आता मंत्रांचे स्वर घुमू लागले. माझ्या मस्तकावर आर्यावर्तातील गंगा, यमुना, सरस्वती, सिंधू, गोमती अशा सर्व नद्यांतील पवित्र जल सिंचलं जाऊ लागलं. त्या जलात माझं मस्तक भिजत होतं, तर ज्येष्ठ कौरव दुर्योधनाच्या निर्भेळ प्रेमाच्या जलगंगेत माझं मन भिजत होतं. किती विशाल नि तत्पर होतं त्याचं मन! आज जर तो पुढं झाला नसता तर! त्या नुसत्या विचारानंच माझं अंग शहारलं. कर्णाच्या जीवनात मोजक्याच व्यक्तींवर त्यानं प्रेम केलं होतं. एक त्याचे आई – बाप आणि भाऊ, दुसरा अश्वत्थामा, तिसरे पितामह भीष्म आणि आता निर्भय दुर्योधन! पण या सर्वांपेक्षा दुर्योधन वेगळा आहे, कारण त्यानं अधिक्षेपाच्या गर्तेत पडणाऱ्या मला स्वत:चा हात देऊन सावरलं. एका सामान्य माणसाला त्यानं क्षणात राजा केलं. या कर्णाच्या मनाचा एक कप्पा इथून पुढं एकट्या ज्येष्ठ कौरव दुर्योधनासाठीच राहील; मी मनोमन निर्धार केला – सिंहासनावर बसूनच!

त्यानं एक सोनेरी मुकुट माझ्या सोनेरी केसांवर बसविला. खांद्यांवर राजवस्त्रं टाकली आणि हातात रुपेरी खड्ग घेऊन ते खूप वर उंचावून गोल फिरवीत तो मोठ्यानं ओरडला, "अंगराज कर्णाचाऽऽऽ!" सर्वांनी त्याला प्रचंड आवाज करून प्रतिसाद दिला, "विजय असोऽऽऽ!"

माझं मन दुर्योधनाच्या त्या अकल्पित धाडसानं भारून गेलं. त्याच्या घारसट डोळ्यांत एक वेगळाच आनंद चमकत होता. त्याला कडकडून मिठी मारावी, असं मला वाटू लागलं. सगळे नगरजन अंगराज कर्णाचा जयजयकार करीत होते. आज सारथ्याचा मुलगा सम्राट झाला! सहा वर्षांत जे गुरू द्रोणांनी केलं नाही, कृपाचार्यांनी केलं नाही, पुढं आयुष्यभर कधीही केलं नसतं, ते आज एका पळभरात दुर्योधनानं केलं होतं. गदावीर दुर्योधन! युवराज दुर्योधन! अन्यायाला ठोकरणारा दुर्योधन! पराक्रमाची परीक्षा करणारा दुर्योधन! छे, मित्र दुर्योधन! प्राणप्रिय साथी दुर्योधन! माझ्या डोळ्यांत अतीव कृतज्ञतेचे दोन अश्रू उभे राहिले. ते जणू त्याला सांगत होते, 'सुहृद दुर्योधना, आज मातीत पडलेलं कमलपुष्प तू राजमुकुटात बसविलंस. धुळीतला हिरा तू कोंदणात बसविलास. अपमानाच्या प्रसंगी हात दिलास. आता माझं सगळं जीवन तुझ्यासाठी आहे. एकट्या तुझ्यासाठी!'

नगरजनांनी चोहोबाजूंनी माझ्यावर फुलं उधळली. माझं मन त्यांच्या प्रेमानं गुदमरून गेलं. आता द्वंद्व झालं आणि त्यात मी कामी आलो तरी काय बिघडणार होतं? यापेक्षा मानाचा मृत्यू दुसरा कुठला असणार? सगळ्यांनी फुलं उधळलेला मृत्यू! सिंहासनावरचा मृत्यू! आज या मित्रवर दुर्योधनासाठी मी प्राणपणानं द्वंद्व खेळीन. माझ्या सहा वर्षांच्या घनघोर अधिक्षेपाचं मूल्यही चुकतं करीन! आज मी रात्रंदिवस

केलेल्या द्वंद्वाच्या सरावाची परीक्षा लागेल. आज माझ्या बाहुकंटकाची परीक्षा लागेल! अर्जुन गतप्राण होईल!

या वेळी आणखी एका आशीर्वादाची मला आवश्यकता होती. माझ्या आईच्या आशीर्वादाची. आज ती या आखाड्यात असती तर! माझी खात्री आहे, धावत येऊन तिनं या वेळी मला आपल्या छातीशी कवटाळलं असतं. सर्वांसमक्ष तिनं लहानपणी घेतले तसे माझ्या कपाळाचे आणि कुंडलांचे पटापट मुके घेतले असते! कुठल्या आईला आपल्या सामान्य मुलाचा सम्राट झालेला पाहिल्यावर आपला आनंद आवरता येईल? पण – पण आज ती इथं नव्हती. एकटे बाबा हस्तिनापुरात होते, पण तेही त्या जनसमुदायात कुठं आहेत दिसत नव्हते.

माझे डोळे सगळ्या आखाड्याभर फिरू लागले. दूर – दूर आखाड्याच्या महाद्वारात बाबा उभे होते. किती थकले होते ते! सहा वर्षांत त्यांचं सगळं मस्तक पांढरं झालं होतं. पाठ वाकली होती. मान वार्धक्यानं थरथरत होती. हातातील काठीच्या आधारानं ते कसेतरी उभे होते. आपल्या मुलाच्या जयजयकाराचे ध्वनी ऐकून त्यांना काय वाटलं असेल? इथं येण्यासाठी त्यांचं मन किती अधीर झालं असेल! कोण त्यांना सांभाळून इथपर्यंत आणणार?

मी शोणाकडे बघितलं. माझ्या डोळ्यांतले भाव त्यानं अचूक वाचले असावेत. झटपट तो चौथऱ्याच्या पायदंड्या उतरत जमावात दिसेनासा झाला. दोन्ही हातांनी लोकांना दूर सारीत तो बाबांच्या जवळ गेला. एका हातानं त्यांना धरून दुसऱ्या हातानं लोकांना दूर सारीत तो आमच्याकडे येऊ लागला. मी उठून उभा राहिलो. लोकांना वाटलं मी आता द्वंद्वाची घोषणा करणार, पण माझं मन पित्याला भेटायला आतुर झालं होतं. मला त्यांचा आशीर्वाद हवा होता.

थोड्याच वेळात शोण त्यांना घेऊन सरळ चौथऱ्यावर आला.

माझ्या डोक्यावर सोनेरी मुकुट पाहताच त्यांची मान जास्तच थरथरू लागली. हातातील काठी लडबडू लागली. त्यांचे डोळे भरून आले. मी वाकून माझं मुकुटानं मंडित झालेलं मस्तक त्यांच्या चरणांवर ठेवलं, त्यांच्या डोळ्यांतून ओघळलेले दोन अश्रुबिंदू माझ्या मस्तकावर पडले. मला धन्य वाटलं. ज्या मस्तकावर गंगा, यमुना, सरस्वती यांचं पवित्र असं अभिषेकाचं जल पडलं होतं त्याच मस्तकावर माझ्या पित्याचे मायेनं भरलेले दोन अश्रुबिंदू पडले होते. आता या अंगराज कर्णाचा अभिषेक खऱ्या अर्थानं पुरा झाला होता! या दोन अश्रुबिंदूपेक्षा अधिक पवित्र जल कोणतं असणार? माझा कंठ, त्यांनी मजसाठी घेतलेल्या अपार कष्टांच्या स्मृतीनं दाटून आला.

मला वर उठवीत घोगऱ्या आवाजात ते म्हणाले, ‘‘कर्णा!’’

माझ्याही तोंडातून तितक्याच सहजपणानं उद्गार बाहेर पडले, ‘‘बाबा!’’

त्यांनी मला कडकडून मिठी मारली. त्यांच्या हातातील काठी गळून खाली पडली! सगळा आखाडा श्वास रोखून ते आलिंगन बघू लागला. क्षणभर चौथऱ्यावर काय चाललं आहे ते कुणालाच कळेना! सगळीकडे द्वंद्व पाहायला उत्सुक झालेली शांतता होती.

मी बाबांना हाक मारल्याचं आणि त्यांच्या पाया पडल्याचं कृपाचार्यांनी पाहिलं होतं. झटकन पुढे होत हात उंचावून ते ओरडले, ‘‘कर्ण हा एक सारथ्याचा पुत्र आहे! त्याचं आणि राजपुत्र अर्जुनाचं द्वंद्व कधीच होणार नाही. महाराजांचा सारथी अधिरथ

याचा कर्ण हा पुत्र आहे!'' त्यांची ती घोषणा ऐकून राजकुमारांच्या बैठकीत असलेला भीम आपलं अवजड शरीर आवरीत उठला. हाताची बोटं तिरस्कारानं माझ्या दिशेनं झाडत तो म्हणाला, ''काय सारथ्याचा पुत्र? मग तो या वीरांच्या आखाड्यात आलाच कसा? त्याला म्हणावं आपल्या कुळाला शोभणारा प्रतोद हातात घे! जा, इथून जा! अश्वशालेत जाऊन घोड्यांना खरारा करून त्यांची लीद काढ! इथं या कुरुकुलाच्या पराक्रमी चौथऱ्यावर तो कशाला चढला आहे? कसं धैर्य झालं त्याचं?''

सगळे राजपुत्र कुत्सितपणानं खदखदून हसले. सगळीकडे गोंधळ झाला. जो तो एकमेकांच्या कानात कुजबुजू लागला, 'सारथ्याचा पुत्र! सूतपुत्र!' माझं मन तडफडू लागलं. आक्रंदू लागलं – सिंहासनावर!

त्या शब्दांचे एकापेक्षा एक वरचढ आवाज माझ्या कानात तापलेल्या इंगळासारखे घुसू लागले. 'सारथ्याचा पुत्र! सूतपुत्र!'

दहा–वीस–शंभर–सहस्र मुखांतून शब्दांचे बाण – लिप्तबाण बाहेर पडू लागले. 'सारथ्याचा पुत्र! सूतपुत्र!'

आज हस्तिनापुरातील सत्यासत्याची चाड खरोखरीच संपली काय? आज हस्तिनापुरातील न्यायान्यायाची जाणीव बुजली काय? या हस्तिनापुरात या कर्णाच्या भग्न हृदयाचा हा आक्रोश ऐकण्याइतकी एकाच्याही अंगात शक्ती नाही काय? या कर्णाचं तडफडणारं मन ओळखण्याएवढी एकातही शक्ती नाही काय? महाराज मनूंचं हे हस्तिनापूर, पराक्रमी नहुषांचं हस्तिनापूर, दिग्विजयी ययातींचं हस्तिनापूर, शंतनू, दुष्यंत, भरत यांचं हस्तिनापूर – आणि अजूनही ज्यांची स्मृती हे नगरजन विसरले नाहीत त्या नुकत्याच मावळलेल्या कुरूंचं हस्तिनापूर!! आज थंड आणि लाचार का? आज अन्यायाला ठोकरून काढण्यासाठी ते धैर्यानं छातीठोकपणे का उभं राहत नाही? या कर्णावरचा अन्याय! पराक्रमाच्या या चौथऱ्यावर एका वीराचा अपमान! दांभिकतेच्या यज्ञात असत्याच्या वेदीवर सत्याचा इथं आज निर्घृण बळी क्षणाक्षणाला दिला जातो आहे आणि धर्माची कास धरू पाहणारे विदुर, महाराज धृतराष्ट्र, पितामह भीष्म तो थंडपणानं सहन करताहेत! कधी बोलणार ते? काय बोलणार ते? ते गप्प का? त्यांच्यावरचा सगळा आदराचा भाव क्षणभर बाजूला ठेवून मी म्हणेन की, केवळ सोनेरी मुकुट घालून उंची आसनं पटकावण्याकरिताच का तुमचा जन्म आहे? या हस्तिनापुरातील मार्गावरून ऐटदार आणि वेगवान घोड्यांचे प्रशस्त रथ उडविण्याकरिताच का तुमचा जन्म आहे? आज तुम्ही गप्प का? या कर्णावरचा हा अन्याय कंठरवानं का थांबवत नाही? प्रजेनं राजाकडे अपेक्षेनं बघायचं नाही तर मग कुणाकडे? मी डोळ्यांत प्राण आणून राजकुलातील लोकांच्याकडे पुन:पुन्हा पाहत होतो! ते गप्प होते! चोहोबाजूंनी आवाज येत होता, 'सारथ्याचा पुत्र! सूतपुत्र!' नैऋत्येकडून तर मुठी वळून धुंद लोक ओरडत होते, 'सारथ्याचा पुत्र! घोड्याचा खरारा!'

जग तरी किती वेडे असतं! क्षणापूर्वीच ज्या कर्णाला त्यांनी गौरविला, त्याचा उंच स्वरात जयजयकार केला आणि आता – आता तेच जग त्याच्या अंगावर धावून येत होतं! माझं डोकं गरगरू लागलं. मस्तकावरचा मुकुट हस्तिनापुराच्या धुळीत फेकून द्यावा असं मला वाटू लागलं! कुंडलांचे बोळे कानात कोंबून दोन्ही हातांनी कान झाकून मी असाहाय्यपणे मान वर केली. आकाशात गुरुदेव उभे होते! माझं चोहोकडून लाथाडलेलं मन त्यांच्या किरणांची असंख्य बोटं धरून ती गदागदा हलवीत त्यांना कळवळून विचारू

लागलं, 'गुरुदेव, तुम्ही वर जळत असताना माझी ही आज घोर विटंबना चालली आहे. कशाला मी सारथी झालो? सारथी झालो हा काय माझा दोष आहे? जन्म हा जन्माला येणाऱ्याच्या इच्छेप्रमाणं कधीतरी मिळाला आहे काय? या हस्तिनापुरातले हे नगरजन गुरूला साक्षी ठेवून आज शिष्याची निर्भर्त्सना करताहेत. काय करू मी? सर्वांनी लाथाडलेला मी कुठं जाऊ?' मी लज्जेनं माझं तोंड ओंजळीत झाकून घेतलं. मरणप्राय यातनेनं! चौथरा दुभंगून पृथ्वी मला पोटात घेईल तर बरं होईल असं वाटू लागलं.

कुठूनतरी मोठा गलका झाला म्हणून मी मान वर केली. सगळे सेवक राजस्त्रियांच्या डेऱ्याकडे धावत होते. कुणीतरी एकटा सेवक धापा टाकत चौथऱ्यावर आला. त्यानं श्वास रोखत नीलकमलांची माला घातलेल्या निळ्या अर्जुनाला कानात सांगितलं, "पांडुपुत्रा, राजमाता कुंतीदेवी मूर्च्छित झाल्या!" गळ्यातली माला फेकून देऊन अर्जुन चौथरा उतरून त्या डेऱ्याकडे धावू लागला. लोक तरीही ओरडत होते, 'सारथ्याचा पुत्र! सारथ्याचा पुत्र!'

डोक्यावरचा मुकुट फेकून देऊन बाबांना घेऊन तेथून चालतं व्हावं म्हणून मी मुकुटाला हात लावला. तेवढ्यात माझ्या पाठीवरून कुणाचातरी हात फिरला. तो दुर्योधन होता. डावा हात माझ्या पाठीवरून फिरवीत उजव्या हाताची भक्कम मूठ वळून तो सर्वांना म्हणाला, "लक्षात ठेवा, कर्ण हा अंगराज आहे. राजपुत्र दुर्योधनाचा मित्र आहे. त्याला सारथ्याचा पुत्र म्हणून हिणवणाऱ्यांची उन्मत्त, गर्विष्ठ मस्तकं मी पायाखाली रगडून टाकीन, 'कर्ण' हा 'कर्ण' नाही, 'अंगराज कर्ण' आहे. युवराज दुर्योधनाचा मित्र आहे." त्याचे घारे डोळे आग पाखडू लागले. परत आवाज उंचावून तो म्हणाला, "हा कुरुकुलाचा पराक्रमी वीरांचा आखाडा आहे. इथं केलेला अपमान कधीच सहन केला जाणार नाही. आजच्या स्पर्धा संपल्या आहेत. नगरजन परत जाऊ शकतात!" गुरू द्रोणांकडे ढुंकूनही न बघता त्यानं स्पर्धेची समाप्ती केली.

नगरजन उठले आणि परत जाऊ लागले. त्यांच्या पायांखाली ती नीलकमलांची माला धुळीत मिळू लागली! अजिंक्यपदाची माला धुळीत!

माझं मन भारावून गेलं. आवेगानं मी राजकुमार दुर्योधनाला मिठी मारली. आजपासून कर्ण युवराज दुर्योधनाचा मित्र आहे. त्याचं सामर्थ्य, शरीर, मन, शस्त्रविद्या सर्व – सर्व श्रेष्ठ कौरव दुर्योधनासाठीच आहे! त्याचा हात हातात घेऊन तो प्रेमानं थोपटत मी म्हणालो, "राजा, मी अंगराज कर्ण, नव्हे नुसता कर्ण तुला वचन देतो की, ज्या मेरुपर्वताच्या धैर्यानं आज तू मला सावरलंस त्याच धैर्यानं मी आजन्म तुझ्या पाठीशी राहीन! प्राण गेला तरी कधीही परतणार नाही!"

तो माझ्या कुंडलांकडे क्षणभर पाहत राहिला. सगळे नगरजन केव्हाच निघून गेले होते. आखाडा सुना होता. मी, शोण, दुर्योधन आणि बाबा चौथरा उतरू लागलो. पश्चिमेकडे मावळतीला चाललेल्या सूर्यदेवांना शेवटचा नमस्कार करावा म्हणून मी पाहिलं. त्यांच्यावर एक काळसर ढग उभा होता! धूसर प्रकाशात आखाड्यातले सगळे पोट – आखाडे भेसूर दिसत होत. अश्वारोहणाच्या आखाड्यातील घोडी इकडे – तिकडे कशीतरीच फिरत होती. शोणानं कौरवांच्या राजचिन्हाला घातलेली माला तेथेच होती, पण आता ती सुकली होती! आणि कौरवांचा भगवा ध्वज न फडफडता, मान टाकून स्वस्थ होता.

**

# सदतीस

रात्री मला रोजच्यासारखी झोप लागली नाही.

सकाळपासून घडलेल्या घटना एकसारख्या डोळ्यांपुढं नाचू लागल्या. किती उलथापालथी झाल्या या एकाच दिवसात! मी सारथी आहे याची आज मला खंत का वाटली? काळ म्हणजे तरी काय आहे? एक सारथीच नाही काय? मानवरूपी घोड्यांच्या पाठीवर आपल्या संकेतांचे आसूड मारीत केव्हा – केव्हा तो किती गतीनं पिटाळतो हे घोडे! आज आखाड्यात जे – जे घडलं ते काल कुणी ज्योतिषानं मला सांगितलं असतं तरी माझा त्यावर विश्वास बसला नसता. पण ते – ते आज घडून गेलं होतं. क्षणात लोकांनी वीर कर्णाचा जयजयकार केला होता, तर क्षणात त्याला 'सारथ्याचा पुत्र' म्हणून हिणवलं होतं. ज्याला सर्वांनी सारथी म्हटलं होतं त्याला दुर्योधनानं मित्र म्हटलं! दुर्योधन! महाधैर्यशाली! आज माझ्यावरचा अन्याय खोडून काढावा, असं त्याला एकट्यालाच का वाटलं? माझ्यावरच्या प्रेमामुळे की अर्जुनाच्या द्वेषामुळे? भीमावरच्या क्रोधामुळे तर नव्हे? माझ्या मनाच्या विवरातून शंकांची वाळवी बाहेर पडू लागली. शय्येवर या कुशीवरून त्या कुशीवर मी एकसारखा तळमळत होतो. झोप येत नव्हती. मोठ्या आवाजानं बुजलेल्या गाईच्या पाडसासारखी ती हुंदाडत होती. कितीही चुचकारलं तरी नेत्रांच्या गोठ्याकडे फिरकत नव्हती.

युद्धशालेतल्या आमच्या दालनाबाहेर मी आलो. बाहेर पौर्णिमेचा टपोरा चंद्र आपला रुपेरी कुंभ धरतीच्या पायावर ओतत होता. दूर अरुंधतीची चांदणी आपल्या किलकिल्या डोळ्यांनी चंद्राची ती पृथ्वीवरची मुक्त कृपा क्रोधानं पाहत होती. माझ्या मनातली शंकांची अभ्रं दूर झाली. गंगेवरच्या गार – गार लहरी माझ्या खांद्याला गदागदा हलवून म्हणू लागल्या, 'चल, आमच्या असंख्य कन्या डोक्यावर रुपेरी, चंदेरी वस्त्रं घेऊन कशा नाचताहेत ते पाहायला!'

अंगाभोवती उत्तरीय लपेटून घेतलं आणि युद्धशालेच्या तटाबाहेर पडलो. आखाड्याच्या मागूनच गंगा वाहत होती, मध्येच कुठंतरी एखाद्या अशोक वृक्षावर एखादा क्रौंच पक्षी आपले पंख फडफडवीत होता. गंगेच्या शांत काठावर आलो. किती विशालं होतं तिचं पात्र! कुरुकुलाच्या कितीतरी पिढ्या तिनं पाहिल्या होत्या! महान उलथापालथींची प्रतिबिंब आपल्या अंगावर झेलली होती! तरीही ती संथच होती. एका काळ्या पाषाणावर बसून मी तिचं ते रुपेरी, मनोहर अपरूप पात्र पाहू लागलो. दुरून कुठूनतरी बुडबुड असा आवाज आला! गंगेच्या पाण्यावर वाकलेली एक मनुष्याकृती मला दिसली. रात्रीच्या वेळी पाणी नेण्यासाठी इथं कोण आलं आहे? मी मोठ्या आवाजात विचारलं, "कोण ते?"

एका खांद्यावर घडा घेतलेली ती आकृती हळूहळू पुढं सरकू लागली. माझं कुतूहल बळावलं. क्षणात एक उंचापुरा धिप्पाड पुरुष माझ्या पुढ्यात उभा राहिला. खांद्यावरच्या घड्यामुळे त्याची मान किंचित खाली झुकली होती. दोन्ही हातांनी त्यानं घडा सावरला होता. माझ्या पुढ्यात येताच तो म्हणाला, "मी सत्यसेन आहे!"

'सत्यसेन!' माझं मन स्मृतीचं वस्त्रं उसवू लागलं. एक धागा कुठंतरी हाती लागत होता, पण निश्चितपणानं तो समजत नव्हता. सत्यसेन हे नाव कुठंतरी ऐकलं आहे, असं वाटू लागलं. मी परत त्याला विचारलं, "कोण सत्यसेन?"

"मी प्रयागचा सारथी सत्यसेन!"

प्रयाग! गंगा – यमुनेचा संगम! माझं कुतूहल जास्त वाढलं. मी त्याला विचारलं, "मग अशा या रात्रीच्या वेळी या गंगेच्या काठी हस्तिनापुरात का?"

"कौरवराज महाराज धृतराष्ट्रांची ख्याती ऐकून हस्तिनापुराला आपल्या सारथ्याचं मोल होईल म्हणून मी आलो आहे. माझी बहीण वृषाली आणि आईही माझ्याबरोबर आली आहे."

"वृषाली!" माझ्या तोंडातून सहजोद्गार बाहेर पडले.

"होय. आम्ही दिवसा हस्तिनापुरात पोहोचू अशी अपेक्षा होती, पण आमच्या एका घोड्याचा पाय कांपिल्यनगराच्या घनदाट अरण्यात लचकल्यामुळे आम्हाला सावकाश यावं लागलं. नुकतेच आम्ही या नगरात आलो आहोत."

"मग पाणी आणण्यासाठी तुम्हाला या अपरात्री इथं पाठविण्याइतकी हस्तिनापुरातली आतिथ्याची पातळी वाढली आहे काय?"

"तसं नाही. आम्ही कुणाकडेही उतरलो नाही, कारण माझी इथं कोणाशी ओळखच नाही. आईला आणि बहिणीला विष्णूच्या मंदिराच्या आवारात बसवून आलो आहे. आईला प्रवासानं तहान लागली म्हणूनच मी पाणी आणण्यासाठी आलो. पण महाराज, आपण कोण?"

"मी महाराज नाही! मी कर्ण आहे!" मी त्याचा अपसमज दूर केला.

"कर्ण? म्हणजे चंपानगरीच्या अधिरथ काकांचे – " तो माझ्या कुंडलांकडे पाहत म्हणाला.

"होय. त्यांचाच मी पुत्र आहे."

तो माझ्या कुंडलांकडे पुन:पुन्हा पाहू लागला. खांद्यावरच्या घड्यामुळे तो अवघडला होता. मी म्हणालो, "जा तुम्ही. शक्य असल्यास उद्या पलीकडच्या युद्धशालेत या. माझी भेट घ्या."

घडा सावरीत तो चालू लागला. त्याच्या पायांखालची वाळू चुरूचुरू वाजू लागली. गार – गार वायुलहरी माझ्या अंगाला झोंबत होत्या. खांद्यावरून घसरलेलं उत्तरीय सावरण्यासाठी मी त्याचं एक टोक हवेत उडवून उजव्या खांद्यावरून पाठीवर फेकलं, पण माझ्या पाठीवर खटकन काहीतरी आदळलं! ते काय असावं म्हणून पाहण्यासाठी मी उत्तरीयाचं ते टोक परत मागं खेचून हातात घेतलं. एका गाठीत काहीतरी बांधलेलं होतं. झटपट ती गाठ उत्सुकतेनं मी सोडली. तो घड्याचा एक फुटका तुकडा होता! दालनाबाहेर पडताना मी घाईनं जुनं उत्तरीयच पांघरलं होतं. क्षणभर मला वाटलं की, तो तुकडा खालच्या वाळून फेकून द्यावा, पण मी तसं केलं नाही! तो हातात घोळवत परतलो. माझ्या पायांखालची वाळू चुरूचुरू वाजू लागली!

**

# अडतीस

दुसऱ्या दिवशी मी सत्यसेनाची वाट पाहिली, पण तो काही आला नाही. तो का आला नसावा या शंकेनं मी त्याची विचारपूस करण्यासाठी शोणाला विष्णुमंदिराकडे पाठविलं.

त्यानं परत येऊन जो वृत्तान्त सांगितला तो मोठा धक्का देणारा होता. रात्री सत्यसेन गंगेवरून मंदिराकडे परतल्यावर अर्ध्या एक घटकेतच त्याच्या वृद्ध मातेला प्रवासाच्या दगदगीनं रक्ताच्या उलटया झाल्या होत्या. त्या वृद्धेनं आपलं शरीर विष्णुमंदिराच्या पवित्र आवारात मृत्यूच्या स्वाधीन केलं होतं. आपली दोन मुलं तिनं विष्णूच्या चरणांवर अर्पण केली होती.

सत्यसेनाला खरोखरच कुणाच्यातरी साहाय्याची आता नितान्त आवश्यकता होती. मी शोणाला परत त्याच्याकडे पिटाळून त्याला बरोबर घेऊनच येण्याची सूचना दिली. अफाट हस्तिनापुरात तो एकाकी होता. योगायोगानंच त्याची आणि माझी रात्री गंगेवर गाठ पडली होती. नाहीतरी नेहमी योगायोगच मानवाचं जीवन घडवीत असतात. मनुष्य त्यांचं केवळ श्रेय उपटीत असतो!

■

# कुंती

# एक

ही धात्री विचारते आहे, ''महाराणी, तुम्ही एवढ्या उदास का?'' कोणत्या शब्दांत तिला मी सांगू की, मी उदास का? किती झंझावाती वळणं घेत आलं आहे माझं आयुष्य! काय हेतू आहे या वळणांचा? कोण फिरवितं माणसाला या चाकोरीतून? कुणाच्या हातात असतात ही सगळी सूत्रं? माणूस म्हणजे नियतीनं आपल्या संकेतांच्या कंठबंधनांनी जखडून टाकलेलं जनावरच नाही काय?

आज मी या राजवाड्याच्या सौधावर उभी आहे. माझ्याभोवती वैभवानं भरलेला राजवाडा आहे. माझा प्रत्येक शब्द झेलण्यासाठी पावलोपावली तत्पर दासदासी उभ्या आहेत. सगळं हस्तिनापूर मला 'राजमाता, राजमाता' म्हणून माझ्या चरणांवर आदरानं मस्तक ठेवीत आहे. युधिष्ठिरासारखा सालस, भीमासारखा बलवान आणि अर्जुनासारखा लोकप्रिय मुलगा असल्यावर दु:खाचं काय कारण आहे? कुठल्याही स्त्रीची जीवनाबद्दलची अपेक्षा यापेक्षा अधिक ती काय असणार? अशा जीवनाचा कोण अभिमान बाळगणार नाही? जगाच्या दृष्टीनं मी आज वैभवाच्या शिखरावरच नाही काय? सुख-सुख म्हणतात ते यापेक्षा अधिक काय असतं?

पण तसं नाही. केवळ याच बाह्य गोष्टींवर सौख्य अवलंबून असतं असं नाही. मनाचं स्वास्थ्य असेल तरच जीवन सुखी असतं. या एवढ्या वैभवात राजमाता म्हणून राहूनही मला ते मिळालेलं नाही. केवळ एकाच अनिवार्य घटनेच्या विरूप उंदरानं माझ्या जीवनाचं राजवस्त्र गेल्या अनेक रात्री कुरतडलं आहे.

जेव्हा-जेव्हा मी सौधावर अशी उभी राहून ते राजवाड्याचं समोरचं भव्य महाद्वार पाहते तेव्हा-तेव्हा माझं मन वावटळीत सापडलेल्या वाळक्या पानासारखं भरकटत-भरकटत असंच दूर कुठंतरी उडून जातं. गेल्या चार तपाच्या प्रवासाची भ्रमंती करून मगच ते देहाच्या पिंजऱ्यात येतं. गेल्या चार तपांचा काल! या दीर्घ चार तपांत ही कुंती – कुंती म्हणून किती दिवस जगली? एकही दिवस नाही! चांगला पन्नास वर्षांचा काल, पण किती कृपण आणि चेंगट! या पन्नास वर्षांत त्यानं कुंतीला – 'कुंती' म्हणून जगण्यासाठी कधी एकही दिवस दिला नाही! गेली पन्नास वर्षं माझ्या गळ्यात विविधरंगी निरनिराळ्या गोंडस नावांचे पट्टे घालून कालानं मला नुसतं गरगर फिरवलं आहे. हवं तसं आणि हवं तिकडे!

माझ्या मनात भरलेल्या आकाशातून गत जीवनातील आठवणींचा पाऊस अनेक धारांनी कोसळू लागला. कधी-कधी तो एवढा मुसळधार पडतो की, त्याच्या संतत माऱ्यानं माझ्या शरीराची आता चाळण तर होणार नाही, ना अशी मला भीती वाटते.

काय-काय घडलं या चार तपांत? छे! सांगण्यासारखं काय आहे त्यात? माझ्यासारख्या क्षत्राणीला तरी ते सांगावं असं कधीही मनापासून वाटत नाही, पण मन हे विचित्र असतं. त्याला आवरण्याचा प्रयत्न केला की, ते जास्त अनावर होतं.

या चार तपांत मी तीन सरळ-सरळ वेगवेगळ्या कुंतींचं वेगवेगळं जीवन जगले. एकीची दुसरीशी थोडीसुद्धा कुठंही तुलना होत नाही. एकीचं दुसरीशी थोडंसुद्धा साम्य

नाही. या तीन कुंती भिन्न आहेत. कधी-कधी त्या एकमेकांकडे टक लावून पाहतात. अनोळख्यासारखं एकमेकींना विचारतात, 'तू कोण? कोण तू? तू गं कोण?'

या सौधावर उभं राहिलं की, दूरवर गंगा दिसते. तिचं ते वळणदार पात्र पाहिलं की, मला मथुरेची आठवण येते. माझ्या बालपणाची आठवण येते. तिथं यमुनेकाठी मथुरेत माझं बालपण गेलं... हो अक्षरश: गेलंच! तोंडातून एकदा बाहेर पडलेल्या शब्दासारखं ते कधीच परतून माझ्याकडे आलं नाही! त्याच्या स्मृती मात्र अजूनही माझ्या मनावर आहेत तशाच कोरलेल्या आहेत.

बालपण म्हणजे गोल मोहक गिरक्या! बालपण म्हणजे उंच-उंच लाटा! बालपण म्हणजे स्फटिकासारखे शुभ्र, धवल रंग! तिथं खोटचा प्रतिष्ठेचे मुखवटे नसतात. तिथं एकमेकांना पाण्यात पाहणारी असूया नसते. भावी आयुष्याचं वाळवंट तुडविताना घायाळ होऊ पाहणाऱ्या जिवासाठी पूर्व तरतूद म्हणून निसर्गानं निर्माण केलेला शीतल पाण्याचा तो एक चषक असतो!

आजही मला माझं मथुरेतलं ते बालपण आठवलं की, वाटतं, कशाला मी मोठी झाले? कशाला महाराज शत्रुघ्नांच्या या पुण्यपावन नगराबाहेर पडले?

मथुरेतल्या त्या राजवाडचासमोरच्या उद्यानातल्या फुलपाखरामागं धावणारी पृथा, यमुनेतल्या पाण्याशी खेळणारी पृथा, सूर्यदेवांना अर्पण करण्यासाठी बकुल फुलांची माला गुंफणारी पृथा, किती निरामय आणि निरागस होती ती पृथा! पृथा? होय पृथाच! लहानपणी मी मथुरेत पृथा म्हणून वाढले! माझ्या प्रेमळ पित्याच्या – मथुरेचा राजा शूरसेन यांच्या – मायेच्या सावलीत, कष्टाचा किंवा दु:खाचा कधी एक प्रसंगही मजवर आला नाही. नावाप्रमाणंच ते शूर होते! बाहुबलानं आणि मनाच्या खंबीर निर्धारानं! यदुवंशाचं भूषण होते ते. मला त्यांचा नेहमीच अभिमान वाटतो. त्यांच्या स्मृतीनं राजवाडचाच्या तटासारखी त्यांची भव्य मूर्ती डोळ्यांसमोर उभी राहते.

त्यांनी माझा कोणता हट्ट पुरविला नव्हता? एकदा तर मला स्पष्ट आठवतं, मी त्यांच्याजवळ मला एक धनुष्य द्या असा विचित्र आग्रह धरला. त्यांना आश्चर्य वाटलं. ते म्हणाले, "मुलीला धनुष्य काय कामाचं पृथे? मुलींनी फुलं मागावीत, सोन्याचे अलंकार मागावेत!"

पण त्यांचं मी काहीच ऐकून घेतलं नाही. शेवटी त्यांनी निरुपायानं मला एक धनुष्य आणून दिलं! आकाशातल्या लुकलुकणाऱ्या तारका जरी त्या वेळी कुणी माझ्या हातात सागरगोटे म्हणून ठेवल्या असत्या तरीसुद्धा मी माझ्या हातातील ते धनुष्य त्याला दिलं नसतं! ते हातात पडताच मी उडचा मारीतच राजवाडचासमोरच्या उद्यानात गेले, कितीतरी वेळ मग मी या झाडावर, त्या झाडावर असे उगीच बाण सोडीत बसले होते, पण बकुळीच्या झाडावर बसलेली एक पत्ररथ पक्षिणी मला सारखी सतावीत होती! ती एकसारखी ओरडत होती. त्यामुळे माझं लक्ष तिच्या ओरडण्याकडे जात होतं. बाण नीटपणे सुटत नव्हते! मला तिचा अतिशय राग आला होता. माझ्या मनात एक मजेदार विचार त्या वेळी चमकून गेला! अचूकपणे मला जर हवा तसा बाण सोडता आला असता तर एक बाण त्या पत्ररथ पक्षिणीच्या चोचीत मारून मी तिचं ओरडणं बंद केलं असतं!

**

# दोन

एके दिवशी संध्याकाळी नेहमीप्रमाणं मी वाड्यासमोरच्या उद्यानात खेळत होते. चंद्रिका नावाची एक दासी जवळच पूजेसाठी लागणारी निवडक फुलं खुडत होती. आपले रंगीबेरंगी इवलेसे पंख फडफडवीत मन मानेल तशा मोहक गिरक्या घेणाऱ्या एका फुलपाखरामागं मी हात उंचावून धावत होते. इतक्यात चंद्रिकेनं एकदम मला हाक मारली. किती मोठ्यानं ओरडली होती ती!

"राजकुमारी, अहो लवकर या इकडे. काय गंमत आहे पाहा तरी जरा!"

मी फुलपाखरामागचं धावणं तसंच सोडलं आणि तिच्याकडे धावले! एका विशाल अशोकाच्या झाडाखाली ओंजळीत काहीतरी जपून धरून, मी येण्याची ती आतुरतेनं वाट पाहत होती. मी उड्या मारीतच तिच्याजवळ गेले. तिच्या हातात कोणती गंमत होती ते पाहण्याची मला अतिशय घाई झाली होती. मी जवळ जाताच लगबगीनं तिनं आपली ओंजळ माझ्यापुढं केली आणि हळुवारपणे बोटं उघडली. काय होतं तिच्या हातात? एक चंडोल पक्षयाचं नुकतंच जन्मलेलं पिल्लू होतं! आपली इवलीशी लालसर नाजूक चोच वासून ते कुणालातरी आपल्या मदतीसाठी बोलवीत होतं. त्याचे इवलेसे डोळे भेदरलेले होते. डोळ्यांवरचं गुलाबी कातडं ते मध्येच आपल्या डोळ्यांवर ओढून घेत होतं. थरथरणारी मान वारंवार वर करून कुणाचीतरी वाट पाहत होतं. त्याच्या सगळ्याच हालचालीत कमालीचं कारुण्य होतं.

मी चंद्रिकेला विचारलं, "कुठून आणलंस हे? किती दुष्ट आहेस गं तू? याची आई याला शोधून शेवटी दमून जाईल! मला ही असली गंमत मुळीच आवडत नाही. जा, सोडून ये त्याला!"

माझा तो अचानक अवतार पाहून तिचा सगळा उत्साह क्षणात मावळला. ती घाबरली. चाचरत-चाचरत तिनं खुलासा केला, "मीऽऽ? मी मुद्दाम नाही आणलं ते राजकुमारी! या हिरवळीवर ते आपलं आपलंच पडलेलं होतं! या अशोकावरच त्याचं घरटं असावं!"

मी पानांच्या गर्दीतून त्याचं घरटं दिसतं का ते पाहू लागले, पण घरट्याचा काही पत्ता नव्हता. काय करावं ते मला सुचेना. ते पिल्लू तर एकसारखं आपली मान उंचावत होतं. मला एकदम तातांची आठवण झाली! झर्रकन मी उठले आणि वाड्याकडे धूम ठोकली. वाड्याच्या तीन-तीन पायदंड्या त्या वेळी एकदम ओलांडल्याचं मला अजूनही स्पष्टपणे आठवंत. बाबा नुकतेच भोजपूरनगरीहून आले होते. अंगावरची वस्त्रंसुद्धा त्यांनी बदललेली नव्हती. त्यांच्या शेजारीच कोणीतरी पाहुणे उभे होते. ते माझ्याकडे टक लावून पाहू लागले. त्यांना बघितल्यावर माझा उत्साह जरा मावळला, पण त्यांनीच मला काहीतरी सांगावयाचं आहे हे अचूक ओळखलं. ते म्हणाले, "पृथे, लाजू नकोस. मी कुणी परका नाही. मी कुंतिभोज आहे – तुझ्या पित्याचा आतेभाऊ! अगं, तुझा काका!"

मला थोडासा धीर आला. पुढं होत तातांच्या बोटांना धरून ओढत मी म्हणाले, "तात, जरा उद्यानात चला पाहू. माझं काम आहे तुमच्याकडे."

माझं काहीतरी महत्त्वाचं काम आहे असं त्यांना वाटलं. ते माझ्या खांद्यावर हात टाकत पाहुण्यांकडे पाहून म्हणाले, ''चल कुंतिभोजा, काय म्हणतेय ही ते पाहू.''

आम्हा तिघांना आपल्याकडे येताना पाहून चंद्रिकेची मात्र गाळण उडाली. हातातील फुलांची परडी आणि ओंजळीतील ते पिल्लू यांमुळे उत्तरीय कसं सावरावं हे तिचं तिला समजेना! ती अपराध्यासारखी मान खाली घालून तशीच गप्प उभी राहिली.

आम्ही त्या अशोकाखाली आलो. मी चंद्रिकेच्या हातातील ते पिल्लू माझ्या हातात घेतलं. त्याचा तो उबदार स्पर्श अजूनही माझ्या लक्षात आहे! तातांना ते दाखवीत मी म्हटलं, ''याचं घरटं या झाडावरच आहे, पण हे चुकून खाली पडलंय. याची आई याला आपल्या घरट्यात शोधीत असेल! त्याला आत्ता त्याच्या घरट्यात पोहोचवा!''

माझ्याकडे कौतुकानं पाहत ते म्हणाले, ''आईला नको काय पोराची काळजी? पोराला एकटं टाकून तिनं कशाला लांब जायचं?''

''त्याच्यासाठीच चारा आणायला गेली असेल ती!'' मी म्हणाले.

ते माझ्याकडे पाहून हसले. इकडे-तिकडे कोणी सेवक दिसतो का, ते पाहू लागले. उद्यानात कोणीच नव्हतं. एव्हाना हळूहळू अंधार पडायला सुरुवात झाली होती. माझ्या हातातील ते पिल्लू एकसारखं वळवळत होतं. कुणाच्यातरी पंखांच्या उबेत जायला ते फार आसुसलेलं होतं. मला ते असह्य झालं. मी रडवेल्या स्वरात म्हणाले, ''तात, आटपा ना लवकर. हे बघा कसं करतंय – '' माझा रडवेला आवाज त्यांनी ओळखला. ते म्हणाले, ''आण ते इकडे! सकाळी त्याला आपण त्याच्या घरट्यात पोहोचवू.''

''सकाळी? सकाळपर्यंत ते आपल्या आईशिवाय जगेल तरी कसं? आत्ताच पोहोचवा ना त्याला!''

माझ्याजवळ येत समजावणीच्या स्वरात ते म्हणाले, ''असं काय करतेस वेडयासारखं पृथू? इथं कोणीच सेवक नाही या घडीला. आत्ताच त्याला कसं घरट्यात पोहोचवता येईल? तू तुझ्या मऊ-मऊ शय्येत ठेव आजची रात्र त्याला. दाणापाणी घाल. सकाळी आपण त्याला त्याच्या घरट्यात घालवू हं.''

''तुम्ही इथं असताना सेवक कशाला पाहिजे तात? याला जर आत्ताच्या आत्ता घरी पोहोचवलं नाहीत तर मग मीही वाड्यावर येणार नाही! याला घेऊन अशीच या अशोकाखाली बसेन रात्रभर.''

तात कुंतिभोजांना म्हणाले, ''कसं समजावायचं या पोरीला? फारच हट्टी आहे. ''

ते म्हणाले, ''शूरसेना, तू मथुरेचा राजा असलास तरी त्याचं या निरागस पोरीला काय? ती तुझ्यापुढं असाच हट्ट धरणार.'' माझ्याजवळ येत ते मला म्हणाले, ''आण मुली ते पिल्लू, मी पोहोचवितो त्याला त्याच्या आईकडे. मग तर चालेल?''

ते माझ्या हातातील पिल्लू घेऊ लागले, एवढ्यात बाबा पुढे झाले. माझ्या हातातून ते पिल्लू हळुवारपणे आपल्या हातात घेत म्हणाले, ''कुंतिभोजा, तू अभ्यागत म्हणून आला आहेस. इथं मी असताना तू या झाडावर चढणार की काय? मग मला मथुरेचा राजा कोण म्हणेल? पृथूचा पिता कोण म्हणेल?''

तातांनी उत्तरीय आणि चढाव काढून हिरवळीवर ठेवले. झपाझप पावलं उचलीत ते अशोकाच्या बुंध्याजवळ गेले. खारोटीसारखे ते वर चढले. थोड्या अवकाशानं ते वरून ओरडले, ''सापडलं गं पोरी, घरटं सापडलं!'' पिल्लू घरट्यात ठेवून ते खाली उतरू लागले. मी आनंदानं खाली टाळ्या पिटू लागले. त्या दिवशी किती अभिमान वाटला मला

माझ्या पित्याचा! तातांनी सांगितलेला कोणताच शब्द कधीही मोडायचा नाही, असा निर्धार मी करून टाकला!

शेवटी अगदी खाली येताच त्यांनी पटकन उडी मारली. तशी माझ्या मनातही शंकेच्या एका बेडकुळीनं उडी मारली. पुढं होत मी त्यांचा हात धरून त्यांना लगबगीनं विचारलं, "पण तात, ते त्याच पिल्लाचं घरटं होतं ना?"

माझ्या खांद्यावर हात ठेवीत ते म्हणाले, "वेडे, एवढंही समजत नाही होय मला! त्या घरटच्यात तसलीच आणखी पाच पिल्लं होती की!"

धूसर संध्याप्रकाशात आम्ही परत राजवाड्यात आलो. "शूरसेन, मोठी गोड आहे मुलगी तुझी!" भोजपूरनगरहून अभ्यागत म्हणून आलेले महाराज कुंतिभोज माझ्या मस्तकावरून ममतेनं हात फिरवीत बाबांना म्हणाले.

त्या रात्री स्वप्नात मला ते पिल्लूच एकसारखं दिसत होतं.

**

# तीन

दुसऱ्या दिवशी तात आणि महाराज कुंतिभोज परत भोजपूरनगरीला जाण्यासाठी रथात बसले. येताना नीलकमलं आणा, असं तातांना सांगण्यासाठी मी गेले तेव्हा ते म्हणाले, ''चल पृथे, तुलाही भोजपूरला जायचं आहे!'' मी आश्चर्यानं त्यांच्याकडे पाहू लागले, कारण मथुरा सोडून मी कुठंच आणि कधीही बाहेर गेले नव्हते. आजच पहिल्या प्रथम तात मला आपल्याबरोबर ये म्हणत होते!

भोजपूरनगरी कसली आणि कुठं आहे ते मला माहीतसुद्धा नव्हतं. मी गोंधळून तशीच उभी राहिले. तात कधी नाही ते जरा दरडावूनच म्हणाले, ''पृथे, ऐकू आलं की नाही? चल लवकर?''

खाली मान घालून मी मुकाटपणे रथात चढले. मला आईला भेटायलासुद्धा मिळालं नाही. मी जाणार होते आईला विचारायला, पण तातांनी मला अडवलं. काय म्हणेल आई मी परत आल्यानंतर?

मी मनोमन म्हणाले, ''मारिषामाते, मला क्षमा कर! मी तुझ्या दर्शनाशिवाय-आज्ञेशिवाय या राजवाड्याबाहेर पडते आहे! मथुरेबाहेर जाते आहे! यमुनेला सोडते आहे!''

उद्यानात फुलझाडांना पाणी पाजणाऱ्या चंद्रिकेनं मला हात उंचावून निरोप दिला. 'राजकुमारी कुठं चाललात?' असं तिला विचारायचं होतं, पण ती दासी होती. आपल्या महाराजांसमोर येऊ शकणार नव्हती.

**

# चार

दहा दिवसांनंतर आम्ही भोजपूरला आलो, ती वेळ संध्याकाळची होती. नगर तसं छोटंसंच; पण टुमदार होतं. मला ते आवडलं.

मला वाटलं होतं की, राजवाड्याच्या महाद्वारात तिथं राजस्त्रिया आमचं ओवाळून स्वागत करतील, कारण मथुरेत आमची तशी प्रथा होती. पण भोजपुरात एका साध्या दासीनंच आम्हाला ओवाळलं! मला ते थोडंसं विचित्र वाटलं.

आम्ही महाद्वारातून आत प्रवेश केला. मला राजवाड्यासमोरची प्रशस्त भव्य मोकळी जागा आवडली. केवळ एका कोपऱ्यात एक छोटंसं उद्यान होतं. बाकीची सगळी जागा मोकळी होती. वाडाही छान होता. त्याचं तोंड पूर्वेकडे होतं. मोकळी जागा म्हणे सैन्याच्या संचलनासाठी ठेवली होती!

आठ दिवस भोजपूरनगरात केव्हाच गेले. माझं मन परत मथुरेकडे ओढ घेऊ लागलं. मारिषामातेची वारंवार आठवण होऊ लागली. नवव्या दिवशी मथुरेला परत जाण्यासाठी बाबांनी रथ तयार ठेवायला सांगितला. माझं मन मथुरेच्या आठवणी काढू लागलं. आता आपण परत मथुरेला जायचं म्हणून मी हुरळून गेले होते. पण – पण त्यानंतर पुन्हा मी कधीच मथुरेला गेले नाही!! इच्छा असूनसुद्धा ते मला कधीच शक्य झालं नाही!

त्या दिवशी रथात बसण्यापूर्वी बाबांनी मला जवळ बोलावलं. महाराज कुंतिभोज तिथंच होते. त्यांच्याकडे बोट दाखवून ते म्हणाले, "पृथे, आता तुला इथंच राहायचं आहे! हेच तुझे माता आणि पिता!"

मला त्यांच्या बोलण्याचा अर्थ नीटसा समजला नाही.

भयाण अरण्यात एखाद्या लहान मुलाला तो झोपेत असताना कोणीतरी नेऊन सोडलं तर त्याला जसं वाटेल तसं मला वाटू लागलं! इथं माझी कुणाशी ओळख नव्हती. या भोजपुरात उभं राहून मथुरा कुणीकडे आहे, असं जर कुणी मला विचारलं असतं, तर तेसुद्धा मला नीटपणानं दाखविता आलं नसतं आणि तात तर सरळ म्हणत होते की, "तुला इथं राहायचं आहे!"

माझी ते चेष्टा तर करीत नाहीत ना? माझं बालमन क्षणात भीती आणि शंका यांनी घुसमटून गेलं. मी इथं का राहायचं? मी त्यांना आवडत नसेन तर त्यांनी मला मथुरेत नेऊन कुठंही सोडावं. मी तिथं राहीन, पण इथं या नगरात मी एकटी कशी राहणार? वडील माणसंसुद्धा कधी-कधी इतकी निर्दयी होतात की काय? माझ्यासाठी धनुष्य आणणारे, मला 'पृथू, पृथू' म्हणून प्रेमानं नेहमी जवळ घेणारे, माझ्या शब्दासाठी खारोटीसारखे झाडावर चढणारे तात फसवे आणि खोटे होते की काय? की मी हट्टी आहे म्हणून मला अद्दल घडविण्यासाठी त्यांनी हा जगावेगळा कठोर मार्ग स्वीकारला होता? मी कळवळून त्यांना विचारलं, "का तात? मी इथं का राहायचं? कशासाठी? मी तुम्हाला आवडत का नाही? तसं असेल तर मला मथुरेत नेऊन कुठंही सोडा. मी कध्धी कध्धी पुन्हा हट्ट धरणार नाही!"

"तसं नाही पृथू, तू मला आवडतेस गं, पण – पण या कुंतिभोजाला – माझ्या आतेभावाला मी वचन दिलं आहे – " त्यांचा आवाज घोगरा झाला होता. माझा खांदा थोपटीत ते बोलत होते, त्यांचा कंठ दाटलेला मी आज प्रथमच पाहत होते.

शंकाकुशंकांनी माझं बालमन घायाळ झालं. आता काय-काय ऐकावं लागणार? वचन! कसलं वचन? कुणाला दिलं आहे तातांनी वचन? कशाबद्दल दिलं आहे? आणि वचन म्हणजे तरी काय? मी गोंधळून विचारलं, "कसलं वचन?"

"ऐक," घोगऱ्या स्वरात ते म्हणाले, "बारा वर्षांपूर्वी एकदा मी आणि कुंतिभोज या भोजपूरजवळ अरण्यात मृगयेसाठी गेलो होतो. त्या दिवशी निषाध पर्वताच्या अरण्यात आम्ही पुष्कळ भटकलो, पण मृगयेसाठी काहीच मिळालं नाही. दमून-भागून शेवटी तसेच परत यायला निघालो. नगराबाहेरच्या अश्वनदीवर पाणी पिऊन तिच्या काठावरच्या गर्द आणि डेरेदार अशा विशाल शालवृक्षाखाली आम्ही विश्रांतीसाठी बसलो. त्या दिवशी कुंतिभोज फारच नाराज होता. मला वाटलं तो मृगया झाली नाही म्हणून नाराज असेल. म्हणून मी त्याला म्हणालोही, 'कुंतिभोजा, तू नाराज का?' तो माझ्याकडे नुसतं पाहतच राहिला. त्याचा हात हातात घेऊन मी त्याला आस्थेनं विचारलं, 'राजा, बोल. बोलल्यानंच मनाची दु:खं हलकी होतात.'

"तो म्हणाला, 'शूरसेना, आज आपण मृगयेसाठी बाहेर पडलो. पण माणूस म्हणजेच दैवाची मृगया नाही काय? मला तरी या माझ्या निपुत्रिक जीवनाचा उबग आला आहे. मुलाशिवाय संपत्ती म्हणजे सूर्याशिवाय आकाश! हे भोजांचं संपन्न राज्य सेनापतीच्या स्वाधीन करून दूर हिमालयात निघून जावं असं वाटतं मला.'

"त्याचा माझ्या हातातील हात दाबून मी म्हणालो, 'एवढंच ना? राजा कुंतिभोजा, मी शूरसेन – मथुरेचा यादवराजा – तुला सांगतो आहे की, मला होणारं पहिलं अपत्य मी तुझ्या स्वाधीन करीन! पण क्षत्रियानं राज्य सोडून जाण्याची भाषा कधीच बोलू नये.'

"त्यानं मला त्या वेळी आनंदानं मिठी मारली. आम्ही अश्वनदीवरून नगरात आलो. थोडं दिवस त्या वेळी त्या नगरात राहून मी मथुरेला गेलो. त्याच वर्षी तुझा जन्म झाला. पृथे, तोच हा माझा आतेभाऊ आणि राजा कुंतिभोज! मुली, मला माझा शब्द पाळला पाहिजे, तुला तुझा धर्म पाळला पाहिजे!"

मी माझ्या किलकिल्या डोळ्यांनी त्या दोघांच्याकडे पाहत होते. मला त्यांच्या बोलण्यात वचन हा शब्द कुठंच ऐकू आला नाही म्हणून मी विचारलं, "वचन म्हणजे काय तात?"

झर्रकन वळत ते म्हणाले, "वचन म्हणजे दिला शब्द पाळणं. पोरी, मी तुला देईन, असा या कुंतिभोजाला शब्द दिला आहे." त्यांचे डोळे डबडबून आले होते. पहाड पाझरत होता.

माझ्यासाठी अशोकवृक्षावर सरसर चढणारे तात आज वचनपूर्तीसाठी डोळ्यांवाटे अश्रू काढीत होते! त्या दिवशी अशोकाखाली मी ठरवून टाकलं होतं की, त्यांचा कोणताच शब्द कधीही मोडायचा नाही. माझ्यासाठी त्यांनी रडवेलं व्हावं? स्वत:ला सावरून मी पुढं होऊन म्हणाले, "तात तुम्ही सांगत असाल तर मी इथंच राहीन. पण तुम्ही रडू नका! शोक करू नका!"

पुढं होऊन त्यांनी मला आपल्या छातीशी कवटाळलं. त्यांचं भरदार शरीर पिप्पल

वृक्षासारखं थरथरत होतं. महाराज कुंतिभोजांना ते म्हणाले, "राजा, जिवाच्या मायेनं जपलेली ही देणगी – सांभाळ. हिच्या मातेला, मी हिला घेऊन परस्पर आलो आहे, हे माहीतसुद्धा नाही. ते आधी समजलं असतं, तर तिनं हिला मथुरेतून कधीच सोडलं नसतं!"

मारिषामातेच्या आठवणीनं मला गलबलून आलं!

मला तसंच सोडून झटकन त्यांनी कमरेचं खड्ग म्यानातून काढलं. त्याचं धारदार पातं चमकन चमकलं. आपल्या उजव्या हाताचा भरीव अंगठा त्या धारेवर त्यांनी ओढला! रक्ताची एक लालभडक रेषा त्यांच्या भरगच्च अंगठ्यावर क्षणात उभी राहिली. ती त्यांनी माझ्या कपाळाला लावली. त्याचा तो गरम स्पर्श अजूनही माझ्या लक्षात आहे! खड्ग म्यानात ठेवून माझा चेहरा ओंजळीत घेऊन ते म्हणाले, "लक्षात ठेव पृथे, तू एका क्षत्रिय राजाची मुलगी आहेस! हे कधीच विसरू नकोस! विसरणार नाहीस ना बाळ?" वाकून त्यांनी माझ्या मस्तकाचं एकदा दीर्घ अवघ्राण केलं. त्यांनी लावलेला रक्ताचा टिळा त्यांच्याच ओठांनी पुसटला गेला! त्यांच्या डोळ्यांतून अश्रुबिंदू घरंगळून दाढीत मिसळले.

झटकन ते वळले आणि झपझप चालत रथात चढले. हातातील आसुडाचे त्यांनी घोड्यावर सपासप कोरडे ओढले. रथ उधळला. धूळ उडू लागली. माझं छोटं मन बावरलं. हात उंचावून पुढं होत मी ओरडले, "तातऽऽ थांबा!" महाराज कुंतिभोजांनी पुढं होत मला आवरलं. ते म्हणाले, "मुली, क्षत्रिय एकदा निघाले की, कधीच मान फिरवून मागं वळून बघत नसतात."

मी खाली मान घालून म्हणाले, "मला बरोबर न्यावं म्हणून काही मी त्यांना थांबवत नव्हते! माझ्या आईसाठी माझी ही आठवण तरी त्यांच्या बरोबर दिली असती! मी आईला भेटलेसुद्धा नव्हते." हातातील अंगठी मी त्यांच्यासमोर धरली.

ती पाहताच ते गप्प बसले. थोड्या वेळानंतर म्हणाले, "आण मुली ती अंगठी. मी ती पोहोचती करतो. नुसती अंगठीच नाही, तर तुलाही! राजा शूरसेनानं आपलं वचन पुरं केलं आहे, पण त्यानं आज माझी परीक्षा घ्यायचं ठरविलं आहे. मीही त्याला दाखवून देईन की, भोजपूरचा कुंतिभोज काही एवढा निर्दय नाही..." त्यांचे डोळे वेगळ्याच तेजानं चमकू लागले. त्यांनी टाळी वाजविताच एक सेवक समोर आला. आता ते मला घेऊन दुसऱ्या रथातून तातांना गाठणार होते! मला क्षणात काय झालं कुणास ठाऊक, खांद्यावरचं उत्तरीय मी डोक्यावर घेतलं आणि पुढं होऊन त्यांना वाकून नमस्कार करीत म्हणाले, "आपली मानसकन्या पृथा आपणाला वंदन करते आहे, तात!"

त्यांनी झटकन मला वर उठविलं. माझ्याकडे पाहत ते भरल्या आवाजात म्हणाले, "धन्य आहे तो राजा शूरसेन, ज्यानं तुझ्यासारख्या निग्रही कन्येला जन्म दिला! पण तुझं मन इथं कधीच रमणार नाही पोरी. मला मूल नाही, पण मुलांची मनं मला कळतात! इंद्रधनुष्याचे रंग जाणायला काही आकाश व्हावं लागत नाही मुली!"

"नाही तात, हेच आता माझं जन्मग्राम आणि हीच आता माझी मथुरा!" मी धाडसानं बोलले. कोण माझ्या तोंडून धैर्यानं बोलत होतं देव जाणे, पण ती फुलपाखरामागं धावणारी पृथा नक्कीच नव्हती, धनुष्यानं खेळणारी पृथा नव्हती नक्कीच!

"भले मुली! क्षत्रियानं मोडावं; पण मिटू कधीच नये! शूरसेनाची कन्या शोभतेस खरी. पण तू इथं राहू नयेस. कारण –"

‘‘कारण काय?’’

‘‘कारण या राजवाड्यात एकही राजस्त्री नाही! सगळ्या वाड्याची जबाबदारी तुझ्यावरच पडेल. तुझ्यासारख्या अल्लड पोरीला या कोवळ्या वयात ती कधीच झेपणार नाही.’’

‘‘मी ती पार पाडीन! आजपासून हा राजवाडा माझा आहे. इथली माणसं माझी आहेत!’’

‘‘तरीही तुला मी पृथा म्हणून हाक मारली की, तू अस्वस्थ होशील. तुला मथुरेची नेहमीच आठवण होईल. या भरल्या वाड्यात एकांती तू सदैव दु:खी राहशील, म्हणून मी ठरविलं होतं की...’’

काहीतरी ते बोलणार होते, पण त्यांनी ते कटाक्षानं टाळलं.

‘‘काय ठरविलं होतं आपण?’’ मी कुतूहलानं विचारलं.

‘‘तुला पृथा न म्हणता...’’ परत ते थांबले. ‘‘...कुंती... कुंती म्हणणार होतो मी, माझ्या नावावरून! पण तुला ते कदाचित आवडणार नाही. जा तू आत.’’

मी झटकन पुढं होत वाकून त्यांना वंदन करून म्हणाले, ‘‘आपली कन्या कुंती आपणाला वंदन करते आहे, तात!’’

माझ्या त्या अनपेक्षित उद्‌गारांनी ते भारून गेले. त्यांनी मला वर उठविलं आणि तातांनी जसं छातीशी कवटाळलं होतं तसंच मला छातीशी कवटाळत ते म्हणाले, ‘‘कुंती, वाईट वाटून घेऊ नकोस मुली, तुझ्या पित्याची तुला इथं आठवणही होणार नाही, पण तू इथं राहिली नाहीस तर या राजवाड्याला अवकळा येईल. गेली चौदा वर्षं मी तुझी वाट पाहतो आहे! ही वास्तू राजस्त्रीची वाट पाहते आहे!’’

‘‘नाही, मी इथून कधीच जाणार नाही!’’ मी त्यांना बिलगत म्हणाले. निर्धारानं आणि निश्चयानं!

त्यांनी माझी पाठ थोपटली. मला सावरून राजवाड्यात नेताना त्यांच्या डोळ्यांत अश्रू तरळले होते. ते भोजपूरच्या महाद्वाराशिवाय दुसऱ्या कुणाला कसे आठवतील?

**

# पाच

एकएका घटनेत माणसाला नखशिखान्त बदलण्याचं किती प्रचंड सामर्थ्य असतं! त्या दिवसापासून एका अल्लड कुमारीचं एका अबोल आणि गंभीर किशोरीत रूपांतर झालं. त्या एकाच घटनेनं पृथेचं वय नकळत वाढविलं. त्या एकाच घटनेनं मला आमूलाग्र बदलून टाकलं. ज्या वयात बालिश हट्ट धरावेत, अगदी त्याच वयात माझ्यावर भोजांच्या सगळ्या वाड्याची जबाबदारी पडली. आपल्या मुलीचं काय झालं आहे हे पाहण्यासाठी पित्यानं मानसुद्धा फिरवली नव्हती. एखाद्या शेळीसारखं भोजपुरात आपल्या मुलीला वचनाच्या खुंटाळीला बांधून ते निघून गेले होते! मीही त्यांचीच मुलगी होते! काही झालं तरी आता मथुरेला जायचं नाही, असं मीही ठरवून टाकलं! दिवसांमागून दिवस जाऊ लागले. मला नेहमीच मथुरेची आठवण येई; पण मनाच्या निर्धारानं मी ती पुसून टाकी, कारण इथं मी पृथा नव्हते. इथं मी कुंती होते. एका मान्यवर राजाची एकुलती एक कन्या. भोजपूरच्या राजवाड्याची एकटीच राजस्त्री होते. मग पृथा कोण होती? पृथा कुंतीच्या जीवनातील एक स्वच्छंदी फुलपाखरू होतं! पृथा कुंतीच्या जीवनातील एक वायूची लहर होती! पृथा कुंतीच्या जीवनातील हिरवळ होती! पृथा कुंतीच्या जीवनातील एक पुष्पशय्या होती! पृथा कुंतीच्या जीवनातील एक सुगंधी कुपी होती! पृथा म्हणजे कुंतीच्या जीवनातील केवळ एक स्वप्न होतं, नुसतं स्वप्न! कधी-कधी स्वप्नातील गोष्टीही मनाला आनंद देतात. पृथेची आठवण मला तशीच आनंद देऊ लागली. तिच्या अल्लड, निरागस स्मृतीशिवाय आज तरी माझ्याजवळ आनंददायक असं दुसरं काहीच नव्हतं!

**

# सहा

भोजपुरात राजकुमारी कुंती म्हणून मला सर्व जण मान देऊ लागले. मला कोणत्याही गोष्टींची कमतरता भासू नये, म्हणून बाबा झटू लागले. रीतीरिवाजाच्या काही-काही गोष्टी मला चटकन समजत नसत! वाड्यावर एक वृद्ध दासी होती, ती मला सगळं समजावून सांगत असे. माझी ती अतिशय काळजी घेई. एका नव्या जीवनाला मला सुरुवात करावी लागली. इथं पाठीवरून मायेनं फिरणारा आईचा हात नव्हता. तरीही मोठ्या निर्धारानं आणि चिकाटीनं मी सर्व शिकत होते. मध्येच कधीतरी एकदम ओरडणाऱ्या टिटवीसारखी मथुरेची आठवण होई. मोठ्या कष्टानं मी ती दाबून टाके. दिवसेंदिवस मी जास्त समजूतदार होत चालले.

अशा अवस्थेतच तिथं माझी दोन वर्षं गेली. राजवाड्याची आता मला सवय झाली. एक वेगळं आकर्षण भोजपुराविषयी वाटू लागलं. त्या वृद्ध दासीबरोबर मी कधी-कधी नदी किनाऱ्यावर जाई. एकदा मी तिला विचारलं, ‘‘या नदीचं अश्वनदी असं विचित्र नाव का? की ही घोड्याच्या गतीनं धावते म्हणून हे नाव आहे?’’

‘‘नाही राजकुमारी, तसं नाही. पण या भोजपुरामधले घोडे या नदीशिवाय कुठलंच दुसरीकडचं पाणी पीत नाहीत आणि म्हणून हिला अश्वनदी म्हणतात!’’

ती वृद्ध दासी हुशार होती. तिचं नाव होतं धात्री! व्यवसायावरून ती धात्री होती, पण त्यामुळेच तिचं नाव धात्री पडलं होतं. सगळ्या बारीकसारीक गोष्टींचं तिला ज्ञान होतं. कोणत्या व्याधीवर कोणती औषधी वनस्पती चालते येथपासून पूर्वेकडच्या निषाधांच्या राज्यात राक्षस-टोळ्यांची कशी बंडाळी चालते तेथपर्यंत ती मला नेहमी काहीतरी सांगत असे.

एकदा मी तिला विचारलं, ‘‘अशा या निषाधांच्या शेजारी आपण राहतो. आपणाला त्यांच्यापासून केव्हाही त्रास होणारच. या राजवाड्यावर अशा वेळी राजस्त्रियांच्या संरक्षणासाठी काय सोय आहे?’’

इकडे-तिकडे पाहत ती हळूच म्हणाली, ‘‘आहे, तशी सोय आहे, पण ती फक्त मला व महाराजांना माहीत आहे!’’

‘‘कोणती सोय आहे?’’ मी कुतूहलानं विचारलं.

‘‘चला माझ्याबरोबर, दाखविते तुम्हाला.’’

मी तिच्याबरोबर राजवाड्याच्या एका दालनात गेले. इकडे-तिकडे पाहून तिनं कोणी नाही याची खात्री करून घेतली आणि कोपऱ्यातली एक दगडी खुंटाळी उजवीकडे फिरविली. त्या कोपऱ्यातील एक तीन हात उंचीचा भाग दूर झाला. आतून धूसर प्रकाशाचे किरण बाहेर पडले. ते एक भुयार होतं!

‘‘कुठं जातं हे भुयार?’’ मी आश्चर्यानं विचारलं.

‘‘अश्वनदीवर!’’ तिनं उत्तर दिलं.

मी त्या भुयारात डोकावून पाहिलं. इतक्यात आत एक पाकोळी चिरका आवाज काढीत फडफडली. बाहेर जाण्यासाठी ती धडपडत होती, पण तिला मार्ग सापडत

नव्हता! भुयाराच्या भिंतीवर आपले पंख फडफडवीत तीन-चार वेळा ती थडाथड आपटली... आणि शेवटी वर प्रकाशासाठी ठेवलेल्या छिद्रातून निघून गेली. तिची ती धडपड पाहून जीवन म्हणजे विश्वाच्या भयाण भुयारातून बाहेर पडण्यासाठी धडपडणारं पाखरू आहे, असा एक विचित्र विचार माझ्या मनात येऊन गेला. झटकन मी ती दगडी खुंटाळी डावीकडे फिरविली. तो भाग होता तसा बंद झाला. भुयार अदृश्य झालं. माझं मन स्थिरावलं.

**

# सात

मी, धात्री आणि बाबा असेच एकदा महालात बोलत बसलो होतो. इतक्यात एक दूतसैनिक धापा टाकत महालात आला. श्वास कसातरी रोखत तो म्हणाला, “महाराज, पूर्वेकडून निषाधांचं सैन्य वाटचाल करीत आहे. आपल्या भोजपुरावर ते चालून येत आहे.”

“काय म्हणतोस? असाच जा आणि सेनापतींना रणभेरी आणि शंख फुंकायला सांग. चर्मण्वतीच्या किनाऱ्यापलीकडेच त्यांना रोखलं पाहिजे. या भोजपुरात कुंतिभोज आहे तोपर्यंत हे राज्य स्वतंत्रच राहील. जा.” बाबा झटकन उठले आणि शस्त्रागाराकडे निघून गेले. त्यांच्या चालीत सिंहाची ऐट होती. शरीरात भोजकुलाचं अशरण रक्त होतं!

क्षणार्धात योद्धयाचा वेष चढवून ते परत आले. नगरात सगळीकडे शंख, दुंदुभी आणि रणभेरी घुमू लागल्या. बाबांची चर्या एका वेगळ्याच तेजानं चमकू लागली. भोजपुराचं सैन्य तयार झालं. सगळीकडे भोजांच्या राज्याचा जयजयकार घुमू लागला. शूर सैनिक स्वातंत्र्यासाठी मरायला तयार झाले!

मी धात्रीला पंचारती तयार करायला सांगितलं. युद्धावर जाण्यापूर्वी राजाला ओवाळायचं असतं. धात्री आरती घेऊन आली, पण त्यापूर्वीच बाबा बाहेर पडले! राजवाडयाच्या द्वारातून मी म्हणाले, “बाबा, थांबा. मी ओवाळते.”

ते मागं न फिरताच म्हणाले, “क्षत्रिय तोंड फिरवल्यानंतर मागं कधीच वळून बघत नसतात मुली! विजयी होऊन आलेल्या पित्याला ओवाळ. तोपर्यंत पंचारती देव्हाऱ्यातल्या कुलदेवतेपुढं तशीच तेवत ठेव.” त्यांनी गरुड चिन्हांकित राजध्वज हाती घेतला. पुढचं पाऊल पुढंच टाकीत ते महाद्वारात गेले आणि रथात बसून क्षणार्धात दिसेनासे झाले. चोहोकडे “महाराज कुंतिभोजांचाऽऽऽ विजय असो!” अशा घोषणा घुमू लागल्या. भोजांचं सैन्य निषाधांचा नि:पात करण्यासाठी पेटल्या मनानं धावू लागलं. धुळीचा एक लोळ दूरवर उठत होता. अश्वनदीच्या पात्राच्या दिशेनं तो थोडचा कालानं विरून गेला.

**

# आठ

रोज वेगवेगळ्या वार्ता कानांवर पडत होत्या, चर्मण्वती नदीच्या पुढं दोन्ही सैन्यांची गाठ पडली होती. कधी निषाधांची सरशी होत होती, तर कधी आमची सरशी होत आहे, असं समजताच निषाधांचं सैन्य क्षणात जवळच्या घनदाट अरण्याचा आश्रय घेत होतं, पण भोजपूरच्या चिवट सैन्यापुढं त्यांचं काहीच चाललं नाही. दहा दिवस त्यांनी वाट पाहिली आणि परत ते विन्ध्य पर्वताच्या दिशेनं आले तसे माघारी निघून गेले! बाबा यशस्वी झाले!

एक दूत वार्ता घेऊन आला, "निषाधांना पिटाळून महाराज कुंतिभोज परत येताहेत!"

सगळं नगर उत्साहानं भरून गेलं. आपल्या शूर राजाचं प्रेमपूर्ण स्वागत करण्यासाठी नगरजन उत्सुक झाले. स्त्रियांनी अंगणात सडे शिंपले, गुढ्या-तोरणं उभारण्यात आली. आक्रमकांना पिटाळणाऱ्या कोणत्या वीर राजाचा जनतेला अभिमान वाटणार नाही? अशा राजाचं कोण स्वागत करणार नाही? कोण त्याच्यावर सुवर्णपुष्पांचा वर्षाव करणार नाही?

पंधरा दिवसांनी बाबा विजयी होऊन परत येत होते. पंधरा दिवस कुलदेवतेसमोर इंगुदीचं तेल घालून तेवत ठेवलेली पंचारती हातात घेऊन मी राजवाड्याच्या महाद्वारात उभी राहिले.

नगराच्या सीमेवरून नगाऱ्याचा आवाज येत होता. नगरजन घोषणा देत होते. फुलं उधळीत होते. शेवटी आमचं विजयी सैन्य राजवाड्याजवळ आलं. सैन्याच्या आघाडीवर एका हत्तीच्या अंबारीत बाबा बसले होते. माहुतानं हत्ती खाली बसविला. बाबा महाद्वारात उभे राहिले. त्यांच्या विजयी डोळ्यांतून आनंदाच्या ज्योती बाहेर पडत होत्या. मान ताठ होती.

महाद्वारात मी त्यांना ओवाळलं. त्यांनी पाठीवरच्या बाणांच्या भात्यातून एक बाण सर्रकन खेचून हातात घेतला. त्याचं धारदार टोक आपल्या उजव्या अंगठ्याला टोचलं. त्यांच्या भरगच्च अंगठ्यावर रक्ताचा एक थेंब उभा राहिला. त्याचा टिळा माझ्या मस्तकाला लावीत ते म्हणाले, "वीरांनी विजयाच्या धुंदीत जगावं आणि वीरकन्यांनी शीलासाठी मरावं!"

अमृताचे बोल होते ते!

मी भारावून गेले. मला बाबांचा अभिमान वाटला. मी मनोमन पुटपुटले, 'वीरकन्यांनी शीलासाठी मरावं आणि वीरांनी विजयाच्या धुंदीत जगावं!'

सगळ्या नगरजनांनी विजयोन्मादानं घोषणा केल्या – "महाराज कुंतिभोजांचाऽऽऽ विजय असो!"

"राजकुमारी कुंतिदेवींचाऽऽऽ विजय असो!"

अभिमानानं छाती फुगवीत बाबांनी महाद्वारात पाऊल टाकलं इतक्यात एक तीक्ष्ण आवाज सगळ्यांची काळजं कापीत वाड्याच्या प्राकारात घुमला. विजेच्या

कडकडाटासारखा! प्राकाराच्या पाषाणांवरही भीतीनं रोमांच उभे राहावेत असा!

"राजा, विजयाच्या आनंदानं एवढा उन्मत्त झालास काय? तुझ्या वाड्यासमोर कोण अतिथी उभा आहे याची तुला जाणीव तरी आहे काय?"

सगळ्या नगरजनांची दृष्टी त्या आवाजानं आपल्याकडे रोखून घेतली. भीतीची एक सणसणीत शिरशिरी सगळ्या वातावरणाच्या अंगात चमकून गेली.

आम्ही आवाजाच्या दिशेनं पाहिलं. एक लांबच लांब दाढी असलेला, जटाधारी, कृश आणि उंच असा ऋषी होता तो! त्याचा रंग तांबसर होता. सगळं जग जणूकाही त्याच्या दृष्टीनं हातातील बिल्ववृक्षाच्या वक्रदंडानं सहज उलटं करता येण्यासारखं केवळ गवताचं पातं होतं! आपल्या वक्र भुवयांनी त्यानं सगळ्या ब्रह्मांडाला एक जबरदस्त विळखा घातला होता. हातातील चकचकीत झळाळणारा कमंडलू हवेत नाचवीत तो डोळ्यांतून अग्नीचा वर्षाव करीत होता.

नगरजन कुजबुजू लागले. बाबा तत्परतेनं पुढं झाले आणि त्या ऋषीच्या पायांवर त्यांनी सरळ लोळण घेतली!

तो ऋषी पुन्हा कडाडला, "कुंतिभोजा, कसल्या या रणभेरींच्या आणि तुताऱ्यांच्या पुंकण्या फुंकतो आहेस?"

"गुरुदेव, क्षमा असावी. स्वारीहून आताच परततोय. आपल्या आगमनाची कल्पना नव्हती... नाहीतर – " बाबा त्यांच्या चरणांवर मस्तक ठेवून कळवळून बोलू लागले. क्षणापूर्वी अशोकासारखे ताठ असलेले बाबा क्षणात गवताच्या पात्यासारखे मलूल झाले. क्षणापूर्वी भुजंगासारखे सळसळीत वाटणारे बाबा क्षणात गोगलगाईसारखे दीन झाले.

"आगमनाची कल्पना द्यायला मला काय तू आपल्या पायाचा मांडलिक समजलास? या पृथ्वीच्या पाठीवर हवं तिथं मुक्तपणानं स्वच्छंद फिरणारा मी एक मुक्त ऋषी आहे हे विसरलास की काय? की ही सगळी पृथ्वी तुझ्या पायाची बटीक झाली आहे?" तो ऋषी भुवया वाकड्या करीत परत गरजला.

अंगावर कोसळणाऱ्या कड्यासारखाच तो सर्वांना वाटला.

"क्षमा असावी. आपण येणार हे समजलं असतं, तर आपलं उचित स्वागत करता आलं असतं." अंग सावरून उभं राहत बाबा बोलले.

"स्वागत आणि मानपान तुझ्यासारख्या नृपांसाठी असतो! मला त्याची पत्रास नाही."

"क्षमा असावी." हात जोडून बाबा दीनवाणे म्हणाले.

"ठीक आहे, राजा चल."

सगळ्या लोकांनी सुटकेचे नि:श्वास सोडले!

धात्रीनं मला पुढं होऊन नमस्कार करायला सांगितला. मीही हळूच पुढं झाले आणि त्या ऋषीला वाकून नमस्कार केला.

"ही कोण राजा?" त्यांनी बाबांना प्रश्न विचारला.

"ही माझी कन्या कुंती."

"तुझी कन्या? राजा, कुणापुढं तू बोलतो आहेस याची नीट जाणीव आहे काय तुला?" आपले डोळे गरगर फिरवीत ऋषीनं खोचक प्रश्न विचारला.

"नाही गुरुदेव क्षमा असावी. ही शूरसेन राजाची कन्या पृथा! माझी मानसकन्या

कुंती.'' आज बाबांना काय झालं होतं? पावसानं झोडपलेल्या लव्हाळ्यासारखे ते खाली मान घालून क्षणाक्षणाला त्या दाढीवाल्या ॠषींला नमस्कार का करीत होते?

''राजा, इथं मी काही तीर्थयात्रा करण्यासाठी आलो नाही! मला एक महायज्ञ करायचा आहे. इथं – या भोजपुरात आणि या तुझ्या वाड्यात. माझ्या अंतरात्म्याचा मला तसा आदेश आहे.''

''सेवक सेवेला तत्पर आहे.'' बाबा वाकून म्हणाले.

''हा महायज्ञ साधा नाही राजा! या यज्ञानं, ज्या पाच मूलतत्त्वांनी हे जग साकारलं आहे त्या पंचमहाभूतांना मी माझ्या पायाचे दास बनविणार आहे! ज्या शक्तींच्या जोरावर हे सगळं जग चालतं त्या सगळ्या शक्तींना या यज्ञानं मी दास करणार समजलास! या यज्ञात काही कमी पडलं तर...'' त्यानं डोळे फिरविले.

''नाही गुरुदेव. मी आणि कुंती आपणाला काहीच कमी पडू देणार नाही.''

''लक्षात ठेव कुंतिभोजा, हा यज्ञ सगळ्या आर्यावर्तात पहिल्याप्रथमच केला जाणार आहे! गेली तीन तपं त्यासाठी हिमालयात घोर तपश्चर्या करून मनाचं दिव्य सामर्थ्य मिळवून मी आलो आहे."

''गुरुदेव, आज मी धन्य झालो. आपण राजवाड्यात चलावं.''

"राजवाड्यात कशाला? जिथं वैभवाचा विलास असतो तिथं आत्म्याचा विनाश असतो. मी पर्णकुटीत राहीन. तुझ्या वाड्यासमोर – पर्णकुटीत!"

''जशी आज्ञा. ही कुंती आपली सेवा करील."

त्या ॠषींनं वाड्याच्या महाद्वारातून आत पाऊल टाकलं. सगळ्या लोकांनी घोषणा केली. ''दुर्वास ॠषींचा विजय असो!"

गर्रकन वळत दुर्वास ॠषी सर्वांच्या अंगावर एकदम ओरडले, ''कुणाचा जयजयकार करता? इथं ओरडण्यापेक्षा शेतात जाऊन ओरडा. धान्याची कणसं खाणारी पाखरं तरी उडून जातील. जा, इथून चालते व्हा! राजा, हा असला गोंधळ मला मुळीच चालणार नाही. मला संपूर्ण एकान्त पाहिजे!" ते परत कडाडले.

ते दुर्वास ॠषी होते तर! अत्री ॠषींचे पुत्र! महासती अनसूयेचे पुत्र! योगिराज दत्तात्रेयांचे बंधू! आर्यावर्तातील सर्व कोपिष्ट ॠषींचा कोप ज्यांच्या कमंडलूत सहज सामावला असता असे दुर्वास!

**

# नऊ

लागलीच वाड्यासमोर एक पर्णकुटी उभारण्यात आली! एक विचित्र दृश्य दिसू लागलं. एका वैभवशाली वाड्यासमोर एक वाळल्या गवताची पर्णकुटी उभी राहिली! वाड्यात येणारे सगळे अभ्यागत त्या पर्णकुटीकडे आश्चर्यानं पाहू लागले. जिथं सैनिकांची संचलनं होत होती तिथं दुर्वास ऋषींचे गंभीर मंत्रोच्चार घुमू लागले. "ॐ भूर्भुव:....." भल्या पहाटे उठून दुर्वास ऋषी अश्वनदीत स्नान करून येत आणि मंत्रसाधनेसाठी पूर्वेकडे तोंड करून बसत. समोरच्या यज्ञकुंडात निरनिराळ्या समिधा टाकत. त्यांच्या धुरानं राजवाड्यातील लोकांच्या डोळ्यांत पाणी उभं राहू लागलं.

दुर्वास ऋषी! किती विक्षिप्त आणि हेकेखोर होतं त्यांचं वागणं! ज्यानं जग निर्माण झालं आहे त्या दिव्यशक्तीवर ते विजय मिळविणार होते! पंचमहाभूतांना ते दास करणार होते! मनाच्या कुठल्या अवस्थेत ते होते हे कुणालाही सांगता आलं नसतं. क्षणात एखाद्या लहान बालकासारखं ते मला दूध हवं म्हणून हट्टाला पेटत, तर कधी-कधी दोन-दोन दिवस ते काहीच खात नसत. क्षणात ते एखाद्या दुर्मीळ अशा झाडाच्या समिधा मागत, तर कधी असलेल्या फेकून देत. कधी-कधी ते एकसारखे अंगावर खेकसत, तर कधी-कधी दोन-दोन दिवस एक शब्दसुद्धा बोलत नसत.

अशा या दुर्वास ऋषींची सेवा करण्याचं काम बाबांनी माझ्यावर टाकलं होतं! त्यांनी मला अशी समज दिली होती की, दुर्वास ऋषी कितीही चिडले तरी तू त्यांना उलट बोलू नकोस. मुखावर कंटाळा दिसू देऊ नकोस. त्यांच्या सेवेत काहीच कमी पडू देऊ नकोस. कधी-कधी ऋषींचं वागणं असह्य होई. मला ते सरळ आपले पायसुद्धा धुवायला सांगत! त्यांच्या हाताखाली इतके आणि असे काम पडे की, शरीर थके, मन कोमेजे, पण बाबांच्या समाधानासाठी मी तेही करीत असे. धुतलेले पाय पुन्हा धुवावे लागत! पुन्हा वर आरडाओरडा निराळाच! ती सगळी पर्णकुटी जाळून उद्ध्वस्त करून आपण सरळ मथुरेला निघून जावं, असं मला वाटे. या विक्षिप्त माणसाच्या सहवासात जास्त दिवस राहिले, तर मला वेड लागेल की काय अशी मला भीती वाटू लागली!

एक नाही दोन नाही चांगले दहा महिने मी हे विचित्रपणाचं सगळं वागणं सहन केलं! रोज रात्री मी अर्धवट झोपेतून उठून बसत असे, कारण पहाटे दुर्वासांची पूजनाची तयारी करावी लागे. अर्धवट झोपेमुळे माझे डोळे लाल दिसू लागले. मी कृश होत चालले. माझी ती अवस्था बघून धात्री दुर्वासांच्या नावानं बोटं मोडू लागली.

शेवटी शेवटी दुर्वास ऋषी पर्णकुटीच्या बाहेर पडेनासे झाले. शेवटचे दोन महिने तर ते पूर्णत: अबोल होते. नुसतं दूध आणि फळं हाच त्यांचा आहार असे. रात्री न झोपता ते एकसारखे रात्रभर मंत्र पुटपुटू लागले. मला त्यांच्या त्या जागरणांची भीती वाटू लागली. हा ऋषी त्या शक्तींवर विजय मिळविण्याऐवजी या शक्तींमध्येच मिसळून जाणार की काय? काय निघणार आहे या यज्ञातून? काय करणार आहेत हे दुर्वास त्या तेजांना दास करून? मानवाला ते तेज कधी झेपेल काय? असंख्य प्रश्नांनी माझं मन दिवसभर अस्वस्थ असे. कुणीकडे जरा इकडे-तिकडे जावं म्हटलं तरी ते अशक्य असे;

कारण ते पर्णकुटीतून केव्हा हाक मारतील याचा नेम नसे. कधी काय मागतील ते सांगता येत नसे.

एका पौर्णिमेच्या दिवशी मी असाच विचार करीत झोपी गेले. त्या दिवशी मला गाढ झोप लागली होती. पहाटे जागी झाले ते एका मोठ्या आवाजानंच. पर्णकुटीतून दुर्वास ॠषी एकसारखे ओरडत डत होते. नुसतं दूध पिऊन आणि फळं खाऊनही त्यांचा आवाज विजेच्या कडकडाटालाही लाजवील असा कणखर होता! आनंदानं ते आरोळ्या मारीत होते,

"कुंतिभोजाऽऽ कुंतिभोजाऽऽ!"

मी गडबडीनं उठले आणि आत गेले. त्यांनी आपले डोळे उघडले. त्यांच्या डोळ्यांकडे बघणं मला शक्य होत नव्हतं! अतिशय दीप्तिमान तेजाचे ते दोन गोल होते! मला बघताच एक अस्पष्टशी स्मिताची लकेर त्यांच्या मुखावर चमकली. घनगंभीर आवाजात ते म्हणाले, ''कुंती, माझी सेवा केल्याचं फळ आज तुला मिळेल! सगळं जग यापुढं तुला वीरांची जननी म्हणून ओळखेल! ये. बैस." मी तशीच उभी राहिले. ते गरजले, "बैस."

मी त्या यज्ञाच्या वेदीजवळ बसले. त्यांच्या बोलण्याचा काही म्हटल्या काहीच अर्थ कळला नाही मला.

ते म्हणाले, ''कुंती, या विश्वातली पंचमहाभूतं आज माझ्या मंत्रांच्या धाग्यांनी मी रथाच्या अश्वांसारखी करकचून बांधून टाकली आहेत! माझा प्रयोग यशस्वी झाला आहे! हे आचमनाचं पाणी घे!''

''पण मी...?'' माझं मन भीतीनं गारठून गेलं.

''कुंती, तू कुणापुढं उभी आहेस याची कल्पना आहे काय?'' त्यांचे डोळे गरगरू लागले. मला ते जाळून टाकणार होते की काय?

मी मुकाटपणे आचमनाचं पाणी घेतलं. ते घडाघडा मंत्र म्हणू लागले. ते शब्द मी पूर्वी कधीही ऐकले नव्हते तरीही ते कानांवाटे माझ्या मनाच्या पडद्यावर स्पष्टपणे उमटू लागले! ते शब्द ऐकताना मला एक अननुभूत आनंद वाटत होता. ते शब्द म्हणजे अमृताच्या लहरी होत्या. माझ्या शरीरातील कणन्कण हलका झाला. क्षणभर मी म्हणजे ते शब्दच आहे, असं मला वाटू लागलं! डोळ्यांपुढे धवल प्रकाशाची वलयं दाटली.

मंत्र म्हणून होताच विजयी वीरासारखे दुर्वास उठले. माझ्या मस्तकावर हात ठेवून ते म्हणाले, ''कुंती, या आर्यावर्तात तुझ्यासारखी दुसरी स्त्री होणार नाही! ज्या-ज्या शक्तीचं स्मरण करून तू हे मंत्र म्हणशील ती-ती शक्ती मानवरूपात क्षणात दासासारखी तुझ्यासमोर उभी राहील आणि तुझ्या पोटी आपल्यासारखाच तेजस्वी पुत्र निर्माण करून निघून जाईल. ही दुर्वासाची वाणी आहे, लक्षात ठेव! जा!''

माझ्या कसल्याच उत्तराची वाट न पाहता किंवा बाबांना भेटण्यासाठी न थांबता ते आले होते तसेच, कमंडलू नाचवीत मत्त हत्तीसारखे पर्णकुटीबाहेर पडले. क्षणार्धात ते दिसेनासेही झाले. राजवाड्याच्या तटाबाहेर पडून उत्तरेकडे निघून गेले.

यज्ञकुंडातील राख वायुलहरींबरोबर पर्णकुटीभर पसरू लागली. वाऱ्याच्या एका लहरीनं दुर्वास बसले होते ते व्याघ्रचर्म उलटं-सुलटं झालं!

**

# दहा

दुर्वास ऋषी निघून गेले. वाड्याला परत वाड्याची कळा आली. धात्रीनं सुटकेचा निःश्वास टाकला. बाबांच्या छातीवरचं दडपण दूर झालं. दुवार्सांनी मला जाताना अभिचारासह तो... 'देवहुती' मंत्र दिला आहे, हे कुणालाच माहीत नव्हतं.

वाड्यावरचे सेवक दुर्वास ऋषींना विसरूनसुद्धा गेले. दुर्वास म्हणजे भोजपुराच्या राजवाडयावर क्षणभर उठलेलं एक वादळ ठरलं. पण त्यांचे ते शब्द माझ्या कानांत नेहमीच घुमत. "तू वीरांची जननी होशील." माझं मन त्या शब्दांनी लाजून चूर होई. कधी-कधी मी दिवसभर एकही शब्द बोलत नसे. मंत्राचे ते शब्द माझ्या कानात स्पष्टपणे ऐकू येऊ लागत. ते म्हणावे असं सारखं वाटे. पण मोठ्या संयमानं मी ते आवरी. एखाद्या गोमाशीनं कुत्र्याचा अविरत पाठलाग करावा तसे ते माझ्या मनाचा पाठलाग करीत. माझ्या मनाच्या आतल्या या संघर्षामुळे बाहेरच्या दैनंदिन व्यवहारात काही-काही वेळा फार मजेदार चुका होत. दासदासींना मी एकदम 'अहो-जाहो' म्हणून बोलवी. सर्व जण माझ्याकडे आश्चर्यानं पाहत. लागलीच मी स्वतःला सावरीत असे. असे दिवसांमागून दिवस गेले. नगरावर वसंतऋतूची कृपादृष्टी वळली. निरनिराळ्या रंगीबेरंगी फुलांनी भोजपुराचा आसमंत नटून गेला. सर्वत्र संमिश्र सुगंध दरवळू लागला.

वसंत! वसंत म्हणजे वर्षाऋतूच्या शेवटच्या इंद्रधनुष्याचं पृथ्वीवर पडलेलं प्रतिबिंब! वसंत म्हणजे निरनिराळ्या पक्षयांच्या रूपानं सप्तस्वरांचे पावे घेऊन पृथ्वीवर अवतरलेले आकाशातील सप्तर्षी! वसंत म्हणजे नुकत्याच खोडकर वर्षाऋतूनं आपल्या सरींच्या असंख्य बोटांनी गुदगुल्या केल्यामुळे पृथ्वीरूपी बालकाच्या गालावर पडलेली गोड खळी! तारुण्यात पदार्पण करणाऱ्या मनाला अशा वसंताचं नेहमीच आकर्षण असतं. मी नेहमी वाड्याच्या सौधावर उभी राहून विविध फुलांनी डवरलेलं आजूबाजूचं निसर्गसौंदर्य पाहत असे.

अशीच एकदा पहाटे मी सौधावर उभी होते. तो दिवस रविवारचा होता. मंद- मंद वायुलहरी अश्वनदीचं झुळूझुळू संगीत मला ऐकवीत होत्या. सगळं नगर हळूहळू जागं होत होतं. गाईंच्या गळ्यांतले घंटानाद ऐकू येत होते. पक्षयांचा किलबिलाट चालला होता. इतक्यात पूर्व दिशा उजळू लागली. सूर्यदेव पूर्व- क्षितिजावर हळूहळू वर येऊ लागले. त्यांच्या स्पर्शानं प्रत्येक वस्तूत चैतन्य भरलं जाऊ लागलं. माझ्या अंगातून एक गोड शिरशिरी चमकून गेली. आस्ते-आस्ते ते तेज पूर्णाकार घेऊन पूर्वेकडे उभं राहिलं.

किती तेजस्वी दिसत होतं ते! त्या तेजाचे असंख्य कण पृथ्वीचा कणन्कण उजळीत होते. माझ्या मनात एक विचित्र विचार आला. आपणही या धरतीसारखे विशाल असतो, तर या तेजाच्या सर्व कणांनी आपल्या सर्वांगालाही स्पर्श केला असता! उकळणारं पाणी वरखाली गोल फिरतं तसं मंत्राचे शब्द माझ्या मनात गोल फिरू लागले. माझं सगळं शरीर त्या मंत्रांच्या शब्दांनी मंत्रमय झालं आहे, असं वाटू लागलं.

कुतूहलाचं वासरू संयमाच्या कंठबंधाला हिसके देऊ लागलं. या मंत्रापासून काय होणार आहे? त्या सूर्यदेवांचं मी आता चिंतन केलं तर ते इथं येतील काय? कसं शक्य आहे ते? बघू या तरी या मंत्रात काय सामर्थ्य आहे ते? दुर्वास ऋषी साधना-साधना म्हणत; तिचं सामर्थ्य तरी पाहू या. मी डोळे मिटले. क्षणभर त्या तेजस्वी शक्तीचं स्मरण केलं. हात जोडून मी भराभर मंत्रोच्चार करू लागले! 'ॐऽऽ हिरण्ययेन पात्रेन...' त्या एकएका शब्दाबरोबर माझं शरीर हलकं होत होतं. मनाची जाणीव नाहीशी होत चालली. मंत्राचे शब्द एकापेक्षा एक असे वरचढ आवाजात माझ्याकडून म्हटले जाऊ लागले. शरीराची जाणीव नष्ट होऊ लागली! मन! तेही उरलं नाही. सगळ्या वस्तू दिसेनाशा झाल्या. मी कुंती आहे, मी सौधावर उभी आहे, मी मंत्र म्हणते आहे, हे सगळे जाणिवेचे सघन बंध खडाखड निखळून पडले! मी म्हणजे केवळ एक तेजस्वी ज्योत झाले! त्या ज्योतीला इतर काही दिसत नव्हतं. पूर्वेकडून एक अतिशय तेजस्वी कांतीचा देदीप्यमान पुरुष येत होता! त्यांच्या कानांत प्रकाशवलयं फेकणारी दिव्य कुंडलं होती. केस सोनेरी वर्णात चमकत होते. डोळ्यांतून तेजस्वी प्रकाशलहरी बाहेर पडत होत्या. मुद्रेभोवती तेजाची आभा पसरली होती. अंधाराचं राज्य आपल्या ऐटदार चालीनं जाळीत तो सौधाकडे येऊ लागला. दशदिशांनी असह्य किरणशलाका उधळीत! माझ्या शरीररूपी ज्योतीला त्या देदीप्यमान पुरुषानं स्पर्श केला. ज्योत थरथरली. विरोधासाठी मान हलवून ती डोलली. दोघांचा अबोध अशा भाषेत एक संवाद झाला, पण ज्योतीचं काहीच चाललं नाही. तो आकाशपुरुष ज्योतीला भेदून पलीकडे गेला. एका महान तेजाचं संक्रमण झालं!

माझ्या शरीरातील कणन्कण सणसणीत तापला होता. मी हळूहळू अस्तित्वाच्या जगात येत होते, पण तापलेल्या शरीरामुळे माझं शरीर मलाच असह्य झालं. डोळ्यांपुढं तेजाची वलयं गरगर फिरत होती. पायातील शक्ती गेल्यासारखं वाटत होतं. उभी राहिले, तर मी सौधावरून धाडकन खाली कोसळेन या भीतीनं मी मटकन खालीच बसले. माझ्या पाठीवर कुणीतरी हात टेकविला. टेकविला आणि तो झटकन पुन्हा वर उचलला. मी वळून पाहिलं. ती धात्री होती! चमत्कारिक दृष्टीनं ती माझ्याकडे पाहत होती. डोळे विस्फारून ती म्हणाली, "राजकुमारी, किती ज्वर भरला आहे तुमच्या अंगात! चला, प्रथम तुम्हांला औषधी देते."

मी सौधावरून खाली उतरू लागले. त्या पायदंडचा उतरताना उगाच मला वाटलं की, मी उंच आकाशाच्या स्वर्गातून – पृथ्वीवर की, पृथ्वीच्याही खाली खोल पाताळात जाते आहे!

**

# अकरा

त्या दिवसापासून मला जे-जे काही वाटत गेलं ते सगळं अतर्क्य होतं. माझं मलाच आश्चर्य वाटत होतं की, मी अशी का वागत होते. मला कुणाशीही एक शब्दही बोलावासा वाटेनासा झाला. नेहमीच माझ्या डोळ्यांपुढं तेजस्वी वलयं फिरू लागली. एकसारखी मी त्या दुर्वास ऋषींच्या पर्णकुटीत जाऊन उगाच बसू लागले.

वाड्यातील दासदासींना माझ्या वागण्याचं कोडे पडलं. ती सगळी माझ्यासमोर येऊन अनेक प्रकारांनी माझं मन रमविण्याचा प्रयत्न करू लागली, पण माझं मन नेहमी आकाशात उंच भराऱ्या मारू लागलं. उगाच बाहेर प्रकाशात बसावं, असं वाटू लागलं. नेहमीच मी सौधावर उभी राहून सूर्यदेवांकडे पाहू लागले. ते डोक्यावरून मागं येत. त्यांच्या तप्त किरणांनी माझी पाठ खरपूस तापल्याशिवाय मला तिथून उठवत नसे! रोज तीन-तीन घटका हा कार्यक्रम सुरू झाला. रात्री मी माझ्या महालातून आकाशात पाही. आकाशात असंख्य तारका लुकलुकत असत. मला त्या तारकांची फुलं खुडावी असं वाटे! जे-जे प्रकाशमान होतं त्या-त्या सर्वांची मला अनावर ओढ लागली! माझं अंग सोनेरी दिसू लागलं.

बरेच दिवस मनाच्या या विचित्र अवस्थेत गेले. माझ्या सर्वांगात आमूलाग्र बदल पडत होता. एकदा मी अशीच कक्षातून फिरत होते. कुणीतरी दासीनं आणून दिलेलं सुवर्णचंपकाचं फूल हुंगत होते. इतक्यात धात्री आली. तिच्याशी काहीतरी बोलताना ते फूल माझ्या हातातून सुटून खाली पडलं. ते उचलण्यासाठी मी खाली वाकले. माझं सर्वांग जड झालं आहे, असं मला वाटलं. कसतरी ते फूल मी वर उचललं आणि परत हुंगू लागले.

धात्री माझ्याकडे विचित्र दृष्टीनं पाहत होती! तिच्या वृद्धत्वानं आधीच आठ्यांनी जाळीदार झालेल्या कपाळावर आणखी एक जादा आठी उठली. आपल्या तीक्ष्ण अनुभवी डोळ्यांनी ती माझं सगळं शरीर चाचपते आहे, असं मला वाटू लागलं! आपल्या भुवयांचं जीर्ण कातडं उंचावत ती म्हणाली, ‘‘राजकुमारी, माझं वय मला धोका देणार नाही. मी एक प्रश्न विचारू का?’’

‘‘धात्री, आजपर्यंत प्रश्नासाठी तू माझ्याकडे कधी अनुज्ञा मागितली आहेस का?’’ मी तिला उलट विचारलं.

‘‘नाही, पण राजकुमारी, हा प्रश्न तुम्हाला कधीच आवडणार नाही. या म्हातारीला वेड लागलं आहे, तिच्या पाठीवर आसुडाचे फटके मारून हिला विन्ध्याच्या अरण्यात सोडा; अशी आज्ञा सोडाल तुम्ही!’’

‘‘धात्री, तू वाड्यावरची सर्वांत वृद्ध आणि सर्वांत प्रामाणिक दासी आहेस हे मी विसरले नाही अजून. विचार, तुला काय विचारायचं असेल ते स्पष्टपणे.’’

परत एकदा तिची वृद्धदृष्टी माझ्या सर्वांगावरून फिरली. थरथरत्या माननें तिनं विचारलं, ‘‘राजकुमारी, तुम्ही माता होणार हे....!’’

‘‘धात्री, कुणासमोर तू बोलते आहेस याची जाणीव आहे काय तुला?’’ मी

मोठ्यानं किंचाळले, अंगावर वळवळता सर्प पडल्यासारखी!

"राजकुमारी, माझे केस पिकले आहेत. या वाड्यातील तीन राजपिढ्या मी बघितल्या आहेत. आपलं शरीर समोरच्या दर्पणात नीट पारखून बघा." आपली मान जास्तच हलवीत ती कक्षाबाहेर जाऊ लागली.

माता! त्या दोन अक्षरांच्या मुष्टियोद्धयांनी माझ्या मनाला निर्दयपणे बुकलायला सुरुवात केली. सगळा कक्ष माझ्याभोवती गरगर फिरतो आहे, असं मला वाटू लागलं. धरतीनं दुभंगून मला पोटात घेतलं असतं तरी बरं झालं असतं. माझं मन त्या भुयारातल्या पाकोळीसारखं देहाच्या भित्तीवर थडाथड आपटू लागलं. असाहाय्यपणे!

मी माता होणार होते! कौमार्यावस्थेत माता! मातृत्व हा स्त्रीला मिळणारा सर्वांत श्रेष्ठ वर आहे, पण मला मिळणारा हा वर शापासारखा नव्हता काय? दुर्वास ऋषींचे ते उद्गार माझ्या कानांत घुमू लागले. "तू वीरांची जननी होशील." त्यांच्या मंत्राचे तुटक शब्द कानांत निनादू लागले. 'ॐ ऽऽ हिरण्मयेन पात्रेन...' क्षणात माझ्या मनाच्या घुमटात बाबांचे ते शब्द घुमू लागले, "वीरांनी विजयाच्या धुंदीत जगावं आणि वीर कन्यांनी शीलासाठी मरावं!" शील! स्त्रियांचं अमोल लेणं! शील म्हणजे आर्यस्त्रीचा श्वासोच्छ्वास!

मध्येच उद्यानातलं ते चंडोल पक्षयाचं पिल्लू आपली चोच वासून ओरडू लागलं. चिर्रर, चिर्रर!

क्षणात मथुरेतून आणून मला इथं सोडून जाताना तातांनी काढलेल्या उद्गारांचे पडसाद शतगुणित होऊन माझ्या डोळ्यांपुढं फेर धरून नाचू लागले.

"तू एका क्षत्रिय राजाची मुलगी आहेस हे कधीच विसरू नकोस!"

क्षत्रियकन्या! शील! शब्दांचा मुसळधार पाऊस पडू लागला. स्वरांचे नाच सुरू झाले. शील! क्षत्रियकन्या! कानांवर हात ठेवून मी डोळे मिटून मोठ्यांदा ओरडले, "धात्री, थांब!"

ती परतली. माझ्यासमोर ती उभी राहताच मी तिला डोळे मिटूनच सांगितलं, "धात्री, मी राजकुमारी कुंती तुला सांगते आहे. जगातलं सगळ्यांत दाहक विष जे असेल ते संध्याकाळच्या आत माझ्या हातात पडलं पाहिजे."

माझ्यासाठी अन्य दुसरा कोणताही सुरक्षित मार्ग नव्हता!

"राजकुमारी," तिचा आवाज वीणेच्या तुटल्या तारेसारखा थरथरला.

"जा, ही राजकुमारीची आज्ञा आहे." मी कठोरपणे सांगितलं.

"पण –

" "धात्री, दासींनी आज्ञा पाळायची असते. उपदेश करायचा नसतो. जा!"

खाली मान घालून ती कक्षाबाहेर निघून गेली.

**

# बारा

त्यानंतर धात्री माझ्या कक्षात कधी आलीच नाही. आपल्या राजकुमारीला विष आणून देण्याचं धैर्य तिच्या म्हाताऱ्या काळजात नव्हतं. मी तिला अनेक निरोप पाठविले, पण तिनं कामाच्या नावावर ते उडवून लावले. काळ गेल्या प्रत्येक पळाला सहस्त्र जिभांनी चाटत खायला येतो आहे, असं वाटत होतं. कक्षाबाहेर पडणं मी सोडून दिलं होतं.

माझ्या मनात एकच एक विचार पक्का होत होता. मृत्यू! तडफडणाऱ्या जिवाच्या जाचण्या कायमच्या बंद करण्यासाठी मला मृत्यूशिवाय दुसरा मार्ग नव्हता. मृत्यू! मरणप्राय मानसिक वेदनांना मरण देणारा मृत्यू! प्रतिष्ठेच्या कंठबंधानं बांधलेल्या जिवाला अज्ञाताच्या अनंत प्रदेशात नेणारा मृत्यू! जगातली सगळी काळी दृश्यं आपल्या काळ्या जिभांनी सहज पचविणारा मृत्यू! मनाच्या असल्या कोंदटलेल्या अवस्थेत मृत्यूशिवाय अन्य दुसरा कोणता आश्रय असणार? कारण राजकुमारी कुंतीला सगळे जण मान देत होते, तिचा प्रत्येक शब्द झेलत होते, पण – पण उद्या माता झालेल्या कुंतीला त्यांनी काय म्हटलं असतं? कुलटा म्हणून ते तिच्या तोंडावर थुंकले असते. दगडांनी ठेचून त्यांनी तिची नगरातून धिंड काढली असती. लोक तरी किती विचित्र असतात! मातृत्वाची ते नेहमी महती गातात, पण याच मातृत्वावर ते कधी-कधी पापाची राजमुद्रा ठोकतात. याच मातृत्वाला ते सामाजिक संकेतांच्या सहस्त्र शूलांनी छिन्नविच्छिन्न करतात! मी कुमारी होते आणि आता माता होणार होते. समाजानं त्या मातृत्वाचं कसं स्वागत केलं असतं? मला मंत्रापासून पुत्रप्राप्ती झाली आहे, हे धडधडीत सत्य त्यांना कधीतरी पटलं असतं काय? प्रत्यक्ष दुर्वासांनी येऊन नगराच्या चौकात उभं राहून कंठरवानं सांगितलं असतं, तरी ते कुणालाही पटलं नसतं. कशाला आले होते दुर्वास या नगरात? काय मिळवलं त्यांनी माझ्या जीवनाशी हे असं महाभयानक द्यूत खेळून? त्यांच्या त्या भयानक प्रयोगात माझा काय संबंध होता? पण असं म्हणून तरी माझी सुटका आता कुठं होणार होती? जगात सगळ्याच गोष्टींत सुसंगती कुठं असते? निरपराधी माणसांना दुसऱ्या कुणाच्यातरी अपराधाचं प्रायश्चित्त भोगावं लागतंच नाही काय? मी त्यांपैकीच एक नव्हते काय? प्रश्नांच्या असंख्य साळुंक्या माझ्या मेंदूच्या घायाळ नागिणीला टोचत होत्या. ती असाहाय्यपणे कळवळून फूत्कार टाकत होती... मृत्यू! मृत्यू!

मी ताडकन उठले आणि जोरात एक टाळी वाजविली. एक दासी तत्परतेनं आत आली. तिला मी सांगितलं, "अशीच जा आणि नगरातून राजवैद्यांना बोलावून आण. जसे असतील तसे."

ती निघून गेली. अर्ध्या घटकेतच राजवैद्य माझ्या कक्षात प्रविष्ट झाले. वाकून अभिवादन करून ते म्हणाली, "राजकुमारी, काय आज्ञा आहे?"

"वैद्यराज, दुर्वास ऋषींच्या यज्ञाची सांगता करायची आहे! त्यासाठी जगातील सगळ्यांत प्रभावी विष हवि म्हणून वापरायचं आहे! या दासीबरोबर ते ताबडतोब लावून

द्या.''

दुर्वास ॠषी म्हणताच वैद्यराज अगोदर गप्प बसले! त्यांनी पुढं काहीच प्रश्न विचारला नाही! कारण दुर्वास ॠषी कोणतीही दुर्मीळ वस्तू केव्हाही मागत असत हे त्यांना माहीत होतं.

''जशी आज्ञा,'' म्हणत ते कक्षाबाहेर निघून गेले.

थोड्या वेळातच ती दासी कुपीतून विष घेऊन आली. मी सुटकेचा नि:श्वास टाकला. आता मला कुणाच्याही हृदय जाळणाऱ्या कुत्सित दृष्टीला तोंड द्यावं लागणार नव्हतं. ती कुपी मी जपून एका कोनाड्यात ठेवली. माझ्या मरणप्राय यातनांचा अंत त्या कुपीत होणार होता.

**

# तेरा

त्या रात्री सगळीकडे सामसूम होताच मी मंचकावरून हळूच उठले. कोनाड्यातील ती विषाची कुपी हातात घेतली. मथुरेतल्या बाबांचं स्मरण करून मी त्यांना वंदन केलं आणि डोळे मिटून पुटपुटले, ''बाबा, तुमची पृथा एका क्षत्रिय राजाची कन्या आहे, हे कधीच विसरणार नाही. माझा हा निर्णय तुम्हाला खात्रीनं आवडेल.'' नंतर भोजपुरातील बाबांना आठवून त्यांनाही नमस्कार करून मी म्हणाले, "क्षत्रियकन्यांनी शीलासाठी मरावं, हे सत्य मी आज सिद्ध करते आहे. बाबा, मला आशीर्वाद आणि धैर्य द्या!''

क्षणभर मी डोळे उघडले. सगळीकडे नि:शब्द शांतता होती. थोड्याच वेळात मीही अशीच शांत होणार होते. हे निर्दय तरीही हवं-हवं वाटणारं जग आपणाला परत पाहायला मिळणार नाही म्हणून क्षणभर माझं मन भरून गेलं, थरकलं! पण मी त्याला आवरलं. आईचं स्मरण करून मी म्हणाले,

''आई, तुझ्या पृथेचा जन्म लक्ष-लक्ष दु:खं सहन करण्यासाठीच आहे का गं? आज या दु:खाचा अंत होणार आहे. मला आशीर्वाद दे."

डोळे मिटून मी ती कुपी घशात ओतली आणि मंचकावर अंग झोकून दिलं. आता सकाळी नगरात हाहाकार उडणार होता.

**

# चौदा

मी ती विषारी कुपी प्याले होते – पण – पण तिचा काहीच उपयोग झाला नव्हता! मृत्यूसुद्धा आपली कृपादृष्टी माणसावर माणसाला हवी तेव्हा वळवायला तयार नसतो. माझ्या पोटात आता आगीचा डोंब उसळेल अशी माझी कल्पना होती, पण नुसतं घशात चुरचुरण्यापेक्षा मला काहीच वाटलं नाही. अर्धा घटका मी मंचावर पडून होते, पण मला काहीच झालं नव्हतं. आत्यंतिक मानसिक त्रासानं झापड मात्र येत होती. मी ताडकन उठून बसले. भीतीनं माझं अंग शहारलं. मी कोण होते? विषानंही न मरणारी? एकदम धावेसारखी तापणारी!

शंकांनी मन गारठून गेलं. जीवन मला असह्य झालं होतं, मरणं मला अशक्य होतं. विषाचाही माझ्या शरीरवर परिणाम होत नव्हता! मी कोण होते?

द्वार उघडून मी कक्षाबाहेर आले. दासींच्या दालनात शिरले. तिथं अनेक दासी झोपल्या होत्या. एका कोपऱ्यात धात्रीही अंगाची मुटकुळी वळून पडली होती. मी तिला गदागदा हलवून जागं केलं.

मला पाहताच ती दचकली. तिला हाताला धरून तशीच ओढत मी माझ्या कक्षात आणलं. कुणाच्यातरी साहाय्याची मला अत्यंत गरज होती! कक्षात येताच मी झालेल्या सर्व घटना तिला सांगितल्या. तिचे खांदे गदागदा हलवून कळवळून विचारलं, ''धात्री, तूच सांग आता, मी कुठं जाऊ? काय करू? मी मरू शकत नाही. या अवस्थेत जगण्याचा मला कोणताच अधिकार नाही.''

माझ्या पाठीवर आपला खरबरीत हात प्रेमानं फिरवीत ती म्हणाली, ''राजकुमारी, धीर धरा. या कक्षाबाहेर मात्र आतासारखं पुन्हा कधीच येऊ नका. तुम्हाला या स्थितीत कोणीच बघता कामा नये.''

**

# पंधरा

तेव्हापासून धात्री माझ्याच कक्षात राहू लागली. ती कुणालाच म्हणून कक्षात घेत नसे. दिवसांमागून दिवस जात होते. पौर्णिमेच्या चंद्रासारखं माझं शरीर कणाकणांनी फुलत होतं. मन मात्र ग्रहणाच्या चंद्रासारखं चिंतेनं ग्रासलं होतं. एक- एक दिवस मला एक-एक युगासारखा वाटत होता.

नुकताच शरत ॠतू संपला असूनही एका रात्री एकदम आकाश भरून आलं. वादळी आवर्त चोहोबाजूंनी घोंघावत राजवाड्यावर आदळू लागली. मुसळधार सरींवर सरी कोसळू लागल्या.

मध्यरात्री एकदम माझ्या पोटात दुखू लागलं. मंचकावर मी असह्य वेदनांनी तळमळू लागले. परांच्या उशांचा चुरगळून चोळामोळा होऊ लागला. वेदनांच्या असंख्य सुयांनी माझ्या शरीराच्या वस्त्राचे टोक उसवले जाऊ लागले! धात्रीच्या वृद्ध डोळ्यांतही भीतीची भयाण छटा पसरली. बाहेर विजांचा कडकडाट आणि वाऱ्याचा घोंघाट चाललाच होता. प्रसूतीच्या असह्य यातनांनी मी कण्हत होते.

एका घटकेनंतर एका चिमण्या जिवाचं ओरडणं सुरू झालं. त्या वाड्यात पाच तपांनंतर हे रडणं ऐकू येत होतं! मात्र बाहेरच्या कडकडाटात ते कुणालाही ऐकू जात नव्हतं. मी माता झाले! मातृत्व! स्त्रीचा सर्वांत श्रेष्ठ अलंकार! प्रसूतिवेदनेच्या मुशीतून तापून निघालेलं सोनं! निसर्गाचं सगळ्यात मंगल प्रकटीकरण! मी डोळ्यांत जीव आणून त्या चिमण्याकडे पाहिलं. आनंदाची मोरपिसं माझ्या मनावर आपली हळुवार बोटं फिरवू लागली. किती देखणं होतं त्याचं रूपडं! उगवत्या सूर्यासारखं!

मला पाहताच त्यानं आपलं रडणं थांबविलं. इवल्याश्या डोळ्यांनी ते माझ्याकडे टिक-टिक पाहू लागलं. त्याच्या कानांत निळसर-तांबसर प्रकाश फेकणारी दोन मांसल कुंडलं होती!! कुतूहलानं मी ती चाचपून पाहिली. जास्वंदीच्या लालचुटूक कळ्यांसारखी दिसत होती ती! त्याचं लुसलुशीत गोंडस अंग सोनेरी रंगाचं होतं. केसांची दाट कुरळी, सोनेरी झुलपं वाऱ्याच्या झुळकीबरोबर हलत होती. कुंभासारख्या गोल मुखाभोवती तेजाची आभा होती. आपल्या उजव्या पायाचा अंगठा ते चोखत होतं! निळे-निळे बिटके डोळे किलबिल करीत पुन:पुन्हा माझ्याकडे पाहत होते! मध्येच एक वाऱ्याची झुळूक आली त्याबरोबर ते खुदकन हसलं. त्याचं जावळ हाललं. गालावर एक गोड खळी पडली! ती पाहताच मी राजकुमारी आहे, एक क्षत्रियकन्या आहे, माझं हे कौमार्यातलं बालक आहे, हे सारं-सारं मी विसरून गेले. धात्रीच्या हातांतून मी त्याला ओढून घेतलं. आवेगानं! आणि त्याचे पटापट मुके घेतले. माझा स्पर्श होताच ते मला बिलगलं. माझ्या अंगावर धन्यतेचे रोमांच उभे राहिले. मातृत्व हीच स्त्रीची मुक्ती असते असं क्षणभर वाटलं!

त्याच्या मांसल स्पर्शानं मला पान्हा फुटला. त्याला पाजावं म्हणून मी मांडीवर घेतलं, पदराखाली त्याला झाकताच धात्रीनं माझा हात धरला! ती दबक्या आवाजात माझ्या कानात म्हणाली, "राजकुमारी, वेळ थोडा आहे. हा विजांचा कडकडाट चालू आहे,

तोपर्यंतच आपण बाहेर पडलं पाहिजे!''

''कुठं? आणि कशाला?'' मी घाबरून विचारलं.

''याला घेऊन तुम्हाला कधीच जगता येणार नाही.''

''म्हणून काय करायचं?''

''याला – याला तुम्ही टाकलं पाहिजे!''

''काय म्हणतेस तू धात्री? एका मातेला आपल्या नुकत्याच जन्मलेल्या मुलाचा त्याग करायला सांगते आहेस तू? अगं, त्याच्याकडे पाहा. या निष्पाप जिवानं कोणता अपराध केला आहे?''

''राजकुमारी, मला हे सगळं पटतंय; पण नगरातल्या लोकांना तुम्ही हे पटवून द्याल काय?''

''नाही! धात्री, मी प्राण गेला तरी याला सोडणार नाही. मी कुणाची राजकुमारी नाही, कुणाची कन्या नाही, मी माझ्या या छकुल्याची माता आहे! मी केवळ माता आहे!''

''राजकुमारी, पुत्रजन्माच्या आनंदातिशयानं भारावून जाऊ नका. उद्या महाराजांना हे कळलं तर काय होईल? मला सांगवत नाही. कदाचित – कदाचित – ''

''कदाचित काय?''

''ते तुम्हाला वाड्याबाहेर घालवतील. लोक तुम्हाला कुलटा-कलंकिनी म्हणून बोचून खातील. मथुरेचं द्वारसुद्धा तुमच्यासाठी कधीही उघडलं जाणार नाही!''

''मग मी काय करू धात्री? मी कुठं जाऊ?'' मी अगतिकतेनं मुसमुसू लागले.

''राजकुमारी, धीर धरा! याचा त्याग करण्याशिवाय तुम्हाला गत्यंतर नाही. त्याच्या आणि तुमच्या दोघांच्याही हितासाठी!''

''त्याग! कसा करू? माता असून हत्यारी होऊ?''

''लवकर आटपा, याचं रडणं कुणी ऐकलेलं नाही तोपर्यंतच आपण वाड्याबाहेर पडलं पाहिजे.''

''धात्री, किती निर्दय आहेस गं तू? एका मातेला तू मुलाचा गळा घोटायला सांगते आहेस.'' तिची मला घृणा वाटली.

''राजकुमारी, मला एका राजकुमारीचा गळा वाचवायचा आहे. तुम्हाला एवढं वाईट वाटत असेल तर बसा विचार करीत. मी चालले, पण एकदा हे महाराजांनी बघितलं तर – '' ती बाहेर जाऊ लागली.

माझं मन प्रेम आणि व्यवहार, कर्तव्य आणि भावना, वास्तवता आणि ममता या द्वंद्वात सापडलं. काय करावं? त्या मुलाला घेऊन एकट्यानंच कुठेतरी दूर निघून जावं, असं मला क्षणभर वाटलं, पण मी कुठं जाणार होते? कुणी मला आश्रय दिला असता? जगाच्या प्रलयात एक स्त्री लहान मुलाला घेऊन कुठं वणवण फिरणार होती? आणि तशी ती फिरली असती तरी तिच्या सुरक्षिततेचं काय? आपल्या लहानग्याचा त्याग तरी ती कसा करणार होती? कोणत्या हातांनी ती त्याला दूर लोटणार होती? समाज! कसल्या माणसांनी भरला आहे हा समाज? कुणी त्याला हे सर्वाधिकार दिले? हे अधिकार म्हणजे वास्तवतेच्या पाठीवरचं बांडगूळच नाही काय? तो ज्याला पाप-पाप म्हणतो ती त्याची पापाची आणि पुण्याची कल्पना सोयीची नाही काय? आजपर्यंत किती अबलांनी निर्दय अशा या समाजाच्या संकेतांनी उरीस्पोड केल्यामुळे विहिरींचें आणि नद्यांचे तळ गाठले

असतील? मीसुद्धा तेच करावं काय? पण छे, या मुलाचं रूप असामान्य आहे. हे जगलं पाहिजे. कसंही का होईना हे वाचवलंच पाहिजे! काय करावं? काय करावं?

मी धात्रीला हाक मारली, ‘‘धात्री, जाऊ नकोस गं. नाहीतर मी इथं मूर्च्छित होईन.’’ मी शारीरिक आणि मानसिक कोंडीनं घुसमटू लागले.

ती परतली आणि माझ्या पाठीवर हात फिरवून म्हणाली, ‘‘राजकुमारी, क्षत्रियकन्येला शोभेल असा हा एकच निर्णय आहे. आणा त्याला इकडे.’’ तिनं पुढं होत त्याला माझ्या मांडीवरून ओढून घेतलं. आपल्या चिमुरड्या मुठीत त्यानं माझा पदर घट्ट पकडला होता! तिनं तो कठोरपणानं सोडविला. माझं मन आक्रंदू लागलं. त्याला घेऊन ती बाहेर गेली.

थोड्या वेळातच खांद्यावर एक लाकडी पेटिका घेऊन ती परत माझ्या कक्षात आली. मंचावर तिनं ती ठेवली. तिच्या हातात मूल नव्हतं. मी घाबरून तिला विचारलं, ‘‘बाळाला कुठं ठेवलंस धात्री?’’ उत्तर देण्याऐवजी तिनं पेटिकेचं झाकण उघडलं. बाळ त्यात एका मऊ शय्येवर निर्धास्तपणे झोपलं होतं! त्याच्याभोवती अनेक प्रकारचे बहुमोल अलंकार तिनं पसरले होते, पण त्या सर्वांना लाजवील असा त्याचा रंग होता. पेटिकेच्या फटी मऊ मेणानं बुजविल्या होत्या. वरच्या झाकणाला एक लहान छिद्र होतं, पण तिनं त्याला त्या पेटिकेत का ठेवलं होतं? घाबरून मी तिला विचारलं, ‘‘धात्री, त्याला पेटिकेत कशाला ठेवलंस? काय, काय करणार आहेस तू आज?’’

‘‘राजकुमारी, ही पेटिका उजाडण्यापूर्वी अश्वनदीच्या कुशीत गेली पाहिजे. तिच्याशिवाय याला जवळ करण्याइतकं जगात कुणाचंही मन आज मोठं नाही!’’

‘‘धात्री – धात्री, मी राजकुमारी आहे की डोंबीण? तुला मुलाचं प्रेम जाणायला शिकवायला तो देव विसरला की काय?’’

‘‘राजकुमारी, या वाड्यावर माझी आठ मुलं सेवक म्हणून खपताहेत! मन दुबळं करू नका. आटपा लवकर.’’

तिचे शब्द बाणासारखे माझ्या काळजात घुसत होते. पण – पण सकाळी माझं भवितव्य काय होतं? राजवाडा की उकिरडा! यज्ञाचा पशू बळी देण्यापूर्वी करकचून बांधतात तसं माझं मन उलट-सुलट विचारांच्या दोरांनी करकचून आवळलं गेलं. बाळाला उचलावं आणि त्या धात्रीला लाथ मारून सरळ वाट फुटेल तिकडे निघून जावं असं वाटत होतं, पण तिचा तरी काय दोष होता? आपल्या राजकुमारीसाठी एक स्त्री असूनही ती किती मोठं धाडस करीत होती? हे सगळं करताना तिला काय आनंद वाटत होता? मग दोष कुणाचा होता? माझा? दुर्वासांचा? त्या जन्माला आलेल्या अजाण बालकाचा की मानवांना घोड्यासारखं पिटाळणाऱ्या काळाचा? परिस्थितीचा? समाजाचा? कठोर सामाजिक संकेतांचा? कुणाचा...?

माझं डोकं विचार करून-करून तडकणार की काय, असं मला वाटू लागलं. माझ्या असाहाय्य जीवनाची मला अत्यंत चीड आली. आज दैव एका राजकुमारीला अबला ठरविणार की काय? आज परिस्थिती मातेला मारेकरी ठरविणार की काय? असाहाय्यपणे मी माझं मस्तक कक्षाच्या भित्तीवर थडाथड आपटू लागले! माझ्या मस्तकातून रक्ताची एक चिळकांडी उडाली. धात्रीनं पुढं होऊन निकरानं मला मागं खेचलं. आपल्या अंशुकानं माझं मस्तक पुशीत ती म्हणाली, ‘‘राजकुमारी, हे रक्त भित्ती रंगविण्यासाठी नाही. या रक्तातून वीर निर्माण झाले पाहिजेत. या रक्ताचीच शपथ आहे तुम्हाला. आता एकही

शब्द न बोलता धैर्यानं माझ्याबरोबर चला कशा.''

तोंडात पदराचा बोळा कोंबून मी स्फुंदू लागले. धात्रीनं पेटिका उचलली. ती पुढं चालू लागली. सगळा वाडा पहाटेची साखरझोप घेत होता. बाहेरचं वादळ आता थांबलं होतं.

मी भुयाराच्या दालनापाशी आले. दगडी खुंटाळी तिनं उजवीकडे फिरविली. भुयाराचं द्वार एकदम उघडलं गेलं. तिनं पायदंड्या उतरायला सुरुवात केली. मला त्या दिवशी त्या भुयारात धडपडलेल्या पाकोळीची आठवण झाली! माझं मन आक्रंदू लागलं. 'आयुष्य म्हणजे एक भयाण भुयार आहे... आयुष्य म्हणजे एक भयाण भुयार आहे!' मलाही आज त्या भुयाराची वाट धरावी लागली होती. राजस्त्रियांच्या संरक्षणासाठी ठेवलेलं भुयार. आज मी माझ्या संरक्षणासाठी त्याचा वापर करीत होते, पण किती वेगळ्या अर्थानं, किती भयानक कठोर अर्थानं!

आम्ही भुयारातून अश्वनदीवर आलो. अश्वनदीचं पात्र नुकत्याच पडलेल्या पावसामुळे खळाखळ वाहत होतं. ते मळकट लाल पाणी बघताच माझं काळीज चरकलं. या घोंघावणाऱ्या पाण्यात माझ्या कोवळ्या जिवाला सोडायचं! ज्याला भूक लागल्यानंतर रडण्याशिवाय जगातलं दुसरं काहीच माहीत नाही त्याला त्या गर्जणाऱ्या पाण्याच्या लोटात लोटायचं! आणि ती पेटिका बुडून गेली तर? त्या पाण्याच्या पोटात काय-काय असेल? विशाल जबड्यांचे मासे, क्रूर मगरी -

धात्रीनं पुढं होत पेटिका पाण्याच्या प्रवाहात सोडून दिली! लाटांवर हिंदकळत-हिंदकळत ती दूर जाऊ लागली. माझ्या मनाचे बांध मातृत्वाच्या उद्रेकानं फुटले. ''माझं बाळ! माझं बाळ!'' म्हणत मी सरळ पाण्यात घुसू लागले. पुढं होत धात्रीनं मला थोपविलं. मी तिच्या हातांतून सुटण्यासाठी धडपडू लागले, पण तिच्या हातात त्या वेळी कुठून एवढी शक्ती आली होती कोण जाणे! स्वत:च्या शरीराची क्षिती न करता तिनं मला आवरलं. घट्ट मिठी मारून घोरपडीसारखी ती मला चिकटली. पेटिका हेलकावत दूर निघून गेली. घायाळ होऊन धात्रीच्या खांद्यावर मान टाकून मी स्फुंदू लागले. ती माझी पाठ थोपटत होती. सावरून तिनं मला वाड्यात नेण्यासाठी पुढं पाऊल टाकलं.

नदीकिनाऱ्यावर एक शुभ्र गाय वासरासह पाणी पीत होती. ते बघताच मी डोळे मिटून घेतले. ते वात्सल्य माझं हृदय पोखरू लागलं.

आज मातृत्वानं परिस्थितीपुढं हात टेकले होते. आज कुंतीच्या जीवनाला नित्य पोखरणारं एक शाश्वत सत्य तयार झालं होतं! आजपासून कुंती जिवंत मरण जगणार होती!

कक्षात येताच मी मंचकावर माझं शरीर झोकून दिलं. अत्यंत क्षीण आवाजात मी धात्रीला सांगितलं, ''नगरातील चांगल्या कोळ्याला बोलावून आण आणि ती पेटिका कुणाला सापडते यांचा शोध घ्यायला सांग. मला एकटीला सोडून तू आता ताबडतोब इथून जा, चालती हो. मला एकान्त पाहिजे.'' माझं मुख मी परांच्या उशीत खुपसलं. उबदार असूनही त्या उशीचा स्पर्श मला थंड; थंडगार वाटू लागला. अश्वनदीच्या लाटांसारखा! हमसून-हमसून क्रंदताना मला गौप्यस्फोटाच्या भीतीनं कंठातून आवाजही काढता येईना. माझ्या घुसमटलेल्या श्वासात निरागस पृथा टाचा घासून तडफडू लागली. पावसाच्या वर्षावामुळे राजवाड्याभोवतीच्या कदंब वृक्षावरचे रातकिडे दिवस असूनही अथकपणे ओरडत होते! चीत्कारत होते! किर्रर किर्ररऽऽऽ!

**

# सोळा

त्या दिवशी एकसारखी मी रडतच होते. पाखराच्या पिल्लाला घरट्यात पोहोचवा म्हणणाऱ्या हळव्या पृथेनं आपल्या छबुकल्याला मात्र आज स्वत:च्या हातांनी दूर लोटलं होतं! ते मूल कुठं जाईल? कुणाच्या हाती लागेल? की वाहत-वाहत सरळ ते सागराला मिळेल? तसं झालं तर? अनेक शंकांनी माझं मन घायाळ झालं. मान वर करावी असंही वाटत नव्हतं. कुणालाही तोंड दाखविण्याचं धैर्य होत नव्हतं.

रात्री कुणीतरी कक्षात समई पेटवून गेलं. थोड्या वेळानंतर कुणीतरी आत आलं. माझ्या पाठीवर हळुवार हात फिरविला. मला वाटलं ती धात्री असेल म्हणून मी तिच्यावर ओरडले, "धात्री, चालती हो इथून!" तिचा स्पर्शसुद्धा मला नको होता.

"मुली, वर बघ!" मी दचकले. ते बाबा होते! समईच्या अंधूक प्रकाशात उभे होते. कक्षावर धात्रीचा पहारा नसल्यामुळे ते सरळ आत आले होते! मी डोळे पुसत त्यांच्याकडे पाहिलं. भीतीनं माझं मन पार गारठून गेलं. काय-काय समजलं होतं त्यांना? धात्रीनं एक दिवसही दम धरला नाही की काय? आता काय-काय ऐकावं लागणार? इतकं सर्व करूनही माझं भवितव्य उघडं पडणार की काय?

माझा खांदा थोपटीत ते शांतपणे म्हणाले, "कुंती, तुझ्या पित्याचं मथुरेहून आजच भूर्जपत्र आलं आहे. त्यानं तुझ्या स्वयंवराची मांडणी करायला सांगितलं आहे! त्याची तीव्र इच्छा दिसते आहे तशी!"

मी सुटकेचा नि:श्वास सोडला! काहीतरी बोलायचं म्हणून मी म्हणाले, "जशी त्यांची इच्छा आणि तुमची आज्ञा!"

"मला माहीत आहे, मथुरेच्या आठवणीनं तुला दु:ख होत होतं. आता ते थोडं हलकं होईल. तुझे माता-पिता तुला लवकरच भेटतील. तील. पूस ते डोळे! शोक आवर." त्यांना काहीसुद्धा कळलं नव्हतं! ते काय बोलत होते ते मलाही धड कळत नव्हतं!

**

# सतरा

स्वयंवराची तयारी सुरू झाली. बाबांना मी 'जशी तुमची आज्ञा' असं म्हटल्यामुळे त्यांनी माझी संमती आहे, असंच गृहीत धरलं आणि ते पुढच्या सगळ्या तयारीला लागलेही. माझं मन सैरभैर झालं. पारध्यानं मृगीचा करावा तसे अनेक विचित्र विचार माझा एकसारखा पाठलाग करू लागले.

ज्या वेळी मी स्वयंवराची माला हातात घेऊन उभी असेन त्याच वेळी त्या पेटिकेत एखादा भुजंग वरच्या छिद्रातून आत शिरून माझ्या बाळाच्या गळ्याला विळखा घालून बसलेला असेल! ज्या वेळी मी बोहल्यावर उभी असेन कदाचित नेमक्या त्याच वेळी ती पेटिका नदीच्या तळाशी चिखलात रुतून बसलेली असेल. ज्या वेळी वाद्यांच्या गजरात माझ्या मस्तकावर मंगलाक्षता पडत असतील त्या वेळीच कदाचित एखाद्या खडकावर आपटून तिचं झाकण दूर उडून गेलं असेल. उघड्या पडलेल्या बाळाचा तेजस्वी सोनेरी दीप विझविण्यासाठी आकाशात फिरणाऱ्या घारी-गिधाडांनी त्याच्यावर झडपा घालून त्याच्या मस्तकाला बोचकारलेलं असेल! ज्या वेळी मी विवाहाची मंगल वाद्ये ऐकत असेन, त्याच वेळी माझा बाळ घोंघावणाऱ्या लाटांचं कर्कश मृत्युगीत ऐकत असेल. माझं मन कोळ्याच्या जाळ्यात अडकलेल्या मासळीसारखं तडफडू लागे. जास्त विचार करू लागले की, ते जास्तच गुरफटत जाई. मंचकावर उशीत तोंड खुपसून मी हमसाहमशी क्रंदू लागे. त्याचा गोल गोंडस चेहरा, कुरळे सोनेरी केस आणि कानांतली लुसलुशीत कुंडलं दिवसभर माझ्या डोळ्यांपुढं एकसारखी नाचू लागत. जिवाच्या आकांतानं मी माझे डोळे गच्च मिटून घेई.

**

# अठरा

माझ्या स्वयंवराची आमंत्रणं आसपासच्या सर्व मान्यवर राजांना गेली. सगळं नगर त्याबद्दल चर्चा करीत होतं. मला माझ्या दैवगतीची कीव वाटत होती. पृथेची मी कुंती झाले होते, कुंतीची माता झाले होते आणि परत कुमारी म्हणून मी स्वयंवरासाठी उभी राहणार होते! जगातल्या कुठल्या स्त्रीला दैवानं माझ्याइतकं निर्दयपणे हवं त्या ठिकाणी फिरवलं असेल? पण माझ्या शब्दाला इथं कुणीतरी प्रतिसाद दिला असता काय? ‘मला हे स्वयंवर नको’ म्हणून टाहो फोडून सांगितलं असतं, तर प्रश्नांच्या माऱ्यांनी पुन:पुन्हा मला सर्वांनी फाडून खाल्लं असतं. स्त्री म्हणजे समाजाच्या कोंडवाड्यात सामाजिक संकेताच्या दाव्यानं जखडलेली गायच जणू! तिला न आवडणाऱ्या अनेक गोष्टी खुल्या मनानं कधी बोलता येत नाहीत. जणू लक्ष-लक्ष दु:खं आकाशाच्या शांततेनं मूकपणे सहन करण्यासाठीच तिचा जन्म असतो!

स्वयंवराचा दिवस येत चालला. सगळ्या नगरजनांचा उत्साह समुद्रभरती आल्यासारखा फेसाळू लागला. त्यांच्या राजकुमारीचं स्वयंवर होतं. निरनिराळ्या वैभवाची प्रदर्शनं त्यांना आता पाहायला मिळणार होती. माझं मन मात्र एकटंच देहाच्या अंधाऱ्या दालनात अश्रू ढाळी. मला माझ्या बाळाला एकदा पाजणंसुद्धा धड जमलं नव्हतं. आता कुंती आत एक आणि बाहेर एक, अशी दोन आयुष्यं जगू लागली. एक राजकुमारीचं, एक भग्नहृदयी मातेचं! माझ्या जिवाची या दोन कुंतींमध्ये केविलवाणी कुतरओढ होऊ लागली. राजस्त्रियांची दु:खं ही राजवाड्यासारखीच मोठाली असतात! आणि त्यांना कुलांच्या, प्रतिष्ठेच्या तटानं नेहमीच घेरलेलं असतं!

**

# एकोणीस

स्वप्न म्हणजे स्मृतीचं बालक असावं. रोज रात्री मला चित्रविचित्र स्वप्नं पडत. कधी स्वप्नात ते चंडोल पक्षयाचं पिल्लू आपली चोच वासून केविलवाणा आवाज काढीत ओरडे, तर कधी नदीकिनाऱ्यावर बघितलेली ती सवत्स गाय हंबरू लागे. तिचं बाळसेदार वासरू तिच्यामागून शेपटीचा भरीव गोंडा उंचावीत बागडताना दिसे!

एके दिवशी तर स्वप्नात एक भयानक दृश्य मला दिसलं. पाण्यातून हिंदकळत वाहणारी ती पेटिका नदीत एका दगडी खोबणीत अडकली होती. आतलं बाळ भुकेनं टाहो फोडून रडत होतं. त्याला पुढे होऊन कुणीच मायेनं उचलीत नव्हतं. लाटांनी ती पेटी हलताच बाळाला वाटे, कुणीतरी आपणाला वर उचलायलाच आलं आहे! हातपाय हलवून ते कुणाच्याही कुशीत शिरायला धडपडल्यासारखं करू लागे, पण कुणीच त्याला वर उचललं नाही. ओरडून-ओरडून ते थकलं. शेवटी भुकेपायी नुसते चिमुकले हातपाय झाडून-झाडून त्यानं एक भयानक आचका दिला आणि ते कायमचं शांत झालं! पण ते शांत झालं नव्हतं! थोड्या वेळानं थंड झालेलं त्याचं शरीर हळूहळू हलू लागलं. कसंतरीच! क्षणाक्षणाला त्याचं सोनेरी अंग जास्तच सोनेरी होत फुगू लागलं. पेटिकेचं झाकण त्यानं पायानं धाडकन उचकटून टाकलं! वाढत-वाढत ते त्या आकाशपुरुषासारखं मोठं झालं! त्याची चर्या रागानं लाल झाली होती! कानांतील कुंडलं तापली होती! त्याचे निळे डोळे क्रोधामुळे जांभळे दिसत होते! अश्वनदीच्या अफाट पाण्यावरून आपले अजस्त्र पाय टाकीत ते दणदण माझ्याच रोखानं धावून येत होतं. आपल्या मुठी वळून, रागानं दात-ओठ खात म्हणत होतं, 'मातेच्या पवित्र नात्याला पायदळी तुडविणाऱ्या राक्षसिणी! प्रतिष्ठेच्या रेशमी कोशात दडून बसलेल्या कैदासिणी, थांब!' त्यानं आपली वळलेली भक्कम मूठ माझ्या मस्तकावर मारण्यासाठी वर उचलली! मी किंचाळून ओरडले, "धात्री, धाव!"

कक्षाबाहेर धात्री उभीच असावी. माझी जीवघेणी किंकाळी ऐकून ती धावतच आत आली. माझ्या तोंडावरचा घाम पुशीत लगबगीनं ती म्हणाली, "राजकुमारी, किती भ्याला आहात तुम्ही? स्वप्नबिप्न पडलं होतं की काय?"

"धात्री, बाळ...?" मला काहीच बोलता येईना. त्या दासीला माझ्या यातना कशा कळणार?

"राजकुमारी, बाळ सुरक्षित आहे. तुम्ही उठण्याचीच वाट पाहत होते!" माझ्या पाठीवरून हात फिरवीत ती दबक्या आवाजात म्हणाली.

मी झटकन उठून तिचे खांदे गदागदा हलवून आनंदानं ओरडले, "कुठं आहे? कुणाला मिळालं ते?"

तिनं बाहेर उभ्या असलेल्या एका कोळ्याला आत बोलावून घेतलं. वाकून तो कक्षात आला. मी त्याला एकदम तीन-चार प्रश्न विचारले, "कुठं गेली ती पेटिका? कुणाला मिळाली? ज्याला सापडली त्यानं बाळाला आपल्या जवळ घेतलं की नाही?"

"राजकुमारी, ती पेटिका अश्वनदीतून चर्मण्वती नदीत गेली. चर्मण्वती नदीतून

कनकपुराजवळ ती यमुनेत गेली. यमुनेतून ती प्रयागजवळ गंगेत गेली. प्रयागपासून पन्नास योजनांवर ती काशीराज्याजवळ अंगदेशातील चंपानगरीजवळ गेली!''

''कुणाला मिळाली ती?''

''दैवयोग बलवत्तर म्हणूनच एका सारथ्यानं पाण्याबाहेर काढली ती. तीनशे योजनांचा प्रवास करून आली होती ती पेटिका!''

''सारथी?''

''होय राजकुमारी, त्या सारथ्याच्या स्त्रीनं त्या बाळाला जवळ घेतलं. त्याला बघताच तिला पान्हा फुटला. तो मुलगा सारथ्याच्या पर्णकुटीत सुखरूप आहे! क्षमा असावी राजकुमारी, पण, तो मुलगा कुणाचा? कुठल्या पाषाणहृदयी मातेनं त्याला मृत्यूच्या मुखात लोटलं होतं?''

''तो मुलगा दुर्वास ऋषींच्या महायज्ञाचा आहे!'' त्याच्या अंगावर गळ्यातील मोत्याचा कंठा फेकीत मी म्हणाले, ''कुणालाही काही बोलू नकोस.''

''गुरुदेव दुर्वास!'' भिऊन एक अस्पष्टसा उद्गार काढीत लगबगीनं कंठा घेऊन तो चुपचाप निघून गेला.

माझं मन शांत झालं. आनंदानं मी धात्रीला मिठी मारली. माझ्या डोळ्यांतून निघणारी अश्रूंची धार तिची कंचुकी भिजवू लागली. त्यात एका राजकुमारीचे असाहाय्यतेचे दु:खाश्रू होते आणि आपल्या बाळाच्या सुरक्षिततेसाठी तळमळणाऱ्या एका मातेचे आनंदाश्रू होते.

कुठंही का असेना तो सुखरूप होता!

**

# वीस

स्वयंवराचा दिवस उजाडला. नगर आमंत्रितांनी गजबजून गेलं. राजवाड्यासमोरच्या च्या मोकळ्या पटांगणात एक भव्य मंडप उभारण्यात आला. बाबा लहान मुलाच्या उत्साहानं काय पाहिजे, काय नको हे पाहत सगळ्या मंडपभर फिरू लागले. नगरजन येऊन वाड्याची सजावट करू लागले. नगारे, तंतुवीणा, तुताऱ्या वाजू लागल्या. मगध, कोसल, मद्र, चेदी, पांचाल, विदेह, काशी आदी सर्व देशांचे राजेश्वर स्वयंवरासाठी आले. मथुरेहून आई आणि बाबा कन्यादान करण्यासाठी आले. त्यांच्याबरोबर वसुदेव हा बंधू आणि श्रुतश्रवा नावाची – जिला मी प्रथमच पाहत होते ती – बहीण आली. राजवाड्यावर फार वर्षांनतर हा समारंभ होत होता म्हणून सगळीकडे उत्साहाची कारंजी फुलली होती.

विवाह! स्त्रीची जीवनसरिता एका सबल आणि पराक्रमी पुरुषाच्या समुद्राला मिळते ते संस्मरणीय वळण! एका स्त्रीच्या उमललेल्या सुगंधी जीवनपुष्पाची सासरच्या विविध माणसांच्या मालिकेत मधुर गुंफण! स्त्रीच्या जीवनातील पहिलाच मंगल संस्कार! आर्यस्त्रीचा पुनर्जन्म!

स्वयंवराची वेळ झाली. मंडप नगरजनांनी आणि आमंत्रितांनी काठोकाठ भरून गेला. बाबांनी उठून सर्वांना उद्देशून सांगितलं, "आर्यावर्तातील पराक्रमी राजराजेश्वरहो, मथुरेचा यादव राजा शूरसेन याची औरस कन्या पृथा – माझी मुलगी कुंती – आता मंडपात वरमाला घेऊन येईल. आपल्यापैकी अनुरूप वराच्या गळ्यात ती स्वेच्छेने वरमाला घालील. आपण सर्व जण या स्वयंवराला आलात हे पाहून माझं मन आनंदानं भरून गेलं आहे. एक भोजवंशीय राजा म्हणून मी आपलं स्वागत करतो. या स्वयंवरासाठी कोणताही पण मांडण्यात आलेला नाही. माझ्या कन्येची... कुंतीची पसंती हाच या स्वयंवराचा पण आहे!"

सगळ्यांनी उठून बाबांना आदरानं अभिवादन केलं. मंडपात सगळीकडे शांतता पसरली. हातात शुभ्र कमळफुलांची वरमाला घेऊन मी अमात्यांच्या मागून मंडपात प्रवेश केला! कुणीतरी ललकार दिली, "यादवकुलोत्पन्न मथुरादेशीय स्वरूपसम्राज्ञीऽ राजकुमारी कुंतीदेवी!" सगळे राजेश्वर क्षणभर उठून उभे राहिले. बाबांनी हात वर करताच ते पुन्हा खाली बसले. माझ्या अंगातून विजेची एक लहर चमकून गेली. आज माझ्या भावी आयुष्याच्या यात्रेतला सहयात्री मला अचूक निवडायचा होता. आजची माझी निवड माझं भवितव्य ठरविणारी होती! एकाएकी कानांवर काळजाची धडधड ऐकू येऊ लागली! वरमाला सावरीत मी अमात्यांच्या मागून हळुवार पावलं उचलीत मंडपातून चालू लागले. अमात्य एकएका राजेश्वराचं वर्णन ऐकवीत होते. आपणाला माहीत असलेली सगळी विशेषणं ते वापरीत होते. मी किनारी कटाक्षानं त्या-त्या राजेश्वराकडे पाहत होते. नापसंतीनं पुढं जात होते. एकएक करता बसलेल्या सर्व राजेश्वरांची बैठक संपत आली. शेवटचं एकच नाव शिल्लक राहिलं. मगध देशाचे शत्रुतापन महाराज दीर्घ! अमात्यांनी माहिती सांगितली. मी नापसंतीनं पुढं झाले. सगळे जण कुजबुजू

लागले. संध्याकाळची दीर्घ सोनेरी किरणं मंडपावर पसरू लागली. अमात्य माझ्या कानाशी भयभीतपणे पुटपुटले, ‘‘राजकुमारी, आता या मंडपाचं रणक्षेत्र होणार! तुम्ही कुणालातरी निवडायला पाहिजे होतं! काय केलंत हे?’’

काहीतरी बोलण्यासाठी बाबा उभे राहिले. एवढ्यात मंडपाच्या पश्चिमेच्या दिशेनं गोंधळ झाला. नगरजन भराभर बाजूला सरकू लागले. पाठोपाठ हजारो घोडेस्वार वाड्याच्या महाद्वारातून आत घुसले. कुणीतरी ललकारी दिली, ‘‘हस्तिनापुराधिपती कौरवराज महाराज पांडूऽऽ!’’ हातातील माला सावरून मी पश्चिमेकडे पाहू लागले. एक उंच, गौरवर्णी, बांधेसूद आकृती मंडपातून पुढं सरकत होती. मावळत्या सूर्यदेवांचे किरण पाठीमागून त्या आकृतीवर पडले होते. आकृतीची चर्या पुष्ट, गोल होती. जणू सूर्यदेवच स्वयंवरातल्या कुंतीची लाज राखण्यासाठीच येत होते. ती आकृती मंडपात येताच मी पुढं झाले. हातातील वरमाला मी त्या पुरुषश्रेष्ठाच्या गळ्यात घातली! चोहोबाजूला टाळ्यांचा कडकडाट झाला. कुणीतरी आनंदानं ओरडलं, ‘‘हस्तिनापूर कौरवकुलभूषण महाराणी कुंतीदेवींचाऽऽ’’ सगळ्यांनी त्याला प्रतिसाद दिला – ‘‘विजय असो!’’

मी राजकुमारी कुंतीची महाराणी कुंती झाले! माझं मन आनंदाच्या सागरावर डोलू लागलं. सगळ्या आर्यावर्तात विक्रमाचा धाक असलेल्या हस्तिनापूरच्या कुरुकुलाची मी महाराणी झाले. महाराजांसमवेत मी बाबांना आशीर्वादासाठी नमस्कार केला. त्यांनी भारावून आशीर्वाद दिला. ‘‘कुरुकुलाची दुमदुमणारी कीर्ती तुझ्यामुळे स्वर्लोकापर्यंत जावो!’’ आजपर्यंत झालेल्या सर्व अनपेक्षित घटनांत ही एकच घटना मला धीर देणारी होती. माझ्या इच्छेनं घडलेली होती.

मी निर्धास्त झाले होते!

**

# एकवीस

आठ दिवसांनंतर मी महाराजांबरोबर हस्तिनापूरला जाण्यासाठी रथात बसले. सगळे नगरजन मला निरोप देण्यासाठी सीमेपर्यंत आले होते. बाबा उत्तरीयानं डोळे पुशीत होते. वसुदेवासह मी सर्वांचा निरोप घेतला. महाराणी कुंती म्हणून हस्तिनापुराला चालले. नगरातील एकच महत्त्वाची स्त्री मी माझ्याबरोबर घेतली होती आणि ती म्हणजे धात्री! माझं मन अनेकविध संमिश्र भावनांनी भरून आलं. माझ्या स्मृतींची रांगोळी अंगावर कोरून घेणाऱ्या त्या नगराला वंदन करून मी निरोप घेतला. रथ हस्तिनापुराकडे धावू लागला. नगराच्या सीमा मागं पडू लागल्या. शेवटी अश्वनदीचं पात्र आलं! तिच्या पात्राच्या दर्शनानं अग्रीच्या ठिणगीनं जसा वणवा पेटावा तसा विवाहापूर्वीच्या त्या आठवणींनी माझ्या मनाचा डोंब उसळला. तिच्या लाटे-लाटेवर मला ती दोन सोनेरी कुंडलं दिसू लागली! दोन गोंडस हात दिसू लागले. ज्या हातांनी राजदंड धरावा तेच हात आता आसूड आणि घोड्याचे वेग धरतील! दैव हे किती निर्दय असतं! त्यानं मला मथुरेहून या नगरात आणलं. माझ्या या नगरातील जीवनात काही दुःख नाही, हे त्याला पाहवलं नाही. त्यानं हिमालयातून दुर्वासांना इथं पाठविलं! आता मी हस्तिनापुराला जात होते. माझं ते तेजस्वी बाळ मात्र चंपानगरीत होतं! एका सारथ्याच्या पर्णकुटीत! त्याची आठवण म्हणून मी अश्वनदीला श्रद्धेनं वंदन केलं! राजकुमारी कुंती कौरवांची महाराणी म्हणून चालली होती! स्त्रीचं जीवन म्हणजे अनेक उलथापालथी. कधी ती कुणाची कन्या, कुणाची पत्नी, कुणाची माता असते, तर कधी कुणाची सून, कुणाची भावजय असते. तिला स्वतःचं स्वतंत्र असं अस्तित्व कधी असत नाही. असलं तरी दाखविता येत नाही.

**

# बावीस

आम्ही हस्तिनापुराला आलो. हे नगर महाराणी शकुंतला, सुवर्णा, यशोधरा, तपती, शुभांगी, संप्रिया, अमृता, सुयशा आणि सत्यवती या महाराण्यांचं नगर होतं! एकीपेक्षा एक सरस महाराण्यांनी कुरुकुलाची कीर्ती आर्यावर्तात पसरविली होती. माझं मन नगरात प्रवेश करताच भारावून गेलं. हजारो नगरजन आपल्या महाराणीचं स्वागत करण्यासाठी गंगेच्या पवित्र तीरावर जमले होते. आनंदानं धुंद होऊन ते घोषणा देत होते. फुलं उधळीत होते. वाद्यं वाजवीत होते. गंगेच्या लहरी-लहरी आनंदानं नाचून कुरुकुलाच्या सुनेचं स्वागत करीत होत्या. हीच गंगा चंपानगरीत माझ्या पुत्राचं लालनपालन करणार होती. म्हणून मी तिला वाकून वंदन केलं.

वाजत-गाजत आम्ही राजवाड्यावर आलो. महाद्वारात राजमातेनं मला ओवाळलं. जवळच वडिलांसारखे पूज्य असलेले महाराज भीष्म आणि धृतराष्ट्र उभे होते. श्रद्धेनं मी त्या सर्वांना वंदन केलं. मला आशीर्वाद देताना विदुर म्हणाले, “मुली, राजा शूरसेनाशी या कुलाचं नातं आज जोडलं गेलं हे भवितव्याच्या दृष्टीनं छान झालं.” कौरवांच्या त्या अफाट सामर्थ्याची साक्ष देणाऱ्या राजवास्तूत मी कुरूंची महाराणी म्हणून तरुण वयात पाऊल टाकलं! मन पिसासारखं हलकं झालं. सौख्याचे अमृतमेघ माझ्या डोक्यावर असंख्य धारांनी वर्षाव करू लागले.

**

# तेवीस

हस्तिनापुरात माझे दिवस आनंदात जात होते. दिवस केव्हा उगवत होता आणि केव्हा मावळत होता, तेसुद्धा मला समजत नव्हतं. धात्री रोज पराक्रमी पूर्वजांच्या निरनिराळ्या कथा सांगत होती. बाळपणातील फुलपाखरामागं धावणारी पृथा माझ्या मनाच्या पटलावरून अस्पष्ट होऊ लागली. भोजपुरात भित्तीवर डोकं आपटणारी असाहाय्य कुंती अदृश्य होऊ लागली. खरोखरच विस्मृती ही माणसाच्या जीवनातील किती प्रभावी शक्ती आहे! दैनंदिन जीवनात अशा कितीतरी असंख्य घटना घडत असतात; त्या सगळ्याच माणसाच्या मनात राहिल्या तर? त्यांचा परस्परांशी संबंध लावताना त्याचा मेंदू कातावून जाईल. वेड लागेल त्याला! म्हणून निसर्गानंच हे विस्मृतीचं अमोल देणं मानवाला दिलं असावं.

माझ्या पूर्वीच्या सर्व आठवणी आता हळूहळू बुजू लागल्या. माझं मन मनोरथांच्या सुयांनी महाराणी कुंतीच्या जीवनाचं राजवस्त्र हळुवार विणू लागलं. मी स्वतःच्या भाग्यावर संतुष्ट होऊ लागले. आता मला काय कमी होतं? मानमान्यता, संपत्ती, कीर्ती, प्रतिष्ठा सगळं माझ्या पायांशी लोळण घेत होतं. महाराजांच्या सारखा प्रेमळ, पराक्रमी आणि देखणा पती होता. रोज दर्पणात बघून केशभूषा करवून घेताना मी माझ्याच प्रतिबिंबाला म्हणे, "कोण तू? महाराणी कुंतीकडे अशी टक लावून काय पाहतेस? दृष्ट लागेल की तिला तुझी!" तरीही हसत ते माझ्याकडे पाहतच राही. लटक्या रागानं मी कुपीतलं मुखचूर्ण त्या बिंबाच्या अंगावर फेकी. चूर्ण सगळ्या दर्पणभर पसरे, प्रतिबिंब अदृश्य होई. मी एक गोल गिरकी घेई आणि कक्षाच्या गवाक्षात येऊन उभी राही. तेथून गंगेचं विशाल पात्र दिसे. गंगेवर असंख्य कारंडव पक्षी स्वैरपणे भराऱ्या मारीत असताना पाहून जीवन म्हणजे गोड झोके देणारा एक हिंदोळाच आहे, असं मला वाटे!

अशीच मी एकदा गंगेकडे एकटक पाहत उभी होते. मागून येऊन कुणीतरी एकदम माझे डोळे झाकले! मी दचकून गेले. हातांची डोळ्यांवरची पकड जास्तच घट्ट झाली. ते महाराज होते! मी लाजून लाल झाले. मला जवळ घेत ते म्हणाले, "कुंती, पुरुष पराक्रम करायला लागले की, पराक्रमाची मालिकाच तयार होते! तुला जिंकलं खरं, पण राजाच्या दोन स्त्रिया असतात. एक त्याची पत्नी आणि दुसरी त्यानं जिंकलेली धरती! धरतीशिवाय राजा म्हणजे आयाळीशिवाय सिंह!"

मी खाली मान घालून ऐकत होते. त्यांच्या त्या एकाच अस्पष्ट स्पर्शात किती किमया होती! माझ्या शरीराचा मोर पंख पिसारून नाचू लागला. हनुवटी बोटांनी वर उचलीत ते मला प्रेमानं म्हणाले, "हे राज्य पूर्वजांचं आहे. मी स्वतः जिंकलेल्या राज्याची त्यात आणखी भर घालणार आहे. उद्याच मी दिग्विजयासाठी बाहेर पडणार आहे!"

दिग्विजय! दिग्विजय म्हणजे सतत लढाई. एकापाठोपाठ एका नव्या दमाच्या राज्याशी युद्ध! जीवन-मरणाचा खेळ. त्यांचा हात मी हातांनी घट्ट दाबून धरला. माझी

भीती त्यांनी त्यातून ओळखली. माझ्या डोळ्यांत खोल पाहत ते म्हणाले, ‘‘कुंती, घाबरू नकोस. हे कुरूचं रक्त आहे. याला पराभव माहीत नाही! मी लवकरच परत येईन.’’ त्यांच्या डोळ्यांतून आत्मविश्वासाच्या ठिणग्या बाहेर पडू लागल्या. आपल्या बळकट हातांनी त्यांनी मला अधिकच जवळ घेतलं. त्यांचे उष्ण ओठ माझ्या ओठांवर टेकले! गंगेवरून येणाऱ्या चोमडया थंड वायुलहरी उगाच दोन तप्त शरीरांना थंड करण्याचा दुबळा प्रयत्न करू लागल्या!

**

# चोवीस

दुसऱ्या दिवशी कुरूंचं निधड्या छातीचं अफाट चतुरंग सैन्य दिग्विजयाला जाण्यासाठी सज्ज झालं. महाराज लोहत्राण घालून योद्ध्याचा वेष चढवून सर्व सैन्याच्या अग्रभागी उभे राहण्यासाठी राजवाड्याबाहेर पडू लागले. सर्व वडीलजनांनी त्यांना शुभाशीर्वाद दिले. शेवटी राजमातेनं त्यांना आशीर्वाद देताना सांगितलं, ''पांडू, तुझं क्षेम दूताकडून वरचेवर कळवीत जा. सांभाळून वाग!''

मी पुढं होऊन त्यांच्या कपाळावर केशरी टिळा लावला. वाकून त्यांच्या पाया पडताना मी हळूच पुटपुटले, ''येताना एखादी चांगली पत्नी पण आणा!''

मी वर उठताच त्यांनी आश्चर्यानं विचारलं, ''पत्नी?''

''होय, राजाच्या दोन स्त्रिया असतात! एक त्याची पत्नी आणि दुसरी त्यानं मिळविलेली धरती!''

''ठीक आहे,'' म्हणत ते वळले आणि सैन्याच्या अग्रभागी असलेल्या एका पांढऱ्याशुभ्र अश्वावर आरूढ झाले. त्यांनी संकेत करताच कुरूंचं सैन्य चालू लागलं. त्रिकोणी भगवा ध्वज कपोताच्या पंखासारखा फडफडत पूर्व दिशेला निघून गेला. माझं मन अभिमानानं भरून आलं.

**

# पंचवीस

दूत नित्य वार्ता घेऊन येत होता. एकामागोमाग एक राज्य जिंकीत कौरवांचं विजयी सैन्य – रत्नं, मोती, पोवळी, सोनं, वैदूर्य, माणकं, रूपं, गाई, घोडे, हत्ती, धान्यं यांची खंडणी घेत, पुढं चाललं होतं. दशार्ण, मगध, मिथिला, विदेह, काशी, सुह्य, पुण्ड्र सगळे देश कौरवांपुढं हार खात होते. सैन्य बाहेर पडून आता चार महिने लोटले होते. हे चार महिने म्हणजे मला चार युगांसारखे वाटले होते. युद्धावर जाणाऱ्या विजयी वीराची पत्नी मनाच्या कोणत्या अवस्थेत असते, हे जाणायला वीरपत्नीच व्हावं लागतं.

चार महिन्यांनंतर वार्ता आली की, सर्वत्र यशस्वी होऊन महाराज परत येताहेत! सगळ्या नगरात उत्सुकता पसरली. महाराज भरतानंतर दीर्घकाल कुरुकुलात असला दिग्विजय कुणीच केला नव्हता. माझं मन अभिमानानं भरून आलं. बाबा एकदा म्हणाले होते, "वीरांनी विजयाच्या धुंदीत जगावं." माझं मन मला सांगू लागलं, ही धुंदी सांसर्गिक असते! केव्हा-केव्हा वीरपत्नीलाही ती चढते! आता मी दिग्विजयी महाराज पांडूंची लाडकी पत्नी कुंती होते! महाराण्यांची महाराणी! माणसाच्या दैवाचा समुद्र कधी-कधी भरती आल्यासारखा फेसाळत असतो हेच खरं!

खंडणीनं भरलेल्या शेकडो गाड्या एकामागून एक येऊन राजवाड्यासमोर लागू लागल्या. मागून विजयी कौरव सैन्य नगरात घुसलं. शेवटी महाराज अंबारीतून आले. त्यांची छाती उन्नत होती. पण – पण त्यांच्या डाव्या हाताला एक सुंदर स्त्री बसली होती! कोण होती ती? महाराजांजवळ बसण्याचं धाडस तिनं कसं केलं? शंकेची जळू माझ्या स्त्रीमनाला डसू लागली.

अंबारी महाद्वारात आली. मी नेहमीप्रमाणं पुढं झाले, पण माझं सगळं लक्ष त्या स्त्रीकडे होतं! ती सुंदर होती. महाराजांकडे बघून ती खुदकन हसली! माझ्या संयमाचे बांध फुटू लागले. शेवटी स्वत: महाराजच म्हणाले, "कुंती, तू जाताना पत्नी आणा म्हणून सांगितलं होतंस! ही शल्याची भगिनी माद्री! बघ तुझ्यापेक्षा किती सुंदर आहे!"

एकूण महाराजांनी माझे शब्द माझ्यावरच उलटविले होते तर! पुरुष असल्या बाबतीत केव्हा पडत्या फळाची आज्ञा घेतील ते कोणत्याच स्त्रीला सांगता येणार नाही! या राजवाड्याची तर ती परंपराच होती!

रात्री मला सेनापतींकडून कळलं की, मद्र देशाच्या महाराज शल्यांनी पितामहांच्या सल्ल्यानं आपल्या बहिणीसाठी विजयी महाराजांना पांचालांच्या राज्यातच अगोदर गाठलं होतं. वैभवशाली कुरुकुलाशी आपला रक्ताचा संबंध जोडावा या कल्पनेनं महाराजांना त्यांनी आपली बहीण माद्री हिच्याबद्दल विचारलं. महाराजांनीही त्यांच्या विनंतीला माद्रीच्या सौंदर्याकडे बघून संमती दिली! येताना ते तिला घेऊनच आले होते. आता नगरात दोन महाराण्या झाल्या होत्या. एक कुंती आणि दुसरी माद्री!

त्या रात्री झोपताना मी विचार केला. अतिसौख्यही काही बरं नव्हे. एखादं लहान बालक अतिशय देखणं असलं की, त्याच्या गालाला दूरदृष्टीच्या स्त्रिया तीट लावतात. सौख्याचंही तसंच असतं. त्यातसुद्धा कोणीतरी वाटेकरी असावाच. कुठंतरी तीट

असावीच! बरं झालं महाराणी माद्री आली ते. आता या कुंतीला एक स्त्री म्हणूनही जगायला थोडी मोकळीक मिळेल. महाराणीपणाची अर्धी धुरा आता माद्री सांभाळील! माझ्यापेक्षा सुंदर असल्यानं महाराजांना आनंदी ठेवील.

शेवटी जीवन म्हणजे कुठंतरी केलेली तडजोडच नसते का?

**

# सव्वीस

महाराणी माद्री माझी सवत म्हणून आली खरी, पण आम्ही कधीच एकमेकींचा द्वेष केला नाही, कारण द्वेष हा दुधारी शस्त्रासारखा असतो! तो करणाऱ्याला आणि ज्याचा केला जातो त्याला, दोघांनाही सारखाच मारक ठरत असतो. आम्ही एकमेकींशी प्रेमानं वागू लागलो, कारण प्रेम हा मानवी मनाचा सर्वांत नि हवाहवासा वाटणारा एकमेव आविष्कार आहे. एकमेकांना समजावून घेऊन आम्ही जीवन जगू लागलो.

जितक्या प्रेमानं सगळ्यांनी माझं स्वागत केलं होतं तितक्याच प्रेमानं सर्वांनी माद्रीचंही स्वागत केलं. दोन महाराण्यांमध्ये महाराज दोन चांदण्यांमधील चंद्रासारखे दिसू लागले. मलाही सुखदु:खाच्या गोष्टी बोलण्यासाठी एक चांगली सखी मिळाली. जीवन हे माणसाशी कधी-कधी सौख्याची रंगपंचमी खेळतं. इतके रंग ते उधळतं की, त्यानं जीव घुसमटून जातो. हात उंचावून म्हणावंसं वाटतं की, बस्स झाली आता ही सौख्याची उधळपट्टी! माझंही तसंच झालं होतं. महाराजांच्या अनुपस्थितीत घटकान्घटका मी माद्रीशी गप्पा मारीत बसे. तिचं बोलणं ऐकत बसावं असंच होतं. पाव्यातून मंजूळ स्वर यावेत तसा तिचा आवाज मधुर होता.

आम्ही दोघी एकदा अशाच गप्पांत रंगलो होतो. ती आपल्या भावाची – शल्याची – खोचक बोलण्याची कला कशी प्रभावी आहे, हे मला सांगत होती! आपल्या वाक्चातुर्यानं त्यानं महाराजांचं मन कसं पटकन जिंकलं हे सांगून ती खाली मान घालून गालातल्या गालात हसत होती. महाराज आमच्या मागं येऊन केव्हा उभे होते ते आम्हाला माहीतही नव्हतं! हळूच पुढं होत आमच्या खांद्यावर हात ठेवत ते हसत म्हणाले, ‘‘एकूण एकाच म्यानात दोन खड्गं कधी-कधी राहतात तर!’’

आम्ही सावरून उठलो. मी हळूच पुटपुटले, ‘‘स्त्री म्हणजे खड्ग आहे असं कुणी सांगितलं?’’ माद्रीनंही मला साथ दिली. ती म्हणाली, ‘‘आणि पुरुष म्हणजे म्यान हे तरी कुठं बरोबर आहे?’’

महाराजांना आश्चर्य वाटलं. त्यांनी विचारलं, ‘‘दोघी मिळून आम्हाला सांगा तरी स्त्री म्हणजे काय आणि पुरुष म्हणजे काय ते!’’

मी म्हणाले, ‘‘पुरुष म्हणजे एक देह आणि...’’

‘‘आणि स्त्री म्हणजे त्याची पडछाया! कधी-कधी दोहो बाजूंनी प्रकाश आला की – की एकाच देहाच्या दोन-दोन पडछाया पडतात. आम्ही दोघी आपल्या तशाच पडछाया आहोत!’’ माद्रीनं माझं अर्धवट वाक्य पुरं केलं! मला तिचं कौतुक वाटलं.

माद्रीच्या उत्तरानं ते आनंदी झाले. त्यांनी दोन्ही हातांनी आम्हा दोघींना एकदमच छातीजवळ घेतलं. आनंदानं ते हसत-हसत म्हणाले, ‘‘या नगराचा राजा झालो तेव्हा, किंवा दिग्विजयी सम्राट झालो तेव्हा जेवढा आनंदी नव्हतो तेवढा आज मी आनंदी आहे आणि राजा आनंदी झाला म्हणजे काय करतो माहीत आहे का तुम्हा दोघींना?’’

‘‘गोरगरिबांना धन वाटतो!’’ मी म्हणाले.

‘‘नगरात एखादी धर्मशाळा बांधतो! नाहीतर एखादा मार्ग तयार करतो.’’ माद्री म्हणाली.

‘‘छे, छे, राजा संतुष्ट झाला म्हणजे एकच करतो – मृगया! आज आम्ही वारणावताच्या अरण्यात मृगयेसाठी जाणार!’’

त्यांनी एका सेवकाकडून सेनापतींना संदेशही पाठवला. मृगयेची तयारी सुरू झाली. गडबडीत महाराज कक्षाबाहेर जाऊ लागले. दारातून बाहेर पडताना त्यांच्या डोक्यावरचा सोनेरी मुकुट द्वारावरच्या पडद्याच्या एका तलम धाग्यात अडकला आणि खाली पडला! माझ्या मनात भीतीची पाल चुकचुकली! पुढं होऊन मी तत्परतेनं मुकुट उचलीत म्हणाले, ‘‘महाराज, आज नाही गेलं तर नाही का चालणार?’’

‘‘कुंती भीती हा स्त्रियांचा स्वभावच आहे, पण निश्चय हा पुरुषांचा स्वभाव आहे. मी जाणारच. घाबरायचं सोडून दे. मी काही युद्धावर जात नाही. केवळ मृगयेला जातो आहे!’’

मस्तकावर मुकुट चढवून ते झपाझप पावलं उचलीत निघून गेले.

**

# सत्तावीस

दोन दिवसांनीच महाराज वारणावताहून परत आले. त्यांनी मृगया म्हणून काहीच बरोबर आणलं नव्हतं. उलट त्यांची नेहमीच हसरी असणारी चर्या म्लान आणि मलूल झाली होती. कदाचित ती अरण्यात भटकल्यामुळे झाली असेल. आम्हाला पाहताच ते खुलतील या कल्पनेनं मी आणि माद्री त्यांना हसतच सामोऱ्या गेलो, पण त्यांनी आमच्याकडे ढुंकूनही पाहिलं नाही! खाली मान घालून तडक ते आपल्याच कक्षात गेले. त्यांनी लागलीच कक्षाचं द्वार आतून लावून घेतलं. काही न खाता चार दिवस ते आतच राहिले! कक्षाचं द्वार कितीही ठोठावलं तरी ते उघडलं जाईना. शंकांच्या असंख्य इंगळ्या आम्हा दोघींचं मन पोखरू लागल्या. शेवटी नाइलाजानं आम्ही राजमातेकडे गेलो. त्यांना ते कळताच त्यांची चर्याही काळजीनं काळवंडून गेली. लागलीच त्या आमच्याबरोबर आल्या. त्यांनी बाहेरून कक्षाचं द्वार ठोठावलं. आतून थोडासा कठोर आणि बराचसा त्रासिक आवाज आला, "कोण आहे ते?"

"मी अंबालिका आहे! तुझी माता! द्वार उघड पांडू." राजमातेनं तेवढ्याच निर्धारानं सांगितलं.

झटकन कक्षाचं द्वार उघडलं गेलं. या चार दिवसांत महाराज किती पालटून गेले होते. त्यांनी अंगावरची राजवस्त्रं उतरवून ठेवली होती! सर्वांगावर केवळ पांढरी वस्त्रं त्यांनी धारण केली होती. डोक्यावर मुकुट नव्हता. आकाशात भरारी मारणारी त्यांची ती करारी दृष्टी जमिनीला खिळली होती. माझ्यासमोर दिग्विजयी सम्राट उभा आहे की एक भिक्षुक हेच मला समजेना.

राजमातेनं विचारलं, "पांडू, तू चार दिवस काहीच खाल्लं नाहीस म्हणे. राजा झालास म्हणून वाटेल तसा वागण्याचा अधिकारी झालास की काय? या दोन मुलींचा विचार तरी केलास काय?"

पुढं होत मातेला वाकून नमस्कार करीत महाराज म्हणाले, "राजा झालो म्हणून वाटेल तसा मी वागेन असं तुलाही वाटतं काय? जे जीवन आता मला इथून पुढं जगायचं आहे त्याचा मी सराव करतो आहे! त्याला शोभेल असं वागतो आहे."

"कसलं जीवन?"

"संन्याशाचं!" मान खाली टाकत ते म्हणाले.

"पांडू, ताळ्यावर आहेस काय तू? तू कुरुकुलाचा सुपुत्र आहेस. दिग्विजयी सम्राट आहेस. पर्णकुटीत राहणारा भिक्षुक नव्हेस. कुणी शिकवलं तुला हे?" राजमाता अंगावर वीज पडल्यासारख्या किंचाळल्या.

माझ्या अंगावर आकाश कोसळल्यासारखं झालं.

"दैवानं माते! आता मी कुरुकुलातील सुपुत्र नाही. दिग्विजयी सम्राट नाही, कुणाचा पती नाही, बंधू नाही! मी म्हणजे केवळ दैवाच्या हातचं खेळणं आहे." त्यांनी आपली चर्या ओंजळीत झाकून घेतली! ज्या ओठांनी सेवकांना आज्ञा सोडावी ते कसेतरीच थरथरू लागले!

"दैवाचा तुला आजच का एवढा पुळका आला? दैवाची ढाल पुढं करून दुर्बलासारखा स्वत:चा बचाव करू नकोस पांडू. तुला असं करायचं होतं, तर या दोन सुंदर मुलींशी तू लग्नं कशाला केलीस? स्त्री म्हणजे केव्हाही पायात चढवावा आणि केव्हाही दूर फेकून द्यावा असा चढाव वाटला की काय तुला?" काहीशा कठोर; पण अंतर्यामी काळजीच्या स्वरानं राजमाता म्हणाल्या.

"नाही माते, आई असूनसुद्धा तू पांडूला ओळखलं नाहीस. एका महाभयानक शापाच्या अग्नीत माझ्या जीवनाचा भरारीनं, उभारीनं तरारून उगवलेला लसलसता कोंब नुकताच जळून दग्ध झाला आहे!"

शाप!

ते दोन शब्द वारुळात विषारी नाग घुसावेत तसे आमच्या कानांत घुसले. माझ्या डोळ्यांपुढं काजवे चमकू लागले. माद्री तर मटकन खालीच बसली.

राजमातेनं पुढं होऊन महाराजांचे खांदे गदागदा हलवून कळवळून विचारलं, "शाप? कसला शाप पांडू? कुणाचा? कुणी दिला?"

निर्विकारपणे थंड आवाजात महाराज बोलू लागले, "परवा वारणावताच्या अरण्यात आम्ही मृगयेसाठी गेलो, पण दैवानं उलट माझीच क्रूर मृगया केली. एका हरिणीबरोबर रमलेल्या मृगावर मी बाण सोडला. बाण वर्मी लागल्यामुळे तो मृग खाली कोसळला, पण तो मृगासारखा चीत्कारत नव्हता! मानवासारखं विव्हळत होता! आम्ही जवळ जाताच तो आपले पाय जास्तच झाडू लागला. आपल्या तप:सामर्थ्यानं एका मृगाचं रूप घेऊन आपल्या प्रेयसीबरोबर त्या रम्य अरण्यात रमलेला तो किंदम ऋषी होता! आपला मृगाचा देह टाकताना त्यानं जिवाच्या आकांतानं कळवळून मला शाप दिला, 'उन्मत्तपणानं आज तू एका प्रणयमग्न प्रियकराला आपल्या प्रेयसीपासून ओढून मृत्यूच्या दाढेत ढकललं आहेस, म्हणून मी किंदम ऋषी तुला शाप देतो की, तूसुद्धा प्रणयाराधनेच्या आशेनं जेव्हा आपल्या स्त्रीला कवेत घेशील तेव्हा माझ्यासारखाच तत्काल तडफडून-तडफडून मरशील!'

मुख ओंजळीत घेऊन कुरूंचा दिग्विजयी सम्राट बालकासारखा स्फुंदू लागला. त्यांनी झटकन आपल्या कक्षाचं द्वार बंद करून घेतलं. राजामाता दारावर हात बडवून-बडवून स्फुंदू लागल्या. माद्री गुडघ्यात मान घालून मुसमुसू लागली. मी दगडी पुतळ्यासारखी सुन्न झाले. खेद, दु:ख, यातना यांच्या पलीकडे – सुन्न!!

**

# अठ्ठावीस

रात्री मला महाराजांनी बोलावून घेतलं.

गवाक्षातून गंगेच्या शांत पाण्याकडे एकटक पाहत ते बोलू लागले, "कुंती, मी आता राजवाडा सोडणार आहे! जिथं वैभवाचा विलास असतो तिथं संयमाचा वास नसतो. माणसाला सगळ्यात जास्त प्रिय त्याचं जीवन असतं. इथं राहून मला संयमानं कधीही वागता येणार नाही. जीवनाचं रक्षण करता येणार नाही. उद्या मी राजवाडा सोडून नागशत पर्वतावर निघून जाणार आहे!"

"पण महाराज..." माझं हृदय हेलावून गेलं.

"कुंती, मला माहीत आहे तुला मी काहीच देऊ शकलो नाही! सौख्याच्या हिमालयावरून दैवानं तुला आज वास्तवतेच्या खोल दरीत लोटून दिलं आहे! इथं राहून तू माझ्यासाठी अश्रू ढाळावेत हे मला कधीही आवडणार नाही. तू परत माहेरी जा! माद्रीलाही ते समजावून सांग."

"महाराज, मी काय म्हणते ते... ऐका तर खरं..."

"कुंती, विजेच्या एकाच लोळात विशाल वृक्षावर निर्धास्तपणे विसावलेल्या वेली कोसळून खाली पडतात. या क्रूर शापानं तुम्हा दोघींची तीच अवस्था झाली आहे. माणसाच्या बाबतीत भवितव्य हे उंदराला क्रूरपणानं खेळविणाऱ्या निर्दय मांजरासारखं आहे! जा."

"महाराज मी काय म्हणते ते तुम्हांला ऐकावंच लागेल. देहाला सोडून सावली दूर राहू शकत नाही. वृक्षाला सोडून मुळ्या वाढू शकत नाहीत. पतीशिवाय आर्यस्त्रिया एक क्षणभरही जिवंत राहू शकत नाहीत! आम्ही दोघींनी आपल्याबरोबर यायचा निर्णय काल रात्रीच केलेला आहे!"

"दैवाबरोबर द्यूत खेळण्याचा दुबळा प्रयत्न करू नकोस कुंती. मनावर विषयाबाबत संयम मिळवणं म्हणजे आकाशाची अनंत पोकळी कुंकुमाच्या करंडकात भरू पाहण्याइतकं अशक्य आहे ते!"

"महाराज, नात्याच्या जाळ्याला आमचा मासा लागतो की काय यासाठीच जर काळ डोळ्यांत तेल घालून टपला असेल, तर मीही त्याला दाखवून देईन की, मथुरेच्या यादव राजा शूरसेनांची मी कन्या आहे! आजपासून मी कुंती प्रतिज्ञा करते की – की तुम्ही माझे पती नसून पुत्र – पुत्र आहात! याशिवाय अन्य कोणतंही नातं मी मनातही आणणार नाही! पण पुत्राशिवाय झालं तरी माता जिवंत राहूच शकत नाही! मला तुम्हाला आपल्याबरोबर न्यावंच लागेल! मी येणारच!"

"कुंती, भावविवश होऊ नकोस."

"तसं होणार नसेल तर – तर मग मला गंगेत लोटूनच तुम्हाला पुढं जावं लागेल."

"कुंती, कुंती, खरोखरच आकाशालाही लाजवील असं तुझं मन आहे, पण काळानं तुझ्यासारखं रत्न या दुर्दैवी पांडूच्या, शापानं भग्न झालेल्या मुकुटात कशाला बसविलं

कोण जाणे?'' ते गदागदा हलून स्फुंदू लागले.

''कुरुकुलाच्या सुपुत्राला रडणं शोभत नसतं! साक्षात दैवानंही लोळण घ्यावी इतकी त्याच्या पायांची किंमत आहे.'' मी त्यांना निक्षून सांगितलं.

त्यांनी आपला शोक आवरला.

त्या भयानक शापानं सगळ्या राजवाड्याची कळाच एका क्षणात नष्ट केली.

चांगले चार दिवस चिंतन करूनच महाराजांनी राजवाडा सोडण्याचा निर्णय केला होता. तो बरोबर होता की काय हे सांगणं कठीण होतं. त्यांचं म्हणणं एकच होतं. वैभवाच्या राजवाड्यात सदैव अंतर्यामी झुरत, दु:खिकष्टी राहण्यापेक्षा अरण्यात राहिलेलं काय वाईट? शिवाय वैभव हे माणसाला भोगी बनवितं. माणूस संपत्ती, कीर्ती, प्रतिष्ठा सगळ्या सगळ्यांशी एक वेळ द्यूत खेळेल, पण आपल्या जिवाशी तो कधीच द्यूत खेळू शकत नाही.

वनवास हाच त्यांना संयमासाठी योग्य होता. मलाही ते पटलं. वैभवाच्या निसरड्या कामभूमीवर कुणाचाही पाय घसरणं शक्य असतं. संयमासाठी असावा लागणारा खंबीरपणा आम्हाला वनातच मिळाला असता. आम्ही तिघांनीही अरण्यात जायचा खंबीर निर्णय केला.

**

# एकोणतीस

आम्ही राजवस्त्रं उतरून ठेवली. अंगावरचे अलंकार राजमातेकडे दिले. कशी कुणाला ठाऊक; पण आम्ही वनात जाणार आहोत ही वार्ता वाऱ्यासारखी नगरात पोहोचली. लोक वाड्यावर गर्दी करू लागले. महाराज भीष्म आणि धृतराष्ट्र आम्ही जाणार या नुसत्या कल्पनेनंच दु:खाच्या खाईत लोटले गेले. त्या पराक्रमी पुरुषांच्या निग्रही डोळ्यांतसुद्धा अश्रू उभे राहिले. विदुर भावोजी महाराजांना अनेक समजावणीच्या गोष्टी सांगू लागले, पण राजवाडा आणि वैराग्य या गोष्टी एकत्र जमणं अशक्य, हे महाराजांचं त्यांना एकच एक उत्तर होतं. नुकताच दिग्विजयाचा डंका वाजवून आलेला सर्वांचा आवडता राजा, योगी होऊन अरण्यात राहायला चालला! ज्या हातांनी कौरवांचा राजदंड धरावा तेच हात आता कमंडलू धरणार होते! ज्या मुखांनी विजयी सैन्याला हाणामारीचे प्रोत्साहनपर शब्द ऐकवले होते तेच मुख आता जिवाच्या मुक्तीसाठी आयुष्यभर श्लोकांचं पठन करणार होतं! दैवाइतकं विस्मयाचे धक्के देण्याचं सामर्थ्य कशातच नसतं!

शेवटी निघताना एक साधं धूतवस्त्र नेसलेल्या महाराजांनी सर्वांना वाकून नमस्कार केला. महाराज भीष्म म्हणाले, "पांडू, पूर्वी माझ्या पित्याच्या – राजा शंतनूच्या भावानं असाच या राज्याचा त्याग केला होता. त्याचं नाव देवापी होतं. पण त्यानं स्वत:च्या इच्छेनं वनवास पत्करला होता. आज तुला पराक्रमाच्या सिंहासनावरून उठून वैराग्याच्या व्याघ्रचर्मावर बसावं लागतं आहे, ते मात्र केवळ दुर्दैवामुळे! वनात त्या राजा देवापीचा ब्रह्मलीन आत्मा तुला धैर्य आणि मन:शांती देईल. जा! ज्या कारणासाठी तू राज्य सोडतो आहेस ते कारण मात्र प्राणपणानं सांभाळ. मनावर संयम ठेव. जोपर्यंत हा भीष्म आहे तोपर्यंत कौरवांचा डंका आर्यावर्तात असाच गाजत राहील, मागची चिंता करू नकोस."

आम्ही तिघांनी सर्वांचा निरोप घेतला आणि राजवाडा सोडला. आमच्याबरोबर नगरातील एकच व्यक्ती येणार होती. ती म्हणजे धात्री! जणू कुंतीच्या जीवनावर मरेपर्यंत छाया धरण्यासाठीच तिला विधात्यानं पाठविलं होतं. तिची कुणीही समजूत काढू शकलं नाही. आम्ही चौघं नगरातून पायी अनवाणी चाललो. या नगरात मी महाराणी म्हणून आले आणि आता संन्यासिनी म्हणून चालले होते. नगरजन येऊन धडाधड आमच्या पायांवर लोळण घेत होते. टाहो फोडून सांगत होते, "महाराज, महाराणी आमचा त्याग करू नका. हस्तिनापूरला पोरकं करून जाऊ नका!" पण आम्हाला जणू काहीच ऐकू येत नव्हतं. आमचे कान सुन्न झाले होते. मनं बधिर होती. मागं वळून बघवत नव्हतं. पुढं काही दिसत नव्हतं.

नगराबाहेर आम्ही गंगेवर आलो. तिला पाहताच माझं मन भरून आलं. मला मथुरेची आठवण झाली. यमुनेच्या काठी मथुरेत माझं बालपण गेलं होतं. निरागस आणि निवळशंख! बालपणातल्या पृथेनं आता कुंतीला बघितलं असतं तर ती काय म्हणाली असती? 'पृथे, वेड्यासारखं पांढरं वस्त्र नेसून कुठं चालली आहेस? माझ्याबरोबर गोल

गिरक्या घेत फुलपाखरू पकडायला ये!' मी तिथंच क्षणभर थांबले. तिथून एक पाऊलही पुढं टाकावं असं मला वाटेना. या गंगेनं आजपर्यंत कौरवांच्या किती पिढ्या पाहिल्या असतील! किती विजय बघितले असतील! आजचा प्रसंग मात्र तिच्या मनात कायमचा कोरलेला राहील. असलं दृश्य तिनं आपल्या जन्मापासून आजवर एकदाही पाहिलं नसेल. माझं धैर्य ढासळू लागलं. ओंजळीत मी मुख झाकून घेतलं. एकाएकी बोटांना कानांतील मोत्यांच्या कुंडलांचा स्पर्श झाला. चुकून ती काढून द्यायची राहिली होती. मी ती काढली आणि गंगेच्या पाण्यात सोडली. पाण्याचं एक गोल वतुळ मोठं-मोठं होत गेलं. माझ्या मनाच्या जलाशयात स्मृतीचं एक वलय उठलं. वर्षापूर्वीच मी दोन जिवंत सोनेरी कुंडलं अशीच अश्वनदीला अर्पण केली होती! आणि आज ही राजमातेची शेवटची निशाणी असलेली मोत्याची कुंडलं गंगेला अर्पण केली जात होती! आता कुंती मोकळी होती. बाहेरून आणि आतूनही! आता तिचे पाय पतीच्या मागून नेतील तिकडे जाणार होते, कुठेच अडखळणार नव्हते. स्त्रीचा जन्म काही साध्य करण्यासाठी कधीच नसतो. सारे समर्पण करण्यासाठीच असतो!

**

# तीस

हस्तिनापुराहून आम्ही नागशत पर्वतावर आलो. उत्तरेकडल्या त्या पर्वतावर हत्तींचे भरपूर कळप राहत होते. राजवाड्यातील सवयीमुळे अरण्यातला घोंघावणारा वारा आम्हाला खायला आल्यासारखा वाटे. त्या वाऱ्यानं हत्तींचे कळप बिथरून जात. चींऽऽ चींऽऽ करीत सरळ-सरळ ते आमच्या जवळून इतस्तत: धावत. त्या पर्वतावर आम्ही कसेतरी एक महिनाभर राहिलो आणि नंतर पुढं निघालो. आता आमच्यासाठी ठरावीक अशी दिशा नव्हती. आम्ही ठरवू तीच आमची दिशा होती. पूर्वजन्मीच्या ॠणानुबंधानं एकत्र बांधलेले आम्ही चार जीव होतो. महाराज दूर गेलेत असं पाहून माद्री ढसढसा रडे. मी स्वत:ला सावरून तिलाही सावरीत असे!

नागशत पर्वतावरून आम्ही चैत्ररथ पर्वतावर आलो. चैत्ररथावर थोडं दिवस राहून गंधमादन पर्वताकडे वळलो. वाटेत हिमालय लागला. त्याच्या दर्शनानं मात्र मला थोडा धीर आला! सगळीकडे विखुरलेलं नुसतं पांढरंशुभ्र बर्फच बर्फ होतं. निरनिराळ्या रंगांनी नटलेल्या नटव्या जगाला त्या पर्वताच्या रूपानं जणू विधाता आपले पांढरेशुभ्र स्वच्छ दात विस्फारून हसत होता! हिमालयात आम्हाला मुनीवर व्यास भेटले. ते घोर तपश्चर्या करून हस्तिनापुरालाच परत चालले होते. त्यांनी आश्चर्यानं विचारलं, "पांडू, तू हिमालयात कसा?" महाराजांनी त्यांना घडलेला सगळा वृत्तान्त सांगितला. मी त्यांना नमस्कार केला. मला आशीर्वाद देताना ते म्हणाले, "कुंती, दुर्वासांची वाणी खरी ठरेल. तू वीरांची जननी होशील!" महाराजांनी आश्चर्यानं चमकून त्यांच्याकडे पाहिलं. त्यांना उद्देशून ते म्हणाले, "पांडू, कुंती कोण आहे ते तुला कळलेलं नाही. जगात ते कुणालाही कळणार नाही! जा तुम्ही." ते निघून गेले. मंद-मंद पदक्षेप टाकीत एखाद्या मंद झुळकेसारखे!

व्यासांच्या उद्गारावरून महाराज काहीतरी विचारतील अशी भीती मला पडली होती, पण दैवानं कृपा केली आणि त्यांनी त्याविषयी मला लगेच तेव्हा काही हटकलं नाही.

हिमालयातून आम्ही गंधमादन पर्वतावर आलो. तिथं इंद्रद्युम्न सरोवराच्या काठी थोडं दिवस राहिलो. तेथून हंसकूट पर्वत ओलांडून सर्वांत शेवटी शतशृंग पर्वतावर आलो. या पर्वतावर निळी-निळी सरोवरं होती. हिरवीगार वनराई होती. निरनिराळी फळझाडं होती. हरणांचे आणि सशांचे कळप होते. हा शतशृंग पर्वत म्हणजे निसर्गदेवतेच्या हिरव्या वस्त्राचा निळा पदर होता!

एका सरोवराकाठी त्या पर्वतावर आम्ही पर्णकुटी उभी केली. आम्ही इतका प्रवास केला होता की, नंतर हस्तिनापूर कोणत्या दिशेला राहिलं होतं ते कळलंही नाही. त्या सगळ्या अरण्यात मानववस्तीचं एवढंच एक निशाण होतं – पर्णकुटीचं! कौरवांचा दिग्विजयी राजा आपल्या दोन लाडक्या पत्नींसह त्या पर्णकुटीत राहू लागला! निळं आकाश त्याच्या पर्णकुटीवर छत्र ढाळू लागलं! अरण्यातले उंच- उंच वृक्ष त्याला विंझणवारा घालू लागले! निरनिराळ्या कंदमुळांच्या जाळ्या-वेली आणि फळझाडं त्याचं

भोजनाचं तबक भरू लागले! अरण्यातली गवताची शय्या त्याला आपल्या कुशीत घेऊ लागली.

**

# एकतीस

सकाळी पूजा करून दिवसभर महाराज अरण्यात फळं आणि कंदमुळं शोधण्यासाठी जात. संध्याकाळी परत येत. आम्ही सरोवरातून पाणी आणून पर्णकुटी सारवणं, पूजेची तयारी करणं अशी कामं करू लागलो. दिवसांमागून दिवस जाऊ लागले. हस्तिनापूरची आठवणही कमी-कमी होऊ लागली. हस्तिनापूर सोडून दोन वर्षं झाली होती.

महाराज थोडं कृश दिसू लागले होते. वाढलेल्या दाढीमुळे ते वयानं मोठे दिसू लागले. नेहमीच ते कसल्यातरी गूढ विचारांत सापडल्यासारखे वागू लागले. त्यांच्या मनाचा थांग लागणं कठीण होतं. जरुरीपेक्षा ते एकही जादा शब्द बोलत नसत. कधी चुकूनही हसत नसत!

एके दिवशी एक हरणाचं गोंडस पाडस त्यांच्या पायांजवळ आलं आणि आपल्या खरबरीत जिभेनं त्यांचा पाय चाटू लागलं. मला वाटलं ते त्याला हळूच दूर लोटतील, पण खाली बसून त्यांनी त्याच्या पाठीवरून ममतेनं हात फिरविला आणि त्याला आपल्या कवेत घेऊन त्याचे पटापट मुके घेत ते लहान मुलासारखे मुसमुसू लागले. माझ्या मनात एक अतिशय भयानक विचार येऊन गेला. अति मानसिक त्रासामुळे महाराजांना वेड लागलं की काय? घाबरून मी विचारलं, ‘‘असं काय करता?’’ माझ्याकडे न पाहताच त्या पिल्लाच्या कातडीवर आपला गाल घाशीत ते म्हणाले, ‘‘कुंती, कसं सांगू? निपुत्रिकाला जर या लोकातच नाही तर मग स्वर्गलोकात तरी कुठली जागा असेल? त्याच्या मृत्यूबरोबरच जग त्याला विसरणार नाही काय? मी दिग्विजयी सम्राट नाही तर दैवाच्या दारातला भिकारी आहे! माझ्याबरोबर माझं नाव अस्त पावेल!’’

‘‘त्यासाठी का आपण दु:खी आहात? तसं असेल तर दुर्वास ॠषींच्या मंत्रानं मी आपल्या नावासाठी पुत्र निर्माण करीन. दुर्वासॠषींनी मला देवहुती मंत्र दिला आहे.’’ महाराजांना मी दुर्वास ॠषींच्या यज्ञयागाची जरूर तेवढीच माहिती दिली.

‘‘कुंती, या पांडूला अपयशाच्या सगळ्या गर्तेतून सावरण्यासाठीच का तुला विधात्यानं माझी पत्नी केलं आहे?’’

‘‘महाराज, लवकर या पर्णकुटीत आपणाला हवा तसा सद्गुणी पुत्र दिसेल.’’ मी तो विषय तेथेच थांबविला.

पुढं काही दिवसांनी एका प्रात:काळी मी आचमनाकरिता पाणी घेतलं आणि डोळे मिटले. मंत्राचे शब्द माझ्या मनाच्या कुंभात गरगर फिरू लागले. त्यांच्या प्रत्येक उच्चाराबरोबर माझ्या शरीराची जाणीव नष्ट होऊ लागली. सर्व जगाचा भार सोसणाऱ्या धरतीच्या नावानं स्मरण करून मी यमदेवतेला आवाहन केलं. माझ्या सर्वांगाची एक ज्योत झाली. धरतीतून एक ज्योत आली आणि त्या ज्योतीतून गेली. जाताना तेजाचं संक्रमण करून गेली. मला हळूहळू शरीराची जाणीव होऊ लागली. कंदमुळं आणि फळं खाऊन जगलेला माझा देह थरथरू लागला. मी धाडकन खाली कोसळले.

त्या दिवसापासून मी अबोल झाले. मला एकान्त आवडू लागला. शांततेची ओढ

लागली. कुणीही मोठ्यानं बोललेलं मला खपेना. परत एक अननुभूत जीवनाला सुरुवात झाली. शरीर कणाकणांनी फुलू लागलं.

योग्य कालानंतर एके दिवशी पहाटे माझ्या पोटात दुखू लागलं. मी माता झाले. एक सौम्य आणि शांत चेहऱ्याचं बालक जन्माला आलं. सर्वांची मुखं आनंदानं उजळून गेली. सर्वांनी त्याचं नाव युधिष्ठिर ठेवलं! युधिष्ठिर पर्णकुटीत वाढू लागला. तो कधीच रडत नव्हता, पण कधी हसतही नव्हता! नदीच्या डोहासारखी त्याची चर्या सदा शांत होती! डोळे विशाल होते!

महाराज त्याला खेळवण्यात स्वत:ला विसरू लागले. आम्हाला हस्तिनापूरचा तर विसर पडलाच होता, पण आता आमच्या दु:खांचाही विसर पडला.

युधिष्ठिर एक वर्षाचा झाला. दुसऱ्या वर्षीच वायुदेवतेपासून मला आणखी एका पुत्राची प्राप्ती झाली. त्याची अंगलट अतिशय रेखीव आणि भक्कम होती. त्याला आम्ही सर्वांनी भीम हे नाव ठेवलं! तो वायूसारखा गतिमान होता. एक क्षणसुद्धा त्याला एका ठिकाणी बसावं असं वाटत नसे! भीमानंतर इंद्रदेवापासून आणखी एका पुत्राचं वरदान मला मिळालं. ते सावळ्या रंगाचं बालक अतिशय तरतरीत होतं. भरदुपारी त्याचा जन्म झाला. त्याच्या काळ्याभोर डोळ्यांतून तेजाच्या ठिणग्या बाहेर पडत! त्याचं आम्ही अर्जुन असं नाव ठेवलं. युधिष्ठिर, भीम आणि अर्जुन यांच्या कलकलाटानं पर्णकुटी हादरू लागली. मला माझं जीवन सार्थ झाल्याचं समाधान वाटू लागलं. ते कोण होतील! काय करतील! याबद्दल मी, धात्री आणि महाराज घटकान्‌घटका चर्चा करू लागलो. धात्री नेहमी म्हणे, "हा भीम कधी कुणाचंही ऐकणार नाही! तो मिळेल त्याला झोपडपूनच काढणार! एक क्षणभर तरी स्थिर बसणं याला माहीत आहे काय?"

आमचे हे संवाद माद्री मात्र एका कोपऱ्यात बसून अबोलपणानं ऐकू लागली! ती कुणाशी काही बोलेना. तिचं असं वेगळंच जग तयार होऊ लागलं. ती का दु:खी होती ते मला समजलं. स्त्रीचं दु:ख जाणायला स्त्रीला वेळ लागत नाही. तिला अपत्याची ओढ लागली होती. सरोवराच्या काठी तिला मी एकदा विचारलं, "माद्री, तू पुत्रासाठी का दु:खी आहेस?" उत्तर देण्याऐवजी मला मिठी मारून ती स्फुंदू लागली. तिची पाठ थोपटीत मी म्हणाले, "माद्री, तू कुरुकुलाची सून आहेस. अशी रडू नकोस. तुलासुद्धा मुलं होतील."

सरोवरातील ओंजळभर पाणी घेतलं आणि डोळे मिटून मी दुर्वासांचं स्मरण केलं. माद्रीला समोर बसवून मी तिच्या हातावर ते पाणी सोडलं. धडाधड मंत्र म्हणू लागले. भात्यातून बाण बाहेर पडावेत तसं माझं शरीर रिक्त होत आहे, असं मला वाटू लागलं! शेवटी सर्व मंत्र म्हणून झाले. मी डोळे उघडले. माद्रीला विचारलं, "आता तुला मंत्राचे शब्द आठवतात का?" तिनं "हो" म्हणून मान डोलावली. मंत्रांचे शब्द आठवण्याचा प्रयत्न मीही करू लागले, पण मला काही आठवेना! स्मृतीच्या सगळ्या कानाकोपऱ्यात मी झाडून पाहिलं, पण कुठूनही मंत्रांचा प्रतिसाद येईना! आज कुंतीनं स्वत:ची शेवटची शक्तीही दुसऱ्याला अर्पण केली होती! आता ती एक साधी स्त्री होती. एक य:कश्चित स्त्री. मुलं आणि पती हीच तिची संपत्ती होती. कस्तुरी काढून घेतलेल्या मृगीसारखी मी सरोवरावरून पर्णकुटीत आले!

माद्रीला पुढं दोन मुलं झाली. त्यांची नावं नकुल आणि सहदेव ठेवण्यात आली. आता पर्णकुटीत नऊ माणसं राहू लागली. महाराज, माद्री, मी, धात्री आणि पाच

कुमार. हस्तिनापूर सोडून आम्हाला दहा वर्षं झाली होती! पर्वतावरच्या वाऱ्यासारखा काळ धावत होता!

या दहा वर्षांत कुरुकुलाचं काय झालं, हस्तिनापुराचं काय झालं, आम्हाला त्यापैकी काहीच कळलं नाही. ज्या पर्वतावर आम्ही राहत होतो तो दुर्गम होता. सहसा कुणीही त्या दिशेला कधी अरण्यात प्रवेश करीत नसे. बाहेरच्या गोष्टी म्हणजे आम्हाला स्वप्नातील भूमी होती. हे अरण्य हाच आमचा वाडा होता. इथले निरनिराळे प्राणी हेच आमचे सोबती होते. पक्षयांचं संगीत हीच आमची करमणूक होती. आम्ही अरण्यवासी झालो होतो!

**

# बत्तीस

स्त्री मुलांच्या सहवासात अरण्यातसुद्धा स्वर्ग निर्माण करू शकते आणि आम्ही तर तीन स्त्रिया होतो. आमचा सगळा वेळ मुलांशी खेळण्यात आणि बोबडे बोल ऐकण्यात वा बोलण्यात जाऊ लागला. ते सगळे लहान होते; पण समजूतदार होते. एकटा भीम मात्र आम्हाला कधीच आवरत नसे. एखाद्या धिप्पाड हत्तीची पुष्ट सोंड जशी एकसारखी अविरत वळवळत असते तसा तो एकसारखा दुडदुडत राही. एक पळभरसुद्धा तो कधी गप्प बसत नसे. दिवसागणिक त्याचं शरीर बांधेसूद होत-होत जास्तच बाळसेदार दिसू लागलं.

ते पाचही कुमार वनगाईंचं दूध पीत आणि फळं खात मोठे होत होते. रानचा वारा खुळखुळा होऊन शीळ घालीत त्यांना खेळवू लागला. त्यांच्या कलकलाटानं पर्णकुटी हादरू लागली. धात्रीच्या वठलेल्या म्हाताऱ्या स्त्रीहृदयालासुद्धा प्रेमाची पालवी फुटली! ती सर्वांना घेऊन खेळू लागली. वर निळं आकाश आणि खाली हिरवीगार धरती अशा वातावरणात ते पाच जीव सागाच्या रोपासारखे मोठे होऊ लागले. मी परत स्वत:च्या भाग्याचा हेवा करू लागले! सौंदर्य, संपत्ती, कीर्ती यांपेक्षा स्त्रीला मुलांची ओढ अधिक असते. दोन रेशमी ओठ लुचून तिचं दुग्धपान करू लागले की, स्त्रीला जीवन धन्य झाल्याचं समाधान मिळतं. मातृत्व हा स्त्रीचा मोक्ष असतो.

आता मी परत सौख्याच्या शिखरावर होते. जीवन म्हणजे सुखदु:खाच्या ऊनपावसाचा खेळ. हे अरण्य हेच आता आमचं राज्य होतं. कुणालाही पायदळी न तुडविता मिळालेलं राज्य! मी या राज्याची महाराणी होते.

आमच्या अंगाखांद्यावर मुलं खेळताना पाहून महाराज आपलंही दु:ख विसरले. त्या पाच मुलांना खेळवताना त्यांनाही आपल्या जीवघेण्या शापाचा विसर पडला. ते पूर्वीसारखे हसू लागले. मनमोकळं बोलू लागले.

**

# तेहेतीस

वर्षांमागून वर्षं मागं पडत चालली. मुलं मोठी होऊ लागली. अरण्यात निर्भयपणे फिरू लागली. कुठंही ती मिळून जात. त्यांना खेळण्यासाठी शतशृंग पर्वत अपुरा पडू लागला. भीम तर येताना वाघाची पिल्लं त्यांच्या कानांना धरून फरफर ओढून आणू लागला. माणसाचं जीवन हे आजूबाजूच्या परिस्थितीवर अवलंबून असतं. जसा आणि ज्यांचा सहवास असेल तसं मानवी मन आकार घेतं. लहान मुलं म्हणजे तर अनुकरणप्रिय असतात. आमच्या पश्चात अरण्य त्यांना जे शिकवील तेच त्यांचे संस्कार होते. ते त्या नैसर्गिक संस्कारांत मोठे होऊ लागले. आता ते दहा-बारा वर्षांचे झाले होते.

अरण्यातल्या नद्या त्यांना जीवन हे सतत वाहण्यासाठी असतं हे शिकवू लागल्या. साचणाऱ्या जीवनाचं कोंदट डबकं त्यांना माहीत नव्हतं. तिथले उंच-उंच कडे त्यांना 'तुम्हीही असेच उंच-उंच व्हा', हे शिकवू लागले. वरचं निळं आकाश मन स्वच्छ ठेवण्याचा धडा देऊ लागले. तिथले निरनिराळ्या प्राण्यांना सावली देणारे वृक्ष त्यांना जगासाठी झिजण्याचा संदेश देऊ लागले. पक्षयांच्या उंच भराऱ्या त्यांच्या धाडसाला आव्हान करू लागल्या.

ते आम्हाला नेहमी हजारो प्रश्न विचारून भंडावून सोडत.

युधिष्ठिर मला विचारी, "आई, आकाशाचा हा निळा-निळा घुमट पृथ्वीवर कोणी बसविला? त्याला खांब कुठं आहेत?"

मी त्याला म्हणे, "बाळ, पूर्वी सर्व देवांसाठी भगवान शंकरानं समुद्रमंथनातून बाहेर आलेलं विष प्राशन केलं होतं! ते आकाश म्हणजे त्या भगवान शंकराचा विष पिताना काळानिळा पडलेला कंठच आहे."

अर्जुन मला विचारी, "आई, वारे जोरात वाहू लागले की सूंऽऽऽ सूंऽऽऽ असा आवाज का येतो?"

मी म्हणे, "अर्जुना, पूर्वी प्रभू रामचंद्र म्हणून एक फार मोठा धनुर्धर होऊन गेला. त्यानं राक्षसांना मारण्यासाठी सोडलेले बाण इतके वेगवान होते की, ते कुणालाही थोपविता आले नाहीत. अजूनही त्याचे काही बाण पृथ्वीभोवती फिरत आहेत. त्यांच्या शेपटांचा हा आवाज आहे!" तो विचारात गढून जाई.

भीम मला विचारी, "आई, हे डोंगर गं कसे तयार झाले?"

मी त्याला म्हणे, "भीमा, प्रभू रामचंद्रांच्या काळी हनुमंत नावाचा एक धिप्पाड सेनापती होता. तो नेहमीच आकाशातून फिरत असे, पण एकदा त्याला पृथ्वीवर यावं असं वाटलं, पण पृथ्वी म्हणजे नुसती दलदल होती त्या वेळी! या दलदलीत हनुमंतानं पाय ठेवला! त्याचा पाय ज्या-ज्या ठिकाणी पडला त्या-त्या ठिकाणी खोल दऱ्या तयार झाल्या! बाकीचा भाग फुगून वर आला तेच हे डोंगर! तेच हे पर्वत! या दलदलीत चालून-चालून हनुमंत कंटाळला. तो आकाशात भरारी घेऊ लागला. त्याच्या पायाला एक मोठं ढेकूळ चिकटून गेलं तोच तो चंद्र!" तो तोंड पसरून सगळं ऐके. मग गाल आणि काखा फुगवून हनुमंत किती मोठा असेल याची कल्पनेनं नक्कल करी!

नकुल आणि सहदेव मला विचारीत, “माते, आकाशात विजा का चमकतात?”

मी त्यांना उत्तर देई, “आकाशात देव-दानवांचं युद्ध चाललं आहे. त्यात देवांच्या हातात तळपणारी ती खड्गं आहेत.”

नकुल स्वत:चे हात फिरवून त्याचे लटके दाटुमुटीचे वार सहदेवावर करी.

मुलं असे अनेक प्रश्न मला विचारीत. मी काहीही उत्तर दिलं तरी त्यांना चाले, त्यांचं समाधान होई!

**

# चौतीस

आमचे दिवस आनंदात जाऊ लागले. तो शतशृंग पर्वत सोडावा, असं आम्हाला वाटेना. जिथं मनुष्य वस्ती करतो त्या ठिकाणाशी त्याची श्रद्धा निगडित होते. त्या जागेबद्दल त्याला एक आगळीच जवळीक वाटू लागते. शतशृंग पर्वत आमचं आता कायमचं निवासस्थान होतं. कुणी सांगावं कदाचित याच पर्वताच्या घोंघावणाऱ्या वाऱ्यात माझा शेवटचा श्वास मिसळला असता! मला त्याबद्दल कधीही खेद वाटत नव्हता, कारण या पर्वतानंच आम्हाला पोसलं होतं. जवळ- जवळ दीड तप आपल्या कुशीत निवारा दिला होता. पण – पण काळपुरुषासारखा लहरी रंगारी या जगात दुसरा कोणीच नसेल. किती झटपट बदलतो तो जगाचे रंग! क्षणात होत्याचं नव्हतं करतो. पृथ्वीच्या पाठीवर आनंदानं गजबजलेलं नगर तो क्षणात अजगरासारखं गिळतो. मानवानं हजारो वर्षं खपून तयार केलेली संस्कृती हा काळपुरुष लहान मुलानं समुद्राच्या काठी बांधलेला वाळूचा किल्ला, लहर लागताच स्वत:ला उधळून लावावा तसा क्षणात उधळून टाकतो. हे जग म्हणजे एक अराजकच नाही काय? इथं सुसंगती आणि सुसूत्रता असते कुठं? कोण या सगळ्या घटनांचे फासे टाकतं? कोण हलवितं ही सगळी खेळणी? माणसाचं जीवन तर या अफाट विश्वातली किती क्षुद्र वस्तू! विश्वाच्या निसर्गात उलथापालथ करणाऱ्या काळाला माणसाचं जीवन म्हणजे एक बुडबुडाच वाटत असणार! केव्हाही फोडता येण्यासारखा एक क्षुद्र बुडबुडा! या बुडबुड्याच्या निर्मितीनं जगात काही भर पडलेली नसते आणि फुटण्यानं काही कमतरता पडणार नसते. विश्व हे कायम आहे तसंच असतं.

पण या बुडबुड्याच्या फुटण्यानं मानवी जीवनात मात्र काही-काही वेळा जलतरंग निर्माण होतात! कधी-कधी ते भयानक असतात. मनाचा जीवनावरील विश्वास उडवितात, श्रद्धा जाळून टाकतात. जगात 'देव' नावाची शक्ती शिल्लक आहे की नाही, असा प्रश्न निर्माण करतात. मन भांबावून जातं. चोहोबाजूंनी आग लागलेल्या वणव्यात सापडलेल्या पाखरासारखं असाहाय्यपणे तडफडू लागतं.

माझी एका घटनेनं अशीच अवस्था झाली. एके दिवशी माद्री पाणी आणण्यासाठी सरोवरावर गेली होती. थोड्या वेळानंतर महाराजही नेहमीप्रमाणं अरण्यात गेले. अर्ध्या घटकेतच माद्री परत आली, पण तिच्या काळीज फोडणाऱ्या टाहोनं आणि हृदयविदारक मर्मभेदी हंबरड्यानं मी घाबरून पर्णकुटीबाहेर आले. तिच्या हातात पाण्याचा घडा नव्हता. आपली छाती पिटीत आणि झिंज्या उपटीत ती कशीतरीच वेड्यासारखी "ताईऽ ताई" असा हंबरडा फोडत वाऱ्याच्या वेगानं धावत येत होती. अंगावरच्या वस्त्राचंही तिला भान नव्हतं. तिच्यापुढं त्या वेळी कुणी जरी आडवं आलं असतं, तरी ती त्याच्यावर धाडकन आदळून कोसळली असती. मला काही कळेना. भीतीची एक सणसणीत शिरशिरी माझ्या सर्वांगातून चमकून गेली. काय झालं होतं माद्रीला? पाण्यासाठी तिनं नेलेला घडा काय झाला? पाच कुमार सुरक्षित आहेत की...?

माझ्याजवळ येताच ती माझ्या अंगावर कोसळली. ती नुसती "ताईऽऽ ताई" असा हंबरडा फोडत होती. हनुवटी वर करून मी तिला विचारलं, "माद्री, रडतेस का?

घडा काय झाला?''

"घडा फुटला!'' म्हणत तिनं मला घट्ट मिठी मारली. तिचा शोकावेग थोडा आवरलेला दिसताच मी तिला विचारलं, "माद्री तू वीरकन्या आहेस, अशी लहान मुलासारखी रडतेस काय? काय झालं ते नीट सांग!''

"ताई गं... महाराज...'' म्हणत तिनं मला छातीशी घट्ट धरलं. कितीतरी आर्तता होती तिच्या मिठीत! तिचं हृदय भीतीनं थडाथड उडत होतं.

"काय झालं महाराजांना? बोल माद्री, महाराज कुठं आहेत?'' मी जोरानं किंचाळले.

"सरोवरच्या काठी!''

ते शब्द ऐकातच कानात वारं भरलेल्या वासरासारखी माझी स्थिती झाली. माद्रीला दूर लोटून मी सरोवराकडे धावू लागले. माद्री माझ्या मागून धावू लागली. सरोवरच्या काठी येताच मी जे पाहिलं ते माझा जगातील सत्यावरचा विश्वास उडविणारं होतं. माझा प्राणप्रिय साथी लाकडाच्या ओंडक्यासारखा निपचित पडला होता. कुरुकुलाचं रक्त अंगात फिरणारी साक्षात सूर्यदेवालाही लाजवील, अशी त्यांची चर्या वणव्यात जळालेल्या लाकडासारखी काळी ठिक्कर पडली होती! ते मूर्च्छित असतील म्हणून त्यांना हलविण्यासाठी मी त्यांच्या अंगाला हात लावला. माझ्या अंगावर काटाच उभा राहिला. त्यांचं शरीर थंडगार होतं. झटकन उठून मी माद्रीला विचारलं, "माद्री, हे असं कसं झालं?''

तोंड फिरवून ती घोगऱ्या आवाजात बोलू लागली, "ताई, माझा काहीच दोष नाही, मी घडयात पाणी भरून सरोवरातून बाहेर पडले. महाराज सरोवराच्या काठीच उभे होते. वाऱ्यानं माझा पदर उडत होता, पण डोक्यावरच्या घडयामुळे मला तो नीट आवरता येईना! मी सरोवराबाहेर आले. महाराज हसत उभे होते. त्यांनी एकदम हातातील परशू खाली टाकला! त्यांच्या डोळ्यांत नेहमीचे भाव नव्हते.

"मी जवळ येताच झटकन त्यांनी मला आपल्या कवेत घेतलं! माझ्या डोकीवरचा घडा धाडकन खाली पडला. त्यांचे कामी डोळे ज्वर फेकीत होते. मला कवटाळीत त्यांनी माझ्यावर 'माद्री, माद्री' म्हणत चुंबनांचा वर्षाव केला. मी त्यांच्या मिठीतून सुटण्यासाठी हातपाय आपटत धडपडू लागले, पण ते अशक्य होतं. एखाद्या उपाशी माणसानं अन्नावर तुटून पडावं तसं ते माझ्यावर तुटून पडले होते. मी त्यांच्या भक्कम मिठीत घुसमटून गेले. ते क्षणात भानावर आले. विषारी नागिणीला ढकलावं तसं त्यांनी मला दूर लोटलं! पण – पण क्षणात त्यांची चर्या बदलू लागली! ते डोळे फिरवू लागले. उभ्याउभ्यानंच ते धाडकन खाली कोसळले. जिवाच्या आकांतानं कसेतरी हातपाय झाडू लागले. 'माद्री, माद्री' म्हणत तळमळू लागले. मी भीतीनं गारठून गेले आणि तुझ्याकडे धाव घेतली."

मी माद्रीच्या खाडकन मुस्कटात मारली. ती जास्तच मोठ्यानं हंबरडा फोडू लागली. माझ्या कानात किंदम ऋषींच्या शापाचे शब्द घुमू लागले. "राजा, तू एका प्रियकराला प्रेयसीपासून दूर खेचलं आहेस, जेव्हा भविष्यात तू आपल्या स्त्रीला असाच कवेत घेशील तेव्हा माझ्यासारखाच तडफडून-तडफडून मरशील!''

माझा जीवनसाथी मला सोडून अनंताच्या प्रवासाला निघून गेला होता. केवळ एकाच मोहाच्या क्षणानं त्याला जीवनाच्या हिरवळीतून मृत्यूच्या स्मशानात नेलं होतं.

केवळ एकाच क्षणानं कुंतीच्या अंगात सहनशक्तीचे कसले अणुरेणू आहेत, हे पाहण्यासाठी तिला विधवा केलं होतं! दिग्विजयी संयम-सम्राट आज भावनांच्या राज्यातला लाचार भिकारी ठरला! कित्येक वर्षं मनाच्या संयमानं वागणारा योगी एका – केवळ एकाच क्षणात दुबळ्या मनाचा भोगी ठरला. कामवासना! कामवासना म्हणजे माणसाचा पाय केव्हाही घसरेल अशी बर्फाची फसवी दरी! कामभावना म्हणजे केव्हाही अंगावर पडून जीवन जाळणारी वीज! आपल्यासह इतरांना पोळून काढणारा वणवा!

माझ्या संयमाचे बांध फुटू लागले. मी उभ्यानंच धाडकन महाराजांच्या प्रेतावर 'महाराजऽ!' असा हंबरडा फोडीत कोसळले. त्यांच्या छातीवर मस्तक आपटू लागले. माझ्या मस्तकावरचा कुंकुमतिलक पुसटून गेला.

**

# पस्तीस

धात्री दहनाची तयारी करू लागली. तिनं चिता रचली. एका दिग्विजयी राजाची अंतिम चिता निर्जन अरण्यात सरोवराकाठी रचली गेली! दैव मला काय-काय दाखविणार होतं? मध्यम वयातच मी विधवा म्हणून जगणार होते. पतीशिवाय स्त्रीचं जीवन म्हणजे ज्योतीशिवाय वात. मी आज कोण उरले होते? एका मान्यवर यादवराजाची मानी मुलगी? कौरवांची वैभवशाली त्या अरण्यातली वनराणी? उद्या आपल्या पराक्रमानं जग दिपविणाऱ्या पुत्रांची भाग्यशाली माता? छे छे, मी यांपैकी काहीच नव्हते. आपल्या पतीच्या निधनानं प्राण निघून गेलेली मी एक निष्प्राण कुडी होते! एक दुर्दैवी विधवा होते. विधवा! किती भयानक आहे हा शब्द! महाराणी – विधवा आणि मध्यम वयस्क! छे, कशात आणि काय संगती होती? माझं जीवन म्हणजे आहे तरी काय? कुठल्या धैर्यानं दुर्दैवाचे हे उकळते कढ सोसू? या अरण्यात कोण मला धैर्याचे आणि सांत्वनाचे चार शब्द सांगणार? चोहोबाजूंनी आकाशाचा घुमटच जर अंगावर कोसळला, तर माणूस आश्रयासाठी कुठं जाईल?

मी एका अजाण बालकाला स्वत:च्या हातांनी मृत्यूच्या मांडीवर ठेवलं होतं म्हणून तर मृत्यू आपले काळे दात विचकून मला त्याबद्दल ही कठोर शिक्षा देत नव्हता ना? पुढं भयाण दरी आणि मागं गर्द अरण्य असंच माझं जीवन नव्हतं काय? बालपणात मी बाबांच्या हातचं खेळणं होते. भोजपुरात मी दुर्वासांच्या हातचं खेळणं झाले. आणि आज या अफाट वेगानं धावणाऱ्या काळाच्या हातचं खेळणं झाले. त्याच्याबरोबर धावताना माझी आता उरस्फोड होणार होती. कुणाच्या आधारानं मी जीवनाची वाट पुढं चालू? माझं मन – छे आता मला मनच नव्हतं! आणि असलंच तर ते बधिर होतं. त्याला भूत, भविष्य, वर्तमान काही-काही समजत नव्हतं. काळ वाघाचं रूप घेऊन अर्धमेल्या कुंतीच्या जीवनाची शेळी पाठीवर टाकून उन्मत्तपणानं तसाच चालला होता. मी गप्प होते. मला रडावं असंही वाटत नव्हतं, कारण माझ्या गोठलेल्या हृदयातून अश्रू बाहेर पडत नव्हते. रडू येण्यापुरत्याही भावना द्रवत नव्हत्या.

धात्रीनं महाराजांचं प्रेत चितेवर ठेवलं. त्यावर लाकडं रचली. तिनंच चितेला अग्नी दिला. शत्रूंना भीतीनं कापायला लावणाऱ्या एका पराक्रमी अन् दिग्विजयी योद्ध्याला एका दासीनं अग्नी दिला! चिता पेटू लागली. ज्वालांचे पक्षी चटाचट आकाशात भराऱ्या घेऊ लागले. माझं मन सुन्न होतं. त्या चितेत घुसावं म्हणून निर्धारानं मी उठून उभी राहिले, काय उपयोग होता आता तशा उर्वरित जीवनाचा? मी निश्चयानं पदर खोचला. इतक्यात पांढरीशुभ्र वस्त्रं घालून सरोवरातून स्नात होऊन आलेल्या माद्रीनं माझ्या पायांना हात लावला आणि तो कपाळावरून मागे नेला. एक क्षणभरही मागं वळून न बघता, मी काय बोलणार हे न ऐकता, ती सरळ तडक त्या अग्नीत घुसली! क्षणार्धात तिचं पांढरं वस्त्रं काळपट पडून करपून गेलं! माझं मन उरी बाण लागलेल्या पक्षयासारखं तडफडू लागलं. मी तिच्या मुस्कटात मारली होती! मला ती भावनेच्या राज्यातली दुबळी स्त्री वाटली होती, पण किती तत्परतेनं तिनं निर्णय केला होता!

किंदम ऋषींच्या नाकावर टिच्चून तिनं आपल्या प्रियकरानं दिलेलं आलिंगन मृत्यूच्या मोलानं चितेवरही स्वीकारलं होतं! आता कुणाचाही शाप तिला तिच्या प्रियकराच्या मिठीतून सोडवून घेणार नव्हता! मीही तिचाच मार्ग अवलंबण्यासाठी सिद्ध झाले. इतक्यात पर्णकुटीतून धावत आलेले पाच कुमार माझ्या कमरेला बिलगले! मला गदागदा हलवून ते विचारू लागले, "आई, बाबा कुठं आहेत?" नकुल आणि सहदेव केविलवाणी मुखं करून रडक्या आवाजात म्हणू लागले, "धाकटी आई कुठं आहे गं आपली?"

त्यांना बघताच माझं बधिर मन पाझरलं. मी त्या चितेत उडी घेतली असती तर? ह्या पाच मुलांना घेऊन ही धात्री कुठं जाणार होती? केवळ एकाच मुलाच्या त्यागाचं शल्य मला अनेक रात्री सतावीत आलं होतं. माझं ते पाप होतं की पुण्य होतं, हे मला सांगता आलं नसतं, पण – पण या पाच निराधार मुलांना मागं टाकून मी चितेत उडी घेतली असती तर – तर ते मात्र नक्कीच पाप झालं असतं. मी त्या सर्वांना एकदमच कवेत घेतलं आणि ढसाढसा रडू लागले. पक्षिणीला पिल्लं बिलगतात तसे ते मला बिलगले. मला स्वत:चा काहीच निर्णय उरला नव्हता. मरणाचासुद्धा!

पेटून-पेटून चिता शांत झाली. राख वाऱ्यावर उडू लागली. कालपर्यंत माझ्याशी सुखदु:खाच्या गोष्टी करणारे दोन जीव आज कुठं होते? मृत्यू! मृत्यू हा जीवनाच्या नदीतील कुणालाही न फोडता येणारा अवघड भोवराच नाही काय? विश्वकर्त्याच्या अविरत धावणाऱ्या रथातील तो सर्वांत नाठाळ घोडाच नव्हे काय? आजपर्यंत त्यानं किती जीवनं आपल्या टापांखाली रगडली असतील? आज त्याची दृष्टी माझ्या पर्णकुटीकडे वळली होती. किंदम ऋषींच्या शापाच्या रूपानं आणि माद्रीच्या निश्चयाच्या रूपानं त्यानं आज मला खिळखिळं करून टाकलं नव्हतं काय? जगातल्या आजवरच्या मृतांनी अजूनही न भरलेल्या आपल्या काळ्या भांडारात मृत्यूनं आणखी दोन जिवांची भर घातली होती आणि माझं कपाळ मात्र रिकामं केलं होतं. मी चितेजवळ गेले आणि त्या राखेनं माझं फटफटीत कपाळ भरून घेतलं. त्या राखेत एका दुर्दैवी महाराणीचे दग्ध दु:खाश्रू होते, तर एका प्रेयसीचे मृत्यूवरही विजय मिळविलेले आनंदाश्रू होते, आणि एका विजयी राजाचे पराजयी रक्तबिंदू होते! आणखी –

आणखी माद्रीबरोबरच दग्ध झालेल्या दुर्वास ऋषींच्या देवहुती मंत्राचे करपलेले अमृत शब्द होते!

**

# छत्तीस

मी पर्णकुटीत परत आले, पण ती पर्णकुटी आता मला खायला उठली होती. महाराजांची तशीच माद्रीची चर्या पर्णकुटीवरील गवताच्या पात्या-पात्यांवर मला दिसू लागली. एक क्षणभरही तिथं थांबले असते, तर मला वेडच लागलं असतं. मी सहनशील असले, क्षत्रियकन्या असले, वीरमाता असले तरीही मी एक स्त्री होते! आणि कुठल्या स्त्रीनं दु:खात तसले कढ त्या भयाण निर्जन अरण्यात राहून पचविले असते? आता माझ्यापुढं एकच मार्ग होता आणि तो म्हणजे परत हस्तिनापुराला परतण्याचा. माझ्यासाठी नव्हे; पण मुलांसाठी मला माझं मन मारून परत हस्तिनापुरालाच जाणं भाग होतं! आता मी असाहाय्य माता होते. माता स्वत:चा मान जाणीत नाही. केवळ माया आणि वात्सल्य जाणते. अजाण मुलांना आणि धात्रीला घेऊन मी अरण्यात राहू शकले असते काय? ज्या शापासाठी मी हस्तिनापूर सोडलं होतं त्याच शापामुळे मला परत हस्तिनापुराची वाट धरावी लागत होती! येताना महाराज, मी, माद्री आणि धात्री होतो. परत जाताना मात्र महाराज अन् माद्रीच्या रूपानं ही पाच मुलं होती. जिवाच्या मायेनं जपलं तरच मुलं भविष्यात काहीतरी करणार होती. नाहीतर – नाहीतर वास्तवतेच्या अग्नीत आमच्या जीवनाचे अंकुर आजपर्यंत जळून गेले, तसे त्या पाच मुलांचेही गेले असते! आता मला रडून भागणार नव्हतं. रडल्यानं भवितव्य बदलत नसतं. परिस्थितीच्या या आव्हानाला तोंड देणं हेच आता योग्य होणार होतं. स्त्रीला अबला म्हणणारा समाज आणि निसर्ग या दोहोंना मला दाखवून द्यायचं होतं की, प्रतिकूल परिस्थितीच्या चिखलातही मी पाच कमलं नीट उमलू, फुलवू शकले. आम्ही शतशृंग पर्वत सोडून हस्तिनापुराकडे निघालो, अनेक वर्षांनंतर! या दीर्घ काळात कदाचित हस्तिनापुराचं सगळंच बदलून गेलं असेल. महाराणी कुंतीबद्दलच्या नगरजनांच्या भावना बोथट झाल्या असतील. कदाचित तिला ते विसरूनही गेले असतील!

**

# सदतीस

एक महिन्यानंतर आम्ही परत गंगेच्या तीरावर आलो. दूरवर हस्तिनापूर दिसत होतं. गंगेवर येताच मला मी कानांतून काढून पाण्यात टाकलेल्या राजमातेच्या कुंडलांची आठवण झाली. गंगेच्या चिखलात ती रापून गेली असतील! आणि – आणि मी अश्वनदीत सोडलेली त्या वेळची ती दोन जिवंत सोनेरी कुंडलं आता कुठं असतील? कशी असतील? काय झालं असेल इतक्या वर्षांत त्या अजाण बालकाचं? एका सारथ्याच्या कुलात तो सारथी म्हणून वाढला असेल. घोड्यांना खरारा करीत असेल. आपल्या कुंडलांबद्दल अनेकांना प्रश्न विचारीत असेल. माझ्या भवितव्याची ही अशी परवड होणार हे मला त्याच वेळी समजलं असतं, तर मी त्याला एकट्यालाच घेऊन कुठंतरी गेले असते, पण ज्या कल्पनेनं मी त्याचा त्याग केला होता ती कल्पना तरी साकार झाली होती काय? मी एक महाराणी म्हणून तरी किती दिवस हस्तिनापुरात राहिले होते? त्याच्या त्यागाबद्दल न्यायनिष्ठुर काळानं माझ्यावर भयानक सूडच उगविला नव्हता काय? पण आता मला कसलाच विचार करायचा नव्हता. स्त्री ही प्रतिकूल परिस्थितीतसुद्धा जास्तीत जास्त विधायक कार्य करणंच जाणीत असते. माझ्या पाच मुलांचा सांभाळ करणं हेच आता माझं कर्तव्य होतं. तो सोनेरी कुंडलांचा मुलगा म्हणजे त्या उद्यानात अशोकवृक्षावरून खाली पडलेल्या चंडोल पक्षयाच्या पिलासारखाच होता! त्या कुणाचाही दोष नव्हता! असलाच तर केवळ अनिवार्य परिस्थितीचा होता! केवळ काळच त्याला परत आपल्या भावंडांत आणण्यास समर्थ होता! बाकी कुणीही नाही! ना पृथू! ना पृथूचा पिता! ना दुर्वास!

आम्ही सर्वांनी नगरात प्रवेश केला. त्या नगरात प्रथम मी महाराणी म्हणून आले होते, नंतर संन्यासिनी म्हणून बाहेर गेले आणि आज अनेक वर्षांनंतर एक विधवा म्हणून प्रवेश करीत होते, पण तरीही माझं मन शांत होतं. दु:खाच्या सतत आघातानं आता ते तसंच तयार झालं होतं. मला माहीत झालं होत की, शोक हा दु:खावरचा शेवटचा उपाय नाही. घडणारी प्रत्येक घटना अटळ असते. तिला काहीतरी तसाच गूढ अर्थ असतो. काहीतरी कारण असतं. जगात एकही घटना निरर्थक नसते.

आम्ही राजवाड्यावर आलो. आता राजमाता मला महाराजांबद्दल काहीतरी विचारतील म्हणून मी मनाची तयारी करू लागले, पण अमात्यांनी आणखी एक आघात माझ्यावर केला. त्यांनी सांगितलं, "महाराजांच्या अकालीच राज्य सोडून अरण्यात जाण्यानं धास्ती घेऊन त्या मातेनं हस्तिनापूर कायमचं सोडलं होतं!"

आता माझ्यासाठी मोठ्या मनाचा असा एकच आधार होता आणि तो म्हणजे पितामह भीष्मांचा! त्यांनी मला पाहताच आस्थेनं विचारलं, "कुंती, पांडू आणि माद्री कुठं आहेत?"

मी शांतपणानं उत्तर दिलं, "ते किंदम ॠषींना माझ्या भवितव्याचा अंत विचारायला गेले आहेत!"

पुढं होत त्यांनी माझ्या खांद्यावर मायेनं हात ठेवला आणि धीरगंभीर आवाजात

ते म्हणाले, ‘‘तो अंत त्यानं कशाला सांगायला पाहिजे! मी भीष्म त्यासाठी समर्थ आहे? कुंती, आजपासून तू कौरवांची राजमाता आहेस! जा वाड्यात.’’

वाड्याच्या पायदंडीवर माझ्या पाच पुत्रांसह धात्रीला घेऊन पाऊल ठेवताना मी पितामहांकडे पाहिलं. उत्तरीयाच्या शेवानं ते आपल्या ओलसर डोळ्यांच्या कडा पुशीत होते!

**

# अडतीस

या काळात हस्तिनापूर साफ बदललं होतं! राज्याची सर्व सूत्रं महाराज धृतराष्ट्रांच्या हाती गेली होती. आम्ही अरण्यात गेल्यानंतर लागलीच गांधार देशाच्या स्वरूपसंपन्न गांधारीदेवींशी त्यांचा विवाह झाला होता. विदुर भावोजींचाही विवाह झाला होता, पण ते राज्यात सल्ला देण्यापेक्षा जास्त लक्ष घालीत नव्हते. राजवाडयावरची कौरवांची सगळी वृद्ध माणसं अनंताच्या न संपणाऱ्या प्रवासाला केव्हाच निघून गेली होती. एकटे पितामह भीष्म मात्र हिमालयासारखे उभे असून खंबीरपणानं सगळीकडे लक्ष देत होते. महाराणी गांधारीदेवींना व्यास मुनींच्या वरदानापासून शंभर मुलगे आणि एक मुलगी झाली होती. मुलीचं नाव दु:शला होतं. मुलांमध्ये सर्वांत मोठा दुर्योधन होता. कौरवकुल वटवृक्षासारखं फैलावलं होतं. नगरात द्रोण नावाचे कुशल गुरू सर्व राजकुमारांना युद्धविद्या शिकविण्यासाठी आले होते. मी राजवाड्यात राजमाता म्हणून वावरू लागले. माझ्या मुलांना महाराजांचे पुत्र म्हणून सर्व जण प्रेमानं वागवू लागले. गतकालातील महाराजांचा दिग्विजय आणि पितामह भीष्मांचा दरारा यामुळे सर्व जण मला राजमाता म्हणून मान देऊ लागले. माझी मुलं राजपुत्रांच्या युद्धशालेत युद्धविद्येचं शिक्षण घेऊ लागली. जात्याच हुशार आणि विनयी असल्यामुळे ती सर्वांना आवडू लागली. अर्जुन हा तर गुरू द्रोणांचा सर्वांत लाडका शिष्य झाला. ते नेहमी म्हणू लागले, ‘‘अर्जुनासारखा धनुर्धर साऱ्या आर्यावर्तात असणार नाही.’’ मुलंही एकमेकांशी मिळून मिसळून वागू लागली. ते सावत्र भाऊ होते, हे कुणालाही सांगूनदेखील पटलं नसतं.

परिस्थितीच्या निर्घृण थपडा खात आलेलं माझं मन हे सारं पाहून निर्धास्तपणे विसावलं. मी परत येण्यात मुलांचं हितच झालं, हे पाहून मी मनोमन सुखावले. आता राजमाता म्हणून मी सुखासमाधानानं जगू शकत होते. वीस वर्षांच्या वनवासाच्या मुशीतून तावून-सुलाखून निघालेलं हे राजमातेचं पद होतं! मला त्याचा अभिमान वाटत होता. का वाटू नये? परिस्थितीची सर्व आव्हानं एक स्त्री असूनही मी कसल्या अनपेक्षित धैर्यानं स्वीकारली होती! एकटीनं आणि मूकपणानं! राजमाता म्हणून माझं जीवन आता समाधानाचा सुस्कारा टाकू लागलं! पाच पुत्रांकडे अपेक्षेनं बघू लागलं. पण – पण कधी-कधी मधूनच भोजपुरात जन्मलेल्या माझ्या प्रथम पुत्राची आठवण येई आणि मन सैरभैर होऊन जाई.

**

# एकोणचाळीस

हस्तिनापुरात आल्यानंतर दोन वर्षांनी घडलेली एक घटना. अशीच मी एकदा नगरातील विष्णूच्या मंदिरात देवदर्शनासाठी गेले होते. माझ्यासाठी पितामह भीष्मांनी एक स्वतंत्र पडदे लावलेला रथ ठेवला होता. त्यातून मी त्या दिवशी नगरात गेले होते. त्या रथाला सहा घोडे जोडण्याची व्यवस्था होती, पण मी सारथ्याला नेहमी पाचच घोडे जोडायला सांगे. तो म्हणत असे, ''राजमाता, एक घोडा न जोडल्यानं रथ बेंगरूळ दिसतो. शिवाय रथाचा समतोलही राहत नाही.'' मी त्याला म्हणे, ''असू दे. ती मोकळी जागा मला नेहमीच कुणाचीतरी आठवण करून देत राहील! तू पाचच घोडे जोडत चल. जगाला पाच हा आकडा आवडतो – सहा नाही!''

त्या दिवशी आम्ही देवदर्शन करून परतलो. रथ राजवाड्याजवळ आला होता. थोडंच अंतर उरलं होतं, पण एक मोठा हबका बसून रथ मध्येच थांबला. मी सारथ्याला विचारलं, ''काय झालं? रथ का थांबविलास?'' तो म्हणाला, ''कुणी एक मुलगा आडवा आला होता राजमाता. रथाखाली सापडणारं मांजरीचं पिल्लू वाचविण्यासाठी त्यानं आपला प्राण धोक्यात घातला. मी घोडे आवरले म्हणूनच तो वाचला!''

मला त्या मुलाचं कौतुक वाटलं. आपले प्राण धोक्यात घालून तो एका मांजरीच्या पिल्लाला वाचवीत होता! आणि मी – आणि मी मात्र माता असून माझ्या मुलाला स्वत: दूर लोटलं होतं... किती मोठा झाला असेल तो?... आता जर तो माझ्याजवळ आला असता, तर मी त्याला माझ्या छातीशी कवटाळला असता. पण – पण...

सामाजिक संकेतांचा पडदा मला त्याच्या चंपानगरीला जाण्यास संमती देणार नव्हता. काय करीत असेल तो...? असे अनेक विचार माझ्या मनात येऊन गेले. वाड्यावर जाऊन मंचकावर स्वस्थ पडावं म्हणून मी सारथ्याला म्हणाले, ''एक पळभरही थांबू नकोस. सत्वर रथ हाकार!''

त्यानं हातातील आसुडाचा फटका घोड्यावर ओढला. तो ध्वनी ऐकताच माझा कुंडलधारी पुत्रही कुठंतरी असाच घोड्याच्या पाठीवर आसूड तर ओढत नसेल? या जाणिवेनं मन विद्ध झालं. काय नाव ठेवलं गेलं असेल त्याचं?... केवढा दिसत असेल तो?... त्याची कुंडलं कशी दिसत असतील?... विचार करीत-करीतच मी राजवाड्यावर पोहोचले.

**

# चाळीस

काळाची नदी दिवस-रात्रीची वळणं घेत वाहत होती. युधिष्ठिर, भीम, अर्जुन आणि नकुल-सहदेव दिवसेंदिवस जास्तच लोकप्रिय होत होते. नगरातले सगळे लोक त्यांचा गौरवानं निर्देश करीत होते. माझं मन परत सौख्याच्या झोल्यावर हिंदोळे घेऊ लागलं. महाराजांच्या नावानं लोक माझ्या सर्व मुलांना पांडव म्हणू लागले. त्या पाचही मुलांना ते माझेच मुलगे मानू लागले.

कुठलीही गोष्ट सर्वच मुलं मला विचारल्याशिवाय कधीच करीत नसत. मी घेतलेल्या कष्टांचं सार्थक झालं होतं. कधी-कधी माझ्या डोळ्यांत त्या पाच पुत्रांना पाहिलं की, आनंदाचे अश्रू उभे राहत. माझं मन आता शांत होतं. केव्हा-केव्हा मात्र हत्तीच्या पायानं एखादं शांत तळं घुसळलं जातं तसं एखाद्या घटनेनं माझ्या मनाचं तळं घुसळलं जाई. अनेकविध आठवणींचा गाळ इकडे-तिकडे फिरू लागे. बालपणापासूनचं माझ्या जीवनाचं चित्र माझ्या डोळ्यांसमोर उभं राही. मग माझ्या धैर्याचं माझं मलाच आश्चर्य वाटे. कुठून निघून मी कुठं आले होते? यातलं एकतरी वळण मी कधीतरी माझ्या इच्छेनं घेतलं होतं काय? माणूस समाजात वावरत असला तरी त्याचं मन अंतर्यामी एकटंच असतं. ज्याचं दु:ख त्यानंच पचवायचं असतं. मिळालेल्या रक्तपेशी घेऊन जीवनभर धावायचं असतं. मी ते आता चांगलं शिकले होते. ज्या-ज्या वेळी आठवणी – वाघानं हरिणींचा करावा तसा – माझा पाठलाग करीत, त्या वेळी मी माझं मन कशाततरी गुंतवून टाकी. भूतकालाचं चित्र अस्पष्ट होतं. कधी-कधी केवळ दुसऱ्यासाठी जगावं लागतं, तेही आपली दु:खं लपवून जगावं लागतं! मी तशीच जगत होते.

पांडव म्हणून माझ्या मुलांची कीर्ती आता सगळ्या आजूबाजूच्या राज्यात दुमदुमू लागली. महाराज धृतराष्ट्र माझ्याशी बोलताना त्यांचा वारंवार आदरानं निर्देश करू लागले. आता मी नुसती राजमाता नव्हते, तर पाच बलदंड वीरांची माता होते. मी खाल्लेल्या खस्तांचं सार्थक झालं होतं. कधीकाळी मी अरण्यात इतकी वर्षं काढली होती, हेही मी विसरून गेले! छे, सौख्याचे दिवस किती लवकर जातात! मुलांच्या युद्धशालेतल्या शिक्षणाचा काल किती झपाट्यानं मागं पडत चालला होता. काल-परवापर्यंत मला बालिश प्रश्न विचारणारे युधिष्ठिर आणि भीम आता कितीतरी मोठे आणि अबोल झाले होते! वाढत्या वयाबरोबर त्यांचा समजूतदारपणाही वाढत गेला होता.

शुक्ल पक्षातल्या चंद्रासारखे भीमार्जुन वाढत होते. ते दिवसरात्र युद्धशालेत खपू लागले. शूल, तोमर, शतघ्नी, भृशुंडी, चक्र, धनुष्य अशी निरनिराळी शस्त्रं कौशल्यानं हाताळू लागले. घटकान्घटका ते शस्त्रास्त्रांवर चर्चा करू लागले. व्यायामशालेत कसलेली त्यांची शरीरं पीळदार आणि भक्कम दिसू लागली. आपल्या विनयी स्वभावानं ते सर्वांची मनं जिंकू लागले. अर्जुन धनुर्विद्येत पटाईत झाला. युधिष्ठिर धर्मशास्त्रात प्रवीण झाला. भीम तर एखाद्या अशोकाच्या झाडासारखा गोल गरगरीत दिसू लागला! त्याच्या गोऱ्या दंडांचे पुष्ट स्नायू गदेच्या दंडासारखे दिसू लागले. नकुल-सहदेव खड्गात तयार झाले. माझी चरणधूली घेऊन आशीर्वाद घेतल्याशिवाय ते

कोणतंच कार्य करीत नसत.

भीमाचा स्वभाव थोडा तापट होता. तो नेहमी हातात गदा घेऊन फिरे. त्याच्या धिप्पाड शरीराकडे आणि हातातल्या गदेकडे पाहून कोणीच त्याला ब्र बोलत नसे. त्याला झटकन राग येई. दंडात सामर्थ्य असल्यामुळे तो कुणाचा निषेध आणि शाब्दिक अपमान करीत नसे. लागलीच तो संबंधिताला सरळ ठोकून काढी! मी त्याला आवरण्याचा नेहमीच प्रयत्न करीत असे. माझ्यापुढं मात्र तो एक शब्दही बोलत नसे. त्याची कानउघडणी करण्याचं इतर कुणातही सामर्थ्य नव्हतं, पण त्याचा तापट स्वभाव बदलणं मलासुद्धा अशक्य होतं! माझ्या मागं तो नेहमीच कुणाशीतरी भांडण उकरून काढी. त्याला गदेची आवड होती. त्याप्रमाणे दुर्योधनालाही होती. त्यांना गदा शिकविण्यासाठी मथुरेहून माझा भाचा बलराम आला होता. माझ्यानंतर मथुरेत बाबांना एक पुत्र झाला होता. त्याचं नाव वसुदेव होतं. बलराम हा वसुदेवाचा मुलगा होता. वसुदेवाला आणखी एक मुलगा होता. त्याचं नाव कृष्ण होतं. तो मथुरेतच होता.

बलरामाच्या गदेच्या वर्गात कधी-कधी दुर्योधनाचं आणि भीमाचं भांडण होऊ लागलं. माझ्या कानांवर त्यांच्या कागाळ्या येऊ लागल्या. मी भीमाला नेहमीच समजुतीचे विचार सांगे, पण त्याच्या अंगातलं दिवसागणिक वाढणारं सामर्थ्य त्याला कधीच गप्प बसू देत नसे. दुर्योधन तर अतिशय हट्टी आणि हेकेखोर होता. त्याच्या घाऱ्या डोळ्यांत काय लपलं आहे ते सांगणं कठीण होतं.

भीमाच्या क्रोधाला आळा घालण्यासाठी मी त्याला तो गोडीत असताना एक मजेदार अट घातली होती. सर्वांत युधिष्ठिर अतिशय शांत आणि विचारी होता. त्याच्या विचाराचा अंकुश भीमावर नेहमी राहावा म्हणून मी त्याला सांगितलं की, "भीमा, तुला कधीही आणि कितीही राग येवो; तू नेहमी युधिष्ठिराच्या उजव्या पायाच्या अंगठ्याकडे पाहायचं. त्यानं अंगठा वर उचलला तरच तू बोलायचं, नाहीतर गप्प बसायचं. तोंडसुद्धा उघडायचं नाही! ही माझी आज्ञा आहे."

त्यानंही ती अट, तो मोठा झाला तरी अद्यापपर्यंत पाळली होती. युधिष्ठिरासमोर भीम असला म्हणजे विषारी दात पाडलेल्या भुजंगासारखा तो निष्प्रभ ठरे.

एकदा मला फार विचित्र वार्ता कळली होती. त्या दिवशी दुर्योधन आणि त्याचे भाऊ माझ्या सर्व मुलांसह नगराबाहेर वनविहार करण्यासाठी म्हणून गेले होते. दुपारपर्यंत ते सगळे वनात भटकत राहिले. जाताना त्यांनी फराळासाठी म्हणून गोड-गोड पक्वान्नं बरोबर नेली होती. दुपारी सर्व जण फराळासाठी एका सरोवराजवळ बसले. त्या दिवशी दुर्योधनानं भीमाला आपल्या हातानं लाडू चारायला सुरुवात केली. कोणतीही खायची वस्तू फारसा विचार न करताच खायची सवय असल्यामुळे भीमानंही, त्यानं चारले तितके लाडू खाल्ले! फराळ होताच सर्व जण पाणी पिऊन विश्रांतीसाठी एका झाडाखाली लवंडले, पण भीम पाणी प्यायलासुद्धा उठू शकला नाही. तो तिथंच खाली पडला. सर्वांना वाटलं तो झोपाळू आहे त्यामुळे तसाच झोपला असेल, पण तो झोपला नव्हता. तो मूर्च्छित झाला होता! दुर्योधनानं त्याला लाडवांतून गुंगी येणारं औषध चारलं होतं! सर्व जण झाडाखाली लवंडलेले पाहताच दुर्योधन हळूच उठून भीमाजवळ आला. सरोवराकाठच्या रानवेलींनी त्यानं भीमाचे हातपाय करकचून बांधले आणि त्याला मूर्च्छितावस्थेतच त्या सरोवरात उचलून फेकून दिला. पाण्याचा स्पर्श होताच माझा भीम

हळूहळू जागा झाला आणि सावध होऊन बाहेर आला. परमेश्वराची कृपा म्हणून एखाद्या जलदेवतेनंसुद्धा त्याला वाचवला असेल.

मला ही हकिकत एका सेवकानं सांगितली, पण तिच्यावर माझा विश्वास बसला नाही, कारण माझी पक्की खात्री होती की, माझे राहिलेले चार मुलगे त्याला सोडून कधीच थोडंसुद्धा इकडे-तिकडे गेले नसतील. शिवाय भीमाचं आतडं कसलंही विष पचवील, हे त्याच्या रोजच्या आहारावरून मला माहीत झालं होतं!

**

# एक्केचाळीस

एकामागून एक अशी अनेक वर्षं निघून गेली. मुलं खदीर वृक्षासारखी उंच आणि धिप्पाड झाली. ते पाच जण चालले की, रथाच्या पाच घोड्यांसारखे दिसत. लोक त्यांना आदरानं नमस्कार करू लागले.

मला माझ्या अरण्यवासाचाही विसर पडला. कोणत्याही मातेला आपल्या होतकरू तरुण मुलांचा नेहमी अभिमान वाटतो. मला तर पाच होतकरू मुलं लाभली होती. मग मला त्यांचा का अभिमान वाटू नये? त्यांच्या रूपानं सौख्य माझ्यावर पंचामृतांचा वर्षावच करीत होतं. आतापर्यंत मी जे-जे सोसलं होतं त्याचं हे फळ होतं. मी पाच वीरांची माता होते. नगरजनांची राजमाता होते.

एकदा असेच गुरू द्रोण आपल्या सर्व शिष्यांना घेऊन गंगेवर अंघोळीसाठी गेले होते. माझी सर्व मुलं त्यांच्याबरोबर होतीच. सर्व जण अंघोळ करून गंगेतून बाहेर पडले. सर्व बाहेर आले याची खात्री करून गुरुवर्य द्रोणही बाहेर पडू लागले, पण काठाजवळ येताच ते एकदम, ''वाचवा! वाचवा!'' म्हणून ओरडत गटांगळ्या खाऊ लागले. एका मगराची शेपटी मधूनच पाण्याबाहेर फडफडू लागली. मगरानं पाण्यात गुरुवर्यांचा पाय पकडला होता! कुणालाच काय करावं ते समजेना. जो- तो इकडे-तिकडे धावू लागला. दुर्योधनानं पुढं होऊन गुरुदेवांचा हात जेमतेम कसातरी पकडला. अर्जुनानं ते सगळं दृश्य पाहिलं. त्यानं झटकन आपलं धनुष्य उचललं आणि सटासट सात-आठ मर्मभेदी बाण त्या मगरावर सोडले. वळवळत तो मगर, लाकडाच्या वाळक्या ओंडक्यासारखा क्षणात पाण्याबाहेर आला. गंगेचं पाणी त्याच्या रक्तानं लाल झालं. गुरुदेव द्रोणांची सुटका झाली. बाहेर येताच त्यांनी अर्जुनाची पाठ थोपटली. ते म्हणाले, ''अर्जुना, तू माझे प्राण वाचवलेस. माझं ब्रह्मास्त्र मी आजपासून तुला दिलं आहे. त्याचा तुला केव्हाही उपयोग होईल.'' अभिचारासह त्यांनी अर्जुनाला ब्रह्मास्त्र दिलं. या प्रसंगापासून मला वाटू लागलं अर्जुन माझ्या आशा-आकांक्षांचा हिमालय आहे. आपल्या शापदग्ध दुर्दैवी पित्याची अपूर्ण राहिलेली कर्तृत्वाची धवल रेखा तोच पूर्ण करणार होता.

गुरू द्रोण वरचेवर राजवाड्यात येत. ते माझ्या सर्व पुत्रांची वाखाणणी करीत. माझ्याशी ते नेहमीच आदरानं वागत. मी अर्जुनाची माता आहे, हे सर्वांना अभिमानानं सांगत. असेच एकदा ते म्हणाले, ''राजमाता, आता सर्व शिष्य चांगले तयार झाले आहेत. आता सर्वांची एकदा परीक्षा घेतली पाहिजे! सामर्थ्य हे स्पर्धेशिवाय व्यक्त होत नसतं.''

''पण गुरुदेव, स्पर्धा ही माणसाला आंधळं करते म्हणतात. असं असेल तर ही स्पर्धा कशाला?'' मी विचारलं.

''तसं नाही. स्पर्धा हे जीवनाचं आवश्यक अंग आहे. स्पर्धा नसेल तर माणूस गंजून जाईल. त्याचे खरे गुण कधीच व्यक्त होणार नाहीत. निर्भेळ स्पर्धा म्हणजे आत्म्याचा निखळ आवाज. मी लवकरच सर्व शस्त्रास्त्रांच्या स्पर्धा भरवणार आहे.''

''लवकरच म्हणजे केव्हा?''

''येत्या वासंतिक पौर्णिमेला.''

पुढं स्पर्धेचा तो दिवस अमात्यांकडून सर्वांना कळविला गेला. मी त्या दिवसाची वाट पाहत होते, कारण मला माझ्या पुत्रांचं युद्धकौशल्य बघायचं होतं. त्यांच्या अंगी किती पराक्रम आहे ते मला पाहायचं होतं.

**

# बेचाळीस

तो वासंतिक पौर्णिमेचा दिवस उजाडला... आणि मावळलाही होता. हस्तिनापुरातल्या सर्वश्रेष्ठ वीराची निवड झाली होती. पांडवांची माता म्हणून मी आखाड्यात राजस्त्रियांच्या डेऱ्यात सर्व स्त्रियांच्यामध्ये बसले होते, पण त्या एकाच दिवसानं मला पूर्णपणे कळलं की, मी कोण आहे! जगातल्या कुठल्याच मातेची काळानं एवढी घोर परीक्षा घेतली नसेल! तिची एवढी धिंड काढली नसेल!

त्या दिवशी गुरू द्रोण स्पर्धा संपल्यावर अर्जुनाच्या गळ्यात ती मानाची नीलकमलांची माला घालणार एवढ्यात एक उंच, तेजस्वी आणि धिप्पाड तरुण – आखाड्याच्या महाद्वारातून दंड थोपटीत, "थांबा!" म्हणत आत घुसला. किती निर्भय आणि खंबीर होता तो! क्षणार्धात तो मधल्या दगडी चौथऱ्यावर उभा राहून गरजला, "राजपुत्र अर्जुनानं आज या ठिकाणी करून दाखविलेले सर्व पराक्रम मी आता करून दाखवणार आहे. मला संधी मिळेल काय?"

महाराज धृतराष्ट्रांनी राजदंड उचलून त्याला अनुमती दिली. त्यानंतर त्यानं चौथऱ्यावर जी उडी मारली ती किती सहज! त्याच्या रूपानं जणू एक तेजाचा लोळच सगळ्या आखाड्यात विजेसारखा इकडे-तिकडे चमकत होता. त्याच्या सर्व हालचालींत अतिशय गती होती. चपळता व सहजता होती. शेवटी तो आखाडे बदलत-बदलत मल्लविद्येच्या आखाड्यात अगदी आमच्या डेऱ्यासमोर आला. केवळ एक कटिवस्त्र असलेला तो तरुण म्हणजे पायांनी चालणारा नागशत पर्वत होता! त्याचं उघडं अंग सूर्यप्रकाशात इतकं चमकत होतं की, सूर्यदेव आकाशात आहेत की पृथ्वीवर तेच समजत नव्हतं! आकाशाच्या पोटात घुसणाऱ्या शालवृक्षासारखा तो उंच होता. पळसाच्या तांबड्या फुलासारखे त्याचे गाल रसरशीत लाल होते. सिंहाच्या आयाळीसारखे त्याचे कुरळे, सोनेरी लांबसडक केश त्याच्या विशाल खांद्यावर मंद-मंद रुळत होते. मध्येच तो पाठमोरा होई. त्याची पाठ फणसाच्या पिवळ्याधमक फाकेसारखी विशाल आणि नितळ होती. तो नुसता थोडासा जरी सहज हलला तरी त्याच्या सर्वांगाचे पीळदार स्नायू वळवळणाऱ्या सतेज भुजंगासारखे तिथल्या तिथंच गोल फिरत; बघणाऱ्याची दृष्टी जागीच खिळून ठेवत. चर्या गदेच्या शिरस्त्राणासारखी गोल गरगरीत होती. मान शंखासारखी पीळदार असून खांद्याच्या भक्कम शय्येत ती चिखलात हत्तीचा पाय रुतावा तशी जिथल्या तिथं बसविली होती. प्रेक्षकगण त्याचा 'कर्ण! कर्ण!' म्हणून जयजयकार करीत होते. खेळत- खेळत घामानं निथळणाऱ्या त्यानं आपल्या प्रतिस्पर्ध्यावर बाहुकंटक नावाचा अवघड डाव टाकला. तसा त्याचा प्रतिस्पर्धी मरणाच्या भीतीनं हातपाय झाडू लागला. त्या वीरानं आमच्या डेऱ्याकडे बघितलं! माझ्या डोक्यावर विजेचा लोळ पडल्यासारखं झालं! त्याच्या लाल गोल मुखावर लालसर, निळा प्रकाश फेकीत दोन मांसल सोनेरी कुंडलं त्याच्या कानात डौलानं डुलत होती! तो दुसरा-तिसरा कोणी नव्हता. मी अश्वनदीला जन्मत: अर्पण केलेला तो साक्षात सूर्यपुत्र होता! जणू आपल्या पित्याचं रूप घेऊनच तो सर्वांना जाळायला आज तिथं आला होता. किती

ऐटदार दिसत होता तो! अरण्यातल्या घोड्यासारखी त्याची चाल ऐटदार होती! माझ्या इतर पाचही पुत्रांपेक्षा तो सर्वांत अधिक देखणा होता! कितीही झालं तरी तो सूर्यपुत्र होता! ज्येष्ठ होता. त्याचं सर्वांग तेजाचे कण बाहेर फेकीत होतं. कर्ण! त्या दोन अक्षरी नावात काय-काय रहस्य लपलं होतं ते धात्री आणि मी याशिवाय त्या भव्य आखाड्यात कोणालाच माहीत नव्हतं. प्रत्यक्ष कर्णालासुद्धा!

पौरजन त्याचा वीर म्हणून जयजयकार करीत होते, पण तो साधा वीर नव्हता. वीरांचाही वीर, असं त्याचं खरं स्वरूप होतं. माझा तो सर्वांत पहिला पुत्र होता. पहिला आणि ज्येष्ठ पांडव. त्याच्यासाठी सतत आक्रोशणारं माझं मातेचं मन तडफडू लागलं. तिथले सगळे लोक पृथ्वीच्या पोटात अदृश्य झाले असते, तरी मला त्याचं काहीच वाटलं नसतं. मला त्याला एकदा कडकडून मिठी मारायची होती. त्याच्या कानांतल्या कुंडलांचे दीर्घ काळ साठलेले मुके घ्यायचे होते! ते गंगा, यमुना, चर्मण्वती आणि अश्व या नद्यांच्या पाण्यावर वाढलेलं माझं सतेज टवटवीत सोनेरी कमळ मला माझ्या दोन्ही हातांनी मनसोक्त कुरवाळायचं होतं! कित्येक वर्षं माझ्या मनाचा एक कप्पा त्याच्यासाठी अश्रू ढाळत आला होता. त्याला धड एकवेळसुद्धा पाजणं मला जमलं नव्हतं. माझ्यातील मातेचं मन मला मुळीच स्वस्थ बसू देईना. हृदयात कधीही न अनुभवलेली विरही खळबळ माजली. त्याच्या चिमण्या ओठांना पारखं झालेलं दूधही माझ्या शरीरात गरगर फिरू लागलं. उरात भरून आलं. मी उठून उभी राहिले. मला त्याच्या केवळ दर्शनानंच अनावर पान्हा फुटला!! कंचुकी दुधानं भिजून गेली. काय करावं ते समजेना. डोळ्यांतून अश्रू पाझरत होते, स्तनांतून दूध वाहत होतं!

माझ्या आणि त्याच्यामध्ये केवळ एक झिरमिरीत पडदा होता! तसा अतिशय तलम; पण ओलांडायला अतिशय अवघड वाटणारा एक पडदा होता! एका मातेला तिच्या पुत्रापासून दूर ठेवणारा पडदा. समाजाचा पडदा! राजकुलाचा पडदा! प्रतिष्ठेचा पडदा! सामाजिक संकेतांचा पडदा!! हा पडदा फाडून मी आवेगानं पुढं झाले असते तर! काय, काय झालं असतं? कर्ण मला बिलगला असता काय? त्याच्या डोळ्यांत मातेच्या प्रेमाचे अश्रू उभे राहिले असते काय? 'मी तुझी माता आहे', म्हणून मी त्याला त्याचे भरगच्च खांदे गदागदा हलवून सांगितलं असतं तरी त्याला ते पटलं असतं काय? पतिनिधन आणि वनवास यांमुळे राजमाता कुंतीला वेड लागलं आहे, असं कुठल्याही जरी एखाद्या वेड्यानं त्या आखाड्यात म्हटलं असतं तरी सगळ्यांनी त्यालाच शहाणा म्हटलं नसतं काय? त्या वेळी मी कोण होते? राजमाता? सहा वीर पुत्रांची आई? क्रूर काळाच्या आजवर हव्या तशा थपडा खाल्लेली दुःखी कुंती? छे, त्या वेळी एका पुत्राला आपल्या मिठीत घेण्यासाठी आसुसलेली मी एक चिरविरहिणी माता होते, पण असाहाय्य होते. पाण्याबाहेर काढलेल्या मासोळीसारखी मी तडफडत होते. त्याच्या दर्शनानं शरीराचे बांध फोडून आलेला पान्हा आवरत नव्हता. जगाच्या दृष्टीला कर्ण मोठा वीर वाटत असेल – पण मला मात्र तो नुकताच जन्माला आल्यासारखा वाटत होता! माझं मन पिंजऱ्यात कोंडलेल्या मैनेसारखं आतल्या आत फडफडू लागलं. असाहाय्यपणे मी हातांनी छाती दाबून घेतली तरीही दूध आवरत नव्हतं. दीर्घ काळ जिवाच्या निर्धारानं दाबलेला तो पान्हा होता! आता तो आवरणार नव्हता. माझी कंचुकी चिंब भिजली. मी परत मटकन खाली बसले. धात्री मला सावरू लागली. तिला दूरचं काही दिसत नव्हतं. त्यामुळे आखाड्यात कोण होतं ते तिला कळलं नाही. त्या आखाड्यात मी एकटीच अशी स्त्री

होते की, तिला कर्णाचा जीवनवृत्तान्त माहीत होता. माझ्यामुळेच तो तसा घडला होता. माझ्या एकाच शब्दानं आखाड्याचं स्वरूप बदलणं मला शक्य होतं, पण एकही शब्द मला बोलता येत नव्हता. प्रयत्न करूनही मुखातून एकही शब्द फुटत नव्हता.

कर्ण धनुर्धराच्या चौथऱ्यावर निघून गेला. सर्वांना दिपवून टाकणारा लक्षयवेध त्यानं केला. तोच खरा त्या दिवशीचा सर्वश्रेष्ठ वीर ठरला, पण माळ मात्र अर्जुनाच्या गळ्यात पडली तसं वातावरण तापलं. कर्णानं चौथऱ्यावर उभं राहून दंड थोपटून अर्जुनाला द्वंद्वयुद्धाचं आव्हान दिलं. कर्णाला कृपाचार्यांनी कुल विचारलं. दुर्योधनानं पुढं होऊन चौथऱ्यावरच कर्णाला राज्याभिषेक केला.

घटनाचक्र वेगानं फिरलं.

एक सारथी म्हणून वाढलेला सूर्यपुत्र क्षणात राजा झाला. माझ्या मनाचा एक कोपरा त्यामुळे क्षणभर सुखावला. कसाही का होईना, पण तो राजा झाला होता! सारथ्यापेक्षा राजा केव्हाही श्रेष्ठच, पण त्यानं अर्जुनाला द्वंद्वाचं आव्हान दिलं होतं. द्वंद्व म्हणजे विजय किंवा मरण! सख्खे भाऊ अज्ञानामुळे एकमेकांविरुद्ध एकमेकांचा जीव घेण्यासाठी उभे राहिले होते आणि तेही आपल्या मातेला समोर साक्षी ठेवून! दैव बलवत्तर म्हणून ऐनवेळी कर्णाचं पालन केलेला पिता अधिरथ चौथऱ्यावर आला. नाहीतर! छे, कल्पनाही करवत नाही काल काय घडलं असतं त्याची. दोघांपैकी एकाचा अंत झाला असता! तोही त्यांच्या मातेच्या पुढ्यात आणि तो प्रेक्षकगणांनी टाळ्या वाजवीत आणि आरोळ्या मारीत पाहिला असता! पण कर्ण हा सारथ्याचा मुलगा आहे, हे कळताच त्याला सर्वांनी टोचून घेतलं. सर्व जण 'सारथ्याचा मुलगा! सारथ्याचा मुलगा!' म्हणून त्याला हिणवू लागले. साक्षात सूर्यपुत्रावर क्षुद्र किडे थुंकू लागले आणि तेही त्याच्या मातेसमोर! 'सारथ्याचा मुलगा! सारथ्याचा मुलगा!' त्या लोकांच्या आरोळ्या माझ्या कानात भाल्याच्या टोकासारख्या घुसत होत्या. कुणाला ते सारथी म्हणत होते? या हस्तिनापुरातल्या एकातरी क्षुद्र किड्यात त्याला ओळखायची पात्रता होती काय? माझ्या मस्तकात त्यांच्या आरोळ्यांचे घणाघात बसू लागले. समोरचा आखाडा अस्पष्ट आणि धूसर होऊन तो माझ्याभोवती गोल गरगर फिरू लागला. सहनशक्तीलाही काही सीमा असतात! माझ्याभोवती चाललं होतं ते काय होतं? वेड्या लोकांचा तो आचरट तमाशा नव्हता काय? मला तो थांबवता येणं शक्य नव्हतं. माझा शरीरावरचा तोल हळूहळू नष्ट होऊ लागला. मी माझे कान दोन्ही हातांनी गच्च झाकून घेतले. वादळी वाऱ्यात असाहाय्य केळ उन्मळून खाली पडते तशी मी धाडकन खाली कोसळले. काही-काही ऐकू येईना, काही दिसेना. मी मूर्च्छित झाले.

**

# त्रेचाळीस

माझ्या पुत्रा कर्णा, आज तुझी काय अवस्था आहे? छे! तिचं वर्णनसुद्धा करवत नाही. तुला माहीत नाही की, तू कोण आहेस! चोहोबाजूंनी आज जग तुला हीन-हीन म्हणून, भुजंगाला साळुंक्यांनी टोचून खावं तसं टोचून खात आहे. 'नीच कुलातला, नीच कुलातला' म्हणून आज तुला क्षणाक्षणाला सर्व जगात जीवघेणा अधिक्षेप होतो आहे. आजचं तुझं जीवन म्हणजे मरणाहूनही महाभयानक अपमान! खाली मान घालायला लावणारी हृदयविदारक घृणा! वज्राघातापेक्षाही कठोर वंचना! वीर असून, शूर असून, बलाढ्य असूनही आज तुला हे सगळं मेल्या मनानं सहन करावं लागतं आहे, कारण तुला माहीत नाही की, तू कोण आहेस! सगळं जग तुझ्या अंगावर चोहोबाजूंनी धावून येताच तू गोंधळलास, भांबावलास, कारण आज तुला माहीत नाही की, तू कोण आहेस! तुला चारी बाजूच्या लोकांनी काय म्हणायचं बाकी ठेवलं? दुसऱ्या कुणीतरी ते सहन केलं असतं काय? कर्णा, अरे ही तुझी सहनशक्ती आहे, अज्ञान आहे, की असमर्थता आहे? मला माहीत आहे की, ही तुझी सहनशक्ती नाही. तुला असमर्थ म्हणण्याचं धाडस कोणीही करणार नाही. तू आज अज्ञानात आहेस! मनाच्या परस्परविरोधी महाभयानक गोंधळात आहेस, कारण तुला माहीत नाही की, तू खऱ्या अर्थानं कोण आहेस! मला माहीत आहे की, गवत रसरशीत तप्त अंगाराला कधीच नष्ट करू शकत नाही, पण त्या अंगारावर आज मनाच्या संभ्रमाच्या राखेचं पुट चढलं आहे.

सगळ्यांनी चोहोबाजूंनी आघात करताच तू बावरलास! आपले कान हातांनी झाकून घेऊन तू डोळे गच्च मिटलेस, कारण तू ज्या तेजाची खाण आहेस त्या तेजाचं नावही तुला आज माहीत नाही! गेल्या कित्येक वर्षांत तुला ते कुणीही सांगितलं नाही! अरे, माळावर घायपात वाढतं तसा तू गेली अनेक वर्षं नुसता वाढलास! सगळ्या जगाचं काळीज छिन्नविच्छिन्न करणारे वाग्बाण तुला आज सहन करावे लागताहेत! जग हे वेडं आहे असा उदार विचार करून का तू गप्प आहेस? अरे, हे आहे तरी काय? कुठल्या निसरड्या भूमीवर तू उभा आहेस याची कर्णा – माझ्या पुत्रा, आज तुला जाणीव नाही रे! आणि असलीच तर ती चुकीची आहे! तू असाच त्या अपसमजुतीत राहिलास, तर सारं जग तुला, 'सारथ्याचा मुलगा! सारथ्याचा मुलगा!' असंच म्हणत राहील आणि तुझं खरं कुलशील गडप होईल! कारण ज्यांना आत्मज्ञान आणि दूरदृष्टी नसते ते नष्ट होतात! त्यांचं नावही जगावर शिल्लक राहत नाही!! तुला हे सगळं आज कोण समजावून सांगणार? मला माहीत आहे, तुझं मन अगतिकतेनं आणि संभ्रमानं आपण कोण आहोत, काय करायला पाहिजे, याचा शोध घेत नेहमी शरीराच्या भित्तीवर थडाथड आपटतं आहे. आज तुझा अंतरात्मा काळजीनं आणि चिंतेनं काळवंडून गेला आहे! तुला वाटतं आहे की, आपल्या पायांखालची वाळू आता सरकते आहे, कारण अजूनही तुला माहीत नाही की, खऱ्या अर्थानं तू कोण आहेस ते. तुला गेल्या अनेक वर्षांत एवढंच शिकवलं आहे की, 'तू सारथ्याचा पुत्र आहेस, तू सूतपुत्र आहेस!' पण खरोखरच का तू सारथ्याचा पुत्र आहेस? नाहीस! कर्णा तू सारथी नाहीस! त्रिवार सांगावंसं वाटतं की, तू सारथी

नाहीस!!!

तुझी परंपरा थोर आहे कर्णा! तुला आजचं हे रूप नि आकार देण्यासाठी कोणी-कोणी काय-काय अमर्याद कष्ट घेतले आहेत, पुण्य खर्ची टाकलं आहे, याची तुला जाणीव नाही. तू साक्षात सूर्याचा पुत्र आहेस. जगातला भयाण अंधार उजळण्यासाठीच रे तुझा जन्म आहे! पण आज मात्र तू स्वत:च दिवाभीतासारखा ओंजळीत तोंड लपवितो आहेस! अरे, तुझं तोंड लपविण्यासाठी नाही, जगाला उजळण्यासाठी आहे! कारण तुझी परंपरा थोर आहे! त्या परंपरेकडे पाहा. त्या तेजाच्या धगधगत्या स्फुल्लिंगाकडे पाहा. तुझं तुलाच कळून येईल की, तू खरा कोण आहेस!

सर्वांनी तुला नीच म्हणताच बावरून तू हस्तिनापुराकडे पाहिलंस. सगळं हस्तिनापूर आज अगदी गप्प आहे! लाचार आहे ते आज! हे भीष्म, धृतराष्ट्र, विदुर सगळे-सगळे विद्वान आहेत, त्यागी आहेत, पण आज तुला तुझं खरं स्वरूप सांगायला असमर्थ आहेत!! कारण त्यांना तरी तू कोण आहेस, हे कुठं नीटपणे माहीत आहे? त्यांना तरी तुला सांगावा असा योग्य मार्ग कुठं सापडला आहे? ते गप्प बसलेत कारण ते स्वत: अज्ञानात आहेत!! जगातून मदत मिळेल या अपेक्षेनं तू चारीकडे बघितलंस! पण तुला कोण मदत करणार? उद्या एखादा महान प्रसंग तुझ्यावर आलाच तर तुला कोण सावरणार? वेड्या, जगाच्या मदतीवर आजपर्यंत कोणी जगलं आहे काय? ज्याला-त्याला आपण कोण आहोत हे कळावं लागतं! ज्याला-त्याला आपल्या महान कुलाचं नाव माहीत असावं लागतं. तुझी आज दुर्दशा आहे ती त्यामुळेच! अरे, कुठून निघून तू कुठं आला आहेस, हे तुला ठाऊक नाही. प्रत्यक्ष सूर्यपुत्र असूनसुद्धा तुझ्यावर हे कावळे थुंकताहेत! तू मात्र आपल्या अंतर्गत गोंधळात गडबडून गेला आहेस. कधी सावरणार तू?

जर तू असाच राहिलास तर काय होईल? खरोखरच तू सारथी होशील! नीच होशील! आपला आसूडच आपणाला बरा, असा एक विचित्र न्यूनगंडाचा भाव तुझ्या कणाकणांत भिनून जाईल! केवळ कुणाच्यातरी रथाचं सारथ्य करणं एवढंच तुझ्या हाती राहील! तू म्हणजे कुणाच्यातरी हातचं केवळ एक खेळणं होशील! तुझं स्वावलंबन आणि तुझी स्वतंत्रता शिल्लकही राहणार नाही! मग सावध झालास तरी त्या वेळी मात्र वेळ निघून गेलेली असेल! त्या वेळी तुला सावरणं मलाच काय; पण प्रत्यक्ष ब्रह्मदेवालाही शक्य होणार नाही! रथाच्या चाकावरून उडणारी धूळ आणि परतंत्र सारथी दोघेही सारखेच! कर्णा, तू असली... धूळ होशील! केवळ धूळ!

या आणि असल्या भयानक विचारांनी मी उदास आहे, कारण मी कर्णाची माता आहे. माझा कणन्कण त्याच्याशी निगडित आहे. माझ्या तेजस्वी पुत्राला सर्वांनी 'सारथ्याचा पुत्र' म्हणून टोचून घेतलं. कोणत्या मातेला आपल्या मुलाचा हा अपमान साहवेल? म्हणूनच मी आज उदास आहे. ही धात्री मात्र वेड्यासारखी विचारते आहे, ''महाराणी, तुम्ही उदास का?'' कोणत्या शब्दांत तिला सांगू की, मी उदास का ते?

किती झंझावाती वळणं घेत आलं होतं माझं आयुष्य! काय हेतू आहे या वळणांचा! काहीच कळत नाही. ह्या चार तपांत तीन वेगवेगळ्या कुंतींचं जीवन मी जगले नाही काय? बालपणातील पृथा, किशोरावस्थेतील आणि तारुण्यातील कुंती, आणि आता... आता राजमाता असलेली विधवा कुंती! पुत्रासाठी तळमळणारी कुंती! माझी ही तिन्ही जीवनं कुणाच्या ना कुणाच्यातरी हातात होती. बालपणी मी बाबांच्या वचनासाठी

मथुरा सोडली. तरुणपणी महाराजांच्या शापासाठी हस्तिनापूर सोडलं, आणि आता – आणि आता भावाविरुद्ध भाऊ दंड थोपटून उभा राहिलेला पाहून मी माझं जीवन काळाच्या हाती सोडलं आहे! कारण काल अर्जुन अज्ञानानं आपल्या भावाविरुद्ध उठला. भीमानंही अज्ञानानं आपल्या ज्येष्ठ भावाला, 'हातात कुलाला शोभणारा आसूड घे', असा विषारी वाग्बाण मारला, पण या सर्वांपेक्षा माझ्या काळजात भीतीचा गोळा उठला आहे तो दुर्योधनाचा! त्यानं आपल्या घाऱ्या डोळ्यांचं जाळं पद्धतशीर कुटिलपणानं कर्णावर बरोबर टाकलं आहे! किती कौशल्यानं त्यानं कर्णाला आज आपल्या अधीन करवून घेतला आहे! या दुर्योधनाच्या हातात कर्णाचं आता होणार तरी काय आहे?

मी उदास आहे ती याचकरिता. या वेडया धात्रीला हे सगळं कसं सांगू? ती विचारते आहे, "महाराणी, तुम्ही उदास का?" कोणत्या शब्दांत तिला सांगू की, मी उदास का ते? राजमाता असूनही मी माझ्या वंचित पुत्रासाठी काय करू शकते? काऽही नाही. सामर्थ्याचे आणि सत्तेचे नगारे मानव कितीही पिटत राहो, तो शेवटी काळाच्या बळकट हातातील केवळ एक नगण्य खेळणंच आहे. "कर्ण माझा पुत्र आहे." असं हस्तिनापुरातील एका प्रशस्त चौकात उभं राहून गर्जून सांगावं, असं मला वाटतं, पण ते धैर्य मी दाखवू शकत नाही. कारण त्या धैर्याच्या प्रतिक्रियेतून माझ्या इतर पाच पुत्रांची काय अवस्था होईल, ते सांगता येत नाही. कदाचित त्यांना परत वनवास भोगावा लागेल आणि समाज मला कदाचित कर्णालाही कुरवाळू देणार नाही. माझ्या पुत्रा – कर्णा, मी तुझा दोन वेळा त्याग केला आहे. एकदा जन्मलास त्या वेळी आणि परवा आखाडयात. दुर्दैवी पुत्रा, मी माझं जीवन काळाच्या हाती सोपवलं आहे रे आणि तुझं जीवन तुझ्या पित्याच्या हाती सोपविलं आहे!!

■

# कर्ण

# एक

अंगदेशचा राजा झालो म्हणून मी स्वत:ला भाग्यशाली मानत नव्हतो. कारण मला पूर्णपणे माहीत होतं की, ते राज्यपद मला दुर्योधनाच्या कृपेनं मिळालं होतं. जे लाचार आणि दुर्बल असतात तेच केवळ असल्या दुसऱ्याच्या कृपेची ऐट धरतात. हे असलं कुणाच्यातरी कृपेचं राज्यपद आपण मिरवावं, असं मला कधीच वाटलं नाही. खऱ्या अर्थानं पाहिलं तर हे काय राज्यपद होतं? सर्वांनी फुलं उधळून, अभिषेकाचं जल सिंचून, कर्णाच्या नावाचा जयजयकार करून नंतर सरळ-सरळ दात विचकून त्याचा केलेला तो एका अर्थानं जगजाहीर अधिक्षेप होता, अधिक्षेप! अभिषेकयुक्त अधिक्षेप! कितीही दीन आणि असमर्थ असला तरी कोणताही माणूस आपला अधिक्षेप विसरू शकत नाही. मी तर एक योद्धा होतो. योद्धा मरण पत्करतो, पण आपल्या स्वाभिमानाचं मरण तो कधीच स्वीकारत नाही. मला हस्तिनापुराचा त्या दिवशी इतका वीट आला होता की, हे नगर सोडून मार्ग फुटेल तिकडे निघून जावं असं वाटलं. अशा एका देशात जावं की जिथं माणसाचं कुल कधीच विचारलं जात नाही, केवळ बल विचारलं जातं. म्हणूनच त्या दिवशी सायंकाळी राजवाड्याच्या सौधावरून चित्ररथ पक्षयांचा थवा पाहणाऱ्या दुर्योधनाला मी म्हणालोही, "राजा, तुझं हे राज्यपद आता तूच सांभाळ! मला चंपानगरीचा मार्ग मोकळा करून दे." पण त्याचा आग्रह घोरपडीसारखा होता. त्यानं मला आवर्जून सांगितलं की, "कर्णा, तुझ्या जोरावर तर मी त्या पांडवांना तोंड देण्यासाठी भक्कमपणे उभा आहे. तूच जर आता तोंड फिरवलंस, तर मला नगरात तोंड दाखवायलासुद्धा जागा राहणार नाही. कुरूचा ज्येष्ठ राजकुमार दिवाभीतासारखा जीव मुठीत घेऊन फिरताना तुला पाहायचा आहे की काय? तू हस्तिनापूर सोडून निघून गेलास, तर हे पांडव मला जगणंसुद्धा अशक्य करून टाकतील."

आणि म्हणूनच 'आपत्तीच्या वेळी मित्राला साहाय्य करतो तोच खरा मित्र' या एकाच विचारानं मी त्याचा अंगदेश स्वीकारला होता. 'सारथ्याचा पुत्र! सारथ्याचा पुत्र!' अशी सहस्त्र मुखांतून बाहेर पडलेली रसरशीत तप्त लोहपुष्पं ज्या सिंहासनावर खच्चून भरली होती त्याच सिंहासनावर मनाचा निर्धार करून मी बळेच बसलो होतो. केवळ राज्यलोभाच्या आशेनं नाही, कारण अगोदर ज्या सर्वांनी माझी छी:-थू केली त्यांच्याकडून नंतर एका स्वतंत्र देशाचा राजा म्हणवून घेताना माझ्या मनाला ज्या असंख्य यातना झाल्या आहेत त्या केवळ माझ्या मलाच माहीत आहेत. गेल्या कित्येक रात्री मी माझ्या भविष्यात आहे तरी काय, या तळमळीत काढल्या आहेत. केवळ एकच एक विचार, गोमाशीनं कुत्र्याचा करावा तसा, एकसारखा माझा पाठपुरावा करीत होता. मी सूतपुत्र आहे तर मग मला 'सूतपुत्र' या शब्दाचा इतका संताप का येतो? का मी स्वत:ला सूतपुत्र म्हणून धन्य मानीत नाही? कुणीतरी 'सूतपुत्र' म्हणताच माझ्या अंगातील रक्ताचे कण उधळलेल्या रानघोड्यासारखे का धावू लागावेत? मन म्हणजे आहे तरी काय? ते उलट-सुलट विचारांचं भयंकर वादळ माझ्या देहात का निर्माण करीत आहे? काहीच उत्तर सापडत नव्हतं. आणि कधीच ते सापडणार नव्हतं!

मला पूर्णपणे माहीत झालं होतं की, स्पर्धेच्या त्या दिवसापासून नगरातील सर्व जण मला अंगराज म्हणत होते. स्वतंत्र म्हणत होते! पण ते केवळ तोंडावर! माझ्या पश्चात ते माझी सारथी म्हणून अवहेलनाच करीत होते! अपमानाइतकं जगात मरणही भयानक नसतं. पण तरीही स्वत:ला मी अंगराज म्हणवून घेत होतो. स्वतंत्र राजा म्हणवून घेत होतो. अंत:करणात अपमानाचे कढ पचवून बाह्यत: स्वातंत्र्याचे गोडवे गात होतो! कारण मी सारथी म्हणून राहिलो असतो, तर कुणीच मला मान देणार नव्हतं. अंगराज कर्णापुढं मात्र सर्व जण मान तुकवीत होते. ते अंगराजपद टिकवूनच मला जगात काहीतरी करता येणार होतं! कारण कर्ण उणे अंगराजपद म्हणजे केवळ धूळच नव्हती काय? धूळ कुणी मस्तकी लावीत नाही. ती पायदळीच तुडविली जाते. म्हणूनच माझी इच्छा असो वा नसो हे अंगराजपद मला टिकवावंच लागणार होतं, स्वातंत्र्याची कास धरूनच मला या घनदाट अंधकारातून काहीतरी मार्ग काढावा लागणार होता. स्वातंत्र्याशिवाय जीवन म्हणजे मूर्तीशिवाय मंदिर! माझं अंगराजपद हे माझं स्वातंत्र्यच होतं. कसंही असलं तरी स्वातंत्र्य ते स्वातंत्र्यच! आणि ते मला प्राणपणानं जपायचं होतं. कारण मला माहीत होतं, माझ्या अंगदेशाच्या राज्यव्यवस्थेत युवराज दुर्योधन कसलाही हस्तक्षेप करणार नव्हता. आणि म्हणूनच मी स्वत:ला स्वतंत्र म्हणवीत होतो. दुर्योधन माझ्या भावना सांभाळील आणि माझ्या कल्पनांना कृतीची जोड देईल, अशी माझी मनोदेवता मला सांगत होती.

त्या उद्दाम भीमाला मला दाखवायचं होतं की, कर्णाच्या हातातील प्रतोद केवळ घोड्यांच्याच नाही तर कधी-कधी त्याच्यासारख्या माणसांच्याही पाठीवर फाडफाड उडू शकतो! काही काल मात्र मला स्वस्थ बसणं भाग होतं; झाल्या अपमानाचं विष पचवून गप्प बसणं भाग होतं. आतून जळत असताना बाहेरून शांत असल्यासारखं दाखविणं भाग होतं! हे अंगराजपद मिरवणं माझं कर्तव्य होतं. मला आत्मविश्वास होता की, एक दिवस असा उगवेल की, त्या दिवशी स्वत:च्या शक्तीनं उन्मत्त झालेल्या दांडगट भीमाच्या गळ्यात मी माझं धनुष्य अडकवून त्याची गर्दन गदागदा हलवीन. आणि त्याला पटवून देईन की, मी एक सारथीच आहे, पण वीर सारथी आहे! त्यासाठी थोडा काल थांबावं लागणार होतं. कुठल्याही गोष्टीला योग्य वेळ यावीच लागते.

**

# दोन

अलीकडे मी आनंदी होतो तो मात्र फारच वेगळ्या कारणासाठी! कारण दूतांकडून माझ्या विवाहाची आमंत्रणं सगळीकडे गेली होती. विवाह! खरोखरीच जगात स्त्री आणि विवाह या दोन गोष्टी नसत्या तर! माणसाचं जीवन कसं झालं असतं? विधात्याचं हे रमणीय जग म्हणजे केवळ एक मरुभूमी ठरली असती. नद्या, निर्झर, पशु-पक्षी आणि सुंदर-सुंदर फुले असलेली; तरीही मरुभूमी! प्रेमासाठी तहानलेला माणूस मरुभूमीत वणवण भटकला असता आणि शेवटी वेडापिसा होऊन त्यानं झाडाझुडपांना मिठ्या मारल्या असत्या; त्याच्या तडफडणाऱ्या जिवाला आत्महत्येशिवाय शांती मिळाली नसती! म्हणूनच स्त्री म्हणजे विश्वकर्त्यानं आपल्या पहिल्याच साखरझोपेच्या वेळी टाकलेला एक हळुवार नि:श्वास वाटतो मला! त्या नि:श्वासातच पुरुषाच्या जळणाऱ्या मनाला शांत करण्याची प्रचंड शक्ती असते. स्त्रीच्या प्रेमळ सहवासात माणूस जगाचं क्रौर्य विसरू शकतो. अपमानाचे कडू घोट धीरानं पचवू शकतो. नव्या पराक्रमाचे पर्वत उभे करू शकतो. विवाह म्हणजे तरुण मनाला ज्याची नेहमीच ओढ असते असं जीवनाच्या वाटचालीतील सर्वांत मोक्याचं ठिकाण! विक्रमाच्या सागराला सौंदर्याच्या सरितेचं सानंद आलिंगन! दोन तरुण मनांचं मधुर-मीलन!

म्हणूनच मला दुसरं-तिसरं काहीच दिसत नव्हतं. दिसत होती ती केवळ माझ्या जीवनात माझी साथीदारीण म्हणून प्रवेश करणारी माझी भावी अर्धांगी. एखाद्या मधमाशीनं आपल्या आवडत्या फुलाभोवती गुंजारत सारखं फिरावं तसं माझं मन तिच्या काल्पनिक मूर्तीभोवती एकसारखं घोटाळत होतं. मला माहीत आहे – माझ्यासारख्या योद्धयाचं मन हे असं असू नये. पण ते तसं होतं! कारण मीही एक माणूस होतो. योद्धयाचं मन बाणांची पाती करतात त्या लोखंडाचं केलेलं नसतं! त्यालाही भावभावनांनी बांधून टाकलेलं असतं. प्रत्यंचेशिवाय धनुष्य नाही आणि भावनेशिवाय मनुष्य नाही! म्हणूनच होऊ घातलेल्या माझ्या पत्नीची प्रतिमा माझ्या डोळ्यांसमोर नित्य उभी राहत होती. मनात अनेक प्रश्नांचं काहूर माजत होतं. कशी वागेल ती माझ्याबरोबर? माझा स्वभाव, माझं जीवन, ध्येय तिला बरोबर समजेल काय? कारण माणूस हा कधीच परिपूर्ण नसतो. त्याच्या स्वभावात त्याच्या नकळत असंख्य दोष लपलेले असतात. बालपणापासून आजूबाजूच्या परिस्थितीचे पडसाद मनावर उमटलेले असतात. ते माणसाच्या स्वभावावर परिणाम केल्याशिवाय राहत नाहीत. क्षणोक्षणी ते प्रकट होत असतात. म्हणूनच परस्परांच्या स्वभावातले असे दोष पति-पत्नींना तरी नीट माहीत असावे लागतात. वैवाहिक जीवन म्हणजे दोन चक्रांचा रथ. पति-पत्नी ही ती दोन चक्रं. ही दोन्ही चक्रं ठीक समतोल असली तरच तो चालतो. नाहीतर अंती तो धरणीत रुततो! ज्यांना हे पटत नाही ते केवळ एक विलास म्हणूनच विवाह करतात. चांगली तलम वस्त्रं परिधान करून फिरतात. अशी माणसं म्हणजे उत्तम वस्त्रांतील केवळ पशू! त्यांचा संस्कृतीचा टेंभा खोटा असतो. त्यांच्या पुढच्या पिढ्यान्‌पिढ्या तशाच विलासी आणि मूर्ख जन्मतात. हत्तीच्या पायाखाली मुंग्यांचं वारूळ सापडलं की, त्यातील लाखो मुंग्या जशा चेंदामेंदा

होऊन जातात तशीच काळाच्या गजराजापुढं त्यांच्या वंशजांची अवस्था होते! मुंग्यांच्या संख्येला कधीच किंमत नसते! कारण त्या क्षुद्र असतात.

माझ्या डोळ्यांसमोर माझ्या होणाऱ्या पत्नीची मूर्ती उभी होती. एक कर्तव्यदक्ष पती म्हणून, एक प्रजाहितदक्ष राजा म्हणून, माझ्या विवाहाला माझ्या राज्याभिषेकाइतकंच महत्त्व होतं. वृषाली माझी जीवनसाथी होणार होती. प्रयागात माझ्या चरणांवर वाहिलेला आपल्या जीवनाचा घडा ती तसाच माझ्या चरणांवर ठेवणार होती! सत्यसेन माझा मेहुणा होणार होता. एका सारथ्याचं एका सारथिकन्येशी जन्माचं नातं जोडलं जाणार होतं. म्हणूनच तिची गोलाकार शंखासारखी नितळ आकृती माझ्या डोळ्यांसमोर एकसारखी नाचत होती. तिच्या साहाय्यानं माझं जीवन म्यानातल्या खड्गासारखं निर्धास्त होणार होतं. म्यानात खड्ग कधी गंजत नसतं. उलट ते अधिक धारदार राहतं. माझ्या लेखी वृषाली म्हणजे पृथ्वीवर अवतरलेलं साक्षात अप्सरेचं एक प्रतिचित्र होतं.

खरोखर स्त्रीच्या सौंदर्यात किती प्रभावी सामर्थ्य असतं! नियंता हा जर एक जग रंगविणारा कुशल रंगारी असेल, तर स्त्री ही त्यानं रंगवलेली सर्वश्रेष्ठ रंगकृती म्हटली पाहिजे. सर्व जग रंगवून झाल्यावर शेवटी निर्वाणीच्या हातानं आणि सर्वांत प्रभावी कुंचल्यानं रंगविलेली पूर्णाकृती!

वृषालीच्या नावाबरोबरच, वायूच्या झुळकीसरशी एखाद्या मिटलेल्या कळीच्या पाकळ्या हळुवार उमलल्या जाव्यात, तशा माझ्या अनेक मधुर स्मृती फुलविल्या जातात. कधी-कधी माणसानं केवळ दैवावरच विश्वास ठेवावा, असं वाटू लागतं, कारण स्मृतिपटलावरील अनेक नाट्यमय घटना माझ्या डोळ्यांसमोर उभ्या राहतात.

**

# तीन

आखाडच्याच्या रात्री मला सत्यसेन गंगेच्या काठावर भेटला होता. त्याला 'माझी गाठ घे – ' असं मी सांगितलं होतं. त्याप्रमाणं तिसऱ्या दिवशी तो मला भेटला. मी त्याची दुर्योधनाजवळ थोडी वाखाणणी केली. त्याला आपल्या सैन्यात कुठंतरी ठेवावं, असं मी म्हणताच दुर्योधानानं त्याला लागलीच आपल्या राजरथाचा सारथी म्हणून नेमूनही घेतलं. सत्यसेनाच्या व्यवसायाचा प्रश्न मिटला. थोड्याच दिवसांत त्यानं आपल्या सारथ्यातील कौशल्यानं दुर्योधनाची कृपाही संपादन केली. मी, बाबा आणि शोण युद्धशाला सोडून राजवाड्यावर राहू लागलो, कारण मी आता अंगराज झालो होतो. माझ्यासाठी स्वतंत्र राजवास्तू होती, दासदासी होत्या आणि सगळ्यात जास्त महत्त्वाचा होता तो माझ्यावरील दुर्योधनाचा आग्रही लोभ! त्याच्या सर्व बंधूंचंही माझ्यावर प्रेम होतं!

जरी मी राजवाड्यावर आलो होतो; तरीही नेहमीप्रमाणं रोज पहाटे गंगेवर जात होतो. तेथून भर दोन प्रहरी परतत होतो. जाताना दोन चषकं गाईचं दूध पिऊन जाई. गंगेवर जाऊन सूर्यपूजा करणं हा माझा रोजचा नियम होता. सूर्यदेवांना गंगाजलाचं अर्घ्य दिल्याशिवाय माझा दिवस सार्थकी लागत नव्हता.

असाच मी एकदा गंगेवर गेलो होतो. स्नान आटपून नेहमीप्रमाणं अर्घ्यासाठी ओंजळभर पाणी मी घेतलं. माझ्यापासून वीस-पंचवीस पावलांवरच उजव्या बाजूला गंगेचा घाट होता. त्याच्या दगडी पायदंड्या धूसर प्रकाशात अस्पष्ट दिसत होत्या. माझ्या ओंजळीतील पाणी थेंबाथेंबांनी परत गंगेच्या पात्रात समंत्र एकरूप होत होतं. रिक्त झालेली ओंजळ मी परत भरून घेत होतो. माझ्या गुरूला मी ती श्रद्धेनं अर्पण करीत होतो. आजपर्यंत मी अशा किती भावओंजळी अर्पण केल्या होत्या त्याची गणती नव्हती.

गेली कित्येक वर्षं मी हे श्रद्धेनं करीत आलो आहे. जीवनाच्या अंतापर्यंत मी ते तसंच करणार आहे. श्रद्धा म्हणजे काटेरी जीवनावरची हिरवळ! माझी ही गुरूवरची श्रद्धा मी प्राणपणानं जपली होती आणि शेवटपर्यंत मी ती जपणार आहे. सगळ्या हस्तिनापुराला आता ते चांगलं माहीत झालं होतं. सकाळच्या तीन प्रहरी 'कर्ण कुठं आहे?' असा हस्तिनापुरात कुणालाही प्रश्न विचारला असता, तर प्रत्येकानं निर्धास्तपणे उत्तर दिलं असतं, "गंगेच्या काठावर!"

नित्यासारखा मी त्या दिवशीही एकएका ओंजळीनं माझ्या श्रद्धेचा घट भरत होतो. पूर्व दिशा नुकतीच कुठं उजळू लागली होती. क्षणात निळ्या साम्राज्याचा सोनेरी सम्राट आपल्या रथाचे किरणरूपी हजारो घोडे उधळीत पूर्वक्षितिजावर हसत उभा राहिला! पशु-पक्षयांनी मंजूळ आवाज काढून त्याचं स्वागत केलं. गंगेच्या पैलतीरावरची हिरव्यागार लुसलुशीत गवताची असंख्य पाती अंग झटकून तरारली. त्यावरचे हिरवे-हिरवे टोळ आपली गवताची मऊ शय्या सोडून पटापट इकडे- तिकडे उडू-बागडू लागले. तृणपात्यांवरचे दवबिंदू रुपेरी, चंदेरी रंगात चमकू लागले. कुरणातील गाईंची गोंडस

वासरं पुष्ट माना वाकडचा-तिकडचा करून बागडू लागली. पक्षयांनी पंख झटकून किलबिलत चाऱ्यासाठी घरटी सोडली. काही कारंडव पक्षी फडफडत मध्येच गंगेच्या पाण्यावर झेपावू लागले. पंख पाण्यात भिजताच परत वर झेपावून आकाशात भरारी घेऊ लागले. मंदिरांचे डौलदार कळस सोनेरी रंगात उजळून निघाले. गंगेच्या असंख्य लहरी सोनेरी वस्त्रं पांघरून चमचमत, एकमेकींशी नृत्यगीत गुणगुणत फेर धरून नाचू लागल्या! सगळं चराचर कसं चैतन्यानं कुदू लागलं! जगाला उजळणारा तो अक्षय महादीप माझ्या कानातील कुंडलांना गोंजारू लागला. माझ्याशी एका अबोध भाषेत बोलू लागला. डोळे सताड उघडे ठेवून एकटक पाहत मी ते तेज घटाघटा पिऊ लागलो. माझ्या मनाची ही तेजाचा रस डोळ्यांनी पिण्याची इच्छा कधी तृप्त का होऊ नये, तेच मला कळत नसे. कधी-कधी तर ते तेज मी अखंड दिवसभर डोळ्यांनी प्राशन केलं होतं! तरीही मी अजून अतृप्तच होतो. माझ्या मनाला तेजाची लागलेली ही तृष्णा कसल्या प्रकारची असावी, हे माझं मलाच कळलं नव्हतं! कदाचित जीवनाच्या अंतापर्यंत ते मला कधी कळलंही नसतं! नेहमीच्या या सूर्यदेवांकडे पाहण्याच्या सवयीनं माझ्या डोळ्यांच्या बाहुल्या मात्र मोठ्या झाल्या होत्या! अश्वत्थामा तर नेहमीच मला म्हणत होता, "कर्णा, तुझ्या निळ्या डोळ्यांत चमकणाऱ्या सोनेरी-रुपेरी बाहुल्या म्हणजे निळ्या आकाशात प्रकाशमान होणारे सूर्य-चंद्रच वाटतात!" असं माझं हे सूर्याराधनेचं व्रत नित्य चालू होतं. देहाचं भान हरपून जाई. मन हलकं होई.

त्या दिवशीही माझी अशीच अवस्था होत होती, पण एकाएकी घाटाच्या दिशेनं आलेली एक आर्त किंकाळी माझ्या कानात बाणासारखी घुसली. कुणीतरी "वाचवाऽऽ वाचवाऽऽ" म्हणून जिवाच्या आकांतानं ओरडलं. मी झटकन मान वळवून घाटाकडे पाहिलं. सगळा भव्य घाट निर्मनुष्य होता. एक मातीचा घडा मात्र उपडा होऊन गंगेच्या पाण्यावरून हिंदकळत दूर चालला होता. रुपेरी-सोनेरी लाटांत एक कर्दळीच्या दंडासारखा नितळ हात पाण्याच्या पृष्ठभागावर वळवळत होता. कंकणं चमकत होती. मधूनच तो हात झटकन पाण्याखाली अदृश्य होई. काठावरच्या शेवाळलेल्या पायदंडीवरून पाणी भरताना कोणत्यातरी ललनेचा गंगेत तोल गेला होता. नेहमीच दुरून आकर्षक दिसणारं गंगेचं सखोल पाणी आज कुणालातरी कायमचं आपल्या उदरात घेऊ पाहत होतं! त्या हाताच्या पाण्याबाहेर होणाऱ्या चळवळीत मदतीची आर्त हाक होती.

मी अंगावरचं अधरीय सावरलं आणि घाटाच्या दिशेनं धावू लागलो. घाटावर येताच माझं शरीर मी सरळ गंगेच्या पात्रात झोकून दिलं. बराच वेळ पाण्याच्या आत मी डोळे उघडून पोहत होतो. कुंडलांना काही धाडसी लहान-लहान मासे व्यर्थ लुचत होते. थोडचा वेळातच पाण्याखाली खोल बुडत जाणारी एक मानवी आकृती दिसली. जवळ जाताच त्या आकृतीनं मला कडकडून मिठी मारली. मृत्यूच्या दारात जीव किती असाहाय्य असतो! तो जात-गोत, समाज, धर्म, प्रतिष्ठा, लिंगभेद काही-काही पाहत नसतो. तो पाहतो केवळ स्वत:चं अस्तित्व! ती एक स्त्री होती, तरीही तिनं मला कवटाळलं होतं. मृत्यूच्या द्वारात घोटाळणाऱ्या एका जिवाची दुसऱ्या एका जीवनाला, 'मला पदरात घे' म्हणून मारलेली होती ती मिठी! ती मिठी मलाही गंगेच्या तळाशी नेऊ शकली असती, म्हणून प्रथम मी स्वत:ला सोडवून घेतलं आणि तिच्या मुक्त केसांच्या मिळतील तेवढचा बटा मुठीत घट्ट पकडून काठाच्या दिशेनं सरासर पाणी कापू लागलो. त्या तशा अवस्थेतही एक विचार माझ्या मनात चमकून गेला. माझी गुरुपूजा अर्धवटच

राहिली होती. पाणी कापता- कापता गंगेतूनच सूर्यदेवांकडे पाहत मी पुटपुटलो, "गुरुदेव, क्षमा करा. कधी-कधी नियमाला अपवाद निर्माण होतो!" ती स्त्री केसांबरोबर ओढली जात होती. मी काठावर आलो. त्या मूर्च्छित स्त्रीला कसंतरी पाण्याबाहेर काढलं. तिचा चेहरा पाहताच मात्र; मी आश्चर्यानं स्तब्धच झालो. क्षणभर काहीच सुचेना. ती वृषाली होती! सत्यसेनाची बहीण.

डोळ्यांपुढं क्षणात प्रयागचा संगम उभा राहिला. तिच्या घड्यातलं पाणी माझ्या वस्त्रावर पडून माझी वस्त्रं भिजली म्हणून त्या वेळी ती किती लाजली होती! केवळ एकदाच तिनं माझ्याकडे पाहिलं होतं. त्यानंतर तिनं जी धरतीला दृष्टी खिळवली होती ती काही पुन्हा वर उचलली नव्हती. पायाच्या नखानं भूमी उकरून-उकरून तिनं खड्डा तयार केला होता! त्या वेळची वृषाली म्हणजे वाऱ्याला लाजून पानांआड आपलं मुख लपविणारी एक लाजाळू कळी होती. तर आताची वृषाली म्हणजे एखाद्या डहाळीवर विसावलेलं, उमललेलं पुष्प होतं. दवाच्या बिंदूंनी प्राजक्ताचं झाड चिंब न्हावं तशी ती दिसत होती. तिच्या चर्येवर कसलेही भाव नव्हते. झोपी गेलेल्या अर्भकासारखी तिची मुद्रा शांत होती, निरागस होती. गंगेच्या पात्रातून चुकून मी एखादी अरागस जलकन्या बाहेर काढली की काय असं मला वाटलं! ज्या हातांनी अर्घ्य देत होतो त्याच हातांवर तिचा अचल देह घेऊन पूर्वेकडे पाहत तसाच मी क्षणभर उभा राहिलो. एक चमत्कारिक विचार माझ्या मनात डोकावून गेला. वाटलं की, असाच रमणीय सूर्योदय असावा. वृषाली माझ्या बाहूंत अशी असावी. मीही भिजलेला, तीही भिजलेली! काळाची गतीच थांबावी. गंगेच्या चंचल अस्थिर पाण्यात आम्हा दोघांचं प्रतिबिंब असंच हिंदकळत राहावं! कारंडव पक्षयांनी अशीच मधुर गाणी गावीत.

पण क्षणातच मी तो विचार अंगावरची पाल झटकतात तसा झटकून टाकला. मला माझी तीव्र खंत वाटली. कितीही झालं तरी ती एक परस्त्री होती. तिचा अचल देह मी एका प्रशस्त पायदंडीवर अलगद ठेवला. तिच्या अंगावरून निथळणारं पाणी पायदंडीवरून ओघळत परत गंगेत मिसळू लागलं! काय सांगणार होतं ते तिला? अर्धा घटका ती शुद्धीवर आलीच नाही. किती किती निरागस दिसत होती ती! भिजलेलं वस्त्र तिच्या अंगाला जागजागी चिकटलं होतं. पाण्याचे चुकार-मुकार बिंदू तिच्या गोऱ्या गोल मुखकमलावर ठिकठिकाणी थबकून चमकत होते. त्यांच्यावर पडणारे सूर्यकिरण परावर्तित होऊन तिच्या गालांवर विखुरले होते! तिची त्या वेळची देहलता म्हणजे गंगेचं एक ऐटदार चंदेरी वळणच वाटलं मला!

काठावर ठेवलेल्या कोरड्या उत्तरीयाची मला आठवण झाली. ते आणण्यासाठी मी लगबगीनं उत्तरीयाजवळ आलो. ते घेऊन तसाच माघारी वळतो तो तिचा श्वास मंद-मंद चालू झाला होता. घाटावर तर कोणीच नव्हतं. उत्तरीयानं मी तिच्या मुखावरचे जलबिंदू हाताचा स्पर्शही जाणवणार नाही असे टिपले. तिनं आपली मान थोडीशी चाळवली आणि हळुवारपणे डोळे उघडले! प्रथम तिला आपण कुठं आहोत, मी कोण आहे, काहीच कळलं नाही! बावरल्या नेत्रांनी ती माझ्याकडे एकटक पाहू लागली. कुंडलावर तटलेले दोन जलबिंदू घरंगळून माझ्या खांद्यावर पडलेले तिनं पाहिले! आणि एका क्षणात तिला आपण कुठं आहोत, मी कोण आहे या सर्वांची जाणीव झाली. झटकन ती उठून बसली. अंगावरचं ओलं वस्त्र लगबगीनं सावरण्याचा गमतीदार प्रयत्न ती करू लागली. तिनं आपली मान खाली घातली. सावरून उठून उभं राहताना माझं

उत्तरीयही तिनं नकळत आपल्या अंगाभोवती तसंच लपेटून घेतलं! वर उठून गंगेच्या पाण्यात दूरवर वाहत गेलेल्या घड्याकडे बोट दाखवीत मी म्हणालो, "मागं प्रयागात तुमचा एक घडा फुटला होता. आता हस्तिनापुरात एक घडा गंगेनं कायमचा हिरावून घेतला आहे! कुणासाठी ते तिलाच विचारा!"

तिनं हिंदकळत दूरवर जाणाऱ्या त्या गंगेतल्या घड्याकडे एक दृष्टिक्षेप टाकला. लाजून खाली मान घालून ती गर्रकन वळली आणि एक-एक पायदंडी चढत दूर निघूनही गेली! तिच्या ओल्या पायांचे सुस्पष्ट ठसे घाटाच्या पायदंड्यांवर रांगेत उमटत गेले. जाताना तिनं गोंधळून माझं उत्तरीयही तसंच आपल्याबरोबर नेलं! तिच्या त्या धांदरटपणावर मी स्वत:शीच हसलो. गंगेतल्या त्या घड्याकडे मी कितीतरी वेळ पाहत होतो. मागून कुणीतरी घाटाच्या पायदंड्या उतरत असल्याची चाहूल लागली म्हणून मी मागं वळून पाहिलं. ते पितामह भीष्म होते! मला पाहताच अगदी सहजपणानं त्यांनी विचारलं, "कर्ण, आज अजूनही तू पात्राबाहेर कसा?"

मी काहीच बोललो नाही. काय बोलणार होतो?

'माझी साधना काही कारणानं आज अपुरी राहिली आहे!' असं मी त्यांना कसं सांगणार होतो?

केवळ अंगावरच्या ओल्या अधरीयातच गंगेवरून परतलेल्या कर्णाकडे त्या दिवशी कितीतरी नगरजन आश्चर्यानं पाहत होते.

**

# चार

त्या दिवशी घडलेली सर्व घटना कशी कुणाला ठाऊक; पण दुर्योधनाला कुणाकडूनतरी कळली होती! बहुतेक वृषालीनं ती आपल्या बंधूला सांगितली असावी आणि त्यानं ती कधीतरी दुर्योधनाला सांगितली असावी! माझी मात्र त्या घटनेपासून विचित्र मन:स्थिती झाली. मी रोज नित्यासारखा गंगेवर जात होतो, पण सूर्यदेवांकडे पाहू लागलो की, त्या तेजस्वी बिंबात मला वृषालीची चर्या दिसू लागली! कधी-कधी मी माझं उत्तरीय गंगेच्या काठावर विसरून तसाच परत येऊ लागलो! आणि ते आणण्यासाठी नंतर शोणाला गंगेवर पिटाळू लागलो. शोण मला विचारू चागला, "दादा, तू असा विसराळू कसा होत चाललास?" मी त्याला काहीतरी उत्तर द्यायचं म्हणून म्हणू लागलो, "शोणा, काही-काही वेळा माणसाला उगाच विसरावं असं वाटतं!" तो गोंधळून माझ्याकडे पाही, कारण रोज ऐन रणरणीत उन्हातून त्याला माझ्यासाठी गंगेवर जावं लागत होतं! आपला राजा इतका विसराळू कसा? अशी सेवकांनी पश्चात चर्चा करू नये म्हणून ते काम मी शोणालाच सांगत होतो.

बाबांच्या प्रत्येक शब्दाला मी आजपर्यंत मान देत आलो होतो, कारण त्यांच्या कष्टामुळेच माझं जीवन अंगराज-कर्ण म्हणून आज उभं होतं. मी अंगराज होताच त्यांना राजवाडयावर आणून ठेवलं होतं. त्यांचा प्रत्येक शब्द झेलला होता. रोज रात्री मी स्वत: त्यांच्या भगभगणाऱ्या तळपायांना चंदनमिश्रित उटणं चोळत होतो. आई ते पाहून कधी-कधी म्हणे, "वसू, तू आता राजा झालास. हे काम आता तुला शोभत नाही रे! आता एखादी महाराणी आण आणि तिला हे सर्व सांग!" मी तिच्या कल्पनेला कधीच प्रतिसाद देत नव्हतो. चंपानगरीच्या आठवणी काढून मी कौशल्यानं तिचं मन दुसरीकडे वळवीत होतो.

एकदा बाबांनी मला एक आश्चर्याचा धक्का दिला.

शोणानं मला बाबांचा तातडीचा संदेश सांगताच मी त्यांच्या कक्षात गेलो. दुर्योधन पूर्वीच तिथं बसला होता. आत जाताच बाबांनी मला सरळ-सरळ एक प्रश्न केला. ते म्हणाले, "कर्णा, मी तुझ्याकडे आजपर्यंत काहीच मागितलं नाही. आज जर मी एखादी गोष्ट मागितली, तर ती तू देशील काय?"

मला त्यांच्या प्रश्नाचा रोख नीटसा कळला नाही. तरीही त्यांच्या शब्दांसाठी काहीही करणं माझं कर्तव्य होतं म्हणून मी झटकन म्हणालो, "बाबा, मी तुमचा पुत्र कर्ण आहे. पित्यानं पुत्राकडे काही मागायचं नसतं; हे हवं म्हणून त्याला आज्ञा करायची असते!"

"मग मला सून हवी आहे! तुझा विवाह करायचं मी ठरविलं आहे. तुझी कसलीच ना मी आता ऐकून घेणार नाही."

"पण..." मी थोडा चाचरलो.

"हे बघ... पणबिण काही नाही. मी सारथीकुलातील एक देखणी वधू तुझ्यासाठी बघितली आहे."

"बाबा... माझं..."

"तुझं मी आता काहीच ऐकणार नाही. आजच मी मुलीच्या घरी पुरोहित पाठविणार आहे."

"पण थोडं दिवस थांबलं तर नाही का चालणार?" मी निर्वाणीचा म्हणून प्रश्न विचारला. कारण नसता डोळ्यांसमोर उगाच वृषालीची मूर्ती नाचू लागली. तिला सहजासहजी विसरता येणं, का कुणास ठाऊक; पण मला शक्यच नव्हतं. कारण मी रोज गंगेवर जाणार होतो. रोज मला तिची आठवण होणार होती. तिची आठवण होऊ नये यासाठी एकच उपाय होता. तो म्हणजे गंगेवर जायचंच सोडणं! पण मला तर ते कदापिही शक्य नव्हतं. एक वेळ मी अंगराज पद सोडलं असतं, माझी कवच-कुंडलं सोडली असती, पण गंगेच्या तीरावर जाऊन सूर्याराधना करणं कधीच सोडलं नसतं!

"हे बघ कर्णा, आता थोडं दिवसही आम्हाला थांबता येणार नाही, कारण अजून शोणाचंही लग्न व्हायचं आहे आणि आम्हीही आता वृद्ध झालो आहोत. तुला हे लग्न नको असेल तर तसं स्पष्टच सांग." बाबांनीही मला निर्वाणीचा प्रश्न विचारला. काय उत्तर द्यावं ते चटकन समजेना. मी म्हणजे शोणाच्या जीवनमार्गातील धोंड व्हायचं की काय? आपल्यासाठी अविश्रांत कष्ट घेतलेल्या वृद्ध मातापित्यांची प्रेमळ अंत:करणं दुखवायची की काय? माणूस हा भावनेवर जगतो म्हणतात, पण कधी-कधी त्याला कर्तव्यासाठी भावनेला मागं ढकलावंच लागतं. इतरांसाठी जगतो तोच माणूस. क्षणभर सूर्यदेवांचं स्मरण करून मी निर्णय केला. त्यांना नम्रपणे सांगितलं, "आपली इच्छा असेल तर मी तयार आहे!"

"ठीक आहे," म्हणत ते माझ्याजवळ आले. त्यांचे वृद्ध डोळे एका वेगळ्याच आनंदानं चमकत होते. आपला थरथरता हात त्यांनी माझ्या पाठीवरून मायेनं फिरविला. एकाएकी वृषालीचा कर्दळीच्या दंडासारखा गोल गौरवर्णी हात मला आठवला. मनाच्या निर्धारानं सर्व विसरण्याचा मी प्रयत्न करू लागलो. पण छे! मन हे किती नाठाळ असतं! जी गोष्ट विसरण्यासाठी माणूस प्राणपणानं प्रयत्न करतो नेमकी तीच गोष्ट मनात एकसारखी घोटाळत राहते. जीवन हे कधी-कधी माणसाची कठोर परीक्षा घेत असावं. कितीही आवडली तरी प्रत्येक गोष्ट माणसाच्या इच्छेप्रमाणं होईलच असं नाही. वृषाली मला आवडली होती, पण आता तिला विसरणंच भाग होतं. ती माझी पत्नी होणं आता शक्य नव्हतं! त्यांच्यासमोर आपल्या हृदयाचे भाव व्यक्त होऊ नयेत म्हणून "चलतो," असं म्हणत मी बाहेर जाण्यासाठी वळलो. तिथं दुर्योधन बसला होता याचंही भान राहिलं नाही! मी जाण्यासाठी वळलो हे पाहताच दुर्योधनानं बाबांना एक खोचक प्रश्न विचारला, "पण... पण अधिरथकाका, तुम्ही कुठली वधू पाहिली आहे? तिचं नाव काय? काहीच सांगितलं नाहीत की तुम्ही!"

मी माझे कान जाता-जाता टवकारले. बाबांनी उत्तर दिलं, "मुलगी हस्तिनापुरातच आहे. सत्यसेनाची बहीण वृषाली!"

"ती होय! म्हणजे उगाच गंगेला रोज-रोज त्रास नको, असा सुज्ञ विचार केला वाटतं तुम्ही!" दुर्योधन मोठ्यानं हसत म्हणाला. बाबाही त्याच्याबरोबर हसू लागले. माझ्या डोक्यात लखकन प्रकाश पडला! हा सगळा उपद्व्याप दुर्योधनाचाच होता तर! किती बुद्धिमान होता तो! माझ्या संमतीसाठी बरोबर बाबांनाच गाठलं पाहिजे हे त्यानं कसं नेमकं अचूकपणे हेरलं होतं! तो माझा नुसता मित्र नव्हता, तर सख्खा बंधूच होता!

अगदी शोणासारखा! त्याच्या प्रेमाविषयी शंका घेणंसुद्धा पाप होतं. मला अंगराज करण्यात त्याचं माझ्यावरचं निर्भेळ प्रेम हे एकच कारण होतं. मी मात्र त्याला स्वार्थी समजत आलो होतो. त्याच वेळी मी पक्कं ठरवून टाकलं की, दुर्योधनासाठी वेळ पडल्यास वाटेल ते करायचं! आता मला दोन सख्खे बंधू झाले होते! एक शोण आणि दुसरा दुर्योधन! माझ्यासारख्या एका सारथिपुत्राच्या अतिकोमल भावना जपणारा कुरुश्रेष्ठ ज्येष्ठ कौरव दुर्योधन मला आता प्राणप्रिय झाला होता.

काही न बोलता मी लगबगीनं कक्षाबाहेर आलो. मन नुसतं कारंज्यासारखं उफाळत होतं. सर्वांच्या शुद्ध प्रेमानं ते देहात गुदमरत होतं. वृषाली माझी पत्नी होणार होती! कक्षाबाहेर पाठमोरा शोण उभा होता. त्याच्या जवळ जाताच मी त्याच्या पाठीवर दाणकन एक थाप मारली. तो केवढ्यानंतरी दचकून रागानं म्हणाला, ‘‘कोण हा मूर्खपणा!’’ मला पाहताच मात्र त्यानं आपली जीभ कचकन चावली आणि हात जोडून खाली मान घालून तो अपराध्यासारखा उभा राहिला. तसेच त्याचे हात हातात धरून मी त्याला म्हणालो, ‘‘आता मूर्खपणा संपला शोण! माझं उत्तरीय आणण्यासाठी तुला परत-परत आता कधीच गंगेवर जावं लागणार नाही!!’’

शोण माझ्याकडे पाहतच राहिला.

**

# पाच

मी आनंदी होतो तो यासाठीच.

माझ्या विवाहाची आमंत्रणं सगळ्या आजूबाजूच्या राज्यांत गेली होती. त्या दिवशी आखाड्यात होते ते-ते सर्व लोक विवाहाला निमंत्रणिकेने येणार होते. खरोखरच माझं जीवन म्हणजे सौख्याचा देवदार वृक्षच नव्हता काय? दिवसेंदिवस तो अधिकच डौलदार होत चालला होता. सारथ्यापासून राज्यपदापर्यंत आणि नंतर शुभमंगलाकडे आणि तेही सुयोग्य स्थळी, ही वाटचाल भाग्याचीच नव्हती काय? सौख्य हे कधी-कधी अनेक पंखांनी माणसाला विंझणवारा घालू लागतं. कधी-कधी हे सौख्य इतकं होतं की, त्यात श्वासही कोंडून जातो आणि मग माणसाचं मन स्वत:लाच म्हणू लागतं, 'बस्स झाली आता ही सुखं!'

वाड्याच्या सौधावर उभं राहून मी असाच विचार करीत होतो. दूरवर विशाल आकाशाचा नीलिमा, क्षितिजापाशी हिरव्यागार धरतीला कवेत घेताना माझ्यासमोर मला स्पष्ट दिसत होता! चित्त कसं प्रसन्न झालं होतं. कुरूंच्या पुरातन राजवाड्यासमोर उभारलेल्या माझ्या स्वयंवराच्या मंडपात अंग मोडून सजावट करणाऱ्या सेवक-सेविकांना पाहून माझं मन वायूसारखं हलकं झालं होतं. समोरच्या तलावात मानेला ऐटदार झटके देणाऱ्या आणि केवळ नेमकं दूध पिणाऱ्या पांढऱ्याशुभ्र राजहंसासारखं ते जणू देहाच्या तलावात वल्ही मारत फिरत होतं. सभोवती भावी जीवनाची सुखस्वप्नं वलयं निर्माण करीत होती. सगळं जगच मंदिरासारखं प्रसन्न आणि पवित्र वाटत होतं!

**

# सहा

माझ्या विवाहाचा, सर्वांमुखी झालेला, सर्वांची उत्सुकता शिगेला नेणारा तो मंगल सोहळा पार पडला. माझी अपेक्षाही नव्हती इतक्या थाटात माझा विवाहसमारंभ पार पडला. मी संसारी जगतात एक जबाबदार पती म्हणून प्रवेश केला. माझ्या जीवनाच्या नाट्यातील दुसरा अंक सुरू झाला. शृंगार आणि वात्सल्यानं भरलेला असतो हा अंक! माणसाचं मन या अंकात बहुधा फारच रमतं, तिथंच रेंगाळू लागतं! वैवाहिक जीवनात सर्व वस्तूंना आणि दिशांनासुद्धा गुलाबी वर्ण येतात! जीवनाच्या संगीतातला तो वसंत-वैभव राग असतो! आता तो राग मी आळवणार होतो, कारण माझ्या विवाहाचा मंगल सोहळा पार पडला होता. अजूनही त्या समारंभातले काही प्रसंग माझ्या मनात रेंगाळत होते. वसंतऋतू निघून गेला तरी जसा बकुलाच्या फुलाचा गंध मागे दरवळतो ना, तसे!

विवाहाला अनेक राज्यांतले नामवंत राजे आणि झाडून सारे नगरजन आले होते. एका सारथिपुत्राच्या विवाहाला क्षत्रिय कुलोत्पन्न राजे उपस्थित असावेत, ही घटना खरोखरच अपूर्व होती. दुर्योधनानं माझ्यासाठी सर्वांना आवर्जून निमंत्रणिका धाडल्या होत्या. खरोखरच त्याच्या प्रेमाला काही बंध नव्हते. कुरुकुलातला राजपुत्र ज्याला एकदा आपलं म्हणतो त्याला तो खरोखरच कायमचं आपलंसं करून टाकतो, याचा प्रत्यय त्याच्या प्रत्येक कृतीतून मला आला होता. माझ्या विवाहाच्या वेळी परप्रांतातलं कोणीही जरी हस्तिनापुरात आलं असतं, तरी त्याला हा कुरुवंशातल्या कोण्या राजपुत्राचाच विवाह आहे असं वाटलं असतं! मी भाग्यवान होतो हेच खरं! शोणाचा आनंद तर विवाहाच्या वेळी गगनात मावेनासा झाला होता. आपलं वय विसरून प्रौढासारखा तो, काय हवं अन् काय नको याची विचारपूस स्वत: करीत सगळ्या मंडपभर गरगरा फिरत होता.

नेहमी धर्म, आत्मा, कर्तव्य अशा गहन विषयांवर घटकान्घटका बोलणारा अश्वत्थामासुद्धा माझ्या विवाहात उत्साहानं उपस्थित झाला होता. माझ्या मस्तकाला त्यानं आपल्या पवित्र हातांनी मंडोळ्या बांधल्या होत्या. तसं करताना त्यानं मला पुटपुटत बजावलं होतं, ‘‘सावधान कर्ण! या आखाड्यात कोणीच अजिंक्य ठरलेलं नाही!’’

हळदीच्या वेळी तर स्त्रियांपैकी कुणीतरी खट्याळपणे म्हणालं होतं, ‘‘नवरदेवाच्या अंगाला हळद कशाला? हळद काय सोनेरी रंगाची आहे!’’ मला अजूनही हे सारं आठवतंय.

संध्याकाळच्या गोरज मुहूर्तावर विवाह झाला. वृषालीनं पांढऱ्याशुभ्र टपोऱ्या कमलपुष्पांची माला माझ्या कंठात सविनय घातली. नगाडे आणि चौघडे यांच्या संमिश्र स्वरांनी सगळं राजनगर निनादून गेलं. चंदनजल आणि निशिगंधाचा अर्क यांनी वातावरणाला सुगंधी धुंदी आणली. पश्चिम क्षितिजावर रोजच्यापेक्षा थोडा वेळ अधिक रेंगाळून सूर्यदेवांनी आम्हाला आशीर्वाद दिला. सायंकालचा रोजचा नमस्कार त्या गोंधळात निवांतपणे करायला मिळणार नाही म्हणून मी बोहल्यावरूनच त्यांना वंदन

करून घेतलं!

मी चतुर्भुज झालो! विवाहासाठी अनेक देणग्या आल्या होत्या. त्यात अनेक अलंकार होते, तलम वस्त्रं होती, रुपेरी आणि सोनेरी मुठींची धारदार खड्गं होती. वैदूर्य, माणिक, मोती आणि पाचू होते, पण एक देणगी मात्र फारच वेगळी होती. पांडवांकडून केवळ एकच देणगी आली होती. तीही राजमाता कुंतीदेवींकडून! ती देणगी म्हणजे एक निळ्या रंगाचा शालू आणि एक घोरपडीचं अंगुलित्राण होतं! त्या निळ्या शालूवर सोनेरी बुट्टे होते. हे महावस्त्र मौल्यवान आणि सुंदर होतं.

मी आणि वृषालीनं वाकून राधामातेला आणि बाबांना अभिवादन केलं. त्यांनी आम्हाला, "औक्षवंत व्हा!" असा शुभाशीर्वाद दिला. मन भरून आलं. त्यांच्या पोटी जन्म घेतल्याचं सार्थक झालं, असं मला वाटलं. माझ्या दंडाला धरून वर उठवीत राधामाता म्हणाली, "कर्णा, सुखी हो." तिचा वृद्ध खरबरीत हात हातात घेत मी म्हणालो, "कर्णा नव्हे, वसू म्हण माते! मी जगासाठी कर्ण आहे, पण तुझ्यासाठी वसूच आहे आणि सदैव वसूच राहीन." माझे डोळे भरून आले. तिनं मला आपल्या पोटाशी धरलं. माझी मान क्षणभर मी तिच्या खांद्यावर टेकविली. समोरच्या कक्षाच्या गवाक्षात राजमाता कुंतीदेवी उभ्या असलेल्या मला स्पष्ट दिसल्या. त्या आमच्याकडेच पाहत असाव्यात. त्यांनी आपल्या डोळ्यांना पदर लावल्याचं मला स्पष्ट दिसलं! माझ्या डोळ्यांत तरळलेल्या अश्रूंमुळे मलाच कदाचित तसा भास झाला असेल! नाहीपेक्षा राजमाता आपल्या डोळ्यांना पदर कशाला लावतील? दुसऱ्या क्षणीच गवाक्षाचं कवाडही झटकन बंद झालं! त्या कवाडाच्या तावदानावर पडलेली मावळती सूर्यकिरणंही क्षणभरात अदृश्य झाली! वृषालीचा हात मी हातात घेतला. विश्वाच्या प्रलयात तिचा हातच आता मला खरीखुरी सोबत करणार होता.

'राजमाता कुंतीदेवींना आखाड्यात आपल्या अर्जुनाला आव्हान देणाऱ्या सूतपुत्राचा विवाह एवढ्या थाटात झाल्याचं पाहायचं नव्हतं; म्हणून तर नसतील त्यांनी आपल्या कक्षाच्या गवाक्षाची द्वारं इतक्या तिडिकीनं झाकून घेतली?' उगाच एक विचार मनात येऊन गेला.

**

# सात

जीवनात तशा अनेक घटना घडतात. माणसानं कितीही मनात आणलं तरी त्या सगळ्या घटना काही त्याला लक्षात ठेवता येत नाहीत, पण काही-काही घटनाच अशा असतात की, त्या विसरू म्हटलं तरी नाही विसरता येत. पाण्यातला मगर जसा एकदा पकडलेलं भक्षय सोडायला कधीच तयार नसतो, तसं मनही त्या घटना सोडायला कधीच तयार नसतं. मनाच्या पेटिकेत अशा घटनांची अनेक तलम, रेशमी तशीच जाडीभरडी वस्त्रंही पडलेली असतात. विवाहानंतरची पहिलीच मधुमिलनाची रात्र जगातल्या कुठल्याही पति-पत्नीला विसरता आली आहे काय? छे! सर्वच चांगल्या आठवणी सुगंधी फुलांसारख्या असतात, पण त्या रात्रीची आठवण म्हणजे धुंद गंधानं भरलेलं केवड्याचं कणीसच! ही रात्र म्हणजे संकोच, संमोह आणि समर्पण! ही रात्र म्हणजे दोन मनांचं अबोल नि अबोध संभाषण! छे, शब्दांनी तिचं नीटसं वर्णन करताच येत नाही. विश्वरचनेच्या या अफाट यज्ञात परमेश्वराचा स्त्री आणि पुरुष निर्मितीत काही हेतू असेलच तर ही रात्र म्हणजे त्या यज्ञाची शेवटची पवित्र सांगता आहे! अजूनही ती रात्र कालच घडल्यासारखी जशीच्या तशी मला आठवते. विशेष म्हणजे ती रात्र पौर्णिमेची होती! शरदातील पौर्णिमेची!

निशिगंधाच्या पांढऱ्या चिमुरड्या आणि सुगंधी फुलांनी सजविलेल्या शिसमाच्या काळ्या लाकडी मंचकावर वृषाली सलज्ज बसली होती. मी शयनगृहात शिरताच ती अंग सावरून उभी राहिली. अधोमुखी उभी होती ती. मलाही काय बोलावं ते समजेना. गवाक्षाजवळ जाऊन मी तसाच उभा राहिलो. तेथून आकाशातला पूर्ण चंद्र दिसत होता. आपल्या चंदेरी चांदण्याचा घट तो पृथ्वीच्या अंगावर मुक्तपणे रिकामा करीत होता! सगळं हस्तिनापूर कसं शांत होतं. गंगेवरून बोचऱ्या गार-गार वायुलहरी कक्षात येत होत्या. त्या जणू मला विचारीत होत्या, ‘गंगेला विसरलास की काय? तुम्हा दोघांचं आलिंगन पहिल्याप्रथम तिनंच पाहिलं आहे.’ मी गंगेच्या पात्राकडे पाहिलं. दूरवर चांदण्यात निथळलेलं तिचं चंदेरी वळण डौलदार कपोतासारखं दिसत होतं. त्या दिवशी घाटाच्या पायदंडीवर मूर्च्छित पडलेल्या वृषालीला पाहून मला तसंच वाटलं होतं. हळूच गवाक्षाचं कवाड मी लोटलं आणि मंचकाजवळ जात तिला हळुवार आवाजात म्हणालो, “आता जर का तू परत गंगेत पडलीस, तर मात्र मी तुला पुन्हा पाण्याबाहेर काढणार नाही! मी काही गंगेत बुडणाऱ्यांना वाचविणारा कोळी नाही!” गालातल्या गालात हसतानाही तिच्या गालावर एक मोहक खळी पडली. ती काहीच बोलली नाही. अजूनही ती तशीच अवगुंठून उभी होती. मी परत म्हणालो, “या राजवाड्यावर अनेक दगडी पुतळे उभे आहेत. त्यात आणखी एका दगडी पुतळ्याची भर घालायची आहे का काय तुला? किती वेळ अशीच उभी राहणार तू? बैस खाली.” ती अवगुंठून खाली बसली. बसताना तिच्या शालूवरचे सोनेरी जरीचे बुट्टे समईच्या प्रकाशात चमकन चमकले. ते पाहून मला आश्चर्य वाटले. तो राजमाता कुंतीदेवींनी देणगी म्हणून दिलेला शालू होता! तिनं नेमका तोच शालू का निवडला होता? मी तिला कुतूहलानं विचारलं, “वृषाली, हाच

शालू तू आज का निवडलास? काय विशेष आहे त्यात एवढं?'' माझी ही वस्त्रचिकित्सेची मात्रा मात्र अचूक लागू पडली! ती बोलती झाली.

''आपणाला निळ्या-निळ्या आकाशातील सोनेरी सूर्यदेवांकडं पाहणं आवडतं म्हणे. या निळ्या शालूवर तसेच सोनेरी बुट्टे आहेत म्हणून!'' ती अतिशय हळुवार स्वरात पुटपुटली. तिचा आवाज गाईच्या गळ्यातील मधुर घंटेसारखा होता! आजच प्रथम मी तो ऐकत होतो. तिच्या आवाजापेक्षा तिचं उत्तरच मला अधिक आवडलं!

तिनं माझ्याबद्दल आणखी काय-काय माहिती काढली होती देव जाणे!

तिची हनुवटी वर उचलीत मी तिच्याशी काही बोलणार तोच -

तिनं मंचकावरच्या शय्येखाली हात घालून एक घडी घातलेलं वस्त्र माझ्यापुढं धरलं. कुतूहलानं ती घडी मी उलगडून पाहिली. ते माझंच उत्तरीय होतं! त्यादिवशी भांबावून आपल्याबरोबर नेलेलं माझं उत्तरीय तिनं अजून तसंच जपून ठेवलं होतं तर! मी ते हातात घेऊन झटकलं. त्यातून काहीतरी खाली पडलं. वाकून ते उचलून मी आश्चर्यानं हातात घेतलं. ते घोरपडीचं अंगुलित्राण होतं! वृषालीच्या कुशाग्र बुद्धीचं मला अतिशय कौतुक वाटलं. आपला पती धनुर्धर आहे हे जाणून तिनं, राजमाता कुंतीदेवींकडून आलेलं अंगुलित्राण मला देण्यासाठी आवर्जून आणलं होतं. मी ते बोटावर चढविलं. एका विचित्र योगायोगाची मला राहून-राहून एकसारखी जाणीव होऊ लागली. वृषालीनं नेमक्या राजमातेकडून आलेल्याच वस्तू का निवडल्या होत्या? त्याचं उत्तर काही केल्या मला सापडेना. नाहीतरी जीवनात सगळ्याच घटनांची उत्तरं कुठं सापडतात माणसाला? मी तो विचारच शेवटी दूर सारला.

दोन्ही हातात धरलेलं उत्तरीय वृषालीच्या मस्तकावरून मागं टाकून त्या विळख्यानं मी तिला जवळ ओढीत म्हणालो, ''आपल्या पतीला काय-काय आवडेल हे ओळखण्याची बुद्धी तुम्हा स्त्रियांना निसर्गतःच असते की काय?''

''पण अंगराजांनी आपल्या लाडक्या पत्नीसाठी काय-काय आणलंय?'' माझ्या छातीवर आपलं मस्तक घाशीत ती पुटपुटली.

मी कमरेच्या शेल्यात बांधलेला प्रयागातील संगमावरचा फुटक्या घड्याच्या तुकडा तिच्यासमोर धरीत म्हणालो, ''हे प्रयागचं सोनं!''

तिनं तो झटकन माझ्या हातातून काढून घेतला. तिचे गाल क्षणात आरक्त झाले! लाजून तिनं आपलं तोंड माझ्याच छातीवर घुसळलं. तिचं राजमुकुटाच्या आकाराचं गौरवर्णी गोल मुख मी ओंजळीत धरलं. तिच्या-माझ्यातील अंतर कमी- कमी होऊ लागलं. हळूच ती कक्षातल्या इंगुदीच्या समयांकडे बोट दाखवीत म्हणाली, ''अंहं! त्या पाहताहेत ना!'' मी हसून तिचं ओंजळीतलं मुख तसंच सोडून मंचकावरून उठलो. एक-एक अशा कक्षातल्या सर्व समया मी फुंकरीनं विझवून टाकल्या! परत मंचकावर येऊन बसलो. तिला कवेत घेऊन म्हणालो, ''आता तरी नाही ना कोणी तुला पाहायला?''

''अजून सगळे दीप कुठं विझलेत?'' तिनं उलटा प्रश्न केला. तिचा रोख मला नीट समजलाच नाही. एक चुकार लोचट चंद्रकिरण गवाक्षाच्या झरोक्यातून उगाच आत आला होता! तो पाहताच मला वाटलं की, त्याच्यासाठीच ती तक्रार करते आहे. त्या किरणशलाकेकडे उपेक्षेनं पाहत मी म्हणालो, ''आकाशातल्या त्या दूरस्थ चंद्राबद्दल म्हणतेस होय! अगं, विश्वाच्या निर्मितीपासून आजपावेतो अनेक रात्री त्यानं अशी किती प्रणयी युगुलं पाहिली असतील ते त्याचं त्यालासुद्धा आठवत नसेल! त्याची

दृष्टीच आता मृत झाली आहे!'' तरीसुद्धा त्या सुस्त पहुडलेल्या किरणशलाकेवर मी मनोमन फारच रुष्ट झालो होतो!

''अंहं! चंद्र नव्हे. आणखी दोन दीप तसेच आहेत की, चंद्राच्या चंदेरी चांदण्यालाही लाजवतील असे! कधीही न विझणारे. अंगराजांना आपल्या ओठांनी कधीही फुंकर न घालता येणारे!'' ती आपल्या टपोऱ्या डोळ्यांनी माझ्याकडे एकटक पाहत म्हणाली.

''कोणते?'' मी हटून विचारलं. तिचा रोख कशावर आहे ते समजणं कठीण नव्हतं.

''आपल्या कानांतले!'' खाली मान घालून गालातल्या गालात हसत ती म्हणाली. तीच गोड खळी उमटली!

''व्वा! वृषाली, कुणी गं शिकवलं हे शहाणपण तुला?'' मी तिचं मुख पुन्हा ओंजळीत घेतलं. माझ्या लुकलुकणाऱ्या मांसल कुंडलांतून बाहेर पडणारी जांभळट, रुपेरी किरणं तिच्या गौरवर्ण गोलाकार मुखावर विखुरली. तिचे मूळचे गौरवर्णी गाल त्यामुळे जांभळट; आरक्त दिसू लागले. कशासारखे दिसत होते ते? छे! शोधूनही मला उपमा सापडली नाही! अरुंधतीला घेऊन आकाशात पौर्णिमेचा पूर्ण विकसित टपोरा चंद्र हळूहळू वर चढू लागला. गवाक्षाच्या अर्धवट उघड्या पडलेल्या कवाडांच्या झरोक्यातून खुशाल शयनगृहात घुसलेल्या गंगेच्या थंड-थंड वायुलहरी फारच झोंबू लागल्या!

**

# आठ

वृषालीच्या सहवासात माझे दिवस असे आनंदात जाऊ लागले. ती एक आदर्श पत्नी होती. पत्नीच का, बहीण, कन्या, सून, भावजय सगळ्याच नात्यांत ती मला आदर्श वाटू लागली. मी तर तिच्या सहवासात कधीकाळी माझा या राजनगरात अपमान झाला होता हेही विसरून गेलो! जीवन हे इतकं हवंहवंसं, आनंदविभोर, रोमांचकारी आणि उदात्त असतं, हे मला पहिल्यानंच कळलं! कुठल्याही उत्कट भावनेचा आनंद हा त्याबद्दलचे ग्रंथ वाचून आणि पुराणं ऐकून कुणाला कधीच मिळत नसतो. त्याचा अनुभव घ्यावा लागतो. वृषालीच्या सहवासात एकच एक भाव फुलत होता आणि तो म्हणजे निर्भेळ प्रेमाचा. प्रेम ही मनाची सर्वांत प्रभावी प्रेरणा आहे. प्रेमाच्या धवल रंगापुढं, अपमान, सूड, असूया यांचे लाल, काळे आणि निळे सगळे-सगळे रंग फिके पडतात. नष्ट होतात.

रोज माझा दिवसातील अर्धाअधिक काल गंगेवर जात होता. राहिलेला काल व्यायाम, राजसभा, अश्वत्थामा आणि दुर्योधन यांच्याशी चर्चा यांत जात होता आणि रात्र फुलत होती ती वृषालीच्या सहवासात! आता माझ्यासाठी रात्र अशी नव्हतीच! अखंड दिवसच होता! चोवीस घटका प्रकाश! जीवन माझ्यावर सौख्याची सुवर्णफुलं उधळीत होतं! माझ्याभोवती माझ्यासाठी स्वत:ला विसरणारी कितीतरी प्रेमळ माणसं होती! आई-बाबा, वृषाली, सत्यसेन, अश्वत्थामा, शोण आणि युवराज दुर्योधन. शोण तर आता केवढा मोठा झाला होता! घायपाताच्या सरळ उंच दंडासारखं त्याचं शरीर किती ऐटदार दिसत होतं! व्यायाम आणि स्वच्छ निरागस मोकळं मन यांमुळे शरीरानं तो आता भक्कम झाला होता. आपल्या प्रेमळ स्वभावामुळे तर तो सर्वांचाच आवडता झाला. सर्वांना तो बलदंड आणि विनयी वाटत असला, तरी मला मात्र तो बालिश आणि भाबडाच वाटे. कारण त्याचा तो चौकसपणा, थरथरणारा संयत आवाज आणि मजविषयी पदोपदी स्पष्ट होणारी बंधुप्रेमाची सहजसुंदर जाणीव अजूनही पहिल्यासारखी तशीच होती. त्याचं शरीर बदललं होतं, थोराड झालं होतं; पण मन तसंच होतं – स्वच्छ हिमासारखं.

कधी-कधी माझी कवच-कुंडलं त्यालाच मिळाली आहेत, अशी कल्पना करून मी त्याच्याकडे पाही! तो मला अगदी माझ्यासारखाच वाटे. काही-काही वेळा तर तो माझ्यापेक्षाही अधिक चांगला दिसे. तो थोडासा शामवर्णी होता एवढंच! खरंच ही कवच-कुंडलं स्वत:ला मिळाली नाहीत म्हणून त्याला काय वाटत असेल? लहानपणी तर तो सरळ-सरळ त्याबद्दल कुरकुर करायचा, पण आता त्याला माझ्याबद्दल काय वाटत असेल? द्वेष? असूया? हेवा? छे! त्याच्या कुठल्याही कृतीत मला ते कधीच दिसलं नाही. निरामय बंधुप्रेमाचं अप्रतिम प्रतीक म्हणजे माझा शोण! दुर्योधनाला नव्याण्णव बंधू होते, अर्जुनाला चार बंधू होते, पण मला मात्र एकच बंधू होता. बंधू कसला? तो प्रति-कर्णच होता! मी राजा झाल्याबरोबर अनेकांनी अनेक वस्तूंची आणि अनेक जागांची माझ्याकडे गोड शब्दांत मागणी केली, पण शोणानं काय मागितलं? अंगराज्याचा अर्धा

वाटा? संपत्ती? अमात्याची जागा? की सेनापतीची? छे! मला एकांतात गाठून त्यानं काय सांगितलं? "दादा, आता तू खराच मोठा झालास! माझ्या मनासारखं झालं! नेहमी तुझ्याजवळ राहायला मिळावं, अशी माझी इच्छा आहे. मला तू तुझ्या पांढऱ्याशुभ्र घोड्यांच्या रथाचा सारथी कर! करशील ना?"

किती विशुद्ध प्रेम होतं त्याचं! मला आठवतंय, त्याचं ते मागणं ऐकून माझा कंठ दाटून आला आणि त्याचा हात हातात घेऊन तो प्रेमभरानं मी फक्त थोपटला. कुणाला माझ्याइतका प्रेमळ आणि नम्र बंधू मिळाला होता? लहानपणी 'मी कोण आहे?' असा मी उगाच त्रागा करून घेई. मी शोणाचा प्रिय बंधू नव्हतो काय? अश्वत्थामा आणि दुर्योधनासारखे जिवलग मित्र मला होते, मायाळू माता-पिता होते, समजूतदार आणि सुंदर पत्नी होती, अंगदेशाचं स्वतंत्र राज्यपद होतं. माणसाची सौख्याची यापेक्षा जास्त ती काय अपेक्षा असते? पण... पण तरीही माझ्या अंतरंगातील एक अनामिक कप्पा अतृप्तच होता! असंतुष्ट होता! कितीही झालं तरी मी सूतपुत्र होतो! वास्तविक मला माझ्या कुलाची खंत नसायला हवी होती – पण ती होती. का ते माझं मलाच समजत नव्हतं. कधी-कधी अजून तीव्रतेनं वाटतं की, शोणाला घेऊन हस्तिनापुराहून रथ पिटाळावा तो सरळ चंपानगरीत गंगाकिनारी न्यावा. शोणानं शिंपले वेचावेत. आपण रथातून सूर्यदेवांकडे पाहावं. संध्याकाळ व्हावी. परतताना गरुड पक्षयांकडे पाहून शोणानं तोच प्रश्न मला विचारावा, "दादा, तू जाशील का रे त्या गरुडासारखा उंचच उंच?" मीही त्याला उत्तर द्यावं, "हो जाईन! इतका उंच की, तुला कधी दिसणारही नाही!!"

पण हे सगळं घडत नव्हतं. घडणारही नव्हतं. जीवनात कधीच मागं जाता येत नाही!

**

## नऊ

युवराज दुर्योधनाशी राजकारणावर तशी मी बऱ्याच प्रसंगी करी. ओघाओघातच पांडवांचा निर्देश झाला की, त्याचे घारे डोळे विचित्र रंग पालटू लागत! जवळच शकुनीमामा असत. त्यांना तो अनेक धाडसी कल्पना सांगे. त्यातील संभाव्य धोके मामा आपल्या बुद्धिचातुर्यानं दूर करीत. मला त्यांच्या त्या सर्व कल्पनांत कपटाचाच वास येई. मी त्याला सरळ विरोध करी. तेव्हा शकुनीमामा म्हणत, "राजकारण म्हणजे काय, हे कर्णा, तुला कळतच नाही. तू तुझ्या कल्पनेप्रमाणं जगाकडे पाहायचा प्रयत्न करतोस, पण ते चूक आहे. राजकारण मनाच्या चांगुलपणावर कधीच चालत नसतं! ते बुद्धीच्या कसरतीवर चालत असतं! जग म्हणतं, भाषा हे भावना व्यक्त करण्याचं साधन आहे, पण राजकारणात हीच भाषा मनाच्या खऱ्या भावना अव्यक्त ठेवण्याचं साधन ठरतं! राजकारणी माणसाचं मन हे घुशीच्या बिळासारखं असावं. ते बीळ जसं कुठून सुरू होतं आणि कुठं जातं, हे कुणालाच कळत नाही; तसंच राजकारणी माणसाच्या मनात काय-काय आहे, हे कुणाला कधीही कळता कामा नये. राजकारण म्हणजे खुल्या मनानं चर्चा करावी असा मंदिरातल्या प्रवचनाचा विषय नव्हेच!"

मी त्यांच्या त्या विचारांनी गुदमरून जात असे. मनाला श्रीफळाची उपमा देणारा अश्वत्थामा आणि घुशीच्या बिळाची उपमा देणारे शकुनीमामा यांची मी तुलना करू लागे. मला काहीच सुचत नसे. नियतीनं मानवाच्या हाती जीवन कशाला दिले आहे? स्वत: जळून, दग्ध होऊन, जगाला उजळण्यासाठी की, स्वत:च्या क्षुद्र सुखासाठी इतरांना प्रसंगी निर्दयपणानं जाळण्यासाठी? माणसाला सलोख्यानं आणि स्नेहभावानं कधीच का राहता येणार नाही? मग जिवाचा स्थायिभाव तरी काय आहे? प्रेम की क्रौर्य? क्रौर्यच जर असेल तर माणसाचा तरी त्यात काय दोष आहे? निसर्गानंच माणसाला क्रूरपणाची जाणीव दिली असं होईल! अश्वत्थामा नेहमी म्हणे, देहात आत्मा आहे. मग क्रौर्य, द्वेष, असूया, सूड हे सगळे त्या अंतर्गत आत्म्याचे आविष्कार आहेत काय? तसं असेल तर त्याबद्दल संबंधित माणसाला जग दोष का देतं? की हे सगळे मनाचे भाव आहेत? तसं असेल तर प्रेम, त्याग, संयम हेच तेवढे नेमके आत्म्याचे आविष्कार कसे?

मन!

किती महान रहस्यं लपलेली असतात फक्त या दोन अक्षरी शब्दात! खरंच काय आहे! काय आहे, हे मन म्हणजे? जगातील प्रत्येक माणूस म्हणजे मनोभावनांच्या असंख्य दोरखंडांशी जखडलेला एक हत्तीच नसतो काय? जिथल्या तिथं एकसारखा हलणारा! अस्वस्थ! तरीही स्वत:ला स्वतंत्र आणि सामर्थ्यवान समजणारा! आणि ज्याला 'मन, मन' म्हणतात ते म्हणजे तरी दुसरं-तिसरं काय आहे? तो एक खेकडाच नसतो काय? किती असंख्य भावनांच्या नांग्या असतात त्याला! वळवळणाऱ्या, आपली तीक्ष्ण टोकं आसपासच्या वाळूत रुतविणाऱ्या! तरीही एकमेकींना आधार देत-देत मधल्या देहाचं ओझं तसंच पुढं-पुढं ओढणाऱ्या! माणसाच्या भावभावना अशाच नाहीत

काय? प्रेम, द्वेष, त्याग, लोभ, स्नेह, तिरस्कार, ममता, क्रोध सगळ्या-सगळ्या त्या मनाच्या नांग्या! स्वत:च्या क्षेत्रात हव्या तशा वळवळणाऱ्या! तरीही देहाला पुढं-पुढं सावरीत नेऊ पाहणाऱ्या! कुठं? ते मात्र कुणालाच सांगता येत नाही! आत्म्याचं आश्चर्यकारक तत्त्वज्ञान सांगणाऱ्या अश्वत्थाम्यालासुद्धा!

मी त्या मामा-भाच्यांचा संवाद केवळ ऐकत एकटक माझ्या पायांकडे पाहत राही. दुर्योधनाच्या डोळ्यांतून माझं मौन सुटत नसे. तो माझ्याजवळ येऊन माझ्या खांद्यावर हात ठेवून म्हणे, ''कर्णा, अप्रसन्न झालास की काय? तू आपल्या पायांकडे पाहायला लागलास की, ओळखावंच की, तू निश्चितच असंतुष्ट आहेस! कसल्यातरी गूढ विचारात आहेस! बाकी तुझ्या पायांकडे पाहिलं की, मला पुरोचनानं सांगितलेली एक मजेदार वार्ता प्रकर्षानं आठवते.''

''कोणती?'' मी आश्चर्यानं विचारलं.

''माझ्यासाठी माझा साहाय्यक पुरोचन नेहमी पांडवांत मिसळून वागतो. त्यांची सगळी माहिती तो मला नेहमी पुरवितो. त्यानंच मला एकदा असं सांगितलं की, तो युधिष्ठिर म्हणे आपल्या बंधूंना नेहमी सांगतो की, 'कर्णाचे पाय आपल्या राजमाता कुंतीच्या पायांसारखे आहेत!'''

''काय म्हणतोस राजा?'' मी चमकून त्याच्याकडे पाहिलं आणि बारकाईनं माझे पाय पुन्हा न्याहाळू लागलो. ते पुढं थोडंसे निमुळते होत गेले होते, हे पाहून मलाही आश्चर्य वाटलं. खरोखरच ते राजमातेसारखे होते काय? असतीलही! जगात एकासारखं दुसरं काहीतरी, कुठंतरी असू शकणार नाही काय?

''हे बघ कर्णा, हा त्या धूर्त युधिष्ठिराचा डाव आहे. आज तो तुझे पाय आपल्या मातेच्या पायांसारखे आहेत, असं म्हणतो. उद्या तो तुझं राजमाता कुंतीशी काही नातं आहे, असंही म्हणू लागेल. उद्या तो तुला पांडवांचा भाऊही म्हणू लागेल, काय भरवसा सांगावा?''

''राजा, तू या कर्णाला काय दूधखुळा समजतोस? माझी 'राधामाई' ही एकटीच माझी माता आहे आणि ती मला माझ्या प्राणापेक्षाही प्रिय आहे. कर्ण हा तीन गोष्टींसाठी आपले प्राणही अर्पण करील. पहिली गोष्ट म्हणजे माझी माता राधा, दुसरी सूर्यदेवांची आराधना आणि तिसरी गोष्ट म्हणजे माझं वचन!'' मी दुर्योधनाला ताडकन उत्तर दिलं.

माणसानं कसंही असावं; पण त्यानं आपले मानबिंदू केव्हाही जपावेत. माता, वचन आणि धर्म हे माणसाचे तीन सर्वश्रेष्ठ मानबिंदू आहेत. प्राणाच्या मोलानंही प्रसंगी जपावेत असे!

**

# दहा

ह्या सगळ्या गोष्टी मी अश्वत्थाम्याच्या लोभस सहवासात शिकलो होतो. त्याचा प्रत्येक शब्द अमृतात न्हाऊन निघाल्यासारखा असे. त्याच्या पित्यानं फक्त शस्त्रास्त्रं आणि काही कठोर सामाजिक नीतिनियम तेवढे पाहिले! त्यापेक्षा अधिक काहीच पाहिलेलं नव्हतं, पण अश्वत्थामा म्हणजे मला एक अष्टपैलू हिरा वाटे. जीवनाच्या यात्रेतला तो मला सर्वांत अभ्यासू आणि चोखंदळ तरीही नम्र यात्रेकरू वाटे. तो शूर योद्धा होता, प्रेमळ मित्र होता, आज्ञाधारक पुत्र होता, निसर्गाचा रसिक भोक्ता होता. किती बारकाईनं त्यानं आजूबाजूच्या बारीकसारीक गोष्टींची जीवनाशी डोळस सांगड घातली होती! त्याच्या मौनामुळे कित्येक जण त्याला कोंदटलेल्या क्षितिजाचा म्हणत! पण मला ते पटत नसे! छे! अश्वत्थामा कोंदटलेल्या क्षितिजाचा असेल कसा? वास्तविक पाहता त्याला क्षितिजच नव्हतं! चोहोबाजूंचं अफाट क्षितिजच त्याच्या विविधढंगी व्यक्तिमत्त्वात सहजपणे सामावलं नव्हतं काय? कारण मी त्याला अतिशय जवळून पाहिला होता. माझ्याशी तो अनेकदा घटकान्‌घटका बोलला होता. गुरू द्रोणांनी त्याला विकासाची पुरेशी संधीच कधी दिली नाही, असं काही जण सांगत. त्यांच्या विशाल व्यक्तिमत्त्वाच्या वटवृक्षाखाली तो भूछत्रासारखा वाढला, असं म्हणत. किती अन्यायकारक अन् एकांगी विचार आहेत हे! अश्वत्थामा हा खऱ्या अर्थानं या राजनगरात कुणालाच समजलेला नव्हता. मला तरी त्याचं सर्वांहून अतिशय वेगळं असं स्वतंत्र व्यक्तिमत्त्व स्पष्ट दिसत होतं. या हस्तिनापुरात त्याच्यासारखं स्वत:चं असं स्वतंत्र वेगळं व्यक्तिमत्त्व असलेला मला दुसरा कुणीच दिसत नव्हता. कधी-कधी तर तो मला गुरू द्रोणांपेक्षाही श्रेष्ठ वाटे! हिमालयाच्या धवल शिखरासारखा उंच! गंगेच्या पात्रासारखा विशाल!

असाच मी एकदा पहाटे गंगेवर जायला निघालो. अंगावर शुभ्र उत्तरीय टाकून लगबगीनं चाललेला हसतमुख अश्वत्थामा मला मार्गात भेटला. नुकत्याच उमललेल्या शुभ्र कमळासारखी त्याची चर्या प्रसन्न आणि टवटवीत होती. त्याच्या हातात औदुंबराच्या समिधा होत्या. बहुधा सकाळचं हवन करण्यासाठी तो लगबगीनं युद्धशालेकडे चालला असावा. त्याला पाहताच मी रथ थांबविला. राजा झाल्यापासून मी रथातूनच गंगेवर जात होतो. इतर वेळी माझ्या रथाचं सारथ्य शोण करी, पण गंगेवर मात्र मी एकटाच जाई. घोडे आवरीत मी अश्वत्थाम्याला म्हणालो, ''अलभ्य लाभ! गुरुपुत्रा, तुझ्या दर्शनानं माझा आजचा सगळा दिवसच आनंदात जाणार! कदाचित न भेटणाऱ्या कोणा दुर्मीळ अतिथीची आज भेटही होईल.''

तो सहज हसत-हसत म्हणाला, ''एवढं माझं दर्शन तुला शुभदायक आहे काय? मग रोजच तुझ्या या गंगेकडे जायच्या मार्गावर मी येऊन बसत जाऊ काय?''

''ते तुला शक्य नाही, हे मला माहीत आहे, पण तुझं दर्शन शुभदायक आहे हे मात्र निश्चितच! चल येतोस काय गंगेवर?'' मी त्याला प्रश्न केला.

''नको कर्णा, आता हवनाची वेळ होत आली आहे. मला गेलंच पाहिजे. निदान या

समिधा तरी वेळेवर पोहोचविल्या पाहिजेत.'' हातातील समिधांची छोटी मोळी वर करीत तो म्हणाला.

''एवढंच ना, मग तुझ्या समिधा युद्धशालेत पोहोचत्या करून मगच आपण गंगेवर जाऊ. चल वर; रथात ये.'' मी त्याला आग्रह केला. माझं मन त्याला मोडवेना. तो रथात चढला. आम्ही युद्धशालेकडे जाऊ लागलो. पक्षी नुकतेच किलबिलत होते. रथाच्या चक्राबरोबर माझ्या मनात स्मृतींची अनेक आवर्तं फिरत होती. माझा स्वत:चा तर अनुभव आहे की, गती आणि स्मृती यांचं काहीतरी गूढ नात असावं! नाहीतर गतिमान वाहनात स्मृतींची एवढी गर्दी का व्हावी? मला अधिरथबाबांची आठवण झाली. म्हणून मी अश्वत्थाम्याला विचारलं, ''गुरुपुत्रा, पिता-पुत्रांच्या नात्यासंबंधात तुझं मत काय आहे? स्पष्ट सांग.''

तो सहज म्हणाला, ''सूर्याचं प्रतिबिंब नदीच्या डोहात पडतं. पित्याचं तसंच आपल्या पुत्रात पडलेलं असतं! जीवन हे असीम आहे. पुत्राच्या रूपानं पिताच जणू पुन्हा जन्माला येत असतो. जन्मदानाचा हा अखंड यज्ञ विश्वाच्या निर्मितीपासून असाच अतूट चालू आहे.''

''अस्सं! तुझा स्वत:चा काय अनुभव आहे?''

''माझा? आहे कर्णा, एक अतिशय जिवंत अनुभव आहे! पण मी तो कुणालाच सांगितलेला नाही. त्या योग्यतेचं कुणीही मला आजपर्यंत भेटलं नाही. तुला मात्र तो आज मी सांगणार आहे.''

''तसं असेल तर मग सांग तरी, तुझा तो जिवंत अनुभव!''

काहीतरी महत्त्वाचं आणि गुप्त सांगावं, अशा आवाजात तो म्हणाला, ''माझ्या वडिलांनी कौरव-पांडवांना सारी युद्धविद्या शिकविली हे तुला माहीतच आहे; पण त्यांनी ती त्यांच्या हाती पूर्णार्थानं जाणार नाही, याची दक्षता घेऊन ठेवली आहे. धनुर्धर म्हणून विख्यात असलेल्या अर्जुनालाही त्यांनी काही दिवस अज्ञानात ठेवलं. कसं ते ऐक; अर्जुनाला लहान गळ्याचं एक जलपात्र देऊन माझे वडील दररोज त्याला पाणी आणायला गंगेवर पाठवीत. सर्वांना ते काम करावं लागे! मला मात्र ते मोठ्या गळ्याचं जलपात्र देत. त्यामुळे मी भर्रकन सर्वांच्या आधी पाणी घेऊन युद्धशालेकडे परते. पांडव आणि कौरव येण्यापूर्वीच बाबा मला महान असं नारायणास्त्र शिकवीत!''

''म्हणजे तुला नारायणास्त्र माहीत आहे तर?''

''होय! अर्जुनालाही नंतर ते माहीत झालं. बाबांची ती युक्ती ओळखून त्यानं त्यांच्याकडून हट्टानं ते नारायणास्त्र मागून घेतलं. आम्हा दोघांशिवाय इतर कुणालाच ते माहीत नाही.''

''यावरून तू पिता-पुत्रांच्या नात्यासंबंधी काय निष्कर्ष काढलास अश्वत्थामन्?'' शेवटी मी माझ्या मूळ प्रश्नाची आठवण करून दिली.

''हाच, की पिता पुत्रासाठी काहीही करू शकतो! प्रसंग पडल्यास असत्यही बोलू, वागू शकतो! पण जरी आम्हा दोघांना नारायणास्त्र मिळालं तरी धनुर्विद्येतलं तुझं कौशल्य काही आमच्या ठायी आलेलं नाही. खरंच कर्णा, तुला कुणी शिकवलं हे?'' त्यानं मलाच उलटा प्रश्न विचारला.

''अर्थातच माझ्या पित्यानं! अश्वत्थामा, मी एक सूतपुत्र! मला दुसरं कोण, कसं शिकवणार? पिता पुत्रासाठी काहीही करू शकतो ना? तेव्हा अधिरथबाबांनीच मला हे

शिकवलं असं समज.''

''धन्य आहे तुझा पिता, कर्णा!'' तो माझ्या खांद्यावर हात ठेवीत म्हणाला.

एवढ्यात पूर्व दिशा उजळून निघाली. सूर्यदेव अंधाराचा पट फाडून वर आले. आम्ही हां-हां म्हणत युद्धशालेजवळ आलो. एका ऋषिकुमाराजवळ अश्वत्थाम्यानं हातातील समिधा दिल्या. आम्ही दोघंही परत गंगेकडे चाललो. बऱ्याच दिवसांनंतर आजच मी असा अश्वत्थाम्याला बरोबर घेऊन गंगेकडे चाललो होतो! नेहमी मी एकटाच जात असे. आज आम्ही दोघं होतो. माझ्या मस्तकात नारायणास्त्र घुमत होतं! थोड्या वेळातच आम्ही गंगेवर आलो. मला आन्हिकाला थोडासा वेळ झाला होता. रोज मी सूर्योदयापूर्वी कटिभर पाण्यात उभा असे. आज सूर्योदय झाला, तरीही पाण्याबाहेरच होतो! मी घाईघाईनं रथातून उडी मारली. अश्वत्थामाही खाली उतरला. सकाळची हसरी सोनेरी किरणं सगळीकडे स्वैरपणे पसरली होती. सूर्यकिरणं पाहिली की, मला त्यांना वस्तुमात्राचा आकार नाही, याचा नेहमीच मनस्वी खेद होतो. त्यांना आकार असता, तर मी ती हवी तेवढी कवेत घेतली असती! त्यांना सुगंध असता, तर मी तो मनसोक्त वक्षभर हुंगला असता! ती किरणं मानवाच्या भाषेत बोलू शकली असती, तर घटकान्‌घटका मी त्यांच्याशी भानरहित होऊन गप्पा मारल्या असत्या! आणि तरीही सदैव अतृप्तच राहिलो असतो! हे असं मला का वाटतं ते मात्र मला सांगता येत नव्हतं. वाटत होतं, हे निश्चित!

''कर्णा, मी मघा म्हणालो की, जीवन हे असीम आहे. या गंगेच्या काठावर आल्यावर मला ते प्रकर्षानं जाणवतं आहे.'' अश्वत्थामा खाली उतरताच मला म्हणाला.

''ते कसं?'' त्याच्या सोनेरी किरणांनी उजळलेल्या मुखाकडे पाहत मी त्याला विचारलं. पाण्यावरून परावर्तित झालेले काही थरथरणारे किरण त्याच्या गोल मुखावर पडले होते. त्यामुळे अगोदरच तेजस्वी असलेले त्याचे काळेशार डोळे एका विलक्षण तेजानं चमकत होते.

''ते पाहा पैलतीरावरच्या हिरव्या तृणपात्यांवर किती असंख्य दवबिंदू चमकताहेत ते!'' पैलतीराकडे बोट दाखवीत तो सहज म्हणाला.

''होय!'' मी म्हणालो. ''काल रात्री इथं उमाशंकर आले असावेत! त्यांच्या पाठशिवणीच्या खेळात उमेच्या गळ्यातील मोत्यांची माला तुटली असावी! खेळ संपल्यानंतर केव्हातरी उमेच्या लक्षात आलं असावं. 'तुमचा हा असाच धसमुसळेपणा' अशी लाडिक कुरकुरही तिनं शंकराजवळ केली असेल! पण तेवढ्यात पहाट झाली असेल. गडबडीत हाती लागतील तेवढे मोती कसेतरी गोळा करून तिनं उजाडण्यापूर्वीच आपल्या पतीचा हात धरून कैलासाकडे पलायन केलं असेल. राहिलेले ते मोतीच आता चकाकत आहेत. हे दवबिंदू उमाशंकराचं गोड रहस्य सकाळच्या सोनेरी किरणांना हसत-हसत खुलवून सांगताहेत!'' मी माझ्या कल्पनेवर स्वत:च आनंदित होत त्याच्याकडे पाहिलं.

''नाही कर्णा, चुकतोस तू. उमाशंकर कैलास सोडून इथं कशाला येतील? आणि त्या भणंग पतीबरोबर संसार करणाऱ्या त्या गरीब उमेजवळ – लंकेच्या पार्वतीजवळ – मोत्यांची माला तरी कुठली असणार?'' तो त्या चकाकणाऱ्या दवबिंदूकडे एकटक पाहत शांतपणे म्हणाला.

''मग तू तरी सांग ते दवबिंदू म्हणजे काय ते?''

''कर्णा, हे दवबिंदू म्हणजे माणसाच्या जीवनाचं एक उत्कृष्ट प्रतीकच आहे! अरे दवबिंदूच का, निसर्गातली प्रत्येक वस्तू माणसाला काहीतरी धडा देण्यासाठीच विधात्यानं निर्माण केली आहे! पण मानवाचे डोळे उघडे मात्र हवेत. मन स्वच्छ हवं, तरच त्याला जग ही विधात्याची भव्य आणि अखंड पाठशाला आहे, हे कळेल आणि तो जगाच्या निर्मितीचं खरंखुरं रहस्य जाणून घेण्यासाठी तळमळणारा एक जिज्ञासू शिष्य होईल.''

''अश्वत्थामा, पूर्वी तू कधीतरी माणसाचं जीवन श्रीफलासारखं असतं, असं म्हणाला होतास ते अजूनही माझ्या लक्षात आहे. आता तू म्हणतोस की, हे दवबिंदूही मानवी जीवनाचं प्रतीक आहेत! कसं ते जरा स्पष्ट करशील काय?''

''हे बघ कर्णा, हे दवबिंदू कुठून येतात आणि कुठं जातात हे कुणालातरी माहीत आहे काय? माणसाचंही तसंच आहे. तो कुठून येतो आणि कुठं जातो हे कुणालाही सांगता येत नाही. पुढं ऐक हं, कसं आहे ते -

''हे दवबिंदू कुणाचातरी प्रकाश घेऊन चमकतात. इतके की, वाटावं जणूकाही प्रत्येक दवबिंदू हा एक छोटा आणि स्वतंत्र सूर्य आहे! हे चमचम करणारे दवबिंदू वायूच्या झुळकीसरशी मंद-मंद झोके घेतात. आपल्याजवळ असलेली प्रकाशकिरणं आपल्यापासून बाहेर फेकतात. त्यांच्याकडे पाहणाऱ्यांना आल्हाद देतात, परंतु जरा का वारा जोरात आला की, हे प्रसन्न, हसरे दवबिंदू खालच्या मातीत असंख्य जलबिंदू होऊन विरून जातात – का कू न करता – न आक्रोश करता!''

''माणसांचंही अगदी असंच आहे. एकाच परमात्म्याची असंख्य रूपं घेऊन मानव म्हणून वावरणारे हे जीव – अरे, यातले काही जीव तर एवढे दिव्य असतात की, साक्षात परमात्माच वाटावेत! हे सारे आपलं जीवन जगत असतात. पुरुषार्थाच्या किरणांनी जग उजळतात. सौख्याच्या क्षणी आनंदानं डोलतात आणि मृत्यूची चाहूल आली की, निमूटपणे त्याच्या स्वाधीन होतात. पिढ्यान्‌पिढ्या हे चाललंय! आदल्या दिवशी विरून गेले तरी दुसऱ्या दिवशी सकाळी तृणपर्णावर जसे दवबिंदू पुन्हा तयार! तसेच पिढ्यान्‌पिढ्या मृत्यू पावलेले मानव नवपिढीच्या रूपानं पुन्हा तयारच!! जीवन असीम आहे! असं मी नेहमी का म्हणतो, हे तुला आता कळेल -''

''खरं आहे तुझं अश्वत्थामा, पण काही-काही लोकांकडे पाहिलं की, त्यांचं जीवन तू म्हणतोस त्याप्रमाणं दवबिंदूसारखं असेलसं वाटत नाही. ते कधीही सौख्याच्या हिंदोळ्यावर झुललेले नसतात! त्यांनी कधीच कोणते पराक्रम केलेले नसतात! जिवंतपणीच ते मृत झालेले असतात! त्यांना तू तुझ्या या कल्पनेत कुठं बसविणार? जीवनाला दवबिंदूची उपमा देऊन तू तुझी सौंदर्यदृष्टी व्यक्त केलीस, पण जीवन इतकं सहजसदृश्य नाही, सोपं नाही.''

''नाही कर्णा, तू म्हणतास ते लोकसुद्धा दवबिंदूसारखेच असतात! केवळ हे दवबिंदू तृणपात्याच्या उलटच्या बाजूला चिकटलेले असतात! त्यांच्यापर्यंत सूर्याचे दिव्य किरण पोहोचतच नाहीत! त्यांना प्रकाश मिळालेला नसतो. अज्ञानाच्या महान अंधकारात गाडलेले असतात ते दवबिंदू! आणि जगात अज्ञानाइतका मृत्यूही क्रूर नसतो!''

''मग त्या दवबिंदूंना प्रकाश केव्हा मिळायचा? केव्हा उजळायची अशा लोकांची जीवनं? कधी उभारायचे त्यांनी पराक्रमांचे उत्तुंग पर्वत?''

''मृत्यूच्या दारात! जे अज्ञानात चाचपडतात त्यांना मृत्यूशिवाय दुसरा नैसर्गिक

नि:पक्षपाती, सत्यप्रिय गुरूच नाही! मुक्तीचा अन्य कुठलाही मार्ग नाही.''

''मग त्यांनी लवकर आत्महत्या करावी, असंच तुझं सरळ-सरळ मत असेल?''

''मुळीच नाही! जे जीवन मिळविण्याचा अधिकार नाही ते गमावण्याचाही अधिकार कुणाला नाही. आत्महत्या म्हणजे भावविवश मनाचा आत्म्यावर सरळ बलात्कार!''

''मग अशा लोकांनी करावं तरी काय? केवळ मरेपर्यंत जगावं की, मरण जगत असताना जीवन जगत असल्याचं खोटं-खोटं ढोंग करावं?''

''नाही! अशांनी सहनशील धरतीकडे पाहावं. तिच्यासारखी असंख्य आघात सहन करण्याची स्वत:ची शक्ती वाढवावी. शारीरिक, सांपत्तिक व लौकिक नव्हे; तर आत्मिक! आणि मगच योग्य वेळी अनंतात विलीन होऊन जावं. आत्म्याच्या संक्रमणाचे अनुभव समृद्ध करून जावं, कारण कुणीही कधीच विसरू नये की, काळ हा अखंड आहे. जीवन ही भीक मागून मिळणारी वस्तू नव्हे. जीवन म्हणजे पूर्णत्वासाठी अनंताकडून अनंताकडे चालू असणारा अखंड प्रवास आहे!''

मी त्याच्याकडे भारावून एकटक पाहू लागले. त्याच्या डोळ्यांतून ज्ञानाचं तेज जणू ओसंडत होतं. तरीही तो शांत वाटत होता.

मला पाण्यात उतरायला वेळ झाला आहे, हेही माझ्या ध्यानात राहिलं नाही. त्याच्या खांद्यावर हात ठेवून हळुवार आवाजात मी त्याला म्हणालो, ''मित्रा, माझं मन कधी-कधी अतंर्गत परस्परविरोधी विचारांनी गोंधळून जातं. कुठल्याही एका वैचारिक पार्श्वभूमीवर मी कधीच स्थिर होऊ शकत नाही! मी कोण आहे, हे माझं मलाच नीट समजत नाही! माझ्या अंतरंगात हे परस्परविरोधी विचित्र असे संघर्ष का? ही दुही का? हे द्वैत अद्वैत कधी होणार? आतबाहेर अखंड एकच असा कर्ण मी कधी होणार? एक कर्ण! सर्वांना हवाहवासा वाटणारा कर्ण! स्वत:च्या तेजानं चमकणारा कर्ण! स्वत:ला आपण कोण आहोत, हे खऱ्या अर्थानं पूर्ण जाणून घेतलेला कर्ण!''

माझ्याकडे अतिशय स्नेहाळ दृष्टीनं पाहत, मला मध्येच थांबवीत तो म्हणाला, ''कर्णा, ज्याअर्थी तुझ्या कानात जन्मजात कुंडलं आहेत, त्या अर्थी अतितेजस्वी आणि अतिप्राचीन अशी तुझी परंपरा असली पाहिजे. तरीही परंपरेचे केवळ शुष्क गोडवे गात बसू नकोस. तू लक्षात घे, तो केवळ वर्तमानकाळ! त्यातूनच निर्माण होणारा भविष्यकाल हाती लागणार नाही, असा न्यूनगंड निर्माण होऊ देऊ नकोस. त्या भीतीनं हातातील वर्तमानकाल तर कधीच पायदळी तुडवू नकोस. ज्याला जीवन हे असीम आहे, हे एकदा पटलं तो कधीच असंतुष्ट होणार नाही. स्वत:वरचा विश्वास कधीच तिळमात्रही उडू देणार नाही. मूर्ख आणि प्रवाहपतित लोकांचं अनुकरण कधीच तो करणार नाही. तो हलक्या-फुलक्या करमणुकीत रमणार नाही आणि रमलाच तर मग तो कितीही बलाढ्य असो, त्याची परंपरा कितीही थोर आणि श्रेष्ठ असो तो धुळीत मिळाल्याशिवाय राहणार नाही! त्याच्या त्या तथाकथित श्रेष्ठ परंपरेचा अवशेषसुद्धा बाकी राहणार नाही! जगातले सर्व लोक त्याच्याकडे मूढ, आत्मवंचित आणि प्रवाहपतित म्हणूनच पाहतील! त्याची कथा कोणीही कधीही लिहिणार नाही. लिहिली तरी ती कुणी वाचणार नाही! तेव्हा कर्णा, पुन:पुन्हा मी सांगतो आहे की, अशा अंतर्गत संघर्षात तू अजूनही असशील, तर तत्काळ स्वत:ला सावर! स्वत: कोण आहेस, ते आत्मपरीक्षणानं नीट एकदा पारखून घे! माझी खात्री आहे, तूच एकटा जगाला दिव्यत्वाचा मार्ग दाखवशील! तुझं

अंतर्गत द्वैत मिटलं, तर जग एक दिवस अक्षरश: तुझ्या पायांवर लोळण घेईल; इतका तू महान आहेस!” त्याचे डोळे अतिशय शांत नि निश्चल होते. कसलंतरी अबोध आणि अपूर्व तेज त्याच्या गौरवर्णी गोलाकार चर्येवर फाकून नुसतं ओसंडत होतं. त्याच्या वाणीत काहीतरी गूढ आणि समर्थ सत्य ठासून भरलं आहे, असं मला वाटू लागलं.

त्याच्या निरपेक्ष आणि स्पष्ट सल्ल्यानं माझा त्याच्याबद्दलचा आदर दुणावला. जगात तोंडासमोर स्तुती करणारे अनेक लोक असतात, दोष दाखविणारे थोडंच! मार्गदर्शन करणारे तर क्वचितच! त्याचे काही शब्द माझ्या कानात एकसारखे घुमू लागले, ‘तुझी परंपरा तेजस्वी आहे! वर्तमानकाल लक्षात घे... भविष्यकालाबाबत न्यूनगंड नको... जगाला दिव्य संदेश!’

मी त्याचा हात हातात घेऊन म्हणालो, “अश्वत्थामा, कुणालाही आजवर सांगितलं नाही ते आज केवळ तुला सांगतो आहे. माझा गुरू दुसरा-तिसरा कोणीच नाही. मी धनुर्विद्येसाठी साक्षात सूर्यदेवांना गुरू केलं आहे! त्यांच्याकडून मला नेहमीच दिव्य संदेश येतात. मला स्वत:ला ते पूर्णपणे समजतात, पण अडचण हीच आहे की, कुठल्याही भाषेत ते मला कधीच सांगता येत नाहीत. जेव्हा-जेव्हा एखादं अतर्क्य कृत्य माझ्याकडून घडतं तेव्हा-तेव्हा ते माझ्या गुरूंच्या आदेशामुळेच घडतं.” मी आकाशाकडे बोट दाखवीत म्हणालो.

आम्ही दोघांनी त्या तेजोनिधीला नमस्कार केला. माझ्या कानात अश्वत्थाम्याचे काही चुकार शब्द मात्र रेंगाळत होते. ‘काळ अखंड आहे! जीवन असीम आहे!...!’

यापूर्वी अनेक वेळा ओठावर आलेला एक प्रश्न त्याला मी विचारू शकलो नव्हतो तो प्रश्न निश्चय करून आज विचारायचाच, असं मी ठरवलं. तो नेहमी आपल्या शिरावर एक वस्त्राची धवलपट्टी लपेटून तिची निरगाठ हनुवटीखाली बांधत असे! त्याच्या शिरावर जखम तर नसावी ना? अशी शंका मला वारंवार आली होती. शेवटी अर्घ्यदान करून परतताना मी त्याला विचारलंच, “अश्वत्थामन्, तू नेहमी आपलं शिर आच्छादून का घेतोस? सूर्यकिरणांचा त्रास होतो म्हणून की काय?”

“नाही! मुळीच नाही. उलट गंगेचं पात्र आणि सूर्यकिरण यांचं मला मनस्वी आकर्षण आहे, पण मी शिरावर वस्त्राचं आच्छादन का घेतो, हे तुला आज सांगत नाही. योग्य काली मात्र तुलाच आणि निश्चयानं ते सांगेन!”

**

# अकरा

नदीकिनाऱ्यावरून मी राजवाड्यात आलो. अश्वत्थामा युद्धशालेकडे निघून गेला. वाड्यावर येताच मला एक महत्त्वाची वार्ता ऐकायला मिळाली. मथुरेच्या यादव राजाचा – कंसाचा – त्याचा भाचा श्रीकृष्ण यानं वध केला होता. कंस हा अतिशय अन्यायी होता. त्यानं श्रीकृष्णाच्या सात कोवळ्या भावंडांना शिळेवर आपटून ठार मारलं होतं. खरोखरच स्वार्थी माणूस हा नुकत्याच व्यालेल्या वाघिणीसारखा असतो! ती वाघीण पोटात भुकेची आग पडल्यामुळे आपलीच नुकती जन्मलेली कोवळी पिल्लं खाऊन आपली भूक भागविते. स्वार्थी माणूस असाच असतो. आपल्या स्वार्थापुढं इतरांना बळी देताना तो आपपर भाव कधी ठेवत नाही. कंसही असाच स्वार्थी होता. त्यानं केलेल्या अन्यायाची सविस्तर वर्णनं रोज राजवाड्यावर दूतांकरवी आम्हाला ऐकायला मिळत होती. त्यानं आपल्या कोवळ्या भाच्यांची नवनीतासारखी लुसलुशीत शिरं शिळेवर आपटून फोडून टाकली होती. त्याची राक्षसी वृत्ती इतक्या पराकोटीला पोहोचली होती की, त्याच्या अन्यायी आणि उन्मत्त वागणुकीला सगळ्या मथुरेतील नगरजन कंटाळले होते. शेवटी श्रीकृष्णानं कंसाचा वध केला. आपल्या मामाला त्यानं छातीत बुक्क्या घालून ठार केलं! अन्यायाचा शेवट नेहमी असाच होत असतो! कीर्तिमान, सुषेण, भद्रसेन, ऋजू, संमर्दन आणि भद्र या आपल्या सख्ख्या बंधूंच्या वधाचा श्रीकृष्णानं शेवटी न्यायनिष्ठुर प्रतिशोध घेतला!

श्रीकृष्णाबद्दल मी अनेकांकडून अनेक परींनं ऐकलं आहे. कुणी त्याला कुचेष्टेने गवळ्याचा पोर म्हणतात. कुणी त्याला राधा गवळणीचा सखा म्हणतात, कुणी त्याला सुदामा नावाच्या गरीब ब्राह्मणाचा जिवलग मित्र म्हणतात, तर कुणीकुणी त्याला केवळ मुरलीवाला म्हणतात! मी त्याला तसं अजून एकदाही प्रत्यक्ष पाहिलं नाही. त्याला पाहण्याची अनिवार इच्छा मात्र आहे. पांडव त्याचे आतेबंधू असल्यामुळे तो त्यांना भेटायला कधीतरी हस्तिनापुरात येईलच! त्याची भेट झाल्यानंतर आणि त्याच्याशी चार शब्द बोलल्यावरच त्याच्याबद्दलचं खरं मत तयार करता येईल. अनेकांच्या दृष्टीनं तो वेगवेगळ्या स्वरूपांत दिसला असला, तरी मला मात्र तो यादवांचा एक सामर्थ्यशाली आदर्श राजा वाटत आहे. अन्यायाची चीड असणारा, समाजाला त्यापासून बंधमुक्त करणारा, सर्वसामान्य श्रमिक जनांत चटकन मिसळणारा. मिसळणारा. आपल्या अत्याचारी मामाचा सरळ-सरळ वध करूनही त्याच्या राज्याचा लोभ न धरता त्याच्याच पित्याला – उग्रसेनाला राजसिंहासनावर बसविणारा!

अशा त्यागी वीराविषयी प्रजेलाही आपुलकी असणार! कारण उग्रसेन राजा असला, तरी लौकिक अर्थानं मथुरेला ग्रासलेल्या प्रजेनं आपल्या राज्याचा राजदंड खरोखर श्रीकृष्णाच्याच हाती दिला आहे! मथुरेचं साधं पानही श्रीकृष्णाच्या संकेताशिवाय हलू शकत नाही.

**

# बारा

श्रीकृष्णाच्या विजयाच्या वार्तेमुळे हस्तिनापुरात उत्साह पसरला. सगळे नगरजन चौकाचौकांत एकत्र जमून श्रीकृष्णाच्या अद्भुत पराक्रमाच्या अनेक कथा एकमेकांना चवीनं सांगू लागले. काही जणांनी गुढ्या-तोरणं उभारली.

राजवाड्यावर अमात्य वृषवर्मांनी, महाराज धृतराष्ट्रांनी तत्कालिक राजसभा बोलावल्याची आमंत्रणं सर्व मानकऱ्यांना दिली. मी अंगराज झाल्यापासूनची ही पहिलीच राजसभा होती. सभेत यादवराज श्रीकृष्णाला उपहार पाठवून त्याचे कुरुवंशाशी राजमाता कुंतीदेवींमुळे असलेले संबंध घनिष्ठ करण्याचा निर्णय सर्वानुमते घ्यायचा होता. सगळ्यांच्या शुभेच्छा त्या प्रसंगी व्यक्त करायच्या होत्या. मथुरा हे यादवांचं एक सामर्थ्यसंपन्न राज्य असून हस्तिनापुराला ते सर्वांत नजीकचं राज्य होतं. अशा एका बलशाली नातेवाइकाच्या राज्याशी आपल्या राज्याचे संबंध कुरूंना जिव्हाळ्याचे करायचे होते. राजकीयदृष्टचा मित्र जोडणं हे दूरदृष्टीपणाचं ठरत असतं.

राजवाड्यावरचे नगारे वाजू लागले. कुरूंचा ठेवणीतला तलम वस्त्राचा भगवा राजध्वज बाहेर काढण्यात आला. तो त्रिकोणी केशरी भगवा ध्वज पांढऱ्याशुभ्र राजवाड्याच्या माथ्यावर डौलानं फडफडू लागला. त्याची चपळ फडफड जणू हस्तिनापुराच्या राजवाड्यावरून वायुगतीनं सुसाट धावत जाऊन मथुरेतल्या यादवांना सांगणार होती, 'तुमच्या नव्या राजाचं स्वागत असो!'

सभागृहाचं दालन आमंत्रितांनी आणि मानकऱ्यांनी हां-हां म्हणता भरून गेलं. सभागृहाच्या मध्यभागी पूर्वेकडे तोंड करून दीडपुरुष उंचीचं भव्य राजसिंहासन मत्त हत्तीसारखं उभं होतं. किती प्राचीन! त्या सिंहासनावर कोण बसणार? त्या सिंहासनावर बसणारा तो विक्रमी पहिला राजा कोण असेल? विवस्वान की त्याच्याही पूर्वीचा कोणी? कुणालाच त्या राजसिंहासनाचा सारा गतइतिहास नीट माहीत नव्हता. संपूर्ण सुवर्णानं मढविलेलं ते सिंहासन भूषविणारे बलदंड राजे काळाच्या उदरात गडप झाले होते, तरीपण त्या सिंहासनावर त्या प्रत्येकाच्या कर्तृत्वाचा सखोल अन् स्पष्ट ठसा होता. त्यांच्या उन्नत शौर्याची जिवंत साक्ष म्हणजेच ते सिंहासन होतं. त्याच्या हाताच्या बैठकीच्या जागी जबडे पसरलेल्या दोन सिंहाकृती होत्या. पाठीची बैठक चांगली पुरुषभर उंच होती. सर्व सिंहासनावर जास्वंदीच्या फुलातल्या केसरदंडासारखी वळणदार कोरीव नक्षी होती. ते सिंहासन म्हणजे कुरूंचा आणि त्यापूर्वी सोमवंशाचा मानबिंदू होता. असा मानबिंदू की, ज्याच्या प्रतिष्ठेच्या रक्षणासाठी सहस्त्रावधी शूर सैनिकांनी आर्यावर्ताच्या कानाकोपऱ्यांत आपल्या उष्ण रुधिराचे पाण्यासारखे पाट वाहवले होते. त्या राजसिंहासनापुढं आर्यावर्तातील सर्व राजे मान वाकवून जणू पराक्रमाची श्रद्धेनं आणि विनयानं पूजाच करीत होते. कितीतरी पराक्रमी राजांनी आपल्या दमदार, घोटीव शरीरानी ते सिंहासन भूषविलं होतं! विवस्वान, मनू, पुरुरवा, नहुष, ययाती, पुरू, अहंयाती, देवतिथी, अंत्यनार, इलील, दुष्यन्त, भरत, सुहोत्र, हस्ती, अजमीढ, संविरण, कुरू, अनश्वन, परिश्रवस् आणि विख्यात शंतनू! एकापेक्षा एक अधिक महान राजांची

तेजस्वी परंपरा होती. ते सगळे राजे म्हणजे तेजाचे दिव्य स्फुल्लिंग होते. महाराज नहुषांनी तर देवराज इंद्रालासुद्धा पराभूत करून सोमवंशाच्या त्या राजसिंहासनापुढं नाक घासायला लावलं होतं.

कुणीही त्या सिंहासनापुढं आला की, त्याची मान आदरानं आपोआप खाली लवत होती. सोमवंशातल्या पराक्रमी राजांचा, ते सिंहासन म्हणजे जिवंत शिलालेख – नव्हे सुवर्णलेखच होता!

सभागृह म्हणजे तर वैभवाचा नटलेला वसंत होता. आणि तो का असू नये? वैभव हे विक्रमाचा दास होऊन त्याच्यामागून चालत असतं. राजसिंहासनाच्या मागील बाजूस बरोबर पूर्वेकडे तोंड करून सोमवंशाचं मानचिन्ह असलेल्या चंद्रदेवांची, एका निळ्याशार रंगाच्या भित्तीवर थाळीच्या आकाराची शुद्ध सुवर्णाची ओतीव आकृती होती. त्या आकृतीच्या दाहीदिशांना किरणांसारखे दिसणारे, भित्तीच्या निळ्या रंगाच्या पार्श्वभूमीवर ठळक उठून दिसणारे चंदेरी पट्टे होते. जणू चंद्रदेवच त्या सिंहासनाच्या पाठिंब्यासाठी आकाशातून खाली येऊन त्या भित्तीवर स्थिर झाले आहेत, असा त्या चकाकणाऱ्या आकृतीकडे पाहिल्यानंतर आभास निर्माण होत होता. सिंहासन इतर सर्व बैठकींपेक्षा उच्च स्थानी होतं. त्याच्या दोहो बाजूंस महाराणी, राजगुरू, पितामह, सेनापती, पुरोहित आणि अमात्य यांची आसनं होती. राजसिंहासनासमोर दुहाती अनेक आसनं होती. त्यावर आसपासच्या देशांचे आमंत्रित राजे आणि हस्तिनापुरातील योद्धे बसत. सभागृहातील दगडी स्तंभ नक्षीदार असून त्यावर अनेक भावमुद्रा खोदल्या होत्या. पांढऱ्याशुभ्र दगडांच्या संगबंदीवर गांधार आणि कांबोज देशातल्या मऊ आणि तलम पायघड्या अंथरल्या होत्या. हवा खेळती राहावी यासाठी समोरासमोर भव्य गवाक्षं होती. राजस्त्रियांना बसण्यासाठी एक स्वतंत्र सौध केला होता. तो नेहमीच झिरझिरीत तलम वस्त्रांच्या पडद्यांनी आच्छादलेला असे. कितीही आत्माभिमानी माणूस असला तरी कुरूंच्या डोळे दिपविणाऱ्या त्या राजसभेच्या सभागृहात तेथील सिंहासनासमोर तो नतमस्तक होत असे.

ठरल्याप्रमाणं सभागृह भरून गेलं. अश्वपाल, कोशपाल, सेनापती वगैरे आपापल्या जागी स्थानापन्न झाले. मी, दुर्योधन आणि शोण एकदमच सभागृहात गेलो. तिथं दुर्योधनाचे सर्व बंधू बसले होते. युधिष्ठिरासमवेत पांडवही होते. राजगुरूंच्या आसनावर द्रोण बसले होते. त्यांच्या शेजारीच शकुनीमामा होते. सर्व राजपुत्रांमध्ये अश्वत्थामाही बसला होता. सर्वांच्या कुजबुजण्याच्या संमिश्र आवाजानं सगळं सभागृह भरून गेलं होतं. आम्ही तिघांनीही आपापली आसनं विराजमान घेतली. केवळ महाराज धृतराष्ट्र, राजमाता गांधारीदेवी, पितामह भीष्म आणि गुरुदेव विदुर यांची चारच आसनं रिती राहिली होती. कुठल्यातरी कोपऱ्यात जळणाऱ्या धूपाच्या धूम्रलहरी लाडिक वळणं घेत वातावरण प्रसन्न करीत होत्या. सभागृह आमंत्रितांनी भरून गेलं होतं. अश्वत्थामा मधून-मधून माझ्याकडे पाहत गालातल्या गालात मंद हसत होता. मला त्या सभागृहातील दोन वस्तू अधिक आकर्षक वाटल्या. एक अश्वत्थाम्याची नितळ टवटवीत चर्या आणि दुसरी म्हणजे कुरुवंशाचं मानचिन्ह असलेली ती चंद्रदेवांची तळपणारी चंदेरी प्रतिमा! मी त्या प्रतिमेकडे एकटक पाहू लागलो. उजव्या हाताचा कोपरा मी आसनाच्या बैठकीवर रुतविला होता. हनुवटी तळहातावर टेकवून ते लोभस दृश्य मी डोळाभर पाहू लागलो. क्षणभर मला वाटलं, आपण गंगेच्या काठावरच उभे

आहोत! आजूबाजूचे कुजबुजणारे मानकरी म्हणजे गंगेच्या लपलप करणाऱ्या केवळ लाटाच आहेत! मी भारावून त्या प्रतिमेकडे पाहू लागलो. एक मजेदार कल्पना सहज मनात आवर्त घेऊ लागली. या सोमवंशातला प्रत्येक विक्रमी राजा म्हणजे त्या अक्षय तळपणाऱ्या चंद्रदेवांचा जणू एक-एक वेगवान किरणच नव्हता काय? त्या सर्व राजांना मी त्या प्रतिमेत पाहण्याचा प्रयत्न करू लागलो. एक-एक पूर्वी कधीही न पाहिलेली तरीही परिचित वाटणारी मुद्रा मला त्या प्रतिमेत स्पष्ट दिसू लागली. त्या सर्वांची अंगकांती पिवळ्याजर्द सोनेरी रंगात चमकत होती. इतकं रम्य दिवास्वप्न मी कधीच पाहिलं नव्हतं. मी त्या रम्य स्वप्नदृश्यात दंग होऊन गेलो. इतक्यात शेजारी बसलेल्या दुर्योधनानं मला एक सणसणीत कोपरखळी मारली. माझी भावसमाधी भंग पावली! मी चमकून त्याच्याकडे पाहिलं. त्यानं समोर बसलेल्या युधिष्ठिराच्या दिशेनं भुवया उडवून नेत्रपल्लवी केली, म्हणून मी युधिष्ठिराकडे पाहिलं. तो स्वत:ला विसरून एकटक माझ्या पायांकडे बघत होता! मी झटकन माझे पाय आसनामागं घेतले, त्यामुळे चमकून माझ्याकडे त्यानं दृष्टी वळविली. त्याच्या भव्य कपाळावर एक लहानशी आठी उठली. इतक्यात कुणीतरी मोठ्यानं ललकारी दिली, "कुरुकुलभूषण कौरवराज महाराज धृतराष्ट्रऽऽऽ!"

महाराज धृतराष्ट्र, महाराणी गांधारीदेवी, पितामह भीष्म आणि गुरुदेव विदुर एकदमच खास द्वारातून सभागृहात आले. अभिवादनासाठी सभागृहातले सर्व सभासद उठून उभे राहिले. मीही उभा राहिलो. महाराजांनी राजदंड उंचावताच, सगळे जण पुन्हा आसनस्थ झाले. पितामह भीष्म आणि महात्मा विदुर आल्यामुळे सगळीकडे गंभीर शांतता पसरली. अमात्य वृषवर्मा उठून बोलू लागले :

"वंदनीय पितामह, कुरुकुलभूषण महाराज, महाराणी, आदरणीय गुरुदेव द्रोण आणि महात्मा विदुर, राजमाता कुंतीदेवी, सुबलराज शकुनीमामा, सरसेनापती आणि अष्टमंत्रिमंडळातील मंत्रिजन, कौरवश्रेष्ठ राजपुत्र युधिष्ठिर आणि दुर्योधन, अंगराज कर्ण, गुरुपुत्र अश्वत्थामा, उपस्थित राजकुमार आणि आमंत्रित नगरजनहो – आजची राजसभा कशासाठी आमंत्रित करण्यात आली आहे, हे आपण जाणताच! यादवश्रेष्ठ महाराज श्रीकृष्ण यांनी आपल्या अत्याचारी मामाचा वध करून मथुरेत आपलं राज्य स्थापन केलं आहे. महाराज श्रीकृष्ण हे कौरवश्रेष्ठ महाराज पांडू यांच्या सुपत्नी राजमाता कुंतीदेवी यांचे जे बंधू यादवराज वसुदेव यांचे सुपुत्र आहेत, हेही आपण जाणता. त्यांच्या या यशामुळे कुरूंना मथुरेत प्रतिसाद देणारा एक कर्तव्यदक्ष नातेवाईक मिळाला आहे, ही आमच्या दृष्टीनं भाग्याची गोष्ट आहे. आपण सर्व जण आपला आनंद आणि शुभेच्छा व्यक्त करण्यासाठीच आज इथं जमलो आहोत. यानंतर कौरवश्रेष्ठ वंदनीय पितामह भीष्म आपणाला यादवराज महाराज श्रीकृष्णांबद्दल अधिक काही सांगतील." आपली मान दोन वेळा खाली झुकवून अमात्य वृषवर्मा खाली बसले.

सगळ्यांच्या नजरा पितामह भीष्मांकडे वळल्या. मला पितामह भीष्मांची आणि माझी गंगेवर झालेली पहिली भेट आठवली. त्या वेळी ते मला म्हणाले होते, "तुझ्या कानातील कुंडलांना जपत जा!" त्याचे ते उद्गार आठवताच मी कानातील कुंडलं चाचपून पाहिली. त्या सभागृहात इतर कुणालाच कुंडलं नव्हती, हे तर मला त्या वेळी प्रकर्षानं जाणवलं. मी सावरून बसलो आणि पितामहांकडे पाहू लागलो. ते उठून उभे राहिले आणि

धीरगंभीर आवाजात बोलू लागले. जणू ताठ आणि उंच बोलका देवदार वृक्षच सर्वांसमोर उभा होता! इतक्या वृद्धावस्थेतही त्यांचं उंच शरीर कुठंच वाकलेलं नव्हतं. पाषाणावर आदळणाऱ्या बाणाच्या पात्याचा आवाज जसा खणखणीत असतो, तसा त्यांचा आवाज कणीदार आणि खणखणीत होता. अत्यंत शांतपणे सगळ्या सभागृहावर आपली वृद्ध; पण धारदार दृष्टी फिरवीत ते बोलत होते -

"आमंत्रित नरेश आणि कुरूंच्या श्रेष्ठ वीरांनो, आज माझं मन अनेकविध संमिश्र भावनांनी महापुरातल्या युमनेसारखं दुथडी भरून आलं आहे. भगवान श्रीकृष्णाबद्दल मी काय सांगावं? मी त्याला भगवान म्हणतो यातच सर्व काही तुम्ही जाणावं! तथापि तुमच्या या तरुण पिढीपुढं या वेळी काहीतरी बोलणं हे एक वृद्ध कुरू म्हणून माझं कर्तव्य आहे, कारण काही-काही वेळा तुम्ही संयमाचं महत्त्व पार विसरून जाता म्हणूनच तुमच्या वीर मनाला पटेल आणि समजेल अशा सोप्या शब्दांत मी श्रीकृष्णाबद्दल काही सांगणार आहे, ते सावधान चित्तानं नीट ऐका.

"श्रीकृष्ण हे एक सहस्त्र पाकळ्यांचं शतरंगी कमलपुष्प आहे! त्यातली कोणतीही पाकळी घेतली, तरी आपल्या मृदू स्पर्शानं आणि शांत रंगानं मनाला दिव्य आनंदच देते. आज राजा झालेला श्रीकृष्ण त्याच्या जन्मापासून अनेक स्वरूपांत माझ्यासमोर स्पष्टपणे उभा राहतो. मी त्याला अनेकदा पाहिला आहे आणि त्याच्या बाबतीत घडणाऱ्या अनेक घटना कुणाकडूनही ऐकत असताना त्या माझ्यासमोर घडत असल्यासारख्याच मला जाणवल्या आहेत. आता या राजसभेत माझ्यासमोर तुम्ही बसलेले आहात, हे जितक्या स्पष्टपणे मी पाहू शकतो, तितक्याच स्पष्टपणे मी त्या साऱ्या घटना आजही पाहू शकतो! माझ्या स्वत:च्या जीवनक्रमातील काही घटना जरी मी विसरून गेलो असलो, तरी श्रीकृष्णाच्या जीवनक्रमातील एकही घटना विसरणं मला शक्य झालेलं नाही. श्रीकृष्णानं कंसाला मारलं, याचं तुम्हाला आश्चर्य वाटत असेल, मला नाही. त्याच्यासाठी शुभेच्छा व्यक्त करण्याचंही वास्तविक मला काही कारण नाही. सूर्याला त्याचं तेज कोण अन् कसं दाखवू शकणार? तरीही मी तुम्हाला इथं बोलावून घेतलं ते एवढ्यासाठी की, मला त्याच्याबद्दल तुमच्याशी बोलायचं होतं. कुरूंचे भावी आधारस्तंभ असणाऱ्या तुमच्या या तरुण पिढीला काही सांगायचं होतं. वीरहो, श्रीकृष्णाला आपण स्वत:च्या श्रीफलाएवढ्या मेंदूच्या साहाय्यानं मोजू-मापू पाहाल, तर आपण खरोखरच सरळ फसाल. त्याला मोजताना विशाल आकाशाकडे पाहा. तेही तुम्हाला थिटं पडल्याचं योग्य वेळी पुढं कळून येईल. मी भावनाविवश होऊन काहीतरी बोलत आहे, असं समजू नका. सुरुवातीलाच मी श्रीकृष्णाला आदरपूर्वक, भक्तिभावानं; पण विचारपूर्वक 'भगवान' म्हटलेलं आहे."

इतकं बोलून ते आसनस्थ झाले. सारं सभागृह त्यांच्या शब्दांनी भारावून गेलं होतं. महात्मा विदुर आसनावरून उठले. फुललेल्या प्राजक्ताच्या वृक्षासारखे ते शांत नि प्रसन्न दिसत होते. त्यांचा आवाज अतिशय गोड होता. एखाद्या चपळ माशानं नितळ जलाशयात सहजपणे गोल मोहक गिरक्या माराव्यात, तसा तो सगळ्या सभागृहात घुमत होता. ते म्हणाले -

"तुम्ही सर्वांनी श्रीकृष्णाबद्दल आता ऐकलंच आहे. मी अधिक काय बोलू? तरीही एवढंच सांगतो की, जग काय म्हणेल याची मुळीसुद्धा चिंता न करता मी स्वत:ला श्रीकृष्णाचा एक नम्र भक्त मानतो. भक्त हा कधीच आपल्या दैवताबद्दल काही बोलत

नसतो. त्यानं त्याला आपल्या मनाच्या गाभाऱ्यात श्रद्धेनं पूजलेलं असतं. भक्ताला आपल्या भावना व्यक्त करायला भाषासुद्धा अपुरी वाटत असते.” ते लागलीच आसनस्थ झाले.

त्यांच्यानंतर महाराज धृतराष्ट्र उभे राहिले. ते घोगऱ्या आवाजात बोलू लागले.

“मी श्रीकृष्णाला कधीही पाहिलं नाही; पाहू शकतही नाही! पण विदुराच्या तोंडून त्याच्याविषयी पुष्कळ ऐकलं आहे. ते ऐकताना कधी-कधी आपणाला दृष्टी नाही, याचं मला मनस्वी वाईट वाटलं आहे! दैवयोगानं कधीकाळी मला दृष्टी लाभलीच तर... तर सर्वांत प्रथम मी मथुरेला जाईन! बस्स. एवढंच मला त्याच्याबद्दल सांगता येईल.” आपल्या डोळ्यांच्या कडांवर साचलेलं पाणी उत्तरीयाच्या टोकानं सावरीत ते खाली बसले.

त्यांच्यानंतर गुरू द्रोण, शकुनीमामा, सेनापती असे अनेक मानकरी एकापाठोपाठ बोलले. सर्वांनी काही ना काही असामान्य असंच श्रीकृष्णाचं वर्णन केलं. माझं कुतूहल सारखं वाढत होतं. क्षणभर मनात आलं की, एकदा मथुरेला जावं आणि या सर्वांना एवढ्या लहान वयातच प्रिय होणाऱ्या त्या श्रीकृष्णाला एकदा पाहून यावं. त्याच्याशी जमल्यास एक वेळ बोलावं. मी अशा प्रकारचा विचार करीत होतो एवढ्यातच ज्येष्ठ पांडव युधिष्ठिर संथ बोलू लागला -

“पितामह, अमात्य, विदुरकाका, आणि महाराज यांनी इतक्या स्पष्टपणानं सांगितल्यावर मी या ठिकाणी अधिक असं काय सांगणार? शिवाय श्रीकृष्ण हा आमचा आतेभाऊ आहे. आम्ही त्याच्या आणि आपल्या सर्वांच्या आज्ञेत नम्रपणे राहू.”

तो खाली बसताच ज्येष्ठ राजपुत्र दुर्योधन उठला. आपली पुष्ट मान सगळीकडे गरगर फिरवीत तो म्हणाला,

“राजा श्रीकृष्णाचं वर्णन या राजसभेत झालंच आहे. मी अमात्यांना एवढीच सूचना करतो की, त्यांनी लागलीच एक सुवर्णमंडित मुकुट, एक रुपेरी मुठीचं खड्ग आणि तलम राजवस्त्रं कुरूंच्या वतीनं मथुरेला उपहार म्हणून आजच पाठवावीत. माझ्यानंतर अंगराज कर्णानं या प्रसंगी चार शब्द बोलावेत असं मी सुचवतो!” तो माझ्याकडे पाहत हसला नि आसनावर बसला. मला न विचारताच त्यानं मी काहीतरी बोलावं असं उगाच सुचवून ठेवलं! आता मला जे सुचेल ते बोलण्याशिवाय दुसरा मार्गच नव्हता! श्रीकृष्णाबद्दल मला जे काही माहीत होतं ते केवळ ऐकूनच. त्याला मी कधीच समक्ष पाहिलेलं नव्हतं. तरीही मी बोलायला उभा राहिलो! एकदा मी कुरूंच्या मानचिन्ह असलेल्या त्या चंद्रदेवांच्या प्रतिमेकडे पाहिलं आणि शरद ऋतूत काही अनोळखी धवल पक्षयांचे थवेच्या थवे जसे कुठूनतरी आकाशात येतात, तसे अनेक अनपेक्षित विचारांचे थवेच्या थवे माझ्या मनाच्या गाभाऱ्यात जमू लागले. मी संथ स्वरात बोलू लागलो -

“मी श्रीकृष्णाला अजून एकदाही पाहिलं नाही, तरीही मी त्याच्याबद्दल आज माझा परममित्र युवराज दुर्योधन याच्या आग्रहासाठी दोन शब्द बोलणार आहे! श्रीकृष्णाबद्दल एखादा विचार मांडताना त्याची संपूर्ण माहिती असायलाच हवी, असंही काही नाही. त्याच्या जीवनात घडलेल्या घटनांवरून एखाद्या व्यक्तीचं मूल्यमापन करता येईल. आपण सर्वांनी कथन केलेल्या माहितीप्रमाणे श्रीकृष्णानं आपल्या अन्यायी आणि अत्याचारी मामाला स्वतःच्या हातांनी खरोखरच निखंदून टाकलं असेल तर – तर

श्रीकृष्ण हा माझ्या मताप्रमाणं आर्यावर्तातला सर्वांत पहिला द्रष्टा राजा आहे! कारण सत्यासत्याच्या द्वंद्वात त्यानं आपल्या राष्ट्रापुढं आपल्या नात्याचा निधड्या मनानं सर्वप्रथम बळी दिला आहे! आपण सर्वांनीच त्याचा आदर्श सर्वकाळ डोळ्यांसमोर ठेवावा इतका तो उदात्त आहे आणि केवळ म्हणून मला श्रीकृष्ण वंदनीय आहे." सर्वांनी टाळ्या वाजवून माझ्या कल्पनेचं स्वागत केलं. मी खाली बसलो.

लागलीच एका प्रशस्त तबकातून एक सोनेरी मुकुट, एक खड्ग आणि रेशमी राजवस्त्रं सभागृहात आणण्यात आली. महाराजांनी तबकाला हस्तस्पर्श केला. सर्वांच्या वतीनं अमात्यांनी मथुरेला जावं, असा निर्णय करण्यात आला. राजसभा विसर्जित झाली. सर्व जण सभागृहाबाहेर पडू लागले. मी समोर बसलेल्या पांडवांकडे पाहिलं. भीम माझ्या डोळ्यात खोलवर रोखून पाहत होता. अर्जुन माझ्या कानांतील कुंडलांकडे डोळे विस्फारून पाहत होता आणि युधिष्ठिर अजूनही माझे पाय निरखीत होता. थोड्या वेळातच जेव्हा ते सर्व जण सभागृहाबाहेर पडले तेव्हा केवळ मी, शोण आणि दुर्योधन तिघेच सभागृहात राहिलो होतो. सर्वांत शेवटी आम्हीही बाहेर पडलो.

राजस्त्रियांच्या सौधावरून बाहेर पडणारा सोपान सभागृहाच्या उजव्या बाजूलाच होता. त्या सोपानावरून राजस्त्रिया उतरत होत्या. आम्ही सभागृहाबाहेर आलो त्या वेळी राजमाता कुंतीदेवी तो सोपान उतरीत होत्या! त्यांच्या अंगावर अनंताच्या धवल फुलासारखं पांढरंशुभ्र वस्त्रं होतं. अतिशय धीमेपणानं त्या एक-एक पायदंडी उतरत होत्या. माझी-त्यांची दृष्टिभेट होताच त्या पायदंडीवर तशाच थांबल्या! माझ्या कुंडलांकडे त्या एकटक पाहत असाव्यात. मी श्रीकृष्णाबद्दल काढलेले उद्गार त्यांना आवडले असावेत. श्रीकृष्ण हा त्यांच्या बंधूंचा पुत्र होता. त्यांच्या चर्येवरून त्या माझ्याशी काहीतरी बोलणार असाव्यात, असंच मला वाटलं! मीही क्षणभर थांबलो, पण दुर्योधनानं माझा दंड धरून मला हळूच पुढं ओढलं! तो म्हणाला, "कर्णा, आज तू फारच समर्पक बोललास. मला तुझं बोलणं फारच आवडलं. आज तू माझ्याबरोबर माझ्या कक्षात चल. आपण थोडा फलाहार करू मगच तू परत जा." मी त्याच्याबरोबर चालू लागलो. माझ्या मनात श्रीकृष्णाचेच विचार घोळत होते. पांडवांचं त्याच्याशी नातं होतं. आपलं त्याच्याशी कसलंच नातं नाही! आपण त्याला कधी पाहिलंही नाही, याबद्दल मला खंत वाटत होती.

**

# तेरा

रात्री वृषालीकडून राजमाता कुंतीदेवींची आणखी एक महत्त्वाची वार्ता कानी आली. राजसभेचं कामकाज कसं काय चालतं ते पाहावं, या कुतूहलानं आणि दुर्योधनाची बहीण दु:शलादेवी हिच्या आग्रहानं वृषाली राजसभेत स्त्रियांच्या सौधात येऊन बसली होती. तिला पाहताच राजमातेनं तिला एका दासीकरवी आपल्याजवळ बोलावून घेतलं व शेजारी बसवून घेतलं. तिच्या पाठीवरून त्यांनी प्रेमभरानं हातही फिरवला. वृषालीनंही त्यांना आदरानं वाकून वंदन केलं. राजसभेचं सर्व कामकाज संपेपर्यंत ती राजमातेशेजारीच बसली होती. तिच्या जवळच दु:शलादेवी होती. ती वृषालीला अधूनमधून अनेक प्रश्न विचारीत होती. राजमाता जवळच असल्यामुळे शक्यतो दबक्या आवाजात ती तिच्या प्रश्नांना उत्तरं देत होती. दु:शलादेवीनं एक प्रश्न तर तिला अतिशय खोचक विचारला होता. मला तो प्रश्न वृषालीच्या तोंडून ऐकण्याची फारच उत्सुकता लागली. तिनं तिला काय उत्तर दिलं, हेही मला पाहायचं होतं, पण काही केल्या ती तो सांगायला तयार होईना. ती म्हणे, "मला तिचा तो प्रश्न सांगायला लाज वाटते!" मी तिला खोदून-खोदून विचारलं. तिची अनेक आर्जवं केली. पण व्यर्थ! ती काहीच दाद देत नव्हती. काही झालं तरी स्त्रियांच्या मनातलं असलं काही गुपित अट्टाहासानं काढून घेणं केव्हाही अवघडच! जगात सर्वांत सखोल आणि कधीही अंत न लागणारं काय असेल, तर ते स्त्रियांचं मन! त्यांच्या मनातील रहस्य काढून घ्यायचं असेल, तर त्याला एकच राजमार्ग आहे. तो म्हणजे त्या रहस्याचं आपल्याला काहीच महत्त्व वाटत नाही, असं भासविणं! असं झालं की मग जे पाहिजे तेच नेमकं त्यांच्या तोंडून ऐकायला मिळतं! कधी-कधी मूळ घटनेत भर घातली जाऊन!

वृषालीनं माझी ताणलेली उत्सुकता ओळखून जाणीवपूर्वक तो प्रश्न काय होता, हे मला सांगायचं टाळलं. स्त्रिया म्हणजे खरोखरच वळवाचा पाऊस! पाहिजे त्या वेळी येणार नाही. नको तेव्हा निश्चित कोसळेल!

वृषाली तो प्रश्न असाच केव्हातरी मला आपोआप सांगणार होती. मला धीर होता.

**

# चौदा

वैवाहिक जीवनाची परिपूर्णता पुत्रसौख्यात असते. पुत्रमुख पाहताना पित्याला आपलं जीवन धन्य झाल्याचा एक अननुभूत आनंद प्राप्त होतो.

गर्भधारिका वृषाली अनेक दुर्मीळ फळांची आणि हरतऱ्हेच्या वस्तूंची मागणी करीत होती. तिची मागणी पुरविताना मी केलेल्या थट्टेनं ती लाजून चूर होई. सगळ्या राजवाड्यावर तिचे सर्व हट्ट पुरविण्यासाठी सेवक-सेविका धावपळ करीत होत्या. खऱ्या अर्थानं ती अंगराज्ञी झाली होती.

वृषालीला होणाऱ्या पहिल्याच पुत्राचं नाव काय ठेवावं, याचा मी कितीतरी विचार केला, पण योग्य नाव सुचत नव्हतं! ते काम तिच्यावर सोपविण्यातच शहाणपणा होता. ती निवडील ते नाव निश्चित शोभणारं असणार होतं!

माझ्या मनात एकच विचार वारंवार घोळत होता. माझ्या या पुत्राला कवच-कुंडलं असलीच पाहिजेत. कसा दिसेल तो त्या कवच-कुंडलात? मी लहानपणी दिसत असेन तसाच तो दिसणार!

शेवटी वृषालीला पुत्र झाला – पण – पण त्याला कवच-कुंडलं काही नव्हती!! माझं मन शंकेनं घेरून गेलं. तो सशक्त होता, पण कुंडलहीन होता. त्याचं नाव काय ठेवावं, याचं औत्सुक्य मला राहिलं नाही. त्याला कवच-कुंडलं का नाहीत, या शंकेनं मात्र माझं मन पोखरलं जात होतं. त्याचं नाव सुदामन ठेवलं गेलं. त्याच्या नामाभिकरणानिमित्त वाडयावर प्रचंड भोजनसमारंभ झाला. आपल्या कुठल्याच पुत्राला कवच-कुंडलं असणार नाहीत, असं होणार नाही, एवढं एकच समाधान मी माझ्या मनाचं करीत होतो. या पुत्राला नाही, पण दुसऱ्याला तरी निश्चित कवच-कुंडलं असतील, अशी मी मनाची समजूत घालीत होतो.

आशा हीच जीवनाची सर्वांत महान शक्ती असते.

■

# दुर्योधन

# एक

पौरजन मला घाबरत होते! मी म्हणजे जगात असलेल्या-नसलेल्या सर्वच दुर्गुणांचा जिवंत पुतळा आहे, मी म्हणजे अहंकाराचा एक महावटवृक्ष आहे, माझ्या डोळ्यांत जगाला दग्ध करणारा महाभयानक अग्नी आहे, असा अनेकांचा समज होता. अनेकदा त्यांच्या बोलण्यातून तो मला प्रतीत होई. तो अपसमज आहे की नाही ते मला काही सांगायचं नाही, पण ज्याला जग दुर्गुण म्हणतं तो दुर्गुण म्हणजे तरी काय? कुणालातरी ते निश्चितपणानं सांगता येईल काय? कारण मला माहीत आहे, दुबळ्या मनाच्या कर्तृत्वशून्य माणसांनी निर्माण केलेल्या ह्या सर्व खोटया आणि खुळ्या कल्पना आहेत. कारण ज्या कृतीला जग एकदा सद्‌गुण म्हणतं, त्याच कृतीला दुसऱ्या वेळी ते दुर्गुण म्हणतं आणि ते बरोबरही असतं. उदाहरण द्यायचं झालं, तर मानवाच्या हत्येचं देता येईल. एखादा ज्वलंत देशप्रेमी माणूस आपल्या राज्यातील एखाद्या घरभेद्याला ठार मारतो. जग अशा मारणाऱ्याला राष्ट्रभक्त म्हणून ओळखतं. त्याच्या नावाचा गगनभेदी जयजयकार करतं, पण एखादा लुटारू धनाच्या लोभानं एखाद्या वाटसरूच्या डोक्यात परशू घालतो. जग त्याला हत्यारा म्हणतं. कृती एकाच प्रकारची असते. एका माणसाकडून दुसऱ्या माणसाच्या हत्येची, पण जग एका मारेकऱ्याला राष्ट्रभक्त म्हणतं, तर दुसऱ्याला वधिक म्हणतं. एका ठिकाणी तो सद्‌गुण मानला जातो, तर दुसऱ्या ठिकाणी तो दुर्गुण ठरतो. दोन्ही गोष्टी बरोबर असतात. म्हणूनच मी म्हणतो की, दुर्गुण-सद्‌गुण या सगळ्या कल्पना आहेत. काही वेळा भीरू मनाच्या भेकड माणसांनी आपली दुर्बलता लपविण्यासाठी त्या हेतुतः तयार केलेल्या असतात. वेडं जग या कल्पनांना आदर्श मानून त्यावर हजारो वर्षं चालत आलेलं आहे!

माझ्या मते जगात एकच सद्‌गुण श्रेष्ठ आहे! जगात केवळ एकच कल्पना चिरंतन असते, शाश्वत असते! आजपर्यंत हे जग एकाच बिंदूपुढं नमलं आहे. तो सद्‌गुण म्हणजे सामर्थ्य! सामर्थ्याशिवाय माणूस म्हणजे मुळाशिवाय वटवृक्ष आणि मुठीशिवाय खड्‌ग!

सामर्थ्य! नुसतं दंडाचंच नव्हे, तर बुद्धी आणि दंड-राजदंड या दोहोंचं एकवटलेलं सामर्थ्य! मी अशा सामर्थ्याला महत्त्व देतो. अशा सामर्थ्यानं नटलेला पुरुषदेह आकाशाचा पट पाडून तारकांचीही हिरे, माणकं पृथ्वीवर आणू शकतो. मी अशा सामर्थ्याचा पूजक होतो आणि म्हणूनच जग मला गर्विष्ठ मानीत होतं. अहंमन्य म्हणत होतं. सगळं हस्तिनापूर माझ्या पश्चात माझ्या नावानं बोटं मोडत होतं! दुर्बल तेवढंच करू शकतात! मी अहंमन्य नव्हतो, असं कंठशोष करून मला कुणालाही सांगायचं नाही, कारण मी ते तसं सांगून कुणालाही पटणार नाही! पृथ्वीवर रेंगणाऱ्या किडयांना आकाशात स्वैर भटकणाऱ्या मेघराजाची काय कल्पना येणार? लोक मला अहंमन्य आणि ताठर म्हणोत! सुखेनैव म्हणोत! मला त्याची आता क्षिती नव्हती. कारण मला पूर्ण माहीत होतं की, जगापुढं नमून आणि दबून वागलं की, हेच जग त्याला मवाळ आणि अळणी म्हणेल! मग जगात माणसानं वागावं तरी कसं! ज्याचा जो स्थायिभाव असेल

त्याप्रमाणं! आत्मसंयमनाच्या गप्पा कोणी मारीत असेलही, पण आपल्या स्थायिभावाप्रमाणंच जो-तो वागत असतो आणि ते निसर्गाला धरूनच आहे. वाघाच्या पिल्लांना हरणं कशी पकडावीत, हे शिकवताना वाघाला कुणी कधी तरी पाहिलं आहे काय? माणसांचंही तसंच आहे! माणसानं कसं मत्त हत्तीसारखं असावं! तसाच एखादा प्रसंग आल्यास जगाला कायमची आठवण राहावी अशी जबरदस्त धडक देण्याची धमक त्याच्या गंडस्थळात असावी! आणि यात चूक तरी काय आहे? ज्याला धाडसाची आवड नाही तो पुरुषच नव्हे. संयम, सहनशक्ती, औदार्य, त्याग, सहिष्णुता हे सगळे सद्गुण घोटीव दगडांच्या सुडौल मंदिरात बसून, धूपाच्या सुगंधात ऐकताना बरे वाटणारे केवळ पोकळ शब्द आहेत. भोंगळ पुराणं आहेत. कारण जीवन हे असं मंदिर नाही! ते एक सदैव पेटलेलं यज्ञकुंड आहे! जन्म-मृत्यूच्या श्वासोच्छ्वासांनी रटरटलेलं ते एक अखंड रणांगण आहे! रणांगणात एकाच गोष्टीला महत्त्व असतं आणि ते म्हणजे सामर्थ्याला! सामर्थ्यातून निर्माण होणाऱ्या धैर्याला. जे गतिप्रिय असतात त्यांनाच ते पटतं. जे स्थितिप्रिय असतात त्यांना हे पटणार नाही. उलट ते नेहमीच पांचट तत्त्वज्ञानाचा शाब्दिक कीस काढण्यात गुरफटलेले असणार! मी जीवनभर निर्धारानं आणि निश्चयानं कास धरली होती ती सामर्थ्याची आणि अमोघ धैर्याची! आणि काय वाटेल ते झालं, तरी मी शेवटपर्यंत ती तशीच धरणार होतो. नगरजन त्याला सद्गुण म्हणोत किंवा दुर्गुण म्हणोत! मला ते दुर्योधन म्हणोत किंवा युधिष्ठिर म्हणतो तसं सुयोधन म्हणोत. त्याचा विचार करण्याइतपत अवसरही माझ्याजवळ नव्हता! राजपुत्रानं तो कधी करूही नये! युधिष्ठिराला पितामह आणि महामंत्री विदुर कुरूंचा युवराज मानत असावेत. तसा त्यांच्या तोंडून त्याचा निसटता निर्देशही होई. युवराजपदाचा तसा अभिषेक मला वा त्यालाही झालेला नव्हता. म्हणूनच मी आग्रहानं सर्वांकडून आवर्जून 'युवराज' असंच संबोधून घेई!

दुसरा महत्त्वाचा आक्षेप होता तो माझ्या घाऱ्या डोळ्यांवर! सगळे जण माझ्या घाऱ्या डोळ्यांबद्दल आपसांत कुजबुजत. त्यांच्या मते माझे घारे डोळे जगाला जाळून काढणारे आहेत! माझ्यासमोर मात्र कुणीच तसं उघड बोलत नव्हतं! तसं बोलण्याचं धैर्य केलंच असतं, तर मी त्याला ताडकन उत्तर दिलं असतं की, "ही केवळ शुद्ध असूया आहे."

आजपर्यंत काय या जगात घाऱ्या डोळ्यांची माणसं कधी झालीच नाहीत? त्या सर्वांनी काय जग जाळूनच काढलं आहे? आणि काढलं असेल, तर तुम्ही जिवंत कसे? जिवंत आहात ती काय मग जगाची केवळ राख आहात? वास्तविक घारे डोळे हे एक सौंदर्याचं अप्रतिम असं लक्षण आहे. आपणाला असे डोळे मिळाले नाहीत म्हणूनच सर्व जण माझ्याबाबत अशी चोरून टीका करीत! ती असूया नव्हती तर दुसरं काय होतं?

जगातील तीन गोष्टींबद्दल मला नितांत प्रेम होतं. एक कुरूंचं राज्यपद, दुसरी गदा आणि तिसरी म्हणजे माझे घारे डोळे! प्रसंगी मी, माझी गदा आणि माझं राज्यपद यांवरचं माझं प्रेमही दुय्यम मानलं असतं, पण माझ्या घाऱ्या डोळ्यांचा अभिमान मला सोडता येण्यासारखा नव्हता! राजवैद्यांनी सांगितलं असतं की, "युवराज दुर्योधना, तुझे डोळे दिलेस तर महाराज धृतराष्ट्रांना दृष्टी लाभण्याचा संभव आहे!" तर – तर मी त्यांना उत्तर दिलं असतं की, "वैद्यराज, माझे डोळे लाभल्यानंतरच महाराजांना दृष्टी लाभणार असेल, तर निरुपाय म्हणून मी ते देईनही, पण ज्या क्षणी मी ते देईन त्या क्षणीच

दुसऱ्या हातानं मीच माझं मस्तक धडावेगळं केलेलं असेन! कारण डोळे उणे दुर्योधन म्हणजे केवळ एक लाकडी ओंडका! माझं जे काही व्यक्तिमत्त्व आहे ते माझ्या डोळ्यांत आहे आणि म्हणूनच माझ्या घाऱ्या डोळ्यांचा मला अभिमान आहे! सार्थ अभिमान आहे! माझे डोळे मला प्राणप्रिय आहेत!''

**

# दोन

मी कुरूंचा सर्वांत ज्येष्ठ राजपुत्र होतो. म्हणूनच 'युवराज' होतो. हस्तिनापूर, अवघ्या आर्यावर्ताचं नाक आज माझ्या हातात होतं! माझ्या सेवेसाठी झंझावाती वायूलाही लाजवतील असे रथ होते. युवराजानं रथ उडवायचे नाहीत, तर मग कुणी? हस्तिनापुरातल्या गगनचुंबी डौलदार आणि विलासी वास्तू माझ्या वास्तव्यासाठी होत्या. वाटेल त्या वेळी मिष्टान्न भोजनं शक्य होती. अगदीच कंटाळा आला, तर माझं मनविनोदन करण्यासाठी अप्सरांनाही खाली पाहायला लावतील अशा लावण्यसंपन्न नर्तिका, गणिका आणि गायिका माझ्या राजकक्षात होत्या. माझ्याविरुद्ध आवाज चढवून बोलण्याचं धैर्य कुणी केलंच असतं, तर त्याला ठेचून काढण्यासाठी ज्येष्ठ राजपुत्र म्हणून – युवराज म्हणून माझ्या हातात कुरूंचा विख्यात राजदंड होता. कारण हस्तिनापूरचा उद्याचा स्वामी मीच होतो! मला एक-दोन नव्हे, तर चांगले नव्याण्णव बलशाली बंधू होते. शकुनीमामांसारखे कुशल आणि बुद्धिमान नातेवाईक मी माझ्याभोवती मला हितकर राजपरामर्श देण्यासाठी गोळा केले होते! शिवाय कुरूंचे जुने जाणते राजनीतिज्ञ कणक होतेच! माझा प्रत्येक शब्द झेलण्यासाठी अमात्य वृषवर्मापासून सामान्य सेवकापर्यंत एक अतूट दुव्यांची प्रचंड साखळीच्या साखळी तयार होती! वडील अंध असल्यानं आणि पितामह वृद्ध असल्यानं हस्तिनापूर राज्याची सर्व सूत्रं खऱ्या अर्थानं जवळ-जवळ माझ्याच हातात एकवटली होती.

हस्तिनापूरचा राजदंड गेली जवळ-जवळ सतरा वर्षं माझ्याच हातात होता! अतिशय निकटवर्ती असलेले माझे कर्णासारखे मित्र मला कधी-कधी धैर्यानं विचारीत, "दुर्योधना, काय केलंस तू या सतरा वर्षांत?" पण ते विसरत होते की, कुरूंच्या या अफाट राज्याच्या दृष्टीनं हा सतरा वर्षांचा काळ म्हणजे अगदीच नगण्य आहे. आज जवळ-जवळ सतरा वर्षं मी माझ्या जिवाचा, कुरूंची प्रतिष्ठा वाढविण्यासाठी आटापिटा केला होता. तरीही हे लोक म्हणतच होते की, "तू अनिर्बंध वागलास!" असंच जर असेल, तर मीही म्हणतो की, "होय! मी अनिर्बंधच वागलो! काय म्हणणं आहे तुमचं त्याबद्दल?" मला कुणाचे बंध असण्याचं कारण तरी काय? हे राज्य कुणी मिळविलं? माझ्या पूर्वजांनीच ना? मग त्यांचा वंशज असलेला मी असा वागलो, तर त्यात काय चूक आहे? माझ्या भविष्यात काय आहे याची धास्ती बाळगण्याचं मला मुळीच कारण नव्हतं. भविष्यात काय आहे हे भविष्य ठरवील! या हस्तिनापुराचं काय होईल? या आर्यावर्ताचं काय होईल? पण मी मात्र हा असाच वागणार! कारण मी भूत आणि भविष्य दोन्हीही काळ जाणत नाही! मला माहीत आहे तो केवळ धगधगता वर्तमानकाळ! आणि या वर्तमानात विरोधक म्हणून पांडवांची मला जी एक दूरस्थ भीती वाटत होती तीही मी कुशलतेनं कमी केली होती, कारण महापराक्रमी, बलाढ्य आणि सूर्यासारखा तेजस्वी कर्ण सर्वस्वी आज माझ्या बाजूला होता! त्याचा एकमुखी कौल आज माझ्याच पक्षाला होता! जरी पराक्रमी असला तरी भोळा-भाबडा आहे तो! त्याला सर्व जण सारथी म्हणत, हीन म्हणत, पण ज्या-ज्या वेळी मी त्याला पाहिलं होतं, त्या-त्या प्रत्येक वेळी तो एक

सूतपुत्र आहे, हे मला कधीच पटलं नाही! सारथ्याच्या अंगी एवढा पराक्रम कसा असेल? सारथ्याच्या कानात तेजोवलयं फेकणारी हिरण्यवर्णाची कुंडलं असतील काय? तो कुणीतरी उच्च कुलातला राजपुत्रच होता. पण – पण त्याला स्वत:ला माहीत नसावं की, आपण कोण आहोत ते! माझा तर्क जर खरा असेल आणि त्याला जर उद्या त्याचं खरं स्वरूप कळेल तर – छे! कल्पनाही करवत नाही की मग हा कुरूंचा युवराज म्हणून मिरवणाऱ्या दुर्योधनाची काय अवस्था होईल?

आपला जीवश्चकंठश्च मित्र म्हणून त्या वेड्यानं आपलं जीवनसर्वस्व, ध्येय, भवितव्य सर्वकाही माझ्या हाती सोपविलं आहे! अगदी निर्भयपणे! मला तो आपला मित्र आणि हितकर्ता मानतो! वेड्या कर्णा, या दुर्योधनाला पुरता ओळखायला तुला फार दिवस लागतील. कदाचित – कदाचित स्वत:च्या अंतापर्यंतही तुला त्यासाठी डोळ्यात जीव आणून वाट पाहावी लागेल! कारण आज तू माझ्या मुठीत आहेस! मी तुला अंगदेशाचा राजा केला आहे. अनेक दिवस सारथी म्हणून या हस्तिनापुराच्या कुठल्यातरी कोपऱ्यात खितपत पडलेल्या तुला मी – केवळ मीच, स्वातंत्र्याचे किरण दाखविले आहेत! कदाचित तुला तुझ्या जीवनांतापर्यंत कधी शक्य झालं नसतं, असं राज्य मी तुला मिळवून दिलं आहे! तुला स्वतंत्र केलं आहे. आता यापुढं मी सांगेन त्याप्रमाणंच तुला वागावं लागणार आहे. नाही वागलास तर आतल्या आत धुमसत-धुमसत तुला जळून जावं लागेल, पण माझी आता पुरेपूर खात्री झाली आहे की, तू माझ्याविरुद्ध आता कधीच आणि काहीच बोलणार नाहीस! कारण मी तुला राजा केलं आहे! एका सारथ्याला एका स्वतंत्र देशाचा राजा केलं हीच माझी थोर पुण्याई आहे! या पुण्याईच्या जोरावर मी आता तुझा हवा तसा वापर करीन! कर्णा, तू म्हणजे आज तरी या दुर्योधनाच्या गोठ्यात बांधलेली एक निरुपद्रवी गाय आहेस! गायीला एकच माहीत असतं आणि ते म्हणजे आपल्या मालकाला दूध देणं. गरीब गाय आपल्या धन्यावर कधीच शिंगं उगारीत नसते, हे अनुभवानं मला पक्कं माहीत आहे! कर्णा, आज तरी तू या कुरुश्रेष्ठ दुर्योधनाच्या दारात केवळ असाच आहेस! तुला वाटत असेल की, तुझ्यावरचं माझं प्रेम उफाळून ऊतू जात आहे आणि म्हणून मी तुला साथ देतो, पण अगदी चूक आहे ते. मला त्या पांडवांचा काटा काढायचा आहे, या कामी तुझा मला उपयोग होणार आहे.

महाराज पांडूंचे आपण पुत्र आहोत, असं ते वारंवार म्हणतात. माझे काका महाराज पांडू पराक्रमी होते, शत्रुतापन होते, दिग्विजयी होते हे सगळं मीही मान्य करतो. त्यांच्याबद्दल माझ्या मनात आजही नितांत आदर आहे. पण त्यांनी हस्तिनापूर का सोडलं हे ज्यांना माहीत असेल ते सुज्ञ लोक तरी निश्चित मान्य करतील की, पांडव हे महाराज पांडूंचे पुत्र असू शकणार नाही! महाराज पांडूंना किंदम ऋषींनी एक भयानक शाप दिला होता. त्यांना त्या शापामुळे मुलं होणं शक्यच नव्हतं! मग हे पांडव त्यांचे कसे? ते महाराज पांडूंचे पुत्र नव्हेत हे एकदा नक्की झाल्यानंतर त्यांना मी 'पांडव' असं तरी का म्हणावं? फार तर ते कौंतेय आणि माद्रेय म्हणवून घेण्याला पात्र होतील! आणि असं असेल तर त्यांनी स्वत:च्या राज्याच्या प्राप्तीसाठी मथुरेला जाऊन श्रीकृष्णाबरोबर भांडावं किंवा मद्र देशाला जाऊन शल्याशी भांडावं! इथं, या हस्तिनापुरात ते उद्धत अधिकारानं आपलं तोंड का खुपसत आहेत?

आमच्या प्रिय पांडू महाराजांचं काय झालं ते एक महान आश्चर्यच आहे.

महाराज कसे वारले हे कुणीच सांगत नव्हतं! राजमाता कुंतीकडे बघूनच केवळ त्या सर्वांना या राजवाड्यात आश्रय दिला गेला. जिथं-तिथं चाललेले त्यांचे सगळे लाड आजवर आत्यंतिक संयमानं मी सहन केले. वास्तविक गुरू द्रोण कौरवांचे राजगुरू. त्यांनी आम्हाला अधिक जिव्हाळ्यानं वागवायला हवं होतं. पण युद्धशालेत गाईच्या मागून वासरू फिरतं, तसं गुरू द्रोणांच्या मागून फिरणारा अर्जुन मी नेहमी पाहिला आहे. नको तिथं नाक खुपसून सर्वांनाच उपदेशाचे घोट पाजणारा युधिष्ठिर मी पाहिला आहे. नेहमी पोहायला म्हणून नगराबाहेरच्या तळ्यात नेऊन माझ्या चार- चार भावांना पाण्याखाली बुडवून त्यांना अर्धमेलं होईपर्यंत पाण्यातच कोंडणारा रानगट भीम मी पाहिला आहे! ते पाहताना मला काय वाटलं असेल, याचा कुणीतरी आणि कधीतरी विचार केला आहे काय?

गेली बारा वर्षं माझ्या मनाचा अग्नी त्यांच्या असह्य अरेरावीनं नुसता धुमसत आला आहे. जिथं-तिथं पांडव! पांडव म्हणजे काय देव आहेत? आणि असलेच तर त्यांनाही मी दाखवून देईन की, देवांनासुद्धा नाक घासायला लावणाऱ्या महाराज नहुषांचा मीही वंशज आहे!! कारण ते पांडव अलीकडे हस्तिनापूरच्या राजसिंहासनावर सरळ-सरळ आपला अधिकार सांगू लागले आहेत! तो युधिष्ठिर तर पक्का 'खाल मुंडी पाताळ धुंडी' आहे. तो माझ्यापेक्षा वयानं ज्येष्ठ आहे, असं सर्व जण म्हणतात. त्याला प्रमाण काय? त्याचा जन्म तर अरण्यातला! शिवाय लाक्षागृहाच्या दुर्घटनेनंतर हस्तिनापुरानं मलाच युवराज मानलंय त्याचं काय?

राज्य कुणाचं? कौरवांचं! ज्येष्ठ कौरव असल्यामुळे माझे पिता धृतराष्ट्र यांचं. ते अंध असल्यामुळे मिळालं त्यांचे कनिष्ठ बंधू पांडूंना. ते शापदग्ध झाल्यामुळे वनात गेले. विश्वस्थ म्हणून धृतराष्ट्रांना नेमून. पांडूंना शापामुळेच पुत्रप्राप्ती होणं शक्य नव्हतं. त्यासाठीच तर मनावर संयम मिळविण्यासाठी ते वनात गेले. तिथं त्या शापामुळेच ते वनातच वारले. पांडूंच्या पश्चात माझे वडील धृतराष्ट्र ह्यांचंच हे राज्य नाही का? कारण कौरव व कौंतेयात कुरू म्हणून कौरवच ज्येष्ठ आहेत. पांडूंच्या पश्चात आता हस्तिनापूरचं राज्य त्यांचंच आहे आणि खरंतर ज्येष्ठ कौरव म्हणून माझंच आहे. मागत होते मात्र मान वर करून ते – कुंती आणि माद्रीच्या पापाचे पुत्र! – कारण माझं मन नेहमी मला सांगत होतं की, पांडव हे महाराज पांडूंचे नव्हेतच! फार तर कुंतीचे आणि माद्रीचे पुत्र असतीलही; पण एवढ्या जोरावरच ते कुरूंच्या राजसिंहासनावर बसण्याची गोंडस स्वप्नं रंगवीत असतील, तर माझ्या मते ते महामूर्ख आहेत.

वळचणीच्या सांडपाण्याला कोणीच कधी गंगेचं पवित्र जल मानीत नाहीत. ओढ्याकाठी इतस्तत: वाढलेल्या रामेट्याच्या खुरट्या झुडपावरची विरविरीत फुलं प्राजक्त मानून कोणीच कधी देवाच्या पवित्र मूर्तीवर चढवीत नाहीत. रस्त्यावरच्या गारगोट्या आकाशातल्या तारका बनून कधीच चमकत नाहीत. वडाच्या झाडावर बसून भर उन्हात केविलवाणी काव-काव करणाऱ्या काळ्याकुट्ट कावळ्याला उंच शिखरावर बसणाऱ्या पक्षिराज गरुडाची कधीच सर येणर नाही. 'काय व्हायचं असेल ते होवो पण... पण जोपर्यंत हा बलशाली कौरव दुर्योधन जिवंत आहे तोपर्यंत तो काहीही करील, पण पांडव म्हणवून घेणाऱ्या त्या पापी पंचकडीला तो कुरूंच्या पवित्र आणि प्राचीन राजसिंहासनाला कधी शिवूसुद्धा देणार नाही!'

आणि त्यासाठीच कर्णा मी तुला एक प्रभावी शस्त्र म्हणून जवळ केलं आहे.

तसा स्पर्धेच्या संस्मरणीय दिवशीच मी निर्धार केला होता!

केवळ यासाठीच त्या दिवशी प्रचंड जनसमुदायासमोर अंगदेशाचं राज्य देऊन त्या पराक्रमी कर्णाला मी कौशल्यानं माझ्या पक्षाकडे वळविलं आहे. कर्ण हा एकच एक असा योद्धा आहे की, जो अर्जुनापेक्षाही काकणभर वरचढ आणि अनेक सद्गुणांमुळे श्रेष्ठ आहे. आखाड्यात त्यानं ते निर्विवादपणे सिद्धही केलं आहे. त्या दिवशी कर्णाच्या कुलशीलाबद्दल तो भीम मध्येच उठून जे काही बोलला – ते बोलला नसता – तर – तर अर्जुन या जगात अस्तित्वातही राहिला नसता. द्वंद्वयुद्धात कर्णानं त्याच्या बरगड्या पिचल्या असत्या आणि म्हणूनच कर्णाचं सूर्यफुलासारखं चकाकणारं पिवळसर सोनेरी अंग हीच आता माझी अभेद्य ढाल बनली आहे! कौशल्यानं ती मी वेळ पडेल तेव्हा पुढं करणार आहे! कर्ण खराच भोळा आहे. ज्याला तो आपलं मानतो त्याच्यावर तो विशुद्ध प्रेम करतो! मलाही त्यानं आता आपलं मानलं आहे. ‘वेड्या कर्णा, तुला अंगराज करवून... स्वतंत्र करवून जो मानाचा मुकुट मी मोठ्या प्रेमानं तुझ्या मस्तकावर चढविला आहे, त्याच्या कोंदणात एक प्रकाशमान असा लाल रंगाचा हिरा आहे, असं मी तुला भासविलं आहे! वास्तविक तो हिरा नाहीच! तो आहे एक धगधगीत अंगार! माझ्यावरील तुझ्या भाबड्या श्रद्धेचा तो अंगार आहे. अंगार! तू प्रेमानं मस्तकी धारण केलेला! मी माझ्या हातांनी बसविलेला!’

**

# तीन

कर्ण जरी माझ्या पक्षाला होता तरी त्या पांडवांचा काही भरवसा सांगता येत नव्हता. मागच्या आखाडयात अर्जुनानं आणि भीमानं जे-जे राक्षसी पराक्रम केले होते ते पाहून माझी तर झोपच उडाली होती.

त्या दांडगट भीमानं तर माझ्या प्रिय दु:शासनाला मुष्टियुद्धात, रजकानं धुणं बडवावं तसा उंच उचलून दाणकन खाली आदळला होता. गदेच्या आखाडयात तर तो भीम माझ्या अंगावर एखाद्या उपाशी सिंहासारखा चवताळून आला होता. छे! त्या पांडवांचा कायमचा काटा काढल्याखेरीज कौरवांना समाधानानं जगायला मिळणार नाही. त्यासाठी वाटेल ते करावं लागलं, तरी ते मी करीन, कारण त्याशिवाय माझ्या अतृप्त, तप्त मनाला शांती कशी ती मिळणार नाही.

पांडवांना सरळ-सरळ नष्ट करणं कधीच शक्य नव्हतं, कारण ती पंचकडी म्हणजे पाच सलग पर्वतांची चालती-बोलती खंबीर रांगच होती! एकमनानं एकत्र आलेले पाच मस्त खोंड एखाद्या सामर्थ्यशाली वनराजालाही सहज लोळवू शकतात. इथं तर गाठ होती पाच शस्त्रसंपन्न, सशक्त योद्धयांशी! म्हणूनच मी त्यांना कपटानं मारायचं ठरवलं आहे. कपटानं म्हणण्यापेक्षा कौशल्यानं म्हणणं जास्त योग्य ठरेल! कारण राजकारणात कपटालाच कौशल्य हे गोंडस आणि सुसंस्कृत नाव आहे! या बाबतीतल्या माझ्या योजनांबद्दल मी कर्णाशी अनेक वेळा चर्चाही केली, पण त्याचं आपलं म्हणणं एकच होतं, ‘मला एकाच वेळी पाच जणांबरोबर सरळ द्वंद्व खेळायला सांग! मी त्यांना केळीचा गाभा पिचतात तसा उभे पिचून काढीन, पण कोणत्याही कपटानं मी काहीही करणार नाही!’ त्याचा हा आत्मविश्वास सार्थ होता, हे मलाही पटलं होतं, पण त्याच्या त्या धैर्यशील कल्पनेशी मी कधीच सहमत झालो नाही – होणारही नाही. मी माझे सर्व डाव प्रथम टाकून पाहणार आहे. त्यातूनही ते नीच पांडव वाचलेच तर शेवटी... अगदी सर्वांत शेवटी निर्वाणीचं प्रभावी अस्त्र म्हणून मी कर्णाला वापरणार आहे! कारण तो पराक्रमी असला, तरी दयाळू आणि सरळ मनाचा आहे. ज्याला तो एकदा आपलं म्हणतो त्याला तो खऱ्या अर्थानं आपलंसं करून टाकतो. त्याच्या अनेक मनमोहक गुणांनी त्यानं या राजनगरातील असंख्य नगरजनांची मनं आज जिंकली आहेत. सर्वांत प्रभावी आणि आकर्षक असं त्याच्याजवळ काही असेल, तर ते त्याचं लोभस व्यक्तिमत्त्व. तो समोर उभा असला की, का कुणास ठाऊक; पण तेजाचे असंख्य कणच आपल्यासमोर उभे आहेत असं वाटतं. त्याच्या निळ्या डोळ्यांत क्षणभर जरी पाहिलं, तरी आकाशाचा नीलिमा कितीतरी फिका वाटतो. कधी-कधी गंगेवरून स्नान करून परत येताना त्याची व माझी राजवाडयाच्या पायदंडयांवर अचानक गाठ पडत होती. त्या वेळी त्याला ज्या स्वरूपात मी पाहिलं आहे त्या स्वरूपाचा तर मला कधीच विसर पडणार नाही. चुकूनमाकून राहिलेले गंगेचे काही शुभ्र जलबिंदू त्याच्या ओलसर सोनेरी कुरळ्या केसांत असे काही चमकतात की, त्याला पाहिल्यानंतर दवबिंदू शिरावर घेऊन उद्यानात डोलणाऱ्या सोनेरी रंगाच्या सूर्यफुलाचीच आठवण व्हावी! त्याची मंद-मंद डुलणारी जन्मजात मांसल कुंडलं,

नितळ अन् भव्य कपाळ, ध्वजदंडासारखं सरळ तरतरीत नाक, पळसाच्या फुलासारखे रसरशीत रक्तवर्णी गाल, कानांच्या दिशेनं लांब सरकत गेलेल्या रेखीव सोनेरी भुवया, हत्तीच्या सोंडेसारखे दंड, पोटरीचे पीळदार, सतेज स्नायू, गंगेतल्या प्रचंड कासवाच्या विशाल पाठीसारखी विस्तृत आणि उन्नत-भरदार छाती, बाणाच्या भात्यासारखी गोल गरगरीत, पुष्ट मान, वृषभासारखे खच्चून भरलेले – भक्कम, भरदार खांदे आणि या सर्वांना एक आगळाच उठाव आणणारी त्याची सूर्यासारखी गोल, अतिशय गोल मुद्रा! अशा आकर्षक व्यक्तिमत्त्वाचा दुसरा एकही पुरुष माझ्या मते संपूर्ण हस्तिनापुरात नव्हता. तो बोलतो फारच कमी, पण त्याचं मौन म्हणजे एक जिवंत भाष्य आहे! जेव्हा कधी तो बोले तेव्हा त्याचा नाद तर मला गदेवर गदा आदळल्यानंतर जसा खणखणीत ध्वनी निघतो तसाच कणीदार वाटे. बोलीच्या बाबतीत मला एक पितामहांच्या खालोखाल कर्णच आवडला आहे.

बोलताना तो कधीतरी मोहक स्मित करतो अशा वेळी त्याचे दुहातीचे दोन सुवर्णमय दात चमकतात! आणि मी...

आणि मी माझी गुरू द्रोणांकडून झालेली घोर उपेक्षा विसरतो, भीमार्जुनांकडून झालेला उपमर्द विसरतो, हृदयाच्या सखोल विवरात सदैव सलणारी शेकडो शल्यं विसरतो. विसरतो की, मी कुरूंचा युवराज आहे, विसरतो की, उद्या मी या हस्तिनापूरचा अधिकृत सम्राट होणार आहे. केवळ एकच एक विचाराचं आवर्त माझ्या मस्तकात भिंगरीसारखं भिरभिरत भ्रमण करू लागतं. 'हा कर्ण खरोखरीच सूतपुत्र आहे काय? सारथ्यांच्या चंद्रमौळी झोपडीत हे एवढं सौंदर्याचं स्वरूप कधीतरी साकार होईल काय? कर्ण हा खराच हीन आहे काय?' मग माझं मन मला मोठ्यानं गर्जून सांगते, 'कर्ण हा सारथिपुत्र नाही! कर्ण ही तेजाची खाण आहे! तेजाची खाण अंधाराच्या गुहेत कसा जन्म घेईल? कर्ण हा कुठल्यातरी पराक्रमी राजाचा तेजसंपन्न धैर्यशाली सुपुत्र असावा. कर्ण हा क्षत्रियच असावा!' आणि म्हणूनच मी त्याला सर्वांच्या नाकावर टिच्चून अंगराज केला आहे. नाहीतर हा दुर्योधन काय एवढा मूर्ख आहे की, त्यानं घोड्याची शेपटी पिळून त्याच्या पाठीवर आसुडाचे कोरडे ओढणाऱ्या एका यःकश्चित सारथ्याला कौरवांच्या वैभवी राजसभेत एक राजा म्हणून आणावं? अंगराज म्हणून मानाचा शिरपेच त्याला द्यावा?

कर्ण मला माझं निर्वाणीचं अस्त्र वाटत आलंय. तशी वेळ पडल्याशिवाय मी त्याला कधीच पणाला लावणार नाही. कर्ण ही दुर्योधनाची सुरक्षा-पेटी आहे. त्याच्या अंगावरचं अभेद्य कवच मैत्रीचं रूप घेऊन माझ्या अंगावर केव्हाच चढलं आहे! जोपर्यंत कर्ण जिवंत आहे तोपर्यंत दुर्योधन अजिंक्य आहे! यासाठीच एक दुसरा उपाय म्हणून, ज्यात कर्णाचा संबंधही येणार नाही, असा एक वेगळाच मार्ग मी पांडवांच्या बाबतीत अवलंबायचं ठरविलं आहे. काल रात्री मी माझ्या पित्यांना... महाराज धृतराष्ट्रांना एक स्पष्ट सूचना दिली आहे.

ते त्या पापी पंचकडीला खरोखरच आपल्या भावाचे पुत्र मानतात. मी त्यांना समजावून सांगितलं आहे की, पांडव महाराज पांडूंचे पुत्र नाहीत, उलट पांडू – महाराजांचा अकाली अंत हे पंचकडीचंच काहीतरी कटू कारस्थान आहे! मला हे त्यांच्या गळी उतरविताना किती त्रास झाला! त्यांचं एकच म्हणणं होतं, "राजमाता कुंती राज्यलोभानं कधीही खोटं बोलणार नाहीत. तसं काही असतं, तर तिनं राजनगरात

पाऊलही टाकलं नसतं.'' अतिशय भोळा स्वभाव आहे आमच्या तीर्थरूपांचा. राज्यलोभानं एकवेळ पुरुष युद्ध खेळतील, एकमेकांना कंठस्नान घालतील. वेळ पडल्यास रणमर्दिनीला शूरासारखं आपलं शिरकमल समर्पित करतील. पण... स्त्रिया?... छे! स्त्रिया राज्यलोभासाठी प्रसंग पडल्यास ते संपूर्ण राज्यच्या राज्य जाळून खाक करतील! सगळे लोक म्हणतात, स्त्री म्हणजे विधात्याचं वैभव, स्त्री म्हणजे मानवतेचा मान, स्त्री म्हणजे सौंदर्याचं संघटन, स्त्री म्हणजे कोमलतेचा कळस, स्त्री म्हणजे प्रेमाचा पर्वत! पण मला हे खोटं वाटतं! पुरुष प्रसंगी क्रूर असतो; पण मर्यादित. कारण त्याचा क्रूरपणा एखाद्या व्यक्तीबाबत असतो, पण स्त्रीनं एकदा आपलं मन घट्ट केलं की, ती नियतीच्या अनेक शाश्वत तत्त्वांशीही बंड करून उठते. तसं नसतं तर आपलं कलंकित काळं तोंड दाखवायला राजमाता कुंती परत हस्तिनापुरात कशाला आली असती? पण माझ्या वडिलांना ते पटत नाही. पांडवांना ते आपल्या प्रिय भावाचे सुपुत्रच मानीत आहेत. पण त्यांना माहीत नाही की, हे त्यांचे पुतणे कसल्या भयानक अग्नीच्या ठिणग्या आहेत, कारण अंध असल्यामुळे त्यांनी भीमार्जुनांचे राक्षसी पराक्रम प्रत्यक्ष पाहिलेले नाहीत. कधी- कधी अज्ञानात सौख्य असतं! माझ्या वडिलांचं सौख्य आणि समाधान अशाच प्रकारचं नाही काय? त्यांना काही वाटत असलं, तरी मला निष्काळजी राहून चालणार नाही. काळ कधीच कुणाची प्रतीक्षा करत नसतो! उद्या हेच पांडव वरचढ होतील आणि मग या युवराज दुर्योधनाला पांडू महाराजांसारखं एक अधरीय नेसून आपल्या बंधूंसह अरण्यवासासाठी, झोळी घेऊन वनाचा मार्ग पत्करावा लागेल. म्हणूनच काल रात्री मी माझ्या वडिलांना पटवून दिलं आहे की, ज्यांना तुम्ही आपल्या बंधूंची मुलं मानीत आहात ते पांडव त्यांच्या बंधूचे पुत्र नाहीत.

कधी-कधी नाती विसरून माणसाला कटू सत्यं कठोरपणानं आपल्याच जिव्हाळ्याच्या माणसांना अप्रिय शब्दांतही ऐकवावी लागतात. जीवन हे कर्तव्याची कठोर कास धरणाऱ्या माणसांच्या बाजूनंच अखेर खरा कौल देत असतं!

कणकांच्या साहाय्यानं मी महाराजांना काल रात्री आमूलाग्र बदलून टाकलं आहे. मंत्री कणक हे काल रात्रीपासून माझे गुरू झाले आहेत. काल त्यांनी महाराजांना किती मार्मिक राजपरामर्श दिला! त्यांनी दिलेला तो हितोपदेश म्हणजे 'कणकनीती' – ही कुठल्याही यशस्वी होऊ इच्छिणाऱ्या महत्त्वाकांक्षी राजानं सदैव आपल्या लक्षात ठेवावी.

कणकांनी जे-जे सांगितलं ते-ते प्रथमदर्शनी ऐकायलाही विचित्र वाटलं, पण ज्या वेळी मी त्यांच्या म्हणण्याचा सखोलपणे विचार केला तेव्हा त्यात फारच मोठा आणि वास्तववादी अर्थ असल्याचं माझ्या ध्यानी आलं. मी असली खोचक नीती यापूर्वी कधीच ऐकली नव्हती. मला ती फार-फार आवडली. म्हणून मंत्रिमंडळातल्या या ज्येष्ठ राजकारणपटू मंत्र्याला – कणकाला मी राजगुरू मानलं आहे. महाराजांनी एका सेवकाकरवी काल कणकांना आपल्या कक्षात बोलावून घेतलं. कणक कक्षात येताच महाराजांनी सरळ-सरळ त्यांना म्हटलं, ''कणक, मी तुम्हाला एक निष्णात राजकारणी मानतो. मी एक प्रश्न विचारतो आहे. नीट चातुर्यानं त्याचं उत्तर द्या. माझा ज्येष्ठ पुत्र दुर्योधन अलीकडे वरचेवर म्हणतो आहे की, पांडव हे पांडूचे पुत्र नाहीत. तसंच दिवसेंदिवस पांडव अधिकच अरेराव होत चालले आहेत! युवराज दुर्योधनाच्या या म्हणण्यात काही तथ्य आहे काय? तुमचं स्पष्ट आणि सत्य मत मला हवं आहे.''

कणकांनी महाराजांना लवून प्रणाम केला आणि मुद्रा गंभीर करून ते म्हणाले, "महाराज, आपण माझं स्पष्ट मत विचारीत आहात म्हणूनच मी सांगतो की, ते आपणाला कदाचित मानवणार नाही!"

"असं का म्हणता कणक? धृतराष्ट्राचं मन कटू सत्य पचवू शकतं, हे तुम्हीही ओळखू शकला नाहीत तर – "

"तसं नाही महाराज, आपली ऐकण्याची तयारी असेल, तर मी सांगतो. कुठल्याही प्रामाणिक सेवकाला केव्हाही आपल्या स्वामीचं कल्याण व्हावं, असंच वाटत असतं. मी आपला एक प्रामाणिक सेवक आहे, म्हणूनच मी स्पष्ट बोलतो आहे, त्यासाठी मजबद्दल अपसमज वा अपग्रह करून घेऊ नये.

"महाराज, माणसानं आपल्या सामर्थ्याचा दंड नेहमीच उंच उचलून उभं असावं. कारण दंड उचलून उभा राहणाऱ्यालाच जग नेहमी घाबरत असतं. यासाठीच सर्व कामं दंडाच्या साहाय्यानंच करावीत. आपल्या राज्यकारभारातील छिद्रं दुसऱ्याला दिसू देऊ नयेत, कारण कोणताही हितशत्रू नेमका अशा छिद्रांचाच लाभ करून घेतो! शत्रूच्या राज्यकारभारातील नेमकी छिद्रं शोधून काढावीत आणि पश्चात्ताप करण्याची पाळी येण्याइतका वेळ न घालवता वेळीच त्या छिद्रांवर आघात करावा! माणसानं नेहमीच कासवासारखं आपलं अंग झाकून ठेवावं आणि प्रसंग पडेल तेव्हाच जगाचा कानोसा घेण्यासाठी सावधपणानं आपली मान बाहेर काढावी! सारखं जगाकडे बघत बसून त्यावर केवळ टीका करू नये. आपलं खरं स्वरूप इतर कोणालाही कळू देऊ नये. निदान राज्यकारभार हाकणाऱ्यानं तर मुळीच तसं कळू देऊ नये!

"स्वीकारावा लागलाच तर काही काळ अंधपणाही स्वीकारावा आणि पुढं अशा वेळीच आपले डोळे उघडावे की, ज्या वेळी त्या डोळ्यांत जग जाळण्याची शक्ती आलेली असेल. कान, डोळे आणि तोंड ही इंद्रिय आपली आहेत म्हणून ती वाटेल तशी वापरू नयेत! लक्षात ठेवावं की, आपले हात हेही आपली इंद्रियंच आहेत. प्रसंग पडल्यास नाक, डोळे आणि तोंड यांना बंद करण्यासाठी आच्छादन म्हणून नियतीनं आपणाला आपले हात दिलेले आहेत! शत्रू दुर्बल वाटत असला, तरी कधीच त्याची गय करू नये. ताडाचं रोप लहान भासलं तरी क्षणात ते आकाशाच्या पोटात घुसतं! एरंडाच्या रोपाला कधीच जायफळं लागत नाहीत! अग्नीची ठिणगी लहान असली, तरी तीच गगनस्पर्शी लहलहणारा वणवा भडकवू शकते! सापाचं पोर – पोर म्हणून सोडलं तरी मोठेपणी ते डंख मारायचं विसरत नसतं! शत्रू कितीही दुर्बल आणि क्षुल्लक वाटत असला, तरी परिणामी तो फार मोठं मोल वसूल करतो! असा शत्रू जरी प्रसंगी दीनपणाची पडेल भाषा वापरू लागला, तरी त्याच्या शाब्दिक पश्चात्तापावर विसंबून त्याला कधीच सैल सोडू नये.

"पीडा देणाऱ्या उन्मत्त शूत्रला तर सरळ ठार मारावा. साम, दाम, दंड, भेद ज्या ज्या शक्य असेल त्या-त्या मार्गांनी शत्रूचा नि:पात करावा, कारण शत्रू हा घायपातासारखा चिवट असतो! त्याला कितीही उखडून कुठल्याही माळरानावर टाका, तो परत आपली मुळे जमिनीत रुजवितोच! परत त्याच्या दोन्ही कडांस असलेले वैमनस्याचे काटे तरारू लागतातच! क्रोध आला तरी नेहमी स्मितपूर्वक बोलावं. करताना न चुकता करायचं तेच करावं! कधीही कुणाला टाकून बोलू नये. शत्रूशी तर प्रहार करण्यापूर्वी गोड बोलावं आणि प्रहार केल्यानंतर तर पूर्वीपेक्षाही गोड बोलावं!

भिकारी, नास्तिक आणि घरभेदे यांना राज्यात कधीही थारा देऊ नये, कारण भिकारी आळस वाढवितात, नास्तिक शेकडो वर्षांची समाजरचना उधळून प्रत्येक गोष्टीबद्दल अनास्था निर्माण करतात. घरभेदे तर राज्याचा समूळ नाश करतात. ज्याच्याबद्दल शंका घेणं योग्य नसेल त्याच्याबद्दलही शंका घ्यावी, त्याची पारख करावी आणि ज्याच्याविषयी शंका असेल त्याला तर कधीच मोकळा सोडू नये, कारण असा माणूस कुरणात लपून बसलेल्या भयानक भुजंगासारखा असतो. विश्वासास पात्र नसलेल्यावर तर कधीच विश्वास ठेवू नये, पण विश्वासास पात्र असलेल्यावरही एकदम सर्व विश्वास ठेवू नये, कारण असा माणूस म्हणजे एखाद्या वेळी केवळ एका पापुद्रयासारख्या पातळ पडद्यानं झाकलेली हिमाची खोल दरी ठरू शकतो! अशी दरी की, दृढ मनानं आणि विश्वासानं पाय टाकला; तर टाकणाऱ्याला निश्चितपणे आणि विश्वासानं कायमची पोटात घेणारी!

"आपल्या आणि शत्रूच्या राज्यात नेहमीच गुप्त हेर ठेवावेत. केवळ गुप्तचर ठेवूनच भागत नाही, तर अशा गुप्त हेराचं काम प्रामाणिकपणे चाललं आहे की नाही ते पाहण्यासाठी राजानं स्वत: गुप्तचर म्हणून वेष पालटून आपल्या राज्यात फेरफटका मारावा. परराष्ट्रांमध्ये पाठवायचे हेर नास्तिक, अविवाहित आणि कमी बोलणारे असावेत. असले हेर कुठल्याही देवाच्या भयानं वा कुटुंबीयांच्या ओढीनं आपल्या देशाचं रहस्य कधीच फोडीत नाहीत. विहार, प्रार्थनागृहं, मद्यपानगृहं, रस्ते, तीर्थ, चव्हाटे, व्यापारपेठा, अड्डे, वाळवंट ह्या सर्व ठिकाणी राज्याशी प्रामाणिक राहणारे धाडसी गुप्तचर सदैव वावरत असावेत. हेर हे राष्ट्ररूपी, फोफावलेल्या शेताचं रक्षण करणारं चालतं-बोलतं कुंपण असतं, हे कधीच विसरू नये.

"कुठल्याही राष्ट्रानं एखाद्या वृक्षासारखं असावं! हा वृक्ष असा असावा की, ज्यावर सुंदर फुलं असावीत; पण फळं असू नयेत. फळं असलीच तर वृक्षाच्या अंगावर काटे असावेत की, फळापर्यंत कुणाचेही हात कधीच पोहोचू नयेत! फळंही अशी असावीत की, कच्ची असली तरी पिकल्यासारखी दिसावीत आणि कुणीतरी कधीतरी ती खाल्लीच तर त्याला ती कधीच सहजासहजी पचू नयेत! थोडक्यात आपलं राष्ट्र म्हणजे खऱ्या अर्थानं काय आहे, हे इतर कुणालाच कधीही कळू नये. सामर्थ्य आल्यावरच धर्माची सेवा करण्याची घोषणा करावी! कारण सत्य म्हणजे संपत्तीचा दास आणि धर्म म्हणजे सामर्थ्याचा दास! ज्याच्या हातात संपत्ती असते त्याचा कसलाही शब्द सत्य ठरतो! ठरत नसला तरी त्याला ठरवून घेता येतो! आणि ज्यांच्या दंडात सामर्थ्य असतं त्यांचा धर्म श्रेष्ठ ठरतो. ठरत नसला तर तो सामर्थ्याच्या जोरावर ठरविता येतो. म्हणूनच सत्य हे संपत्तीच्या दारातील आणि धर्म हा सामर्थ्याच्या दारातील सदैव हात जोडून उभे राहिलेले दास आहेत! जो कुणी शत्रूशी संधी झाल्यानंतर 'आपण कृतकृत्य झालो' असं मानून गप्प बसतो तो एखाद्या उंचच उंच वृक्षावर झोपल्यासारखा असतो! खाली पडल्यावरच तो जागृत होतो. किंबहुना त्या वेळी तो संपलेलाच असतो, कारण संधी म्हणजे निखळ विजय नव्हे! संधी याचा अर्थ शत्रुपक्षाचं आपण काहीतरी देणं लागतो याची सरळ-सरळ दिलेली लेखी मान्यता असते! म्हणूनच संधी करीत बसण्यापेक्षा शत्रूचं सैन्य निस्त्राण झालं आहे, निसर्गाची आपणाला साथ आहे, शत्रूच्या सैन्यात रोगराई माजली आहे, अन्नधान्याची टंचाई आहे, त्याच्या सैनिकाचं मनोधैर्य ढासळलं आहे, तोवरच त्याला खडे चारावेत. तशी परिस्थिती नसेल, तर तशी निर्माण करून मग

चारावेत. राजानं जीवनाची ही अंगं नेहमीच लक्षात ठेवावीत आणि त्याप्रमाणं वागावं. ते शक्य नसेल तर आपलं राज्य दुसऱ्या योग्य आणि कर्तृत्ववान राजाच्या हाती सोपवून आपल्या अंगाला भस्म फासून सरळ वानप्रस्थाश्रम स्वीकारावा, असं धर्मशास्त्र सांगतात!

"राजाचा जन्म हा केवळ सुग्रास अन्न खाण्यासाठी, भरजरी वस्त्रं पांघरण्यासाठी, सोनेरी मुकुट चढवून राजरथ उडविण्यासाठीच नसतो! त्याच्यासाठी आणि अखिल राज्यासाठी उन्हातान्हात अहोरात्र शेतात राबून – घाम गाळून धनधान्य पिकविणारे कृषिजन काही पकडून आणलेले कोणी दस्यू नसतात! राज्याच्या संरक्षणासाठी आणि आसमंतात त्याची प्रतिष्ठा वाढविण्यासाठी सावरीच्या कापसासारखं आपलं जीवन नीडरपणानं उधळणारे सैनिक काही माथेफिरू नसतात! त्यांच्या रक्ताच्या लाल रंगामुळेच राजाचं पिवळं कातडं चकाकत असतं. त्यांच्या रक्तामांसाच्या खतातूनच राज्याचं रोप वाढत असतं आणि त्याची रसाळ फळं राजा आणि प्रजा चाखीत असतात. त्यांच्या घामाशी आणि रक्ताशी एकनिष्ठ राहू शकत नाही तो राजा तरी कसला आणि ते त्याचं राज्य तरी कसलं?

"महाराज, आवर्जून सांगावंसं वाटतं की, कटू असलं तरी हे सत्य आहे! आणि सत्य कुणाच्याही इच्छेवर चालत वा बदलत नाही! बोलल्याशिवाय राहवत नाही म्हणून मी आज हे स्पष्टपणे बोलतो आहे. शेतातील पीक पशुपक्षयांनी उद्ध्वस्त केल्यानंतर मग गोफण फिरविण्यात कोणताच शहाणपणा नसतो. आपण कौरवश्रेष्ठ आहात म्हणून थोडी जीभ सैल सोडून मी हे बोलू शकलो, कारण कौरवांची सत्यप्रियतेबद्दल निखिल आर्यावर्तात ख्याती आहे. शेवटी आपण आपल्या इच्छेप्रमाणं पटेल तो निर्णय करावा. काळ हा अखंड आहे आणि तोच सर्वांचा न्यायनिवाडा करणारा एकमेव नि:पक्षपाती न्यायाधीश आहे, असा माझा ठाम विश्वास आहे! माझ्या या नीतीतून आपण आपल्या प्रश्नाचं योग्य ते उत्तर शोधून काढालच!"

कणकांनी परत मान लववून प्रणाम केला आणि एखादा धुंद हत्ती जसा चालतो तशी धीरगंभीर पावलं उचलीत उत्तरीय सावरीत ते राजकक्षातून निघून गेले.

दूरवर कुठूनतरी गंगेच्या रोखानं एक टिटवी केकाटत गेली असावी. तिचं ते कर्णकर्कश ओरडणं माझ्या कानांवर आदळलं. क्षणभरच मला वाटलं, 'टिटवी! किती क्षुल्लक जीव! पण आवाजात किती आर्तता आणि भेदकता! आसमंत चिरणारी!'

मला कणकांचा सल्ला मनस्वी आवडला आणि त्यांच्या सल्ल्याप्रमाणं शत्रू लहान असला, तरी त्याची गय करू नये हे सूत्रच मी उचललं! त्या एकाच हेतूनं पांडवांना वारणावताच्या अरण्यात जिवंत जाळण्याची कल्पना माझ्या मनात घोळू लागली. माणसाचं मन हे लांडग्यासारखं असावं! लांडगा कधीही कोकराची मान फोडताना कोकराला काय वाटत असेल, याचा विचार करीत नाही आणि म्हणूनच त्याच्या शेपटीचा झुबका ऐटदार आणि उंच असतो! कोकराला तसा झुबका कधी मिळालेला कुणी पाहिला आहे काय? कुणीतरी दुसऱ्याला पायदळी तुडविल्याशिवाय जगात कुणालाच आणि कधीही मोठं होता येत नाही. मग प्रामाणिकपणाच्या आणि संयमाच्या गप्पा कोणीही अन् कितीही मारोत!

पांडवांना जिवंत जाळण्याची माझी सर्व योजना मी माझ्यासाठी प्राणही अर्पायला तयार असणाऱ्या माझ्या विश्वासू साहाय्यकाला... पुरोचनाला एकांती

सांगितली. पांडवांचं पाप पचविण्याचं सामर्थ्य अग्नीशिवाय अन्य कुणात असणार? आता नेहमीच गुरू द्रोणांसमोर वळवळत बोलणारी त्या काळ्या अर्जुनाची अंजिरी जीभही धगधगत्या अग्निशलाकेत जळून अक्षरश: काळीकुट्ट होईल! अनाठायी फुरफुरणारे त्या उन्मत्त भीमाचे पीळदार दंड किकर वृक्षाच्या गाठाळ लाकडी ओंडक्यासारखे जळून दग्ध होतील! आणि महाराणी म्हणवून घेणारी अध:पतित कुंती त्या जळत्या अग्निलोटांवर क्षणात स्वर्गाची महाराणी होईल! वारणावताच्या अरण्यात जेव्हा त्या ज्वालाग्राही घराचा पुरोचन भडका उडवून देईल तेव्हाच गेली पंधरा वर्षं माझ्या उपेक्षित अंतरात भडकलेला वणवा शांत होईल! उपेक्षेचा धुमसणारा अग्नी शांत करण्याचं सामर्थ्य केवळ सूडाच्या अग्नीतच असतं! म्हणूनच... पुरोचन एकसारखा माझ्या डोळ्यांसमोर नाचत होता. त्याचा बारीक डोळ्यांआड लपलेली मजवरची त्याची एकनिष्ठताही मला स्पष्ट दिसत होती.

**

# चार

पुरोचन मला भेटून वारणावताच्या अरण्याकडे निघून गेला. मी त्याला सावधानतेच्या सर्व सूचना दिल्या. अरण्यातल्या लाक्षागृहाला अग्नीचा भडका देताना मी त्याला श्वासही कोंडून घ्यायला सांगितलं! हो, नाहीतर केवळ श्वास ऐकून, मिटल्या डोळ्यांनी आवाजाचा लक्ष्यभेद अचूक टिपणारा तो अर्जुन नेमका त्याचा कंठनाळ फोडायचा! जळत्या पलित्याच्या फरफरणाऱ्या ज्योतीवर तळहात धरून त्यानं माझ्या कल्पनेतील एक अक्षरही बाहेर फुटणार नाही, यासाठी मर्दिनीची शपथ घेतली. हे जिवावर उलटणारं अघोर कर्म करायला तो तरी का तयार झाला? केवळ अष्ट-मंत्रिमंडळातील एक कुरूंचा मंत्री होता म्हणून? छे! स्वार्थाशिवाय कोण असलं कृत्य करायला तयार होईल?

तो आपल्या योजनेत संपूर्ण यशस्वी होऊन परतला, तर सरळ कुरूंचा अमात्य करण्याचं आश्वासन मी त्याला दिलं! राजकारणात अशी आश्वासनं द्यावीच लागतात! नाहीतरी आमचा सध्याचा अमात्य वृषवर्मा म्हणजे मरुस्थलीचा नुसता वृद्ध उंटच आहे! कधी आपणहून पुढं न जाणारा आणि सोबत प्रवाशांनाही पुढं न जाऊ देणारा! आणि राजकारण तर नेहमीच मरुभूमीसारखं असतं. त्यात वृद्धांचा भरणा म्हणजे प्रगतीचा खेळखंडोबा! मी त्या वृद्ध अमात्याला अर्धचंद्र देणार आहे! जेव्हा-तेव्हा पांडवांपुढं नत होणारी त्याची थरथरणारी मान कुरूंच्या कळसाला काळिमा फासणारी आहे! वृषवर्म्याच्या पदी मी पुरोचनाला नियुक्त करणार आहे! राजकारणात क्षितिजापलीकडे पाहणाऱ्या उभारीच्या अशा तरुणांची नितान्त आवश्यकता असते, हे गेल्या सतरा वर्षांच्या अनुभवानं मला पटलेलं आहे! मला पुरोचनासारखा खंबीर आणि अडिग अमात्य हवाच आहे!

त्यानं जेव्हा वारणावताला जाण्यासाठी हस्तिनापूर सोडलं तेव्हाच माझं मन निर्धास्तपणे विसावलं. पुरोचन राजवाड्याच्या प्राकारातून आपला रथ बाहेर काढत असताना गंगेवरून परतणारा कर्ण त्याला महाद्वारातच भेटणार, हे माझ्या कक्षाच्या गवाक्षातून हेरलं! कर्णानं काही विचारल्यास त्याच्या प्रभावी व्यक्तिमत्त्वामुळे पुरोचन गोंधळून उत्तर देताना कुठंतरी घसरेल म्हणून मी माझ्या सेवकाला... प्रभंजनाला कर्णाला सत्वर बोलावून आणण्यासाठी माझ्या कक्षातून पिटाळला! कुणालाही जाळण्याची कल्पना कर्णाला कधीच पटली नसती! आपल्या मातापित्यांना घेऊन त्यानं तडक चंपानगरीच गाठली असती, हे मला माहीत होतं! त्याचं जीवन खऱ्या धनुर्धरासारखं होतं – चापातून सुटलेल्या बाणासारखं नाकासमोर जाणारं! राजकारण त्याचा प्रांतच नव्हता.

क्षणार्धात प्रभंजन कर्णापुढं उभा राहिला आणि त्यानं कौशल्यानं पुरोचनाला त्याच्या प्रश्नावलीतून मुक्त केला! पुरोचन मागं वळूनही न पाहता निघून गेला. सैरभैर समुद्रवाऱ्यासारखा!

वारणावताच्या अरण्यात तो ताग, राळ, बल्वज, भुंज आणि लाक्षा यांच्या घृतात

मळलेल्या चुन्याच्या भिंतींचं एक ज्वालाग्राही घरकुल बांधणार होता. आकर्षक आणि टुमदार! त्या घराचं छप्पर चांगल्या वाळलेल्या वेळूंचं तयार होणार आहे! महाराजांच्या आग्रहावरून नीच पांडव आपल्या लाडक्या मातेसह हवापालटासाठी आणि वनविहारासाठी वारणावतावर जाणार आहेत. रात्री सर्व जण विश्रामासाठी त्या पुरोचनानं बांधलेल्या टुमदार गृहात राहणार आहेत. दिवसभराच्या पायपिटीनं आत्यंतिक भागलेल्या त्या सहाजणांना गाढ निद्रा लागणारच! आणि मग त्या निद्रेचं पुरोचन महानिद्रेत रूपांतर करणार! ते सर्व निद्राधीन झाल्यावर मध्यरात्रीनंतर पलित्यानं पुरोचनानं त्या घराला आग लावून दिल्यानंतर, बाहेरून सर्व द्वारं बंद केलेल्या त्या लाक्षागृहातून पांडव कुठे जाणार आहेत? भडकलेल्या, भकभकणाऱ्या ज्वाळांबरोबर सरळ स्वर्गलोकालाच! बिळातील भुजंग बिळाच्या मुखावर धूमी घातल्यानंतर धुरानं तडफडून मरतात तसे ते गुदमरून आणि जळून मरणार आहेत! हस्तिनापुरात न मिळालेलं कुरूंचं वैभवी राज्य ते खरोखरच पांडुपुत्र असतील, तर स्वर्गातसुद्धा मिळवतीलच!

पुरोचनाला जाताना मी शेवटची आणि निर्वाणीची राजमात्रा दिली. परत येताना, लाक्षागृह जळून शांत झाल्यावर राखेच्या ढिगाऱ्यातून त्या उद्दाम भीमाचं प्रेत बाहेर काढून त्याची होरपळून काळी पडलेली उजव्या हाताची करपलेली करंगळी कापून आणायला सांगितलं आहे मी त्याला! सहस्त्र प्रेतांतूनही त्या थोराड रानरेड्याचं प्रेत कुणीही ओळखील! त्यानं आणलेली करंगळी एका चांदीच्या पेटीत भरून ती पेटी मी माझ्या डाव्या दंडात बांधणार आहे! जेव्हा-जेव्हा माझ्या डाव्या दंडाचा सहजपणे छातीला स्पर्श होईल तेव्हा-तेव्हा त्या अरण्यवराहाच्या भयानं गोठलेल्या माझ्या काळजाला ती पेटी धैर्य देत राहील. 'भीमाची राख वारणावताच्या अरण्यात धूळ खात पडेल!'

'आखाड्यात गदेची मंडलं घेऊन आपल्या अवजड गदेचे असह्य प्रहार माझ्या पाठीत निर्दयपणे मारणाऱ्या भीमा, तुला काय माहीत आहे की, जीवन म्हणजे सुद्धा एक गदेचा आखाडाच आहे! इथं नित्य मंडलं घ्यायची असतात! गरगरणारी आवर्तं! नाकासमोर धावायला ही काही रथांची शर्यत नाही!'

सर्व जण म्हणतील की, हे एक क्रौर्य आहे. माझा सर्वांना एकच प्रश्न आहे की, गुरू द्रोणांनी सहस्त्र योद्धयांमधून एकटच्या अर्जुनाचंच माजविलेलं अवडंबर हा एक मानसिक क्रौर्याचाच प्रकार नव्हता काय? माझ्या चार-चार भावांना लहानपणी पाण्याच्या तळाशी कवेत मारून कोंदटून ठेवणाऱ्या भीमाला कोणी दयाळू म्हणेल काय? आखाड्यात वीरश्रेष्ठ कर्णाला त्याचं कुल विचारून हिणविणारे कृपाचार्य क्रूर नव्हते काय? त्या विक्रमी वीराला क्षणात त्याचा अंगराज म्हणून जयघोष करून दुसऱ्या क्षणी "सूतपुत्र! सूतपुत्र!" म्हणून दात विचकटून त्याला हसणारे नगरातील शेकडो, सहस्त्र नगरजन क्रूर नव्हते, तर आणखीन काय होते? कोण देणार या प्रश्नांची समर्पक आणि समाधानकारक उत्तरं? म्हणून मी म्हणतो की, कितीही दया, क्षमा, शांतीची दुंदुभी पिटली तरी प्रत्येक माणसात क्रौर्याचा अंश हा राहणारच! मी स्वत:ला धन्य मानीत होतो तो यासाठीच की, मी माझं क्रौर्य हे पांडवांच्या पापी पंचकडीला दग्ध करण्यासाठी उपयोगात आणीत होतो!

अश्वत्थामा म्हणतो, "जग कधीकाळी सुंदर होईल!" त्याच्या या म्हणण्यावर माझा तिळमात्रही विश्वास नाही! आणि तसं ते खरोखरच होणार असेल, तर मी

त्यातील एक नाव घेण्यायोग्य सिंहाचा वाटाच उचलत नव्हतो काय? पांडव महाराज पांडूचे पुत्र नाहीत, हे मला पक्कं माहीत असताना मी त्यांना जिवंत ठेवलं असतं तर मी माझ्या वंदनीय चुलत्यांवर... त्यांच्या धवल कीर्तीवर अन्याय केल्यासारखं झालं नसतं काय? म्हणूनच पापी पांडवांना रसरशीत अंगारांतून जाळून शुद्ध करण्याच्या पवित्र कार्यावर मी माझा मंत्री पुरोचन याला पाठविलं.

यात माझं काय चुकलं?

शेवटी महाराजांनी गोड शब्दांची पखरण करून कुंतीसह पाची पांडवांना वारणावताच्या अरण्याकडे 'हवापालटा'साठी पाठविलं. महाराजांच्या अंधत्वाबद्दल त्यांना अपंग म्हणणाऱ्यांना हे कळतच नव्हतं की, त्यांची जीभ हेच त्यांचे डोळे होते! राजकारणातील अनेक समस्या आपल्या गोड बोलण्यानं त्यांनी सहज हातावेगळ्या केलेल्या मी प्रत्यक्ष पाहिल्या होत्या. त्याच मधुर वाणीनं त्यांनी पांडवांना हवापालटाचं सहज पटणारं सुंदर कारण सांगून वारणावताच्या घनदाट अरण्याकडे पिटाळलं.

ते खरोखरच हवा पालटतील! स्वर्गातील हवा पृथ्वीपेक्षा फारच आरोग्यवर्धक असते, असं विद्वान ऋषिजन आणि प्रतिभाशाली महाकवी म्हणतात!

जेव्हा ते पाच वटवृक्ष जळून राख होणार होते तेव्हाच माझं पेटलेलं अशांत मन निवणार होतं! मन! मनाला कुणी सुगंधी पुष्प म्हणतात, कुणी खळाळत वाहणारी रम्य सरिता म्हणतात, कुणी निरभ्र निळसर आकाश म्हणतात, तर कुणी सतत तेवणारी विधात्याची अद्भुत ज्योत म्हणतात! पण सूडाच्या आणि प्रतिशोधाच्या भावनेनं भडकलेलं हेच मन म्हणजे काय असतं, हे मात्र कुणीच विद्वान सांगत नाही! सूडाच्या भावनेनं भडकलेलं मन म्हणजेही एक सुगंधी पुष्पच असतं! पण त्याचा सुगंध असा असतो की, कुण्या गंधमुग्ध रसिकानं गंधमोहानं ते हाती घेऊन क्षणभर जरी ते हुंगलं तरी त्यानं धाडकन धरतीवर लोळण घ्यावी! कारण त्यातील सुगंध विषारी असतो! असं सूडग्रस्त मन एखाद्या नदीसारखं असतं! पण त्या वेळी ती तासातून वाहणारी धीरगंभीर आणि शांत नदी नसते, तर अक्राळविक्राळ लाटांच्या गर्जना करीत महापुराचं अफाट पाणी आवतीभोवतीच्या भूप्रदेशावर थडाथड फेकीत, क्षणाक्षणाला तास कापीत सुसाट धावणारी ती एक प्रलय-नदी असते! सूडानं पेटलेलं मन म्हणजेही एक आकाशच असतं! पण ते निळंभोर निरभ्र आकाश नसतं! काळ्याकुट्ट ढगांनी भरलेलं ते आकाश असतं! कधी-कधी या गतिमान ढगात पृथ्वीला उभा चिरणारा विजेचा लोळही असतो! सूडानं भडकलेलं मन म्हणजे एक ज्योतही असते! पण ती मंद-मंद तेवणारी ज्योत नव्हे; तर पलित्याची भकभकणारी ज्योत असते!

लहानपणापासून माझं मन त्या पांडवांच्या प्रत्येक ठिकाणाच्या अरेरावीनं पेटत आलं होतं. गदायुद्धाच्या शालेत सरावाच्या वेळीही भीमानं मला – एखादा कृषिजन वृषभाला बदडतो तसं – निर्दयपणे बदडून काढलं होतं. त्याच्या पायदळी माझ्या जीवनाचं राजकमल क्षणोक्षणी तुडवलं गेलं होतं. पाकळ्या उद्ध्वस्त झाल्या होत्या. उरला होता काळा देठ! मीसुद्धा युवराज होतो, मलासुद्धा मन होतं, भावना होत्या. पण माझ्या स्वाभिमानाची नाजूक कळी त्या रानगट भीमानं आपल्या पायांखाली अनेक वेळा चिरडून टाकली होती. तिच्या कुस्करलेल्या आणि धुळीत विखुरलेल्या पाकळ्या एकत्र करताना दुर्योधन हा असा निर्माण झाला होता. हे सत्य कोणीच समजून घेत नाहीत. माणसाला माणूस म्हणून वाटणारी मायासुद्धा माझ्या मनात त्या पांडवांविषयी मुळीच शिल्लक

राहिली नव्हती. का राहावी? तो भीम माजलेल्या रानडुकरासारखा सर्वांना धडक देण्याच्या उद्दाम वल्गना करीत होता. मला तर त्यानं अनेक वेळा धडकलंही होतं. स्पर्धेच्या दिवशी आखाड्यात किती उर्मटपणानं त्यानं कर्णाला, 'कुलाला शोभणारा प्रतोद हातात घेऊन घोड्यांना खरारा कर', असं सांगितलं. कर्ण म्हणजे काय केव्हाही पायाखाली तुडवावा असा पालापाचोळा वाटला की काय त्याला? आपल्या मंद बुद्धीमुळे त्या पांडवांतल्या निर्बुद्ध हत्तीनं कळत-नकळत कौरव-पांडवांच्या द्वेषाचा अंगार फुलविला होता. त्याच्या हे कधीच लक्षात आलं नाही की, बलाढ्य हत्तीला प्रसंगी एक साधी मुंगीसुद्धा स्वर्गाची वाट दाखवू शकते. इतस्तत: वाढलेल्या घनदाट अरण्याची एखादी क्षुल्लक ठिणगी क्षणात राख करू शकते. एखादा काळा ढग सहस्त्ररश्मी सूर्याला क्षणात झाकाळून टाकू शकतो. जगात आपण एकटे काय ते सामर्थ्यशाली आहोत, ही कुणाचीही वल्गना व्यर्थ असते आणि म्हणूनच स्वत:ला सामर्थ्यशाली मानणाऱ्या भीमाला मी तेच दाखविणार आहे. शक्तीच्या जोरावर ते मला एकट्याला शक्य नसलं तरी संपत्तीच्या आणि बुद्धीच्या जोरावर मी ते शक्य करणार आहे. आणि म्हणूनच पुरोचनाला सर्व आवश्यक त्या सूचना देऊन मी वारणावताकडे पिटाळलं होतं. राज्यव्यवस्थेत असे काही हस्तक असावेच लागतात! हस्तकाशिवाय राज्यव्यवस्था म्हणजे धडाशिवाय मस्तक!

पुरोचन काय वार्ता आणतो इकडे माझं लक्ष लागलं. एखादी प्रणयिनी आपल्या प्रियकराची पाहत नसेल एवढ्या आतुरतेनं मी त्याची वाट पाहत होतो. तो खात्रीनंच यशस्वी होणार! मी माझ्याभोवती गोळा केलेली माणसं म्हणजे काही अहिछत्राची यात्रा नव्हती.

**

## पाच

शाब्बास पुरोचना! आपल्या राजाचे मनोरथ तू पूर्ण केलेस! हां-हां म्हणता तुझा दूत त्या रानगट भीमाची करपलेली करंगळी घेऊन माझ्यासमोर उभा ठाकला. धन्य आहे तुझ्या स्वामिनिष्ठेची. कुरूंचा राजा म्हणून अभिषेक झाल्यानंतर आर्यावर्तातील सर्व पवित्र नद्यांचं जलतीर्थ म्हणून माझ्या तळहातावर पडल्यानंतरही जेवढा आनंद माझ्या मनाला वाटणार नाही, तेवढा या करपलेल्या करंगळीकडे बघून वाटतो. हे पुरोचना, जे कुणालाही शक्तीच्या जोरावर कधीही शक्य नव्हतं, ते आज तू बुद्धीच्या जोरावर शक्य करून दाखविलंस तर! सिंहालाही न भिणारा भीम आज तू केवळ गवताच्या काड्यांनी जाळून टाकलास. पुरोचनानं वार्ता देऊन धाडलेल्या सेवकाकडे पाहताना एकच चित्र माझ्या डोळ्यांसमोर उभं राहत होतं. कसे मेले असतील ते पांडव? उकळत्या पाण्यात कंदमुळं उकडली जातात तसे? की यज्ञाच्या धगधगत्या होमकुंडात समिधांची लाकडं जळून खाक होतात तसे? काय, काय वाटलं असेल त्यांना मरताना? माझी खात्री आहे, मरताना त्यांनी माझ्या नावाचा केविलवाणा आक्रोश करून मला लाखोली वाहिली असेल. त्या राजमाता म्हणविणाऱ्या कलंकित कुंतीनं कडकडून मिठी मारून अर्जुनाच्या रूपानं मिरविणारं ते काळ्या रंगाचं पाप कायमचं आपल्या उदरात घेतलं असेल. वेड्या अबले, कुरूंचं सोमवंशाचं हे राज्य आहे. कोणतीही वारांगना या राज्याच्या सिंहासनाच्या आजूबाजूलासुद्धा फिरकू शकत नाही. काल तू कौरवांची राजमाता होतीस. कुरूंचा अजिंक्य वैभवशाली राजदंड तुझ्या चरणांपुढं झुकत होता. आपलं पाप कुणाच्याच लक्षात येत नाही, या कल्पनेनं तुझं कोडगं मन आपल्या पोरांना राज्याभिषेक झाल्याची सुखस्वप्नं पाहत होतं, पण आज – आज मात्र तू मृत्यूच्या पायातील माती झालीस. केवळ माती! वारणावताचं घनदाट अरण्य हे पांडवांची दहनभूमी ठरली! सगळे नगरजन त्या पांडवांना सिंह म्हणत होते. ठीकच आहे. त्या सिंहांना अशा अरण्यातच चिरविश्रांती मिळाली! आणि म्हणूनच वारणावत हे माझं आजपासून तीर्थक्षेत्र झालं आहे. पांडव जळाले! आणि माझं नित्य जळणारं मन आज शांत झालं आहे.

ही सर्व किमया करणारा पुरोचन मात्र परत आला नाही! तो त्या लाक्षागृहात तर जळून गेला नसेल ना? माझं मन तर मला पुन:पुन्हा हेच सांगत आहे की, स्वत:ची स्वामिनिष्ठा सिद्ध करण्यासाठी त्यानं हा मार्ग स्वत:च पत्करला असावा! स्वर्गाची वाट पांडवांना शेवटपर्यंत दाखविण्यासाठी तो मृत्युलोक सोडून केवळ माझ्यासाठीच त्या पांडवांबरोबर गेला असावा! जा पुरोचना, निर्धास्तपणे जा! तुझी अर्धांगी तशीच कुटुंबातली इतर सर्व माणसं यांची जबाबदारी आजपासून दुर्योधनानं आपल्या समर्थ स्कंधावर घेतली आहे. तुझ्या पराक्रमाचं प्रतीक म्हणून लवकरच मी वारणावतावर मर्दिनीचं एक मंदिर बांधून ते एक तीर्थक्षेत्र म्हणून घोषित करणार आहे. ज्या दिवशी तू राजनिष्ठेसाठी हे सुंदर जग सोडलंस त्या दिवशी प्रतिवर्षी वारणावतावर एक प्रचंड यात्रा भरेल. जा. शांतपणे! तुझ्या नावावरून सर्व जण आता त्या अरण्याला पुरोचनारण्य म्हणतील!

**

# सहा

पुरोचना, अरे पांडव वारणावताला जाऊन पोहोचल्याची वार्ता येते न येते तोच पाठोपाठ ते जळून मेल्याची वार्ता तुझा दूत आणतो काय? तुझ्यासारखे प्रामाणिक आणि तत्पर सेवक आहेत, म्हणूनच या दुर्योधनाची छाती सदैव उन्नत आहे. तू जिवंत परत आला असतास, तर तुला महाद्वारात मी कडकडून मिठी मारली असती. तुझी स्वामिनिष्ठा तुझ्या प्रत्येक कृतीतून स्पष्ट झाली आहे. या दुर्योधनावरच्या प्रेमासाठी एक चंचल मनाची हरिणी तिच्या पाच शावकांसह जाळून खाक केलीस तू. इतकं करूनच तू थांबला नाहीस. आपल्या राजासाठी एक अतिशय आनंदाची वार्ताही तू दूताकडून पाठवून दिलीस.

पांचाल देशाच्या युवराज्ञी याज्ञसेनीच्या स्वयंवराची वार्ता घेऊन तुझा सेवक राजनगरात आला तेव्हा माझ्या मनाची कारंजी उफाळून उधळू लागली! पांचालांची युवराज्ञी याज्ञसेनी! द्रुपद राजाची रूपगर्विता कन्या द्रौपदी! मी असं ऐकलं होतं की, तिच्या सर्वांगाला सुगंध येतो. याज्ञसेनी म्हणजे सुगंधाची चालती-बोलती जिवंत कुपी आहे. वर्णानं ती थोडीशी सावळी आहे म्हणे. म्हणूनच सावळ्या रंगाच्या; पण धुंद गंधाच्या भुईचाफ्याच्या फुलासारखी ती दिसत असणार! द्रुपद राजानं संततीसाठी केलेल्या महायज्ञातून ती आली आहे. मी तिला स्वयंवराच्या पणात जिंकीन, द्रुपदाच्या बलशाली राज्याशी कुरूंचे रक्ताचे संबंध येतील. नाहीतरी द्रौपदीसारखं रत्न हस्तिनापूरच्या राजमुकुटाशिवाय इतरत्र कसं शोभून दिसणार? पुरोचनानं ही वार्ता स्वत: आणली असती, तर मी त्याला कंठातील पुष्कराजाचा गुंफ उपहार म्हणून दिला असता!

कर्णासारखा पाठीराखा, द्रौपदीसारखी अर्धांगी, दु:शासनासारखे बलदंड नव्याण्णव भाऊ, दु:शलेसारखा शकुनीमामांसारखे कुशल राजकारणपटू आणि पुरोचनासारखे तळहातावर मस्तक घेऊन माझ्यासाठी केव्हाही मरायला तत्पर असलेले शेकडो- हजारो सैनिक यामुळे कौरवांचा राजदंड या आर्यावर्तात हिमालयासारखा उंच राहील! मी माझ्या समर्थ दंडानं तो पेलीन.

माझं हे एक सुखस्वप्न होतं! आणि प्रत्येक जिवंत माणसाचं कोणतं ना कोणतंतरी सुखस्वप्न असतंच असतं. ते साकार करण्यासाठी तो जीवनभर प्राणपणानं लढत असतो. मीही तसाच लढणार होतो. अखंड धडपडणार होतो. एकसारखी धडपड हाच जीवनाचा अर्थ आहे! आपल्या कल्पना मूर्त करायच्या असतील तर एकसारखी, अविरत, अखंड धडपडच करावी लागते. त्यावरच राज्यं उभी राहत असतात!

माझ्या मार्गातला पांडवांचा एक मोठा अडथळा कायमचा दूर झाला होता. पांडव गेले होते. त्यांच्या स्मृती तरी कशाला? केवळ स्मृतीतून कर्तृत्वशून्यताच निर्माण होते. लवकरच त्या पांडवांचं ‘दिवसा’चं एक मोठं भोजन घालून मी त्यांच्या मृत्यूवर राजमुद्रा ठोकायचं ठरविलं आहे! रडायचं नाटक मला जमणार नाही म्हणून ते काम मी शकुनीमामांकडे दिलेलं आहे. नगरजन ते भोजन जेवणार आहेत आणि ढेकरांबरोबर

पांडवांना विसरूनही जाणार आहेत. राजाला नेहमीच हे असं वागावं लागतं. राजाचं जीवन हे काही बाणासारखं सदा नाकासमोर जाणारं नसतं. कधी ते गदेसारखं गोल फिरतं, कधी ते खड्गासारखं आडवेतिडवे प्रहार करतं, कधी-कधी तर भृशुंडीसारखी नुसतीच दगडांची फेक ते करतं!

सत्य हे राजाचा मार्ग ठरवीत नसतं. राजा ठरवील तोच मार्ग सत्य म्हणून समाज स्वीकारीत असतो!

पांडवांच्या मृत्यूची वार्ता शकुनीमामांनी कर्णाला सांगितली. मला वाटलं होतं की, तो त्या वार्तेनं खुलून जाईल! पण मामांनी जे सांगितलं ते एकून मी स्तब्धच झालो. ‘पांडव गेले’ असं ऐकताच तो म्हणे आपल्या मस्तकाला तळहातांनी घट्ट धरून क्षणभर मटकन खालीच बसला! “त्यांचा घात कुणी केला? ते पाच वीर मारणारा कोणता बलवान योद्धा निघाला? राजमाता कुंतीदेवी तरी सुरक्षित आहेत काय?” अशा प्रश्नांचा त्यानं मामांवर भडिमार केला.

मामांनी त्याला तितक्याच शांतपणे सांगितलं, “ते अपघातानं वारणावताच्या अरण्यात जळून गेले. राजमाता कुंतीदेवी तरी वाचायला पाहिजे होत्या, पण दैवापुढं कुणाचं काय चालणार?”

ते ऐकून तो काहीच बोलला नाही. शेवटी कंटाळून शकुनीमामा त्याच्या कक्षातून निघून गेले. तो त्यांच्याशी एकही शब्द बोलला नाही. गवाक्षातून एकटक तो नुसता गंगेच्या पात्राकडे पाहत राहिला!

संध्याकाळी स्वत: त्याची भेट घ्यावी म्हणून मी त्याच्या कक्षाकडे गेलो, पण शोणानं मला सांगितलं की, तो इतर कुणाला काहीच न सांगता केवळ मला ‘मी चंपानगरीला जातो आहे’ एवढंच सांगून एकटाच निघून गेला.

पंधरा दिवस तरी तो मला आता राजनगरात भेटणार नव्हता. हस्तिनापुराला तो परत येईलच. आलाच नाही तर? एक शंका माझ्या मनात दाटू लागली.

**

# सात

बरेच नगरजन पांडवांच्या उत्तरक्रियेचं जेवण जेवून गेले. स्वत: मीच पंचपक्वांत्रांचा आग्रह करून सर्वांना वाढलं होतं. 'पांडव गेले' असं सांगताच काही जण हळहळले. काही जण सरळ-सरळ रडले, काहींनी राजमाता कुंतीच्या भित्तीचित्राला भावविवशतेनं लोटांगणच घातलं. खरोखरच हस्तिनापूर अंधश्रद्धेच्या भोळ्या आणि व्यक्तिपूजक लोकांनी कसं नुसतं बजबजून गेलं आहे! कधी कुणीही मेलं की, हे लोक नुसतेच रडतात! मला तर कधी-कधी अशी शंका येते की, ही गंगानदी हिमालयाचं हिम वितळून निर्माण झाली नसून केवळ या दुबळ्या मनाच्या रडक्या लोकांच्या अश्रूंनीच निर्माण झाली असावी! रडून आणि छातीच्या बरगड्या पिटून घेऊन का कधी गेलेलं माणूस परत येत असतं! पण हे अशांना कुणी पटवायचं? सगळेच रडगाणं गात बसलेले. जनसमुदाय हा मूर्ख असतो हेच खरं!

या प्रसंगातून शकुनीमामा किती बुद्धिमान आणि कुशल आहेत, याचा मला आणखी एकदा अनुभव आला. मी त्यांना माझा हितकर्ता मानलंच होतं, पण आता या प्रसंगानं त्यावर निश्चितीची राजमुद्रा ठोकली गेली.

भोजनासाठी आलेल्या सर्व नगरजनांना 'पांडव गेले' असं उत्तरीयाचं टोक डोळ्यांना लावून सांगत ते शेवटी म्हणाले, "दुर्दैवं तुमचं आणि आमचं की, पांडवांची मृत शरीरं दहनासाठीसुद्धा आपल्या हाती मिळू शकली नाहीत. आमच्या या क्षुद्र हातांनी जणू त्या पुण्यवंतांना भडाग्नीसुद्धा घ्यावा असं वाटलं नाही!" मामांचे ते मानभावी उद्गार सर्वांना ज्वलंत आणि जिवंत भावनांसारखे वाटले! "त्यांच्या आत्म्यांना शांती लाभावी यासाठीच हे भोजन आहे. ते तुम्ही घेतलं नाहीत तर त्यांना शांती लाभणार नाही." मामांच्या त्या उद्गारांनी सर्वांनाच कोंडीत पकडलं! प्रत्येक जण भोजन घेऊन गेला. मामा हा माझा चालता-बोलता बस्तिक बाण होता. कुठंही मारावा; अयशस्वी ठरणार नाही. शेपटी बाहेर निघाली तरी निदान पातं तरी लक्ष्यात अडकून राहीलच.

सर्वांत शेवटी आम्ही सर्व कौरव भोजनासाठी बसलो. मामाही होतेच, पण माझ्या पहिल्याच घासाला एक दूत धापा टाकीत एक विश्वास न ठेवता येण्यायोग्य वार्ता घेऊन आला. वरखाली होणारं वक्ष सावरीत तो तुटक स्वरात म्हणाला – "महाराज, दक्षिण पांचालांच्या राज्यात कुणीतरी ब्राह्मणपुत्रानं हिडिंब... आणि बकासुर या अजिंक्य... नरमांसभक्षक राक्षसांना द्वंद्वयुद्धात नुसत्या बुक्क्यांनी ठार मारलं आहे!!" ती वार्ता ऐकताच, भीम अजून जिवंत आहे की काय अशी एक शंका माझ्या मनात तरळून गेली आणि घशातला घास घशातच अडकला! पण ती जीवघेणी शंका मी क्षणात निर्धारानं दूर सारली, कारण शंका ही घायपातासारखी असते! एकदा का तिनं मूळ धरलं की, ती वाढतच जाते आणि शेवटी तिचं दाट गचपणात रूपांतर होतं. दंडातील चांदीच्या पेटीवरून मी क्षणभर तळहात फिरविला तेव्हाच मला थोडं समाधान वाटलं! पुरोचनानं दिलेली दग्ध भीमाची करपलेली काळी करंगळी त्या पेटीत होती! माझं मन स्थिर झालं. त्या दिवशी मी आकंठ भोजन घेतलं! त्यावर केशरमिश्रित सुगंधी तांबूल खाल्ला!

**

# आठ

कितीही निधड्या छातीचा असलो तरी शेवटी मीही एक माणूसच होतो आणि म्हणूनच कधी-कधी माझं मन मी केलं ते चूक की बरोबर, या प्रश्नाच्या सतत माऱ्यानं भांबावून जाई. माणूस बुद्धीच्या आणि संपत्तीच्या जोरावर जगाला सहज फसवू शकतो, पण आपल्या मनाला फसविता येणं कुणालाच शक्य नसतं. ज्याच्या-त्याच्या खऱ्या व्यक्तिमत्त्वाचं प्रतिबिंब ज्याच्या-त्याच्या मनाच्या दर्पणात स्पष्ट पडलेलं असतं. प्रत्येक माणूस आपल्या एकांतवेळी या दर्पणात स्वत:चीच विविध रूपं पाहत असतो. काही-काही वेळा ही रूपं आकर्षक व अभिमान वाटण्यासारखी असतात, पण बऱ्याच वेळा ही रूपं डोळ्यांपुढं येऊसुद्धा नयेत असं वाटतं. कोणतीही वाईट गोष्ट करण्यापूर्वी आत्माभिमानातून, धैर्यातून वा कुतूहलातून निर्माण झालेली खोटी उभारी प्रत्येकात असते, पण ती गोष्ट या उभारीतून एकदा होऊन गेली की मग मात्र मन उरी बाण लागलेल्या श्वापदासारखं कुणाचातरी समर्थ आश्रय शोधण्यासाठी इतस्तत: धावू लागतं. कुणाला सुदैवानं हा आश्रय मिळतो – कुणाला जीवनभर तसंच धावत राहावं लागतं.

पांडवांना जिवंत जाळण्यात मी काय मिळवलं? कुरुवंशातल्या राजकुमाराला आणि पितामह भीष्मांच्या आप्ताला हे भूषणावह होतं काय? हे आणि असे अनेक प्रश्न माझ्या मनात घोळू लागत. हे राज्य आणि ही संपत्ती आजवर कुणीतरी आपल्याबरोबर नेली आहे काय? या दिग्विजयी कुरुवंशात अनेक राजे होऊन गेले. त्यांनी युद्धं केली, अश्वमेधाचे घोडे साऱ्या आर्यावर्तात फिरवले, अमाप संपत्तीचा यथेच्छ उपभोग घेतला, पण मातीत खेळणारं लहान मूल आपल्या हातातील क्षणापूर्वी प्राणप्रिय वाटणारं खेळणं मातीत तसंच टाकून क्षणभरात दुसरीकडे निघून जातं तसं ते आले आणि निघून गेले! कुठं निघून गेले? कुठून आले होते ते? काय शिल्लक राहिलं त्यांचं? केवळ स्मृती! बऱ्यावाईट, उथळसखोल, स्फूर्ती देणाऱ्या आणि लाजविणाऱ्या! उद्या माझ्यामागं माझ्याही अशाच स्मृती राहतील. कशा असतील त्या? पांडवांना मीच जाळलंय हे जर कुणाला कळलं तर...? छे! काहीच समजत नव्हतं. माझं मन मग उगाच विंचवानं आपलीच नांगी फिरवून वाकडी करून आपल्याच पाठीत त्वेषानं मारावी, तसं त्या विचारांनी स्वत:लाच दोष देऊ लागे. मन अस्थिर होऊन जाई. त्या पाच भावांचे हसरे चेहरे एकसारखे डोळ्यांपुढे फेर धरून नाचायला लागत. मन गोंधळून जाई!

मन! खरोखरच माणसाला मन नसतं तर! कुणी सांगावं कदाचित तो सुखीही झाला असता, पण कसं शक्य आहे ते? मनाशिवाय माणूस म्हणजे दंडाशिवाय गदा! छे! मनाशिवाय जीवन तर अपूर्णच असेल तर ते असावंही! पण एवढं गुंतागुंतीचं नसावं. या आणि अशा अनेक परस्परविरोधी विचारांनी मी गोंधळून जाई. अशा प्रत्येक वेळी एकच एक व्यक्ती मला नेहमीच आशेचा एक प्रभावी किरण दाखवीत असे. आणि ती म्हणजे अश्वत्थामा! कर्णाबरोबर तो नेहमीच राजवाड्यात येत असे. त्याला आणि कर्णाला एकत्र पाहिलं की, एखाद्या अफाट नदीकाठी एक सुंदर मंदिर पाहिल्यासारखं वाटत असे!

कर्ण हा त्याच्या भरदार आणि घोटीव सोनेरी शरीरामुळे नदीसारखा दिसे, तर अश्वत्थामा हा त्याच्या नितळ आणि शांत चेहऱ्यामुळे मंदिरासारखा वाटे!

पांडवांच्या अशा आठवणींमुळे कधी नव्हता तो, 'जीवन म्हणजे काय?' हा प्रश्न माझ्या मनात वारंवार डोकावू लागला. मी अश्वत्थाम्याला विचारलं, "गुरुपुत्रा, जीवन म्हणजे काय?"

तो शांतपणे म्हणाला, "राजा, जीवन म्हणजे काय हे अनेक प्रकारांनी सांगता येईल, पण तुझ्यासारख्या कुरुवंशातल्या वीराला पटेल अशा भाषेत सांगायचं म्हटलं तर जीवन म्हणजे म्यानातलं खड्ग!"

"म्यानातलं खड्ग? ते कसं काय?" मी आश्चर्यानं विचारलं.

"होय राजा. माणसाचं शरीर हे म्यानासारखंच असतं आणि त्याचं मन हे त्या म्यानातील खड्गाच्या तीक्ष्ण पात्यासारखं असतं!"

"व्वा, अश्वत्थामा, चांगली कल्पना आहे तुझी जीवनाबद्दलची!"

"नाही राजा, अजूनही या कल्पनेत एक अपूर्णता आहे."

"कोणती?"

"आणि अशा या जीवनरूपी खड्गाची आत्मा ही एक मूठ असते!"

"आत्मा ही खड्गाची मूठ?"

"होय. आत्मा हा त्या जीवनरूपी खड्गाची मूठच आहे. म्हटलं तर त्या मुठीचा त्या खड्गाशी आणि म्यानाशी संबंध आहे, म्हटलं तर नाही, पण मूठच नसली तर खड्ग चालेल काय? म्यानाला शोभा येईल काय? आत्म्याविना शरीराचं आणि मनाचंही तसंच आहे. आत्म्याशिवाय ना शरीराला अर्थ ना मनाला!"

"मग अश्वत्थाम्या, शरीर नष्ट झाल्यानंतर आत्म्याचं काय होतं, तुझ्याच कल्पनेत विचारायचं तर म्यान नष्ट झाल्यानंतर मुठीचं काय होतं?" माझ्या मनातून पांडवांची स्मृती काही अजूनही जात नव्हती.

"चुकतोस राजा. म्यानाचा नाश पावल्यानं मुठीला काय होणार? ती खऱ्या अर्थानं म्यानात कधी असते तरी काय? असली तरी ती पात्याच्या रूपानं! मनाच्या रूपानं आत्म्याचं कार्यही शरीरात तसंच चालू असतं. म्हटलं तर शरीरात आहे म्हटलं तर नाही. थोडक्यात सांगायचं म्हटलं तर, आत्मा हा सर्पासारखा असतो!"

"आत्मा आणि सर्पासारखा! किती आश्चर्यकारक बोलतो आहेस आज तू गुरुपुत्रा! आत्मा सर्पासारखा कसा असेल?"

"होय. सर्प जसा एक कात टाकून दुसरी नवी कात धारण करतो तसा आत्माही एक शरीर टाकून दुसरं धारण करतो." अश्वत्थामा नितांत शांतपणे म्हणाला. त्याचे काळेशार टपोरे डोळे आत्मविश्वासानं चमकत होते. जणू तो डोळ्यांनीच सांगत होता की, 'आश्चर्यानं बघू नकोस, मी म्हणतो हे सत्य आहे.'

माझं कुतूहल जास्तच वाढलं. तो प्रश्नांची उत्तरं देताना निश्चितपणे कुठंतरी सापडेल या विचारानं मी त्याला परत छेडला, "अश्वत्थामा, आत्म्याला सर्पाची उपमा देणारा तू खरोखरच बुद्धिमान आणि कल्पक आहेस, पण असा हा तू म्हणतोस तो आत्मा एक शरीर टाकून दुसरं धारण करतो म्हणजे पुनर्जन्म आहे असंच तुला म्हणायचं आहे की काय?"

"होय राजा, मी तुला आता माझ्यासमोर पाहतो आहे, हे जितकं सत्य आहे

तितकंच प्राण्याला पुनर्जन्म आहे हेही सत्यच आहे. कारण माणसाच्या शरीरात असलेलं चैतन्य हे अमर आणि अमरच आहे.''

त्या भीमानं पुनर्जन्म घेतला असेल तर? केवळ या कल्पनेनंच माझ्या छातीत एक भयानक कळ आली. कसाबसा स्वत:ला सावरून मी म्हणालो, ''मग हे पुनर्जन्माचं सत्र कुठपर्यंत चालणार आणि या जगाचा शेवट तरी कुठं होणार?''

''राजा, समुद्राच्या लाटा कधी पाहिल्या आहेस काय? त्या कधीतरी मोजता आल्या आहेत काय? त्या कुठून येतात आणि कुठं जातात हे कुणालातरी सांगता आलं आहे काय? या पुनर्जन्माचंही तसंच आहे.''

''मग या जगाचं काय होईल शेवटी?''

''राजा, शेवटी हा शब्द काढून टाक, कारण काळाला शेवट आणि सुरुवात दोन्हीही नाहीत! काळ हा अखंडच आहे. ज्यांना काळ हा अखंड आहे हे पटतं, त्यांना – आणि केवळ त्यांनाच पटू शकतं की, आत्मा हा अनंत आणि म्हणून अमर आहे. पृथ्वीवरचे पशू, पक्षी, वृक्ष, वेली, मानव यांचं जीवन अमर आहे.''

''असा हा आत्मा शरीराशी इतका सहजपणे आहे, तर मग माणसाकडून पापं का होतात?''

''छान! राजा, फारच सुंदर प्रश्न तू विचारलास. प्रथम पाप म्हणजे काय ते नीटपणे ठरवायला पाहिजे. पाप म्हणजे आत्म्याचा निकृष्ट आविष्कार. जेव्हा-जेव्हा माणूस आपल्या शरीरातील एका शाश्वत आवाजाशी मनाचा आवाज मिळविण्यास तयार नसतो तेव्हाच विसंवादातून या निकृष्ट आविष्काराची निर्मिती होते. तिलाच जग 'पाप' म्हणतं.''

''मग उपभोग हे पापच आहे काय?''

''मुळीच नाही. तसं असतं तर माणसाला ही पंचेंद्रियं मिळालीच नसती! उपभोग म्हणजे पाप नव्हे, पण उपभोगाची परमावधीची आसक्ती म्हणजे मात्र जरूर पाप आहे! या आसक्तीमधूनच विद्रोह आणि युद्धं भडकतात. व्याधी आणि विसंगती वाढतात!''

''मग अशा या संहारक आसक्तीचे बंध जग केव्हा तोडील?''

''ते काहीच सांगता येणार नाही. आपण ही चर्चा जीवनाच्या एका मधल्या तीर्थक्षेत्रावर बसून करीत आहोत! हा पूर्णत्वासाठी चाललेला अखंड प्रवास आहे. अजून पुष्कळ मार्गक्रमणा करायची आहे. तरीही आपल्या सोयीसाठी काळाला स्थिर करून सांगायचं म्हटलं, तर कदाचित त्यासाठी कोटच्यवधी वर्षं लागतील आणि तोच मानवांचा, आत्म्याच्या वलयात प्रवेश करण्याचा पहिला मंगलदिन असेल! माझ्यासारखे असंख्य वेडे अशा... आणि केवळ अशा दिवसाच्या आशेवरच जीवन जगतात!''

''काय कर्णा, असंच ना?'' जवळच बसलेल्या कर्णाला त्यानं प्रश्न विचारला. आमचा बराच काल चाललेला विवाद तो शांतपणे नुसता ऐकतच होता. कसल्यातरी गहन विचारात बहुधा तो गुंतला असावा. प्रथम अश्वत्थामा आपणाला काही प्रश्न विचारतो आहे, हेच त्याला समजलं नाही. अश्वत्थाम्यानं त्याचा उजवा पुष्ट खांदा आपल्या तळहातानं घुसळला तेव्हा तो आपल्या विचारातून जागा झाला. अश्वत्थामा आपणालाच काहीतरी विचारीत आहे हे जाणून तो त्याच्याकडे पाहत म्हणाला, ''अश्वत्थामा, तू फार मोठा तत्त्वचिंतक आहेस!''

''नाही कर्णा, प्रत्येक मनुष्यच आपल्यापरीनं तत्त्वचिंतक असतो. तूसुद्धा

आहेसच की.''

त्यानं त्याला काहीच उत्तर दिलं नाही. तो नुसताच मंदपणे हसला. स्मिताची एक मोहकशी लकेर त्याच्या गोलाकार हिरण्यवर्णी चेहऱ्यावर गालांपासून उमटून कानांजवळ लय पावली. त्या लकेरीनं, वाऱ्याच्या मंद झुळकीबरोबर जास्वंदीच्या रक्तवर्णी फुलातील पीतवर्णी परागदंड जसे हळुवार हलतात तशी त्याच्या कानांतील गोबरी मांसल कुंडलं कळतील न कळतील अशी लाडिक हलली!

दुग्धपानानंतर तो आणि अश्वत्थामा कक्षातून निघून गेले.

अश्वत्थाम्याचे काही विचार माझ्या मनाच्या प्रांगणात दोन शत्रूंसारखे परपस्परांवर हल्ले करू लागले. "जितक्या स्पष्टपणे मी तुला पाहतो आहे, तितकंच स्पष्ट आहे की, मानवाला पुनर्जन्म आहे!'', ''माणूस आपल्या शरीरातील शाश्वत आवाजाशी प्रतारणा करतो तेव्हाच पापाची निर्मिती होते.'', ''पुनर्जन्म... पाप... भीम... आत्मा... सर्प... आसक्ती'' शब्दांचे घणाघात मस्तकावर बसू लागले. शरदाचे दिवस असूनही शरीराला कसलेतरी चटके बसताहेत असं वाटू लागलं. जीव गुदमरू लागला. मनाला विरंगुळा वाटेल म्हणून मी सौधावर आलो. कर्ण आणि अश्वत्थामा राजवाड्याच्या पायदंड्या ओलांडून मधल्या सिंहमूर्तीजवळ आल्याचं सौधावरून मला स्पष्ट दिसत होतं. ते दोघं काहीतरी बोलत चालले असावेत. एवढ्यात त्यांच्या समोरून महाद्वारातून युवराज्ञी दुःशलेचा – माझ्या बहिणीचा ऐटदार घोड्यांचा रथ आत शिरला आणि क्षणार्धातच त्या दोघांसमोर उभा राहिला. रथातून दुःशला खाली उतरली, त्या दोघांनीही तिला अभिवादन केलं. गुरुपुत्र म्हणून ती अश्वत्थाम्याबरोबर काहीतरी बोलत होती. अश्वत्थाम्याशी बोलता-बोलता ती बऱ्याच वेळा कर्णाकडे पाहत असावी. तो मात्र तिच्याशी काहीच बोलला नाही! शेवटी अश्वत्थाम्यानं तिचा निरोप घेतला आणि ते दोघेही महाद्वारातून दृष्टिआड झाले.

मी विचार करू लागलो. दुःशला राजरथ घेऊन सायंकाळच्या वेळी बाहेर कुठं गेली असावी? शेवटी मला आठवलं की, पौर्णिमा असल्यानं देवदर्शनासाठी ती नगरात उमाशंकरांच्या मंदिरात गेली असावी.

मी समोर पाहिलं. दूरवर पश्चिम क्षितिजावर सूर्य अस्ताला चालला होता. त्याची लांबट सौम्य किरणं राजवाड्याच्या उंच माथ्याला स्पर्शीत होती. त्या तेजोगोलाकडे क्षणभर एकटक पाहिल्यानंतर मला वारंवार वाटू लागलं की, याच तेजाच्या धगधगीत रसाशी मिळतंजुळतं असंच काहीतरी आपल्या आसपास नेहमी वावरत असतं, पण ते काय हे काही केल्या नक्की माझ्या लक्षात येईना. शेवटी मी तो विचारच सोडून दिला!

**

# नऊ

त्या रात्री मी अश्वत्थाम्याच्या तत्त्वज्ञानाचा बराच विचार केला, पण मला समाधानकारक असा मार्ग सापडला नाही! त्याचं तत्त्वज्ञान कितीही गोंडस असलं, तरी ते प्रत्यक्ष जीवनात आणता येत नव्हतं. आत्म्याचा विचार करायलाही अवसर नव्हता आणि तत्त्वज्ञान हे माणसानं नेहमीच केवळ ऐकायचं असतं; ते कधीच अनुकरणात आणायचं नसतं. सकाळी शय्येवरून उठताच मला याची प्रकर्षानं जाणीव झाली. अश्वत्थाम्याच्या विचारावर अनावश्यक चिंतन करून मी स्वत:ला उगाच कष्टी करून घेतलं होतं. तो म्हणतो की, आसक्तीचे बंध मानवाला कधी सुटतील तोच भाग्याचा दिवस! मला हे बंधबिंध काहीच कळत नव्हतं! तो म्हणतो काळ अखंड आहे. मला त्याचा तो काळ खंडित आहे की अखंड आहे याच्याशी काहीच कर्तव्य नव्हतं. काळाच्या बाबतीत मला एकच एक काळ माहीत आहे, तो म्हणजे एकच वर्तमान! आणि या एकाच वर्तमानाचा वेग हातात धरून मी काळाला, इंद्राचा समर्थ सारथी मातली जसा आपला रथ वेगात पिटाळतो तसा पिटाळणार आहे. मी दुर्योधन आहे! कौरवांचा युवराज आहे! काळाचा महिमा वर्णन करणारा दुबळा ब्राह्मणकुमार नाही. मी अश्वत्थामा नाही. लागलीच मी द्रौपदीच्या स्वयंवरासाठी पांचालांच्या राजनगरीला – कांपिल्यनगराला जायचं ठरविलं. द्रुपद राजाचंही आमंत्रण त्या शुभ सकाळीच आलं होतं. जाताना बरोबर कर्णाला घेणं अधिक योग्य ठरलं असतं. कमीजास्त झाल्यास तो प्राण पणाला लावून मला पाठीशी घालील. माझे बंधू दु:शासन आणि दुर्मर्ष ह्यांनाही मी बरोबर घेणारच होतो. जे शूर असतात ते जीवनाचा चषक जीवनरसानं पूर्ण भरून प्राशन करण्यासाठी धडपडत असतात. जे भीरू असतात ते तत्त्वज्ञानाचा शुष्क कीस पाडीत असतात. मी स्वयंवराच्या पणात पांचालीला जिंकून हस्तिनापुराला आणणार होतो. पितामह भीष्मांनी काशी राज्यातून आमच्या महामातेला... महाराणी अंबिकेला जिंकून आणून स्वत:साठी नव्हे; तर आमच्या पूजनीय पितामहांना – महाराज विचित्रवीर्यांना अर्पण केली. अगदी तसाच प्रसंग आल्यास अंगराज कर्णाकरवी त्या पांचालांच्या सुगंधी याज्ञसेनेला जिंकून मला अर्पण करून घेणार होतो, कारण मला पूर्ण माहीत होतं की, पितामह भीष्मांचा जन्म जसा केवळ कुरूंच्या कुलासाठी होता, तसाच किंबहुना त्याहीपेक्षा अधिक खात्रीनं कर्णाचा जन्म दुर्योधनासाठी होता!

'कर्ण माझ्यासाठी काय-काय करील?' असा प्रश्न मी जेव्हा-जेव्हा स्वत:ला विचारी तेव्हा-तेव्हा, 'तो काय करणार नाही?' असाच प्रतिप्रश्न मला उत्तर म्हणून मिळे!

जीवन ही एक अनिवार्य, अटळ अशी तडजोड असते! मी त्याला अंगदेशाचं स्वतंत्र राज्य दिलं होतं! त्याच्या तारुण्यसुलभ कोमल भावना जपण्यासाठी त्याचं प्रेम वृषालीवर आहे, हे अचूकपणे हेरून त्याचा विवाह वृषालीशीच लावून दिला होता. त्याला या सर्वांची जाणीव होती आणि म्हणूनच माझ्यासाठी तो काहीही दिव्य करील यावर माझा पूर्ण विश्वास होता!

**

## दहा

याज्ञसेनीच्या स्वयंवराला जाण्याचा निर्णय मी केला, पण स्वयंवरासाठी राजा द्रुपदांनी मांडलेला पण ऐकताच मात्र माझं मन विचलित झालं. याज्ञसेनी कुरूंची महाराणी व्हावी, ही माझी तीव्र इच्छा असूनही त्या विचित्र पणामुळे त्या इच्छेत विघ्न येणार की काय अशी शंकेची पाल माझ्या मनात चुकचुकली. ती शंका मी कर्णाला बोलून दाखविली, कारण द्रुपदांनी मांडलेला पण सहजपणे पूर्ण करू शकतील असे दोनच धनुर्धर आर्यावर्तात आहेत, असं मला वाटत होतं. एक कर्ण आणि दुसरा अर्जुन. अर्जुन तर आता स्वर्गात एखाद्या अप्सरेच्या स्वयंवरासाठी सिद्ध झाला असेल. राहता राहिला कर्ण! हा एकच धनुर्धर होता आणि तो या दुर्योधनाचा प्राणप्रिय मित्रही होता. कुरूंच्या राजनगरीत – हस्तिनापुरात होता. मी त्याला माझा सेवक प्रभंजन याच्याकरवी कक्षात बोलावून घेतलं.

कक्षात येताच त्यानं आश्चर्यानं विचारलं, "राजा, आज अगदी अवेळी आठवण झाली माझी?"

"वेळ आणि अवेळ आपणच ठरवायची असते. वेळ सर्वांनाच सोयिस्कर असते, पण अवेळ सोयिस्कर करून दाखवितो तोच खरा योद्धा." त्याच्या हातात मी द्रुपदांचं निमंत्रण दिलं. आपले निळे तेजस्वी डोळे आमंत्रणाच्या भूर्जपत्रावर त्यानं रोखले. त्याच्या वक्राकार डौलदार सोनेरी भुवया कळतील न कळतील अशा ताणल्या गेल्या! भव्य कपाळावर एक सूक्ष्म आठी पडली. क्षणभरानं आपली भरदार मान वर उचलीत तो म्हणाला, "स्वयंवराचं हे निमंत्रण आहे. मला वाटलं की, काही राजकीय बिकट प्रश्न निघाला म्हणून मला पाचारण आलंय!"

"कर्णा, कोणताही राजकीय प्रश्न या स्वयंवराइतका बिकट नाही. या स्वयंवरामुळे माझंच काय आम्हा सर्व कुरूंचं जीवनही बदलू शकेल."

"ते कसं काय? एका स्त्रीसाठी कुरूंचं जीवन बदलेल, सिंहासन डळमळेल असं मला स्वप्नातही वाटणार नाही. मग ती कितीही सुंदर असो. तिचे पाठीराखे कितीही बलशाली असोत."

"नाही कर्णा, ही सामान्य स्त्री नाही. द्रुपद राजाला साक्षात यज्ञापासून मिळालेली ही अग्निकन्या याज्ञसेनी आहे. तिच्या सर्वांगाला भुईचंपकाच्या फुलासारखा सुगंध येतो. ती जन्मजातच सुगंधाची कुपी आहे. जशी तुझी कुंडलं जन्मजात आहेत तशी!"

"मग असेना! ती कुरूंचं जीवन कसं काय बदलू शकणार?"

"ती महाराणी म्हणून... माझी पत्नी म्हणून या हस्तिनापुरात आली तर हे प्राचीन राज्य वैभवाच्या शिखरावर चढेल. माझं जीवन तर मला स्वर्गानंदाचा अनुभव देईल. याज्ञसेनी माझी व्हावी, ही माझी महत्त्वाकांक्षा आहे."

"तिला तरी यापेक्षा अधिक भाग्यशाली जीवनसाथी कोण मिळणार? कुरूंची महाराज्ञी व्हावं, असं कोणत्या स्त्रीला वाटणार नाही? स्वयंवराला जायला काहीच

हरकत नाही. योद्धयानं मनात आणलेली गोष्ट कधी अर्धवट टाकूच नये!''

''कर्णा, ते काय मला पटत नाही असं वाटतं तुला? पण याज्ञसेनीच्या स्वयंवरासाठी तिच्या पित्यानं मांडलेला पण ऐकून तुझ्यासारखा धनुर्धरही होईल.''

''असा कोणता पण आहे?''

''ऐक! पांचालांच्या कांपिल्यनगर या राजनगरीत आपल्या राजवाड्यासमोरच्या भल्यामोठ्या पटांगणात द्रुपदांनी एक भव्य मंडप उभारला आहे. त्या मंडपात मध्यभागी एक पाण्याचा दगडी तलाव बांधून घेण्यात आला आहे. त्या तलावात गंगा आणि इक्षुमती ह्या पवित्र नद्यांच्या संगमातील नितळ पाणी भरण्यात आलं आहे. तलावाच्या मध्यावर ज्याचं प्रतिबिंब दिसेल असं एक वर्तुळाकार गतिमान मत्स्ययंत्र मंडपाच्या छताला टांगण्यात आलं आहे. त्या मत्स्ययंत्रातील लाकडी माशाचा एकसारखा गरगर फिरणारा डोळा, खालच्या तलावातील प्रतिबिंबाकडे पाहून सूची बाणानं अचूक टिपायचा आहे आणि तोही तिथं ठेवण्यात येणाऱ्या अवजड अशा साक्षात शिवधनुष्यानं! केवळ पाच बाणांत!''

''मग यात असाध्य काय आहे राजा?''

''तुला काहीच असाध्य नाही! लक्षय न पाहताही केवळ आवाजावरून पक्षिणीची चोच टिपणारा तू सर्वश्रेष्ठ धनुर्धर आहेस, पण माझ्यासारख्या गदावीराला इतकं कसं शक्य आहे?''

''मग स्वयंवराला जायचं टाळणार की काय तू?''

''तू नकार दिलास, तर मात्र मला तेच करावं लागणार आहे.''

''माझ्या नकाराचा त्यात काय संबंध?''

''कर्णा, मला माहीत आहे, हा एवढा अवघड पण तू आणि अर्जुन यांखेरीज या आर्यावर्तात कोणीच जिंकू शकणार नाही. अर्जुन तर आता या जगातून कायमचाच निघून गेला आहे! आता तूच हा पण जिंकला पाहिजेस.''

''मी? राजा, मी सूतपुत्र आहे हे तू विसरलास की काय? एक क्षत्रियकन्या मला वरमाला घालावयास कधीतरी धजेल काय? ...आणि अन्य कुठलीही स्त्री वृषालीपेक्षा सुंदर असेल या गोष्टीवर माझा विश्वासच नाही!''

''कर्णा, तू याज्ञसेनीला पणात जिंक! तुला तिनं नाकारलंच, तर मी पाहीन काय करायचं ते. तुझ्यासाठी नाही, केवळ माझ्यासाठी तू हा पण जिंक!''

''मी तुझ्यासाठी काहीही करीन. पितामह भीष्मांनी काशीराजाच्या कन्या जिंकून तुझ्या पितामहांना – विचित्रवीर्यांना अर्पण केल्या तशी मी याज्ञसेना तुला अर्पण करीन!''

जरा थांबून तो पुढं म्हणाला, ''या याज्ञसेनीचं कमलपुष्प तुझ्या चरणांवर अर्पण करीन, पण एका अटीवर – ''

''कोणती अट? बोल! न ऐकताच ती मी मान्य करीत आहे.''

''मी या पणात सर्वांत शेवटी भाग घेईन. शिवाय विजयी होताच तू माझी एक मनीषा पूर्ण करावीस.''

''सांग तुझी काय मनीषा आहे ती!''

''मी ज्या ग्रामात जन्मलो... वाढलो ती चंपानगरी सुदैवानं अंगदेशातच आहे. त्या माझ्या जन्मग्रामाला तू राजनगर म्हणून मान्यता द्यावीस! त्या नगराच्या

पुनर्वसनाची घोषणा कांपिल्यनगरातच करावीस.''

''कर्णा, खरोखरच तू धन्य आहेस! अरे, याज्ञसेनीच्या बदल्यात तू हे सगळं कुरूंचं राज्यही मागितलं असतंस तरी ते मी तुला दिलं असतं, पण तू काय मागितलंस, तर आपल्या जन्मग्रामाचं पुनर्वसन! खरोखरच कर्णा, निःस्वार्थी प्रेमाचं दिव्य प्रतीक म्हणजे तू!''

मी त्याला कडकडून मिठी मारली. तो भारावून गेला. माझा हात हातात धरून तो त्यानं जिव्हाळ्यानं हळुवार थोपटला.

छे! कर्ण कोण होता तेच मला कळत नव्हतं.

''आज संध्याकाळी आपण स्वयंवरासाठी निघू या. सत्यसेन बरोबर असला की, हां-हां म्हणता कांपिल्यनगर गाठील.'' मी त्याला म्हणालो.

''ठीक आहे. मी त्याला प्रवासाची तयारी करायला सांगतो.''

तो उठला आणि धीमी पावलं टाकीत एखाद्या वनराजासारखा कक्षातून निघून गेला.

**

# अकरा

मी कर्णासह कांपिल्यनगराला आलो. माझ्या समवेत दु:शासन, निषंगी, अग्रयायीन, दुर्विमोचन, विकर्ण, अयोबाहू, विवित्सु, विकट, क्राथ आणि दण्डधार हे माझे दहा कनिष्ठ बंधू होते. स्वयंवर हा सामोपचारानं सुटणारा विधी नसतो. त्यासाठी कधी-कधी दोन हातही करावे लागतात. त्यासाठीच साहाय्यार्थ म्हणून मी माझ्या दहा बंधूंना समवेत घेतलं होतं, पण माझा सर्वांत अधिक विश्वास होता तो कर्णावर. माझे मनोरथ साकार करण्यासाठी त्या विक्रमी वीराची प्राणाचं मोलही देण्याची तयारी होती. त्यासाठीच मी त्याला आग्रहानं पांचालांच्या राजनगराला आणलं होतं. कुरूंच्या वतीनं अंगराज कर्णच मत्स्यभेद करणार होता! आम्ही पण जिंकणार होतो. आमच्या समवेत अश्वत्थामा आणि शकुनीमामाही होते. षोडशवर्षीय कर्णपुत्र सुदामनही आग्रहानं आला होता.

कांपिल्यनगराच्या सीमेवर अगदी गंगा आणि बहुदा यांच्या संगमावर पांचालांचे अमात्य वीरबाहू आणि महाराज द्रुपद यांनी आम्हा सर्वांचं प्रचंड स्वागत केलं. द्रुपदांचा पुत्र युवराज धृष्टद्युम्नानं तर दु:शासनाला सामोरं जात कडकडून आलिंगनच दिलं. मी कर्णाचा त्याच्याशी परिचय करून देताना म्हणालो, "हे अंगराज कर्ण!" कर्णानं आपले गुलाबी तळहात जोडून त्याला वंदन केलं. धृष्टद्युम्न त्याच्या कानांतील कुंडलांकडे क्षणकाल टक लावून पाहत हसत सहजपणानं म्हणाला, "त्यांना ओळखीत नाही असं कोण आहे? हस्तिनापुरातील आवाजाचा लक्ष्यभेद आम्ही सर्वांनी प्रत्यक्ष पाहिला आहे! तो प्रसंग आणि तो दिवस मी तरी या जन्मी कधीच विसरणार नाही."

धृष्टद्युम्नाचे बोल सहज होते. आम्हा सर्वांनाच ते आवडले. मला धृष्टद्युम्नाची देहयष्टी फारच आवडली. एखाद्या मोहोरलेल्या डौलदार मधुक वृक्षासारखा तो दिसत होता! चेहरा हनुवटीजवळ निमुळता होत गेलेला. त्याचा वर्ण मात्र तांबसर गौर होता. मी त्याच्या मुद्रेशी क्षणभर याज्ञसेनीची तुलना केली. मला याज्ञसेनीशिवाय सांप्रत काहीच सुचत नव्हतं.

आम्ही नगरात प्रवेश केला. सगळं नगर आपल्या प्रिय राजकुमारीच्या स्वयंवरानिमित्त नगरजनांनी मोठ्या कौशल्यानं सुशोभित केलं होतं. जागजागी हिरव्या वेशी, गुढ्या, तोरणं उभी केली होती. नगरातील सर्व प्रशस्त चौक विविध रंगांच्या अरण्यफुलांच्या मालांनी सजविले होते. ठिकठिकाणी पाण्याची कृत्रिम कारंजी तयार केली होती. सर्व अंगणात ललनांनी केशरमिश्रित पाण्यानं सडे घालून त्यावर ढंगदार रांगोळ्या चितारल्या होत्या. नगारे, तुताऱ्या आणि मृदंग यांनी वातावरणाचा कणन्कण फुलवून टाकला होता. आम्ही नगरात जेव्हा प्रवेश केला तेव्हा नगरजन आमच्या दर्शनासाठी मार्गाच्या दुहाती उभे राहिले होते. ते कुरूंच्या वैभवशाली आणि विक्रमी कुलाचा सहजस्फूर्त जयघोष करीत होते. मात्र कोणत्याही नगरात मला कधी न दिसणारं एक आश्चर्यकारक दृश्य येथे दिसत होतं! अनेक निवासांच्या उंच सौधांवर नगरातील ललनांचीही दाटी उडाली होती. त्यातील काहीतर आमच्या रथाकडे सरळ अंगुलिनिर्देश

करीत होत्या! माझ्या रथात मी, दु:शासन आणि कर्ण असे तिघेच होतो, इतर सर्व रथ मागे होते. बऱ्याच कालानंतर माझ्या ध्यानात सर्व प्रकार आला. कर्णाच्या अप्रतिम सौंदर्याची दुदुंभी पांचालांच्या राज्यापर्यंत येऊन पोहोचली होती! कर्ण दुरून का होईना; पण कसा काय दिसतो, हे पाहण्यासाठी स्त्रिया आतुर होत्या. त्या बिचाऱ्याला मात्र यातलं काहीच माहीत नव्हतं! अगदी निरागसपणे तो माझ्या उजव्या हाताच्या बाजूला उभा होता. त्याच्या अंगावरचं सुवर्णधाग्यांची छटा असलेलं उत्तरीय सूर्यकिरणांत चमकत होतं. मी त्याला सहज म्हणालो, ''कर्णा, आता तुला स्वयंवरात भाग घ्यायचा आहे. आता रथनीडावर उभा राहू नकोस. आत बैस आणि धनुर्वेदाचं चिंतन कर!''

त्याला माझा विचार पटला. तो रथात बसला. अनेक स्त्रियांची त्यामुळे निराशा झाली असावी! मी त्यांच्या मूर्खपणास हसत होतो. एका सूतपुत्राला पाहण्यासाठी एवढा त्यांनी जिवाचा आटापिटा का करावा, हेच मला समजत नव्हतं. वास्तविक त्यांनी दर्शन घ्यायला पाहिजे होतं माझं! फार तर दु:शासनाचं, कारण मी मनात आणलं असतं तर आमच्या रथाच्या सारथ्याला – सत्यसेनाला त्याच्या जागेवरून उठवून त्या ठिकाणी कर्णाला बसवलं असतं! कितीही झालं तरी सारथ्यकर्म हाच त्याचा अंगभूत व्यवसाय होता!

सूर्योदयाला घेऊनच पांचालांच्या शोभिवंत राजवाड्याजवळ आम्ही आलो. स्वयंवराचा भव्य मंडप दृष्टिपथात आला. त्या मंडपाच्या आवतीभोवती जनसमुदाय नुसता खच्चून भरला होता.

''या, कुरुश्रेष्ठ युवराज! आज नगरजनांच्या उत्साहाला उत्सुकतेचं भरतं येण्याची ही दुसरी वेळ आहे.'' पांचालांचे अमात्य वीरबाहू मला रथातून उतरवून घेताना म्हणाले.

''आणखी कुणाचं एवढ्या प्रचंड उत्साहानं स्वागत झालं?'' मी अमात्यांना विचारलं.

''मथुरेहून यादवश्रेष्ठ भगवान श्रीकृष्ण आजच आले आहेत. त्यांचं!''

''श्रीकृष्ण? श्रीकृष्ण स्वयंवरात भाग घेणार की काय अमात्य?'' मी जरा भयपूर्ण शंकेनंच विचारलं.

''ते मी कसं सांगू? पण भाग घेणार नाहीतच असं नाही!''

''आणखी कोण-कोण आलंय स्वयंवरासाठी?''

''महाराज भोज, सौबल, सहदेव, शल्य, शिशुपाल, विराट, सुकेतू, चित्रायुध, जरासंध, चेकितान, भगदत्त आलेत. तसेच भूरिश्रवा, सुषेण, दृढधन्वा, सोमदत्त, वृषक, बृहद्बल, बृहन्त, मणिमान, दण्डधार, मेघसंधी, शंक, सुशर्मा, शिवाय सेनाबिंदू, सत्यधृती, सूर्यध्वज, रोचमान, सुदक्षिण, रुक्मरथ, शिबी, श्रीकृष्णपुत्र प्रद्युम्न, सात्यकी, सिंधुअधिपती जयद्रथ, असे अनेक देशांचे अनेक वीर राजेमहाराजे आले आहेत. आम्ही प्रतीक्षा करीत होतो ती एकटच्या हस्तिनापुराधिपतींची.''

त्यांनी मला हाताला धरून मंडपाच्या एका कडेनं राजवाड्यात नेलं. स्वयंवर अपराण्हकालानंतर एक घटकेनं मांडलं जाणार होतं. तोपर्यंत मी, कर्ण, अश्वत्थामा, शकुनीमामा सर्व जण भोजन करून विश्रांती घेणार होतो. आमचा प्रवास एक शतक योजनांचा झाला होता. अंगावरची राजवस्त्रं धुळीनं माखून गेली होती. घोडी थकली होती.

स्वयंवराबद्दल मी निर्धास्त होतो, कारण आलेल्या असंख्य राजांपैकी कोणीही निष्णात असा धनुर्धर नव्हता. ते योद्धे होते, पण द्रुपदांचा कठीण पण कोणीच पूर्ण करू शकणार नव्हतं. केवळ एकटा कर्णच परत एकदा सर्वांच्या नेत्रांचं पारणं फेडणार होता आणि अशी पणात जिंकलेली श्यामल द्रौपदी तो माझ्या चरणांवर मित्रप्रेमानं अर्पण करणार होता. कारण त्याला मी आजपर्यंत प्रकर्षानं पटवून दिलं होतं की, जीवन ही एक अनिवार्य अशी तडजोड आहे.

काही अघटित घडलं असतं, तरच पांचाली आमच्या हातातून सुटली असती. माझ्या मनाचा एक कोपरा साशंक होता तो केवळ एकाच व्यक्तीमुळे – आणि ती म्हणजे श्रीकृष्ण!

**

# बारा

आणि शेवटी ते अघटित खरोखरच घडलं! स्वयंवराहून मी हस्तिनापुराला परत आलो ते अनेक घटनांचे अनिवार्य बाण उरात घेऊनच! आता मला वारंवार वाटतं की, आयुष्य हे एक अद्‌भुतरम्य स्वयंवर असावं. प्रत्येक माणूस त्या स्वयंवरात हिरिरीनं भाग घेतो, पण काही वेळा काळानं इतके अवघड पण त्या स्वयंवरात मांडलेले असतात की, ते कुणालाच सगळे जिंकता येत नाहीत. काही जणांची तर जीवघेणी दुर्दशा होते! अनेक माणसं धैर्यशाली, बुद्‌धिमान आणि पराक्रमी असूनही ती हे पण पूर्ण करू शकत नाहीत. मी नाही, अश्वत्थामा नाही, कर्ण नाही, कुणीच नाही.

पांचालीच्या स्वयंवराच्या केवळ स्मृतींनीही माझं मन अनेकविध भावभावनांच्या विचित्र संमिश्रणानं तडफडू लागतं. काळाचे आणि दैवाचे गोडवे कुणी गायलेलं मला कधी आवडत नव्हतं. मी जीवनात एकटच्या कर्तृत्वालाच किंमत देत आलो होतो, पण जेव्हा-जेव्हा कर्तृत्व थिटं पडलं तेव्हा-तेव्हा मला काळाचं महत्त्व पटू लागलं.

पुरुषार्थाचे कितीही नगारे मानव पिटत असो, त्याच्या कर्तृत्वाचे ध्वज हातात घेऊन तो धुंदपणानं कितीही नाचत असो, शेवटी तो विशाल नि अनंत आकाशासमोर थिटा आणि अपूर्णच राहणार. अपूर्णता हाच जीवनाचा स्थायिभाव आहे, असं पांचालीच्या स्वयंवरापासून मला वारंवार वाटू लागलं आहे.

तिचं स्वयंवर पार पडलं होतं, पण तिचा सुकुमार गोंडस हात काही माझ्या हातात आला नव्हता. तिच्या पाणिग्रहणासाठी पुढं केलेल्या माझ्या भक्कम हातावर कठोर नियतीनं ठेवले होते ते धगधगीत सत्याचे जळजळीत अंगार! अजूनही स्वयंवराचा प्रसंग आठवला की, माझी मती गुंग होते. जीवन हा रहस्यमय भूमार्ग आहे असंच वाटतं! मी त्या स्वयंवराला गेलो नसतो, तर फारच बरं झालं असतं. अनेक कटू आणि असह्य सत्यांचं दडपण तरी माझ्या छातीवर आलं नसतं, कारण त्या स्वयंवरानं मला सर्वांत भयानक धक्का दिला होता तो पांडवांच्या अस्तित्वाबद्दल. पांडव जिवंत आहेत, हे असह्य सत्य एखाद्या राक्षसाचं अक्राळविक्राळ रूप घेऊन माझ्या छातीवर थयथय नात होतं. त्याच्या पायांखाली माझ्या आकांक्षांच्या बरगडया पिचत होत्या. ते स्वयंवर विसरण्याचा मी कितीही प्रयत्न केला, तरी एखाद्या अप्रिय व्यक्तीनं पुन:पुन्हा समोर येऊन आपलं क्षेमकुशल विचारावं तसं ते माझ्या डोळ्यांसमोर पुन:पुन्हा उभं राहून मला डिवचत होतं. पणात मांडलेलं मत्स्ययंत्र डोळ्यांपुढं येऊन गरगरत होतं!

स्वयंवराच्या दिवशी पांचालांच्या राजनगरात जाताना आम्ही पंचपक्वान्नांचा समाचार घेतला. घटकाभर वामकुक्षीसाठी राजकक्षातील मंचकावर कलंडलो. थोड्या वेळातच कर्ण उठला. अंगावर उत्तरीय पांघरून तो कक्षाबाहेर निघाला. मी अर्धवट निद्रेत होतो; तरीही मी त्याला विचारलंच, ''कर्णा, स्वयंवराची घटका जवळ येत आहे. कुठं निघालास या अवेळी?''

''वेळ ही सर्वांनाच सोयिस्कर असते, अवेळ सोयीची करून दाखवितो तो खरा योद्धा!'' मीच त्याला हस्तिनापुरात सांगितलेलं तत्त्वज्ञान त्यानं मला हसत ऐकविलं.

''ठीक आहे जा, पण लवकर परत ये! कारण...''

''कारण काय?''

''कारण तू नगरात जिथं-जिथं जाशील तिथं-तिथं तुला पाहण्यासाठी स्त्रियांची गर्दी उडून जाईल!''

''पण मी नगरात जाणारच नाही!'' तो मंद हसत म्हणाला.

''मग कुठं? गंगेच्या किनाऱ्यावर?'' तो कुठंही असला तरी एक नदीकिनारा आणि दुसरं स्वच्छ आकाश त्याला लागत असतं.

''नाही. इथंच राजवाड्यातील दुसऱ्या एका कक्षात.'' तो मान डोलवीत म्हणाला.

''कुणाच्या? धृष्टद्युम्नाच्या की अमात्यांच्या? बहुधा तू स्वयंवराची बारीकसारीक माहिती काढायला जात असावास!''

''नाही राजा – मी चाललो आहे श्रीकृष्णाला भेटायला! थोड्या वेळापूर्वीच मी अमात्यांकडून तसा निरोप त्याला पाठविला आहे.''

''श्रीकृष्णाची भेट घ्यायला तू कशाला तिकडे जायला पाहिजेस? त्यालाच आपण अमात्यांकरवी इथं बोलावून घेऊ!'' मंचकावरून मी ताडकन उठलो आणि निद्राधीन झालेल्या दु:शासनाला गदागदा हलवीत म्हणालो, ''दु:शासन, ऊठ अन् पांचालांच्या अमात्यांना बोलाव.''

कर्ण तत्परतेनं पुढे होऊन माझा हात धरीत म्हणाला, ''नको, त्याचा निद्राभंग नको. मी अर्ध्या घटकेतच परत येतो. श्रीकृष्णाला इथं बोलावलेलं मला नाही आवडणार! मीच त्याच्याकडे जाईन.''

त्याचा स्वभाव आपल्यासाठी कुणालाही त्रास होऊ नये असा होता.

''ठीक आहे, जा, पण लवकर परत!'' मी त्याचं मन मोडू शकत नव्हतो. पण का कुणाला ठाऊक तो श्रीकृष्णाला भेटायला जातो आहे, हे मला त्या वेळी मुळीच आवडलं नाही. श्रीकृष्णाबद्दल माझं मत फारसं चांगलं नव्हतं, कारण त्याचा रंग अर्जुनासारखाच निळसर होता. त्याला पाहिलं की, मला अर्जुनाची आठवण येई!

आम्ही अर्धा घटका विश्रांती घेतली तेवढ्या अवधीत कर्ण श्रीकृष्णाला भेटून आला होता. त्याचं मुख उल्हसित आणि आनंदी दिसत होतं. राजवाड्यासमोरच्या मंडपात जमलेल्या लोकांचा उत्साहपूर्ण कलकलाट आम्हाला स्पष्ट ऐकू येत होता. मी, शकुनीमामा, अश्वत्थामा, दु:शासन सर्व जण राजवस्त्रं परिधान करून तयार होतो. कर्ण वस्त्रागारात वस्त्रं बदलत होता! थोड्या अवधीत तो वस्त्रागारातून बाहेर आला. त्यानं निळ्या रंगाचं अधरीय परिधान केलं होतं. त्यावर पिवळ्याजर्द रंगाचं उत्तरीय होतं! खरंतर उत्तरीयापेक्षा त्याच्या त्वचेचा रंगच अधिक उठून दिसत होता! तो वस्त्रागारातून बाहेर आला तेव्हा गुहेतून बाहेर पडणाऱ्या एखाद्या वनराजासारखाच वाटला मला! याच्या मुद्रेवरून जणू सूर्यकिरणच परावर्तित होऊन आसमंतात मिसळत होते. मला पाहताच तो मंदपणे हसला. त्याच्या गोबऱ्या उजव्या गालावर एक गोड खळी पडली. अगदी चुकूनच एखाद्या वेळी मी अशी खळी पाहिली आहे. त्याची सुवर्णवर्णी गोलाकार मुद्रा मला नेहमीच टवटवीत सूर्यफुलासारखी वाटत असे. त्याचा पुत्र सुदामनही त्याच्यामागून वस्त्रागारातून बाहेर पडला. नको-नको म्हटलं, तरी तो आग्रहानं आमच्याबरोबर आला होता!

थोड्या वेळातच एक दास कक्षात आला नि मान वाकवून मला म्हणाला,

''महाराज, आपणाला अमात्यांनी आदरपूर्वक पाचारण केलं आहे! मंडपात सर्व नरेश आपली प्रतिक्षा करताहेत!''

मी, कर्ण, शकुनीमामा, अश्वत्थामा, कर्णपुत्र सुदामन आणि दु:शासनासह माझे दहा बंधू असे सर्व जण कक्षाबाहेर पडलो. जाता-जाता मी कर्णाला म्हणालो, ''माझा सर्व भार तुझ्यावरच आहे! पण फारच अवघड आहे.''

तो काहीच न बोलता केवळ हसला. त्याचे सुवर्णजडित दात क्षणभर चमकले. चालताना बसणाऱ्या हबक्यांनी कानांतील लोभस कुंडलं लयीत डोलू लागली.

आम्ही स्वयंवराच्या मंडपात आलो. कुणीतरी कंठरवानं ललकारी दिली, ''हस्तिनापुराधिपती कौरवश्रेष्ठ, धृतराष्ट्रपुत्र, युवराज दुऽऽ र्योऽऽ धऽऽन! चंपानगराधिपती, अंगराज कऽर्ण!''

द्रुपदपुत्र युवराज धृष्टद्युम्न आम्हा सर्वांना सहास्य सामोरा आला. त्यानं माझा हात प्रेमभरानं आपल्या हातात घेऊन आम्हाला आमच्या आसनांकडे न्यावयास सुरुवात केली. सर्व आमंत्रित राजे आणि योद्धे आदरानं उठून उभे राहिले. माझी छाती अभिमानानं भरून आली. कुरूंचा सत्ताधाकच जणू हे सर्व नरेश उत्थापन देऊन मान्य करीत होते. आम्ही सर्व जण आसनस्थ झालो. लागलीच मंडपातील इतर सर्व नरेशही खाली बसले. माझ्या आसनासमोर एक आसन तसंच मोकळं होतं. इतर सर्व आसनांवर कोणी ना कोणी बसलं होतं. मी धृष्टद्युम्नाला उत्सुकतेनं विचारलं, ''हे समोरचं आसन कुणाचं? अजूनही ते रिक्त कसं?''

त्या आसनाकडे पाहत तो म्हणाला, ''ते आसन मंडित झाल्याशिवाय स्वयंवराला प्रारंभ होणारच नाही, कारण ते आसन भगवान श्रीकृष्णांचं आहे!''

''मथुराधिपती, यादवकुलोत्पन्न, वसुदेवपुत्र, भगवान श्रीऽकृऽष्ण' मंडपात आणखी एक ललकारी घुमली. प्रवेशद्वारातून निळ्या वर्णाचा श्रीकृष्ण प्रवेशत होता! त्याच्या समवेत त्याचा बंधू बलराम, पुत्र प्रद्युम्न, रुक्मरथ, उद्धव, सात्यकी इत्यादी यादवजन होते. मंडपातील सर्व नरेश, इतकंच काय; पण पुरोहितांसह राजस्त्रियांच्या सौधातील सर्व जण आदरानं उभे राहिले! माझ्या शेजारी बसलेले कर्ण, अश्वत्थामा, शकुनीमामा, दु:शासन सर्वच उठून उभे राहिले. मला त्यांनी त्या काळ्या श्रीकृष्णाला एवढा मान का द्यावा, तेच कळलं नाही. पायातल्या चढावात काहीतरी अडकलं आहे, असं भासवून मी त्याचे बंध सोडण्याच्या निमित्तानं आसनावरून एक रतीभरही हललो नाही! पण किनारी दृष्टीनं मी सर्वत्र पाहत होतो. श्रीकृष्ण हात उंचावून सर्वांना खाली बसण्याचा विनम्र संकेत करीत होता, पण कोणीच खाली बसत नव्हतं! शेवटी तो माझ्यासमोरच्या आसनावर आसनस्थ झाला. तरीही सर्व जण उभेच होते! शेवटी तो पुन्हा वर उठला आणि मंदपणे हसत उजवा हात उंचावीत धीरगंभीर आवाजात म्हणाला, "आमंत्रित नरेशहो, बसा! युवराज धृष्टद्युम्न आता आपल्या भगिनीचं – युवराज्ञी याज्ञसेनीचं – स्वयंवर मांडील!" सर्व जण कळसूत्री बाहुल्यांसारखे खाली बसले. श्रीकृष्णानं माझ्यावरही दृष्टिक्षेप टाकला. मी माझी दृष्टी दुसरीकडे वळवली! मला त्याचं मुखही पाहायचं नव्हतं. त्याच्या केवळ दर्शनानंच नदीकिनारी टिटवी कर्कशावी तशी मला अर्जुनाची आठवण होत होती. छातीत एक अनामिक कळ उमटत होती. भीमाची गदा माझ्याभोवती फिरत असल्याचा भास होत होता.

मी सर्व मंडपभर दृष्टी फिरविली. तिथं आर्यावर्तातले सर्व लहान-थोर राजे आले

होते. द्रौपदीच्या सुगंधानं सर्वांनाच वेडं केलं होतं तर! मगधाधिपती जरासंध, मद्राधिपती शल्य, सिंधुअधिपती जयद्रथ, चेदिराज शिशुपाल. एकापेक्षा एक सामर्थ्यशाली वीरांचं ते सम्मेलन होतं! पण का कुणास ठाऊक त्यांपैकी एकही मला कर्णाइतका सतेज आणि आकर्षक वाटत नव्हता! ते त्याला सांगावं म्हणून मी उजव्या हाताला असलेल्या त्याच्या कानाजवळ तोंड नेलं, पण तो असावध होता. तो एकटक नुसतं श्रीकृष्णाकडेच पाहत होता! मी त्याला नेहमीप्रमाणं सावध करण्यासाठी एक कोपरखळी मारली! तो चमकून मजकडे पाहू लागला! मी त्याला त्याच्या सौंदर्याबद्दल सांगण्यासाठी ओठ उघडले, पण तेवढ्यात पांचालांचा युवराज धृष्टद्युम्न आपल्या भगिनीला... याज्ञसेनीला घेऊन मंडपात आला. सगळीकडे उत्सुकतेच्या पोटी निर्माण झालेली नीरव शांतता पसरली! जो-तो अधोमुखी आणि धीरगंभीर पदक्षेप टाकणाऱ्या पांचालीकडे निरखून पाहू लागला. तिच्या हातात पायापर्यंत पोहोचेल अशी धवल कमलांची वरमाला होती. आपल्या प्रत्येक पावलागणिक ती जणू तिथं जमलेल्या सर्व वीरांची हृदयकमलं सहजपणे तुडवीत चालली होती. विविध पुष्पमालांनी सजविलेला, अनेक पुष्पांच्या गंधांनी धुंद झालेला तो विशाल मंडप पांचाली सलज्जपणे तेथे येताच खऱ्या अर्थानं स्वयंवराचा मंडप दिसू लागला! सावळ्या रंगाची द्रौपदी शरदातल्या अबोल, लोभस संध्येसारखी दिसत होती!

आपला उजवा हात मस्तकापर्यंत वर उंचावीत पांचालांचा युवराज धृष्टद्युम्न बोलू लागला, "आमंत्रित नरेशहो, माझ्या भगिनीच्या – युवराज्ञी याज्ञसेनीच्या स्वयंवराला आपण आलात यासाठी मी पांचालांच्या वतीनं आपणा सर्वांचं हार्दिक स्वागत करतो. या स्वयंवरासाठी मांडलेला पण जो कोणी वीरपुरुष पूर्ण करील त्याला माझी ही बहीण याज्ञसेनी आपला पती म्हणून वरील व आपल्या हातातील वरमाला त्याच्या कंठात घालील. पत्नी म्हणून त्या महायोद्ध्याची आर्यस्त्रीच्या मनोभावानं जीवनभर सेवा करील.

''पणासाठी सर्वांसमोर मंडपाच्या छताला टांगलेलं एक मत्स्ययंत्र आहे. ते आत्ताच त्याचे कुशल कारागीर सुरू करतील. त्या मंडलं घेणाऱ्या गतिमान मत्स्ययंत्रातील लाकडी माशाचा उजवा नेत्र, शिवधनुष्याची प्रत्यंचा ताणून तिच्यावर एक सूची बाण चढवून, यंत्राखालील तळ्यातील त्या माशाच्या प्रतिबिंबाकडे पाहून जो वीर अचूकपणे टिपील तो आम्हा पांचालांचा आजपासून आप्तेष्ट होईल! यासाठी कुणाही धनुर्धराला पाच बाण फेकण्याची आम्ही अनुज्ञा देत आहोत!''

त्यानं प्रस्तावना संपवून अमात्यांकडे एक दृष्टिक्षेप टाकला. अमात्यांनी मंडपाच्या छतावर चढलेल्या कारागिरांना संकेत करताच त्यांनी मत्स्ययंत्र सुरू केलं. आर्यावर्तातील एकजात सर्वश्रेष्ठ वीरांचं भाग्य त्या यंत्राबरोबर अक्षरशः मंडलं घेऊ लागलं! पाच धिप्पाड मल्लांनी मोठ्या कष्टानं धापा टाकीत पांचालांच्या शस्त्रागारातून वाहून आणलेलं ते विख्यात शिवधनुष्य पाण्याच्या तळ्याजवळ ठेवलं आणि सुटकेचा निःश्वास टाकून मस्तकावरचा घाम टिपला.

सर्वत्र शांतता पसरली. नुसती मत्स्ययंत्राची घरघर तेवढीच स्पष्टपणे ऐकू येऊ लागली. तलावातील पाण्यात त्याचं प्रतिबिंब गरगरू लागलं!

ते अवजड शिवधनुष्य पाहून त्याला स्पर्श करण्यासाठी प्रथम तर कोणीच पुढं येऊ धजेना. सगळेच जण एकमेकांकडे टकमक पाहू लागले! शेवटी विशाल छातीचा

आणि नावाप्रमाणं दृढ शरीराचा राजा दृढधन्वा उठला. अभिमानानं सर्व मंडपभर दृष्टी फेकत त्यानं उत्तरीय सावरीत शिवधनुष्याला हात घातला. सर्व प्रेक्षकांनी डोळे ताणले, पण दृढधन्वाचे डोळे पांढरे झाले; तरीही त्याला ते प्रचंड शिवधनुष्य नुसतं तसूभरही उचलता आलं नाही! लज्जित होऊन त्यानं आपली मान खाली घातली आणि तो क्षणात तेथून पराभूत म्हणून परतला. मंडपात एक क्षणभरही न थांबता तो मानी राजा सरळ बाहेर निघून गेला.

त्याच्यानंतर मेघसंधी, मणिमान, दण्डधार, सुषेण, रोचमान, बृहद्बल, सत्यधृत व भोज असे अनेक राजे क्रमाक्रमानं आले, पण त्यांपैकी एकालाही ते शिवधनुष्य वर उचलता आलं नाही! शेवटी चेदिराज शिशुपाल उठला. त्यानं दातओठ खात कसंबसं ते धनुष्य उचललं, पण प्रत्यंचा लावून लक्षयवेधासाठी पक्का पवित्रा घेणं काही त्याला साधलं नाही. कसाबसा त्यानं एकच बाण सोडला, पण तो माशाच्या डोळ्यावर बसला नाही! सर्वांच्या उंचावलेल्या अपेक्षा कोसळल्या. त्याच्यानंतर पांडवांचा मामा, राजमाता म्हणविणाऱ्या माद्रीचा सख्खा बंधू, मद्रदेशाचा राजा शल्य पुढं झाला! पण तोही कसाबसा दोन बाण फेकू शकला. त्याच्यानंतर सिंध देशाच नृप जयद्रथ उठला. मोठ्या प्रयासानं शिवधनुष्य उचलून त्यानं तीन बाण फेकले, पण एकही लक्षयात घुसू शकला नाही. सगळीकडे उत्सुकता, भय, सहानुभूती या विविध भावनांना धारण करणारी शांतता पसरली होती. स्वयंवराला सुरुवात होऊन एक घटका झाली होती, पण तरीही ते मत्स्ययंत्र सर्वांना वाकुल्या दाखवीत उन्मत्तपणानं तसंच गरगर मंडलं घेत होतं. मी सहज म्हणून मध्येच श्रीकृष्णाकडे पाहिलं. आसनाच्या उजव्या हाताच्या बैठकीवर त्यानं आपलं कोपर टेकलं होतं. उजवा तळहात उजव्या गालाला टेकवून थोडासा उजवीकडे कलून तो स्वस्थ बसला होता. कर्णाकडे पाहता तो श्रीकृष्णाच्या पायाच्या अंगठ्याकडे एकटक पाहत आहे, असं माझ्या ध्यानात आलं.

आता मला वाटू लागलं की, कर्णाला पुढं जाण्यासाठी संकेत करावा, पण न जाणो त्याचा लक्षयवेध चुकला तर? अशी एक शंकाही मनात येऊ लागली. सर्वांत शेवटी निर्वाणीच्या वेळीच मी त्याला उठण्याचा संकेत करणार होतो.

एकामागून एक राजे येत होते. आपल्या सामर्थ्याची परीक्षा पाहत होते. अपयश घेऊन परतत होते. काही नृपांनी तर दोन-दोन वेळा प्रयत्न केला! मत्स्ययंत्र मात्र सर्वांना वेडावीत घरघरत तसंच फिरत होतं. मंडपात शिवधनुष्याची महती गाणारी कुजबुज सुरू झाली. आर्यावर्तातले सर्व राजे त्या अवघड पणापुढं निष्प्रभ ठरत आले होते! काही राजे माझ्याकडे पाहत होते. काही श्रीकृष्णाकडे, तर जवळ- जवळ सगळेच कर्णाकडे अपेक्षेनं पाहत होते! तेवढ्या मगधांच्या विशाल साम्राज्याचा, द्वंद्वयुद्धात प्रवीण असलेला, बळकट शरीराचा जरासंध उठला! त्याचं सर्व कसदार शरीर पुष्ट हत्तीसारखं धिप्पाड होतं. आत्मोन्नतपणे छाती फुगवीत तो शिवधनुष्यापाशी आला. सर्व सामर्थ्यानिशी त्यानं धनुष्य उचललं! एकामागोमाग एक असे चार बाण फेकले. पण मत्स्ययंत्राला असलेल्या चक्रातील आऱ्यांतून ते पार कुठेतरीच बाहेर गेले! छताला भेदून अदृश्य झाले! जरासंधानं आपल्या बाणांतील एक तरी बाण माशाच्या डोळ्यात घुसला असेल या अपेक्षेनं छतावरच्या मत्स्ययंत्राकडे क्षणभर पाहिलं, पण तेवढ्यात त्याचा तोल गेला आणि स्वत:ला सावरण्याच्या प्रयत्नात तो तलावाच्या उंच दगडी कठड्यावरून धाडकन खाली कोसळला! ते अवजड शिवधनुष्य त्याच्या उन्नत वक्षावर

कोसळलं! त्याच्या पराभवाची क्रूर कुचेष्टा करणारी हास्याची लकेर मंडपात सगळीकडे पसरली. मी श्रीकृष्णाकडे पाहिलं, पण तोही खटचाळपणे गालातल्या गालात हसत होता! पण क्षणार्धात ते दृश्य पालटलं. जरासंध त्या प्रचंड धनुष्याच्या असह्य भाराखाली प्राणांतिक तडफडू लागला. हातपाय झाडून स्वतःची सुटका करण्यासाठी केविलवाणी धडपड करू लागला. त्याच्या मुखातून रक्ताची एक चिळकांडी उंच उडाली. शिवधनुष्य रक्तानं माखलं! एका मानी क्षत्रियाची ती केविलवाणी धडपड काही केल्या माझ्यानं पाहवली नाही. मी स्पर्धेत भाग घ्यायचा नाही, असं ठरविलं होतं, पण तेही मी क्षणात विसरलो! श्रीकृष्णाच्या तटस्थपणाची तिडीक म्हणून त्याच्यावर एक जळजळीत दृष्टिक्षेप टाकत आसनावरून ताडकन उठलो. तरीही कर्ण वेड्यासारखा त्या काळ्याच्या पायांकडेच पाहत होता! श्रीकृष्णाला भेटून आल्यापासून तो असा का वागत होता तेच मला समजत नव्हतं. कृष्णानं त्याचा तेजोभंग केला होता की काय? मी कर्णाच्या साहाय्याची वाट न पाहता उठलो! तलावाजवळ आलो! आकाशाकडे दृष्टी खिळलेला प्रचंड जरासंध माझ्याकडे जणू प्राणाची भीकच मागत होता! मगधांच्या समर्थ राज्याचा तो पराक्रमी राजा मृत्यूचं रूप घेऊन वक्षावर कोसळलेल्या शिवधनुष्याला कुणीतरी दूर करावं म्हणून आशाळभूतपणे पाहत होता! एक विख्यात द्वंद्वयोद्धा! मोठ्या कष्टानं मृत्यूशी द्वंद्व खेळत होता. मी कृष्णाजवळ बसलेल्या माझ्या गुरूंकडे – बलरामांकडे एकवार श्रद्धेनं पाहिलं. त्यांचे विशाल नेत्र मला आशीर्वाद देत होते! त्या तशा आणीबाणीच्या वेळीही माझ्या मनात श्रीकृष्णाची आणि बलरामांची तुलना करणारा एक चमत्कारिक विचार तरळून गेला. मला बलरामांबद्दल नितांत आदर वाटत होता, पण तेवढ्याच प्रकर्षानं किंबहुना त्याहीपेक्षा जास्त प्रभावीपणानं त्या श्रीकृष्णाचा मनस्वी तिटकारा वाटत होता.

क्षणात मी पुढं झालो. तडफडून घायाळ नि श्रांत झालेल्या जरासंधाच्या हातापायांची धडपड थांबली होती! त्याचं सगळं शरीरच जणू डोळे होऊन बोलत होतं! मृत्यूच्या दारात जीव किती असाहाय्य असतो! तो स्वतःची प्रतिष्ठा, आत्माभिमान काही-काही जाणीत नसतो. तो केवळ याचना करीत असतो जगण्याची! जीवनाची! देशोदेशींचे अनेक राजे नरयज्ञासाठी आपल्या राजनगरात – गिरिव्रजात कारावासात कोंडणारा जरासंध शिवधनुष्यानं अडकवून ठेवला होता! खाली वाकून मी एका हातानंच ते शिवधनुष्य उचललं! सगळ्या मंडपात टाळ्यांचा प्रचंड कडकडाट झाला! फासे पारध्यांनी लावलेल्या सापळ्यात अडकलेली शेपटी सुटताच एखाद्या वनराजानं गर्जना करीत सुटकेची उंच उडी मारावी, तसा जरासंध वक्षावरचं धनुष्य दूर होताच ताडकन वर उसळला नि हात उंचावीत मोठ्यानं ओरडला. त्यानं मला कडकडून मिठी मारली. सर्व लोकांना वाटलं की मी द्रौपदीसाठीच स्वयंवरात भाग घेण्यासाठी ते धनुष्य उचललं होतं. कुणीतरी माझ्या नावाचा जयघोष केला. मला आता तेथून माघार घेणं शक्य नव्हतं. ते धनुष्य मी सहज उचललं याचं अनेक लोकांना आश्चर्य वाटलं, पण केवळ माझे गुरू बलरामांखेरीज कुणालाही माहीत नव्हतं की, मी गदेच्या शालेत भीमाशी सातत्यानं सहा-सहा घटका गदा खेळलो होतो! दंडाचा तो सरावच मला या वेळी उपयोगी पडला होता. माझे दंड हत्तीच्या पायांसारखे भक्कम झाले होते.

धनुष्य हातात पेलीत मी सर्व मंडपभर एकदा गरगर दृष्टी फिरविली आणि तलावाकाठी गेलो. काठावर उभा राहून सहज एकदा द्रौपदीवर दृष्टी टाकली. ती

डोळ्यात प्राण आणून माझ्याकडेच पाहत होती! माझ्यातील कुरुकुलाच्या अभिमानाचा लसलसता कोंब तरारून उठला! ही सुगंधाची कुपी सर्वांसमक्ष कवेत मारूनच आज हस्तिनापूर गाठायचं, असा निर्धार करून मी कुंडातल्या पाण्यावर शांतपणे दृष्टी खिळविली. मत्स्ययंत्राचं प्रतिबिंब पाण्यात स्पष्ट पडलं होतं! पूर्वीच्या स्पर्धकांनी फेकलेल्या बाणांनी छताला जी काही छिद्रं पडली होती त्यातून निसटलेले काही चुकार सूर्यकिरणही पाण्यात तरंगत होते. त्यात ते प्रतिबिंब तळपत होतं, पण – पण त्यात गरगरणाऱ्या मत्स्याचा डोळा दिसत नव्हता! तरीही मी प्रत्यंचा ताणून वेध घेतला आणि सलग असे एकापाठोपाठ पाच बाण फेकले! पण माझ्या प्रत्येक बाणाबरोबर केवळ छताला आणखी एक-एक छिद्र अधिक पडत गेलं! सूर्यकिरणांचे आणखी पाच कवडसे कुंडातील पाण्यात डोकावू लागले! ते पाच कवडसे पाहताच मला पांडवांची आठवण झाली! प्रत्येक वेळी पाच हा आकडा माझ्या मनाचा वेध घेत होता! माझा एकही बाण मत्स्यात घुसला नव्हता. पांचालांचं ते क्षुद्र मत्स्ययंत्र कुरूंच्या सिंहासनाला खिजवीत तसंच ताठपणे गरगरत होतं. ते अवजड धनुष्य पेलून-पेलून माझ्या दंडात कड आला. खिन्नपणे मी काठावरून खाली उतरलो. मला तीव्रपणे वाटलं की, या द्रुपद राजानं याऐवजी गदेचा कोणताही कठीण पण आज ठेवला असता तर त्यांचं काय बिघडलं असतं? त्याला आपल्या कन्येचं खरोखरच स्वयंवर करायचं होतं की त्यानं ही पराक्रमी वीरांची क्रूर कुचेष्टा मांडली होती? त्याचं शिवधनुष्य घेऊन हा पण पूर्ण करायला आता कैलासावरून साक्षात शिवानंच धाव घ्यायला पाहिजे होती.

माझ्या पराभवावर मात्र द्रौपदी गालांत हसत होती!

मी लज्जित मनानं तलावाच्या पायदंड्या उतरून आलो. हातातील शिवधनुष्य क्षणाक्षणाला मला अतिशय अवजड भासू लागलं. सर्वांत अधिक काळ मीच ते हातात पेललं होतं. मंडपातील लोकांची प्रतिक्रिया काय होत आहे म्हणून मी सगळीकडे दृष्टी फेकली. यादवांचा स्वस्थ बसलेला राजा श्रीकृष्ण माझ्याकडे पाहून खोचकपणे हसत होता! इतर सर्वांनी माना खाली घातल्या होत्या! कर्ण वेड्यासारखा अजून त्या काळ्या श्रीकृष्णाच्या पायांकडेच पाहत होता. हसणाऱ्या कृष्णाला, 'नुसताच हसतोस काय? धमक असेल तर ऊठ नि हे धनुष्य पेलून तो पण पूर्ण करून दाखव!' असा भाव दर्शविणारा एक कडकडीत दृष्टिक्षेप त्याच्यावर टाकून, मी ते धनुष्य त्याच्याच दिशेनं फेकलं! पण माझ्या दंडातील शक्ती क्षीण झाल्यामुळे ते फारसं पुढं गेलंच नाही! उलट पायांखालच्या गुळगुळीत पाषाणावरून ते कसंतरी घसरलं आणि गोल मंडल घेऊन फिरून माझ्याच उजव्या पायाच्या पंजावर पडलं! वेदनामय सणक पायापासून मस्तकापर्यंत चढली. पणातील पराभवानं मन आणि धनुष्याच्या भारानं शरीर दोन्हीही आक्रोशू लागली. मदतीच्या अपेक्षेनं समोर बसलेल्या जरासंधाकडे मी पाहिलं! त्यानं नकारदर्शक मान खाली घातली. मला त्याची त्या बिकट अवस्थेतही कीव वाटली! माझ्या धनुष्याखाली सापडलेल्या पायाच्या वेदनांचं मला तेवढं दु:ख वाटलं नाही, जेवढं जरासंधाच्या तटस्थपणाचं वाटलं! पाय धनुष्याखाली सापडून आता तुटला तरी कुणाकडेही मदतीच्या अपेक्षेनं वर पाहायचं नाही, असं ठरवून मी माझे डोळे घट्ट मिटले. क्षणापूर्वी जरासंधाला मुक्त करणारा दुर्योधन स्वत: शिवधनुष्याखाली सापडलेला पाहून सर्व जण हळहळत असावेत, पण पुढं मात्र कोणीच सरसावत नव्हतं! माझं मन चोहोबाजूंनी लाल मुंग्या डसलेल्या घायाळ भुजंगासारखं तडफडत होतं!

पण एकाएकी मंडपातील कुजबुज जास्तच सशब्द झाली. माझ्या कानांवर तुटक-तुटक शब्द एकामागोमाग एक आदळू लागले. ''कर्ण!... कवच-कुंडलं!... लक्ष्यभेद... सर्वश्रेष्ठ धनुर्धर!... साक्षात धनुर्वेद!'' मान उचलून मी कर्णाच्या आसनाकडे पाहिलं! तो आसनावरून उठून उभा राहिला होता! त्याच्या कानांतील कुंडलं तप्त झाली होती, पण उभा राहूनही तो समोरच्या श्रीकृष्णाच्या पायाच्या उजव्या अंगठ्याकडेच अजून पाहत होता! मला मोठ्यानं ओरडावंसं वाटलं की, ''कर्णा, नेहमी गरुडासारखे आकशात झेप घेणारे तुझे डोळे आज त्या काळ्या कृष्णाच्या पायावर का खिळले आहेत?'' पण तेवढ्यात श्रीकृष्णानं उजव्या पायाचा अंगठा हळूच थोडा वर उचलला. कर्ण एक मोहक गोड हास्य फेकीत आसनाजवळून गर्रकन वळला आणि माझ्या दिशेनं झपाझप चालू लागला! त्याची उंच देहयष्टी इतकी भारदस्त वाटत होती की, जणू खदिराचा डेरेदार उंच वृक्षच चालत येत होता! त्याच्या प्रत्येक पदक्षेपाबरोबर त्याच्या कानांतील कुडलं लयीत हिंदोळे घेत होती. त्याच्या आत्मविश्वासू, ढंगदार चालीवर सर्व प्रेक्षकगण इतके मुग्ध झाले की, त्यानं धनुष्याला हात लावण्यापूर्वीच सर्वांनी प्रचंड टाळ्यांनी त्याचं स्वागत केलं! मी माझा पाय धनुष्याखाली आहे, याची जाणीवही विसरून गेलो! हस्तिनापूरच्या आखाड्यात मला सापडलेला अष्टपैलू हिरा दशदिशांना तेजाचे दीप्तिमान स्त्रोत फेकत येत होता!

छे! मी तरी किती स्वार्थी होतो! अशा कर्णाचा वापर करून मी पांचालीला आपली अर्धांगी करणार होतो! किती अरसिकपणा ठरला असता तो! पांचालीसारखी सुगंधी कुपी कर्णासारख्या सुवर्णपुष्पालाच शोभून दिसली असती! कर्ण आणि पांचाली हा जोडा साक्षात उमाशंकरालाही लाजवील असाच ठरला असता! मी माझा विचार बदलला. आता क्षणभरातच कर्ण मत्स्यभेद करील! त्यानं मत्स्यभेद केला की, द्रौपदीचा अंगदेशाची महाराणी म्हणून उद्घोष करायचा आणि चंपानगरी ही कर्णाच्या अंगदेशाची राजनगरी आहे एवढंच घोषित करून थांबायचं नाही तर कर्ण हा कुरूंचा सेनापती आहे, असा आज त्याचा यथोचित गौरवही करायचा! हस्तिनापुराला परतल्यावर ती कल्पना महाराजांना पटवून त्याप्रमाणं त्याच्या सेनापतीपदाचा अभिषेकविधी करायचा. हस्तिनापुरातून राजहत्तीवरून त्या दोघांची मिरवणूक काढायची! मी तिथल्या तिथं मनाशी हा निर्धारही करून टाकला.

क्षणातच तो माझ्याजवळ आला. उत्तरीयाची लोंबती टोकं क्षणात त्यानं कमरेजवळ अधरीयात खोचली! नुसती एकदाच त्यानं माझ्यावर दृष्टी टाकली. काहीही न बोलता त्याचे निळेशार, निमुळते, नितळ डोळे मला सांगत होते, 'राजा, घाबरलास की काय? तुझी सुटका करायला कर्ण समर्थ असताना तू जरासंधाकडे अपेक्षेनं कशाला बघितलंस?' पुढं होत प्रथम लीलया त्यानं शिवधनुष्याला नम्र वंदन केलं! अगदी सहजपणे त्यानं एका हातानंच ते अवजड शिवधनुष्य वर उचललं! काय होत आहे हे समजायच्या आत, एखाद्या लहान मुलानं एखादं खेळणं वर उडवून झेलावं तसं ते धनुष्य त्यानं क्षणभर अवकाशात वर फेकलं नि परत अचूकपणे एकाच हातानं पुन्हा पेलून धरलं! मंडपभर अविरत टाळ्यांचा प्रचंड पर्जन्य कोसळला! माझा पाय आणि मन दोन्हीही मुक्त झाली. उल्हसित मंडपानं त्यासाठीही टाळ्यांचा अविरत प्रतिसाद दिला. कर्णाचं अर्घ्यदान स्वीकारणाऱ्या समोरच्या गंगेच्या जललहरीच जणू थरथरत आहेत, असं मला वाटलं.

विजेसारखा तो तलावाकाठी गेला. तिथं ठेवलेल्या बाणांच्या भात्यातील एक बाण त्यानं सर्रकन खेचला. तो त्याचा सूक्ष्म लक्षय अचूक टिपायचा नित्याचा सूची बाण होता! वीरासन घेत प्रत्यंचा ताणून सूची बाण चढवून त्यानं पाण्यात डोकावून पाहिलं. गरगर फिरणाऱ्या मत्स्ययंत्रातील माशाचा डोळा पाण्याच्या कुठल्या थेंबावर प्रतिबिंबित झाला आहे हे शोधण्यासाठी त्याचे नीलवर्णी डोळे गरगरू लागले. त्याचं ऐटदार वीरासन सर्व आमंत्रितांना मंत्रमुग्ध करीत होतं! पाण्यात डोकावणाऱ्या त्याच्या कपोतासारख्या ऐटदार, पुष्ट मानेला लोभस वळ्या पडल्या होत्या! अरण्यवराहावर झेप घालण्यापूर्वी सिंह घेतो, तसा त्यानं अचूक पवित्रा घेतला होता! सर्व जणांची दृष्टी त्याच्या सूची बाणाच्या अग्रावर आता खिळली होती! द्रुपदकन्या पांचालीचं जीवन त्या बाणाच्या अग्रावरून प्रवास करीत कर्णाच्या चरणांवर पडणार होतं! सर्वांनी कुतूहलानं, उत्सुकतेनं नि कर्णावरच्या निरामय आदरानं श्वास रोखले होते! तो एकच दिव्य क्षण होता! सर्व पांचालांचं आणि कुरूंचं भवितव्य त्या मत्स्ययंत्रातील माशाबरोबर त्या क्षणीच ठरणार होतं! कर्णाचं जीवन पांचालीच्या प्राप्तीनं उजळून जाणार होतं. छे! पांचालीचं जीवनच कर्णाच्या प्रकाशमय सहवासात फुलून निघणार होतं! तो एकच क्षण सर्वांचा भविष्यकाल ठरविणार होता. माझा, कुरूंचा, आर्यावर्ताचा आणि सूर्यशिष्य अंगराज कर्णाचा!

मत्स्ययंत्रातील गरगर मंडलं घेणारा मासा, त्याच्या डोळ्यांचं प्रतिबिंब आणि सूचीबाणाचं टोक यांची सांगड त्यानं घातली आणि लक्षयवेधसाठी म्हणून कुंडलांपर्यंत आकर्ण अशी सर्रकन प्रत्यंचा ताणली. सर्वांची शिगेला पोहोचलेली उत्सुकताही ताणली. बाणाचं प्रक्षेपण होणार एवढ्यात मंडपातील औत्सुक्यपूर्ण शांततेला चिरणारा एक समर्थ नारी आवाज मंडपाच्या राजकक्षातून उमटून सर्वांच्या कानात लिप्त बाणासारखा घुसला.

"थांबा!!"

प्रथम कोण बोलतंय हेच कुणालाही समजेना! सर्व जण राजकक्षाकडे अवाक होऊन पाहू लागले. शुभ्रकमलांची वरमाला कशीतरीच हालली! सर्वांची हृदयं थरकली! साक्षात द्रौपदी बोलत होती. हातातील कमलांची वरमाला उंचावून, कंठाच्या नाजूक धमन्या फुगवून!

ती म्हणाली, "थांबा! आपण मत्स्यभेद नाही करू शकत!"

आश्चर्यमय कुजबुज मंडपाला घेरू लागली.

"का नाही करू शकत?" झटकन आपली पुष्ट मान वर उंचावून अंगराज कर्णानं आश्चर्यानं विचारलं.

"आपण क्षत्रिय नाही!! मी कोणत्याही सारथ्याची पत्नी वा सून होणं कदापिही नाही मान्य करणार! मी एक क्षत्रियकन्या आहे – क्षुद्र सारथिकन्या नाही!"

कर्णाचे धनुष्य धारण केलेले बाहू अनावर संतापानं सतत थरथरू लागले. त्यानं तणाव दिलेली प्रत्यंचा लडलडू लागली. त्याच्या हातातील शिवधनुष्यातून मत्स्याच्या नेत्रभेदासाठी रोधिलेला बाण वेडावाकडा होत कसातरीच सुटला! तो सरळ श्रीकृष्णाच्या आसनाच्या दिशेनं धावला आणि खाली उतरून सपकन त्याच्या उजव्या पायाच्या अंगठ्यात घुसला! अक्रूर, बलराम, उद्धव सर्व जण एकदम त्याच्याभोवती धावले, पण काहीही न बोलता हाताच्या संकेतानंच श्रीकृष्णानं सर्वांना आपापली आसनं घेण्यास सांगितलं! आपला पाय तसूभरही न हलविता खाली वाकून त्यानं तो बाण

सहजपणे आपल्या अंगठ्यातून हसतच उपटून काढला! त्यावरचं रक्त अंगावरच्या पीतांबरानं अलगद टिपलं! अगदी थंडपणं!

मला मात्र ते रक्त पाहून समाधान वाटलं! त्याच्या अंगावर काही अभेद्य कवच नव्हतं!

"क्षुद्र, सूतपुत्र!" स्वत:शीच पुटपुटत हृदय भेदणाऱ्या वैषम्यानं आपली मान मागं टाकून कर्ण कितीतरी विकटपणे गदगदून कसातरीच हसला! कसलं होतं ते हास्य! ते हास्य नव्हतंच! आक्रोश हा स्त्रियांचा गुणधर्म असतो, त्या वीराला असं आक्रोशता येणार नव्हतं! म्हणूनच तो हसला होता, पण त्याचं हास्य आक्रोशापेक्षाही हृदय पिळवटणारं होतं! त्याची तेजस्वी कुंडलं क्षणात निस्तेज पडून तर क्षणात रक्तवर्णात प्रकाशून त्याच्या मानी मनाच्या अंतरंगातला भावनांचा विस्फोट स्पष्ट करू लागली! बाणांनी पडलेल्या छताच्या छिद्रांतून तो एकटक वेड्यासारखा आकाशाचा पटल जाळीत तळपणाऱ्या गुरुदेव सूर्याकडे पाहत काही काळ त्या तलावाच्या दगडी काठावर दगडी पुतळ्यासारखा तसाच वीरासनातच राहिला! दुसऱ्याच क्षणी लडलडणारं हातांतील शिवधनुष्य संतापानं खालच्या पायघडीवर फेकून देऊन, वायूनं भडकलेला वणवा अरण्यातच झपाझप पसरत जातो तसा तो तरातरा चालत आपल्या आसनाकडं जाऊन मान खाली घालून बसला! तो चालताना ज्या-ज्या ठिकाणी त्याचे पाय पडले होते, त्या-त्या ठिकाणचं पायघडीवरचं वस्त्र होरपळून काळंठिक्कर पडलं होतं! भावनांचा केवढा प्रचंड कल्लोळ, समुद्रपर्वकाळी खवळावा तसा त्याच्या अंतरंगात खवळला असावा, याची त्याच्या सहवासात राहूनसुद्धा मलाही नीट कल्पना येऊ शकली नाही! त्याच्या शेजारीच आसनावर असल्यामुळे त्याच्या नाकाद्वारे बाहेर फेकले जाणारे उष्ण नि:श्वास माझ्या शरीराला चांगलेच जाणवत होते! कुणीच काही बोलत नव्हतं. बोलू शकणार नव्हतं. शेवटी हा भावपीळ एका निष्ठावान सूर्यभक्ताचा आणि याज्ञसेनीचा होता!

झालेल्या अघटित प्रकारानं सर्वांनाच विस्मयाचा केवढातरी प्रचंड धक्का बसला होता. प्रत्यक्ष द्रौपदीच वधू म्हणून उभी असताना सर्व संकेत गुंडाळून ठेवून विनयानं खाली घातलेली मान उंचावून तीच काहीतरी असं भयानक मर्मछेदक बोलेल याची कुणालाच कल्पना नव्हती! बोलणारी द्रौपदी आणि बोलून घेणारा कर्ण असल्यामुळं मध्ये बोलण्याची अन्य कुणाचीच प्राज्ञा नव्हती!

सगळीकडं शांतताच शांतता पसरली होती. द्रौपदीनं परत आपली मान खाली घातली. स्वयंवर मांडून दोन घटका झाल्या होत्या. संध्यासमय झाल्यामुळे आकाशातला सूर्य आता ढळत चालला होता! मत्स्ययंत्राच्या भयाण घरघरीशिवाय अन्य कोणताच ध्वनी त्या मंडपात आता ऐकू येत नव्हता. ते मत्स्ययंत्र कालयंत्र बनून तसंच घरघरत राहणार होतं. इतकं गोल गरगरणार होतं की, प्रत्यक्ष त्या माशालाही आता पृथ्वीचा डोलाराच फिरल्यासारखा दिसणार होता! त्याच्या अविरत गरगरण्यामुळे काळ कसलं भयानक संगीत भवितव्यात रचणार होता, हे एक त्या मत्स्ययंत्राला आणि दुसरं त्या काळालाच माहीत होतं!

जीवनभर मला साथ देण्याची प्रतिज्ञा घेतलेल्या माझ्या मित्राकडं – अंगराज कर्णाकडं मी सहानुभूतीनं बघितलं. आज जीवनाच्या स्पर्धेत तो खरोखरच पराभूत झाला होता. त्याच्या अंगावरची वस्त्रं घामानं चिंब भिजली होती. अपमानाच्या तीव्र आणि असह्य जाणिवेनं त्याचं शरीर यज्ञकुंडासारखं पेटलं असावं, पण तो काहीच बोलला नाही.

काय बोलणार होता! मला उठून सर्वांना गर्जून सांगावंसं वाटत होतं की, ''कर्ण हीन नाही, क्षुद्र नाही! त्याची अशी मर्मभेदी वंचना करू नका. तो अंगदेशचा अभिषिक्त राजा आहे! स्वतंत्र आहे! त्याच्या कानांत प्रकाशमान कुंडलं आहेत. अंगावर अभेद्य कवच आहे. तो स्वतंत्र आहे! श्रेष्ठ आहे!'' मी उठण्याच्या प्रयत्नात होतो एवढ्यात सामान्य प्रेक्षकांच्या बैठकीतून उठलेला एक दाढी- जटाधारी ब्राह्मण युवक सर्वांना दूर सारत पुढं सरसावताना मला दिसला! समोरच्या आसनावर श्रीकृष्णही कसल्यातरी निर्धारानं उठून उभा राहिला होता.

मत्स्यभेदासाठी कुणीच पुढं येत नाही, हे पाहून एव्हापर्यंत शांत असलेला द्रुपदराजाही कठोर शब्दांत सर्वांची निर्भर्त्सना करू लागला. त्याचे शब्द जळजळीत होते.

''आज माझ्या कन्येचं पाणिग्रहण करण्याची पात्रता या आर्यावर्तातल्या एकाही क्षत्रिय राजात नाही असंच मी मानायचं काय? एका यःकश्चित लाकडी माशानं आज अखिल आर्यावर्त जिंकला असंच समजून मी माझी यज्ञदेवापासून मिळालेली ही सुगंधी सुकन्या परत यज्ञदेवाच्या रसरशीत कुंडात असाहाय्यपणे लोटून द्यावी काय? आज या राष्ट्रातील क्षात्रतेज नष्टप्राय झालं आहे काय?''

''नाही!'' तो दाढी-जटाधारी ब्राह्मण युवक मंडपाच्या मध्यभागी येत गर्वोन्नतपणे म्हणाला. त्यानं आपल्या शरीरावर भगव्या वस्त्रांची छाटी घातली होती. सर्वांगाला भस्माचे पट्टे फासल्यामुळे त्याचा रंग कोणता होता कुणालाही अचूकपणे सांगता आलं नसतं, पण त्याची बाणासारखी सरळ गतिमान चाल मात्र मला दाट परिचयाची वाटली. ती चाल... ती चाल अर्जुनाच्या चालीशी फारच जुळती होती! तो अर्जुन तर नसेल? माझं शंकाकुल मन क्षणभर थरकलं. पण ते शक्यच नव्हतं. अर्जुन तर मरणाच्या मार्गानं कधीच गेला होता. त्याचं पिशाच्चसुद्धा या स्वयंवराच्या मंडपात येणं शक्य नव्हतं! आणि आलं असतं तरी शिवधनुष्याला हात घालायला ते कधीही धजलं नसतं! शिवाला पिशाच्चं भितात असं मी ऐकलं होतं.

त्या ब्राह्मणकुमारानं शिवधनुष्य कर्णासारखंच एका हातानं उचललं, क्षणात ऐटदार वीरासन घेतलं! ते बघताच मंद हसणारा श्रीकृष्ण उठला तसाच खाली बसला! या घटनेनं क्षणापूर्वी कर्णाचा... त्या तेजस्वी वीराचा झालेला अपमान कुणाच्याच ध्यानात राहिला नाही! सर्वांनी परत टाळ्यांचा वर्षाव करून त्या नव्या स्पर्धकाला चेतावणी दिली. त्या ब्राह्मणकुमारानं मान वळवून श्रीकृष्णाकडं दृष्टी फेकली. मला त्या सर्वांचाच राग आला. त्यानं बसा म्हटल्यानंतरच प्रथम सर्व राजे खाली बसले होते. कर्ण तर त्याच्या पायांकडे पाहत कितीतरी काळ स्वस्थच बसला होता आणि आता हा ब्राह्मणकुमारही त्या दिशेनंच पाहत होता? का? हा श्रीकृष्ण म्हणजे या सर्वांना वाटतो तरी कोण? देवांचा राजा इंद्र की सृष्टिकर्ता ब्रह्मदेव? मी माझं बैठकीचं आसन उद्वेगानं सरळ उलट दिशेला परतवून घेतलं. मला श्रीकृष्ण आणि तो ब्राह्मणकुमार वा त्या मंडपातील मूर्खांसारखे टाळ्या पिटणारे प्रेक्षकगण यांतलं काहीच माझ्या दृष्टीपुढं असू नये, असं त्या वेळी वाटलं! आसन फिरवताच माझ्या पाठीमागच्या आसनावर बसलेला शिशुपाल माझ्या तोंडासमोर आला. तो आश्चर्यानं माझ्याकडे पाहत होता इतक्यात एक प्रचंड गदारोळ उठला. ''तो पाहा त्या ब्राह्मणकुमारानं मत्स्यभेद केला! गेली दोन घटका घटनांचे कडू धागे विणणारं ते मत्स्ययंत्रं आता बंद पडलं आहे! धन्य आहे तो

ब्राह्मणपुत्र! कोण आहे तो? कुठला?"

मी सर्रकन वळून पाहिलं, तळ्याच्या काठावर तो भगवी वस्त्रं घातलेला तरुण वक्ष ताणून उभा होता! त्यानं माशाचा डोळा अचूक टिपला होता! कोण होता तो? इतका वेळ स्वस्थ का होता? मी मनाच्या घोड्यावर प्रश्नांचे प्रतोद ओढू लागलो!

दगडी चौथरा उतरणारी, साक्षात आकाशकन्या भासणारी द्रौपदी मान खाली घालत सलज्जपणे त्या ब्राह्मणकुमाराजवळ आली आणि तिनं एक क्षणभरच त्याच्याकडे पाहून हातातील धवल कमलांची वरमाला मंद हसत एकदम त्याच्या गळ्यात घातली! नेमका त्याच वेळी सूर्य अस्ताला गेला! सगळीकडे संध्याछायेची धूसर भयाण छटा पसरली! स्वयंवर झालं होतं. सर्व जण परतण्यासाठी उठत होते. पण माझ्यामागून शिशुपाल दोन्ही हात उंचावून ओरडला, "हे स्वयंवर आम्हाला मान्य नाही! सर्व क्षत्रिय इथं उपस्थित असताना एका संध्या करणाऱ्या ब्राह्मणानं एक क्षत्रियकन्या वरावी हा सर्वांचाच अपमान आहे! मी तो प्राण गेला तरी कदापिही सहन करणार नाही. धरा त्या दाढीवाल्याला."

त्याच्या स्फोटक गर्जनेला पणात पराभूत झालेल्या सर्वच राजांनी प्रतिसाद दिला. सर्वांनीच आपापली शस्त्रं सावरली. मीही गदा उचलली. स्वयंवराच्या मंडपाला क्षणात सत्यासत्याच्या समरांगणाचं स्वरूप प्राप्त झालं. सर्व जण त्या ब्राह्मणकुमारावर धावले. तो हातातील शिवधनुष्यावर असंख्य बाण चढवून ते हवे तसे सोडू लागला. सर्व जण त्याच्या दिशेनं पुढं सरकू लागले. इतक्यात एकाएकी प्रचंड झंझावातासारखा ध्वनी झाला. दुसरा एक, भगवी छाटी घातलेला, जणू पर्वतच असा ब्राह्मणकुमार दातओठ खात सर्वांवर धावून आला. त्याला पाहताच माझं हृदय बंद पडतं की काय असंच मला वाटू लागलं. मी ज्याच्याशी सहा-सहा घटका गदा खेळलो होतो तो भीमच वस्त्रं बदलून, दाढी वाढवून तिथं आला होता! कसा आला होता तो? तो जिवंत कसा? पुरोचनाच्या लाक्षागृहानं मग जाळलं तरी काय? तागाचं आणि बल्वजाचं गवत की युवराज दुर्योधनाच्या आशा-आकांक्षा? नेहमीच्या सवयीप्रमाणं मी माझा हात डाव्या दंडातील चांदीच्या पेटीवरून फिरविण्यासाठी उचलला आणि कुठूनतरी सुंऽऽ करीत आलेला एक बस्तिक बाण नेमका त्याच वेळी माझ्या दंडात घुसला! त्या पात्यानं त्या पेटीचे बंध तुटले गेले. ती पेटी उडून कुठंतरी खाली पडली! कुणाकुणाच्या पायदळी सापडली कोण जाणे? दंडातील बाण काढावा म्हणून त्याचं शेपूट मी हातानं खेचलं. माझ्या ध्यानात राहिलं नाही की, तो बस्तिक बाण होता! त्याचं पातं माझ्या दंडात तसंच राहिलं. मोडकं शेपूट हातात आलं.

अपमानाच्या तीव्र तडाख्यानं आपण भ्रमिष्ट झालो आहोत म्हणून आपणाला हे विचित्र दृश्य स्वत:च्या कल्पनेतूनच दिसत असावं असं वाटून मी स्वत:ला एक चिमटा काढून त्या दुसऱ्या ब्राह्मणकुमाराकडे पाहिलं. होय तो भीमच होता! त्याचे डोळे आग पाखडत होते! एखाद्या कृषिजनानं शेतातील धान्याची कणसं मळणीच्या हंगामात झोडपावीत तसा तो मिळेल त्याला हातातील गदेच्या भकक्कम प्रहारानं झोडपत होता! त्याच्या पुढं एकटा शल्य कसाबसा टिकाव धरून होता. मद्य पाजलेल्या हत्तीसारखा तो आपल्या गदेच्या मंडलकक्षेत येणाऱ्या प्रत्येक वीराला जबरदस्त धडका देत होता. त्याच्या प्रहारांनी घायाळ झालेले वीर छताकडे तोंड वर करून विव्हळत कोसळत होते. प्रभंजनासारखा वाटणारा तो दांडगट अंगात चेव चढण्यासाठी मध्येच मत्त वृषभासारखा

डरकाळ्या फोडीत होता! त्याच्या डरकाळ्यांनी छतावरच्या मत्स्ययंत्रातील स्तब्ध झालेला लाकडी मासाही थरकत होता! निर्विवादपणे तो भीमच होता! पण तो कुठून आला होता? कसा आला होता? आकाशातून की पाताळातून? साक्षात यमालाही त्यानं आपल्या अवजड गदेनं ठोकरलं होतं की काय? त्याच्या थयथय नाचण्यानं स्वयंवराचा मंडप लडलड हलत होता! तो तसाच घटका दोन घटका ओरडत नाचत राहिला असता, तर निश्चितच मंडप चोहोबाजूंनी आत कोसळणार होता! मला केवळ वेड लागायचं तेवढंच शिल्लक होतं! भीम जिवंत कसा? भीतीनं थरकलेलं माझं मन आक्रोशत होतं. रथाच्या चाकाखाली सापडलेला पाय बधिर होतो तसं ते बधिर झालं होतं! तो तर सर्वांना ठोकण्यासाठी अधीरच झाला होता. तो भीम होता की त्याचं पिसाळलेलं पिशाच्च होतं? सत्य काय आणि स्वप्न काय तेच समजत नव्हतं. वारणावताच्या राखेतून त्यानं परत हा सुंदर आकार कसा घेतला? त्या राखेतील ओंजळभर राख घेऊन त्याचं पिशाच्च ती माझ्या आणि इतरांच्या तोंडाला फासायला तर आलं नव्हतं? भेदी होऊन पुरोचन फितला होता की माझं दैवच फिरलं होतं?

कसाबसा स्वत:ला सावरीत मी त्या धुमश्चक्रीतून बाहेर पडू लागलो. भीम माझ्याकडे डोळे वटारून आरोळ्या मारीत होता, पण त्याच्याभोवती शल्य, सुदामन, शिशुपाल, जरासंध, सुषेण यांचं कडं होतं. मत्स्यभेद करणारा अर्जुन पाण्याच्या तलावाकाठी द्रौपदीजवळ कुणालाही फिरकू देत नव्हता! पावसाळी मेघांतून पाण्याच्या सरी कोसळाव्यात तसे त्याच्या शिवधनुष्यातून तो सतत बाण सोडत होता! त्याच्या असंख्य बाणांनी वरचं छत केव्हाच छिद्रमय झालं होतं. कुणीतरी सेवकांनी क्षणाक्षणांनी वाढणाऱ्या अंधारातील गोंधळ आवरावा म्हणून प्रचंड ज्वाला फेकणारे पलिते आणले होते! त्या प्रकाशाचा उपयोग करून घेऊन सर्व जण उलट भीमार्जुनांवर अधिक तुटून पडत होते. गोंधळ वाढतच होता. माझं मस्तक तर सुन्नच झालं.

मी त्या कलकलाटातून कसातरी बाहेर पडलो. सर्व राजे उठून युद्धात गुंतल्यामुळे मंडपातील आसनं ठेवलेला भाग आता ओस पडला होता. दुरून राजपुत्र धृष्टद्युम्नाचा आणि त्याच्या पित्याचा सर्वांना शांत होण्यासाठी विनविणारा उच्च स्वर एकू येत होता! आसनांच्या दीर्घ बैठकीत दूरवर एका आसनावर आपलं विशाल मस्तक दोन्ही तळहातात गच्च पकडून खाली मान घालून बसलेला कर्ण मला दिसला! द्रौपदीच्या वाग्बाणांनी घायाळ झालेला तो वीर अस्वस्थ होऊन विचारमग्न झाला होता. धापा टाकीत मी त्याच्याजवळ गेलो. त्याच्या विशाल पाठीवर हात टाकून त्याला गदागदा हलवीत मी ओरडलो, ‘‘कर्णा, अर्जुन जिवंत आहे! त्यानंच पणात द्रौपदी जिंकली आहे! मंडपात तो कुणालाही जवळ येऊ देत नाही! घनघोर संग्राम माजला आहे! सत्य काय आहे तेच समजत नाही!’’

अंगावर साधी शुष्क काटकी पडली तरी एखादा चपळ सिंह जसा गर्जना करीत उसळतो तसा तो ताडकन वर उठला, ‘‘अर्जुन! अर्जुन! अर्जुन! आज त्याला सरळ-सरळ दाखवून देईन की, मनात आणलं तर एक सूतपुत्रही त्याच्या समक्ष एका राजकन्येला नेऊ शकतो!’’

विजेच्या लोळासारखा तो वळला. त्याची चर्या आरक्त झाली. कुंडलं रसरसू लागली. मला दूर लोटून तो मंडपामधल्या तलावाच्या दिशेनं घुसला! जवळ उभ्या असलेल्या भोजराजाच्या हातातून त्यानं त्याचं धनुष्य हिसकावून घेतलं. अर्जुनाजवळ

जाताच तो सर्वांना उद्देशून ओरडला, ‘‘दूर व्हा!’’ त्याच्या शब्दांत इतकी धार होती की, क्षणभर वीज कडाडल्याचा भास झाला. सर्वांनी हात आवरले. “अर्जुना, खरा क्षत्रिय असशील तर हातातील शिवधनुष्यानं या सूतपुत्र कर्णाचा शिरच्छेद करून या पांचालांच्या सौंदर्योन्मत्त राजकन्येला घेऊन जाशील! नाहीतर तिला आज आणि या क्षणी मी दाखवून देईन की, तिनं क्षत्रिय म्हणून निवडलेला अर्जुन या कर्णाच्या बाणाचं एक दुबळं भक्षय आहे!’’ तो ताडकन बोलून गेला. अर्जुनानंही शिवधनुष्य उंचावून सावरलं. त्या दोघांचं जुंपणार या भयानं द्रौपदी अर्जुनाला बिलगली! तिला दूर लोटून त्यानंही बाण चढविला, पण वेध घेण्यापूर्वीच कर्णानं तो क्षणात भेदून टाकला. दोघंही एकमेकांवर बाणांचा वर्षाव करू लागले. पलित्याच्या धूसर प्रकाशात ते एकमेकांवर अचूक बाण फेकण्याचा प्रयत्न करीत होते, पण ते वरच्यावरच भेदले जात होते. दोघांचा एकमेकांवर सतत एक घटका बाणवर्षाव चालला होता, पण निर्णय काही लागत नव्हता.

भीम आणि शल्य एकमेकांशी लढतच होते. त्या स्वयंवराच्या मंडपाचं उद्ध्वस्त समरांगणात रूपांतर झालं होतं. मध्यभागातील पाण्याचा तलाव बाणांनी खचाखच भरून गेला. पाणी काठ फोडून मंडपभर सैरभैर धावू लागलं! छताची अवस्था विदीर्ण झाली. द्रौपदीनं अर्जुनाच्या गळ्यात घातलेली वरमाला कर्णाच्या बाणांनी तुटून पायदळी पडली होती! युद्धाचा निकाल लागत नव्हता. दोघेही इरेला पेटले होते. बाणांच्या टक्करणाऱ्या ठिणग्या डोळे दिपवू लागल्या!

शेवटी कुणाला काही समजायच्या आतच युद्ध थांबलं. सर्वांनी दोघांकडे आश्चर्यानं पाहिलं. मध्ये पडलेल्या बाणांच्या ढिगावर हात उंचावून दोघांमध्ये श्रीकृष्ण उभा होता! इतकं मोठं दोघांचं घनघोर युद्ध झालं होतं, तरी तो आपला शांत नि धीम्या स्वरात हसतहसतच म्हणाला, “कर्ण-अर्जुन थांबा, तुमच्या युद्धासाठी लागणारे बाण तयार करण्याइतपत अवसर तरी या पांचालांना द्या! अरे, आता शस्त्रागारातले बाण संपले आहेत आणि युद्धशास्त्राच्या संकेताप्रमाणं एकदा वापरलेले बाण कोणताही योद्धा परत वापरू शकत नाही!’’ तो परत एकदा हसला आणि पीतांबरावरील निळं उत्तरीय सावरीत एकदम पांचालांच्या राजवास्तूत निघून गेला.

कर्णार्जुनांनी चमकून आपापल्या भात्यांत हात घातला. त्यांच्या हाताला एकही बाण लागला नाही! निरुपायानं अर्जुनानं हातातील शिवधनुष्य खाली फेकलं. या धनुष्याखाली द्रौपदीची वरमाला सापडली! तिच्यातील धवल कमलपुष्पं कुस्करून आणि रापून गेली होती! कर्णही मागं परतला. मी त्याच्या घामानं चिंबलेल्या खांद्यावर हात ठेवला. माझा तळहात त्याच्या शरीरस्पर्शानं नुसता पोळून निघत होता, पण मला त्याची पर्वा नव्हती. अर्जुनाला तोंड देणारा एक तरी वीर आपल्याजवळ आहे, ही जाणीवच मला आनंद देत होती. धैर्य देत होती. मी त्याला म्हणालो, ‘‘कर्णा, आता एक क्षणभरही आपण या नगरात थांबायचं नाही. जो तुझा अपमान तोच दुर्योधनाचा अपमान!’’

‘‘अंगराज, या घनघोर युद्धात एक घटना अत्यंत अप्रिय घडली आहे. तुझ्या साहाय्याला धावलेला तुझा... पुत्र,’’ अश्वत्थामा काहीतरी सांगता-सांगता अडखळला. त्याची मान खाली होती. पापण्या पाणावल्या होत्या!

‘‘कुठं आहे सुदामन? अश्वत्थामन् तू गप्प का?’’ त्यानं मानेला झटके देत अश्वत्थाम्याचे खांदे गदागदा हलवीत त्याला विचारलं. त्याच्या कुरळ्या सोनेरी केसात

दाटलेले घामाचे थेंब उडून अश्वत्थाम्यानं मस्तकावर बांधलेल्या वस्त्रावर पडले! कर्णाचे नेत्र अंगारांसारखे प्रदीप्त झाले होते. भिरभिरत ते मंडपात आपल्या पुत्राला शोधीत होते!

"तो तुझा पुत्र चिरविश्रांती घेतो आहे अंगराज!" बाणाच्या ढिगाऱ्यात पडलेल्या सुदामनच्या कलेवराकडे अंगुली उचलीत अश्वत्थामा गदगदल्या स्वरात म्हणाला.

"सुदामनऽऽऽ!" मान उंचावून हाकेला ओ न देणाऱ्या आपल्या पुत्राला मोठ्यानं हाकारत सर्वांना तिथंच टाकून तो आपल्या पुत्राच्या कलेवराकडे धावला! त्याच्या पायाजवळ द्रौपदीच्या हातातील वरमाला पडली होती! त्यानं ती क्रोधानं पायानं ठोकरून दिली! दुसऱ्याच क्षणी गुडघे टेकून आपल्या प्रिय पुत्राचा निष्प्राण हात आपल्या हाती घेऊन, क्षणापूर्वी सिंहासारखा गर्जत युद्ध करणारा राधेय पुत्रशोकानं स्फुंदू लागला! खांद्यावर हात ठेवून त्याला अश्वत्थाम्यानं कसंबसं मंडपाबाहेर नेलं! सर्वस्वी भिन्न अशा तीन भावनांचे तडाखे त्याच्या मनावर एकाच वेळी आदळले होते. अवमान, वीरश्री आणि पुत्रवियोग!

मी संकेत करताच आमच्या सेवकांनी सुदामनचा मृतदेह उचलला! पहिला कर्णपुत्र हस्तिनापुरात जन्मला होता आणि पांचालांच्या राज्यात त्यानं आपल्या पित्याच्या साहाय्यासाठी धावताना अखेरचा नि:श्वास सोडला होता.

नगर सोडताना गंगाकिनारी त्याच्या पार्थिव देहाला अग्निसंस्कार करताना जी नीरव शांतता सर्वत्र पसरली होती ती तर मी आयुष्यभर कधीच विसरणार नाही. गंगेच्या खळखळणाऱ्या लाटा मात्र पुन:पुन्हा कर्णाला सांगत होत्या, "कर्णा, तुझा पुत्र गेला. तुझं दु:ख कोणत्या प्रकारचं आहे ते त्या अर्जुनालाही पुत्रवधानं दाखवून दे!" आत्यंतिक धैर्यानं अंगराजानं हातातील पेटत्या पलित्यानं चितेला भडाग्नी दिला. आकाशाला भिडणाऱ्या त्या चितेच्या ज्वाळांचं विद्रूप आणि भयाण प्रतिबिंब गंगेच्या हिंदकळणाऱ्या लहरींवर लांबट आकारात पडलं होतं! सुदामनला अग्नीच्या स्वाधीन करून खिन्न मनानं आम्ही कांपिल्यनगर सोडलं.

**

# तेरा

त्या काळ्या रात्रीच आम्ही हस्तिनापुरात परतलो, पण माझं मन कशातही रमत नव्हतं. दुधाचा चषक उचलला, एखादं सुगंधपुष्प हातात घेतलं किंवा कुरूच्या विख्यात राजदंडाकडे पाहिलं, तरी प्रत्येक वस्तूत मला एकटा भीमच दिसत होता! दातओठ खात तो अंगावर धावून येतो आहे, असं वाटत होतं. प्रत्येक क्षण त्याच्या स्मृतीचे पलिते घेऊन मला क्रूर चटके देत होता. मी युवराज होतो, माझ्या केवळ एकाच शब्दासाठी सहस्त्र योद्धे हातात खड्ग घेऊन त्या भीमावर तुटून पडले असते. दु:शासन, पितामह, गुरू द्रोण, कृप, अश्वत्थामा, वृषवर्मा आणि कुरूंचं अफाट सैन्य म्हणजे माझ्या सुरक्षिततेचं भक्कम वृजन होतं. तरीही माझं मन भयाकुल झालं होतं. कितीही झालं तरी मानव कधीही अन्य कुणाच्या स्कंधावर विसंबून सुरक्षित असूच शकत नाही! कुणालाही स्वत:चं मन प्रथम निर्भय करावं लागतं. मी माझ्या मनाचे भीमाच्या दर्शनानं विस्कटलेले सर्व धागे एकत्र करू पाहत होतो, पण ते फारच गुंतागुंतीचे झाले होते. मी स्वत:ला वारंवार सांगत होतो, ‘‘दुर्योधना, तू वीर आहेस, भीमाला एवढा का घाबरतोस? तू गदावीर आहेस. तसाच प्रसंग आल्यास सर्वांना दूर सारून हाती गदा पेलून त्या भीमावर तुटून पड. असं मन:स्वास्थ्य घालवू नकोस.’’ मी स्वत:ची अशी कितीही समजूत घातली, तरी ग्रीष्मात डोळ्यांपुढं एकसारख्या घोंगावणाऱ्या चिलटासारखी त्या भीमाची मूर्ती माझ्या डोळ्यांसमोर उभी राहू लागली. मन कुणाच्यातरी धीराच्या शब्दांसाठी कान टवकारू लागलं. मी नकळतच माझ्या सेवकाला – प्रभंजनाला – कर्णाकडे पिटाळू लागलो. सेवक जाताच तो तत्परतेनं येई आणि मग माझ्या दोन-तीन घटका कशा जात ते समजत नसे. त्याच्या केवळ सहवासात जीवन सहस्त्रपटींनी सामर्थ्यशाली झालं आहे असंच मला वाटे. पण मी त्याच्यासमोर कधीच स्तुती केली नाही! मला माहीत होतं की, पुरोचनाप्रमाणंच त्याचाही जन्म केवळ माझ्यासाठीच होता! आणि राजानं कधीच कुणाची स्तुती करू नये, हा पाठ मला कणकांनी शिकविला होता! कधी-कधी कर्णाच्या समवेत अश्वत्थामाही येऊ लागला. तो काही-काही वेळा इतका आश्चर्यकारक बोले की, ते ऐकताना मन गुंग होऊन जाई! पण त्याचं बोलणं मला तो निघून गेल्यानंतर लागलीच केवळ एक कल्पनांचा रम्य खेळ वाटे. द्रौपदीच्या स्वयंवरानंतर तो असाच एकदा कर्णाबरोबर मजकडे आला. कर्ण आला होता तो पंधरा दिवसांनंतर येऊन ठेपलेल्या नगरोत्सवात रथांच्या स्पर्धा ठेवाव्यात हे सांगण्यासाठी! त्याला घोडे, रथ, अस्त्र, सूर्याराधना, धनुर्वेद आणि मल्लयुद्ध याशिवाय जगात अन्य काही आहे याचं स्मरणच नसे!

मी त्याच्या स्पर्धेच्या कल्पनेला तत्काळ संमती दिली. सहज विनोदानं मी त्याला म्हणालो, ‘‘कर्ण, जग हीच एक स्पर्धा आहे!’’

‘‘मग ती आपण जिंकलीच पाहिजे!’’ तितक्याच सहजपणे कर्ण म्हणाला.

‘‘ते तेवढं सोपं नाही.’’ अश्वत्थामा सहजस्फूर्तपणे मध्येच बोलला.

‘‘का?’’ मी विचारलं.

"ही स्पर्धा ज्या पटांगणावर चालते त्याची लांबी-रुंदी कुणालाच सापडलेली नाही!"

अश्वत्थामा नेहमीच काहीतरी गूढ बोलतो हे सर्वांना आता माहीत होतं. म्हणून मी विचारलं, "असं कोणतं दिव्य पटांगण आहे या जगात?"

"आहे! मनाचं पटांगण! या पटांगणावर आकांक्षांचे सजविलेले रथ घेऊन सहस्त्र वर्षं मानव या स्पर्धेत भाग घेत आला आहे. पण काळाच्या नि:पक्ष पंचानं त्याला या स्पर्धेत कधीही विजयी म्हणून घोषित केलेलं नाही." अश्वत्थाम्याचा ध्वनी पाव्यापेक्षा मधुर होता.

"म्हणून त्यानं या स्पर्धेत भाग घ्यायचं सोडून द्यावं की काय?" मला त्याची कल्पना न पटल्यामुळे मी विचारलं.

"मुळीच नाही. तसं ते त्याला करताही येणार नाही, कारण कर्माच्या अटळ नियमांनी प्रत्येक मानवी जीव बद्ध आहे. मनाच्या अतिपुरातन गाभाऱ्यातून येणारे इष्ट आणि अनिष्ट संदेश पाळणारा तो केवळ एक आज्ञाधारक सेवक आहे!"

"मन! मन! अश्वत्थामा, तू म्हणतोस त्या ह्या मनाचे धागे आहेत तरी किती?" मला त्याच्या गूढ बोलण्याचा अर्थ पुरेसा कळत नव्हता.

"तुझ्या सुवर्णमंडित मुकुटाखालच्या मस्तकात किती केस आहेत हे तुला अचूकपणे सांगता येईल काय? मनाचे धागेही तितकेच अगणित आणि गुंतागुंतीचे आहेत! काही जण म्हणतात, जीवन हे अशा अद्‌भुतरम्य धाग्यांचं वस्त्र आहे, पण तेही सर्वार्थांनं योग्य नाही."

"ते कसं काय?" मध्येच कर्णानं विचारलं.

"जीवन हे मनाच्या असंख्य धाग्यांनी विणलेलं केवळ एक वस्त्रच नाही, तर अशा वस्त्राची एक अनाकलनीय गाठ आहे! आणि ती ज्याची त्यानं स्वत:च्या हातांनी अंतरात्म्याचे डोळे उघडे ठेवून स्वत:च सोडवायची असते!"

"मग जगात सत्य काय? केवळ तू म्हणतोस ती ही जीवनाची गाठच की काय?" मी त्याला डिवचलं.

"नाही! सत्य ते की, जे शाश्वत आणि नित्य असतं! त्या दृष्टीनं विचार केला तर मला सत्य केवळ एकच वाटतं. सूर्याची ही असंख्य किरणं! किती अनादी कालापासून ती पृथ्वीला जीवनदान देत आली आहेत! त्यांच्या दिव्य स्वरूपात कधी बदल झाला आहे काय? त्यांनी कधी आपला सर्वांना स्पर्श करायचा दिव्य गुणधर्म सोडला आहे काय? इतकं निर्दोष सत्य राजा, तू मला दुसरं कोणतंही दाखवतोस काय?"

जरा थांबून तो पुढं म्हणाला, "जीवन ही सूर्यापासून स्फुरलेली एक दिव्य प्रकाशलाट आहे! आणि हे ज्याला नि:संदेह पटलं आहे, त्याचं जीवन प्रकाशाशिवाय अन्य काय असणार? म्हणूनच हा कर्ण मला आपल्या सहवासात नेहमी असावा, असं प्रकर्षानं वाटतं. कारण तो सूर्याची अखंड आराधना करीत आला आहे. त्याच्या प्रसन्न मुद्रेकडे पाहा. ते तुला सूर्याबिंबासारखं नाही का वाटत?"

"अश्वत्थामा, तू म्हणतोस ते सर्व मला पटतं, पण नेमकं बरोबर हेच तुझ्या पित्याला... गुरू द्रोणांना का नाही पटत?" मी कर्णाकडं पाहत अश्वत्थाम्याला एक खोचक प्रश्न टाकला.

"मी परत तुला आठवण करून देतो आहे युवराजा, जीवन ही मनाच्या असंख्य

धाग्यांच्या वस्त्राची एक गाठ आहे! ती ज्याची त्यानंच सोडवायची असते! माझी मी, तुझी तू, कर्णाची कर्णानं, माझ्या पित्याची माझ्या पित्यानं! इथं अन्यांचं साहाय्य उपयोगी नाही!''

त्यानं मला पुन्हा निरुत्तर करून टाकलं. कितीही झालं तरी तो एका बुद्धिमान आचार्यांचा पुत्र होता!

**

# वृषाली

# चौदा

अश्वत्थाम्याच्या तत्त्वज्ञानाची मी जीवनाशी सांगड घालण्याचा प्रयत्न करीत होतो, पण ती कधीच बसत नव्हती. तो म्हणत होता, 'जीवन ही मनाच्या असंख्य धाग्यांच्या वस्त्रांची अशी एक गाठ आहे की, ती ज्याची त्यानंच सोडवायची असते.' माझं मन यातली एकही कल्पना मान्य करायला तयार नव्हतं. प्रथम म्हणजे मन हे वस्त्रासारखं असतं हेच मला पटत नव्हतं! मला ते शस्त्रासारखं वाटत होतं! गदेसारखं! आपल्या मंडलाच्या कक्षेत गदा कुणालातरी येऊ देते काय? मानवी मनही तसंच असतं! प्रत्येकाचं जीवनक्षेत्र निराळं असतं. त्या क्षेत्रात प्रत्येक जण केंद्रस्थानी असतो आणि विचारांची गदा घेऊन प्रत्येक जणच ती आपल्या जीवनाभोवती गरगर फिरवीत असतो! मंडलात येणाऱ्या कुणाच्या मस्तकात ती आदळते, कुणाचं वक्ष फोडते, आणि कधी-कधी कुणाला चिरविश्रांतीही देते! पण या परिणामांचा विचार करीत कधीच बसायचं नसतं. तसा विचार केला, तर कुठलंच कार्य तडीला जाणार नाही!

अश्वत्थाम्याच्या कल्पना मी झटकून टाकायचा प्रयत्न करी, पण तरीही त्याची आठवण सतत येई व मी हैराण होई. शेवटी मी त्राग्यानं निर्णय घेई, 'अश्वत्थाम्या, तू म्हणतोस तसं जीवन ही एक असंख्य धाग्यांच्या वस्त्रांची गाठ असेलच तर मलाही ते मान्य आहे... पण ती गाठ मी उलगडणार नाही! ती मी अधिकच आवळणार आहे! आणि तिच्यामध्ये त्या दांडगट भीमाचं जीवाणू पकडून त्याचा जीव जाईपर्यंत ती घट्ट करणार आहे!'

भीमाला जीवनाच्या गाठीत पकडायची कल्पना मला जेव्हा सुचली तेव्हा मी निर्धास्त झालो. भीम एका सापळ्यातून सुटला होता. हरकत नाही. मी त्याच्यासाठी भक्कम असा दुसरा सापळा तयार करण्याचं ठरविलं! त्याच्यासाठी मी शेवटपर्यंत हवे तितके सापळे तयार करणार होतो. आता केवळ त्याच्या करपलेल्या करंगळीसाठी मी एखादी चांदीची पेटी करणार नव्हतो, तर त्याचं मस्तकच मी कुरूंच्या सिंहासनाखाली खोल पुरणार होतो! कारण पांचालीच्या स्वयंवरात त्या निळ्या अर्जुनानं पांचाली जिंकली होती आणि शेवटी झालेल्या युद्धात त्या उद्दाम भीमानं माझ्या पाठीत गदेचा भक्कम प्रहार हाणला होता!

आणखीही एका गोष्टीबाबत माझं भाग्य बळावर होतं, कारण द्रौपदीला कर्णाचा अपमान... सर्व वीरांच्यासमोर करण्याची दुर्बुद्धी झाली होती. कर्णासारख्या शक्तिशाली वीराचा पुरुषार्थ मी त्याला त्याच्या त्या अपमानाची वारंवार आठवण करून देऊन जागृत करणार होतो. म्हणजे संधी मिळताच कर्ण द्रौपदीचाही सूड घेईल! तूर्तास तो जरी माझ्या उजव्या हाताला उभा होता, तरी माझी खात्री होती की, एक दिवस तो पूर्णपणे माझ्या मुठीत येणार आहे! कर्ण... सूर्यभक्त कर्ण, कवच-कुंडलं असलेला कर्ण... विशाल शरीराचा कर्ण... दुर्योधनाच्या मुठीत येईल! त्याचं जीवन मग मी ठरवीन तसं आणि तसंच होत राहील! हस्तिनापूरचा स्वामी आणि त्याच्या मुठीत कर्ण! ही या दुर्योधनाची सुखस्वप्नं सत्य झालेली जगाला पाहावी लागणार!

या सर्व उलथापाथीत एक अतिशय अप्रिय घटना मात्र विसरली जात नव्हती. स्वयंवरानंतरच्या युद्धात अर्जुनानं कर्णाच्या पुत्राला – सुदामनला आपल्या अमोघ बाणांनी छिन्नविच्छिन्न करून टाकला होता. काही बाण तर त्याच्या कोवळ्या आणि नुकत्याच तारुण्यात पदार्पण केलेल्या नितळ मुखमंडलातही रुतले होते. त्या वीरपुत्रानं या जगातलं काय अनुभवलं होतं? त्याच्या मृत्यूचं समर्थन करून अर्जुनाला कोण वीर म्हणणार होतं? कर्णानं त्यामुळे जर अर्जुनाच्या वधाची प्रतिज्ञा केली, तर तो त्यामुळे आततायी कसा ठरणार होता? नीतीचे नियम आदर्श वचनांवरून केवळ ठरत नसतात. ते जीवनातल्या जागत्या अनुभवावरूनही ठरत असतात!

■

# एक

स्त्रीचं जीवन म्हणजे पतीच्या चरणांवर भक्तिभावानं आणि श्रद्धेनं समर्पित केलेलं एक कमलपुष्प असतं! पतीचं सौख्य तेच तिचं सौख्य. पतीच्या जीवनाची अर्धी बाजू सावरण्याची पवित्र शपथ तिनं सप्तपदीच्या मंगल वेळी अग्निनारायणाला साक्ष ठेवून घेतलेली असते, म्हणूनच तिला अर्धांगी म्हटलं जातं. मी माझ्या पतीला सौख्याच्या शिखरावर ठेवण्यासाठी झटत होते, कारण त्यांचं जीवन ज्या कष्टमय मार्गातून वाटचाल करीत आलं होतं तो संपूर्ण मार्ग मला शोणभावोजींनी अनेक वेळा सांगितला होता. मी अतिशय भाग्यशाली होते, कारण कोणत्याही सौंदर्यशाली स्त्रीला माझा हेवा वाटावा, असं माझ्या पतीचं स्वरूप होतं आणि त्याहीपेक्षा जास्त त्यांचं मन विशाल होतं. आपल्या सहवासातल्या प्रत्येक व्यक्तीला केवळ प्रेम देण्यासाठीच त्यांचा जन्म असावा! आपल्या अनिंद्य सौंदर्याचा त्यांना यत्किंचितही गर्व नव्हता. कधी चुकूनसुद्धा ते आपल्या दिव्य कुंडलांचा वा कवचाचा बोलताना निर्देश करीत नसत. एवढे सामर्थ्यशाली पुरुष आणि एका देशाचे राजे असूनही ते जेव्हा आपल्या मातापित्यांच्या तळपायांना स्वत: चंदनमिश्रित उटणं चोळत तेव्हा माझा ऊर अभिमानानं भरून येई. कोणत्या स्त्रीला आपला पती सुंदर आणि सद्गुणी आहे, हे पाहून अभिमान वाटणार नाही? एखाद्या विशाल वटवृक्षावर विसावलेल्या वेलीचं जीवन निर्धास्त आणि सुखमय असावं तसं माझं जीवन माझ्या पतीच्या सहवासात सुखमय होतं. माझे सासूसासरे म्हणजे तर देवतातुल्य होते. मी त्यांची सून आहे, असं कधीच मला वाटलं नाही. मला ते आपल्या कन्येसारखंच वागवीत आले होते. शोणभावोजी म्हणजे हास्याचा खळखळणारा झराच होता! ते इतरांशी फारच थोडं बोलत, पण माझ्याशी बोलताना त्यांना किती बोलू अन् किती नाही असं होई. ‘‘वहिनी, वहिनी’’ अशी त्यांची जिव्हाळ्याची हाक ऐकली नाही, असा माझा एकही दिवस कधी गेला नाही. राजनगरात आणि राजवाड्यात घडणारी प्रत्येक घटना ते सर्वांआधी मलाच सांगत.

मला राहून-राहून आश्चर्य वाटे की, त्यांच्या विवाहाचं मात्र कोणीच कसं बोलत नसे? मी मामंजींना म्हणेही, ‘‘आपल्या ज्येष्ठ पुत्रावरच आपलं अधिक प्रेम दिसतंय, नाहीपेक्षा शोणभावोजींचं लग्न आपण एव्हाना केलं असतंत!’’ ते नुसतं हसून म्हणत, ‘‘तो प्रश्न आमचा आहे असं आम्हाला कधी वाटतच नाही! कर्णाचं लग्न करणं हीच आमच्या कर्तव्याची आणि समाधानाची गोष्ट होती. आता कर्णानं शोणाचं लग्न करावं नाही तर त्याला तसंच ठेवावं!’’

मी कधीतरी संधी साधून शोणभावोजींच्या लग्नाचा विषय माझ्या पतिदेवांपुढं काढी. ते म्हणत, ‘‘वृषाली, स्त्रिया फार मत्सरी असतात असं मी ऐकलं आहे! तू शोणाच्या पत्नीचा द्वेष करणार नाहीस कशावरून?’’ माझ्याशी नेहमीच ते असं खोचक बोलत! पण त्यामागचं प्रेम मला दिसत असल्यामुळे मी काही बोलत नसे. ‘‘मला शोणभावोजी माझ्या दादासारखे वाटतात. भावाच्या पत्नीचा कुणी द्वेष केला आहे काय?’’

‘‘वृषाली, हे नात्याचं घोडं उगाच पुढं दामटू नकोस. खरं सांगू? तुला तुझा पती

इतरांच्या प्रेमात अडकलेला नको आहे! शोणाचं लग्न करावं, असं म्हणण्यात तुझा दुसरा-तिसरा काही हेतू नसून माझा शोणाशी बोलण्या-बसण्यात जाणारा काल त्याचं लग्न झाल्यानंतर सारा तुझ्या वाट्याला यावा, असा आहे. खरं ना? किती स्वार्थी असता गं तुम्ही स्त्रिया?''

मी त्यांच्या असल्या बोलण्यावर नाराज होऊन दूर जाऊन गवाक्षातून गंगेकडं पाहत बसे. ते थोड्या वेळातच माझ्या पाठीमागं येऊन माझ्या मस्तकावरून हात फिरवीत आणि म्हणत, ''वृषाली, रागावलीस की काय तू? अगं, मलाच काही समजत नाही! मला अजूनही वाटतं की, माझा शोण अजून गंगेच्या काठचे शिंपले गोळा करणारा... दादा, 'तू गरुडासारखा उंच जाशील काय...?' असं विचारणारा, माझ्या रथामागून रडत-ओरडत, धावत येणारा... मांजरीचं पिल्लू रथाखाली सापडू नये म्हणून धावत जाऊन ते तत्परतेनं उचलणारा... भाबडा शोण आहे. तो मोठा झाला आहे, असं मला अजून वाटतच नाही. पण आता मात्र मी विलंब लावणार नाही. त्याचा विवाह माझ्यापेक्षाही थाटात होईल. किती उंच आणि धिप्पाड झाला आहे नाही गं तो?''

अशा वेळी वाटे माझं मस्तक त्यांच्या भरदार खांद्यावर टेकावं. वाटे, या विशाल शरीरात केवढं विशाल मन असलं पहिजे! त्यांच्या आयुष्यात अनेक उलथापालथी झाल्या होत्या, पण आपल्या प्रिय बंधूच्या स्मृती त्यांनी आपल्या मनाच्या गाभाऱ्यात किती ताज्या ठेवल्या होत्या, कदाचित स्वतः शोणभावोजीसुद्धा त्या साफ विसरून गेले असतील! पण यांनी मात्र त्या प्रेमानं तशाच जपल्या होत्या. सर्व नाती अशी श्रद्धेनं पाळून माझ्यावर जिवापाड प्रेम करणारा पती मला लाभला होता. माझं जन्मोजन्मींचं पुण्य फळाला आलं होतं. त्यांची पत्नी झाल्यामुळे केवळ त्यांच्या कुटुंबातील माणसंच माझ्यावर मायेचा वर्षाव करीत होती असं नव्हे, तर महाराणी गांधारीदेवी, युवराज्ञी दुःशलादेवी आणि राजमाता कुंतीदेवी यांच्याही प्रेमात मी न्हाऊन निघाले होते. मी एक सूतकन्या होते, पण राजकन्येचं जीवन मला लाभलं होतं! हे सारं माझ्या पतिदेवांमुळे मला लाभलं म्हणूनच त्यांच्या सौख्यासाठी मी रात्रंदिवस झटत असे. कोणतीही दुःखदायक घटना मात्र ते मला कधीच सांगत नसत. मागं आखाड्यात कृपाचार्यांनी आणि युवराज भीमानं केलेला त्यांचा अपमान त्यांनी मला कधीच सांगितला नव्हता. इतरांची मनं आपल्यासाठी कष्टी व्हावीत, असं त्यांना कधीच वाटलं नाही, पण त्यांना दुःख देणारी... घडलेली कोणतीही गोष्ट शोणभावोजी मात्र सर्वांत प्रथम मलाच सांगत. बंधुप्रेमाच्या पोटी मला ते म्हणत, ''दादा कितीही संकटात असो वहिनी, तो तुम्हाला काहीच कधी सांगणार नाही! म्हणूनच मी तुम्हाला हे सर्व सांगतो. त्याच्या मनाला यातना झालेल्या मला पाहवत नाहीत हो. लहान तोंडी मोठा घास घेऊन मला त्याच्या तोंडावर काही बोलता येत नाही! तुम्हीच दादाला सावरा.''

पांचालांच्या युवराज्ञीच्या स्वयंवरात झालेला आपला अपमानही त्यांनी मला वाईट वाटू नये म्हणून न सांगताच तसाच पचविला होता, पण शेवटी तो मला शोणभावोजींकडून समजलाच. स्वयंवरात घडलेला सर्व वृत्तान्त जेव्हा मला कळला तेव्हा द्रौपदी म्हणविणाऱ्या त्या आततायी आणि अविवेकी युवराज्ञीचा मला मनस्वी राग आला, पण तो पहिल्या भरात. नंतर मला तिची कीवच वाटली. आपल्या हाताशी आलेला अमृताचा कुंभ त्या अविचारी स्त्रीनं कुलाच्या घमेंडीनं पायानं ठोकरला होता. मुकुटात बसवावं असं सुगंधी सुवर्णपुष्प तिनं पायदळी तुडविलं होतं! सर्व राजांसमक्ष तिनं

माझ्या मानी पतीचा घोर आणि अक्षम्य अवमान केला होता. माझ्या सुंदर पुत्राचा बळी घेतला होता! हसतमुखानं हस्तिनापुरातून निघालेला केळीच्या दंडासारखा माझा महिलाच पुत्र - अंगराजांच्या आणि माझ्या प्रेमाचं प्रतीक असलेला माझा सुदामन स्वयंवरानंतरच्या युद्धात राजपुत्र अर्जुनाकडून मारला गेला होता आणि माझा पती अपमानित करण्यात आला होता.

जेव्हा अंगराज पांचालदेशाहून परतले तेव्हा मी त्यांना ओवाळताना चिंतातुरतेनं विचारलं, "आपला सुदामन कुठं आहे?" माझ्या डोळ्यांत खोलवर पाहताना त्यांचा कंठ दाटून आला होता. त्यांच्या नीलवर्णी नेत्रांतून ओघळलेले दोन टपटपीत अश्रुबिंदू रक्तवर्णी गालांवरून घरंगळत माझ्या पायांवर पडले. अंगारांसारखे ते जळजळीत वाटले! मान वळवून नेत्रकडा उत्तरीयानं टिपीत ते म्हणाले, "सुदामन गेला वृषू! त्याचं कलेवर तुडवून द्रौपदीच्या कंठात वरमाला घालणारा अर्जुन आता सुदामनच्या पित्याच्या बाणानंच शेवटचा निःश्वास सोडणार आहे!" त्यांनी माझ्या हातांतील ओवाळणीच्या तबकातील एक पुष्प प्रतिज्ञा म्हणून वर उचललं! सुदामनच्या वधाची वार्ता ऐकून माझ्या हातातील तबक खाली निसटलं!

**

# दोन

स्त्रीला आपलं दु:ख पचवून इतरांचं दु:ख सौम्य करायचं असतं. कोणत्याही सुज्ञ स्त्रीला आपल्या पतीचं मानसिक दु:ख कसं निवारावं, हे कुणीही कधी शिकवावं लागत नाही. मी सूक्ष्मपणानं मपणानं पाहिलं होतं की, स्वयंवराचं शल्य अंगराजांच्या मनात डाचत होतं. त्यांचं लक्ष कशातच लागत नव्हतं. घटकान्‌घटका ते विचारात मग्न असत. असेच ते एकदा तिसऱ्या प्रहरी भोजनानंतर एकटेच बसले होते. मी अनपेक्षितपणं त्यांच्यासमोर जाऊन उभी राहिले. मला पाहताच खोटं-खोटं हसत ते म्हणाले, ''वृषाली, तू?''

''काही-काही माणसं खोटं बोलत नाहीत; पण ती खोटं हसतात हे कळलं मला आज!'' मी म्हणाले.

''कोण खोटं हसतंय? तुला पाहिल्यावर हसणारा खोटं कधीच हसणार नाही.''

''आपण! आपणच खोटं हसताय! माझ्यापासून आपली दु:खं लपवताय!''

''कसली दु:खं?''

''सुदामनचं आणि स्वयंवराचं! तुम्ही मनाला लावून घेतलेल्या त्या अपमानाचं.''

''वृषाली, खरं आहे ते, पण तुला कुणी सांगितलं ते सारं?''

''शोणभावोजींनी! पण मी म्हणते, त्यात एवढं मनाला लावून घेण्यासारखं काय आहे?''

''त्यासाठी पुरुषाचा आणि तोही योद्धयाचा जन्म घ्यावा लागतो, त्याशिवाय अपमानाचं शल्य मनाला कसं पोखरतं हे कळत नाही. वृषाली, खरंच का गं मी इतका हीन आणि क्षुद्र आहे?'' नेहमीसारखं गवाक्षातून दूर क्षितिजाकडे पाहत ते बोलत होते.

''नाही. आपणाला हीन म्हणणारे सारे एक दिवस पश्चात्ताप पावतील, असं माझं मन मला निक्षून सांगतंय.''

''तुला एक प्रश्न विचारू? सत्य ते सांग! सांगशील?''

''मी आपल्याशी कधीच असत्य बोलले नाही, बोलणार नाही! आपण माझे परमेश्वर आहात!''

''तुला कधीही असं वाटलं नाही काय की आपला पती सूतपुत्र नसता तर – फार बरं झालं असतं?''

''का? असं मला का वाटावं? आपलं हे विचारणं मला नाही बाई पटत. माझ्या या सूतपुत्रात काय कमी आहे?''

''मग मलाच असा क्रोध का येतो... सूतपुत्र या शब्दाचा?''

''कधी-कधी जगाच्या दुष्टपणामुळे आपलं मन गोंधळून जात असावं आणि मग त्यामुळे आपल्याला तसं काही वाटत असावं, पण आपण आता इतरांच्या क्रूरपणाचा विचारही करू नये, कारण...''

''कारण आपलं दोघांचं जीवन...''

''का, काय झालं वृषाली? अशी अडखळतेस का? आपल्या दोघांच्या जीवनाचं

काय?”

“आता ते आपणा दोघांचं राहिलं नाही. त्यात आता तिसरा वाटेकरी येणार आहे! आपण पुन्हा लवकरच तात होणार आहा!”

“काय म्हणतेस काय वृषाली? मी लवकरच तात होणार? आपल्याला पुत्र होणार? वृषाली, ही वार्ता तू मला किती उशिरा सांगतेस!” पुढं होत त्यांनी माझं मुख आपल्या ओंजळीत घेतलं. मी कितीही प्रयत्न केला तरी माझे डोळे वर होत नव्हते. शेवटी ओंजळ इकडे-तिकडे हळुवार हलवीत ते शांत सुरात म्हणाले, “वृषू वर तरी बघ माझ्याकडे!”

मी त्यांच्या निळ्या आणि कुंडलांकडे निमुळत्या होत गेलेल्या शांत डोळ्यांत पाहिलं. मला द्रौपदीची आठवण झाली. खरोखरच तिनं माझ्यावर कृपा केली होती! तिनं जर यांना माझ्याइतकं जवळून पाहिलं असतं, तर खात्रीनंच तिनं यांना हस्तिनापुराला कधी परत येऊ दिलंच नसतं! माझ्याकडं सखोलपणं पाहत ते म्हणाले, “वृषू, पुत्र होणार की कन्या?”

“आपली काय इच्छा आहे?”

“कन्या! तुझ्यासारखी टपोऱ्या डोळ्यांची.”

“अंहं! पुत्र, आपल्यासारखा कुंडलं असलेला!” मी ओंजळीतून मुख सोडवीत म्हणाले.

“मग तुला माझी आठवणही राहायची नाही! पुत्र झाल्यावर स्त्रीचं पतीवरचं प्रेम कमी होतं म्हणतात!”

“आपली आठवण आता केवळ एकच घटना दूर करू शकते. ती म्हणजे माझा मृत्यू!”

“वृषाली, माझ्यासाठी कसल्या-कसल्या स्वर्गीय देणग्या घेऊन आली आहेस तू?” त्यांचे पाणीदार डोळे माझ्या हृदयाच्या सरोवरात डुंबत होते.

“स्वर्गातल्या साक्षात देवाला का कुठं स्वर्गीय देणग्या लागतात!” मी त्यांच्या मनोवृत्तीत प्रसन्नता आणू शकले, याचाच मला अधिक आनंद वाटत होता, पण स्वयंवराहून आल्यापासून ते माझ्याशी पहिल्यानंच एवढ्या मोकळेपणानं बोलत होते. पण क्षणातच ते परत अबोल झाले. मला तिथंच सोडून एकटेच गवाक्षाजवळ जात दूरवर बाहेर पाहू लागले!

“का - काय झालं?” मी त्यांना भयानं विचारलं.

“काही नाही, जा तू आता.” ते मजजवळून परत काहीतरी लपवू लागले.

“आपण मला नेहमी असंच अंतर ठेवून वागवणार काय?”

“नाही वृषाली! पण सर्वच गोष्टी सांगण्यासारख्या नसतात. समजून घ्याव्याच अशा नसतात, कारण त्या कटू असतात.”

“कोणतीही कटू गोष्ट मला आपल्या मुखातून आली तर ती अमृताइतकी मधुरच वाटेल.” मीही निर्धारानं म्हणाले.

“नाही.”

“मी सांगा असा हट्टच धरणार नाही. पण पत्नी ही पतीची अर्धांगी असते, हे व्यर्थ मानूनच मी इथून जाईन.”

“तसं नाही. तुझी तयारी असेल तर ऐक. आपणाला पुत्र होणार म्हणून तू

आनंदानं किती वेडी झालीस! मीही ते ऐकून स्वत:चं दु:ख क्षणभर विसरलो, पण माझ्या पूर्वीच्या दु:खात या वार्तेनं आणखी भरच पडली आहे.”

“असं काय बोलता आपण? आपणाला पुत्र होणार ही सुवार्ता दु:खात भर कशी टाकील?”

“होय. वृषाली, तुझ्या पोटी जन्म घेणारा निरागस पुत्र या राजवाड्यात कर्णपुत्र म्हणून वाढेल, पण उद्या तो समाजात मिसळेल तेव्हा सर्व जण त्याला ‘सूतपुत्र सूतपुत्र’ म्हणूनच हिणवतील! ज्या धैर्यानं त्याच्या पित्यानं हे कटू कढ जीवनभर पचविले त्या धैर्यानं तो ते पचवीलच असं नाही! छे! वृषाली, कर्णाच्या पराक्रमाचे नगारे व्यर्थ आहेत! समाजाच्या संकेतापुढं व्यक्तीचं जीवन, ध्येय, आशा, आकांक्षा सर्व; सर्व काही कवडीमोलाचंच नाही काय?”

“पण तो सूतपुत्रच असताना त्याला तसं म्हणवून घेताना अवमान वाटण्याचं कारणच काय?”

“वृषाली, जा तू! कर्णाच्या सहवासात राहूनही तू त्याला पूर्णपणे जाणू शकली नाहीस!”

“तसं मुळीच नाही! पण आपण तरी आपल्या कुलाचा अभिमान का धरीत नाही? आपण सर्वांना ठामपणे का असं सांगत नाही की, मी सूतपुत्रच आहे, माझे पुत्र आणि त्यांचे वंशज हे सर्व जण सूतपुत्रच राहतील म्हणून?”

“वृषाली, त्यासाठी गेली दोन तपं मनाचे धागे मी धैर्यानं एकत्र आणण्याचा प्रयत्न करीत आहे, पण मला ते अजूनही जमलेलं नाही! मी सूतपुत्र आहे याचा मला अभिमान वाटायला पाहिजे! पण तो वाटत नाही!”

“मग... मग मी सूतकन्या आहे, आपली पत्नी आहे, हे सत्यही आपणाला कधीच आनंद देत नाही, असंच समजायचं काय?”

“नाही वृषाली! तू, शोण, आई, बाबा आणि दुर्योधन यांच्या प्रेमाचा मला अभिमानच वाटतो! तुझ्याबद्दल सांगायची वेळ आलीच तर मी सांगेन की...” ते गवाक्षातून गर्रकन मागं वळले.

“काय सांगाल आपण?”

“जे तुलाही मी कधी आजवर बोलून दाखविलं नाही ते - की, वृषाली पत्नी म्हणून लाभणार असेल तर मी सूतपुत्र म्हणून एकच का दहा जन्मसुद्धा पत्करीन!”

त्यांच्या उद्‌गारांनी मी भांबावून गेले. काही झालं तरी त्यांच्या मनाचा थांग लागणं अशक्यच होतं! आकाशाचा अंत कुणालातरी कधी सापडला आहे काय? माझ्यापुरती मी समाधानानं त्यांच्या कक्षातून बाहेर पडले.

तरीही एक रुखरुख राहिलीच की, आपल्या मुलाचा सूतपुत्र म्हणून होणारा उल्लेख त्यांना का आवडणार नाही?

**

# तीन

पतीच्या सहवासात मी सुखात होते. माझ्या मनात युवराज दुर्योधनांबद्दलही आदरभाव होता, कारण त्यांच्या साहाय्यावरच माझ्या संसाराचा वटवृक्ष फुलला होता. प्रत्येक प्रसंगी त्यांनी माझ्या पतीचा, 'आपला प्राणप्रिय सखा' असाच उल्लेख केला होता. कुठल्याही स्त्रीच्या मनात आपल्या पतीसाठी झटणाऱ्या व्यक्तीबद्दल आदरभाव असणं साहजिकच आहे. युवराज दुर्योधनांमुळेच मी अंगराज्ञी म्हणून अभिमानानं हस्तिनापुरात फिरू शकले होते आणि म्हणूनच मला वारंवार एक गोष्ट खटकत होती. ती म्हणजे आमच्या विवाहात पुढाकार घेणारे युवराज दुर्योधन मात्र स्वत: अविवाहितच होते! विवाह ही जीवनाची सांगता असते. केवळ संपत्ती, सामर्थ्य आणि कीर्ती यांवरच सारी सौख्यं अवलंबून नसतात. मी माझ्या पतिदेवांना युवराज दुर्योधनांच्या विवाहाबद्दलही अनेक वेळा सुचविलं होतं. तसे ते पांचालांच्या राज्यात द्रौपदीच्या स्वयंवरासाठी गेले होते, पण तिथं त्यांना अपयश आलं होतं. म्हणून काही त्यांना जीवनभर अविवाहित राहून चालणार नव्हतं! मी माझ्या पतिदेवांना ते संधी मिळेल त्या वेळी अप्रत्यक्ष पटवून देत होते. मला उत्तर देताना ते म्हणत, ''वृषाली, तो एक राजपुत्र आहे आणि हस्तिनापुरच्या वैभवशाली साम्राज्याला शोभेल अशी राजकन्याच त्याला मिळाली पाहिजे. राजाचा विवाह हा अभिषेकाइतकाच महत्त्वाचा असतो.'' मी दुर्योधन युवराजांसाठी माझ्या सत्यसेनदादाकडून माहिती काढून अनेक राजकन्या सुचवीत होते, पण त्यांना एकही पसंत नव्हती. शेवटी एक दिवस संध्याकाळी ते राजसभेतून आले. मला दासीकडून बोलावून घेऊन ते म्हणाले, ''हे बघ वृषाली, तुला दुर्योधनाच्या विवाहाची फार चिंता वाटत होती ना? आता मात्र तो चतुर्भुज होईल.'' त्यांनी एका भूर्जपत्रावरून आलेलं आमंत्रण माझ्या हातात दिलं.

ते आमंत्रण कलिंगदेशाच्या चित्रांगद राजाचं होतं. आपली कन्या भानुमती हिचं त्या राजानं स्वयंवर मांडलं होतं. आप्तेष्टांसह कलिंगाच्या राजनगरीला - काशीपूरला येण्यासाठी त्या राजानं पितामह भीष्मांना नम्र विनंती केली होती.

''आता मला एक चांगली सोबतीण मिळेल!'' मी हर्षानं म्हणाले.

''तुम्ही स्त्रिया प्रत्येक गोष्टीत निखळ व्यवहारच पाहता वृषाली! अगं, हे केवळ स्वयंवराचं आमंत्रण आहे. राजकन्या भानुमतीची प्राप्ती व्हावी म्हणून सामर्थ्याचा टेंभा मिरवीत पांचालीच्या स्वयंवरापेक्षा कितीतरी अधिक राजे कलिंगांच्या काशीपुरातही एकत्रित होतील. भानुमती दुर्योधनालाच मिळेल, असं सांगता येत नाही.'' त्यांनी माझं मत अजमावण्यासाठी उगाच काळजी व्यक्त केली.

''समवेत आपण असलात म्हणजे सर्व काही सहजशक्य आहे. नाहीतरी पांचालीच्या स्वयंवरानंतर अर्जुनाबरोबर आपणच एक घटका एकटे लढत होतात.''

''वृषाली, प्रत्येक स्त्रीला वाटत असतं की, आपलाच पती काय तो एक कर्तृत्ववान आहे! तू त्यांपैकीच एक आहेस. पण तुझा पती कर्तृत्ववान आहे, असं म्हणताना अपेक्षित आपत्तीचा तुला विसर पडत आहे.''

“कोणती आपत्ती?”

“अगं तुझ्या पतीचं कर्तृत्व पाहून एखादी अन्य स्त्री त्याच्यावर अनुरक्त झाली आणि तिनं त्याला आपलंसं करून घेतलं तर आपत्तीच नाही का ती तुझ्यावर?”

“मुळीच नाही! प्रश्न आहे माझ्या पतीच्या आवडीचा. त्यांना ती स्त्री जर आवडली असेल तर मी तिचं भगिनी म्हणून स्वागतच करीन! ती घटना मला इष्टापत्तीच वाटेल.”

“बघ वृषाली, ते तेवढं सोपं नाही!”

“मी वृषाली आहे! अंगराजांची पत्नी!” मीही त्यांना निर्धारानं उत्तर दिलं.

माझ्या उत्तरावर ते फारच खूश झाले. जवळ येऊन माझा हात हातात घेऊन प्रेमभरानं म्हणाले, “मी युवराज दुर्योधनासह उद्या कलिंगांच्या राज्यात जाणार आहे. तू तुझ्या प्रकृतीला जप. आपला सुदामनच पुन्हा तुझ्या उदरी येणार आहे.”

माझा हात त्यांच्या हातात होता, पण मन कलिंगांच्या राज्यात फेऱ्या मारीत होतं. कशी असेल ती कलिंगांची युवराज्ञी भानुमती? आणि तिचं ते राजनगर काशीपूर?

**

# चार

दुसऱ्या दिवशीच युवराज दुर्योधन, अंगराज आणि इतर संबंधित कलिंगांच्या काशीपूर नगराच्या दिशेनं निघून गेले. मी त्या सर्वांना यश चिंतीत होते. रोज नगरातील उमाशंकराच्या मंदिरात जाऊन, त्यांना यश मिळावं म्हणून प्रार्थना करीत होते. का कुणास ठाऊक; पण मंदिरात जाताना मला नेहमीच राजमाता कुंतीदेवींनी दिलेला निळा शालू नेसून जावं असंच वाटे! त्यांची स्मृती म्हणून मी तो प्राणापलीकडे जपला होता. आपल्या पाच पुत्रांसह त्या अपघातानं वारणावतावर जळून गतप्राण झाल्या ही वार्ता जेव्हा मला युवराज्ञी दुःशलादेवींकडून समजली तेव्हा एका पेटिकेत जपून ठेवलेला तो निळा शालू काढून त्यात तोंड खुपसून मी ढसढसा रडले होते. मला नेहमी वाटे की, त्या शालूत गुंडाळून जणू त्या सात्त्विक, प्रेमळ आणि आत्यंतिक अबोल राजमातेनं आपलं जीवनभराचं अमोल प्रेमच मला दिलं आहे.

पण – पण त्यांच्या पुत्रानं – अर्जुनानं मात्र माझं एक अमोल राजवस्त्र हिरावून नेलं होतं. सुदामनला मी विसरू शकत नव्हते. अर्जुनाला क्षमा करू शकत नव्हते.

परवा पांचालीच्या स्वयंवरात पांडव जिवंत आहेत, हे जेव्हा स्पष्ट झालं तेव्हा ती वार्ता सांगणाऱ्या दासीला गदागदा हलवून मी प्रथम तिच्याकाडून वदवून घेतलं की, राजमाता कुंतीदेवी सुखरूप आहेत ना? का कुणास ठाऊक; पण मंदिरातल्या मूर्तीसारख्या कुंतीदेवी मला सात्त्विक आणि पवित्र वाटत!

पांडवांचा आणि माझ्या पतिदेवांचा मतभेद होता. विशेषतः राजकुमार अर्जुनाचं आणि यांचं तर कधीच पटलं नाही. मी अर्जुनाचा विषय काढून नेहमी यांना म्हणे, "त्यांच्याशी तुमचा इतका मतभेद का? तुमचा कुरूंच्या राजसिंहासनाशी उत्तराधिकारी म्हणून वास्तविक काहीच संबंध नाही."

ते म्हणत, "जे राहू-केतू चंद्राला ग्रासतात त्यांचा तरी चंद्राशी कुठं असतो संबंध? आकाशात कडाडणारा विजेचा लोळ पृथ्वीला चिरतो. तिचा त्या लोळाशी कधी कुठं काही संबंध असतो का? अर्जुन हा माझी जीवनसरिता अशीच जागोजाग थोपवू पाहाणारा बांध आहे. तुला ते कधीच कळणार नाही वृषाली."

मग ते मला आपली आणि अर्जुनाची युद्धशालेतील पहिली भेट सांगत आणि शेवटी म्हणत की, "आम्हा दोघांमध्ये एका काळ्याकुट्ट भुजंगाचं वेटोळं अवकाशातून एका गरुडाच्या पायांतून निसटून पडलं." हा शेवट ऐकताना माझ्या अंगावर नेहमीच एक भीतीचा भयानक काटा उभा राही. माझ्या स्त्रीमनाला त्यांची ती आठवण ऐकत असताना राहून-राहून वाटे की, तो भुजंग म्हणजे भावी अशुभ घटनांचा सूचक असा अपशकुनच असावा. पण तो विचार मी एक वीरपत्नी आहे, या जाणिवेनं क्षणात झटकून टाकी.

मला राजमाता कुंतीदेवी सुखरूप आहेत याचा आनंद झाला होता. अंगराजसुद्धा राजमातेबद्दल नितांत आदर बाळगून होते. ते नेहमी म्हणत, "माझा मतभेद अर्जुनाशी

आहे. त्याच्या सर्वश्रेष्ठ म्हणविल्या जाणाऱ्या वीरतेशी आहे. त्याच्या बंधूंशी वा मातेशी माझं वैर असण्याचं कारण काय?''

पांडव सुरक्षित आहेत या वार्तेनं हस्तिनापुरात आनंद पसरला होता. नगरजन तर ते केव्हा परत येणार म्हणून एकमेकांकडे विचारणा करीत होते. माझ्या मनाचाही एक कोपरा त्यांच्या सुखरूपतेनं सुखावला होता. कुणीही सुखी असावं अशीच खरं म्हटलं तर कोणत्याही स्त्रीची इच्छा असते. निदान कुटुंबवत्सल स्त्रीची तरी असतेच असते. पण – पण राजकुमार अर्जुनाला क्षमा करायला मात्र माझं मन तयार नव्हतं!

**

# पाच

अंगराजांना कलिंग देशात जाऊन तीन सप्ताह झाले होते. शेवटी एक मासानंतर युवराज दुर्योधनांचा खास विश्वासू अग्रदूत प्रभंजन हस्तिनापुरात काशीपूरची सविस्तर वार्ता घेऊन आला. त्याच्या तोंडून त्या सर्व घटनांचा वृत्तान्त ऐकताना मला अनेक संमिश्र भावनांचा साक्षात्कार होत होता. प्रभंजनानं जे-जे काही सांगितलं होतं ते-ते ऐकून माझ्या पतीच्या शौर्याचा, औदार्याचा आणि मित्रप्रेमाचा मला फार– फार अभिमान वाटू लागला.

कलिंगांच्या युवराज्ञीच्या स्वयंवरासाठी देशोदेशीचे राजे काशीपुरात जमा झाले होते. ते काशीपूर हस्तिनापुराच्या पार पूर्वेला कितीतरी शेकडो योजनांवर होतं. तेथून काही योजनं अंतरावरच पूर्वसमुद्र होता. एवढ्या दूरवरच्या राज्यात सर्व पराक्रमी राजे राजकन्या भानुमतीच्या सौंदर्याची ख्याती ऐकूनच जमा झाले होते. त्यांत जरासंध, शृगाल, क्रथ, शिशुपाल, दण्डधार असे अनेक पराक्रमी नरश्रेष्ठ होते. मात्र स्वयंवरासाठी कोणताही पण मांडण्यात आला नव्हता. युवराज्ञी भानुमती हातात वरमाला घेऊन स्वयंवराच्या मंडपातून फिरणार होती. तिला जो कोणी आपला पती होण्यास योग्य वाटेल त्याच्या गळ्यात वरमाला घालून ती त्याच्या चरणांवर आपलं जीवनपुष्प अर्पण करणार होती.

सर्व आमंत्रित राजांनी स्वयंवर-मंडप भरताच ती ठरल्याप्रमाणं हाती वरमाला घेऊन मंडपात आली. सर्वांत प्रथम राजा शिशुपाल होता. त्याच्यावर एक ओझरता नेत्रकटाक्ष टाकून ती पुढं सरकली. त्यानंतर शृगाल होता. त्यालाही तिनं अमान्य केलं. त्याच्यासमोरून ती राजा दण्डधारापुढं उभी राहिली, पण त्याच्या आरक्त नेत्रांमुळे तिनं त्यालाही निवडलं नाही. त्यानंतरचं आसन होतं मगधांच्या विशालकाय राजा जरासंधाचं, पण भानुमतीनं त्यालाही अमान्य केलं. पाचव्या आसनवर राजे दुर्योधन होते. त्यांच्यामागं माझे पतिदेव उभे होते. दुर्योधनांसमोर येताच भानुमतीनं मान उंचावून त्यांच्याकडे पाहिलं आणि क्षणभरातच तिची दृष्टी त्यांच्यामागं उभ्या असलेल्या माझ्या सर्वस्वावर गेली! ती एकटक त्यांच्याकडे पाहते आहे, हे पाहून युवराज दुर्योधन झटकन आसनावरून उठले आणि कुणाला काही समजायच्या आतच त्यांनी भानुमतीच्या कोमल कटीभोवती आपल्या भक्कम बाहूंचा बळकट विळखा घालून तिला अलगद आपल्या खांद्यावर उचलून घेतलं आणि ते सर्वांना उद्देशून मोठ्यानं ओरडले, “पूर्वी पितामह भीष्मांनी जशी काशीराज्यातून माझ्या महामातेला उचलून नेली तशी आज माझ्या दंडाच्या बलावर मी ही कलिंगांची राजकन्या उचलून नेत आहे! कुणात सामर्थ्य असेल त्यानं कुरूंच्या राजदंडाशी दोन हात करावेत!”

सर्व राजे उठून उभे राहिले. मंडपाच्या प्रवेशद्वारावर उभ्या असलेल्या दोन-चार राजांना एका हातानं बाजूला सारीत युवराज दुर्योधन चापल्यानं प्रवेशद्वाराच्या बाहेर पडले आणि डोळ्याचं पातं लवतं न लवतं तोच सत्यसेनदादानं प्रवेशद्वाराशी उभ्या केलेल्या ‘दुर्जय’ रथात ते धडपडणाऱ्या भानुमतीला फुलासारखं अलगद घेऊन चढले.

सत्यसेनदादानं रथाचे घोडे पिटाळले. त्याचा पाठपुरावा करण्यासाठी क्रुद्ध झालेले काही राजे प्रतिकारासाठी प्रवेशद्वाराकडे धावू लागले. पण... पण प्रवेशद्वार अंगराजांनी केव्हाचं पुढं होऊन अडविलं होतं! प्रवेशद्वारात अंगराजांना पाहताच शिशुपाल ओरडला, "अंगराज कर्ण, द्वारातून दूर हो! हा सर्व क्षत्रियांचा घोर अपमान आहे."

"शिशुपाल, तुम्ही सगळे क्षत्रिय आहात तर मग राजा दुर्योधनाच्या या मित्राबरोबर... सूतपुत्र कर्णाबरोबर प्रथम दोन हात करा! लक्षात ठेवा, राजा दुर्योधन हे कर्णाच्या म्यानात ठेवलेलं कुरूंचं भक्कम खड्ग आहे! खड्गाला हात घालण्यापूर्वी सामर्थ्य असेल तर प्रथम म्यान दूर करा!"

शिशुपालासह क्रथ, शृगाल असे एकदम दहा राजे अंगराजांवर चालून आले. स्वत: प्रभंजन अंगराजांमागं उभा राहून त्यांना हवे ते बाण सतत पुरवीत होता. धनुष्यातून निघणाऱ्या बाणांनी ते दहा जण धुक्यानं नदीचं पात्र झाकलं जातं तसे क्षणात झाकले गेले! घनघोर युद्धाला सुरुवात झाली! शिशुपालासह सर्व जण एकट्या अंगराजांवर हवे तसे बाण फेकू लागले, पण त्यांच्या बाणांचा काहीच प्रभाव पडत नव्हता, कारण अंगराजांची त्वचा अभेद्य होती! सर्व जण बाणांची फेक करून-करून शांत झाले. प्रवेशद्वाराच्या दिशेनं एकही राजा एक सूतभरही पुढं सरकू शकला नाही! उलट अंगराजांच्या अमोघ बाणांनी दण्डधार आणि शृगाल यांना प्राणांतिक जखमा झाल्या होत्या. एका घटकेनंतर शिशुपालाच्या लक्षात सर्व प्रकार आला. हातांतील धनुष्य फेकून देऊन तो असह्य संतापानं ओरडला, "हा अंगावर जन्मजात अभेद्य कवच असलेला अंगराज कर्ण आहे! याला तीक्ष्ण शस्त्रानं तोडू म्हटलं तरी तुटणार नाही! युवराज्ञी आता कायमची गेली. मित्रहो, निदान प्राण तरी गमावू नका." विषारी भुजंग डसावा तसे सर्व राजे किंचाळून स्तब्ध झाले! सर्वांच्या चर्या म्लान झाल्या. एखाद्या मत्त हत्तीसारखं विशाल शरीर असलेला जरासंध धनुष्य फेकून तसाच पुढं घुसला आणि दंडावर तळहातानं शड्डू ठोकून आव्हानपूर्वक म्हणाला, "अभेद्य कवचाची ढाल घेऊन लढणाऱ्या कपटी कर्णा, मी मगधांचा राजा जरासंध तुला द्वंद्वयुद्धासाठी आव्हान देतो आहे! सूतकुलात जन्मलेल्या आणि दुर्योधनाच्या आश्रयाखाली वाढलेल्या भूछत्रा, क्षत्रियांच्या कुलवान स्त्रिया म्हणजे केव्हाही रथाला जोडता येतील अशा दीनवाण्या घोड्या वाटल्या की काय तुला? ये, खाली ये."

"जरासंधा, हे कवच काढून फेकून देता आलं असतं, तर ते फेकून देऊनही मी तुला आत्ताच दाखवून दिलं असतं की, कवचाशिवाय कर्ण हासुद्धा अजिंक्य कर्ण आहे! क्षत्रिय म्हणून उन्मत्त बनलेल्या वृषभा, पांचालीच्या स्वयंवरात शिवधनुष्याखाली घासून झिजलेल्या पायांच्या टाचा आठवून पाहा! द्वंद्वयुद्ध म्हणजे मरण आहे याची जाणीव ठेवून जीभ उचल!"

"सूतपुत्रा, भगवान शंकरांची आराधना केलेला मी अजिंक्य द्वंद्वयोद्धा आहे हे विसरलास की काय? अजगरानं हरिण मोडावा तसा तुला मी हां-हां म्हणता मोडून टाकीन." त्यानं परत आव्हानपूर्वक शड्डू ठोकला. सर्व राजांनी श्वास रोखले. अंगराजांनी अंगावरचं उत्तरीय प्रभंजनाच्या खांद्यावर फेकून अधरीयाचा काचा कसला! त्यांच्या कानांतील कुंडलं तप्त लाल झाली, शरीर – भरतीचा समुद्र फुगतो तसं फुगू लागलं.

उभयतांच्या चित्तथरारक द्वंद्वाला सुरुवात झाली! स्वयंवराचा मंडप द्वंद्वयुद्धाचं मल्लमंडल झालं. जरासंध दातओठ खात क्षुधार्त वाघासारखा अंगराजांवर चालून गेला,

पण एखादा विशाल सागर आपल्या शरीरावर चढू पाहाणाऱ्या ओढ्याला जसा मागं फेकून देतो तसा त्यांनी त्याला सहज दूर फेकून दिला! परत तो पवित्रा घेऊन मंडलं घेऊ लागला. उगाच खिजविणारे शड्डू ठोकू लागला, पण दहा-पंधरा पळांतच अंगराजांनी त्याला आपल्या भक्कम मांडाखाली घेतला. आपल्या बलवान हातांचे दोरासारखे पाश करून ते त्यांनी जरासंधाच्या गळ्याभोवती आवळायला सुरुवात केली. श्वास कोंडल्यामुळे जरासंध डोळे पांढरे करू लागला! तो बाहुकंटक डाव होता! त्या पकडीत जरासंधाचा सरळ-सरळ अंत होणार होता! स्वयंवराच्या मंडपात एका क्षत्रिय सम्राट राजाचा बली पडणार होता. जरासंधानं हात उंचावून मदतीची आर्त मागणी केली, पण कुणीच पुढं यायला धजेना. महाराज चित्रांगदांच्या अंगावर भीतीनं काटा उभा राहिला! त्यांच्या मनाचा एक कोपरा मात्र सुखावला होता. त्यांची कन्या अंगराजांसारखे बलशाली वीर असलेल्या कुरू राज्याची महाराणी होणार होती. झटकन पुढं होत त्यांनी माझ्या पतिदेवांचे अक्षरश: पाय धरले. अत्यंत गयावया करीत म्हणाले, ''अंगराज कर्ण, सम्राट जरासंध शरण आले आहेत, त्यांना जीवदान द्या! मगधांच्या सीमा आमच्या राज्याला लागूनच आहेत! त्यांच्या-आमच्या संबंधात राजकीय वैर नको.''

अंगराजांनी जरासंधाला जीवदान दिलं! बाहुकंटकाची गोफण ढिली झाली! सर्वांना वाटलं होतं की, मुक्त होताच जरासंध खजील होऊन अवमानानं खाली मान घालून निघून जाईल, पण घडलं ते उलटंच! डावातून मुक्त होताच जरासंधानं अंगराजांना कडकडून आलिंगनच दिलं! त्यांचा उजवा हात हातात घेऊन तो वर उंचावीत तो म्हणाला, ''अंगराज कर्ण आजपासून मगधांच्या जरासंधाचे प्राणप्रिय स्नेही आहेत. मी माझ्या राज्यातील मालिनीनगर या अचाट सामर्थ्याच्या द्वंद्वयोद्ध्याला देणगी म्हणून घोषित करतो आहे! यासारखा शरीरसामर्थ्याचा एकही कुशल द्वंद्वयोद्धा मी अद्याप पाहिलेला नाही.''

अंगराजांनीही जरासंधाला आलिंगन दिलं. हां-हां म्हणता ही वार्ता काशीपूर राजनगरात पसरली. नागरिकांच्या झुंडीच्या झुंडी अंगराजांचं दर्शन घेण्यासाठी कलिंगांच्या राजवाड्यावर येऊ लागल्या! अंगराजांनी चित्रांगदांना सांगून युवराज दुर्योधन व त्यांची कन्या भानुमती यांचा ठिकाणा शोधून काढला. राजकुमारी भानुमतीला घेऊन सर्व जण महानदीच्या किनाऱ्यावर अंगराजांची मार्गप्रतीक्षा करीत थांबले होते! त्यांना कलिंगाच्या अमात्यांनी सर्व वृत्तान्त सांगून सन्मानानं परत राजवाडयावर आणलं.

काशीपुरातल्या नगरजनांनी राजकुमारी भानुमतीला हस्तिनापूरची महाराणी म्हणून घोषणा देऊन निरोप दिला. मधून-मधून ते माझ्या पतीचा 'अंगराज कर्ण!' म्हणून जयघोष करीत होते. नगरजन फुलं उधळीत असतानाच सर्वांनी काशीपूर सोडलं होतं.

प्रभंजनानं तो सर्व वृत्तान्त जवळून पाहिल्यानं रसाळपणे मला ऐकविला होता. केवळ ती वार्ता मला सांगण्यासाठीच तो घोडा फेकीत सर्वांपुढं नगरात आला होता. तो म्हणाला, ''महाराणी, अंगराज आहेत तोपर्यंत कुरूंची मान अशीच उन्नत राहील. नव्या महाराणींच्या स्वागताची तयारी करा. अंगराजांना ओवाळण्यासाठी उजळा!''

**

# सहा

स्वयंवराला गेलेले योद्धे भानुमतीसह हस्तिनापूरच्या सीमेवर गंगेकाठी आल्याची वार्ता हस्तिनापुरात पसरली. त्यांच्या स्वागतासाठी सर्वांची एकच धांदल उडाली. नव्या युवराज्ञीचं दर्शन घेण्यासाठी आतुरलेले नगरजन हातात फुलांच्या माला घेऊन राजमार्गावर गर्दी करू लागले. राजकन्या भानुमतीची आता युवराज्ञी भानुमती झाली होती. हस्तिनापूरच्या विशाल, वैभवी साम्राज्याची युवराज्ञी!

शेवटी एका सुशोभित केलेल्या राजहत्तीवरच्या अंबारीत बसलेले युवराज दुर्योधन नगरातून राजवाड्यासमोर आले. त्यांच्या उजव्या हाताजवळ अंगराजही होते आणि डाव्या हाताला युवराज्ञी भानुमती होत्या, त्यांच्या डाव्या हाताला आणखीही एक स्त्री होती! ती बहुधा युवराज्ञी भानुमतींची आवडती सखी असावी. त्याशिवाय तिला त्यांनी अंबारीत घेतलीच नसती! ती भानुमतीपेक्षाही सौंदर्यवती होती!

राजवाडयाच्या भव्य महाद्वारात राजमाता गांधारीदेवींनी नूतन वधूवरांना ओवाळलं. ओघाओघातच दोहो बाजूंस उभ्या असलेल्या भानुमतींच्या सखीला आणि अंगराजांनाही ओवाळण्यात आलं! ओवाळताना डोळ्यांवर वस्त्राची पट्टी असल्यामुळे त्या त्यागी राजमातेची किती कुचंबणा झाली असेल? वधूवरांनी पितामह भीष्म, महामंत्री विदुर, शकुनीमामा अशा वडीलधाऱ्या मंडळींना वंदन करून राजवाडयात पदार्पण केलं! युवराज्ञींच्या सखीनंही वाड्यात पाऊल टाकलं! अंगराजांचं एकच कुंडल दिसू शकलं! कारण ते आपली मान वळवून युवराज्ञी भानुमतीच्या सखीकडेच पाहत होते. मान वळल्यामुळे त्यांचं जे कुंडल तिच्या बाजूकडे होतं ते मला काही केल्या दिसू शकतच नव्हतं! ते माझ्यासाठी जसं काही अदृश्यच झालं. सदैव!

**

# सात

नव्या युवराज्ञींच्या आगमनामुळे राजवाडयावर चैतन्य पसरलं. युवराज दुर्योधनांचं जीवन विवाहाच्या उद्यानात फुलणार, या कल्पनेनं आम्हा दोघांना समाधान वाटलं. कधी-कधी अविवाहित मनुष्य क्रोधातून उगाच अविचार करू शकतो, पण विवाहिताला तो करता येत नाही. आजवर कानांवर येणाऱ्या युवराज दुर्योधनांच्या अति साहसी कल्पनांना विवाहामुळे आता भावी काळात बांध बसणार होता. स्त्रीनं मनात आणलं तर तिला आपल्या पतीच्या विध्वंसक क्रोधाचं रूपांतर शालीन कर्तृत्वात करता येतं! हे कौशल्य मी युवराज्ञी भानुमतींना वेळोवेळी कलेकलेनं त्यांचं मन न दुखविता सांगणार होते. पराक्रमी पुरुषांची जीवनं त्यांच्या स्त्रियांच्या हातात असतात! कधी आपल्या प्रेमानं, तर कधी आपल्या सौंदर्यानं त्या आपल्या पतीला धोक्याच्या वेळी सावध करू शकतात! त्यासाठी मला युवराज्ञींशी परिचय वाढवायचा होता. सगळं स्थिरस्थावर झाल्यावर मी त्यांच्या भेटीसाठी जाणारच होते.

पण त्यांच्या भेटीला मी जाण्यापूर्वीच मला युवराज दुर्योधनांचं बोलावणं आलं! ते अनपेक्षित असलं तरी मला त्याचं आश्चर्य वाटलं नाही. माझ्या पतीच्या पराक्रमाचं वर्णन ऐकावयालाच त्यांनी मला बोलावलं असावं, असं मला वाटलं! मी एक स्त्री होते आणि कुठल्या स्त्रीला आपल्या पतीच्या पराक्रमाचं वर्णन एका मानी राजाच्या तोंडून ऐकावंसं वाटणार नाही?

राजमाता कुंतीदेवींनी दिलेला निळ्या रंगाचा तोच शालू नेसून मी माझ्या मृणाल नावाच्या दासीला घेऊन त्यांच्या भेटीसाठी जाण्याचं ठरवीत होते, पण... पण ज्या शारीरिक स्थितीत मी होते त्या स्थितीत मी परपुरुषापुढं जाऊ शकत नव्हते! मी गर्भधारिका होते. शेवटी निर्धार करून मी मृणालकडून माझी प्रकृती ठीक नसून, आपणच नि:संकोचपणे माझी भेट घ्यावी असा निरोप धाडला. तो त्याना कदाचित आवडणार नव्हता, कारण त्यांचा स्वभाव आत्यंतिक मानी होता. किती झालं तरी ते कौरवांचे ज्येष्ठ युवराज होते. हस्तिनापूरचे अघोषित सम्राट होते.

तरीही मृणालसोबत ते माझ्या कक्षाकडे येत होते. ते येत असल्याचं मला गवाक्षातून स्पष्ट दिसलं म्हणून तप्तरतेनं मी कक्षाच्या आतील दालनात जाऊन बसले. कदाचित ते रागावलेही असणार म्हणून मी मनाचं धैर्य एकवटून ते काय बोलणार ते ऐकून घेण्याची तयारी करू लागले! ते काहीही बोलले असते तरी मी त्यांना प्रत्युत्तर करणार नव्हते, कारण ते माझ्या पतीचे प्राणप्रिय साथीदार होते, शोणभावोजींइतकंच त्यांचं माझ्या जीवनात श्रेष्ठ स्थान होतं. त्यांना आदरानं वागविण्याची अंगराजांनी सूचना केली होती.

आत येताच ते एका आसनावर बसले. त्यांनी संकेत करण्यापूर्वीच मृणाल कक्षातून निघून गेली! माझं आतल्या दालनातील अस्तित्व त्यांना स्पष्ट जाणवावं म्हणून मी हातातील सुवर्णकंकणांचा ध्वनी केला! दालनाच्या द्वारावर झिरझिरीत पडदा होता त्या पडद्याकडे पाहत ते म्हणाले, "अंगराज्ञी मला इथं पाहून तुम्हाला विस्मय वाटला

असेल?"

"नाही. आपणच इथं यावं, असा परतीचा निरोप मला पाठवावा लागला याचा मलाच खेद होतो आहे. पण... पण माझा नाइलाज होता..."

"मला आपली अडचण समजली आहे. दासीनं ती सांगितली आहे आणि म्हणूनच मी स्वत: इथं आलो आहे, आणि त्याचा आपणाला विस्मयही नसावा."

"नाही. आपण सर्वांसाठी कौरवराज आहात, पण माझ्यासाठी शोणभावोजींइतकेच निकटचे आहात."

"त्याची जाणीव ठेवूनच मला इथं येताना संकोच वाटला नाही. शिवाय ज्या कामासाठी मी इथं आलो आहे त्यासाठी अन्य कुणालाही मी आपल्याकडे पाठवू शकत नव्हतो!"

"असं आपलं कोणतं महत्त्वाचं काम माझ्यासारख्या सामान्य स्त्रीकडून होणार आहे?"

"आपण सामान्य नाही. कर्णपत्नी कधी सामान्य असूच शकत नाही!"

"आपल्या कामासाठी ही स्तुती आहे, असं मी कसं म्हणू?"

"नाही. ही स्तुती नाही. ही वस्तुस्थिती आहे! आणि आज पुन्हा एकदा आपण सामान्य नाही, हे सिद्ध करण्याची वेळ आपणावर आली आहे!"

"असं कोणतं असामान्यत्व सिद्ध करणार आहे मी आज?"

"आपण जाणताच आहात की, अंगराज आणि मी स्वयंवरासाठी कलिंगांच्या राज्यात गेलो होतो. कलिंगकन्या भानुमतीला घेऊन मी आलो आहे... पण तिनं स्वयंवराची माला माझ्या कंठात घालण्यापूर्वी एक विचित्र अट घातली होती."

"कोणती अट?"

"त्या अटीला मी होकार दिला तोही केवळ आपल्याच विश्वासावर!"

"माझ्या? आपल्या उभयतांच्या वैवाहिक जीवनात माझ्यामुळे आनंद फुलणार असेल तर मी, आपण माझ्या पतीचे प्राणप्रिय स्नेही आहात म्हणून हवं ते करीन! अट कसली आहे?"

"तिची इच्छा आहे की..."

"अडखळू नका कौरवराज, स्पष्ट – स्पष्ट बोला."

"की, अंगराज कर्णानं आपल्या प्राणप्रिय सखीशी विवाह करावा!"

त्यांच्या उद्गारांनी मी सुन्नच झाले. पण क्षणभरच! लागलीच स्वत:ला सावरून मी धैर्यानं म्हणाले, "पण अंगराजांची याला संमती आहे काय?"

"दुर्योधनासाठी कर्ण काहीही करू शकेल, हे अजूनही सिद्ध झालेलं नाही असं वाटतं की काय आपल्याला? प्रश्न तुमच्या आणि केवळ तुमच्या संमतीचाच उरला आहे."

"ती मिळविण्यासाठी आपण परस्पर इकडे यावं, हे अंगराजांनी तर आपणास सुचविलं नाही?"

"छे! त्यांना यांतलं अजून काहीच माहीत नाही. आपली संमती नाही असं मी समजू का?"

"कशावरून?"

"आपण साशंकपणे अनेक प्रश्न विचारीत आहात म्हणून."

“नाही, तसंच काही नाही, पण हाच प्रसंग युवराज्ञी भानुमतींच्या जीवनात आला असता तर त्यांनी याहून अधिक प्रश्न विचारले असते, असं अपणाला नाही का वाटत?”

‘‘नाही! तिनं कोणताच प्रश्न विचारला नसता! एका वाक्यातच पृच्छकाला नकार देऊन तिनं सरळ बाहेरचा मार्ग दाखविला असता! आपण भानुमती नाही म्हणूनच मी येण्याचं साहस केलं आहे!”

‘‘अंगराजांच्या आणि आपल्या सौख्यासाठी मी हवं ते करीन! माझ्या संमतीसाठीच हा विवाह थांबणार असेल तर मी वचनपूर्वक सांगते की, माझी संमती आहे!”

ते आनंदानं ताडकन आसनावरून उठले. न राहवून शेवटी ते म्हणालेच, ‘‘वहिनी, खरोखरच तुमच्यासाठी एकेकाळी कर्णानं एवढा ध्यास का घेतला होता ते मला आज पटलं!” एक क्षणभरही न थांबता उत्तरीयाचा घोळ सावरत ते जाण्यासाठी द्वाराकडे वळले.

‘‘पण त्या भाग्यशाली सखीचं नाव काय?” मी शेवटी विचारलंच.

“सुप्रिया!’’

ते झपाझप पावलं टाकीत कक्षातून निघून गेले. माझ्या मनाची खोटी उभारी क्षणात ढासळली. सवत! छे! माझ्या सुखी संसाराला त्या कल्पनेनं गालबोटच लागणार नव्हतं काय? तिचं नाव सुप्रिया होतं म्हणे. पण खरोखरच ती सर्वांना सुप्रिय होईल काय? अनेक शंकांच्या माऱ्यांनी माझं मन कोंदटू लागलं, पण कधी- कधी दैवाशी द्यूत खेळण्याशिवाय मानवाच्या हाती दुसरं काय असतं?

प्रभंजनानं म्हटल्याप्रमाणं मला नव्या अंगराज्ञीच्या स्वागताची तयारी करावी लागली! पण ती किती, किती वेगळ्या अर्थानं! माझ्या अधिकाराच्या कुंडलांतील एक कुंडल आता सुप्रियेचं होतं! जे मला अनेक कष्टांनी प्राप्त झालं होतं ते तिला मात्र सहज मिळालं होतं! काही-काही माणसं जन्मजात दैववान असतात हेच खरं!

**

# आठ

अंगराजांचा आणि सुप्रियेचा विवाह थाटात पार पडला! युवराज दुर्योधनांचं वचन सत्य ठरलं. अंगराज त्यांच्या इच्छेला नकार देऊ शकले नाहीत. कधी-कधी सत्य हे कल्पनेपेक्षाही अद्भुत असतं आणि ते असतं म्हणून त्याला तोंडही द्यावं लागतं! मी सुप्रियेला कधीही न दुखविण्याचा निश्चय करून टाकला. तिला दुखविण्यानं त्याचा त्रास अंती माझ्या पतीलाच होणार होता! स्त्री ही कमीत कमी हानी आणि अधिकात अधिक सोय निवडत असते. तोच तिचा जन्मजात स्वभाव असतो.

सुप्रियेला स्वतंत्र अंत:पुरी कक्ष देण्यात आला. इतकं सर्व झालं होतं तरी माझं मन मला निक्षून माझ्या पतीच्या प्रेमाची ग्वाही पूर्वीइतकीच देत होतं. त्यांचं माझ्यावरचं प्रेम तर कधीच रतीभरही कमी झालं नसतं. गंगेकाठच्या ओलेत्या उत्तरीयाची आठवण ते कसे काय विसरणार होते! सुप्रियेनं मात्र माझ्यावरही ताण केली होती! माझ्या सर्व कल्पितांना तिनं प्रचंड धक्काच दिला! ती इतकी समजूतदार होती की, विवाह होताच सर्वांआगोदर तिनं माझीच भेट घेतली, मला विनयानं वंदन करून ती म्हणाली, ‘‘ताई मी आपली कनिष्ठ भगिनी आहे! आपणच मला जीवनदान दिलं आहे! तुम्ही संमती दिली नसतीत, तर अंगराजांचं नाव ओठी ठेवून मरण स्वीकारणं हाच माझ्यापुढं मार्ग होता! माझं त्यांच्यावर निरतिशय प्रेम आहे. हस्तिनापुरातील कुंडलं मला मिळाली पाहिजेत, असा मी ध्यास घेतला होता.’’

‘‘सुप्रिये, ठीक झालं तू आलीस ते! इतक्या विक्रमी पतीला सावरायला नाहीतरी मी एकटी असमर्थच होते! त्यांचं मन कशानंही दुखवलं जाणार नाही याची काळजी घे. लक्षात ठेव, मोठ्या माणसांची दु:खंही तशीच मोठी असतात! ती निवारण्यासाठी त्याच्या पत्नीला केवळ ध्यास आणि प्रेम असून चालत नाही, तर धैर्य आणि संयम असावा लागतो.’’

अनेक शंकांनी झाकाळून गेलेलं माझं मन तिच्या केवळ दर्शनानंच निर्धास्त झालं. हरिणीसारखे डोळे असलेली ती हरिणीसारखीच निष्कपट, निरागस होती. नावाप्रमाणंच ती मला अतिशय प्रिय झाली. नावाप्रमाणंच ती सुप्रिय ठरली.

**

# नऊ

सुप्रियेच्या विवाहानंतर मात्र मला अंगराजांना बोलवायला एक छान कारण सापडलं होतं. माझं आपलं एक टुमणं त्यांच्या पाठीशी नित्याचं लागून राहिलेलं असे. ''केवळ स्त्रियाच आपल्यापुरतं पाहतात असं नाही, तर पुरुषही तसेच असतात!'' असं मी म्हटलं की, ते आश्चर्यानं विचारीत, ''कोणत्या कारणावरून तू मला असं म्हणत आहेस?''

''म्हणू नको तर काय करू? आपण मात्र दोन-दोन विवाह करायचे आणि आपला छोटा बंधू वयात आला असूनही त्याच्याकडे लक्ष द्यायचं नाही, याला काय म्हणावयाचं माणसानं?''

''वृषाली, तुझ्या समाधानासाठी तरी मला आता शोणाचं लग्न लवकर केलं पाहिजे! नाहीतर...''

''नाहीतर काय?''

''नाहीतर माझ्यावर सूड म्हणून तू स्वत: पुढाकार घेऊन एकाच वेळी त्याची तीन लग्नं लावून मोकळी होशील! आणि तीही मिळतील त्या मुलींशी!''

''आपल्यावर कसला सूड? आपल्यावर सूड घ्यायचा म्हणजे मी माझ्या स्वत:वरच सूड उगविण्यासारखं नाही काय?''

ते त्यावर काहीच बोलत नसत. मात्र आपल्या भावाचा विवाह लवकरात लवकर केला नाही, तर मी या ना त्या प्रसंगी त्यांना सारखी छेडीत राहणार हे त्यांनी ओळखलं होतं.

**

# दहा

युवराज दुर्योधनांच्या विवाहानंतर ते आता लवकरच हस्तिनापूरचे अभिषिक्त राजे होणार, अशी जागोजागी चर्चा सुरू झाली. सेनापती म्हणून ते अंगराजांची नियुक्ती करतील, असंही सर्व जण बोलत होते. महाराज धृतराष्ट्र फारच वृद्ध झाले होते. त्यांनी कुरूंचं राज्य इतकी वर्षं नीट सांभाळलं होतं तेच काही कमी नव्हतं, तरीही नगरातील वृद्ध लोक नेहमीच महाराज पांडूंची आठवण काढून म्हणत असत की, 'महाराज पांडूंनी दिग्विजय करून हस्तिनापूर राज्याची कीर्ती वाढविली आणि त्यांचे कमलपुष्पांसारखे पाच पुत्र मातेसह अग्नीच्या भक्षयस्थानी पडले.' कुणी-कुणी म्हणत, 'ते जिवंत आहेत. असतील तर त्यांना हस्तिनापुरात आणलं पाहिजे!'

मला नगरातील लोकांच्या या चर्चा कधी शोणभावोजींकडून, कधी सत्यसेनदादाकडून, कधी प्रभंजनाकडून तर कधी मृणालकडून समजत. पांडवांच्या स्मृती आवडीनं आणि श्रद्धेनं जपणारे अनेक नगरजन हस्तिनापुरात होते. मलाही प्रसंगवशात राजमाता कुंतीदेवींची प्रकर्षानं आठवण होई. त्यांच्या स्मृतीबरोबरच त्या पाच एकसंध फिरणाऱ्या भावाभावांची आठवण होई. ते या जगातून नाहीसे झालेत, हे मला कधी सत्य असं वाटलंच नव्हतं. काळाच्या ओघात काल वाटत असणारं सत्य आज असत्य ठरलेलं असतं. शेवटी तसंच घडलं होतं. अदृश्य झालेले पांडव पांचालीच्या स्वयंवरात एकदम प्रकट झाले होते.

स्वयंवरानंतर लगेच ते मथुरेला गेले होते. श्रीकृष्ण हा त्यांचा आतेभाऊ! सर्व नगरजनांना वाटलं की, ते आता मथुरेतच वास्तव्य करतील. कारण सर्वांना माहीत होतं की, युवराज दुर्योधनांचं आणि त्यांचं कधी पटणारच नाही, पण मला मात्र नेहमी वाटे की, त्या पाच भावांनी एकदा तरी हस्तिनापुराला यावं. त्यांच्यातील राजपुत्र नकुल तर मला अंगराजांची दुसरी प्रतिमाच वाटे. केवळ त्यांना कवच- कुंडलंच कमी होती आणि अंगराजांसारखे हिरण्यवर्णी कुरल केश नव्हते. त्या पाच भावांना एकदा तरी पाहावं, अशी माझ्या मनात तीव्र इच्छा होती. माझ्या पुत्राचं दु:ख आता कालाच्या ओघात बोथटलं होतं.

एके दिवशी माझी ती इच्छा फलद्रूपही झाली. अंगराज आणि मी शोणभावोजींसाठी एकमेकांना देशोदेशींच्या सुस्वरूप मुली सुचवीत बसलो होतो.

''वृषाली, तू कुलिंद देशाबद्दल कधी काही ऐकलं आहेस?''

''ऐकलंय, पण फारसं नाही.''

''तो देश हिमालयाच्या अगदी पायथ्याशी आहे. हिरव्यागार वनश्रीनं सदासर्वकाळ नटलेला तो देश म्हणजे पृथ्वीवरचा स्वर्गच मानला जातो. त्या देशातील स्त्रिया म्हणे अप्सरांसारख्या सुंदर असतात. शोणासाठी वधूसंशोधन करावं म्हणून त्या देशात मी स्वत:च जाणार आहे.''

त्यांचं आपल्या भावावरचं प्रेम खरोखरच अतुल होतं. मी त्यांच्या या विचारावर काहीतरी बोलणार एवढ्यात दुर्योधनांचा खास सेवक प्रभंजन आत आला आणि

घाईघाईत म्हणाला, ''अंगराज, तातडीची राजसभा बोलावण्यात आली आहे. आपणाला राजसभेत घेऊनच ये, असा निरोप आहे.''

''का? काय झालं प्रभंजन? अशा सभेचं प्रयोजन?'' अंगराजांनी आसनावरून उठत-उठतच त्याला विचारलं.

''मथुरेहून निघालेले पांडव आता हस्तिनापूरच्या अगदी सीमेवर आले आहेत. ते गंगेच्या पैलतीरावर येऊन ठेपले असल्याची वार्ता आली आहे. महाराज धृतराष्ट्रांकडे आपल्या राज्याचा अर्धा राज्यभाग मागायला ते येत आहेत अशी कुणकुण आहे!''

''चल प्रभंजन, तू पुढं हो. मी सभेची वस्त्रं परिधान करून येतोच म्हणून सांग.''

वस्त्रं धारण करण्यासाठी ते वस्त्रागारात गेले. माझ्या मनात शंकेची पाल चुकचुकली. या राजसभेत न जाणो, परत कुणाचीतरी भांडणं व्हायची. प्रश्न राज्याच्या वाटपाचा होता! राज्यासाठी लाखो वीरांची मस्तकं धडावेगळी होतात! वैमनस्याचे विषवृक्ष फोफावतात. जे घडू नये तेच नेमकं घडतं. जगासाठी संपत्ती, राज्य, कीर्ती ही बहुमोल असतील, पण स्त्रीसाठी तिचा प्रिय पती एवढाच अमोल ठेवा असतो. पतिहृदय हेच तिचं सिंहासन असतं!

ते वस्त्र बदलून येताच मी सामोरी गेले. आज त्यांना काहीतरी सांगणं अत्यावश्यक होतं असं माझं मन मला सांगत होतं!

''वृषाली, मी राजसभेहून येतो.'' मस्तकावर सुवर्णकिरीट धारण करीत ते मंद हसत म्हणाले.

''थांबावं! मी आपल्याकडे आजपर्यंत काहीच मागितलं नाही, पण आज मन सुचवतं आहे काहीतरी माग.''

''ही वेळ नव्हे ते मागण्याची! मी कुरूंच्या राज्याचा एक योद्धा आहे! तू एका योद्ध्याची पत्नी आहेस!''

''ही आणि हीच वेळ आहे मागण्याची.''

''वृषाली, कोणतीही शक्ती या वेळी राजसभेत जाण्यापासून मला परावृत्त करू शकणार नाही. तूसुद्धा नाहीस.''

''मी आपणाला जाण्यापासून परावृत्त करणार नाही. आपण राजसभेत अवश्य जावं, पण मला एक वचन देऊन जावं.''

''कोणतं वचन?''

''पांडवांच्या राज्यवाटपात आपण काहीच बोलू नये असं मला वाटतं!''

''ते कसं शक्य आहे? दुर्योधनाच्या कल्पनेला पाठिंबा देणं हे कर्णाचं जीवितकार्य आहे! आज तू कुणामुळे या सोमवंशाच्या वाड्यात मानानं अंगराज्ञी म्हणून मिरवते आहेस ते तुला माहीत नाही काय?''

''मला त्याची पूर्ण जाणीव आहे, पण... पण पांडव हे महाराज पांडूंचेच पुत्र आहेत असं माझं मन मला निक्षून सांगतंय! राजमाता कुंतीदेवींकडे पाहिल्यावर आपणालाही तसंच वाटेल!''

राजमातेचं नाव कानांवर पडताच ते एकदम उगाच गंभीर झाले. आपल्या खांद्यावरून घसरणारं उत्तरीय सावरीत ते काही काळ स्तब्धच झाले.

शांततेचा भंग करीत मीच म्हणाले, ''आपण कौरव-पांडवांच्या राज्यवाटपात कुणाचाही पक्ष उचलू नये, कारण कदाचित त्याला अखंड वैराचं स्वरूप येईल.''

माझ्याजवळ येत नेहमीसारखं माझं मुख आपल्या उबदार ओंजळीत घेत ते माझ्याकडे सखोल पाहत म्हणाले, ''वृषाली, क्षणापूर्वी तू शोणाच्या लग्नाचा विचार करीत होतीस त्या वेळी मला तू त्याची जणू मोठी बहीणच वाटलीस आणि आता माझा विचार करताना क्षणभर मला तू दोन जिवांची माता वाटलीस. एक तुझ्या उदरातील कर्णाच्या पुत्राची आणि एक साक्षात कर्णाची! स्त्री ही मनात आणलं तर पुरुषाशी एकाच काळी अनेक नात्यानं वागू शकते हेच आज तू सिद्ध केलंस! प्रणयाच्या वेळी उन्मलून येणारी प्रणयिनी आणि पुत्राच्या सुरक्षिततेसाठी सजग असणारी माता कधी-कधी या एकाच शरीरात एकाच वेळी असू शकतात. या ठिकाणी राधामाता असती, तर तिनं मला नेमकं हेच सांगितलं असतं आज!''

''जा आपण, पण ऐकण्यासाठी, बोलण्यासाठी नव्हे!"

''हो. मी सांगतो विश्वास ठेव. मी काहीच बोलणार नाही!'' नकळत त्यांनी वचन देऊन टाकलं!

ते राजसभेसाठी निघून गेले. मी नि:शंक झाले. पांडव नगरात येत असल्याची सूचक वाद्यं वाजत होती. मी गवाक्षात उभी राहिले. मला राजमाता कुंतीदेवींना एकदा पाहायचंच होतं.

अर्ध्या एक घटकेत पांडव, राजमाता कुंतीदेवी आणि द्रौपदी बऱ्याच जनसमुदायासमवेत राजवाड्यासमोर आले. त्यांच्या समवेत महामंत्री विदुर होते. त्यांना एक साधा रथही पाठविण्यात आला नव्हता याचं मला वाईट वाटलं. मी गवाक्षातून राजवाडयाच्या महाद्वारातील सर्वांच्या हालचाली पाहत होते. पितामह भीष्म आणि महामंत्री विदुर यांनी पांडवांना कडकडून आलिंगनं दिली, पण महाराज धृतराष्ट्रांच्या आलिंगनात ती आर्तता नव्हती! युवराज दुर्योधन भीमाकडे पाहत होते, पण पाठीवर एका वृद्ध स्त्रीला घेतल्यामुळे भीमाची मान खाली होती! पांडुपुत्र अर्जुन अंगराजांच्या कुंडलांकडे आणि युधिष्ठिर त्यांच्या पायांकडे एकटक पाहत होते. राजमाता कुंतीदेवी आणि अंगराज एकमेकांना इतके का निरखीत होते कोण जाणे! कदाचित अंगराज राजमातेच्या डोळ्यांत पाहून पांडव हे पांडू महाराजांचेच पुत्र आहेत का याचा शोध घेत असावेत! आणि राजमाता त्यांना आपल्या नेत्रांनीच सांगत असाव्यात की, ''अंगराज कर्णा, तू तरी तुझ्या दुर्योधनाला आम्ही या राज्याचे अर्धे अधिकारी आहोत हे पटवून दे!"

एक कोडं मला मात्र मुळीच उलगडलं नाही ते पांडुपुत्र भीमांच्या पाठीवरच्या वृद्ध स्त्रीचं! ती स्त्री कोण असावी म्हणून मी बराच कयास करून पाहिला, पण उत्तर सापडेना. शेवटी मी माझ्या कक्षातून मृणालला चौकशीसाठी पाठविली. तिनं खाली जाऊन त्या गर्दीत घुसून ती स्त्री कोण होती याची माहिती काढली आणि परत आल्यावर श्वास रोधीत ती म्हणाली, ''महाराणी, ती एक दासी आहे!"

''दासी! पांडुपुत्र भीमांच्या पाठीवर?"

''होय. ती राजमाता कुंतीदेवींची दासी आहे! धात्री की धरित्री असं काहीसं नाव आहे तिचं!"

''काय नाव आहे म्हणालीस तिचं?"

''धात्री!''

त्या नावातील ध आणि त्र या कठोर अक्षरांनी असो व अन्य कोणत्याही कारणांमुळे असो, मला त्या दासीचं नाव मुळीच आवडलं नाही!

मी वरून पाहिलं. राजमाता कुंतीदेवी आणि द्रौपदी महामंत्री विदुरांबरोबर राजवाड्याबाहेर गेल्या, कारण त्यांनी सर्वसंगत्याग केल्यामुळे ते राजवाड्यात कधीच राहत नसत. कुरूंचे महामंत्री असूनही ते एका प्रशस्त पर्णकुटीत राहत म्हणूनच तर त्यांना नगरजन 'महात्मा विदुर' म्हणत. कुंतीदेवी नगराबाहेरील त्यांच्या पर्णकुटीतच राहणार होत्या. इतर सर्व मंडळी मात्र राजसभेसाठी सभागृहाकडे वळली. पांडुपुत्र भीमाच्या पाठीवरच्या वृद्धेला खाली उतरवून घेण्याची खूण, अंगराजांनी शेजारच्या प्रभंजनाला केली. सर्व जण राजवाड्याच्या पायदंड्या चढून गेले. सर्वांत शेवटी शकुनीमामा होते. ते युवराज दुर्योधनांच्या कानाशी तोंड नेऊन काहीतरी बोलले. काय बोलले ते इतर कुणालाच कळणं शक्यही नव्हतं!

राजपुत्र अर्जुनाला पाठमोरा पाहताना त्यानं माझ्या पुत्राचा वध केला हे सत्यही मला पटत नव्हतं, कारण तो कितीतरी धीमी पावलं टाकत पायदंड्या चढत होता.

प्रत्यक्ष युद्ध चालू असताना कोण मारलं जातंय याकडे ह्या योद्ध्यांचं लक्ष असतं की नाही कोणास कळे! एरवी ते कितीतरी सौम्य दिसतात; पण युद्ध पेटलं की किती क्रूर होतात ते!

**

# अकरा

राजसभेत काय-काय घडलं ते सर्व मला समजलं. मला ते आवडलं नाही. संपत्ती आणि सत्ता मानवी मनाला कधी-कधी पशूहूनही क्रूर करतात! राज्यातील आपला न्याय्य भाग मागणाऱ्या युधिष्ठिराला शकुनीमामांनी जी वागणूक दिली ती कुणालाच पटणारी नव्हती. मला तर ती मुळीच आवडली नाही, पण न आवडणाऱ्या सर्वच गोष्टी काही नेहमी थोपविता येतात असं नाही. मला शकुनीमामांचं स्वत:चं गांधार राज्य सोडून नेहमी हस्तिनापुरात राहणंच पसंत नव्हतं. सर्व कलहाचं मूळ तेच होते.

सभागृहात पांडवांच्या वतीनं युवराज युधिष्ठिरांनी आपण पांडू महाराजांचे पुत्र आहोत असं सांगून, आपल्या दिग्विजयी पित्यानं जिंकलेल्या राज्याचा न्याय्य राज्यभाग आपणाला द्यावा अशी विनंती केली. राजसभेत सर्व वृद्ध आणि अनुभवी कौरव योद्धे असूनही शकुनीमामा मध्येच उठून मानभावीपणानं म्हणाले की, ‘‘पांडवांना राज्याचा भाग पाहिजेच असेल तर कौरव त्यांना मोठ्या आनंदानं खांडववनाचं विशाल राज्य देण्यास तयार आहेत! पांडवांचा जन्म शतशृंग पर्वतावर झाला आहे! त्यांना पर्वतावर आणि अरण्यात राहण्याचा छंद आहे!’’

मामांचे ते उद्‌गार धडधडीत अन्यायाचे, ढोंगाचे आणि क्रूर असत्याचे होते. पण सभेतील सर्व योद्धयांनी विवश स्तब्धता स्वीकारली होती. अंगराजांकडून वचन घेऊन मी मोठी चूक करून बसले होते. पांडवांवर अन्याय होतो आहे ही जाणीव त्यांना सभेत अस्वस्थ करणारी असूनही ते वचनापायी काहीच बोलू शकले नव्हते.

युधिष्ठिरानं खांडववनाच स्वीकार केला. सभा विसर्जन पावली.

सभेतून येताच अंगराज म्हणाले, ‘‘वृषाली, पांडवांना खांडववनाचं घनदाट अरण्य देण्यात ते रानटी श्वापदांच्या भक्षयस्थानी पडावेत अशीच मामांची इच्छा असावी. सभेत जे झालं ते वीरांना शोभणारं नव्हतं! नेमकी आजच माझ्याकडून वचन घेण्याची बुद्धी तुला कशी सुचली?”

**

## बारा

दोन दिवस महामंत्री विदुरांच्या पर्णकुटीत राहून पांडव खांडववनात निघून जाणार होते. त्यांच्या त्या दोन दिवसांच्या वास्तव्यात एकदातरी राजमातेची आणि माझी भेट व्हावी, अशी माझी तीव्र इच्छा होती. मला राजमाता कुंतीदेवींबद्दल एवढा जिव्हाळा का वाटत होता, ते कधीच सांगता आलं नसतं, पण वाटत होता हे खरं होतं. जीवनात अनेक व्यक्ती भेटतात. त्या सर्वांबद्दलच आपणाला काही विशेष ओढ वाटते असं नाही, पण एखाद्या व्यक्तीच्या केवळ पहिल्याच दर्शनात जिव्हाळा आणि आकर्षण निर्माण होतं! राजमातेच्या बाबतीत माझं तसंच झालं होतं. बऱ्याच दिवसांनंतर भेटीचा योग येत असल्यानं त्यांच्याशी चार शब्द समक्ष बोलायला मिळावेत, असं मलाही वाटत होतं आणि तो योगायोग राजमाता कुंतीदेवींनीच घडवून आणला. त्यांनी पर्णकुटीतून एका सेवकाला पाठवून मला बोलावलं असल्याचा संदेश धाडला. मला तेच हवं होतं. त्यांच्या मनात मजविषयी प्रेम होतं, हे मी कधीच जाणलेलं होतं. त्यांचा निरोप येताच मी क्षणाचाही विलंब न करता सत्यसेनदादाला बोलावून घेतलं. त्यानं रथ जोडला आणि महात्मा विदुरांच्या पर्णकुटीसमोर उभा केला.

पर्णकुटीच्या कवाडातच राजमाता कुंतीदेवी आणि महात्मा विदुर ही दोघं काहीतरी बोलत उभी होती. मला पाहताच राजमाता पुढं झाल्या. पांडव नगरात कुठंतरी गेले असावेत. रथातून खाली उतरताच त्यांच्या चरणावर हात टेकवून मी त्यांना आदरानं वंदन केलं! खांद्याला धरून मला वर उठवीत त्या म्हणाल्या, ‘‘मुली, तू गर्भधारिका आहेस याची कल्पना नव्हती मला! नाहीतर मीच आले असते तुला भेटायला!’’ त्यांचा प्रत्येक शब्द मला माझ्या मातेसारखा मायेचा वाटला! त्या सत्त्वशील राजमातेला दैवानं किती क्रूर फटके दिले होते! तरीही त्या कुलवंत शरीरात तसंच मोठं मन होतं. एक महाराणी माझ्यासारख्या सूतकन्येची, एका सूतराजाच्या पत्नीची आस्थेनं विचारणा करीत होती.

मनात प्रकर्षानं येऊन गेलं, दैव गुणवान माणसांचा, हाती काटेरी शस्त्र घेऊनच नित्य का बरं पाठपुरावा करीत असावं? जगातील एकजात सज्जनांच्याच वाट्याला दुर्दैव का येतं बरं? की दुर्दैवाला जवळ करण्याएवढं विशाल हृदय सज्जनांजवळच असतं आणि इतरांजवळ नसतं म्हणून?

राजमातेशी मी मनसोक्त गप्पा मारल्या. मधूनच अत्यंत जिव्हाळ्यानं मला गर्भारपणात प्रकृती कशी जपली पाहिजे, हे त्या बजावीत होत्या. मी परत यायला निघाले तेव्हा त्या म्हणाल्या, ‘‘तुला होणारा हा पुत्र विख्यात होईल. त्याचं नाव काय ठेवावयाचं ठरवलंयस तू?’’

‘‘त्याला कवच आणि कुंडलं असतील तर... कवचधर नाहीतर कुंडलसेन!’’ मी म्हणाले.

जरा अवघडून त्या म्हणाल्या, ‘‘नाही मुली, त्याल कवचही असणार नाही आणि कुंडलंही असणार नाहीत! मात्र त्याच्या पित्यासारखा तो सुंदर असेल!... त्यानं

तुझ्यासारखं सुदैवी व्हावं म्हणून तुझ्या नावावरून त्याला वृषसेन असं नाव का ठेवीत नाहीस तू?''

"आपली इच्छा असेल तर त्याचं नाव वृषसेनच ठेवीन मी!'' मी त्यांचा निरोप घेतला आणि पर्णकुटीतून बाहेर पडून रथात बसले. मला त्यांच्या संभाषणातील 'त्याला कवचही असणार नाही आणि कुंडलंही असणार नाहीत' या अडखळत बोलण्याचा अर्थ उमजला नाही. त्या तसं का बरं म्हणाल्या? मला त्याचं उत्तर काही सापडलं नाही.

**

# तेरा

पांडव आपल्या मातेसहवर्तमान खांडववनाकडे निघून गेले. तिथं ते पर्णकुटी बांधून राहणार होते. एका विक्रमी राजाचे पाच सुपुत्र एका घनदाट अरण्यात राहायला निघून जावेत हे मला खटकत होतं, पण मी एक स्त्री होते. घडेल ते निमूटपणे पाहणं याशिवाय स्त्री काय करू शकते? तिला करता येणं शक्य असतं केवळ आपल्या कुटुंबाचं भलं!

मी अंगराजांना शोणभावोजींचा विवाह करण्यासाठी अनेक मार्गांनी सांगत होते. एका पौर्णिमेच्या शुभदिवशी ते आपलं सैन्य घेऊन शोणभावोजींसह कुलिंद देशाला वधूच्या शोधासाठी निघून गेले. माझा जीव भांड्यात पडला. ते जातील ती दिशा आपलीच करतील, यावर माझा पूर्ण विश्वास होता.

एका मासानंतर ते परत आले. त्यांच्यासमवेत कुलिंदाच्या राज्यातील एक सुस्वरूप तरुणी होती. राजवाड्यात येताच मी तिला ओवाळलं. माझ्या एकुलत्या एका दिराची ती पत्नी होणार होती. आकाशातल्या विजेसारखी तिची अंगकांती सतेज होती. डोळे बोलके होते. नासिका सरळ तरतरीत असून मुद्रा अंगराजांसारखीच गोलाकार होती. तिचं नाव होतं मेघमाला!

मेघमालेचा आणि शोणभावोजींचा विवाह राजवाड्यासमोर भव्य मंडप उभारून थाटात पार पाडण्यात आला. मला त्यांच्या विवाहानं एका जबाबदारीतून सुटल्याचा फार मोठा आनंद मिळाला. विवाहानंतर वंदन करण्यासाठी शोणभावजी वधूसह आले तेव्हा मी म्हणाले, ‘‘भावोजी, ही मेघांची माला आज निलिम्याच्या कंठात घातली आहे! तिला सांभाळा. इंद्रधनुष्याचे रंग फुलतील तुमच्या संसारात!’’

ते नेहमीच्या सहजपणे हसत म्हणाले, ‘‘दादानं दोन विवाह केले तसे मीही करीन असं वाटलं की काय तुम्हाला वहिनी? पण दादात आणि माझ्यात फार मोठं अंतर आहे!’’

**

# चौदा

मी, सुप्रिया आणि मेघमाला आम्ही तिघीही आमच्या सासुसासऱ्यांना जपत होतो. आमच्याकडे पाहून ते नेहमी कृतार्थतेच्या भावनेनं म्हणत, "मुलींनो, आता मरण यावं असं वाटतं! सौख्याच्या शिखरावरून स्वर्गाला जाणारी वाट जवळ असती तर किती बरं झालं असतं! कर्ण अंगराज झाला, त्याचे विवाह झाले, शोणही चतुर्भुज झाला, आमच्यासारख्या सारथ्यांची सौख्याची कल्पना यापेक्षा अधिक ती काय असणार?"

मला चिमटा काढीत सुप्रिया त्यांना म्हणे, "पण मामंजी, नातवाचं मुख पाहिल्याशिवाय स्वर्गात प्रवेश नाही असं ऐकलंय आम्ही!"

"होय सुप्रिया, ती एक इच्छा राहिली आहे आणि वृषाली ती लवकरच पूर्णही करील, काय वृषाली?" ते मला विचारीत. माझं मुख लज्जेनं आरक्त होई. मी सुप्रियेकडे लटक्या रागानं पाही. तोंड फिरवून ती खुदुखुदु हसत राही. सुदामननंतर बऱ्याच वर्षांत आमच्या कक्षात बाल बोल घुमले नव्हते.

**

# पंधरा

दिवसांमागून दिवस जात होते. मला हालचाल करणं अवघड जात होतं. मंचकावर पडले की, माझं सारं आयुष्य माझ्या डोळ्यांसमोर उभं राही. वडील लहानपणीच गेल्यामुळे आईनं आणि सत्यसेनदादानं माझा ममतेनं सांभाळ केला होता. आम्ही हस्तिनापुरात आलो त्या दिवशीच आई कायमची निघून गेली. प्रयागात माझी आणि अंगराजांची पहिली भेट झाली. तिला कारणीभूत होता तोही एक घोडा आणि एक घडा. मी नेहमीच त्या घोड्याला मनोमन धन्यवाद देत आले आहे. त्यानं मला जन्मोजन्मीचा सहचर शोधून दिला होता. पराक्रमी, सुस्वरूप, निगर्वी आणि प्रेमळ. माझं जीवन त्यांच्या संगतीत फुललं होतं. मातृत्व म्हणजे स्त्रीच्या जीवनयज्ञाची पवित्र सांगता! मातृत्व हा निसर्गानं स्त्रीला दिलेला सर्वांत श्रेष्ठ असा वर असतो! पराक्रमाचं मातृत्व पुरुषाकडे असतं, पण मातृत्वाचा पराक्रम केवळ स्त्रीच करू जाणते! मातृत्व ही स्त्रीची सर्वांत श्रेष्ठ आणि सहजसुंदर अशी साधना असते! इतर सर्व आनंद सापेक्ष असतात, पण मातृत्वाचा आनंद हा ब्रह्मानंद असतो, कारण तो निर्मितीचा अतुल आनंद असतो. पण आनंद सहजसाध्य नसतो. त्यासाठी स्त्रीला मरणप्राय प्रसववेदना सहन कराव्या लागतात. मातृत्वाचं हे सुवर्ण प्रसववेदनांच्या मुशीतून तावून-सुलाखून निघालेलं असतं आणि म्हणूनच स्त्रीला त्याचा अभिमान असतो.

आणि एक दिवस मी प्रसववेदनांनी घायाळ झाले. जणू सहस्त्र शरांची अग्रं सर्वांगात कुणीतरी निर्दयपणानं खुपसत होतं. मी त्या सर्व यातना निकरानं सहन करीत होते. माझ्या मुलाच्या जीवनासाठी हे मला सहन करणंच भाग होतं. जीवन! गोंडस आणि सर्वांनाच हवंहवंसं वाटणार जीवन किती कष्टमय मार्गांनी साकार होत असतं! मातेच्या प्रसववेदनेच्या नि:श्वासातून जन्माला येणारं अर्भक जीवनाचा हुंकार घेत असतं! मातृत्व हा सर्वांत अद्भुत चमत्कार आहे! वेदनामय तितकाच आनंददायक, भीतिदायक; पण आशादायक!

मी प्रसूत झाले. औंदुबराच्या पक्व फलासारखं अंजिरी रंग असलेलं एक बालक जन्माला आलं. माझं शरीर रितं झालं आणि मन वात्सल्यानं काठोकाठ भरून आलं! मी माता झाले. सर्वांगातील शक्ती गेल्यानं शरीर श्रांत झालं असूनही मी मोठ्या उत्साहानं कसंबसं स्वत:ला सावरीत उठले. दाईच्या हातातील त्या अर्भकाला मी छातीशी कवटाळलं. तो पुत्र होता. हुबेहूब अंगराजांसारखा दिसत होता, पण – पण त्याच्याही कानात अंगराजांसारखी कुंडलं नव्हती!! त्याच्या अंगावरचं कातडं अभेद्य होतं की नव्हतं तेही कळत नव्हतं! मला आश्चर्याचा धक्का बसला. राजमाता कुंतीदेवींचा कयास अचूक ठरला होता.

त्या बालकाच्या रडण्याचा आवाज ऐकून कक्षाबाहेर उभे राहिलेले अंगराज, शोणभावोजी, सुप्रिया, मेघमाला, सत्यसेनदादा सर्व जण आत आले. आत येताच अंगराजांनी तत्परतेनं अलगद माझ्या हातातून बालकाला आपल्या हातात घेतलं. आत्यंतिक अधिऱ्या नजरेनं त्यांनी त्याच्या कानांकडे पाहिलं. त्याला कुंडलं नाहीत हे

पुन:पुन्हा चाचपून पाहिलं. त्याच्या लुसलुशीत कोवळ्या करंगळीवर त्यांनी हळूच सुई टोचली. करंगळीवर क्षणात एक रक्ताचा थेंब उभा राहिला! तो पाहताच ते एकदम गंभीर झाले. त्यांचा उंच देह थरथरू लागला. हातातील मुलाला पुन्हा दाईच्या हाती देऊन शोणभावोजींजवळ जात त्यांचे खांदे पकडून ते गदागदा हलवीत केवढ्यातरी मोठ्यानं ते म्हणाले, ‘‘शोणा, तू माझा सख्खा भाऊ असून तुला कवच-कुंडलं नाहीत. हा माझा पुत्र असून यालाही कवच-कुंडलं नाहीत. का नाहीत? मी कोण आहे? अरे, मी कोण आहे ते तुम्ही मला सांगत का नाही?”

ते पुढं म्हणाले – ‘‘सुदामनच्या वेळीही मला वाईट वाटलं होतं, पण या नाही तरी दुसऱ्या पुत्राला कवच-कुंडलं असतील या आशेवर त्या वेळी मी माझ्या मनाची समजूत काढली होती, पण आज मात्र मी याबाबत पूर्ण निराश झालो आहे. माझ्या कोणत्याच पुत्राला कवच-कुंडलं असणार नाहीत...”

शोणभावोजी स्तब्ध... गप्प होते. त्यांच्या शेजारी असलेल्या आपल्या मातेला अंगराजांनी कळवळून विचारलं, ‘‘माते, तुझ्या याही नातवाला कवच-कुंडलं का नाहीत?” त्यांनीही काहीच उत्तर दिलं नाही. शेवटी त्याच आवेगानं ते माझ्याजवळ आले आणि मी श्रांत आहे, याचं भानही न राहून माझा दंड गदागदा हलवीत म्हणाले, ‘‘वृषाली, तू तरी सांग, मी कोण आहे? मला कुणीतरी सांगा, मी कोण आहे?”

‘‘असं काय करताय? तुम्ही राधामातेचे पुत्र आहात, शोणभावोजींचे ज्येष्ठ बंधू आहात, तुम्ही या बालकाचे पिता आहात, तुम्ही अंगराज आहात!’’ मी त्यांना संथपणे सांगितलं.

‘‘नाही वृषाली, तसं नाही. मी कोण आहे ते माझं मलाच समजत नाही! कुणीही मला ते कधी सांगत नाही!” असं म्हणत ते कशाचीही वाट न पाहता तेथून ताडताड निघून गेले.

**

# सोळा

माझ्या त्या द्‌वितीय पुत्राचं नामाभिधान झालं. सर्व जण त्याला अनेक सुंदर-सुंदर नावं सुचवीत होते, पण मी त्याचं नाव वृषसेन ठेवण्याचा आग्रह धरला! वृषसेनाच्या आगमनानं मला रिझवणारं एक छानसं साधन मिळालं. तो हातापायांची इतकी अविरत धडपड करी की, केव्हा-केव्हा मला त्याची भीती वाटे. घर आणि मूल हेच स्त्रीचं जीवन असतं. त्यातच तिचं मन रमतं. माझा पहिला पुत्र सुदामन द्रौपदीच्या स्वयंवरात अकारण प्राणास मुकला होता. त्याच्या स्मृतीनं माझं अंत:करण कधी-कधी गलबलून येई, पण ते विसरणं भाग होतं. सुप्रिया आणि मेघमाला वृषसेनाला पळभरसुद्धा खाली ठेवायला तयार नसत. 'वृषू, वृषू' म्हणत त्या त्याचे पटापट मुके घेत, त्या वेळी मला माझ्या सर्वांगावरून सौख्याची सहस्त्र मयूरपिसं फिरल्याचा भास होई. सुदामनच दुसरा देह धारण करून माझ्या उदरी आला आहे, असं मला वाटे.

शुक्ल पक्षातला चंद्रमा कलाकलांनी वाढतो तसा तो सर्वांच्या दृष्टीखाली वाढू लागला. त्याची अंगलट दृष्ट लागण्यासारखी होती. त्याला कवच-कुंडलं असती तर फारच छान झालं असतं, असं मला नित्य वाटे.

वृषसेनाला पाहण्यासाठी युवराज्ञी भानुमती आणि युवराज्ञी दु:शलादेवी आल्या. युवराज्ञींची आणि माझी ती पहिलीच भेट होती. मला वाटलं होतं त्यांचा स्वभाव खेळकर असेल, पण त्या फारच आढ्यतेखोर होत्या! माझी भेट होताच मला अन्य काहीच न विचारता जुन्या स्मृतींना उजळा देत त्या म्हणाल्या, ''मी भेटायला आले ते आवडलं नसेल तुम्हाला!''

''ते का म्हणून?'' मी विचारलं.

''मी तुम्हाला सवत आणणारी म्हणून!''

''छे, मला तसं कधीच वाटलं नाही. उलट सुप्रियेनं मला कितीतरी आनंदी केलं आहे.''

''ते सध्या ठीक आहे. पण उद्या तिला मुलंबाळं झाल्यानंतर ते संबंध असेच राहतील असं नाही!''

''आम्ही दोघीही अंगराजांच्या पत्नी आहोत. आमच्या इच्छेपेक्षा अंगराजांच्या इच्छेलाच अधिक मोल दिलं जाईल.'' मी म्हणाले.

''अंगराज्ञी वृषाली, भवितव्य हे अंगराजांच्याच काय; पण साक्षात परश्वेराच्या इच्छेलाही डावलू शकतं.'' त्या म्हणाल्या.

त्या माझ्याशी वाद घालायला आल्यासारख्याच तुटकपणानं बोलत होत्या. मी संभाषण बंद केलं. ज्या कारणासाठी त्या आल्या होत्या ते तसंच राहून गेलं. वृषसेनाला त्यांनी पाहिलंही नाही! युवराज्ञी दु:शलादेवींनी मात्र त्याला हाती घेऊन त्याचे दोन्ही कान पुन:पुन्हा चाचपून पाहिले. त्याच्या कुरळ्या जावळाचे त्यांनी पटापट मुके घेतले.

**

# सतरा

मी सौख्याच्या शिखरावर होते, पण अधूनमधून मला राजमाता कुंतीदेवींची आठवण होई. म्हणूनच सत्यसेनदादाला मी आवर्जून त्यांच्याविषयी मिळेल ती माहिती आणावयास सांगितलं होतं. तो जे-जे सांगत होता ते ऐकून मला पांडवांच्या कर्तृत्वाचा अचंबा वाटत होता.

केवळ सहा महिन्यांतच त्या पाच शक्तिशाली वीरांनी खांडववनाचं घनदाट अरण्य तोडून टाकलं होतं. त्यातील गगनचुंबी वृक्ष होत्याचे नव्हते केले होते. नेहमी खांद्यावर गदा बाळगणारे राजपुत्र भीम प्रात:काळी खांद्यावर धारदार परशू टाकून अरण्यात गेले की, एक योजन घेरातील सारे अवाढव्य वृक्ष आणि काटेरी लतावेली ते नाहीशा करूनच परत फिरत. पाचांपैकी एकाला आपल्या मातेजवळ आणि पांचालीजवळ रक्षणासाठी ठेवून सकाळीच चार दिशांना चार जात आणि कामाला लागत. त्यांच्या कर्तृत्वानं ज्या धरतीला हजारो वर्षांत कधी सूर्यप्रकाशाचा स्पर्शही झालेला नव्हता, ती आता प्रकाशस्पर्शानं पावन होत होती. खांडववनाचं सपाट पठारात रूपांतर होत होतं.

खांडववनाचं वर्षभरात एका सपाट पठारात रूपांतर होताच द्वारकेहून श्रीकृष्णांनी धाडलेल्या कुशल कारागिरांच्या साहाय्यानं त्यांनी अरण्यातील लाकूडसंपत्तीचा उपयोग करून एक प्रचंड वास्तू बांधण्यास सुरुवात केली! त्या वास्तूसाठी लागणारे प्रचंड पाषाण भीम खांद्यावरून वाहून आणीत होते. कुणाच्याही भिक्षेवर जगायचं नाही, असा पण त्या पाच मानी राजपुत्रांनी केला होता. द्वारकेच्या कल्पक कारागिरांनी आरंभलेली राजवाड्याची वास्तू आकाशाच्या उदरात दिवसागणिक आपलं मस्तक उंचावीत उभी होत होती. अरण्यातले रानटी घोडे पकडून नकुल त्यांना माणसाळवीत होते. त्यांनी एका बळकट लाकडी कुंपणात शेकडो घोडे कोंडून ठेवले होते. पांडवांची क्रमाक्रमानं चाललेली प्रगती हस्तिनापुरात फारशी कुणालाच कळत नव्हती. माझ्या आग्रहासाठी सत्यसेनदादा कधी-कधी खांडववनात जाऊन सर्व माहिती काढून मला ती सांगत होता. त्यातलं एकही अक्षर युवराज दुर्योधनांच्या कानी जाता कामा नये, अशी मी त्याला सूचना केली होती. न जाणो त्यांचा ससेमिरा पांडवांचा पाठपुरावा करीत तिथंही पोहोचावयाचा अशी मला हुरहुर वाटे.

राजमाता कुंतीदेवींच्या आशीर्वादाच्या छायेत पांडव सुखात असावेत, असं मला वाटे.

**

# अठरा

दिवसरात्रीच्या चातकपक्षयांचं जोडपं हर्षविभोर होऊन एकमेकांमागोमाग धावत होतं. वृषसेन दोन वर्षांचा केव्हा झाला ते कळलंही नाही. त्याच्या धावण्याला राजवाडा अपुरा पडू लागला. ''तात, तात'' म्हणत तो अंगराजांच्या अंगावर झेपावू लागला. ते त्याला पटकन उचलून घेत आणि त्याच्या मस्तकाचं दीर्घ अवघ्राण करीत. त्यांच्या पुष्ट दंडावर बसून तो आपल्या टपोऱ्या डोळ्यांनी त्यांच्या कानांतील लयीत डोलणाऱ्या कुंडलांकडे टकमक पाही. क्षणात त्याच्या मनात काय येई कोण जाणे; पण दोन्ही हातांनी जवळचं कुंडलं चापसून तो म्हणे, "ताऽ ताऽ ताऽ!"

माझ्याकडे पाहत ते त्याला म्हणत, ''वृषू, तुला ही कुंडलं आवडली आहेत, पण ती तुला मी देणार नाही. दुरून पर्वत साजरे असतात राजा! यासाठी काय- काय मनस्ताप सहन केलाय मी, हे तुला कसं सांगू?''

त्यांचं म्हणणं जणू पटलंच अशा थाटात तो हातातील कुंडलं झटकन सोडून देऊन माझ्याकडे झेपावे. मी त्याला घेता-घेता म्हणे, ''अजून दोन वर्षांचा नाहीतर त्याला तुमची भाषा आत्ताच कळायला लागलीय. मोठा झाल्यावर तो माझं काहीच ऐकणार नाही!"

''तसं कसं होईल वृषाली? तो कर्णाचा पुत्र आहे. तो मातेला कधीच विसरणार नाही!" ते अभिमानानं म्हणत.

**

# एकोणीस

वृषसेनानं आपल्या आगमनानं जणू राजवाडा गजबजवायचं ठरविलं असावं. त्याच्या शुभसूचक जन्मानंतर राजवाडा अनेक बालबोलांनी भरून गेला. वृषसेन दोन वर्षांचा झाला नाही तोच महाराणी भानुमतींनाही पुत्र झाला. त्याचं नाव लक्ष्मण ठेवण्यात आलं. त्याचं नामाभिधान फारच थाटात झालं. सहजच होतं, कारण तो कुरूंचा भावी राजा होता, महाराज धृतराष्ट्रांचा नातू होता.

लक्ष्मणाच्या जन्मानंतर एक मासानंतर सुप्रियेला एक पुत्र झाला. तो चित्रासारखा रेखीव होता म्हणून त्याचं नाव चित्रसेन ठेवण्यात आलं. चित्रसेनाच्या जन्मानंतर अंगराजांपेक्षाही आतुरतेनं मी सुप्रियेच्या कक्षात गेले. तिच्या शय्येवरच्या अर्भकाकडे मी उत्सुकतेनं पाहिलं... पण त्यालाही कुंडलं नव्हती! अंगराजांच्या कोणत्याही अपत्याला कवच-कुंडलांचं दैवी देणं लाभणार नव्हतं, हे आता निश्चित झालं होतं, पण ते निश्चित झाल्यानंतर ते अधिक गंभीर झाले होते. त्यांना नेमकं काय खटकत होतं ते कुणालाच कळत नव्हतं. कधी-कधी गंगेच्या पात्रात दिवसभर उन्हात सूर्याला अर्घ्य देत ते उभे असत. भोजनाचीही शुद्ध त्यांना नसे. मला त्यांची चिंता वाटू लागली.

माझा पती सामर्थ्यशाली, सुस्वरूप होता. सद्गुणी होता. कोणत्याही स्त्रीनं आपलं जीवनसर्वस्व त्याच्या चरणांवर ओवाळून टाकावं असा अद्वितीय होता... पण त्याच्या मनाचा थांग नीट कुणालाच लागत नव्हता. मी त्यांच्या नित्य सहवासात होते, पण कधी-कधी मला उगाचच वाटे की, आपण एका पुरुषाच्या सहवासात नसून तेजाच्या वलयातच उभ्या आहोत! आणि म्हणूनच त्यांच्यापुढं काही-काही गोष्टी बोलण्याचं धैर्य मला कधीच होत नव्हतं! मागं एकदा युवराज्ञी दुःशलादेवींनी मला विचारलेला एक प्रश्न मी त्यांना सांगितलेला नव्हता. कोणता म्हणून त्यांनी मला बरंच छेडून पाहिलं, पण मी काहीच कळू दिलं नाही.

तो प्रश्न तसा चावट होता. "तुमच्या एकांताला पतीच्या अभेद्य कवचामुळे काहीच बाध येत नाही काय?" दुःशलादेवींनी विचारलेला हा प्रश्न मी माझ्या पतिदेवांना कशी काय सांगू शकणार होते?

**

# वीस

अशाच एका दिवशी, पांडवांनी खांडववनांत एक नगर वसविल्याची वार्ता येऊन थडकली. ती ऐकताच अनेकांना आनंद झाला. त्या नगराचं नाव त्यांनी इंद्रप्रस्थ असं ठेवलं होतं आणि इंद्रप्रस्थ ही खांडवराज्याची राजनगरी आहे, असंही पांडवांनी घोषित केलं होतं. इंद्रप्रस्थात वस्तीला जाण्यासाठी अनेक पांडवप्रेमी नगरजन आपल्या परिवारासह हस्तिनापूर सोडू लागले होते! दिवसेंदिवस इंद्रप्रस्थ गजबजू लागलं. गायक, नर्तक, कुशल कामगार अशा अनेक प्रकारच्या लोकांनी इंद्रप्रस्थ भरू लागलं. ज्या खांडववनात पूर्वी रानटी श्वापदांच्या चित्तथरारक आरोळ्यांशिवाय काहीच ऐकू येत नव्हतं तिथं मानवांची संमिश्र कुजबुज ऐकू येऊ लागली. संगीत आणि नर्तन यांनी तिथला परिसर फुलून गेला. धैर्यशाली, कर्तबगार वीर अरण्यालाही राजनगराची वैभवी छटा आणू शकतात, हे पाहून जसा अनेकांना आनंद झाला होता; तसंच वैषम्यही वाटलं होतं.

हस्तिनापुरात तर सरळ-सरळ दवंडी पिटण्यात आली की, जो कोणी इंद्रप्रस्थात जाईल त्याची शेती, धन, संपत्ती सर्वच त्याच्या अनुपस्थितीत कुरूंच्या राजदंडाच्या अधिकारात येईल. कौरव आणि पांडव ही सरळ-सरळ दोन स्वतंत्र राज्यं वाटावीत असं वातावरण तयार होऊ लागलं! जे घडू नये ते घडत होतं. मत्सराची अभ्रं दोन्ही राज्यांतील राजनगरांभोवती दाटत होती.

पांडवांना राज्याचा सरळ योग्य राज्यभाग दिला गेला असता, तर बरं झालं असतं, असं अनेकांचं स्पष्ट मत दृढ होत होतं. पण सत्ता ही मदिरेसारखी असते. ती ज्याच्या हाती असते त्याला धुंद करते आणि ज्यांच्या हाती ती नसते त्यांना ती वेडी करते! कौरवांचं चुकलं होतं. त्यांचं समर्थन करताच येत नव्हतं. पण पांडवांना राज्याचा भाग मिळाल्यानंतर हे कुरू वंशाचे एकशे पाच वीर एकत्र सुखानं राहू शकले असतेच, असं कुणालाही म्हणता आलं नसतं. त्यांची मनं एकमेकांपासून दूर गेली होती. हस्तिनापुरात आचार्य द्रोण, महामंत्री विदुर, महाराज धृतराष्ट्र, पितामह भीष्म, राजमाता गांधारीदेवी सर्व जण असूनही त्यांना आपल्या वंशजांची मनं नीट पारखता आली नव्हती. प्रत्येक जण सोयिस्करपणे दुसऱ्याला दोष देत होता. हस्तिनापूर म्हणजे तटस्थ प्रेक्षकांची, निष्क्रिय विलासनगरी आहे की काय अशी दाट शंका येत होती!

इंद्रप्रस्थ मात्र वसंतऋतूत पळस फुलावा तसं फुलत होतं!

सहज बोलण्यात नगरजन 'पांडवांचं इंद्रप्रस्थ' म्हणू लागले होते. नुसतं इंद्रप्रस्थ कधीच म्हणत नव्हते! नकळत विणले जाणारे हे धागे मनाभोवती दूरत्वाचं जाळं निर्माण करीत होते. ज्या नगरात एकेकाळी एकशे पाच राजपुत्र एकत्र मानानं मिरवताना पाहिले होते, तिथंच आता ते शंभर आणि पाच असे विभागले गेलेले आहेत असं मानलं जात होतं. रक्तानं एकत्र आलेली मनं कधीच एकमेकांपासून दूर जाऊ नयेत. ती अंती दाहक ठरत असतात!

महाराज, पितामह, महामंत्री, अमात्य कुणीतरी जाणकारानं पुढाकार घेऊन

दोन्ही राज्यांचे संबंध कसे सुधारतील यासाठी प्रयत्न करण्याची आवश्यकता येऊन ठेपली होती, कारण मानवी मन हे अनेक विचारांचं तृण माजलेलं कुरण असतं! त्यावर अपसमाजाचे दवबिंदू नेहमीच मौक्तिकासारखे तळपायला लागतात! पण कुणीच समेटासाठी हालचाल करीत नव्हतं. दिवस प्रकाशाचं लेणं घेऊन उगवत होते, रात्री अंधाराचं देणं देऊन मावळत होत्या. एकमेकांना सीमा भिडलेली दोन राज्यं मनात द्वेषाचा अंगार जागवत कधीच सुखी होऊ शकणार नाहीत, हे मोठमोठ्या राजधुरंधरांनाही काही उमगत नव्हतं.

माझं जीवन सुखी असूनही भोवतीच्या या कुंद वातावरणामुळे ते मला सुखी वाटत नव्हतं.

**

# एकवीस

सौख्याचे दिवस फारच जलद गतीनं निघून जात असावेत किंवा मन सौख्यात गुंतलं असल्यामुळे त्याला कालाचं भानच राहत नसावं. वृषसेनापाठोपाठ लक्ष्मण आणि चित्रसेन झपाट्यानं वाढत होते. मोठी झाली तरी आपली अपत्यं मातापित्यांना नेहमीच लहान वाटतात. वृषसेन सहा वर्षांचा झाला. अखंड बडबड आणि अविरत धडपड हाच त्याचा स्वभाव होता. अनेक शंका आणि प्रश्न यांनी तो वाड्यातील सर्वांना सतावून सोडी. तो जरा अंगराजांनाच भीत असे. राजसभा, युद्धशास्त्र, मृगया यांतून उरलेला सर्व काळ अंगराज वृषसेनासमवेत घालवीत. त्याच्याशी बोलताना ते बालाहून बाल होत. अनेक वेळा तो त्यांना अतिशय आश्चर्यकारक प्रश्न विचारी.

एकदा तो त्यांना म्हणाला, ‘‘तात, तुम्ही फारच अप्पलपोटे आहात!’’

‘‘ते कसं काय वृषू? मला तर सर्व हस्तिनापूर उदार म्हणतंय!’’ त्याच्या मस्तकावरून मायेनं हात फिरवीत ते हसत म्हणाले.

‘‘नाही. तुम्ही अप्पलपोटेच आहात! नाहीतर तुम्ही आम्हालाही तुमच्यासारखी सुंदर कुंडलं आणली असतीत!’’

‘‘कुंडलं अशी जर सहज मिळत असती, तर ती प्रत्येकानं घेतली असती राजा! तुला आवडणारी ही कुंडलं कापून काढता आली असती तर मी ती तुला लगेच देऊनही टाकली असती! मलाही आता ती नकोशी झालीत!’’

‘‘तुम्हाला स्वत:ला कशी ती कापता येतील? दुसऱ्या कुणालातरी कापता येतील. तुम्ही दोन हातांनी कान आणि खड्ग धरणार तरी कसं?’’

‘‘तू बघ तुला जमतंय का ते?’’

‘‘जमेल, पण रक्त आलं तर? आई मारील की मला!’’

‘‘नाही रे! ती इथं येण्यापूर्वीच तू कुंडलं घेऊन टाक. रक्त येणार नाही आणि आलं तरी मी रडणार नाही, तिला सांगणार नाही!’’

आपल्या पित्यासारखाच हट्टी असलेला तो लगेच शस्त्रागारात धावत गेला आणि शस्त्रागारपालाकडून एक छोटं खड्ग घेऊन ते हातात नाचवीत परतलाही. अंगराजांच्या मांडीवर बसून त्यानं त्यांचं एक मांसल कुंडल आपल्या चिमुकल्या हातात चिमटीत पकडलं! पण तसाच क्षणभर तो थांबून म्हणाला, ‘‘तात, मी काही तुमच्यासारखा अप्पलपोटा नाही! मी... मी एकच कुंडल घेईन! एक मला, एक तुम्हाला!!’’ असं म्हणत त्यानं खड्ग सावरलं.

‘‘ठीक आहे. तुझ्या वाटणीचं तू घेऊन टाक. आटप लवकर.’’ त्यांनी त्याला अनुज्ञा दिली. आपले डोळे मोठे करून तो काय-काय करतो ते कुतूहलानं ते पाहू लागले.

इतक्यात मी तिथं गेले.

आपल्या चिमुकल्या दातांनी खालचा ओठ आवेशानं दाबून तो हातातील खड्गाचं धारदार पातं त्यांच्या कानावरून सरासर फिरवीत होता! पण खड्ग गवताच्या पात्यासारखं त्यांच्या कानावरून नुसतंच फिरत होतं. बराच काल त्यानं प्रयत्न करून

पाहिला! आम्ही दोघं त्याच्या चिकाटीवर हसत होतो. शेवटी तो दमला! त्याच्या थिटुकल्या मस्तकावर घामाचे बिंदू उभे राहिले! खड्गही त्याला पेलवेना. ते हातातून फेकून तो त्यांच्या मांडीवरून खाली उतरला.

त्यांनी विचारलं, "काय रे वृषू, काय झालं?"

त्यानं जे उत्तर दिलं ते इतकं अनपेक्षित होतं की, त्या दिवशी मला प्रथमच कळलं की, तो भलताच धोरणी आहे. आपला पराभव यत्किंचितही मान्य न करता तो बालिशपणानं सहज म्हणाला, "काही नाही तात, मला तुमचं कुंडलच नको!"

"का रे?"

"कशाला ते? तुमचे कान केवढे आणि माझे केवढेसे! माझ्या कानात ते मोठं नाही का दिसणार?"

त्याच्या उत्तरावर खूश होऊन अंगराजांनी त्याचा हात धरून त्याला झटकन परत आपल्याकडे ओढलं आणि कुंडलं नसलेल्या त्याच्या कानाचे पटापट मुके घेत ते पुटपुटले, "तुला कुंडलं नाहीत तेच ठीक आहे! त्यांच्यामुळे माझं काय कल्याण होणार ते माझं मलाच समजलेलं नाही राजा!"

वृषसेनाच्या बाललीलांत आमचे दिवस गोफणगुंडा शेतात पडल्यावर पाखरं उडून जातात तसे, भर्रकन निघून जात होते. राहत होत्या त्या काही प्रसंगांच्या स्मृती.

सूर्यास्तानंतर रेंगाळणाऱ्या धूसर अस्पष्ट संधिप्रकाशासारख्या!

**

# बावीस

अंगराजांसमवेत कधी-कधी गुरुपुत्र अश्वत्थामा दुग्धपानासाठी कक्षावर येत. त्यांची आणि वृषसेनाची आता छान गट्टी जमली होती. कुणापुढंही हार न खाणारे गुरुपुत्र त्याच्यापुढं मात्र कान पकडून सरळ शरणागती पत्करीत.

एकदा ते असेच कक्षावर आले होते. मी फळांनी भरलेलं एक तबक मृणालकडून बैठकीवर पाठवलं. हळूच त्यातील एक अंजिराचं फळ गुरुपुत्र अश्वत्थाम्यांनी उचललं. ते त्यांनी हळुवार कापलं. पण त्याच्याकडे गंभीरपणं नुसतं पाहतच राहिले. तसं अंगराज म्हणाले, ''काय झालं अश्वत्थामन्?''

''अंगराज, या वरून सुंदर; दिसणाऱ्या फळात एक कृमी आहे! आपलं जीवनही असंच नाही का? वरून सुंदर पण आतून किडलेलं!''

''अश्वत्थाम्या, त्यात या फळाचा काय दोष?''

''दोष कुणाचा हे काहीच सांगता येत नाही, पण वास्तवात जीवन दिसतं तसं नसतं हे मात्र खरं! हे फळच बघ की, बाहेरून किती चांगलं दिसतंय!''

अंगराज त्यावर काहीच बोलले नाहीत. मात्र त्या दोघांचा संवाद ऐकणारा वृषसेन हळूच आपल्या बैठकीवरून उठल्याचं मी पाहिलं. तो तेथून उठला तो सरळ अनेक सोपान उतरून राजवाड्यासमोरचा चौक पार करून पुढं महाद्वारातून प्राकाराच्याही बाहेर गेला. हा जातोय तरी कुठं? मी मृणालला त्याच्या शोधार्थ त्याच्यामागून पाठविणार होते, पण तेवढ्यात तो परतलाही. सशासारख्या पटापट उड्या मारीत तो येत होता. परत येताच तो अंगराज आणि गुरुपुत्रांच्या पुढं धीटपणं उभा राहून आपली मूठ उघडी करीत तो म्हणाला,

''काका, यात असेल का हो कृमी?'' तो एक पाषाणाचा तुकडा होता!

त्याचा तो अद्भुत प्रश्न ऐकून गुरुपुत्र मात्र क्षणभर परत गंभीर झाले! अंगराजांकडे पाहत ते म्हणाले, ''अंगराज, खरंच, मघाच्या माझ्या प्रश्नाचं उत्तर तुझ्या पुत्रानं किती सहजपणे अचूक दिलं आहे!'' तो पाषाणाचा तुकडा वृषसेनाच्या हातातून घेऊन ते त्याकडे निरखून पाहत म्हणाले, ''या निर्जीव पाषाणात कुठली आहे कृमी! कृमी फळातच असणार! दोष... दोष हे सजीवातच असणार! फळातील जीवनरसावर कृमी जगते. मोठी होते. तरीही फळाला स्वत:ला ती कधीच बाहेर काढून टाकता येत नाही! माणसांचे दोषही तसेच! अज्ञानाच्या जीवनरसावर मानवातील दोष पोसले जातात! मोठे होतात.''

वृषसेनाची पाठ थोपटीत ते म्हणाले, ''वृषसेना, हा तुकडा गवाक्षातून खाली टाक आणि हा अंजीर तोंडात टाक!'' त्यांनी त्याच्या डाव्या हातात त्यानं आणलेला तुकडा आणि उजव्या हातात तबकातील एक दुसरा सबंध अंजीर ठेवला. वृषसेनानं तुकडा गवाक्षातून खाली फेकला. अंजीर खाता-खाताच वृषसेनानं गुरुपुत्रांना आणखी एक धक्का दिला. वस्त्राच्छादित अशा त्यांच्या मस्तकाकडे पाहत तो म्हणाला, ''काका, मीही तुमच्यासारखंच वस्त्र बांधणार माझ्या मस्तकाभोवती!''

“का बुवा? तू तर अंगराजपुत्र आहेस, तू सुवर्णकिरीट धारण करायचा. वस्त्र नव्हे.” गुरुपुत्रांनी त्याला विचारलं.

“नाही. सुवर्णकिरिटाचा काय उपयोग? त्याचा काय ध्वज करता येतोय थोडाच?”

“ध्वज? आणि ध्वजासाठी तू असलं वस्त्र मस्तकाभोवती बांधणार?”

“होय! लढाईत रथावरचे ध्वज कोसळतात असं मोठे तात म्हणतात! असा ध्वज कोसळला की, तिथं दुसरा कुठला लगेच मिळणार?”

त्याचं उत्तर ऐकून आम्ही सर्व जण हसलो, पण आम्ही का हसतो आहोत हे त्या निरागस बालकाला कळलं नाही.

**

# तेवीस

वृषसेन सात वर्षांचा झाला त्या वेळी मला आणखी एक पुत्र झाला. सुप्रियेलाही त्याच वेळी आणखी एक पुत्र झाला. माझ्या मुलाचं नाव सुषेण ठेवण्यात आलं. सुप्रियेच्या मुलाचं नाव सुशर्मा ठेवण्यात आलं. आमचे सासूसासरे त्यांच्या दर्शनानं आनंदून गेले. त्यांनी घेतलेल्या जीवनभराच्या अपरिमित कष्टांचं सार्थक झालं होतं. त्यांनी लावलेल्या कुटुंब-रोपटयाचं विशाल वटवृक्षात रूपांतर होत होतं. मला ते नेहमी म्हणत, “वृषाली, तू गृहलक्ष्मी आहेस. तू आलीस ते सुखाचे पर्वत घेऊनच! आम्ही स्वप्नातसुद्धा अपेक्षिलं नव्हतं ते घडत आहे.”

त्यांचे पाय चेपता-चेपता मी म्हणे, “माझ्यामुळे काहीच घडलं नाही! अंगराजांसाठी आपण जे कष्ट घेतलेत त्याचंच हे फळ आहे.”

“त्याच्यासाठी आम्ही कसले कष्ट घेतले? आमच्या पर्णकुटीत तो जन्माला आला हेच आमचं भाग्य! तू त्याला पत्नी म्हणून लाभलीस हेही आमचं महत्भाग्य आहे. सर्वांचेच ऋणानुबंध आहेत हे मुली.”

सासूबाईंच्या मांडीवर असलेला सुषेण त्याच वेळी नेमका हुंकार भरून जणू आपणही त्या ऋणानुबंधातला एक घटक आहोत याची सर्वांना आठवण करून देई! त्या त्याला थोपटून निजविताना काहीतरी गुणगुणत. मी त्यांना ते गीत मोठ्यानं म्हणण्यासाठी विनवी. तेव्हा त्या म्हणत, “वसू या सुषेणाएवढा असताना मी ते म्हणत असे, आता नीटसं आठवत नाही गं! आणि चंपानगरीच्या पर्णकुटीतलं ते गीत या वैभवी वाड्यावर कशाला? तूच आता तुझ्या पुत्राला या वाड्याला शोभेल असं गीत ऐकव.” निद्रावश झालेल्या सुषेणाला माझ्या हाती देताना त्या म्हणत.

त्या मातेनं आपल्या पुत्रासाठी कष्टांचे किती अगणित पर्वत उपसले असतील या जाणिवेनं त्यांच्यापुढं मी काहीच नाही, असं मला होऊन जाई.

**

# चोवीस

सुषेणापाठोपाठ एका वर्षातच मला वृषकेतु झाला. मी तीन मुलांची माता झाले! त्या तिघांच्या आगमनानं माझ्या जीवनाचं उद्यान फुलून गेलं. वृषसेन, सुषेण आणि वृषकेतु ही त्या उद्यानातील तीन सुवर्णकमळंच होती. माझ्याशी कुठंच कमी पडायचं नाही म्हणूनच की काय सुप्रियेनंही आणखी दोन सुंदर पुत्रांना जन्म दिला. त्यांची नावं प्रसेन आणि भानुसेन अशी ठेवण्यात आली. चित्रसेन, सुशर्मा, प्रसेन व भानुसेन ही सुप्रियेची चार मुलं आपल्या मातेसारखीच सुंदर होती. महत्त्वाचं म्हणजे आम्हा दोघींनाही एकसुद्धा कन्या झाली नाही! मला नेहमी वाटे, अंगराजांच्या या सात पुत्रांना एक तरी भगिनी असती, तर किती बरं झालं असतं! ती उणीव मात्र शोणभावोजींनी भरून काढली होती! मला वृषकेतु झाला त्या वेळीच त्यांना एक कन्या झाली. तिचे डोळे मासा जसा आकारानं लांबट असतो तसे असल्यामुळे सर्वांनीच तिचं नाव मीनाक्षी असं सुचविलं. मीनाक्षी मेघमालेसारखी केतकीच्या वर्णाची गोड मुलगी होती. ती कधीच रडत नसे. अंगराजांना आपल्या स्वत:च्या पुत्रापेक्षाही तिचाच लळा अधिक लागला.

तिला आपल्या बळकट बाहूंवर घेऊन मजजवळ येत म्हणत, "वृषाली, तुझ्या सौंदर्याचा तुला भलताच अभिमान आहे नाही? ही मीनाक्षी जेव्हा तुझ्याएवढी होईल तेव्हा दुर्योधनाचा पुत्र लक्ष्मणही हिला मागणी घालील! तू अंगराज्ञी आहेस, ही कौरवराज्ञी होईल!"

"काही घडो; पण तेवढं मात्र होऊ नये!" मी म्हणे.

"का?"

"अहो, ती कुरूंची महाराणी झाली, तर उद्या तुम्हालाही तिला वंदन नाही का करावं लागणार?"

"आपल्या पतीनं कुणापुढंही आपली मान नमवू नये. निदान आपल्या आप्तेष्टांपुढं तरी कधीच नमवू नये अशी तुझी अपेक्षा आहे म्हण की?"

ते इतर कुणाशीही वाद घालीत नसत, पण मला मात्र नेहमीच उलट-सुलट प्रश्न विचारीत. शेवटी मग मी मौन धारण करी. मौन हे सर्व काही साधून देतं असं म्हणतात.

मीनाक्षीशी ते घटकान्‌घटका खेळत बसत. त्यांना तिच्याशी खेळताना पाहून जीवनातला दीड तपाचा काल कसा आणि कुठं निघून गेला, याचा वेध घेण्याचा मी प्रयत्न करी, पण हाती काहीच येत नसे.

या दीर्घ कालात मी हस्तिनापुरात होते की स्वर्गात असाच मला संभ्रम झाला होता. नाही म्हणायला वादळी वाऱ्यासारखी सुदामनची स्मृती मला कधी-कधी अस्वस्थ करून टाकी. आता असता तर तो चांगला पंचवीस वर्षांचा झाला असता. मला वंदन करून व्यायामशालेत जाताना तो म्हणाला असता, "माते, माझ्या बाहुकंटकाला व्यायामशालेतील सर्वच शिष्य घाबरतात." पण –

पण त्याच्या अशा धूसर स्मृतीशिवाय आता मजजवळ त्याचं असं दुसरं काहीच

नव्हतं.

**

# पंचवीस

राजवाड्यात आणखीही नवीन माणसं आली होती. पितामह भीष्मांनी कुरूंच्या शंभर राजकुमारांचे देशोदेशींच्या शंभर राजकन्यांशी विवाह घडवून आणले होते. मधाचं पोळं मधमाश्यांनी गजबजून जातं, तसा राजस्त्रियांनी राजवाडा गजबजून गेला होता. कुरूंचं वैभवाचं शिखर हिमालयाशी स्पर्धा करू लागलं. शंभर राजकुमारांचा हा संसार थाटलेला पाहण्याचा रोमांचकारी योग त्या राजवाड्याच्या जीवनात पहिल्या प्रथमच आला होता! मला मात्र सभोवतीची ती शृंगारिक कुजबुज ऐकली की, पांडवांची स्मृती होई! कौरव व पांडव यांच्यात असलेला एक मोठा फरक मला नित्य जाणवत असे. कौरवांच्या प्रत्येक राजपुत्राला एक-एक पत्नी होती, तर पाचही पांडवांना मिळून एकच पत्नी होती! कौरवांच्या भगिनीचा - राजकन्या दु:शलादेवींचा सिंधुराज जयद्रथाशी विवाह झाला होता.

मला आश्चर्य वाटे ते पितामह भीष्मांचं! ते पराक्रमी होते, वृद्ध होते, त्यांचा सर्वांवर वचक होता, सर्वांना त्यांच्याबद्दल आदरयुक्त भीती होती. पांडवांविषयी मात्र ते फारच उदासीन वाटत! ते कधीही खांडववनाचं इंद्रप्रस्थात रूपांतर करणाऱ्या पांडवांना भेटायला गेले नाहीत! त्यांच्यावर होणाऱ्या अन्यायाबद्दल कळवळून बोलले नाहीत! युवराज दुर्योधनांच्या पांडवद्वेषाला त्यांनी पुढाकार घेऊन स्वत: कधी आळा घातला नाही. राजमाता कुंतीदेवींना त्यांच्या या पडत्या काळातही त्यांनी मदतीचा हात दिला नाही. हे काहीतरीच घडत होतं. घडणारं सर्वच ते तटस्थपणे पाहत होते!

पांडवांचं इंद्रप्रस्थ राज्य आता भरभराटीला आलं होतं. त्यांचं इंद्रप्रस्थातलं राज्य म्हणजे खडकावर कोंब फुटून आकाशात झेप घेणाऱ्या अशोक वृक्षासारखं एक महान आश्चर्यच होतं! दिवसेंदिवस तो वृक्ष वाढतच होता. आसपासच्या राज्यांतले मल्ल, योद्धे, कुशल कामगार, गायक, नर्तक, गज व अश्वपारखी आणि कृषिजन आता इंद्रप्रस्थात दाटी करू लागले. हस्तिनापूर हे पूर्वजांच्या पराक्रमाचं पूर्वापार राज्य होतं. इंद्रप्रस्थ हे मात्र केवळ पांडवांच्या स्वकर्तृत्वाचं राज्य होतं.

**

# सव्वीस

लहान मुलं खेळायला जातात तसे दिवस, महिने, ऋतू आणि वर्षं एकमेकांच्या हातात हात गुंफून धावत होते. मला त्यांची गणती करायला अवसरच सापडत नव्हता. माझ्या आणि सुप्रियेच्या मुलांचा सांभाळ करण्यात माझा कितीतरी काल निघून जाई. मी एक सारथिकन्या आहे, याचा मला विसर पडावा इतकी एकामागून एक सौख्यं माझ्या सेवेसाठी धावून आली होती. राजवाड्यावरचे सर्व कौरवयोद्धे अंगराज्ञी म्हणून माझा आदरानं सन्मान करीत होते. तरीही एक गोष्ट मला मधूनच अस्वस्थ करीत होती. माझा सत्यसेनदादा अजून अविवाहित होता. माझ्यापेक्षा वयानं तो मोठा असल्यामुळे मी त्याला या विषयात समक्ष काहीच बोलू - विचारू - शकत नव्हते. अंगराजांनाही मी त्याच्या लग्नाविषयी काही सुचविलं नव्हतं, कारण आपल्या भावासाठी मी त्यांच्याजवळ काही मागणी हे मलाच पटत नव्हतं! आपल्या छोट्या बहिणीनं आपल्या लग्नासाठी केले हे ऐकून दादालाही त्याचा खेदच झाला असता. माझ्याभोवती जी-जी माणसं होती त्या-त्या प्रत्येक माणसाचा स्वभाव कसकसल्या कणखर लोहपेशींचा होता ते मला पूर्ण माहीत होतं. माझं मन मात्र सांगत होतं की, एक दिवस अंगराजच आपणहून दादाच्या विवाहाचा विषय काढतील.

आणि तसं घडलही. एक दिवस ते माझ्या हातात मंगलाक्षता देत म्हणाले, ''ओळख पाहू या कुणाच्या मंगलाक्षता आहेत?''

''दोन आकडा अशुभ वाटतो म्हणून आपण तिसरं लग्न करणार असाल!'' मी विनोदानं म्हणाले.

''नाही. माझं तिसरं लग्न तर केव्हाच झालं आहे!'' ते तेवढ्याच सहजपणानं म्हणाले. ते ऐकून माझ्या काळजात क्षणकाल खळबळ माजली. मी घाबरून विचारलं, ''तिसरं लग्न? आणि ते कुणाशी?''

''हे बघ वृषाली, तू माझी दुसरी पत्नी आहेस! सुप्रिया तिसरी!''

''मग पहिली भाग्यवान कोण?'' माझा ऊर धडधडू लागला.

''धनुर्विद्या!'' ते खळसळून हसत म्हणाले! नंतर माझ्या हातातील अक्षतांकडे अंगुली करीत ते म्हणाले, ''त्या अक्षता माझ्यासाठी नाहीत! त्या तुझ्या सत्यसेनदादासाठी आहेत. वृषाली, शोणाच्या विवाहासाठी अहोरात्र मला सतावणारी तू, आपल्या भावाच्या विवाहाबद्दल कधीच चुकूनसुद्धा कसं काय बोलली नाहीस ते?''

''कारण मी अंगराज्ञी तर आहेच तशी एका मानी भावाची मानिनी भगिनी पण आहे!''

माझ्याजवळ येऊन माझा हात हातात घेऊन ते म्हणाले, ''वृषाली, सुप्रिया तुझ्यापेक्षा देखणी आहे, पण तुझ्यासारखं समर्पक बोलणं तिला कधीच जमत नाही. कुठं शिकलीस गं हे?''

''आपण धनुर्वेद कुणाकडून शिकलात?''

''माझ्या गुरूंकडून!''

“काय नाव त्यांचं?”

“नाव नाही सांगता येणार!”

“मग मलाही माझ्या गुरूचं नाव नाही सांगता येणार!”

“बघ. परत तुझी समर्पक उत्तरं सुरू झाली!”

मी हातातील अक्षतांकडे पाहत गप्प बसले. त्या प्रत्येक अक्षतेवर मला मुंडावळ बांधलेला सत्यसेनदादा दिसत होता! आपल्या छोटया भगिनीसाठी त्या विशाल मनाच्या भावानं कष्टांचे पर्वत उपसले होते. नावाप्रमाणंच सत्यासाठी तो झटत आला होता.

पुरोहितानं शोधून काढलेल्या मंगलदिनी मोठ्या थाटात माझ्या दादाचा विवाह हस्तिनापुरातील एक सारथिकन्येशी झाला. दादा, कौरवराज दुर्योधनाचा सारथी असल्यामुळे त्याच्या विवाहात वैभवाला कुठंच कमतरता नव्हती. त्याच्या अर्धांगीचं नाव होतं पुष्पावती!

त्या विवाहानंतर एक मासानंतरच युवराज दुर्योधनांना एक कन्या झाली. नगरात सगळीकडे पणत्यांची रोषणाई करून आपल्या राजकन्येचं नगरजनांनी स्वागत केलं. पुरोहितांनी तिचं नाव सुदर्शना सुचविलं. सुदर्शना सुंदर होती.

राजवाडयावर राजकुमार लक्ष्मण, राजकन्या सुदर्शना, माझे आणि सुप्रियेचे पुत्र, मीनाक्षी असे कितीतरी बाल जीव उद्यानातल्या फुलझाडांप्रमाणं आनंदात वाढू लागले. त्यांच्या बाललीलांना राजवाडाही अपुरा पडू लागला. स्वर्गातले देवगण हस्तिनापूरचा हेवा तर करणार नाहीत ना? अशी शंका माझ्या मनात कधी-कधी स्पर्शून जाई!

**

# सत्तावीस

मधून-मधून कानांवर पडणाऱ्या इंद्रप्रस्थाच्या वार्ता पांडवांबद्दल सर्वांमध्येच कुतूहल निर्माण करू लागल्या. त्यांनी खांडववनात स्वतंत्र राज्य स्थापन करून इंद्रप्रस्थाला त्या राज्याची राजनगरी करून टाकलं. राजधानीच्या नावावरून त्या राज्याला शेजारची राज्य इंद्रप्रस्थ राज्यच म्हणू लागली होती. हस्तिनापुरापेक्षा इंद्रप्रस्थाची कीर्तिदुंदुभी सगळीकडे निनादत होती.

राज्यं ही काही केवळ भव्य वास्तू आणि विपुल नागरिक यांवरच चालत नसतात! ती चालण्यासाठी संपत्तीची आवश्यकता असते. पांडवांनी अशी संपत्ती कधी आणि कुठून उभारली, याबाबत हस्तिनापुरातील सर्वांनाच उत्सुकता होती.

भीमार्जुनांनी आपलं राज्य समृद्ध करण्यासाठी सतत शेजारची राज्यं पादाक्रांत करण्याचा धावता विक्रम मांडला होता. पराभूत राज्यं त्यांना खंडणी देऊ लागली आणि त्यांचं इंद्रप्रस्थ संपन्न होऊ लागलं. सैन्याची संख्या वाढू लागली.

आणि असाच एक दिवस पांडवांचा राजदूत अचानकपणे हस्तिनापूरला येऊन थडकला! तो पांडवांकडून राजसूय यज्ञाचं भूर्जपत्रावर आमंत्रण घेऊन आला होता! वासंतिक पौर्णिमेला पांडव एका प्रचंड यज्ञाचा प्रारंभ करणार होते. त्या यज्ञाला पितामह भीष्मांचे शुभाशीर्वाद लाभावेत, अशी त्यांची इच्छा होती. या आमंत्रणापाठोपाठ पांडवांचे पुरोहित धौम्य ऋषीही स्वत: हस्तिनापुराला येऊन निमंत्रणाबाबत आग्रह करून गेले.

स्वत: युवराज युधिष्ठिर देशोदेशी पाच सुवर्णकुंभ घेऊन फिरून आले. त्या कुंभांतून त्यांनी वितस्ता, पुरुष्णी, गंगा, यमुना, सिंधू, मंदाकिनी, अलकनंदा, इरावती, शरयू, चर्मण्वती, लोहिता अशा अनेक पवित्र नद्यांचं जल इंद्रप्रस्थात आणलं. पांडवांच्या इंद्रप्रस्थातून - राजवाड्यासमोरूनच वाहणाऱ्या इक्षुमती नदीच्या जलात हे पवित्र जल मिसळून यज्ञासाठी इक्षुमतीचं जल वापरलं जाणार होतं. इंद्रप्रस्थ इक्षुमती आणि यमुनेच्या संगमावर होतं.

राजवाड्यासमोर इक्षुमतीच्या दुसऱ्या किनाऱ्यावर भव्य पटांगणात यज्ञमंडप उभारला होता. भोवती निमंत्रितांसाठी विश्रामगृहं आणि भोजनागारंही तयार ठेवण्यात आली होती. ह्या सर्व वार्ता हस्तिनापुरात येऊन थडकत होत्या.

पांडुपुत्र अर्जुन आणि भीम देशोदेशी आपल्या यज्ञाची आमंत्रणं देण्यासाठी फिरू लागले होते. सर्वत्र यज्ञाचीच चर्चा सुरू झाली होती. माझंही कुतूहल वाढलं. इंद्रप्रस्थ कसं काय वसविलं आहे, ते एकदा तरी पाहून यावं असं मला वाटे, पण ते शक्य नव्हतं. योग्यही नव्हतं!

या दीर्घ कालखंडात पांडवांनी चारी दिशांना दिग्विजय केले होते. अमाप संपत्ती गाड्यागाड्यांनी आणून त्यांनी ती इंद्रप्रस्थाच्या भांडारात भरली होती. कक्षात पांडवांविषयी चर्चा चाले ती ऐकून मला ही सारी माहिती कळली होती. त्यांनी दिग्विजयात दोनच राज्यांवर आघात केले नव्हते. एक मथुरा आणि दुसरं हस्तिनापूर!

तसं काही ते आम्हाला इंद्रप्रस्थाचं पहिलंच निमंत्रण नव्हतं! द्रौपदीला पाच पतींपासून पाच पुत्र झाले होते. त्या प्रत्येकाच्या नामाभिकरणासाठीही मला राजमाता कुंतीदेवींकडून आवर्जून आमंत्रणं आली होती, पण अंगराजांना आवडणार नाही म्हणून मी प्रत्येक वेळी काहीतरी निमित्त सांगून इंद्रप्रस्थाला जायचं टाळलं होतं! पण त्या प्रत्येक राजपुत्राचं नाव काय ठेवण्यात आलं, याची मात्र मी कसून विचारणा केली होती. द्रौपदीला युवराज युधिष्ठिरांपासून प्रतिविंध्य, भीमसेनांपासून सुतसोम, अर्जुनांपासून श्रुतकीर्ती, नकुलांपासून शतानिक आणि सहदेवांपासून श्रुतकर्मा असे पाच देखणे पुत्र झाले होते, पण ह्या सर्वांहून आम्हाला एक प्रकारचं वेगळं असं वर्णन ऐकविण्यात आलं होतं ते अभिमन्यूचं!

अभिमन्यू हा श्रीकृष्णाच्या सुभद्रा नावाच्या भगिनीचा अर्जुनपुत्र होता. आपल्या मामासारखाच तो नीलवर्णी आणि बांधेसूद होता. पांडवांनी आपल्या सोयीसाठी केलेल्या वैवाहिक आयुष्यातील एका नियमाचा पांडुपुत्र अर्जुनांनी अनवधानानं भंग केल्यामुळं त्यांना बारा वर्षांच्या दीर्घ वनवासावर जाण्याचा प्रसंग आला. या वनवासाच्या कालातच त्यांनी रैवतक पर्वतावर राहून द्वारकेतून श्रीकृष्णाच्या भगिनीचं हरण केलं होतं. वनवासानंतर पांडुपुत्र अर्जुन इंद्रप्रस्थाला परतले ते सुभद्रा आणि अभिमन्यू यांना घेऊनच. मला मात्र एका योगायोगाचं नेहमी आश्चर्य वाटे. माझं नाव वृषाली होतं, अर्जुनाच्या पत्नीचं नाव पांचाली! माझी सवत सुप्रिया होती आणि पांचालीची सवत सुभद्रा! या नावांत कुठंतरी आणि काहीतरी गूढ साम्य खासच होतं!

राजसूय यज्ञासाठी पांडवांची सर्व माणसं अविश्रांतपणं खपत होती. धौम्य ऋषींनी स्वत: माझी भेट घेऊन, राजमाता कुंतीदेवींनी आम्हाला पाचारण केल्याचं सांगितलं, पण त्यांचं ते निमंत्रण अंगराजांना सांगायचं नाही असं मी ठरविलं, कारण त्यांना ते आवडलं असतंच असं नाही. सुदामनला वधून अर्जुनांनी आम्हा दोघांचाही घोर अपराध केला होता.

धौम्य ऋषींनी बोलण्याच्या ओघात आणखी एक-दोन अतिशय महत्त्वाच्या गोष्टी सांगून टाकल्या... खांडववनाचं अरण्य दहन करताना अग्नीचं आणि अर्जुनाचं दारुण युद्ध झालं होतं. या युद्धात संतुष्ट होऊन अग्नीनं अर्जुनांना गांडीव नावाचं धनुष्य आणि दोन अक्षय्य बाण असलेले भाते दिले होते आणि जरासंधाच्या मगध राज्यातून नुकत्याच परतलेल्या राजपुत्र भीमसेनांनी जरासंधाला वधून राक्षसराज वृषपर्व्याकडून एक दिव्य गदाही मिळवली होती. अर्जुनानं तर त्या दिव्य धनुष्याच्या आधारावरच दिग्विजयाचं पुढचं काम पुरं केलं होतं.

इंद्रप्रस्थाच्या या सर्व वार्ता त्या राज्याविषयी कुतूहल निर्माण करीत होत्या. एका निबिड अरण्याचं हे अशा समृद्ध राज्यात असं रूपांतर व्हावं, याचं सर्वांनाच महान आश्चर्य वाटत होतं!

**

# अठ्ठावीस

हस्तिनापूरच्या मगध देशातील गुप्तहेरानं मध्येच एक अविश्वसनीय वार्ता आणून राजवाडयावरच्या सर्वांनाच धक्का दिला. ती वार्ता ऐकताच अंगराज तर फारच अस्वस्थ झाले. ज्या वेळी एका दासानं येऊन त्यांना ही वार्ता सांगितली त्या वेळी ते वृषसेनाला द्वंद्व शिकवीत होते. आणि त्याला बाहुकंटकाचा अवघड डाव समजावून देत होते.

वार्ता घेऊन येणारा दास मगधांच्या राजाच्या वधाची वार्ता घेऊनच आला होता! ती ऐकताच वृषसेनाला तसाच सोडून अंगराज त्या दासाजवळ गेले आणि त्याचे खांदे धरून गदागदा हलवीत त्यांनी त्याला विचारलं, ‘‘त्या विख्यात जरासंधाला कुणी मारलं? बोल, कुणी?’’

‘‘पांडुपुत्र भीमांनी!’’ त्यानं बावरून उत्तर दिलं.

‘‘एकटयानं? शक्य नाही ते!’’

‘‘त्या वेळी भगवान श्रीकृष्णही तिथं उपस्थित होते!’’

त्याचं उत्तर ऐकताच अंगराज स्तब्ध झाले. दास निघून गेला. पाठीवर हातांची गुंफण टाकून कसल्यातरी विचारात गढल्यासारखे ते इकडून तिकडे फेऱ्या घालू लागले.

मी वृषसेनाला विचारलं, ‘‘वृषू, तातांनी शिकविलेला डाव त्यांना करून दाखवशील काय?’’

‘‘तात काय माझ्याएवढे आहेत? चित्रसेनाला नाहीतर लक्ष्मणाला आण माझ्यासमोर. मग मी त्याला माझा बाहुटंकट दाखवितो.’’

त्याला बाहुकंटक म्हणता येत नव्हतं!

मला वाटलं, अंगराज कौतुकानं त्याला वर उचलून घेतील आणि ‘बाहुटंकट नव्हे वेडया, बाहुकंटक’ असं म्हणत त्याच्या मस्तकाचं अवघ्राण करतील; पण ते आपल्याच चिंतनात मग्न होते. जरासंधाच्या वधानं त्यांना काहीतरी खटकलं होतं खास!

‘‘एवढा कसला विचार चाललाय?’’ मी त्यांना भानावर आणण्यासाठी म्हणाले.

ते एकदम थांबून म्हणाले, ‘‘श्रीकृष्णाचा!’’

‘‘तो कशासाठी?’’

‘‘शेवटी श्रीकृष्णानं जरासंधाचा वध केला म्हणून.’’

‘‘आपण वार्ता नीट ऐकली नसावी! जरासंधाचा वध श्रीकृष्णानं केला नाही. त्या वधाचं कृष्णाला काय प्रयोजन? भीमांनी मारलं आहे त्याला!’’

‘‘प्रयोजन श्रीकृष्णालाच होतं! ज्या कंसाचा श्रीकृष्णानं वध केला तो कंस जरासंधाचा जामात होता. आपल्या जामाताच्या वधाचा सूड घेण्यासाठी जरासंधानं चतुरंग सैन्यानिशी मथुरेवर अनेक वेळा चढाया केल्या. त्याच्या चढायांना कंटाळून श्रीकृष्णाला शेवटी-शेवटी मथुरा सोडून पळून जावं लागलं. पार पश्चिमेकडे - द्वारकेला! म्हणूनच त्यानं जरासंधाचा अंत केला असावा. इंद्रप्रस्थाचा राजसूय यज्ञ हा त्या मथुरामुक्तीच्या आनंदासाठीच असावा! मला त्या यज्ञाचं आमंत्रण नाही वृषाली, पण

तरीही मी इंद्रप्रस्थाला जाणार आहे!"

त्यांचा आमंत्रणाशिवाय जाण्याचा निर्णय मला जरा विचित्रच वाटला; परंतु मी काहीच बोलले नाही. मुखातून बाहेर आलेला शब्द मग तो निद्रेतला असला तरी सत्य करून दाखविणारा त्यांचा निश्चयी स्वभाव मला माहीत होता!

''जरासंधाचा शेवट करणाऱ्या श्रीकृष्णाला भेटण्याची उत्सुकता असेल तुम्हाला!''

''वृषाली, पत्नी ही पतीची अर्धांगी असते हे अचूक सिद्ध केलंस तू! ते कारण तर आहेच; पण खरं म्हणशील तर जरासंधाच्या सेनापतीलाही - चेदिराज शिशुपालाला मी त्या द्वंद्वाविषयी सविस्तर हकिकत विचारणार आहे! भीमानं त्याला कोणत्या डावानं मारलं हेही मला ऐकायचं आहे!''

द्वंद्वाविषयी त्यांना अतिशय प्रेम होतं. ते नेहमी म्हणत 'द्वंद्व म्हणजे उघड-उघड आणि सरळ-सरळ शक्तीची परीक्षा!'

**

# कर्ण

# एकोणतीस

पौर्णिमा एका दिवसावर येऊन ठेपली असता कौरवयोद्धयांनी इंद्रप्रस्थाकडं प्रयाण केलं. युवराज दुर्योधनांनी पांडवांच्या यज्ञाला कोणी जाऊ नये असा प्रयत्न केला; पण पितामह भीष्मांनी सुरुवातीलाच या बाबतीत कणखरपणा दाखविला. त्यांनी सर्वांनाच निक्षून सांगितलं की, ''तुम्हाला वृद्धांचा जर मान राखायचा असेल, तर मी सर्वांत वृद्ध कुरू म्हणून तुम्हा सर्वांना यज्ञाला येण्याची आज्ञा करीत आहे. केवळ यज्ञासाठी येणं एवढंच तुमचं काम राहणार नाही. मी सांगेन ते काम त्या यज्ञात प्रत्येकाला तिथं करावंच लागेल. ही माझी इच्छा नसून आज्ञा आहे!''

इतरांपुढं आपला हेका कधीही न सोडणारे युवराज दुर्योधन पितामहांपुढं मात्र काहीच बोलू शकले नाहीत. सर्वांनाच पितामहांचा त्याग आणि पराक्रम माहीत होता. मनातून चरफडत का होईना; पण त्यांची आज्ञा सर्वांना पाळणंच भाग होतं.

अंगराजही सर्वांसमवेत इंद्रप्रस्थाला जायला निघाले. त्यांना पंचारतीनं ओवाळून मी, जाताना त्यांना म्हणाले, ''आपण गेलंच पाहिजे अशी काही पितामहांची आज्ञा नाही.''

"पण मी जाणारच!''

''एवढा कुणाचा आग्रह आहे आपणाला?''

''आग्रह कुणाचाच नाही! पण मला गेलंच पाहिजे. तिथं मथुरेहून श्रीकृष्ण येणार आहेत. मला यज्ञापेक्षाही त्याला पुन्हा एकदा पाहण्याची इच्छा तीव्र आहे."

''आपली इच्छा म्हणजे निर्धारच!" त्यांच्या परशूच्या पात्यासारख्या विशाल कपाळावर मी कुंकुमतिलक लावला. त्यांची मुद्रा त्या तिलकानं अवर्णनीय शोभिवंत दिसू लागली. आपल्या मात्यापित्यांची चरणधूली मस्तकावर धारण करून ते आपल्या हस्तिदंती वर्णाच्या घोड्यांच्या जैत्ररथात बसून यज्ञासाठी इंद्रप्रस्थाकडे निघून गेले.

ते म्हणाले होते, ''श्रीकृष्णाचं दर्शन घेण्याची इच्छा तीव्र आहे."

त्याच्या दर्शनानं त्यांना एवढं कसलं समाधान मिळणार होतं कोण जाणे! त्यांच्या त्या उद्गारांनी मलाही वाटलं की, श्रीकृष्णाला आपणही एकदा तरी पाहावं, कारण जे माझ्या पतीचं समाधान होतं तेच माझं समाधान होतं. स्त्रीचं जीवन हे पतीच्या चरणांवर भक्तिभावानं आणि श्रद्धेनं समर्पित केलेलं कमलपुष्पच असतं. पतीचं सौख्य; तेच तिचं सौख्य!

■

# एक

धुळीचे लोट उडवीत, मार्गावरची वळणं घेत माझा रथ हस्तिनापुराहून इंद्रप्रस्थाच्या दिशेनं धावू लागला, पण त्याहीपेक्षा अधिक गतीनं माझ्या मनाचा रथ भूतकालाच्या विस्तीर्ण जीवन-मार्गावरून धावत होता. उडत होती ती केवळ स्मृतींची धूळ! चांगल्या दीडएक तपाचा काल निघून गेला होता! व्यक्तीच्या जीवनात दीडएक तपाचा कालखंड म्हणजे कितीतरी दीर्घ कालखंड! पण दीर्घकाल हेच काही स्मृती विसरण्याचं प्रभावी साधन ठरत नाही. निदान कटू स्मृती विसरण्याचं तर नाहीच नाही! उलट जसजसा अधिकाधिक काल जात राहतो तसतशा अशा जुन्या स्मृती विचारमंथनांची विविधवर्णी वस्त्रं लेवून प्रकर्षानं डोळ्यांपुढं नाचू लागतात! मनाला हैराण करून सोडतात.

पांचालांच्या राज्यात स्वयंवरप्रसंगी द्रौपदीनं सर्व मान्यवर राजांसमक्ष माझ्या मानी मनावर निर्दयपणे केलेली जखम अजून तशीच ओली होती. अवमानाच्या कोणत्याच जखम लवकर भरून येत नाहीत. विशेषत: स्त्रियांनी केलेल्या जखमा तर कधीच लवकर भरून नाही येत! आल्या तरी त्यांचे विरूप व्रण कुठंतरी कायमचे मागं राहतातच राहतात! आपलं स्वयंवर मांडून त्या स्त्रीनं सर्वांना गर्जुन सांगितलं होतं की, कर्णाचं जीवन म्हणजे हीनता, उपेक्षा, वंचना आणि अवमान! स्त्रीमुखातल्या एका नाजूक जिभेनं कर्णाचं कणखर शरीर केवळ आपल्या शब्दावर तोललं होतं! योद्धयासाठी यापेक्षा अन्य कोणतं भयानक मरण असतं? सर्व लोक संपत्तीच्या आणि वैभवाच्या उभारीवर जगत असतात, पण योद्धा हा केवळ मनाच्या उभारीवर जगत असतो. म्हणूनच अवहेलनेचे आणि अधिक्षेपाचे प्रसंग तो कधीच विसरू शकत नाही. एका य:कश्चित स्त्रीकडून झालेला घोर अवमान तो विसरू शकत नाही आणि तिला क्षमाही करू शकत नाही. म्हणूनच त्या घटनेनंतर दीर्घ कालावधी लोटला तरी महापुराच्या पाण्यानं नदीचा तास क्षणाक्षणाला कुरतडत जावा तसे तिचे विषारी शब्द माझ्या अंत:करणाला कुरतडत आले होते. ते वाग्बाण विसरावे म्हणून मी प्रयत्न करीत होतो, पण छाटलेल्या वृक्षाला नवे धुमारे फुटावेत तसे ते वेळोवेळी नव्याच आविष्कारात माझ्यापुढं उभे राहत. शांत वेळी मला अगदी अस्वस्थ करीत. मनाचं सरोवर ढवळून टाकीत. तिच्या स्वयंवरात कामी आलेला माझा पुत्र सुदामन अनेक वेळा आपली आठवण करून देई. एखाद्या शहाण्या माणसाला भोवतीच्या लोकांनी ओरडून मूर्ख म्हणावं आणि शेवटी त्याला स्वत:लाच आपल्या शहाणपणाची शंका येऊन त्यानं मूर्खासारखं वेडेवाकडे हातवारे करावेत तसंच माझं झालं होतं! सर्व जण मला हीन म्हणून संधी मिळेल तेव्हा छेडीत होते. प्रथम-प्रथम ते ऐकताना मी उसळत होतो, पण जेव्हा एका स्त्रीनंही तीच ती हीनतेची मुद्रा हसत-हसत माझ्या मस्तकावर ठोकली, तेव्हा आपण खरंच हीन आहोत असं मला वाटू लागलं! मी चांडाळाइतका किंबहुना त्याहीपेक्षा अधिक हीन आहे, हे ऐकायला मी माझं मन आता तयार केलं आहे! पण माझ्या पुत्रवधाचा सूड मात्र मी नक्कीच घेणार!

केवळ एकच एक सत्य या हीनतेतही मला स्वर्गीय सौख्य देत आलं होतं अन् ते

म्हणजे माझ्या कुटुंबीयांच्या प्रेमाचं. पण ते सौख्यही निखळ नव्हतं. माझ्या कोणत्याही पुत्राला माझ्यासारखी जन्मजात कवच-कुंडलं नव्हती आणि म्हणूनच ते माझ्यापेक्षाही हीन ठरणार होते. उद्याचे आमचे वंशज हे माझ्यापेक्षा हीन असणार, ही जीवघेणी जाणीव कधी-कधी मला फार अस्वस्थ करू लागली. माझा आधार एकच होता. आकाशात तळपणारा माझा गुरू. त्याच्या केवळ एकाच दर्शनानं मला स्फूर्ती येत होती. सारं औदासीन्य दूर पळत होतं.

मी इंद्रप्रस्थाकडं चाललो होतो! पांडवांच्या राजनगराकडं! पण ते केवळ श्रीकृष्णासाठी! जाता-जाताच मी रथातून सहज आकाशात दृष्टी फेकली. शेजारी बसलेला अश्वत्थामा म्हणाला, "काय पाहतो आहेस त्या सूर्याबिंबाकडे एवढं निरखून कर्णा?"

"पाहतोय की त्या तेजस्वी बिंबात कुठं एखादा हिणकस काळा भाग दिसतोय का?"

"जे सत्य आणि शक्य नाही ते कशाला पाहतोस?"

"जे सत्य नसतं तेच जगात शक्य करून दाखविलं जातं म्हणून! मी तेच अनुभवत नाही काय?"

माझ्या उत्तरानं तो स्वस्थ बसला. आम्ही इंद्रप्रस्थाच्या सीमेत प्रविष्ट झालो. राजवाड्यासमोर अमात्यांनी आमचं स्वागत केलं. यज्ञमंडपात पांडवांच्या राजसूय यज्ञाची सर्व तयारी झाली होती. पण माझे डोळे श्रीकृष्णाचाच वेध घेत फिरू लागले. तो कुठंच दिसला नाही. मी केवळ त्याच्या दर्शनासाठीच आलो होतो. नीलवर्णाचा तो श्रीकृष्ण हे एक मला निळ्या आकाशासारखंच महान गूढ वाटत होतं.

केवळ अल्पशा कालखंडात खांडववनाच्या घनदाट परिसरात गगनचुंबी नगरी उभारलेली पाहताना मात्र मी आश्चर्यानं थक्क झालो. सर्वत्र मंदिरं, राजवाडे, शस्त्रागारं, अश्वशाला, पाठशाला, भूषणागारं यांची शिखरं आकाशाच्या उदरात घुसून दाटीवाटीनं इक्षुमतीच्या व यमुनेच्या किनाऱ्यावर उभी होती. ही किमया काय केवळ पांडवांनीच केली असेल? नक्कीच नाही. श्रीकृष्णाचंही त्यांना साहाय्य झालं असलं पाहिजे! पांडवांना त्याचा पाठिंबा लाभला होता. नाहीपेक्षा पांडव समर्थांच्या क्षेत्रातील केवळ याचकच होते!

**

# दोन

मी, अश्वत्थामा आणि दुर्योधन राजवाड्याच्या महाद्वाराबाहेर थांबलो. दुर्योधन तर फारच अस्वस्थ दिसू लागला. त्याची इंद्रप्रस्थात येण्याची मुळीच इच्छा नव्हती, पण पितामहांची अवज्ञा तो करू शकला नव्हता. मनावर हिमालयासारखा पाषाण ठेवूनच केवळ ज्येष्ठांचं आज्ञापालन म्हणून तो आला होता.

पांडवांचे अमात्य आमच्या सामोरे होते, पण त्यांच्यासमवेत आत प्रवेश करणं आम्हा तिघांनही प्रशस्त वाटलं नाही. आम्ही कुरुयोद्धे होतो. सामान्य आमंत्रित नव्हतो, पण इतक्यात मंडपातून युवराज युधिष्ठिरानं आम्हाला पाहिलं आणि तो तत्परतेनं प्रवेशद्वाराबाहेर आला. पुढं होऊन अश्वत्थाम्याचा हात त्यानं जिव्हाळ्यानं आपल्या हाती घेतला. दुर्योधनाकडे पाहत तो म्हणाला, ‘‘आर्या, युवराज्ञी भानुमतींना नाही आणलंस?’’ दुर्योधन काहीच बोलला नाही. शेवटी युधिष्ठिरानं माझ्याकडे पाहिलं, मला पाहताच तो दचकला. त्यानं आपली दृष्टी माझ्या पायांवरच खिळविली! सर्वच स्तब्ध उभे राहिले.

शांततेचा भंग करीत अश्वत्थाम्यानं त्याला विचारलं, ‘‘युधिष्ठिरा, यज्ञाची सर्व तयारी यथासांग झाली आहे ना?’’

‘‘होय गुरुपुत्रा! आम्ही मार्गप्रतीक्षा करतो आहोत ती यज्ञाच्या मुख्य यज्ञवेत्त्याची.’’

‘‘यज्ञवेत्ता कोण आहे?’’

‘‘श्रीकृष्ण!’’ युधिष्ठिर माझ्या पायांकडे पाहतच त्याला म्हणाला. त्याच्या कपाळावर आठ्यांचं जाळं होतं.

‘‘मग श्रीकृष्णाचं इंद्रप्रस्थात आगमन होईपर्यंत आम्हाला तुझी ही भव्य राजवास्तू तरी दाखवशील की नाही?’’ आपल्या मस्तकावरच्या शुभ्र वस्त्राची प्रवासात ढिली झालेली हनुवटीखालील गाठ नीट करीत अश्वत्थामा म्हणाला.

‘‘हो,’’ म्हणत युधिष्ठिरानं आपल्या आमात्यांना आम्हाला आत नेण्याचा संकेत केला.

माझी आणि युधिष्ठिराची जेव्हा-जेव्हा भेट झाली होती तेव्हा-तेव्हा कटाक्षानं त्यानं माझ्या पायांकडेच निरखून पाहिलं होतं. त्याला असं सुचवायचं नव्हतं ना की, ‘‘कर्णा, तुझं स्थान केवळ पायांजवळच आहे! तू सूतपुत्र आहेस!’’

आमात्यांसहवर्तमान आम्ही तिघांनी यज्ञमंडपात प्रवेश केला. आमच्या अगोदर आलेले पितामह, महामंत्री विदुर आणि द्रोण त्या मंडपात यज्ञाची व्यवस्था पाहत होते.

तो भव्य मंडप देशोदेशींच्या ऋषिमुनींनी अगदी फुलून गेला होता. मला तर क्षणभर आपण एखाद्या आश्रमासमोर उभे आहोत असं वाटलं! नरेशांच्या बैठकीच्या विभागात अनेक देशांचे राजे आसनस्थ झाले होते. त्यात करकायू, कुंकड, कनकध्वज, दृढधन्वा, जयद्रथ, भोज, नंदक, रोचमान, द्रुपद, सेनाबिंदू, कृतवर्मा आणि शिशुपाल यांसारखे विख्यात राजे होते. पूर्व दिशेला एक भव्य यज्ञकुंड आणि त्यानिकटच एक

यज्ञवेदी उभी केली होती. कुंडाभोवती नक्षीदार रांगोळी रेखली होती. त्या रांगोळीमागं व्याघ्रचर्म अंथरून ऋषी कुंडाला वलय देऊन बसले होते. त्यांच्या हाताला सहज लागतील, अशा बेतानं औदुंबर, बल्वज, पिप्पल, वट, आम्र, चंपक, चंदन अशा विविध वृक्षांच्या समिधांचे छोटे-छोटे ढीग दिसले. थोड्या कालावधीनंतर त्या समिधा कुंडात अर्पिल्या जाणार होत्या. अर्घ्यासाठी तूप, दूध आणि नद्यांच्या पवित्र जलांनी भरून ठेवलेले सुवर्णकुंभ मावळतीच्या प्रकाशकिरणात झळाळू लागले. यज्ञकुंडाच्या पूर्व दिशेला यज्ञवेत्त्या श्रीकृष्णासाठी मांडलेलं सुवर्णासिंहासन त्याच्या अंगलटीच्या मानानं मला फार भव्य वाटत होतं.

आम्ही मंडपातून राजवाड्याच्या पायदंडीपर्यंत चालत गेलो. तिथं भीम-अर्जुन आणि नकुल-सहदेव उभे असलेले दिसले. अर्जुनाला पाहताच माझ्या स्मृतींचं सरोवर एकाएकी ढवळलं गेलं! आखाड्यातील नीलकमलांची माला आणि स्वयंवरातील धवलकमलांची माला त्याच्याच कंठात पडली होती! का? तो केवळ क्षत्रिय होता म्हणून! माझ्या मनाच्या धनुष्यावर स्मृतींचे लिप्त बाण चढू लागले! तो एकटक माझ्या कानांकडे पाहत होता, पण माझ्याशी काही बोलावं, असं त्याला वाटलं नसावं. का वाटावं? एका क्षत्रियानं एका सूतपुत्राशी बोलावंच असा कोणताही सामाजिक संकेत त्याला माहीत नव्हता. गुरुपुत्र म्हणून अश्वत्थाम्याला मात्र त्यानं आदरानं वंदन केलं! भीम दुर्योधनाकडे पाहत होता. भीमाला जणू वाटत होतं की, सर्वांना पायाखाली चिरडण्यासाठीच आपण जन्माला आलो आहोत.

जवळच उभे असलेले पांडवांचे पाच पुत्र आश्चर्यानं हे सारं पाहत होते.

"अर्जुना, अरे त्या कर्णाच्या कानांकडे एवढं एकटक काय निरखून पाहतोस? त्याची कुंडलं जन्मजात आहेत, जसा तुझा नीलवर्ण जन्मजात आहे तशी!" अश्वत्थामा हसत राजवाड्याच्या पहिल्या पायदंडीवर पाय टाकत म्हणाला. तो नेहमीच स्वत:भोवती प्रसन्नता ठेवण्याचा यत्न करीत असे.

त्या उत्तुंग राजवास्तूवर एकदा दृष्टी टाकावी म्हणून वरच्या शिखराच्या दिशेनं मी हळूच मान वर उचलली. वरच्या शुभ्र पाषाणाच्या पसरट सौधाच्या तळपत्या कठड्याला डावा हात टेकून उभी असलेली, शुभ्र वस्त्रं परिधान केलेली एक स्त्री मला दिसली! मंदिरातल्या देवतेच्या मूर्तीसारखी ती निश्चल उभी होती! तिच्या उजव्या हातात काहीतरी पिवळ्या धाग्यासारखं अस्पष्ट दिसत होतं. माझी अन् तिची दृष्टिभेट होताच मात्र ती मूर्ती क्षणभर हलली. सौधावरून लगबगीनं आपल्या कक्षात जाण्याच्या प्रयत्नात त्या स्त्रीच्या हातातील वस्तू एकाएकी सुटली आणि गरगरत खाली येत नेमकी माझ्याच पायांवर पडली! सर्वांनी आश्चर्यानं माझ्या पायांकडे दृष्टी वळविली. दुर्योधन ती वस्तू उचलण्यासाठी पुढं झाला, पण त्याला मी ती संधी दिलीच नाही! मीच खाली वाकून ती हळूच वर उचलली. अतिशय नाजूक आणि सूक्ष्म दुव्यांचं, बालकाच्या हातात बांधायचं ते एक सोनेरी हस्तभूषण होतं! राजवाड्यावर कुणाचाही पुत्र इतका लहान नसताना ते राजपुत्रांनी हाती बांधायचं हस्तभूषण त्या स्त्रीनं कुणासाठी करवून घेतलं असावं, असा विचार करीत ते मी अमात्यांच्या हाती दिलं! मी क्षणभर परत सौधाकडं पाहिलं. तिथं कुणीच नव्हतं! तो शुभ्र पाषाणांचा उंच सौध सूर्यशलाकांत तसाच तळपत होता.

आम्ही राजवाड्याच्या पायदंड्या चढू लागलो. पण माझ्या डोळ्यांसमोरून ते

हस्तभूषण काही केल्या जाईना! पायदंडच्या चढता-चढताच मी अमात्यांना विचारलं, ''मघा सौधावर उभ्या होत्या त्या कोण?''

''राजमाता कुंतीदेवी! हे हस्तभूषण त्यांनी हस्तिनापुरातील कुठल्यातरी एका महापराक्रमी योद्धयाच्या पुत्रासाठी करवून घेतलं आहे! कारण सुवर्णकाराला त्यांनी ज्या-ज्या सूचना केल्या त्या मी स्वत: ऐकल्या आहेत! मीच त्याला मथुरेहून पाचारण केलं होतं!''

हस्तिनापुरातील महापराक्रमी योद्धा कोण? असा प्रश्न मी स्वत:ला विचारला, पण नेमकं नाव काही डोळ्यांपुढं येईना. आपल्याला काय करायचं? असा विचार करीत तो यत्न मी सोडून दिला.

अमात्य त्या वास्तूचं वर्णन ऐकवू लागले. राजवास्तू इतकी आकर्षक बांधण्यात आली होती की, तिच्यापुढं हस्तिनापूरचा प्राचीन राजवाडा मला काहीच वाटला नाही! निरनिराळ्या दालनांतून निरनिराळे कक्ष पाहताना त्यांची घडण करणाऱ्या त्या कल्पक कलाकारांचं कौतुक केल्याशिवाय राहवेना. भित्तीवर ठायी-ठायी कुरूंच्या पूर्वजांच्या जीवनचरित्रातले अनेक ठळक प्रसंग आकर्षक रंगात चितारले होते. राजसभेचं विशाल दालन म्हणजे तर चित्रकलेचा स्वच्छंद आविष्कारच वाटला मला. त्या दालनात पितामह भीष्म काशीराजांच्या कन्या हरण करून आणताहेत, महाराज शंतनू नदीतटाकी मत्स्यकन्या मत्स्यगंधेकडे लुब्ध होऊन पाहताहेत, महाराज देवापी राज्याचा त्याग करून ऐन तारुण्यात ईशचिंतनासाठी शांत मुद्रेनं अरण्यात जाताना हस्तिनापूरवासियांकडून बाहू उभारून निरोप घेत आहेत. महाराज पांडू एका अरण्यात मृगया करीत फिरताहेत, त्यांनी मारलेल्या मृगाचं एका कोपिष्ट ऋषीत रूपांतर झालं आहे, शापित महाराज पांडू आपल्या दोन स्त्रियांसह नगराचा, खाली मान घालून निरोप घेताहेत. एका अरण्यात ऋषिवेषधारी महाराज पांडू असून त्यांच्या दोहो बाजूंस दोन स्त्रिया आहेत. त्यांच्यासमोर पाच बालकं खेळताहेत, असे अनेक आकर्षक प्रसंग पाहताना मन भूतकालाचा वेध घेऊ लागलं. ती राजसभा कुरूंच्या हस्तिनापुरातील राजसभेपेक्षा मला कितीतरी प्रसन्न आणि जिवंत वाटली. एक गोष्ट मात्र त्या राजसभेत मला कुठंच दिसली नाही. ती म्हणजे चंद्रप्रतिमा! ज्या ठिकाणी राजसिंहासनामागं प्रतीक म्हणून कुरूंनी शुद्ध चांदीची प्रतिमा ओतविली होती, नेमक्या त्याच ठिकाणी राजसिंहासनामागं पांडवांनी मुरलीधर श्रीकृष्णाची शाडूची एक नीलवर्णी प्रतिमा कोरलेली होती! पांडवांच्या श्रीकृष्णनिष्ठेचंच ते प्रतीक असावं.

राजसभेचं दालन पाहून होताच आम्ही राजस्त्रियांच्या दालनात प्रवेश केला. राजस्त्रियांची दालनं म्हणजे तर सौंदर्याचं अप्रतिम प्रदर्शनच होतं. नक्षीदार कोरीव शुभ्र पाषाणांच्या स्तंभांवर नर्तिकांच्या अनेक भावमुद्रा खोदल्या होत्या. केशभूषेसाठी उंच-उंच दर्पण नक्षीदार दगडी महिरपीत बसविले होते. भित्तीवर राजकुलातील स्त्री-पुरुषांच्या जीवनक्रमातील अनेक भावप्रसंग चितारले होते. त्यातला प्रत्येक भावप्रसंग मला स्पष्ट समजला, कारण बाबांनी कुरूंचा कुलवृत्तान्त मला वेळोवेळी कथन केलेला होता. त्या दालनातील प्रत्येक चित्र मला मोहक आणि बोलकं वाटलं. काही-काही प्रसंग फारच पुराणकालचे असूनही ते कालच घडल्यासारखे परिचित वाटू लागले.

'उर्वशी उर्वशी' म्हणत झाडाझुडपांना मिठ्या मारणारे निष्ठावंत प्रेमिक महाराज

पुरुरवस् एका चित्रात रेखाटलेले दिसले. इंद्राचा पराभव करून परतताना सैन्याच्या अग्रभागी आत्मोन्नतपणे उभे असलेले नहुष, शुक्राचार्यांच्या चरणांवर मस्तक टेकवून पश्चात्तापदग्ध झालेले, आपल्या अपराधांची क्षमा मागणारे ययाती आणि त्यांच्याशेजारी गर्वोन्नतपणे उभी असलेली त्यांची पत्नी – रूपगर्विता ऋषिकन्या देवयानी, सिंहाचे दात मोजू पाहणाऱ्या आपल्या भरताकडे सकौतुक पाहणारी शकुंतला, कुरूंच्या वंशविस्तारासाठी झटलेली महाराणी सत्यवती अशा अनेक स्त्री-पुरुषांच्या स्मृती त्या भित्तींवर ठसठशीतपणे साकार झाल्या होत्या. त्या अबोल भावमुद्रा सजीव होऊन मूकपणेच आपल्या कथा सांगताहेत, असं वाटत होतं.

पण त्यातील एका चित्राचा मला काही केल्या अर्थबोध होईना! त्या चित्रात आर्तता होती. गूढरम्यता होती. भयाण असाह्यता होती. मात्र तरीही ते मुळीच करुण वाटत नव्हतं! त्या चित्राकडे पाहिल्यानंतर नेमकं काय वाटतं, तेच मला कळेना. उत्सुकता, कुतूहल की अन्य काय होतं हे सांगणं कठीण होतं. त्या चित्रात गूढ आकर्षण होतं! रंगसंगती तर सर्व चित्रांहून फारच प्रभावी होती.

निळ्या रंगाच्या पार्श्वभूमीवर, एका भित्तीवर एक विशाल नदीच्या पात्राचा एक वळणदार ओघ दाखविला होता. त्या नदीच्या पात्रात गुडघाभर जलाशयात एक वृद्ध-जर्जर दासी खाली वाकून एक लाकडी पेटिका त्या पात्राच्या उफाळलेल्या लाटांत सोडत होती! नदीकिनाऱ्यावर एक तरुण राजस्त्री आपलं मुख आपल्या ओंजळीत धरून क्रंदत होती! तिच्या राजवस्त्रांवरून ती राजस्त्री होती हे निश्चित! तिच्या वस्त्राचा पदर घोंघावणाऱ्या उत्तान वाऱ्याबरोबर उडत होता. तिच्या कंचुकीवरून काही थेंब खाली ठिबकत असल्याचं दाखविलं होतं. वाटे की, पाऊस नुकताच पडून गेल्यामुळे ते पाण्याचे असावेत! पण मग त्यांना दुधासारखी धवल छटा का दाखविली होती, ते मला नीट उमजेना. नदीच्या पात्राच्या पैलतीरावर दोन पर्वतशिखरांमधून सूर्यदेवांचा तेजस्वी प्रकाशझोत सरळ त्या पेटिकेपर्यंत ओढला होता! त्या कल्पक चित्रकाराला त्या कृतीतून असं तर सुचवायचं नव्हतं ना की, ती दासी ती पेटिका सूर्यदेवांनाच अर्पण करते आहे! किनाऱ्यावर एक श्वेतवर्णी गाय नदीच्या पात्रातील जल प्राशन करीत होती आणि तिचं नुकतंच जन्मलेलं एक गोंडस पाडस तिच्या कासेला बिलगण्यासाठी शेपटीचा गोंडा उंचावून धडपडत होतं, पण ते त्याला जमत नव्हतं. मला ते चित्र अतिशय आवडलं!

ते चित्र खूप निरखून पाहून मी माझ्या स्मृतीला बराच ताण दिला, पण मला तो प्रसंग कुणीही, कुठंही कधीच सांगितल्याचं आठवेना. शेवटी कुतूहल म्हणून मी अमात्यांना विचारलं, “हा प्रसंग कोणता अमात्य?”

“ते मलाही नीटसं माहीत नाही! असं एक चित्र तयार करावं, असा आग्रह राजमाता कुंतीदेवींनी केल्यामुळे सर्वांत कुशल असे मथुरेचे चित्रकार आणवून ते काढून घेतलं आहे. चित्र पूर्ण होताच राजमातेला ते पाहण्यासाठी मी पाचारण केलं. चित्र पाहताच मात्र त्या स्तब्ध झाल्या. चित्रकाराला वाटलं आपली कला त्यांना आवडली नसावी! ‘राजमाता, त्या पेटिकेत नेमकं काय होतं याची मला कल्पना देण्यात आली असती, तर हे चित्र मी याहीपेक्षा अधिक समर्पक अन् सूक्ष्म भावछटांत रेखाटलं असतं!’ तो चित्रकार म्हणाला.”

“मग राजमातेनं चित्रकाराला कोणतं उत्तर दिलं?” मी उत्सुकतेनं विचारलं,

कारण मलाही नेमकं तेच कुतूहल होतं.

"एक दीर्घ नि:श्वास सोडून त्या वेळी कुंतीदेवी म्हणाल्या की, 'त्या पेटिकेत काय होतं, हे एकटचा दुर्वास ॠषींनाच माहीत आहे!' अमात्यांनी उत्तर दिलं."

"बाहेर यज्ञमंडपात आलेल्या ॠषींत दुर्वास ॠषी आहेत काय?" मला त्या चित्रातली आर्तता हृदयस्पर्शी वाटली. त्या पेटिकेत काय असावं, ही शंका काही केल्या दूर होईना. म्हणून मी पृच्छा केली.

"नाही!" उत्तर आलं.

आम्ही दालनातून बाहेर आलो. मनात असूनही शिष्टाचार म्हणून मला अधिक प्रश्न विचारता आले नाहीत.

सर्व राजवाडा पाहून झाला. शेवटचं एकच दालन शिल्लक राहिलं. त्या दालनातील सर्व वस्तू मायावी आहेत, असं अमात्यांनी आम्हाला सांगितलं.

विनोदानं अश्वत्थामा म्हणाला, "तसं सगळं जगच मायावी आहे!"

शेवटी आम्ही त्याही दालनात प्रवेश केला. खांद्यावरची गदा पेलत दुर्योधन सर्वांच्या अग्रभागी टेचात चालला होता. त्या दालनात प्रवेश करताच एका सोपानावर दासींच्या एका घोळक्यात उभी असलेली द्रौपदी मला दिसली. जिला पाहताच माझ्या स्मृतींचं मोहोळ डिवचलं गेलं! घटनांच्या गांधीलमाशा घोंगावत माझ्यातल्या सूतपुत्राला डसू लागल्या. एक सूतपुत्र म्हणून आपल्यावर ती आता तिरस्काराचा जळजळीत कटाक्ष तर नाही ना टाकणार, या केवळ जाणिवेनंच माझं मन गुदमरू लागलं, पण घडलं ते उलटंच! माझी दृष्टिभेट होताच तिनं आपली मान तिरस्कारानं दुसरीकडे नाही वळवली! क्षणभर माझ्याकडे पाहताच तिनं आपली दृष्टी पटकन खाली वळविली. तिचं मुख आरक्त झालं! आपल्या सखीच्या कानात ती काहीतरी हळूच पुटपुटली. तिच्या डोळ्यांतील भाव मला निराळाच, अगदी अपरिचित वाटला. माझ्यावरच्या प्रेमानं भारावलेली वृषालीही कधी-कधी माझ्याकडे जसं पाही तसा वाटला तो मला! आपल्या सखीच्या कानात ती काय पुटपुटली असावी? काही कळेना.

दुर्योधनाचं मात्र दालनाकडे लक्ष नव्हतं. तो त्या दालनातील मायावी वस्तूंकडे पाहत ताठपणे तसाच पुढं चालू लागला. दालनाच्या मध्यंतरी एक आकर्षक वीण असलेली नक्षीदार पायघडी अंथरली होती. त्या पायघडीवरील रेखीव नक्षी पाहून त्यानं आश्चर्यानं आपल्या भुवया ताणल्या आणि दुसऱ्याच क्षणी पुढं जाण्यासाठी म्हणून वर छताकडे बघत त्यानं सरळ डावं पाऊल त्या तलम पायघडीवर टाकलं. पण ती पायघडी नव्हती! काठोकाठ पाण्यानं भरलेल्या एका छोटचा तलावावर राजवाडचातील दासींनी विविध रंगांच्या, फुलांच्या परागकणांनी पाण्यावर काढलेली ती एक फसवी रांगोळी होती! तिच्यावर पाय पडल्यामुळे अचानकपणे दुर्योधन सरळ त्या जलाशयात तोंडघशी फेकला गेला. रांगोळी विसकटली गेली. त्याचा भव्य राजमुकुट मस्तकावरून उडून तलावात कुठंतरी अदृश्य झाला. हातातील गदेमुळे त्याला नीट पोहताही येईना! त्यानं दोन-चार गटांगळ्या खाल्ल्या म्हणून मी पुढं होऊन झटकन त्याला हात दिला. त्या आधारानं तलावाबाहेर हसत-हसत येत तो विनोदानं मला आणि अश्वत्थाम्याला काहीतरी म्हणणार होता, तेवढचात तिकडे सोपानावर उपहासात्मक हास्याची कारंजी उडाली! दुर्योधनावर तिरस्काराचा एक जळजळीत कटाक्ष टाकत आपल्या सखींना उद्देशून द्रौपदी खोचकपणे खोचकपणे म्हणाली, "अंध पित्याचे पुत्रही अंधच असतात

म्हणायचे!'' तिच्या सखी पक्षिणींच्या थव्याच्या चिवचिवाटासारख्या साक्ष देत खसखसल्या – ''तर काय पायाखालचंसुद्धा दिसत नाही!''

त्या कुत्सित आणि खोचक उद्‌गारांनी मला अत्यंत किळस आली. तिच्या शरीराला सुगंध असेल, पण मनातून असल्या दुर्गंधाशिवाय आम्हाला कधी काय दिसलं? दुर्योधनावरचा तिचा क्रोध तिनं असा त्याच्या अंध पित्याच्या नैसर्गिक व्यंगाचा मर्मभेदक उल्लेख करून प्रदर्शित केला.

मला वाटलं, काही झालं तरी स्त्रीला मर्यादा असाव्यात. निदान राजस्त्रीला तरी त्या असाव्यातच. किमान वडीलधाऱ्यांविषयी बोलताना तरी तिनं जिभेचे वेग रोधावेत.

तिच्या कुचेष्टेने बिथरलेल्या दुर्योधनानं हातातील अवजड गदा क्रोधानं तशीच तलावात फेकून दिली! आपले आग पाखडणारे डोळे तिच्यावर रोखीत ताठ मानेनं तो केवढ्यातरी मोठ्यानं कडाडला, ''अंध पित्याचे पुत्र डोळस असतात हे प्रसंग येईल तेव्हाच तुला कृतीनं दाखवून देईन!'' त्याच्या भिजलेल्या वस्त्रावरून पाणी ओसंडत होतं; पण क्रुद्ध डोळ्यांतून मात्र आग! आणि त्यात त्याचा काय दोष होता? द्रौपदीच्या अहंभावी उद्‌गारांचं समर्थन करून त्या क्षणी दुर्योधनाला कोण शीघ्रकोपी म्हणणार होतं? अहंमन्य मानणार होतं?

अश्वत्थाम्यानं त्याच्या दंडाला धरून त्याला कसंतरी त्या मायावी दालनाबाहेर नेलं. मी जाता-जाता त्या तलावाकडे पाहिलं. त्यावरची वलयं थांबली होती. परागकणांची रांगोळी पूर्ववत तयार झाली होती – पण ती पूर्वीइतकी आकर्षक नव्हती! कशी असणार! पूर्वीच्या रंगच्छटा कुठच्या कुठं विखुरल्या होत्या! उधळल्या होत्या! विचित्र रंगच्छटांचं विरूप मिश्रण मागं दाटलं होतं!!

मी जवळ जाताच दुर्योधन मला निग्रहानं म्हणाला, ''कर्णा, आता मला इथं एक पळभरही थांबायचं नाही. सत्यसेनाला बोलावून घे आणि रथ जोडायला सांग. आत्ताच्या आत्ता मी हस्तिनापूरला असाच परतणार!''

आपल्या अंगावरची वस्त्रं भिजली आहेत याचीसुद्धा त्याला शुद्ध नव्हती. अश्वत्थाम्यानं अमात्यांना नेत्रानं संकेत केला. त्यांनी वस्त्रागारातून एक कोरडे उत्तरीय व अधरीय आणलं. अश्वत्थाम्यानं ती वस्त्रं त्याच्यापुढं धरली तेव्हा कुठं त्याच्या ध्यानात आपण भिजलो आहोत हे आलं! एका मोकळ्या दालनाकडे अंगुली दाखवीत अश्वत्थाम्यानं त्याला वस्त्रं बदलून येण्यासाठी सुचविले. अश्वत्थामा म्हणजे समयसूचकतेचा सुंदर निर्झर वाटला मला!

दुर्योधन वस्त्रं बदलून आला, पण त्याच्या शरीरापेक्षा त्याच्या अंगावरची वस्त्रं पारच सैल दिसत होती! ती वस्त्रं बहुधा भीमाची असावीत! मला तो एक विचित्र योगयोग वाटला. मी माझ्या मस्तकावरचा मुकुट काढून तो त्याच्या अनावृत मस्तकावर बसविला, कारण त्याचा मुकुट तर तलावाच्या तळाशी गेला होता. माझ्या अनावृत मस्तकाकडे पाहून त्यानं विचारलं, ''आणि तुझ्या मस्तकावर काय?''

''मी क्षत्रिय नाही राजा, सूतपुत्राला मुकुटाशिवाय वावरण्याची सवय असते!'' मी उत्तर दिलं.

माझ्या मस्तकाकडे पाहत त्यानं अश्वत्थाम्याला विचारलं, ''वास्तविक याला कोणत्याही मुकुटाची आवश्यकता नाही असं तुला नाही वाटत?''

‘‘त्याचे सोनेरी कुरळे केस मुकुटालाही लाजविणारे आहेत.’’ अश्वत्थामा म्हणाला.

आम्ही हस्तिनापुराला जायच्या निर्धारानंच तेथून बाहेर पडलो, कारण दुर्योधनाचा अवमान तो माझाही अवमानच होता. तो आणि मी दोन आहोत, असं मी कधीच मानलं नव्हतं. त्यानं माझं जीवन घडविलं होतं, भवितव्यही तोच घडविणार होता. त्याची कुचेष्टा करणारी द्रौपदी मला केवळ अविचारीच नाही तर घमेंडखोरही वाटली. प्रत्येक घटनेला परिणाम असतो. तिलाही तो कधीतरी भोगावा लागणार असं मला वाटलं.

एकाएकी चोहोबाजूंना चौघडे, नगारे, तुताऱ्या आणि मृदंग यांचा हर्षवर्धक एकच कल्लोळ झाला. म्हणून मी कुतूहलानं अमात्यांना त्या कल्लोळाबद्दल विचारलं. ते म्हणाले, ‘‘आता यज्ञाला प्रारंभ होईल. द्वारकेहून भगवान श्रीकृष्ण आत्ताच आले असावेत! त्यांच्या आणि इतर यादवांच्या स्वागतासाठीच ही रोमहर्षक वाद्ये वाजताहेत! राजसूय यज्ञाची अट आमच्या राज्यानं पूर्ण केली आहे. पूर्वपश्चिम आणि दक्षिणउत्तर अशी सर्व राज्यं या यज्ञापूर्वी जिंकावी लागतात. यज्ञमंडपात उपस्थित असलेले सर्व राजे आमच्या सैन्यानं पादाक्रांत केलेल्या या आर्यावर्तातील निरनिराळ्या भूभागाचे राजे आहेत. ते सर्व राजे उठून आता यज्ञवेत्त्याला अभिवादन करतील.’’

‘‘कोणकोणती राज्यं जिंकली तुमच्या सैन्यानं?’’ मी पुन्हा प्रश्न केला.

‘‘कितीतरी – कोसल, विदेह, चेदी –’’ ते एक-एक नाव सांगू लागले. ते ऐकत-ऐकतच आम्ही यज्ञमंडपाजवळ आलो.

**

# तीन

हस्तिनापुराकडे परतण्यासाठी आम्ही सरळ यज्ञमंडपातून बाहेर जाण्यासाठी तत्परतेनं पावलं टाकू लागलो. दुर्योधन तर कुणाकडेही ढुंकून न पाहता झपाझप चालू लागला, पण प्रवेशद्वाराकडून द्रुपद राजाचा हातात हात धरून आत येणाऱ्या पितामहांनी त्याला मध्येच थांबविलं आणि अधिकारवाणीत ते त्याला म्हणाले, ''दुर्योधना, तू यज्ञासाठी आला आहेस की मृगयेसाठी? जा, एक काम कर. यज्ञात बळी देण्यासाठी आणलेल्या पशूंची गणती करून त्यांची नीट व्यवस्था राखली आहे की नाही ते तू स्वत: पाहा! आणि कर्ण, तू यज्ञासाठी दान देण्याच्या वस्तू स्वहस्ते सर्वांना दान करावयास बस!''

अगोदरच द्रौपदीकडून अवमानित झालेल्या करारी दुर्योधनाला त्यांनी सांगितलेलं एवढं क्षुल्लक काम मुळीच आवडलं नाही. वळीव पर्जन्याच्या वेळी एकाएकी चोहोबाजूंनी ढगांचं जाळं निरभ्र आकाशावर गोळा व्हावं, तसं असंख्य आठ्यांचं जाळं त्याच्या निरुंद मस्तकावर गोळा झालं! भक्कम काळविटानं शुष्क काटकीच्या साध्या आवाजानंसुद्धा कान टवकारावेत तशा त्यानं आपल्या वक्र भुवया अधिकच ताणल्या. त्याचे घारे डोळे जणू प्राणांतिक फडफड करून त्यांना सांगू इच्छित होते की, 'तुम्ही पितामह भीष्म आहात! मी कुरूंच्या दिव्य कुलातील ज्येष्ठ युवराज आहे! तुम्हाला तरी हे असलं क्षुद्र काम या वेळी मला सांगणं शोभा देत नाही!' पण पितामहांच्या ज्येष्ठत्वाचा तो उपमर्द करू शकला नाही. एकदा असाहाय्यतेनं माझ्याकडे पाहून खाली मान घालून तो पशूंच्या गोठ्याच्या दिशेनं निमूटपणे वळला. त्याच्या मनात कसलं भयाण वादळ चाललं होतं, याची साक्ष त्याची भूमीवर आदळणारी भक्कम पावलंच देत होती. त्याच्या सांत्वनासाठी काहीतरी बोलावं म्हणून मी त्याच्या पाठीमागून चालू लागलो. मागं न वळताच उजव्या हाताच्या तळव्यानं मला थांबण्याचा संकेत करून तो निर्धारानं म्हणाला, ''तू थांब राधेया! आजचा दिवस या सर्वांना एका आगळ्या अर्थानं आणि मला एका वेगळ्या अर्थानं जीवनांतापर्यंत लक्षात राहील! दुर्योधनालाही मन आहे, तोही एक माणूस आहे, याचं या सर्व धुंदांना विस्मरण झालेलं दिसतंय. योग्य वेळ येताच मी त्यांना पटवून देईन की, मीही एक जिवंत माणूसच आहे!''

मी त्याच्या मानी क्षत्रिय मनाच्या मरणप्राय यातना ओळखल्या, पण त्याला एकही सांत्वनाचा शब्द सांगू शकलो नाही. कसा सांगू शकलो असतो? त्याच्यात आणि माझ्यात काय फरक होता? एका दुखऱ्या मनाच्या माणसानं दुसऱ्या दुखऱ्या मनाच्या माणसासाठी कोणते सांत्वनाचे शब्द धुंडाळावेत? जीवनभर मीही हेच अनुभवलं नव्हतं काय? अवहेलना आणि तिरस्कार. त्याच्या लहान होत जाणाऱ्या पाठमोऱ्या आकृतीकडे मी अनुकंपेनं पाहू लागलो. त्याच्या चालीत नित्याची कौरवराजाची ऐट कुठंच दिसली नाही.

पितामहांनी दुर्योधनाला खऱ्या अर्थानं ओळखलंच नाही असं मला वाटलं!

मंडपातील संमिश्र कुजबुज आकस्मिक एकदम थांबली म्हणून मी माघारी वळून

प्रवेशद्वाराकडे पाहिलं. धवलवर्णाच्या चार घोड्यांच्या गरुडध्वज रथातून श्रीकृष्ण खाली उतरला! मंद-मंद हसत, शांत, धीरगंभीर पावलं टाकीत तो यज्ञमंडपात आला. अंजनीच्या नीलवर्णी फुलासारखं त्याचं निळं शरीर मावळतीच्या सौम्य किरणांत झळाळत होतं. त्याच्या मागून अबोली वर्णाचं अंकुश धारण केलेली अधोमुखी रुक्मिणीही आली. त्या दोघांमागून सात्यकी, बलराम, उग्रसेन, अक्रूर, उद्धव, प्रद्युम्न, सांब, ब्रह्मगार्ग्य रथांतून उतरले. पितामहांनी तत्परतेनं सामोरं जात श्रीकृष्णाला गाढ आलिंगन दिलं. त्या दोघांचं आलिंगन पाहताना मला वाटलं की, हिमालयाचं धवल शिखर आकाशाच्या निळ्या कंठात बिलगलं असावं! सुवासिनींनी श्रीकृष्ण-रुक्मिणींच्या चरणांवर जलाचे कुंभ रिते केले. राजमाता कुंतीदेवींनी त्याच्या विशाल कपाळावर मंगल कुंकुमतिलक लावला. द्रौपदीनं औक्षण केलं. मला ते पाहताना राधामातेची आठवण झाली. मी कुठंही बाहेर निघालो की, ती असाच तिलक माझ्या कपाळावर लावीत असे. विदुरांनी त्याच्या कंठात टवटवीत श्वेतकमलांची माला घातली. श्रीकृष्णानं वाकून राजमातेची चरणधूली, विनयानं मस्तकी घेतली. मंडपातील सर्व जण आदरानं उभे राहिले. पायांवर ओतलेल्या पाण्यातच लोळण घेणाऱ्या अनेक ऋषींना श्रीकृष्ण तत्परतेनं वर उठवू लागला! दूरवर एका आसनावर मात्र कोणी एक नरेश तसाच बसला होता. मी त्याच्या त्या तटस्थपणाच्या कुतूहलामुळे त्याच्याकडे निरखून पाहिलं. तो शिशुपाल असावा!

शेवटी युधिष्ठिर पुढं झाला. श्रीकृष्णाचा उजवा हात आपल्या हाती घेत त्याला तो यज्ञवेदीजवळच्या भव्य सुवर्णसिंहासनाकडे नेऊ लागला. डाव्या दिशेनं चालणाऱ्या अर्जुनाच्या अनावृत खांद्यावर श्रीकृष्णानं आपला डावा हात टाकला होता. त्या दोघांच्या नीलवर्णामुळे मागून पाहणाऱ्याला त्यातला श्रीकृष्ण कोण आणि अर्जुन कोण हे लगेच कळलं नसतं! मला मात्र त्या दोघांत एक स्पष्ट फरक जाणवू लागला. श्रीकृष्णाच्या चालीत सहजता होती. अर्जुनाच्या चालीत शरीर पेलण्यासाठी निर्माण झालेलं भान होतं! मंडपाच्या निवडुंगाच्या खांबाला टेकून मी दूरवरून श्रीकृष्णाला पाहू लागलो. ज्याच्यासाठी मानावमानाच्या सर्व सांकेतिक कल्पना दूर लोटून, मी आमंत्रण नसतानाही आलो होतो ती माझी आकांक्षा पुरी झाली. श्रीकृष्णाच्या शरीरवर्णात आणि आकाशवर्णात मला बरंच साम्य आढळलं. त्याच्या कानांकडे निमुळत्या होत गेलेल्या नेत्रांत इतर कुणालाही न आढळणारी प्रशांत जवळीक होती. लहान असूनही त्याची देहयष्टी पिळदार होती. डोळे निमुळते होते. बोलक्या, धुंद पापण्यांनी ते आच्छादलेले होते.

युधिष्ठिरानं त्याला यज्ञकुंडानजीकच्या भव्य सुवर्णासिंहासनावर बसविलं. तो बसताच सर्व जण आसनस्थ झाले. ऋषिगणांनी आपापल्या व्याघ्रचर्मांवर पद्मासनं घातली. माझ्याकडे कुणाचंच लक्ष नव्हतं. असायचं तसं काही कारणही नव्हतं! मंडपावरून सहज दृष्टी फिरविताना श्रीकृष्णाला मी यज्ञमंडपाच्या एका कोपऱ्यात दिसलो. त्याची अन् माझी क्षणभरच दृष्टिभेट झाली. काही कारण नसताना माझ्या डोळ्यांसमोर चंपानगरीतलं गंगेचं विशाल पात्र उभं राहिलं! माणसाचं मन तरी किती विचित्र असतं! त्याला केव्हा काय आठवेल याचा काहीच नियम नसतो. मला पाहताच मात्र तो सिंहासनावरून परत उठला. महात्मा विदुरांना त्यानं हाताच्या संकेतानं जवळ बोलावून घेतलं आणि त्यांच्या कानात पुटपुटून काहीतरी सांगितलं. माझ्या मस्तकावर

मुकुट नाही, याची जाणीव होताच मला खंत वाटली. महामंत्री विदुर तो देण्याची व्यवस्था करण्यासाठी म्हणूनच माझ्याकडे येऊ लागले. माझ्याजवळ येताच त्यांनी मला जे सांगितलं त्यानं मात्र माझा अपेक्षाभंग झाला. ते म्हणाले, "अंगराज, आता यज्ञविधीला प्रारंभ होणार आहे. आपण आसनस्थ व्हावं!"

"मी इथं उभा आहे तो योग्य नाही का?" उत्तरासाठी मी म्हणालो. मस्तकावर मुकुट नसताना नरेशांच्या बैठकीत कसं बसायचं?

"ही माझी इच्छा नाही! भगवान श्रीकृष्णांची आहे!" ते तेवढ्याच शांतपणे म्हणाले. त्या उत्तरावर मजजवळ कोणतेच शब्द नव्हते.

मी मूकपणे त्यांच्यामागून चालत जात त्यांनी दाखविलेल्या एका आसनावर बसलो. सगळीकडे शांतता पसरली. चौथा प्रहर असल्यानं मावळत्या सूर्यदेवांची सर्वस्पर्शी लांबट किरण बालकं प्रवेशद्वारातून प्रवेशून सगळ्या मंडपाला स्पर्शू लागली. ती पाहताच उगाच एक विचित्र विचार माझ्या मनात तरळून गेला, मला महामंत्र्यांनी एक आसन दाखविलं होतं, पण त्या किरणांना ते कोणतं आसन दाखविणार होते? आणि खरं म्हटलं तर त्यांना आसन दाखवायची आवश्यकता होती काय? मंडपातल्या प्रत्येक आसनावर ती आमंत्रण नसताना कुणाच्याही विरोधाला न मानता येऊन बसलीच नव्हती काय? श्रीकृष्णाच्या आसनावरसुद्धा! त्यांना कोण आणि कसा विरोध करू शकणार?

काही निमंत्रित राजे माझ्या मुकुटविहीन मस्तकाकडे निरखून पाहत काहीतरी कुजबुजू लागले. बहुधा त्यांना माझं तिथं तसं बसणं अशुभसूचक वाटलं असावं! पण जेव्हा ज्येष्ठ युधिष्ठिर यज्ञकुंडाजवळ उभा राहून बोलू लागला तेव्हा त्यांची कुजबुज आपोआपच थांबली. तो बोलू लागला – "भगवान श्रीकृष्ण, पितामह, महामंत्री, गुरुदेव द्रोण, पूजनीय ऋषिजन आणि आमंत्रित नरेशहो, मी माझ्या चारी भ्रात्यांच्या वतीनं आपणा सर्वांच्या इंद्रप्रस्थातील आगमनाचं सानंद, सहर्ष स्वागत करतो. आम्ही हा राजसूय यज्ञ आमच्या राज्याच्या समृद्धीसाठी आणि शांततेसाठी मांडला आहे. आमच्या सुदैवानं या महत्त्वपूर्ण यज्ञविधीसाठी आज यज्ञवेत्ता म्हणून भगवान श्रीकृष्ण इथं उपस्थित आहेत. यज्ञवेत्त्याचे आजच्या शुभमुहूर्तावर चरण धुऊन मी त्यांच्या शुभहस्ते या यज्ञातील पहिली बिल्वसमिधा अर्पण करणार आहे. आपणा सर्वांच्या आणि त्यांच्या कृपाप्रसादानं आमच्या राज्याचं कल्याण होईल, असा आमचा दृढ विश्वास आहे. या यज्ञानंतर आपण सर्वांनी, आज पौर्णिमा असल्यानं, समोरच्या इक्षुमतीच्या किनारी मंडपात बसून सहभोजन घ्यायचं आहे."

त्यानं आपल्या अमात्यांकडे सहेतुक कटाक्ष टाकला. त्यानं विविध नद्यांचं जल भरलेला एक सुवर्णकुंभ आणि एक सुवर्णाचं तबक आणलं. युधिष्ठिरानं ते तबक श्रीकृष्णाच्या चरणांजवळ ठेवलं. नेहमी माझे पाय बारकाईनं निरखणारा युधिष्ठिर श्रीकृष्णाचे चरण त्या तबकात ठेवून, श्रद्धेनं सुवर्णकलशातील जल त्यावर ओतू लागला. सर्व आमंत्रित राजे ते दृश्य औत्सुक्यपूर्ण शांततेनं पाहू लागले. चरण धुऊन होताच त्यानं सुवर्ण तबकात पडलेल्या जलाचे चार बिंदू आपल्या उजव्या तळहाताच्या पोकळीत घेऊन ते तीर्थाच्या आचमनासारखे श्रद्धेनं प्राशन केले. आपल्या तलम धाग्यांच्या उंची उत्तरीयानं भक्तीनं श्रीकृष्णाचे ओले चरण पुसले. मी त्या चरणांतील उजव्या निळ्या अंगठ्यावर पाहिलं, माझ्या बाणाचा व्रण तिथं असायला हवा होता; पण

तो नव्हता!

अग्निहोत्री ॠषींनी प्रणवाचा मंत्र म्हणत धगधगीत अंगारांची एक थाळी यज्ञकुंडात ओतली. त्या अंगारांवर अर्पण करण्यासाठी श्रीकृष्णानं बल्वज वृक्षाच्या काष्ठांची एक छोटी मोळी हळूच उचलली. ओणावून तो ती मोळी यज्ञकुंडात अर्पण करणार इतक्यात नरेशांच्या बैठकीत बसलेला चेदिराज शिशुपाल आपल्या आसनावरून खाडकन उठला आणि हातातील गदा एका झटक्यात उचलून खांद्यावर पेलीत तीव्र विरोधाच्या कणखर आवाजात ओरडला, "थांब!" कानात वायू भरलेला वृषभ कुणाच्याही अंगावर धावून जाण्यासाठी सिद्ध झालेला असतो तसा त्याचा आविर्भाव होता. गर्जणाऱ्या मेघासारखा तो आवाज होता.

सर्वांनी आश्चर्यानं भेदरून त्याच्याकडे पाहिलं. आपली मान मंडपभर गरगर फिरवून शेवटी ती युधिष्ठिरावर रोखत नाकपुड्या विस्फारीत त्याला क्रोधानं तो म्हणाला, "कुरूंच्या श्रेष्ठ कुलात जन्मलेल्या युधिष्ठिरा, एका य:कश्चित गवळ्याच्या पोराला या महान यज्ञाचा यज्ञवेत्ता करून तू इथं या आर्यावर्तातल्या समस्त शूर क्षत्रियांची आमंत्रणं देऊन कुचेष्टा मांडली आहेस की काय?" त्याची उन्नत छाती वरखाली होत होती. त्याच्या मनात दीर्घकालीन साचलेली मळमळ उतास येऊ लागली. तो जरासंधाचा सेनापती आणि रुक्मिणीचा एके काळचा नियोजित वर असल्यानं श्रीकृष्णावर अर्थातच रुष्ट होता.

त्यानं श्रीकृष्णाचा 'एक य:कश्चित' म्हणून केलेला निर्देश मला मुळीच आवडला नाही. भीमार्जुन तर क्रोधानं आपली गदा आणि चाप सावरीत आसनांवरून ताडकन उठलेच. हातातील बल्वजाची मोळी परत समिधांच्या ढिगात फेकत मंदपणे वर उठत श्रीकृष्णानं त्यांना हातानंच संयम करण्याचा संकेत केला. ते खाली बसले. त्या तशा ऐनसमयीसुद्धा एक गोष्ट मला प्रकर्षानं जाणवली. श्रीकृष्ण क्षत्रिय असूनसुद्धा त्याला आपलं जीवन गोपालपुत्र म्हणूनच घालवावं लागलं होतं! दैव हे आत्यंतिक लहरी बालकासारखं असतं! बालक जसं हातातील सुंदर सुवर्णभूषण पायदळीच्या मातीत फेकून देईल आणि त्या मातीतील शुष्क काष्ठ मात्र हाती घेईल; तसंच दैवसुद्धा पराक्रमी पुरुषांना असाह्यतेच्या धुळीत फेकून देतं आणि कर्तृत्वशून्य भेदरटांना कधी-कधी मस्तकी धरतं!

आपणाला कुणाचाच विरोध होत नाही, याची पक्की खात्री होताच आसन सोडून शिशुपाल सरळ यज्ञवेदीच्या अगदी जवळ गेला. गदा सावरीत, हवे तसे हातवारे करीत तो अधिकच त्वेषानं बोलू लागला. त्याच्या मुखाच्या वणव्यातून तडतडणाऱ्या ठिणग्याच ठिणग्या बाहेर पडत होत्या. सारे शब्द केवळ विवेकशून्य होते. "या मंडपात त्या गवळ्यापेक्षा सूर्यप्रतापी अनेक वीर असताना त्यांना डावलताना तू कोणता विचार केला आहेस? इथं हे पितामह भीष्म, महाराज धृतराष्ट्र, युवराज दुर्योधन, दु:शासन, मद्रराज शल्य, सिंधुराज जयद्रथ, सुबलराज शकुनी, पांचालश्रेष्ठ द्रुपद यांसारखे महाप्रतापी वीर असताना, ब्रह्मतेजानं तळपणारे पैल, धौम्य, द्रोण, कृप, विदुर आणि अश्वत्थामा यांसारखे पूजनीय विद्वान असताना एका काळ्या गवळ्याची अग्रपूजा करून कुरूंच्या धवल कीर्तीला काळिमा फासताना तुला काहीच कसं वाटत नाही? याच्या केवळ काळ्यानिळ्या वर्णानंच तू भारावून गेला असशील तर त्याहीपेक्षा आकर्षक आणि आश्चर्यकारक सुवर्णवर्णाचं झळाळणारं अभेद्य कवच धारण करणारा कुंडलधारी वीरश्रेष्ठ

अंगराज कर्ण इथं आहे; तो तुला दिसलाच नाही की काय?''

त्यानं सर्वांच्या आसनांसमोर उभं राहून अंगुलिनिर्देश करून सर्वांत शेवटी माझ्यावर दृष्टी फेकली! मला ते मुळीच आवडलं नाही! कसं आवडणार? जगाला कुतूहल वाटणारी कवच-कुंडलं मी धारण केली होती म्हणून मला काही सारथी न म्हणता कुणी सम्राट म्हणून मान देणार नव्हतं! तो उगाच माझा निर्देश वेड्यासारखा करीत होता!

त्याची रक्तवर्णी जीभ वेड्यासारखी बडबडत होती.

''आणि या सर्वांना सोडून गायींच्या शेपट्या पिरगळीत, अरण्यात भटकणाऱ्या एका यःकश्चित गवळ्याला तू आज एवढ्या महान राजसूय यज्ञाचा यज्ञवेत्ता कसा केलास? तेवढं करून तरी तू थांबला आहेस काय? गायींच्या मलमूत्रांनी नित्य बरबटणारे त्याचे ओंगळ पाय धुवून ते अमंगळ पाणी ते एखाद्या तीर्थासारखं प्राशन करतोस! आणि तेही या सर्व क्षत्रियांसमोर! ही सर्वांची जीवघेणी कुचेष्टाच नाहीतर दुसरं काय आहे? सांग, आपल्या नूतन राज्याचा तुला गलिच्छ गवळीवाडा करायचा आहे की काय?'' त्याच्या उद्गारांनी क्रोधानं संतप्त झालेले पितामह भीष्म, भीम आणि सहदेव ताडकन आसनांवरून उठले. पण... पण श्रीकृष्णानं त्यांना केवळ हाताच्या संकेतानंच खाली बसविलं!

भानरहित झालेला शिशुपाल जिभेला येईल ते अद्वातद्वा बोलू लागला. मद्यापेक्षाही प्रतिशोधाची धुंदी अधिक प्रभावी असते, हे त्याला पाहून आणि त्याचे त्या वेळचे प्रलाप ऐकून कुणालाही पटलं असतं. जरासंधाचा सेनापती म्हणून आणि रुक्मिणीचा विवाहपूर्व अयशस्वी वर म्हणून त्याला श्रीकृष्णावर प्रतिशोध घ्यायचा होता. त्यासाठीच तो हवा तसा बोलत होता. तो तसाच बोलत राहिला तर त्याच्या कंठाचा कुंभ तडकेल की काय असंच सर्वांना वाटू लागलं! अतिशय अर्वाच्य भाषेत सुचतील ते अपशब्द योजून तो मस्तकावरचा तोल गेल्यासारखा अद्वातद्वा ओरडत होता. श्रीकृष्णाची कुणी कधी केली नसेल आणि ऐकली नसेल अशी असह्य अवहेलना करू लागला. त्याचा प्रत्येक शब्द पेटत्या दीप्ती बाणासारखा होता. ''गवळणींत नाचणाऱ्या कामुका नर्तका, आपल्या मामाची हत्या करणाऱ्या कुलघातक्या, जरासंधाच्या पौरुषाला पाठ दाखविणाऱ्या भेकडा, क्षत्रियांनी आणि ब्राह्मणांनी मांडलेल्या या पवित्र यज्ञासाठी मथुरेच्या गवळीवाड्यातून हवीचं दूध कावडींनी आणून देऊन त्याचं दाम मोजून घेऊन चालतं न होता, त्या पवित्र सुवर्णसिंहासनावर बसून एका उच्च कुलस्थ क्षत्रियाकडून स्वतःचे अमंगळ पाय धुऊन घेताना तुला थोडीसुद्धा लज्जा कशी वाटली नाही?'' क्रोधानं अंध झाल्यामुळे चैत्रातल्या पळसासारखा तो फुलून निघाला होता. प्रत्यंचेसारख्या त्याच्या कंठाच्या धमन्या ताठर झाल्या होत्या! संतापानं तो अंगभर नुसता थरथरू लागला.

त्याच्या प्रत्येक शब्दाबरोबर ऐकणाऱ्यांच्या छातीत भीतीचा गोळा उठला. श्रीकृष्णाची मान हळूहळू भुजंगफण्यासारखी ताठ होऊ लागली! आपले दोन्ही हात कमरेवर ठेवून शिशुपालाला सावध करण्यासाठी निर्वाणीच्या वाणीत तो निक्षून म्हणाला, ''शिशुपाल, तुझे नव्व्याण्णव अपराध आजवर मी सहन केले आहेत! तुझ्या मातेला तुझे शंभर अपराध मी सहन करीन असं वचन दिलं आहे. आता मात्र प्रत्येक पळ तुझ्या जीवनमरणाची सीमारेषा खेचून जवळ आणीत आहे! सावध हो आणि संयम कर! युद्धाखेरीज अन्य ठिकाणी संयम हाच क्षत्रियांचा धर्म आहे! माझी सहनशीलता

पराकोटीला जाईपर्यंत ताणशील, तर तिचं संहारक सुदर्शनात रूपांतर होईल!''

"तत्त्वज्ञान सांगणाऱ्या भेकडा, पुरुषार्थ हाच जर क्षत्रियांचा धर्म असेल आणि तू खरा क्षत्रिय असशील तर असा या यज्ञमंडपाच्या मध्यभागी येऊन या चेदिराजाशी द्वंद्व खेळ!'' हातातील गदा दूर फेकून सरळ त्यानं श्रीकृष्णावर दृष्टी रोखून आपले दंड थोपटले! त्याच्या त्या दंड थोपटण्यानं सर्वांच्या कानठळ्या बसल्या. श्वास नाकपुड्यांत अडखळले.

मला ओरडून सांगावसं वाटलं की, "शिशुपाल, संपलास तू! सागराच्या भरतीलाही फुगण्याची सीमा असते!''

एकाएकी पूर्वी कधीही न ऐकलल्या अपरिचित सहस्त्र वाद्यांच्या कर्कश आवाजांनी मंडप डळमळू लागला! तो आवाज कुठून येत होता ते कुणालाही कळेना! माझ्या डोळ्यांपुढं तर तेजाची वलयंच वलयं गरगर फिरू लागली! सर्वांची दृष्टी श्रीकृष्णावर अचल खिळली. नील देठावर नीलकमल असावं तसं त्याचं निळ्या शरीरावरचं नीलवर्णी मुख एकदम गंभीर झालं. महाद्वाराची भव्य कवाडं मिटली जावीत तसे त्यानं आपले विशाल नेत्र मिटून घेतले. क्षणातच त्याचं शरीर अंगारावरची लाही फुलावी तसं फुलू लागलं. क्षणापूर्वी नीलकमलासारखं दिसणारं त्याचं मुख क्षणातच अंगारासारखं रक्तवर्णी दिसू लागलं. हळूहळू वाढत त्याच्या मुकुटाचा मयूरपंखी शिरपेच हां-हां म्हणता मंडपाच्या छताला जाऊन भिडला! त्याचं शरीर जसजसं वाढत होतं तसतसं माझं शरीर अधिकाधिक तप्त होत होतं! मी ज्या आसनावर बसलो होतो ते आसन वितळणार की काय अशीच मला शंका वाटू लागली. शरीरात केवळ उष्णतेच्या प्रचंड लाटाच लाटा उफाळत होत्या. त्याच्या वाढत्या शरीराबरोबर माझं शरीर का तप्त व्हावं म्हणून मी त्या विशाल देहाकृतीकडे निरखून पाहिलं. त्या आकृतीला चार हात होते! क्षणापूर्वीच ज्या हातानं शुष्क काष्ठांची समिधा उचलली होती त्या हातात तेवढ्याच सहजतेनं पेललेली एक अवजड गदा दिसू लागली! त्यामागील हातात तेवढ्याच तेजाची वलयं फेकीत गरगर फिरणारं, बारा आऱ्यांचं, वज्रनाभीचं एक दातेरी चक्र होतं! त्या देहाकृतीचे दीर्घ ओठ पूर्णपणे मिटले होते. तरीही मेघांच्या गडगडाटाला लाजवील असा – सहस्त्र वाद्यांच्या कलकलाटालाही भेदणारा कणीमय धारदार ध्वनी बाहेर पडला. मंडपाला चिरत तो आमंत्रितांच्या कानांतून सरळ हृदयात घुसला! कितीतरी खोल!

"शिशुपाल, तुझे शंभर अपराध संपले! विश्वकर्ता ब्रह्माही आता तुला तुझ्या जिवाचं दान करू शकणार नाही! क्षत्रियत्वाच्या खोट्या अहंतेनं उन्मत्त झालेल्या दुर्बल जिवा, विसरलास की भरतीच्या सागरालासुद्धा उन्मत्तपणे उसळण्यासाठी मर्यादा असते! सावर आणि मृत्यूच्या सत्याला तोंड देण्यासाठी वीरासारखा सिद्ध हो! यापुढं एकशे एकावा अपराध तुला करताच येणार नाही! ती संधी तुला आता कधीच मिळणार नाही!''

त्यानं आपले मिटलेले दीर्घ नेत्र उघडले आणि एक क्षणभरच शिशुपालाचा वेध घेऊन हातातील तेजोवलय फेकणारं मंत्रभारित सुदर्शनचक्र शिशुपालाच्या रोखानं प्रक्षेपिलं! झंझावातातील देवदार वृक्ष धिप्पाड असूनही थरथर कापतो तसा शिशुपाल आता थरथर कापू लागला! क्षणापूर्वी पर्वतासारखा कणखर आणि खंबीर वाटणारा तो क्षणातच त्या भव्याकृतीपुढं मातीच्या ढेकळासारखा क्षुद्र वाटू लागला. क्षत्रियत्वाच्या अहंतेनं उन्मळून क्षणापूर्वी लाल झालेलं त्याचं मुख क्षणातच अदय मृत्यूच्या जाणिवेनं काळंठिक्कर पडलं! सर्व यज्ञमंडपभर हाहाकार उडाला. सगळीकडे असह्य दीप्तिमान

प्रकाश दाटला होता. जलाच्या सुवर्णकुंभांवरून तो परावर्तीत होत होता. 'सूऽऽ' असा कर्कश शिळेसारखा आवाज काढीत चक्र शिशुपालाच्या दिशेनं पुढं सरकू लागलं. माझं मन कुतूहल, आश्चर्य, उत्सुकता, करुणा यांनी भरून गेलं. प्राणाच्या भयानं व्याकूळ झालेला शिशुपाल त्या देदीप्यमान प्रकाशवलयं फेकणाऱ्या चक्राचा मारा चुकविण्यासाठी मंडपातील राजांच्या आसनांमागं लपण्याचा केविलवाणा प्रयत्न करू लागला. त्याची ती धडपड पाहताना जिवाला जगण्याची किती तीव्र आसक्ती आहे याची प्रचिती येत होती. क्षणापूर्वी श्रीकृष्णाला पळपुटा म्हणणारा शिशुपाल आपल्यापुढं मृत्यू उभा ठाकताच स्वत: पळू लागला! पण तो ज्या-ज्या राजाच्या आसनामागं लपण्याचा यत्न करीत होता ते-ते सर्व राजे चक्रातून बाहेर फेकल्या जाणाऱ्या दाहक तेजोवलयांपासून स्वत:चं रक्षण करण्यासाठी जिवाच्या आकांतानं आसनं सोडून इतस्तत: आश्रयासाठी धावू लागले. समरांगणात शार्दूलासारख्या डरकाळ्या फोडणारे ते विक्रमी योद्धे त्या चक्रापुढं क्षणभरही थांबू शकत नव्हते! मंडपातील सर्व आसनं पटापट मोकळी होऊ लागली. भेदरलेला शिशुपाल थरथरत ती चपळाईनं पालटू लागला. तेजाचे असह्य स्त्रोत मुद्रेवर पडताच त्यापासून पोळून निघू नये म्हणून आपल्या पुष्ट हातांनी तो मध्येच आपली मुद्रा आच्छादून घेऊ लागला. पळापूर्वीचा त्याचा क्षत्रियी अभिनिवेश आता लवमात्रही शिल्लक राहिला नव्हता.

धावता-धावता मध्येच तो त्यानं स्वत:च फेकलेल्या गदेच्या दंडावर पाय पडून तोल गेल्यामुळे पर्वतशिखरावरून पाषाण कोसळावा तसा उभ्यानंच धाडकन खाली कोसळला! वेध घेण्यासाठी चक्र त्याच्यावर एकदम झेपावलं! चपळाईनं झटकन उठून तो परत आसनांच्या रांगेत घुसला. चक्राच्या असह्य उष्णतेनं त्याची गदा मात्र वितळून गेली! ते चक्र यज्ञमंडपाची राख करणार की काय या भयानं ऋषींनीसुद्धा मंडप सोडला! मंडपात मी, शिशुपाल आणि ती भव्याकृती यांशिवाय कोणीच नव्हतं! चक्राचा कर्कश आवाज क्षणाक्षणाला तीव्रतेनं वृद्धिंगत होऊ लागला. माझ्या शरीराचा कणन्कण फुलून निघाला! आसनावरूनच ते अपूर्व भीषण, गूढ दृश्य स्वत:ला विसरून मी एकटक पाहू लागलो. कधी नव्हतो इतका मी दिङ्मूढ झालो. श्रीकृष्ण! त्या एकाच शब्दातील अद्भुतरम्य रहस्यानं माझ्या बुद्धीला थक्क करून टाकलं.

शिशुपाल भांबावलेल्या अवस्थेत आता हवा तसा मंडपभर धावू लागला. मृत्यूच्या केवळ जाणिवेनंच त्याच्या पायांतील शक्ती नष्टप्राय झाली. मृत्यू! जणू मृत्यू त्या चक्राचे दात विस्फारून विकट हसत शिशुपालाची उत्तान जीभ निखंदण्यासाठी उतावीळ झाला होता! धावण्याच्या प्रयत्नात त्याच्या शरीरावरचं अधरीय आसनात सापडून जागजागी फाटलं होतं. उत्तरीय कुठं पडलं होतं तेही त्याला कळत नव्हतं. त्याचं उंच नि धिप्पाड शरीर वणव्यात एकाकी पेटणाऱ्या विशाल वृक्षासारखं भेसूर दिसू लागलं! सगळीकडं डोळे दिपविणारा प्रकाशच प्रकाश कोंदला होता!

एकदम धापा टाकीत शिशुपाल माझ्याच आसनासमोर आला! त्याची माझी एक क्षणभरच दृष्टिभेट झाली. दवबिंदूंनी कमल ओथंबून भिजावं तसं त्याचं रक्तवर्णी सतेज मुख स्वेदबिंदूंनी डबडबलं होतं. किती अपार कारुण्य, असीम भयाकुलता आणि हृदय पिळवटणारी पश्चात्तापदग्धता त्याच्या डोळ्यांच्या बाहुल्यांत एकवटली होती! एका विशाल देशाचा अभिषिक्त राजा असूनही तो मृत्यूच्या द्वारातील एक नगण्य भिक्षुक वाटत होता! पण... पण त्या तशा अवस्थेतही आपण क्षत्रिय आहोत हा अहंगंड काही

त्याच्या मनाला सोडवत नसावा, कारण मला पाहून प्राणाच्या आकांतानं तो मुळीच किंचाळला नाही की, ‘‘कर्णा, मला वाचव!’’ कारण त्याला त्या स्थितीतही मी एक सूतपुत्र होतो आणि तो एक क्षत्रिय होता याचा विसर पडलेला नसावा!

चक्र शीळ घालत तसंच त्याचा पाठपुरावा करीत माझ्या आसनासमोर आलं. तरीही मी आसनावर शांत बसलेला पाहून त्याच्यातील मानी क्षत्रियाचं मन बिथरलं. एका सूतपुत्राला पीडा न देणारं हे चक्र केवळ आपणालाच काय करणार या कल्पनेनं गर्रकन वळून त्यानं कसलाही विचार न करता शेवटी सरळ सुदर्शनालाच हात घातला! पण त्याचा हात पोळून निघाला! काळाठिक्कर पडला! आता मात्र त्याच्या धैर्याचे बांध तटातट तुटले. भ्यालेल्या सशासारखा पटकन उडी मारून तो माझ्यामागं आला आणि वारुळात भुजंग शिरतो तसा माझ्या आसनाखालच्या निरुंद पोकळीत आपलं मस्तक खुपसून लपू लागला. सुदर्शन भयाण शीळ घालत माझ्यासमोर मंडलाकृती घोंगावत फिरू लागलं. मी कोण आहे हे माझं मलाच कळेना! शिशुपालाच्या वितळलेल्या गदेच्या रसासारखं माझं शरीर मला असह्य उष्ण भासू लागलं! त्या तेजस्वी चक्राकडे मी एकटक पाहू लागलो. त्यातून निघणारी तेजोवलयं अस्ताचलाच्या सूर्यदेवांच्या किरणशलाकेसारखी उबदार आणि मला हवीहवीशी वाटू लागली! ते चक्र नव्हतंच, जणू मावळतीचे सूर्यदेव माझं नेहमीचं सूर्यास्ताचं अर्घ्य मागायला यज्ञमंडपातच आज आले होते! आसनावरून ताडकन उठून मी अर्घ्यासाठी म्हणून ओंजळ धरली! हातात जल नव्हतं, तरीही ती भावनांची ओंजळ मी अर्पण केली. तरीही ते चक्र घोंगावत प्रदक्षिणा घालीत तसंच माझ्यासमोर फिरू लागलं. मी माझे डोळे त्याच्यावर अचलपणे रोधले होते! माझ्यासमोर तेजाचे कोटचवधी कण गरगर फिरत होते.

‘‘कर्ण, आसन सोड! यज्ञवेदीजवळ चल!’’ छताला भिडलेल्या भव्याकृतींच्या मुखातून अधिकारवाणीत शब्द आले! मी काय करतो आहे हे माझं मलाच समजलं नाही. भारावल्यासारखा सरळ आसनावरून उठलो आणि यज्ञवेदीच्या दिशेनं चालू लागलो! वेदीजवळ येताच माझं मस्तक जिच्या गुडघ्याला टेकलं असतं अशी ती विशालाकृती कशाची आहे म्हणून निरखू लागलो. गतिमान अशा गरगर फिरणाऱ्या दिव्य तेजःकणांनी ते सर्व शरीर भरलं होतं! केवळ तेजाचे रसरसणारे गतिमान कण!

मी आसन सोडताच चक्र शिशुपालाचा पुन्हा पाठलाग करू लागलं! शिळेचा आवाज वाढू लागला म्हणून मी माघारी वळून शिशुपालाकडे पाहिलं. मंडपात आपणाला कुणाचाच आधार नाही, याची खात्री होताच तो रथाच्या शर्यतीच्या घोडचासारखा सुसाट धावत मंडपाचं प्रवेशद्वार ओलांडून राजवाडचाच्या प्राकाराबाहेर पडला होता. अंगावरच्या फाटक्या वस्त्रांचंही त्याला भान नव्हतं. मध्येच तो मागं वळून चक्रातील आणि आपल्यातील अंतराचा भयाकुल मुद्रेनं वेध घेत होता. त्याच्या मुद्रेवरील प्रत्येक भाव मानव मृत्यूला किती घाबरतो हे विविध छटांनी दाखवू लागला! कधी राजवाडचाच्या बांधकामापासून शिल्लक राहिलेल्या पाषाणामागं तर कधी विशाल वृक्षामागं तो आश्रयासाठी लपण्याचा प्रयत्न करू लागला, पण मानवाप्रमाणं अवघा निसर्गही त्याचं रक्षण करायला असमर्थ ठरला. दुरून तो जीवनमरणाचा पाठशिवणीचा अद्भुत खेळ पाहताना प्रत्येकाच्या अंगावर रोमांच उभे राहिले. शेकडो डोळ्यांच्या उत्सुक बाहुल्या सुदर्शनाबरोबर गरगरू लागल्या.

आश्रयाचे सर्वच मार्ग खुंटल्यामुळे गलितगात्र झालेला शिशुपाल शेवटी सरळ

राजवाड्यासमोरच्या इक्षुमती नदीच्या पात्रात शिरला! चक्राचा मारा चुकविण्यासाठी तो क्षणाक्षणाला अधिकाधिक सखोल पाण्यात उतरू लागला! त्याचं मुख मात्र मंडपाकडेच होतं. पाय, मांड्या, कंबर, छाती असा त्याचा एक-एक अवयव हळूहळू पाण्याखाली अदृश्य होऊ लागला. शेवटी कंठापर्यंत जलौघ येईपर्यंत तो चिकाटीनं आत शिरला, पण कंठाला पाणी लागताच निरुपायानं थांबला! त्यानं निर्धारानं आपले डोळे मिटून घेतले असावेत. पोळलेल्या काळ्या ओंजळींचं आच्छादन मुखावर घेऊन आपल्या मनाचे धागे त्यानं मृत्यूच्या अटळ सत्याला तोंड देण्यासाठी निर्धारानं एकत्र बांधले! क्षणातच चक्र चपळाईनं त्याचा कंठभेद करून गेलं! देठ तुटलेल्या गुलाबी कमलपुष्पासारखं त्याचं मस्तक क्षणात इक्षुमतीच्या उफाळणाऱ्या लाटांत अदृश्य झालं! उभारीच्या शिशुपालाचं जीवन संपलं! चक्रही गतीनं पात्रात शिरलं. जणू त्या उन्मत्तपणे बोलणाऱ्या जिभेचा त्या चक्राला त्या पाण्यातही वेध घ्यायचा होता!

मावळतीच्या सूर्यकिरणांत इक्षुमतीचं विशाल पात्र चमकू लागलं, पण नेहमीसारख्या त्या पात्राच्या जललहरी शुभ्र नव्हत्या! त्या पात्राच्या काही जललहरी लाल दिसू लागल्या! विस्मय, करुणा, संभ्रम, कुतूहल अशा विविध भावनांनी माझं मन सुन्न झालं! धरतीत रोवलेल्या मल्लस्तंभासारखा वेदीजवळ निश्चल उभा राहून मी इक्षुमतीच्या पात्राकडे पाहू लागलो. हिंदकळणाऱ्या जललहरींशिवाय तिथं काहीच दिसत नव्हतं! केवळ जललहरी! लपलपणाऱ्या, नि:शब्द! माझ्या मनातही तशाच प्रश्नांच्या विचारलहरी लपलपत होत्या! श्रीकृष्ण कोण असावा? त्याच्याकडे ते दाहक चक्र कसं? माझ्या शरीरावर ते का परिणाम करू शकलं नाही? मी कोण आहे? मनात आणलं असतं, तर मी शिशुपालाला आज वाचविलं असतं काय? श्रीकृष्णाच्या वृद्धिंगत होणाऱ्या शरीराबरोबर माझं शरीर पण तप्त का झालं? माझ्या मनात असंख्य प्रश्न उभे राहिले. पण उत्तर मात्र एकाही प्रश्नाचं मिळेना!

त्या दिव्य शरीरात आणि आपल्यात काय फरक आहे तो पाहावा म्हणून इक्षुमतीच्या पात्रावरून मी मागं छताकडे दृष्टी फेकली. तिथं कुणीच नव्हतं! युधिष्ठिरानं मांडलेल्या सुवर्ण सिंहासनावर बसून कृश अंगलटीचा सावळा श्रीकृष्ण उजव्या हाताच्या बैठकीवर उजव्या हाताचा कोपर टेकवून उजवा तळहात उजव्या गालावर टेकवून उजवीकडे थोडंसं कलून माझ्याकडे पाहत मंदपणे हसत होता! त्याच्या अंगलटीपेक्षा ते सुवर्णसिंहासन फारच मोठं वाटत होतं!

मला सत्य काय आणि किमया काय तेच कळेना! मंडपाबाहेरील राजेयोद्धे आणि ऋषिजन मिळतील तसे आत घुसून त्याच्या सुवर्णसिंहासनापुढं पटापट लोळण घेऊ लागले. श्रीकृष्ण ऋषिजनांना सौम्य शब्दांत म्हणाला, "सूर्यास्त होतो आहे. मुहूर्त टाळू नका. राजसूय यज्ञाची पहिली समिधा आज सूर्यास्तापूर्वी यज्ञकुंडात पडलीच पाहिजे."

यज्ञमंडप क्षणापूर्वीचं चित्तथरारक नाटच विसरून तत्परतेनं हलू लागला. ऋषिगण उच्च रवात मंत्र घोषवू लागले. युधिष्ठिरानं पुन्हा श्रीकृष्णाचे चरण धुतले. श्रीकृष्णानं शांतपणं उठून बल्वजाची एक मोळी यज्ञकुंडात अर्पण केली. त्यानंतर घडाघड मंत्र म्हणत ऋषिमुनी समिधांवर समिधा यज्ञकुंडात अर्पू लागले. त्या समिधांचा धूर माझ्या डोळ्यांत दाटू लागला. केवळ धूर! डोळ्यांपुढं समिधांचा धूर, मनापुढं संभ्रमाचा आणि साशंकतेचा धूर!! श्रीकृष्णाजवळ सुदर्शन होतं मग ते त्यानं जरासंधावर कधीच का सोडलं नाही? जरासंधाच्या सततच्या स्वाऱ्यांचा त्रास

चुकविण्यासाठी तो द्वारकेला का गेला? जो जरासंध मला शरण आला तो श्रीकृष्णाला मात्र कसा सतावू शकला? काही-काही समजत नव्हतं!

धूर डोळ्यांत गेल्यानं डोळ्यांत दाटलेलं पाणी टिपावं म्हणून उत्तरीयाचा शेव मी पापण्यांच्या कडांना लावला. कुणीतरी माझ्या खांद्यावर हात ठेवला होता. तो अश्वत्थामन् होता.

''चल, तूही एक समिधा यज्ञकुंडात अर्पण कर.'' तो शांतपणे इक्षुमतीच्या पात्राकडे बघत म्हणाला.

त्याच्यासमवेत जाऊन मीही एक औदुंबराची समिधा कुंडात अर्पण केली. यज्ञमंडप सोडताना विचारमग्न झालेला उंच अश्वत्थामा स्वत:शीच पुटपुटला ''काहीच कळत नाही!''

''काय कळत नाही?'' तो काय म्हणत होता ते मला नीट कळलं नाही.

''या श्रीकृष्णाबद्दल म्हणतोय मी. आज त्यानं वधलेला शिशुपाल कोण असावा असं वाटतंय तुला?''

''कोण होता तो?''

''श्रीकृष्णाचा आतेबंधू! श्रीकृष्ण-पिता वसुदेव याची सख्खी भगिनी चेदिराज दमघोषाला दिली आहे. तिचं नाव आहे श्रुतश्रवा. शिशुपाल हा दमघोष आणि श्रुतश्रवा यांचा पुत्र होता. श्रीकृष्णाचा आतेबंधू! जसे राजमाता कुंतीदेवींचे पांडव नात्याने कृष्णाला आहेत तसा.''

'कुंतीदेवींचे पुत्र!' मी मध्ये थांबलो. काही बोलावंसं वाटत नव्हतं. एकच एक प्रश्न सारखा मस्तकात भिरभिरत होता... श्रीकृष्ण कोण असावा?

**

# चार

राजसूय यज्ञ संपला. आम्ही अविस्मरणीय स्मृतींची गाठोडी घेऊन हस्तिनापुराकडे परतू लागलो. माझ्या मनात श्रीकृष्णाविषयीच्या विचारांचं थैमान माजलं होतं. रथ हस्तिनापुराकडे धावत होता. सत्यसेनाला उठवून मी स्वत: घोड्यांचे वेग हाती घेतले. आसुडाचा तडाखा मारताच आयाळ विस्कटीत ते धावू लागले. माझ्या मनाची घडीही साफ विस्कटली होती.

पांचालांच्या राज्यात स्वयंवराच्या दिवशी मी श्रीकृष्णाची स्वत: भेट घेतली होती, माझं हसतमुखानं स्वागत करीत त्यानं माझ्याशी अनेक विषयांवर चर्चा केली. ज्या वेळी माझ्या बोलण्यात दुर्योधनाचा ओघानं निर्देश आला त्या वेळी मध्येच मला थांबवून त्यानं एक विषयपालट करणारा विचित्र प्रश्न विचारला होता. त्यानं विचारलं होतं, ''कर्ण, अरण्यात मुक्त फिरणारा शक्तिशाली वनराज मेंढरांच्या कळपात आणून सोडला तर त्याचं काय होईल?''

''दुसरं काय होणार? तो क्षणातच त्या मेंढरांचा फडशा पाडील!'' मी उत्तर दिलं.

''पण तसं नेहमीच घडतं असं नाही! त्यांचा फडशा तर दूरच राहो; पण आपलंच अस्तित्व विसरून कधी-कधी तो त्या मेंढरांसारखाच वागू लागतो!''

''ते कधीच शक्य नाही! मग तो वनराजच कसला?'' मी त्याला विरोध केला. तो हसत म्हणाला, ''ते जाऊ दे! तू आज स्वयंवरात भाग घेऊ नयेस हेच ठीक! निदान मी माझ्या उजव्या पायाचा अंगठा होकारासाठी वर उठवीत नाही तोपर्यंत तरी घेऊ नयेस!''

मी त्याप्रमाणं त्याचा होकार मिळेपर्यंत संयम राखला होता. पण शेवटी मी त्या स्वयंवरात भाग घेऊ शकलो नाही. मला होकार देण्यात काही चूक केलीस का? असा त्याला प्रश्न विचारावा म्हणूनच मी चापातून तो सूची बाण त्याच्या अंगठ्यावर सोडला होता! पण त्या बाणाच्या जखमेचा व्रणही त्याच्या अंगठ्यावर मला यज्ञाच्या वेळी दिसला नाही! इतक्या अल्पावधीत तो व्रण त्याच्या अंगठ्यावरून कसा काय अदृश्य झाला असेल?

त्याच्या विषयीच्या सर्वच स्मृतींत अशी गूढता होती. संभ्रमात गटांगळ्या खायला लावणारी रहस्यमयता होती. यज्ञाच्या वेळचं त्याचं सर्व वागणं म्हणजे केवळ विचार आणि चिंतन करायला लावणारं एक कोडं होतं! क्षणात तो छताएवढा विशालकाय झाला काय आणि क्षणात आपल्या आत्तेच्या पुत्राला होत्याचा नव्हता करून पुन्हा आसनावर शरीर आखडून बसला काय? सर्वच नवलपूर्ण होतं. रथाच्या चक्रानं कण्याभोवती फेऱ्या माराव्यात तसं माझं मन श्रीकृष्णाभोवतीच फिरू लागलं अन् फिरता-फिरता कृष्ण अलौकिक आहे, या निर्णयावर येऊन ते थांबू लागलं.

रथात शेजारी बसलेल्या दुर्योधनाला मी विचारलं, ''तुझं मत काय आहे श्रीकृष्णाविषयी?''

''कर्ण, तू पराक्रमी वीर असूनही त्या काळ्या चेटक्याच्या जाळ्यात गुरफटलास की काय?'' त्याच्या जाड भुवया वळवळल्या.

"चेटक्या!" अंगाला विजेचा लोळ डसल्यासारखा मी ओरडलो.

"चेटक्या नाहीतर काय? शरीर बदलणं, निरनिराळ्या वाद्यांचे कर्कश आवाज काढणं, हे चेटूकविद्या अवगत असणाऱ्यांशिवाय अन्य कुणाला जमणार?" तो काहीच झालं नाही अशा आविर्भावात सहज म्हणाला.

मी त्याच्या अनपेक्षित उत्तरानं अधिकच संभ्रमात पडलो. संभ्रम हेच माझं जीवन आहे की काय असं मला वाटू लागलं. विचारांच्या सुया मस्तकाचे टाके उसवताहेत या कल्पनेनं मस्तक भणाणून गेलं. असाहाय्यतेनं मी माझा डावा तळहात मस्तकावर दाबण्यासाठी वर नेला. त्या तळहाताला मुकुटाचा स्पर्श होताच माझं आश्चर्य उफाळून गेलं! माझा मुकुट तर दुर्योधनाच्या मस्तकावर स्पष्टपणे दिसत होता. घाईघाईनं मी मस्तकावरचा मुकुट काढून पाहिला. त्याची घडण होती छताला टेकलेल्या श्रीकृष्णाच्या मुकुटासारखी! माझ्या मस्तकावर तो कसा, हे काही मला कळलं नाही.

हातातील आसूड मी घोड्यांच्या पाठीवर सपासप ओढू लागलो. वायुवेगानं त्यांनी हस्तिनापूर गाठलं. नगरातून निघताना मी श्रीकृष्णाच्या ओढीनं गेलो, पण येताना मात्र त्याच्याविषयीच्या कधीही न संपणाऱ्या शंकांचं गाठोडं घेऊन परत आलो! त्यातली एक शंका होती, ते त्याचं चक्र मला का पोळू शकलं नाही? केवळ अभेद्य कवचामुळे काय? दुसरी शंका होती ती, त्याची आज्ञा ऐकून एखाद्या आज्ञाधारक सेवकासारखा मी यज्ञवेदीजवळ कसा गेलो? आणि तिसरी शंका होती, श्रीकृष्णाचा मुकुट माझ्या मस्तकावर कुणी, कधी, कशासाठी ठेवला?

**

# पाच

पांडवांच्या अमात्यांनी, पांडवांनी राजसूय यज्ञाची सर्व राज्यं जिंकण्याची अट कशी पूर्ण केली याचं रसभरीत वर्णन आम्हाला इंद्रप्रस्थात ऐकविलंच होतं. त्या सर्व राज्यांची नामावली माझ्या कानांत घुमत होती. त्यांनी एक-एक दिशा निवडून त्या मार्गात येणारी सर्व राज्यं जिंकली होती. जिताकडून सुवर्ण, रूपं, चांदी, हिरे, माणकं, प्रवाल, पाचू, मोती, वैदूर्य, पुष्कराज, नीलमणी, गायी, गज, अश्व आणि दास यांची खंडणी गाड्यांनी नि तांड्यांनी भरून आपल्या भांडारात आणून ओतली होती. संपत्ती हे कोणत्याही साम्राज्याचं सर्वश्रेष्ठ साधन आहे. संपत्तीशिवाय राज्यं चालू शकत नाहीत. चालली तरी टिकू शकत नाहीत. म्हणूनच आपणही एक दिग्विजय करावा, अशी प्रबळ महत्त्वाकांक्षा माझ्या मनात इंद्रप्रस्थातच रुजली. पांडवांनी एक-एक दिशा निवडून दिग्विजय केला होता. आपण एकटयानंच आठ दिशांचा दिग्विजय करायचा असा मी तिथं मनोमन निर्धारही केला!

अशा दिग्विजयासाठी पादाक्रांत करावे लागणारे राजे किती असावेत, त्यांचं सामर्थ्य काय असावं, कोणत्या ॠतूंत हा दिग्विजय यशस्वी होईल यावर मी एकट्यानंच दीर्घ विचार केला होता.

अर्थातच दिग्विजयाची सुरुवात मी पूर्व दिशेकडूनच करणार होतो. हस्तिनापूर राज्याच्या पूर्व दिशेला सर्वांत बलाढ्य दोन राज्यं होती. एक द्रुपदाचं पांचाल राज्य आणि जरासंधाचं मगधराज्य! यांशिवाय कोसल, अयोध्या, काशी, विदेह, वत्स, कुंतल, मुंड, पुंड्र, उत्कल, ओड्र, अंग आणि वंग अशी राज्यं होती.

दक्षिण दिशेला सर्वांत सामर्थ्यशाली राज्य होतं यादवराज उग्रसेनाचं मथुराराज्य! याच राज्याला शूरसेनराज्य असंही म्हणत होते. याशिवाय दक्षिणेला शाल्व, चेदी, कुरुष, दशार्ण, अवंती, निषाद, मेकल, दक्षिणकोसल, वैणिक, विदर्भ, महारठ्ठ, आनर्त आणि मालव, मत्स्य अशी राज्यं होती. आनर्त राज्याजवळ श्रीकृष्णानं वसविलेलं नूतन द्वारकेचं राज्य होतं. पश्चिम सागराच्या किनाऱ्यावर उभं असलेलं.

पश्चिम दिशेला मात्र बलशाली अशी दोन राज्यं होती. एक ॠतायनपुत्र शल्याचं मद्र आणि दुसरं बाल्हीक. यांखेरीज वातधान, सौभीर, सिंधू, पंचनद, अंबष्ठ, त्रिगर्त, कैकेय, शिबी, कांबोज आणि गांधार अशी राज्यं होती. दिग्विजयाच्या दृष्टीनं पश्चिम दिशा ही अतिशय प्रभावी विरोधी ठरली असती.

उत्तर दिशेला कुलिंद, राक्षस, तंगण, खश आणि किरात ही राज्यं होती.

कितीही वायुवेगानं धाव ठेवली असती तरी हा एवढा अफाट प्रदेश जिंकण्यासाठी, लागणारं सैन्य घेऊन जाताना कमीत कमी दहा मासांचा कालावधी मला सहज लागणार होता.

एक गोष्ट मात्र मी कटाक्षानं पाळणार होतो. स्वतःचं सामर्थ्य कितीही वाढलं तरी मी मथुरेवर किंवा द्वारकेवर कधीही चढाई करणार नव्हतो! मग जगानं कोणताही अर्थ त्यातून काढला असता तरी त्याची मला खंत करायची नव्हती.

**

# सहा

आम्ही हस्तिनापुरात आलो, पण दुर्योधनाची मन:स्थिती फारच कठीण झाली होती. रात्री शयनगृहात मध्येच दचकून उठून मंचकाशेजारी उभी केलेली गदा आपल्या खांद्यावर टाकून, 'मी या इंद्रप्रस्थात आता एक पळभरही थांबणार नाही!' असं बडबडत कक्षाबाहेर धावण्याचा तो यत्न करू लागला! युवराज्ञी भानुमती त्याच्या तप्त मस्तकावर शीतल पाण्याचा शिडकावा करून, त्याचे खांदे गदागदा हलवून तो हस्तिनापुरात आहे, याची त्याला जाणीव करून देऊ लागली! भानावर येताच पाठीवर दोन्ही हातांची बोटं गुंफून गुहेत फेऱ्या घालणाऱ्या वाघासारखा तो कक्षात फिरू लागे. मध्यान्हरात्रीही कधी-कधी माझी भेट घेण्यासाठी तो मला प्रभंजनाकडून संदेश धाडू लागला.

मी समोर जाताच त्याच्या दोन्ही हातांच्या बोटांची गुंफण अधिकच आवळली जाई. अनेक प्रश्न विचारून तो मला अस्वस्थ करू लागे.

''कर्ण, पांडवांच्या यज्ञात पशूंची गणती करून मी अजून जिवंत कसा आहे याचंच मला आश्चर्य वाटतं. क्षणाक्षणाला मरणप्राय यातना देणाऱ्या या कटू घटना हृदयात जागवण्यापेक्षा विष प्राशन करून मी त्यांचा अंत का करू नये? माझ्या पूजनीय पित्याच्या अंधत्वाचा मर्मभेदक निर्देश करून त्यांच्या नैसर्गिक व्यंगावर दात काढते तीही एक य:कश्चित स्त्री! छे! वळवळत शब्दांगार पेकणारी तिची जीभ आणि विचकट हसताना माझ्या हृदयाचे शतश: खंड पाडणारे ते शुभ्र दात मी का ठेचू नयेत? आणि ठेचता येणं शक्य नसेल तर कुरू म्हणून जिवंत तरी का राहावं? कशासाठी? सांग कर्णा, कशासाठी?''

मी त्याच्या खांद्यावर हात ठेवून त्याला शांत करण्याचा प्रयत्न करी, पण तो जरी अंमळ शांत झाला तरी वरून गंभीर वाटणाऱ्या सागराचं अंतरंग किती सखोल असतं, हे कळू शकत नाही त्याप्रमाणं त्याच्या अंतरंगात काय-काय चाललं होतं हेही काहीच कळत नव्हतं! एकाएकी माझा हात हातात घेत तो मला एकदा शयनगृहाबाहेर चलण्यासाठी आग्रह करू लागला. त्याचं मन दुखावलं जाऊ नये म्हणून मध्यान्हरात्र असूनही मी त्याच्यासमवेत गेलो. मला त्यानं सरळ कुरूंच्या राजसभेतल्या राजसिंहासनापर्यंत नेलं. त्या सिंहासनाच्या इतक्या जवळ मी कधीच गेलो नव्हतो! पलित्यांच्या मंद-मंद प्रकाशात तळपणाऱ्या, सोमवंशाचं प्रतीक असलेल्या त्या सिंहासनामागच्या चंदेरी चंद्रप्रतिमेकडे बोट करून तो म्हणाला, ''तू माझा समर्थ सहचर असशील तर मानचिन्ह असलेल्या या चंद्रप्रतिमेची प्रतिज्ञा घेऊन सांग की, तू माझी साथ कधीच सोडणार नाहीस! कर्ण, मी एकाकी आहे, असं मला वाटू लागलंय.''

''आजपर्यंत तुला कधी अशा प्रतिज्ञेची आवश्यकता भासली आहे काय?''

''आज भासते आहे! मला उपदेश आणि तत्त्वज्ञान नको. तुझ्या अखंड मित्रत्वाचं निखळ वचन हवंय!''

''त्यानंच तुझं समाधान होणार असेल तर मी तुला ते देत आहे.'' मी त्यानं पुढं पसरलेल्या तळहातावर माझा तळहात ठेवला! शेजारच्या पाषाणी स्तंभात रोवलेल्या

पेटत्या पलित्यावरची इंगुदीच्या तेलाची एक ठिणगी तडकली आणि माझ्या तळहातावर पडली! पण कवचामुळे माझा हात मात्र पोळला नाही!

**

# सात

मी संधी मिळेल तेव्हा, दुर्योधनाला घडलेल्या अप्रिय घटना विसरायला सांगू लागलो. विस्मरण हे एक मनाचं दुष्प्राप्य सामर्थ्य आहे. अर्थात हे सामर्थ्य सर्वांना सहजसाध्य नसतं. मी त्याला भूतकालातल्या कटू घटना विसरायला सांगत होतो, पण स्वत: मीच त्या विसरू शकलो नव्हतो. एका घायाळ माणसानं आपली दुखरी व्यथा सावरीत दुसऱ्या घायाळ माणसाच्या व्रणावर फुंकर घालण्यासारखं होतं! पण मला ते करणंच भाग होतं. कधी-कधी तसं वागण्याशिवाय दुसरं काहीच शक्य नसतं!

'एका सारथ्याची सून होणं मी कधीच मान्य करणार नाही!' हे त्या रूपगर्वितेचे विषारी वाग्बाण मात्र एखाद्या बाणासारखे केव्हाही माझ्या मनाचा असह्य दाह करीत होते. मी संसारात रमलो होतो. सात पुत्रांचा पिता आणि दोन सुंदर स्त्रियांचा पती असूनही द्रौपदीची स्मृती मात्र मला केव्हाही उरी बाण लागलेल्या मृगासारखी चीत्कारायला लावत होती! स्मृती! स्मृतीला सुगंधी कुपी किंवा मयूरपिसं म्हणणाऱ्यांना काय कल्पना असणार की, एका स्त्रीकडून अवमानलेल्या पुरुषयोद्धयाची स्मृती म्हणजे रखरखीत मरुभूमी असते! त्या भूमीतून केवळ प्रतिशोधाच्या दाहक ज्वालाच लहलहत नित्य बाहेर पडत असतात! त्या ज्वालांत संयम, औदार्य, क्षमाबुद्धी यांचे कोवळे अंकुर केव्हाच होरपळून गेलेले असतात.

काळाच्या उदरात बरीच वर्षं गडप झाली होती! काल ही मनावरचे आघात सौम्य करणारी दिव्यौषधी आहे असं म्हटलं जातं, पण मला मात्र तसं कधीच अनुभवायला मिळालं नव्हतं. ह्या कालावधीत मला नेहमी आपण क्षत्रिय झालो असतो तर...? हा एकच विचार नित्य सतावीत आला होता. खरंच मी क्षत्रिय कुलात जन्म घेतला असता तर माझं जीवन कसं झालं असतं? युवराज दुर्योधनासारखं, शकुनीमामांसारखं की शिशुपालासारखं! हे सर्व क्षत्रियच नव्हते काय? त्यांच्यासारखं जीवन मिळालं असतं तरी ते मला आवडलं असतं काय? माझ्याजवळ हे आणि असले असंख्य प्रश्न होते. पण त्यातल्या एकाही प्रश्नाचं समर्पक आणि समाधानकारक उत्तर मात्र माझ्याजवळ नव्हतं!

मी आणि दुर्योधन! आम्हा उभयतांचं जीवन दिवसेंदिवस अधिक गुंतागुंतीचं होऊ लागलं होतं. कुणी कुणाला आधार द्यायचा हाच प्रश्न होता! काही झालं तरी दुर्योधनाला सावरणं माझं कर्तव्य होतं.

त्याला आनंदी ठेवण्यासाठी मृगया, जलविहार, रथांच्या, कुक्कुटांच्या शर्यती, धूत अशा मार्गांचा अवलंब अटळ होता. मला स्वत:ला मात्र द्युताचा भयंकर तिटकारा होता. शकुनीमामा मात्र तो खेळ खेळण्यात प्रवीण होते. त्यांच्या गांधार देशीचा तो प्रिय खेळ होता. ते दोघं मामा-भाचे घटकान्घटका धूत खेळत होते. मलास त्या बटबटीत कवडयांच्या नीरस खेळातील काहीच समजत नव्हतं. त्यात मनही रमत नव्हतं.

त्याच्या शेजारी, दुर्योधनाच्या आग्रहासाठी बसून तो कंटाळवाणा खेळ मी नीरसपणे पाहत असे. द्युताच्या त्या पटाकडे पाहताना माझं जीवनच मला त्या पटासारखं

आहे, असं वारंवार वाटू लागलं! उभे-आडवे केवळ चार पट्टे! त्या पट्टयांवर वंचनेचे, अवमानाचे आणि अवहेलनेचे असंख्य चौकोन!

एकदा खेळता-खेळता दुर्योधनाच्या बहुतेक सर्व नरदा मारल्या गेल्याचं मी पाहिलं. एकही फासा त्या दिवशी त्याच्या मनासारखा पडला नाही. सगळेच फासे मामांना अनुकूल असे पडले! त्यामुळे स्वत:वर रागावून दुर्योधनानं खेळाचा पट सरळ उधळून टाकला!

त्याच्याकडे हसून पाहत मामा म्हणाले, "वेडया, हा पट असा उधळू नकोस. मनात आणलंस तर याच पटानं तू पांडवांना भुईसपाट करशील!"

"ते कसं शक्य आहे? त्या पर्वतासारख्या भीमाला हे दोन हातांचं वस्त्र आणि या चार क्षुल्लक कवडया कशा काय भुईसपाट करतील?"

आपले बारीक डोळे अधिकच बारीक करून काळ्या दाढीच्या दाट केसावळीतून डाव्या हाताची शिडशिडीत बोटं फिरवीत क्षणभर थांबून मामा म्हणाले, "राजा, धिप्पाड असणाऱ्या गजराजाला एक साधा अंकुश कसा वठणीवर आणू शकतो? या पाच कवडया पाची पांडवांना तशाच क्षणात वठणीवर आणतील!"

"मामा, मी आजपर्यंत तुम्हाला बुद्धिमान समजत आलो, पण आज तुमच्या बुद्धीची मला खरोखरच शंका येते आहे!" दुर्योधन त्यांच्या कल्पनेचा अर्थ न समजल्यानं त्यांना म्हणाला.

"भ्रमिष्टाला भोवतीचं जगही भ्रमिष्टच दिसतं. तुझंही तसंच झालं आहे! तू भांबावला आहेस. द्रौपदीनं केलेल्या अवमानानं गेल्या अनेक रात्री तुला निद्रानाशाचा विकार जडला आहे म्हणूनच तू असं बोलतो आहेस." मामांचा प्रत्येक शब्द हृदयभेदक होता.

"मामा, मी अयोग्य काय बोललो? धूताच्या या चार पट्टयांच्या पटात तुम्ही सलग पर्वतासारखे असलेले पाच पांडव गुंडाळण्याची अतर्क्य स्वप्नं कशी काय पाहू शकता?"

"ह्या चार पट्टयांच्या पटात केवळ पाच पांडवच नाही, तर त्यांची प्राणप्रिय पांचाली आणि राजमाता कुंतीदेवीसुद्धा गुंडाळून दाखवू शकतो मी! ज्यांना धाडसाची स्वप्नं पाहायची सवय असते आणि जे आपलं प्रत्येक स्वप्न साकार करण्यासाठी झटतात तेच वीर असतात!"

"पण हे सर्व कसं काय शक्य आहे? स्वप्न आणि सत्य यांत आकाश अन् धरती इतकं महदंतर असतं आणि कोणत्याही वीराची सर्वच स्वप्नं साकार होतात असं नाही."

"तू राजा असूनही राजाजवळ आवश्यक असणारी व्यक्तिपरीक्षणाची दृष्टी तुला नाही. नाहीतर तुला हे नक्कीच पटलं असतं की, कोणतंही व्यसन हे कुठल्याही बुद्धिमान माणसालासुद्धा अध:पतनाच्या सखोल दरीत नेऊन पोहोचवू शकतं!" युवराज असूनही मामा नेहमीच दुर्योधनाला राजा म्हणत.

"व्यसन? कुणाला आहे व्यसन? आणि ते कसलं?"

"युवराज युधिष्ठिराला! द्यूत खेळण्याचं!"

"मग त्याचा आपणाला काय उपयोग?"

"राजा एकदा... केवळ एकदाच तुझ्या युधिष्ठिराला शकुनीमामासमोर द्यूताच्या शर्यतीत आणून सोड! तू आता संतापलास आणि तुझ्या मनावरचा तोल जाऊन तू पट

उधळून दिलास याहीपेक्षा अधिक प्रमाणात त्याच्या मनावरचा तोल घालवून दाखवीन मी!''

''मामा, किती बालिश बोलता तुम्ही? आता परत या हस्तिनापुरात यायला तो मूर्ख नाही.''

''तो होऊन कधीच येणार नाही, त्याला आणणं हेच तर आपलं कौशल्य आहे! बिळातले भुजंग सुखासुखी बाहेर येत नसतात. त्यासाठी बिळात धुमी घालावी लागते.''

''कसली धुमी घालणार तुम्ही त्याला इथं आणण्यासाठी?''

''यज्ञाची! इतर कोणत्याही कारणासाठी तो इथं आला नाही तरी तो धार्मिक विधीसाठी यावयाचा कधीच राहणार नाही. त्याचं उपनाम धर्म आहे हे तू विसरलास काय?''

''यज्ञ?'' कपाळाला आठ्या चढवीत दुर्योधन म्हणाला.

''होय यज्ञ! राजसूय यज्ञापेक्षा भव्य यज्ञ! विष्णुयाग यज्ञ! अमात्य वृषवर्मांना पाचारण करून आजच सर्वांना निमंत्रणं धाड!'' हातातल्या कवड्या खेळवीत मामा म्हणाले. मला त्यांच्या हातातील कवड्या मृत माणसाच्या निष्प्राण डोळ्यांच्या बुब्बुळांसारख्या भयाण वाटल्या. त्यांच्या कुठल्याच कल्पनेत कुठंही पुरुषार्थ दिसत नव्हता. त्यांचा संवाद मी निमूटपणे ऐकला होता, पण मामांच्या कल्पनेत राजकारणाच्या नावाखाली कपटाचा दुर्गंध येताच तीव्र विरोधाच्या भाषेत मी म्हणालो, ''मामा, स्वत:ला सुबलराज म्हणूवन घेता! ज्या हातात खड्ग घेऊन शत्रूला समारांगणात खडे चारावेत त्याच हातात त्या कवड्या घेऊन तुम्ही दैवाचा पाश पांडवांच्या कंठाभोवती टाकू पाहताहात! हे आपल्याला शोभादायक नाही.''

''कर्ण, राजकारण हा तुझा विषयच नव्हे! राजकारण केवळ दंडाच्या बलावर वा मनाच्या चांगुलपणावर कधीच चालत नसतं. ते बुद्धीच्या कसरतीवर चालत असतं! माजलेलं अरण्य नष्ट करायचं झालं, तर तुझ्यासारखा साधाभोळा वीर हातात परशू घेऊन जीवनभर ते एकटाच वेड्यासारखं तोडीत बसेल! पण... पण माझ्यासारखा एका ठिणगीतच त्याची वासलात लावील! चल, आठ दिशांच्या नावानं आठचं दान दे,'' असं म्हणत त्यांनी हातातील कवड्या खेळवून पटाजवळ फेकल्या. आठाचं अचूक दान पडताच बैठकीवरून टण्दिशी उडी मारून ते ओरडले, ''ते बघ, आठ म्हणजे आठच!''

त्यांच्या कर्कश आरोळीनं माझं मस्तक सुन्न झालं. मामा म्हणजे पराक्रमी क्षत्रिय आहेत की द्यूताच्या अड्ड्यातील सराईत जुगारी, तेच मला समजेना!

मी त्यांच्या बैठकीजवळून उठून बाहेर पडलो. माझ्या जीवनक्रमात तशी मी अनेक माणसं पाहिली होती, पण मामा त्यांपैकी कोणत्याच प्रकारात बसत नव्हते! विचार करीत करीतच मी वृषालीच्या कक्षात आलो. आत शिरताच वृषसेन आणि सुषेण माझ्या कमरेला बिलगले. छोटा वृषकेतु रांगत बोंबड्या शब्दांत 'ताऽ त' म्हणत माझ्या दिशेनं दुडुदुडू येऊ लागला, त्या तिघांना पाहताच मामा आणि त्यांचं राजकारण कुठच्या कुठं पसार झालं.

**

# आठ

''अंगराज, वद्य चतुर्दशीचा दिवस विष्णुयाग यज्ञासाठी निश्चित करण्यात आला आहे.'' माझ्या कक्षात कधीही न येणाऱ्या अमात्य वृषवर्मांनी स्वत: येऊन मला यज्ञाचा दिवस सांगावा याचं आश्चर्य वाटलं.

''वद्य चतुर्दशी! म्हणजे अमावस्या तोंडावर ठेवून यज्ञ करणार की काय दुर्योधन?''

''होय. मामांनी निवडलेला तो दिवस आहे. त्यात कोणत्याही कारणासाठी परिवर्तन होऊच शकत नाही.''

''मामांनी? मग यज्ञवेत्ता कोण आहे?''

''मामाच! यज्ञाच्या दिवशी पार पाडण्यात येणाऱ्या सर्व विधींना श्रद्धेचं अधिष्ठान असावं म्हणून महाराजांनी आपणाला त्या दिवशी भल्या पहाटेपासून गंगेत उभं राहून अर्घ्यार्पणानं सूर्याराधना करावी, अशी विनंती केली आहे. ते सांगण्यासाठीच मी स्वत: आपल्या भेटीसाठी आलो.'' ते जाण्यासाठी उठले, तेवढ्यात त्यांचा शोध घेणारा एक सेवक तलम वस्त्रानं आच्छादलेलं एक मोठं सुवर्णतबक हाती घेऊन आत आला. अभिवादन करून त्यानं ते तबक आमच्या समोरच्या शिसमाच्या लाकडी बैठकीवर ठेवलं.

''काय आहे ते?'' अमात्यांनी भुवया उंचावीत त्याला विचारलं.

''इंद्रप्रस्थाहून एक दूत हे तबक घेऊन आला आहे. तो अतिथिगृहात बाहेर थांबला आहे.'' तबकाजवळ जात अमात्यांनी त्यावरचं तलम आच्छादन दूर केलं. तबकात एक सुवर्णमुकुट आणि एक सुवर्णात मढविलेली गदा होती!

त्या दोन्ही वस्तू दुर्योधनाच्या होत्या, त्या पाहताच माझ्या स्मृतींचं वारूळ फुटलं घटनांच्या काळ्यातांबडया मुंग्या चटचटत वावरू लागल्या! तलावातला गटांगळ्या खाणारा दुर्योधन! परागकणांची मायावी रांगोळी! 'अंध पित्याचे पुत्र अंधच असतात म्हणायचे!' वगैरे घटनांचे त्रोटक तुकडे डोळ्यांपुढं क्षणात उभे राहिले.

''अमात्य, त्या तबकातून, दुर्योधनाच्या वस्त्रागारात पडून असलेलं सर्वांत मोठं असलेलं अधरीय आणि उत्तरीय शोधून काढून इंद्रप्रस्थाला परत पाठवा!'' मी अमात्यांना योग्य ती आज्ञा दिली. भीमाची वस्त्रं त्याच तबकातून नाही तर कुठल्या तबकातून परत पाठवायची?

सेवकानं तबक उचललं. अमात्यांमागून तो निघून गेला.

तबकातील त्या मुकुटामुळे माझ्या मनाचा चित्तरपक्षी मात्र आपल्याच चोचीनं घटनांची विविध रंगी पिसं चिवडू लागला.

शिशुपालाच्या चित्तथरारक अंताच्या दिवशी मी माझा मुकुट दुर्योधनाच्या मस्तकावर ठेवला, पण येताना माझ्याही मस्तकावर मुकुट होता. तो कुणी ठेवला? केव्हा ठेवला? आणि त्याची घडण नेमकी श्रीकृष्णाच्या मुकुटासारखीच कशी? या प्रश्नांची समर्पक उत्तरं मला कधीच मिळाली नव्हती.

भूषणागारात जाऊन जपून ठेवलेला तो मुकुट मी हाती घेतला. त्यावर साचलेले धुलिकण अंगावरच्या उत्तरीयानं हळुवार झटकले. त्या नक्षीदार शिरोभूषणावरून हात फिरवताना एक अनामिक संवेदनांची शिरशिरी माझ्या सर्वांगातून तरळून गेली. माझी मती गुंग करणारं त्या मुकुटाचं रहस्य काय असावं? पुनःपुन्हा प्रश्नांचे पत्थर मनाच्या भृशुंडीवर चढवून पाहिले. पण एकही अचूक ठरेना! तसं पाहायला गेलं तर सर्व जीवनच रहस्यानं भरलेलं असतं! आपल्या आवर्तीभोवती काय कमी रहस्यं असतात? पण त्यातील एखादंच रहस्य मनाला चुटपूट लावून जातं! अस्वस्थ करून टाकतं आणि मन त्याचा वेध घेण्यासाठी अविरतपणं त्या रहस्याच्याच मागं धावू लागतं.

हळुवार हातानं तो मुकुट मी भूषणागारातील बैठकीत बसविला. उत्सुकता ही शेवाळ्यासारखी असते. केवळ एकाच घटनेच्या खड्याभोवती ती मनाच्या जलाशयात साचत असते! तिला साचू द्यायचं नसेल तर एकच उपाय असतो. नेमका तो खडाच उचलून त्यासाठी दूर करावा लागतो! मी त्या निर्धारानं मुकुटाची आकृती डोळ्यांपुढून दूर सारली! भूषणागाराचं द्वार बंद करून घेतलं!

**

## नऊ

दुर्योधन विष्णुयाग यज्ञाच्या तयारीला लागला. हस्तिनापुराचे सेवक निकटच्या राज्यात जाऊन यज्ञासाठी आवश्यक असणारी सामग्री हस्तगत करू लागले. दुर्योधनानं दु:शासनाला मगधांच्या राज्यात कशासाठी पाठविलं होतं ते मात्र कुणालाच समजलं नाही. तशी राजवाड्यावरची काही गुप्त खलबतं मलाही कळत नसत.

पंधरा दिवसांतच दु:शासन राजगृह या मगधांच्या राजनगरीहून परत आला. माझी भेट होताच मी त्याला मगधांच्या राज्यात कशाला गेला होतास म्हणून विचारणा केली, पण त्यानं 'यज्ञाच्या तयारीला!' असं संदिग्ध उत्तर दिलं आणि कौशल्यानं प्रश्नच टाळला.

दुर्योधनाच्या यज्ञाच्या कल्पनेनं मला वास्तविक आनंद वाटायला हवा होता, पण तो वाटत नव्हता. या यज्ञात तो आपल्या संपत्तीचं नेत्रदीपक प्रदर्शन मांडणार होता. संपत्ती हे जीवनाचं अत्यावश्यक अंग असेलही; पण मला वाटे तिचं प्रदर्शन कधीच मांडू नये. मामा त्या प्रदर्शनात द्यूत मांडणार ही कल्पना तर असह्यच होती.

मामांच्या प्रत्येक कल्पनेला दुर्योधन बळी पडत चाललेला पाहताना माझ्या मनाची अवस्था मात्र कठीण होऊ लागली. मित्र म्हणून अखंड साथ देण्याचं मी त्याला वचन दिलं होतं. वैभवाच्या वेळी स्तुती करून धोक्याच्या प्रसंगी मूग गिळतात ते खरे मित्र नव्हेत. मी दुर्योधनाचा जीवश्चकंठश्च मित्र होतो. मामांच्या कल्पनेतील कटुता त्याच्या वेळीच निदर्शनाला आणणं माझं कर्तव्य नव्हतं काय? कारण पांडवांना घनदाट अरण्याचं खांडववन राज्य म्हणून देण्याची कल्पना मामांचीच होती. यज्ञाचा भुजंगही आता त्यांनीच दुर्योधनाच्या मेंदूत घुसविला होता. भावविवश दुर्योधनाला वेळीच सावध करण्यासाठी म्हणून मी एके दिवशी त्याच्या कक्षात गेलो.

तिथं तो एकटा असेल या कल्पनेचा राजकुमारी दु:शलेमुळे अपेक्षाभंग झाला. मला पाहताच ती उठून उभी राहिली. चोरट्या कटाक्षानं ती माझ्या कानांकडे पाहत असावी. मला तिचं हे पाहणं असह्य झालं. खरोखरच मला माझ्या कुंडलांचा आता वीट आला होता! तीन तपं ती माझ्या कानांना चिकटली होती, पण कशासाठी तेच मला कळलं नव्हतं. इतरांचं लक्ष मात्र ती उगाच माझ्याकडे वेधून घेत.

माझी मुद्रा दु:शलेला मुळीच दिसणार नाही, असा एक भव्य स्तंभ मध्ये ठेवून मी एका बैठकीवर बसलो! चाणाक्ष दुर्योधनानं माझी अडचण ओळखली आणि त्यानं तिला, "दु:शासनाला लागलीच पाठवून दे," असं सांगून तिथून पिटाळलं.

खाली मान घालून ती बाहेर जाताच मी सरळ मुख्य विषयाला हात घातला. "युवराजा, तुझा पराक्रमावर दृढ विश्वास आहे ना?"

"कर्णा, पराक्रम हेच तर क्षत्रियाचं जीवन असतं! आणि मी क्षत्रियच आहे. या प्रश्नाचं प्रयोजन?"

"मग कोणतीही कल्पना साकार करण्यासाठी तू पराक्रमाचा मार्ग का स्वीकारत नाहीस?"

“सर्वच कल्पना पराक्रमावर सफल होत नाहीत म्हणून आणि राजकारण हाही एक महान पराक्रमच आहे.” माझ्या प्रश्नाचा रोख लक्षात येऊन त्यानं उत्तर दिलं.

“राजकारण हा पराक्रम कसला?”

“बुद्धीचा!” आपल्या हातातील कवड्यांचा खुळखुळ असा आवाज काढीत तो म्हणाला.

“आपणाला हा पराक्रम शोभा देणारा आहे, असं तुला खरोखरंच वाटतं काय?”

“का वाटू नये? विक्रमी जरासंधाला श्रीकृष्णानं केवळ दंडाच्या सामर्थ्यावर मारलं असं तुला वाटतंय काय? राजकारण म्हणजे नाकासमोर जाणारा सूची बाण नव्हे. तो परिस्थितीप्रमाणं वेडीवाकडी वळणं घेणारा जिद्म बाण असतो! आणि ज्याला तू पराक्रम, पराक्रम म्हणतोस त्याची पत्रास पांडवांनी तरी केव्हा आणि कुठं ठेवली?”

“काय केलं त्यांनी?”

“काय केलं नाही? मला आणि दु:शासनासह माझ्या सर्व बंधूंना त्यांनी लहानपणी एक उपेक्षित दासापेक्षा वेगळी कोणती वागणूक दिली? माझं राहू दे, पण तुझी स्वत:ची झालेली घोर अवहेलना कशी काय विसरू शकतोस तू? आखाड्यातल्या भीमाचा निर्दय आसूड तुझ्या पाठीवर अजून वाजत नाही काय? द्रौपदीच्या विषारी शब्दांची तुला विस्मृती पडली काय? अंगी पराक्रम असूनही तू त्यांच्या हृदयशून्य वागणुकीचा का प्रतिशोध घेऊ शकला नाहीस? सांग, पराक्रम हेच केवळ जीवनाचं सूत्र असेल तर तू स्वस्थ कसा? आपल्या पुत्राचा वध ज्यानं क्रूरपणानं स्वयंवरमंडपासारख्या मंगल स्थानावर केला त्याचा तरी प्रतिशोध...”

“प्रतिशोध! प्रतिशोध! तुझ्या मनाची ही असली भावना का झाली आहे हेच मला कळत नाही.”

“प्रतिशोध ही कोणत्याही माणसाच्या मनाची मूळ भावना कधीच असत नाही! अवमानित मनाची ती केवळ प्रतिक्रिया असते! कुणीही कुणाचा स्वाभिमान दुखवू नये आणि दुखविल्यास प्रतिशोधाचा तडाखा बसताच कधीही विव्हळू नये. गेली दोन तपं माझ्या मनाची ठेवण अशी कशी; याची कुणीतरी कधी विचारणा केली आहे काय? या एवढ्या सेवक-सैनिकांनी फुललेल्या वैभवी वास्तूत दुर्योधन हा उपेक्षितच आहे! ज्यांना मी जीवनभर पूज्य मानत आलो त्या पितामहांनीसुद्धा पांडवांच्या यज्ञातील पशूंची गणती करायला सांगून मला पशूहून कमी लेखलं आहे. सांग, राधेया, मी हे सर्व कसं विसरू?”

“विसरण्याचा प्रयत्न केला पाहिजेस तू! घडणारं सर्वच ध्यानात ठेवून जगायचं म्हटलं तर वेड लागेल तुला.”

“कर्ण, उपदेश सोपे असतात, कृती महाकठीण असते. तुला प्राणप्रिय असलेल्या कवच-कुंडलांची शपथ घेऊन तू तरी सांगू शकतोस काय की, सर्वांनी ठायी-ठायी ‘सूतपुत्र सूतपुत्र’ असा केलेला तुझा मर्मभेदी घोष तू अजूनतरी पूर्णपणे विसरून गेला आहेस? सांग?”

मला त्यानं निरुत्तर केलं. माझ्या देहाच्या गुहेत कुठंतरी सुप्त झालेल्या पूर्वघटनांच्या स्मृतींचा वनराज त्यामुळे खडबडून जागा झाला. एकटा दुर्योधन सोडला, तर खरोखरच कुणी मला कधी प्रेमाचा जिव्हाळा दिला नव्हता. सर्व जण मिळेल त्या संधीचा लाभ घेऊन उलट तिरस्काराचे बस्तिक बाण, जिभांच्या चापावर चढवून

माझ्यावर चोहोबाजूंनी फेकत आले नव्हते काय? मी योद्धा आहे, धनुर्धर आहे, अंगराज आहे, मला कवच-कुंडलं आहेत हा माझा आत्मविश्वास खोटा नव्हता काय? सर्वांनी लाथाडलेल्या आणि केवळ दुर्योधनानं जवळ केलेल्या एका सारथ्यापेक्षा मी अधिक काय होतो? पर्णकुटीत वाढल्यामुळं कुशल राजकारणाचे डाव मला अवगत नव्हते. कदाचित दुर्योधन करीत होता तेच बरोबर असेल! त्याला कोणताही उपदेश करण्याचा मला अधिकार नव्हता. माझ्यासारखा सूतपुत्र अपमानाचे कटू कड पचवू शकला असता, पण दुर्योधनासारखा राजपुत्र ते कधीच पचवू शकला नसता! हेच खरं की, सारथ्यांची मनं ही घोड्यासारखीच असावीत, कुणीही त्याच्या पाठीवर आसूड मारावेत.

"येतो मी," असं म्हणत मी उठलो. मला काहीच सुचत नव्हतं.

"रागवलास की काय? बैस," असं म्हणत माझ्या हाताला धरून बळेच त्यानं मला पुन्हा बसविलं. क्षणभर हातातल्या फाशांच्या कवड्यांकडे पाहत तो गंभीरपणे म्हणाला, "सर्व जण मला अविचारी आणि क्रूर म्हणतात! तुलाही मी तसाच वाटतो की काय? सांग?"

"मुळीच नाही! तू कुरूंच्या कुलातील ज्येष्ठ आणि श्रेष्ठ युवराज आहेस. आपल्या हिताहिताच्या गोष्टी तुला कळत असल्याच पाहिजेत, पण मित्र म्हणून मला निक्षून सांगावंसं वाटतं की, शकुनीमामांच्या कोणत्याही सूचनेचा ती स्वीकारण्यापूर्वी तू पुन्हा स्वतंत्रपणे दीर्घ विचार करावास."

आपल्या हातातील कवड्या माझ्या हाती देत तो म्हणाला, "थोड्याच दिवसांत या कवड्या तुझ्या-माझ्यापेक्षा कितीतरी पराक्रमी आहेत हे पाहशील तू! मामांसारखी जी माणसं मी माझ्या राजसभेत ठेवली आहेत ती केवळ आहिच्छत्राची यात्रा नव्हे हे तुला तेव्हाच पटेल."

"काही झालं तरी ही द्यूताची कल्पना मला मुळीच मान्य नाही!" मी हातातील कवड्या समोरच्या मऊ शय्येच्या बैठकीवर फेकल्या. त्या बराच काल थरथरल्या आणि वाकड्या-तिकड्या होत-होत स्थिरावल्या. एकदा माझ्याकडे आणि एकदा कवड्यांकडे डोळे विस्फारून पाहत त्यानं त्या आत्यंतिक काळजीपूर्वक उचलल्या. त्याचे घारे डोळे रंग पालटू लागले. ते माझ्यावर एकटक रोखत तो म्हणाला, "तू द्यूत खेळत नाहीस हे मला माहीत आहे... पण केवळ एकदाच माझ्यासाठी आणखी एकदा कवड्या टाक. मनात कोणताही अंक धरून तो उच्चार आणि कवड्या टाक."

त्यानं पुन्हा कवड्या माझ्या हाती दिल्या! मला त्याच्या विचित्र लहरी आणि हट्टी स्वभावाची कीव आली. मी द्यूताचा तिरस्कार करतो, हे ठाऊक असूनही त्याला ते हट्टानं मजकडून खेळवूनच घ्यायचं होतं! कवड्या हातात घेताच माझ्या मनात, त्या धावत जाऊन गवाक्षातून सरळ खाली फेकून द्याव्यात असा विचार आला.

माझे दोन्ही हात हलवीत तो म्हणाला, "स्तब्ध का? अंक उच्चार आणि टाक फासा. तू किती दैवी आहेस ते केवळ एका फाशातच ठरून जाईल!"

'दैव! दैव!' हे फासेच दैव ठरविणार असतील, तर एकटा मी या दैवाविरुद्ध खंबीरपणे उभा आहे म्हणून मी 'एक' या अंकाचं दान मागतो! "एक" असं ओरडत मी कवड्या फेकल्या. परत त्या बराच काल कशातरीच थरथरल्या आणि शेवटी स्थिरावल्या! दान पडलं! पण ते एकाचं नव्हतं! पाचाचं होतं!

त्या दानानं दुर्योधनाला आनदं वाटायला हवा होता, पण तो वाटला नाही.

स्वत:ला हरवून तो एकटक त्या कवड्यांकडेच पाहू लागला. जणू त्या कसल्यातरी हाडाच्या कवड्यांत तो कुणालातरी शोधत होता! त्याच्या उबऱ्या निरुंद मस्तकावर कोळ्याच्या जाळ्यासारखं आठ्यांचं दाट जाळं निर्माण झालं. नाकाच्या धारदार अग्रावर घामाचे चार तरतरीत बिंदू उभे राहिले. बैठकीजवळून उठत हात पाठीवर बांधून तो गवाक्षाजवळ गेला आणि दूरवर क्षितिजाकडे पाहत राहिला. त्याला काहीतरी सांगावं म्हणून मी उठू लागलो, पण तोच माघारी वळला. आपले बारीक डोळे अधिकच बारीक करीत त्यानं मला एक असंबद्ध प्रश्न विचारला, ‘‘कर्णा, तुझं आणि जरासंधाचं कधी द्वंद्वयुद्ध झालं होतं काय?’’

‘‘होय!’’ मी उत्तर दिलं. क्षणापूर्वी फाशावरून दैव ठरविणारा तो क्षणात द्वंद्वयुद्धाची का विचारणा करीत होता, ते मला कळलं नाही. अनेक वेळा तो असे विसंगत प्रश्न विचारीत असे हे सहवासानंतर मला अवगत झालं होतं.

‘‘त्या द्वंद्वयुद्धात तू जरासंधाला कधी जीवदान दिलं होतंस काय? तुझ्या बाहुकंटकातून सोडलं होतंस काय?’’

‘‘होय! कलिंगाच्या राज्यात आपण महाराणी भानुमतींच्या स्वयंवरासाठी गेलो होतो तेव्हा तू वधूचं हरण केलंस. तुला नंतर काय झालं कळलंच नाही. जरासंध क्रोधानं भडकून माझ्यावर द्वंद्वासाठी चालून आला. प्रत्यक्ष द्वंद्वात त्याचे प्राण माझ्या बाहुकंटकानं कासावीस झाले तेव्हा त्यानं मजजवळ जीवदान मागितलं, म्हणून मी त्याला जिवंत सोडलं होतं.’’

‘‘कर्णा, मीही काहीतरी आज मागितलं तर मला द्यायला तू संकोचणार नाहीस ना?’’ त्यानं डोळे बारीक करून मला विचारलं.

‘‘द्यूत खेळण्याशिवाय अन्य काहीही माग. माझं जीवनसर्वस्व तुझंच आहे!’’

‘‘तू द्यूत खेळू नयेस हेच मी मागणार आहे! इतकंच नव्हे तर यज्ञाच्या दिवशी राजसभेत असेपर्यंत तू काहीच बोलू नयेस!’’

‘‘एवढंच! तुला समाधान होणार असेल तर तुझं द्यूत चालू असेपर्यंत मी काहीच बोलणार नाही!’’ मी जाण्यासाठी उठलो तेवढ्यात दु:शासन बाहेरून आत आला. आमच्या समोरच्या बैठकीवरच्या कवड्या, त्या सुवर्णमुद्रा असल्यासारख्या त्यानं तत्परतेनं उचलल्या! दुर्योधनाच्या हाती त्या देत तो म्हणाल्या, ‘‘या मौल्यवान कवड्या अशा कुणी टाकल्या? मला मगधांच्या राज्यात परत हेलपाटा देण्याचा विचार आहे की काय तुमचा?’’

एकूण दु:शासन त्या कवड्या आणण्यासाठीच मगधांच्या राज्यात गेला होता तर!! एवढ्या लांब जाऊन त्याच कवड्या आणण्यासारखं असं त्यात काय विशेष होतं? ते केवळ त्या दोघांनाच माहीत असावं. मला ते जाणून घेण्याची फारशी उत्सुकताही नव्हती.

**

# दहा

दुर्योधनाच्या विष्णुयाग यज्ञाच्या कल्पनेत तसं अयोग्य काहीच नव्हतं. धार्मिक विधीला कुणाचा पाठिंबा असणार नाही? पण यज्ञवेत्ता म्हणून शकुनीमामांचं नाव मात्र मला मुळीच योग्य वाटलं नाही. मी तर त्यासाठी श्रीकृष्णाला पाचारण करायचं असं योजलं होतं. महात्मा विदुरांना जर द्वारकेला पाठविलं असतं, तर श्रीकृष्णानं कोणतेच आढेवेढे न घेता वेत्तेपण स्वीकारलंही असतं! पण मामांना वेत्तेपण देऊन दुर्योधनानं कुरूंच्या राजनौकेचं सुकाणू जणू मामांच्याच हाती सोपवून टाकलं! आता ते निश्चित करतील तीच कुरूंची दिशा होती! माझं जीवन म्हणजे त्या नौकेतील केवळ एक डोलकाठी ठरली होती! मध्ये उभी असलेली, तरीही स्वयंभू स्थान नसलेली! परिस्थितीच्या वायुझोताबरोबर डोलणारी! नकाराची मान हलवीत नौकेबरोबरच चालणारी! मी दुर्योधनाला सोडू शकत नव्हतो, पण त्याच्या प्रत्येक कल्पनेला साथही देऊ शकत नव्हतो.

पांडवांच्या वाढत्या सामर्थ्यानं दुर्योधन केवळ दिपूनच गेला होता असं नाही, तर मनातून भ्यालाही होता. अनेक वेळा राजसभा बोलावून त्यानं महाराज धृतराष्ट्रांसमोर कोणत्या एका प्रश्नावर विचारविमर्श केला असेल, तर तो पांडवांच्या वाढत्या सामर्थ्याला आळा कसा घालावा यावरच! विचाराचा हा धागा धरून वावरताना कधी-कधी तो त्यांच्या नाशाची हास्यास्पद स्वप्नं रंगवू लागला.

एकदा राजसभेत त्यानं द्रौपदीला वश करण्याची कल्पना मांडली तेव्हा त्याच्या राजकीय नेतृत्वाची मला खरोखरच कीव आली! त्याचं म्हणणं असं होतं की, पाच पती असलेल्या द्रौपदीच्या मनात पाचांबद्दल परस्परविरोधी मतभेद निर्माण करावेत! त्यासाठी एक कुशल दासी इंद्रप्रस्थात धाडावी! तिच्या कुटिल कारवाईनं ते पाच जण द्रौपदीसाठी आपसांत झगडून कदाचित मरतील! मला शेवटी त्याला असं सांगावं लागलं की, कोरान्न खाऊन जगणाऱ्या भिक्षूंसमवेत जी स्त्री प्रामाणिकपणानं संसार करू शकते ती वैभवी राजांशी कशी प्रतारणा करेल! शकुनीमामा तर अतर्क्य अशा कपटी कल्पना राजकारणाच्या गोंडस नावाखाली त्याला सुचवू लागले. राजसभेचा समारोप करताना महाराज धृतराष्ट्रांनी मला विचारलं, ''काय कर्ण, पांडवांविषयी तुझं काय मत आहे?'' सभेतल्या अनेकांची अपेक्षा होती की, मीही मामांच्यासारखी बुद्धीची चतुराई करणारी एखादी आश्चर्यकारक योजना सांगून सर्वांना दिपवून टाकीन. पण त्यांनी कर्णाला नीट ओळखलं नसावं. कुटिल कारस्थानांचं कपटी राजकारण हा कर्णाचा स्थायिभाव नव्हे, हे त्या सभेतल्या सर्व योद्धयांना कळलं नसावं याचा मला अर्थातच खेद झाला. पांडवांच्या प्रश्नाचा कायमचा सोक्षमोक्ष लागावा म्हणून मी सभेला सांगितलं, ''पांडवांशी वैर वाढवून कुरूंचं कल्याण होणार नाही या पितामहांच्या कल्पनेशी मी सहमत आहे. वैर ही जीवनाचा मंत्र होऊच शकत नाही, पण पांडवांच्या वाढत्या सामर्थ्याचा कुरूंच्या राज्याला निश्चित धोका आहे असंच सर्वांना खरोखरच वाटत असेल, तर जोपर्यंत पांचालराज द्रुपद आपल्या सेनेसह पांडवांना मिळाला नाही तोपर्यंत उघड-

उघड युद्धाचा विडा पांडवांना पाठवून त्यांच्याशी प्रकट युद्ध घोषित करावं! समरांगण ठरवील की, जगायला कोण अधिक योग्य आहे!'' पण माझ्या कल्पनेला सभेतल्या एकाही योद्धयानं पाठिंबा दिला नाही! खरं म्हटलं तर एकटे पितामह सोडले, तर कुरूंच्या सर्व योद्धयांना पांडवांची भयंकर धास्ती वाटत होती! त्यांच्या खुरटलेल्या पराक्रमातून केविलवाणी कारस्थानं जन्म घेत होती! माझं मन ती ऐकताना विदीर्ण होई. कधी-कधी सभा अर्धवट सोडूनच मी परते आणि शोणाला समवेत घेऊन दूर गंगेच्या काठावर जाऊन निवान्त बसे. पात्रात मासे पकडण्यासाठी अविचल उभे राहिलेले श्वेत बकपक्षी पाहताना मला कुरूंची सभाही बकपक्षयांनीच भरली आहे असं वाटू लागे! त्या सभेत भीष्मांचा अपवाद सोडला, तर एकही गरुड पक्षी नसावा याची जाणीव मला अस्वस्थ करून टाकी.

माझ्याभोवती घडणारं सर्व मला स्पष्ट दिसत होतं. पण ते कधीच पटत नव्हतं. परंतु कुरूंच्या राजसभेत ज्याच्याजवळ मी माझं मन मोकळं करावं असं कोण होतं? एकटा दुर्योधन सोडला तर इतर सर्व जण माझ्याकडे मनापासून अंगराज म्हणून पाहत होते काय? दुर्योधनाविषयी माझ्या मनात आदरभाव होता. तरीही कित्येक वेळा मला त्याच्या योजना आणि कल्पना मुळीच पटत नसत.

सर्वांत अधिक असं माझं दुर्दैवं कोणतं असेल तर हेच की, हस्तिनापुरातील एकजात सर्वांचं असं ठाम मत होतं की, दुर्योधन जे-जे करतो ते-ते सर्व कर्णाच्याच सल्ल्यानं! कुणीही, कधीही हे लक्षात घेण्याचा यत्न केला नाही की कर्ण सामान्यातून वर आलेला आहे! अन्याय कसे असह्य असतात, हे स्वत: त्यानं मुकाटपणे अनुभवलं आहे! ज्याला अन्यायाची अनुभूती असते तो कधीच कुणावरही अन्यायाचं अस्त्र उचलत नाही! म्हणूनच दुर्योधनाच्या आणि मामांच्या कल्पना मला कधीच पटल्या नाहीत आणि त्याबरोबरच हेही सत्य होतं की, मला माझ्या कल्पना त्यांना पटवून देता आल्या नाहीत! वास्तविक माझ्या म्हणण्यात न पटण्यासारखं गुंतागुंतीचं असं काहीच नव्हतं. सरळ-सरळ स्पष्ट युद्ध! वीराला शोभणारं, कीर्तीला नेणारं. पण ऐकून त्यावर चिंतन करण्याइतकं दुर्योधनाचं मन:स्वास्थ्य ठीक नव्हतं. शरीरानं सन्निध असलेली माणसं मनानं पण सन्निध असतातच असं नाही! प्रत्येक व्यक्ती म्हणजे वेगवेगळ्या विचारांचं, कल्पनांचं आणि भावभावनांचं अतिशय गूढ असं स्वतंत्र विश्वच असतं.

माझ्या दृष्टीनं माझं एकच कर्तव्य होतं. त्याच्या यज्ञाला शक्य ते सर्व साहाय्य करणं! इच्छा असो वा नसो, कर्तव्य हे करावंच लागतं.

एकाच कुलात दोन वेळा तोच यज्ञ करता येत नाही म्हणून सर्वांनी आमच्या यज्ञाला विष्णुयाग नाव दिलं! त्यांच्या मते राजसूय यज्ञापेक्षा हा मोठा होता. महायाग होता!

**

# अकरा

यज्ञविधीच्या साहित्यानं राजवाडा भरून गेला. दुर्योधनाचे साहाय्यक कुठल्याही कार्याला लागले की थांबत नसत. राजवाड्यासमोर पांडवांपेक्षाही भव्य यज्ञमंडप उभारण्यात आला. शौनक, भृगु, च्यवन, असित अशा मान्यवर ऋषींना आमंत्रणं पोहोचली होती. भोवतीच्या सर्व नरेशांना पाचारण करण्यात आलं होतं.

वद्य चतुर्दशीचा यज्ञाचा दिवस उजाडला! उजाडला कसला कोंदटला! कारण पहाटेपासूनच आकाशाचं नेहमी नयनरम्य निळं दिसणारं छत त्या दिवशी पांढरट भुरक्या ढगांनी झाकाळून गेलं होतं. माझं मन त्यामुळे खिन्न होतं. कुठंच प्रकाश नव्हता! सगळं कसं कोंदटलेलं, अस्वस्थ होतं!

दुर्योधनाच्या यज्ञासाठी शुभाकांक्षा व्यक्त करण्याकरिता म्हणून मी गंगेच्या पात्रात उभं राहून सूर्यदेवांना अर्घ्य देणार होतो. यज्ञात पहिली समिधा पडेपर्यंत मी पात्रातच उभं राहायचं ठरविलं होतं.

म्हणून गंगेकडे जाण्यासाठी मी माझ्या कक्षातून बाहेर पडू लागलो. कक्षातील विष्णूच्या गाभाऱ्यासमोर रोज पहाटे मी उठण्यापूर्वीच शोणाची पत्नी मेघमाला रांगोळी रेखून जात असे, पण त्या दिवशी नेहमीच्या नियमितपणानं ती रांगोळी रेखून गेली नव्हती. खाली मान घालून गुणगुणत घाईघाईनं रांगोळी रेखताना ती मला गाभाऱ्यासमोर दिसली. माझ्या पदक्षेपांची चाहूल लागताच आत्यंतिक तत्परतेनं ती स्वत:ला सावरीत झटकन उठली, पण लगबगीनं उठताना तिच्या हातातील रांगोळीचं पंचपात्र खाली पडलं! त्या पात्रातील धवल रांगोळी, रक्तवर्णी कुंकुम आणि पीतवर्णी हळद एकमेकांत मिसळून गेली! तिला आपल्या हातातून पंचपात्र पडलं हा काहीतरी अपशकुनच वाटला. किती झालं तरी स्त्रियांची मनं श्रद्धाळू असतात. मेघमाला ओशाळून अवगुंठून क्षणभर उभी राहिली आणि दुसऱ्याच क्षणी झटकन खाली वाकून तिनं रांगोळी सावरण्यासाठी हात सरसावला. तिची रुखरुख जाणून मी हसत-हसतच तिला म्हणालो, "असू दे ती रांगोळी तशीच! त्या धवल रंगाच्या रांगोळीला तांबड्या आणि पिवळ्या छटा फारच सुंदर दिसताहेत!" काहीच न बोलता पडलेली रांगोळी मी सांगितल्यामुळे तशीच सोडून रिक्त पात्र घेऊन ती तशीच निघून गेली. कितीतरी वेळ मी त्या विखुरलेल्या विविध रंगच्छटा असणाऱ्या निर्बंध रांगोळीकडे पाहत होतो!

श्वेत, पीत आणि रक्तवर्णी छटा मनात तशाच घोळवीत राजवाड्याचे सोपान मी उतरू लागलो. प्रत्येक व्यक्तीच्या जीवनालाही असेच सोपान असतात! हे सोपान मात्र घटनांच्या पायदंड्यांचे असतात! कधी-कधी या पायदंड्या एकासमोर एक ठेवून ध्येयाच्या उंच शिखरापर्यंत नियती मानवाला क्षणात पोहोचविते, तर कधी- कधी याच घटनांच्या पायदंड्या एकासमोर एक रचून त्याला अंधकाराच्या दरीपर्यंतही खोल पोहोचविते! मी सर्व सोपान उतरून खाली आलो.

राजवाड्यासमोरचा चौक आला. चौकातल्या तलावात नेहमीसारखं निळ्या आकाशाच्या पार्श्वभूमीवर तळपणारं सूर्यबिंबाचं प्रतिबिंब मला दिसलं नाही. त्यात

प्रतिबिंब दिसलं ते यज्ञमंडपाच्या भुरकट वस्त्राच्या छताचं! काही राजहंस मात्र आपल्या माना ताठ ठेवून त्या तलावाच्या जलात डौलदार प्रदक्षिणा घेत होते. ते शुभ्रवर्णी पक्षी पाहताच मला शकुनीमामांची आठवण झाली. जलमिश्रित दुधातून राजहंस स्वत:ला हवं असलेलं केवळ दूधच घेतात, हे त्यांनी मला आणि अश्वत्थाम्याला प्रत्यक्ष दाखवून दिलं! आणि ते आठवून मला वाटलं की, मानवाचंही राजहंसासारखंच असावं, कारण मानवही जीवनातलं स्वत:ला हवं ते बरंवाईट, शुभाशुभ निवडीत असतो!

त्या पक्ष्याकडे कौतुकाचा एक कटाक्ष टाकून मी रथशालेकडे वळलो. सत्यसेन रथशालेतील कुरूंचे रथ हलवून अभ्यागतांच्या रथांसाठी जागा मोकळी करीत होता. महायागासाठी म्हणून पुष्कळ आमंत्रित येणार होते.

मला पाहताच तो सामोरा आला. मी त्याला माझ्या नित्याचा श्वेतवर्णी घोड्यांचा जैत्ररथ जोडायला सांगितलं. काही पळांतच रथ घेऊन तो सज्ज झाला. मी रथात चढताच हातातील आसूड घोड्यांच्या पाठीवर ओढत त्यानं विचारलं, "कुठं घेऊ रथ?"

"गंगेवर!" यज्ञमंडपाच्या सजावटीत शेवटची भर टाकण्यासाठी खपणाऱ्या सेवकांकडे पाहत मी उत्तरलो.

वास्तविक नेहमीप्रमाणं मी एकट्यानंच गंगेकडे जायला पाहिजे होतं, कारण नसताना सत्यसेनाला आज समवेत घेतल्याची मला जाणीव झाली. पण त्याला आता माघारी पाठविणं ठीक नव्हतं! कधी-कधी कारण नसतानाही माणूस चुकतो! मी त्याला घेण्यात तशीच चूक केली होती.

हस्तिनापुरातील मार्ग नगरजनांनी फुलले होते, पण कुणाच्याही हालचालीत चैतन्य दिसत नव्हतं. आकाश कोंदटल्यामुळे कदाचित मलाच तसं वाटलं असेल! जसं मन असतं; तसंच जग दिसतं.

रथ नगराच्या सीमेपाशी आला. सीमेपासून थोड्याच अंतरावर गंगा होती. सत्यसेन सीमेचं प्रवेशद्वार ओलांडून गंगेकडचं वळण घेऊ लागला इतक्यात पश्चिमेकडून दौडणारा राकट वर्णाच्या घोड्यांचा एक रथ आमच्या रथाजवळून प्रवेशद्वारात घुसताना आम्हाला दिसला. त्याच्या रथनीडावर महामंत्री विदुर बसले होते. इंद्रप्रस्थाला पांडवांना आणण्यासाठी दुर्योधनानं त्यांनाच पाठविलं होतं! पांडवांसह पांचालीला घेऊन ते परतले असावेत, कारण ज्याअर्थी ते रथनीडावर सारथ्याशेजारी बसले होते त्याअर्थी रथात स्त्री नक्कीच असणार!

पांचालीच्या केवळ विचारानंच कोंदटलेल्या आकाशासारखं माझं मनही कोंदटून गेलं. स्वयंवरात निर्दय घाव घालून तिनं घायाळ केलेला माझ्या मनाचा वैनतेय सूडाच्या नखाग्रांनी माझ्या स्वाभिमानाला बोचकारू लागला. छे! एका स्त्रीकडून अवहेलना झाली असताना मी ती सहनच कशी करू शकलो? कर्ण हा वीर आहे, धनुर्धर आहे हा जगानं पिटलेला नगारा व्यर्थ होता? कर्णाला सारथी करून कालानं त्याच्या जीवनाचं सारथ्य आपल्याच हाती घेतलं नाही काय? माझी सहनशक्ती ही सर्वांना संयमासारखी वाटली असेल काय? की – की सर्वांनी कर्ण हा भेकड आणि मुखदुर्बल लाचार आहे, असा डंका पिटला असेल? अनिवार्य घटना आणि सहनशक्तीचं जीवघेणं प्रदर्शन हेच माझं जीवन आहे की काय? एकाच वेळी पाच पांडवांची पत्नी होणाऱ्या एका स्त्रीला कर्ण उच्च की नीच हे ठरविण्याचा अधिकार कुणी दिला?

सत्यसेन घोड्यावर तर माझं मन स्वाभिमानावर आसूड ओढत होतं! रथाच्या चक्राप्रमाणे माझ्या मेंदूचे आरेही गरगरत होते! केवळ प्रतिशोधाच्या – सूडाच्या कण्याभोवती!

गंगाकाठ आला. माझं नित्याचं पात्रात उभं राहण्याचं स्थानही दृष्टिपथात आलं. गंगेवरून सूर्यदर्शन होताच मी परस्पर तसाच यज्ञमंडपात जाणार होतो. त्यासाठी माझी राजवस्त्रं आणि भूषणं गंगेवर आणण्यासाठी मी शोणाला रात्रीच सूचना दिली होती. इंद्रप्रस्थाहून परतताना माझ्या मस्तकावर आढळलेला भूषणागारातील मुकुटही आणण्याबद्दल मी त्याला बजावलं होतं. गंगेच्या स्वच्छ पात्रात उभं राहून मी डोळे मिटले. नित्यासारखी तेजाची वलयं डोळ्यांपुढं काही केल्या उभीच राहीनात! डोळे उघडून सामोर पाहिलं, कारंडव पक्ष्यांचे थवेच्या थवे गंगेच्या असंख्य जललहरींवर झेपावत होते. विचारांच्या आणि शंकांच्या काहुरानं मस्तक भणाणून गेलं. गंगेच्या लहरींइतकेच माझे विचार अगणित होते! आखाड्याच्या दिवशीही पूर्वी असंच ढगाळून आलं होतं! तसंच काहीतरी अघटित घडणार की काय आज?

ओंजळीत पाणी घेऊन स्थिर मनानं मी तेजाची मार्गप्रतीक्षा करू लागलो. तीन घटका तशाच निघून गेल्या तरी तेजोदर्शन होईना! शंकांचे कारंडव पक्षी माझ्या मनाच्या गंगेवर झेपावू लागले! पंख फडफडू लागले!

सत्यसेन माझ्यासाठी किनाऱ्यावरच्या वाळूत तिष्ठत केव्हाचा उभा होता. शेवटी मला परतणंच भाग झालं. पात्राबाहेर येऊन मी खाली मान घालून वाळू तुडवीत सत्यसेनाच्या दिशेनं चालू लागलो. माझ्या ओलेत्या अधरीयाचं टोक वाळूत फरफटत चाललं!

"शोण अद्यापि राजवस्त्रं घेऊन आला नाही वाटतं?" मी सत्यसेनाला त्याच्याजवळ येताच विचारलं.

"नाही. पण महाराज आपली... " तो मध्येच थांबला. मी मान उंचावीत त्याच्याकडे पाहिलं. त्याची मुद्रा कळंजून गेली होती! डोळे भयाकुल झाले होते.

"काय झालं सत्यसेन?"

काहीच न बोलता खाली मान घालून उगाच आसुडाच्या दंडानं तो पायांजवळच्या वाळूत रेघोट्या ओढू लागला. त्याला खचितच काहीतरी सांगायचं होतं, पण तो संकोचला होता. बोलला नव्हता.

आम्ही शोणाची मार्गप्रतीक्षा करू लागलो. दूरवर एक टिटवी कर्कशपणे ओरडत किनाऱ्यावरून झेपावत एका निवडुंगाच्या गचपणात शिरली. तिच्या आर्त किंकाळीचे स्वर मात्र आसमंतात तसेच काही क्षण भरून रेंगाळत राहिले!

एवढ्यात धूळ उडवीत शोणाचा रथ किनाऱ्यावर येऊन थांबला. हातांत एक मोठं तबक घेऊन वाळू तुडवीत तो गतीनं आमच्या दिशेनं येऊ लागला. जवळ येताच सत्यसेनानं पुढं होत त्याच्या हातांतील तबक आपल्या हाती घेतलं.

"यज्ञाची पहिली समिधा यज्ञकुंडात पडली असेल ना?" मी शोणाला उत्सुकतेनं विचारलं. राजवाड्यावर महायागाचे कोणकोणते विधी पार पडले होते ते जाणण्याची मला ओढ होती.

"यज्ञमंडप आहे तसाच आहे! यज्ञकुंडात समिधा पडण्याऐवजी राजसभेत द्यूताचे फासे पडताहेत! यज्ञाचा मुहूर्त केव्हाच टळून गेला आहे!" शोण तबकातील एक

बाहुभूषण उचलीत म्हणाला.

"कोण कोण आहेत सभेत?" तबकातील नीलवर्णाचं अधरीय उचलून ते कमरेभोवती लपेटीत मी विचारलं.

"सर्व जण! मुंगीचासुद्धा शिरकाव अशक्य आहे इतके मानकरी सभेत दाटलेले आहेत."

"द्यूत कोण कोण खेळत आहेत?" अधरीयाची टोकं दातांत धरून ओलेतं अधरीय बदलीत मी विचारलं.

"शकुनीमामा आणि युधिष्ठिर! युधिष्ठिराला एकही फासा अनुकूल पडत नाही! पहिल्या पणासाठी दहा लक्ष गायी त्यानं लावल्या, दुसऱ्या पणासाठी इंद्रप्रस्थाची राज्यसंपत्ती आणि तिसऱ्या पणासाठी सेवक-सेविकांसह सगळं राज्य!" माझ्या मनगटावर, दंडावर, कंठात एक-एक भूषण चढवित तो उत्सुकतेनं सांगू लागला. युधिष्ठिर! संयम, निग्रह आणि धर्माधर्म सांगणारा विवेकी युधिष्ठिर द्यूत खेळतो आहे, यावर माझा विश्वासच बसेना.

"मग काय-काय झालं आहे आतापर्यंत?" मी गंगेच्या लपलपणाऱ्या लाटांकडे पाहत विचारलं.

"युधिष्ठिर सर्व हरला आहे! भीम त्याला रोधण्यासाठी मध्येच ओरडतो आहे. तो ओरडताच मामा फासे टाकताहेत! भीमाच्या ओरडण्यामुळे फाशाच्या कवडया कशातरीच थरथरताहेत! पण ते कुणाच्याच लक्षात आलेलं नाही!" माझ्या खांद्यावर त्यानं तबकातील पीतवर्णी उत्तरीयही चढविलं. मी सांगितलेला इंद्रप्रस्थाचा रहस्यमय मुकुट मात्र त्यानं आणला नव्हता.

"मी सांगितलेला भूषणागारातील मुकुट का नाही आणलास?"

"खूप शोधाशोध केली, पण तू वर्णन केलेला मुकुट भूषणागारात सापडलाच नाही!" आणलेला दुसराच मुकुट माझ्या मस्तकावर चढवून, खाली बसत माझ्या पायात चढाव चढवून त्यांचे सोनेरी वर्णाचे बळकट बंध त्यानं करकचून आवळले. "दादा, तू आता लवकर राजसभेत चल. मी इथं यायला निघालो त्या वेळी युधिष्ठिरानं स्वत:सह आपल्या चार बंधूंना बारा वर्षांचा वनवास व एक वर्षाचा अज्ञातवास या घोर पणावर लावलं होतं! तो पण जिंकल्यास त्याला मामांनी त्याची द्यूतात जिंकलेली सर्व संपत्ती व राज्य परत द्यायचं मान्य केलं आहे! एवढया कष्टानं, दिग्विजय करून मिळवलेलं राज्य त्यानं द्यूताच्या कवडयांवर कसं काय उधळलं रे दादा?"

"चल!" मी त्याच्या दंडाला धरलं. माझ्या डोळ्यांपुढं राजसभेचं दृश्य उभं राहू लागलं. एकूण चार पट्टयांच्या पटानं खरोखरच मामांनी पांडवांना बोलल्याप्रमाणं गुंडाळलं होतं तर? नेहमीच वळवळत बोलणाऱ्या जिभेच्या हातांत हात घालून हसणारे भीमाचे रुंदट दात मामांनी फाशांच्या कवडयांनी त्याच्याच घशात घातले होते तर! पण त्याच्या बोलण्याबरोबरच फाशांच्या कवडया का थरथराव्यात? माझ्या हातातून सुटल्यावरही त्या तशाच थरथरल्या होत्या! का? माझं मन – मळणीचे वृषभ मध्यदंडाभोवतीच फिरतात तसं – त्या प्रश्नाभोवती फिरू लागलं.

आपल्या कमेरच्या शेल्यात खोचून ठेवलेली माझी कर्णभूषणं काढून ती माझ्या कानांवर चढविण्यासाठी शोण चालता-चालताच थांबला. माझ्या कानांजवळ हात नेऊन तो ती चढविणार होता, पण झटकन हात खाली घेऊन तो मध्येच थांबला. त्याची मुद्रा

एकदम भाव पालटू लागली! तोच भाव! मघा सत्यसेनाच्या मुद्रेवर दिसलेला.

“का? काय झालं शोण?”

“दादा...!!” तो थांबला. त्याचा सावळा चेहरा ठिक्कर काळा होऊ लागला. डोळ्यांच्या बाहुल्या भिरभिरू लागल्या.

“का... चाचरतोस का?”

“दादा, तू आज राजसभेत जाऊच नकोस!”

“मी तिथं जाऊन बोलताच भीमाला घाबरतात तशा कवड्या मलाही घाबरून कौरवांच्या उलटं दान देतील म्हणून!” कवड्या मला घाबरत असलेलं मला आठवलं.

“नाही... पण... ” तो पुन्हा थांबला.

“पण काय ते बोल! का जाऊ नये मी राजसभेत!” त्याचे खांदे गदागदा हलवून मी ओरडलो.

“तुझी कुंडलं आज – आज परत निस्तेज पडली आहेत.” त्यानं आपली मान खाली घातली! तो पुढं म्हणाला, “देठ तुटलेल्या फुलासारखी!”

त्याचे शब्द रसरशीत लोहरसासारखे पुन्हा एकदा माझ्या कानांत घुसले. मी सत्यसेनाकडे पाहिलं. तो खाली मान घालून आसुडाच्या दंडानं तसाच वाळूत रेघोट्या ओढत होता. जे त्याला सांगायचं होतं ते शोणानं सांगितलं होतं.

“शोण, आज कुंडलं निस्तेज पडोत वा तुटून पडोत मी राजसभेत जाणारच!”

“नको दादा, जाऊ नकोस. द्यूत हे कुणालाही पटणारं सत्य नाही.” त्याचा विरोध प्रखर होऊ लागला. त्याच्या पाणीदार डोळ्यांत भीतीच्या वलयांशिवाय दुसरं काहीच नव्हतं.

“सत्य हे कुणालाही पटणारं द्यूत आहे शोण. आज सत्याच्या द्यूतात पांडवांचे फासे उलटे पडेलत! आजपर्यंत ते नेहमीच कर्णाच्या उलटे पडले होते! चल.” मी त्याचा हात धरला.

“नको. दादा, माझ्यासाठी तरी आज तू जाऊ नकोस.” त्यानं माझा हात मला थांबविण्यासाठी घट्ट पकडून ठेवला. किती आर्तता होती त्याच्या पकडीत!

“शोण, उपदेश नको.” मी त्याचा हात झिडकारला.

सत्यसेनाच्या हातातील आसूड हिसकावून घेऊन रथाकडे चालताना मी त्याला निक्षून सांगितलं, “सत्यसेन, शोणाला त्याच्या रथातून घेऊन परत जा आणि शोण, तू कर्णाचा भ्राता आहेस हे कधीच विसरू नकोस!” मी शोणाकडे न पाहताच म्हणालो.

जैत्ररथावर चढताच मी आवेगानं वेग ओढले. घोडे उधळले!! चौफेर! किनाऱ्यावरच्या तप्त वाळूच्या पोटातून वर धावणाऱ्या जळजळीत अग्निज्वाला माझ्या उघड्या दंडांना प्रकर्षानं जाणवू लागल्या! माझं कातडं अभेद्य असलं तरी ते काही स्पर्शहीन नव्हतं!

**

# बारा

ढगाळलेलं आकाश माथ्यावर घेऊन भराभर राजमार्ग मागं टाकीत माझा वायुजित, हिमांग, अनंतपुष्प, शशांक, गजदंत, हंसवर्ण या सहा शुभ्र घोडयांचा जैत्ररथ राजवाडयाच्या प्राकारातून आत घुसला. त्या घोडयांतील वायुजित मला सर्वाधिक प्रिय होता. प्रत्यक्ष मला सारथ्य करताना पाहून द्वारपाल स्तिमित झाले असावेत. मला अभिवादन करण्याचं भानही त्यांना राहिलं नव्हतं. पुतळ्यासारखे ते तसेच उभे होते. वेग आखडून मी रथ आवरला. तो रथशालेत नेऊन सोडावा, असंसुद्धा मला वाटलं नाही. हातातले वेग घोडयांच्या पाठीवर फेकून रथदंडावरून मी धरतीवर सरळ झेप घेतली. कंठबंध तुटलेल्या वासरासारखं माझं मन राजसभेत जायला उधळू लागलं! मंडपात प्रवेश करण्यापूर्वी एकदा वेध घेण्यासाठी आकाशाच्या छतावर दृष्टी फिरविली. गंगेचं पात्र भुरक्या धुक्यानं झाकलं जावं तसा चोहोबाजूंनी क्षितिजापर्यंत र् तो पांढरट भुरक्या ढगांनी झाकाळलेलाच होता! जटांनी झाकाळलेल्या घुम्या ॠषीसारखा दिसत होता तो!

राजवाडयात जायचं म्हणजे तयारीनं सुसज्ज झालेल्या यज्ञमंडपातून जावं लागत होतं. त्या एवढया भव्य यज्ञमंडपात अजून कुणीही उपस्थित नव्हतं! दूरवर यज्ञकुंडावर एक धीट काकपक्षी मात्र कृमिकीडा शोधण्याच्या व्यर्थ प्रयत्नात असलेला दिसला! काळ्या वर्णाचा! मान मागंपुढं करणारा! मध्येच काव-काव करीत चीत्कारणारा! मंडप क्षणात ओलांडून राजवाडयाच्या चार-चार पायदंडया एकएका झेपेतच मी चढू लागलो. कितीतरी वर्षांपूर्वी बाबांचा हात धरून चंपानगरीहून आल्यानंतर याच पायदंडया किती असाव्यात म्हणून कुतूहलानं त्यांची गणती करणारा बालपणीचा कर्ण क्षणात माझ्या डोळ्यांसमोर उभा राहिला! आता त्याच कर्णाला पूर्ण परिचित होतं की, पायदंडयांची संख्या निश्चितच एकशे एक आहे! कारण अनेक वेळा तो त्या चढला होता, अनेक वेळा उतरला होता!

छे, किती झपाटयानं घटनांची विविधरंगी फुलं कालाच्या अखंड धाग्यात गुंफीत नियतीनं माझ्या जीवनाची पुष्पमाला तयार केली होती! बालपणीच्या सुंदर सुंदर कळ्या तीत होत्या, शिष्यावस्थेतील विद्येच्या निष्ठेच्या अर्धेन्मीलित पाकळ्याही तीत होत्या, तारुण्यातील शस्त्र, व्यायाम, सूर्याराधना यांची झळाळणारी कलाबूत त्या मालेत होती आणि... आणि माझ्या अवमानित, उपेक्षित जीवनाची हिरवट, ताठर पानंही होती!! कलाहीन आणि विद्रूप!

माझं मन शरीरातील रक्तापेक्षा अधिक गतीनं धावू लागलं. एकच एक ध्यास त्याला लागला होता. राजसभा! राजसभा! राजसभा!

सभेच्या भव्य प्रवेशद्वाराजवळ आलो. आत चाललेल्या द्यूताच्या फाशांचा निर्णय पाहायला वेडावलेल्या प्रेक्षकगणांनी ते आच्छादून टाकलं होतं. डोळ्यांचे जीव करून ते सर्वांनी मामांच्या हातातील फाशांवर खिळविले असावेत. त्या सेवक-सेविकांच्या समुदायातच एखाद्या सामान्यासारखा दु:शासन पाठमोरा उभा असलेला पाहून मात्र मला आश्चर्य वाटलं! तो सभागृहात न बसता प्रवेशद्वारावरच का थांबला असावा? आज

सगळंच उलटं झालं होतं.

मागून प्रवेशद्वाराजवळ जात त्याच्या खांद्यावर एकदम हात ठेवून मी म्हणालो, "दु:शासन, तू आज असा इथं उभा का?" शर्यतीतल्या चपळ घोड्यासारखा तो गर्रकन परतला.

"कोण कर्ण! थांब... केवळ एक क्षणभरच. तूही या प्रवेशद्वारातच थांब! द्यूत चालू असेपर्यंत तुला आत सोडू नये, म्हणूनच दादानं माझी नियुक्ती इथं सकाळपासून केली आहे!"

"का? मी आत गेल्यामुळे असा कोणता अनर्थ होणार आहे?" त्याचा प्रतिरोध मला असह्य वाटला. कुरूंच्या राजवाड्यात इतका उघड विरोध आजवर मला कुणीच आणि कधीही केला नव्हता.

"ते मला काहीच माहीत नाही, पण मी तुला सभागृहात आता सोडू शकत नाही अंगराज! मामा आता शेवटचा फासा टाकताहेत! केवळ निर्वाणीचा एकच एक फासा!!" मला थोपविण्यासाठी प्रवेशद्वार घेरावं म्हणून त्यानं आपले दोन्ही हात विस्तारले. सगळं द्वार त्यानं वेढून टाकलं!

मी अंगराज आहे हे दु:शासन आज का विसरला? आपल्या परमप्रिय मित्राला सभागृहात प्रवेश नाकारणारी आज्ञा दुर्योधनानं आज त्याला कशी दिली?

"या फाशाच्या पणावर काय-काय लावण्यात आलं आहे दु:शासन?" पायतळ उंचावून सभागृहात डोकावून मी त्याला विचारलं.

"पांचाली!'' त्यानं द्वारांच्या भेगेत आपल्या दोन्ही हातांची बोटं खंबीरपणे रुतवून माझ्यासमोर आपल्या हातांचा अडसरच तयार केला!

पांचाली! एक अहंकारी क्षत्राणी! कर्णानं आपल्या जीवनाचं राजवस्त्र नम्रतेनं चरणांवर अर्पण केलं असता ती एक मलिन पायघडी मानून उन्मत्तपणे त्यावरून चालत जाऊन नेमक्या अर्जुनाच्या कंठात वरमाला चढविणारा रूपगर्विता...! पाच पतींच्या पत्नीत्वानं चढेल होऊन दुर्योधनाच्या मनाचं पळसपुष्प पायदळी रगडणारी अहंमन्य आर्या! एका यज्ञकुंडातून आपण जन्मलो हे सत्य विसरून कुलाची सदैव दुंदुभी पिटणारी अविचारी स्त्री! भरघाव रथातून जाताना भोवतीच्या वृक्ष, वेली, पर्वतांची चित्र अस्पष्ट होत भराभर मागे पडतात तशी घटनांची असंख्य चित्रं माझ्या डोळ्यांसमोर उभी राहून क्षणात अस्पष्ट होऊ लागली!

"दु:शासन, दूर हो!" त्याचे हात उचकटून एका झटक्यात मी दूर केले. सभागृहात शिरताना एकच एक घणाघात मस्तकावर बसू लागला. द्यूत! द्यूत! द्यूत योग्य असेल वा अयोग्य असेल, पण माझ्या झिडकारलेल्या तप्त मनाला तेच शांती देणारं असेल तर ते मी अयोग्य तरी का म्हणावं? तसा योग्य की अयोग्य याचा निर्भेळ निकष माझ्याशी वागताना जगानं तरी केव्हा लावला होता? म्हणूनच प्रवेशद्वारातून मोठ्यानं ओरडावंसं वाटलं की, "मामाऽऽ हा फासा तुम्ही आज जिंकलाच पाहिजे!!" जनसमुदाय फोडत तरातरा आसनाच्या दिशेनं मी पुढं सरकलो. "थांब, थांब," म्हणत दु:शासनही हात उंचावीत माझ्यामागून येऊ लागला.

सभेच्या पश्चिम दिशेच्या पाषाणाच्या चौथऱ्यावर अंथरलेल्या मऊ शय्येवर द्यूताचा पट मध्ये ठेवून दोहो बाजूंस शकुनीमामा आणि युधिष्ठिर बसले होते! उलटी मांड घालून मामा हात कानाजवळ नेत फाशांच्या कवड्या हाताच्या पोकळीत एकसारख्या

घोळवू लागले. त्यांच्या माघारी उभे असलेल्या दुर्मुख, दुर्जय, निषंगी, क्राथ, अलंबू, वातवेग या कुरू योद्धयांचे डोळे त्यांच्या हातावर खिळले होते. त्यांच्या उजव्या हाताला दुर्योधन भीमाकडे एकटक पाहत होता. युधिष्ठिरामागं बसलेले, भीम, अर्जुन, नकुल आणि सहदेव कधी नव्हेत तसे लाचारपणे खाली माना घालून आपल्या वडील भ्रात्याच्या बुद्धिभ्रंशाचं कारण शोधीत असावेत. केवळ आज – आणि आजच पहिल्यानं त्यांना कळत होतं की, कोणत्याही योद्धयाला जनसमुदायासमोर मान खाली घालताना कशा मरणप्राय यातना होतात! अशा वेळी विस्कटलेल्या मनाच्या पुष्पपाकळ्या एकत्र करणं किती कठीण असतं!

"चल... चल... चल साताचं दान दे!" हातातील कवड्या घोळवीत कानाजवळ नेऊन मामांनी मोठ्यानं ओरडत फासा टाकला. कसलेला कोळी हात उंचावीत माशांचं जाळं चौफेर टाकतो तसा!

"हा सर्वनाशी खेळ आता तरी थांबवणार आहेस की नाही तू?" फासा पडतानाच भीम विजेसारखा युधिष्ठिरावर कडकडला. कवड्या, विजेच्या कडकडाटात तृणपाती थरथरावीत तशा थरथरल्या! दान पडलं! जनवृंदातून मार्ग काढीत आसनाकडे जाण्यासाठी मी धडपडू लागलो. द्यूत पाहताना सर्वस्व हरवलेले प्रेक्षक कुणाकडेही लक्ष द्यायला तयार नव्हते! सर्वांची दृष्टी पटाजवळच्या केवळ कवड्यांवरच खिळली. तळपाय उंचावून प्रत्येक जण फाशांचा वेध घेऊ लागला. कितीचं दान पडलं असावं? आखाड्यातील आवाजाचा लक्ष्यभेद पाहताना जेवढी नव्हती, कांपिल्यनगरात शिवधनुष्यानं मत्स्यभेद पाहताना जेवढी नव्हती, तेवढी उत्सुकता डोळ्याडोळ्यांतून ओसंडून वाहत चालली होती! मृगातल्या मुसळधार पर्जन्यासारखी! क्षुद्र कवड्यांभोवती सहस्त्र डोळे! रेंगाळणारी सहस्त्र जीवनं! एक क्षणभरच मला वाटलं, यज्ञकुंडावर कृमी शोधण्याचा व्यर्थ यत्न करणाऱ्या कावळ्यासारखंच जीवनही असंख्य नगण्य आणि क्षुल्लक गोष्टींतून भवितव्य शोधण्याचा यत्न करीत असावं!

"बघ दुर्योधनाऽऽऽ सात म्हणजे सातच!!" राजा दुर्योधनाच्या हातावर टाळी देत मामांनी आनंदातिशयानं बैठकीच्या शय्येवरच पटकन केवढीतरी उंच उसळी घेतली. सर्व कुरू युवराजांनी टाळ्यांचा प्रचंड कडकडाट केला. खाड! ऽऽखाड! ऽऽखाड!! माझ्या मनाचेही दोन हात होऊन एकमेकांवर आदळू लागले! नुसत्या विचारांच्या टाळ्या! उलट-सुलट! त्या टाळ्यांचा ध्वनी मात्र एकसारखा नव्हता. कधी दुर्योधनाच्या आवाजासारखा निग्रही, कधी मामांसारखा बोचक खोचक, कधी अश्वत्थाम्यासारखा मधुर-अवीट, तर कधी पितामहांसारखा कठोर; पण समजावणीचा! टाळ्या – विचारांच्या अतूट, अखंड टाळ्या! त्या टाळ्यांत मी जणू बुडतच चाललो! माझा ध्वनी मला कुठंच ऐकू येईना! चोहोबाजूंनी अविरत खडखडणाऱ्या टाळ्या!

कसातरी आसनावर येऊन पोहोचलो. सभागृहावर दृष्टी फिरविताना कुरूंची सभा यापूर्वी कोणत्याच प्रसंगी एवढी फुलली नव्हती, याची मला प्रकर्षानं जाणीव झाली. सिंहासनावर महाराज धृतराष्ट्र बसले होते. त्यांच्या मिटलेल्या डोळ्यांच्या तांबसर, ओल्या कडा वळवळत होत्या. द्यूताचे फासे पाहायला तर त्या अधीर झाल्या नव्हत्या ना? त्यांच्या डाव्या हाताशी बसलेल्या राजमाता गांधारीदेवींचा हात वारंवार डोळ्यांवरच्या पट्टीकडे जाऊ लागला! सभेत काय चाललं आहे, हे त्या राजा-राणींना समजत नसावं! एक क्षणभरच मला वाटलं, अंध राजाला अंधारात चाचपडायला

लावणारी ही डोळसांची राजसभा आहे की वर्षांनुवर्षं कोंदटलेल्या भावनांचा हा स्वैर विस्फोट आहे!

पितामह भीष्म, गुरुदेव द्रोण, महामंत्री विदुर, अश्वत्थामा, अमात्य वृषवर्मा, सेनापती यांच्या उपस्थितीत यज्ञविधीसाठी दाही दिशांकडून आलेले शौनक, भृगू, च्यवन, असित, पैल, याज्ञवल्क्य, सुसाम, वालखिल्य, सहस्त्रपात, शंपाक यांसारखे ज्येष्ठ ऋषिजन बसलेले मला दिसले. त्यांपैकी एकालाही द्यूताच्या कवड्या थोपविता आल्या नाहीत! यज्ञाचा मुहूर्त केव्हाच टळून गेला तरी! एकूण मामांचं राजकारणच सर्वांना घेरणारं ठरलं तर! कवड्यांची करणी, कुरूंचा कायापालट करणारा कोणताही मार्ग त्यांना दाखवू शकते हे मामांनी ऋषिमुनींना साक्षी ठेवून सर्वांना पटविलं! मामा! गांधार देशातल्या उंटासारखी त्यांची चाल! मला तर ती कधीच सरळ दिसली नव्हती, वाटली नव्हती. पण त्यांनी हाती कवड्या घेऊन पटवून दिलं होतं की, राजकारणाच्या मरुभूमीत यांच्यासारखे उंटच श्रेष्ठ असतात! मार्गदर्शक ठरतात! वक्र चालीचे! केवळ उंट! अष्टांगी वक्र उंट!

पट गुंडाळताना स्वत:वर खूश झालेले मामा विजयाच्या उन्मेषानं बडबडू लागले, “युधिष्ठिरा, गायी, संपत्ती आणि सेवक-सेविकांसह इंद्रप्रस्थाचं राज्य हरलास. स्वत:सह चौघा बंधूंना बारा वर्षांच्या वनवासावर आणि एक वर्षाच्या अज्ञातवासावर लावून तो पणही हरलास आणि आत्ताच्या या साताच्या दानामुळे स्वपत्नी पांचाली कुरूंची दासी करणारा पणसुद्धा तू हरलास! सर्व जण तुला धर्म म्हणतात. धर्मानं वागणाऱ्या युधिष्ठिरा, फासे जिंकणारा कोणताच धर्म तुला कुणी आणि कसा शिकविला नाही? आता तरी तुला पटलं काय की, या सुबलराज शकुनीचा द्यूतात हात धरणारा एकही द्यूतपटू या आर्यावर्तात नाही! की, शिल्लक राहिलेल्या आपल्या वृद्ध मातेलाही पणाला लावून आज या शकुनीच्या कुशल हातांची आणखी एक अंतिम परीक्षा घेणार आहेस तू?” भुवया उडवीत मामांनी कावळ्यासारखी मान वाकडी केली! माझ्या सर्वांगातून एक असह्य वेदना देणारी विचित्र कळ उमटून गेली! गंगेच्या पात्रात तीन घटका तिष्ठल्यामुळे ती आली असावी!

“शकुनी!!” गदा सरसावून भीम मामांवर सिंहासारखा धावला. आपल्या मातेचा इतका नीचपणे केलेला निर्देश त्याला आवडला नाही.

“भीम, मागं फिर.” युधिष्ठिरानं प्रथमच तोंड उघडलं. त्याच्या पायाच्या अंगठ्याकडे पाहत भीम क्रोधानं तसाच मागं परतला.

“दासांनी स्वामींना एकेरी नावानं संबोधायचं नसतं! भीम, तू कुरूंचा दास आहेस, दास! तुझ्या हातातील गदा ही आता तुझी नाही. तुझी पत्नी पांचाली कौरवांच्या चरणांची आज एक बटीक आहे!” मामांनी हाती कवड्या खेळवीत भीमाला निरुत्तर केलं. खाली मान घालून, तो जेवढ्या त्वेषानं मामांवर उसळला तेवढ्याच शांतपणानं आपल्या स्थानावर बसला. त्यानं चावलेल्या स्वत:च्या ओठातून रक्त ठिबकत होतं! ‘कुलाला शोभणारा आसूड घेऊन घोड्यांना खरारा कर!’ म्हणत आखाड्यात मला दात विचकणारा तो भीम! आणि नियतीच्या एका थपडेतच कोलमडलेला हा भीम! त्याच्या शरीराची माजलेली रग कुठं गेली? कुठं गेला त्याचा पर्वतप्राय पराक्रम?

“बटीक! पांचाली कुरूंच्या चरणांची बटीकऽऽऽ!” आपण युवराज आहोत हे विसरून दुर्योधन खदखदून हसला! त्याचं हास्य मला अतिशय भेसूर वाटलं. त्याच्या

कोंदटलेल्या मनाचा ज्वालामुखी शरीराचे बांध फोडून हवा तसा विस्फोटत बाहेर पडू लागला! आपल्या आसनावर बसताना सभागृहात यच्चयावत सर्व वस्तुमात्रांवर आपली दृष्टी फिरवीत अधिकारवाणीत तो आपल्या खास युद्धासाठी ठेवलेल्या सारथ्याला – प्रातिकाम्याला – म्हणाला, ‘‘प्रातिकाम्या, त्या कुरूंच्या दासीला या सभागृहात आताच्या आता सादर कर – जशी असेल तशी!’’ पर्वतावरून गडगडणाऱ्या विशालकाय पाषाणांसारखे त्याचे शब्द होते! आज्ञा घेऊन प्रातिकामा सभागृहातून गेला.

आसनावरूनच मी युधिष्ठिराकडे पाहिलं. नेहमीच माझे पाय बारकाईनं निरखणारी त्याची दृष्टी त्या वेळी स्वत:च्याच पायांवरून ढळत नव्हती! नेहमी कुणालाही केवळ चिरडण्याचीच दर्पयुक्त घोषणा करणारी भीमाची आडदांड जीभ त्याच्याच दाढेखाली रगडली जाऊ लागली. अर्जुन! तो स्वत:ला अजिंक्य मानणारा धनुर्धर! असेलही अजिंक्य! पण मनाचा विशालपणा, दुसऱ्याच्या कौशल्याची गुणग्राहकता आणि खेळाडू वृत्ती या मनाच्या आत्यंतिक उच्च भावांचा साक्षात्कार त्यानं कर्णाला कधी दाखविला होता काय? ज्याचा उल्लेख करता येईल अशा एखाद्या प्रसंगी तरी? स्वत:चं कोडकौतुक करवून घेऊन कीर्तीचं वलय स्वत:भोवती गुंफताना, आपल्या स्वत:सारखंच केवळ धुनर्विद्येवर प्रेम करणारा अन्य कुणी या हस्तिनापुरात आहे याची जाणीव कधीतरी त्यानं राखली होती काय? उलट आपल्यापेक्षा कंकणभर वरचढ ठरणाऱ्या निषादपुत्र एकलव्याचा अंगठा गुरुदक्षिणेच्या गोंडस नावाखाली मागत असताना गुरू द्रोणांना विरोध करण्याऐवजी त्यानं सरळ साथच दिली नव्हती काय? कशाला माजविलं आहे हस्तिनापुरानं या अर्जुनाचं एवढं अवडंबर? केवळ एकाच योग्यतेसाठी! तो श्रेष्ठ कुलातील राजपुत्र आहे! क्षत्रिय आहे यासाठीच ना? आज त्याचं क्षत्रियत्व कुठं गेलं होतं?

माझ्या ठिकाणी तो असता तर! असाह्यता आणि सर्वांनी पदोपदी हीन म्हणून छेडताना निर्माण होणारी अगतिकतेची भयाण मानसिक दरी तो किती काल साहू शकला असता? अंगी कौशल्य, गुणवत्ता आणि तळमळ असतानाही उपेक्षित झालेल्या जीवनाच्या कष्टमय केंद्रबिंदूभोवती तो माझ्याइतका किती काल फिरू शकला असता? तगला असता?

माझे जीवनातील सर्व अनुभव सहन करायला किती कठीण आहेत, हे त्या पापी आत्मकेंद्री, गर्वोन्नत राजपुत्रांना पटविण्यासाठीच नियतीनं हे अशा घटनांचं आजचं अद्‌भुत द्यूत मांडलं होतं! आत्ताच त्यांना समजणार होतं की, अपमान म्हणजे मनाचं राजवस्त्र अखंडपणे कुरतडणारा काळा उंदीर! उपेक्षा म्हणजे गुणी माणसाच्या मनाचं शांत सरोवर खळबळून टाकणारा झंझावात! अवहेलना म्हणजे वीराच्या सर्वांगावर पडणारा तप्त लोहरस! तिरस्काराचे शब्द म्हणजे कानांच्या वारुळात घुसणारे विषारी भुजंग!! जीवनाचं हे असह्य स्वरूप – जे कर्णानं जीवनभर सहन केलं होतं, ते आज पांडवांना स्वत:च्या अनुभवानं कळणार होतं.

आखाड्यात ‘सूतपुत्र, सूतपुत्र’ म्हणून हेटाळलेला अगतिक कर्ण सगळ्या हस्तिनापुरानं चवीनं डोळाभर स्वस्थपणे पाहिला नव्हता काय? स्वयंवरात ‘सारथिपुत्र’ म्हणून लाथाडलेला कर्ण पाहताना कुण्या एकाचं तरी मन द्रवलं होतं काय? घृणेनं पेटून निघालं होतं काय? मग आज युधिष्ठिराच्या अविचारानं लाचार झालेले त्याचे बंधू आणि पत्नी पाहताना कुणालाही धाय मोकलून रडायचं काय कारण होतं? क्षत्राणीपणाचा टेंभा

मिरविणारी पांचाली दासी झालेली पाहताना कौरवांनी नरकाचा व्यापार मांडून जगातल्या यच्चयावत पावित्र्याच्या कंठालाच नख लावलंय असं उरी फाटेपर्यंत कर्कशपणानं ओरडून सांगायचं तरी काय कारण होतं? सत्य ते सत्य मानणाऱ्या किमान डोळस सडेतोडांना तरी नव्हतंच नव्हतं!

द्रौपदी! एक दासी! सुगंधी दासी! दासी म्हणजे सूतकन्येपेक्षाही क्षुद्र!! माझ्या मनाच्या दुंदुभीवर विचारांच्या टिपऱ्या हव्या तशा तडतडू लागल्या. दासी! हातात वरमाला घेतलेली दासी! अंध पतींची डोळस दासी!! दासांची पत्नी दासी!! माझ्या डोळ्यांपुढच्या काळ्या वलयात त्या काळ्या दासीचा लज्जित मुखडा नाचू लागला.

"महाराज, युवराज्ञी सभागृहात येऊ शकत नाहीत!" प्रातिकामा स्त्रियांच्या दालनातून फेरा घालून परत आला. पंख तुटलेल्या पक्षयासारखा रखडत-अडखळत! हात हलवीत!

"शकत नाही? दासी स्वामीसाठी काहीही करू शकते! शकलीच पाहिजे!" आसनावरून दुर्योधन पाषाणफेकीच्या भृशुंडीच्या दंडासारखा ताडकन उठला! त्याच्या डोळ्यांत काय होतं! अंगार! यज्ञकुंड? छे! धगधगीत ज्वालामुखी!!

"नाही महाराज, त्या रज:स्वला असून नुकत्याच ॠतुस्नात झालेल्या आहेत! स्नानागारातून स्नान करून बाहेर पडल्यानंतर केश उदवून आपली वेशभूषाही त्यांनी अजून केलेली नाही!" खाली मान घालून प्रातिकाम्यानं निवेदनं केलं.

"प्रातिकाम्या, सारथी म्हणून रथाचे घोडे जितक्या काळजीपूर्वक हाकतोस तितक्याच काटेकोरपणे तुला दुर्योधनाच्या आज्ञा पाळता येत नाहीत. दु:शासन, ऊठ, त्या प्रातिकाम्याला दाखवून दे की, सारथ्यात आणि क्षत्रियात काय फरक असतो ते! जा आणि तिला असेल तशी फरफटत इथं घेऊन ये!" विजेसारखी त्याची निर्मम, कडकडीत आज्ञा सुटली.

चापातून बाण सुटतो तसा दु:शासन सभागृहातून सुटला! त्या तशा स्थितीतही दुर्योधनानं प्रातिकाम्याची सारथी म्हणून केलेली हेटाळणी मला मुळीच आवडली नाही. धुंदपणानं बोलताना आपला मित्र कर्णही सारथी आहे, याचं त्याला विस्मरण झालं असावं. त्याच्या त्या उद्गारांनी मला मात्र सभागृहातून उठून मिळेल त्या रथात – माता-पित्यासह बसून तडक चंपानगरी गाठावी, असंच क्षणभर वाटलं. मी मनानं माझ्या आसनावरून उठलोही. एका अशा ठिकाणी जाण्यासाठी की, जिथं सारथ्यांची कुणीही आणि कधीही एवढी घोर हेटाळणी करणार नाही.

"सोडऽऽऽ सोडऽऽऽ! चांडाळा माझ्या शरीराला स्पर्शही करू नकोस."

हुंदक्यापाठोपाठ आर्त किंकाळ्या समवेत घेऊन दु:शासन – ज्या द्वारातून दिग्विजयी पूर्वज प्रवेशले होते – त्याच द्वारातून, सभागृहात प्रवेशण्यासाठी धडपडू लागला. दासीला घेऊन राजकुमार येऊ लागला.

विरोधासाठी प्रवेशद्वाराच्या भेगेत आपली निमुळती बोटं घट्ट रुतवून, उंबरठ्याला पाय तटवून दासी निकरानं त्याच्याशी झुंजू लागली. गंजीतून पेंढिका ओढून काढावी तशी तिला द्वारातून बलात ओढून काढण्यासाठी दु:शासन तिच्याशी झटापट खेळू लागला! पण घोरपडीसारखी भेगेत रुतलेली तिची बोटं हललीच नाहीत! तसं दु:शासनानं सरळ तिच्या कमरेला आपल्या भक्कम बाहूंचा विळखा घातला! माझ्या सर्वांगातून शिसारीची एक चमत्कारिक शिरशिरी तरळून गेली! त्या शिरशिरीत सूतपुत्र

कर्ण, धनुर्धर कर्ण, अंगराज कर्ण, मानी कर्ण सर्व-सर्व क्षणार्धात वितळून गेले! शिल्लक राहिला तो केवळ गंगेत उभा राहून अर्घ्यदान करणारा कर्ण!

"दु:शासना, ज्या बाहूंनी तू पांचालीच्या पवित्र देहाला आज या कुरुसभेत वडीलधाऱ्या, ऋषिमुनींसमक्ष कवटाळलं आहेस ते तुझे बाहू मुळातून उखडून मी अवकाशात फेकून देईन आणि जी छाती उन्मत्तपणानं फुगवून तू माझ्या पत्नीला एकवस्त्रा, रज:स्वला स्थितीतही इथं खेचून आणलंस ती तुझी उन्मत्त छाती फोडून तिच्यातील उष्ण रक्त मी सोमरसासारखं या सर्वांसमक्ष घटाघट प्राशन करीन! त्या उष्ण रक्तानंच तिचे मुक्त केश उदवून सावरेन!" हातातील गदा पायघडीच्या पाषाणावर दाणकन आदळून तिच्या टणत्कारात भीमानं दु:शासनवधाची घोर प्रतिज्ञा केली.

असंच काहीतरी माझ्या देहाच्या गाभाऱ्यातून कुणीतरी गर्जून सांगत होतं. कोण होतं ते? दररोज गंगाकाठी उभा राहणारा तो सूर्यशिष्य कर्ण होता. हात उंचावून तो मला सांगत होता – 'कर्णा, ऊठ, हा अन्याय आहे! ऊठ आणि थोपव या अन्यायाला! प्रकाशाचं दिव्य साम्राज्य सोडून तूही अंधकाराच्या भयाण गर्तेकडे कुठं चाललास? सूड, प्रतिशोध ही हलक्या मनाची क्षुद्र लक्तरं! फेकून दे ती! फेकून दे! ऊठ!'

'खाडऽऽ! खाडऽऽ! खाडऽ!' आसुडाचे फटकारे मारत, वेग आखडत एक संतप्त सारथी त्या सूर्यशिष्यासमोर क्षणातच ताठपणे उभा राहिला! आपल्या हातातील आसुडाचे दोन-तीन निर्दय फटकारे काहीही विचार न करता त्यानं प्रथम त्या सूर्यशिष्यावर ओढले. गंगेचं पाणी घेतलेल्या त्याच्या भावओंजळीवर लाथ मारून तो सारथी कडाडला – 'विसरलास काय इतक्यातच आपली पर्णकुटी? तो घोड्यांचा खरारा? स्वयंवरातील ती विषारी वाग्बाणांची काळीज चिरणारी फेक? कळू दे आज तिलाही एकदा कळू दे की, दासी ही सूतापेक्षाही हीन असते!'

आसुडाचे फटकारे आणि अर्घ्यदानाच्या ओंजळीतून पडणारी पाण्याची प्रपातासारखी प्रचंड धारा या दोहोंत माझं मन क्षणक्षणाला दोलायमान होऊ लागलं! मूढता, बधिरता आणि किंकर्तव्यता या मनाच्या दाटलेल्या धुक्यात समोरचं काहीच दिसेना. दिसलं तरी कळेना! कळलं तरी काहीच बोलवेना! मी कोण होतो? ते माझं मलाच समजेना!

अर्धमेली, मरगळलेली गाय पाठीवर टाकून वाघानं जशी फरफटत आपल्या गुहेत आणावी, तशी ती घायाळ झालेली शामवर्णी, सुगंधी दासी, कमरेला विळखा घालून दु:शासनानं सभागृहाच्या मध्यभागी जाळ्यात आणली! जाळ्यातून सुटण्यासाठी अविरत उसळ्या घेणाऱ्या पाण्याबाहेरच्या एखाद्या मासोळीसारखी, ती त्याच्या विळख्यातून सुटण्यासाठी एकसारखी तडफडून, अनावर उमाळे घेऊ लागली!

दु:शासनाचा तो विळखा तिच्या कमरेभोवती नव्हता... तो माझ्यातल्या सूर्यशिष्याच्या कंठाभोवती होता! क्षणाक्षणाला तो आवळला जात होता. पात्रात उभं राहून अर्घ्यासाठी ओंजळीत घेतलेलं पाणी त्या विळख्यामुळे त्या शिष्याच्या हातातून कसंतरीच भवितव्याच्या पात्रात परत पडू लागलं!

"पिताऽमह!" तिची एकच किंकाळी थेट छताला भेदून गेली!

"दु:शासन, त्या कौरवांच्या चरणदासीला, ती सुगंधी आहे म्हणून, आम्ही थोडंसं उच्च स्थान देतो! चरणांपासून थोडंसं वर... या मांडीवर आणून बसव तिला!" अधरीय मांडीवरून थोडं दूर सारून दुर्योधनानं उघडी मांड थोपटली! पितामहांनी शुभ्रकेशांकित

मान डावी उजवी झिडकारत खाली घातली!

"दुर्योधना, उन्मत्तपणानं जी मांड भरल्या सभागृहात तू उघडी करून दाखविलीस तीच मांड वेळ येताच या गदेच्या एकाच प्रहारात चेंदूनमेंदून टाकीन!" भीमानं गदा उचलून प्रतिज्ञा केली. नागफड्याच्या बोंडासारखं त्याचं मुख लालीलाल दिसत होतं, दहा हाती नागाच्या नुकत्याच खांडोळ्या केलेल्या नकुलासारखं!

"भीमा, दासांच्या प्रतिज्ञेला वल्गनेपेक्षा अधिक काहीच मोल नसतं!" दुर्योधनाला काय झालं होतं तेच मला समजेना. तो पेटत्या पलित्यासारखा दिसत होता! सारखी आग ओकत होता!

माझ्या शरीरात सारथ्याचं आणि सूर्यशिष्याचं भयानक द्वंद्व सुरू झालं! दोघांनी एकमेकांना निर्दयपणे बुकलायला सुरुवात केली! कोण कुणावर विजय मिळविणार होतं; काहीच समजत नव्हतं!

'अन्याय! एका रज:स्वलेवर भर सभागृहात गुरुजन आणि वृद्धांसमक्ष अन्याय! विटंबना! स्त्रीची विटंबना म्हणजे पावित्र्याची विटंबना! विनाश! स्त्रीच्या शीलाचा विनाश म्हणजे समग्र मांगल्याचा, शुचितेचा विनाश! स्त्रीच्या शीलावर आघात म्हणजे मानवतेच्या मर्मावर आघात! यातूनच संघर्ष! जगातील सर्व कोमल भावभावना दग्ध करणारा संघर्ष! वैराचं सर्वभक्षक यज्ञकुंड!! कर्णा, सूर्यशिष्या, ऊठ, दु:शासनाचे हात उचकटून टाक आणि दुर्योधनासह सर्वांना गर्जून सांग की, हा अन्याय आहे, अत्याचार आहे, हे अध:पतन आहे! विनाशकारी आहे हे सारं!' माझ्यातील सूर्यनिष्ठ कंठाच्या धमन्या ताणीत सारथ्यावर तावून तुटून पडला. हातातील किरणांची खड्गं त्याच्या उरात खुपसू लागला, पण त्या सारथ्याला काहीच होत नव्हतं! त्याचं कातडं अभेद्य होतं!!

'सूड! प्रतिशोध! अवमान, अवहेलना, तिरस्कार, उपेक्षा, वंचना, अधिक्षेप! कर्णा, हे आणि हेच तुझं जीवन आहे! जीवन कसलं ते जिवंत मरण! एका स्त्रीकडून वाग्बाणांनी पूर्वी तूच मृत झाला असताना आता तू कुणाचं आणि कसलं रक्षण करणार? कर्णा, उठू नको! जे घडत आहे ते सर्व न्याय्य आहे! निष्ठुर काळानं दु:शासन आणि दुर्योधनाची युती योजून तुझ्यावरच्या अन्यायाचा त्या उन्मत्त स्त्रीवर घेतलेला हा तितकाच उग्र अन् क्रूर सूड आहे! कर्णा, त्यालाच साथ दे! पाठिंबा दे!' सारथी आसुडाचे फटकारे मारू लागला. सूर्यशिष्य लपण्यासाठी आश्रयस्थान शोधू लागला! स्वैर धावू लागला!

'सूड! प्रतिशोध! एका वीराला स्त्रीचा सूड घेणं कधीतरी शोभा देतं काय? स्त्रियांच्या शीलाचं रक्षण हेच तर विक्रमी पुरुषाचं पौरुष! कर्णा, एक पळही वाया दवडू नकोस. आजचं तुझं मौन तुझ्या धवल चारित्र्याला कायमची काळोखी फाशील! ऊठ, पुढं हो, धाव आणि दु:शासनाचे हात उचकटून टाक! अरे आपत्तीतही तत्त्वनिष्ठ राहतो तोच तर खरा माणूस!' सूर्यशिष्यानं निकराचा अंतिम हल्ला केला.

'नाही! या सभागृहात पितामह भीष्म, द्रोण, विदुर, अश्वत्थामा, कृपाचार्य सगळे-सगळे असताना आज तूच उठण्याचं काय कारण आहे? पुन्हा विषाची परीक्षा घेणार आहेस की काय तू? भडकलेल्या दुर्योधनानं भर सभेत, 'सूतपुत्रा, तू कशाला मध्ये धडपडलास?' म्हणून प्रातिकाम्यासारखीच तुझीही वासलात लावली तर? किंवा ज्या स्त्रीचा तुला इतका कळवळा येतोय ती स्त्रीच 'सूतपुत्रापासून मला संरक्षण नको' म्हणाली तर? तर मग शंभर बाण काळजात घुसले तरी होणार नाही अशी एकाच शब्दानं वेदनेची कळ तुला होत राहील! तेव्हा कर्णा, उठू नकोस, एक सूतभरही हलू नकोस!'

शेवटी सारथ्यानंच विजय मिळविला! हातातले वेग उन्मत्तपणे अवकाशात फेकून तो आनंदानं आसुडाचे प्रहारावर प्रहार अर्घ्यदानी सूर्यशिष्यावर ओढू लागला. खाडऽऽ खाडऽऽ खाड!

उफाळलेला जलौघ नौका लोटत नेतो तसा दु:शासन तिला दुर्योधनाच्या आसनाकडे लोटत नेऊन लागला! त्याच्या अनावृत्त मांडीवर बसविण्यासाठी!

''थांब दु:शासना, अंध पित्याचे पुत्र अंध नसतात तर जगानं जे कधीही पाहिलेलं नसतं ते पाहण्याइतकेसुद्धा ते समर्थ डोळस असतात, हे त्या दासीला आत्ताच दाखवून दे! तिच्या सर्वांगावरची वस्त्रं उतर आणि तिला विवस्त्र करून या माझ्या मांडीवर बसव!'' लोहकारानं घण घालताच तप्त लोह धावेवरून चोहोबाजूंना ठिणग्याच ठिणग्या उडतात तशा दुर्योधनाच्या मुखातून शब्दांच्या केवळ ठिणग्याच ठिणग्या उडाल्या! सर्व ऋषींनी कानांवर हात ठेवले. नेत्र मिटले.

"दुर्योधनाऽऽ!" राजमाता गांधारीदेवी किंचाळल्या.

''दुर्योधना, नीचा!" गदा पेलून भीम दातओठ खात त्याच्या आसनाकडे धावला. उसळलेल्या शार्दुलासारखा!

''मागं फीर भीमा!" मान वर न उठविता, आपल्या जागेवरून एक अंगुळभरही न हलता युधिष्ठिरानं त्याला पुन्हा मागं घेतलं. केवळ शब्दांनी! पायाच्या अंगठ्याकडे पाहत.

आता मात्र असह्य कोंडीपोटी भीम युधिष्ठिराकडे बघत कडाडला, ''सहदेवा! थोडा अग्नी आण. द्यूत खेळणारे याचेच हात जाळून टाकतो!'' अर्जुनानं निकरानं त्याला आवरलं.

भडकलेला वणवा हिरवळीकडे सरकतो तसा क्षणात दु:शासन द्रौपदीकडे सरकला! तिच्या उजव्या हाताचं मनगट, खड्गाची मूठ पकडावी तसं त्यानं डाव्या हातानं घट्ट पकडलं. हात सोडवून घेण्यासाठी पाय आदळून मोठ्यानं किंचाळत ती धडपडली. कितीतरी असाहाय्य! अति अगतिक! त्या धडपडीत केवळ एकाच पुष्पमालेनं एकत्र बांधलेले तिचे विपुल भृंगवर्णी कुरल केस, माला तुटल्यामुळे सुटले आणि विखुरले! ते पाहताचा माझ्या डोळ्यांपुढं काळ्याकुट्ट घनदाट अंधकाराची अगणित वलयं उभी राहिली! मी कुठं आहे? सभोवती काय चाललं आहे? विटंबना! अत्याचार! अन्याय! ही कुरूंची राजसभा आहे, की कामुकांची, मदोन्मत्तांची, बुद्धी हरपलेल्या धुंदांची अंत:पुरी आहे? छे, या हस्तिनापुरात कशाला आलो मी? चंपानगरीतच एक सारथी म्हणून जगलो, वाढलो असतो तर काय बिघडलं असतं? कुठं चाललो आहे मी? अंधकाराच्या, अध:पतनाच्या भयाण दरीकडे! कुणी मला राजा केलं? दुर्योधनानं? हस्तिनापूरकरांनी? की अज्ञात नियतीनं? 'कर्णा, फेकून दे तो मुकुट आणि चालता हो हस्तिनापुरातून... चंपानगरीकडे!' कोणीतरी कंठशोष होईपर्यंत माझ्यातून आक्रोशत होतं. पण... पण मी मुकुट फेकू शकलो नाही! कितीही तीव्र इच्छा असली तरी जीवन कुणालाही कधीच मागं उलट नेता येत नाही! त्यापासून पळूनही जाता येत नाही! ते दिसेल तसं बघावं लागतं! असेल तसं जगावं लागतं!

दु:शासनानं सरळ पांचालीच्या अंशुकाच्या निरीला हात घातला! खवळलेल्या नागिणीसारखं परतून तिनं त्याच्या भक्कम हाताचा कडकडून चावा घेतला! कळवळत त्यानं दोन्ही हात झिडकारले! आकाशातून वीज सुटते तशी ती त्याच्या हातांतून कडाडत

सुटली! सभागृहात गरगर फिरू लागली. तडतडू लागली! छातीवर हात पिटून किंचाळू लागली.

पेटलेल्या पलित्यासारखी दिसणारी ती शामल मंडलं घेऊ लागली. झंझावातासारखा दु:शासन त्या पलित्यापाठोपाठ सतत गरगर धावू लागला. पलित्याची झोत भडकली! धावून-धावून थकलेली पांचाली शेवटी पितामहांच्या आसनासमोरच्या पायदंडीवर, वादळातल्या असाहाय्य कर्दळीसारखी उभ्यानंच उन्मळून धाडकन कोसळली. गवाक्षाचं कवाड घोंगावणाऱ्या वादळी वाऱ्याबरोबर भित्तीवर थडाथड आपटतं, तसं आपलं मस्तक पायदंडीच्या पाषाणावर अखंडपणे थडथड आदळू लागली! तिच्या मस्तकावरचं सौभाग्यलेण्याचं कुंकुम पुसटलं गेलं. त्यातच मस्तकातून उडालेल्या रक्ताच्या चिळकांडीतील थेंब मिसळले! स्नानाच्या वेळी तिच्या विपुल केसात साचलेले दवबिंदू तिच्या समोरच्या पाषाणावरील प्रत्येक आघाताबरोबर वर उडून पायदंडीवरील रक्तात मिसळले.

असह्यपणे मी डोळे मिटून घेतले. पण डोळे मिटल्यानं सत्यं का कधी मिटत असतात? माझ्या मिटल्या-जाग्या डोळ्यांपुढंसुद्धा दोन रक्तबिंदू आणि दोन अश्रुबिंदू उभे राहिले! क्षणभर ते थरथरले आणि दुसऱ्याच क्षणी त्यांतून रक्ताचा आणि अश्रूंचा ओघ स्रवू लागला! कणाकणांनी फुगणाऱ्या त्या ओघांच्या दोन प्रचंड महानद्या तयार झाल्या! गंगेपेक्षा कितीतरी विशाल! यमुनेपेक्षा कितीतरी विस्तीर्ण! घोंगावत त्यांच्या उफाळणाऱ्या लाटा एकमेकींत मिसळल्या! रक्ताच्या आणि अश्रूंच्या लाटा! मिसळलेल्या, उपाळलेल्या, घोंगावणाऱ्या! त्या भयाण मिश्रणाच्या भेसूर ओघातून अनेक योद्धयांची शिरकमलं तृणपात्यासारखी वाहत जाताना पाहून माझं मन विषण्ण झालं! विषण्ण झालं; पण भीतीनं थरकलं नाही!!

“पितामहऽऽऽ!”

हंबरड्याच्या आर्ततेनं दचकून मी डोळे उघडले.

लाह्यासारखे शब्द फुलत होते. “मी महाराज पांडूंची स्नुषा म्हणजे आपली कन्याच आहे! पितामह उठा. या चांडाळाचे हात उखडून टाका. पदर पसरून मी भिक्षा मागते. माझ्या शीलाचा या कुरूंच्या प्राचीन राजसभेत व्यापार मांडू नका! उठा, कुरूंच्या कुलाची स्त्रियांच्या लज्जा रक्षणाची परंपरा या मदांध नीचाला खड्गानं दाखवून द्या.”

पण...

पण पितामह भीष्मांचं मस्तक देठ मोडलेल्या कमळासारखं खालीच होतं. आखाड्यात माझ्यासाठी घुमलेला बाणाच्या टणत्कारासारखा त्यांचा तो कणीदार आवाज पुन्हा राजसभेत घुमेल असं मला वाटलं, पण तो घुमला नाही.

पितामह भीष्म! कुरुकुलाचा ध्वजदंड! ऋषिवर्य वशिष्ठांचा वेदांचा शिष्य! बृहस्पती आणि शुक्राचार्य यांच्याकडून शास्त्राध्ययन झालेला विक्रमी क्षत्रिय! च्यवन, भार्गव आणि मार्कंडेय यांच्याकडून धर्माचं सखोल ज्ञान घेतलेला धर्मज्ञ! शंतनू महाराजांचा साक्षात गंगापुत्र! काशीराज आणि उग्रायुध यांना धूळ चारणारा वीर! ज्यांच्यापासून धनुर्वेद शिकला त्या जमदग्निपुत्र परशुरामांचा धनुर्युद्धात सरळ-सरळ पराभव करून सत्शिष्य गुरूपेक्षा काकणभर श्रेष्ठच असतो, हे सिद्ध करणारा विख्यात धनुर्धारी! आजन्म ब्रह्मचर्य पाळलेला तेजाचा धगधगीत निधी! पण...

पण तो भीष्मही खाली मान घालून स्तब्ध होता.

जीवनचरित्रातला बहुधा पहिलाच असलेला हा पराभव त्या ज्येष्ठ वृद्धानं का स्वीकारला? की काही-काही प्रसंगच मी-मी म्हणविणाऱ्या समर्थांचीही लज्जा लुटण्यासाठीच कुशल नियतीनं योजलेले असतात?

पितामहांना स्तब्धच पाहून तिनं डोळे विस्फारले. हातांनी छाती पिटत ती ओरडली, ''महाराजऽऽऽ!'' तिचा आक्रोश सभागृहाच्या छताला भेदून आकाशाच्या वितानाला गदागदा हलवतो आहे की काय असंच मला वाटलं! कानांच्या रंध्रारंध्रांत विजा कडकडू लागल्या, 'कर्णा ऊठ! ऊठ कर्णा! घटकान्घटका अर्घ्यदान करणाऱ्या सूर्यशिष्या ऊठ! अंधकाराचं हे साम्राज्य उजळून टाक! अरे सूड आणि प्रतिशोध ह्या हलक्या मनाच्या क्षुद्र कल्पना आहेत! कोंदटलेल्या भावनांची रटरटणारी दलदल असते ती! दलदलीत सापडलेल्या हत्तीसारखा तूही आज तसाच स्वस्थ बसणार आहेस की काय? डोळ्यांच्या मुखांनी तेजाचा रस घटकान्घटका रोज प्राशन करणाऱ्या सूर्यभक्ता, आजचा क्षण – प्रत्येक क्षण तुझ्या आणि सर्वांच्या भवितव्याच्या दृष्टीनं सुवर्णमोलाचा आहे! ऊठ. तुझ्या एकाच शब्दानं सभागृहाचं स्वरूप तू म्हणशील तसं पालटणार आहे!'

"महाराजऽऽऽ आपल्या अविचारी, अत्याचारी पुत्राला आवरा! राजमाताऽऽ माझी लज्जा राखा! मी दासी म्हणून, ही कुरूंची राजसभा दररोज झाडायला तयार आहे, आपली राजवस्त्रं धुवायला तयार आहे, केशभुषा करायला आहे!" आपले हात महाराजांसमोर पायदंडीवर आदळून "महाराजऽऽ महाराणीऽऽ!" म्हणून ती टाहो फोडू लागली. तिच्या हातातील सुवर्णकंकणं आघातामुळे चेपून गेली, पण – पण तो राजदंड उचलला गेला नाही.

बहिरी ससाण्यासारखी झेप घालून दु:शासनानं तिच्या मुक्त केसांच्या बटा मुठीत पकडल्या. घोंगावत कोसळणाऱ्या प्रपातासारखा खदखदून हसत तो म्हणाला, ''ए दासी, कुणाला चांडाळ आणि नीच म्हणतेस? मला?" हातातल्या केसांना त्यानं एक तीव्र झटका दिला. वेलीला झटका बसताच तिच्यावरचं फूल लडलडतं तशी तिची कोमल मान लडलडली. तिच्या मानेचा झटका सणक होऊन सरळ माझ्या पाठीत कुठंतरी खोलवर उमटला. ''तुझ्या या षंढ पतींना चांडाळ म्हण!'' दु:शासन खदखदून हसतच होता.

तो सर्व प्रकार पाहताना माझ्या सर्वांगावर शिसारीचा घृणामय रोमांच उमटला. पण तो क्षणभरच. हीच ती गर्वोन्नत मान होती! वारंवार तिरस्कारानं झटकलेली! नको तिथं नको त्या वेळी खुपसलेली! अनेकांना पदोपदी खाली पाहायला लावणारी! हीच – हीच ती आत्माभिमानी उद्धट स्त्री होती, पांचाली!

स्त्री म्हणजे महान मांगल्याचं मनोहर प्रकटन, असं म्हणणाऱ्या सर्व भावुकांना याची कल्पनाही नसेल की, हीच स्त्री प्रसंगी विराट विनाशाचं, विरूप विध्वंसनाचं केवळ एकमेव कारण ठरू शकते! एकमेव कारण!

दु:शासनानं केस धरताच त्याला तसाच आपल्या मागून फरफटत ओढून घेत ती सभागृहातल्या सर्व सभासदांना मोठ्यामोठ्यानं आक्रोशत हाकारू लागली, "आचार्यऽऽऽ, गुरुदेव द्रोणऽऽऽ कृपाचार्यऽऽऽ, गुरुपुत्रा अश्वत्थामन्ऽऽऽ, अमात्यऽऽऽ तुम्ही सर्व स्तब्ध का? कुणीतरी उठा! कुणीतरी उठा!"

तिच्या स्वरास्वरांत हृदय भेदणारी आर्तता होती, पण मला ती मुळीच जाणवत नव्हती! का जाणवावी? माझं हृदयच लोखंडासारखं कठीण झालं होतं! अंगावरच्या कवचापेक्षाही अभेद्य! कुणाच्याही आक्रोशानं आता विरघळण्यासारखं त्याच्यात काहीच

नव्हतं! का असावं? कसं असावं?

छाती पिटीत, हात पसरीत ती प्रत्येकाच्या आसनासमोरून आक्रोशत पुढं सरकू लागली, ‘‘हस्तिनापुरातील पुरुषश्रेष्ठांनो, समरांगणात तळपणाऱ्या वीर योद्धयांनो, कुरूंच्या मानबिंदूंनो – मी असाहाय्य, अबला पांचाली आज पदर पसरते, मला आपल्या समर्थ बाहूंचं अभय द्या! उठा, या अभागी भगिनीला या दुष्टांच्या हातून वाचवा! स्त्रीच्या कुशीत जन्म घेणाऱ्या शक्तिशाली पुरुषांनो, एका स्त्रीचा हा टाहो तुमच्या पुरुषार्थाला जागृत करीत नाही काय?’’

आसनामागून आसनं मागं टाकीत ती माझ्या दिशेनं येऊ लागली. अश्रूंचे ओघळ, बोलताना हलणाऱ्या तिच्या मुखावरून घरंगळत कंचुकीत विरत होते. एका क्षणात – आता एका क्षणातच ती माझ्या आसनासमोर उभी राहणार होती. हात विस्फारून कळवळून म्हणणार होती, ‘‘अंगराज, या अभागी अबलेला तुमच्या अंजिक्य, अभेद्य कवचामागं तरी मुख लपविण्यासाठी स्थान आहे काय? अत्याचाराच्या या लोहनीतीला तुमचं अभेद्य कवच तरी आज भेदू शकेल काय? अंगराज-कर्ण पांचालीचं पावित्र्य तुम्ही तरी रक्षू शकाल काय?’’

बस्स! मित्रद्रोह ठरो वा प्राण जावोत; पण आपल्यासमोर हात पसरून उभ्या राहिलेल्या पांचालीच्या पवित्र प्रावरणाला स्पर्शणारा निर्दय, निष्ठुर हात खड्गाच्या एकाच फटकाऱ्यात निखंदून टाकायचा! केवळ एकाच क्षणानंतर कर्ण कुरूंच्या सभागृहातील एक सभासद राहणार नव्हता! दुर्योधनाचा प्राणाला प्राण देणारा मित्र, त्याचा मित्र राहणार नव्हता! खाली मस्तक घालून मूकपणे अन्यायाला संमती देणारा विवश आश्रित राहणार नव्हता. अपमानाच्या अग्निकुंडात एकाकीपणानं होरपळणारा कोंदट सारथी राहणार नव्हता. सूडासाठी तळमळणारा सामान्य कीटक राहणार नव्हता! केवळ एकाच क्षणानंतर आपल्या आश्रयासाठी आलेल्या एका स्त्रीचं रक्षण करणारा तो एक सूर्यशिष्य राहणार होता! एक सत्य पुरुष ठरणार होता.

मी माझ्या मनाचे सर्व धागे हळुवारपणे एकत्र बांधले. धाग्यात सूतपुत्र कर्ण, कुरूंचा योद्धा कर्ण, अवमानित कर्ण, सूडांध कर्ण सगळ्या सगळ्यांना करकचून एकत्र आवळून मी त्यांना शरीराच्या एका कोनाडचात फेकून दिलं! किरणांचे असंख्य घोडे उधळीत माझ्यातील सूर्यशिष्य कर्ण उभा ठाकला; येईल त्या प्रसंगाला तोंड द्यायला! एका क्षणानंतर जे नाटच घडणार होतं ते खरोखरच सर्वांना प्रचंड धक्का देणारं ठरणार होतं. विरोधासाठी कुरूंची सर्व सभा जरी आता उभी ठाकली असती तरी कुणाचाही हात कर्णापाठी उभ्या राहिलेल्या पांचालीवर पडला नसता! स्त्रीदाक्षिण्याचा भोंगळ टेच त्यात असणार नव्हता! पांडवांवरच्या दयेची जाणीव त्यात आता राहणार नव्हती! स्वतःच्या पौरुषाचं प्रदर्शन तर त्यात मुळीच असणार नव्हतं!

आश्रयार्थीला दिलेलं ते केवळ एक अभयदान ठरणार होतं! केवळ अभयदान! ‘‘कर्णा, माझी लज्जा राख!’’ म्हणून हस्तिनापुरातल्या कोणत्याही सामान्य स्त्रीनं जरी आकांतानं माझ्याकडे धाव घेतली असती, तरी कधीही आणि कोणत्याही प्रसंगी मी तिला हे आणि हेच दान दिलं असतं! ही तर पांचाली होती! स्वतःचं जीवनदान देऊनसुद्धा मी तिचं संरक्षण केलं असतं.

एक हात पसरून दुसऱ्या हातानं दुःशासनाला ढकलून देत-देत ती आसनामागून आसनासमोर आक्रोशात पुढं सरकू लागली. प्रलयाच्या महानदीत एखादा देवदार वृक्ष

फरफटत ओढला जावा तसा दु:शासन तिला विपुल केसांच्या पोटरीपर्यंतच्या दीर्घ बटांबरोबर ओढला जात होता! एक स्त्री असूनही दु:शासनासारख्या द्वंद्व योद्धयालाही ती मुळीच आवरत नव्हती! आपल्या पौरुषाला एका स्त्रीचं हे जळजळीत आव्हान दु:शासनाला असह्य झालं होतं. चिघळून चेतावलेला दु:शासन तिच्या बटांचा आपल्या मनगटाभोवती विळखा घालून तिच्या मानेला वारंवार झटके देत तिला घायाळ करण्याचा क्रूर प्रयत्न करीत होता. त्याला सभागृहात द्रौपदीशिवाय काहीच दिसत नसावं! ऐकू येत नसावं!

उर्णनाभ, चित्रचाप, दृढवर्मन, निषंगिन, महाबाहू, विशालाक्ष, चित्रवर्मन, सोमकीर्ती – प्रत्येकासमोर टाहो फोडून ती त्यांच्यातील वीरत्वाला आव्हान देत होती. दीनवाणी – अतिशय दीनवाणी मुद्रा करून हंबरडा फोडत होती. वादळात – घनदाट अरण्यात वाट चुकलेल्या एकाकी गायीसारखी! कुणीही वर उठत नव्हतं.

माझ्या उजव्या हाताच्या आसनावर बसलेल्या युवराज पद्मनाभाला तिनं कवळवळून साद घातली, “युवराजऽऽऽ पद्मनाभन्!” आखाड्यातल्या सहस्त्र मुखांनी केलेला अर्जुनाचा आणि माझ्या जयजयकार जेवढा तीव्र नव्हता तेवढा तिचा एकटीचा आक्रोश तीव्र होता! पण... पद्मनाभानं मस्तक उंचावलं नाही!

पुढच्याच क्षणी ती माझ्या आसनासमोर डबडबल्या नेत्रांनी उभी राहिली! माझ्या जीवनक्रमात असे कितीतरी आमूलाग्र वळण देणारे अविस्मरणीय क्षण होते! त्या क्षणाक्षणांनीच माझं सारं जीवन चितारलं होतं! त्या सर्व क्षणांत हा क्षणच अत्यंत महत्त्वाचा होता. कळसाचा होता. माझी कुंडलं एकाएकी सरसरू लागली. ती माझ्यापुढं दीनवाणी उभी राहिली म्हणून नव्हे! एका आवेगातच ती मला आव्हान करणार होती आणि काय घडणार होतं ते माझं मलाच सांगता येणार नव्हतं! आसन सोडून सरळ मध्यभागावर मी झेप घेणार होतो.

एक क्षणभरच तिनं माझ्याकडे पाहिलं. नित्याची आत्मोन्नत क्षत्राणीची एखादी साधीशी छटाही तिच्या डोळ्यात नव्हती असं मला वाटलं... पण ते क्षणभरच. आसनावरून उठत कमरेच्या खड्गाची मूठ पकडून मी ताठ उभा राहिलो. तिचा केवळ एकच शब्द तिच्या ओठाबाहेर आता उमटणार होता ‘अंगराजऽऽ!’ आणि दुसऱ्याच क्षणी जरासंधाशी जुंपली तशी माझी दु:शासनाशी जुंपणार होती. मी उठलेला पाहताच पितामह, अमात्य, अश्वत्थामा, कृपाचार्य, गुरुद्रोण सर्वांनी आपली मस्तकं आश्चर्यानं उंचावली. सारंग पक्षयांच्या थव्यासारखे माझ्या शरीरातले रक्ताचे कण उधळले होते. गंगेकाठी ग्रीष्मात तापणाऱ्या पाषाणासारखं शरीर रसरसून तापलं होतं! कानांत शंखनादासारखी अबोध शीळ घुमत होती. मी आपले कान त्या एका शब्दासाठी टवकारले!

पण... पण एक शब्दही न उच्चारता ती खाली मान घालून तशीच पुढं सरकली! मूकपणे! आतल्या आत स्फुंदत! का कुणास ठाऊक? माझ्या मस्तकावर सहस्त्र विजा कोसळल्याचाच मला भास झाला! तशीच का पुढं सरकली ती? कोणत्या भावनेनं? एका सूतपुत्रापुढं एका क्षत्राणीनं आपला हात दीनवाणेपणे का पसरावा, म्हणूनच की काय? परत मस्तकाच्या वारुळात असंख्य प्रश्नांच्या भुजंगांनी फणा उभारल्या! अनावर घोड्यांसारखे विचार उधळले! त्यांच्या टापांखाली संयम, विवेक, औदार्य, सहृदयता या जगातील सर्वश्रेष्ठ सद्गुणांची रक्ताळलेली शरीरं प्राण जाईपर्यंत तडफडू लागली!

दोन्ही कानांवर हात ठेवून तिला कंठरवानं ओरडून सांगावसं वाटलं, इतक्या कंठरवानं की, त्या नादानं अंगावरच्या अभेद्य कवचालाही तडे पडावेत! की, 'मी सूतपुत्र नाही! मी अंगराज आहे!' हातातील खड्गाची मूठ थरथरू लागली. उभं राहणं अशक्य झाल्यानं तसाच आसनावर कोसळलो! मन, शरीर, जाणीव सर्व-सर्व बधिर, सुन्न झालं होतं! अंगावर अभेद्य कवच देणाऱ्या योद्धयाला मनावरही अभेद्य कवच द्यायला नियती का विसरते?

स्वत:च्या स्वयंवरात वाटेल ते बोलून घेऊन तिनं माझ्या मानी मनाच्या शतश: चिंधड्या केल्या होत्या आणि आज... आणि आज काही न बोलता तिनं लत्तेच्या एकाच प्रहारात त्या धुळीत फेकल्या होत्या! अंगावरची तलम राजवस्त्रं आणि मस्तकावरचा मुकुट यांत सजवलेला, सभागृहात बसलेला एक केवळ वृषभ यापेक्षा कर्ण तिला अधिक असा काहीच वाटला नाही की काय? सामान्यांतल्या सामान्य राजपुत्रापुढं पसरलेला हात तिला अंगराज कर्णापुढं मात्र पसरावा असं वाटलं नाही! की, तिला हेच सुचवायचं होतं काय की प्रातिकामा आणि कर्ण यांत कसलाच भेद नाही! वणव्यातल्या अरण्यातून हत्तींचे कळप चिंऽऽ चिंऽऽ करीत एकमेकांना अंगं घासून नुसते धावतच सुटतात तसे असंख्य विचार माझ्या मस्तकात धावू लागले. विचार आणि शंका यांच्या अखंड माऱ्यानं मस्तकाचा कुंभ तडकणार की काय म्हणून मी तो हातांनी आवळून धरला.

सर्व आसनांसमोरून लाथाडलेली, धापावणारी, केश विखुरलेली ती दासी दु:शासनानं निर्वाणीच्या बलानं सभागृहाच्या मध्यभागी आणली. दासी! होय दासीच! सर्व कुरू राजपुत्रांसाठी ती दासी होती! द्यूतानं ठरविलेली! पण माझ्यासाठी ती दासीपेक्षाही हीन होती! जीवनातल्या सत्यांनी ठरविलेली!

सर्व सभागृहाला आणि आपल्या पतींना ती निवडक शब्दांनी, धाय मोकलून दूषणं देत होती. कटीत वाकून दु:शासनाच्या हाती निरी येणार नाही यासाठी शरीराची मोळी करीत होती! तिच्या मर्मभेदक शब्दांनी कुणाकुणाला काय-काय वाटत होतं ते मला माहीत नाही, पण माझं मन यत्किंचितही द्रवलं नाही. का द्रवावं? सूतांना कान नसतात आणि मनं तर नसतातच नसतात! असलीच तर पाषाणांची असतात! धुळीत पडलेली! आणि कुणीही त्यांना ठोकरण्यासाठी!

एका जागीच मंडलं घेत निर्वाणीचं म्हणून आकांडतांडव करीत ही हवं तसं बोलत होती. कडकडणाऱ्या विजेसारखी – "सांगा, या कुरूंच्या प्राचीन राजसभेत आज एकतरी सिंहाच्या छातीच्या सत्यप्रिय वीर पुरुष उरला आहे काय? ज्या सभेत वृद्ध नाहीत ती सभा नव्हे, ज्या वृद्धांत अधर्माची तिडीक येणारा धर्म नाही ते वृद्ध नव्हेत आणि ज्या धर्मात सत्यासत्याची चाड राहिली नाही तो धर्म नव्हे! सांगा, कुणीही सांगा. ज्या पतीनं स्वत:ला पणाला लावून स्वत:चं जीवित गमावलं आहे त्याला आपल्यानंतर पत्नीला पणाला लावण्याचा कोणता अधिकार उरला होता? धर्मराज, धर्मराज म्हणून घेणाऱ्या माझ्या पतीनंही धर्माला अनुसरून सर्वांना पटवून द्यावं की, स्वत:नंतर मला पणावर लावण्याचा अधिकार कोणत्या धर्मानं त्यांना दिला?

"स्त्रियांना मानबिंदू मानून त्यांच्या शीलरक्षणासाठी रक्ताच्या नद्या वाहवणाऱ्या कोणत्या ना कोणत्यातरी एका नरशार्दूलानं एकेकाली भूषविलेल्या आसनावर तुम्ही प्रत्येक जण बसला आहात. त्या निर्जीव आसनांचा कण आणि कणसुद्धा आज जिवंत होऊन तुम्हाला गर्जून हेच सांगेल की, स्त्रियांचं शील म्हणजे एखाद्याला

द्यूताच्या पटात गुंडाळता येणारी नरद नसते! केव्हाही हाती घेऊन कशीही फेकावी अशी फाशांची कवडी नसते! स्त्रीची विटंबना करणारा हात, समाज वा राज्य विनाशाच्या गर्तेतच लोटण्यास कारणीभूत होईल! तुम्हा प्रत्येकाचा जन्म एका स्त्रीच्या वत्सल कुशीतच झाला आहे, याची जाणीव तरी तुम्हाला आज उरली आहे काय? सांगा, आपल्या मातेच्या स्तन्याचे, ओठावरचे तुषार ज्याला अजूनही स्पष्ट स्मरतात असा एकतरी सुपुत्र आज या सभेत जिवंत आहे काय?''

क्षणभर सगळीकडे शांतताच शांतता पसरली. दु:शासनाची मूठ ढिली पडली.

शांत जलाशयातून एखाद्याच खवल माशानं कळपातून फुटून जलपृष्ठावर उसळी घ्यावी तसा दुर्योधनाचा केवळ एकच भ्राता विकर्ण उठला! हात उंचावून आपल्यापेक्षा वडील असलेल्या दु:शासनाला अधिकारवाणीनं म्हणाला, ''दु:शासना, पांचालीच्या शरीराला स्पर्शही करू नकोस! सर्व जण लक्षात ठेवा की, महाराणी तपती, नलिनी, भूमिनी, सुदक्षिणा, वीरजा, देवयानी, गंगा आणि सत्यवती यांनी भूषविलेली राजसभा आहे ही! इथं राजस्त्रीवर अन्याय करणं म्हणजे मंदिरात प्रत्यक्ष आराध्य देवतेची मूर्ती पायदळी तुडविण्यासारखं आहे! जो पती स्वत: द्यूतात हरला त्याला आपली पत्नी पणावर लावण्याचा मुळीच अधिकार नाही. ज्या क्षणी तो हरला त्या क्षणी त्याच्या पतित्वाचा अंत झाला. अन्यायाला पाठीशी घालणारी राजयंत्रणा, समाज वा धर्म विश्वाच्या प्रलयात टिकूच शकत नाही! धुंद आणि मूढ सभासदांनो, एका रज:स्वला, एकवस्त्रा स्त्रीवर वीरांच्या सभेत चाललेला हा धडधडीत अन्याय आहे! आपण महाराज आयू, नहुष, ययाती, पुरू, हस्ती, अजमीढ, संवरण, कुरू, जन्हू, प्रतीप आणि शंतनू यांचे वंशज आहोत याची एकाला तरी आज जाणीव उरली आहे काय? सांगा, आपल्या कोणत्याही पूर्वजांच्या कारकिर्दीत कधी एवढा काळा दिवस या सभागृहानं पाहिला होता काय? ज्या सभागृहात दिग्विजयाचे आणि अश्वमेधाचे घोडे पाठविण्याचे, हिमालयाला गवसणी घालणारे विचारविमर्श झाले त्याच सभागृहात आज एका अबलेचे लज्जारक्षणासाठी फोडलेले टाहो घुमून विरताहेत! आणि तेही कुरुकुलाच्याच एका स्नुषेचे! धन्य आहे त्या कुरूंच्या राजसिंहासनाची आणि या योद्धयांची!

''लहान असूनही मी वृद्ध म्हणविणाऱ्या ज्येष्ठांना स्पष्ट विचारतो की, समारांगणात तळपणारी त्यांची खड्गं आज गंजली आहेत काय? पितामह, महाराज, आचार्य, गुरुदेव, अमात्य, कृपाचार्य आणि सर्वांना धर्मदान करणारे इथले तपस्वी, ब्रह्मज्ञ, ऋषिजन अंगावर वीज पडल्यासारखे आज प्रेतवत का बसले आहेत? मी राजकुमार विकर्ण सांगतो – एका पतिव्रतेचे आक्रोश, किंकाळ्या आणि टाहो यांचं रौद्रभैरव संगीत घेऊन वाहणारे हे जळजळीत अश्रू महापुरातल्या गंगेचं स्वरूप घेऊन जेव्हा घोंघावत धावतील तेव्हा यांतल्या ज्या आसनांच्या अभिलाषेनं तुम्ही सर्व जण अबोल आहात त्यांतील एकही आसन ठिकाणावर असणार नाही! पतिव्रतेवर अन्याय म्हणजे पावित्र्यावर अन्याय! पतिव्रतेची विटंबना म्हणजे पुरुषार्थाचा अंत!'' सभासदांवर गरगर डोळे तो अखंड वर्षणाऱ्या मृगाच्या मुसळधार पर्जन्यासारखा शब्दांच्या धारा वर्षवू लागला.

सगळ्या राजसभेत तो एकटाच उठला म्हणून त्याच्याबद्दल मला अतिशय अभिमान वाटला, पण तो क्षणभरच. त्याची शिष्टाई सत्यावर आधारलेली होती काय? तो कुणाला पतिव्रता म्हणत होता? समाजाच्या संरक्षणाचे सर्व संकेत धाब्यावर बसवून

एकाच देही पाच पतींशी रममाण होणाऱ्या एका स्वैराचारिणीला त्यानं सांगितलेल्या तपती, विरजा, सुदक्षिणा, देवयानी या विख्यात महाराणींच्या पायाशी बसण्याची तरी या पांचालीची पात्रता होती काय? यांतल्या कुठल्या महाराणीनं एकापेक्षा अनेक पती निवडून पातिव्रत्याचा महान आदर्श हस्तिनापुराला घालून दिला होता? आपल्या आप्तेष्टांच्या शारीरिक व्यंगाचा दात विचकून त्यांनी निर्दय निर्देश केला होता? कोणत्या वीराला त्यांनी कुलाचा ध्वज हाती उंचावून हिच्यासारखं हीन-हीन म्हणून मिळेल तेव्हा ठोकरलं होतं? पांचाली पतिव्रता नाही! ती वारांगना आहे – कुलटा आहे – कलंकिनी आहे! विषारी भुजंग उसळल्यासारखा माझ्यातील सारथी खवळून उठला! 'कर्णा, थांब! कर्णा, थांब!' म्हणणाऱ्या सूर्यशिष्याच्या मस्तकावर पाय ठेवून तो ताडकन उभा राहिला! फूत्कारत बोलू लागला. धुंदपणे मुखाला येईल ते.

"विकर्णऽऽ, तू मूर्ख आहेस! सभागृहात पितामह, महाराज, आचार्य, अमात्य सर्व उपस्थित असताना ते काहीच बोलत नाहीत हे जाणूनही धर्माची धुरा केवळ आपल्या एकट्याच्याच स्कंधावर पडल्याच्या आवेशानं तू कंठाच्या धमन्या व्यर्थ ताणतो आहेस! पतिव्रता, पतिव्रता म्हणून वारंवार जिचा तू कंठरवानं उद्घोष करतो आहेस ती पतिव्रता मुळीच नाही! एकाच देही पाच पतींशी रमणारी पांचाली विलासिनी आहे! कलंकिनी आहे! वारांगना आहे! कुलटा आहे!! अशा स्त्रीला पाचापेक्षा एकशे पाच पतीच पसंत असतात! दासीला वस्त्रं पांघरण्याइतकी तरी लज्जा असते, विनय असतो. कुलटेला तो कधीच नसतो! दु:शासन, ती सवस्त्र सभागृहात आली काय आणि विवस्त्र आली काय सारखीच आहे! लज्जा नसलेल्या कुलटेच्या लज्जाहरणाच्या मूर्ख कल्पनेनं फाटून जाण्याइतकं कुठल्याही सभासदाचं काळीज नवनीतासारखं नाही. विकर्ण, जे माहीत नाही त्यात तोंड खुपसू नकोस. खाली बैस! दु:शासन, आजपर्यंत पांडवांच्या असमर्थ कमरेला लटकलेलं हे सावळं खड्ग वस्त्राच्या मान्यातून बाहेर खेच!"

नागसर्प शिरताच ढोलीतून केकाटत बाहेर पडणाऱ्या पोपटांच्या थव्यासारखे शब्द बाहेर पडले! मिळेल त्या दिशेनं धावणारे, हिरवट, विषारी! मी बोललो. यथेच्छ मद्य प्यालेल्या धुंद मद्यप्यासारखा! वर्षानुवर्षं अवहेलनेत झालेल्या मनाच्या थाळीत सूडाचे धगधगीत अंगार घेऊन ती थाळी मी तिच्या उन्नत मस्तकावर पालथी केली होती! सर्वांसमक्ष. केवळ सूड भावनेनं.

सूड ही मनाची अंगभूत क्रिया नाही. ती केवळ प्रतिक्रियाच आहे! जेव्हा दोन मनांच्या स्वाभिमानाची वलयं एकमेकांना छेदू लागतात तेव्हाच प्रतिक्रियेच्या विकर्ष रेषा निर्माण होतात! जग त्यांनाच सूड म्हणतं, क्रौर्य म्हणतं.

माझ्या शब्दांची वाटच पाहणाऱ्या दु:शासनानं केळीच्या गाभ्यावरचा पापुद्रा फोडावा तसा तिच्या अंशुकाला हात घालून तिचा पदर फेडला! उरावरच्या कंचुकीवर हात घेऊन तिनं जीवघेणा हंबरडा फोडला, "अच्युता, मिलिंदा, माधवा, केशवा, गोपाळा, घननीळाऽऽ धाव!"

"श्रीकृष्णाऽऽ, मधुसूदनाऽऽ धरती होऊन दुभंगून या अभागी पांचालीला आता पोटात घे! यज्ञकुंडातला अग्नी हो आणि या याज्ञसेनेला त्यात दग्ध करून तिच्या जीवनयज्ञाच्या सांगतेची भगभगीत रक्षा करून या अंध, अधमांच्या कपाळाला फास! माझ्या या असाहाय्य अश्रूंच्या यमुनेच्या महापुरात या कामुकांची मदांध मस्तकं प्राण जाईपर्यंत घुसमटवून टाक! माझ्या या उष्ण श्वासांनी कुरू कुलाच्या माजलेल्या अरण्यात

लपलेल्या या विषारी भुजंगांना होरपळून टाक! कंसाला वधणाऱ्या केशवा, शिशुपालाचा कंठनाळ छेदणाऱ्या श्रीकृष्णा, गोवर्धन उचणाऱ्या गोपाला, शतधन्व्याचा शिरच्छेद करणाऱ्या शामसुंदरा, विदूररथाचा विकोश करणाऱ्या वासुदेवा, दंतवक्राला दग्ध करणाऱ्या द्वारकाधीशा, नरकासुराला नष्ट करणाऱ्या नंदकिशोरा, बाणासुराचे बाहू तोडणाऱ्या ब्रह्मांडनायका, पौंड्रकाला पाणी पाजणाऱ्या पुरुषोत्तमा, शृगालाचा शेवट करणाऱ्या शशिकिशोरा, धावऽऽऽ! त्रैलोक्याला सामावून घेणाऱ्या तुझ्या मुरलीच्या पोकळीत या दीन, एकाकी, असाहाय्य, अबला, अनाथ पांचालीलाही सामावून घे! सुदर्शनाच्या सर्वसंहारक शक्तिमान शलाकांनी सभेतल्या या स्तब्ध पौरुषहीन शिष्टांची शिरं आज शाकटून टाक! कृष्णाऽऽ अरे तुला तरी तुझ्या यशोदा-देवकींच्या मातृत्वाची चाड उरली आहे काय? मातृत्वाच्या महन्मंगल मंदिराच्या महाद्वारात मस्तक नमविणाऱ्या तुझ्या तेजस्वी वृष्णिकुलाची चाड तुला तरी आज उरली आहे काय? जगाचा अंत घनदाट काळ्या अंधकारातच करणार असशील तर आजच सूर्याचा महादीप फुंकून या कौरवांच्या काळ्या दासीला या अंधकारात पुरून टाक! नाही तर धावऽऽ यमुनेच्या गर्जणाऱ्या लाटांवरून धाव! कर्कश घोंगावणाऱ्या झंझावाताबरोबर धाव! आकाशाच्या निळ्या छतांवरून, पाताळाच्या पोकळीतून, दाही दिशांतून धाव! धावऽऽऽ! धावऽऽऽ!!”

आक्रोशत ती थडाथड छाती पिटू लागली.

तिच्या आक्रोशानं माझ्या कानांतील कुंडलं क्षणभर थरथरली! कधी नव्हतं ते माझ्या सुवर्णकुंभासारख्या नितळ कवचांवर टपटपीत रोमांच उभे राहिले! डोळ्यांसमोर काळ्या लाटांचा खवळलेला प्रचंड सागर हिंदकळत उभा राहिला! त्या पर्वतप्राय लाटांच्या माऱ्यात एखाद्या तृणपात्यासारखं माझं मस्तक थडाथड थपडा खाऊ लागलेलं पाहून माझे पाय थरथरू लागले! थपडा थांबत नव्हत्या. त्यांच्या अखंड माऱ्यांनी माझ्या कानांतील कुंडलं निखळून लाटांबरोबर किनाऱ्यावरच्या दलदलीत पडलेली मला स्पष्ट दिसली!

समुद्रवाऱ्यासारख्या दु:शासनाला तिचा आक्रोश पक्षिणीच्या चिवचिवाटा-सारखा नगण्य वाटला आणि ऐकू आला नाही. केळीला मुळातून उखडायला उतावीळ झालेल्या झंझावातासारखा हातांतील पदर तो एकलग सरासर ओढू लागला. मुख ओंजळीत लपवून घेतलेली ती शामल स्त्री त्या वस्त्रांबरोबर भोवऱ्यासारखी गरगर फिरू लागली. तिच्या अंगावरच्या अंशुकाचे दोनच पेड शिल्लक राहिले. केवळ दोनच! आणि हिमालयाच्या अत्युच्च शिखरावरून शिखरलोट झाल्यासारखं माझं मन स्वत:च्याच अगतिकतेनं कळवळून उठलं! त्रिशुलानं सर्वांगाला कुणीतरी भोसकत होतं! पांचालीच्या जागी सभागृहात वृषाली उभी आहे या नुसत्या कल्पनेनंच माझ्या सर्वांगाला रसरशीत इंगळ्या डसल्या! मुसळधार पर्जन्यात कोसळणाऱ्या जीर्ण पर्णकुटीसारखा मी आसनावर कसातरी कोसळलो! पायांतली शक्तीच निघून गेल्याचा क्षणभर भास झाला. क्षणापूर्वीची क्रोध, तिरस्कार, प्रतिशोध यांची उभारी क्षणात नष्ट झाली. काय बोललो मी? कशाला? कुणासाठी? कुणाला?

मनाच्या गुहेत खोलवर लपण्यासाठी डोळे मिटून मी स्वैर धावू लागलो! पण वृषाली माझी पाठ सोडेना! वृषाली! होय वृषालीच. माझ्यामागून धावणारी वृषाली! एकाकी, रज:स्वला, सुस्नात वृषाली! केस विखुरलेली! आक्रोश करणारी, मुख ओंजळीनं

आच्छादून घेणारी वृषाली! 'अंगराज, अंगराज' म्हणून टाहो फोडणारी विवस्त्र वृषाली!! पांचालीच्या जागी वृषाली पाहून मी खाडकन डोळे उघडले! उघडया-जाग्या डोळ्यांपुढंही क्षणात पांचाली तर क्षणात वृषाली दिसू लागली! पांचाली! वृषाली! विवस्त्र पांचाली!! छे, छे, विवस्त्र वृषाली!! वृषाली!!! छे, तिच्या शरीरावर वस्त्र घातलंच पाहिजे!

खांद्यावरचं उत्तरीय हाती घेऊन मी पुन्हा आसनावरून खाडकन उठलो. एवढ्यात विजयी सेना पराभूत शत्रूच्या उरल्यासुरल्या शिबिरांचाही नि:पात करण्यासाठी जयघोष करीत पुढं घुसते तसे मुरलीचे रौद्र – भयानक स्वर कुठूनतरी सभागृहात घुसले! पाठोपाठ सहस्त्र वाद्यांचे हृदयभेदी संमिश्र ध्वनी घुमले! मला राजसूय यज्ञाची आठवण झाली. काय होत होतं हे मला समजत नव्हतं. जणू माझी सारी शुद्धबुद्ध हरपली होती. वाद्यांच्या नादांनी सर्वांची मनं थरकली. ते कुठून येत होते? आकाशातून? पाताळातून? की दाही दिशांतून? कुणालाही काही समजेना! प्रकाशासाठी ठेवलेल्या छतावरच्या थाळीसारख्या गोल छिद्रातून एक प्रकाशझोत तडक आत घुसला आणि पांचालीच्या सर्वांगावर पसरला! तो पाहताच मला सुदर्शनाची स्मृती झाली. श्रीकृष्णाची नीलवर्णी आकृती डोळ्यांसमोर उभी राहिली. काय होणार आता? दु:शासनाचा शिशुपाल? आणि – आणि माझाही? वाद्यांच्या कलकलाटांनी सर्वांची मनं भीतीनं थरकली, पण दु:शासनाचं मात्र उन्मादानं बिथरलं! हातातील वस्त्र, कुणाकडेही लक्ष न देता तो घोड्यांचे वेग ओढावेत तसं ओढू लागला. पाण्यातील भोवऱ्यात सापडलेल्या वाळलेल्या काडीसारखी ती वस्त्राबरोबर मंडलाकृती फिरली – आणि सर्व सभागृहाला प्रचंड धक्का बसला! तिच्या अंगावरच्या मूळ नीलवर्णी अंशुकात ज्याची वीण गुंफली आहे असं सुंदर रक्तवर्णी अंशुक तिच्या शरीरावर होतं! दु:शासनाचे डोळे पराजयाच्या भावनेनं आरक्त झाले! वाद्यांचा आवाज क्षणाक्षणाला वाढत असतानाही त्यानं त्या रक्तवर्णी अंशुकाला हात घातला!

मी कोण आहे? पांचाली कोण आहे, ही कुरूंची सभा आहे, हे विसरून मी ते अपूर्व, अद्भुत, गूढ दृश्य भारावल्यासारखा एकटक पाहतच राहिलो. हातांतील उत्तरीय थरथरू लागलं. काय केलं मी आज? कुठं गेलो मी? काय बोललो मी?

सरसर! सरसर! खड्गापेक्षाही चपळाईनं हात फिरवीत दु:शासन अंशुकं ओढू लागला, पण – गोठ्यातून अरण्याकडे जाणाऱ्या गायी एकमेकींच्या अंगाला अंग घासून कवाडाबाहेर पडतात तशी निळी, हिरवी, जांभळी, शुभ्र, रक्तवर्णी वस्त्रं एकापाठोपाठ एक बाहेर पडू लागली. वाद्यांची गती वाढल्यानं अनेकांनी कानांवर हात ठेवले. पिसाळलेल्या हत्तीसारखा दु:शासन खवळला होता. विकर्ण आनंदानं टाळ्या पिटतो आहे, हे पाहून तर तो अधिकच खवळला. त्या वेळी दु:शासनाला प्रतिकार करण्यासाठी कोणीही पुढं सरसावलं असतं तर? ते ऐकण्याच्या अवस्थेत तरी तो होता काय? त्यानं प्रतिकार करणाऱ्याच्याच वस्त्रांना हात घातला असता! दु:शासनाच्या अविवेकाचा अंगार फुंकर घालून दुर्योधनानं फुलविला होता. माझ्या अर्वाच्य शब्दांच्या झंझावातानं त्याचा भडकून वणवा झाला होता! दुर्योधनाला, मला, कुरूंच्या राजदंडाला कुणालाच न विझवता येणारा अनावर वणवा!

अंशुकांचा ढीग सभागृहात पडू लागला. माझ्या मनात असंख्य विचारांचा ढीग पडू लागला! काय केलं मी! बालपणापासून कडक नियमांनी आणि कष्टसाध्य प्रयत्नांनी

हस्तगत केलेली चारित्र्याची धवल साधना एका क्षणात सूडाच्या काळ्या कुंडात आज मी बुडवून टाकली! कर्ण! योद्धयांनी गौरविलेला कर्ण! महान आपत्तीचं धैर्यानं कर्तृत्वात रूपांतर करणारा कर्ण! प्रेमाच्या धाग्यांनी सगळ्या नगरजनांच्या हृदयावर अधिराज्य करणारा कर्ण! एकाच क्षणात भावनांच्या राज्यातील दुर्दैवी कर्ण पराजित ठरला! शिशुपाल आणि मी, दु:शासन आणि मी, इतकंच काय पण कंस आणि मी यात कसलाच फरक नाही की काय? या विचारानं कधी नव्हते ते माझ्या डोळ्यांत टचकन अश्रुबिंदू उभे राहिले! राजसभेतील माझ्या जीवनातले पहिलेच अश्रुबिंदू! त्यात कारुण्य नव्हतं, भीती नव्हती, याचना नव्हती, परिणामाच्या भयानं थरथरणारी पश्चात्तापदग्धताही नव्हती! आदर्श म्हणून प्राणपणानं जीवनभर उराशी कवटाळलेल्या नीतितत्त्वांना उरावर घेऊन अंशुकांच्या ढिगाऱ्यात सूर्यशिष्य कर्णाचं कलेवर पाहताना खंबीर मनाचे बांध फोडून आलेली ती वेदनेची आणि यातनेची तीव्र सणक होती! अश्रुबिंदूंच्या स्वरूपात ती सणक उभी राहिली होती – तीही सूतपुत्र कर्णाच्या नेत्रांत! सूर्यशिष्यासाठी सूतपुत्राच्या डोळ्यांत अश्रू! एक क्षणभरच मला वाटलं, मी सूतपुत्र झालो नसतो तर! कसं झालं असतं माझं जीवन! श्रीकृष्णासारखं? का नाही? झालंही असतं? संस्काराच्या संघातांनी सामान्याचा असामान्य होतो. उलट कुसंस्कारांच्या कर्दमात कमलपुष्पाच्या पाकळ्यांचंही घृणामय शेवाळ होतं! कुणीही कसं दिसावं यापेक्षा कसं असावं याला महत्त्व आहे. ते शक्य नसेल तर जास्तीत जास्त कसं नसावं याला तरी नक्कीच महत्त्व आहे! मी एका क्षणात ह्या सर्व मर्यादा आज ओलांडल्या होत्या!

माझ्या डोळ्यांतले ते पहिलेच अश्रुबिंदू कुरूंच्या राजसभेत घरंगळून हातांतल्या उत्तरीयावर पडून असेच विरले! ज्यांचा अन्वय सभागृहातल्या कुणालाही लागला नसता. निवळलेल्या डोळ्यांसमोर पांचाली उभी होती. घामानं डवरलेला, थकलेला दु:शासन क्षणभर थांबला. शेकडो योजनांचा प्रवास करून आलेल्या घोड्यासारखा तो धापावत होता! अंशुकांचा ढिगारा त्या दोघांपेक्षाही उंच दिसत होता! सर्व वाद्यांचा आवाज एकाएकी थांबला आणि केवळ मुरलीचेच स्वर भयाण भेदक शीळ घालू लागले. पांचालीच्या अंगावर पीतवर्णी अंशुक झळाळत होतं! सुवर्णधाग्यांनी गुंफलेल्या वस्त्रासारखं! मला ते पूर्वीही कुठंतरी पाहिल्यासारखं वाटलं! सर्व शक्ती एकवटून त्या पीतांबरालाही हात घालण्यासाठी दु:शासनानं हात उचलला! पुढचे खूर उचलून मध्येच उसळणाऱ्या शुभ्र घोड्यासारखे दोन्ही हात उंचावून पितामह खाडकन उठून गरजले,

“दु:शासन, एक सूतभरही आता पुढं सरकू नको! शिशुपालासारखा एका क्षणातच दग्ध होशील! लक्षात ठेव ते पीतांबर आहे!”

अंगी त्राण नसल्यामुळे हात खाली सोडून दु:शासन रखडत-रखडत कसातरी आपल्या आसनाजवळ आला. क्षणभर आसनाच्या हस्तदंडीवर हात टेकवून कमरेत खाली वाकला. त्याच्या स्वेदानं डवरलेल्या मस्तकावरचे दोन थेंब टपकन त्याच्याच आसनावर ओघळले. त्या स्वेदबिंदूवर तो उभ्यानंच शक्तिपात झाल्यासारखा कोसळला! आसनावर स्वेदबिंदू, स्वेदबिंदूवर दु:शासन! शिसारीनं मी मान फिरविली. माझ्या हातातील उत्तरीय केव्हाच गळून पडलं होतं. पीतांबराच्या तेजस्वी वर्णापुढं त्या उत्तरीयाचा वर्ण काहीच नव्हता! खिन्न मनानं मी खाली बसलो. कायमचा!

मंडलं घेऊन-घेऊन भोवळ आलेली पांचाली कोऱ्हांटीची कळी वाऱ्याबरोबर इकडे-तिकडे लडलडते तशी क्षणभरच लडबडली आणि कर्दळीसारखी उभ्यानंच उन्मळून

समोरच्या वस्त्रांच्या ढिगाऱ्यातच कोसळली! त्या विविधरंगी वस्त्रांच्या इंद्रधनुष्यात पीतांबर धारण केलेली ती विद्युल्लताच होती!

तिच्या अनावृत चरणांवरची धूल मस्तकी धरण्यासाठी सभासदांतील काही जण पुढं झेपावले, पण तितक्यात सर्व शांत झालं आहे याचा वेध घेऊन पर्वतशिखर सोडून खाली उतरणाऱ्या गरुडासारखे पितामह पायदंड्या उतरून खाली तिच्याकडेच येताना पाहून सर्व जण जागचे जागीच थबकले! तिच्याजवळ येताच पितामह सर्वांना उद्देशून गंभीर स्वरात म्हणाले, ‘‘सभासदहो, द्यूत संपलं आहे! फाशांचं! तुम्ही जाऊ शकता – पण लक्षात ठेवा, आता कायमचं द्यूत सुरू झालं आहे! घटनांचं!’’ खाली माना घालून सर्व जण सभागृह सोडू लागले.

आपापल्या कक्षाकडे परतणाऱ्या राजपुत्रांपैकी नेमक्या विकर्णाच्याच पायांखाली माझ्या हातातून सुटून खाली पडलेलं उत्तरीय सापडलं! पीतांबर पांचालीच्या अंगावर, माझं उत्तरीय मात्र विकर्णाच्या पायांखाली! माझं मन विषण्ण झालं. माझं उत्तरीय तुडवीत जाऊन विकर्णानं पितामहांचीसुद्धा पर्व न करता पुढं होत ढिगाऱ्यात अविचल पडलेल्या मूर्च्छित पांचालीची चरणधूली मस्तकी धारण केली! केवळ एकट्या विकर्णानं!

सर्व सभासद सभागृहाबाहेर निघून जाताच पितामहांनी कमरेचं खड्ग म्यानाबाहेर काढलं! पाषाणाच्या निश्चल मूर्तीसारखा आसनावर बसून मी ढगाळलेल्या आकाशाची संदिग्ध सकाळ घेऊन आलेल्या दिवसाचा अर्थ लावीत होतो. सगळा दिवस म्हणजे आश्चर्य, संभ्रम, रहस्य, अवास्तवता, अध:पतन, मूढता, क्रौर्य आणि अविवेक यांशिवाय दुसरं काय होतं? पण पितामहांच्या हातात धारदार खड्ग पाहून मात्र विस्मयाच्या आणखी एका प्रचंड धक्क्यानं माझं मन क्षणभर थरारलं. काय असावं त्यांच्या मनात? क्षणापूर्वीच्या डोळे दिपविणाऱ्या नाट्यानं जेवढा स्तब्ध झालो नव्हतो तेवढा ते तळपणारं खड्ग त्या सागवृक्षासारख्या उंच वृद्धाच्या हाती पाहून मी स्तब्ध झालो. काय असावं त्यांच्या मनात? आता आणखी काय पाहावं लागणार?

उजवा पाय मुडपून वीरासनाच्या पवित्र्यात ते वस्त्रांच्या ढिगाऱ्याजवळ खाली बसले. पाठीवर हळुवारपणे हात ठेवून ‘‘पांचाली!’’ म्हणून गदगद हलवीत त्यांनी तिला हाक मारली. अंशुकांचा ढिगारा हलला; पण ती तशीच निश्चेष्ट पडली होती! पितामहांनी पीतांबराचा शेव उचलला आणि हातातल्या खड्गानं, त्याला जोडून असलेलं आकाशवर्णी अंशुक सर्रकन कापलं! ज्या पीतांबराला हातही लावू नको म्हणून दु:शासनाला त्यांनी निर्वाणीचं निक्षून सांगितलं होतं तेच पीतांबर त्यांनी मात्र सहजपणे हाती घेऊन खड्गानं अलग केलं! कसं शक्य झालं त्यांना ते?

त्यांनी उठून संकेत करताच दासींनी पुढं होऊन तिचा मूर्च्छित देह उचलला. खाली माना घालून उभ्या असलेल्या पांडवांपैकी भीमाच्या पाठीवर एक आणि अर्जुनाच्या पाठीवर एक हात ठेवून पितामहांनी तो क्षणभर थोपटला. मानेच्या संकेताबरोबर ते पाचही जण त्यांच्याबरोबर चालू लागले. पितामहांचे हात भीमार्जुनांच्या पाठीवरच होते!

आसनावरून उठावंसंसुद्धा मला वाटत नव्हतं. समोर पडलेल्या वस्त्रांच्या ढिगाऱ्यांचा प्रचंड पाषाणांचा एक पर्वत करून तो माझ्या छातीवर कुणीतरी ठेवीत आहे या जाणिवेनं श्वास कोंदटत होते! किती काल मी आसनावर तसाच बसून होतो, हे माझं

मलाच समजलं नाही. संध्याकाळच्या भेसूर, धूसर छटांत भव्य सभागृहातील रिक्त आसनं भयानक दिसू लागताच मी खडबडून उठलो! नेहमीच्या नियमितपणानं सभागृह समयांनी उजळून टाकायचं सेवकांना भान राहिलं नव्हतं! पण त्या मिणमिणणाऱ्या समयांनी माझ्याभोवतीचा अंधकार तरी आता कितीसा उजळणार होता!

काही काळ आलेल्या निद्रेतून मी जणू जागा होत होतो. विषण्णपणे उठून मंद-मंद पावलं टाकीत सभागृहाबाहेर चाललो. अंशुकांच्या ढिगाऱ्यातील विविधरंगी वस्त्रं धूसर संध्याप्रकाशात पाहताना मलाही माझं जीवन त्या वस्त्रांच्या ढिगाऱ्यासारखं वाटलं! विविध रंगांच्या घटनांनी भरलेलं! खरोखरच त्या वस्त्रांच्या ढिगाऱ्यासारखं! पण पीतांबरासारखं झळाळणारं तेजस्वी असं एकही वस्त्र नेमकं त्यात नव्हतं!

सभागृहाच्या महाद्वारात जाताच आपल्या निर्मितीपासून आजपर्यंत वैभवाचे तेजस्वी, अभिमानास्पद गौरवाचे अनेक प्रसंग पाहणाऱ्या त्या वास्तूवर आजच्या घटनांच्या स्मृतींचे ठसे कसे काय उमटले असतील म्हणून मी मागं वळून पाहिलं. सुवर्णाचं पुरुषभर उंचीचं सिंहासन प्रकाश नसल्यामुळे झळाळत नव्हतं! सगळी मोकळी आसनं नदीकिनारी अस्ताव्यस्त पडलेल्या काळ्या पाषाणासारखी कळाहीन वाटत होती. केवळ एका दूरवरच्या आसनावर हस्तदंडीवर मान टेकवून माझ्यामागंही कोणीतरी त्राण नसल्यासारखं सभागृहात बसून होतं! आसनाच्या क्रमांकावरून तो दु:शासनच होता हे निश्चित! नाहीतरी दुसरं कोण रेंगाळणार होतं इतका काल? तो इतका अचेतन बसला होता की, त्याच्यात आणि लगतच्या अंशुकांच्या निश्चल ढिगाऱ्यात कुणालाही काहीच फरक वाटला नसता! एक नि:श्वास सोडून मी महाद्वार सोडलं. गंगेवर जाऊन नित्याचं संध्याकालचं अर्घ्यदान करावं, असंही मला वाटलं नाही! आकाशाची सगळी पश्चिम दिशाच काळ्याकुट्ट ढगांनी झाकाळली होती.

अवजड साखळदंड बांधल्यासारखे जड पदक्षेप उचलीत कक्षाकडे जाणाऱ्या सोपानाच्या पायदंड्या चढून कक्षाच्या द्वारात आलो. विष्णुमूर्तीच्या गाभाऱ्यासमोर ओणवी वाकून मेघमाला हातातील इंगुदीच्या चंचुपात्रातील इंगुदी समईत ओतत होती. समई भरताच पलित्यानं तिनं तिची वात सरशीनं पुढं ओढून प्रज्वलित केली. तिचं केतकीवर्णी मुखमंडल समईच्या प्रकाशकिरणांनी उजळून गेलं. तिला पाहताच मात्र मला सकाळी तिच्या हातातून अनवधानानं पडलेल्या रांगोळीच्या पात्राचं स्मरण झालं! झपाझप पावलं उचलीत तडक गाभाऱ्यासमोर गेलो. मला पाहताच मेघमाला सावरून दूर झाली. गाभाऱ्यासमोरची दगडी समई उचलून खालच्या संगघडीवर ज्या ठिकाणी सकाळी रांगोळी सांडली होती ते ठिकाण मी पाहिलं! तिथली धवलवर्णी रांगोळी उडून गेली होती! पीतवर्णी हळद उडून गेली होती! उरल्या होत्या केवळ रक्तवर्णी कुंकुमाच्या भडक छटा! इतस्तत: विखुरलेल्या! खिन्नपणे हसत मी त्या विखुरलेल्या कुंकुमाला बोटांनी स्पर्श केला. कसातरीच वाटला तो मला! उठून समई मेघमालेच्या हाती देत तसाच शयनागाराकडे चाललो.

कुठूनतरी शोण मला सामोरा आला. त्याला पाहताच त्याला कडकडून मिठी मारून लहानपणीच्या वसूसारखं, 'मी कोण आहे शोणा?' असं विचारावंसं मला वाटलं, पण सकाळी गंगाकिनारी त्याचा आग्रही हात मी किती निर्दयपणानं झिडकारला होता! त्याच्याशी काहीच न बोलता शयनागाराकडे वळलो, पण तोच पुढं होऊन म्हणाला, "दादा, थांब!" कितीही झालं तरी तो माझा सख्खा भ्राता होता! ज्येष्ठ असूनही मला

त्याचे उपदेशाचे सर्व घोट आता निमूट ऐकावे लागणार होते. मी थांबलो. ''दादा, तुला सर्वांनी आज सकाळी गंगाकिनारी पात्रात उभं राहून अर्घ्यदान करण्याचा आग्रह का केला हे अजूनही कळलेलं नाही!''

''शोणा, आता ते कळूनही त्याचा काही उपयोग नाही.''

''पण ज्यांच्यासाठी तू जीवनाचे सर्व आदर्श पणाला लावलेस त्यांच्या तुझ्याबद्दलच्या कल्पना तरी तुला कळायला पाहिजेत!''

''का पाठविलं होतं सर्वांनी आज सकाळी आग्रहानं मला गंगाकिनारी? काय माहीत आहे तुला?''

''आजच्या द्यूताच्या फाशाच्या कवड्या भीमवधित जरासंधाच्या हाडांच्या होत्या!! ज्याला तू द्वंद्वात जीवदान दिलं होतंस!''

''काय, म्हणतोस काय शोणा? जरासंधाची हाडं आणण्यासाठीच दु:शासन मगधांच्या राजगृहाला गेला होता काय?'' मी त्याचे खांदे पकडून त्याला गदागदा हलविलं.

''होय! तुझ्या शब्दाघाताबरोबर कवड्या थरथरतात, हे अचूकपणे हेरून सर्वांनी तुला द्यूत होईपर्यंत पद्धतशीररीत्या सभागृहाबाहेर ठेवला होता आज! कवड्या तुला आणि भीमालाच काय ते थरथरत होत्या!''

''तुला कसं समजलं ते?''

''सत्यसेनाकडून! दुर्योधन तुला गंगेवर अडखळत ठेवणार हे सत्यसेनाला पूर्वीच माहीत होतं. गंगाकिनारी तो तुला सभागृहात सत्वर पाठविण्यासाठी काहीतरी बोलणारही होता... पण तुझी कुंडलं निष्प्रभ झालेली पाहून तू सभागृहात जाऊ नये, असंच त्याला वाटलं म्हणून तो अडखळला! महाद्वारात दु:शासनानं तुला प्रतिरोध केला तोही तू आत असलास तर फासा आपल्यासारखा पडणार नाही म्हणूनच!''

आजचा सगळा दिवसच आश्चर्याचं कूट जाळं विणणारा होता.

''शोणा, जा तू! पण... पण लक्षात ठेव शोणा, सकाळी मी तुला झिडकारलं म्हणून अपसमजानं तूही मला झिडकारू नकोस! सगळं जग उलटं उभं ठाकलं तरी चालेल, पण बंधो, आपण दोघं एकाच मातेच्या रक्तामांसाचे पिंड आहोत, हे विसरू नकोस!"

''दादा, तुझ्या चरणांवर मरण आलं तरीही मी ते गंगेकाठच्या शिपल्यासारखं ओंजळीत घेऊन उराशी कवटाळीन.'' पुढं होऊन त्यानं माझ्या चरणांना हस्तस्पर्श केला.

गाभाऱ्याजवळ अवगुंठून उभ्या असलेल्या मेघमालेकडे बोट उंचावून मी त्याला सांगितलं, ''जा शोणा, तिला सांग की, रांगोळी पुसटली गेली आहे. पुसटण्यासाठीच असते ती!'' तो मंदपणे निघून गेला.

शयनागाराच्या प्रवेशद्वारातून मंचावर बसलेली वृषाली पाहताच मात्र मला कधी नव्हे ती स्वत:चीच लाज वाटली! सभागृहातल्या अप्रिय प्रकाराची आठवण देऊन ती आता मला प्रश्नांच्या माऱ्यानं घायाळ करणार होती. काय उत्तरं देणार होतो मी तिला? काय वाटलं असेल आपल्या पतीविषयी तिला आज?

आत प्रवेशून तिला पाहिलंच नाही, असं भासवून मी गवाक्षातून बाहेरच्या अंधकारात न दिसणारं गंगेचं पात्र पाहू लागलो!

नित्यासारखी मागून येत पाठीशी उभी राहत ती आश्चर्यानं म्हणाली, ''अं! आपलं उत्तरीय कुठं आहे आज? की कुणाला देऊन टाकलंत?''

“हं? देणार होतो. पण देता आलं नाही! पण साध्या उत्तरीयासाठी तू आपल्या पतीला ते कुठंय म्हणून प्रश्न विचारते आहेस आज?”

“साधं? अहो, आपल्या अनेक स्मृती जपणारं, गंगेकाठी मी वेंधळेपणानं आणलेलं ते तुमचं आणि माझंही अत्यंत प्रिय असं उत्तरीय होतं! कुठं गेलं ते?”

“ते गेलं, कायमचं गेलं! त्या वस्त्रापेक्षा अनेक मौल्यवान वस्त्रं जगात असतात, हे मला पटवून देऊन ते आज कायमचं गेलं आहे!”

“जाईना गेलं तर! पती हेच स्त्रीचं मोठं वस्त्र असतं!” माझ्या पाठीवर गाल टेकवीत ती नित्याच्या प्रेमादरानं म्हणाली.

सभागृहातील एकही घटना तिला समजली नव्हती तर! मी सुटकेचा नि:श्वास सोडला.

“आपलं उत्तरीयं गेलं ही आश्चर्यकारक वार्ता तुम्ही मला सांगितलीत, मी त्याहीपेक्षा आश्चर्यकारक वार्ता सांगून तुम्हाला आज चकित करणार आहे!” ती बोलत होती आणि माझ्यासमोर तर एकसारखं सभागृह फिरत होतं! निळे, पिवळे, हिरवे अणि तांबडे रंग होते.

“कोणती?” तिच्यापासून दूर होत दुसऱ्या एका गवाक्षाच्या कवाडात उभा राहत मी विचारलं.

“तुम्ही नेहमी म्हणता की, पांचाली आपला तिरस्कार करते! पण – ”

“वृषाली! या विषयावर काही एक ऐकण्याची मला आता मुळीच आवश्यकता नाही. मी केलं त्याची, काठावरच्या प्रेक्षकांनी पोहणाऱ्याची करावी तशी परीक्षा मला नको आहे.”

“ऐका तर खरं! पांचालीनं तुमचा मनापासून कधीच तिरस्कार केला नाही!” मला मध्ये अडवून वृषाली म्हणाली.

“कशावरून म्हणतेस तू हे?”

“आज मला स्वत:ला ते समजलं म्हणून!”

“काय समजलं तुला?”

“एकदा तिसऱ्या प्रहरी अंत:पुरात आम्ही सर्व जण बसलो होतो तेवढ्यात द्रौपदी सुस्नात होऊन अंत:पुरात आली. आपली पत्नी म्हणून तिनं माझी फारच जिव्हाळ्यानं विचारपूस केली. वृषसेनाच्या कानाला हात लावून तर म्हणालीदेखील, ‘खरंच, तुमच्या या पुत्राला कुंडलं हवी होती!’ मी तरी काय उत्तर देणार होते? ‘का नाहीत ते त्याच्या पितृदेवांनाच माहीत!’ असं म्हणून मी वेळ मारून नेली! पण तुमचा निर्देश करताच मात्र तिनं झटकन आपली मान खाली घातली!”

“का खाली घातली वृषाली? तुला ते कधीच समजायचं नाही!” बाहेरच्या अंधकाराच्या सागरात नेत्रांचे बाण दूरवर फेकीत मी म्हणालो.

“मलाही तीच शंका आली की, तिला तुमचा माझ्यासमोरही उपहास करायचा असावा! म्हणूनच ती केशभूषेच्या दर्पणाकडे वळलेली पाहून सत्यासत्य पारखण्यासाठी मी तिच्या हिरण्मयी नावाच्या सखीला जवळ बोलावून घेतलं. तिनं जे-जे मला सांगितलं ते-ते ऐकताच तुम्हाला सर्वांआधी ते सांगून तुमच्या मनातील किंतू केव्हा दूर करीन असं मला झालं. मृणालला पाठवून मी तुमचा शोधही केला, पण तुम्ही त्या वेळी सभागृहात दंग होतात!”

''असं काय आश्चर्यकारक सांगितलं तिनं तुला?"

''सर्वांसमवेत राजसूय यज्ञासाठी तुम्ही एकदा इंद्रप्रस्थाला गेला होतात तेव्हा मायावी वस्तूंच्या दालनातील सोपानावरून तुमच्या कुंडलमंडित मुखाचं तलावातल्या पाण्याच्या एका कोपऱ्यात पडलेलं प्रतिबिंब पाहून पांचाली तिच्या कानात पुटपुटली होती की...!''

''काय पुटपुटली ती? सांग, वृषाली त्याही वेळी मी संभ्रमात होतो आणि आजही आहे!''

''ती पुटपुटली की – 'हिरण्मयी, या कवच-कुंडलांचं पत्नीत्व दैवी आलं असतं, तर किती कारंजी फुलली असती माझ्या जीवनाच्या उद्यानात! अंगराज कर्ण पती म्हणून लाभले असते तर पाच पतींच्या सहवासात विषमपणे विभागलेलं वर्ष... दोन-दोन मासांच्या सम-सहवासात विभागलं नसतं का?" मागून येत तिनं माझ्या पाठीवर मस्तक टेकविलं. मागं वळून 'पांचाली' म्हणत वृषालीचं मुख ओंजळीत घेत मी भान न राहवून कळवळलो.

''पांचाली नव्हे वृषाली!'' माझ्या हातांवर आपले हात ठेवीत वृषाली म्हणाली.

''आता तरी पांचालीच्या अपसमजानं संतप्त होणारं तुमचं मन शांत राहील ना?" समईच्या अंधूक प्रकाशात माझ्या डोळ्यांत खोलवर पाहत ती काहीतरी धुंडू लागली.

अनेकविध संमिश्र भावनांनी मन गलबलून गेलं. सकाळपासूनच्या सत्यासत्याच्या द्वंद्वात केवळ आणि केवळ दैवयोगानंच मी सत्यापासून वंचित होऊन असत्याकडे फेकला गेलो नव्हतो काय! काय उपयोग होता आता सत्य समजून? पांचालीच्या भावना समजून?

''वृषाली!'' तिला कवेत घेऊन मी अस्फुट पुटपुटलो.

''किती मोठे आहात तुम्ही! पांचालीलाही माझा हेवा वाटत असेल!" माझ्या छातीवर मस्तक घुसळीत ती म्हणाली.

''मी – आणि मोठा? वृषाली, मी मोठा होतो, पण आज नाही.''

''मला तर तुम्ही सदा सर्वकाल मोठेच आहात.'' कवेतून स्वत:ला सोडवून घेत ती शयनगृहाबाहेर झुळुकेसारखी गेली. माझ्याकरिता काहीतरी आणण्यासाठीच ती चालली होती हे ओळखून मी तिला जाता-जाताच म्हणालो, ''वृषाली, काही आणू नकोस माझ्यासाठी. मला भूक नाही.''

ती बाहेर जाताच आवेगानं पुढं होऊन मी शयनगृहाचं दार आतून बंद करून घेतलं आणि मंचकावर पहुडलो. मनाची, शरीराची सर्व उभारी ढासळली होती. अंत न लागणाऱ्या क्षितिजाचा वेध घेत समुद्रपक्षी पाण्यावरून झेपावत निकरानं पुढं जातो तसं माझं मन भवितव्याचा वेध घेत निकरानं धावत होतं. अंत न लागल्यानं परतून पुन्हा देहाच्या पंजरात येत होतं. चोच वासून धापावत निश्चेष्ट पडूनच राहत होतं! कण्हत होतं, ''पांचाली क्षमा कर! पांचाली क्षमा कर!''

मऊ शय्येच्या मृदू स्पर्शानं अशा वेळी मन अधिकच अशांत नि अस्वस्थच होतं. म्हणूनच थंडगार संगघडीवर गुडघे टेकवून मी माझं मस्तक मंचकाच्या लाकडी बैठकीवर विसावलं, पण क्षणभरातच सगळा दिवस सूर्यकिरणांसारखा टळटळीतपणे माझ्या डोळ्यापुढं उभा राहिला. शरीराचे डोळे मिटता येतात, पण मनाचे डोळे कधीच मिटू शकत नाही! घटनांचे चित्तरपक्षी विविधरंगी पंख फडफडवीत डोळ्यांपुढं नाचू लागले.

मधून-मधून चीत्कारू लागलो. ढगाळलेलं आकाश! रांगोळीचं पंचपात्र! केकाटत धावलेली टिटवी! निस्तेज कुंडलं! यज्ञकुंडावरचा कावळा! काळा अगदी काळाकुट्ट दिवस! पांचालीचे विखुरलेले काळे केस, अश्रू आणि रक्तबिंदू छे, रक्ताश्रूंच्या नद्या! थरथरणाऱ्या कवड्या! मदोन्मत्त हत्तीसारखा दु:शासन! आणि... आणि अविवेकी, मार्गच्युत, अध:पतित कर्ण!! भोवतीचा टाहो, आक्रोश, अन्याय! विटंबना! दुसऱ्यासह स्वत:ची! झळाळणारं पीतांबर! आणि – आणि पायदळी तुडविलेलं उत्तरीय! उधळलेल्या रांगोळीच्या शुभ्र-धवल छटा! उरलेलं कुंकुम! केवळ रक्तवर्णी भडक कुंकुम!! चरणांवर मस्तक ठेवणारा शोण! पाठीवर मस्तक टेकवणारी वृषाली! वर्षाचं दोन-दोन मासांत विभाजन करू पाहणारी पांचाली! पांचाली!! पांचाली!!!

असह्यपणे मी मस्तक उंचावलं. सभोवती समईचा मिणमिणणारा प्रकाश होता बुभुक्षिताला कदान्न मिळालं तरी तो वेडावून जातो. त्याच आर्ततेनं मनाचा अंधार उजळण्यासाठी मी समईच्या ज्योतीकडे पाहू लागलो. त्या ज्योतीतही पांचाली उभी होती! अतिशय सौम्य मुद्रेनं ती मला आवर्जून सांगत होती, 'अंगराज, मी आज सभेत तुमच्यापुढं हात पसरला नाही याचं तुम्हाला मनस्वी दु:ख झालं असेल! पांचालीनं आपल्याला परत ठोकरलं, असं वाटून तुमच्या मनाच्या आज शतश: चिंध्या झाल्या असतील! पण... पण खरं सांगायचं, तर कुठल्या तोंडानं मी तुमचं अभय आज मागणार होते? कोणता अधिकार होता मला? तुमच्या झळाळणाऱ्या कुंडलांना एकेकाळी मी – मी माझ्या सुगंधाच्या धुंदीत लाथाडलं नव्हतं काय? माझ्या अंगभूत सुगंधाइतकीच तुमची अंगभूत कवच-कुंडलं मौल्यवान आहेत, हे कळायला मला फारच कालावधी लागला आणि जेव्हा कळलं तेव्हा उपाय नव्हता. तुम्हाला धिक्कारल्याची उरी सलणारी कळ असह्य असताना – मी सभागृहात हात पसरल्यावर तुम्ही मला लाथाडलं असतंत तर! तर ती यातनेची कळ मी कशी काय सहन करणार होते? म्हणून आणि म्हणूनच स्वत:च्याच लज्जेनं मी तुमच्यापुढं हात विस्तारले नाहीत. तुमच्या तिरस्कारानं नव्हे! तुमचा अवमान करण्यासाठी नव्हे हो! खरंच नव्हे! पण – पण तुम्ही मात्र मला विलासिनी, वारांगना आणि कुलटा म्हटलंत! पाच पतींशी रमणारी स्वैराचारिणी म्हटलंत! सांगा, मातेच्या आज्ञेचं पालन करणारा पती जेव्हा आपल्या पत्नीला आपल्या बंधूंचीही पत्नी करतो तेव्हा त्या ज्येष्ठ पतीला साथ करणारी स्त्री कुलटा कशी ठरते? सांगा, मी वारांगना आहे काय? विलासिनी आहे काय? कुलटा आहे काय? स्वत:ला मनोमन विचारून मला उत्तर द्या.'

ज्योत क्षणाक्षणाला वाढते आहे या भासानं डोळ्यांवर हात घेऊन मी किंचाळलो,. ''नाही पांचाली, तू कुलटा नाहीस! तू पतिव्रता आहेस!! वृषाली इतकीच तूही पवित्र आहेस!"

बाहेर घनदाट अंधकार असतानाही मी तसाच उठलो! शयनगृह, कक्ष मागं टाकून सोपान उतरून राजवाड्याच्या प्राकाराच्या महाद्वारात आलो. पेंगुळलेल्या द्वारपालांना न उठविताच महाद्वाराचा आडदंड दूर सारून द्वार उघडलं. चालू लागलो. गंगेकडे! सगळं हस्तिनापूर अंधकारानं गिळलं होतं! मार्ग परिचित असल्यानं चुकत नव्हतो एवढंच!

गंगाकाठच्या नित्याच्या पाषाणावर बसलो. त्या शांत जलवाहिनीच्या काठी दाटीवाटीनं वाढलेल्या वृक्षांपैकी कुठल्यातरी कदंब वृक्षावर चुकारमुकार कारंडव पक्षी मध्येच पंख फडफडवीत भेदक चीत्कारत होता, पण क्षणातच त्याचा आवाज

किनाऱ्यावरच्या नीरव निःशब्द शांततेच्या घुमटात कुठल्याकुठं विरत होता. आकाशाच्या निळ्या प्राजक्त वृक्षाला इवल्या-इवल्या तारकापुष्पांचा नुसता बहर आला होता. त्यांतीलच काही पुष्पांचा सडा प्रतिबिंबाच्या रूपानं गंगेच्या पात्रात पडला होता! बराच काल त्या पाषाणावर तसाच बसलो. पण अंतरंगातला संभ्रम आणि गोंधळ केव्हा थांबणार यावर मात्र मला उत्तर सापडत नव्हतं! लपलपणाऱ्या लाटा ते कधीच देऊ शकणार नव्हत्या!! विषण्णपणानं शेवटी गंगातीर सोडून कक्षाकडे परतलो. तळमळत असाच केव्हातरी निद्रावश झालो. निद्रा ही सर्वांत अधिक उदारहृदयी माता आहे! व्यक्तिव्यक्तींची विभिन्न दुःखं ती एकाच ममतेनं काही काल का होईना; पण निश्चितच आपल्या विशाल उदरात घेते!

**

# तेरा

कसल्यातरी खडखडाटानं जेव्हा जागृत झालो तेव्हा गवाक्षातून शयनगृहात शिरलेल्या अरुणोदयाच्या लोभस किरणशलाका पाहून मी विस्मयचकित झालो. कधीच मी इतका काल निद्राधीन झाल्याचं मला आठवत नाही! कालच्या प्रसंगानं माझ्या दिनचर्येतही बदल घडविला की काय? अशा शंकेनं मंचकावरून लगबगीनं उठून गवाक्षाच्या झरोक्यातून सूर्यबिंब पूर्वक्षितिजावर कितपत आलं आहे हे बाहेर डोकावून पाहिलं. द्वार बाहेरून पुन्हा खडखडलं. बाहेरून द्वार ठोठावण्याचं धाडस कोण करणार या शंकेनं लगबगीनं द्वाराजवळ आलो. मला माहीत होतं ती वृषाली नव्हती, सुप्रिया नव्हती, मेघमालाही नव्हती. सत्यसेन आणि शोण तर कधीच माझ्या शयनगृहाकडे फिरकले नसते! शक्यता होती राधामातेचीच! 'कोण असावं?' असा प्रश्न स्वत:ला विचारीतच द्वाराचा आडदंड दूर सरकाविला. द्वारात अश्वत्थाम्याला पाहून हसत-हसत म्हणालो, ''तू आज येणार हे समजून आल्यामुळे आज हा एवढ्या उशिरा उठलो! नाहीतर एव्हाना गंगेवर असायचा मी!''

''एवढा अंतर्ज्ञानी केव्हापासून झालास? उगाच काहीतरी सांगून मला खुलवू नकोस! आत्ताच वहिनींकडून कळलंय की, रात्री तू मध्यान्हरात्रीनंतर कधीतरी परत आलास म्हणून! अरे, दु:खं लपवावीत; पण ती तरी जरा कौशल्यानं!''

''गुरुपुत्र म्हणून तुला कुठंही आणि कधीही प्रवेश आहे अश्वत्थामा, म्हणून तू कुणाकडूनही कसलीही माहिती काढू शकतोस! कधी नाही तो भल्या प्रभातकाली माझ्याकडे का आला आहेस ते तर मला सांग!''

''आज प्रभातकालीच तुझ्याकडे आलो तेही न राहवल्यामुळे.''

''का? काय झालं?'' मी त्याला आसनावर बसण्याचा संकेत करून विचारलं.

''पांडव पांचालीसह काम्यक अरण्याकडे वनवासासाठी आज निघून गेले! आजच सूर्योदयापूर्वी!''

ते ऐकताच वेदनेची आणखी एक नवी कळ माझ्या काळजात उमटली. ''कालच्या प्रकारानंतरही मामांनी त्यांना वनवासावर पाठविण्यासाठी हट्ट धरला की काय?'' मी पोटतिडकीनं त्याला विचारलं.

''नाही! स्वत: युधिष्ठिरानंच तो निर्णय घेतला आहे! वचनपूर्तीसाठी! वृषवर्मा, महामंत्री विदुर, पितामह आणि संजय यांनी त्याला परावृत्त करण्यासाठी अनेक प्रकारे सांगून पाहिलं, पण त्यानं कुणाचंच ऐकलं नाही. 'आपलं इंद्रप्रस्थाचं राज्य आता तुमचं आहे,' असं दुर्योधनाला सांगून त्यानं अंगावरची राजवस्त्रं महाराजांच्या चरणांवर ठेवली!''

''अश्वत्थामा, आपण सर्व जण कुठं जाणार आहोत तेच मला समजत नाही!''

''ते समजलं असतं तर जीवनाला कसलाही अर्थ उरला नसता! भविष्यात काहीतरी गोंडस आहे या आशेच्या गुंगीवरच सर्व चराचर सृष्टीचा दैनंदिन कार्यक्रम अव्याहतपणे चालू आहे. युधिष्ठिर गेला! तो जाणारच! तोच त्याचा जन्मजात

स्वभावविशेष आहे!''

''कसला स्वभावविशेष?''

"सत्यप्रियतेचा आणि संयमनाचा!"

''संयमन? हे असलं कसलं संयमन अश्वत्थामन्? दिग्विजय करून मिळविलेलं राज्य, दुंदुभीच्या टिपरीसारखं एका क्षणात फेकून निघून जायचं?''

''होय! ते एकटा युधिष्ठिरच करू शकतो! त्याच्या अगाध संयमनाचा आणखी एक नमुना पाहायचा असे, तर अजूनही काल सभेत तो ज्या आसनावर बसला होता त्याच्यासमोरचं चरण ठेवायचं लोहमय चरणासन पाहून ये!''

''काय आहे त्या चरणासनावर?"

''त्यानं भीमाला रोधण्यासाठी मनाच्या निर्धारानं त्या चरणासनावर रुतविलेल्या उजव्या पायाच्या अंगठ्याचा सखोल ठसा!"

"अंगठ्याचा ठसा?"

''होय. राजमाता कुंतीदेवींनी युधिष्ठिराचा शांत स्वभाव पाहून त्याच्यापेक्षा लहान असलेल्या चारी पांडवांना त्याच्या पायाच्या अंगठ्याकडे पाहूनच निर्णय घेण्याची आज्ञा दिली आहे! जेव्हा युधिष्ठिराच्या पायाचा अंगठा वर उंचावलेला असेल तेव्हा ते चौघेही कुणावरही एकाच वेळी विजेच्या लोळासारखे कोसळून पडतील!"

''मग काल त्यानं का उंचावला नाही आपल्या पायाचा अंगठा?'' एक-एक रहस्य ऐकताना मी आता पुरता कष्टावून गेलो होतो.

''काल त्यानं अंगठा उचलला असता तर कदाचित तो स्वत:च कायमचा खोल घसरला असता! काय घडलं असतं त्याचं अनुमान कुणालाही करता आलं नसतं! आणि वर युधिष्ठिर मातेलेखी विश्वासघातकी ठरला असता!''

''तुला काय म्हणायचं आहे? त्या चौघांनी काल तेथील सर्वांनाच पाणी पाजलं असतं?''

''तसंच काही नाही! पण भीमानं दु:शासनाला तर काल निश्चितच वधला असता! कारण तो ज्या आसनावर बसला होता त्याच्या लोहमय हस्तदंडच्या त्यानं क्रोधानं वाकवून ठेवलेल्या आजही तुला सभागृहात तशाच दिसतील!"

''अश्वत्थामन्, कालच्या अघटित प्रकारानंतरही तुला माझ्याविषयी थोडीसुद्धा घृणा वाटत नाही?"

''मुळीच नाही! मात्र एका गोष्टीचा आत्यंतिक खेद होतो मला."

''कोणत्या? मी द्रौपदीची कुलटा म्हणून अवलेहलना केली त्याचाच काय?''

''नाही! तू तसं म्हटलं नसतंस तर द्रौपदी ही किती असामान्य स्त्री आहे, हे हस्तिनापूरला एवढ्या प्रकर्षानं कधीच कळलं नसतं! आज तर द्रौपदी ही विकर्णानं वर्णन केलेल्या देवयानी, तपती, गिरिजा, सुदक्षिणा या महाराण्यांपेक्षाही नगरात वंदनीय झाली आहे! माझा खेद द्रौपदीसाठी नाही! तुझ्यासाठी आहे!"

''माझ्यासाठी? आपला एक प्राणप्रिय सखा जिव्हेवरचं समतोलत्व हरवून बसला म्हणून?"

''नाही! त्यासाठीही नाही! पण तुझ्याविषयी आज सर्वच नगरजन जिव्हेवरचं समतोलत्व हरवून बसलेत म्हणून! हे तुझं फार मोठं दुर्भाग्य आहे की, हस्तिनापुरातले अर्ध्याहून अधिक नगरजन तूही द्यूताच्या कपट कटात होतास, किंबहुना तूच त्या

कल्पनेचा केंद्रबिंदू आहेस असं आज निर्धोकपणे मानतात म्हणून!''

''छे! अगदीच असत्य आहे हे अश्वत्थामा! वास्तविक माझंच चुकलं. द्वंद्वात मी जरासंधाला जीवनदानच द्यायला नको होतं! हे सर्व प्रसंगच आले नसते! त्या कवड्या आल्या नसत्या, ते फासे आले नसते!''

''ते तुला शक्य नव्हतं आणि पुढंही होणार नाही! शत्रूवर दया दाखविणं हा तुझा जन्मजात स्वभावविशेषच आहे! आजवर तू तेच करीत आलास.''

''आता तू सांगतोस तो पांडवांचा वनवास तर अकल्पित आहे. कालच्या द्यूतावर पीतांबरानं पट पडला गेला असं पांडवांनी मानायला नको होतं काय?''

''मानायला पाहिजे होतं, पण मानलेलं नाही. त्यांच्या मनाची घडण कशी आहे हे समजायला कठीण आहे. कारण त्यांनी वनवासाला जाण्यापूर्वी आपल्या मातेच्या दर्शनासाठीसुद्धा इंद्रप्रस्थाला जाण्याचं योजलं नाही! अर्जुनानं तर आपल्या मातेला, सुभद्रेसह अभिमन्यूला घेऊन श्रीकृष्णाकडे द्वारकेला जाण्याचा सरळ संदेश धाडला आहे! द्रौपदीनं आपल्या पाच पुत्रांना पांचालदेशी घेऊन जाण्यासाठी आपल्या बंधूला - धृष्टद्युम्नाला संदेश दिला आहे! क्षणापूर्वी एकत्र असलेल्या पांडुकुलाची आता कशी वाताहत झाली आहे!''

''अश्वत्थामा, कुणालाही विचारला नसता असा एक अत्यंत जिव्हाळ्याचा प्रश्न तुला विचारू का?''

''अवश्य विचार.'' माझा प्रश्न कोणता असावा याचा कयास करताना त्याच्या कपाळावर सूक्ष्म आठी उमटली.

''रथ घेऊन वायुगतीनं असंच धावत जाऊन मी पांचालीची मनापासून क्षमा मागितली तर पांडव पुन्हा परततील काय?''

''शक्य नाही! वीरांचे निर्णय हे चापातून सुटलेल्या बाणासारखे असतात! आता तूच काय; पण पितामह भीष्मांनी जरी चरणांवर नाक घासलं तरीही पांडव परतणार नाहीत! व्याधी होण्यापूर्वी औषधी घ्यावी असं म्हटलं जातं. पांडवांविषयी वागताना तर ती कुणीच कधीही घेतलेली नाही! पितामह भीष्म, महाराज, आचार्य, इतकंच काय पण माझ्या... माझ्या पित्यानंही! आता पक्षी स्वैर चोहोदिशांना उधळलेले आहेत! घरकुलाकडे लवकर परत न वळण्याच्या कटू निर्धारानं!''

''याला उपाय काय?'' त्याची उधळलेल्या पक्षयांची कल्पना मला भयानक वाटली.

''काहीच नाही! प्राप्त प्रसंगाला ठामपणे तोंड देणं! केवळ हाच एक त्याला उपाय आहे!'' आपली हनुवटी वर उंचावीत त्यानं शिरावरच्या वस्त्राच्या पट्टीची सैलसर झालेली गाठ आवळली!

''तू शिरावर ही पट्टी नेहमी का बांधतोस?'' असं त्याला विचारावं असं मला क्षणभर वाटलं, पण मी ती गोष्ट क्षुल्लक मानून ते टाळलं!

''आज आणखी एका आश्चर्याचा अनुभव आला मला.'' गाठ बांधून होताच तो म्हणाला.

''कोणत्या?''

''पांडव इंद्रप्रस्थाचे राजे असूनही या कुरूंच्या हस्तिनापुरातील अनेक प्रजाजन आज त्यांच्या समवेत वनवासाला जायला निघाले हे पाहून! अर्थात

युधिष्ठिरानं अशा सर्वांना परोपरीनं विनवून सीमेवरून मागं परतविलं. एकटे धौम्यऋषी मात्र त्या सहाजणांसमवेत जाऊ शकले.''

''जाताना युधिष्ठिर तुझ्याशी काही बोलला काय?''

''तो नाही बोलला, पण मीच त्याच्या अनावृत पायांकडे पाहून म्हणालो - ''

''काय म्हणालास तू?''

''मी म्हणालो – युधिष्ठिरा, तुझे पाय पाहून मला आता कर्णाची आठवण होतेय! खरोखरच त्याच्यासारखं अभेद्य कातडं तुझ्या पायांना असतं तर या वनवासात तुला काटयाकुटयांपासून होणारा त्रास झाला नसता!'' अश्वत्थामा माझ्या पायांकडे निरखून पाहत म्हणाला.

काटयाकुटयांच्या संदर्भात माझ्या अभेद्य कवचाचा उल्लेख ही कल्पना अश्वत्थाम्याशिवाय अन्य कुणालाही सुचली नसती. मीही माझ्या पायांकडे पाहिलं. ते अग्राकडे बाणाच्या पात्यासारखे निमुळते आहेत याचं मला वरचेवर आश्चर्य वाटत आलं होतं!

एका हाती मंद तेवणारी निरांजनं, फुलं, कुंकुम व अक्षता असलेलं तबक आणि दुसऱ्या हाती, गायीच्या धारोष्ण दुधाचा उभट चषक घेऊन वृषाली हळुवारपणे आत आली. प्रभातकाली गुरुपुत्राचं दर्शन म्हणजे तिच्या लेखी स्त्री-मनाची पर्वणी होती! स्त्रिया नेहमीच श्रद्धाळू असतात!

निरांजनानं ओवाळून अश्वत्थाम्याच्या कपाळावर कुंकुमतिलक लावून तिनं त्याच्या शिरावर चार अक्षता टाकल्या. त्याच्या चरणांवर दोन चंपकपुष्पं भक्तीनं चढविली. अश्वत्थाम्यानं ती तत्परतेनं वाकून हाती घेतली. अंशुकाचा शेव उजव्या हाती घेऊन वृषाली त्याला वंदन करण्यासाठी ओणवी झाली तेव्हा मात्र त्यानं आपले पाय झटकन आसनावर आखडून घेतले!

''वहिनी, माझं आयुष्य कमी करणार आहात की काय तुम्ही? मी तुमच्यापेक्षा लहान आहे!'' नकारदर्शक हात हलवून तो म्हणाला.

''तू वयानं लहान असलास तरी गुरुपुत्र आहेस! ऋषिकुमार आहेस! तिची तुझ्यावर त्यासाठीच श्रद्धा आहे.'' मी वृषालीलाच साथ दिली!

''नाही! काही असलं तरी मी हे वंदन कधीच स्वीकारू शकत नाही.'' तोही निग्रहानं म्हणाला.

''वंदन नाही तर नाही, तो दुधाचा चषक तरी स्वीकारशील की नाही?'' मला त्याचा स्वभाव पूर्णपणे परिचित होता. माझ्या पत्नीचं वंदन त्यानं कधीच स्वीकारलं नसतं!

वृषालीनं चषक उचलून त्याच्या हाती दिला. हनुवटीखालच्या वस्त्राच्या गाठीचे विखुरलेले शेव डाव्या हातानं मागं सारून तो दूध पिऊ लागला. मध्येच त्याच्या शिरावरच्या वस्त्राच्या सुरकुतीत अडकलेला एक अक्षतेचा दाणा घरंगळून हातातल्या दुधाच्या फेसात पडला. चषक डाव्या हाती घेऊन उजव्या हाताच्या बोटानं त्यानं तो काढून टाकण्यासाठी दोन-तीन वेळा चषकात बोट घालून ते वर झटकलं. शेवटी फेसाचा एक थेंब त्याच्या बोटावरून उडून अक्षतेच्या दाण्यासह खालच्या संगघडीवर टपकन पडला!

दुधाचा तो थेंब पाहताच मला एकदम राधामातेची आठवण झाली! तिच्या

दुधावरच माझं शरीर, वैभव आणि धैर्य सर्व काही पोसलं होतं! मी मात्र काल रात्री विचित्र मन:स्थितीत गंगाकिनारी जाण्यात तिच्या तळपायांना चंदनमिश्रित तेल चोळायचं विसरूनच गेलो होतो! सर्वांत प्रथम तिचं दर्शन घेणं आवश्यक होतं! माता म्हणजे ममतेच्या महन्मंगल मंदिरांनी गजबजलेलं तीर्थस्थान!

"मी येतो अश्वत्थामन्. तू बैस." मी द्वाराकडे वळत म्हणालो.

"मलाही गेलंच पाहिजे. आज अमावस्या आहे! महामृत्युंजय मंत्राचं पुरश्चरण मला यज्ञकुंडाजवळ बसून दिवसभर करायचं आहे आज!" तोही उठला.

आम्ही दोघंही एकदमच बाहेर पडलो.

**

# चौदा

पांडव वनवासासाठी निघून गेले ही घटनाच मला सत्य वाटत नव्हती, पण सत्य हे नेहमीच वाटतं तसं नसतं. ते गेले होते. इंद्रप्रस्थाचं दिग्विजयानं समृद्ध केलेलं राज्य - एखाद्या सर्पानं झळाळणारी कात टाकून सहजपणे सळसळत दूर निघून जावं तसं - सोडून! कात जशी सर्वच्या सर्व टाकली जाते तसंच त्यांनी अखंड राज्य सोडलं होतं! रत्नं, माणकं, मोती, प्रवाल, पाचू, पुष्कराज, हिरे, नीलमणी, गोमेद, लसण्या, वैदूर्य, सुवर्ण, गायी वा सेवकसेविका यांपैकी त्यांनी काहीच समवेत घेतलं नाही. इतकंच काय पण अंगावरची राजवस्त्रंही उतरवून ते निघून गेले. अश्वत्थामा म्हणाला त्यावरून तर ते अनवाणी निघून गेले होते!

मला जीवनभराच्या अनुभवानं माहीत झालं होतं की, काही-काही घटना अटळ असतात! पण हेही खरंच होतं की, काही घटनांचे परिणाम टाळता येणं हे शक्य असतं. मात्र त्यासाठी कुणीतरी तळमळीनं यत्न करावे लागतात! आखाड्यात अर्जुनाच्या कंठात पडणारी माला कुणालातरी पुढाकार घेऊन थोपविता आली असती. स्वयंवरातील माझी अवहेलना धैर्यानं पुढं होऊन कुणालातरी रोधता आली असती. पांचालीची सभेत अकारण झालेली, सर्वांची निद्रा नष्ट करणारी घोर विटंबना कुणालातरी टाळता आली असती आणि पांडवांचा वनवास हाही निर्धारानं कुणालातरी थांबविता आला असता... पण... पण त्यासाठी कुणीही पुढाकार घेतला नव्हता! सगळं कसं एका विशिष्ट मार्गानं, विशिष्ट ठिकाणीच जायचं आहे या कल्पनेनंच घडत आलं होतं. आता तो विशिष्ट मार्ग कुणालाच टाळता येणार नव्हता! कधीही! अश्वत्थामा म्हणाला त्याप्रमाणं त्याला एकमेवच उपाय होता; येईल त्या प्रसंगाला तोंड देण्यासाठी धैर्यानं उभं ठाकणं! त्यासाठीच मी मनाचे धागे एकत्र करू पाहत होतो. पण... पण तेही विस्कटले होते! माझं दु:ख एक नव्हतं. मृगाच्या एकाच सरीनंतर जिकडे-तिकडे नुसते कोंबच कोंब उभे राहतात तशी माझी दु:खं अनंत, अगणित होती! घटनेची एक-एक नवी सर कोसळत होती. प्रश्नांचे नवे-नवे कोंब धुमारत होते! तरीही मी शांत राहणं आवश्यक होतं. अचूक निर्णयाला पुरेसा अवसरही नाही अशी माझ्या भोवतीची परिस्थिती आणीबाणीची होती! दुर्योधनाच्या मजवरच्या स्नेहाचं गोड विश्वासात रूपांतर झालं होतं. मला पूर्ण माहीत होतं की, विश्वाच्या प्रलयात तो एकटाच मला सोबत करणार आहे! आणि मीही त्याला! अन्य कुणालाही मी सोडू शकत होतो, पण त्याला सोडण्याची कल्पनाही मला सहन करवत नव्हती. मात्र मला वारंवार वाटत होतं की, दुर्योधनानं आपल्या विचारात, स्वभावात, हालचालीत वेळीच बदल करावा. नाहीतर -!

पण स्वभाव म्हणजे काही कुणालाही आणि केव्हाही बदलता येईल असा रथाचा घोडा थोडाच आहे!

मी सुन्न झालो होतो. माझ्या भवितव्याचं जे चित्र माझ्यासमोर उभं राहत होतं ते मला वेडं तर करणार नाही ना? या जाणिवेनं साचलेला मनाचा कुंभ चूर्ण करून टाकावा असं कधी-कधी वाटत होतं. कधी नव्हे ते नैराश्याचे काळे पक्षी मनाच्या प्रांगणावर

उतरत होते. असल्या कोंदटलेल्या मनाला एकाच ठिकाणी शांती मिळू शकते. नर्तिकांच्या पदन्यासांत किंवा मद्याच्या चषकात! कर्णासाठी आता तोच मार्ग अटळ आहे असं सिद्ध होऊ घातलं होतं. कर्ण! एकेकाळी राजहंस आणि गरुडासारखा ढंगदार दिसणारा आणि असणारा कर्ण! कावळ्यासारखा आता मद्याच्या काळ्या ढोलीत खाली मान घालून प्रवेशणार होता! तेजाचा रस डोळ्यांनी प्राशन करणारा कर्ण, सोमवल्लीचा रस डोळे मिटून प्राशन करणार होता! मनाची आग विझविण्यासाठी मद्याची आग उदरात लोटणार होता! जाग्या डोळ्यांपुढचा अंधकार पाहण्यापेक्षा मनाच्या अंधकारात धुंद होऊन पडणार होता! त्या अंधकारात त्याला कोणीही सूतपुत्र म्हणणार नव्हतं, तू चुकलास, तू नीच आहेस असा हल्ला त्याच्यावर कुणीही करणार नव्हतं!

म्हणूनच एका दासीकरवी मी प्रभंजनाला भेट घेण्याचा संदेश धाडला. दुर्योधनामुळे तो माझ्याशी निश्चितच विश्वासानं वागणार होता.

काही क्षणांतच प्रभंजन माझ्यासमोर उभा राहिला. आश्चर्याची एक सूक्ष्म आठी त्याच्या उचललेल्या उथळ मस्तकावर उभी राहिली होती. मी त्याला प्रथमच बोलावून घेत होतो.

"प्रभंजन, मला सत्वर सोमरस आणि मैरेयक पाहिजे! जा." मी त्याच्याकडे पाठ करून त्याला आज्ञा केली. त्याच्या जाड भुवया प्रश्नांकित होऊन दृष्टीलासुद्धा पडू नयेत असं मला वाटत होतं.

आज्ञापालनार्थ तो गेला असेल या कल्पनेनं मी वळलो, पण खाली मान घालून मख्खपणे त्याला तसाच सामोर उभा असलेला पाहून माझ्या मस्तकावरची धमनी थडाथड उडू लागली.

"प्रभंजन, ऐकलंस की नाही?" त्याच्या जवळ जात मी ओरडलो.

"अंगराज... आपणही!" त्याची मान खालीच होती.

"प्रभंजन, मला सोमरसाचे घोट पाहिजेत, उपदेशाचे नव्हे! दास आज्ञा पाळतात हे विसरलास काय?"

तसं कटी वाकवून अभिवादन करून तो निघून गेला. पायांत अवजड साखळदंड बांधलेल्या हत्तीसारखा!

काही कालानं एक दासी सोमरस आणि मैरेयकाची उभट चंचुपात्रं घेऊन कक्षात आली. मधल्या बैठकीवर ती ठेवून अवगुंठून उभी राहिली. मला प्रभंजनाची टाळाटाळ अपमानास्पद वाटली! एक यःकश्चित दासही आज मला टाळू पाहत आहे की काय?

"जा! त्यालाच पाठवून दे!" मी दासीवरही ओरडलो.

निरुपायानं प्रभंजन परत कक्षात आला.

"प्रभंजन, सोमरसानं चषक भर! तुझ्या नावापेक्षाही भयानक प्रभंजन माझ्या मस्तकात आहे! तूच... त्याला चषक देण्यासाठी तूच योग्य आहेस!"

त्यानं खाली मान घालून एक चषक भरून आणून माझ्यासमोर धरला! मी तो निर्धारानं हाती घेतला! त्या रापट रसात डोकावून पाहताना मात्र राधामाता, वृषाली, शोण, सुप्रिया, सत्यसेन, मेघमाला, पुष्पावती, अश्वत्थामा आणि - आणि पांचाली, यांच्या मुद्राच मुद्रा मला दिसू लागल्या! ती क्षणचित्रं पाहतानाही माझं मन विचलित झालं नाही! विचलित होण्यासाठीसुद्धा मन थोडंसं शुद्धीत असावं लागतं!

चषक ओठाजवळ घेताच त्यातील रसाच्या उग्र दर्पानं नाकाची रंध्रं बधिर

झाली. क्षणमात्रच त्या रसात सूर्यबिंबाची प्रतिमा असल्याचा भास मला झाला– तरीही... तरीही तो चषक ओठांजवळ नेऊन मी डोळे मिटले!

''अंगराज!'' कुणीतरी द्वारातून प्रवेशताना हाक घातली!

त्या आवाजातील जवळिकीनं दचकताना माझ्या हातातील चषक सुटून खाली आदळला! आतील द्रव इतस्तत: विखुरलं.

''कोण ते?" मी एकदम झरकन वळलो. माझं सर्वांग वृषभाच्या कातडीसारखं थरथरत होतं!

''मी आहे!" ते संजयकाका होते! मला एकदम त्यांनी कधीतरी लहानपणी ऐकविलेलं जातिवंत घोड्याचं लक्षण आठवलं. 'जातिवंत घोडा कधीही खाली बसत नसतो!!'

''तुम्ही काका?" मी आश्चर्यचकित झालो. काय बोलावं ते सुचेना. प्रसंगावधानी प्रभंजनानं चटकन सोमरसाचा दर्प घालविण्यासाठी सुरंगीच्या पुष्पांच्या अर्काची एक सुगंधी कुपी दर्पणाजवळ पालथी केली! सोमरसाचा उग्र दर्प कुठल्या कुठं उडून गेला! सुरंगीचा रोमहर्षक सुगंध मात्र कक्षभर दरवळू लागला! माझ्या कानांच्या गुहेत तो एकच एक शब्द पुन:पुन्हा निनादू लागला. 'जातिवंत घोडा कधीच खाली बसत नसतो! जातिवंत घोडा कधीच खाली बसत नसतो!!'

''का? मला पाहून आश्चर्य वाटलं? जगासाठी अंगराज असलेला कर्ण माझ्यासाठी अधिरथाचा पुत्र कर्ण आहे, याचं एवढ्यातच विस्मरण झालं का काय?" आसनावर बसून माझ्या डोळ्यांत सखोल पाहत त्यांनी मला विचारलं.

''नाही. ते कधीच शक्य नाही." पुढं होऊन त्यांची चरणधूली मी मस्तकी घेतली.

''माझ्या इथल्या आकस्मिक आगमनापेक्षा आणखी एका अद्भुत व्यक्तीचं आश्चर्यजनक आगमन आज हस्तिनापुरात झालं आहे. त्यासाठीच एक सावधानतेचा संकेत करण्यासाठी मी इथं आलो आहे."

''कुणाचं आगमन?" पांडव वनवासाला गेले ही वार्ता द्वारकेत गेल्यानं श्रीकृष्ण तर आला नसेल? अशा समजुतीनं मी उत्सुकतेनं विचारलं.

"ऋषिवर्य दुर्वासांचं!" शांतपणे संजयकाका म्हणाले. त्या वार्तेनं मला कसलाच धक्का बसला नाही! का बसावा? ऋषिमुनींची अशी अनेक आगमनं मी आजवर हस्तिनापुरात पाहिली नव्हती काय? त्यांपैकीच एक दुर्वास!

''अंगराज, या दुर्वासांच्या सहवासात राहणाऱ्याचं एकतर जन्माचं कल्याण होईल; नाहीतर संपूर्ण विध्वंसन! तेव्हा त्यांना टाळणंच बरं हे सुचवावं म्हणून मी इथं आलो."

''खरं म्हणाल तर मला आता कुणाकडेच जावंसं वाटत नाही! मग दुर्वासांचा प्रश्नच कशाला? तरी पण काका तुमच्या एका कल्पनेची सत्यासत्यता मला एकदा पडताळून पाहायची आहे!''

''कोणत्या?'' आपलं सतेज भाल किंचितसं उंचावून त्यांनी विचारलं.

''एक पाय मुडपून निद्रा घेणारा घोडा दीर्घकालच्या प्रवासाला खरोखरच निकामी झालेला असतो काय?''

''होय! पण आपल्या हस्तिनापुरातल्या अश्वशाळेत आज असा एकही घोडा नाही! असल्यास मला तरी तो माहीत नाही!''

मी उगाच माझ्या पायांकडे पाहिलं. ते अग्राकडे निमुळेत का होत गेले असावेत याचं उत्तर काही मला कधीच मिळालेलं नव्हतं!

**

# पंधरा

सभागृहातल्या त्या एकाच प्रसंगानं माझा जीवनातल्या सत्यावरचा विश्वासच उडाला. वृषालीनं सांगितलेल्या पांचालीच्या मजविषयीच्या कल्पनेनं तर त्यात अधिकच भर पडली. अपसमजाच्या वलयांत सापडल्यामुळे असो किंवा धुमसत्या मनाच्या उद्रेकामुळे असो, अधमाहून अधम गतीला जाऊन मी पांचालीला अपशब्द बोललो होतो. माझं ते सर्वांत पहिलं अध:पतन होतं! त्यातून निर्माण झालेली एक गोष्ट मात्र आता कुणालाच सावरता येणार नव्हती. ती म्हणजे पांडवांशी वैर! कधीही न मिटणारं अखंड वैर! अश्वत्थामा म्हणाला, ते सर्वस्वी सत्य होतं. पक्षी घरटचांतून चोहोदिशांना उधळले होते. त्यांचे पंख नेतील ती त्यांच्यासाठी आता दिशा होती!

आणि त्या सत्याचा दोष कुणीही आणि कितीही कंठरवानं गर्जून माझ्या एकटचाच्याच माथी मारण्याचा प्रयत्न केला असता तरी मला माझं मन निक्षून सांगत होतं की, हे आपसातील वैर जरी आता पेटलं असलं तरी एकटचा कर्णामुळे ते मुळीच निर्माण झालेलं नव्हतं. मला माझं समर्थन मुळीच करायचं नव्हतं; कारण सत्याला वास्तविक समर्थनाची आवश्यकता नसते. सत्य काय होतं?

अगदी लहानपणापासून कौरव–पांडव आणि मी त्यांच्या मनोरेखा नीटपणे पारखण्यात अयशस्वी ठरलेले गुरू द्रोण त्याला काय कमी कारणीभूत होते? स्वत:भोवती रमलेला अर्जुन काय त्याला मुळीच कारणीभूत नव्हता? आपल्या जिभेचे वेग कधीही आवरू न शकलेल्या भीमाचा त्यात काहीच संबंध नव्हता की काय? भारदस्त व्यक्तित्व असूनही त्याचा इतरांचे दोष कमी करण्यासाठी दंडासारखा कधीही वापर करू न शकलेले पितामह भीष्म काय कमी कारण होते? वेदविद्येचं अध्ययन करून जीवनाचं तत्त्वज्ञान नेहमीच दूर उभं करून गोंडस शब्दांत मांडणारे महात्मा विदुर त्यापासून कुणाला कसे काय वगळता आले असते? कुशल राजकारणाच्या नावाखाली कवडचांचा कपटी कावा खेळणाऱ्या शकुनीमामांचा त्यात काहीच हात नव्हता की काय? आणि... आणि श्रीकृष्णासारख्या महान प्रज्ञावंताच्या सहवासात राहून धर्म, सत्य, नीती, संयम अशा सर्वच निवडक सद्गुणांचा वारसा घेतलेला, 'ज्येष्ठ... ज्येष्ठ' म्हणून ज्याच्या कीर्तीचा डंका ऋषीमुनींनीसुद्धा वेळोवेळी पिटला होता तो युधिष्ठिर, जेव्हा द्यूतासारख्या जुगाराला बळी पडला तेव्हाही काय तो निर्दोषच होता? ज्या सामाजिक संकेतांनी घेरल्यामुळे पांचालीनं, 'मी सूताची स्नुषा कधीच होणार नाही, कर्ण स्वयंवरात भाग घेऊ शकणार नाही' असा माझ्या उभारीच्या तरुण मस्तकावर जळता अंगार ठेवला ते लोहभित्तीसारखे सामाजिक संकेत काय मुळीच कारणीभूत नव्हते? अंध असलेले महाराज धृतराष्ट्र आणि महाराणी गांधारीदेवी यांना तरी या वलयांतून बाहेर काढता आलं असतं काय? स्वत:च्या पुत्रांना योग्य मार्गदर्शन करू न शकलेल्या राजमाता कुंतीदेवींना वगळण्याचं धाडस तरी कुठल्या शहाण्यानं केलं असतं? यांशिवाय मला माहीत नसलेली अन्य किती कारणं या महाभयानक सत्यामागं उभी असतील हे कुणालाच सांगता आलं नसतं!

पण... पण सर्वांना दिसला होता तो एकटा कर्ण! दृश्य स्वरूपात बोलणारा! मला पूर्ण माहीत होतं की, मी मुळीच निर्दोष नव्हतो! पण माझ्या सदोषपणाला कोणतं ना कोणतंतरी कारण होतं! प्रत्येक घटनेतील माझं वागणं म्हणजे एक तीव्र प्रतिक्रिया होती. राजनगरातल्या इतर एका तरी व्यक्तीला त्याच्या वर्तणुकीच्या समर्थनार्थ सांगता येण्यासारखं कारण त्याच्याजवळ होतं काय? मुळीच नाही! कौरव–पांडवांचं वैर केवळ कर्णामुळे जन्मलं, वाढलं, पोसलं आणि फोफावलं असं म्हणणाऱ्या वाहवत गेलेल्या लोकांना 'मी निर्दोष आहे!' 'मी निर्दोष आहे!' असं कंठरवानं ओरडून सांगावं असं मला वाटतही नव्हतं! या वैराबाबत कुणीच निर्दोष नव्हतं हे मला पूर्णपणे माहीत होतं.

आता कौरव आणि पांडव कुरुकुलातील एकमेकांचे आप्तेष्ट राहिले नव्हते. मगधांच्या जरासंधाचं आणि मथुरेच्या श्रीकृष्णाचं जेवढं नव्हतं तेवढं वैमनस्य सभागृहातल्या त्या एकाच प्रसंगानं कौरव–पांडवांत निर्माण केलं होतं. मी त्यात कोण आहे? म्हणून विचार करताना 'एकशे एकावा कौरव' हा राजा दुर्योधनानं घोषित केलेला एकच मार्ग माझ्यासाठी निश्चित होता! जीवनातल्या कोणत्याही महाभयानक सत्याला घाबरून मला त्या मार्गापासून धावून दूर जायचं नव्हतं! साक्षात मृत्यूपासूनसुद्धा! द्रौपदीच्या लज्जाहरणाच्या कटू कल्पनेतून जन्माला येणारे सर्व परिणाम मी भोगणार होतो! एकटा! त्यासाठी मी माझी मनोभूमी तयारी करीत होतो आणि ती करताना आदर्श म्हणून मला पितामह, महामंत्री विदुर, गुरू द्रोण, अश्वत्थामा, वृषवर्मा इतकंच काय पण राजा दुर्योधनसुद्धा योग्य वाटत नव्हता! त्यासाठी माझ्या मनाचा कल एकाच व्यक्तीकडे नकळत झुकत होता. शकुनीमामांच्याकडे!! राजकारणाच्या निबिड अरण्यात शकुनीमामांसारखे मार्गदर्शकच असावे लागतात. पूर्वी मला मामांच्या कल्पना कपटी वाटत होत्या, क्रूर वाटत होत्या. जीवनात काही आदर्श असतात. ते रक्तामासांच्या खतानं जोपासायचे असतात, या कल्पनेनं त्यांच्या कोणत्याही राजकीय डावाला मी विरोध करीत होतो... पण दीर्घकालच्या अनुभवानं मला आता पटलं होतं की, जो बुद्धीचा हुकमी वापरू करू शकतो, तो मनुष्यच जगाची सूत्रं हलवू शकतो! आता आपणही मामांपेक्षा भयानक कल्पना कल्पू शकतो, हे मला मामांना दाखवून द्यायचं होतं! आजपर्यंत दुर्योधन मामांच्या संकेतांवर हलला होता, आता मीच त्याला हलवणार होतो.

आदर्श – आदर्श म्हणून अनेक कल्पना उराशी बाळगणाऱ्या कर्णाचं प्रेत करून ते सभागृहातल्या वस्त्रांच्या ढिगाऱ्यात नियतीनं केव्हाच करकचून गुंडाळलं होतं! अध:पतन! मग ते एकदा घडलं काय आणि शंभरदा – सारखंच!

**

# सोळा

ऋषिवर्य दुर्वासांचं आगमन हस्तिनापुरात झालं होतं. अत्यंत कोपिष्ट आणि लहरी म्हणून त्यांच्याजवळ जाण्याचं धाडस कुणीच करीत नव्हतं. स्वत: राजा दुर्योधन मात्र आपल्या मातापित्यांची केली नसेल इतक्या भक्तिभावानं त्यांची सेवा करीत होता. मलाही दुर्वासांना भेटण्याची इच्छा होती. इंद्रप्रस्थातील राजवाड्याच्या भित्तीवर मला न समजलेल्या चित्राचं रहस्य कळलं तर मला हवं होतं, पण आपणहून त्यांना भेटायला जाणं मला प्रशस्त वाटलं नाही. एकट्या दुर्योधनाशिवाय अन्य कुणालाही भेटावं, असं आता मला वाटतच नव्हतं.

शेवटी एकदा दुर्वासांना भेटायचा योग आला. तोही दुर्योधनाच्याच आग्रहामुळे! आपल्या तत्पर सेवाभावानं त्यानं दुर्वासासारख्या ज्वालामुखीचं मंद तेवणाऱ्या ज्योतीत रूपांतर केलं होतं! कुणाच्याही अंगावर लहानसहान कारणांवरून उसळणारे दुर्वासऋषी दुर्योधनाशी बोलताना मात्र जिव्हाळ्यानं वागत होते! दुर्योधनानं कोणत्या किमयेनं त्यांना अल्पावधीत आपलंसं केलं होतं, हे एक आश्चर्यच होतं. एके दिवशी त्याच्या आग्रहानं मी त्याच्यासमवेत ऋषिवर्यांच्या गंगेकाठच्या पर्णकुटीत गेलो. आपण होऊन काहीच बोलायचं नाही, हे मात्र मी ठरवून टाकलं होतं.

आम्ही गेलो तेव्हा ते पद्मासन घालून एका व्याघ्रचर्मावर ध्यानस्थ बसले होते. एखाद्या लाकडाच्या ओंडक्यासारख्या असलेल्या त्या कृश शरीराला सर्व जण इतके का घाबरतात तेच मला कळलं नव्हतं! अर्ध्या एक घटकेनंतर त्यांनी आपले डोळे उघडले. तत्परतेनं पुढं होऊन दुर्योधनानं त्यांच्या चरणांवर आपलं मस्तक टेकविलं. दुर्योधन कुणापुढंतरी मस्तक नमवितो, हे आश्चर्यकारक सत्य मी जीवनात प्रथमच पाहिलं!

दुर्योधनानं जरी त्यांच्यापुढं मस्तक नमविलं तरी त्यांनी मात्र आपले डोळे एकटकपणे माझ्यावरच रोधले होते! त्या कृश शरीरात किती सामर्थ्य असावं, हे त्यांच्या डोळ्यांकडे पाहूनच कळलं. सूर्यकिरणांत तळपणाऱ्या पुष्कराज खड्यासारखे त्यांचे डोळे तळपत होते.

''कर्ण!'' धनुष्याच्या टंकारासारखा एकच शब्द त्यांच्या ओठाबाहेर आला.

''होय कर्णच! माझा परममित्र अंगराज कर्ण!'' वर उठत दुर्योधनानं उत्तर दिलं.

''तुझा मित्र? अंगराज? राजा, हा कुणाचाही मित्र नाही! अंगराजही नाही! हा केवळ कर्ण आहे! सारं जग त्याला कर्ण म्हणून ओळखतंय आणि प्रदीर्घ काल ते त्याला कर्ण म्हणूनच ओळखत राहील!'' ते त्रोटक आणि असंबद्ध असं काहीतरी बोलले. त्यांच्या लहरी स्वभावाला धरूनच ते होतं! त्यांना वंदन करावंसं मला एकदा वाटलं, पण अशा लहरी माणसापुढं नमण्यासाठी कर्णाचं मस्तक नाही, या विचारानं मी तसाच उभा राहिलो!

दुर्योधनानं त्यांना काय हवं–नको त्याची सूचना राजवाड्यावर पाठविण्याची विनंती केली. आम्ही पुन्हा पर्णकुटीबाहेर पडलो. दुर्योधन विचारमग्न झाला. बहुधा तो दुर्वासांच्या माझ्याविषयीच्या उद्गारांचं चिंतन करताना माझ्या मित्रत्वाविषयी

गोंधळला असावा! त्याच्या खांद्यावर हात टेकवून जाता–जाताच मी त्याला म्हणालो, ''या भस्म फासलेल्या विक्षिप्त ऋषीनं ठरवावी अशी आपली मैत्री कमंडलूतल्या पाण्यासारखी तुला चंचल वाटते की काय? प्रसंग पडल्यास एक वेळ मी कवच–कुंडलांचाही त्याग करीन, पण चंद्रप्रतिमेसमक्ष तुला दिलेलं आमरण स्नेहाचं वचन मी कधीच भंगू देणार नाही.''

''नाही राधेया, तुझ्या वचनप्रियतेबद्दल मला तिळमात्रही शंका नाही. मी त्याचा विचारही केलेला नाही, पण द्रौपदीच्या वस्त्रहरणानं बिथरलेले पांडव चौदा वर्षांनी झाले तरी निश्चित परत येणारच!''

''परतेनात का! पुन्हा द्यूताच्या कल्पनेनं तुला युधिष्ठिराला घेरता येईल की!''

''मला कल्पना सुचली आहे! तुला ती पटली तरच मी ती अमलात आणणार आहे.''

''कसली कल्पना?''

''दुर्वासऋषींचा हा वणवा मी पांडवांच्या अंगावर सोडणार आहे! उगाच त्यांची सेवा इतक्या तत्परतेनं करायला मी काही मूर्ख नाही!''

''काय करणार दुर्वास पांडवांचं? पाच पर्वतांसारख्या सलग योद्धयांना बल्वजाच्या शुष्क काष्ठानं उखडण्याची तुझी कल्पना मला अजून नीट समजली नाही. उलट ती थोडी हास्यास्पदच वाटते मला.''

''नाही. ती हास्यास्पद नाही. दुर्वास आपल्या सोळा सहस्र शिष्यांसह द्वैतवनात पांडवांच्या पर्णकुटीकडे जातील. त्यांनी त्या पर्णकुटीसमोर तळ ठोकताच आतिथ्यासाठी म्हणून पांडवांना त्या साऱ्यांच्या भोजनाची व्यवस्था करावीच लागेल! कशी करणार ते ती त्या निर्जन अरण्यात? हा कोपिष्ट ऋषी क्रोधानं त्यांना त्यासाठी शापदग्ध करून टाकील! तुला काय वाटतं?''

''दुर्योधन, तुझ्या समजुतीप्रमाणं तू काहीही करू शकतोस. मी मात्र तुला एवढंच निक्षून सांगतो की, जर तुला खरोखरच पांडवांचा नाश करावयाचा असेल तर पांडवांचं सामर्थ्य जोपर्यंत वाढलं नाही तोपर्यंतच त्यांच्यावर सरळ चढाई धरून त्यांना कायमचं नष्ट करून टाकावं!''

''तो सर्वांत शेवटचा मार्ग आहे! चल. आज दुर्वास आनंदी दिसले. आजच त्यांच्याकडून तसं वचन घेता येणं शक्य आहे.'' माझा हात धरून त्यानं मला त्या लहरी ऋषींच्या पर्णकुटीकडे पुन्हा वळविलं!

कवाडातून आत शिरताच पुन्हा वंदन करून तो हात जोडून दुर्वासांसमोर उभा राहिला.

''बोल! का परतलास? काय पाहिजे?'' भुवया उंचावीत त्या ऋषीनं त्याला विचारलं.

''गुरुदेव, एक विनंती आहे!.''

''विनंती कसली करतोस? वर माग!''

''आपण मजवर संतुष्ट झालाच असाल तर माझी एकच इच्छा आहे की, इथं पाहिजे तितके दिवस वास्तव्य करून हिमालयाकडे जाताना आपण आपल्या शिष्यगणांसह द्वैतवनात पांडवांकडेही एक सप्ताह राहण्याची कृपा मजवर करावी!''

''एवढंच! अरे, एक सप्ताहच का एक पक्ष आम्ही त्यांच्याकडे वास्तव्य करू!''

दुर्योधन क्षणभर हसला! कटीत वाकूनच तो पर्णकुटीबाहेर पडू लागला. मी कवाडातून दूर होत जाण्यासाठी मार्ग करून दिला. माझ्या हालचालीमुळे दुर्वासांनी मलाही पाहिलं.

''बोल कर्ण, तुला काय पाहिजे?'' परत भुवया उंचावल्या गेल्या!

''मला काहीच नको!'' दुर्योधनामागोमाग सरळ पर्णकुटीच्या ठेंगण्या कवाडाला चुकविण्यासाठी वाकून बाहेर पडताना मी पुटपुटलो. तरीही आतून आज्ञार्थी शब्द आले, ''कर्ण!'' दुर्योधनानं हातानंच मला परत आत जाण्यासाठी खुणावलं! अनिच्छेनं मी केवळ त्याच्यासाठी म्हणून परत आत गेलो!

''कर्ण, मी काय सांगतो ते नीटपणे ऐक. अलीकडे सूर्याला अर्घ्यदान करण्यात तुझी हेळसांड होते आहे! ती सावर! आणि रोज रात्री एका चषकात जल घेऊन त्यात सर्व वर्णांची कमलपुष्पं ठेवून सकाळी त्या कमलजलात सुवर्णपत्तीचं भस्म मिसळून ते सुवर्णजल नियमानं प्राशन करीत जा!''

मी भारावल्यासारखा पर्णकुटीबाहेर आलो. माझी अर्घ्यदानातील हेळसांड ह्या तपस्व्याला कशी समजली? मी अर्घ्यदान करतो हे तरी नेमकं त्याला कसं समजलं? ही रहस्य एकमेकांच्या हातांत हात घालून एकटचा माझ्याभोवतीच फेर धरून किती काल नाचणार होती? नगरात अन्य कुठलाच योद्धा त्यासाठी त्यांना सापडत नव्हता की काय? या दाढीधारी ॠषीला सुवर्णजलाचं हे एवढं महत्त्वाचं रहस्य मलाच सांगावंसं का वाटलं? त्यानं ते दुर्योधनाला का नाही सांगितलं?

**

# सतरा

चांगले दोन मास हस्तिनापुरात वास्तव्य करून ऋषिवर्य दुर्वासांनी नगर सोडलं. त्यांच्या वास्तव्यात ते केवळ दोघांशीच मनमोकळेपणानं बोलले होते. दुर्योधनाशी आणि अश्वत्थाम्याशी! मी पुन्हा कधीही त्या विचित्र ऋषींच्या पर्णकुटीकडे गेलो नाही. मात्र त्यानं सांगितलेलं सुवर्णजल न चुकता नित्य सकाळी सूर्योदयापूर्वी प्राशन करू लागलो. अर्घ्यदानाचा थोडासा अनियमित झालेला कार्यक्रमही मी सावरून घेतला.

दुर्योधनाच्या सूचनेवरून प्रभंजनही दुर्वासामागोमाग द्वैतवनाकडे निघून गेला होता. ऋक्ष, काम्यक, हिमालय अशा सर्व पर्वतांवरील अपल्या आश्रमातील सहस्रावधी शिष्य बरोबर घेऊन शेवटी दुर्वासऋषी पांडवांच्या पर्णकुटीसमोर उभे ठाकणार होते! त्यांच्या भोजनाची थोडीसुद्धा अनास्था होताच स्वभावधर्माप्रमाणं क्रोधानं जटा पिंजारून तो तपस्वी पांडवांना शाप देणार होता आणि या सर्व कथेचं सविस्तर निवेदन त्यांच्या पाठोपाठ मागोवा घेत फिरणारा प्रभंजन घोड्यावरून दौडत येऊन दुर्योधनाला सांगणार होता! मला मात्र दुर्योधनाच्या या कल्पनेत काहीच स्वारस्य वाटत नव्हतं.

पांडव! ही तीनच अक्षरं शीळ घालत माझ्या मस्तकात भ्रमण करीत होती. पांडवांच्या अस्तित्वानं धैर्य सुटलेल्या दुर्योधनाची केविलवाणी अवस्था मला पाहवत नव्हती. त्याच्या कंठाभोवती लपेटलेला हा तीन अक्षरांचा फास मला मुक्त करायचा होता. दुर्योधन आणि कर्ण ह्या आता एकाच राजमुद्रेच्या दोन बाजू झाल्या होत्या! पृथ्वीतलावर एक पांडव तरी अस्तित्वात राहतील; नाहीतर कर्ण तरी राहील, या भावनेनं मी दुर्योधनाला साहाय्य करणार होतो.

एक मासानंतर प्रभंजन द्वैतवनातून राजनगराकडे परतला. दुर्वास आणि त्यांचा प्रचंड शिष्यगण यांच्या मागोमाग सावधपणे प्रवास करून त्यानं सर्व वृत्तान्त हस्तगत केला होता.

आर्यावर्तातील आपल्या सर्व शिष्यांसमवेत हस्तिनापुराहून निघाल्यापासून विविध आश्रमांचा प्रवास करून पंधरा दिवसांतच ऋषिवर्य दुर्वास द्वैतवनातील पांडवांच्या पर्णकुटीसमोर उभे ठाकले! त्या विचित्र ऋषीनं दररोज निरनिराळ्या पक्वान्नांची मागणी करून, पांडवांना त्रस्त करण्याचा आटापिटा केला, पण एका अद्भुत थाळीनं तो उधळून लावला गेला. पांचालीजवळ अशी एक थाळी होती की, जिच्यातून कोणतंही पक्वान्न आपोआप उत्पन्न होत होतं. कितीही बुभुक्षितांची भूक शमवूनही परत ती थाळी पूर्ण भरलेलीच राहत होती! सर्वांत शेवटी प्रभंजनानं सांगितलं की, पांचालीला ती थाळी सूर्यदेवांकडून मिळाली होती! द्वैतवन सोडताना स्वत: दुर्वासांनी त्या रहस्यमय थाळीला वंदन केलं आणि शापाऐवजी पांडवांना तृप्त मनानं वरदान देऊन ते हिमालयाकडे निघून गेले! दुर्वास दुर्योधनाला संतुष्ट करू शकले नव्हते.

पाठीवर हातांची गुंफण करून तो सर्व वृत्तान्त ऐकताना पंजरात कोंडलेल्या शार्दूलासारखा दुर्योधन कक्षात फेऱ्या घालू लागला. भुवया ताणून एकदम आपल्या त्या

विश्वासू आणि प्रिय सेवकाच्या अंगावर धावून जात तो वसकन ओरडला, ‘‘मूर्खा! असली अप्रिय वार्ता आपल्या सम्राटाला ऐकविण्यापेक्षा पुरोचनासारखा तिकडेच जळून का मेला नाहीस तू?’’ युवराज असून स्वत:ला तो सम्राट म्हणवून घेत होता.

प्रभंजन क्षणभर थरथरला. पण त्याचा तरी काय दोष होता? आपलं आज्ञापालनाचं कर्तव्य त्यानं केलं नव्हतं काय?

‘‘तू जा!’’ मी त्याला आज्ञा केली. मान नमवून तो खिन्नपणानं निघून गेला.

अस्वस्थपणे फेरे घेणाऱ्या दुर्योधनाकडे क्षणभर एकटक पाहून मी त्याला म्हणालो, ‘‘युवराजा, पांडव तुला खरोखरच इतके अस्वस्थ करून सोडताहेत काय? मग सरळ–सरळ राजसभा भरवून युद्धाचाच निर्णय तू का घेत नाहीस? कुणी नाही दिली तरी मी दिलेली साथ तुला पुरेशी वाटेल की नाही?’’

‘‘अंगराज, मला पूर्ण माहीत आहे की, पांडवांशी गैरिक पर्वताच्या खंबीरपणानं तोंड देणारा सिंहाच्या छातीचा एकच योद्धा हस्तिनापुरात आज अस्तित्वात आहे आणि तो म्हणजे कर्णच!’’

‘‘मग कधीही सत्य न ठरणाऱ्या सावरीच्या कापसासारख्या इतर हलक्या योजना का आखतोस?’’

‘‘ते तुला कधीच कळणार नाही. तरी पण तुझ्या म्हणण्याप्रमाणं एकदा राजसभा भरवून कुरुयोद्धयांचा कानोसा घेऊन पाहायला काहीच हरकत नाही.’’

माझी कल्पना पटवून घेऊन ती लगेच अमलात आणण्याचं ठरविल्याचा त्याचा हा पहिलाच प्रसंग होता! त्याचा निरोप घेऊन मी परतताना दुर्योधनाबाबतचा एक विचार यत्न करूनही माझ्या मनाच्या प्रांगणातून क्षणकालही दूर होत नव्हता. अशा कोणत्या दिव्य भक्तीच्या साधनेनं पांचालीनं सूर्यदेवांकडून ती अद्भुत थाळी मिळविली होती! मला तिच्या भक्तीचा मार्ग जर खरोखरच कळला असता, तर मी त्याचा काटेकोरपणे अवलंब केला असता. कुठलीतरी थाळी मिळविण्यासाठी नव्हे! शस्त्रास्त्रं मिळविण्यासाठी नव्हे! केवळ मला मार्ग दाखविणाऱ्या त्या गुरूच्या अधिक सन्निध जाण्यासाठी! जीवन अधिक प्रकाशमय करून घेण्यासाठी!

**

# अठरा

ठरल्याप्रमाणं दुर्योधनानं राजसभा बोलावली. या सभेत सर्व सभासदांचा खरा कस लागणार होता. पांडवांशी किती काल पाठशिवणीचा न संपणारा खेळ खेळायचा हे ठरणार होतं.

सभागृह भरताच वृषवर्मा अमात्यांनी सभेचं प्रयोजन सांगितलं. अमात्यांमागोमाग दुर्योधन उठला. आपल्या पुष्ट, आखूड बोटांची भक्कम मूठ वळवून त्यानं सर्व सभासदांना ऐकविलं की – "काही झालं तरी पांडव कुरूंच्या सिंहासनाला स्पर्शू शकणार नाहीत. एका महान रहस्याचा भेद आज मी या कुरूंच्या प्राचीन आणि पवित्र सिंहासनाला साक्षी ठेवून करणार आहे. पितामह, महामंत्री, विदुरकाका, महाराज आणि महाराणी, गुरू द्रोण, कृप आणि अश्वत्थामन्, अंगराज कर्ण आणि महावीर शोण, शकुनीमामा आणि राजनीतिकुशल कणक वगैरे सर्वांच्या साक्षीनं मी हे करीत आहे. पांडव महाराज पांडूंचे औरस पुत्र नाहीत! ज्या भयानक शापाच्या भीतीनं दिग्विजयी महाराज पांडू हस्तिनापूर सोडून अरण्यात निघून गेले तो शाप काय होता ते मी सांगतो. सर्व सभासदांनी तो सावधपणं पुन्हा ऐकावा – तो शाप असा होता – 'राजा, प्रणयाच्या इच्छेनं ज्या वेळी तू आपल्या स्त्रीला कवेत घेशील तेव्हा असाच माझ्यासारखा तडफडून–तडफडून मरशील!' मग राजामाता कुंती आणि माद्री यांना पुत्रप्राप्ती झालीच कशी? या सभागृहातील एकतरी सभासद या धडधडीत असत्याचं समर्थन करायला समर्थ आहे काय? कुंती आणि माद्री यांचे पांडव हे कलंकित पुत्र असताना त्यांनी या महाराज कुरूंच्या पवित्र सिंहासनावर हक्क सांगितला, तर आपण सर्व जण तो मान्य करणार आहोत काय? द्यूतात पांडव हरले याची ज्यांना–ज्यांना हळहळ वाटत असेल, त्यांनी हे कधीच विसरू नये की, खांडववनात इंद्रप्रस्थाचं राज्य स्थापण्याचीही पांडवांची पात्रता नाही! या सभागृहाच्या प्रवेशद्वावर सेवक म्हणूनही पांडवांना उभं करणं म्हणजे आपल्या पिढ्यान्पिढ्या रक्ताचं सिंचन करून पवित्र ठेवलेल्या राजसिंहासनाला काळिमा फासणारं आहे! सांगा, केवळ ते सामर्थ्यशाली आहेत म्हणून पांडवांपुढं नतमस्तक होऊन मी या राज्याचा अर्धा भाग वा खांडववनाचं – इंद्रप्रस्थ त्यांना द्यावं काय? आकाशाचं छत फाटून मस्तकावर कोसळलं तरी त्याची हसतमुखानं पायदंडी करून त्यावर उभे राहणारे अंगराज कर्णासारखे महारथी कुरूंच्या पाठीशी उभे असताना पांडवांना भिण्याचं कुरूंना काय कारण आहे? मी तर त्यांना पांडवसुद्धा म्हणावयास तयार नाही, कारण त्यांना पांडव म्हणणं म्हणजे महाराज पांडूंची अवहेलना करण्यासारखं आहे! मी त्यांचा 'कौंतेय आणि माद्रेय' असा उल्लेख करणार. त्यांच्या माजलेल्या अरेरावीला वेळीच उखडण्यासाठी आज या सभागृहातल्या सर्व सभासदांना आवाहन करीत आहे. कुरूंच्या शूर योद्धयांनो! कौंतेय एकाकी आणि साहाय्यहीन आहेत तोपर्यंतच त्यांना तुम्ही निखंदून टाकावयास नको आहे काय? सांगा!" दोन्ही हात अवकाशात उडवीत त्यानं सर्व सभासदांना प्रश्न विचारला.

सभागृहातले सर्व योद्धे, गदेच्या प्रहारासारख्या त्याच्या शब्दफेकीनं उठून उभे

राहिले. काही जण तर हात उंचावून ओरडले, "राजा, द्वैतवनाकडे जाणारा मार्ग आत्ताच आम्हाला दाखवा! कौंतेय नष्ट झालेच पाहिजेत! महाराज पांडूंच्या पवित्र नावाचा नीच वापर करणारा कोणीही प्राणी या हस्तिनापूर राज्यात जिवंत राहणार नाही!" भारावलेल्या सर्व योद्धयांच्या कलकलाटानं सभागृह कोंदटून गेलं! दुर्योधनाची कल्पना सर्व योद्धयांनी उचलून धरली. सर्व योद्धयांचा इतका भरघोस पाठिंबा आजच राजा दुर्योधनाला मिळत होता.

"थांबा!" तोच तो पाषाणावर बाणांचं पातं आदळताच होतो तसा कणखर आवाज झाला! थरथरणाऱ्या पितामहांनी महाराज धृतराष्ट्रांच्या हातातून राजदंड आपल्या हाती घेतला! मागे एकदा आखाड्यात माझ्यासाठी बोलताना त्यांनी असाच तो राजदंड आपल्या हाती घेतला होता! तोच आवेश आणि उन्मेष त्या वृद्ध शरीराच्या थरथरीतून उफाळून वाहत होता. निश्चितच काहीतरी धक्का देणारं सत्य आता ऐकायला मिळणार होतं! पांडवांसाठी प्रेमभावना जोपासणारा हा ज्येष्ठ कुरू आता जमून आलेल्या खेळाला खो घालणार होता – हातातील राजदंडं उंचावीत त्या वृद्धानं शब्दांचे जिद्म बाण सोडले!

"कुरूंच्या योद्धयांनो, युवराज दुर्योधन गेली अर्धा घटका या सभागृहात जे बोलला ते या वास्तूच्या निर्मितीपासून आजपर्यंत एखादा दास किंवा दासीसुद्धा बोलली नसेल! महाराणी कुंती कलंकित नाही! विकर्णानं याच सभागृहात सांगितलेल्या गिरिजा, सुदक्षिणा, तपती, नलिनी किंवा जिला अद्भुतपणे वस्त्रांचा पुरवठा झाला ती पांचाली या सर्वच राजस्त्रियांपेक्षा महाराणी कुंती कितीतरी श्रेष्ठ आहे! इतकंच काय; पण आज कुणीही मला विचारलं की, 'कुरूंचा सर्वश्रेष्ठ योद्धा कोण?' तर मी अभिमानानं उत्तर देईन की, 'कुंती!' कारण एक स्त्री असूनसुद्धा ज्या हिमालयाच्या उत्तुंग धैर्यानं तिनं अनेक आपत्तींना तोंड दिलं आहे ते धैर्य तुमच्यापैकी एकाही योद्धयात मला कधीच दिसलं नाही! म्हणूनच जे सत्य जीवनभर मी स्वत:शीच जागवीत आलो ते कुरूंच्या वंशवृत्तान्ताचं रहस्यमय सत्य आज निरुपायानं मलाच कथन करावं लागणार आहे! तुमच्या उफाळलेल्या क्रोधावर त्या सत्याचं शीतल जल शिंपताना मात्र माझं मन संतप्त होत आहे! ज्या राज्यरक्षणाच्या कल्पनेनं दुर्योधनानं तुम्हाला पेटवून दिलं ते राज्य कुणाचं आहे? कोण आहेत त्याचे खरे वंशज? धृतराष्ट्राचे शंभर पुत्र कौरव? की पांडूचे पाच पुत्र पांडव? कुणाला द्यावं हे राज्य? या राजसिंहासनावर बसण्याचा खरा मान कुणाचा? हा राजदंड कुणी हाती धरावा? संपूर्ण आर्यावर्ताला आपल्या शौर्यानं थरकाप भरविणाऱ्या कुरू योद्धयांनो, हे सत्य ऐकताना तुमचे ऊर आज आश्चर्यानं फाटून जातील की ज्या अनादी कुरुवंशाची तुमच्या पितरांनी सेवा केली त्याचे वंशज – " आपलं शुभ्रकेशांकित मस्तक त्यांनी सभागृहावर फिरवलं.

क्षणभर सगळीकडे उत्सुकतेनं भरलेली शांतताच शांतता पसरली. कुणाचं नाव ऐकायला मिळणार? कौरवांचं की पांडवाचं?

"त्याचे वंशज – कौरवही नाहीत! आणि पांडवही नाहीत!"

सर्वांनी श्वास रोखले. पाठीचा कणा ताठ करून मीही कान टवकारले. माझ्या सर्वांगाभोवती अभेद्य कवच का आहे याचं मला जेवढं आश्चर्य वाटलं नाही तेवढं आश्चर्य, सर्वांनीच जीवनभर उराशी कवटाळलेल्या कल्पना एका क्षणात उधळणारं ते महान सत्य ऐकताना मला वाटलं. आम्ही हे काय ऐकत होतो? कसा विश्वास बसला असता त्या कथनावर? पण बोलणारे पितामह होते! अर्थात ते सत्यच होतं.

“मग कोण आहे कुरुकुलाचा खरा वंशज?” कुणीतरी धैर्यानं सभागृहातल्या शांततेचा भंग केला.

“मी!!” हातातील थरथरणारा राजदंड सावरीत पितामह भीष्मांच्या स्वरूपातला तो हिमालयाचा उंच कडा बोलू लागला. त्यांचं एक-एक वाक्य म्हणजे त्या कड्यावरून कोसळणारा भीतिदायक प्रपातच होता – “या अवस्थेतही आशेचे किरण शोधीत उभा असलेला तुमच्या समोरचा भीष्म हा शेवटचा कुरू आहे! कौरव–पांडव कुरुकुलोत्पन्न नाहीत. तरीही आज ते आपली मस्तकं कुठल्या कल्पनेनं हाडवैऱ्यांसारखी एकमेकांशी भिडविताहेत, याचं कारण शोधताना माझं मन विषण्ण होत आहे. म्हणूनच कुरुकुलाचा सत्य वंशवृत्तान्त सांगण्यासाठीच माझ्या मनावर अवजड पाषाणांचा भार ठेवून मी आज उभा आहे. लक्ष देऊन ऐका. धृतराष्ट्र, पांडू आणि विदुर हे एकमेकांचे बंधू आहेत. त्यांचा पिता एकच आहे. पराशरपुत्र व्यास! माता मात्र वेगवेगळ्या होत्या. धृतराष्ट्राचे या सभागृहातील शंभर पुत्र हे व्यासांचे वंशज आहेत! युवराज दुर्योधनसुद्धा! आणि पांडव हे पांडूचे पुत्र नाहीत हे जेवढं सत्य आहेत तेवढंच ते पापाचे पुत्र नाहीत हेही सत्य आहे! महाराणी कुंती आणि माद्री यांना ऋषिवर्य दुर्वासांच्या शक्तिमान देवहूती मंत्रापासून झालेले पांडव पापातून झाले आहेत असं कोण म्हणणार आहे? आणि याहीपेक्षा भयानक सत्य आहे ते हे की, तुम्ही सर्व समजता तसे पांडव पाचच नाही! आणखी एक ‘सहावा पांडव’ जगाला कधीच दिसला नाही... कारण – कारण आपल्या जन्मापासूनच तो दुर्दैवाच्या फेऱ्यात घेरलेला मी पाहिला आहे! त्याच्यासाठीच माझ्या मनाचे धागे तिळतिळ तुटलेले आहेत.”

“म्हणूनच निर्वाणीचं मी सांगतो आहे... तुम्हा कुरूंचा शेवटचा कुरू म्हणून सांगतो की, जे राज्य दिग्विजयी पांडूनं वृद्धिंगत केलं आणि या धृतराष्ट्रानं जोपासलं ते कौरव–पांडवांनी अर्धं–अर्धं विभागून घ्यावं. कौरवांचं नेतृत्व करणाऱ्या आणि कुशल गदावीर म्हणून विख्यात असलेल्या दुर्योधनानं निदान आपल्या गदेच्या गुरूचा आदर्श तरी डोळ्यांसमोर सदैव जागता ठेवावा! त्याचा गुरू बलराम आपला बंधू श्रीकृष्ण याचा परामर्श घेतल्याशिवाय काहीच करीत नाही. कौरव–पांडवांनी बलराम–श्रीकृष्णाचं नातं डोळसपणे पाहावं! आणि आकाशाचं छत कोसळलं तरी त्याची पायदंडी करून उभा ठाकणारा, म्हणून ज्या कर्णाचा दुर्योधनानं गौरव केला त्या वीर कर्णानंही या एकशे पाच पायदंड्या उभ्या करून त्यांवर आपला पाय ठेवण्याचं कर्तृत्व दाखवावं! या सभागृहातल्या कुठल्याही सभासद योद्ध्यानं विसरू नये की, राजमाता कुंती पवित्र आहे आणि तिचे पुत्र तेजस्वी महावीर आहेत.” थरथरतच पितामह खाली बसले.

सभेचं पुढचं काम कसं चाललं यात कुणाचंच चित्त नव्हतं. नंतर बोललेल्या महामंत्री विदुर, अमात्य, महाराज यांचे शब्द ऐकण्याइतकं कुणाचंही मन नीटपणे स्वस्थ नव्हतं. नाही म्हणायला आकस्मिकपणे महाराणी गांधारीदेवी उभ्या राहिलेल्या पाहून सर्वांना आणखी एक विस्मयाचा धक्का बसला. त्या कसंबसं एकच वाक्य उच्चारू शकल्या – “दुर्योधन, आता तरी शहाणा हो – पांडवांना वनातून परत आण!” डोळे झाकलेलं मुख क्षणभर सभागृहावर फिरवून त्याही आसनस्थ झाल्या.

सभा विसर्जित झाली. सभागृह सोडताना माझं मन केवळ एकाच गोष्टीभोवती मंडलं घेत होतं. पितामहांनी कथन केलेला तो ‘सहावा पांडव’ कोण? पांडवांशी समेट अशक्य झालाच तर तो अचानक कुठूनतरी येऊन आपल्या बंधूंना मदत करील काय? सर्व

पांडव मंत्रशक्तीतून निर्माण झाले आहेत तसा तोही मंत्रापासूनच निर्माण झाला असेल काय? किती सामर्थ्यशाली असेल तो? आपण त्याच्याशी लढताना कुठं कमी तर पडणार नाही ना? जन्मापासूनच तो दुर्दैवी कसा? आणि इतर पांडवांना तरी कोण सुदैवी म्हणणार होतं? विचारांच्या आवर्तांत माझं मन शुष्क पर्णासारखं गरगरत होतं. पांडव आणि कौरव कुणीच कुरुकुलापैकी नाहीत! पितामह भीष्म हे जर शेवटचे कुरू आहेत, तर राजसिंहासन कोणाचं हा प्रश्न आता अधिकच गुंतागुंतीचा नव्हता काय? कोण सोडविणार होतं, तो प्रश्न? माझ्या मनाच्या पटांगणावर शंकांचे घोडे हवे तसे दौडू लागले. कुणाला आवरावं ते समजत नव्हतं. खाली मान घालून जडपणे एक-एक पाऊल उचलीत मी सभागृहाबाहेर शुभ्र पाषाणांची पायघडी असलेला चौथरा मागं टाकीत होतो. राजवाड्याभोवतीच्या प्राकाराच्या माथ्यावरून घसरलेली मावळतीची किरणं त्या पायघडीवर पडून विखुरल्यामुळे ती आगळ्याच वर्णात झळाळत होती. माझ्या खांद्यावरचा तलम उत्तरीयाचा एक शेव घरंगळून खाली पडला होता, पायघडीवरून फरफटत येत होता. उत्तरीयाचा जो शेव अंगावर होता तो मी जाता-जाताच मनगटाभोवती करकचून गुंडाळला. काही सुचत नव्हतं. जगात कुणाचीतरी दु:खं कुणाच्यातरी हृदयात का सलत असतात? काय आहे जग म्हणजे?

उत्तरीयाला आकस्मिक हिसका बसला. ते कशाततरी सापडलं असावं म्हणून सोडविण्यासाठी मी वळलो. उत्तरीयाचा शेव हाती घट्ट धरून अश्वत्थामा उभा होता! मला पाहताच तो हसला. मला आश्चर्य वाटलं. क्षणापूर्वीच्या सभेचा त्याच्या मनावर काहीच परिणाम कसा काय झाला नाही?

"कसल्या विचारात गढला आहेस एवढा?" पुढं होऊन उत्तरीय माझ्या खांद्याभोवती लपेटीत तो नेहमीच्या जिव्हाळ्यानं म्हणाला.

"विचारात? कुठं?" मी काहीतरी उत्तर दिलं. तो तेवढ्या उत्तरावर थांबणार नव्हता, हे मला माहीत होतं.

"चल. नगराबाहेर दूर भटकून येऊ! तू फारच अस्वस्थ दिसतोस."

"नको. आता कुठंच जाण्याची इच्छा नाही. तुला सांगाती पाहिजे तर शोणाला घेऊन जा." मला कुणाबरोबरही जावंसं वाटत नव्हतं.

"शोण आणि कर्ण यांत महदंतर आहे! मला कर्णासमवेत जायचं आहे. चल." त्यानं माझा हात आपल्या हाती घेत राजवाड्याच्या महाद्वाराकडे अंगुली उचलली. निरुपायानं त्याच्यासमवेत जावं लागलं मला, कारण माझ्याशिवाय अन्य कुणालाच त्यानं असा आग्रह कधीही केला नसता.

त्याच्याबरोबर चालत-चालत महाद्वाराचा उंबरठा ओलांडताना न राहवून मी त्याला विचारलं, "आज पितामह भीष्मांनी सांगितलेला तो सहावा पांडव कोण असावा असं वाटतं तुला?"

"ते कसं सांगता येईल? पांडव सहा आहेत हे सत्य खरोखरच पटणारं नाही, पण पितामहांनी सांगितलं त्याअर्थी ते सत्यच असणार! हा सहावा पांडव कोण, त्याच्याशी काय करायचं आहे आपणाला? तो कसा असेल एवढा कयास मात्र कुणालाही करता येईल!" त्यानंही महाद्वाराचा उंबरठा ओलांडला. आम्ही पायीच नगराबाहेर चाललो.

"कसा असेल तो?"

अश्वत्थामा जीवनाचा सखोल अभ्यासक होता.

“तो निश्चितच पांडवांसारखा नसेल!”

“मग कुणासारखा असेल तो? पांडवांपेक्षा वेगळं असं त्याच्यात काय असेल?”

“सर्वच! कदाचित तो पाची पांडवांपेक्षा सरस असेल. कदाचित तो त्या पाचांहूनही कनिष्ठ असेल. ज्या वातावरणात तो वाढला असेल तेच त्याचं जीवन असेल! कारण संस्कार म्हणजेच जीवन. फुलाच्या परागदंडात लपलेली कृमीसुद्धा सत्संगतीनं देवमूर्तीवर चढविली जाते.”

“एखाद्या व्यक्तीबद्दल आपलं मत फार अनुकूल असतं, एखाद्याविषयी मात्र आपणाला कधीच जिव्हाळा वाटत नाही. हे असं अकारण का असतं, अश्वत्थामन्?” मी त्याला विचारलं.

“कुठल्याही व्यक्तीविषयी आपली मतं अगदी बालपणापासून ठरत असतात. प्रसंगानुरूप कधी–कधी त्यात थोडासा बदलही होत असतो. पण बालपणीची अनादराची मतं मात्र पायात खडा खुपल्यानंतर साकळणाऱ्या रक्तासारखी असतात! पुढं याच साकाळलेल्या रक्ताचं केळणीत – टणक गाठीत – रूपांतर होतं! बालपणातील अनादराची मतं तारुण्यात आणि भावी आयुष्यात पक्की होत जातात! या टणक गाठींच्या अटळ त्रासामुळे चांगली सशक्त माणसंसुद्धा लंगडतलंगडत चालताना मी पाहिली आहेत अंगराज! म्हणूनच बालपण हा आयुष्याच्या घडणीच्या दृष्टीनं अतिशय महत्त्वाचा काल मानतो मी.”

“म्हणजे नवजात अर्भकाचं मन अगदी एखाद्या सुवर्णतबकासारखं निर्मल असतं. त्याला जगाची – मानवी गुंतागुंतीची – काहीच जाणीव नसते – पण भोवतीच्या परिस्थितीनं त्याला आपल्या अमंगळ हस्तांचा एकदा का स्पर्श केला की, त्या हस्तांचे ठसे त्या तबकावरही स्पष्ट उमटायला लागतात, असंच तुला म्हणायचं आहे काय?”

“नुसते ठसेच उमटत नाहीत राधेया – तर सुवर्णाच्या तेजोमय पार्श्वभूमीवर तेही सूर्यप्रकाशात स्पष्ट तळपायला लागतात! गुणांबरोबर नकळत दोषही व्यक्त व्हायला लागतात. कारण नवजात अर्भकाचं मन हे एखाद्या नुकत्याच धुऊन झटकून साफ केलेल्या आणि सुकत टाकलेल्या वस्त्रासारखं असतं! कुठं नावालासुद्धा एकही सुरकुती नसते त्यावर! पण तेच प्रौढाचं मन म्हणजे मात्र नुकत्याच सुकलेल्या आणि सुरकुत्यांनी भरलेल्या वस्त्रासारखं असतं! त्याच्यातील श्रद्धेचं – मांगल्याचं पाणी बाष्प होऊन उडून गेलेलं असतं. दाटलेले असतात ते केवळ अनेक गुंतागुंतीचे शुष्क धागे! किती धागे – किती सुरकुत्या! त्याला अंतच नाही. द्वेष, तिरस्कार, स्वार्थ, असूया, हव्यास, दंभ, ढोंग, क्रौर्य, क्रोध, किंकर्तव्यता, अज्ञान, अहंभव, आसक्ती, स्तुती,, आत्मस्तुती, कारुण्य, वात्सल्य, भक्ती, सार्थकता, ममता, प्रेम, काम, अगतिकता, उद्वेग, आत्मपीडन, मत्सर, मोह, असाह्यता, नैराश्य आणि वैफल्य! किती अगणित सुरकुत्या ह्या! व्यक्तिव्यक्तीच्या जीवनवसनाला घेरून राहिलेल्या.”

कधी–कधी अश्वत्थामा इतकं दिपविणारं बोलत असे की, त्याचं ते बोलणं सारखं ऐकतच राहावं असं मला वाटे.

“मग यातून मार्ग काढण्यासाठी काहीच का उपाय नाही? ह्या सुरकुत्या म्हणजेच जीवन की काय?” या प्रश्नावर तो जे–जे बोलेल ते–ते अमृतात न्हाऊन, निथळून निघणारं असंच असणार होतं.

“मार्ग का नाही? अवश्य आहे! तू कोळ्याचं जाळं पाहिलं आहेस ना? किती

गुंतागुंतीचं असतं ते! पण त्या जाळ्यावरून स्वच्छंदानं फिरणारा कोळी त्या जाळ्यात गुरफटून मेला असं कधी पाहिलंस काय? शरीरातल्या मनाच्या या असंख्य धाग्यांत कधीही न गुरफुटणारा असा एक कोळी तुझ्या–माझ्यात – सर्व चराचरात आहे!''

''कोण तो?''

''आत्मा! आणि त्या आत्म्याचा स्थायिभाव आहे प्रकाश. प्रकाश म्हणजेच शरीरातील चैतन्य! कधीच आणि कोणत्याही बंधनात गुरफटून पडू शकत नाही असं चैतन्य, पण चैतन्य म्हणजे काय हे जाणून घेण्याची तीव्र तळमळ पाहिजे. त्यासाठी जीवनावर अतूट श्रद्धा पाहिजे.''

''एखाद्यानं अशी श्रद्धा जीवनात पाळण्याचा प्रयत्न केला आणि त्याच्या श्रद्धांना प्रचंड धक्के देणारी सत्यं सभोवती उभी ठाकली, त्यात त्याची श्रद्धा डळमळली आणि तो इच्छा नसतानाही श्रद्धाहीन झाला तर त्यात त्याचा काही दोष आहे? दोष असलाच तर तो परिस्थितीचा आहे असं म्हणावं लागेल!''

''नाही राधेया, तसं म्हणता येणार नाही! श्रद्धा या कल्पनेचा तुझा अर्थ परिपूर्ण नाही. मृत्यूच्या महाद्वारातसुद्धा ज्या श्रद्धेला तडा जात नाही तीच खरी श्रद्धा! खरा श्रद्धावंत कधीच अश्रद्ध होत नाही आणि परिस्थितीवर खापर फोडीत नाही.

श्रद्धाहीन माणूस म्हणजे मात्र सुगंधी केवड्याच्या आत जीवनभर राहूनही गंधहीन झालेलं निरुपयोगी कणीस! अशा माणसानं शंभर वर्षांचं जीवन जगूनसुद्धा काहीही – खरोखरच काहीही मिळविलेलं नसतं!''

त्याच्या डोळ्यांतून तेजाचे स्फुल्लिंग वर्षू लागले. मुखमंडल ब्रह्मतेजानं कसं तळपू लागलं.

''श्रद्धा! कशाकशावर ठेवावी माणसानं श्रद्धा? श्रद्धा म्हणजे तरी नेमकं काय?'' त्याला चेतावून त्याची रसवंती फुलविणं हा माझा नित्याचा परिपाठ होता.

''श्रद्धा म्हणजे काटेरी जीवनावरची हिरवळ! स्वतःवरच श्रद्धा हवी. ज्याची स्वतःवर – स्वतःच्या दिव्य स्वरूपावर श्रद्धा नाही तो जगासाठी, इतरांसाठी काहीच करू शकत नाही.''

"दुर्योधनानं पांडवांना राज्य देण्याबाबत प्रखर विरोध दर्शविला, हे राज्य केवळ कौरवांचंच आहे, पांडवांचं नाही अशी त्याची मनोमन श्रद्धा आहे म्हणूनच ना?''

''मुळीच नाही! स्वार्थ म्हणजे स्वतःवरची श्रद्धा नव्हे! चूक होते ती नेमकी इथंच!''

''स्वार्थ झाला तरी तो चूक कसा? निसर्गानंच तो विचार मानवाला दिला आहे की नाही?"

''स्वार्थाची जाणीव ही चूक नसेलही, पण या जाणिवेला मर्यादा असावी लागते. एक जीभ या इंद्रियाचंच स्वरूप घे. एखाद्यानं ठरविलं की, जगात अस्तित्वात असलेल्या सर्व रसांचा आस्वाद घ्यायचा! अगदी मनसोक्त! आणि आपल्या इच्छापूर्तीसाठी राक्षसी हव्यासानं तो एकसारखा जीवनभर धावत राहिला, तरी त्याला त्याचं जीवन त्या इच्छापूर्तीसाठी कधी तरी पुरं पडेल काय? कुठल्याही स्वार्थी कल्पनेचं हे असंच आहे. विधात्याचं चोहो दिशांना विखुरलेलं हे अमर्याद जग कधीच आणि कुणालाही एकट्यानं घेऊ म्हटल्यानं कधीतरी कवेत घेता येणं शक्य आहे काय? कारण आदिशक्तीनंच मानवाला सर्व क्षेत्रांत समर्याद केलेलं आहे! राजवाड्याच्या तटाजवळ वाढलेल्या

तृणांकुराला जेवढी राजवाड्याची, तेवढीच मानवाला खऱ्या अर्थानं विश्वाची कल्पना आहे! मानवाच्या बुद्धीची जेमतेम श्रीफलाला पुरेल एवढीशी कव विश्वाला कधीच घेरू शकणार नाही!''

''मग जीवन म्हणजे तरी काय? केवळ एक अपघात?'' मी विषय थोडा बदलला.

''नाही! जीवन म्हणजे जन्ममरणाच्या तासांतून अविरत वाहणारी सरिता! परमात्मारूपी सागराला मिळण्यासाठी आसुसलेली! मुक्तीसाठी तळमळणारी!''

"मुक्ती म्हणजे केवळ वेदनाहीन मृत्यू अशीच मुक्तीबाबत तुझी कल्पना आहे काय?''

''नाही! मुक्ती म्हणजे अविरत अखंड प्रकाश! चैतन्यमय, प्रकाशमय, शरीरहीन, भावहीन अस्तित्व! आत्म्याचा एकच एक असलेला भाव, प्रकाश! जरा डोळसपणे सभोवती पाहशील तर सारं जीवन चराचर प्रकाशासाठी कसं नुसतं कणकणांनी आसुसलेलं आहे, हे पाहून तू दिङ्मूढ होशील. कृमी, कीटक दीपज्योतीवरच का झेपावतात? वनस्पती, लतावेली, तृणांकुर सर्व आपआपलं मुख आकाशाच्या रोखानं उंचावून प्रकाशासाठीच का तळमळतात? कुणालाच हे विसरून चालणार नाही की, जीवनाचा स्थायिभावच प्रकाश आहे!''

''मग हा प्रकाश मानवाला सहजसाध्य का नाही? जीवनाचा हा जर मूळ उद्देश आहे तर तो इतका दुष्प्राप्य का?''

''जीवनाचा उद्देश प्रकाश आहे; पण तो अगदी अंतिम असा उद्देश आहे! तो साध्य होण्यासाठी अनुभूतीची जरुरी आहे. निरनिराळ्या भावविभावांची अनुभूती! विविध अनुभव घेतल्यानंतरही 'मी शोधतो आहे ते हे नव्हे!' असं समजून आल्यानंतर मानव अंती आपल्या अंतरात्म्याकडे वळेल! त्याला तसं वळावंच लागेल! अटळ म्हणून स्वीकारावा लागणारा मानवजातीपुढचा अध्यात्म हाच एकमेव मार्ग राहील!''

''नाही अश्वत्थामन्, काळाचे कितीतरी पट फाडून मी भविष्याचा वेध घेण्यासाठी बुद्धीला ताण दिला आहे, पण तू म्हणतोस तसा मंगल दिन कधीकाळी उगवेल यावर माझाच काय पण कुणाचाच विश्वास बसणार नाही, असं मला वाटतंय. आशा–आकांक्षा उराशी नुसत्या कवटाळून मृगजळामागं धावण्यात काय अर्थ आहे?''

''अजूनही तू संभ्रमातच आहेस, पण त्यात तुझा दोष नाही. मानवी मनच मुळात विचित्र आहे. रथाच्या चक्रासारखं! अनेक आरे असतात या चक्राला! पण खरा चिकित्सक ते आरे ज्या एका विशिष्ट कण्याभोवती फिरतात त्यावरच लक्ष देत असतो! तू म्हणतोस भवितव्याचा वेध घेण्यासाठी काळाचे असंख्य पट फाडून तू पाहिले आहेस! पण प्रश्न असा आहे की, काळाला कधी असे पट खरोखरच असतात काय? की आपण आपल्या सोयीसाठी दिवस, मास, ऋतू आणि वर्षं या कारावासात काळाला निष्फळ कोंडू पाहतो आहोत. मला वाटतं भवितव्य ही मानवानं निर्माण केलेली भयानक भूल आहे! जरा सखोलपणानं विचार करून पाहा! काळाला कधीतरी भूत आणि भविष्य आहे काय? काळ हा अखंड आहे आणि अखंडत्वाची जाणीवच मानवाला खऱ्या अर्थानं निर्भय करू शकेल!'' त्याची दिव्य प्रज्ञा फुलून ओसंडू लागली. बोलत–बोलत आम्ही नगरापासून दूर अर्ध्या एक योजनावर केव्हा आलो याचं आम्हा दोघांनाही भान राहिलं नाही. नगराबाहेरचं विष्णुमंदिर आलं. आल्यासारखं दर्शन तरी घेऊन जावं म्हणून आम्ही मंदिरात प्रवेश केला. संध्याकाळ होत आली होती. गुलाबी वर्णाच्या पश्चिम

क्षितिजाच्या पार्श्वभूमीवर उंचावरून काही सारंग पक्षी कलकलाट करीत घरकुलाकडे परतत होते.

दर्शन घेऊन आम्ही मंदिराबाहेर आलो. अश्वत्थाम्यानं दिलेल्या गाभाऱ्यातल्या घंटेच्या टोलाचे मागं रेंगाळणारे काही गूढरम्य मधुर स्वर माझ्या कानांत घुमत होते!

मंदिराबाहेर येताच वर पाहत त्यानं कळसाच्या रोखानं आपली अंगुली उंचावली, "ते पाहिलंस काय?" निश्चल उभा राहून त्यानं विचारलं.

"हो. मावळतीच्या किरणांत कळसावरचा सुवर्णकुंभ फारच आकर्षकपणे तळपतो आहे."

"छे! कळसावरच्या सुवर्णकुंभाबद्दल नव्हे! त्याखाली मंदिराच्या माथ्यावर पाषाणाच्या निरुंद फटीत नुकतंच उगवलेलं ते पिप्पलाचं रोपटं बघ!"

"काय आहे उपयोग त्याचा?"

"उपयोग? तुझ्या दृष्टीनं नाही; पण माझ्या दृष्टीनं खूपच आहे. आपली लुसलुशीत लाल पानं हलवून ते सांगत आहे की, या पाषाणांच्या माथ्यावर पाय देऊनही मला जगायचं आहे! वायूबरोबर डुलायचं आहे! प्रतिकूलतेच्या पाषाणाला एक साधंसं रोपटंसुद्धा निसर्गात शरण जायला तयार नाही! आणि मानव मात्र...."

बोलता–बोलता तो मध्येच थांबला. आम्ही नगराकडे परतलो. मार्गातच त्याची पर्णकुटी असलेली युद्धशाला आली. माझा हात आपल्या हाती प्रेमानं घेऊन तो क्षणभर थोपटत म्हणाला, "राधेया, विसरून जा मी सांगितलेलं सर्व. मी जसा कुणी ब्रह्मज्ञ नाही, तसाच जीवनाच्या गूढ अंगांचा विचार करण्यासाठी तुझाही जन्म नाही. तुझा जन्म कृतीसाठी आहे! कारण जीवनाची जी वाटचाल तू केली आहेस ती केवळ दिपविणाऱ्या कृतींनीच भरलेली आहे." माझा हात सोडून तो युद्धशालेच्या महाद्वाराच्या पुरुषभर उंचीच्या पोटद्वारातून आत गेला. ते ठेंगणं पोटद्वार ओलांडताना त्याच्या शिरावरच्या वस्त्राचा द्वाराच्या महिरपीला ओझरता स्पर्श झाला. क्षणातच तो द्वारामागं अदृश्यही झाला. किती सखोल अभ्यास होता त्याचा! अगदी सहज तो जीवनाची अनेक अंगं मला वेळोवेळी उकलून सांगत होता, तो जाता–जाता म्हणाला, "तुझा जन्म केवळ कृतीसाठी आहे."

तसा प्रत्येकाचाच जन्म कृतीसाठीच असतो. तरीही जो–तो आपल्या परीनं जीवनाचा अर्थ लावण्यात गढलेला असतो.

मी परतलो. राजवाड्याच्या प्राकारातून आत शिरताना अश्वशालेत बाबा घोड्यांना खाद्य देणाऱ्या सेवकांना काही सूचना करीत असलेले दिसले. वार्धक्यामुळे आता त्यांचं शरीर जर्जर झालं होतं. अंगकाठी वाकली होती, पण मनाची उभारी अजूनही तशीच होती. मी त्यांना कितीतरी वेळा आवर्जून सांगितलं होतं की, "आता तुम्ही विश्रांती घ्या." पण त्यांचं एक उत्तर ठरलेलं होतं. "वसू, शरीर थकलं तरी माणसाचं मन कधीच थकत नाही. त्याला काही ना काही उद्योग हवाच असतो."

त्यांनी सांगितलेल्या या आणि अशाच मौलिक विचारांनी माझं जीवन घडलेलं होतं. त्यांच्याच अपार कष्टांनी माझ्या जीवनाच्या पर्णकुटीचं एका भव्य राजवास्तूत रूपांतर झालं होतं. माझ्या माहितीप्रमाणं निखिल आर्यावर्तातील मी पहिलाच असा सूतपुत्र होतो की, ज्याच्या मस्तकावर सुवर्णकिरीट चढविला गेला होता आणि त्याचं एकमेव श्रेय माझ्या मातापित्यांना होतं. संपत्ती, कीर्ती, कुटुंबसौख्य, पुत्रसौख्य सर्व–

सर्व माझ्या चरणांशी लोळण घेत होतं, पण त्या सर्वांपेक्षाही मातापित्यांची इतकी दीर्घकाल मिळालेली वत्सलतेची छाया मला अधिक सुखवीत आली होती. वाडयावरचे सर्व जण राधामातेला राजमाता म्हणत होते. वृषाली माझ्यावरच्या प्रेमानं भारावून ते ऐकताना मला म्हणत होती की, ''तुमच्यामुळेच त्यांना सर्व जण राजमाता म्हणतात.'' पण तिला वेडीला काय कल्पना होती की, माझ्या मातेमुळेच मला सर्व जण 'कर्ण' म्हणत होते. 'अंगराज' म्हणत होते – 'महाराज' म्हणत होते!

म्हणूनच पुढं होऊन मी अश्वशालेत गेलो. मस्तक नमवून मृदू स्वरात म्हणालो, ''बाबा, आपण इथं येण्याचे कष्ट कशाला घेतलेत? सेवक ही कामं प्रामाणिकपणानं करताहेत – शिवाय संजयकाका आहेत त्यांच्यावर देखरेख करायला.''

डुगडुगणारी मान सावरीत ते म्हणाले, ''कोण वसू? पुत्रा, जन्मभराच्या सवयी इतक्या सहज कुणालाच सोडता येत नाहीत. तू सोडशील काय हातातील धनुष्यबाण! वाडयावर जीव रमत नाही. घोडयांत राहिलो, घोडयांत वाढलो. त्यांचं फुरफुरणं हेच माझं संगीत! इथं बघ किती प्रकारचे घोडे आहेत! त्यांच्याकडे नुसतं बघितलं तरी समाधान वाटतं मला.''

''पण... आता संध्याकाल झाला आहे. आता आपल्या कक्षाकडे चला. मीही वरच चाललो आहे.''

''चल.'' त्यांनी आपला हात माझ्या हाती दिला. माझ्या हाताचा आधार घेत ते चालू लागले. त्यांची करता येईल तेवढी सेवा करणं, हे ज्येष्ठपुत्र या नात्यानं माझं पहिलं कर्तव्य आहे. माझ्या खांद्यावर भार देत एक-एक अशी राजवाडयाची पायदंडी ते हळूहळू चढू लागले. मी हस्तिनापुरात आलो त्या पहिल्याच दिवशी त्यांच्या हाताचा आधार घेऊन या पायदंडया चढलो होतो. आज ते माझ्या खांद्याचा आधार घेऊन त्या चढत होते.

**

# एकोणीस

बाबांना त्यांच्या कक्षात पोहोचविण्यासाठी गेलो. तिथं राधामातेभोवती कथा ऐकत असलेल्या सुषेण, वृषकेतु, सुशर्मा, मीनाक्षी यांनी मला पाहताच आनंदानं एकच गलका केला. सर्वांत लहान वृषकेतु तर धावत येऊन माझ्या पायांनाच बिलगला. इतर सर्वांना आता पूर्ण समजूत आली होती. वयं लहान असूनही ते माझे पुत्र आता शरीरानं थोराड दिसत होते. जेवढी भीती, जेवढा आदर तेवढंच प्रेम त्या सर्वांना माझ्याबद्दल वाटत होतं.

वृषकेतूच्या मस्तकावर तळहातानं थोपटत मी म्हणालो, "तू केव्हा मोठा होणार यांच्यासारखा!"

"आम्ही छोतेच लहानाल!" तो बोबड्या स्वरात म्हणाला.

"का रे?"

"मोत्यांना महामातेला नमत्काल कलावा लागतो. मी मात्ल तिच्या मांडीवल बसतो!"

त्याचे छोटेपणाचे लाभ गमतीदार होते. त्याला उचलून त्याच्या मस्तकाचं प्रेमानं मी अवघ्राण केलं. त्या अल्लडानंही माझी कुंडलं दोन्ही हातांनी नित्यासारखी घुसळली. राधामातेला अभिवादन करून मी तेथून निघालो. नातवंडांत रमलेल्या मातेला पाहिलं की, धन्यतेचे रोमांच माझ्या अंगावर उभे राहत.

मी माझ्या कक्षात आलो. पाकशालेत भोजनाची तयारी करण्यात गुंतलेल्या वृषालीला माझ्या आगमनाची कल्पना मृणालनं दिली असावी. तशा पाकशालेत अन्न शिजविण्यासाठी अनेक स्त्रीसेविका होत्या. तरीही माझ्या आवडीचे अपूप, खांतोळी असे खास अन्नपदार्थ वृषाली स्वत: पाकशालेत बसून तयार करवून घेई. मृणालनं सांगताच ती लगबगीनं कक्षात आली. मी मस्तकावरून उतरून हाती धरलेला किरीट पुढं होऊन आपल्या हाती घेत म्हणाली, "आज एवढा वेळ सभेचं कामकाज चाललं होतं की काय?"

"नाही वृषाली... गुरुपुत्रासमवेत आज पायीच नगराबाहेर फटका मारून आलो." अश्वत्थाम्याचं नाव ऐकताच तिची प्रश्नावली थांबली. हातातील किरीट तिनं हळुवारपणे लाकडी बैठकीत ठेवला.

भोजनाची तबकं मांडल्याचं आम्हाला सांगून मृणाल बाबांना बोलविण्यासाठी निघून गेली. त्यांचा हात धरून ती त्यांना हळुवारपणे घेऊन आली. त्यांच्या मागोमाग वृषसेन, प्रसेन, भानुसेन, सुशर्मा, सुषेण, चित्रसेन सर्वच आले. गेली चौदा वर्षं हे असंच नित्यानं घडत आलं होतं. आम्ही सर्व पुरुषमंडळी एकत्र बसून भोजन घेत होतो. बाबांनी पहिला घास घेतला की, मगच सर्व जण सुरुवात करीत. आमच्यानंतर स्त्रियांची पंगत बसे. त्याही राधामातेनं पहिला घास घेतल्याशिवाय अन्नाला स्पर्श करीत नसत.

वृषाली रोज निरनिराळे अन्नपदार्थ तयार करवून घेई. भोजनाच्या प्रसंगी सर्व जण तिची मुक्तकंठानं स्तुती करीत. कधी ती अपूप, परिवाप, पक्ती, क्षीरौदन असे पदार्थ

करवून घेई. कधी–कधी गोरसात तयार केलेला प्लाशुक, मुगदौदन असे. याशिवाय आमिक्षा, दधी, नवनीत, पयस्य, पीयुष, फाष्ट असे गायीच्या दुधाचे विविध पदार्थ असत. मला अपूप आणि नवनीत हे पदार्थ फारच आवडत. वारंवार ते भोजनात असले की, शोण माझ्याकडे तिरकस दृष्टीनं पाहून वृषालीला म्हणे, ''वहिनी, हे अपूप आता वारंवार खाल्ल्यामुळे आम्हालाही आवडायला लागलेत! आता ते खऱ्या रसिकाच्या वाट्याला कमीच येणार!'' मग दुसऱ्या दिवशी भोजनात शोणाचा आवडता पदार्थ क्षीरौदन नेमका असायचा. कधी–कधी माळढोक पक्षयाच्या चवदार मांसाचा रस्साही असायचा.

''सत्यसेन कुठं आहे?'' तो पंक्तीत दिसेना म्हणून मी विचारलं. त्याच्या पत्नीनं पुष्पा वतीनं मान खाली घालून सांगितलं, ''कुरूंचा एक महत्त्वाचा संदेश घेऊन मद्रदेशाच्या राजनगराला – शाकलनगराला निघून जाणं झालंय.'' मद्रराज शल्याची गाठ घेऊन परतायला त्याला चांगले आठ दिवस लागणार होते. आता आठ दिवस पंक्तीत त्याचं पात्र मांडलं जाणार होतं आणि नंतर त्याचं भोजन तसंच गायीला देण्यात येणार होतं!

पण माझं मन भोजनाकडे नव्हतं. इतर सर्व जण चवीनं खाद्यपदार्थ संपवीत होते. एकट्या शोणालाच मी नित्यासारखा नाही हे जाणवलं. तो वृषालीला म्हणालाही, ''वहिनी, पुत्रप्राप्तीनंतर स्त्रियांचं पतीवरचं प्रेम कमी होतं, असं सर्व जण म्हणतात ते काही खोटं नाही. नाहीतर दादा आज कसा भोजन घेतो आहे हे कळलं असतं तुम्हाला!''

''नाही शोणा, तिचा काहीच दोष नाही.'' मी त्याला थांबवीत म्हणालो.

''का वसू, आज तुझे आवडते पदार्थ असतानाही तू ते चवीनं खात नाहीस?'' बाबांनी शेवटी विचारलंच.

''नाही तात, एका महत्त्वाच्या प्रश्नावर विचार करतोय. तुम्हालाही तो ऐकून आश्चर्य वाटेल.''

''कोणता प्रश्न?''

''सहाव्या पांडवाचा! तुम्हाला हे माहीत आहे काय की पांडव पाच नाहीत, सहा आहेत!'' सागपर्णावर शिरा असतात तशा दाट सुरकुत्या असलेल्या त्यांच्या कपाळाकडे पाहत मी त्यांना विचारलं. उत्तरासाठी म्हणून ते तोंडातील घास गिळून बोलायला लागले, पण त्यांना ठसका लागला! त्यांच्या डोळ्यांत टचकन पाणी उभं राहिलं. वृषालीनं लगबगीनं पुढं होत पाण्याचा चषक त्यांच्या ओठाशी नेला. पाण्याचा एक घोट घेताच त्यांचा कंठ स्वच्छ झाला.

''तुला कुणी सांगितलं हे?'' थरथरणाऱ्या आवाजात त्यांनी विचारलं.

''मला एकट्यालाच नव्हे. सगळ्या सभागृहाला पितामहांनी आज ते सांगितलं!''

''पितामहांनी! मग ते सत्यही असेल. पांडव पाच नसतीलही.''

''इतकंच नाही; पण कौरव किंवा पांडव कुणीच कुरुकुलातील नाहीत, असंही त्यांनी आज सांगितलं. त्यांच्या त्या सांगण्यानं राजसिंहासन हा आता खरोखरच दंडाच्या सामर्थ्यावर सोडविण्याचा प्रश्न झाला आहे.''

''वसू, पितामहांनी सांगितलं त्याअर्थी तेही खरं असलंच पाहिजे. आणखी एक सत्य आज पहिल्यानं तुला मी सांगून टाकणार आहे. कारण आखाड्यात तुला सर्वांनी छेडलेलं मी मुकाटपणं पाहिलं आहे.'' ते क्षणभर थांबले. त्यांचे उद्गार ऐकून मी कानांची प्रत्यंचा ताणली.

“वसू, सूतपुत्र म्हणून सर्वांनी तुझी हेटाळणी केली आणि तू म्हणूनच धैर्यानं त्या सर्वांना तोंड दिलंस. आज राजवाड्यावर महामंत्री म्हणून विदुरांना किती मोठा मान आहे! त्यांचा शब्द कधीच खाली पडत नाही.”

त्यांची ती दोन वाक्यं मला असंबद्ध वाटली; पण मी म्हणालो, “होय तात... पण तेही कुरुकुलातील नाहीत, असं स्वत: पितामहांनी सांगितलं. ते म्हणाले, ‘आज हस्तिनापुरात कुरुराजाच्या वंशातील मी स्वत: एकटा शेवटचा वंशज आहे.’”

“नाही वसू! महामंत्री विदुर हे दासीपुत्र आहेत हे खरं, पण पितामह एकटेच शेवटचे कुरू आहेत हे संपूर्ण सत्य नाही! आणखी एक कुरूचं रक्त धमन्यांत वागविणारा कुरू या हस्तिनापुरात आहे – पण सामाजिक रूढीनं तो सामान्यच राहिला आहे!”

“कोणता? आणखी कोणता शेवटचा कुरू आहे?” मी आश्चर्यानं भुवया उंचावून विचारलं.

वृषालीनं ठेवलेला चषक उचलून पाण्याचा एक घोट घेत ते घोगऱ्या आवाजात म्हणाले, “मी!!”

“तुम्ही?”

“होय! माझा पिता सत्कर्मा हा दिग्विजयी कुरू ययाती यांचा वंशज होता. पण – पण मातेकडून तो सारथी होता. या नगरात दासीपुत्र विदुरांना महामंत्रिपद मिळू शकलं... पण... ययातिवंशज अधिरथाला मात्र अश्वशालाच मिळाली. वसू! हे सत्य आहे! मी स्वत:ला धन्य मानतो ते केवळ तुला अंगराज झालेला पाहून!” जरा थांबून त्यांनी परत एक पाण्याचा घोट घेतला. जीवनभर जतन केलेलं आपलं जन्मरहस्य त्यांनी मला समाधान वाटावं म्हणून सांगितलं.

मी तसाच जेवणावरून उठलो. आपण ययाती महाराजांचे वंशज आहोत, हे सत्य माझ्या मनाला कुठंतरी सुखवीत होतं, पण त्यानं उफाळून जाण्याइतका आनंद काही मला वाटत नव्हता! कोणत्याही आश्चर्यकारक घटनेनं उफाळून जाण्याइतकं आता माझं मन भाबडं राहिलं नव्हतं.

हात प्रक्षालून शयनगृहात मंचकावर कलंडलो. अश्वत्थाम्यानं सहज व्यक्त केलेल्या एका विचारावर माझं मन परत–परत स्थिरावत होतं. पिप्पलाचं रोप दगडी भेगेतसुद्धा जोमानं वाढलेलं पाहताना तो म्हणाला, “पाषाणाच्या प्रतिकूल माथ्यावर पाय रोवून ते रोप जणू म्हणतंय, ‘मला जगायचं आहे, वायुलहरींवर डोलायचं आहे.”

मीही माझ्यासमोर त्या रोपट्याचा आदर्श ठेवायचं ठरवून टाकलं. परिस्थितीची रडगाणी गाण्यात काहीच अर्थ नव्हता.

**

# वीस

अश्वत्थाम्याच्या जीवनविषयक तत्त्वज्ञानाचा मी रात्रभर खूप विचार केला. त्याचं तत्त्वज्ञान ऐकायला फारच मधुर होतं, पण जगातले किती लोक तत्त्वज्ञानावर जगत असतात? कुणाचाही चांगुलपणा ही जगाला हवी असणारी गोष्ट असते, पण स्वत:चा चांगुलपणा मात्र जग कुणालाच द्यायला तयार नसतं! मी माझ्या सर्व जीवनभर हे अनुभवलं होतं. पांडव वनवासाला निघून गेले होते. ते धार्मिक यात्रा करून पुण्य गाठीशी बांधण्यासाठी गेले नव्हते. तेरा वर्षांनंतर झाले तरी ते परतणारच होते. ते डिवचले गेलेले पाच भुजंग होते. तेरा वर्षं अरण्यात लपून ते कधीतरी प्रकट होऊन दुर्योधनाबरोबर कर्णाच्याही पायाला डंख मारणार होते. ते अरण्यात गेले आहेत म्हणून मी स्वस्थ बसलो असतो, तर उद्या तो एक महान मूर्खपणा ठरणार होता. जीवनकलहात आधी कुणाचं वैर निर्माण होऊ नये आणि झाल्यानंतर मात्र ते धुमसत राहू नये. त्याचा कधीतरी समूळ निचरा व्हावाच लागतो. कर्ण किंवा पांडव हा एकच पर्याय मला मान्य होता. पांडवांच्या भीतीचं सदैव टांगतं खड्ग मला दुर्योधनाच्या मस्तकावर ठेवायचं नव्हतं. पितामह गर्जून सांगत होते की, राज्याचा अर्धा हिस्सा पांडवांना द्या. मला त्यांची कल्पना मुळीच मान्य नव्हती. राज्य अखंड राहिलं पाहिजे! मग ते कौरवांचं असो वा पांडवांचं. ज्या वेळी पुढं येऊन काही करायला पाहिजे होतं त्या वेळी पितामह स्वस्थ बसले होते आणि आज पांडवांच्या कंठाला तात लागणार हे समजून येताच त्यांच्या प्रेमानं विव्हल होऊन बोलले होते. सभागृहातल्या सर्व सभासदांचा उत्साह त्यांनी मारून टाकला होता, पण कर्ण हा त्यांच्या शब्दफेकीच्या भृशुंडीत कधीच असा फसणार नव्हता. सभागृहातील कोणी एकही योद्धा समवेत आला नसता तरी त्याची पर्वा न करता मी पांडवांच्या विरुद्ध आता वाटचाल करणार होतो. ते पाच वीर कसे आहेत ते मला एकदा बघायचंच होतं. माझा निर्धार दुर्योधनाच्या कानावर घालायची संधी मी पाहत होतो, पण तो राजवाड्यावर एकटा कधीच भेटत नव्हता. शकुनीमामा, दु:शासन, प्रभंजन, अमात्य, युवराज्ञी भानुमती, राजकन्या दु:शलादेवी, सभागृहातील अन्य कुरुयोद्धे यांपैकी कुणामध्ये तरी तो सदा घेरलेला असे. जे बोलायचं होतं ते मला एकांतात बोलायला मिळत नव्हतं.

त्याला एकांतात भेटण्याची शक्यता एकाच मृगयेसारख्या कल्पनेनं जमणारी होती. म्हणून शोणाकडून मी त्याला वारणावताच्या अरण्यात मृगयेला जाण्याचा माझा मनोदय कळविला. त्यालाही ती कल्पना आवडली.

दोन–तीन दिवसांत आम्ही मृगयेसाठी राजवाड्याबाहेर पडणार होतो. गंगा आणि इक्षुमती ह्या दोन्ही नद्या ओलांडून इंद्रप्रस्थाच्या सीमेवर असलेल्या वारणावताच्या घनदाट अरण्यात आम्हाला जायचं होतं. जो कोणी राजवाड्यावरून मृगयेसाठी कधी बाहेर पडेल त्यानं काही ना काही मृगया आणल्याशिवाय राजवाड्याकडे कधी परतायचं नाही अशी पूर्वापार चालत आलेली प्रथा होती. काही–काही योद्धयांना या प्रथेचं पालन करण्यासाठी मृगयेच्या शोधात एक-एक महिना अरण्यातच वणवण भटकावं

लागलं होतं!

**

# एकवीस

आम्ही केवळ मृगयेसाठी बाहेर पडलो नव्हतो. मला दुर्योधनाशी पूर्ण एकांतात बोलायचंही होतं. आम्ही केवळ पन्नास एक निष्णात अश्वसाद बरोबर घेतले होते तेवढेच. शोणालाही त्या मृगयेसाठी मी टाळलं होतं!

रणरणतं ऊन माथ्यावर घेऊन भर दोन प्रहरी आमची हस्तिदंती वर्णाची पांढरी घोडी माना तिरप्या करीत नगराच्या मार्गावरून धावू लागली. वैशाखाच्या उष्णतेनं कासावीस झालेले नगरजन द्वाराची कवाडं अर्धवट बंद करून आपापल्या निवासांत विसावल्यामुळे एवढ्या प्रशस्त मार्गावर एकही नगरजन कुठं वावरताना दिसत नव्हता. आम्ही कुठं आणि कशासाठी निघालो होतो, हे राजवाड्यावरही एकट्या सेनापतीशिवाय अन्य कुणालाच माहीत नव्हतं. प्रत्यक्ष आमच्या समवेत जाणाऱ्या अश्वसादांनासुद्धा त्याची नीटशी कल्पना नव्हती. एक मार्गदर्शक अश्वसाद आमच्यापुढं धावत होता. इतर सर्व, वेग आखडत आमच्या मागोमाग थोडं अंतर ठेवून दौडत होते.

एरवी तुडुंब भरलेलं असणारं गंगेचं विशाल पात्र ग्रीष्माच्या माऱ्यानं जागजागी कृश होऊन खळखळत होतं. आम्ही ते पार केलं. तिच्या रोडावलेल्या पात्रात आपल्या पांढऱ्याशुभ्र शरीरांच्या प्रतिबिंबाची एक निमुटती रेषा रेखाटत, पाणी उधळत, आमच्या घोड्यांनी ते ओलांडलं. पुढची इक्षुमतीही मागं पडली. इंद्रप्रस्थाच्या आणि हस्तिनापूरच्या सीमा जिथं भिडल्या होत्या ते वारणावताचं किर्र्र दाटलेलं अरण्य आता लागलं.

वारणावताच्या सीमेत घुसताच अश्वसाद पूर्वी ठरल्याप्रमाणं चोहो दिशांना पांगले. हातातील भाले सरसावून, मोठमोठ्यानं हाकारत वेढा देऊन ते आता सगळं अरण्य हादरून सोडणार होते. त्यांच्या कलकलाटानं बुजलेली हरणं आवाजाच्या विरुद्ध दिशेनं उंच–उंच उड्या मारीत उधळणार होती. एका टेकडीवर बसून समोरच्या पठारावरून धावणारी ती भेदरलेली हरणं आम्ही बाणानं अचूक टिपणार होतो. माऱ्याची टेकडीवरची जागा घेताच चोहोबाजूंच्या हाका घालणाऱ्या अश्वसादांना संकेतासाठी म्हणून – ज्यांच्या शेपटांना खुळखुळणारे घुंगरू बांधले आहेत असे – चार जिद्म बाण मी चोहो दिशांना सोडायचे आणि मग हाकाऱ्यांनी एकदम हाकारा सुरू करायचा असं ठरलं होतं.

एक कुरण माजलेल्या टेकडीवरची जागा आम्ही माऱ्यासाठी निवडली. समोर हिरव्यागार गवताचं एक प्रशस्त पठार होतं. सर्व ठीकठाक होताच एक-एक बाण धनुष्यावर चढवून, वीरासन घालून मी ते चारही बाण चोहो दिशांना फेकले. 'सूँऽऽ खळऽ खळऽ सूँऽऽ' असा आवाज करीत ते अरण्याच्या चारही दिशांना वळवळत धावले. पांगलेल्या अश्वसादांना संकेत मिळाला. आरडाओरडा करीत, हाकारा पिटीत ते अरण्यातल्या सर्व श्वापदांना आपली निवाऱ्याची थंड ठिकाणं सोडायला भाग पाडू लागले. सगळं अरण्य रुग्ण माणसासारखं कण्हू लागलं. चित्रविचित्र आवाज एकमेकांत मिसळून गेले. सारंग, चित्ररथ, क्रौंच, कपोत, श्येन, कोकीळ, पत्ररथ अशा विविध

पक्षयांचे थवेच्या थवे अरण्याबाहेर जाण्यासाठी चीत्कारत झेपावताना आम्हाला टेकडीवरून दिसू लागले. थोडचा वेळातच चींऽऽ चींऽऽ करीत अवजड शरीरं सावरीत एक भलामोठा हत्तींचा कळप आकस्मिक पठारावरच्या कुरणात आला.

आम्ही दोघं टेकडीच्या गवतावर वीरासन घालून, धनुष्याची प्रत्यंचा ताणून तयारच होतो. कळपातील एका थोराड हत्तीचा वेध घेऊन त्याला टिपण्यासाठी दुर्योधन हातांतील धनुष्य हत्तीच्या हालचालींबरोबर फिरवू लागला, पण मी त्याला हातानं खुणावून थांबविलं. हत्ती मारून काहीच लाभ नव्हता! तो वाहून नेण्यासाठी पुरेसे सेवक आम्ही समवेत आणलेले नव्हते. डोंगराळ भागातील नदीचं पात्र वळणं घेत जातं तसा तो कळप चीत्कारत, सोंडांची अनिर्बंध हालचाल करीत पठार ओलांडून, एकमेकांना अंग घासत तसाच निघून गेला.

थोडचाच वेळात अरण्याच्या दाट झाडीतून एक चाळीस–पन्नास हरणांचा कळप उंचावरून कोसळणाऱ्या धबधब्याच्या पाण्याचे तुषार एका लयीत उफाळत राहतात, तशा लयबद्ध उडचा घेत पठारावरून धावू लागला! धनुष्यं घेतलेले आमचे हात त्यांच्या मर्मस्थानांचा वेध घेत त्यांच्या धावेबरोबर फिरू लागले. कळप आणि आमचं आसन यांतील अंतराचा विचार करून वेध घेतलेल्या हरणाच्या गतीला अचूक गाठील, अशी बाणाची गती ठेवून थोडासा तोंडाच्याही पुढं बाण सोडायला पाहिजे होता.

‘सूँऽऽ! सूँऽऽ!’ आम्हा दोघांच्याही धनुष्यांतून एकसारखे बाण सुटायला सुरुवात झाली. औदुंबराच्या वृक्षावरून पक्व फलं वाऱ्याच्या झोताबरोबर टपटप खाली पडतात तशी अनेक हरणं उरात बाण घेऊन कुरणात पडू लागली. उरलेल्या हरणांचा कळप आपल्या साथीदारांकडे वळूनही न पाहता उडचा घेत कुरण ओलांडून निघून गेला. मृगया झाली होती. आम्ही समाधानाचा नि:श्वास सोडला.

‘‘किती बाण फेकलेस तू?’’ दुर्योधनानं माझ्याकडे पाहत विचारलं.

‘‘सहा! तू किती?’’ पठाराकडे पाहत मी विचारलं.

“पाच!” त्यानंही कुरणाकडे पाहत उत्तर दिलं.

‘‘मग कुरणात अकरा हरणं सापडायला पाहिजेत. नाहीतर पाच हरणांच्या अंगात दोन–दोन आणि एका हरणाच्या अंगात एक बाण तरी असायला पाहिजे.’’ मी वीरासन मोडून वर उठत म्हणालो.

‘‘होय. चल बघू या.’’ तोही आपलं वीरासन मोडून वर उठू लागला, पण तो पुरता वर उठूच शकला नाही. एकाएकीच “कर्णाऽऽऽ!” अशी हृदयभेदक किंकाळी फोडून, पर्वताचा कडा कोसळतो तसा पायतळीच्या गवतात तो सरळ खाली कोसळला! क्षणापूर्वी रसाळपणे मृगयेची चर्चा करणाऱ्या त्या गदावीराला क्षणात असा टाहो फोडायला काय झालं ते न समजल्यामुळे घाबरून खाली वाकून त्याला वर उठविण्यासाठी मी त्याच्या काखेत हात घातला... पण समोरचं दृश्य पाहताच माझ्याही काळजात धस्स झालं! मृगयेच्या नादात स्वत:ला विसरलेल्या दुर्योधनाचा, वीरासनात गुडघा टेकलेल्या डाव्या पायाचा मागचा भाग कुरणात लपलेल्या एका लांबलचक अजस्त्र अजगरानं घोटचापर्यंत गिळला होता! पायातल्या कातडी चढावामुळे त्याच्या जबडचाचा स्पर्शही दुर्योधनाला जाणवला नव्हता. वीरासन मोडून वर उठताना त्याच्या पायांची हालचाल झाल्यामुळे भक्षय हातचं जाणार या कल्पनेनं त्या लांब प्राण्यानं आपला शेपटाकडचा भागही क्षणार्धात उंचावून दुर्योधनाच्या सर्वांगाभोवती वेळखटून टाकला. हस्तिनापूरचा

उद्याचा सम्राट एका अजगरानं सशाच्या पिल्लासारखा आपल्या कवेत कवटाळून टाकला होता! मस्तकावरचा मुकुट कुरणातल्या धुळीत पडला होता. पाण्याबाहेरच्या माशासारखा उमाळ्या घेत दुर्योधन सुटण्यासाठी धडपडत होता, पण त्याच्या प्रत्येक धडपडीबरोबर तो प्राणी चवताळून त्याला आणखी अधिकच वेळखटत होता. ते दोघे गवतावर गडबडा लोळत होते. किळसवाण्या मृत्यूच्या भयाण जाणिवेनं दुर्योधन ''कर्णऽऽऽ कर्णऽऽऽ'' असा माझ्या नावानं आक्रोशत हातातील बाणाचं पातं, आपल्या पायात ते चुकून घुसेल याचीही पर्वा न करता सपासप त्या प्राण्याच्या विळख्यावर दातओठ खात खुपसू लागला! क्षणात दुर्योधन – क्षणात ते प्रचंड धूड असं ते द्वंद्व दिसत होतं. विचित्र! शहारे आणणारं! पाय झटकत हातांनी त्या ओलसर प्राण्याचे मृत्यूच्या फासासारखे विळखे सोडविण्यासाठी दुर्योधन आकांत करू लागला. त्याच्या धडपडीत क्षणार्धात पायांखालचं गवत उद्ध्वस्त झालं आणि एवढा मोठा सामर्थ्यशाली गदावीर त्या प्राण्यानं माझ्या डोळ्यांदेखत पातं लवतं न लवतं तो लाकडाच्या मोळीसारखा आपल्या विळख्यांनी घट्ट बांधून टाकला. "कर्णाऽऽ!" जिवाची आशा सोडून दुर्योधन गगनाला भेदून जाईल इतकी हृदय फोडणारी अशी निर्वाणीची किंकाळी फोडून, एकदा सर्व शक्तीनिशी आपलं अंग झटकून मूर्च्छित झाला!

आता मला थांबता येणं शक्यच नव्हतं. पण काय करणार होतो मी? कुणालाही काही चटकन सुचावं इतका तो प्रसंग साधा होता काय? दिङ्मूढ होऊन मी त्या धूडाकडे पाहिलं. नुसती वळवळ होती! भक्षयासाठी तळमळणारी! माझ्या हातांत, उरलेल्या बाणांशिवाय काहीच शस्त्र नव्हतं आणि असतं तरी त्याचा काय उपयोग झाला असता? त्या विळख्यांच्या आत गुरफटलेल्या दुर्योधनाला सुरक्षित ठेवून शस्त्र कसं आणि कुणाला चालविता आलं असतं? चिवट कातडीच्या त्या भयाण सर्पावर ते चालू शकलं असतं काय? मला काहीच सुचेना. मस्तक गच्च धरून तसाच एका पाषाणावर क्षणभर काय करावं, याचा विचार करीत मटकन खाली बसलो. संध्यासमय होत आल्यानं प्रत्येक क्षणन्क्षण अत्यंत महत्त्वाचा होता. ज्यानं मला वैभवाच्या शिखरावर चढविलं होतं त्या माझ्या प्राणप्रिय मित्राच्या जीवनमरणाचा प्रश्न होता! संध्याकाळ व्हायला किती अवसर आहे, याचा कानोसा घेण्यासाठी मी पश्चिम क्षितिजावर दृष्टी फेकली... दोन पर्वतशिखरांच्यामध्ये सूर्यनारायण आपली अक्षय अखंड किरणं पृथ्वीच्या माथ्यावर ओतत उभे होते! माझ्या सर्वांगात एक अनामिक शिरशिरी तरळून गेली. अननभूत! अवर्णनीय! अनाकलनीय!

काहीही विचार न करता पाषाणावरून ताडकन उठलो. पुढं होऊन हातातील धनुष्य दूर फेकून मी ते धूड दुर्योधनासकट उचलून सरळ खांद्यावर घेतलं! त्या ओलसर प्राण्याचा स्पर्श म्हणजे साक्षात मृत्यू होता! छे! मृत्यू किती विविध रूपं घेऊन जीवनाच्या मागं हात धुऊन लागलेला असतो! ते जन्ममरणाचं द्वंद्व खांद्यावर घेऊन मावळतीच्या किरणांत ती उंच टेकडी स्वत:चा तोल सावरीत उतरू लागलो. मस्तकात विचारांचा कल्लोळ होता. या बिकट अवस्थेतून दुर्योधन वाचला नाही तर? माझ्या आणि हस्तिनापूरच्या भवितव्यात काय उरणार? काही सुचत नव्हतं, तरीही निधारानं मी पठाराची वाटचाल करीत होतो. कसंही करून त्यांच्यापर्यंत पोहोचणं भागच होतं म्हणून दोन प्रचंड शिळांच्या भाराइतकं अवजड आणि विचित्र दिसणारं ते धूड खांद्यावर घेऊन मी झपाझप पावलं उचलीत होतो. माझं सगळं जीवनच अशा कठोर परीक्षा घेणाऱ्या

बिकट प्रसंगांतून धावत आलं होतं. त्या सर्व प्रसंगांत हा प्रसंग मला विशेष थरकविणारा होता.

मी खांद्यावर काहीतरी घेऊन येतो आहे हे पाहून, ती काहीतरी मोठी मृगयाच असावी या कल्पनेनं कुरणातले सर्व अश्वसाद एकत्र होऊन, हात उंचावून आनंदानं संकेताच्या आरोळ्या मारू लागले, पण मी जसाजसा त्यांच्या जवळ जाऊ लागलो तसतसे डोळे विस्फारून ते पाषाणाच्या मूर्तींसारखे निश्चलपणे माझ्याकडं पाहू लागले. त्यांतल्या अर्ध्याअधिकांनी तरी मला मनोमन मूर्खातच काढलं असावं. माझ्या डोक्यात विचारांचं थैमान होतं. 'दुर्योधनाला कसं वाचवावं?'

त्या सर्वांजवळ येताच गुडघे टेकून ते धूड मी खालच्या गवतात टाकलं. अधरीयाच्या टोकानं कपाळावरचा घाम टिपत त्याच्याकडे पाहिलं. विळख्यांच्या मरणप्राय यातनांनी मूर्च्छित झालेल्या दुर्योधनाचं शिर तेवढंच विळख्याबाहेर होतं. लाकडी ओंडक्यासारखा तो निश्चेष्ट पडला होता. विळखा वळवळत होता! क्षणाक्षणाला अधिकच आवळला जात होता. डोळे विस्फारून मी सर्व अश्वसादांवर मोठ्यानं ओरडलो, "पाहताय काय असं भेकडासारखं? हस्तिनापूरच्या राजाला अजगरानं गिळला, हे ऐकताच राजवाड्यावरचे सर्व लोक तुमच्या तोंडावर थुंकून, तुमचं मुंडन करून गर्दभावरून नगरात धिंड काढतील तुमची! धरा त्या क्रूर प्राण्याला आणि उचकटा त्याचे राजाभोवतीचे विळखे!"

ते चाळीस-पन्नास अश्वसाद त्या शब्दाघातानं चेतावले. पुढं सरसावून त्या दहा-दहा जणांनी महत्प्रयासानं त्या विशालकाय प्राण्याचा एक-एक विळखा उचकटला! पण – पण आपल्या जबड्यात एकदा पकडलेला दुर्योधनाचा पाय तो कसल्याही विरोधाला शरण देऊन सोडायला तयार नव्हता! एकसारखा वळवळणारा तो शक्तिमान सर्प आपल्या एकाएका तडख्याबरोबर दहा-दहा जणांना दूर फेकण्याचा यत्न करीत होता, पण प्रत्येकानं त्याला मिळेल तिथं दोरासारखा घट्ट पकडून ठेवला होता. अधरीयाचा काचा कसून मी पुढं झालो!

त्या प्राण्यानं डोळ्यांवरचं कातडं ओढून घेऊन कधीही न अनुभवलेल्या प्रखर विरोधाला तोंड देण्यासाठी तेवढ्याच प्रखरपणं आतून तयारी चालविली. त्याच्या जबड्याजवळ जाऊन मी माझी बोटं त्याच्या भक्कम पकडीत घुसविली. थोडासा आधार मिळताच सर्व शक्ती एकवटून त्याची दोन्ही पाळं एका झटक्यात दोन्हीकडे उचकटली. माझ्या दंडांचे सर्व स्नायू टरारून फुगले होते. ओठ दातांखाली मुडपले होते. त्यातून ठिबकणारं रक्त अधरीयावर सांडत होतं.

"अरिष्टसेनऽऽ! पाय बाहेर घे." एका अश्वसादाला मी ओरडून आज्ञा केली. लगबगीनं पुढं येत त्यानं दुर्योधनाचा अर्धा घटका जबड्यात अडकलेला पाय बाहेर काढला आणि युवराजाचा मूर्च्छित देह दहा हात दूर अंतरावर नेऊन ठेवला.

"त्या हरणांतलं एक हरीण घे आणि त्याचा पाय जबड्यात दे!" माझ्या दंडावरचा ताण आता असह्य झाला होता. मृगयेतल्या हरणांच्या दिशेनं भुवया उडवीत मी त्याला सांगितलं.

अरिष्टसेनानं एक हरीण फराफर ओढत आणलं आणि एक म्हणता त्याचे दोन पाय त्यानं मी उचकटलेल्या त्या जबड्यात कोंबले. मी ताण सैल केला. अजगरानं हरणाला पकडलं. माझ्या मस्तकावर घामाचं थारोळं माजलं होतं. धमनी थडाथड उडत

होती. हातांतील तो जबडा सोडून वर उठत मी मस्तकावरचा घाम टिपला. एक क्षणभरच थांबलो. कुरणात एकाकी पडलेल्या दुर्योधनाच्या जाणिवेनं मन विषण्ण झालं. कोण राजा? कसला राजा? सगळ्या मनाच्या खोटचा कल्पना! सगळे विचारांचे खोटे तट! तो हस्तिनापूरचा उद्याचा सम्राट एका कुरणात लाकडी ओडक्यासारखा चेतनाशून्य पडला होता. असाहाय्य! एकाकी! एक साधा अजगर आज त्या सम्राटाच्या जिवावर उठला होता!

धावत त्याच्याजवळ गेलो. जबडचात अर्धा घटका सापडलेल्या त्याच्या पायावरून कणवेनं हात फिरविताना त्यात मोडलेले अजगराचे दोन दात माझ्या हाताला लागले. त्या मंदबुद्धी, ओंगळ प्राण्यानं आपले दात मोडू दिले होते, पण एकदा खुपसलेले दात त्यानं कोणत्याही भयामुळे भक्षयातून काढले नव्हते! मी ते दात काढून टाकले. सर्व अश्वसाद घडल्या प्रकारानं क्रुद्ध होऊन मिळतील तिथून पाषाण आणून, त्या जर्जर सापाला ठेचू लागले. त्यांना थोपविण्यासाठी मी हात उंचावून ओरडलो, "हात आवरा!" आश्चर्यानं माझ्याकडे पाहत त्यांनी हातांतील पाषाण खाली टाकले. त्यांना त्यांच्या राजाची पुन्हा आठवण झाली. तो सर्प तिथंच सोडून ते दुर्योधनाच्या मूर्च्छित शरीराच्या दिशेनं धावत माझ्याजवळ आले.

मी त्या अचेतन पडलेल्या सर्पावर एकच कटाक्ष टाकला. एक अत्यंत मौलिक विचार त्यानं मला तिथं दिला होता. 'दात कधी वाटेल तिथं खुपसायचे नसतात, आणि एकदा खुपसल्यानंतर मोडले तरी ते कधीच बाहेर खेचायचे नसतात.'

"युवराजाला घोडचावर घ्या." मी सर्वांना उद्देशून आज्ञा केली. सर्वांनी दुर्योधनाला हळुवारपणे उचलून एका धिप्पाड घोडचावर पालथा ठेवला. मी सुटकेचा नि:श्वास सोडला.

"मृगयेत हरणं किती पडलीत अरिष्ट्रसेन?" एका अश्वसादाला विचारलं. आजची मगृया अविस्मरणीय होती. माझे बाणही कदाचित चुकले असण्याची शक्यता होती!

"सहा!" मान नमवून तो आदरानं म्हणाला.

"प्रत्येकाच्या अंगात किती बाण आहेत?"

"एकएकच अंगराज!" तो पुन्हा नमून म्हणाला. त्या तशा चित्तथरारक प्रसंगानंतरही मला क्षणभर हसू आलं. मी का हसलो ते त्या अश्वसादांपैकी कुणालाच कळलं नाही. कळणारही नव्हतं. शुद्धीवर असता तर ते केवळ एकटचा दुर्योधनालाच कळलं असतं!

एक हरीण अजगराला भक्षय म्हणून सोडून पाच बरोबर घेऊन आम्ही पठार सोडलं. ज्या कारणासाठी मृगयेचं निमित्त काढून मी दुर्योधनाला राजनगराबाहेर काढला होता ते तसंच राहून गेलं! अनपेक्षित घटनांमुळे मला दुर्योधनाशी काहीच बोलायला मिळालं नाही.

अरण्य सोडताना लागणाऱ्या ओढचाकाठी आम्ही क्षणभर थांबलो. तोंडावर पाण्याचा शीतल शिडकावा करताच दुर्योधन शुद्धीवर आला. माझ्याकडे डोळे विस्फारून पाहत त्यानं मला विचारलं, "आपण कुठं आहोत?" त्याच्या कपाळावर आठ्यांचं जाळं होतं.

"हे वारणावताचं अरण्य आहे. आपण मृगयेसाठी आलो आहोत. मृगया झाली

आहे.” मी त्याला केवळ मृगयेची आठवण करून दिली.

“मृगया! किती हरणं आहेत आपल्याबरोबर कर्ण?” त्यानं शुद्धीवर येताच नेमका प्रश्न विचारला.

“ पाच!” मी हसत म्हणालो.

नाहीतरी एक हरीण मागं ठेवावंच लागलं होतं. ते कशाला धरायचं! हा विचार मी मनातच ठेवला.

“पाच! प्रत्येकाच्या अंगात बाण किती आहेत?”

“एकएकच!” मी सत्य तेच सांगितलं.

“एक-एक! छान!”

एवढी हृदय थरकविणारी झालेली घटकेपूर्वीची झुंज तो क्षणात विसरला. निदान त्यानं तसं भासवलं. त्याबाबत काही विचारलं नाही. आपल्या पाच बाणांनीच पाच हरणं पडलीत या जाणिवेनं तो तशा खिळखिळ्या अवस्थेतही जोमानं उडी मारून घोड्याच्या पाठीवर चढला! अरण्य सोडून नगराच्या दिशेनं आमची घोडी टिपूर चांदण्यात दौडू लागली. मध्यरात्रीच्या सुमाराला आम्ही पुन्हा दोन्ही नद्या ओलांडून परत हस्तिनापूर गाठलं.

सीमा ओलांडताना मी सर्व अश्वसादांना थांबवून कडक शब्दांत सूचना केली, “लक्षात ठेवा, अरण्यातला एकही प्रकार वाड्यावर कुणालाही कळता कामा नये. जा!”

**

# बावीस

‘‘महाराजांनी आपणाला पाचारण केलं आहे.’’ अमात्य वृषवर्मा माझ्यासमोर भल्या सकाळीच उभे होते.

‘‘मग हा निरोप घेऊन कुरूंचे अमात्य स्वत: कसे काय आलेत? वाड्यावरचे सेवक काय पाकशाळेत नुसतं अन्न फस्त करताहेत?’’

‘‘नाही. मी आलो आहे ते आपलं अभिनंदन करायला! आपण होता म्हणूनच काल युवराज दुर्योधनांचे प्राण वाचले! धन्य आहे आपल्या धैर्याची!’’ हात अवकाशात उडवीत ते म्हणाले.

‘‘अमात्य! कुणी सांगितलं तुम्हाला?’’ शब्दांतील कठोरपणा जाणवेल, अशा आवेशात मी विचारलं.

‘‘प्रत्यक्ष युवराजांनीच!’’ ते संथपणे म्हणाले.

‘‘ठीक आहे! मी येतो आहे महाराजांच्या भेटीसाठी! आपण दुग्धपान करूनच जावं.’’

उगाच कठोर शब्द वापरल्याच्या जाणिवेनं मी शक्यतो मृदू स्वरात त्यांना म्हणालो. मृणालनं सुवर्ण तबकातून आणलेला दुधाचा रुपेरी चषक आणि फलांची थाळी अमात्यांसमोर ठेवली. राजवस्त्रं परिधान करण्यासाठी मी वस्त्रागारात निघून गेलो. महाराजांनी इतकं तातडीनं का बोलावलं, याचं कारण लक्षात येत नव्हतं.

वस्त्रं परिधान करताच अमात्यांमागोमाग राजकक्षाकडे निघालो. त्यांच्या कक्षाच्या अलीकडचा कक्ष राजकन्या दु:शलादेवींचा होता. समोरच्या सौधावर त्या प्रभातस्नान आटोपून आपले ओले केश कोवळ्या किरणांत सुकवीत होत्या. त्यांच्या केशातून दंतवणी फिरवीत असलेल्या त्यांच्या दासीनं आम्ही येत असल्याचं त्यांना सांगितलं असावं. तत्परतेनं त्या दोघीही सौधावरून कक्षात निघून गेल्या. सिंधू देशाहून – आपल्या सासराहून त्या वसंतोत्सवासाठी नुकत्याच माहेरी आल्या होत्या.

त्या कक्षाच्या द्वारावरून जाताना माझ्या पायानं काहीतरी सरकटलं गेलं. घाईनं आत जाताना दासीकडून विसरलेली ती दंतवणी होती! मी ती वाकून हातात घेतली. तिचे दात फारच तीक्ष्ण होते! कठीण अशा शिसमाच्या लाकडाची होती ती! एक वेळ तिच्या दातांची तीक्ष्णता पाहावी म्हणून सहज तिच्यावरून मी तर्जनी फिरविली. सौधाच्या पसरट पाषाणावर ती दंतवणी पुन्हा ठेवून मी जरा पुढं गेलेल्या अमात्यांना गाठायचं म्हणून झपाझप चालू लागलो.

महाराजांच्या कक्षात शिरताच अमात्यांनी खाकरून कोणीतरी आल्याची त्यांना कल्पक सूचना केली! त्या आवाजालाही महाराजांनी अचूक ओळखलं! आपले कायमचे मिटलेले डोळे चाळवीत ते म्हणाले,

‘‘कोण? अमात्य? काय झालं?’’

‘‘अंगराज आले आहेत महाराज! युवराज दुर्योधनांच्या पायांवर औषधी चूर्ण बांधण्यासाठी आता मी राजवैद्यांकडे जातो.’’

''जा तुम्ही!''

अमात्य निघून गेले. कक्षात क्षणभर नीरव शांतता पसरली.

''बसा अंगराज!'' अचूकपणे बैठकीकडे हात करीत ते म्हणाले.

''वंदन आहे महाराज!'' मी वाकून अभिवादन करून आसनावर बसलो. याच राजानं मी ज्या दिवशी हस्तिनापुरात आलो होतो त्या दिवशी प्रेमानं मला जवळ बोलावून माझी कुंडलं हातांनी चाचपली होती. वेळप्रसंगी माझा आणि माझ्या धर्नुविद्येचा सन्माननीय योद्धयांत मुक्त कंठानं गौरव केला होता. राजदंड उंचावून आखाड्यातल्या शस्त्रास्त्रस्पर्धेत भाग घेण्याचा लाभ मला दिला होता. वृषालीच्या आणि माझ्या विवाहात दानासाठी कुरूंचं भांडार रितं केलं होतं. तेच हे महाराज होते. माझ्यासारख्या य:कश्चिताला त्यांनी निर्भेळ प्रेमच दिलं होतं.

''का पाचारण केलंय मला महाराज?'' मी त्यांच्या शुभ्र दाढीकडे पाहत विनयानं विचारलं.

''अंगराज....''

''नाही महाराज, अंगराज नाही. कर्ण!'' मी त्यांना मध्येच थांबविलं.

''कर्ण, या तुझ्या अद्वितीय गुणांनीच मला कुठंतरी आशेचा किरण दिसतो. तुझा विनय, तुझा पराक्रम, तुझी सहनशीलता सर्वच तुझ्या कुंडलांसारखं अद्भुत आहे. कालच्या मृगयेत तर तुझे आमच्यावर अगणित उपकार...''

''महाराज, उपकार कसले? मी दुर्योधनाला माझ्या शोणापेक्षा काहीच कमी मानत नाही.''

''तुझं त्याच्याशी असलेलं तेच नातं वाढावं. काल मृगयेत दिलीस तशीच सोबत तू त्याला जीवनभर द्यावीस. तू पाठीशी असलास तरच काहीतरी आशा आहे – नाही तर –''

''नाही तर काय महाराज?''

''पांडव वनवासातून परतल्यावर त्याला जिवंत सोडणार नाहीत! म्हणूनच माझं मन भीतीनं थरकतंय. त्यांना राज्याचा अर्धा वाटा देऊन मुक्त व्हावं, असं मला वाटतंय!''

''पांडव! पांडव! त्यांनी दुर्योधनवधाची प्रतिज्ञा केली म्हणून आपणही त्यांना सर्वांसारखे आजिंक्यच मानता की काय? वेळ येताच मी त्यांना निक्षून सांगणार आहे की, 'दुर्योधन हे कर्णाच्या भक्कम म्यानातलं धारदार खड्ग आहे!' राज्याचा वाटा त्यांना द्यायला पाहिजे, असं एकेकाळी मलाही प्रकर्षानं वाटत होतं, पण ज्या राज्याचे ते वा कौरव कोणीच वारस नाहीत त्या राज्याचा राजदंड कुणी आपल्या हाती धरावा हे आता सामर्थ्य ठरवील! युद्धभूमीवरच त्याचा निर्णय होईल!''

''नाही कर्णा! हे पांडवांशी पेटणारं वैर अशा तऱ्हेनं दुर्योधनाला पेलवणार नाही. तू त्याच्या पाठीशी सदा सर्वार्थानं भक्कमपणे उभा राहशील काय?''

''महाराज, मी दुर्योधनाला तसं वचन केव्हाच दिलं आहे. आज आपल्या समाधानासाठी मी पुन्हा आपणाला सांगतो की, पांडवांचं सामर्थ्य वाढलं नाही तोपर्यंतच त्यांचा द्वैतवनात नाश करूनच मी परतेन.''

''राधेया, तुझ्या शब्दांतील धारदार निर्धार ऐकला की, तू अधिरथाचा पुत्र आहेस हे सत्यच वाटत नाही. राधा तुझी माता असेल यावर माझा विश्वासच बसत

नाही.''

''नाही महाराज! मी त्यांचाच पुत्र आहे आणि आज मला त्यांचा अभिमानही आहे. कारण बाबा, तुम्ही मानता तसे सूत नाहीत. ते साक्षात महाराज ययातींचे वंशज आहेत.''

''म्हणतोस काय कर्णा? तुझा पिता अधिरथ, महाराज ययातींचा वंशज आहे?'' जरा वेळ थांबून महाराज गंभीरपणे पुढं म्हणाले, ''मग तूच एक पितामह भीष्मानंतरचा कुरू आहेस! कर्ण, तसं असेल तर तू म्हणशील ते सदैव मलाही मान्य राहील.'' ते आसनावरून झटकन उभे राहिले.

''होय महाराज, मी सांगतो आहे ते सत्य आहे. म्हणूनच पांडवांशी समेट ही अशक्यप्राय गोष्ट आहे! चलतो मी. अजून प्रात:कालची आन्हिकं आटोपायची आहेत माझी.'' मी आसनावरून उठून त्यांना अभिवादन केलं.

''ये!'' त्यांनी हात उंचावून मला निरोप दिला.

मी त्यांच्या कक्षातून बाहेर पडलो. येता–येता सहज दु:शलादेवींच्या कक्षासमोरच्या सौधावरची दंतवणी दिसते का ते मी पाहिलं. तिथं काहीच नव्हतं.

द्वैतवनातले पांडव युद्धाला कसे प्रवृत्त होतील, याचा विचार करीतच मी माझ्या कक्षात आलो. मृगयेत धुळीनं माखलेली माझी वस्त्रं एकत्र करून ती धुण्यासाठी सुप्रिया एका दासीकडे देत होती. त्यातलं एक अधरीय हातात उंचावून ती विनोदानं म्हणाली, ''या अधरीयावर रक्ताचे डाग आहेत. मृगयेतील हरणं आपणच वाहून आणलीत की काय?''

''नाही. ते हरणाच्या रक्ताचे डाग नाहीत.''

''मग कसले?''

''ते तुला सांगितलंच पाहिजे की काय?''

''आपण सांगायची आवश्यकता नाहीच. ते अजगराच्या रक्ताचे आहेत, हे मला माहीत आहे!''

''तुला कोणी सांगितलं ते?'' स्त्रिया आपल्याजवळ काहीच गुप्त ठेवीत नाहीत असं मी ऐकलं होतं, पण ते दुसऱ्याजवळचं गुपितही इतक्या सहजपणे काढून घेऊ शकतात, हे मी प्रथमच अनुभवीत होतो!

''युवराज्ञी भानुमतींनी!'' तिनं हसत उत्तर दिलं. जगातल्या सर्वच स्त्रिया शेवटी स्त्रियांनाच वश होतात असं म्हणतात ते खोटं नव्हतं. माझ्या मस्तकात प्रकाश पडला. दुर्योधन–भानुमती असा प्रवास करून तो अजगर आता सुप्रियेपर्यंत आला होता! एक दिवसातच आता तो सगळ्या राजवाड्याला कळणार होता! तोंड वेंगाडत, मी हिमालयच पालथा घातला आहे अशा कल्पनेनं आता अनेक जण माझी वारेमाप स्तुती करणार होते. जिचा मला तिटकारा होता ती मला आता जिथं– तिथं ऐकावी लागणार होती.

दासी वस्त्रं घेऊन निघून गेली. मी सुप्रियेजवळ जात तिच्या काळ्याभोर टपोऱ्या डोळ्यांत पाहत म्हणालो, ''सुप्रिये, युवराज्ञींची तू सखी होतीस म्हणून त्यांनी तुला सर्व सांगितलं. आता काही तू त्यांची सखी नाहीस, माझी पत्नी आहेस, मी सांगेन तेच तुला ऐकावं लागेल. कसं?''

''म्हणजे? मी आपलं कधीच ऐकत नाही असं म्हणणार की काय आपण?''

''नाही. मात्र तुला हे जे भानुमतींनी सांगितलंय ते कुणालाही सांगू नकोस!

काय? घे माझ्या कुंडलांची शपथ. वृषालीलाही कळता कामा नये यातलं काहीही!''

''आपली आज्ञा शिरसावंद्य आहे मला!'' मी वाकून पुढं केलेल्या कुंडलांवर हात ठेवून ती म्हणाली.

''काकाऽऽ!'' नेमक्या त्याच वेळी आपल्या मातेसह कक्षात शिरलेल्या मीनाक्षीनं मला हाक घातली. आमचा एकान्त भंग होतो आहे, या विचित्र कल्पनेनं तिची माता – शोणपत्नी मेघमाला डोळे वटारून तिला दटावीत होती. तिच्या दंडाला धरून ती आली तशी कक्षाबाहेर जाण्यासाठी वळली! मेघमाला खरोखरच शोणाची पत्नी शोभत होती! आपल्यासाठी इतरांना त्रास व्हावा असं तिला कधीच वाटत नसे! तिला थांबविण्यासाठी मी मीनाक्षीला हाक घातली! ''मिनू!''

त्या दोघीही थांबल्या! माझ्या अंगाखांद्यांवर खेळलेली मीनाक्षी ''काकाऽ!'' म्हणत धावत माझ्याजवळ आली. आठ–दहा वर्षांच्या त्या बालिकेचा स्वभाव निर्झरासारखा निवळशंख होता. माझ्या हाताची बोटं आपल्या चिमुकल्या हातांनी पकडत ती म्हणाली, ''काका, तुम्ही येणार का नगरातल्या मंदिरात?''

''मंदिरात? मिनू, माझं मंदिर या वेळी रोज गंगेकाठी असतं हे माहीत नाही की काय तुला?'' ती का बोलवीत असावी ते न समजून मी सुप्रियेकडे पाहिलं.

''आम्हा आता मंदिरात जाणार आहोत.'' मीनाक्षीला आवरणाऱ्या मेघमालेकडे पाहत सुप्रियेनं स्पष्टीकरण दिलं.

''कशाला?'' मी मिनूच्या हातातून बोटं सोडवून घेत विचारलं.

''आपल्या प्रिय बंधूंसाठी – मेघमालेनं एक व्रत केलं आहे. त्याची सांगता आहे आज नगरातल्या उमेच्या मंदिरात. शोणभावोजी भाग्यवान खरे!'' ती हसून मेघमालेकडे पाहत म्हणाली.

''वा! मेघमाले, शोणाची तू एकटीच पत्नी आहेस; पण किती दक्ष आहेस आपल्या पतीच्या कल्याणासाठी! शोण खराच भाग्यवान! नाहीतर आम्ही आहोतच – आमच्या दोन पत्नी असूनही –'' मी गमतीनं सुप्रियेला निरुत्तर करावयाचं म्हणून म्हणालो.

''साक्षात देवासाठी कसं व्रत करायचं? आणि कुठल्या देवाचं करायचं?'' सुप्रिया खाली मान घालून म्हणाली. मीच निरुत्तर झालो. स्त्रिया अंधश्रद्ध असतात, असं म्हटलं जातं ते अगदी खोटं असतं. त्याच अधिक व्यवहारी असतात. परमेश्वराचा शोध घेण्यासाठी अश्वत्थाम्यासारखे तत्त्वचिंतक अव्यक्ताकडे धाव घेतात, तर सुप्रियेसारख्या कुशल स्त्रियांनी त्या असीम परमेश्वरालाही आपल्या पतीमध्ये बांधून टाकलेलं असतं! व्यक्तिव्यक्तींच्या परमात्म्याबद्दलच्या कल्पना भिन्न–भिन्न असतात असं अश्वत्थाम्यानं मला वारंवार सांगितलं होतं. मलाही ते पटलं होतं, पण सुप्रियेचा विचार ऐकताना मला ती जाणीव प्रकर्षानं झाली. पुरुषांच्या परमात्म्याबद्दलच्या कल्पना आणि स्त्रियांच्या कल्पना यांत महदंतर असतं! काही सुचेनासं झालं की, एखादा पोषक आणि धैर्य देणारा विचार मिळावा म्हणून पुरुष आकाशाच्या निळ्या पोकळीकडे पाहतो. मात्र अशा वेळी स्त्रिया खाली मान घालून सर्वोदार धरतीच्या हिरव्या पायघडीकडे बघतात! विचारातला हा मूलभूत भेद आहे. पुरुषाला नेहमीच अव्यक्ताची आणि स्त्रीला नेहमीच व्यक्ताची ओढ असते. पुरुषाचा आदर्श आकाश, स्त्रीचा आदर्श धरती!

सुप्रियेनं नवा शालू धारण केला. मेघमालेसह ती उमेच्या मंदिराकडे जायला

निघाली. त्या दोघींनीही ओणवून मला वंदन केलं. अजाण मीनाक्षी मात्र तशीच शेजारी उभी होती. तिचा हात धरून तिला माता मेघमाला बळेच माझ्या चरणांवर मस्तक ठेवण्यासाठी दटावू लागली. मी मीनाक्षीच्या दंडाला धरून उंचावून घेत तिच्या बालिश मस्तकाचं प्रेमानं अवघ्राण केलं. जीवन मीनाक्षीसारखं अबोध आणि निरागस असावं असं मला वाटलं.

त्या तिघी कक्षाबाहेर निघून गेल्या. माझी सूर्यकिरणांसाठी तृषार्त झालेली पाठ मला कक्षात स्वस्थ बसू देईना! कोरडी वस्त्रं घेऊन मीही बाहेर पडलो.

**

# तेवीस

मृगयेच्या वेळी मी दुर्योधनाला जे सांगू शकलो नव्हतो ते आता सांगणं भागच होतं. महाराजांच्या मनात पांडवांचं शल्य डाचत होतं – आणि माझं मन? ते तर ठायी–ठायी भडकलेल्या वणव्यात चक्रवाक पक्षयासारखं होरपळत होतं. त्यांच्यामुळेच – केवळ पांडवांमुळेच मानखंडनेचे काळेकुट्ट ढग माझ्या सर्व जीवनाकाशाला घेरून राहिले होते. अश्वत्थामा म्हणाला ते सत्य होतं. बालपणी साकळलेल्या रक्ताचं आता टणक गाठीत रूपांतर झालं होतं! आता मी सरळ चाललो असतो तरीही जगाला ती चाल तिरकीच दिसणार होती! मग तिरकं चालणंच शहाणपणाचं नव्हतं काय! पांडवांच्या बाबतीत माझं मन आता भावनाशून्य झालं होतं. मिळेल त्या मार्गानं त्यांचा घडा त्यांच्या पदरात घालावा, या शकुनीमामांच्या उघड–उघड राजकारणाचा मार्गच मलाही मोहवीत होता. त्यांच्या भयाचं धारदार खड्‌ग माथ्यावर टांगतं ठेवून दुर्योधनाला राज्य करता येणं शक्य नव्हतं. तो काही यज्ञात समिधा टाकणारा ऋृषी नव्हता.

अर्घ्यदान करून परतताच मी प्रभंजनाकडून त्याला संदेश धाडला. ‘‘काही महत्त्वाचं बोलायचं आहे.’’ हे ऐकताच आपल्या घायाळ पायावर पट्‌टी बांधण्यासाठी आलेल्या राजवैद्यांना तसंच तिष्ठत ठेवून तो श्येन पक्षयासारखा झपाझप चालत माझ्यासमोर क्षणात उभा राहिला. त्याची ही चालीतील भक्कमताच मला त्याच्या पहिल्या भेटीत आवडली होती. त्याचे निर्णय कधी–कधी चुकत होते – पार चुकत होते, पण ज्या भक्कमपणे तो आपल्या विचारांना चिकटून राहत होता तो भक्कमपणा कौरव–पांडवांत केवळ दुर्योधनातच होता! राजा म्हणवून घेण्याला माझ्या मते दोनच योद्धे पात्र होते. एक युवराज दुर्योधन आणि दुसरा श्रीकृष्ण!

‘‘बोल अंगराज – ’’ हातातील गदा त्यानं सहजतेनं घोड्याच्या दगडी मूर्तीला टेकवून ठेवली. वैशाखाच्या उष्णतेमुळे कपाळावर उभारलेले घामाचे बिंदू त्यानं उत्तरीयानं टिपले.

‘‘दुर्योधन – ’’ काहीतरी बोलावं म्हणून मी ओठ उघडले, पण प्रभंजनही नेहमीच्या सवयीनं पाषाणमूर्तीसारखा तिथं उभाच होता. त्याच्याकडे पाहताच मी थांबलो. माझं बोलणं युवराजाशिवाय कुणालाही कळू नये अशी माझी इच्छा होती.

‘‘प्रभंजन!’’ दुर्योधन विजेसारखा कडाडला. वीज त्या पाषाणमूर्तीवर कोसळताच ती निमूटपणे नाहीशी झाली. क्षणभर शांतता पसरली.

‘‘दुर्योधन, पितामहांच्या वक्तव्यानं तूही पांडवांना घाबरून आहेस? – ’’ मी विचारलं.

‘‘कर्ण, पितामहांचं पांडवप्रेम आजचं नाही, ते तपातपांचं आहे हे काय मला माहीत नाही? त्यांच्या कोणत्याच सत्य कथनाला आता माझ्या लेखी कवडीचंही मोल नाही. त्यांनी सांगितलेल्या सत्याला इतका काल लोटून गेला आहे की, हस्तिनापूरचं राज्य ही आज सरळ–सरळ सामर्थ्याची स्पर्धा आहे!’’

‘‘मग ती जिंकण्यासाठी कुरूंच्या इतर योद्धयांची वाट पाहत बसणार आहेस की

काय तू?''

"नाही! पण दुसरा कुठला मार्ग योजावा ते विचार करूनही सुचत नाही. भीमाच्या सामर्थ्यमेरूला घेरणारा कोणता दोर आणू?''

"यात कसला विचार? उद्याच मी ससैन्य पांडवांवर द्वैतवनात चालून जाण्याचा निर्धार केला आहे. तू येणार नसलास तरी तुझं सैन्य माझ्या पाठीशी उभं कर. एकटा भीमच नव्हे – तर पाचही जणांना कर्ण नष्ट करीलच. यावर तुझा विश्वास नसेल तर – ''

"विश्वास का नाही? कर्ण आणि दुर्योधन या एकाच राजमुद्रेच्या दोन बाजू आहेत, असं मी जगाला गर्जून सांगतो ते काय खोटं आहे? तुझी तशीच माझीही इच्छा आहे – पण पांडव आपल्या अंगावर चालून येणार नाहीत या प्रवासात!''

"का येणार नाहीत? ते वीर असतील तर असेल त्या सामर्थ्यासह ते आव्हान स्वीकारतील.''

"नाही. ते आपल्या सैन्याची चाहूल लागताच द्वैत सोडून दुसऱ्या वनात जातील. त्यांना अंगावर घेण्यासाठी एकच मार्ग आहे.''

"कोणता? द्वंद्वाचा तर नाही?''

"नाही! राधेय, तुझं द्वंद्वाचं आव्हानही ते कधी स्वीकारणार नाहीत! त्यांना चेतविण्यासाठी एकच उपाय आहे – माणसाला दारिद्रय आलं की, तो चिडखोर होतो. तशा अवस्थेत त्याच्यापुढं कुणीही कसल्याही वैभवाचं प्रदर्शन केलं की, मग तर त्याच्या तळपायाची आग मस्तकाला जाते.''

"म्हणजे? त्यांना हिणविण्यासाठी तुझ्या संपत्तीचं प्रदर्शन तू त्या रानटी श्वापदांनी भरलेल्या घनदाट अरण्यात मांडणार आहेस की काय?''

"होय! प्रदर्शनच! पण सुवर्णलंकारांनी सजलेल्या अनेक सुंदर दासींचं! त्या दासींच्या समवेत माझे बंधू पांडवांसमक्ष सरोवरात जलक्रीडा करतील आणि कुणाला नसली तरी भीमाला, द्रौपदी क्रोधानं म्हणेल की, 'काल माझे पाय चुरणाऱ्या त्या दासी अलंकारमंडित होऊन जलक्रीडा करताहेत हे पाहण्यापेक्षा मला या पर्णकुटीत कोंडून जाळून का टाकीत नाहीस तू?' निर्भत्सनेनं पेटला तर तो एक भीमच! आणि मग तो मंदबुद्धी लगेच दासींच्या अंगावर धावून येईल.''

"दुर्योधनऽऽ ठीक आहे. भीम तसा धावून यावाच. सरोवराकाठच्या हिरव्या कुरणाचा आखाडा त्याच्या उन्मत्त रक्तानं मी माखून टाकीन. सत्यसेनाच्या हातातील आसुडाचे फटकारे त्याच्या पाठीवर सपासप ओढून सांगेन की, 'आज मी खरोखरच हातात आसूड घेतला आहे – आणि तो तुझ्यासारख्या नाठाळ घोड्याच्या पाठीवर ओढलेला आहे'''

"अंगराज, हे तुला सहज शक्य आहे. म्हणूनच या घोषयात्रेत तुझ्याशिवाय अन्य कुणाला घ्यावं, असं मला वाटत नाही. काही कमीअधिक झाल्यास साहाय्य म्हणून काही पदाती आणि थोडं सशस्त्र अश्वसाद बरोबर असले तरी पुरेसे आहेत. ज्या दासी बरोबर असतील, त्याही इंद्रप्रस्थाच्या! त्याशिवाय द्रौपदीचा क्रोधांगार भडकणार नाही!''

"राजा, तू केवळ मामांच्या संकेतावर चालतोस असा ग्रह माझाही झाला होता, पण आज पटलं की, काही योजना तुझ्याही असतात. केवळ तुझ्याच! आणि त्याही कल्पक!''

"जीवन म्हणजे योजना–प्रतियोजनांचा आखाडा असतो. मामांनी कपटानं युधिष्ठिराचं राज्य जिंकलं असं सगळं हस्तिनापूर म्हणतंय, पण ही गोष्ट त्यांच्या लक्षात येत नाही की, युधिष्ठिर काही केवळ दान देण्यासाठी द्यूताला बसला नव्हता. जर आम्ही हरलो असतो तर! पांडवांनी आम्हाला काय पंचारतीनं ओवाळलं असतं?"

"नको राजा, त्या द्यूताच्या स्मृती पुन्हा नकोत. त्या फाशांच्या गोष्टी नकोत."

उगाच छातीत एक असह्य कळ उमटल्याचा मला भास झाला. कुठंतरी खुपत होतं, काहीतरी अस्वस्थ करून टाकत होतं. मी प्रकाशापासून दूर जातो आहे, असं वाटत होतं. द्रौपदी! छे, तो तीन अक्षरी शब्द त्रिमुखी बाणासारखा हृदयात खुपत होता. नको ते नाव! नको तो वस्त्रांचा ढीग!

"चलतो मी! राजवैद्य माझ्यासाठी थांबले असणार!" आसनावरून उठून आपल्या पायाकडे पाहत तो म्हणाला.

कक्षाच्या द्वारातून बाहेर जाणाऱ्या पाठमोऱ्या आकृतीकडे पाहताना मला आखाड्यातला स्पर्धेचा दिवस आठवला. तोच तो अमर्ष त्याच्या नसानसांत आजही तसाच होता.

तो निघून गेला आणि माझं मन त्याच्या गदेसारखं मंडलं घेऊ लागलं! मी करतो आहे ते बरोबर आहे काय? घोषयात्रेच्या निमित्तानं जाऊन पांडवांशी द्वंद्व खेळणं योग्य आहे काय? आपण अध:पतनाची एक-एक पायदंडी आणखी तर उतरत नाही ना?

आणि असलो तरी त्यात अयोग्य काय होतं? भिक्षेच्या निमित्तानं जाऊन प्रत्यक्ष श्रीकृष्णानं जरासंधाला भीमाकडून मारलं नव्हतं काय? पांडव आणि कर्ण हा संघर्ष किती काळ धुमसत ठेवायचा यालाही मर्यादा होत्या. घडेल ते पाहत बसायला मी काही पितामह आणि महामंत्री विदुर नव्हतो. द्वैतवन हा मी निवडलेला एक निर्वाणीचा मार्ग होता.

**

# चोवीस

शेकडो अलंकारभूषित दासींचा तांडा कलकलत द्वैतवनाकडे निघून गेला. त्यांच्या समवेत एकटा प्रभंजन होता. एवढ्या मोठ्या संख्येनं नटून–थटून राजवाड्यावरच्या निवडक सौंदर्यवती दासी कुठं चालल्या आहेत म्हणून अनेकांनी प्रभंजनाला छेडून पाहिलं. त्यानं काहीतरी उत्तरं देऊन सर्वांची तोंडं बंद केली, पण महाद्वारात, सकाळची आन्हिकं आटोपून परतणाऱ्या पितामहांशी त्याची गाठ पडली! त्यांनी विचारणा करताच सत्य सांगावं लागलं, पण ते त्यानं कौशल्य साधून सांगितलं.

"द्वैतवनात जलक्रीडेसाठी जाताहेत त्या! ग्रीष्माची उष्णता असह्य झाली म्हणून युवराजांनीच त्यांना तशी आज्ञा दिली आहे!"

"मग त्यासाठी द्वैतवनच कशाला पाहिजे? जा, दुर्योधनाला माझी सत्वर भेट घ्यायला सांग!" पितामहांचं वय झालं होतं. दोर जळला तरी अधिकाराचा पीळ काही जळला नव्हता! त्यांनी दुर्योधनाला बोलावून घेतलं.

"दुर्योधन, वाड्यावरच्या निवडक दासी कुठं चालल्या आहेत?" दुर्योधन समोर जाताच त्यांनी पांढऱ्या भुवया उंचावून विचारलं.

"जलविहारासाठी द्वैतवनात!"

"द्वैतवनच का निवडलं आहे त्यासाठी? खांडववन आणि वारणावत चाललं नसतं काय?"

"तसंच काही नाही! पण तिथं एक-एक वेळ पूर्वी जलक्रीडा झाली आहे. द्वैतवन सर्वांत अधिक निसर्गरम्य आहे म्हणून या खेपेला ते निवडलं आहे!"

"लक्षात ठेव, त्या वनात पांडव वस्तीला आहेत. त्यांची कुरापत काढण्याचा दुर्बल प्रयत्न करू नकोस. नाहीपेक्षा द्यूतानं भडकलेला भीम त्या सरोवरातच तुला जलसमाधी देईल! जा! सांभाळून ऐस!"

खांदे उडवून दुर्योधन त्यांच्या निवासातून बाहेर पडला. ठोचरला गेलेल्या भुजंगासारखा! त्याचं रक्तवर्णी मुख शंकांच्या अगणित जाळ्यांनी, कमलवेलींच्या माजलेल्या मुळ्यांनी सरोवर झाकलं जातं तसं झाकून गेलं होतं. हिरवट घारे डोळे सरासर रंग पालटू लागले होते.

"का – काय झालं?" तो अस्वस्थ झालेला पाहून मी त्याला साशंकतेनं विचारलं.

"आता या वृद्धावस्थेत जपजाप्य, दानधर्म आणि पूजाअर्चा करायची सोडून या पितामहांचा जीव त्या पांडवांभोवतीच का घोटाळतोय तेच समजत नाही. भीमाची दहशत घालून त्याच्या वाटेलासुद्धा जाऊ नकोस, असं त्यांनी मला तीव्र शब्दांत ऐकवलंय."

"नाहीतरी त्यांच्या मनाचा कल नेहमीच पांडवांकडे होता, आहे आणि राहील राजा! म्हणून तुला स्वत:चे असे काही निर्णय आहेत की नाहीत?"

"कर्ण, दुर्योधन एकदा ठरवितो ते अंतिम असतं, मग मार्गात मृत्यूचा मुक्त संचार असला तरी त्याची पर्वा नाही! अरिष्टसेन, अश्वसादांना गुप्त मार्गानं राजवाडा सोडून

द्वैतवनाकडे दौडायची आज्ञा दे!" त्यानं शेजारी उभ्या असलेल्या अरिष्टसेनाला हात द्वैतवनाच्या दिशेनं उंचावून आज्ञा केली. मान नमवून अरिष्टसेन धावतच अश्वशालेकडे निघून गेला.

राजवाड्याच्या गुप्त मार्गातून बाहेर पडलेले चार–पाचशे अश्वसाद धनछुडी पक्षयासारखे एका रांगेत दौडताना क्षणार्धात आम्हाला सौधावरून दिसू लागले. घोड्यांच्या चैतन्यमय खुरांनी उधळलेला धुळीचा लोट टळटळीत उन्हात गंगेच्या दिशेनं एक दीर्घ लोळ उमटवून अवकाशात अदृश्य झाला. आम्ही राजवाड्याचे सोपान उतरून खाली आलो!

दुर्योधन आपल्या अश्वाचा आणि मी माझ्या प्रिय वायुजिताचा वेग हाती घेऊन दोघंही एकदमच त्यांच्या पाठीवर एका झेपेत स्थिरावलो. प्राकाराबाहेर पडताच आम्ही त्यांना वायुगतीनं उधळणार होतो.

वायुजित आपल्या मानेला राजहंसाच्या मानेसारखं ऐटदार वळण देऊन पहिल्या प्रहराच्या कोवळ्या किरणांना नम्र अभिवादन करून आपल्या स्वामीसाठी जणू तयारच होता. त्याची शुभ्र आणि रमणीच्या तलम केशपाशालाही लाजवील अशी झगझगणारी आयाळ त्याच्या प्रत्येक पावलागणिक ऐटदारपणे हिंदकळत होती. आवाजाचा साधा स्पंदही टिपायला त्याचे कान आसुसलेले होते. लगलग चोहो दिशांना हलत होते. वाड्यावरच्या सर्व जनावरांत ते जनावर अतिशय तेज होतं. शकुनीमामांनी खास गांधार देशातून ते आणलं होतं. तेज होतं म्हणूनच मी ते माझ्यासाठी निवडलं होतं. अनेक वेळा त्याच्या पुष्ट पाठीवर आरूढ होऊन मी प्रवास केला होता. माझ्या जीवनक्रमातील अर्ध्याअधिक कटुगोड स्मृतींशी तो प्राणी निगडित होता. माणसापेक्षाही जनावरं अधिक प्रामाणिक आणि एकनिष्ठ असतात, हे त्यानं मला अनेकदा दाखवून दिलं होतं.

एका लयीत मंद–मंद पावलं उचलीत, हिंदकळत तो वाड्याच्या प्राकाराबाहेर मला वाहून नेत होता. आपल्या कक्षाच्या गवाक्षातून, माझं प्रयाण कुठं चाललं असावं, याचा विचार करीत मजकडे पाहणाऱ्या सुप्रियेचा मी मूकपणे डोळ्यांनीच निरोप घेतला. महाद्वाराचा उंबरठा आला आणि तो ओलांडताना कधी नव्हे ते वायुजित पुढच्या दोन्ही पायांचे खूर मुडपल्यामुळे गपकन, छाती धरतीला टेकेल इतका खाली घसरला! एका हातानं वेग आखडत दुसऱ्यानं मी मस्तकावरचा ढळणारा किरीट कसातरी सावरला! शंकेची टिटवी माझ्या मनाच्या नदीकिनाऱ्यावर क्षणभर कर्कशपणे किंचाळली – 'हा काही अपशकुन?' छे, मी धैर्याचा पाषाण फेकून तिला हुसकावून लावली! हातांनी ओढून वाकवून घेतलेली चिवट वृक्षाची फांदी हातांचा तणाव सोडताच परत जागच्या जागी जाऊन मंद–मंद स्पंद घेत स्थिर होते, तसा क्षणातच वायुजित ताठ उभा राहिला! त्याची कातडी क्षणभर थरथरली, शेपूट इकडे–तिकडे वळवळली. तो एकदा फुरफुरला. मी माझ्या टाचेचं अग्र त्याच्या पोटावर जरासं आदळलं. पुढं गेलेल्या दुर्योधनाला मला गाठायचं होतं! वायुजित नावाप्रमाणंच वायूचं साम्राज्य जिंकीत चौखूर उधळू लागला.

**

# पंचवीस

द्वैतवनाची घनदाट झाडी दृष्टिपथात आली. दुरून शांत दिसणारं ते घनदाट वन पोटात अनेक क्रूर श्वापदं पोसत उभं होतं! घोडच्यावरून खाली उतरून आम्ही पदस्थ झालो. हाती वेग घेऊन चालू लागलो. प्रवासानं आणि ग्रीष्माच्या अंग पोळणाऱ्या उष्णतेनं सर्वांच्या शरीरावरील राजवस्त्रं घामानं ओथंबली होती. थोडा विश्राम घ्यावा म्हणून ओढ्याकाठच्या एका विशाल ऐन वृक्षाखाली थोडा वेळ थांबलो. वृक्षाच्या बुंध्याला घोड्याचे वेग आखडताना दुर्योधन म्हणाला, ''राधेया, आपले चार–पाचशे अश्वसाद कमी पडतील असं नाही का वाटत तुला?''

''आपण युद्धासाठी आलो नाही! आज सरळ–सरळ द्वंद्व होईल. एकाशी नाही, पाचांशी!''

ओढ्यात उतरून ओंजळीतून थंड पाण्याचा शिडकावा तोंडावर घेताना मी उत्तर दिलं. एवढ्यात पैलतीरावरून ओढ्याचं उथळ पाणी घुसळत एका घोड्यावरून प्रभंजन आमच्याच दिशेनं धावत येताना आम्हाला दिसला. कसल्यातरी महान भयाच्या छटा त्याच्या घोड्याला पिटाळताना होणाऱ्या लगबग चंचल हालचालींमधून स्पष्ट दिसत होत्या. जवळ येताच खालीही न उतरता, तो वेग आणि श्वासोच्छ्वास दोन्ही एकदम आखडीत, ओढ्याच्या मध्यभागी उभा राहून तिथूनच भीत–भीत ओरडला, ''महाराज, वनातल्या सरोवरात गांधर्वस्त्रिया पूर्वीच क्रीडा करताहेत! त्यांची आणि आपल्या दासींची सरोवराच्या काठी झोंबाझोंबी चालली आहे! कुणीच कुणाला आटोपत नाहीत!''

''चल प्रभंजन, तू पुढं हो, आम्ही येतोच!'' हात उंचावून दुर्योधनानं त्याला मागं पिटाळला.

आमची घोडीही ओढ्याचं पाणी कापत द्वैतवनाकडे धावू लागली. वाटेवर पुढं आलेल्या लतावेली आमच्या उघड्या दंडांवर सपासप आदळू लागल्या. प्रभंजनच्या घोड्याच्या खुरांचा मागोवा घेत अनेक अवघड वळणं मागं टाकून आम्ही वनाच्या मध्यभागातील सपाट पठारावरच्या सरोवराकाठी आलो. समोरच्या दृश्याचा आम्हा दोघांनाही नीटसा अर्थ लागला नाही. दासी आणि गांधर्वस्त्रिया जीव मुठीत धरून सरोवराच्या काठानं रांगेत उभ्या होत्या! अवाक् आणि निश्चल! पठराच्या मोकळ्या पटांगणात हजारो गंधर्व सैनिकांशी आमच्या अश्वसादांनी घनघोर युद्ध मांडलं होतं! आपली संख्या आणि सामर्थ्य काय आहे, याचा त्यांनी थोडाही विचार केला नव्हता. त्यांना तेवढा अवसरही मिळाला नसावा. गंधर्वसेनेच्या मधून एक उंच आणि देखणा सेनानायक हातातील खड्ग विजेसारखं स्वत:भोवती गरगर फिरवीत आपल्या सैन्याला गर्जना करून प्रोत्साहन देत होता.

''चित्रसेन!'' त्याला पाहताच दुर्योधन पुटपुटला. तो गंधर्वनायक चित्रसेन होता! द्वैतवनच काय; पण सभोवतीच्या आसमंतात त्याच्या नावाचा डिंडिम इतका पसरला होता की, तो रानावनात राहत असूनही त्याच्या वाटेला कधी एखादा राक्षससुद्धा जाऊ धजला नव्हता. आमच्या दासींनी त्याच्या प्रिय स्त्रियांना छेडून भलतीच आपत्ती

ओढवून घेतली होती.

शौर्यानं लढणारे आमचे अश्वसाद चोहो दिशांनी गंधर्वसेनेकडून क्षणाक्षणाला घेरले जात होते.

"दुर्योधन, तू ही फळी फोड!" उजव्या दिशेनं गंधर्वसेनेवर खड्ग उपसून धावताना मी त्याला डावी दिशा दाखविली. विचार करण्याइतकाही अवधी नव्हता.

सपासप वार ओढीत मी सैन्यात घुसलो. आमच्या वेढलेल्या सैनिकांना मुक्त करण्यासाठी अटीतटीचे आघात करून एकदा त्यांच्या भोवतीचं कडं मी फोडलंसुद्धा, पण क्षणार्धात त्यांना नव्या उत्साहाच्या गंधर्वांनी परत घेरलं. कुठूनतरी गर्जना करीत प्रत्यक्ष चित्रसेन माझ्यासमोर उभा ठाकला! फुललेल्या पळसवृक्षासारखा तो क्रोधानं संतप्त झाल्यामुळे रक्तवर्णी दिसत होता!

"कर्ण! आपल्या सैनिकांना घेऊन वनातून चालतो हो, नाहीतर मरणाला सिद्ध हो!" कंठाच्या शिरा ताणत तो मोठ्यानं ओरडला.

"चित्रसेन! मी कर्ण आहे. वायूच्या झोतांनी पर्वतशिखरं हलत नसतात! सिद्ध हो." मला त्याच्या अहंभावी घोषणेचा संताप आला.

त्वेषानं तो माझ्यावर धावून आला. त्याची आणि माझी जुंपताच दोन्ही पक्षांकडील सैनिक दूर झाले. अर्धा घटका – एक घटका नुसत्या विजेसारखी खड्गं खणखणत एकमेकांवर आदळत होती. त्यांच्या भिडलेल्या पात्यांतून स्फुल्लिंग उडत होते. त्याचं खड्ग माझ्या शरीराला ठिकठिकाणी स्पर्शून जात होतं, पण रक्ताचा एक थेंबही त्याच्या जिभेला चाटायला मिळत नव्हता! पायदळीचं गवत उद्ध्वस्त झालं होतं. मध्येच थांबत "हा अभेद्य कवचाचा हस्तिनापूरचा कर्ण आहे! हा खड्गयुद्धात, धनुर्युद्धात, गदायुद्धात कशातही मरणार नाही! त्याला चोहोकडून घेरून जिवंत पकडा!" आपल्या युद्ध पाहत उभ्या राहिलेल्या गंधर्वसेनेला चित्रसेनानं आज्ञा केली! त्याच्या युद्धाला कपटाचा वास आला. आता तिथं थांबण्यात अर्थ नव्हता.

"अश्वसादांनो, दासींना घेऊन परता!" मी त्याच्या सैनिकांनी मला घेरण्यापूर्वीच शेपटी हलवीत गवत खाणाऱ्या वायुजिताच्या पाठीवर आरूढ होताना ओरडलो. प्रत्येक अश्वसादानं एक-एक दासीला घोड्यावर घेतलं आणि माझ्या मागून दौडायला सुरुवात केली. हजारो गंधर्वांनी हातातील शस्त्रं शेवटचा मारा म्हणून आमच्यावर फेकून शस्त्रांचा पर्जन्य वर्षविला. कित्येक अश्वसाद घोड्यांसह, त्यांच्या अचूक फेकीमुळे धडाधड खाली कोसळले. जे सुरक्षित होते ते दौडू लागले. पुन्हा सपासप आदळणाऱ्या लतावेलींचा मारा झेलीत आम्ही वळणामागून वळणं मागं टाकू लागलो. घोडे दौडत होते, धूळ उडत होती. पण माझं मन थिजलं होतं. हे रणांगणातून पराभूत होऊन पळणं आहे की प्राणभयानं मी घेतलेली ही माघार आहे – काहीच कळत नव्हतं. कोणत्या उभारीनं मी राजवाड्याबाहेर पडलो होतो आणि काय बरोबर घेऊन परतत होतो! महाद्वाराच्या उंबरठ्यात लचकलेला वायुजित म्हणजे माझ्या जीवनक्रमातील पहिल्या पराभवाची तर नांदी नव्हती! काय? पराभव! पलायन! माघार! अपुऱ्या सामर्थ्यानिशी लढण्यापेक्षा माघार घेणं योग्य नव्हतं काय? चित्रसेनानं मला पकडलं असतं तर! सुदामनच्या क्रूर वधाचं माप मग अर्जुनाच्या गळ्यात कोण घालणार होतं? माझा शत्रू कोण होता? अर्जुन की चित्रसेन? माझं मन माझ्या निर्णयातील अचूक व्यवहार शोधत होतं. अर्जुनाचा कंठनाळ फोडण्यासाठी मला जगणं भागच होतं. वायुजिताच्या

खुरांबरोबरच विचारांनी अनेक वळणं मनातून मागं पडत होती! घोषयात्रेला कर्णाच्या दृष्टीनं आज दोषयात्रेचं स्वरूप प्राप्त होत होतं! जीवनाचा घोडा कीर्तीच्या महाद्वारात कुठंतरी लचकत होता! पराभव! पहिला पराभव! परिस्थितीनं निर्माण झालेला! कसाही असो; पण माघार म्हणजेही पराभवच! कर्ण–पराभव! पराभवी कर्ण – काही–काही सुचत नव्हतं. सुचलं तरी पटत नव्हतं! आता दुर्योधनाला काय वाटेल? कुठल्या शब्दांत तो आपलं स्वागत करील? दुर्योधन! त्याची आठवण होताच मी वायुजिताचे वेग एकदम आखडले. आम्ही विश्रांतीसाठी थांबलो होतो तो ओढा आला होता! मी मागं वळून पाहिलं. दौडणाऱ्यांत दुर्योधन कुठंच दिसत नव्हता! माझ्या छातीत भयाची एक विचित्र सणक येऊन गेली. हजारो गंधर्वांत, युद्धाच्या धामधुमीत दुर्योधन मागं एकटाच सापडल होता! त्याचं काही बरं–वाईट झालं तर! हस्तिनापुरात कोणत्या तोंडानं परतणार होतो मी?

"अरिष्टसेन, युवराज मागं एकाकी राहिला! परतवा घोडे!" सर्वांना थांबवून मी पुन्हा द्वैतवनाकडे हात उंचावला.

"अंगराज, गंधर्वसेना अफाट आहे. राजनगरात जाऊन पुन्हा ससैन्य परतू या! नाहीतर – "

"नाहीतर काय?"

"नाहीतर आपली वार्ताही हस्तिनापुरात कुणाला कळणार नाही!"

त्याचं म्हणणं योग्य होतं. काय करावं ते समजत नव्हतं. उलटून द्वैतवनाकडे मागं परतावं, तर कुणीच हस्तिनापुराला परतण्याची शक्यता नव्हती. राजनगर गाठावं तर तेही अजून कितीतरी योजनं दूर राहिलेलं! ओढ्याकाठी त्याच ऐनवृक्षाखालच्या काळ्या पाषाणावर मी बसलो. अरिष्टसेनाला राजनगराकडे पिटाळून सैन्य आणविल्याशिवाय काहीच करता येणार नव्हतं. त्याच्या समवेत नगरात जाऊन शोभा करून घेण्यातही अर्थ नव्हता. अरिष्टसेनाला राजनगराकडे पिटाळला. धड द्वैतवनात नाही, धड राजनगरात नाही, अशा मध्येच अडकून पडलेल्या माझी अवस्था अतिशय बिकट झाली. क्षणन्क्षण महत्त्वाचा होता. मेंदूची भृशुंडी विचारांचे पाषाण फेकत होती. मस्तक घट्ट पकडून मी बसून होतो! असाह्यता! असाह्यता ही क्रूर मांजरासारखी असते. माणसाला ती उंदीर करते. धड मरूही देत नाही आणि जिवंतही सोडत नाही. आज चित्रसेनाचं रूप घेऊन ती अकल्पितपणे माझ्या समोर उभी होती!

अरिष्टसेनाला जाऊन अर्धा–एक घटका झाली. दुर्योधनाचा ठिकाणा नव्हता. आता थांबण्यात अर्थ नव्हता. उठून हातात वायुजिताचे वेग घेऊन मी एकटाच द्वैतवनात शिरू लागलो! कोणत्याही अश्वसादानं माझ्याबरोबर मरणाच्या महाद्वारात शिरावं असं मला वाटत नव्हतं! दुर्योधनाला गंधर्वसेनेच्या हातातून मृत्यू येणार असेल, तर कर्णालाही स्वत:साठी तोच मृत्यू मान्य होता! मागं वळूनही न पाहता मी परत द्वैतवनात शिरण्यासाठी घोड्याच्या पाठीवर झेप घेतली! माझं मन आता शांत आणि बळकट होतं. कसलीच खळबळ त्यात नव्हती. मंद–मंद पावलं उचलत वायुजितही जड मनानं चालू लागला. तो घनदाट झाडीतून आत घुसणार तोच दुर्योधन बाहेर आला! त्याचे दोन्ही हात रामेटयाच्या फुलांच्या चिवट वेलींनी करकचून बांधले होते. आयुष्यात प्रथमच मी त्याचं मस्तक खाली गेलेलं पाहत होतो! सत्य हेसुद्धा कधी–कधी कल्पनेपेक्षा भयानक असतं! त्याच्या अंगावरची राजवस्त्रं जागजागी फाटली होती. खुरटत, पाय ओढत तो

कसातरीच चालत येत होता. आयाळ कापलेल्या सिंहासारखा!

"मित्रवर!" तो सुरक्षित असलेला पाहून आनंदानं घोड्यावरून खाली उडी टाकून त्याला मिठी मारताना मी मोठ्यानं ओरडलो. तरीही त्याची मान वर झाली नाही. घाईघाईनं त्याच्या हातांभोवतीच्या वेलींचा गुंता सोडविताना त्याला समाधान वाटावं म्हणून म्हणालो, "तुला मुक्त करण्यासाठीच मी निर्धारानं परतलो होतो आणि तुला शोधीत होतो." तरीही तो आनंदानं उचंबळून आला नाही. त्याची झाडाच्या चिंबून वाकलेल्या फांदीसारखी खाली गेलेली मान वर उंचावली गेली नाही. पाषाणमूर्तीसारखा तो माझ्यासमोर निःशब्द उभा होता. दुर्योधन! योद्धयांच्या साम्राज्यातल्या गदादंडासारखा ताठर वीर, पण तोही देठ मोडलेल्या कमलपुष्पासारखा मान टाकून उभा होता. त्यानं माझ्या एकनिष्ठ मित्रत्वाची शंका घेतली होती की काय? तो हे कर्णाचं पलायनच मानीत होता की काय?

"अंगराज, मी आता हस्तिनपुराकडे परत येणार नाही. या झाडाखालीच आसन घालून मी माझे प्राण सोडणार आहे!" त्याचा प्रत्येक शब्द पायांत अवजड साखळदंड बांधल्यासारखा जडशीळ वाटत होता.

"काय? काय झालं? राजाचे प्राण म्हणजे केव्हाही मृत्यूच्या महानदीत सोडावी अशी नौका नसते, हा राजधर्म तू विसरलास की काय?"

"कसला राजधर्म? कोणता राजा? ज्याला जगात मानानं जगता येत नाही तो कसला राजा?"

"काय झालं? चित्रसेनानं, तू एकटा सापडलास म्हणून तुझी मानखंडना केली असेल तर मी त्याला...."

"नाही कर्ण, चित्रसेनानं माझं मस्तक धडावेगळं करून ते पायांखाली रगडलं असतं, तरी तो रणांगणातील वैभवशाली मृत्यू मी हसतमुखानं स्वीकारला असता. पण – पण साक्षात शत्रूच्या हातून जीवनाची भिक्षा घेऊन मी हा अशा बद्धहस्त अवस्थेत परतलो आहे. वीराच्या मरणाहून वीरत्वाचं मरण भयानक असतं. मी राजा नाही! गदावीर नाही! मानानं जगणारा सामान्य सैनिकही नाही! तू आता सोडलेल्या वेलींच्या पानांइतकंही माझं जीवन आता भारदस्त राहिलेलं नाही!"

"का – असं का बोलतोस? कुणी तुला जीवनाची भिक्षा दिली? तू ती कशी घेतलीस?"

"तुम्ही सर्व जाताच मी एकटा पडलो. गंधर्वसेनेनं मला वेढलं. एकाच वेळी गंधर्व मला सहस्त्रांनी भिडले. त्यांनी माझी शस्त्रं हिरावून घेतली आणि दोन्ही हात वेलींनी बांधून मला बंदिस्त केलं. जवळ–जवळ सर्व गंधर्व सरोवर सोडून विजयाच्या घोषणा करीत निघून गेले. चित्रसेन आणि शे–पाचशे पदाती मला घेऊन कुठंतरी चालले. एवढयात...."

"एवढ्यात काय झालं? कोण आलं?"

"अर्जुन! त्यानं कसलाही विचार न करता चित्रसेनाला आव्हान दिलं आणि... आणि त्याच्या गांडीव धनुष्यातून सुटणाऱ्या अखंड बाणांच्या वर्षावानं सरोवर भरून जाण्याची वेळ आली! चित्रसेन मला तसाच टाकून पळून गेला! हात बांधलेले होते नाहीतर मीच चित्रसेनाला थोपवून अर्जुनावर धावलो असतो! चित्रसेन जाताच तो माझ्यासमोर उभा राहिला. 'दादांच्या आज्ञेसाठी तुला मी मुक्त केलं आहे. परत

द्वैतवनाकडे येऊ नकोस.' त्यानं खोटया विजयाच्या दर्पात द्वैतवन आपल्या पित्याचं राज्य असल्याच्या ठसक्यात मला सांगितलं. त्याच्याबरोबर असलेल्या एका विरूप राक्षसपुत्रानं मला इथपर्यंत आणून सोडलं आहे. मला मुक्त करणाऱ्या अर्जुनानं माझी विटंबना व्हावी म्हणून या वेली अशाच ठेवल्या होत्या! सांग कर्णा, कशाला मी युवराज म्हणून नगराकडे परतू? पंख तुटलेल्या गरुडानं पर्वतशिखरांचा हव्यास कशाला धरावा? मी इथंच प्रायोपवेशन करणार आहे! जा तू!'' त्याच्या जखमी मनाचं रक्त शब्दांचं रूप घेऊन ओठाबाहेर ठिबकत होतं! इतकी तीव्र निराशा त्याच्या जीवनाला कधीच स्पर्शून गेली नव्हती. त्याचं मनगट वेलींच्या वळांनी आणि मग अर्जुनाच्या शब्दांनी काळंनिळं पडलं होतं! साक्षात शत्रूकडून जीवनाचं दान घेताना होणाऱ्या मरणप्राय यातना जाणण्यासाठी त्याच्यासारख्या हस्तिनापूरच्या सम्राटाचं मनच जवळ असायला पाहिजे! माझ्याजवळही त्याच्या सांत्वनासाठी योग्य शब्द नव्हते.

''तुला नगराकडे परतावंच लागेल. तेजाची अखंड आग ओतणाऱ्या सूर्यनारायणालाही कधी–कधी ग्रासून घ्यावं लागतं. ज्यातून निर्माण झाले ते ढगसुद्धा महासागरावर वेडया अहंभावानं कृपेची जलवृष्टी करताना तू पाहिले नाहीस काय? कोण कुणाला जीवनदान करणार? जरासंधाच्या सतरा आक्रमणांना कंटाळून मथुरा सोडून द्वारका गाठणारा श्रीकृष्ण काय जगानं पळपुटा ठरविला आहे? पितामह भीष्मांनी जिंकलेला जमदग्निपुत्र परशुराम काय पराभूत योद्धा मानला गेला आहे? ज्याला पराभवाचा फेरा चुकला नाही असा, नहुष महाराजांनी जिंकून पालखीला जुंपलेला देवराज इंद्र तुला माहीत नाही काय? क्षत्रिय प्रायोपवेशन करून मरत नसतात. समरांगणात तळपत्या सूर्यकिरणांत शरीरातील चैतन्यकिरण विलीन करण्यासाठीच त्यांचा जन्म असतो. घे.'' अरिष्टसेनानं आणलेल्या घोडयाचे वेग मी त्याच्या हाती दिले.

थोडया वेळानं दुर्योधन उमजला.

''कर्ण, नगरजन तुला 'सूतपुत्र ' म्हणतात ते तुझ्या अशा कल्पना ऐकताना कधीच खरं वाटत नाही. मी इथं कृमिकीटकासारखा मरणार नाही! चल!'' त्यानं घोडयावर घेप घेतली. मी सुटकेचा नि:श्वास टाकला. वायुजितावर स्वार झालो. आमची घोडी पुन्हा नगराकडे उधळली. त्यांच्या खुरांखाली धूळ उडत होती! पण वारा पडल्यामुळे ती सभोवतालच्या झाडाझुडपांच्या पानांवरच बसत होती! माझं मन शांत होतं! त्यात पराभवाची खंत नव्हती, पलायनाची रुखरुख नव्हती, यशस्वी माघार घेतल्याचं खोटं समाधानही नव्हतं! मागे मृगयेहून परतताना मी जितका स्थिरचित्त होतो तितकाच आताही होतो. उलट घोषयात्रेचा प्रसंग टळला याचं न आकलणारं विचित्र समाधान होतं.

नगरात आल्यानंतर जिभेवर संयम नसलेल्या दासांपैकी कुणाकडूनतरी 'अंगराज कर्ण युद्धातून पळाले' अशी कुजबुज होणार होती, पण आता मला त्याचीही पर्वा नव्हती. माझं मन मला सांगत होतं की, कसोटी पाहणाऱ्या अनेक प्रसंगांतील तो एक अविस्मरणीय प्रसंग होता. अकल्पितपणे घडलेला!

**

# सव्वीस

"अंगराज, आपण सभेसाठी सभागृहात यावं अशी पितामहांची आज्ञा आहे." महामंत्री विदुरांचा सेवक एका भूर्जपत्रावरचं आज्ञापत्र माझ्यासमोर धरून खाली मान घालून उभा होता! द्वैतवनातून राजनगरात परतल्याला आम्हाला एक दिवसही झाला नव्हता; तोच पितामहांनी स्वतःहून बोलावलेली ही पहिलीच सभा आमंत्रणाचं एक वेगळंच रूप घेऊन माझ्यासमोर उभी होती. ते आमंत्रण नव्हतं – आज्ञापत्र होतं! सभा महाराजांनी बोलावली नव्हती – पितामहांनी! आणि त्या भूर्जपत्रावर सभेचं प्रयोजनही लिहिलं नव्हतं! क्षणभर मनात संतापाच्या उफाळलेल्या भावनांनी गोंधळ घातला. ते भूर्जपत्र टराटर फाडून टाकावं म्हणून मी आडवं धरलं – पण त्यावर चिकटवलेलं, तलम वस्त्रावर विणलेलं, लहान आकाराचं चंदेरी धाग्याचं चंद्रबिंबांकित राजचिन्ह झळाळलं! ती कुरूंची चांद्रवंशीय आदरणीय राजमुद्रा होती. सर्वांनी मान नमवावी अशीच त्या राजमुद्रेची परंपरागत ख्याती होती. व्यक्ती कितीही श्रेष्ठ असेल; पण राजमान्य संकेतापुढं तिला नमावंच लागतं. मी माझा बेत बदलला.

"जा तू." त्यानं भूर्जपत्रासाठी आणलेल्या तबकातील लाकडी बैठकीत बसविलेल्या मेणाचा गोळा घेऊन त्यावर आज्ञापत्र पोहोचल्याचा संकेत म्हणून मी माझ्या तर्जनीतील अंगठीचा ठसा उमटविला. गोळा पुन्हा तबकात घेऊन, अभिवादन करून तबक सावरीत तो निघून गेला.

पितामहांनी बोलाविलेली पहिलीच राजसभा! त्यासाठी मला आज्ञापत्र! काय असावं पितामहांच्या मनात? राजवस्त्रं अंगावर वर चढविताना पर्वतशिखरावर कोसळलेल्या या पावसाचं पाणी अनेक ओघळांनी वाट मिळेल त्याप्रमाणं धावत सुटतं, तसं मन अनेक मार्गांनी धावत होतं. सभेचं कारण काय तेच समजत नव्हतं.

नित्याप्रमाणं सभागृहात जाण्यापूर्वी मी त्याही दिवशी राधामातेची चरणधूली मस्तकी घेतली. दुर्योधनासमवेत सभासदांनी भरलेल्या सभागृहात प्रवेश केला. सर्व कुरुयोद्धे उपस्थित होते, पण सभा कशासाठी आहे ते कुणालाच माहीत नव्हतं. सभागृह भरताच कामकाजाच्या नियमाप्रमाणं प्रस्तावनेसाठी म्हणून अमात्य वृषवर्मा बोलू लागले, "आजची राजसभा पितामहांनी बोलाविली आहे. काही कुरुयोद्धयांना ते भविष्यातल्या धोक्याची गंभीर सूचना देऊ इच्छितात. त्यांचा प्रत्येक शब्द सर्वांना शिरसावंद्य आहे. ते काय सांगणार आहेत ते सर्व योद्धयांनी ध्यानपूर्वक ऐकावं! कुणाचीही मानखंडना करावी, हा त्यामागचा उद्देश नाही. पितामहांच्या गगनभेदी पराक्रमाचं आणि हस्तिनापूर राज्यासाठी त्यांनी केलेल्या अजोड त्यागाचं वर्णन करण्याची ही वेळ नव्हे, तरीही आपल्या राज्याचा धाक त्यांच्या ध्वजदंडासारख्या जीवनामुळे आर्यावर्तात वृद्धिंगत झाला आहे, हे कुणीच विसरू नये! या सभागृहात ते सर्वांत ज्येष्ठ वृद्ध आहेत. वृद्धांचे अनुभवी बोल हे औषधी वनस्पतीसारखे असतात! मनाच्या विकृत कल्पनांच्या व्याधी ते निपटून टाकतात. द्वेष ही एक अशीच व्याधी आहे! या व्याधीच्या मृगजळामागं धापावताना देवादिकांची वैभवी राज्यंसुद्धा धुळीला मिळाली आहेत! आपसांतील भांडणं

म्हणजे तर आपल्याच दातांखाली सापडलेली आपली जीभ! जे सुज्ञ आणि द्रष्टे असतात ते अशी जीभ कौशल्यानं दातांच्या कैचीतून सोडवून घेतात. त्यासाठी प्रेम आणि संयम यांची आवश्यकता असते, कारण द्वेषातून कपट, कपटातून क्रोध आणि क्रोधातून युद्ध जन्म घेत असतं! युद्धांनी प्रश्न कधीच मिटत नसतात – उलट त्यांतून नवे जटिल प्रश्न निर्माण होतात. म्हणूनच प्रेम आणि संयम हाच खरा धर्म आहे. आज आपण सर्वांनीच तो डोळसपणे पाळला पाहिजे. नाहीतर – नाहीतर उद्याचा काल द्वेषांचे पलिते नाचवीत सरसहा सर्वांनाच दग्ध करून टाकील! यासाठीच पितामहांच्या आजच्या सूचना निर्वाणीच्या आणि कळकळीच्या आहेत, हे सर्वांनी शांतपणे समजून घ्यावं –" सुकलेल्या ओठांवरून जीभ फिरवीत ते खाली बसले. त्यांच्या शब्दाशब्दाला धार होती. इतकं भेदक ते यापूर्वी कधीच बोलले नव्हते.

सभागृहात क्षणभर भयाण शांतता पसरली. अमात्यांच्या बोलण्यावरून पितामह काय बोलणार याची थोडीशी कल्पना सर्वांना आली.

पितामह उठून उभे राहिले! आज प्रथमपासून त्यांनी कुरूंचा राजदंड महाराजांच्या हाती देण्याऐवजी आपल्याच हाती घेतला होता! त्यांचं शरीर नेहमी बोलताना थरथरतं तसं थरथरत नव्हतं. हिमालयाच्या उन्नत शिखरासारखे ते अचल उभे होते. क्षणात त्या शिखराच्या मुखातून शब्दांच्या गंगायमुना सभागृहातल्या सर्व योद्धयांवर आदळू लागल्या.

"वीरांनो, मी ही बोलावलेली माझ्या आयुष्यातील पहिलीच सभा आहे – कदाचित शेवटचीही असेल! मी तुमच्यासमोर उभा आहे; तो कुरूंचा योद्धा म्हणून नव्हे, पितामह म्हणून नव्हे, परशुरामशिष्य भीष्म म्हणून नव्हे, जे राज्य मी कधीच उपभोगलं नाही त्या राज्याचा सेवक म्हणूनही नव्हे; तर तुमच्यासारखाच, जीवनाचा संघर्ष – एका डोळ्यात विजयाचे आनंदाश्रू आणि दुसऱ्या डोळ्यात पराभवाचे दु:खाश्रू घेऊन पाहिलेला एक सामान्य कुरू म्हणून उभा आहे! वयाच्या कसोटीनं मी हा संघर्ष तुमच्यापेक्षा अधिक काल पाहिला आहे. माझ्या जीवनाचे सर्व निकटवर्ती साक्षीदार अनंताच्या न संपणाऱ्या प्रवासाला निघून गेले आहेत, मी मागं रेंगाळतो आहे – एवढ्यासाठीच की, नियतीनं मानवी मनाची घडण किती विचित्रपणे केली आहे ते तुम्हाला तुमच्याच भाषेत फोड करून सांगावं म्हणून! आज तो दिवस उगवला आहे!

"लक्षात ठेवा, माणसाला सर्वांत क्रूर करतो तो त्याचा स्वार्थ! भुकेनं व्याकूळ झालेला सिंह आपली भूक शमविण्यासाठी एखादा प्राणी मारून खातो, पण तो कधीच दुसरा सिंह नाही मारून खात! स्वार्थानं व्याकूळ झालेला माणूस मात्र एक नाही, दोन नाही, लक्षावधी माणसं मारण्यासही मागंपुढं पाहत नाही! सिंहाला क्रूर म्हणण्याचा कोणताच नैतिक अधिकार माणसाला नाही! विधात्यानं निर्माण केलेल्या जीवसृष्टीतील माणूस हाच सर्वांत क्रूर प्राणी आहे! तरीही विद्वान लोक मानवाला सुसंस्कृत मानतात. मानव श्रेष्ठ प्राणी आहे, पण केव्हा, जर तो स्वार्थ टाकून इतरांसाठी रक्ताचा कणन्कण झिजवीत असेल तर! नाहीपेक्षा मानव धर्म, भवितव्य, राज्यकारभार यांच्या कितीही वल्गना करीत असो त्या कवडीमोलाच्याच आहेत! माणसाला सगळ्यात मोठा शाप कोणता असेल तर तो स्वार्थाचा!

"भयाण स्वार्थानं पछाडलेला माणूस कष्ट सोडून कपटाचा आश्रय घेतो! जगातील सर्वच माणसं कष्ट न करता केवळ कपटी बुद्धी चालवून, स्वार्थालाच

कुशलपणा हे नाव देऊन जगताहेत असे दृश्य समोर आणा! काय दिसेल? या रमणीय पृथ्वीचा माणसामुळेच निर्माण झालेला नरक! अशा स्वार्थाचा वेळीच निषेध केला पहिजे. म्हणून मी ही सभा बोलाविली आहे.

“प्रजेचं भवितव्य तिच्या राजावर अवलंबून असतं. तुमच्या आणि माझ्या – सर्वांच्याच दुर्दैवानं अशा कपटमय स्वार्थानं आपलं राज्य आज पुरतं घेरलं आहे! कुणी कुणाला दोष द्यावा? सर्व जणच मार्ग चुकलेले! यांतला पहिला आणि अक्षम्य दोष आहे तो तुमच्या राजाचा – या धृतराष्ट्राचा! आपल्या प्रिय बंधूनं – पांडूनं – दिग्विजयाच्या भरारीनं हे राज्य वैभवाला नेलं, हे तो आज सरळ–सरळ विसरला आहे! त्यानं कधी एका शब्दानही आपल्या पुत्रांना सावरलेलं नाही. सत्तेच्या अभिलाषेनं माणसं अंध होतात, असं मी ऐकत आलो होतो, पण ते खोटं ठरविणारं सत्य तुमच्या राजाच्या स्वरूपात समोर उभं आहे! तो दुर्वशात् अंध असलेला राजा सत्तेच्या अभिलाषेनं डोळस बनला आहे! आपल्या पुत्राला पुढं करून, त्याच्या राज्याभिषेकाची अशक्य स्वप्नं साकार झालेली तो भर दिवसा पाहतो आहे! धन्य आहे त्याच्या राजनिष्ठेची!

“अमात्य वृषवर्मांनी सांगितलं की, वृद्धांचे बोल औषधी वनस्पतीसारखे असतात – मी म्हणतो आहे ती वनस्पती कितीही गुणकारी असली, तरी तोपर्यंत तिचा उपयोग नाही जोपर्यंत व्याधिग्रस्त काही पथ्याचं काटेकोरपणे पालन करीत नाहीत! सरळ आणि स्पष्ट शब्दांत मी विचारतो की, धृतराष्ट्र आता तरी आपल्या अंतर्मनाचे चक्षू उघडणार आहे काय? त्याचा पुत्र दुर्योधन आता तरी काही राजकीय पथ्यं पाळणार आहे काय? तुम्ही सर्व जण कधीतरी सत्यासत्याचा शांत मनानं विचार करणार आहात काय? कुठंतरी थांबणार आहात काय?

“आपण ज्या सभागृहात बसला आहात त्या सभागृहानं किती अभिमानाचे प्रसंग पाहिले आहेत, याचं कुणालातरी आज स्मरण उरलं आहे काय? महाराज हस्तींचं हे हस्तिनापूर शेकडो वर्षं आपलं मस्तक उंचावून आर्यावर्ताचं नेतृत्व करीत आलं आहे. हे राजसिंहासन तपतिपुत्र कुरू, शुभांगीपुत्र विदुरथ, संप्रियापुत्र अनश्नन, अमृतापुत्र परीक्षित, सुवेषापुत्र भीमसेन, सुकुमारीपुत्र प्रतीप आणि माझी महामाता सुनंदा यांचे पुत्र महाराज शंतनू यांसारख्या बलदंड आणि विशालहृदयी वीरांनी भूषविलं आहे. त्यांच्या कीर्तीचा डिंडिम, दिग्विजय करून, पांडूनं दुमदुमून टाकला आहे... आणि आज! आज मात्र प्रत्येक प्रसंग आम्हाला खाली मान घालायला लावतो आहे. कुरुस्नुषा द्रौपदीची याच सभागृहात झालेली क्रूर विटंबना कुठल्या पुरुषार्थात बसते? द्यूताच्या फाशावर पांडवांनीच वसवलेलं संपन्न राज्य घशात घालून त्यांना वनवासावर देशोधडीला पाठविणं हे कोणत्या राजधर्मात बसतं? इतकं करूनही दुर्योधन शांत झाला आहे काय? त्यासाठी या धृतराष्ट्रानं कधी तोंड उघडलं आहे काय? नाही! म्हणूनच आज मी निर्वाणीचं बोलतो आहे.

“दुर्योधन, दु:शासन, विकर्ण, चित्रसेन, दु:सह, जय, सत्यव्रत, दुर्मर्षण, पुरुमित्र आणि विवंशती या महारथी धृतराष्ट्रपुत्रांनो, शकुनी, अश्वत्थामन्, जयद्रथ या अतिरथ्यांनो, आपण कुठं थांबणार आहोत की नाही?

“दुर्योधना, द्वेषाचा महावृक्ष अशी स्वत:ची अपकीर्ती करवून घेण्यापेक्षा, सामर्थ्यशाली गदावीर अशी कीर्ती संपादन कर! पांडवांचा विषय मस्तकातून काढून टाक, कारण कालच तू द्वैतवनातून जिवानिशी सुटला आहेस तो केवळ अर्जुनामुळं... कर्णामुळं

नव्हे! जो हेतू मनात ठेवून तू द्वैतवनात गेला होतास तो चित्रसेन गंधर्वानं उधळून लावला आहे. कर्ण समरांगणातून पळाला आहे! ज्याच्या सामर्थ्याचा तुला खोटा विश्वास वाटतो त्या कर्णानं असा कोणता नेत्रदीपक पराक्रम आपल्या आयुष्यात आजवर केला आहे? अर्जुन हा अजिंक्य धनुर्धर आहे. किरात रूपातल्या साक्षात शंकराचा त्यानं पराभव केला आहे. खांडववनात इंद्रप्रस्थ राज्य स्थापताना खवळून आलेल्या वरुणालाही त्यानं जिंकलं आहे – त्याच्याकडून अक्षय्य बाणांच्या भात्यांनी युक्त गांडीव धनुष्य मिळवलं आहे. स्वयंवरातला मत्स्यभेद अर्जुनानंच साधला होता – आणि काल तर स्वत:चे प्राण संकटात घालून गंधर्वाच्या हातून मुक्त करून त्यानंच तुला प्राणदान दिलं आहे! अर्जुनाला जिंकणं सोपं नाही. ज्याचा तुला अभिमान वाटतो तो कर्ण अर्जुनाच्या पासंगालाही पुरणार नाही! म्हणूनच त्याचा आता महारथी–अतिरथी यांच्या नामावलीत मी निर्देशही केला नाही!

"युवराजा, सर्व बऱ्यावाईट कल्पनांचा उगम मनातून होत असतो. एक वेळ सर्व जग जिंकणं सहज शक्य आहे, पण मन जिंकणं अत्यंत कठीण आहे! म्हणूनच खरा वीर असशील तर तुझ्या मनाचा – अर्जुन प्रथम जिंक! राज्यलोभाची कल्पना मनातून काढून टाक. पांडव आणि कौरव यांनी परस्परांना मदतीचा हात दिला तरच हे राज्य टिकेल. अजून वेळ गेली नाही, सेनापतींना पाठवून पांडवांना वनातून समजावून सगौरव परत आण!

"तसं होणार नसेल तर केवळ हा राजदंड आपल्या हाती असावा या हव्यासानं भडकून तू एकापाठोपाठ एक भयानक क्रूर अशा पांडवनाशाच्या योजना आखतो आहेस, त्या परिणामी या सभागृहातल्या शत–शत योद्धयांच्या सिंहासारख्या प्राणांशी बेतल्याशिवाय राहणार नाहीत! धेनू, धाम, धन, धान्य, धरती या सर्वांपेक्षा वीरांची धैर्यशील जीवनं शतमोलाची असतात! कारण राज्याची धवल कीर्ती वधारण्याचं कार्य तेच करीत असतात.

"दुर्योधन, तू या सर्व वीरांना मृत्यूच्या महानदीकडे नेत आहेस. भीमाला बालपणीच विष घालण्याची कल्पना दुर्योधना, तुझीच होती! वारणावतावर लाक्षागृहात त जाळून कुंतीसह पांडवांना दग्ध करण्याचं कपट तुलाच सुचलं! राज्य मागणाऱ्या पांडवांना खांडववनाचं दान देण्याचं लोकविलक्षण औदार्य तुझंच! फाशांच्या कवड्या फेकून उचंबळणाऱ्या कुटिल शकुनीच्या हातावर टाळीसाठी पडला तो सर्वांत प्रथम तुझाच हात! ज्या स्त्रीच्या चरणांची धूल मस्तकी धरावी त्या साध्वी द्रौपदीला उघडी मांड दाखविणारा गदावीर तूच! ज्या जिभेनं वेदमंत्र म्हणत अनाथांना दान द्यावं, त्या जिभेनं सूर्यप्रकाशाइतक्या पवित्र राजमाता कुंतीला कलंकित म्हणताना भर सभेत खदखदलास तो तूच! आणि – आणि काल या पराक्रमशून्य सूतपुत्र कर्णाच्या र् या हातात हात घालून इंद्रप्रस्थाच्या दासी घेऊन पांडवांना डिवचण्यासाठी जाऊन तेथून वेलींनी हात बांधून परतण्याची नामुष्कीची जलक्रीडा केलीस तीही तूच!

"दुर्योधन – कर्ण – हा राजदंड – हा राजदंडच जर तुम्हाला मदांध बनवून, कुरूंचं उद्याचं वैभव असलेल्या या शत–शत वीर योद्धयांच्या प्राणांशी क्रूर द्यूत खेळण्यासाठी पुन:पुन्हा इतका प्रवृत्त करीत असेल, तर – तर हा राजदंड सर्वांच्या प्राणांपेक्षा किती क्षुद्र आहे, हे तुमच्यासह सभासगृहातल्या सर्व योद्धयांना आज स्पष्टपणे दाखविण्यासाठी मी शेवटचा कुरू, या राज्याचा खरा उत्तराधिकारी – शंतनुपुत्र भीष्म –

तो असा फेकून देतो आहे!!''

थरथरता हात उंचावून त्यांनी सुवर्णाचा राजदंड सभागृहाच्या मध्यभागी चक्क फेकून दिला! खालच्या संगघडीवर खणखणाट करीत तो घरंगळत दुर्योधनाच्या पायांजवळ जाऊन थांबला! अंगावर वीज कोसळल्याप्रमाणं दुर्योधनासकट सर्व योद्धे ताडकन उठून उभे राहिले! थिजल्या मनानं एकटा मीच खाली बसून राहिलो होतो. राजदंड फेकणारा तो वृद्ध योद्धा उंच देवदार वृक्षासारखा आता थरथरत होता. त्याच्या मस्तकावर आठयांच्या फटीत घामाचे बिंदू डबडबले होते!

आखाड्यातील लक्षयवेध, कांपिल्यनगरातील मत्स्यभेद, इंद्रप्रस्थातील शिशुपालवध आणि – आणि याच सभागृहातील द्रौपदीचं वस्त्रहरण यांतला कोणताच प्रसंग आजच्याइतका मला अंगावर शहारे आणणारा वाटला नव्हता!

मंद–मंद स्पंद घेणाऱ्या त्या राजदंडाकडे पाहताना कुठूनतरी एक विचारांचा स्पंद माझ्या मनात तरळला. खाडकन उठून पुढं होत तो राजदंड हाती घेऊन मी हात उंचावला! संमिश्र भावनांच्या विविध विध छटा सभासद–योद्ध्यांच्या डोळ्याडोळ्यांतून ओसंडत होत्या. 'मी आता काय करणार?' असा प्रश्न ते मूकपणे मला विचारीत होते.

''खाली बसा!'' मी शब्दांची गदा फिरविली! ओहोटीचा समुद्र खाली जातो तसे ते खाली बसले! माझ्या शरीरातील रक्ताचे कण उधळले होते. नेत्रकडा यज्ञकुंडासारख्या पेटल्या होत्या. कानांच्या रणक्षेत्रावर शब्दांचे शंख कुणीतरी कंठरवानं शिरा ताणून फुंकत होते – 'कर्ण अर्जुनाच्या पासंगालाही पुरणार नाही! पराक्रमशून्य, पराभूत, पलायन करणारा कर्ण! असा कोणता नेत्रदीपक पराक्रम सूतपुत्र कर्णानं केला आहे! अर्जुन अजिंक्य धनुर्धर आहे!'

कानावर एक हात ठेवून उंचावलेला हात हलवून मी शक्य तितक्या भेदक स्वरात म्हणालो –

''मी पराक्रमशून्य नाही! मी पलायन केलेलं नाही! कर्ण अर्जुनाच्या पासंगालाही पुरणार नाही, असं म्हणणाऱ्या पितामहांना मी दाखवून देईन की, तो अर्जुन कर्णासमोर उभासुद्धा राहू शकणार नाही! पराक्रमाची परीक्षा म्हणजे युद्धातील विजयांची संख्या हीच असेल तर, अंगराज म्हणून नव्हे, राजा दुर्योधनाचा मित्र म्हणून नव्हे, तुम्हा कुरूंच्या सभागृहातला एक योद्धा म्हणूनही नव्हे; तर सूतपुत्र राधेय – कर्ण म्हणून हा राजदंड मी सगळ्या आर्यावर्तात अजिंक्य करून मिरवून आणीन! जेवढे देश आणि जेवढे राजे अमात्य वृषवर्मांना माहीत आहेत त्या सर्वांना या पवित्र राजदंडासमोर नतमस्तक करीन! वर्षाऋतू संपताच कुणी केला नाही अशा दिग्विजयासाठी, मी हा राजदंड घेऊन नगराच्या सीमेबाहेर पडेन! ययातीमहाराजांच्या या हस्तिनापुरात यशस्वी होऊनच पुन्हा पाऊल टाकीन... नाहीतर – नाहीतर समरांगणात बलिदान करून घेईन! पण – पण कुणाचाही अपसमज होऊ नये म्हणून या भरल्या सभागृहात मी पुन्हा एकदा निक्षून सांगतो की, विजयाच्या कोणत्याही धुंदीनं उन्मत्त होऊन मी श्रीकृष्णाच्या मथुरा व द्वारका या राज्यांवर चढाई करणार नाही! मरणाच्या आणि पराभवाच्या भयानं मी ही घोषणा करीत नाही! पण मी ती का करतो आहे ते सांगावयाची जरुरी नाही! ही घोषणा केवळ श्रीकृष्णासाठी नव्हे! पुन्हा कुणीच कर्णाची आणि अर्जुनाची तुलना करण्याचा यत्न करू नये. माझं आखाड्यातलं द्वंद्वाचं आव्हान आजही तसंच जिवंत आहे! श्रीकृष्ण

वगळला, तर अर्जुन म्हणजे तडा गेलेलं नादशून्य खड्ग आहे! तसंच पितामहांनी युवराज दुर्योधनावर केलेले आरोप एकांगी आहेत!

"बालपणीच चार–चार दुर्योधन–बंधूंना जलक्रीडेच्या नावाखाली प्राण जाईपर्यंत पाण्याखाली कोंडणारा आडदांड भीम पितामहांना कधी दिसला नव्हता काय? आखाड्यात मला 'हाती आसूड घे' म्हणून खदखदून हसणाऱ्या भीमाच्या विकट हास्याचं त्यांना विस्मरण झालं आहे काय? राजसूय यज्ञात युवराज दुर्योधनाला पांडवांच्या पशूंची गणती करून त्यांची काळजी राखण्याचं काम सांगताना आजची त्यांची न्यायप्रियता कुठं गेली होती? 'अंध पित्याचे पुत्रही अंधच असतात' असं म्हणणारी पांचाली त्यांना माहीत नाही काय? आणि काल – काल अर्जुनानं स्वत: होऊन राजा दुर्योधनाला गंधर्वांपासून मुक्त केलेलं नाही, तर युधिष्ठिराची केवळ आज्ञाच पाळली आहे... नाहीतर त्यानं दुर्योधनाच्या हातांभोवतीच्या वेली स्वत: सोडल्या असत्या. मला वाटतं कौरव आणि पांडव ही दिवस–रात्रीसारखी एकत्र न येणारी अशक्यता आहे.

"पितामह म्हणतात, हा राजंदड क्षुद्र आहे! माझ्या मते, हा राजदंड स्वर्गाच्या राज्याहूनही श्रेष्ठ आहे! या सभागृहातल्या शत–शत योद्ध्यांच्या शत–शत जन्मांच्या प्राणांपेक्षाही! स्वत: त्यांनीच या राजदंडाच्या निष्कलंक प्रतिष्ठेसाठी आपल्या गुरूशी – जमदग्निपुत्र परशुरामांशी घनघोर युद्ध केलं होतं याचं विस्मरण त्यांना झालं असेल, पण आम्हाला... किमान मला तरी नाहीच नाही! आणि वडीलकीच्या श्रेष्ठ नात्यानं भवितव्यात सर्वप्रथम त्यांनाच या राजदंडासमोर नम्र व्हावं लागणार नाही असं तरी कोण म्हणणार आहे?

"तसं माळरानावर गवताचं घनदाट बन माजलेलं असतं – पण देवमूर्तीवर चढविल्या जातात त्या दूर्वाच! तसे जगात अनेक पर्वत आहेत, पण हिमालय तो हिमालयच! तशा स्त्रिया अनेक असतात, पण चरणधूली घेतली जाते ती मातेचीच! तसे या हस्तिनापुरात वीर आहेत... पण... पण पितामह एकटेच हा राजदंड फेकू धजतात! आकाशात तसे अनेक तेजोगोल आहेत, पण सूर्यदेव एकटेच! तसा – अगदी तसाच हा राजदंड एकमेव श्रेष्ठ आहे! आणि म्हणूनच प्राण पणाला लावून पुढं होऊन मी तो उचलला आहे! तो कधीच खाली पडणार नाही. तसा प्रसंग आलाच तर खड्गांना खड्ग भिडतील, गदांचे स्फुल्लिंग उडतील, बाणांचा पर्जन्य पडेल, चक्रांचे आरे फिरतील, रक्ताच्या नद्या वाहतील, पण हा राजदंड त्यावरही तरंगतच राहील! कारण तो कुरूंचा आहे, हस्तिनापूरचा आहे, परंपरेचा आहे! केवळ तेवढ्यासाठीच मी तो हाती धरला आहे. ज्या निर्वाणीच्या निराशेनं पितामहांनी तो खाली फेकला, त्याच निर्वाणीच्या निकरानं, त्यांच्याच चरणाला हात लावून मी तो गगनाइतका उंच उभारीन! वर्षाऋतूनंतर!" माझं सर्वांग थरथरत होतं! मी काय बोललो, कसा बोललो, किती बोललो याचं मला काहीच भान नव्हतं. शरीराची धाव तापून उकळत होती!

"अंगराज कर्णाचाऽऽ!"

"विजय असो!"

सभागृहाचं छत योद्ध्यांच्या घोषणांनी हादरत होतं. माझा हात संमिश्र भावनांच्या स्पंदनांनी थरथरत होता!

"शांत व्हा!" मी राजदंड घेऊन उंचावलेल्या हाताला कुणाचातरी हात बिलगला होता. तो दुर्योधन होता! दुसऱ्या हातानं तो सर्वांना शांत होण्याचा संकेत करीत होता.

सर्व जण शांत होताच तो थोडकंच; पण नेमकं बोलला.

"दिग्विजयासाठी सीमेबाहेर पडणाऱ्या माझ्या परममित्र वीर कर्णामागं मी कुरूचं चार अक्षैहिणी चतुरंगदल सशस्त्र सैन्य उभं करीन! या सैन्यात सत्याऐंशी सहस्र चारशेऐंशी रथ आणि तितकेच हत्ती, दोन लक्ष सहा सहस्र चारशे चाळीस निधडे अश्वसाद आणि चार लक्ष सदतीस सहस्र चारशे लढाऊ पदाती असं एकूण आठ लक्ष, चौऱ्याहत्तर सहस्र आठशे इतकं बलाढ्य सैनिक सामर्थ्य असेल! या वर्षाऋतूनंतर नद्यांचं पाणी ओसरेल आणि कुरूचा कीर्तिसमुद्र भरती पावेल! बस्स! पितामहांनी बोलविलेली ही पहिलीच राजसभा, मीही आज पहिल्यानंच समाप्त करतो आहे! सर्व निमंत्रित परत जाऊ शकतात." त्यानं माझ्या हातातील राजदंड आदरानं आपल्या हाती घेतला! आता तो त्याच्याच हाती राहणार होता.

■

# शोण

# एक

मुसळधार पावसानं राजनगरातील कोट, बुरूज, गोपुरं आणि कळस यांना झोडपायला सुरुवात केली. वर्षाॠतूच्या आगमनामुळे सैनिकांचे उघड्या पटांगणावरचे शूल, तोमर, परिघ, चक्र, गदा आणि खड्ग यांचे व्यायाम आपोआप बंद झाले. सगळ्या दिनक्रमांना शिथिलता आली. काही कृषिजन शेतांतील पिकांची मशागत करण्यासाठी पलाशवृक्षाच्या पानांची छोटी-छोटी छतं पांघरून जाताना सकाळी आणि संध्याकाळी परत येताना दिसू लागले. आषाढ, श्रावणमास मागं पडले. महापुराच्या लाल मळकट पाण्यानं गंगेचं पात्र दुथडी भरून घोंगावत धावू लागलं. तिच्या गर्जणाऱ्या लाटांवरून उडणाऱ्या तुषारांनी काठावरच्या ओदन पिकांची हिरवी-हिरवी पाती निथळून निघू लागली. माझं मनही माझ्या शूर बंधूच्या दिग्विजयाच्या प्रतिज्ञेनं समाधानाच्या भावनेनं ओथंबून आलं. राजवाड्यावर सर्वांमुखी एकच विषय होता. अंगराज कर्णांचा दिग्विजय! सर्व जण वाट पाहत होते ते गंगेचं पाणी कधी ओसरतंय आणि कधी तासात येतंय याची! दादा तर गवाक्षाच्या कवाडांजवळ उभा राहून घटकानन्घटका गंगेच्या लाटांची दिवसागणिक कमी होत जाणारी पातळी निरखीत होता. लोहागारात शेकडो लोहकार बाण, परशू, भाले, खड्ग यांची धारदार पाती घडविण्यासाठी भट्टया पेटवून रात्रंदिवस घणावर घण घालीत होते. पावसाळ्यात निर्माण होणाऱ्या अकूर आणि अकला रोगांपासून घोड्यांच्या खुरांना इजा होऊ नये म्हणून अश्वपाल त्यांवर औषधी वनस्पतींचा रस सोडून त्यांना जपत होते. टिकाऊ म्हणून सागवृक्षांच्या लाकडांच्या फळ्या कातून सुतार नौका घडवीत होते. मी स्वत: दादाच्या वायुजित घोड्याची काळजी घेत होतो.

आश्विन आणि भाद्रपद मास निघून गेले. पावसाची झड कमी आली. उफाळलेलं गंगेचं पात्र, सागराला आपल्या प्रेमाचं स्वैर दान देऊन परत तासात आलं. शेतांतील पिकांची रोपटी तरारली. झाडांच्या पानांवर होणारी जलबिंदूंची अविरत टपटप थांबली. शीळ घालणारा अवखळ वारा, त्याच शिळेचा आवाज शोधत कुठंतरी दूर निघून गेला. सगळी धरती हिरव्या लुसलुशीत अंकुरांच्या नवलाईचं वस्त्र पांघरून नटली. कार्तिक मास संपला आणि पक्षयांनी पंख झटकले. पाच मासांच्या दीर्घ वियोगानंतर सूर्यकिरणांनी राजवाड्याच्या धवल-शुभ्र शिखरांना पहिला स्पर्श केला! वर्षाॠतू संपला! फोफावलेल्या शेतांभोवती कवडे आणि भारद्वाज घुमू लागले.

एक दिवस मी आणि दादानं नदीचं पात्र पाहिलं. नौकांच्या साहाय्यानं आता ते ओलांडता येणं शक्य झालं होतं. राजवाड्यावरच्या घोड्यांनी अश्वशालेत खिंकाळत खुरांनी जमीन उकरून पायांखाली खड्डे करायला सुरुवात केली! दिग्विजयाला राजनगराबाहेर पडण्याचा शुभकाल आला! राजज्योतिष्यांना विचारून प्रस्थानासाठी मुहूर्त शोधण्यात आला. मार्गशीर्ष शुद्ध पंचमीचा दिवस नियुक्त झाला. कार्तिकातील शरीर गोठविणारी थंडी थोडीशी कमी झाली. मार्गशीर्ष उजाडला.

शुद्ध चतुर्थीच्या रात्री सर्व योद्धे, सैनिक, सारथी, भारवाहक, सेवक यांना तयार

राहण्याची आज्ञा देण्यात आली. माझं मन उत्साहाच्या कारंज्याखाली निथळू लागलं. दादा दिग्विजयासाठी सीमेबाहेर पडणार होता! लहानपणी सर्वांनी त्याला एका पाषाणाच्या सिंहासनावर बसविलं होतं! पाषाणासारखंच खंबीर राहून त्यानं अंगदेशाचं सुवर्णसिंहासन भूषविलं होतं. आणि आता - आता तो अखिल आर्यावर्ताचा दिग्विजय करून सर्व योद्धयांच्या मनांची प्रेमसिंहासनं जिंकणार होता. अंगराज! कर्ण! छे - माझा वसुदादा! वसुदादा आता देशोदेशींच्या राजांना दाती तृण धरून शरण यायला लावणार होता. या त्याच्या सर्व दिग्विजयात मीच त्याचं सारथ्य करणार होतो. शंभर राजपुत्र, शकुनीमामा, अश्वत्थामा, जयद्रथ, सेनापती यांपैकी कुणालाही समवेत न घेता तो एकटाच बाहेर पडणार होता. केवळ मलाच बरोबर घेऊन! तशी त्याची-माझी साथ जन्मजन्मांचीच होती. त्याच्या कानांत कुंडलं होती, शरीर सुवर्णवर्णाचं होतं, गाल जास्वंदीच्या फुलांसारखे होते, डोळे गर्द नीलवर्णी आणि दात सुवर्णमय होते, आणि मी मात्र शामवर्णी असावा याची चुकूनसुद्धा मला कधी खंत वाटली नाही. उलट लहानपणीचं त्याचं एक आश्वासन मी कधीच विसरू शकलो नव्हतो.

तो म्हणाला होता, "मीसुद्धा गरुडपक्षयासारखा उंच जाईन! इतका उंच की, तुला दिसणारही नाही!"

त्यानं म्हटल्याप्रमाणं त्याच्या जीवनातील ही दिग्विजयाची भरारी सर्वांत उंच ठरणार होती, कारण त्याचा आत्मविश्वासी स्वभाव मला आता पूर्ण परिचित झाला होता. मात्र त्याचा आत्मविश्वास उफाळून निघायला काहीतरी सबळ कारण असावं लागत होतं. राजसभेच्या निमित्तानं पितामह भीष्मांनी तेही निर्माण करून दिलं होतं. आता त्याच्या दिग्विजयाला कोणीच रोखू शकत नव्हतं. काही वाटेल ते घडलं असतं तरी म्हटल्याप्रमाणं कुरूंचा राजदंड आर्यावर्तभर अजिंक्य म्हणून मिरवूनच तो परतणार होता. शुद्ध चतुर्थीची रात्रसुद्धा आम्हाला आता युगासारखी वाटत होती. पुत्रभेटीसाठी तळमळणारी, पतिमीलनासाठी व्याकूळणारी स्त्री यापेक्षा युद्धासाठी समरांगणावर जाणारा वीर योद्धा हा अधिक उतावीळ असतो!

**

# दोन

आणि मार्गशीर्ष मासातील तो शुद्ध पंचमीचा क्रांतिकारक दिवस उजाडला! भारद्वाज पक्षयाच्या शुभसूचक दर्शनानं सर्वांनाच आनंद झाला. अश्वसाद, गजाती, पदाती, रथ आणि महारथी राजवाड्याबाहेरच्या पटांगणात शिस्तबद्ध उभे राहिले. सर्वांच्या पराक्रमाची साचलेली कोंडी आता फुटणार होती. देशोदेशी ती भ्रमण करणार होती. अंगराज कर्ण दिग्विजयासाठी आज कुरूंच्या हस्तिनापूर नगराबाहेर पडणार होते. बालपणी शिंपले गोळा करून ती संपत्ती राधामातेला अभिमानानं दाखविणारे आम्ही कर्ण-शोण आता सोनं, रूपं, हिरे, माणकं, मोती, प्रवाळ, गोमेद आणि वैदूर्य यांची गाडा भरून आणलेली संपत्ती तिच्या चरणांवर विनयानं अर्पण करणार होतो. तरीही ती दादाला म्हणणारच होती. “वसू, गंगेच्या पाण्यात कधी नाही ना उतरलास या दिग्विजयात?” साधी सरळ माणसं होतो आम्ही. परस्परांवर दारिद्रयात आणि वैभवात सारखंच प्रेम करणारी.

नगाऱ्याचे मंद-मंद पडसाद अगदी भल्या पहाटेपासून राजवाड्याच्या भव्य प्राकारात घुमत होते. पावसाळ्यात पेटिकेत ठेवलेला तलम वस्त्राचा, नहुष महाराजांपासून जतन केलेला, कुरूंचा त्रिकोणी राजध्वज महामंत्री विदुरांच्या हस्ते राजवाड्याच्या कळसावर पुष्पमालेसह चढविण्यात आला होता. सूर्यानं पूर्व दिशा उजळली आणि त्याच्या सोनेरी किरणशलाकेत तो भगवा ध्वज तळपू लागला. वायूबरोबर फडफडू लागला. तो त्या उंच राजवाड्याच्या कळसावरूनही आपली मान उंचावून दृष्टीच्या टप्प्यात येणाऱ्या सर्व राजांना सांगत होता – ‘सावधान! अभेद्य कवचाचा, कुंडलधारी, हस्तिनापूरचा वीर आता बाहेर पडला आहे. शरणागती नाहीतर रणांगणात बलिदान यापेक्षा तुम्हाला आता वेगळं भवितव्यच नाही. सावधान!’

भल्या पहाटेच उठून दादानं स्वत: सैन्याची पाहणी केली. अश्वसाद आणि गजाती यांना नद्या कशा ओलांडाव्यात याच्या सूक्ष्म सूचना दिल्या. गजदलातील हत्तींना वेढून त्यांना डिवचत-डिवचत शत्रूवर कसे सोडावेत, याची कल्पना पदातींना दिली. अन्न शिजविणाऱ्यांना ओदन कमी शिजवायला सांगून मांसाहारावर भर देण्याचीही त्यानं सूचना केली. त्या आहारानंतर चैतन्यासाठी म्हणून प्रमाणबद्ध सोमरसाचा सर्व सैनिकांना पुरवठा व्हावा इकडेही लक्ष द्यावयास त्यानं सांगितलं.

त्याच्या केवळ एका दर्शनानंच वीर योद्धयांचे बाहू स्फुरत होते. ज्या-ज्या पथकातून तो फिरला त्या-त्या पथकातील काही सैनिक तर सरळ पुढं होऊन त्याच्या सोनेरी निमुळत्या चरणांना हात लावून श्रद्धेनं वंदन करीत होते. त्याचा एखादा निसटता स्पर्श किंवा नुसता एक शब्द वा सान्निध्यसुद्धा सर्वांना भारावून टाकत होतं. सेनापतीचं आकर्षक व्यक्तिमत्त्वसुद्धा सैनिकांना प्रेरक ठरतं.

सारी पाहणी जातीनं होताच तो एकटाच अर्घ्यदानासाठी गंगेवर गेला. त्याचं ते जीवनभराचं व्रत होतं. उगवत्या दिनकराला ओंजळीनं अर्घ्यदान आणि डोळ्यांनी श्रद्धा अर्पण करून तो घटकाभरातच पुन्हा राजवाड्याकडे परतला. त्याचं मुखमंडल रसरशीत

सूर्यफुलासारखं हिरण्यवर्णी दिसत होतं. गालांचा रक्तवर्ण पलाशवृक्षाच्या लाल पुष्पांनाही लाजवीत होता. डोळ्यांच्या निळ्या बाहुल्यांतून प्रकाशाची, अर्घ्यदानानं साठविलेली देदीप्यमान किरणं बाहेर फेकली जात होती. कुंडलं, पक्व कोकम फलासारखी लाल दिसत होती.

पुरोहितांनी विधिपूर्वक त्याला सेनापती केलं. पवित्र नद्यांचं जल त्याच्या मस्तकावर मंत्रघोषित करून सिंचलं. राजा दुर्योधनानं निशिगंधाच्या टवटवीत फुलांची माला हसत-हसत त्याच्या मनगटात बांधली. गुरुपुत्र अश्वत्थाम्यानं खास मढविलेलं लोह- शिरस्त्राण स्वत: त्याच्या मस्तकावर चढविलं. सर्व योद्धयांनी अनंत, प्राजक्त, चंपक अशी विविध प्रकारची पुष्पं आपल्या प्रिय सेनापतीवर उधळली. सर्वांगावर लोहकवच घालून तो ज्येष्ठांचे आशीर्वाद घेण्यासाठी राजवाड्याच्या कक्षाकक्षातून फिरला. पितामह भीष्म, महाराज धृतराष्ट्र, राजमाता गांधारीदेवी, महामंत्री विदुर, गुरू द्रोणाचार्य सर्वांपुढं आशीर्वादासाठी त्यानं श्रद्धेनं मस्तक नमवलं. सर्वांत शेवटी तो राधामाता आणि बाबांच्यासमोर उभा राहिला. वृषालीवहिनींनी तप्तरतेनं पुढं होत आम्हाला निरांजनांच्या प्रसन्न ज्योतींनी ओवाळलं. थरथरत्या हातानं त्याच्या नि माझ्या कपाळांवर कुंकुमतिलक भरले. मस्तकांवर अक्षता टाकताना त्यांचे नेत्र डबडबून आले. डाव्या हातानं अंशुकाचा शेव भिजल्या डोळ्यांना लावत त्या पुटपुटल्या, ‘‘दर सप्ताहाला आपली वार्ता इकडे यायला पाहिजे. भावोजी, सांभाळा!”

‘‘वृषाली, सुप्रियेकडे लक्ष दे. पुत्रांनी व्यायामशाळेत नियमानं गेलं पाहिजे.” दादानं धीरगंभीर आवाजात त्यांना सांगितलं. सुप्रियावहिनींकडे एक दृष्टिक्षेप टाकून दु:खावेग सावरण्याची मूक सूचना दिली.

पुढं होऊन आम्ही दोघांनीही मातापित्यांना श्रद्धेनं वंदन केलं. दादाला जवळ घेताना राधामाता म्हणाली, ‘‘वसूऽऽ अंगावरचं लोहकवच कधीच काढू नकोस! शत्रुंतपाला एकाकी टाकू नकोस.” मला ती ‘शोण’ कधीच म्हणत नव्हती.

‘‘माते, तुझ्या कृपेचं कवच आणि अभेद्य शरीर असताना भय कसलं? आम्हाला आशीर्वाद दे.” कातर स्वरात दादा म्हणाला. तिनं आमच्या मस्तकांचं अवघ्राण केलं. दादानं वृषसेन, प्रसेन, भानुसेन, चित्रसेन, सुषेण, वृषकेतु यांच्या दाट, कुरळ्या केशांतून प्रेमानं बोटं फिरविली. माझ्या कन्येला - मीनाक्षीला एकदम वर उचलून घेत तो म्हणाला, ‘‘मिनू, तुझ्या पित्याला माझा रथ नीट हाकायला सांग. आम्ही तुझ्यासाठी देखणा नवरा आणणार आहोत परत येताना!’’

‘‘नवरा म्हणजे काय ले काका?” तिनं त्याच्या कुंडलांना हात लावीत विचारलं. आम्हां सर्वांना हसू आलं.

वारंवार फुटू पाहाणाऱ्या डोळ्यांना निर्धारानं तसंच थोपवीत, भरल्या अंत:करणानं आम्ही आमच्या प्रेमळ कुटुंबीयांचा निरोप घेतला.

डोळ्यांनीच मी मेघमालेला ‘येतो’ म्हटलं. डोळ्यातील आसवं सर्वांसमक्ष पुसणं अवघड वाटल्यानं ती हळूच द्वाराआड झाली. आम्ही एकदम सैन्याच्या दिशेनं वळलो. आता मागं बघता येणार नव्हतं! मोहाचे पाश पराक्रमाला नेहमीच बांध घालीत असतात. निश्चयाच्या बळकट हातांनी ते केव्हातरी तोडावेच लागतात. राजवाड्याच्या कळसावर फडफडणाऱ्या भागव्या ध्वजाकडे पाहताना तो तेच सांगतो आहे असं मला वाटलं! भरजरी वस्त्राचं पालाण पांघरलेल्या पांढऱ्याशुभ्र आणि चपळ वायुजितावर

दादा क्षणातच झेप घेऊन आरूढ झाला. शिखरकडेवरच्या गरुडासारखे गंगेपर्यंत सोबत करण्यासाठी युवराज दुर्योधन आणि अश्वत्थामन् दोघेच येणार होते. तेही आपल्या घोड्यांवर आरूढ झाले. कुरूंचा युद्धध्वज माझ्या हाती देत दादानं आपल्या मागं उभ्या राहिलेल्या गजाती, अश्वसाद आणि पदाती यांच्या दीर्घ, लांब, सशस्त्र सैनिकांच्या रांगांवर एकदा दृष्टी टाकली. सर्व काही ठीकठाक आहे याची खात्री होताच सर्व सैनिकांना उद्देशून त्यानं दिशा दाखविण्यासाठी म्हणून हातातील राजदंड उंचावून आभाळभेदी गर्जना केली, ''पांचाल राज्य!''

पूर्व क्षितिजावरच्या साक्षात सूर्यासारखाच वाटला तो मला! आपल्या पुष्ट मांड्यांत वायुजिताला भक्कम आवळून पायाच्या टाचेनं खुणावताच गोंडेदार शेपटी फुलवीत तो एकदम उधळला तसे शंख, आनक, गोमुखी, डिंडिम यांचे विविध ध्वनी एकमेकांत मिसळले.

मागच्या चार अक्षौहिणी सैन्याच्या अगणित मुखांतून फुटलेल्या जयजयकारानं राजवाड्याच्या भित्तिभित्तींतील पाषाणांवरही रोमांच उभे ठाकले.

''अंगराज कर्णाऽऽ!''

''जयतु!''

कुरूंचा राजदंड तळपत्या सूर्यकिरणांत झळाळू लागला! सताड उघडलेल्या महाद्वारातून वायुजित बाहेर पडला. त्या वेळी योगवशात एक शुभ्रवर्णी गाय दादाला सामोरी आली! त्यानं पुन्हा वेग आखडले. सरळ खाली उडीच घेऊन ओणावत त्यानं तिच्या खुरांना हात लावून वंदन केलं. मनगटातील निशिगंधाच्या पुष्पांची माला झटकन तोडून तिच्या काळ्या खुरांवर श्रद्धेनं अर्पण केली! कुरूंचा राजदंड तिच्या मस्तकावर शुभ्र कातडीला क्षणभर टेकविला! ते दृश्य पाहून पराक्रमोत्सुक सैनिकांनी परत घोषणा केली,

''सेनापती कर्ण महाराजऽऽ''

''जयतु!''

माझी छाती अभिमानानं फुगून गेली. इतका मुग्धकारी प्रसंग मी माझ्या पूर्व जीवनात कधीच अनुभवला नव्हता. आम्ही सारथिपुत्र असूनही वीर क्षत्रियांचं आज अभिमानानं नेतृत्व करीत होतो! तेही आनंदोर्मींनी आमचा गगनभेदी जयजयकार करीत होते! आमच्या मागून दौडत होते. हां-हां म्हणता गंगेचा किनारा आला. पुढं झालेल्या नौकापथकानं शेकडो भक्कम नौकांचे सुटे भाग हत्तींच्या पाठीवरून उतरून घेतले. चटपट जोडून नौका पात्रात लोटून त्यांची वल्ही हाती घेतली. उत्साहित पदाती त्या नौकांतून झराझर पैलतीर गाठू लागले. हत्ती आणि घोडे पोहत पात्र ओलांडू लागले. घटकाभरातच सर्व पथकांनी पैलथड गाठली. आम्ही चौघंच मागं राहिलो. वायुजितावरून उतरून दादानं युवराज दुर्योधनाला गाढ आलिंगन दिलं. अश्वत्थामन्ला आलिंगताना तो म्हणाला, ''गुरुपुत्रा, तू म्हणतोस ते खरं आहे! माणसाचं जीवन दवबिंदूसारखंच असतं! जो-तो आपल्या परीनं पराक्रमाचे किरण जगावर परिवर्तित करण्याचे जीवनभर यत्न करीतच असतो. तुझ्या शुभेच्छा माझ्या पाठीशी असल्यावर दिग्विजय करून दिग्विजयी कर्ण म्हणूनच मी परतेन...''

''कर्ण, माझा विश्वास आहे, तू यशस्वी होशील! जा! मित्रवरा, माझ्या शुभकामना सदैव तुझ्या पाठीशी आहेत.'' गुरुपुत्रानं हात उंचावला. त्याच्या

मस्तकावरच्या वस्त्राचा शेव वायुलहरींबरोबर फरफरत होता. नेत्रकडा पाणथळ दिसत होत्या!

"येतो!"

वायुजिताला पाण्यात सोडून नौकांत चढताना आम्ही हात उंचावले. ते दोघेही किनाऱ्यावरच्या ओलसर वाळूत नि:शब्द उभे राहून आपापले उंचावलेले हात मनगटातून हलवू लागले. आम्ही हस्तिनापूर सोडू लागलो. गंगेच्या अगणित लहरीही आमच्या नौकांवर थडाथड आपटत 'कर्ण–शोण' 'जयतु, जयतु,' म्हणत आम्हाला निरोप देत होत्या! दूरवर राजवाड्याच्या उंच कळसावरचा भगवा ठिपका डौलत फरफरत होता! जसा काही तोही गर्जत होता - 'कर्ण-शोण' 'जयतु, जयतु!'

**

# तीन

गंगा सोडताच दिग्विजयाच्या रोमांचकारी प्रवासाला सुरुवात झाली. पूर्वदिशेकडचं पहिलंच वीस योजनांवरचं भद्रावती नगर आलं. या नगराचा राजा होता श्वेतपर्ण. गुप्त हेरांकडून आमच्या दिग्विजयाची कुणकुण त्याला प्रथमच लागली होती. युद्धाचा प्रसंग टाळण्यासाठी आम्रशाखांनी वेशी बांधून सुवर्ण-तबकात हिरे, माणकं घेऊन आपल्या अमात्यासह आमच्या स्वागताला तो स्वत:च आला होता! दिग्विजयाची सुरुवातच एका शुभ शरणागतीनं झाली. त्यानं सादर केलेली संपत्ती गाड्यात ओतून घेऊन आमचं सैन्य पूर्वेकडे सरकू लागलं. यानंतरचं लागणारं पहिलंच प्रबळ राष्ट्र होतं पांचालांचं! श्वेतपर्णाचं राज्य सोडून पांचालदेश गाठताना आम्हाला पुन्हा गंगा नदी ओलांडावी लागणार होती. या प्रवासातील सर्वांत मोठी अडचण नद्यांची होती. त्यासाठीच आम्ही आमचं नौकापथक भक्कम केलं होतं. त्या पथकात कुशल पोहणारे आणि धिप्पाड कोळी यांचाच भरणा मुख्य होता. प्रत्यक्ष युद्ध-प्रसंगात हे पथक कधीच भाग घेणार नव्हतं. उलट अशा वेळी तळावरच्या शिबिरांत पथकातले योद्धे विश्रांती घेणार होते. देशोदेशींच्या नगरांत फिरून नद्यांच्या प्रवाहांना कुठं–कुठं उतार आहे याची माहिती कौशल्यानं काढणार होते. मोडतोड झालेल्या नौकांची डागडुजी करणार होते.

अन्न शिजविणाऱ्यांचंही वेगळं सुसज्ज पथक होतं. ते आणि प्रेतदहन करणारेही युद्धात भाग घेणार नव्हते. ही पथकं सैनिक-योद्धयांना ढालीसारखी उपयोगी पडणारी होती. आमचं दिग्विजयी सैन्य म्हणजे एक चालतं-बोलतं नगरच होतं! त्यात सर्व प्रकारच्या लोकांचा समावेश होता आणि त्या सर्वांचीच आपल्या सेनापतीवर गाढ निष्ठा होती. सैन्य शासन आणि श्रद्धा यांनी भारलेलं होतं.

आम्ही पांचालांच्या दिशेनं वायुगतीनं वाटचाल करीत होतो. त्या देशाचा राजा द्रुपद. पांडवपत्नी द्रौपदीचा पिता! राजपुत्र धृष्टद्युम्न आम्हाला कधीच शरण येणार नव्हता. युद्ध करून त्याचा पराभव करावा लागणार होता. मधली वाटचाल सात दिवसांची होती. ठिकठिकाणी आमचे तळ पडत होते. योजना-योजनाला सृष्टीचं सौंदर्य वेगळ्या आविष्कारात पुढं येत होतं. कुंभ, करंबल, कुंकुम, सातवण, हळवण, पलाश, पाटल असे विविध वृक्ष हिरव्या चवऱ्या ढाळीत आमच्या सैन्याला उल्हसित करत होते. कितीही प्रवास केला तरी कुणीही थकत नव्हतं. ना थंड, ना उष्ण असं समशीतोष्ण उत्साही वायुमान विजिगीषू मनाची कारंजी फुलवीत होतं. हस्तिनापूर सोडल्यापासून दहाव्या दिवशी आम्ही पुन्हा गंगेच्या किनाऱ्यावर आलो. आपल्या हातातील राजदंड माझ्या हाती देत पदस्थ होऊन दादानं गंगेच्या विशाल पात्राला गुडघे टेकून वंदन केलं.

"शोण, ही नदी नाही. माता आहे असंच मला नित्य वाटत आलंय! का ते मात्र समजत नाही! तुला आठवतंय, चंपानगरीत बालपणी मी हिच्या लाटांकडे कसा एकटक पाहत असे ते? त्या वेळी तू शिंपले गोळा करायचास!" दादानं मला आठवण करून दिली.

"होय! चंपानगरीत आपण असताना एकदा तर तू रात्रभर हिच्या पात्रात उभा होतास! राधामातेनं सकाळी परतल्यावर तुला छेडलं होतं त्यासाठी! खरंच दादा, तुला

एवढा जिव्हाळा का रे वाटतो या गंगेचा?”

“राजहंसांना मानसाचा, गरुडांना पर्वतशिखरांचा, विजांना अवकाशाचा ओढा का असतो हे सांगता येईल काय? नाही. शोण, या नदीचा मला का जिव्हाळा वाटतो ते कधीच सांगता येणार नाही! हे बघ.” त्यानं आपल्या दंडात बांधलेली चांदीची पेटी काढून माझ्यासमोर धरली! “ही पेटी राधामातेनं चंपानगरी सोडताना मला दिली होती. का? ही एवढी लहानशी पेटीच तिनं मला का दिली हे तुला तरी सांगता येईल काय?” ती पेटी गंगेच्या पाण्यात स्वच्छ धुताना त्यानं मला विचारलं, उत्तरासाठी माझ्याकडे पाहताना निसटून ती पात्रात पडली. तरीही पसरट बुडामुळे ती तशीच तरंगत राहिली! हिंदकळत! तरंगत!

“सावर तिला! नाहीतर राधामातेची तू प्रेमानं जपलेली ही भेट भलत्याच्याच हाती जाईल!” मी त्या तरंगणाऱ्या पेटीकडे बोट दाखवीत म्हणालो. त्यानं पुढं झेपावून ती पेटी परत हाती घेतली आणि मी ती पुन्हा त्याच्या दंडात बांधली.

“शोण, या नदीकाठाशी माझ्या अनेक स्मृती निगडित आहेत – याच नदीच्या पैलतीरावर माझ्या प्रथम पुत्रानं – सुदामननं चिरविश्रांती घेतली आहे.”

सुदामनच्या आठवणीनं क्षणभर माझं मनही द्रवलं. तो म्हणत होता ते योग्यच होतं. सुदामनला आश्रय देणारी उदार आश्रयदायी म्हणून मीही त्या नदीला वंदन केलं. दादाच्या भावनांशी समरस झालो.

आता आमचा प्रवेश पांचालांच्या प्रबळ राज्यात झाला होता.

**

# चार

कांपिल्यनगर! पांचालांची राजनगरी आम्हाला समोर स्पष्ट दिसू लागली. आता महान संघर्षाला तोंड फुटणार होतं. याच नगरात स्वयंवराचं मत्स्ययंत्र घरघरलं होतं, सुदामनचा देह पडला होता. घडू नये ते घडलं होतं. याच पांचालांच्या राजनगरात!

द्रुपदराजाकडे पाठविलेल्या आमच्या दूताला मिळालेलं धृष्टद्युम्नाचं विचित्र उत्तर ऐकताच सर्वांना संताप आला. आमच्या दूताला त्यानं सांगितलं होतं, "तुझ्या सेनापतीला म्हणावं, त्याचं अभेद्य कवच जाळून काढण्यासाठी अग्निपुत्र धृष्टद्युम्न तयारच आहे!" तो संदेश ऐकताच सर्व पथक-प्रमुखांच्या अंगाची लाही-लाही झाली.

"कांपिल्यनगर! आऽ क्रमण!" नगराच्या दिशेनं बोट उंचावून दादानं सैन्याला तुटून पडण्याची आज्ञा दिली! पांचालांच्या आणि आमच्या सैन्याची गाठ नगराबाहेरच्या भव्य पटांगणात पडली.

आपल्या युधामन्यू, सुरथ आणि शत्रुंजय या बंधूंसह धृष्टद्युम्न पांचालसैन्याच्या अग्रभागी होता.

त्याच्या अंगावर बाणांचा वर्षाव करताना संतप्त दादा गरजला, "धृष्टद्युम्न, हे कवच जळणारं नाही - जाळणारं आहे!" त्या दोघांच्या घनघोर संग्रामाला सुरुवात झाली. बाण फेकून–फेकून धृष्टद्युम्न थकला! खड्ग घेऊन तो क्रोधानं दादावर तुटून पडला, पण त्याच्यापुढं त्याचं काहीच चाललं नाही. सूर्यास्तामुळे त्या दिवशीचं युद्ध थांबलं. सैनिक शिबिराकडे परतले.

दुसऱ्या दिवशी प्रथम युधामन्यू सामोरा आला, पण विजयासाठी खवळलेल्या दादानं त्याला क्षणात उधळून लावला. पुन्हा धृष्टद्युम्नाशी झुंज जुंपली, जसजसा सूर्य आकाशात चढू लागला तसतसं धृष्टद्युम्नाला दादापुढं उभं राहता येणंही अशक्य झालं. दोन्ही सैन्यांचे अश्वसाद, गजारी आणि पदाती एकमेकांना अटीतटीनं भिडले होते. माझ्यासमोर पांचालपुत्र सुरथ उभा होता! दादानं धृष्टद्युम्नाला नि:शस्त्र केलं. खाली मान खालून तो सूतपुत्रापुढं दीनपणे उभा राहिला! कांपिल्यनगराचे निर्नायकी सैनिक पळू लागले. पांचालदेश पडला! वृद्ध द्रुपदराजाला अरिष्टसेनानं दादासमोर हात बांधलेल्या स्थितीत उभा केला. आमच्या विजयी सेनेनं कुरूंच्या राज्याचा कंठरवानं जयघोष केला.

"सोडा! राजाचे हात सोडा!" तीव्र नापसंतीच्या स्वरात अरिष्टसेनाला आज्ञा झाली. द्रुपदराजानं आश्चर्यानं मान उंचावून विचारलं, "काय अपेक्षा आहे अंगराज?"

"खंडणी!" द्रुपदाच्या सोनेरी किरिटावर अचल दृष्टी रोधून आमचा सेनापती म्हणाला.

"काय देऊ? गोधन, सुवर्ण, रत्नं, हिरे की दासदासी?" द्रुपदाची मान खालीच होती.

"राजा, तू सांगितलेली सर्व संपत्ती कुरूंच्या भांडारात आज कुजत पडली आहे! मी मागतो आहे ती खंडणी वेगळी आहे!" दादानं भुवया उंचावीत त्याला सांगितलं.

"कोणती?" आश्चर्यानं त्या वृद्धाच्या सुरकुतलेल्या कपाळावर आठयांच्या सुरकुत्यांची अधिकच भर पडली. भयानं क्षणभर त्याचे डोळे थरथरले.

"माझ्या पुत्राच्या समाधीची! तू, राजा तूच स्वत: माझ्या सुदामनची समाधी उभी केली पाहिजेस! या कांपिल्यनगरातच! गंगेकाठी! तिच्या नित्यपूजेची व्यवस्थाही! बोल, आहे मान्य? आजच्या आज – एका रात्रीत!" त्याचा निर्धारी स्वर शिबिराच्या पटलांना थरथरवू लागला.

त्या वृद्ध राजाची श्रांत मुद्रा गतकालाच्या कटू स्मृतीनं कळंजून गेली. त्यानं होकारार्थी मान हलवून संमती दर्शविली. कुरूंचा राजदंड पांडवांच्या श्वशुरानं मान्य केला! एका रात्रीत सुदामनची समाधी गंगाकिनारी उभी राहिली! आम्ही कांपिल्यनगर सोडण्याच्या तयारीला लागलो. प्रभातकालीच पांचालांचा कोषागारप्रमुख खंडणीची तबकं घेऊन माझ्यासमोर उभा राहिला! ती तबकं पाहताच मला आश्चर्य वाटलं. दादानं तर कोणत्याही अन्य खंडणीची मागणी त्यांच्याकडून केली नव्हती. तरी त्यांनी ती पाठविली होती. इतक्या दीर्घकालानंतर द्रुपदाला कर्णाची ओळख पटली होती!

**

# पाच

सुदामनच्या मृत्यूनंतर पंधरा-एक वर्षांनी बांधल्या गेलेल्या त्या धवल समाधीवर पांचालांच्या राज्यातील एक विशेष म्हणून ख्याती असलेली मधुमालतीची फुलं चढवून आम्ही कांपिल्यनगर सोडलं. पांचालदेश पडल्याची वार्ता घेऊन दूत मागं हस्तिनापुराकडे निघून गेला. तो वृषालीवहिनींना सुदामनच्या समाधीचा सर्व वृत्तान्त सांगणार होता. मीच त्याला तसं बजावलं होतं. त्या व्याकूळ मातेला तेवढ्यानं तरी थोडंसं मानसिक समाधान मिळालं असतं.

पांचाल देश सोडताच आमचं सैन्य पूर्वेच्या दिशेनं कोसलांच्या राज्याकडं पुढं सरकू लागलं. विजयाच्या उन्मेषानं आत्मविश्वास दुणावलेले सैनिक चापातून बाणांच्या सरी सुटाव्यात तसे अथक दौडत होते. हस्तिनापूर सोडून आता आम्हाला पंधरा दिवस झाले होते. विजयानंदानं वेडावलेले योद्धे महापुरातल्या नदीच्या गतीनं धावत असतात. कालकूटांच्या राज्याच्या सीमा लागल्या. आता आमच्यापुढं सर्वांत कठीण समस्या होती ती नैमिषारण्याची. हे एवढं घनदाट किर्र अरण्य इतक्या अफाट सैन्यासह कसं ओलांडायचं? ते पार केल्याशिवाय कोसलांच्या राज्यात प्रवेश करणं शक्यच नव्हतं. नाहीतर मार्ग बदलून काशीराज्याला समोर धरून चालावं लागणार होतं. गंगेच्या काठाकाठानं खूप घोडदौड केल्यानंतर काशीराज्य लागणार होतं. त्या दिशेनं आम्ही पुढं गेलो असतो तर कालकूट, कोसल आणि किरात ही तीनही राज्यं आमच्या दिग्विजयाच्या मार्गातून सरळ बाजूला पडणार होती. म्हणूनच प्रथम कोसलांना सामोरं ठेवून आमचा ध्वज धावत होता. नैमिषारण्याचं घनदाट आव्हान पत्करून!

मार्गशीर्षाचा वद्य पक्ष सुरू झाला होता. चांदणं नसल्यामुळं रात्रीची धाव थांबली होती. जागजागी तळ पडत होते. वद्य चतुर्थीलाच आम्ही गोमती नदी ओलांडली होती. आता गाठ होती ती नैमिषारण्याशी! तीन दिवसांचा कष्टमय प्रवास करून वद्य सप्तमीच्या थंडीनं गोठविणाऱ्या एका सकाळी आम्ही नैमिषारण्याजवळ आलो. त्या अरण्याकडं बघताच सर्वांची वाचा बंद व्हायचीच वेळ आली! धुक्यानं झाकलेल्या अगणित वृक्ष-महावृक्षांचा जणू राक्षसकाय पर्वतच या कडेपासून त्या कडेपर्यंत हातपाय पसरून उभा होता! जमीन सपाट असली तरी अरण्य घनदाट होतं. आमची शिबिरं त्यापुढं कितीतरी क्षुद्र भासत होती.

अरुणोदय झाला. गोफण टाकताच पक्षयांचे थवेच्या थवे आकाशात उडून जातात तसे सूर्यकिरणांनी धुक्याचे ढगच्या ढग उडवून लावले. धुकं निवळल्यामुळं स्पष्ट दिसणारं ते हिरवंगार अरण्य आता अधिकच भयाण दिसू लागलं. श्येन, सारंग, धनछडी, चित्ररथ, चंडोल, भारद्वाज, पत्ररथ, कोकीळ असे अनेक पक्षी एकदमच कलकलू लागले. रात्रकिडे खरे; पण ते कीटक आपलं नाव खोटं ठरविण्यासाठी दिवसासुद्धा किरकिरत होते! मधूनच व्याघ्रासारखं श्वापद गर्जना करून सर्वांवर ताण करू लागलं.

आमच्या समोर उभं होतं ते एक अक्राळविक्राळ, भयावह प्राकृतिक आव्हान!

काय करायचं? आता समोरचं घनदाट अरण्य कसं पार करायचं? मार्ग

काढण्यासाठी माझ्या शिबिरात सर्व पथकप्रमुख उपस्थित झाले. ते सर्व युद्धनीतिज्ञ होते; पण त्यांनाही काही सुचेना! अरिष्टसेन, संघमित्र, हिरण्यवर्मा, व्याघ्रशर्मा, वीरदत्त कुणालाच काही उपाय सापडेना! आता एवढं सैन्य घेऊन मागं परतणं तर शक्यच नव्हतं. कपाळावर आठ्या घालून आम्ही सचिंत बसलो होतो. इतक्यात प्रात:कालची आन्हिकं आटोपून दादा हसत-हसत शिबिरात आला. सर्व जण खाली माना घालूनच उभे राहिले.

''का शोण – तुम्ही सर्वच असे स्तब्ध का?'' त्यानं धनुवत सोनेरी भुवया उंचावत विचारलं.

''हे अरण्य कसं पार करायचं? सैन्याचा मार्ग आता बदलावा लागणार!'' मी नैमिषारण्याकडे बोट उंचावून आम्हा सर्वांची व्यथा शेवटी त्याला सांगितली.

''अरण्य!'' डाव्या गुलाबी तळहातावर उजव्या हाताची भक्कम मूठ एक-दोनदा आपटून आपल्या पायांकडे पाहत तो क्षणभर विचारमग्न झाला. त्याच्या पायाची लांबट, पुष्ट, सतेज बोटं चाळविली गेली. एकदम मान उंचावून तो निश्चयानं हिरण्यवर्माला म्हणाला, ''हिरण्यवर्मन, एक चांगल्या दमदार धावेचा घोडा घे, सोबत दोन काटक अश्वसादही घे आणि प्रथम या अरण्यात शिरून कुण्या ऋषीचा एखादा आश्रम आणि एखादी नदी आहे काय याची खात्री करून परत ये. सत्वर जा.''

''आज्ञा – '' हिरण्यवर्मन शिबिराबाहेर, खड्ग सावरीत झटकन निघूनही गेला. अरण्याकडे धावणाऱ्या घोड्याच्या खुरांचा टपटप असा आवाज अस्पष्ट होत गेला.

आम्ही सर्व जणच आश्चर्यानं आमच्या सेनापतीकडे पाहू लागलो. ऋषीच्या तप:सामर्थ्यानं अरण्य जाळण्याची त्याची कल्पना होती की काय?

''शोण, आपल्या सैन्याला मद्यपुरवठा करणाऱ्या प्रमुखाचं नाव काय?'' त्यानं लगेच असंबद्ध प्रश्न विचारला.

''सोमपर्ण.'' मी आश्चर्य दाबीत उत्तर दिलं.

''बोलावून घे त्याला!''

एका सैनिकाला पिटाळून मी सोमपर्णाला क्षणात सादर केलं. तो समोर उभा राहताच त्याच्याजवळ जात दादानं त्याला विचारलं, ''सोमपर्ण, मद्य अधिकात अधिक मादक करण्यासाठी काय घालतोस तू सोमरसात?''

''मोहाची मादक फुलं!''

''जा, तुझ्या सेवकांना या अरण्यात आताच पाठवून आणता येतील तितकी मोहाची फुलं आणि सोमवल्ली आणायला सांग!''

''आज्ञा – '' सोमपर्णही निघून गेला. त्याच्या पथकातले सेवक अरण्याकडे जाताना आम्हाला शिबिराच्या फटीतून दिसू लागले.

दादाच्या असंगत कल्पनांचा काहीच अर्थ मला लागेना! आम्ही दिग्विजयासाठी बाहेर पडलो आहोत की मद्य पिण्यासाठी! या शंकेमुळे न राहवून मी निर्धारानं विचारलं, ''हे काय मांडलं आहेस तू?''

''शोण, आपल्या सैन्यात सत्याऐंशी सहस्त्र हत्ती आहेत. त्यांतल्या चाळीस सहस्त्र हत्तींना आता सोमपर्ण हंड्याहंड्यांनी तयार केलेलं मादक मद्य क्रमश: पाजील! मद्य पिऊन धुंद झालेल्या हत्तीदलांना भालाधारी सैनिक मागून एकसारखे भाल्यांच्या अग्रानं टोचत राहतील! वेदनांनी खवळलेले हत्ती या अरण्यात चीत्कारत घुसतील! त्यांच्या प्रचंड सामर्थ्यापुढं हे उंच-उंच वृक्ष कडकडा मोडून खाली कोसळतील! आपल्या

विराट गजदलातील धुंद हत्ती पुढं-पुढं धावण्यासाठी, ही कोसळलेल्या वृक्षांची अडगळही सोंडांनी दूर करतील! त्यांना चेतावणी मिळावी म्हणून या हत्तीदलात अर्ध्याअधिक हत्तिणीही असतील!" छातीवर हात बांधून तो सर्वांवरून दृष्टी फिरवीत अगदी सहज बोलत होता. शांतपणे! सेनापतीचा निग्रह त्याच्या पुष्ट आणि सतेज गोलाकार सूर्यबिंबी चर्येवरून नुसता ओसंडत होता. निळे डोळे तळपत होते.

"मग हिरण्यवर्माला कशाला पुढं पाठविण्यात आलं आहे? ऋषींच्या आश्रमाचा आणि नदीचा काय संबंध?"

"या अरण्यात ऋषिआश्रम असेल तर तो या खवळलेल्या हत्तींच्या पायांखाली उद्ध्वस्त होऊ नये, याची काळजी घेतली पाहिजे! ऋषीनं आपल्या सैन्याला शापदग्ध करू नये म्हणून!" त्यानं आम्हाला आश्चर्याचा धक्का दिला.

"आणि नदीचं काय?" मला त्याची कल्पना निर्धोक वाटली. त्याच्या भव्य कपाळाकडे पाहत मी प्रश्न केला. अतिशय अभिमान वाटला मला त्याच्या बुद्धिमान नेतृत्वाचा!

"पुढं जाऊन हे खवळलेले हत्ती त्या नदीत उतरून मनसोक्त डुंबत राहतील! जलविहारानं ते तृप्त होतील, त्यांची धुंदी हळूहळू उतरेल! आमचा पुढचा प्रवास चालूच राहील! हा मार्ग न बदलता!" त्याचे निळे डोळे एका वेगळ्याच तेजानं तळपत होते. त्याच्या अचाट शक्तिसामर्थ्याचा प्रत्यय आम्हाला तसा अनेक वेळा आला होता, पण सेनापतीच्या अंगी किती योजनाकुशलता असावी लागते, हे मी तर त्याच्यात प्रथमच पाहत होतो. त्याच्या बुद्धीची प्रगल्भता एवढया प्रकर्षानं मला कधीही कुणात दिसली नव्हती. बुद्धिमान सेनापतीच्या अशा एखाद्याच कल्पनेत सैनिकांचे अगणित कष्ट वाचतात. त्याच्याबद्दलचा आदर वाढतो.

अर्ध्याएक घटकेतच हिरण्यवर्मा अरण्यातून परत आला. त्याच्या अंगावरची वस्त्रं ठिकठिकाणी फाटली होती. छाती धापावत होती.

"महाराज, अरण्यात कुठंही आश्रम नाही – पण फार दूरवर एक मोठी नदी आहे. मला वाटतं ती शरयू नदीच असावी!" त्यानं श्वास रोधत अभिवादन करून निवेदन केलं. आपल्या फाटक्या वस्त्राचंही त्याला भान नव्हतं.

आमच्या सेनापतीच्या गोलाकार मुखमंडलावर एकदम हास्याची लकेर तरळून गेली. डोळे चमकू लागले.

"तेच पाहिजे! आश्रम नको, नदीच पाहिजे!" आसनावरून उठून हिरण्यवर्माच्या अंगावर बोटातील नीलमण्याची अंगठी फेकीत दादा आनंदानं म्हणाला.

आम्ही सर्व जण शिबिराबाहेर पडलो. अरण्य पार करायचंच या खंबीर निर्धारानं!

**

# सहा

चाळीस सहस्त्र हत्ती–हत्तिणींचा संमिश्र कळप, त्यांच्या पाठीवरच्या अंबाऱ्या नि नौका उतरून मुक्त करण्यात आला. माहुतांनी त्यांचे अंकुश काढून टाकले! सोमपर्ण मोहाची फुलं सोमरसात मुरवून मादक मद्य तयार करण्यात गढून गेला. एकदम सैन्याची रचना बदलण्यात आली. मुक्त हत्तींचं दल पुढं घेण्यात आलं.

''या हत्तींच्या मागं अश्वसाद ठेवले तर?'' सोंडांची अविरत वळवळ करणाऱ्या त्या मुक्त अफाट गजसेनेकडे बोट दाखवून मी अंगराजाला विचारलं.

''नाही! या हत्तींमागं भार वाहणारे सर्व पदाती राहतील. त्यांच्यामागून अश्वसाद जातील.''

''का – असं का?'' मला त्याच्या कल्पनेत सुरक्षितता दिसेना.

''पुढचे हत्ती कितीही विध्वंसक निघाले तरी अरण्यातल्या काटेरी वेली त्यांना शरण जाणार नाहीत! या काटेरी वेलींनी काही भारवाहक घायाळ होतील. त्यांच्यामागून येणारे अश्वसाद अशा घायाळांना उचलून घोड्यावर घेतील! म्हणजे एकही सैनिक मागं राहणार नाही!'' तो नेहमीच्या शांतपणानं म्हणाला. आपल्या प्रत्येक सैनिकाची किती दक्षतेनं तो काळजी घेत होता, हे पाहून मी स्तिमितच झालो.

त्याच्या सूचनेप्रमाणं अग्रभागी मुक्त हत्तीदल, त्यांच्यामागं भालाधारी भालापथक, भारवाहक, पदाती, त्यांच्यामागं अश्वसाद आणि सर्वांत शेवटी उरलेल्या सर्व हत्तींचं पथक अशी विचित्र रचना त्या अरण्यामुळं आम्हाला करावी लागली!

सर्व सैन्यरचना होताच पुढच्या हत्तींना माहुतांकरवी मादक मद्य हंड्याहंड्यांनी पाजण्यात आलं. त्यांच्या असंख्य सोंडा जलद गतीनं खालीवर वळवळू लागल्या. एकसारखा चींऽऽ चींऽऽ असा चीत्कारून कल्लोळ करीत त्यांनी अरण्यातल्या पक्षयांचा आणि आमच्या सेनेतल्या वाद्यांचा आवाजही गिळून टाकला. अंगात मद्य भिनताच भालाधाऱ्यांनी भाल्यांनी त्यांना मागून सतत टोचायला सुरुवात केली! ते खवळलेले सहस्र–सहस्र धिप्पाड प्राणी आपली अवजड शरीरं सावरीत पाणलोटासारखे अरण्यात घुसले! 'काडऽऽऽ काडऽऽऽ धप्पऽ!' आवाज घुमू लागले.

कांचन, किंशुक, कण्हेर, हेळा, हिरड, अशोक, पुन्नाग, ताल, तमाल, खदीर, औदुंबर, शिवण, सांतवण, डंडणी, पाटल, मोह, मधुक, पलाश, शिरस, पिप्पल, किंजल असे अनेक वृक्ष कडकडत खाली कोसळू लागले! हत्तींच्या चीत्कारांनी भेदरलेले पक्षी घरटी सोडून भेदक केकाटत दूर उडून गेले. सूर्यकिरणांसाठी आसुसलेली - त्या अरण्याखाली कोट्यवधी वर्षं झाकाळून गेलेली - धरती पावन झाली. आज तिला प्रथमच सूर्यदर्शन होत होतं! क्षणापूर्वी आम्हाला वेडावत उभ्या राहिलेल्या त्या अरण्यानंही आम्हाला मार्ग करून दिलेला पाहून मी न राहवून हात उंचावून घोषणा दिली – ''सेनापती अंगराज कर्णऽऽ''

''जयतु!'' मला सगळीकडून साथ मिळाली. हत्तींमागून अरण्यात शिरताना लक्ष-लक्ष मुखांनी मला प्रतिसाद दिला. तो आवाज हत्तींच्या चीत्कारालाही भेदून

जाण्याइतका मोठा निघाला! नैमिषारण्याचं ते माजलेलं राज्य आम्ही पादाक्रांत केलं.

नैमिषारण्य ओलांडून आम्ही सांजेला शरयू नदीच्या काठी आलो. अरण्याचा पराभव केलेले विजयी हत्ती धुंदपणे चीत्कारत शरयूच्या पात्रात जलकेली करण्यासाठी दाटीवाटीनं घुसले. त्यांच्या जलक्रीडांनी शरयूचं नितळ पाणी गढूळ झालं! आता दोन दिवस डुंबायची संधी दिल्याशिवाय त्यांना पात्रातून बाहेरच काढावयाचं नव्हतं. त्यांना शरयूच्या पात्रात जलकेली करताना पाहून मला उगाचंच हस्तिनापूरची आठवण झाली!

आता आम्ही कालकूटांच्या राज्यात होतो. या राज्यात जिंकण्यासारखं असं काहीच नव्हतं आणि विरळ मानववस्तीच्या या राज्याकडून खंडणी अशी काहीच मिळणार नव्हती. तरीही त्यांनी आमची चाहूल लागताच अरण्यफळ आणि मधुर मद्यं आमच्या सैन्याला भेट म्हणून दिली.

यापुढचं नगर होतं ते अयोध्या! कोसलांची राजनगरी! कोसलांकडून अर्थातच विरोध होणार होता. एव्हाना मार्गशीर्ष संपत आला होता. हस्तिनापूर सोडून एक मास झाला होता. आम्ही नैमिषारण्य ओलांडल्याची वार्ता घेऊन दूत कुरूंच्या राज्याकडे निघून गेला.

**

# सात

शरयूच्या काठी पुन्हा पूर्वीची सैन्यरचना करण्यात आली. विसावा घेऊन तरतरीत झालेले सैनिक पुन्हा दुप्पट उत्साहानं पुढच्या प्रयाणासाठी तयार झाले. रणभेरी, शंख, गोमुख आणि तुताऱ्या यांनी शरयूच्या लहरी-लहरी थरारून निघाल्या. सेनापतीचा जयघोष झाला. शरयू नदीच्या काठावरच अयोध्या आहे, याची माहिती गुप्तचरांनी आणलीच होती. म्हणूनच तिच्या किनाऱ्याकिनाऱ्यानं आमचं सैन्य पूर्वेकडे धावू लागलं. ध्वज फडफडू लागला. राजदंड तळपू लागला.

दोन दिवसांच्या भरारीनंतर अयोध्या दृष्टिपथात आली! या नगरावर दशरथ पुत्र रामांचा वंशज शीघ्र याचं राज्य होतं! त्याचा मरू नावाचा पुत्रही विख्यात योद्धा होता. आमच्या हत्तीदलानं गढूळ केलेलं शरयूचं पुढं वाहत गेलेलं पाणी पाहूनच तो चाणाक्ष राजा सावध झाला होता! नगराभोवतीचे खंदक त्यानं पाण्यानं काठोकाठ भरून घेतले. पण गंगा, यमुना आणि गोमती यांसारख्या विशाल नद्या ओलांडणारं आमचं सैन्य टीचभर खंदकांसमोर आता माघार घेणार नव्हतं.

सर्वांनी एकदमच गर्जना करीत खंदक ओलांडले. राजा शीघ्र आपला पुत्र मरू यासह खंदकाला घेरून दोन हात करण्यासाठी निर्धारानं उभा होता. त्यानं चाप सावरीत आरोळी ठोकली, "प्रभू श्रीरामाचाऽऽ"

"विजय असो" त्याच्या घोषणेला त्याच्या सैन्यानं प्रतिसाद दिला. आमच्या खड्गांशी त्यांची खड्गं भिडली. कुरुवंशजांचे बाण रघुवंशजांशी टक्करले! दादासमोर राजा शीघ्र उभा होता. माझ्यासमोर त्याचा पुत्र मरू. घनघोर संग्रामाला सुरुवात झाली. खंदक बाणांनी भरू लागले. अजूनही मद्याची कणकण अंगी भिनलेले आमचे हत्ती कोसलांचं पायदल पायांखाली तुडवीत राजवाड्याच्या झाकलेल्या महाद्वाराला भिडले! धडका देऊन त्यांनी ते महाद्वार उखडून काढलं. कळसावरचा कोसलांचा सूर्यचिन्हांकित सुवर्णी राजध्वज, ज्यासाठी इक्ष्वाकू, दिलिप, रघू, अज, दशरथ, राम, कुश, अतिथी, निषध, नल, नभ, पुंडरिक, क्षेमधन्वा, देवानिक, पारियात्र, सहस्राश्व, बल, स्थल, वज्रनाभ, खगण, विधृती, हिरण्यनाभ, पुष्प, ध्रुवसंधी, सुदर्शन आणि अग्निवर्ण यांसारख्या विख्यात नरवीरांनी रुधिराचे पाट वाहविले होते, तो राजवाड्याच्या माथ्यावरचा मानध्वज कुणीतरी खाली उतरवला! दादाच्या अमोघ आणि अचूक बाणांनी राजा शीघ्र घायाळ होऊन रथात पडला होता! मरूला आमच्या सैनिकांनी बंदिस्त केलं होतं. केवळ काही घटकांतच कोसल देश पडला. खंदकातील पाणी रक्तानं रंगून गेलं. अयोध्या! रामचंद्रांची विख्यात नगरी!

वायुजितावरून उतरून, पदस्थ होऊन वाड्याच्या त्या प्राचीन वास्तूत प्रवेशताना दादा क्षणभर महाद्वारातच थांबला. त्याच्या मुखावर विजयी सेनापतीचे भाव नव्हते.

"का थांबलास?" मी कुतूहलानं विचारलं.

"शोण, पांडवही वनवासाला निघून गेले; पण द्यूत खेळून! या महाद्वारातून

शतकांपूर्वी एक असा वचनप्रिय राजा वनवासासाठी बाहेर पडला होता की त्याच्या पितृभक्तीनं कुणाचंही मन भरून यावं. केवळ पित्याचं वचन पूर्ण करण्यासाठी या महाद्वारातून दशरथपुत्र राजा रामचंद्र आपला बंधू लक्ष्मण व पत्नी सीता यांसह चौदा वर्षांच्या वनवासावर हसत-हसत बाहेर पडला होता! हीच ती अयोध्या - हेच ते महाद्वार!" त्या दिव्य महापुरुषांच्या स्मृतीनं क्षणभर युद्धाच्या धुमश्चक्रीचंही आम्हाला विस्मरण झालं.

राजवाड्यात प्रवेशताच रघुवंशज रामानं भूषविलेल्या राजसिंहासनाला दादानं गुडघे टेकून, मस्तक भिडवून वंदन केलं! मी त्याच्या त्या कृतीनं अधिकच गोंधळात पडलो. जेत्यानं जितांच्या सिंहासनापुढं सरळ गुडघे टेकायचे हे विचित्रच होतं, पण दादाच्या बाबतीत काहीही घडलं असतं तरी ते मला सदैव मान्यच होतं. केवळ राजसिंहासनाला वंदन करूनच तो थांबला नाही, तर तरातर सर्व सोपान चढून तो राजवास्तूच्या माथ्यावरच्या सरळ ध्वजदंडाजवळ गेला. आपल्या हातांनी कोसलांचा कुणीतरी खाली उतरविलेला ध्वज त्यानं स्वत: उंच चढविला! ध्वजाचा दोर हाती घेऊन तो तिथूनच गर्जला, "राजा श्रीरामचंद्रांचाऽऽ!"

"विजय असो!" आमच्या आणि दिपलेल्या कोसलांच्या, दोन्ही सैन्यांतून जयजयकाराचे बोल घुमले! शरयूच्याही अंगावर रोमांच उभे राहिले! राजा शीघ्राच्या नेत्रांत अश्रुबिंदू तरळले! कसले होते ते? पराभवाचे? खेदाचे? आपल्या पूर्वजांच्या स्मृतीचे? की... की, एका अद्वितीय वीर पुरुषाच्या दर्शनानं त्याच्या धन्य झालेल्या क्षत्रिय मनाचे? ते कुणालाच कळणं शक्य नव्हतं!

ध्वजदंडाजवळून खाली येताच शीघ्र दादाला सामोरा झाला. त्यानं आवेगानं आमच्या सेनापतीला दृढ आलिंगन दिलं. मी मरूचे बंध सोडून त्याला मुक्त केलं. त्यानंही मला आलिंगन दिलं. रामराजाच्या त्या पवित्र नगरीत आम्ही दोन दिवस पाहुणचार घेतला. आमच्या नसांत विजयाची धुंदी नव्हती. जयापजयाच्या भावना मनाला स्पर्शू शकल्या नाहीत. जगात तसं कोणीच जेता व जित असत नाही हेच खरं.

तिसऱ्या दिवशी अयोध्या सोडताना ज्या सिंहासनावर पादुका ठेवून भरतराजानं चौदा वर्षं राज्य केलं होतं, त्या सिंहासनाला सुगंधी पुष्पं वाहून आम्ही अयोध्या सोडली. आता पौष मास सुरू झाला होता. कडाक्याची थंडी थोडी कमी झाली होती. गोधूम पिकांची पाती शेताशेतांतून पोसवून तरारून वाढली होती. वाऱ्याच्या झुळुकीबरोबर डोलत होती. आमचं सैन्य किरातांच्या राज्याकडं प्रयाण करीत होतं.

**

# आठ

इरावती नदी ओलांडून कुशीनगर, श्रावस्ती, कपिलवस्तू ही कोसलांची प्रसिद्ध नगरं आम्ही मागं टाकली. आता आमच्या सैन्याचं तोंड थोडंसं हिमालयाच्या दिशेकडं वळलं होतं. किरातांच्या राज्यातील काष्ठमंडप या नगरावर आम्हाला चढाई करायची होती. त्यासाठी मधली गंडकी नदी पार करावी लागणार होती. एकामागोमाग एक असे रोमहर्षक विजय प्राप्त झाल्यानं सर्व सैनिकांच्या अंगात चंडोल पक्षयांचा उत्साह संचारला होता. खड्गं धारदार झाली होती.

गंडकी नदीच्या किनाऱ्यावर आलो. ही नदी ओलांडताच किरातांच्या राज्यात प्रवेश होणार होता. किरातांचं नेतृत्व सात बलशाली राजे करीत होते. थंड प्रदेशाची त्यांना अधिक सवय होती. आता जलद गतीनं नद्या ओलांडायचा सराव आमच्या नौकापथकांना झाला होता. त्या-त्या प्रदेशातील अन्नधान्य शिजवून सैनिकांना नेहमी ते देण्यात येत होतं. किरातांच्या देशात सैन्याला अधिक प्रमाणात मद्य द्यावं लागणार होतं. त्याशिवाय रक्त गोठविणाऱ्या येथील थंडीत सैनिक टिकावच धरू शकले नसते. सोमपर्ण ते काम उत्साहानं पार पाडीत होता.

आम्ही गंडकी नदी पार केली. दिग्विजयाची चाहूलही नसलेल्या किरातांना जिंकणं आम्हाला कठीण गेलं नाही. एका भरारीतच आम्ही काष्ठमंडप गाठलं.

समोर सैन्यच सैन्य बघून भेदरलेले किरात राजे आम्हाला शरण आले.

काष्ठमंडपापासून पाच योजनांवर हिमालय होता. त्यावरून येणारे बोचरे थंड वारे तीव्रतेनं जाणवत होते. मात्र कुठूनही हिमालयाचं एकही शिखर काही दृष्टिपथात येत नव्हतं. इच्छा असूनही त्या हिमपर्वताचं दर्शन घेता येणं शक्य नव्हतं, कारण सावध होण्यापूर्वीच पुढच्या विदेहांना आम्हाला पादाक्रांत करायचं होतं.

**

# नऊ

काष्ठमंडप सोडताच सैन्यानं विदेहांना सामोरं आणण्याचं ठरविलं. या देशाची राजनगरी होती मिथिला! निमीवंशातील मिथिराजाची ऐश्वर्यनगरी. या निमीवंशात मिथी नावाचा राजा होऊन गेला होता. त्याच्या नावावरूनच विदेहांच्या राजनगराला मिथिला नाव पडलं होतं. त्यापूर्वी त्या नगराचं नाव 'वैजयंत' होतं. या निमीवंशातील सर्वच राजांना 'जनक' म्हणत होते. त्यांपैकी सीरध्वज राजा हा रामपत्नी सीतेचा पिता होता. या मिथिलेच्या सिंहासनावर निमीपासून धृतीपर्यंत जवळ-जवळ शंभर राजांनी अकंटक राज्य केलं होतं. आता तिथं बहुलाश्व राजा होता. त्याचा पुत्र कृती हा अतिरथी होता. त्या दोघांशीही आम्हाला तोंड द्यावं लागणार होतं. बहुलाश्व आणि कृती!

काष्ठमंडप ते मिथिला या दीर्घ पट्टयात एकही नदी नव्हती. सगळा प्रदेश पठारमय होता. हिरवी कुरणं विस्तीर्ण घेर धरून क्षितिजापर्यंत पसरली होती. आमच्या अफाट हत्तीदलांनी ती साफ होऊ लागली. एक-दोन तळ पडताच तिसऱ्या दिवशी मिथिला समोर आली. सीतेची नगरी! या नगराभोवती खंदक नव्हता, कारण तो भरण्यासाठी जवळपास एकही नदी नव्हती. सर्व नगराभोवती काळ्या पाषाणांचा भक्कम प्राकार होता. त्या प्राकाराच्या तटावरून बहुलाश्वाचे सैनिक भृशुंडी आणि शतघ्नीमधून दगडफेक करू लागले. महाद्वाराचं रक्षण करण्यासाठी स्वत: बहुलाश्व आणि त्याचा पुत्र कृती रथांत सज्ज होऊन निवडक सैन्यासह उभे होते. महाद्वार आतून भक्कम आडदंड टाकून बंद केलं होतं. ते दोघेही पितापुत्र एकदमच दादावर धावले. आम्ही तटावर घेरून भृशुंडी चालविणारे तटावरचे सैनिक बाणांनी टिपू लागलो. औदुंबराची पक्वं फलं देठ तुटताच खाली कोसळतात तसे ते तटावरून टपटप खाली कोसळू लागले. आमच्या सैन्याची डिंडिम, नगारे ही भेदक वाद्यंच काय ती वाजू लागली. महाद्वारावर एकटा दादा त्या दोघा अतिरथींना संत्रस्त करीत होता. तटावरच्या दगडांच्या वर्षावानं आमचे अनेक सैनिक जखमी झाले. कित्येक गतप्राण झाले. आतापर्यंतच्या प्रवासात मिथिला आम्हाला भारी पडली!

इतक्यात महाद्वारावर कृतीला नि:शस्त्र करून दादानं आपलं धनुष्य त्याच्या गळ्यात फासासारखं अडकवून ओढलं! तो आपल्या रथातून धाडकन खाली कोसळला. आपला पुत्र कामी आला या भ्रामक समजुतीनं बहुलाश्व भेदरला! हातातील धनुष्य फेकून तो कृतीच्या मूर्च्छित देहाकडे पाहत तटस्थ उभा राहिला. हिरण्यवर्मानं त्याला रथासह उधळून बाजूला केला. आमच्या हत्तींनी मिथिलेचं, शंभर पिढ्यांच्या सलग निमीवंशीय जनक राजांना अखंड आश्रय देणारं, ते भव्य महाद्वार मोडून पाडलं! तटाशी भिडलेल्या कुरू सैन्यानं महाद्वाराकडे गर्दी करताना आरोळ्यांचा पाऊस पाडला.

"सेनापती कर्ण महाराज!"

"जयतु!"

विदेहांची मिथिला हस्तगत झाल्याची शुभवार्ता घेऊन दूत हस्तिनापुराकडे दौडू लागला, तेव्हा पौष मासाचा शुक्लपक्ष संपत आला होता.

ज्या शेतात सीरध्वज जनकाला सीता सापडली होती ते शेत पाहून आणि बहुलाश्वाकडून रत्नं, हिरे, माणकं, सुवर्ण यांची विपुल खंडणी घेऊन आम्ही मिथिला सोडली. याच विदेह राज्यात दुसरं ख्यातनाम नगर होतं कुसुमपूर. हिरण्यवती नदीच्या काठी वसलेल्या त्या नगरातूनही आम्ही आमच्या राजदंडाची मिरवणूक काढली. तो दिवस पौष मासातील पौर्णिमेचा होता. टिपुऱ्या चांदण्यात रात्री मी आणि दादा हिरण्यवती नदीच्या एका घाटावरच्या बुरुजावर बसलो होतो. समोरच्या पात्रातील लाटा अखंडपणे नाचत चंद्रकिरणांशी धावपळीचा खेळ खेळत होत्या. तीरावर कदंब आणि बच्यांचे वृक्ष उभे होते. दादाच्या कानांतील कुंडलं हळूहळू लयीत डुलत होती. त्यांची प्रकाशवलयं टिपूर चांदण्यातही चमचमत होती.

"हस्तिनापूर सोडून आपल्याला जवळ-जवळ दीड-एक महिना झाला. या कालात तुला एकदाही राजनगराची आठवण झाली नाही?" मी हिरण्यवतीच्या लाटांकडे पाहत त्याला विचारलं.

"कशावरून काढलास हा निष्कर्ष? अरे, मीही एक माणूसच आहे!"

"तसं नाही. तू तर नेहमीच सैन्याची व्यवस्था, रचना, खाद्य, शस्त्रं यात गढलेला असतोस म्हणून म्हटलं."

"जरी मी या सर्वांत गढलेला असलो, तरी हस्तिनापुरातील सर्वांची आठवण ही मला येतेच. संग्रामात असलो की, मात्र दुसरं काहीच सुचत नाही."

"मला वाटतं आता या नगरातून जाणाऱ्या दूताबरोबर तू दुर्योधनाला पत्र द्यावंस. आनंदानं वेडावून जाईल तो."

"नाही. त्याला कोणतंही पत्र न देता आकस्मिक एक दिवस त्याच्यापुढं उभा राहूनच मी त्याला चकित करणार आहे! अंगदेशाचा अभिषेक करून त्यानं मला जेवढं उपकृत केलं आहे त्याच्या दसपट, ही दिग्विजयाची अगणित संपत्ती त्याच्या चरणांवर घालून मी त्याला उपकृत करणार आहे." बोलता-बोलताच तो बुरुजावरून उठला.

"आपल्या या दिग्विजयासाठी, तिकडे हस्तिनापुरात वृषालीवहिनी देवाच्या गाभाऱ्यापुढं रोज नंदादीप जाळत असतील. आपल्या दूतांची आतुरतेनं वाट पाहत असतील." मीही उठलो. आम्ही शिबिराकडे चालू लागलो.

"बस्स! एवढाच विचार केलास तू? मग आता ऐक तर! माझी भूर्जपत्रं घेऊन हस्तिनापुराकडे दररोज दूत जातो!"

"आँ! मघाशी तर तू..."

"ती पत्रं राजवाड्यावरच्या कुणालाही नसतात!" धीमी पावलं उचलीत आणि चांदण्यात निथळलेल्या रुपेरी कुसुमपुराकडे पाहत तो शांतपणे म्हणाला.

"मग कुणाला असतात? अश्वत्थामन्‌ला?" मला त्या दोघांचा दाट, निकट स्नेह आठवला. त्याच्याशिवाय अन्य कोणालाही तो पत्र धाडणं शक्य नव्हतं.

"नाही! ती पत्रं असतात युद्धात कामी आलेल्या सैनिकांच्या मातापित्यांना! तो दूत राजवाड्यातील कुणाचीही गाठ घेत नाही." घसरलेलं अधरीय खांद्यावर फेकीत तो म्हणाला. जरी मी त्याच्या नित्य सहवासात होतो; तरीही त्याच्या मनाचा थांग काही मला लागला नव्हता हेच खरं!

**

# दहा

कुसुमपूर सोडून आम्ही विदेहांच्या सीमेबाहेर पडलो. यापुढचा देश होता कौशिकी कच्छ! या देशाची राजनगरी होती विक्रमशिला – गंगाकिनारी उभी असलेली.

जन्हू ऋषींच्या आश्रमाला वळसा घालून आम्ही कौशिकी नदी ओलांडली. विक्रमशिला नगर आलं. त्या देशाचा राजा शरण आल्यामुळे युद्धाचा प्रश्नच निर्माण झाला नाही. विजयी सैन्य पुढं चालू लागलं. हा आर्यावर्त आता तरी कुठं संपला आहे की नाही, अशी शंका यावी इतक्या पूर्वेकडे आम्ही प्रवास केला होता. पुंड्रवर्धन नगरही आम्ही पार केलं. कौशिकांच्या सीमा संपल्या.

आता मार्गावर देवद्वार, शिसम, सुरुपर्ण, अशोक, शाल असे थंड प्रदेशातील उंचच उंच, गगनगामी वृक्ष आढळू लागले. लांबट शेपटचांचे पांढरे पक्षी दिसू लागले. यापुढचा देश होता कामरूप! करतोया नदी ओलांडताच विश्रामासाठी आम्ही तळ टाकला, कारण आता लागणारी लोहिता वा ब्रह्मपुत्रा नदी म्हणजे आम्ही आतापर्यंत उल्लंघिलेल्या सर्व नद्यांत मोठी नदी होती! तिला नदी म्हणतच नव्हते. तो एक विशाल पात्राचा नद होता! ब्रह्मपुत्र!

हत्तीही त्या नदात जाण्यासाठी तयार नव्हते; मग घोडचांचा प्रश्नच नव्हता. त्यांना करतोया नदीच्या काठीच ठेवून निवडक सैन्यानिशी आम्ही प्रचंड नौकांनी ब्रह्मपुत्र नद मोठ्या कष्टानं ओलांडला. कामरूप राज्यात आमच्या प्रवेश झाला. या राज्यात एकच मोठं नगर होतं. प्रागज्योतिषपूर! राजा होता भगदत्त. त्याच्या पित्याला – नरकासुराला वधून द्वारकाधीश श्रीकृष्णानं नियुक्त केलेला.

ज्या संकटांना तोंड देऊन आम्ही ब्रह्मपुत्र ओलांडला होता, त्याचं सार्थक करण्यासाठी आम्ही आता साक्षात इंद्राशीही प्राणपणानं लढलो असतो! त्यामुळं भगदत्ताचं भय कुणालाही वाटत नव्हतं. या कामरूप देशातील वायुमान अतिशय थंड होतं. तरीही ब्रह्मपुत्र पार करताच आम्ही दोन दिवसांतच प्रागज्योतिषपूर नगराला वेढून टाकलं. भगदत्तानं निकराचा लढा दिला; पण तो अधिक काल टिकाव धरू शकला नाही. त्याची खंडणी स्वीकारून आम्ही परतलो. पूर्वेकडचं हे सर्वांत शेवटचं टोक होतं. ब्रह्मपुत्रातीरावर वसलेलं.

त्रिपुरा, कामलका, सुवर्णग्राम अशी नगरं मागं टाकत आम्ही परत ब्रह्मपुत्रा ओलांडून माघारी आलो. करतोयाच्या काठावरची हत्ती आणि घोडे यांची पथकं पुन्हा एकत्र आली. आता थोडं दक्षिणेकडं वळणं भाग होतं.

पुन्हा आम्हाला करतोया पार करून गंगेला ओलांडायचं होतं! आमच्या प्रवासातील ते गंगेचं दुसरं दर्शन होतं! आता भेटणारी गंगा मात्र सागरासारखी अफाट पसरलेली असणार होती. अनेक मुखांनी ती संथपणं जिथं पूर्वसागराला मिळते, तो वंग देश आम्हाला जिंकायचा होता!

वंग देशात प्रवेश करण्यासाठी म्हणून आम्ही गंगेचं विशाल पात्र ओलांडलं. हिमालयाच्या कटिखांद्यावरून धडाधड उड्या घेणारी उगमाजवळची गंगा, जी त्या

स्थळी अल्लड बालिकेसारखी वाटते, तीच प्रयागजवळ यमुनेला आणि शरयूला त्यांच्या गुजगोष्टी विचारणारी गंगा अवखळ किशोरी वाटते, पण पुढं सपाट प्रदेशावरून पात्राची रुंदी विस्तारत संथपणे पुढं सरकणारी गंगा म्हणजे लवकरच होणाऱ्या पतिदर्शनामुळे लाजून चूर झालेल्या आणि धीमी पावलं टाकणाऱ्या एखाद्या मुग्ध पुरंध्रीसारखी वाटते!

अशा गंगेकाठचं कलिकादेवीचं कलिकानगर आलं. वंग देशाच्या या राजनगरावर समुद्रसेन आणि चंद्रसेन हे दोन बंधू राज्य करीत होते. मानववस्ती थोडकीच आणि इतर राज्यांपासून वेगळा पडल्यामुळे वंगदेश युद्धशास्त्रात कितीतरी मागं होता. तरीही त्यांच्या शूर नेत्यांनी आम्हाला प्रखर विरोध केला. समुद्रसेन आणि चंद्रसेन शौर्यानं लढले, पण समुद्रासारखी आमची सेना जिंकणं त्यांना कधीच शक्य नव्हतं. या युद्धात चंद्रसेन मारला गेला. समुद्रसेन मूर्च्छित होताच वंगांचं सैन्य शस्त्रं टाकून शरण आलं. वंग पडला! आमचं नगर सोडून आम्हाला दोन मास झाले होते. पहिल्यानंच पूर्वसागराचं रोमांचकारी दर्शन आम्हाला झालं! उफाळणाऱ्या, गर्जणाऱ्या प्रचंड लाटांचं तांडवनृत्य पाहताना आम्हाला आमचा दिग्विजयही त्यापुढं क्षुद्र वाटला! मानव पराक्रमाचे कितीही पर्वत उभे करो, निसर्गापुढं तो नगण्य आहे! पूर्वसागरातील लाटांमधून थपडा खात हिंदकळणाऱ्या जलबिंदूसारखा!

कलिकानगरात एक दिवस राहण्याची दादाची तीव्र इच्छा असल्यामुळं सागराचं गूढरम्य, घरघरणारं संगीत ऐकत आम्ही तिथं तळ ठोकला.

दुसऱ्या दिवशी पहाटे उठून पाहतो तो दादा शिबिरातच नव्हता! सैनिकांची विचारणा करीत तो सेनेतच कुठंतरी असेल म्हणून पथकापथकांतून शोध घेतला तरी काहीच कळलं नाही. भयाची एक दुष्ट शंका माझ्या मनात डोकावून गेली. अनेक राजांशी आमचं वैर निर्माण झालं होतं – कुणी काही घातपात तर केला नसेल? क्षणाक्षणाला माझी अस्वस्थता वाढू लागली. सेनापतीशिवाय सैन्य पुढं कसं जाणार? आणि इतर सर्वांचा तो सेनापती असला तरी माझा प्रिय ज्येष्ठ बंधू होता. त्याच्या शोधार्थ सर्व कुशल हेर मी चोहो दिशांना पेरले. सैन्यात मात्र त्याची वाच्यताही केली नव्हती. जो-तो पुढील प्रयाणासाठी बांधाबांध करण्यात मग्न झाला होता.

एका घटकेनंतर मी पाठविलेल्या हेरदूतांपैकी कीर्तिध्वज परत आला. त्याची मुद्रा आनंदी पाहताच मी त्यानं आणलेली माहिती ऐकण्यासाठी त्याला एकांती घेऊन कान टवकारले.

"महाराज सुखरूप आहेत! पूर्वसागराच्या लाटांतील तुषारांत निथळत कमरभर पाण्यात उभे राहून ते अर्घ्यदान करीत आहेत! त्यांचा साधनाभंग न करता मी तसाच माघारी आलो." त्यानं घोड्याच्या पाठीवर थोपटत सांगितलं.

मी सुटकेचा नि:श्वास सोडला!

**

# अकरा

कलिकानगर सोडताच लागणार होता तो ताम्रलिप्त देश. या देशाच्या राजनगराचं नाव होतं ताम्रलिप्तनगर! राजा होता ताम्रलिप्त. ताम्रलिप्त, मल्ल हे देश इतके लहान होते की, त्या राज्यांचा घेर हस्तिनापूर नगराएवढाही नव्हता! त्यामुळेच विरोधाची कसलीच भीती नव्हती. यापुढं आम्हाला प्रखर विरोध करण्याचं सामर्थ्य केवळ एकाच राज्यात होतं. मगधांच्या!

कलिकानगराचा पाडाव झाल्याची वार्ता ऐकून हादरलेला ताम्रलिप्त संधीला तत्काल तयार होऊन आमच्या स्वागताला राजनगराच्या वेशीवर उभा होता. त्यानं दिलेल्या भेटीत अगणित मोती होते. त्याचं राज्यच पूर्वसागराच्या ऐन किनाऱ्यावर होतं; जो सागरकिनारा मोत्यांसाठी प्रसिद्ध होता. तेथील प्रजाजन मोत्यांचा व्यवसाय करीत – सर्व आर्यावर्तात मोत्ये पुरवीत.

ताम्रलिप्तनगर सोडून ओड्रांच्या राज्याकडं वळावं काय हा प्रश्न आमच्यासमोर उभा राहिला, पण ती कल्पना सोडून आता मल्लांच्या छोट्या राज्याकडं वळणं भाग होतं, कारण ओड्र आणि ताम्रलिप्त यांमध्ये ऋक्षपर्वतांची दुर्लंघ्य रांग पसरली होती! मल्लदेश समोर ठेवून चालण्याशिवाय अन्य मार्गच आमच्या सेनेपुढं नव्हता आणि त्या मार्गानं जायला आम्हीही उत्सुक होतो; कारण मल्लदेशापलीकडे होता तो अंगदेश! युवराज दुर्योधनानं ज्याचा अभिषिक्त राजा म्हणून वसुदादाला घोषित केलं होतं तो देश! दादानं त्या देशाची राजनगरी बदलून ती चंपानगरीला नेली होती. कितीतरी वर्षांच्या दीर्घ कालखंडानंतर आम्ही बालपणी जिथं खेळलो, भांडलो, वाढलो त्या चंपानगरीचं दर्शन आता होणार होतं!

मल्ल पर्वताजवळून जात-जात आम्ही मल्लदेश गाठला. दादा हस्तिनापुरातच राहत असल्यामुळे त्यानं अंगदेशावर प्रत्यक्ष राज्यकारभार पाहण्यासाठी एक मांडलिक नेमला होता. तो आमचं स्वागत करण्यासाठी मल्लदेशात आला होता. त्यानं दादाला आदरानं वंदन केलं. आमचे सैनिक अंगदेशाच्या सीमेत जाण्यासाठी उत्सुक झाले होते. त्यांना माहीत होतं की, अंगराज त्या देशातून चार दिवस तरी हलणार नव्हते! भरपूर विश्रामाची संधी सर्वांना मिळणार होती.

मांडलिकासह आम्ही अंगदेशाच्या सीमेवर आलो! पूर्वाश्रमीचा सूतपुत्र वसुसेन आज अंगराज कर्ण – दिग्विजयी अंगराज कर्ण म्हणून अंगदेशाच्या सीमेवर उभे होते! सहस्रावधी अंगदेशीय नगरजन त्यांच्या स्वागतासाठी विविध प्रकारची फुलं घेऊन जमले होते. सुवासिनी जलकुंभ घेऊन सामोऱ्या आल्या. आपल्या देशाच्या राजाच्या दर्शनानं वेडावलेल्या सहस्रांनी गगनभेदी जयघोषणा केल्या. "अंगराज कर्णमहाराजांचा विजय असो." "चंपानगराधिपती वसुसेन महाराजांचाऽऽ विजय असो!" "दिग्विजयी अंगराज कर्णऽऽ– जयतु – जयतु!!"

बालपणीची पाषाणसिंहासनावरील घोषणा सत्य झाली! फुलं उधळली गेली. हस्तिनापूर सोडल्यापासून कधीही न लागलेले कुंकुमाचे पवित्र केशरी तिलक पुन्हा

आमच्या भाली लागले. निरांजनांची औक्षणं झाली. कुरूंच्या सेनेनं वाद्यांच्या कलकलाटात आणि घोषणांच्या गदारोळात अंगदेशात प्रवेश केला. माझं मन तर त्या प्रसंगानं पिसासारखं हलकं झालं. सौख्याचा अतिरेक सहन करण्यासाठीसुद्धा मनाचं एक विशिष्ट सामर्थ्य असावं लागतं! दादा मात्र नेहमीच्याच शांतपणानं जैत्ररथात बसला होता. दोन्ही हात जोडून नम्रपणानं तो आपल्या प्रिय नगरजनांच्या विशुद्ध प्रेमाचा स्वीकार करत होता. कुठं कसलीही उचंबळ नव्हती. त्याचं मुखमंडल सूर्यबिंबासारखं नुसतं झळझळ तळपतच होतं. आमच्या रथाच्या माथ्यावर तो जगत्पिता आदित्यही, तेजाचा रस ओतीत ते दृश्य असतील तितके नेत्र उघडून पाहत असेल! आणि ''जयतु, जयतु कर्ण'' असंच म्हणत असेल असं मला वाटलं.

संध्याकाळच्या सुमारास आम्ही चंपानगरीजवळ आलो! या नगरीचं ते फार वर्षांनंतरचं पहिलं दर्शन होतं! या नगरातच आम्हा सारथ्यांच्या पर्णकुटचा होत्या! आमच्या बालपणीच्या स्मृती या नगरानंच प्रेमानं जोपासलेल्या होत्या! इथल्या पर्णकुटीनं आमच्यावर प्रेमळ आश्रयाचं छत्र धरलेलं होतं. हसवत-खेळवत आम्हाला वाढवलेलं होतं. जे शिकवायचं ते शिकविलेलं होतं.

पक्षयांचे थवे पाहत, गंगाकिनारीचे शिंपले गोळा करण्यासाठी रथातून जाणारे कर्ण-शोण, धनुष्यानं लतावृक्षांवर लक्षयवेध करणारे कर्ण-शोण, अरण्यातून किकरवृक्षाची रथचक्रांसाठी लाकडं आणणारे कर्ण-शोण, राधामातेला एकमेकांच्या कागाळ्या ऐकविणारे कर्ण–शोण, राजसभेचा पटांगणावर खेळ चालला असताना वृषभाला तोंड देण्यासाठी एकाच पाषाणावर उभे राहिलेले कर्ण-शोण आणि रथातून हस्तिनापूरला जाताना पुन:पुन्हा मागं वळून आपल्या भावाकडे पाहणारा कर्ण आणि रथामागून रडवेला होत, हात उंचावीत याच नगराच्या सीमेपर्यंत धावणारा शोण! सर्वच्या सर्व घटना इथल्या लतावेलींनी आणि पशुपक्षयांनीही पाहिलेल्या होत्या! आणि आज!

आज दिग्विजयी अंगराज कर्ण आणि त्याचा उजवा हात शोण भरल्या मनानं त्याच नगरीत प्रवेश करीत होते. प्रेमभरानं नगरजन त्यांचा सतत विजयघोष करीत होते, त्यांच्यावर सुवर्णपुष्पं उधळीत होते. छे! जीवन म्हणजे किती महान उलथापालथ असते! इथं कणाएवढ्या बीजातून महान वटवृक्ष फोफावतात! करांगुलीएवढ्या धारेतून गंगायमुना धावतात! मी सत्य अनुभवत होतो की स्वप्न पाहत होतो ते माझं मलाच कळत नव्हतं.

मनाच्या एका कप्प्यात बालपणीच्या स्मृती आणि एका कप्प्यात दिग्विजयी सैन्ययात्रेच्या स्मृती घोळवीत आम्ही चंपानगरीच्या मार्गावरून रथातून चाललो होतो. एव्हाना या नगरीचं स्वरूप कितीतरी पालटलं होतं. राजनगरीचं महत्त्व मिळाल्यामुळे इथं भव्य वास्तू उभारल्या गेल्या होत्या. तरीही दादाचे डोळे भिरभिरत काहीतरी शोधत होते! त्याचे हात सर्वांच्या प्रेमाचा स्वीकार करीत होते; पण डोळे कशाचातरी वेध घेत होते. वाद्यांच्या निनादानं चंपानगरी पुलकित झाली होती. त्याच्या नावाच्या घोषणांचा पाऊस पडत होता.

एकाएकी हात उंचावून दादानं मला मंडित जैत्ररथ रोधण्याची आज्ञा केली. मी वेग आखडले. खाली उतरून तो झटकन नगरजनांच्या गर्दीतून आता घुसला! मीही त्याच्या मागोमाग चाललो. मार्गाकडेच्या वास्तूंना तरातर वळसा घालून तो मागील नेमक्या मोकळ्या पटांगणावर आला! ते – तेच पटांगण होतं जिथं लहानपणी आम्ही

राजसभेचा खेळ मांडला होता! ज्या पाषाणाचं त्याच्यासाठी आम्ही सिंहासन केलं होतं तो पाषाण एका कोपऱ्यात तसाच पडला होता! नव्या वास्तू बांधताना कुणीतरी तो पालथा करून त्याचा बैठकीसारखा भाग धरतीकडे केला होता! सभोवती गवत माजलं होतं. पर्जन्यामुळे पाषाणावर शेवाळ दाटलं होतं.

"शोण, ते बघ तुझ्या वसुदादाचं पहिलंवहिलं सिंहासन!" तरातर त्या पाषाणाजवळ जाऊन त्यानं आपल्या हातातील राजदंड माझ्या हाती देत एकट्यानंच तो पाषाण सुलटा केला! माझ्या हातातील कुरूंचा राजदंड घेऊन, तो देशोदेशींच्या राजांना नामोहरम करणारा राजदंड त्यानं सरळ त्या पाषाणाच्या बैठकी भागावर ठेवला! त्याच्या मनात काय होतं ते सांगता येणं अतिशय कठीण होतं.

"चंपानगराधिपती वसुसेन महाराजांचा – " असं म्हणायला तिथं बालपणीचे कोणी मित्रही नव्हते! त्या आवाजानं खवळून अंगावर यायला बिथरलेला वृषभही नव्हता! होत्या केवळ स्मृती! सत्य झालेल्या! साकारलेल्या!

क्षणभरानं त्यानं राजदंड उचलला. एकदा त्या सिंहासनावर कटाक्ष टाकला आणि आम्ही माघारी परतलो. पुन्हा रथारूढ झालो. मिरवणूक राजमार्गावरून पुन्हा पुढं जाऊ लागली. आम्ही बालपणी जिथं राहत होतो त्या पर्णकुट्या आल्या! दादाच्या सूचनेवरून मांडलिकानं त्या व्यवस्थित राखून जतन केल्या होत्या. त्या पर्णकुटीत मांडलिकाच्या वाड्यावरचे सारथी राहत होते! पर्णकुटीच्या दारात उभे राहून ते आमच्या दिग्विजयी सेनेकडं अभिमानानं पाहत होते. सेनापतीचं डोळाभर दर्शन घेत होते. ज्या पर्णकुटीत आम्ही राहत होतो तिच्या दारात एक अतिशय वृद्ध, शुभ्रकेशा सारथी उभा होता. मी आठवण म्हणून त्या पर्णकुटीला वंदन केलं. मांडलिकाच्या गंगेकाठच्या वाड्यावर जाण्यासाठी घोड्यांच्या पाठीवर मी आसूड उगारला!

दादानं मागून तो तसाच वरच्यावर पकडून ठेवला!

"शोण, खाली उतर!" स्वत: खाली उडी घेताना त्यानं मला आज्ञा केली.

कुणाकडेच लक्ष न देता तो तडक त्या पर्णकुटीतील नेमक्या आमच्या पर्णकुटीजवळ गेला! त्याला समोर पाहताच तो चित्ररथ नामक वृद्ध सारथी गोंधळला. आपोआप आत निघून गेला. त्याच्या मागून आत शिरताना दादाचं मस्तक महिरपीला अडलं! तो उंच झाला होता तसं ते ठेंगणं द्वार काही उंच झालं नव्हतं! त्यानं आपली उंची त्या महिरपीशी जमवून घेतली! खाली वाकून तो आत शिरला! मीही आत गेलो.

गोंधळलेला मांडलिक प्रथमच त्या पर्णकुटीत आला! वृद्धानं अंथरलेल्या काळ्याबाळ्या कांबळ्यावर कुरूंच्या आठ लक्ष सेनेचा दिग्विजयी, कवच-कुंडलधारी, सुस्वरूप सेनापती — अंगदेशाचा राजा पाय आखडून बसलेला पाहून काय बोलावं ते त्या मांडलिकालाही कळेना!

"महाराज, आपण राजवाड्यावर चलावं." तो कर्तव्यबुद्धीनं म्हणाला.

"नाही! मी इथंच या पर्णकुटीतच चांगले चार दिवस राहणार आहे! हे सारथी खातात तेच अन्न खाणार आहे! गंगेवर जाऊन अर्घ्यदान करणार आहे. तुम्ही माझ्यासाठी पुन्हा इकडे येण्याचाही त्रास घेऊ नका. सैनिकांची व्यवस्था नीट करा! जा!" दादा पर्णकुटीच्या गवताळ छताकडे पाहत म्हणाला.

"जशी आज्ञा." मांडलिक कवाडाबाहेर पडताना मान नमवून म्हणाला.

मी ओशाळून मान खाली घातली! मी ज्या पर्णकुटीला टाळू पाहत होतो तिला

दादानं आपलं म्हटलं होतं.

“शोण, वर ये – या कांबळ्यावर!” त्यानं मला जवळ बसवून घेतलं. तेवढ्यात मांडलिक पुन्हा आता आला. त्या वृद्धाला आज्ञा देत तो म्हणाला. “ए, तू जरा बाहेर ये. महाराजांना विश्रांती घेऊ दे.”

“नाही! ते बाबाही इथंच राहतील. जा तुम्ही!” मांडलिकाला करड्या आवाजात आज्ञा केली गेली.

मी दादाच्या पायांच्या बोटांकडे पाहत विचारमग्न झालो. बालपणापासूनचं सगळं जीवनच रिंगण धरून त्या पर्णकुटीत माझ्याभोवती नाचू लागलं. माझ्या जीवनात मी एक गोष्ट चांगली केली होती. एका अथांग मनाच्या अद्वितीय योद्धयाचं मी सारथ्य पत्करलं होतं!

चित्ररथ बाबांची स्त्री बिंदीका हिनं पत्रावळीवर तत्परतेनं आणून ठेवलेले नेमके दादाचे प्रिय अपूप पाहताच तो माझ्याकडे बघून मुखभर हसला!

**

# बारा

चार दिवस चंपानगरीत कसे गेले ते आम्हाला समजलंच नाही. पर्णकुटी सोडताना दादानं कंठातील मोत्यांचा गुंफ त्या चित्ररथ बाबांचा हाती दिला. "दूरदेशी असलेले तुमचे नातेवाईक बोलावून घेऊन ही पर्णकुटी सदैव माणसांनी जागती ठेवा." अशी त्याला सूचना केली. मांडलिक देत असलेली सुवर्णाची खंडणी नाकारून उलट त्यालाच दिग्विजयाच्या संपत्तीतून भरपूर हिरे, माणकं देऊन चंपानगरीची शोभा आणखी वाढविण्याची सूचनाही देण्यात आली!

आता तिचं दर्शन? ते कोण आणि कसं सांगू शकलं असतं? अश्रुपूर्ण नेत्रांनी आम्ही चंपानगरी सोडली!

यापुढचं साम्राज्य होतं रणकुशल मगधांचं! आर्यावर्तात कुरूंच्या हस्तिनापूर राज्यानंतर सामर्थ्याच्या दृष्टीनं मगधांचाच क्रम लागत होता. जरासंधाच्या नेतृत्वाखाली एकेकाळी त्यांनी मथुरेवर सतरा स्वाऱ्या केल्या होत्या! आसपासची सर्व राज्यं मगधांचं वर्चस्व स्पष्ट मान्य करीत होती. जरासंधानं तर भोजराजांचा पराभव करून शत-शत राजे आपल्या कारकिर्दीत, नरयज्ञात बली देण्यासाठी कारागृहात कोंडून ठेवले होते! मगधांचं सशस्त्र सैन्य म्हणजे धिप्पाड योद्धयांचा गर्जना करणारा महासमुद्रच होता. गदा, शूल, तोमर, शतघ्नी, खड्ग, चाप, बाण, भाला, त्रिशूल, गज, अश्व, भृशंडी सर्व प्रकारची पथकं कुशल लढवय्यांनी ठासून भरलेली होती. त्यांची सैन्यसंख्या पाच अक्षौहिणी होती. म्हणजे जवळ-जवळ दहा लक्ष योद्धयांशी आमची गाठ होती! हे मगध पुरुवंशातील होते. त्यांचं राजनगर होतं गिरिव्रज! हे गिरिव्रजनगर वसू राजानं गंगेकाठी वसविलं होतं. त्याच्यानंतर त्याचा पुत्र बृहद्रथ सिंहासनावर आला. या बृहद्रथाच्या पुत्रानं – जरासंधानं आपल्या अचाट सामर्थ्यानं मगधांचा सर्व राज्यांवर वचक बसवून आपल्या राज्याला अफाट साम्राज्याचं स्वरूप आणलं होतं. जरासंधाचा वध भीमानं केल्यामुळे गिरिव्रजनगरावर जरासंधाचा पुत्र सहदेव राज्य करीत होता. आमच्या सैन्याशी त्याला टक्कर द्यावी लागणार होती. चंपानगरी सोडताना आम्ही तेथील माहीतगार सैनिकांची पथकं आमच्या समवेत घेऊन आमचं सामर्थ्यही वाढविलं होतं. आमची सैन्यसंख्या आता दहा लक्षांच्या आसपास झाली होती. त्यात जित राजांनी देणगी दिलेले सैनिकही होते. सामना अटीतटीचा होता. पौषातील शुक्लपक्ष संपताच योजनांमागून योजनं मार्ग आक्रमीत दुर्वास ऋषींच्या आश्रमाजवळून आम्ही गिरिव्रज नगराच्या सीमेवर थडकलो! प्रथमदर्शनीच मगधांच्या रणकुशलतेचा डोळे दिपविणारा प्रत्यय आम्हाला आला! सगळ्या नगराभोवतीचा खंदक लाकडांनी भरकाठ भरून ती लाकडं त्यांनी पेटवून दिली होती! अग्नीच्या ज्वालांच्या मंडलात गिरिव्रजाचा प्राचीन अभेद्य तट मान उंचावून ताठ उभा होता! भयावह दिसत होता. स्वस्थ राहण्याशिवाय दुसरा मार्गच आमच्यासमोर नव्हता. दोन-एक दिवस तडतडत पेटणारी लाकडं खंदकात धगधगणाऱ्या अंगारांचा सडा घालून नाहीशी झाली! त्या अंगाराचा विस्तव निवण्याची वाट पाहत खंदकाबाहेर आम्ही दोन दिवस तळ ठोकला, पण तिसऱ्या दिवशी पहाटे

पाहतो तो नवे अंगार तयार करण्यासाठी लाकडांची नवी चवड एका रात्रीत खंदकात भरण्यात आली होती! पुन्हा तटाला चाटणाऱ्या प्रचंड ज्वाला तयार झाल्या! "किती दिवस चालायचं हे असं! मगधांचा पाडाव शक्य आहे की नाही?" अशी कुजबुज आमच्या सैनिकांत सुरू झाली.

आठ दिवस खंदकाबाहेर थांबून-थांबून सैनिक कंटाळले! काहीतरी करणंच भाग होतं. नववा दिवस उजाडला. खंदकातल्या अंगारांवरून राखेचे कण आमच्या सैनिकांच्या डोळ्यांत शिरू लागले. खंदकापलीकडच्या तटावरच्या छिद्रांतून मगध सैनिक आमची त्रेधा मिटक्या मारीत पाहू लागले. आम्हाला तर काहीच सुचत नव्हतं.

शेवटी सर्व पथकप्रमुखांची उपसेनापती या नात्यानं मी तातडीची बैठक बोलाविली. आपल्या शिबिरात दादा विचारमग्न स्थितीत स्वस्थ बसून होता. त्याच्या समोर जाण्याचं धैर्य कुणालाही होत नव्हतं; म्हणून त्याच्या अनुपस्थितीतच माझ्या शिबिरात बैठकीसाठी जमलेले पथकप्रमुख बसले होते. आमची प्रतिष्ठा पणाला लागली होती. काहीतरी निर्णय घेणं क्रमप्राप्त होतं. लढा; नाहीतर माघार!

सर्व पथकप्रमुख जमताच मी सर्वांना, अंगारांनी भरलेले खंदक कसे ओलांडायचे यासाठी सूचना विचारल्या. सर्व जण बुद्धीला ताण देऊ लागले. कुणी म्हणत होते हत्तींवरून गंगेचं पाणी आणून ते खंदकात ओतावं! कुणी म्हणत होते सैनिकांच्या पायांना ओली वस्त्रं गुंडाळावीत! एकानं तर 'एवढं राज्य सोडून तसंच पुढं गेलं तर काय बिघडणार?' असा प्रश्न विचारला! सर्व जण किंकर्तव्यमूढ झाले होते.

एक कल्पना सर्वांसमोर मांडली गेली. "सर्वांनी असं तिष्ठत राहण्यापेक्षा काही जणांनी आपले देह अंगारावर सरळ लोटून द्यावेत! त्यांच्या पाठीवरून मागच्या सशस्त्र सैनिकांनी खंदक ओलांडावेत!"

ही कल्पना काहींनी उचलून धरली. या पद्धतीनं आमचे शे-पाचशे सैनिक कामी येणार असले तरी इतर सर्व जण त्यांचं बलिदान व्यर्थ जाऊ देणार नव्हते! आपल्या साथीदारांच्या अंगारांनी पोळणाऱ्या शरीरावरून चाल करणारे सैनिक मगधावर निश्चित तुटून पडणार होते. त्यांचा धुव्वा उडविणार होते.

सर्व पथकप्रमुखांना परत त्यांच्या पथकात पाठवून, अशा बलिदानाला तयार असणाऱ्या सैनिकांची नामावली तयार करण्याची मी आज्ञा दिली. एक नव्हे, दोन नव्हे हजारो सैनिकांनी आपली नावं देऊन कीर्तीचा रोमांचकारक मार्ग स्वीकारला! त्यांच्या निवडीचा प्रश्न आमच्या समोर उभा राहिला! जे अधिक धिप्पाड होते ते निवडण्यात आले. कुठल्याही युद्धात कुणीही घेतला नसेल, असा तो कर्तव्यकठोर निर्णय होता. निवडलेले सैनिक शिस्तबद्धपणे उभे करून स्वतःच्या या कल्पनेवर स्वतः खूश होत ती सांगण्यासाठी म्हणून मी मान वाकवून दादाच्या शिबिरात प्रवेश केला!

शिरस्त्राण काढून ठेवल्यामुळे त्याचे कुरल सोनेरी केस स्वैर विखुरले होते. डोळे मिटलेले होते. जोडहनुवटी ओंजळीत धरून तो चिंतन करीत होता.

"अंगराज, आता चिंता करायचं कारण नाही. खंदक ओलांडायची कल्पना पक्की झाली आहे." मी त्याच्या शेजारी बसून त्याला माझी रोमांचकारी योजना सांगितली.

"नाही शोण, नाही, असं करता येणार नाही." तो ताडकन आसनावरून उठून शिबिरातल्या निरुंद जागेतच इकडून तिकडे फेऱ्या घालताना अस्वस्थपणे म्हणाला.

क्षणभर शांतता पसरली. त्याच्या नकाराला विरोध करण्याचं धैर्य माझ्यात

नव्हतं! तो जे म्हणेल तेच होणार होतं.

"मगधांच्या धूर्त कल्पनेला मी माझा एकही योद्धा असा बळी पडू देणार नाही! माझा प्रत्येक योद्धा मरायचा असेल, तर समरांगणात लढतानाच मरेल!" तो निर्धारानं म्हणाला.

"मग – मग खंदक पार करायला मार्ग कोणता?" मी विचारलं.

क्षणभर स्तब्धता पसरली. आपलं मस्तक दोन्ही तळहातांत गच्च पकडून तो फेऱ्या घालता-घालता एकदम तसाच थांबला... एक क्षणभरच! एकदम मिटलेले डोळे उघडून तो हसत शांतपणे म्हणाला, "आहे, मार्ग आहे!"

"कोणता?" मी लगबगीनं विचारलं.

"जा शोण, आपल्या नौकापथकातील सहस्रावधी नौकांपैकी अर्ध्या नौका उचकटून त्यांच्या लाकडी फाका मोकळ्या करायला सांगा! त्या अंगारावर अंथरूनच आज आपलं सैन्य एकही योद्धा न गमावता खंदक पार करील!" त्यानं शिरस्त्राण चढविलं! त्याचे निळे डोळे अपार तेजानं तळपले! कुंडलं लडलड हलली.

श्रद्धेनं त्याच्या चरणाला हात लावून मी शिबिराबाहेर पडलो. निवडलेल्या सैनिकांजवळ जात त्यांना विचारलं, "तुमची निवड अंगारांवर शरीर लोटण्यासाठी झालेली नाही! ते काम नौकांचं आहे. जा, नौका उचकटून त्यांच्या लाकडी फाका सत्वर वेगळ्या करा!"

खाडऽऽऽ खाडऽऽऽ खाडऽऽऽ आघातांवर आघात बसू लागले. ज्या नौकांच्या साहाय्यानं आम्ही अनेक नद्या ओलांडल्या त्या मोडल्या जाऊ लागल्या. फाकांचे ढीग पाहताच सर्व पथकप्रमुखांचे डोळे आनंदानं उजळून गेले. किती साधी तोड; पण तोपावेतो कुणाच्याही लक्षात येऊ शकली नव्हती!

शिरस्त्राण घातलेल्या आमच्या सेनापतीनं पुढं होत स्वत: एक-एक फाक सैनिकांच्या हाती द्यायला सुरुवात केली. ती घेताना अमृतलाभ झाल्याच्या आनंदानं कुरू सैनिक जयघोषणा देऊ लागले, "सेनापती अंगराज कर्णऽऽऽ!"

"जयतु! जयतु!"

आमच्या सर्व सेनेनं खंदक ओलांडलेला पाहताचा मात्र तटावरचे मगध सावध झाले! तटाच्या छिद्रांतून ते बाणांचा पाऊसच पाडू लागले. हत्ती–घोड्यांसह आमचं सर्व सैन्य खंदक पार करून नगराच्या तटाला भिडलं होतं. मगधांचे एक-एक अद्भुत युद्धप्रकार आम्हाला सुन्न करीत होते. बाणांच्या शेपटांना पळसाच्या पानांच्या थैल्या करून त्यांतून ते लाल मुंग्यांचा मारा आमच्या हत्तीपथकावर करू लागले! नैमिषारण्याला दाद न देणारे आमचे धिप्पाड हत्ती त्या मुंग्यांनी त्यांच्या कानांच्या नाजूक पटलांचा कडकडून चावा घेताच मर्मभेद होऊन धडाधड खाली कोसळू लागले! किती कुटिल युद्धतंत्र होतं त्यांचं!

"शोण, सर्व हत्तींच्या कानांत वस्त्रांचे बोळे भरून घ्या!" दादा हात उंचावून ओरडला. माहुतांनी अंगावरची उत्तरीयं फाडून त्या वस्त्रांनी हत्तींचे कान झाकून घेतले! एक समस्या मिटली. पथकं पुढं सरसावली.

तटावरून मगधांनी पाषाणफेक सुरू केली. पेटत्या शेपटांचे बाण येऊ लागले. तरीही कुणाला दाद न देता एका प्रचंड हत्तीपथकासह दादा नगराच्या महाद्वाराला भिडलाच. अरिष्टसेन, व्याघ्रशर्मा, हिरण्यवर्मा यांनी तटाला घेरून टाकलं! आता काही

झालं तरी विजय आणि विजयच!

आम्ही महाद्वारासमोर आलो खरे, पण कोणत्याही नगराला नव्हतं असं भक्कम महाद्वार समोर पाहताच आमच्या आशेवर पुन्हा पाणी पडलं! त्या बंद महाद्वाराला बाहेरून अणकुचीदार लोखंडी खिळे उलटे ठोकले होते! एखादा खवळलेला हत्ती त्यावर तुटून पडताच त्याचं गंडस्थळ त्या खिळ्यांतच अडकत होतं! आपल्या जखमी बांधवांच्या शरीरावर धडकायला दुसरा हत्ती काही तयारच होत नव्हता! खिळ्यांत अडकलेला हत्ती काढताना सैनिक थकत होते. पुन्हा समस्या! पुन्हा आव्हान! मगधांचं महाद्वार! अजिंक्य महाद्वार!

दादा क्षणभर थांबला. एका हत्तीच्या पाठीवर हातानं थोपटीत तो विचारमग्न झाला. आणि – आणि झटकन आपल्या अंगावरचं लोहत्राण काढून पुढं होत त्यानं ते एका खिळ्याला टांगलं! त्याच्या मागून सर्वांनीच आपली लोहत्राणं खिळ्यांना सलग टांगली. सर्व खिळे क्षणात झाकून गेले! एकदम दहा हत्तींना भाल्याच्या पात्यांनी डिवचताच त्यांनी निकराची एकच जोरदार धडक दिली! मगधांचं अजिंक्य महाद्वार उन्मळून धुळीत पडलं!! आतापर्यंत सहनशक्तीचा कडेलोट झाल्यामुळे चवताळलेले आमचे कुरू सैनिक आपल्या सेनापतीचा आभाळभेदी जयजयकार करीत, खवळलेले भुजंग वारुळात शिरतात तसे, लक्ष-लक्षांच्या अफाट संख्येने गिरिव्रजात घुसले! मगध साम्राज्य मग एक सामान्य राज्य ठरलं!

घनघोर संग्राम झाला. जरासंधपुत्र सहदेव दादाशी, द्वैरथ, गदा, खड्ग, शूल, तोमर सर्व प्रकारची युद्धं खेळून थकला. माझ्यासमोर मगध सेनापती उभा होता. संध्याकाळपर्यंत मगधांची धुळधाण उडाली. प्रेतांचा खच पडला. बाणांची, त्रिशुलांची, खड्गांची भग्न पाती विखुरली.

नि:शस्त्र सहदेव हात बांधलेल्या स्थितीत व्याघ्रदत्तानं अंगराजापुढं सादर केला! ज्याच्या पित्यानं अनेक राजांचे हात बांधून त्यांना कारागृहात कोंडलं होतं, तो सहदेव स्वत: हात बांधलेल्या स्थितीत अमात्यासह कुरूंच्या सेनापतीपुढं उभा होता! त्याचा सेनापती तर गतप्राणच झाला होता! एवढा मर्मभेदक पराभव मगधांनी यापूर्वी कधीच अनुभवला नसेल. त्यांचा राजध्वज खाली गेला होता.

"बोल, सहदेव काय खंडणी देणार?" आमच्या शूर सेनापतीनं जित राजाला विचारलं.

"आपण सांगाल ती!" धूर्त अमात्यानं मध्येच उत्तर दिलं

"राजा, तू बोल! हिरे, मोती, सुवर्ण, पाचू, प्रवाळ, धान्य, गायी यांची खंडणी तू दिलीच पाहिजे! कशी ते तुला माहीत आहे काय?"

"आज्ञा अंगराज!" सहदेव पुटपुटला. त्याची मान खाली होती. कारागृहात कोंडलेल्या राजांचं दु:ख आज त्याला कळत होतं.

"जेवढ्या नौका फोडून तुझा धगधगणारा खंदक ओलांडावा लागला तेवढ्या नौका बांधवून, त्या भरून ही खंडणी आमच्या उपसेनापतीच्या स्वाधीन कर!" माझ्याकडे अंगुली दाखवून त्याला आज्ञा झाली. मानेनं होकार दर्शवताच सहदेवाचे हात मुक्त झाले. वीर योद्धयांचा मगध देश पडला. माघ महिन्याला सुरुवात झाली होती. हस्तिनापूर सोडून दोन मास मागं पडले होते! आम्ही मदतीला घेतलेले अंगदेशीय सैनिक चंपानगरीकडे परत पाठविण्यात आले. मगधांचा पाडाव झाल्याची शुभ वार्ता घेऊन गुप्त

हेर हस्तिनापुराकडे दौडत निघून गेला.

त्या रात्रीपासून मगधांचे आणि आमचे कारागीर रात्रंदिवस नौका घडवू लागले. त्यांच्या ठकठकीनं झोप न लागणारे सैनिक मगधांचा राजनर्तिकांचं विलोभनीय नृत्य पलित्यांच्या प्रकाशात पाहताना स्वत:ला विसरून जाऊ लागले.

**

# तेरा

जरासंधानं राजे कोंडले होते ते कारागृह एकदा पाहून, नौकांसह खंडणी वसूल करून आम्ही गिरिव्रज सोडलं. तिरंजना नदीच्या किनाऱ्याला धरून पुढं सरकत कीकट, मन्द, पूर्वदशार्ण, उत्कल अशी राज्यं जिंकीत ऋक्षपर्वताजवळून आम्ही पुन्हा पूर्वसागराच्या दिशेनं निघालो. माघ महिन्याचा शुक्ल पक्ष संपून गेला होता.

ऋक्षपर्वतावरच्या कळंब, गेळण, पांढर, उद, खैर, ऐन, कटक, नाना, शमी, पांगेरा, उंडी अशा अनेक वृक्षांच्या पानापानांचं संगीत आम्हाला पूर्वसागरावरचा अवखळ वारा ऐकवीत होता. वैतरणी नदी ओलांडताच पुंड्रदेशात आमचा प्रवास झाला. आर्यावर्ताचं पावला-पावलाला निसर्ग सौंदर्याचे विविध आविष्कार दाखविणारं स्वरूप पाहताना मन दंग होत होतं. किती प्रकारचे पक्षी, लतावेली, वृक्ष, नद्या, सरोवरं, फुलं, पिकं, पर्वत यांनी भरला आहे, हे कुणालाही कधीही सांगता आलं नसतं! मानवी राज्यांचा पराभव करीत आम्ही चाललो होतो, पण निसर्गाच्या राज्याला मात्र आम्ही श्रद्धेनं मानवंदना देत चाललो होतो!

पुंड्रदेशात प्रवेशताच, आपल्या तुटपुंज्या सैन्यानिशी आम्हाला त्या देशाचा राजा व स्वत:ला श्रीकृष्णाचा स्पर्धक म्हणून 'प्रतिवासुदेव' मानणारा पौंड्रक – वासुदेव भिडला हिरण्यवर्मानंच त्याचा पराभव केल्यामुळे आम्हाला शस्त्रही धरावं लागलं नाही.

यानंतरचा देश होता कलिंग! युवराज दुर्योधनाच्या श्वशुराचा – चित्रांगदाचा देश! या देशावर सैन्य घेऊन जायचं कसं? दुर्योधनाच्या भावना त्यामुळे दुखावल्या जातील या कल्पनेनं मी आमच्या सेनापतीला म्हणालो, "हा कलिंग देश युवराज्ञी भानुमतींचा... आणि... सुप्रियावहिनींचा आहे, हा टाळला तर?"

"नाही! मला द्वारका आणि मथुरा यांशिवाय कोणतंच राज्य टाळता येणार नाही! हा राजदंड समस्त कुरूंचा आहे! तुझ्या-माझ्या, युवराज दुर्योधनाच्या – कुणाच्याही भावनांपेक्षा त्याची प्रतिष्ठा अधिक आहे! कोणता राजा आहे तिथं उपस्थित? भानुमंत की त्याचा पिता?"

"भानुमंत! महाराणी भानुमतींचा बंधू!"

"त्याला 'शरण ये' असा संदेश पाठव! तसा तो शरण आला नाही तर..."

"नाही तर काय?"

"तुझीही गत मगधांच्या सहदेवासारखीच होईल! असं कळव त्याला."

त्याच्या आज्ञेप्रमाणं संदेश घेऊन दूत कलिंगाच्या राजनगराला – राजपुराला निघून गेला. वास्तविक हे राजपूर नगर सुप्रियावहिनींमुळे दादाला जिव्हाळ्याचं वाटायला पाहिजे होतं, पण सेनापतीशिवाय कुठल्याही नात्याचा विचार तो करावयास तयार नव्हता. संदेश घेऊन गेलेला दूर परतीचा म्हणून काय संदेश आणतो, यासाठी साशंक मनानं आम्ही त्याची वाट पाहत होतो.

**

# चौदा

दूत परत आला. कलिंगराज भानुमंतानं आमची अट मान्य केली होती. आपलं नगर सजवून तो आमच्या स्वागताला महानदीच्या किनाऱ्यावर सामोरा येणार होता. सुदैवानं त्याला संधीची सुबुद्धी झाली होती.

आमच्या अजिंक्य सेनेसह, ज्या नगरातून राजा दुर्योधनानं महाराणी भानुमतींचं हरण केलं होतं, त्या राजपूर नगरात वाद्यांच्या गजरात आम्ही अभिमानानं प्रवेश केला. त्या नगरातच अंगराजानं जरासंधाला द्वंद्वात जीवदान दिलं होतं. महानदीच्या तीरावरचं हे नगर प्रशान्त आणि रमणीय होतं. राजा भानुमंतानं सामोरं येत सहास्य वदनानं आमच्या झंजावाती सेनापतीचा हात आपल्या हाती घेत त्याला आपल्या राजरथावर चढवून घेतलं. कुरूंचा योद्धा म्हणून नव्हे, दुर्योधनाचा सखा म्हणून नव्हे, सुप्रियावहिनींचा पती म्हणून नव्हे; तर दिग्विजयी कर्ण म्हणून! आमच्या प्रवासातील अर्धाअधिक प्रवास आता संपला होता. हृदयं विजयाच्या उभारीनं काठोकाठ भरून ओसंडत होती.

नगरात प्रवेशताच दादानं सुप्रियावहिनींच्या वृद्ध मातापित्यांची भेट घेऊन त्यांना विनयानं वंदन केलं. भानुमंताच्या आग्रहावरून राजपुरात एक दिवस वास्तव्य करण्याचं ठरलं. माघ मासाच्या वद्य पंचमीचा दिवस होता. संध्याकाळच्या समयाला आपल्या दूतपथकाचा प्रमुख हस्तिनापुराहून आलेल्या एका अश्वसादाला घेऊन माझ्यासमोर आला. तो अश्वसाद, गुरुपुत्र अश्वत्थामन्चं भूर्जपत्र घेऊन आला होता. मगधांच्या राज्यापासून भरधाव दौडत तो आम्हाला गाठण्याचा एकसारखा यत्न करीत होता. तलम वस्त्रात गुंडाळलेलं पत्र त्याच्या हातून घेताना मी हस्तिनापूरचं कुशल त्याला विचारलं. हस्तिनापूरहून तसे खूप संदेश येत होते; पण पत्र असं हे पहिलंच होतं! तातडीनं दादासमोर जात मी ते त्याच्या हाती दिलं.

ते न उलगडताच त्यानं विचारलं, ‘‘कुणाकडून आलं आहे?’’

“अश्वत्थामन्कडून, हस्तिनापुराहून!’’

‘‘वाच, काय म्हणतो आहे ते.” त्यानं ते तसंच परत माझ्या हाती दिलं. वरचं तलम वस्त्र दूर सारून ते भूर्जपत्रावरचं पत्र मी कुतूहलानं वाचू लागलो —

‘‘मित्रा,

तुझ्या गगनभेदी विजयाच्या वार्ता दर सप्ताहाला राजवाड्यावर येऊन थडकताहेत. या दिग्विजयानं तू कीर्तीचा कळस गाठला आहेस, असं सर्वत्र बोललं जात आहे. अशा तुजसारख्या दिग्विजयी वीराला मी ऋषिकुमार तो काय लिहिणार? तरीही हे पत्र दिग्विजयी कर्ण म्हणून वाचू नकोस, एक मित्र म्हणून वाच. माझा विश्वास आहे या पत्राचं तू स्वागतच करशील. तुला मी चांगला जाणतो. मित्राचा एखादा शब्द कमी-अधिक पडल्यास तू रागावणार नाहीस.

पांचाल, कोसल, विदेह, कौशिकी, कच्छ, कामरूप, वंग, मगध असे देश जिंकत तू अश्वगतीनं चालला आहेस. क्षणकाल तू त्यांच्या राज्यात असेपर्यंत ते तुझं सर्वस्व मान्य

करतात, पण तू पुढं जाताच ते पुन्हा आपल्या संस्कृतीचं जतन करण्यासाठी झटू लागतात. लक्षात ठेव, ज्याला-त्याला आपली संस्कृती प्राणप्रिय असते! ती असावीच लागते, कारण तेच जिवंतपणाचं लक्षण आहे. स्वत्व गमावून जगण्यासाठी क्षुद्र कावळाही तयार नसतो! यासाठी सर्वांना जिंकता येईल ते केवळ प्रेमानंच. तसं तुझ्या वर्तणुकीनं तू सर्वांना जिंकलंही असशील, असा माझा दृढ विश्वास आहे. शेवटी धन, संपत्ती, कीर्ती, प्रतिष्ठा हे तट कितीही भक्कम असले तरी मृत्यूच्या महादिग्विजयी सम्राटापासून ते मानवांचं संरक्षण करूच शकत नाहीत. त्यासाठी एकच तट कार्यक्षम ठरतो, तो म्हणजे मनाचा!

स्वभावधर्माप्रमाणं या टीचभर पत्रातूनही मी तुला तत्त्वज्ञानच ऐकवायला लागलो! ते वाचताना तुला कदाचित कंटाळा यायचा! त्यासाठी ते इथंच थांबवितो.

सर्व सैन्यासह वाटचाल करताना या रमणीय देशाचं विविध स्वरूपांत तुला दर्शन होत असेल. तुझं निसर्गप्रेमी मन त्यामुळे सदैवं आनंदित राहत असेल. एखाद्या खळाळत वाहणाऱ्या नदीचं दर्शन घेताना होणारा आनंद, विविधवर्णी पूर्णविकसित कमलांनी भरलेल्या सरोवरावर घोंगावणाऱ्या पुष्ट भ्रमरांचा गुंजारव ऐकताना होणारा आनंद, फुललेल्या निसर्गाला, पिसारा पसरून प्रतिसाद देणाऱ्या मयूराला नृत्यमग्न पाहताना होणारा आनंद, आकाशाच्या नीलवस्त्राला, आपल्या सप्तरंगांची किनार देणाऱ्या इंद्रधनुष्याला पाहताना होणारा आनंद; हे सर्व आनंद माझ्या मते दहा युद्धांतल्या विजयानंदापेक्षाही सरस आहेत! त्या दृष्टीनं तुझा दिग्विजय तर दुहेरी यशस्वी आहे. असो!

आता थोडंसं हस्तिनापुरविषयी!

मी नेहमी नगराबाहेरच्या विष्णुमंदिरात देवदर्शनासाठी जातो. तिथं मी तुला दाखविलेल्या दगडांच्या भेगेतील त्या पिप्पलाच्या रोपट्याचंही दर्शन घडतं! या दोन मासांत किती तरारून वाढलं आहे ते! इथं आल्यानंतर जेव्हा तू ते पाहशील तेव्हा तूही त्या रोपट्याच्या चिकाटीचं कौतुकच करशील. ते मला सदैव तुझी आठवण करून देतं. अस्तु!

तुझ्या आगमनाची आम्ही सर्व जण आतुरतेनं वाट पाहत आहोत. या सर्व जणांत वृषालीवहिनी नि तुझे कुटुंबीयही आहेत! शोणाला स्नेहपूर्ण वंदन, अरे हो! या सर्व पत्रात महत्त्वाचा वृत्तान्त आलाच नाही! तू दिग्विजयासाठी निघून गेलास आणि दुसऱ्याच दिवशी द्वारकेहून राजमाता कुंतीदेवी नगरात आल्या! महामंत्री विदुरांच्या पर्णकुटीत त्या उतरल्या आहेत! मला तर वाटतं महामंत्र्यांनीच त्यांना बोलावून घेतलं असावं. त्यांचंही दर्शन कधी-कधी घडतं. विशेषत: अशाच एका प्रसंगी विदुरांच्या पर्णकुटीत जाण्याचा मला योग आला. त्या वेळी राजमाता म्हणून त्यांना वंदन करताच त्यांचे चरण पाहून मला तुझी प्रकर्षानं आठवण झाली! किती साम्य आहे तुझ्या नि त्यांच्या निमुळत्या चरणांत!

ठीक आहे – आता पत्र पुरं करतो. कारण, तुला सांगण्यासाखं जे-जे आहे ते- ते सर्व व्यक्त करायचं, तर या भूर्जपत्राची विपुल पानं लागतील! शेष कुशल.

तुझा सस्नेह,
अश्वत्थामा.''

शेवटी त्यानं पत्रातील स्नेहबद्ध शब्द खोडून त्याऐवजी सस्नेह असा बदल केला

होता. बंधनाची कोणतीही कल्पना मनावर लादून घेणं, त्याच्या आध्यात्मिक मनाला मानवलं नसावं! त्या पत्रानं माझ्या मनाला विलक्षण विरंगुळा दिला. दादा मात्र विचारमग्न आणि काहीसा अस्वस्थ झाला!

“पत्रोत्तर काय धाडायचं?” मी विचारलं.

“नको. त्याला कोणतंही उत्तर पाठवू नकोस.”

**

# पंधरा

राजा भानुमंताच्या अमात्यानं कलिंगांच्या राज्यातील प्रेक्षणीय स्थलांची नामावली सांगताना महेंद्रपर्वताचा उल्लेख केला. पर्वत आणि प्रेक्षणीय ही कल्पना मला तरी विचित्रच वाटली. तसे पर्वत प्रेक्षणीय असतात; पण दुरून! कारण ते उल्लंघताना काय यातना होतात ते आम्ही प्रत्यक्ष अनुभवत होतोच. मी अमात्यांना विचारलं, "तुमचा हा महेंद्र हिमालयापेक्षाही प्रेक्षणीय आहे की काय?"

"निश्चितच! हिमालयाची शिखरं सूर्यकिरणांत तळपतात तसा या महेंद्राच्या शिखरावर एक परशू तळपतो!"

"परशू? कसला?"

"परशूच! जमदग्निपुत्र परशुराम आश्रम स्थापून या पर्वतावर वास्तव्य करून राहिलेले आहेत! दर अमावस्येला आणि पौर्णिमेला महेंद्राची चढण धीमेपणे उतरून आपलं वरुणव्रत पूर्ण करण्यासाठी ते पूर्वसागराच्या फेसाळत्या, छातीइतक्या पाण्यात उभं राहून तेथून सूर्याला अर्घ्यदान करतात! त्यांच्या दर्शनासाठी अमावस्या आणि पौर्णिमेला सागरकिनारी ही गर्दी उडते! काळ्याभोर दाट दाढीत लाटांचे तुषारकण साचलेले भगवान परशुराम फारच विलोभनीय दिसतात."

"भगवान परशुराम!" क्षणभर महेंद्रावर जावं काय असा एक विचार मनात डोकावून गेला; पण सैन्याला सोडून एकटं कसं जायचं, हे दादाचं उत्तर मला अपेक्षित होतं. राजपूर सोडून आम्ही महेंद्रपर्वताला वळसा दिला. त्या पर्वताची निळी-निळी शिखरं दृष्टिआड होऊ लागली. कण्हेर, करंज, नंदी, धावडा, धामणी, जांभूळ अशा विविध वृक्षांना पायथ्याशी आश्रय देणारी ती उदारहृदयी शिखरं माथ्यावर धुक्याचे पांढरे किरीट घेऊन परशुरामांच्या आश्रमाची शुचिता दर्शवीत होती.

महानदीच्या किनाऱ्यानं दक्षिण कोसलांचं राज्य ओलांडून आम्ही विदर्भाच्या सीमेवर येऊन थडकलो! विदर्भ! श्रीकृष्णपत्नी रुक्मिणीचा देश! हस्तिनापूरच्या पूर्वदिशेचा सर्व प्रदेश संपला होता. आता दक्षिणदिशेचा दिग्विजय सुरू झाला. माघ संपून फाल्गुनाचं आगमन झाल्यानं दुथडीचे निंब, पिप्पल, आल्मलींचे वृक्ष लुसलुशीत पालवीची नाजूक सळसळ करून आता लवरकच वसंतऋतू येणार, याची सूचना देऊ लागले होते. वसंताच्या स्वागतापूर्वी विदर्भराज रुक्मीला अंगराज कर्णाचं स्वागत करावं लागणार होतं! रुक्मी हा श्रीकृष्णाचा आप्तेष्ट, त्यानं संधी करावी ही आमच्या सेनापतीची मनीषा तीव्र होती. विदर्भाच्या राजनगरीला – कुंडिनपूरला तसा संदेश देऊन दूतही धाडण्यात आला होता, पण त्यानं संधी नाकारली! वीणा आणि भद्र नद्या पार करून आमचं सैन्य विदर्भाच्या सीमेत घुसलं.

पयोष्णी नदीच्या तीरावर असलेलं कुंडिनपूर गाठावं म्हणून वायुगतीनं आमची वाटचाल चालली होती, पण मधल्याच भोजकोट नगरात रुक्मीचं अफाट सैन्य पसरलेलं पाहून आम्हाला आश्चर्याचा धक्का बसला. हा राजा राजनगर सोडून मध्येच कसा, म्हणून माहिती काढताना जे-जे समजलं ते तर स्तिमित करणारंच होतं.

आपली भगिनी रुक्मिणी, श्रीकृष्णासारख्या गोपालाला देऊ नये, ती शिशुपालालाच द्यावी म्हणून या हट्टी राजानं आपल्या पित्याला – भीष्मक राजाला स्पष्ट विरोध केला होता! तशातूनही ज्या प्रसंगी श्रीकृष्णानं रुक्मिणीचं कुंडिनपूरातून हरण केलं त्या वेळी, "रुक्मिणीला मुक्त करून परत आणून ती शिशुपालालाच देईन, नाहीतर कुंडिनपुरात पुन्हा पाऊलही टाकणार नाही," अशी घोर प्रतिज्ञा करून तो नगराबाहेर पडला. त्यानं रथातून रुक्मिणीसह धावणाऱ्या श्रीकृष्णाला राज्याबाहेरही जाऊ न देता मध्येच गाठून त्याच्यावर निकराची चढविली, पण श्रीकृष्णानं गोपाळपुराजवळ पराभूत करून त्याचा शिरच्छेद करण्यासाठी आपलं खड्ग उचललं! रुक्मिणीनं मध्ये पडून आपल्या बंधूचे प्राण वाचविले. तेव्हापासून गेली कितीतरी तपं तो कुंडिनपुरात गेलाच नव्हता! हे भोजकोट वसवून तिथं एकटा राहत होता. त्याचा तो निग्रही विरोध आम्हालाही अनुभवावा लागला.

श्रीकृष्णाशी सरळ-सरळ युद्ध करणारा रुक्मी आम्हाला शरण येणं, शक्यच नव्हतं. उलट कुंडिनपुराहून विदर्भाची चिकाटीनं लढणारी अफाट सेना घेऊन आलेले त्याचे रुक्मरथ, रुक्मबाहू, रुक्मकेश आणि रुक्ममाली हे चार अतिरथी कनिष्ठ बंधू त्याला भोजकोट नगरात येऊन मिळाले होते. त्यामुळे अधिकच निर्धारानं तो युद्धसन्मुख होऊन आपल्या सेनेतून गरगर फिरत होता आणि सैन्याला चेतावणी देत होता.

आमची अपेक्षा होती की, मगधांइतका विरोध करण्याचं सामर्थ्य कुणातही नसेल; पण रुक्मी ती अपेक्षा खोटी करण्यासाठी आमच्यासमोर ठाकला होता. मगधांसारखे डाव-प्रतिडाव न करता सरळ समरांगणावर आलेला रुक्मी उलट मला अधिक श्रेष्ठ वाटला. भोजकोटजवळच्या प्रशस्त युद्धभूमीवर त्याच्या आणि आमच्या सैन्यांची गाठ पडली. दोन सेनासागरच जणू एकमेकांना भिडले! विदर्भानं कधी पाहिलं नसेल असा तो संग्राम होता.

रुक्मी प्रत्यक्ष दादा गर्जना करीत जाऊन भिडला! एकमेकांना टक्करणाऱ्या बाणांतून स्फुल्लिंग उडाले. जणू ते सांगत होते की, "आम्ही विदर्भीय आहोत! भीष्मक राजाचे पुत्र! रुक्मिणीचे बंधू!" पहिला संपूर्ण दिवस त्या दोघांचं तुंबळ धनुर्युद्ध झालं. कुणीच कुणाला पराभूत करू शकलं नाही.

दुसरा दिवस उजाडला. हाती गदा घेऊन रुक्मी आपल्या सैन्याला चेतावणी देत खवळून कुरू सेनेवर आदळला. गदा घेऊन, रथातून उतरून – पदस्थ होताना अंगराजही त्याला सामोरा गेला. शंखांचे गजर कानठळ्या बसवू लागले. मृदंगांच्या पडसादावर ते दोघेही ऐटदार मंडलं घेऊ लागले. राधामातेच्या सूचनेप्रमाणं मी कुठल्याही युद्धाच्या वेळी दादाच्या शेजारी राहण्याचा आटोकाट प्रयत्न करीत होतो, त्यामुळे त्याला समरांगणात चपळाईनं लढताना पाहून, मीनाक्षीला कटिखांद्यावर खेळविणारा हाच वसूदादा काय, असा संभ्रम मला होत होता. हातातील अवजड गदा – जितक्या सहजपणे घोड्याच्या पाठीवर मी आसूड फिरवीत होतो – तितक्याच सहजपणे तो फिरवीत होता! मध्येच रुक्मीचे प्रहार चुकविण्यासाठी उंच उमाळी घेत होता. त्या दोघांना क्रुद्ध, आरक्त नेत्रांनी एकमेकांवर धावताना पाहून दोन मत्त हत्ती एकमेकांना भिडलेत असा आभास होत होता. एकसारखे ते अथकपणे प्रहारांवर प्रहार करीत होते. ठरावीक कालानं ऐटदार मंडलं घेत होते. मध्येच प्रहार न करता नुसती मंडलंच घेत. त्यांच्या दंडांचे स्नायू टरारून फुगले होते. कपाळांवरून घामाचे ओघळ वाहत होते. दुसरा

दिवसही मावळला! कुणीही पराभव स्वीकारीत नव्हतं.

तिसऱ्या दिवशी खड्गयुद्ध आणि चौथ्या दिवशी तोमरयुद्ध झालं; तरीही रुक्मी हटत नव्हता. दादाही थकत नव्हता. या चार दिवसांत दोन्ही सैन्यांतील शेकडो वीर धारातीर्थी पडले होते. काय करायचं? युद्धाचा निकाल तर लागत नव्हता.

पाचवा दिवस किरणांची सेना घेऊन आला. दोन्ही सैन्यं एकमेकांसमोर उभी ठाकताच हात उंचावून अंगराजानं वाद्यांचा गजर थांबविला. आमची वाद्यं थांबताच वैदर्भियांनीही वाद्यध्वनी रोखले.

"रुक्मी, मी विदर्भ जिंकल्याशिवाय इथून परत जाणारच नाही! दोन्ही सैन्यांचा नाश टाळायचा असेल, तर खाली उतर आणि या कर्णाशी सरळ द्वंद्व खेळ!" खाडऽऽ खाडऽऽऽऽ दादाच्या रथावरून आव्हानामागून भक्कम शङ्खांचे दमदार आवाज घुमले!

"कर्णा, तुला विदर्भ जिंकताच येणार नाही! ये, सूतपुत्राऽ! युद्धाच्या कुठल्याही प्रकारासाठी रथातून खाली ये. माझी तयारी आहे!"

खाडऽऽ खाडऽऽऽ आव्हानाला रुक्मीकडून प्रत्युत्तर मिळालं. कितीही झालं तरी तो रुक्मिणीचा बंधू होता! यादव भोजांचा युवराज होता.

क्षणात रक्तवर्णी माती पसरून द्वंद्वाचा आखाडा तयार करण्यात आला! आपापल्या सेनानायकांवर दृष्टी खिळवून दोन्ही सैन्यं तशीच उभी राहिली. तटस्थ! दोन पर्वतांच्या मध्ये क्रुद्ध शार्दुलांनी झुंज मांडावी, तसे ते तटस्थ सेनांच्या मध्ये एकमेकांच्या मस्तकाला मस्तक भिडवून द्वंद्व खेळू लागले. विदर्भाची राजनगरी पयोष्णीकाठी कितीतरी योजनं दूर राहिली होती. मात्र तिची प्रतिष्ठा त्या आखाड्यातल्या मातीवर हिंदोळे घेऊ लागली. दोन अजगरांनी एकमेकांना विळखे घालावेत तसे ते एकमेकांना घायाळ करण्यासाठी तट्ट स्नायूंच्या पिळांनी पिळवटू लागले! पहिला प्रहर संपला. सूर्य वर चढू लागला! दोघांच्याही अंगावर घाम टिपण्यासाठी वारंवार राख फासण्यात येऊ लागली, राखेच्या लेपणानं ते दोघेही भेसूर दिसू लागले! दुसरा प्रहर संपला... आता रुक्मी दादाच्या अंगाला स्पर्श करण्याचं टाळू लागला! अग्नीला स्पर्श झाल्यासारखे त्याचे हावभाव होऊ लागले! इतक्यात दादानं अतिशय चपळाईनं हालचाल केली. ती हालचाल बाहुकंटकापूर्वीची होती! बाहुकंटक! प्राणघातकी पेच! असा मी विचार करतो आहे; तोच मोळीसारखा बांधून रुक्मीला आमच्या वीर सेनापतीनं मांडाखाली घेतलाही! दादाच्या बळकट हातांचे पाश त्याच्या कंठाभोवती आवळू लागले! टाचा घासत रुक्मी, प्राण जाणाऱ्या भुजंगासारखा वळवळू लागला! असाहाय्य! केविलवाणा! प्राणांतिक!

"रुक्मी, शरण ये!" दादानं गर्जना केली. उजव्या हाताचा अंगठा उचलून रुक्मी शरण आला! पाश ढिले झाले. जीवदान मिळालं!

"अंगराज कर्णऽऽ"

"जयतु!" आमच्या सैन्याचे रोधलेले श्वास घोषणांतून बाहेर पडू लागले. तटस्थ सैनिक कुंडिनपुराकडे जाण्यासाठी उधळले. हरणांच्या कळपांसारखे!

पराभूत रुक्मी मान खाली घालून माघारी जाईल, अशी आमची कल्पना होती, पण अंगराजांचा उजवा हात हाती धरून तो उंचावून तो दोन्ही सैन्यांना म्हणाला, "अंगराज कर्णासारखा वीर मल्लयोद्धा संपूर्ण आर्यावर्तात नाही! मी विदर्भराज रुक्मी त्याचं स्वागत करतो!" वळून त्यानं आमच्या सेनापतीला गाढ आलिंगन दिलं. त्याला 'सूतपुत्र' म्हणून हिणवणारा त्याचा पीळ पशार झाला होता.

ते अपूर्व दृश्य पाहून वेडावून मीही घोषणा दिली, ''विदर्भराज रुक्मीचा – ''

''विजय असो!'' दोन्ही सैन्यांनी मला साथ दिली.

माझ्या मनात अश्वत्थाम्याच्या पत्रातील काही विचार घोटाळत होते – 'ज्याला- त्याला आपली संस्कृती प्रिय असते – ती असावीच लागते. तेच जिवंतपणाचं लक्षण आहे! — सर्वांना जिंकता येतं ते केवळ प्रेमानं. तुझा दिग्विजय दुहेरी यशस्वी आहे!... '

**

# सोळा

रुक्मीला समवेत घेऊनच आम्ही कुंडिनपुरात प्रवेश केला! आपल्या सैन्याचा पराभव झाला आहे, या खेदापेक्षा आपला पुत्र तीन तपांनंतर नगरात प्रथमच परत आला याचंच भीष्मक राजाला समाधान वाटलं! विदर्भाच्या पुरातन राजवाड्याच्या पायदंड्या चढता-चढता अंगराज एका विशिष्ट पायदंडीवर पूर्वी मिथिलेत थांबला होता तसा थांबला. तोच भाव! तीच विचारमग्न शांतता! तेच भावपूर्ण पाणीदार निळे डोळे!

“का थांबलास?” मी विचारलं.

“शोण, सर्व जण मानतात की, श्रीकृष्णानं रुक्मिणीचं बलात हरण केलं, पण ते अयोग्य आहे! त्यानं तिचं रक्षण केलं आहे! रुक्मिणीचा विवाह शिशुपालाशी झाला असता तर! तिनं या पयोष्णी नदीत, माहेर सोडतानाच उडी घेतली असती! याच पायदंडीवर, श्रीकृष्णासमवेत बाहेर पडताना आनंदाचे आणि आपल्या बंधूंचा मनोभंग केल्याबद्दल दु:खाचे कटू असे संमिश्र अश्रू त्या वीर आर्य स्त्रीच्या नेत्रातून ढळले असतील!” तो क्षणभर भावमुग्ध झाला. एकटक त्या पायदंडीकडे पाहू लागला.

मनोमन वंदन करूनच आम्ही ती पायदंडी चढलो. भीष्मक राजानं लटवाक पक्षयांच्या मधुर मांसाचं भोजन आग्रहानं सर्वांना वाढलं. तो दिवस फाल्गुनातल्या पौर्णिमेचा असल्यानं संध्याकाळच्या सुमारास आम्ही कुंडिनपूर सोडून पुलिंदांच्या राज्याकडे मार्गस्थ झालो. रुक्मीनं सीमेपर्यंत येऊन आम्हाला निरोप दिला. जयापजयाच्या सीमारेषा स्नेहात विलीन झाल्या.

तापी नदी ओलांडून विंध्यपर्वताच्या कडेनं आमची वाटचाल सुरू झाली. या विंध्य पर्वताच्या कडेनं एक मार्ग दक्षिणेकडे गेला होता. त्याला दक्षिणापथ म्हणत होते. त्या मार्गानं दक्षिणेकडे खूप खाली गेल्यानंतर अश्मक, गोप आणि मल्ल या तीन राष्ट्रांचा मिळून महारठ्ठ देश होता. दक्षिणापथ इतका निरुंद होता की, त्यावरून आमचे अजस्त्र हत्ती चालू शकत नव्हते. शिवाय मध्ये घनदाट दंडकारण्य होतं! या अरण्यासारखं दाट अरण्य आम्हाला यापूर्वी कुठंच दिसलं नव्हतं. म्हणूनच महारठ्ठ देश टाळून आम्ही पुलिंददेश सामोरा लावून उत्तरेकडे वळलो होतो. शिवाय महारठ्ठाची गणना आर्यावर्तात होत नव्हती!

दक्षिणापथ सोडून किनाऱ्यानं आमच्या सैन्यानं नर्मदा नदी पार केली. निषाध पर्वत समोर आला. या निषाध पर्वतावरच हिरण्यधेनुक या निषादराजाचा एकलव्य हा पुत्र राहत होता. ज्यानं गुरू द्रोणांना दक्षिणा म्हणून हाताचा अंगठा देऊन सर्व शिष्यांत अग्रस्थान पटकाविलं होतं, तो हा एकलव्य सिंहासारखा त्या पर्वतावर निर्भयपणे फिरत होता. अंगठा नसतानाही मधल्या दोन बोटांनी प्रत्यंचा ताणून हिंस्त्र श्वापदं आणि शत्रू टिपत होता! आमचे कुशल दूत सर्वांची माहिती काढून ती दररोज आम्हाला सादर करीत होते. त्यांनी एकलव्याला पाहिलं होतं. इच्छा असूनही ती संधी आम्हाला मात्र मिळाली नाही.

निषाध आणि शुक्तिमत ह्या दोन पर्वतांमधून एक खिंड होती. तिथूनच आमचं

सैन्य पुलिंदावर नेणं भाग होतं. या खिंडीतून प्रथम पदाती बाहेर काढून समोरचं पुलिंद राज्य जागृत झालं आहे काय, याचा आम्ही कानोसा घेतला. ते स्वस्थ होते. बहुधा आमचं सैन्य विंध्य, निषाध आणि शक्तिमत ही पर्वतांची लांबट आडवी रांग ओलांडून येणार नाही, असा त्यांनी सोयीचा समज करून घेतला असावा; पण वारुळात अविरत मुंग्या बाहेर धावत राहतात, तसं खिंडीतून बाहेर पडून पसरलेलं लक्षावधी कुरूंची सैन्यदलं पाहताच पुलिंदनगराचे अधिपती सुकुमार आणि सुमित्र हे बंधू सावध झाले. पुन्हा संग्राम, पुन्हा रक्तपात, पुन्हा बाणफेक! आता ते आमचं जीवनच झालं होतं. मिळेल त्याला तोंड देण्यासाठीच आम्ही बाहेर पडलो होतो. एक दिवसातच पुलिंदाचा पाडाव झाला. धैर्यानं प्रतिकार करण्यासाठी जमवाजमव करण्याएवढाही अवसर त्यांना मिळाला नव्हता. सुकुमार आणि सुमित्र दोघंही युद्धात मूर्च्छित झाले. आमच्या वैद्यांनीच नाकात औषधीरस सोडून त्यांना सावध केलं. आमचं कुणाशीच तसं वैर नव्हतं. विरोध होता तोही चेतन शरीरातील, अजिंक्य, अजिंक्य म्हणून मिरविणाऱ्या अहंभावी मनाशी! अचेतन शरीराशी नव्हे! तशी आमच्या सेनापतीची आम्हाला शिकवण होती. निःशस्त्र, मूर्च्छित, शरणागत, सेवक आणि स्त्रिया यांवर शस्त्र उचलणाऱ्याला एकच शिक्षा होती. तेच शस्त्र त्यानं स्वतःच्या हातानं स्वतःवर सर्व सेनेसमोर चालवून घ्यायचं! निःशब्दपणे प्राण जाईपर्यंत! पण असा प्रसंग आमच्या कुठल्याच सैनिकावर कधीही आला नाही. त्याचं श्रेय सेनापतीच्या अनिंद्य, निष्कलंक, वंदनीय चारित्र्याला होतं. त्याचा आदर्श हिमालयासारखा सर्वांसमोर धवलपणे उभा होता. तो अर्घ्यदान देत होता त्या अलांच्छन, दीप्तिमान सूर्यासारखा!

पुलिंदराजांकडून अमाप संपत्तीची खंडणी वसूल करून आम्ही शुक्तिमती या शिशुपालाच्या नगराकडे प्रयाण केलं. दिवसरात्रीची श्याम-धवल पुष्पं गुंफत कालाचा माळी एक माला तयार करण्याचा यत्न करीत मांड घालून बसला होता! त्यानं किती पुष्पं आपल्या मालेत या काळात गोवली होती, याची आम्हाला दाद नव्हती.

**

# सतरा

दशार्ण नदीतील लव्हाळ्याची रोपटी तुडवीत आमच्या अश्वपथकांनी चेदिराज शिशुपालाच्या शुक्तिमती राजनगराला चोहोकडून घेरलं. शिशुपाल इंद्रप्रस्थात मारला गेल्यामुळे त्याचा पुत्र धृष्टकेतू चेदींचे नेतृत्व करण्यासाठी उभा होता! जीवनभर श्रीकृष्णाशी वैर करणाऱ्या राजाचा तो पुत्र होता!

आपली भगिनी करेणुमती नकुलाला दिल्यामुळे पांडवांशी त्याचे घनिष्ठ संबंध आले होते. आम्हाला त्याचा विरोध निश्चित होता, पण विजयाशिवाय काहीच माहीत नसलेले कुरू सैनिक कुणापुढंही आता नमणार नव्हते.

शुक्तिमतीचं रक्षण करण्यासाठी धृष्टकेतू आपल्या सुकेतू, करकर्ष आणि शरभ या बंधूंसह एक-एक दिशा घेऊन लढण्यासाठी आमच्या सेनेला भिडला.

वेत्रावतीच्या किनारी पुन्हा अस्त्रांचे स्फुल्लिंग अवकाशात उडू लागले. वीर योद्धयांच्या गर्जनांनी वेत्रावतीच्या थरथरणाऱ्या लाटा अधिकच स्पंदू लागल्या. पात्र बाणांनी भरू लागलं! धृष्टकेतू महान योद्धा होता. इतक्या चपळपणे तो चोहो दिशांना फिरून आपल्या सेनेला प्रोत्साहन देत होता की, सगळ्या सैनिकांना त्याचं पुन:पुन्हा दर्शन होत होतं. आमचे सैनिक तर चार धृष्टकेतू आहेत, असंच मानू लागले! आपल्या पित्याचा धैर्यशील कणखरपणा त्याच्या नसानसांत तसाच भिनला होता, पण आमचा सेनापती ठायी-ठायी त्याला गाठून नि:शस्त्र करीत होता. दोन प्रहरांपर्यंत चेदी निर्धारानं झुंजत होते, पण धृष्टकेतू दादाच्या एका मर्मभेदी बाणानं घायाळ होऊन खाली पडताच त्यांचा विश्वास दुभंगला. वेत्रावतीचं पाणी महापुरात सैरावैरा धावतं तसे ते धावू लागले! घायाळ अवस्थेतही वीर धृष्टकेतू व्रणावर हात दाबून आपल्या सेनेला रोधण्याचा व्यर्थ प्रयत्न करीत होता. चेदी देश पडला! आमच्या विजयी सेनेनं शुक्तिमतीत घुसून वेत्रावतीच्या पात्रातील पाणी घुसळून गढूळ केलं!

या नगराच्या अचूक उत्तरेला मथुरा राज्य होतं. त्या मार्गानं दूत हस्तिनापुराकडे वार्ता घेऊन निघाला. जाताना तो मथुरेत थांबून श्रीकृष्णानं आसनस्थ केलेल्या उग्रसेन राजाला आमची तलम राजवस्त्रांची, सुवर्णमुद्रांची भेट देणार होता! दादाच्या प्रतिज्ञेप्रमाणं आम्ही मथुरेवर आक्रमण करणार नव्हतो. म्हणूनच हा सूचक उपहार होता.

चेदिराज्य सोडून भोजराज्याकडे आमची वाटचाल सुरू झाली. राजे होते कुंतिभोज आणि पुरुजित हे पितापुत्र! त्यांचं भोजपूर हे राजनगर अश्वनदीच्या तीरावर वसलं होतं! फाल्गुन मास संपत आला होता. आता वसंतऋतूचं राज्य अवनीतलावर अवतरणार होतं. वसंतामुळे पुलणाऱ्या धरतीच्या सर्वांगाचं सौंदर्य डोळाभर पाहत पारा, पातालवती अशा नद्या ओलांडत आम्ही भोजराज्यातील चर्मण्वतीच्या काठी आलो! चर्मण्वती! निषाध पर्वताच्या दऱ्या फोडत धावणारी जलदायिनी! वेडीवाकडी वळणं घेत ती पुढं यमुनेला मिळते आणि पुढं यमुनेच्या पोटातून गंगेला!

आम्हाला ज्या ठिकाणी चर्मण्वती सामोरी आली होती, तो होता अश्वनदीचा

आणि तिचा रमणीय संगम! आम्ही आमच्या प्रवासात तशा अनेक नद्या मागं टाकल्या होत्या. त्यांची नावंही मला आता नीटशी आठवत नव्हती! पण अश्वनदी हे नाव मी कधीच विसरू शकणार नव्हतो! सारथिपुत्र असल्यामुळे तिच्या नावातील 'अश्व' मला कदाचित अधिक आवडला असेल! काहीही असो, पण त्या नावात निश्चितच आकर्षण होतं! संगमतीरावर उभे असताना दादाच्या मनाचा कानोसा घ्यावा म्हणून मी त्याला विचारलं, "हे अश्वनदी नाव तुला कसं काय वाटतं?"

"ती अश्वासारखी धावते आहे, यावरून ते योग्यच वाटतं! हिच्या पाण्यावर जगणारे भाग्यवानही जीवनभर अश्वासारखे धावत असतील!" त्यानं अश्वनदीकडे पाहत उत्तर दिलं! इतक्यात एक गोपकन्या, शुभ्रवर्णी गाय पाणी पाजण्यासाठी घेऊन तिथं आली! एक गोंडस पाडसही त्या गायीबरोबर होतं! तिच्या कासेला लुचण्यासाठी ते धडपडत होतं, पण गाय घाईनं पाण्यात उतरल्यामुळे आपल्या शेपटीचा गोंडा उभारून, ती पाण्याबाहेर येण्याची ते पाडस वाट पाहत राहिलं! अश्वनदीच्या पात्रातून एक वाळलेल्या लाकडाचा ओंडका हिंदोळत वाहत चालला होता! गोपकन्येचा पदर वायुलहरींवर फरफरत होता. मला ते दृश्य अतिशय विलोभनीय वाटलं! किती सहजसुंदर होतं! शुभ्र! सर्वांनी वंदन करावी अशी गाय! निरागस पाडस! खळखळत वाहणारं पात्र! मी तर दंग झालो होतो.

पण आमच्या सेनापतीला काय झालं कुणास ठाऊक? त्यानं वायुजितावरून खाली सरळ उडीच घेतली! पुढं होऊन संगमाच्या पाण्यात शिरत त्यानं त्या गायीच्या कंठबंधाला धरून ओढत तिला एकदम पाण्याबाहेर काढली. त्याला त्या वासराची अगतिकता पाहवली नसावी! त्यानं गायीला पाण्याबाहेर काढली खरं, पण त्याच्याच अंगावरच्या योद्धयाच्या वेषामुळे बिथरलेलं ते पाडस मात्र हुंदाडत दूर कुठंतरी निघून गेलं! अगदीच कुठंतरी! पात्रातील लाकडी ओंडकाही हिंदकळत दूर निघून जाऊ लागला! गायीचा कंठबंध तसाच हाती धरून आमचा दिग्विजयी सेनापती त्या अश्वनदीतल्या हिंदकळत जाणाऱ्या ओंडक्याकडे पापणीही न हलविता पाहत तसाच उभा राहिला! त्याच्या एका हातात कुरूंचा राजदंड होता, दुसऱ्या गायीचा कंठबंध!

"जाऊ दे. एका-एकाचं भाग्य असं असतं! तू ज्यासाठी धडपडलास ते पाडसच उधळलं!" मी त्याच्या खांद्यावर हात ठेवला.

"भाग्य? दिग्विजयी सेना घेऊन युद्ध खेळत फिरतो आहेस आणि तरीही भाग्याचेच गोडवे गातो आहेस?" एका क्षुल्लक कारणासाठी तो माझ्यावर कडाडून कोसळला!

"नाहीतर दुसरं काय?" मी खाली मान घातली. मी काय चुकीचं बोललो तेच मला समजलं नाही!

"शोण, भाग्य ही मानवानं निर्माण केलेली सर्वांत भयानक भूल आहे! मानवी जीवनाला ती जोडून जो-तो सत्यापासून सदैव दूर पळू पाहतो. पात्रातून जाणाऱ्या त्या ओंडक्याकडे बघ. प्रत्येकाचं जीवन तसं आहे! लाटेला तोंड देत-देत जगण्यातच खरा अर्थ आहे!" त्यानं पात्राच्या दिशेनं बोट केलं.

एवढ्यात हातीचा कंठबंध सुटल्यानं गाय निघून गेली!

**

# अठरा

कुंतिभोज आणि पुरुजिताला धूळ चारण्यासाठी आम्ही चर्मण्वती ओलांडली. अश्वनदीचा संगमही ओलांडला! भोज राजांचं राजनगर भोजपूर दृष्टिपथात आलं! याच नगरात लहानपणी राजमाता कुंतीदेवी राहत होत्या, असं महामंत्री विदुरांच्या बोलण्यातून मी वारंवार ऐकलं होतं.

कुंतिभोज आणि पुरुजित हे श्रीकृष्णाच्या आतेचे – कुंतीदेवींचे आप्तेष्ट असल्यानं विदर्भाच्या भीष्मक राजानं मधल्या मार्गानं दूत पाठवून आपल्या नातेवाइकांना संधीचा सुज्ञ संकेत परस्पर पूर्वीच केला होता. आम्हाला वाटलं होतं की, ते आमच्याशी निकरानं लढतील, कारण भोजराज्य हे दक्षिण आर्यावर्तातील मगधांच्या इतकंच संपन्न राज्य होतं. भक्कम सैन्यदल आणि श्रीकृष्णाचा पाठिंबा यांमुळे भोजपुरात आम्हाला भरपूर मोल द्यावं लागणार, अशी ठाम कल्पना करूनच आम्ही चर्मण्वती ओलांडली होती, पण घडलं ते अनपेक्षितच, नाहीतरी हे विश्व, मानवी जीवन आणि दिग्विजयी युद्ध ही त्रयी अनपेक्षित धक्के देणारीच असते!

पुरुजित-कुंतिभोजांनी कंठांत घातलेल्या प्राजक्ताच्या मधुर सुगंधी मालांच्या धुंदीतच आम्ही भोजपुरात प्रवेश केला. भोजपूर! चर्मण्वतीच्या संगमासाठी उत्सुक असलेल्या अश्वनदीकाठची रमणीय नगरी! आमच्या प्रवासात भोजपुरासारखं आकर्षक असं दुसरं नगरच आतापर्यंत आम्हाला दिसलं नव्हतं! सर्व वास्तू योजनाबद्ध उभारल्या होत्या. मार्ग प्रशस्त होते. दुहाती अशोक आणि आम्र यांचे डेरेदार वृक्ष छाया करीत होते. वसंताच्या आगमनामुळे ते मोहरले होते. त्यांचा आंबट, मधुर सुगंध सगळीकडे दरवळत होता. त्यानं पुलकित झालेले कोकीळ सप्तस्वरांत ताना मारीत होते!! आता त्यांचेच दिवस होते! भरारीचे! ताना मारण्याचे!

एक कोकिळाची तान ऐकून आमच्या निसर्गप्रेमी सेनापतीनं राजमार्गावरून जाणाऱ्या राजरथातच मला सांगितलं, "शोण, हे कोकीळ सप्तस्वरांत सुस्वर ताना घेताहेत म्हणून तू त्यांच्या आवाजावर भारावून जाऊ नकोस! अरे ते कावळीच्या घरट्यात वाढलेले असतात!"

"असेनात का! त्यांच्या वास्तव्यामुळे उलट कावळीचं घरटं पुनीत झालेलं असतं." मी म्हटलं.

नगरातील वास्तूंच्या सौधासौधांवर उत्सुक असलेले आबालवृद्ध स्त्री-पुरुष, अनुपम सौंदर्यांत अद्वितीय आणि शौर्यांत अजोड असलेल्या आमच्या सेनापतीचं डोळाभर दर्शन घेण्यासाठी दाटीवाटीनं उभे होते. नेहमी दोन्ही हात जोडून सर्वांच्या प्रेमाचा स्वीकार करणारा दादा – भोजपुराच्या राजमार्गावरच्या त्याच्या या राजयात्रेत खांद्यावरचं सुवर्णमंडित 'विजय' धनुष्य एका हातानं उंचावून भोज राज्यातील नागरिकांच्या प्रेमाचा स्वीकार करीत होता. दूरवर अश्वनदीचा एक वळसा सूर्यकिरणांत तळपत होता. सगळं नगर लतावेली, आम्रशाखा आणि कमलपुष्पांच्या भरीव मालांनी नटलं होतं. थिटुकल्या बकुलफुलांचा सडा वायुजितावर पडत होता.

भोजाचं नेतृत्व करणाऱ्या पितापुत्रांसह राजयात्रा राजवाड्यासमोर आली. भोजपूरचा राजवाडा! पुरातन असला तरी अतिभक्कम होता. आम्ही त्या वास्तूत प्रवेश केला तो संध्यासमय होता. मावळतीची प्रदीर्घ सोनेरी किरणं त्या पुरातन वाड्याच्या कळसाला स्पर्शत होती. महाद्वारात पाऊल टाकताना दादा एक क्षणभर तिथंच थांबला. त्याचा नियम त्यानं कधीच चुकवला नव्हता. त्या राजवास्तूच्या महाद्वारातूनच त्यानं सूर्यदेवांना संध्यासमयाचं वंदन केलं.

रात्रीच्या भोजनानंतर त्या पितापुत्रांशी थोडी चर्चा झाली. शेवटी कुणीतरी झोपेची सूचना केली. फार दिवसांनी आम्ही मऊ शय्येवर अंग टाकणार होतो. पाठ टेकताच गाढ निद्रा लागणार होती, पण रात्रभर निद्रादेवी काही मला प्रसन्न झाली नाही! वाडयावरच्या कुठल्यातरी एका दासीचं नुकतंच जन्मलेलं मूल रात्रभर अथक आक्रोशत होतं! ती त्याला शांत करण्याचा आटोकाट यत्न करीत होती. तशातच वाऱ्यानं वाड्याची गवाक्षं थडाथड आपटत होती! आमच्या शयनगृहातील दगडी समईतील ज्योत वाऱ्याशी झुंजत फरफरत जळतच होती!

दादा मात्र शांत झोपला होता!

सकाळी नगर सोडण्यापूर्वी भोजराजांनी आपला पुरातन राजवाडा आम्हाला फिरून दाखविला. त्यातल्या एका भित्तीवर कुंतिभोज राजाचं मोठं चित्र होतं. त्याच्या पायांवर एक वृद्ध दासी पाणी ओतत आहे, असं त्यात दाखविलं होतं. कुंतिभोजाचं असं ते एकच चित्र होतं. ती दासी कुठंतरी पाहिल्यासारखं मला वाटत होतं. पण निश्चित केव्हा ते आठवत नव्हतं.

''ही वृद्धा कोण?'' दादानं ते चित्र पाहताच विचारलं. त्याच्या भव्य कपाळावर आठ्या होत्या.

''इथली धात्री नावाची ती एक प्रामाणिक दासी होती! कुंतीदेवींच्या वेळी ती या वाड्यात राहत होती. पांडवमाता कुंतीदेवी ज्या वेळी इथून गेल्या त्या वेळी ही त्यांची दासीही विश्वासू सेविका म्हणून त्यांच्याबरोबर निघून गेली. वाडयावरचे जुने लोक तिच्या आठवणी सांगतात!'' पुरुजितानं उत्तर दिलं.

त्या दालनाच्या कोपऱ्यात असलेली एक दगडी खुंटाळी त्यानं सरकविताच भित्तीचा एक पुरुषभर उंचीचा भाग झटकन दूर झाला! आतला भूमार्ग स्पष्ट दिसू लागला.

''हा भूमार्ग कुठं जातो?'' दादानं आत डोकावून विचारलं. इतक्यात आतून एक पाकोळी फडफडत बाहेर आली आणि दालनाच्या गवाक्षातून आम्हाला सरळ धडकत बाहेर गेली! अगदी सहजपणे! तिच्या धडकण्यामुळे दादाचा किरीट धक्का लागून किंचित ढळला.

''हा मार्ग सरळ अश्वनदीच्या काठी जातो!'' पुरुजितानं माहिती दिली. दादाच्या सौंदर्यशाली बलंदड व्यक्तिमत्त्वानं तो भारावून गेला होता. सर्व माहिती स्वतःच सविस्तर सांगत होता.

''या नदीला अश्वनदी हे नाव का?''

''या नदीशिवाय दुसरं कुठलंच पाणी इथले अश्व प्राशन करीत नाहीत म्हणून!'' पितापुत्र एकदम म्हणाले.

सर्व राजवास्तू पाहून होताच आम्ही सरोवरच्या पटांगणात आलो. तिथं अनेक

कुंज होते. त्यांतून बाहेर पडताना एका दगडी कठड्याला दादाचा पाय ताडकन ठोकरला! अभेद्य कातड्यामुळे जखम झाली नाही एवढंच! त्याचे सोनेरी केस मानेवर रुळले, भुवया उंचावून त्यानं पाहिलं.

“हे पाषाण का असे मध्येच राहू दिले आहेत?” त्यानं त्या कठडयाकडे पाहत राजांना विचारलं. आम्हाला निरोप देण्यासाठी ते आमच्याबरोबर राजवाडयाबाहेर येत होते.

“आठवण म्हणून राहू दिले आहेत ते! पूर्वी कुंती इथं असताना महर्षी दुर्वास एकदा वाड्यावर आले होते! त्यांनी एक कसलातरी महान यज्ञ केला होता! हे पाषाण त्या यज्ञकुंडाचेच आहेत! इथंच कुठंतरी विक्षिप्त दुर्वासांसाठी एक पर्णकुटीही उभारली होती! अमात्य म्हणत त्यांचा यज्ञ महान होता! त्यातून काहीतरी निष्पन्न झालं असलं पाहिजे!” कुंतिभोजानं माहिती दिली. त्याच्या शुभ्र दाढीतले केस कुंजातील मंद वायुलहरींवर भुरुभुरु लागले.

“दुर्वास! शोण, मी विसरलोच! या – याच दुर्वासांनी मला सुवर्णपत्तीचं भस्म कमलजलातून दररोज न चुकता प्राशन करायला सांगितलं होतं! प्रवासात राहून गेलं, पुढच्या तळापासून तू मला आठवण करीत जा.” दादानं मला सांगितलं.

कुंतिभोज आणि पुरुजिताचा प्रेमळ निरोप घेऊन चैत्रात नटलेली भोजपूरनगरी आम्ही सोडली. अवंतीच्या विंदानुविंदाचा समाचार घेण्यासाठी. सुराष्ट्र राज्यावर तुटून पडण्यासाठी.

काही दिवसांतच निषाध पर्वताच्या पायथ्याशी चर्मण्वतीच्या उगमाजवळ वसलेली विंद आणि अनुविंद ह्या दोन बलाढ्य बंधुद्वयांची विख्यात अवंतीनगरी आली. हिमालयाच्या एकसंध, समान उंच असलेल्या शिखरासारख्या त्या बंधुद्वयांनी आम्हाला निकराचा विरोध केला, पण तीन दिवसांनंतर ते श्रीकृष्णाचे आतेबंधू – राजाधिदेवीचे पुत्रही आम्हाला शरण आले. अवंती पडली!

**

# एकोणीस

अवंतीनंतर माही नदी उल्लंघून मालव देशातून आमची वाटचाल चालली होती. असाणा, लोध्र, अंकोल, पानआवळी यांचे वृक्ष वसंतऋतूचं लेणं लेवून डवरले होते. पश्चिम सागरावरचे थंड-थंड वारे सैन्याला सतावीत होते. मालवांचा पाडाव करीत स्तंबतीर्थ ओलांडून आम्ही सुभ्रमती नदीच्या तटाकी आलो. इथं मालवांचं राज्य संपलं होतं. इथून पुढं लागणार होते ते दोन लहान देश. आनर्त आणि सुराष्ट्र!

आनर्तात पश्चिमसागराच्या किनारी होती ती श्रीकृष्णाची संपन्न, सुवर्णी द्वारकानगरी! आर्यावर्तातील यादवांचं हे एक सामर्थ्यशाली महाजानपद होतं. द्वारकेवर जायचं नसल्यामुळे आनर्ताचा प्रश्नच नव्हता! सुभ्रमतीच्या किनारी तळ पडल्यामुळे शिबिरात सैनिकी हालचालींचा विचारविमर्श झाला. सुराष्ट्र देशावर चढाई करण्यापूर्वी द्वारकेला दूत पाठवून श्रीकृष्ण तेथे आहे काय हे पाहून घ्यावं. त्या दूतासमवेत रत्न, हिरे, सुवर्ण, राजवस्त्रं यांची उपहार तबकं द्वारकाधीशाला पाठवावीत, असं सेनापतीचं मत होतं. त्याचं मत म्हणजे आज्ञाच होती! त्या आज्ञेप्रमाणं भेट घेऊन पाच दूत द्वारकेच्या दिशेनं मार्गस्थ झाले. सेनापती कर्णाची ती द्वारकाधीशाला भेट का होती ते आम्हाला कळलं नाही. कधीच कळणार नव्हतं.

दूत काय वार्ता आणतात याची आतुरतेनं वाट पाहत आम्ही सुभ्रमतीच्या तीरावरच थांबलो. यापुढं सुराष्ट्रात शिरताना थोडी मरुभूमी लागणार होती, म्हणून अश्वसाद सुभ्रमतीतच आपले अश्व धुऊन घेण्यात गढून गेले. या प्रदेशात हत्तींचा काहीच उपयोग नव्हता, कारण धुळीचे कण डोळ्यांत गेल्यानंतर ते आम्हाला त्रासदायकच ठरणार होते. म्हणून सुराष्ट्रावर हत्तीपथकं न वापरता पदाती घेऊन जाणंच अधिक श्रेयस्कर होतं. तसा निर्णयही आम्ही घेतला होता. सुराष्ट्रातील रैवतक पर्वतावर सिंहांची वसाहत अधिक होती. त्यांचा हत्तींना उपद्रवही होऊ नये हा दुसरा हेतूही त्यात होता!

चार दिवसांनी द्वारकेला गेलेले दूत परत सुभ्रमती काठी शिबिरात आले. त्यांनी आणलेल्या वार्तेप्रमाणं द्वारकाधीश श्रीकृष्ण द्वारकेत नव्हता! बलरामासह तो पांडवांना भेटण्यासाठी द्वैतवनाकडे गेला असल्यानं आम्ही पाठविलेली भेट त्याचे अमात्य विपृथु यांनी स्वीकारली होती. तसे द्वारकेचे अभिषिक्त अधिकारी होते महाराज वसुदेव आणि महाराणी देवकीदेवी. पण राज्यकारभार द्वारकाधीश म्हणून श्रीकृष्णच सांभाळत असे. नगरात युवराज बलरामासह श्रीकृष्णपत्नी रुक्मिणी, जांबवती, सत्यभामा, मित्रविंदा, कालिंदी, लक्ष्मणा, भद्रा व सत्या या उपस्थित होत्या. त्यांचे पुत्र प्रद्युम्न, चारुदेष्ण, सुदेष्ण, भानू, भौमरिक, चित्रगू, वेगवत, अश्वसेन, प्रहरण, जय, आयू, अनिल, उन्नाद, हर्ष, ओज, प्रघोष, महाशक्ती, सुबाहू, भद्र आणि शांती अशा सर्वांनी तत्काळ एक राजसभा भरवून आमच्या भेटीचं स्वागत केलं. श्रीकृष्णाचा चुलत बंधू उद्धव यानं त्यांच्या 'सुधर्मा' राजसभेत आमच्या दिग्विजयी सेनापतीचं गौरवगान केलं.

आता आनर्त देशाला वगळून सुराष्ट्रावर चढाई करण्यास आम्ही मुक्त झालो

होतो! प्रभासक्षेत्र पाहून आम्ही रैवतक पर्वताला वळसा घालून गिरिनगराचा पाडाव केला. तिथला सुरथ राजा शरण आला.

विजयाची इतकी फुलं आम्ही आमच्या दिग्विजयी मालेत गुंफत आलो होतो की, माला अर्धीअधिक पूर्ण होत आली होती. सुराष्ट्रातील जनसंस्कारित प्रवाळांची खंडणी घेऊन सुभ्रमतीच्या किनाऱ्यानं आम्ही पुढं-पुढं सरकू लागलो. आमची मागं राहिलेली हत्तीदलं आम्हाला सौवीरांच्या राज्यात पुन्हा येऊन मिळाली! पुढची भ्रमंती अरोध चालू झाली. धूळ उडू लागली.

सिद्धपूरनगर मागं टाकून आम्ही पारियात्र पर्वताच्या पायथ्याशी असलेल्या वसिष्ठऋषींच्या आश्रमाजवळ आलो. पारियात्र पर्वत म्हणजे 'गुहांचं आगर' असं आम्ही ऐकलं होतं. हा पर्वत दक्षिणोत्तर असा कितीतरी योजनं पसरला होता. जेवढी सुराष्ट्रात नव्हती तेवढी दीर्घ मरुभूमी त्या पर्वताला घेरून पसरली होती. पर्वताची लांबी कितीतरी होती, पण शिखरं उदास, उजाड होती! इतर पर्वतांवर आढळत होती तशी गर्द निळी झाडी इथं नव्हती. काळ्या, पांढऱ्या पाषाणांचे केवळ अक्रोत, निंब अशा झाडांनी आणि निवडुंग, तोरणाच्या झुडपांनी कसेतरी झाकलेले उंचवटे दिसत होते. या देशाचं नावच मरुस्थल होतं! पाण्याचा अभाव असल्यानं पन्नास एक योजनांवर कुठंतरी एखादं ग्राम लागत होतं! त्यामुळे युद्धाचा प्रश्नच नव्हता. शेजारचा सिंधुदेश जयद्रथाचा असल्यानं कुरुसेनेचं सामर्थ्य ओळखून त्यानं अगोदरच खंडणी पाठविली.

यापुढचा देश होता विराटांचा मत्स्य! या देशाच्या राजनगरावर विराट राजाचं राज्य होतं. त्याचा पुत्र उत्तर युद्धकुशल नव्हता म्हणून मत्स्य देशाचं नेतृत्व विराटाच्या वृद्ध खांद्यावरच होतं. सिंधुदेशाच्या शिबिनगराहून आम्ही पुन्हा मरुस्थल तुडवीत माघारी फिरलो. विराटावर येण्यासाठी!

पुष्कर, उपप्लाव्य अशी पारियात्र पर्वताच्या पायथ्याशी वसलेली नगरं मागं टाकताना मरुस्थल संपताच लुसलुशीत गवताची विशाल कुरणं लागू लागली. या कुरणांच्या विपुलतेमुळे विराटांचं गोधन आर्यावर्तातील कोणत्याही देशापेक्षा अधिक संपन्न होतं. जागजागी पुष्ट गायींचे कळप शेपटच्या चालवीत कुरणात चरताना दिसू लागले.

मत्स्यदेशाच्या सीमा आल्या. विराटनगर हे मुख्य केंद्र पाच-एक योजनांवर आलं. विराटांचं सामर्थ्य कितीही विराट असलं तरी आम्हाला विजयाची खात्री होती, कारण आता आम्ही हस्तिनापूरच्या इतके जवळ आलो होतो की, केवळ यमुना नदीचं पात्र ओलांडताच आम्ही आमच्या कुरुराज्यात प्रवेश करू शकलो असतो! त्यामुळे कोणतंही साहाय्य हस्तिनापुराहून आम्हाला अल्पावधीत मिळू शकलं असतं. मत्स्यांचा पाडाव सहज झाला असता.

विराटनगराच्या एका भव्य पठारावर आमची विराट राजाशी गाठ पडली! सपाट प्रदेशावरच्या त्या घनघोर युद्धात आमच्या प्रचंड हत्तीदलानं धुमाकूळ घातला. विराटांच्या सेनापती कीचकानं त्यांना रोधण्यासाठी आपली हत्तीपथकं मध्ये घातली, पण आमच्या प्रचंड हत्तीसंख्येपुढं त्याचे हत्ती टिकेनात! खवळलेल्या त्या धिप्पाड प्राण्यांच्या पायांखाली शेकडो विराट चेंगरून गतप्राण झाले. भेदरलेल्या गायी रानोमाळ पळू लागल्या. कुरणं उद्ध्वस्त झाली. नित्याच्या सवयीप्रमाणं निःशस्त्र करून आमच्या सेनापतीनं धनुष्याचा फास विराटराजाच्या कंठात अडकवून त्याला

गदागदा हलवीत विचारलं, “राजा, तुला इतक्या गायी एकट्यालाच काय करायच्या? शक्य असतील तितक्या गायी मधल्या मार्गानं आजच हस्तिनापुराला पाठव!” पराभूत विराटानं मान डोलावून संमती दर्शविला! कुरूच्या कीर्तिध्वजासमोर मत्स्यराजा विराट नतमस्तक झाला! आमचा हस्तिनापूरच्या दक्षिण दिशेचा दिग्विजयही पूर्ण झाला! आता होती पश्चिम दिशा! चैत्रमास संपत आला होता. ग्रीष्मऋतूत वितळणाऱ्या हिमालयामुळे त्या दिशेकडील नद्यांना पूर येण्यापूर्वीच कुलिन्द, त्रिगर्त, बाल्हिक, मद्र, अंबष्ठ, औदुंबर, रोहतक, केकय आणि कांबोज हे देश गाठण्याची आमची योजना होती. आमची सेना दिवसेंदिवस खंडणीचे सैनिक मिळत गेल्यानं फुगत चालली होती.

विराटनगर सोडण्यासाठी आम्ही राजवाड्याच्या महाद्वारात आलो. घोड्यावर आरूढ होऊन अंगराजामागून मी वेग आखडत मंदगती ठेवून चालत होतो. पाठीमागून हत्तीदल येत होतं. महाद्वाराचा उंबरठा ओलांडताना मी क्षणभर, अंगराजाला नीटपणे पुढं जाता यावं यासाठी म्हणून थांबलो. एवढ्यात पाठीमागच्या, एकसारखी सोंड फिरविणाऱ्या एका हत्तीनं, माझं शिरस्त्राणच सोंडेनं उडवून दिलं! खालच्या पाषाणी पायघडीवर पडताना खणखणाट करीत ते स्थिरावलं! तो ध्वनी ऐकून अंगराजानं झटकन मागं वळून विचारलं,

“काय झालं शोण?”

“शिरस्त्राण पडलं!” मी खाली उतरून ते घेण्यासाठी ओणावलो.

“हा काही अपशुकन?” असं तो म्हणत आहे तोच त्या मत्त हत्तीनं पुढं जाण्यासाठी उचललेला पाय सरळ त्या शिरस्त्राणावरच दिला! माझ्या हाती लागण्यापूर्वीच ते त्याच्या अवजड भारामुळे चेपून गेलं! नष्ट झालं!

**

# वीस

विराटनगर सोडताच एकसारखी धाव ठेवून कुरुक्षेत्रावरून दृषद्वती नदी मागं टाकत सैन्यानं कुलिंदांच्या चंदनावती या राजनगराला वेढा दिला. राजा कुलिंद वृद्ध झाल्यानं त्याला अरण्यात सापडलेला त्याचा मानलेला पुत्र चंद्रहास रथारूढ होऊन कुलिंदांचं नेतृत्व करण्यासाठी उभा ठाकला होता. आपल्या पित्याचे ॠण फेडायला त्याला संधी मिळाली होती. पण त्याला कल्पना नव्हती की, त्याचं नाव चंद्रहास असलं तरी आमचा सेनापती सूर्यशिष्य होता.

सरस्वती नदीच्या किनाऱ्यावर संग्रमाला सुरुवात झाली. चंद्रहास एक निष्णात अश्वसाद होता. आपल्या सेनेतून तो विजेसारखा तळपत होता. कुलिंदांना, गर्जना देऊन सावरत होता. अशा धावत्या पराक्रमी वीर योद्धयावर हिरण्यवर्मानं एक अचूक बाण फेकला. त्याच्या घोड्याच्या मानेत घुसल्यामुळे तो शूर सेनापती घोड्यासह सरळ सरस्वतीच्या पात्रात किंशुक वृक्षासारखा उन्मळून पडला! आपला तरुण नेता कुठंच दिसत नाही, हे पाहताच कुलिंद सैन्य सैरावैरा धावू लागलं!

आम्ही जिंकलेल्या राज्यांत एकही राज्य असं नव्हतं की, त्यातील योद्धे सेनापती पडला असताही, मनाच्या निकरानं लढू शकत होते! ही अनिष्ट सवय आपल्या सेनेतील कुणालाही लागू नये म्हणून कधी-कधी आमचा सेनापती घोड्यावरून खाली उतरून 'सेनापती अंगराज पडले' अशी कृतक भूल पसरवायला मला सांगत होता! मागं फिरण्याच्या मार्गावर स्वत: पायी जाऊन चपळाईनं आडवा थांबत होता! जी पथकं माघारी पळण्यासाठी वळतील त्यांना कठोर शिक्षा होती! सर्व सेनेचं त्या दिवसाचं अन्न त्या-त्या पथकातील योद्धयांना स्वत: शिजवावं लागत होतं! त्यामुळे केवळ प्राणपणानं लढणं ही एकच सवय सर्वांअंगी बाणली होती. कुलिंद हा देश मेघमालेचा आहे, याचाही मला विसर पडला होता इतकी सेवावृत्ती अंगी भिनून गेली होती.

चंदनावतीचा पाडाव करून बाल्हिक आणि त्रिगर्त जिंकीत आम्ही शतद्रू नदीजवळ आलो. यापुढच्या देशांत रोहतक, केकय, अंबष्ठ, औदुंबर, यदू ही लहान-लहान राज्यं होती. सामर्थ्यसंपन्न असं एकच राज्य होतं! शल्याचं मद्रराष्ट्र! या सर्व देशांना मिळून पंचनद हे सार्थ नाव होतं! कारण हिमालयातून उगम पावून पश्चिमसागराला भेटणाऱ्या शतद्रू, इरावती, चंद्रभागा, वितस्ता आणि व्यास या पाच नद्यांच्या विपुल पाण्यानं हा प्रदेश वैभवाला नेला होता. यांतल्या मद्रांचा पराभव करताच त्याची प्रतिक्रिया इतर लहान राष्ट्रांवर होऊन ती सरळ शरण येणार होती. म्हणूनच आम्ही सामोरा धरला तो मद्रराज्य शल्य! सहदेव-नकुलांचा सख्खा मामा! ॠतायनाचा पुत्र! म्हणूनच शाकलनगर गाठण्यासाठी आम्ही शतद्रू त्वेरेनं ओलांडली.

चंद्रभागा आणि वितस्ता यांच्या मनोहर संगमावर मद्रांची शाकल ही राजनगरी वसलेली होती. शल्याशी सामना अटळच होता. आपल्या राज्यावर कुरूंचं सैन्य चालून येतं आहे, हे समजताच नगर सोडून आपले पुत्र रुक्मांग व रुक्मरथ यांना समवेत घेऊन तो आम्हाला मधली पुरुष्णी नदीच ओलांडून द्यायची नाही या निर्धारानं

तिच्या काठी येऊन पैलतीरावर ठाण मांडून बसला! आम्हाला भेटलेल्या तोपर्यंतच्या सर्व प्रतिस्पर्ध्यांत एकटा शल्यच डावपेचात अतिशय कुशल होता! बुद्धिमंत होता.

त्याला तोंड देण्यासाठी आम्ही सशस्त्र सैनिकांसह शेकडो नौका पुरुष्णीत हाकारल्या. पात्राच्या मध्यभागापर्यंत त्या पोहोचल्या नसतील तोच वरच्या दिशेनं वाहत येणारे प्रचंड वृक्ष त्यांच्यावर एकाएकी धडाधड आदळू लागले! तोल गेलेल्या नौका पटापट कलंडू लागल्या आणि गवताच्या पात्यासारख्या पुरुष्णीच्या धारेला लागल्या. वाहून जाणारे सैनिक शल्याच्या बाणधारी पथकानं सटासट टिपायला सुरुवात केली. काही मोजके योद्धे सोडले, तर सगळं नौकापथक अशा तऱ्हेनं कामी आलं. शल्यानं डाव साधला.

त्याच्या वृक्षांच्या माऱ्याला हत्ती दाद देणार नाहीत या कल्पनेनं आम्ही पाचशे हतींचं एक भक्कम पथक पात्रात घुसविलं, पण शल्यानं आणखी एक युक्ती काढून तेही उधळून लावलं! पात्रातून सोडलेल्या वृक्षांना त्यानं अणकुचीदार पाती उलटी ठोकली होती! ती कातडयात घुसताच बिथरलेले हत्ती दिशा बदलून धारेला लागले! त्यांच्या रक्तानं पुरुष्णीचं पाणी तांबडं झालं. ते हत्ती कुठं गेले हे पुरुष्णीलाच माहीत! पैलतीरावर असलेला शल्य, हातातील तळपत्या सुवर्णाच्या राजदंडामुळे दादाला अचूक ओळखू येत होता.

तीन दिवस आम्ही ती नदी ओलांडण्यासाठी अटीतटीचे यत्न केले तरी काहीच यश येईना. नैराश्यानं आमची उभारीची मनंही कळंजून गेली. रोज शेकडो सैनिक पात्र पार करण्याच्या यत्नात निष्कारण गतप्राण होत होते. आमच्यासाठी पुरुष्णीच्या पात्रावर अमर बलिदान करीत होते, पण हे कुठंतरी थांबणं आवश्यक होतं. युद्धाशिवाय नाहक प्राणहानी मानवणारी नव्हती.

चौथ्या दिवशी पैलतीराकडून नौकेतून एक शुभ्रवेषधारी व्यक्ती येताना दिसू लागली. सर्वांनी शस्त्रं सावरली. मनाचा कोंदटलेला उद्रेक फोडण्यासाठी!

"थांबा!" आमच्या सेनापतीची निग्रही आज्ञा ऐकून सर्व जण विस्मयचकित झाले. नौका जवळ येताच सर्वांना आपली चूक कळून आली! तो शल्याचा संदेश घेऊन येणारा राजदूत होता!

नौकेतून उतरून तो मद्रांचा धाडसी राजदूत थेट आमच्या सेनापतीपुढं उभा राहिला. त्यानं साधं वंदनही केलं नाही! कानांतील कुंडलांमुळे त्यानं सर्वांतून अचूकपणे आमचा सेनापती ओळखला!

"संदेश! मद्रराज शल्य महाराजांचा!" तुटकपणे बोलत त्यानं एक गुंडाळी अंगराजाच्या हाती दिली. त्यानं ती तशीच माझ्या हाती देत सांगितलं,

"उपसेनापती, वाचा तो संदेश!"

अधिऱ्या मनानं वरचं तलम वस्त्रं दूर करून तो संदेश मी वाचला –

"युद्धकर्म हे बुद्धिमान क्षत्रियांचं कर्म आहे! सूतपुत्रांचं नव्हे! आलात तसे माघारी जा!" हा धडधडीत घोर अवमान होता – आणि तो कुणाचा? दिग्विजयात असंख्य राजांना धूळ चारलेल्या माझ्या प्रिय बंधूचा! शल्यासारख्या यःकश्चिताकडून! माझ्या मस्तकावरची धमनी क्रोधानं थडथडू लागली.

ते संदेशाचं भूर्जपत्र फाडून पायांखाली तुडवावं म्हणून मी दोन हातांच्या चिमटीत ते आडवं धरलं.

''थांब शोण, आण ते इकडे!'' अंगराजानं वस्त्रासह ते भूर्जपत्र आपल्या हाती घेतलं. नुसतं ते तलम वस्त्रच मद्रांच्या दूताच्या हाती देत काहीही न बोलता पुरुष्णीकडे बोट उंचावून त्याला जाण्याची मूक सूचना देण्यात आली. आला तसा तो नौकेतून परत गेला. भूर्जपत्र अंगराजानं कटिवस्त्रावरच्या शेल्यात जपून बांधून ठेवलं.

''उद्या सर्वांना योग्य आज्ञा देण्यात येतील. आता जा तुम्ही!'' आम्ही संतप्त मनाचे भाव लपवीत त्याची आज्ञा पाळली.

आमचा रणात गर्जणारा वीर सेनापती तो संपूर्ण दिवस एखाद्या योग्यासारखा पुरुष्णीच्या पात्रात उभा राहून अर्घ्यदानाच्या ओंजळी अर्पीत होता! आता दिग्विजयाला गालबोट लागणार, अशी खेदाची घनदाट छटा सर्व विजयी सैन्यावर पसरली होती. रात्रभर पुरुष्णीच्या पात्रात दादाच्या ओंजळी जलदान करीत होत्या, आम्ही शिबिरात शय्येवर एकसारखी कूस बदलीत होतो.

पाचव्या दिवसाची सुरुवात झाली आणि सर्वांना आश्चर्याचा धक्का बसला! रात्रभर अंगराज पात्रातच उभा होता! आव्हानाचा विचार करीत की आपल्या आराध्यदैवताला श्रद्धेचे घट अर्पून तिला साकडं घालत ते समजणं कठीण होतं!

पात्रातून बाहेर पडताच तो निश्चयी स्वरात म्हणाला, ''वीरहो, आपण मद्रांचं शाकलनगर आता जिंकूच जिंकू!''

''कसं?'' मी हर्षोत्सुकतेनं विचारलं. सर्व पथकप्रमुखांच्या मुखांवर आश्चर्यानंद ओसंडून वाहत होता.

''शोण, तू आमचा तळपणारा राजदंड घेऊन आमच्या सैन्यात एकसारखा फिरत राहशील! त्या राजदंडावरून मीच सैन्यात आहे असा पैलतीरावरच्या शल्याचा समज होईल! पृष्ठभागाकडचं दोन अक्षौहिणी सैन्य घेऊन मी मागच्या मागं पुन्हा शतद्रू ओलांडीन! तिच्या किनाऱ्यानं उगमाकडे जाऊन कुलुत, द्रुह्यू यांच्या राज्यांतून उगमाजवळ पुरुष्णी आणि चंद्रभागा ओलांडून रोहतकाच्या तकांच्या राज्यात येईन! शाकलनगर मध्ये राहील. एकीकडे तुझं सैन्य आणि दुसरीकडे मागून माझं सैन्य या कात्रीत शल्य अचूक सापडेल!''

''पण यासाठी तुला एक सप्ताह लागेल. तोपर्यंत आम्ही काय करायचं?''

''तुम्ही! तुम्ही शंभर-शंभर हत्तींची पथकं रोज पुरुष्णीत सोडून शल्याला सतत नुसतं झुलवीत ठेवायचं! जेव्हा लगबगीनं शल्य पैलतीर सोडू लागेल तेव्हा मी त्याचं शाकलनगर पलीकडून घेरून आहे हे तुमच्या लक्षात येईलच!''

''पण... पण अशी ही चढाई असावध राजावर केलेली चढाई ठरणार नाही काय?''

''नाही! शाकलनगरात येताच मी शल्याला त्यानं पाठविला तसाच दूत पाठवून स्पष्ट सांगणार आहे की, 'सामर्थ्य असेल तर आपल्या राजनगराचं रक्षण करण्यासाठी आता पुरुष्णी सोडून मुकाट मागं ये!' तो आला नाही तर युद्धाचा प्रसंग निर्माण होणार नाही, कारण शाकलनगरात शल्याचं फारसं सैन्य बाकी उरलेलं नसणार! सरळ त्याच्या राजवास्तूवरचा ध्वज उतरवून त्यावर कुरूंचा ध्वज चढवून मी परतणार आहे!''

''आज्ञा!'' मी कुरूंचा राजदंड त्याच्या हातून घेऊन वायुजितावर आरूढ झालो! आमच्या अग्रभागीच्या सैन्यातून फिरू लागलो! हातातील राजदंड तळपेल असा मुद्दाम उंचावू लागलो! खरंतर वायुजितावर आरूढ होताना मन संकोचलं होतं, पण निरुपाय होता.

आमच्या सैन्यातील पृष्ठभागाकडचं अर्धं अधिक सैन्य हळूच तसंच मागच्या मागं फिरलं. समरप्रसंगांचा विशेष ताण नसल्यानं ते अधिक बळकट होतं. दादाचं नेतृत्व लाभताच तर ते उफाळून आलं. शतद्रू पार करून ते पंचनदांतील पाच नद्यांच्या उगमाच्या रोखानं निघालं. माझ्या फिरण्याबरोबर पैलतीरावरून शल्याचा ध्वजधारी रथ कुशलतेनं हलत होता. मी म्हणजे हाती राजदंड घेऊन शुभ्र वायुजित घोड्यावरून पाहणी करणारा अंगराजच आहे, असाच त्याचा समज झाला होता! रोज शंभर-शंभर हत्तींचं पथक आम्ही पाण्यात एकामागून एक लोटतच होतो. शल्य त्यांचा नि:पात करीतच होता. आपल्या सैन्यात गर्वोन्नत मानेनं गरगर मिरवत होता.

पाच दिवस झाले आणि पैलतीरावरचं शल्य-सैन्य एकदम विचित्र हालचाल करू लागलं! घटका-दीड घटकेतच पैलतीराचा सगळा किनारा निर्मनुष्य होऊ लागला! अंगराजानं झंझावाती धाव घेऊन पलीकडून शाकलनगराला घेरल्याची ती स्पष्ट खूण होती! यक्षिणीची कांडी फिरल्यासारखं शल्यानं शेवटी पुरुष्णीचा किनारा सोडला!

आनंदानं नौकांची असंख्य पथकं पाण्यात लोटताना आम्ही घोषणा दिल्या –

"कुरू सेनापती अंगराज कर्ण महाराजांचाऽऽ!"

"विजय असो!"

त्या नादानं आमचे आजवर असंख्य हत्ती वाहून नेणारी उन्मत्त पुरुष्णीसुद्धा थरथरली असेल!

**

# एकवीस

पटांगणात सापडलेल्या शल्यसैन्याचा युद्धात शाकलनगराजवळ धुव्वा उडाला. स्वत: मीच शल्याला बद्धहस्त करून आमच्या सेनापतीसमोर युद्धकैदी म्हणून सादर केला. त्याची पुष्ट मान अवनत झाली होती. मात्र ती नत करण्यासाठी आम्हाला हिरण्यवर्मा आणि व्याघ्रदत्त गमावावे लागले.

"मुक्त करा त्याला!" आज्ञा झाली. शल्याचे बद्ध हात मुक्त करण्यात आले.

"शल्य, कितीही झालं तरी शशक, यवन आणि बर्बर यांच्या रानटी राज्यांनी वेढलेल्या मद्रदेशाचा तूही नायक आहेस! तुझ्याकडून कोणत्याही औदार्याची कधीही आमची अपेक्षा नव्हती, नाही असणारही नाही! तुझ्यासारखा पायथ्याजवळून खळखळत वाहणाऱ्या ओढ्याच्या पाण्यानं पर्वतशिखरांचा अभिषेक कधीच होत नसतो, हे पुन्हा विसरून जाऊ नकोस!" आमच्या एरवी शांत असणाऱ्या सेनापतीचे निळे डोळे आग वर्षवत होते. गाल काटेफडयांच्या बोंडासारखे रसरशीत लाल झाले होते! कपाळावरच्या फुगलेल्या धमनीवरून घामाची सर ओघळत होती. त्याच्या नाकाचं अग्रही क्रोधानं रक्तवर्णी दिसू लागलं! त्याचा तो सात्त्विक संताप केवळ शल्यामुळेच आम्हाला पाहायला मिळाला!

"शोण, पुरुष्णी नदीच्या पात्रात आपले किती हत्ती आणि नौका वाहून गेल्या?"

"सुमारे सातशे!" मी उत्तर दिलं.

"त्या सर्वांची या मद्रराजाकडून भरपाई करून घ्या... आणि..." त्यानं कटिवस्त्रातून शल्याचंच भूर्जपत्र काढलं! माझ्या हाती ते देत, शल्याच्या कंठात आपल्या विजयी धनुष्याची माला घालून त्याला गदागदा हलवून तो मला म्हणाला, "या क्षत्रियत्वाच्या अहंभवानं अंध झालेल्या रानटी राजाकडून याच भूर्जपत्राच्या पृष्ठभागावर एकदा नव्हे; तर पाच वेळा लिहून घ्या की, 'सूतपुत्रसुद्धा बुद्धिमान असतात आणि युद्धकर्म चांगलं जाणतात!! कधी-कधी तर नामधारी क्षत्रियापेक्षाही अधिक!'" त्याच्या कपाळावरची धमनी थडाथड उडत होती. निमुळती जोड हनुवटी थरथरत होती!

**

# बावीस

शल्याचा पराभव झाल्याची वार्ता आपोआप पंचनदात सर्वत्र पसरली. भोवतीची बर्बर, यवन, शशक, कांबोज ही राज्यं आपोआप शरण आली. सर्वांचे करभार घेऊन आणि शल्याकडून सर्व हानीची भरपाई करून घेऊनच आम्ही पंचनदाबाहेर पडलो. पश्चिम दिशाही संपली! जणू शल्य हाच त्या दिशेचा मुख्य रक्षक होता.

वैशाख मास सुरू झाला होता. आम्ही बाहेर पडून पाच मास झाले होते. सौख्याचे आणि युद्धाचे दिवस कसे निघून जातात हे लक्षात येत नाहीत. निदान योद्धयांच्या तरी ते कधीच लक्षात येत नसावेत.

आता एकच दिशा उरली होती – उत्तर! या दिशेकडे केवळ पाचच राज्यं होती. वैशाखात ती हस्तगत करून वर्षाॠतूपूर्वी आम्ही हस्तिनापुरात परत पाऊल टाकणार होतो! आमचं सैन्य कुठंही वर्षाॠतूच्या मुसळधार तडाख्यात सापडू नये ही आमची योजना होती.

उत्तरदिशेचा काश्मीर देश समोर धरून आम्ही एकलग धावत होतो. काश्मीर! सर्व आर्यावर्तात इतका निसर्गसुंदर असा दुसरा देशच नव्हता! या ठिकाणीच पर्वतराज हिमालयाचं पहिलं दर्शन होणार होतं! धुक्यानं झाकाळलेल्या दऱ्यांतून आमच्या सेनापतीच्या जयकाराचे प्रतिध्वनी उमटणार होते! काश्मीर म्हणजे आर्यावर्ताच्या स्वरूपात उभ्या असलेल्या यौवनसंपन्न निसर्गदेवतेच्या मस्तकावरचा सौभाग्यतिलकच! काही पंडित, कविवर्यांना हस्तिनापूरच्या राजसभेत, 'काश्मीर म्हणजे स्वर्गाचं पृथ्वीतलावरील प्रतिबिंब' असं वर्णन करताना मी पाहिलं, ऐकलं होतं, पण प्रत्यक्ष पाहताना मला उलटाच अनुभव आला! स्वर्गाचं निदर्शक असलेल्या आकाशाचा केवळ एकच रंग होता. निळा! पण काश्मीरच्या भूमीवर इतके रंग एकवटलेले होते की, स्वर्गात राहणाऱ्या देवादिकांनी कधीकाळी आपल्या निळ्या राजकक्षाची गवाक्षं उघडून खाली पाहिलंच असतं, तर त्यांनीही तत्क्षणी स्वर्गाचा त्याग केला असता! काश्मीर म्हणजे अशा दिव्य, मनोहारी, विविधवर्णी मुक्त सौंदर्यानं विनटलेला प्रतिस्वर्ग होता!

आम्ही काश्मिरात प्रवेश केला तो ऐन वसंतॠतूचा काळ होता! वसंतामधील काश्मीर पाहणारा कितीही पाषाणहृदयी असो, तो निसर्गाचं ते विहंगम मुक्त प्रकटन पाहून त्याच्यापुढं नत झाला असता. आमच्या समवेत अश्वत्थामा असता तर वेडावून त्यानं मस्तकावरचं वस्त्र काढून ते सरळ अवकाशात उडविलं असतं! हिरव्या लुसलुशीत गवताची तलम वस्त्रं परिधान केलेल्या पठारावर मुक्तपणे शरीर झोकून तो आकाशाचा गहन-गंभीर नीलिमा घटकान्‌घटका पाहत पहुडला असता! फुललेला निसर्ग पाहून खुललेले विविध पक्षी लाडिक शब्दांत कोणकोणते बोल बोलतात हे त्यानं कान लावून ऐकलं असतं! दऱ्याखोऱ्यांतून फिरताना लहान-लहान फुलांची अगणित वनं पसरलेली पाहून त्यानं अनेक वेळा अंगराजाला विचारलं असतं, 'कोणती शस्त्रं आणून तू या फुलांचं राज्य जिंकणार आहेस? या दऱ्यांची खोली मोजणार आहेस? शिखरांची उंची गाठणार आहेस? नाही अंगराज, मानव सर्व जिंकू शकेल, पण निसर्गाचं हे अपार भांडार

कुणाला आणि कधीही जिंकता येणार नाही!' निसर्गप्रेम हा त्याचा अंगभूत स्वभावच होता. दादालाही त्यानं त्याच्या आस्वादाचं वेड लावलं होतं. तिथल्या सौंदर्याचा नाश होऊ नये असा विचार करूनच की काय कुणाला ठाऊक, पण आमच्या सेनापतींनंही हत्तींची पथकं बरोबर न घेता मागं ठेवली होती! आमचे नुसते पदाती काश्मीरच्या सूर्यनगर या वैभवी राजनगराकडे मार्गस्थ झाले होते.

मार्गात ठायी-ठायी अनेक सरोवरं दिसू लागली. ती नील, पीत, हेम, धवल, रक्त, काषाय अशा विविध वर्णांच्या कमलपुष्पांनी झाकून गेली होती. त्यांचा मकरंद सेवन करीत पुष्ट भ्रमरांचे थवे गुंजारत फिरताना, बीसतंतू खात जलक्रीडा करणाऱ्या राजहंसांना थडकत होते! राजहंसांना त्याची दादही नव्हती! सरोवराचं पाणी तरंगणाऱ्या कमलपत्रांनी झाकलं होतं. जी जागा उघडी होती ती परागकणांनी आच्छादलेली होती. काश्मीर म्हणजे सरोवरं, फुलं, पक्षी, लतावृक्ष, कुरणं यांचं दिपविणारं संमेलन!

सूर्यनगर जिंकून आम्ही हिमालयाच्या दर्शनाला चाललो! देवद्वार, सुरुपर्ण, चिड यांचे गगनचुंबी वृक्ष मागं पडू लागले! चंडोल, चक्रवाक, चातक, कपोत, मयूर, भारद्वाज, सारंग असे अनेक पक्षी 'हिमालायाकडे जाताहात, नम्र होऊन जा!' असा संदेशच आम्हाला देऊ लागले! कर्दळ, निशिगंध, मदनबाण यांचे ताटवे मागं पडले. शेवटी भूभाग संपून हिमालय प्रदेश दृष्टिक्षेपात आला! हिमालय! मानवाला धाक बसावा म्हणून जणू विश्वविधाताच आपलं धारदार खड्ग म्यानाबाहेर काढून आमच्यासमोर एका शिखराच्या स्वरूपात उभा होता! हिम वितळून पाझरणाऱ्या ढगांनी भोवतीनं घेरलं होतं की दूरवरच्या कैलासरूपी पर्वताच्या शंकराला लाजून उमाच त्या धवल ढगाचं वस्त्र सावरत होती?

वेगवेगळ्या जागेवरून पाहताना त्या शिखराची विविध रूपं दिसत होती. कधी शुभ्र वस्त्रं परिधान करून ध्यानमग्न ऋषीसारखं! कधी ध्वजदंडासारखं सरळ उंच! तर कधी अधिऱ्या धरतीनं आकाशाला कवटाळण्यासाठी उंचावलेल्या कर्दळीसारख्या हेमवर्णी सतेज हातासारखं भावपूर्ण!

अंगराजानं गुडघे टेकून त्या पर्वतशिखराला भक्तिभावानं वंदन केलं. काहीतरी पुटपुटत क्षणभर डोळे मिटून तो तसाच गुडघे टेकून बसला. हात जोडलेले होते. मुद्रा धीरगंभीर आणि शांत होती. कानांतील कुंडलांचं, पाणथळ हिमावर प्रतिबिंब पडलं होतं! क्षणभरानं तो उठला.

आम्ही पुढच्या दारद देशाची वाटचाल करू लागलो.

दारदाचं राज्य जिंकून हिमालयाच्या पायथ्याजवळून आमची वाटचाल सुरू झाली. मागं राहिलेली हत्तीपथकं तंगण राज्यात येऊन मिळणार होती. हिमालयाची विविध रूपं पाहताना मन गुंग होऊन जात होतं. हिमालय म्हणजे पर्वतरूपी पक्षयांचा पंखसंपन्न सम्राट गरुडच! किती योजनांपर्यंत त्याचं साम्राज्य पसरलेलं होतं! दुग्धवर्णी धवल! निथळणारं निवळ! असींकी नदीचं नितळ पात्र ओलांडून तंगण राज्यात प्रवेश करताना थंडीची तीव्रता जाणवू लागली. ऐन वैशाखात एवढी बोचरी थंडी होती; मग शरदात केवढी असेल या विचारानं तिथं तग धरून राहणाऱ्या तंगणांचं आम्हाला नवल वाटलं.

सैन्यशक्ती कमी असलेल्या तंगणांनी करभार देऊन आमचं स्वागत केलं. बोरास फुलांचं चवदार खाद्य दिलं. हिमवान प्रदेशात जाण्यासाठी तंगण देश सोडताना मनात

भावनांचा गोंधळ उडाला. हिमवान प्रदेशात आम्हाला आता गंगेचं उगमस्थान पाहायला मिळणार होतं! जगत्पालिनी गंगेचं जन्मस्थान! पुण्यदायिनी गंगेचं उगमस्थान! गंगोत्री!

निवडक सैन्यानिशी आम्ही हिमवान राज्यात प्रवेश केला. राहिलेल्या सैन्याला हस्तिनापुराकडे प्रयाणाची आज्ञा करून आम्ही येईपर्यंत सीमेबाहेर थांबण्याची सूचना देण्यात आली. हिमवान प्रदेशात लहानमोठी अनेक तीर्थक्षेत्रं होती. कुणाचंही एकसंध राज्य त्या हिमसम्राट हिमालयाच्या छायेत निर्माण होणं शक्यच नव्हतं! आम्हीच काय; पण आर्यावर्तातील सर्व राजे एकसंध होऊन आले तरीही ते शक्य नव्हतं!

आणि खरंतर आता स्वारी संपून यात्रेला सुरुवात झाली होती.

केदारलिंग मागं टाकून आम्ही पायीच यम्नोत्री गाठली! यम्नोत्री! यमुनेच्या पुढं फोफावलेल्या यौवनाला जीवनरस देणारी जीवनदायिनी! अनंतकालापासून हिममय शिखरातून पाझरणारी! हिमाच्या धवल पटांगणावर खळखळत बागडणारी!

यमुनेचं पाणी हाती घेऊन ते ओंजळीतून अर्घ्यार्पण करण्यासाठी दादानं योद्ध्याचा वेष खाली उतरवला! एक साधं अधरीय धारण केलं. दिग्विजयातील युद्धात सतत शस्त्र चालविल्यामुळे सतेज झालेले त्याचे पुष्ट दंड उघडे पडले.

त्याच्या नितळ हाताच्या ओंजळीतून यमुनेचं नितळ पाणी खालच्या निरुंद, नितळ पात्रात पडू लागलं! 'ॐ भूर्भुवः स्वःऽऽऽ!' त्याचे डोळे मिटले गेले. गहन गंभीर गायत्रीचे ध्वनी गिरिकंदात घुमून प्रतिध्वनित होऊ लागले! हिमालयाचा धवल वर्ण अधिक तळपत होता की त्याच्या उघड्या दंडांच्या अभेद्य कातड्याचा सुवर्णवर्ण, तेच मला समजेना! तो दिग्विजयी सेनापती आहे की सर्वसंगत्याग केलेला आत्मनिग्रही संन्यासी तेच उमगेना!

यम्नोत्रीजवळ एक दिवस राहून पुढं गंगोत्रीची यात्रा सुरू झाली. इथं मानवी कोलाहलाचा स्पर्शही नव्हता. निश्चल हिमालयाच्या अंगावरून कोसळणाऱ्या प्रपातांची घरघर ऐकू येत होती तेवढीच! हिमालयाच्या पायथ्याशी कोण आणि कसला दिग्विजय करणार? इथं यात्राच करावी लागते.

गंगोत्रीवरील विख्यात 'भगीरथशिला' आली. पात्रात स्नान करून आमचा दिग्विजयी नायक त्या शिलेवर बसला! घटकाभरनं उठून गंगेच्या आटोपशीर पात्रात उभा राहिला. त्याच्या पाठीची सुवर्णढाल सूर्यकिरणांत तापू लागली! मान उंचावून तो एकटक सूर्यबिंबाकडेच पाहत होता! सगळं कसं शांत शांत होतं! क्षणभरच मला वाटलं की, मानवांची खेळणी गरगर फिरविणारं कालचक्र इथंच थांबावं. गगनभेदी पराक्रमाचा, अनिंद्य चारित्र्याचा, निष्कलंक सौंदर्याचा, मूर्तिमंत उभा राहिलेला माझा अशरण, अडिग वसुदादा तसाच राहावा! त्याच्या माथ्यावर सहस्त्ररश्मी सूर्य तसाच तळपत असावा! त्याचे चरण धुणारी गंगा आपल्या खळखळीतून 'जयतु, जयतु कर्ण!' म्हणत राहावी! पर्वतातील हिमालयाजवळ मानवातील हिमालय तसाच हात जोडून उभा राहावा! आणि कालचक्र थांबावं!!

तीन दिवस गंगोत्रीवर राहून आम्ही बदरीद्वाराशी आलो. मार्गात अनेक शिवलिंग होती. त्यांवर फुलं अर्पून शोणितपुराहून हरिद्वारात आलो. हरिद्वार हे शरयूचं उगमस्थान होतं. आमच्या दिग्विजयी प्रवासातील ते अखेरचं नगर होतं! उत्तर दिशाही संपली! आता हस्तिनापूरची वाटचाल! संग्राम, युद्ध आणि प्रवास यांनी

थकल्याभागल्या शरीरांना आणि मनांना विश्राम! शरयूला वंदन करून आम्ही हस्तिनापुराकडे चालू लागलो.

वैशाख संपत आला होता. नगराबाहेर पडून सहा-सात मास लोटले होते! या कालात हस्तिनापुरात काय-काय घडलं, हे आम्हाला कळलं नव्हतं. माझं मन तर नगराच्या दिशेनं अनावर ओढ घेत होतं. युद्धाच्या धामधुमीत मनाच्या कोपऱ्यात कुठंतरी पडलेल्या कुटुंबीयांच्या स्मृती आता उफाळून आल्या होत्या. मनाभोवती दाटून फेर धरीत होत्या.

**

# तेवीस

हरिद्वारहून गंगा पार करून आम्ही हस्तिनापूरच्या सीमेवर आलो! सहा मासांनंतर हे राजनगराचं पहिलंच दर्शन आमच्या मनात संमिश्र भावनांची अगणित कारंजी उडवीत होतं! आमचे शूर सैनिक, अग्रभागी पदाती, मध्ये अश्वसाद व सर्वांत शेवटी गजदल अशी आकर्षक आणि नेत्रसुखद रचना करून आमच्याच आगमनाची वाट पाहत होते. नगरातून दिग्विजयी सैन्याची विजययात्रा निघणार होती. चित्रकाराकडून सर्व हत्तींच्या सोंडा, गंडस्थळ, कान वगैरे भागांवर, मध्यंतरीच्या काळात सुंदर रंगीत कुसर कोरून घेण्यात आली होती. पाठीवर डौलदार, सुवर्णी अंबाऱ्या चढविण्यात आल्या होत्या. माहुतांनी युद्धवेष टाकून सुंदर राजवेष परिधान केले होते. त्यांच्या हातांतील अंकुशांना सुवर्णाचा वर्ख देण्यात आला होता. घोड्यांच्या पाठीवर सुवर्णी वेलबुट्टीची, तळपणारी पालाणं चढविली होती. कातडी वेग काढून टाकून रेशमी धाग्यांनी तयार केलेल्या दोरखंडाचे भगवे, आकर्षक वेग चढविण्यात आले होते. हत्ती, घोडे यांची सारी पथकं पुष्पमालांनी सजवून त्यांच्या माथ्यावर कुंकुम उधळलं असल्यामुळे ती चटकन दृष्टीत भरत होती. योद्ध्यांनी लोहत्राणं उतरवून रेखीव राजवेष घातले होते. त्यांच्या हातांतील खड्गं, भाला, त्रिशूल यांची धारदार पाती सूर्योदयाच्या किरणांत झमाझम तळपून हस्तिनापूरकरांना जणू सांगत होती, "उठा, या दिग्वियजी सेनापतीचं स्वागत करा!"

या सर्व दिग्विजयात बाण हे शस्त्र आम्हाला आत्यंतिक उपयोगी ठरलं होतं म्हणून सैन्याची रचना सर्व पथकप्रमुखांनी कौशल्यानं बाणाच्या आकाराचीच केली होती! या बाणाचं अग्र आता हस्तिनापूरच्या उदरात घुसणार होतं!

आमचं स्वागत करण्यासाठी नदीकिनारी सीमेवर केवळ तीनच व्यक्ती आल्या होत्या! राजा दुर्योधन, अश्वत्थामन् आणि सत्यसेन!

हात उंचावून झपाझप चालत येताना, हसत पायांखालची वाळू तुडवीत, आपण युवराज आहोत हे विसरून, दुर्योधनानं अंगराजाला कडकडून गाढ आलिंगन दिलं! हातातील टपोरी पुष्पमाला त्याच्या गळ्यात घालण्याचंही स्मरण त्याला क्षणभर राहिलं नाही! नंतर ती त्यानं दादाच्या कंठात चढविली! एक निशिगंधाची लहान माला मनगटात बांधताना तो थरथरत्या घोगऱ्या स्वरात म्हणाला, "अंगराज, आज माझं स्वप्न साकार झालं! एक-एक दिशा घेऊन दिग्विजय करणाऱ्या पांडवांना आता कळून येईल की, या चारी दिशांना एकदम दिग्विजय करणाराही कोणीतरी या आर्यावर्तात जिवंत आहे! आणि तो कौरवयुवराज दुर्योधनाचा सखा कर्णच आहे!" त्याच्या अधरीयाचं वस्त्र गंगेच्या वायुलहरींमुळे फुगलं होतं.

काही न बोलता दिग्विजयी सैन्याचा सेनापती मात्र मंद हसला.

अश्वत्थाम्याच्या मस्तकावर नेहमीच्यासारखं पांढरं वस्त्र नाही हे पाहताना भुवया उंचावून त्यानं गुरुपुत्राला अलिंगन देताना विचारलं, "अश्वत्थामन्, आजचं तुझं वस्त्रं काषायवर्णी का?"

“कर्ण, तुझ्यासारख्या दिग्विजयी योद्धयाचं स्वागत करायला वैराग्याचं निदर्शक असलेलं धवलवस्त्रं कसं पांघरून येईन मी! त्यासाठी अलिप्त वैभवाचं निदर्शक हे काषायवर्णी वस्त्रच मी निवडलं आहे! आज प्रथमच मी माझ्या मस्तकावरच्या वस्त्रात परिवर्तन केलं आहे! आवडला नाही की काय तुला हा वर्ण?”

“तसं नाही. मलाही तो वर्ण आवडला आहे!”

सत्यसेनानं पुढं होत दादांच्या चरणांना हात लावला.

“काय सत्यसेन, गृही-द्वारी सर्व कुशल?” या सहा मासांत कुटुंबीयांचं कुशल विचारणारा तो पहिलाच प्रश्न होता! तोही सत्यसेनाला!

“सर्व कुशल महाराज!” सत्यसेन विनयानं उद्गारला.

दुर्योधनाच्या हातात एक हात गुंफून, बाणाकार सैन्यरचनेच्या मुखाग्राजवळ अंगराज मंद-मंद पावलं टाकीत चालत गेला. त्याच्या दुसऱ्या हाती कुरूंचा मानबिंदू असलेला, सर्व राजांना धूळ चारलेला, पुरातन असा तो राजदंड, तो मानबिंदू सूर्योदयाच्या कोवळ्या किरणांत तळपू लागला.

राजयात्रेची सर्व तयारी गंगाकिनारी झाली होती. वर्षाऋतूच्या आगमनाच्या चाहुलीनं चातक पक्षी उत्कंठतेने कदंब वृक्षांच्या गर्द पर्णझडीतून आकाशात झेपावताना भेदकपणे कर्कशत होते. वर्षाऋतू येणार होता. आपल्या जलसंपत्तीचं दान मुक्त हस्तानं जगाला करणारा हा वर्षाऋतू तर मला सर्व ऋतूंत दानशूर वाटत आला आहे!

रांगोळीनं शुभसूचक स्वस्तिक चिन्ह काढून, बाणाकार सैन्यरचनेच्या मुखाग्रावर सेनापतीचा रथ उभा राहील अशी सूचना आयोजकांनी केली होती. त्या स्वस्तिक चिन्हाच्या चारी फाटे मिळणाऱ्या बरोबर मध्यबिंदूवर दादा उभा राहिला! त्याच्यामागं अफाट चतुरंगदली सेनासागर बाणाचा दंड आणि शेपटाचा आकार धरून उभा होता.

एक सजविलेला रथ घेऊन राजसारथी प्रातिकामन सामोरा आला. त्या रथाला सहा घोडे जोडण्याची व्यवस्था असतानाही पाचच घोडे जोडले होते! ते सर्वच धवलवर्णी होते, पण मोकळी असलेली पहिली जागा पटकन जाणवत होती.

“का प्रातिकामन – रथाला पाचच घोडे का?” स्वस्तिकात उभ्या राहिलेल्या सेनापतीनं कपाळ उंचावीत विचारलं.

“या रथाची ही प्रथाच आहे! पूर्वी हा रथ राजमाता कुंतीदेवी उपयोगात आणीत होत्या! तेव्हापासून सर्व सारथी याला पाचच घोडे जोडत आले आहेत! म्हणून मीही तेवढेच जोडलेत महाराज!” प्रातिकामन थरथरत होता. आपला काही अपराध नाही हे त्याला सांगायचं असावं.

“मग इथं आणण्यासाठी राजवाड्यावर तुला दुसरा रथ सापडलाच नाही की काय?”

“अंगराज, तसं नाही! राजवाड्यावर तसे शेकडो रथ पडले आहेत, पण मीच प्रातिकामनला तशी आज्ञा दिली होती! तुझं सर्व नगरजनांना दर्शन व्हावं अशी माझी इच्छा आहे. त्यासाठी कुठल्यातरी रथाच्या छताचा घुमट काढूनच टाकावा लागणार होता! काढायचाच तर मग तो राजमाता म्हणविणाऱ्या कुंतीच्या रथाचा काढला तर काय बिघडलं?” राजा दुर्योधन हसत म्हणाला! त्याचे घारे डोळे चमकत होते.

“छान! युवराज, जितक्या काटेकोरपणे मी माझे सैनिक मरू देण्याचं टाळलं आहे, तेवढ्याच बारकाव्यानं तू राजवाड्यावरचा अचूक रथ निवडून कुरूंचा एक रथ वाचविला

आहेस! पण पाच घोड्यांनी तो विशोभित दिसतो आहे, हे तुझ्याही लक्षात कसं काय आलं नाही? ती एकच अपूर्णता मीच आता भरून काढतो. माझा वायुजित त्याला जोडून टाकून!" स्वस्तिकाच्या मध्यातून बाहेर येत अंगराजानं माझ्या हातीतील वायुजिताचे वेग धरून त्याला ओढत नेऊन स्वत:च्या राजरथाच्या मोकळ्या जागेवर बांधला! इतर पाच घोड्यांपेक्षाही तो, आर्यावर्ताची भरारी मारणारा दमदार वायुजित काकणभर उंचच दिसू लागला! देशोदेशीच्या पराभूत राजांनी चढविलेली विविध आकारांची आभूषणं, सुवर्णी तारांची पालाणं, मस्तकावरचा अनेकरंगी पिसांचा मस्तकतुरा व हिमालयाच्या निळथणाऱ्या हिमासारखा शुभ्रवर्ण यामुळे तो कुणाच्याही डोळ्यांत चटकन भरला असता! कुणाचीही दृष्ट लागावी एवढा तो देखणा दिसत होता.

रथ स्वस्तिक चिन्हावर उभा राहिला! नेहमीप्रमाणं या राजयात्रेतही आपल्या प्रिय बंधूचं सारथ्य करावं म्हणून मी रथनीडावर चढू लागलो. मला थोपवत वसुदादा म्हणाला, "शोण, आता तू सारथी नाहीस! या दिग्विजयी सेनेचा उपसेनापती आहेस! वर ये आणि हा राजध्वज हाती धर! सारथ्य सत्यसेन करील!"

रथनीड सोडून मागच्या बैठकीच्या भागात चढून मी राजध्वज हाती घेत अंगराजाच्या उजव्या हाताशी उभा राहिलो! युवराज दुर्योधन डाव्या हाताशी उभा राहिला! त्याच्या डाव्या हाताला अश्वत्थामन् उभा होता. त्याचं काषायी वस्त्र फरफरत होतं. सर्वांमध्ये अंगराज दोन्ही हात जोडून उभा राहिला. त्यानं सेनापतीचा वेष उतरविण्याच्या कल्पनेला स्पष्ट नकार दिल्यामुळे थोडासा मळकट असाच वेष त्याच्या शरीरावर होता! पण त्यातूनही तो आम्हा चौघांत स्पष्ट उठून दिसत होता. एकतर त्याच्या हातात कुरूंचा दिग्विजयी राजदंड होता, शिवाय आम्हा सर्वांत तो अधिक उंचही होता!

भोवतीच्या योद्धयांनी चंपक, निशिगंध, प्राजक्त, अनंत आणि सुरंग अशी सुगंधी पुष्पं त्याच्यावर उधळली. कुंकुमाच्या उधळलेल्या मुठीमुठींनी अवकाश कोंदून गेलं. कुणीतरी कंठरवानं घोषणा दिली, "दिग्विजयी सेनापती अंगराज कर्ण महाराजांचाऽऽऽ!"

"विजय असो!"

बाणाकार सैन्यरचनेतील लक्ष-लक्ष कंठ गर्जू लागले! आकाशाचा भव्य निळा वितानही त्या गर्जनांनी थरथरू लागला! वृक्षांची पानं, तृणांची पानं स्पंदू लागली! तीही गर्जू लागली, "जय जय!" मृदंग, शंख, रणभेरी, डिंडिम, आनक, तंतुवीणा, गोमुख, नगारे अशी एकमेकांवर ताण करणारी वाद्यं एकदमच गर्जू लागली. घोषणांची आणि त्या वाद्यांची जणू भेदक स्पर्धाच चालली! सत्यसेनानं वेग झटकताच रथाचे घोडे हलले. बाण सरकू लागला! दिग्विजयाची विजययात्रा सुरू झाली. माझं मन अभिमान, आनंद, प्रेमभाव, वीरश्री अशा अनेक भावनांनी भरून गेलं! हेच ते आर्यावर्तातील सर्वांत श्रेष्ठ हस्तिनापूर होतं जिथं संकुचित मनानं मी आणि वसुदादानं पहिलं पाऊल टाकलं होतं! आणि आज – आज नगराच्या मार्गावर, चौकाचौकांत, सौधासौधांवर अनेक नगरजन स्त्री-पुरुष आपल्या नेत्रांच्या निरांजनांनी माझ्या दिग्विजयी, ज्येष्ठ बंधूला ओवाळताना मी त्याच्याशेजारी राहून पाहणार होतो! बस्स, एक क्षणभरच मला वाटलं की, आता जीवनाची यात्रा संपावी! सर्वांत श्रेष्ठ मृत्यू कोणता? मनाच्या समाधानाच्या अत्युच्च शिखरावर असताना मानवाला गाठतो तो! माझ्या डोळ्यांत त्या विचारांनी दोन

अश्रुबिंदू उभे राहिले. त्या सर्व प्रसंगाचा दादाच्या मनावर किती सखोल परिणाम झाला असेल ते पाहावं म्हणून मी त्याच्या मुद्रेकडे पाहिलं. तो एकदम शांत होता! नदीच्या डोहासारखा! नि:स्पंद! आत्माभिमानानं, इतरांचं आपल्यावरील अलोट प्रेम पाहून कुणातही निर्माण होणारी भावनेची सहज कातरता, कसलातरी स्वसुखाचा कोलाहल, उंचबळ, असली एखादी पुसटशी छटाही त्याच्या मुखावर नव्हती! कुरूंच्या राजसभेतील चंद्राच्या प्रतिमेसारखं त्याचं मुख नुसतं तेजाची वलयं फेकत होतं! उगवतीच्या सूर्यबिंबासारखं ते शांत, निश्चल होतं!

विजयबाण हळूहळू नगराच्या दिशेनं पुढं सरकू लागला. आम्हाला पराक्रमाची स्फूर्ती देऊन दोन सूतपुत्रांचं दोन पराक्रमी सेनापतींमध्ये रूपांतर करून स्वागताला सिद्ध असलेलं हस्तिनापूर सहा मासांच्या दीर्घ कालावधीनंतर आमच्या समोर आलं! घोषणांचा पाऊस पडत होता! आंनदोर्मींची शेतं फुलत होती! कणन्कण चैतन्यानं हिंदोळत होता. असा शुभदिन या नगरानं आपल्या जन्मापासून आजतागायत कधी तरी पाहिला असेल काय? दोन सूतपुत्रांचा हजारो क्षत्रियांनी कधी आणि कुठल्यातरी राज्यात एवढ्या निर्भेळ, निरामय स्नेहानं, भक्तीनं जयजयकार केला असेल काय? या विचारांनीच आनंदाश्रूंच्या सरी माझ्या नेत्रांतून सरासर ओघळू लागल्या. जीवन कृतकृत्य झाल्याचं त्यात अखंड आणि अनंत काळाचं महान समाधान होतं. त्या सरी टिपाव्यात असंही मला वाटेना! त्या ओघळत राहाव्यात... अखंड आणि अनंत काळासाठी तशाच ओघळत राहाव्यात असंच मला वाटलं!

डोळ्यांतल्या अश्रुबिंदूमुळे समोरचं नगर मला अस्पष्ट दिसू लागलं. वृक्ष, वास्तू, गोपुरं, मंदिरं धूसर वाटू लागली; पण... पण एका पर्णकुटीची अस्पष्ट आकृती दिसताच मी डोळे उत्तरीयानं टिपले! पर्णकुटीचं अपार महत्त्व दादानं मला चंपानगरीत शिकविलं होतं म्हणून मी त्या पर्णकुटीकडे एकटक पाहू लागलो! ती विदुरांची पर्णकुटी होती! कवाडात एक धवलवस्त्रधारी मूर्तिवत अशी ठेंगणी, स्थूल स्त्री उभी होती! लांबून ती नीट ओळखू येत नव्हती! पण विजययात्रा पाहण्यासाठी ती स्त्री टाचा उंचावीत होती. आमचा रथ विदुरांच्या पर्णकुटीसमोर आला! ती स्त्री अधिक स्पष्ट दिसू लागली! नगरातील कोणतीही स्त्री अशा पद्धतीनं सरळ द्वारात उभं राहू शकण्याचं धाडस करू शकली नसती. म्हणून आश्चर्यानं मी निरखून पाहिलं! त्या राजमाता कुंतीदेवी होत्या! पर्णकुटीतून एक आश्रमकन्या जलाचा कुंभ घेऊन लगबगीनं बाहेर आली. तिला थांबवून राजमातेनं तिच्या हाती एक करंडक देत तिला काहीतरी सांगितल्याचं मी पाहिलं.

पुढं येत आश्रमकन्येनं जलाचा कुंभ घोड्यांच्या खुरांवर रिता केला. सत्यसेनाला ती म्हणाली, "सेनापती थोडं खाली उतरतील काय? मी त्यांच्या भाली कुंकुमतिलक रेखणार आहे!"

"नाही!" सत्यसेनाला दुर्योधनाची तशी आज्ञा असावी म्हणून तो म्हणाला.

"सत्यसेन, वेग आखड! मी खाली उतणार आहे! – " अंगराजाचा धीरगंभीर आवाज घुमला!

रथ थांबवताच दादा उडी घेऊन खाली उतरला. त्या धीट आश्रमकन्येनं त्याच्या भव्य कपाळावर कुंकुमतिलक रेखला! मलाही याची कल्पना नव्हती की, विजययात्रेची सर्व तयारी होऊनही कुणीही आमच्या सेनापतीच्या भाली मंगल तिलक चढविलेला

नाही! ती तेवढीच उणीव त्या आश्रमकन्येनं अचूक दूर केली! अंगराजानं करांगुलीतील मोती मढविलेली अंगठी काढून ती तिच्या कुंकुम करंडकात ठेवली! विजययात्रा पुढं निघाली! सूर्य वर चढू लागला!

आपल्या राज्याचा राजदंड अजिंक्य म्हणून मिरवून आणणाऱ्या अंगराजांचं कुरूंना स्वागत करायचं होतं. सगळ्या नगरात ठिकठिकाणी पुष्पवेशी उभारण्यात आल्या होत्या. अशोक आणि आम्रशाखांनी काही वेशी सजविण्यात आल्या होत्या. सुवासिनींनी अंगणांत कस्तुरी, केशरमिश्रित पाण्याचे सडे घालून विविध आकारांच्या रांगोळ्या मार्गभर चितारल्या होत्या. पुष्पमालांनी लडबडलेल्या गुढ्या गगनाला भिडल्या होत्या. सौधासौधांवरून नगरजन सुवर्णपुष्प उधळीत होते. तारकांसारखा त्यांचा राजमार्गावर नुसता खच पडला होता. जलाचे कुंभ वायुजिताच्या खुरावर रिते होत होते. आमच्या मनाचे कुंभ कृतार्थतेनं ओसंडत होते. घोषणांच्या टिपऱ्या आकाशात नगाऱ्यावर तडतडत होत्या! "दिग्विजयी सेनापती अंगराज कर्णऽ, जयतु! सेनापती कर्णऽऽ... जयतु! वीर कर्णऽऽ... जयतु!"

माझं शरीर उत्तरीयातल्या तलम धाग्यासारखं हलकं झालं होतं! या आरोळ्यांच्या समुद्रावर जणू मी तरंगत होतो, हिंदोळे घेत होतो! आमच्या सेनेचा बाण पुढं-पुढं सरकत होता! सत्यसेनाचं सर्वांग कुंकुमानं केव्हाच माखून गेलं होतं! मूळचे धवलवर्णी घोडे, कुंकुमवर्णी दिसत होते! एवढा धुंद करणारा, क्वचित भानविरहित करणारा, अंमळ गर्वाची भावनाही जागृत करणारा असा दुसरा कुठलाच दिवस आम्हा दोघांच्याही जीवनात मला दिसला नव्हता! भविष्यात दिसेल असंही वाटत नव्हतं! एवढा गगनस्पर्शी उत्साह!

सामान्य पाषाणाचं देवमूर्तीत घडू शकणारं एवढं भव्य स्थित्यंतर दुसरं कुठलं होतं?

महामंत्री विदुरांनी चढविलेला त्रिकोणी भगवा राजध्वज माथ्यावर फडफडविणारा राजवाडा आला! काय घडलं नव्हतं या राजवास्तूत? काय पाहिलं नव्हतं या पाषाणांच्या राजपुरुषानं? 'सूतपुत्र म्हणून लाथाडलेला वसुदादा! गुरू द्रोणांनी डावललेला धनुर्विद्येचा शिष्य! ज्याला राजकन्यांनी वरावं, असा सौंदर्यसंपन्न असूनही सारथिकन्यांसमोर बोहल्यावर उभा राहिलेला वीर! खांद्यावर उत्तरीय टाकून पायी नदीकिनारा गाठणारा सश्रद्ध सूर्यभक्त!' सर्व-सर्व त्या राजवास्तूच्या पाषाणांनी पाहिलं होतं! ते पाषाण आज पाहत होते ते मात्र अपूर्व होतं! आज दिग्विजयी कर्ण पाहत होते ते!

महाद्वारात पितामह उभे होते! विजययात्रा थांबली. वाद्यांचे कलकलाट लुप्त झाले. पितामहांना पाहताच, त्यांनी राजदंड फेकून दिलेला तो राजसभेचा प्रसंग जसाच्या तसा माझ्या डोळ्यांसमोर उभा राहिला.

झालं-गेलं विसरून तो थोर मनाचा कुरू – छे – एक जातिवंत धनुर्योद्धा दुसऱ्या एका धनुर्योद्ध्याच्या स्वागतासाठी महाद्वारात उभा होता!

अंगराजानं रथातून उतरून पुढं होत आपल्या हातातील राजदंड पितामहांच्या हाती दिला! एक क्षणभरच त्यांच्या दाढीधारी भव्य मुखाकडे पाहिलं. आणि – आणि एवढ्या घटकाभराच्या, उचंबळून गेलेल्या उत्साहपूर्ण नगरजनांच्या स्वागतानं ज्याच्या मनाचा एक कप्पाही पाझरला नव्हता तो आमचा शूर सेनापती विरघळला! त्याच्या

नीलवर्णी नेत्रांत दोन अश्रुबिंदू तरारून उभे राहिले! पुरातन महाद्वाराच्या उंबरठ्यावर ते खळकन ठिबकले! वीरासनातच पितामहांच्या चरणांना हात लावीत तो गदगद स्वरात म्हणाला, ''आशीवार्द पितामह!''

''जयतु कर्ण, जयतु!'' पितामहांनी त्याचे खांदे धरून त्याला वर उठविलं. त्यांच्या वृद्ध हातातील राजदंड स्पंदत होता! दाढीचे लांबसडक शुभ्र केस थरथरत होते! आम्ही सहा मासांनंतर त्या राजवास्तूत उंबरठा ओलांडून पाऊल टाकलं!

आतील पायदंडयांवर राधामाता, बाबा आणि वृषालीवहिनींसह सर्व उभे होते. त्यांनी आपल्या डोळ्यांनीच आम्हाला केव्हाच कडकडून आलिंगून टाकलं होतं! त्यांच्यासमोर आम्ही उभे राहिलो! कुणालाच काही बोलवेना! सगळं कसं शांत, नि:स्तब्ध होतं. तरीही ती शांतता सर्व काही सांगत होती! आम्ही एकाच हाडामांसाची माणसं होतो! इथं न बोलताही सर्व समजत होतं!

ओवाळताना वृषालीवहिनींचे हात इतके थरथरू लागले की, तबकातील निरांजनं जागच्या जागी खडखडू लागली. दादानं कितीही आवरण्याचा प्रयत्न केला तरी निसटलेले दोन अश्रुबिंदू तबकातल्या निरांजनाच्या ज्योतीवर पडून चर्र्रऽऽ असा आवाज करीत नाहीसे झाले!

आम्ही बाबांना वंदन केलं. त्यांच्या हातातील आधाराची काठी अधिकच लडबडू लागली. आशीर्वादासाठी म्हणूनही त्यांच्या ओठातून शब्द सुटेना! कसातरी त्यांनी आपला हात आमच्या मस्तकावरून फिरविला. राधामातेची चरणधूली घेण्यासाठी आम्ही ओणावलो. तिच्या डोळ्यांतून ओघळलेला एक-एक अश्रुबिंदू आमच्या मस्तकावर पडला! शरीरं पुलकित झाली! आमचा दिग्विजय खऱ्या अर्थानं आता पूर्ण झाला! पावन झाला!

''कर्णऽऽ शत्रुंजयऽऽ'' ती गदगदल्या स्वरात आम्हा दोघांना एकदम छातीशी कवटाळताना म्हणाली.

''नाही माते, वसू आणि शोण म्हण!'' मी तिला आमच्या खऱ्या नावांची आठवण करून दिली.

एव्हाना सूर्य पूर्ण मध्यान्ह कलामुळे सरळ माथ्यावर आला होता! उष्णतेनं घामेजलेला युवराज दुर्योधन पुढं झाला. अंगराजाचा हात हाती घेऊन तो त्याला पायदंडया चढता-चढताच दिग्विजयाचा वृत्तान्त विचारू लागला. एकच पायदंडी शिल्लक असताना नेमक्या एकशेपाचाव्या पायदंडीवर तो थांबला!

''अंगराज, तुझ्या दिग्विजयानं माझं मन इतकं मोहरून गेलं आहे की, आनंदाप्रीत्यर्थ मी सहभोजनाचा बेत आयोजित केला आहे! शोणासह तू, अश्वत्थामा वगैरे सर्व जण उद्या सहभोजन घेऊ! अपूप, नवनीत आवडेल ना तुला?''

जरा वेळ थांबून तो पुढं म्हणाला, ''आपला राजसूय यज्ञही आता लवकरच करावा असं मला वाटतं. करायचा ना राजसूय यज्ञ?''

''का नाही? यज्ञ अवश्य होईल! पण अपूप आणि नवनीताची माझी आवड तुला कशी कळली?''

''तुला आश्चर्य वाटलं याचं? अंगराज, शल्याशी झुंजताना हताशपणे पुरुष्णीत उभा राहिलेल्या रात्री तू अर्घ्यदानाच्या किती ओंजळी सोडल्यास तेही मी अचूक सांगेन! सगळ्या आर्यावर्तात माझे गुप्तचर फिरतात! आणखी एक सांगतो, कर्ण आज तू

राजदंड पितामहांच्या हाती देण्याऐवजी माझ्या हाती देतास तर अधिक बरं झालं असतं!''

''युवराज, तो तुझ्या हाती असल्यासारखाच आहे! कोणत्याही निर्वाणीच्या घोर प्रसंगी पितामह आता तुझ्यासाठीच शस्त्र उचलतील! त्यांना तसं करणं भाग व्हावं यासाठीच मी तो त्यांच्या हाती जाणूनबुजून दिला आहे! अंगराज, दुर्योधन आणि पितामह हा त्रिकोण आता कधीही तुटणार नाही!"

त्यानं शेवटच्या पायदंडीवर पाय ठेवला! नेहमी गूढ बोलणारा अश्वत्थामा कसल्यातरी सखोल विचारात दंग होता. आम्ही सभागृहातील चंद्रप्रतिमेचं दर्शन घेण्यासाठी चाललो. वैशाखाचं उन्ह रणरणत होतं! ज्वाला लहलहत होत्या!

**

# चोवीस

दुसऱ्या दिवशीच्या रात्रीच सहभोजनाचा कार्यक्रम पार पडला. युवराज दुर्योधन, दु:शासन, मामा, जयद्रथ, राजपुत्र कौरव सर्व जण उपस्थित होते. स्वत:चं अन्न स्वत: शिजवून खाण्याच्या आश्रमातील सवयीमुळे केवळ अश्वत्थामन् तेवढा आला नव्हता.

अंगराजानं अपूप आणि नवनीत यांचं आकंठ भोजन घेतलं, तर इतर सर्वांनी लटवाक पक्षयाच्या मांसाच्या पदार्थांवर यथेच्छ ताव दिला! तांबूलसेवनापूर्वी जुन्या मधाचं मद्य घेऊन प्रभंजन भोजनगृहात आला. सर्वांच्या हाती एक-एक चषक देऊन उभट चंचुपात्रातून तो ते चषक भरत गेला. युवराज दुर्योधन बैठकीवरून उठून चषक उंचावून बोलू लागला.

"माझा सखा अंगराज कर्ण यानं दिग्विजय करून पितामह, गुरू द्रोण, कृपाचार्य आणि महाराज पांडू यांनी कधीही मिळवून दिली नव्हती एवढी अफाट कीर्ती कुरू राज्याला मिळवून दिली आहे! त्याचा हा पराक्रम असाच वाढत राहावा अशी माझी इच्छा आहे. दिग्विजयाचा आनंद साजरा करण्यासाठी हातातील मधुर सोमरस तुम्ही सर्व कुरूंनी प्राशन करा. दिग्विजयी अंगराज कर्णऽऽ!"

"जयतु! जयतु!"

त्यानं चषक ओठाजवळ नेऊन तो एका घोटातच प्राशन करण्यापूर्वी घोषणा दिली.

सर्वांनी चषक रिते केले. प्रभंजनानं चपळाईनं ते पुन्हा भरले! सर्वांचा उत्साहभंग होऊ नये म्हणून आम्ही दोघं त्या जळजळीत द्रवाचे घोट डोळे मिटून घेऊ लागलो! एक चषक कसातरी संपवून मी अंगराजाच्या हातातील चषकाकडे पाहिलं. प्रभंजनानं तो पुन्हा भरला होता! तसे आम्ही युद्धापूर्वी हुरूप येण्यासाठी सोमरस घेत होतो, पण तो इतका मादक नव्हता. आमच्या चषकांत भरलेलं मद्य मात्र खूपच मादक होतं, म्हणूनच मी अंगराजाला पुटपुटत सूचना केली, "हा सोमरस नाही! अधिक प्राशू नकोस!" त्यानं तो पायांशी ओतून टाकला! पण प्रभंजनानं तो पुन्हा सर्वांसमोर भरला! दादाचा नाइलाज झाला. सर्व जण सहभोजनासाठी एकत्र जमलेत की मद्य पिण्यासाठी ते कळेना. शंभर राजपुत्र, शकुनी आणि जयद्रथ सर्व जणच पाण्यासारखे मद्य पिऊ लागले! अर्ध्या एक घटकेतच बैठकीचं स्वरूप पालटलं!

झुकांड्या खात उठलेले मामा हातांची पोकळी कानाजवळ नेत आत द्यूताचे फासे असल्याप्रमाणं ती हलवीत दादासमोर येऊन बोबड्या शब्दांत म्हणाले, "कऽऽर्ण, टुझ्यासारखेऽऽ छपन्नऽऽय डिग्विजयऽऽ मीऽऽ या फाश्यांनीऽऽ करून दाखवीनऽ! बोऽऽल काय ऽऽ डान आहे टुऽऽ झं? काऽऽ य म्हणालास? पाऽऽच हे बघ पाऽऽ च टर पाच!"

हाती काही नसतानाही त्यांनी फासे फेकल्याचा हावभाव केला! "पाऽऽच" ते झुकांड्या खातच मोठ्यानं ओरडले! नसलेले फासे गोळा करण्यासाठी म्हणून धाडकन

खाली कासळले.

मला त्यांची कीव आली.

दुसऱ्या एका कोपऱ्यात तर दु:शासन एका दगडी स्तंभाला स्त्री समजून तिची वस्त्रं फेडण्यासाठी म्हणून त्या स्तंभाभोवती फिरत होता! "डासीऽऽ, डाऽऽसी!" म्हणून पुटपुटत होता! खदखदून हसत होता.

क्षणातच सर्व राजपुत्र बरळू लागले! आम्हाला पुरेसं मद्य न घेताही भोवळ यायची वेळ आली! कुणी हातपाय आपटून लहानासारखा आक्रोशत होता, कुणी गडाबडा लोळू लागला! दिग्विजयात एखाद्या राजानं आमचा पराभव केला असता, तरी बसला नसता एवढा प्रचंड धक्का ते बरळणं ऐकून मला बसू लागला!

शेवटी स्वत: युवराज दुर्योधन बरळत उठला! "अंगराजऽऽ टुझा डिग्विजय व्यर्ट्य आहे!! ज्या अर्जुऽऽनानं किराटऽऽ रुपाटल्याऽऽ शंकराचाऽ पराभव क्येलाय – टो अर्जुनऽऽ अजिंक्य आऽऽहे! टचाला तू कसा जिंकणार? णुसटं अर्घ्य डेऊन काय उपयोग? अर्जुऽऽ न! अऽऽऽ र्जुऽ न!" त्याचा तोल जात होता. शरीर वादळातल्या कळकीच्या बेटासारखं झुलत होतं! शब्दरूपानं कसंतरीच करकरत होतं!

"दुर्योधन!" दादा इतक्या मोठ्यानं ओरडला की, प्रभंजनाच्या हातांतील चंचुपात्र निसटून खाली पडलं! शल्याकडून भूर्जपत्रावर लिहून घेताना जो सात्त्विक संताप त्याच्या डोळ्यांतून उफाळत होता, त्यापेक्षा कितीतरी अधिक प्रकर्षानं तो संतापलेला होता! त्याच्या नाकाचं अग्र रक्तवर्णी झालं होतं. आग पाखडणारे डोळे अधिक गरगरत होते की कपाळावरची धमनी अधिक थडथडत होती तेच समजेना! त्याचे शब्द त्याच्या बाणापेक्षाही अधिक वेगवान होते! हातातील चषक थरथरत होता. ताडकन आपल्या आसनावरून उठून वर्षाऋतूतील मृगाची सर कोसळावी तसा तो बोलू लागला, "राजपुत्र म्हणविणाऱ्या धुंद मद्यप्यांनो, मद्यानं जर तुमच्यासारख्या क्षत्रियांचंही अशा गर्दभात स्थित्यंतर होत असेल, तर धिक्कार असो त्या मद्याचा आणि तुम्हा मद्यप्यांचा! पांडवांसारखे बलशाली शत्रू जिवंत असताना ज्या मद्यानं तुम्हाला त्यांची आठवणही उरली नाही त्या मद्याचा धिक्कार असो! मी अंगराज कर्ण आज अशी प्रतिज्ञा करतो की, जोपर्यंत अर्जुनाचा वध मी करणार नाही तोपर्यंत चुकूनही मद्य पिणार नाही! इतकंच काय; पण त्याच्या रक्तानंच केवळ धुवावयाचे म्हणून मी माझे पायही तोपर्यंत धुणार नाही!!

"अर्जुनाला अजिंक्य म्हणणाऱ्या दुर्योधना, माझा दिग्विजय तुला पुरेसा वाटत नसेल, माझी सूर्याराधनाही त्यासाठी कमी पडली असेल, माझी पुण्याई कमी वाटत असेल तर यापुढं मी माझी पुण्याई दानधर्मानं भरून काढीन! पण अर्जुनाच्या भयानं दबलेल्या दुर्बला, मी त्याला ठार मारीनच मारीन!" दादा थांबला आणि पुन्हा निर्धारानं गरजला, "आजपासून कोणताही याचक अंगराज कर्णाच्या द्वारातून कधीच विन्मुख परत जाणार नाही! कुडीत प्राण असेपर्यंत!" हातातील चषक फेकून देऊन तो झपाझप चालत कक्षाबाहेर गेला. पेटत्या शेपटाच्या बाणासारखा!

ती त्याची घोर प्रतिज्ञा ऐकून माझ्या दिग्विजयाचा आनंदही मावळला! भवितव्यात काय आहे या शंकेनं मी खिन्न-सुन्न मनानं त्याच्या मागून बाहेर पडलो. सोसाटयाच्या वाऱ्यांनतर आम्रवृक्षाखाली फलांचा सडा जसा अस्ताव्यस्त पडतो, तसे कुरूंचे मद्यधुंद शंभर राजपुत्र आता कक्षभर निपचित पडले होते! त्यांचं असंबद्ध बरळणं

बंद झालं होतं.

**

# पंचवीस

वैशाख संपल्यामुळे वर्षाऋतूला सुरुवात झाली! मुसळधार पावसानं नगरातील, कोट, बुरूज, गोपुरं आणि कळस यांवर जलदानाचा वर्षाव सुरू केला! दादाच्या दानाच्या प्रतिज्ञेची वार्ता सर्व नगरात पसरली! थोडीशी उघडीप मिळताच याचक राजवाडयावर गर्दी करू लागले! कुणी पावसापासून रक्षण करण्यासाठी घराचं साहित्य, कुणी पाण्यामुळे अकूर व्याधीनं मेलेल्या घोड्याऐवजी दुसरा घोडा, कुणी धन, कुणी धान्य, कुणी धेनू, कुणी धरती अशा अनेक मागण्या घेऊन याचक वाड्यावर जमू लागले. सकाळची आन्हिकं आटोपल्यानंतर प्रथम सर्व याचकांना दानं करून मगच वसुदादा भोजन घेऊ लागला. राजवाड्याला याचकांच्या अखंड येण्या-जाण्यामुळे व्यापारपेठेचं स्वरूप आलं! दुर्योधनाच्या पायांवर पुरेशी घालूनही उरलेली दिग्विजयातील संपत्ती गाड्यागाड्यांनी होती. आर्यवर्तातील सर्व राज्यांतील याचक आले असते, तरीही ती संपली नसती! त्या संपत्तीचं दान करून तो आता जनमनांची राज्यं जिंकू लागला! दीन, दुर्बल, अपंग, रंजले-गंजले, ब्राह्मण, अनाथ, व्याधिग्रस्त, सर्व स्त्री-पुरुषांना एकच आधार मिळाला – दानशूर कर्ण!

दानशूर कर्ण!

राजवाड्यासमोरच्या प्राकारी चौकातल्या दगडी चौथऱ्यावर बसून जो जी मागेल त्याला ती वस्तू देताना मला वसुदादाचं विलक्षण आश्चर्य वाटू लागलं. प्रत्येक याचकाचं प्रथम तो मधुर हसून स्वागत करीत असे. हे हास्य जर दिग्विजयातील प्रत्येक सैनिकाला पाहायला मिळालं असतं, तर त्यासाठी दंडकारण्य पार करून ते आर्यावर्ताबाहेर महारठ्ठातही गेले असते! जे सैनिकांना पाहायला मिळालं नव्हतं ते याचकांना मात्र मिळत होतं! जी संपत्ती वणवण भटकून त्यानं मिळविली होती ती तो आता हसतमुखानं सहज हजारोंना देऊ लागला.

अश्वत्थाम्यानं आपल्या पत्रात निसर्गातील मनोरम दृश्यं पाहून होणारा आनंद हा दहा दिग्विजयातील विजयानंदापेक्षाही श्रेष्ठ असतो, असं म्हटल्याचं मला स्पष्ट आठवत होतं. एका वृद्धेला भरजरी वस्त्र देता-देता अंगराजानं आमच्या शेजारी उभ्या असलेल्या, अश्वत्थाम्याला विचारलं, "गुरुपुत्रा, दहा दिग्विजयांतील विजयानंद, अनेक निसर्गरम्य देखावे पाहताना होणारा आनंद, आणि – आणि अशा एका अनाथ निराश्रित, गांजलेल्या दुर्बलाचे अश्रू पुसताना होणारा आनंद यांतील सर्वश्रेष्ठ आनंद कोणता?"

अश्वत्थाम्याजवळ त्याचं उत्तर काही नव्हतं! तो नुसता हसला!

आर्द्रा नक्षत्रामुळे आकाशात साचलेले ढग अनपेक्षित वर्षू लागले. जणू ते ढगच सांगत होते की, 'दुर्बलाला दातृत्वानं सबल करण्याचा आनंदच सर्वश्रेष्ठ आहे!'

पावसाच्या सरीनं भिजणाऱ्या याचकांत हालचाल सुरू झाली. अंगराजानं माथ्यावर छत्र धरणाऱ्या सेवकाला दूर करून भिजत-भिजतच दान देत राहणं पत्करलं. मला तर मुसळधार कोसळणारा पाऊस आणि दानांमागं दानं देणारा वसुदादा यांची

दातृत्वाबाबत स्पर्धाच चाललली आहे असं वाटलं!

सुवर्ण, मोती, प्रवाळ, हिरे, वैदूर्य यांच्या मुठी-मुठी तो याचकांच्या झोळीत मुक्तपणानं रित्या करू लागला. राजवाड्याच्या सौधावरून पितामह आणि महामंत्री विदुर हे पाहत होते याची त्याला जाणीवही नव्हती! त्याचं दान याचकाच्या झोळीत नीट पडावं म्हणून अश्वत्थामा प्रत्येक याचकाला झोळी भरण्यास मदत करू लागला! आम्ही पावसात भिजत आहोत याचं भान आम्हा तिघांपैकी कुणालाही नव्हतं.

सर्व याचक दान घेऊन "दानवीर कर्ण औक्षवंत होवो!" असं पुटपुटत महाद्वारातून बाहेर पडले. केवळ दोनच याचक शिल्लक राहिले! ते दोघंही इतके वृद्ध होते की, भिजल्यामुळे कुडकुडत होते! त्यांतील एकाचं शरीर नीलवर्णाचं होतं! युवराज अर्जुन आणि यादवराज श्रीकृष्ण यांशिवाय नीलदेहाची अन्य कुठलीच व्यक्ती कुठंही पाहिल्याचं मला आठवत नव्हतं. याचक असल्यामुळे त्याला तसं काही विचारता येणं शक्य नव्हतं. दुसरा वृद्ध गोल मुद्रेचा होता तो एकसारखा अंगराजाच्या पायांकडेच पाहत होता!

"दानशूर कर्णा, दान दे!" नीलदेहाच्या त्या वृद्धानं हातातील काठी लडलड हलवीत शब्द उच्चारले.

"काय देऊ बाबा? धन, धान्य, धेनू, धरती, धाम?"

"या सर्व गोष्टी जीव अस्तित्वात उरला तरच कामाच्या आहेत! आम्ही पावसात भिजल्यामुळे थंडीनं गारठून मरतो आहोत! आम्हाला वाळलेली लाकडं दे मोळीभर!" दात थडाथड आपटत त्या वृद्धानं आपली व्यथा सांगितली!

"वाळलेली लाकडं..." अंगराजानं चमकून अश्वत्थाम्याकडे आणि माझ्याकडे पाहिलं. वृद्धाची काठी तर लडलडतच होती. पांढऱ्या दाढीवरून पाण्याचे थेंब निथळत होते. त्याची मागणी पूर्ण केली नसती, तर तो खरंच गारठून मेला असता!

"शोण, याला या वेळी लाकडं कुठली देणार? आर्द्राच्या या वर्षणाऱ्या पावसात वाळलेली लाकडं कुठं मिळणार?" अंगराज सचिंतपणानं माझ्याकडे पाहू लागला. दिग्विजयातल्या त्याच्या विस्मयचकित करणाऱ्या कल्पना मी विसरलो नव्हतो! काय सांगणार होतो मी त्याला? काही सुचलं असतं तर ते त्याचं त्यालाच!

"थांब शोण, यांना इथं थांबवून घे! त्यांचं दान त्यांना मिळेलच!" मोत्याची मूठ एकाएकी तबकात रिती करून तो चौथरा सोडून तसाच झपाझप पायदंडया चढत आपल्या कक्षात निघून गेला.

"थाडऽऽ थाडऽ" कसल्यातरी आघाताचे आवाज त्याच्या अंतःपुरी कक्षातून निघून राजवाड्याच्या प्राकारात घुमू लागले.

अर्ध्या एक घटकेतच तो पायदंड्या उतरत पुन्हा चौथऱ्याकडे येऊ लागला. त्याच्या खांद्यावर लाकडाची मोळी होती! रणांगणात वायुजितावर आरूढ होऊन हातातील खड्ग विजेसारखं फिरविणारा सेनापती कर्ण आणि खांद्यावर मोळी घेऊन निषाध पर्वतातील एखादा भिल्ल पर्वताची उतरण उतरतो तसा पायदंड्या उतरणारा हा दाता कर्ण एकच आहे, हे तिथं केवळ एकट्या मलाच माहीत होतं. आपल्या कक्षातील छताला आधारासाठी आडव्या टाकलेल्या दोन चंदनी तुळ्या त्यानं स्वतः उपसून काढल्या आणि परशूनं त्या नीट फोडून, वायुजिताच्या वेगात बांधून ते मोळीचं लोकविलक्षण दान खांद्यावर टाकून तो संथपणे पायदंड्या उतरत होता. माझं मन संमिश्र

भावनांनी भरून गेलं. क्षणभर वाटलं की, त्याचा सख्खा बंधू म्हणवून घेण्याची कोणतीच पात्‌रता आपल्यात नाही.

"हे आपलं दान! माझ्यासाठी फार काल तिष्ठत राहावं लागलं आपल्याला!" खांद्यावरची मोळी नीलदेहाच्या वृद्धाच्या चरणांवर ठेवताना हात जोडून दादा म्हणाला.

"जयतु दानवीर कर्ण!" त्या वृद्धानं त्याच्या मस्तकावर हात उंचावीत आशीर्वाद दिला!

मोळी उचलताना तो वृद्ध सौधावरच्या पितामह आणि महामंत्‌री विदुर यांच्याकडं पाहून का हसला ते मात्‌र मला समजलं नाही! त्याच्याबरोबरच्या गोल मुद्‌रेच्या वृद्धानं जाता-जाता पुन्हा एकदा दादाच्या पायांवर कटाक्ष टाकला! कमरेतून वाकलेले ते दोघेही वृद्ध मोळी घेऊन महाद्वाराबाहेर पडले. नीलदेहाच्या त्या वृद्धाला महाद्वाराचं ते दिंडीद्वार ओलांडताच एकदम ताठ उभा राहिलेला पाहून एक क्षणभर मला भास झाला की, तो वेष पालटलेला श्‌रीकृष्ण तर नसेल? आणि त्याच्याबरोबरचा तो दुसरा वृद्ध युधिष्ठिर तर नसावा!

दान संपलं होतं. पावसाच्या सरी थांबल्या होत्या, पण माझ्या मनात विचारांच्या सरी ओघळतच होत्या! दादाचं सारथ्य पत्करून मी मोठी चूक केली होती! त्यामुळे मला त्याचा रथ हाकता येत असला तरी त्याचा सेवक होता आलं नव्हतं. सेवक असतो तर दिवसभर दानासाठी उभं राहिल्यामुळे थकणाऱ्या त्याच्या तळपायांना चंदनी तेल चोळण्याचं अपूर्व भाग्य मला मिळालं असतं! धाकटचा भावाच्या नात्यानं सेवा करीन म्हटलं तर दादा त्याला तयार झाला नसता.

**

# सव्वीस

धावत्या रथचक्राचे आरे एकामागून एक पुढं सरकतात तशी वर्षांमागून वर्षं सरकत होती! दिग्विजयी कर्ण ही दादाची कीर्ती मागं पडून दानवीर कर्ण ही कीर्ती आता सर्वांमुखी झाली. त्याच्या सर्व पुत्रांना दानवीराचे सुपुत्र म्हणून सर्व जण आदरभावानं वागवीत होते. हिमालयाच्या सलग पर्वतशिखरांसारखे ते आता धिप्पाड झाले होते. पित्यासारखे युद्धशास्त्रात निष्णात झाले होते. सर्वांत ज्येष्ठ वृषसेनानं तर बाहुकंटक सर्व कौशल्यासकट हस्तगत केला होता! वृषसेन, सुषेण आणि वृषकेतु हे वृषालीवहिनींचे तीन पुत्र तर मात्यापित्यांचे सर्वच गुण घेऊन आले होते. चित्रसेन, सुशर्मा, प्रसेन आणि भानुसेन हे सुप्रिया वहिनींचे चार पुत्रही गुणविशेषांत कुठंही कमी पडत नव्हते! ते सप्तपुत्र व्यायामशालेकडे निघण्यापूर्वी दानासाठी उभ्या असलेल्या पित्याच्या चरणांना हात लावून पुढं जाताना पाहून मला दादाचं जीवन कृतार्थ झाल्याचं समाधान मिळू लागलं! अश्वत्थाम्यासारखा मी जीवनाचा सखोल अभ्यास केला नव्हता, दादासारखे सुखदु:खांच्या घटनांचे रस भरलेले चषकही पचविले नव्हते! माझं जीवन म्हणजे फोफावलेल्या पिकाच्या रोपट्यांनी सुशोभित केलेल्या शेताच्या बांधावरील गवतासारखं वाढलेलं होतं. दुरून पाहणाऱ्याला ते गवतही पिकासारखंच वाटतं! अंगराजाचा बंधू ही उपाधी सोडली तर स्वतंत्र अशी माझी काय योग्यता होती? केवळ त्याच्यामुळेच, मीही सर्वांमुखी झालो होतो! म्हणूनच जीवन म्हणजे एक महान योगायोग आहे, असं मला नित्य वाटत होतं.

पूर्वजन्मीच्या पुण्याईच्या ऋणानुबंधावरच आम्ही दोघांनी राधामातेच्या कुशीत जन्म घेतला होता. जन्मभर हातात हात घालून विशुद्ध मनानं सोबत केली होती. मातीच्या घड्याच्या तुकड्यानं प्रयागक्षेत्री वृषालीवहिनींचं अंगराजाशी नातं जोडलं होतं! जीवनाचे घडे पुढं त्यांनी प्रेमरसानं भरले होते! आता तर ते काठोकाठ भरले होते!

गुरू द्रोणांनी सामाजिक संकेतांपोटी दूर सारलेला धनुर्धर कर्ण, त्यांच्याच पुत्रानं – अश्वत्थाम्यानं मात्र जिवाभावाचा स्नेही मानला होता! पितामह भीष्मांनी एकवार धिक्कारलेल्या कर्णाचं दिग्विजयी योद्धा म्हणून स्वागत केलं होतं. हे परस्परविरोधी घटनांचं द्वंद्व पाहताना मला एकच वाटत होतं की, 'जीवन हा एक महान योगायोग आहे!'

ही कल्पना मी जेव्हा दादापाशी बोलून दाखविली त्या वेळी तो म्हणाला, "नाही शोण, जीवन हा योगायोग नाही! जन्म हा योगायोग आहे! जीवन योगायोगापेक्षा कर्तृत्वावर अवलंबून आहे."

त्याचा प्रत्येक विचार, प्रत्येक कल्पना इतकी सडेतोड होती की, विरोधाला अर्थच उरत नव्हता. तरीही तो पुष्कळ वेळा मला परामर्श का विचारीत असावा हे मात्र समजत नव्हतं.

"शोण, मी दान देतो. सर्व मला दानशूर म्हणतात, पण माझं हे दानशूरत्व संकुचित नाही वाटत तुला? हस्तिनापूर आणि आसपासची चार राज्यं यांपेक्षा बाहेरच्या

इच्छुकांना मी काय देऊ शकलो आहे? दिग्विजयासाठी आपण सर्व आर्यावर्तात फिरलो, पण दानासाठी फिरलो का? सांग, याला उपाय सांग!" त्यानं मला एकदा विचारलं.

"तीच जर तुझी इच्छा असेल तर त्याला एकच मार्ग आहे. तुझ्या सप्तपुत्रांचे विवाह! आणि तेही दूरदेशींच्या सारथिकन्यांशी! त्या निमित्तानं सर्व राज्यांतील याचक इथं निमंत्रित करता येतील. ज्यांना येणं शक्य नसेल, त्यांना आपल्या आप्तेष्टांकडून आपण धन, धान्य, वस्त्रं पाठवून देऊ शकू." मला त्याच्या पुत्रांचे विवाह शक्यतो लवकर व्हावेत, असं मनापासून वाटत होतं! कारण ते सर्व आता विवाहयोग्य झालेले होते!

"ठीक आहे, तुझी कल्पना योग्य आहे. तू व सत्यसेन जा आणि वधूकन्या पसंत करून या. अवंती, कामरूप, कांबोज, काश्मीर अशा दूर देशांतील त्या असाव्यात. सत्यसेन पश्चिम उत्तरेकडे जाईल. तू पूर्व आणि दक्षिणेकडे जा. आणि लक्षात असू दे, मीनाक्षीसाठी आमच्या पुत्रांपेक्षाही सुस्वरूप वर तू शोधून आणला पाहिजेस! आता मोठी झाली आहे ती!"

"एवढा सुस्वरूप वर कुठं मिळणार?"

"का नाही? तुला शक्य नसेल तर ते काम मी करीन! मथुराराज्यात त्या निमित्तानं तरी जाता येईल मला. मीच पाहीन तिला योग्य वर!"

त्यानं माझ्या कन्येसाठी वरसंशोधनाचं काम आपल्याकडे घेतलं!

**

# सत्तावीस

देशोदेशी फिरून मी आणि सत्यसेनानं वधूकन्या पसंत केल्या. दादानं मीनाक्षीसाठी मथुराराज्यातील वर निवडला. सर्वत्र आमंत्रणं गेली. त्या आमंत्रणांत नव्या आप्तेष्टांना अधिकांत अधिक अनाथ, अपंगांना घेऊन येण्याची विनंती आग्रहानं केली गेली होती. राजज्योतिषांनी आणि पुरोहितांनी सांगितलेला शुभदिवस आला!

राजनगरात सर्वत्र फिरून वृषाली आणि सुप्रियावहिनींनी अक्षता वाटून सर्वांना आमंत्रणं दिली होती. नगराबाहेरच्या विदुरांच्या पर्णकुटीत जायलासुद्धा त्या विसरल्या नव्हत्या!

पहाटेपासूनच राजवाड्यावर नगारे घुमत होते. आपल्या दिग्विजयी सेनापतीच्या आणि दानशूर महामानवाच्या पुत्रांच्या विवाहांचा आनंद व्यक्त करण्यासाठी सर्वांनी आपली निवासं सजविली होती. ही सूतपुत्रांची लग्नं आहेत, असं म्हणण्याचं धाडस आता एकाही राजानं केलं नसतं! राजवाडा तर एखाद्या नववधूसारखा नटविण्यात आला होता! आमचे थकलेले मातापिता देहांची कुरकुर विसरून नातवांच्या विवाहांत उभारलेल्या भव्य मंडपातील बोहल्याभोवतीच्या मंगलकलशांवर श्रीफलं ठेवीत होते. जीवन वेडावलं होतं. आमच्यावर सौख्याचं मुक्त हस्तानं दान करीत होतं. दिग्विजयातील सर्व राजे हस्तिनापुरात आले होते. जे येऊ शकले नव्हते त्यांचे प्रतिनिधी म्हणून त्यांनी अमात्य, महामंत्री, सेनापती कुणी ना कुणीतरी पाठविलं होतं. ते सर्व जण वधू-वरांना बघण्याऐवजी मंडपाबाहेर ब्राह्मण, ऋषिमुनी, अनाथ, आपद्ग्रस्त यांना दान देत असलेल्या दानवीर अंगराजाला पाहण्यासाठीच अधिक गर्दी करू लागले.

''महाराज धृतराष्ट्रांसारखा मी नगराचा अधिपती असतो तर 'हस्तिनापूर' हे नाव बदलून मी 'कर्णपूर' हेच नाव ठेवलं असतं त्या नगराचं!'' सर्व सोहळा पाहून भारावलेला विदर्भराज रुक्मी मला हे म्हणाला.

विवाह पार पडले. देशोदेशींचे तृप्त याचक 'जयतु कर्ण, जयतु!' असे आशीर्वाद देत निघून गेले. त्या रात्री सर्व नगरभर समयांची रोषणाई पाहताना स्वर्ग आकाशात आहे की धरतीवर याचा मला संभ्रम पडला!

आपल्या सुनांना आशीर्वाद देताना दादानं काढलेले उद्गार माझ्या कानांत घोटाळत होते.

"राजवाड्यात आलात तरी तुम्ही सारथिकन्या आहात हे कधीच विसरू नका!" हे ते उद्गार होते. ते आठवताना मला जगाचा विसर पडला. नाही म्हणायला मनाच्या कोपऱ्यात कुठंतरी दूरवर मात्र पांडवांची स्मृती वळवळत होती! त्यांना वनवासाला जाऊन दहा वर्षं झाली होती! कुठल्यातरी अरण्यात, एखाद्या जीर्ण पर्णकुटीत अंधाराचं काळं वस्त्र पांघरून ते झोपले असतील! मन अस्वस्थ होतं.

मीनाक्षीला पतिगृही पाठविताना होणारं दु:ख, तिच्यासारख्या सात मीनाक्षी सुनांच्या रूपात वाड्यावर वावरताहेत हे पाहून मी गिळून टाकलं! याचकांना देऊन रिती झालेली कोठारं विवाहांतल्या देणग्यांच्या रूपानं पुन्हा भरली होती! गंगेच्या पात्रासारखं

दादाचं दानसत्र अखंड चालूच होतं. एकही याचक विन्मुख परत जात नव्हता. जाणार नव्हता!

पतिगृही जाताना मीनाक्षीनं अंगराजांसाठी – आपल्या वंदनीय काकांसाठी – एक संदेश दिला. विवाहाच्या धामधुमीत तो मी त्याला सांगू शकलो नव्हतो. "तुमच्या कुंडलांशी खेळणाऱ्या नातवांना पाहण्यासाठी मी लवकरच परत येईन!" असा तो संदेश होता. तो सांगून त्याच्या प्रसन्न मुखावरचं हास्य खुलवावं म्हणून मी त्याच्या महालाच्या द्वारात उभा राहिलो. पण – पण सूर्योदय झाला तरी त्याच्या कक्षाचं द्वार बंदच होतं! आठ-दहा वेळा ठोठावलं तरी आतून प्रतिसाद काही येईना! शंकेनं मन झाकाळून गेलं. असं पूर्वी कधीच घडलं नव्हतं!

"दादाऽऽऽ द्वार उघड दादा!" मी भयानं कसातरी बोललो.

"कोणऽऽ शोण?" आडदंड दूर झाला. द्वार उघडलं गेलं. सोनेरी केसांच्या कुरळ्या बटा विखुरल्यामुळे त्याचं सदैव प्रसन्न दिसणारं मुख चिंताग्रस्त दिसत होतं! पाठीवर हातांची गुंफण बांधून तो एकसारखा कक्षात इकडून तिकडे अशा अवस्थेत फेऱ्या घालू लागला.

"का काय झालं? तुझं मुख एवढं म्लान का?" मी न राहवून विचारलं.

"काहीऽ काही सुचत नाही शोण!"

"कशाबद्दल बोलतो आहेस तू?"

"स्वप्नाबद्दल! रात्री मी एक अद्भुत स्वप्न पाहिलं आहे."

"कोणतं स्वप्न? अरे, स्वप्नं काही सत्य नसतात!"

"नाही शोण! हे स्वप्न सत्य ठरणार असं माझी मनोदेवताच मला सांगते आहे. या स्वप्नात साक्षात सूर्यदेवांशी माझं संभाषण झालं आहे!"

"काय, काय झालं संभाषण?"

"ते म्हणाले की, उद्या प्रत्यक्ष इंद्र याचक म्हणून तुझ्या द्वारात येणार आहे! धन, संपत्ती, वस्त्रं, गायी यांपैकी काहीच न मागता तो मागणार आहे...."

"काय मागणार आहे?"

"कवच आणि कुंडलं, शोणा! कवच आणि कुंडलं! आणि तीही अर्जुनासाठी!!" तो द्रुतगतीनं अस्वस्थ फेऱ्या घालू लागला.

"नाही दादा! काही झालं तरी हे दान मात्र तू मुळीच देऊ नकोस! हे दान नाही; दास्य ठरणार आहे!" मी जवळ-जवळ किंचाळलो. माझं शरीर थरथरत होतं!

"हेच मला सूर्यदेवांनीही निक्षून सांगितलं आहे. कवच-कुंडलं दिलीस, तर तुझा सर्वनाश होईल असं ते पुन:पुन्हा आवर्जुन म्हणाले."

"मग काय उत्तर दिलंस त्यांना तू?"

"शोण, मी दिलेलं उत्तर तुला आवडणार नाही – ऐकवणार नाही."

"सांग! लवकर सांगितलं नाहीस तर माझा श्वास थांबेल!"

"सूर्यदेवांना वंदन करून मी सांगितलं आहे की, प्रत्यक्ष इंद्र याचक म्हणून माझ्या द्वाराशी येणार असेल, तर अशा याचकाला शोभणारं कवच-कुंडलांचं दानही मी अवश्य देईन!" त्याचे शब्द तप्त लोहरसासारखे माझ्या कानांत शिरले.

"का? कशासाठी स्वत:च्या प्राणांशी हे महाभयानक द्यूत तुला खेळावंसं वाटतं आहे?"

''शोण, तुला कधीच कळणार नाही! हे दान केवळ कीर्तीसाठी मी देणार आहे!''

''कीर्ती-कीर्ती! आतापर्यंत काय तुला कमी कीर्ती प्राप्त झाली? 'कीर्ती' म्हणजे तरी काय? फसवी वारांगना नाही तर काय? कसली कीर्ती पाहिजे आहे तुला आणखी?''

''बल आणि वृत्रासुर यांना ठार मारणाऱ्या, स्वर्गाचा अधिपती असलेल्या, देवांचाही देव म्हणवून घेणाऱ्या कीर्तिश्रेष्ठ इंद्राचा वरदाता कर्ण अशी कीर्ती मला संपादन करून घ्यायची आहे! शोण, उद्या प्रत्यक्ष स्वर्ग या पुरातन धरित्रीकडे भिक्षा मागण्यासाठी येणार आहे! या वैभवासाठी कवच-कुंडलंच काय; पण मी प्राणही होमून टाकीन! वीरांच्या जन्म-मृत्यूच्या कल्पना वेगळ्या असतात! कीर्तिहीन मनुष्य हा जिवंत असला तरी मृतवतच असतो! कीर्तिवंतालाच स्वर्गाची द्वारं मुक्त असतात! कीर्ती ही माणसाला स्मृतीच्या रूपानं अमर नवजीवन देणारी दुसरी माताच असते! कीर्तिहीन जीवन हे जीवन्मृताचं जीवन असतं! दिनरात्र भोजन, निद्रा, धन, प्रेम यांसाठी धावणं म्हणजे जीवन नव्हे! जीवनाची गणती कीर्तीच्या मानदंडानंच होत असते! तसे महासागरात शेकडो वर्षं जगणारे देवमासे नसतात का? पण कुणीही त्यांना अमर नाही म्हणत! केवळ जिवंत असणं म्हणजे जगणं नव्हे! कसं जिवंत असावं हे कीर्ती ठरवीत असते! तसे पृथ्वीच्या या विशाल पाठीवर प्रत्यही हजारो जीव जन्म घेतात आणि मृत्यू पावतात! त्यांच्यासाठी अश्रू ढाळण्याइतका अवसरही कुणाला नसतो! पण ज्यांच्या जाण्यानं मनामनांचे कुंभ वियोगाच्या विदारक यातनेनं भंग पावतात तेच खरे कीर्तिमान! तेच खऱ्या अर्थानं जगले आणि खऱ्या अर्थानं मेले! म्हणूनच जीवन आणि कीर्ती यांपैकी काय निवडणार आहेस, असं विचारणाऱ्या सूर्यदेवांना मी 'कीर्ती!' असंच उत्तर दिलं आहे! कीर्ती कलंकित करून मिळणारं जीवन मी कधीही स्वीकारणार नाही!''

''मग असलं हे कीर्ती प्राप्त करून देणारं दान देताना एवढा अस्वस्थ तरी का झाला आहेस? दादा, जीवनाची आशा ही सर्व आशा-आकांक्षापेक्षा श्रेष्ठ असते हे नाकारू नकोस! जिवंत असताना कीर्ती मिळाली तर आत्मसन्मानाचं सौख्य तरी मिळेल, पण मृत्यूनंतर त्या कीर्तीचा उपयोग तरी काय? सुगंधी फुलांची माला प्रेतावर चढवून तिचा सुवास ते प्रेत काही अनुभवू शकत नाही. जगात अस्तित्वात असणं – कोणत्याही मार्गानं अस्तित्वात असणं, हाच खरा पराक्रम आहे! तेच खरं जीवन आहे! तुझ्या द्वाराशी इंद्राला पाठविणाऱ्यांची तरी दुसरी कोणती उदात्त कल्पना आहे? ते केवळ जगू पाहताहेत! जगणं हा जिवाचा स्थायिभाव आहे म्हणूनच तुझं मन आज कातर झालं आहे! जगण्यासाठी! कारण तुलाही माहीत आहे की, कवच-कुंडलांमुळे तू युद्धात अवध्य आहेस! अजिंक्य आहेस! अर्जुनासारखा धनुर्धरसुद्धा तुझा पराभव करू शकणार नाही. दादा, मनाच्या सत्य स्वरूपाला साथ दे! कवच-कुंडलं दान देऊ नकोस! अर्जुनवधाच्या प्रतिज्ञेची तरी आठवण ठेव!''

''शोण, फार बोललास! माझ्या सहवासात राहून कधी बोलला नव्हतास तेही बोललास! सरोवरात फुललेल्या कमलपुष्पांच्या मकरंदाची गोडी सरोवरच्या पाण्यालाही कळत नसते! ती कळते दूरस्थ भ्रमरांना! तुझीही तीच स्थिती आहे! जीवनभर मी कसा वागलो, हे तुलाही कळू नये याचं आश्चर्य वाटतं! माझ्या सहवासात राहून, खांद्याला खांदा लावून जगूनही तू असं म्हणावंस? जिवाच्या भयानं मी कातर आहे, अस्वस्थ झालो आहे आणि त्यामुळेच मला काही सुचत नाही, असंच तुलाही वाटतं? शोण, मी कातर झालो आहे, अस्वस्थ झालो आहे, काही सुचेनासं झालं आहे मला – हे सारं खरं आहे; पण

ते का?”

“का?’’

तो रहस्याचं जाळं अधिकच गुंफत होता.

‘‘शोण, अंगावरचं हे अभेद्य कवच आणि ही तळपणारी कुंडलं देवराज इंद्रानं मागितली, तर त्याला ती कशी व कुठून कापून काढून द्यावीत, हे सुचत नाही म्हणून मी अस्वस्थ आहे!! कसं शस्त्र चालवू मी या अभेद्य शरीरावर? कीर्तीचा समोर आलेला हा कुंभ कवच-कुंडलांच्या अभेद्यपणामुळे भंगणार की काय? मी अस्वस्थ आहे तो केवळ यासाठी! रात्रभर विचार करतो आहे; पण अजून मार्ग काही सुचत नाही! सांग शोण, कसं आणि कुठून कापू शकणार मी हे कवच?” तो पुन्हा पाठीवर हात गुंफून अस्वस्थ-अस्वस्थ फेऱ्या घेऊ लागला.

मी मान खाली घातली. त्याच्या गगनचुंबी विचारांसमोर खरोखरच मला माझे विचार अतिशय क्षुद्र वाटले! कितीतरी काल आम्ही तसेच शांत होतो. शेवटी मला कक्षात सोडून तो अर्घ्यदानास जाण्यासाठी कोरडं उत्तरीय घेऊन निघून गेला.

वृषालीवहिनींसह सर्वांना ती वार्ता सांगून जागृत ठेवण्यासाठी मी राजवास्तूच्या कक्षाकक्षांतून फिरू लागलो, पण त्याचा कठोर निर्धार सर्वांना पूर्ण माहीत होता. कवच-कुंडलं-दानाच्या निर्णयापासून त्याला परावृत्त करण्याचं सामर्थ्य आता आम्हापैकी कुणातही नव्हतं!

**

# कर्ण

# अठ्ठाव्वीस

नित्यासारखं स्नान, आन्हिकं आणि अर्घ्यदान आटोपून तो दानाच्या चौथऱ्यावर येऊन उभा राहिला! याचकांची पंक्ती लांबवर पसरली होती. त्यात देवेन्द्र दिसतो का म्हणून मी बारकाईनं कानोसा घेतला! तो कुठंच दिसत नव्हता. समाधानानं मागेल ती वस्तू मी अंगराजाच्या हाती देत होतो. सुवर्ण, वस्त्रं, मोती, धान्य, तेल यांचं मुक्त हस्तानं दान झालं. सर्व याचक संपले. सौधावर चिंतेनं व्याकूळ होऊन उभे राहिलेले मातापिता, वृषालीवहिनी आणि सप्तपुत्र सुटकेचा निःश्वास टाकून समाधानानं आत परतले! 'स्वप्न हे स्वप्नच ठरलं म्हणायचं,' असं पुटपुटत मी खाली सांडलेले चार मोती तबकात टाकले. इतक्यात एक कृश शरीराचा ब्राह्मण महाद्वाराच्या पोटद्वारातून आत शिरला आणि क्षणभर तिथंच थांबला! माझं मन शंकेनं थरारलं!

"कोण आहे ते?" अंगराजानं विचारलं.

"एक दरिद्री ब्राह्मण! एक याचक!"

"ये बंधो, त्वरा कर! दानाचा समय संपत आला आहे. लवकर ये!"

कमरेवर दोन्ही हात टेकवून वाकत तो ब्राह्मण चौथऱ्याजवळ आला. डोळे बारीक करून मुखाचं बोळकं चाळवीत उभा राहिला!

"ब्रह्मज्ञा, काय देऊ? धन, धेनू, धरती, धाम, अश्व, वस्त्रं? फुलं, पुष्पं, मधुर रस? सेवक, सेविका की ग्रंथलेखनासाठी भूर्जपत्रं? काय देऊ? बोला!"

"कर्ण, तुझी दानवीर ही अभंग कीर्ती ऐकून दूरदेशाहून मी आलो आहे! मला धन नको, मी धनलोभी नाही! धेनू नको, मी गोपाल नाही! धरती नको, मी राजा नाही! जिथं जाईन तेच माझं धाम आहे म्हणून मला धामही नको! अश्व, अन्न, फलं, पुष्पं काहीच नको! मी ग्रंथलेखन करणारा कुणी ऋषीही नाही म्हणून मला तुझी भूर्जपत्रंही नकोत!"

"मग पाहिजे तरी काय? मी स्वत: आपला सेवक होऊ का? आपल्या मागून सांगाल तिकडे येऊ काय? ब्रह्मवर्या, सांगा, संकोचू नका! एक वेळ मेघ सागराच्या द्वारातून विन्मुख जातील, पण याचक कर्णाच्या द्वारातून कधीही नाही विन्मुख परत जाणार! कधीच नाही!!"

"हा तुझा खोटा दंभ आहे! तुझा लौकिक भंगू नये म्हणून मी परत जातो आहे, कारण मी जे मागणार आहे, ते तू कधीच मला देणार नाहीस!" ब्राह्मण परतून महाद्वाराकडे चालू लागला. अंगराजानं चौथरा सोडून धावत जाऊन त्याचे चरण धरले.

"माझ्या धवल कीर्तीला असा काळिमा आणू नका. हे मस्तकही मी आपल्या चरणांवर उतरून ठेवीन, पण आपण रिक्त हस्त परतू नये! सांगा, आपली इच्छा काय आहे ती?"

"दानवीर म्हणवून घेणाऱ्या कर्णा, आपल्या दानशूरत्वाचा तुला एवढा गगनभेदी अभिमान असेल, तर दे मला तुझ्या कवच-कुंडलांचं दान!!" ब्राह्मणानं दोन्ही हात पसरले! दादा अग्नीचा झटका बसल्यासारखा ताडकन उठला. त्याचे नीलनेत्र पाण्यानं डबडबले होते, ओठ थरथरत होते.

"देवराज इंद्र! या कर्णासारख्या सामान्य सूतपुत्राच्या द्वारातऽऽऽ आपण? एका वृद्ध ब्राह्मणाच्या वेषात? मी कुठं आहे? ही धरती आहे की स्वर्ग आहे? स्वर्गातील अमृताचं प्राशन करून अप्सरागणांत रमणारा देवांचा राजा मर्त्यलोकातील एका सूतपुत्राच्या द्वारात हात पसरून उभा आहे? हे सत्य आहे की स्वप्न? शोण, आज... आज आपला दिग्विजय खऱ्या अर्थानं पूर्ण झाला आहे! चारी दिशांच्या वर एक पाचवी दिशाही असते! आज तीही पराभूत आहे! देवराज अंगराजाच्या द्वारात प्रत्यक्ष याचक म्हणून उभा आहे! या, देवाधिदेवा, मी आपलं सहर्ष स्वागत करतो आणि कवच-कुंडलांचं दान आपल्या झोळीत टाकतो! पण... पण त्यासाठी मोठी झोळी घेऊन या देवराज! माझं हे सर्वांग अभेद्य आहे. त्यावर शस्त्र नाही चालू शकत! म्हणून... म्हणून श्वास प्राण जाईपर्यंत रोखून मी माझं मृत शरीरच त्या झोळीत फेकून देईन. स्वर्गात गेल्यानंतर आपल्या राज्याच्याभोवती असलेल्या सोनेरी कुंपणावर ते वाळत टाका! माझ्या थंड रक्ताचं बाष्प होऊन जाईल! हे सुवर्ण-कवच अखंड मिळेल! हवं तसं! अभेद्य कवच छेदणं हाती नसलं, तरी श्वास रोधणं हाती आहे माझ्या!"

अंगराज थोडा वेळ थांबला आणि म्हणाला, "पण का पाहिजे आहे आपल्याला ते? स्वर्गाच्या भांडारातील सुवर्णाचा साठा संपुष्टात आला म्हणून? की आपल्या सिंहासनावरचं व्याघ्राजिन जीर्ण झालं आहे त्या जागी नवं घालण्यासाठी म्हणून? की आपल्या हातातील वज्राला शोभणारी कवच ही एकच एक दुसरी वस्तू विश्वात आहे म्हणून? सांगा देवराज, स्वर्गाच्या ज्या पायदंडचा उतरून तुम्ही आज धरतीवर आलात त्यांवर पायघडी म्हणून घालण्यासाठी तर आपणाला हे माझं सुवर्णी कवच नको आहे ना? बोला महेन्द्र, स्तब्ध का? निदान मला हे कवच आपल्या चरणांवर ठेवण्याचा उपाय तरी सांगा! कारण... कारण माझ्यासारख्या सूतपुत्राच्या प्राणाला स्वर्गात स्थान कुठलं असणार? केवळ कवच आणि कुंडलंच घेऊन जाणार आहात ना आपण? मग त्यासाठी ती जन्मानं एकत्र जोडलेली अभेद्य असताना विलग कशी करू मी? कुठून करू? मेंदूचे सर्व धागे उसवून मी उपाय शोधतो आहे आणि तो न मिळाल्यामुळे माझी विमल कीर्ती आज कलंकित होणार म्हणून लज्जित मुखानं आपणासमोर उभा आहे! कुंठित मती होऊन. पूर्ण पराभूत होऊन!"

"नाही कर्ण, तुझी कीर्ती कधीच कलंकित नाही होणार! कमरेचं खड्ग काढ आणि कमलदलासारख्या तुझ्या तलम मुखातून खड्गाचं धारदार पातं चालव! कवचाचा एक विलग पापुद्रा हाती येईल! तो धरून स्वत:च्या हातांनी वृक्षावरची साल काढावी तसं कवच विलग करून काढ! कर्ण, पाची दिशांचा दिग्विजय केवळ तुला आणि तुलाच शक्य आहे! जगात तू आणि एकमेव तूच दानवीर ठरशील!!"

"देवराज, मी आपला कसा ॠणमुक्त होऊ? मला हे सुचू शकलं नाही. आपण धन्य आहात!" त्याचे डोळे विलक्षण आनंदानं तळपले.

झपाझप चालत तो चौथऱ्यावरच्या नेहमीच्या जागी आला. त्यानं सर्रकन कमरेचं खड्ग म्यानाबाहेर खेचलं. त्या आवाजाबरोबर भीतीचा एक सखोल शहारा सर्रकन माझ्या सर्वांगावर तरळून गेला. त्याच्या हातातील खड्ग रोखत मी कळवळून त्याच्या पायांना मिठी मारत म्हणालो, "दादा, नको रे नको! तुझ्या कानांतील कुंडलं आज पुन्हा निस्तेज पडली आहेत! कधी नव्हे अशी काळी ठिक्कर झालीत ती! नको रे करूस कवच-कुंडलं दान! नकोऽऽ नकोऽऽ!"

"शोण, आज कुंडलं निस्तेज पडणार ती शेवटची! आणि ती पडली तरी त्याची मला आज मुळीच क्षिती नाही! त्यांच्यापुढं आज साक्षात स्वर्गही निस्तेज पडणार आहे! दूर हो!" त्यानं खड्ग माझ्या हातून हिसकावून घेतलं. मी त्याच्या चरणांवर मस्तक ठेवून ते थडाथड आपटत आक्रोशू लागलो, "दादा, एवढी भिक्षा मलाही घाल! मलाही दे दान. शस्त्र कवचावर नकोस चालवू!" माझं मस्तक गरगरू लागलं.

त्याचं कुणाकडेही लक्ष नव्हतं. फासे फेकताना शकुनीमामा झाले नव्हते एवढा दादा आज कसा काय धुंद झाला होता! सहभोजनाच्या दिवशी मद्यपी दुर्योधन झाला नव्हता तेवढा कर्णराज धुंद झाला होता!

डोळे मिटून, सूर्यस्तोत्र म्हणत विस्फारलेल्या आपल्या मुखात त्यानं खड्गाचं धारदार पातं डोळे मिटत खसकन खुपसलं! रक्ताची एक-दोन कारंजी देवेन्द्राच्या कटिवस्त्रावर उडाली!

"दादाऽऽऽ दादाऽऽऽ" मी लहानपणी त्याच्या रथामागून जेवढ्या काकुळतीनं क्रंदलो नव्हतो तेवढ्या तीव्रतेनं मी हंबरडा फोडला, पण तो त्याला त्या वेळी गेला तसा आज काही ऐकू गेला नाही! वृक्षावरची साल काढावी तसा तो आपल्या हातांनी आपलं अभेद्य कवच अलग करू लागला. अंजिराचं फल कापताच आतला रक्तवर्णी गर्भ उघडा पडावा तसं त्याचं मांसल शरीर क्षणाक्षणाला उघडं पडू लागलं! गंगेच्या घाटावरील बुरूज तिच्याच पाण्यात निथळतो तसा तो त्याच्याच उष्ण रक्तधारांत निथळू लागला!

माझ्या सर्वांगात असंख्य बाणांची अग्रं खुपसल्याच्या असह्य यातना होत होत्या! चौथरा गरगरत होता. भोवळ येत होती मला! मस्तक दाबून, मांडीत खुपसून मी मटकन खाली बसलो! आता सर्व जणच खालीच बसणार होते!

हसत-हसत वस्त्र उतरावं तसं कवच उतरून त्यानं ते देवराजाच्या हाती दिलं. क्षणार्धात कुंडलंही कापून त्यावर ठेवली. तो मंद-मंद हसत होता. एवढा कसला आनंद मिळाला होता त्याला? आम्हा सर्वांच्या आशा-आकांक्षांवर अंगार ठेवून त्यानं देवेन्द्रांच्या पायांखाली पुष्पं विखुरली होती! कसलं सौख्य मिळालं असेल त्याला, म्हणून त्याच्या मुद्रेकडे मान उंचावून मी पाहिलं! मृत्यूसुद्धा इतका भेसूर नसेल! सर्वांगावरचं कवच काढल्यामुळे उघडं पडलेलं रक्ताळलेलं त्याचं शरीर आणि कानांची तुटकी पाळी यांमुळे तो इतका भेसूर, विद्रूप दिसत होता की, माझी दातखिळीच बसली! वणव्यातल्या अर्धवट पेटून विझलेल्या विशाल वटवृक्षासारखा तो चौथऱ्यावर उभा होता! स्वत:ला कसंतरी सावरीत मी उठलो! मी जिवंत आहे की मृत; तेच मला समजेना! तो वीर धनुर्धर, अनुपमसुंदर, दिग्विजयी सेनापती, दानवीर कर्ण – छे! आता तो कोणी, कोणी नव्हता! तो म्हणजे विरूपतेचा केवळ एक विकृत पुतळा दिसत होता! माझ्याकडं पाहून तो नेहमीसारखा हसला! पण मला त्याचं हसू नेहमीसारखं दिसलं नाही! रक्तवर्णी मुखाच्या आतून बाहेर डोकावलेले त्याचे दोन चकचकीत सोनेरी दात भयानक दिसत होते! शिरावरचे सुंदर सोनेरी केस कवचाबरोबरच समूळ गेल्यामुळे ते गदेसारखं नुसतंच गोल दिसत होतं! तुटक्या पाळ्यांजवळ पूर्वीसारखी जांभळट सोनेरी किरणं नव्हती. तिथं होते साकळलेले रक्तबिंदू! केवळ रक्तबिंदू!

"वसूऽऽऽ!" त्याला त्या विरूप अवस्थेत पाहून राजवाड्याच्या पायदंड्यांवरून मूर्च्छित होऊन धाडकन कोसळलेली राधामाता गडगडत येऊन, किंकाळत चौकात धपकन आदळली! त्या तशा विरूप अवस्थेतही पुढं जाऊन त्यानं तिला सावरण्याचा

यत्न केला! पण आपल्या उष्ण रक्ताच्या स्पर्शानं तिच्या अंगावर फोड उठताहेत, हे पाहून पुन्हा तो दूर झाला! केवढा असाहाय्य झाला होता तो! त्या रक्ताळलेल्या विरूप शरीरातील विशाल मन पाहून हसावं की दैवगतीला रडावं; तेच मला समजेना! कवच-कुंडलं हाती धरलेल्या इंद्राचे हातही आता पोळले होते! त्याचं मन मात्र निवलं होतं! त्याचा अर्जुन सुरक्षित राहिला म्हणून? की एक अद्वितीय दानवीर पाहायला मिळाला म्हणून? ते समजणं अर्थातच शक्य नव्हतं! राजवाड्याच्या पायदंड्या उतरून वृषाली आणि सुप्रिया वहिनी दानवीराकडे झेपावल्या, पण त्याही त्याला स्पर्शू शकत नव्हत्या! दुरूनच "नाथऽऽ महाराजऽऽऽ स्वामी!" म्हणून त्या हृदयद्रावक हंबरडा फोडत, घायाळ गायींसारख्या हंबरत होत्या. माझं मस्तक सुन्न झालं होतं! राजवाड्याचे सगळे सौध भरून गेले होते! दिग्विजयी सौंदर्यशाली वीराचं विरूप पुतळ्यातील रूपांतर सर्व जण डोळ्यांतून अश्रू ढाळत पाहत होते! याचकांचे अश्रू ओघळले होते त्याच चौथऱ्यावर त्याच्या रक्ताचं थारोळं आज दाटलं होतं! सर्व जण 'हायऽऽ हाय!' म्हणून हळहळू लागले! मी कान हातांनी आच्छादून घेतले! माझ्या कानांना त्याच्या जयजयकाराशिवाय काहीही ऐकण्याची कधीच सवय नव्हती. त्याच्या विरूपतेपेक्षा ही सर्वांची विफल सहानुभूती मला असह्य झाली होती!

चौथरा सोडून तो देवेन्द्राजवळ आला. मंदपणे! त्याच्या चरणांना वाकून हात लावीत तो म्हणाला, "देवराज, कुणाच्याही हृदयाला यातना देत जगण्याची माझी इच्छा नाही! माझ्यासाठी या सर्वांचं हृदय तीळ-तीळ तुटतं आहे! शक्य असल्यास माझं शरीर सुरूप कर... नाहीतर... नाहीतर हे खड्ग या कंठावरून फिरव! आता माझं मस्तक सहज धडावेगळं होईल!" हातातील रक्तरंजित खड्ग त्यानं देवराजाच्या चरणांवर ठेवलं! मान खाली टाकली! नेहमी सुवर्णासारखी तळपणारी त्याची रसरशीत पाठ आता तप्त लोहरसारखी लालबुंद दिसत होती.

"ऊठ! अंगराज कर्णा, तू धन्य आहेस! मी संतुष्ट होऊन तुला एक अमोघ अस्त्र देत आहे! तुझ्या केवळ एकाच शत्रूला वधू शकणारं वैजयंती अस्त्र!" देवेन्द्रानं त्याला वर उठविलं आणि त्याच्या सर्वांगावरून हात फिरविला. आशीर्वादासाठी क्षणैक त्याच्या मस्तकावर ठेवला. त्याचं शरीर हळूहळू सुरूप दिसू लागलं. धुकं निवळावं तसा रक्तवर्ण निवळला! कवच जाऊन कातडं आलं!

"जयतु दानवीर कर्ण!" आशीर्वाद देऊन ब्राह्मण वेशातील देवेन्द्र महाद्वाराबाहेर निघून गेला! ठिबकणारी कवच-कुंडलं घेऊन! आणि स्वत:चा पराभव त्या चौथऱ्यावर मागं ठेवून!

अंगराजाचं कवच गेलं हे विसरून अनेकांनी एकदम पुढं होत त्याला कडकडून आलिंगन दिलं! कुणीतरी घोषणा दिली – "दानवीर कर्ण! जीवेत् वर्षाणि शतम्!" मला त्या घोषणा ऐकू येत नव्हत्या. कवचातून ठिबकलेले अखेरचे रक्तबिंदू मी अनिमिषपणे डोळाभर पाहू लागलो. वरून राजवाड्याच्या पार सौधावरून फुलं उधळली गेली – ती स्वर्गातून उधळली होती की आणखी कुठून हे पाहायला कुणालाही अवसर नव्हता! सर्वांनी त्याला प्रेमापोटी घेरून टाकलं होतं. त्याला काय वाटत होतं ते सांगता येणं शक्य नव्हतं. पुढं होत त्यानं राधामातेला वंदन केलं.

"वसूऽऽ" तिचा कंठ दाटून आला होता.

"वसू नव्हे – वैकर्तन माते!" तो शांतपणे म्हणाला.

तिनं त्याच्या तुटलेल्या कानांची पाळी थरथरत्या बोटांनी चाचपून पाहिली! वेडं होतं तिचं मातृप्रेम! तिला सावरीत तो राजवाड्याच्या पायदंडया शांतपणे चढू लागला. त्याचे पुत्र, सुना, आप्तेष्ट, मी, कुणाचंही त्याला भान नव्हतं! दुथडीचे मुग्ध प्रेक्षक भावनावेगानं त्या मातापुत्रांवर पुष्पं उधळीत होते! त्याचं कवच-कुंडलहीन शरीर पाहणं नको म्हणून सूर्य मात्र पश्चिम क्षितिजावरून नित्यापेक्षा लवकर टळला होता! सगळीकडे संध्याछाया दाटत होती!

कवच-कुंडलं दान करून दादानं काय मिळवलं होतं? इंद्राचं, कोणत्याही एका महान योद्धयाला गतप्राण करू शकणारं अमोघ वैजयंती अस्त्र! आणि दिक्कोनात दुमदुमणारी, दिव्य दिगंत, कालजयी कीर्ती! अभंग, अतुल, अजोड दानवीर कर्ण अशी!!

■

# एक

“माझ्या सर्व आशा-आकांक्षावंर तू पाणी ओतलं आहेस! कशाला केलंस तू कवच-कुंडलांचं दान? त्या दानानं दानवीर म्हणून त्रैलोक्यात तुझी कीर्ती दुमदुमली असेलही; पण अंगराज, याच दानानं, वीर म्हणून मात्र समर्थांच्या राज्यातील दान आज तुझ्या उलटं पडलं आहे! कवच-कुंडलांशिवाय कर्ण म्हणजे फण्याशिवाय भुजंग! आयाळीशिवाय सिंह! शिखराशिवाय हिमालय! आता अर्जुनासमोर तू युद्धात कसा काय उभा राहणार?”

माझ्या कानांची तुटकी पाळी पाहून युवराज दुर्योधनाचं काळीज तीळ-तीळ तुटत होतं! माझ्यासमोर तो एकसारखा जखमी व्याघ्रासारखा फेऱ्या घेत होता.

“कवच-कुंडलांवरच माझ्या पराक्रम अवलंबून होता, असं तुला वाटतं की काय? युवराजा, कवच-कुंडलांशिवाय मी अर्जुनाचा अंत करीन!” मी त्याच्या सांत्वनासाठी काहीतरी बोलत होतो; पण माझ्या मनातही दूरवर कुठंतरी न्यूनतेची टिटवी कर्कशतच होती! सामर्थ्याशिवाय योद्धा म्हणजे सुळ्याशिवाय हत्ती! तीक्ष्ण नखाग्रांशिवाय सिंह! माझी कवच-कुंडलं म्हणजे माझं सामर्थ्य होतं. कीर्तीचा अवघड सोपान चढण्यासाठी मी ते कमी करून बसलो होतो.

“कवच-कुंडलांना जप!” म्हणणाऱ्या पितामहांना द्यायला मजजवळ उत्तर नव्हतं. तरीही कोणत्याही परिणामाच्या भयानं माझं मन थरकत नव्हतं! उलट माझ्या मनाला माझ्या कृत्याचा अभिमानच वाटत होता. तो शब्दांकित करून दुर्योधनाला समजावून सांगणं शक्य नव्हतं. भाषा कितीही समृद्ध असली तरी मनाचे सर्वच भाव व्यक्त करण्यासाठी ती पुरेशी पडतेच असं नाही. त्याच्या राजकारणी मनाला भावनेची तीव्रता समजणं कधीच शक्यच नव्हतं. तो अस्वस्थपणे फेऱ्या घेत होता.

“कर्ण, आहे! तुला सामर्थ्यशाली होण्याचा केवळ एकच मार्ग आता उरला आहे.” मध्येच थांबून जाड भुवया उंचावीत तो लगबगीनं म्हणाला.

“कोणता?” मी आश्चर्यानं विचारलं.

“ब्रह्मास्त्रप्राप्तीचा!”

“कुणाकडे आहे ते? सांग युवराजा, मी त्यासाठी आकाशपाताळ एक करीन.”

“कर्ण, हे ब्रह्मास्त्र तू आपणा सर्वांसाठी आता प्राप्त करून घ्यावं असं मला वाटतं! ते तुला मिळालं काय आणि मला मिळालं काय सारखंच आहे. माझ्या दृष्टीनं तूच असा एक धनुर्धर आहेस की, जो ब्रह्मास्त्रासाठी सर्वार्थानं योग्य आहेस. पांढरेशुभ्र बळकट सुळे केव्हाही बलाढ्य हत्तीलाच शोभून दिसतात.”

“माझ्याकडे ब्रह्मास्त्र नाही हे तुला एवढ्या प्रकर्षानं जाणवत असेल तर मग मी ते मिळवीनच. वाटेल ते करून मी ते हस्तगत करीन. तुझी त्याबाबत काय योजना आहे तेवढी सांग.”

“तुला त्यासाठी गुरू द्रोणांकडे जायला हवं! हस्तिनापुरात केवळ एकटे द्रोणच ब्रह्मास्त्रविद्या जाणतात. सर्वश्रेष्ठ ब्रह्मपुत्र भगवान परशुरामांनीच ते त्यांना दिलं

आहे, म्हणून तुला गुरू द्रोणांकडेच जायला पाहिजे!''

''युवराजा, काय बोलतोस तू हे! ज्यांनी लक्षावधी नगरजनांसमोर माझ्या मनावर अपमानाचे रसरशीत तप्त अंगार ठेवले त्यांच्याकडे मी लाचार होऊन जाऊ? ज्यांच्या अंतरात या कर्णाबद्दल शब्दाची मायासुद्धा राहिली नाही त्यांच्यापुढं नतमस्तक होऊन उभा राहू? इंद्राला याचक म्हणून द्वारी उभा करणारा मी, द्रोणांच्या द्वारी भिक्षुक म्हणून उभा राहू? काय बोलतोस तू हे!''

''होय कर्ण, जीवन हे कुंभकाराच्या चक्रासारखं आहे! काळ हा कुंभकाराचं रूप घेऊन हे चक्र पाहिजे तेवढ्या गतीनं फिरवीत असतो. तिथं कुणाच्याही इच्छेला कसलाच थारा नसतो आणि म्हणूनच काळाच्या त्या कुंभाराला हवे तसे घट तयार करता येतात. जीवनात असेही काही-काही क्षण असतात की, त्या क्षणी अपमान बाजूला ठेवून कर्तव्याची कास धरावीच लागते. तू जर आज या गोष्टीला नकार देशील तर – ''

''तर काय होईल?''

''या दुर्योधनाच्या जीवनातलाही तो एक पराजय ठरेल! मी शकुनीमामांना तुझ्याबद्दल वचन देऊन आलो आहे; तुला न विचारताच!''

''काय वचन दिलं आहेस त्यांना तू?''

''माझ्यासाठी कर्ण गुरू द्रोणांकडे जाऊन ब्रह्मास्त्र शिकेलच! तो नाही गेला तर – तर मी स्वत: जाईन! मात्र त्या वेळी कर्ण-दुर्योधन ही सांगड तुटलेली असेल!''

''युवराजा! हीच का परीक्षा केलीस तू माझी? तुझ्या प्रेमासाठी वेळ पडल्यास मी त्रैलोक्यालासुद्धा लाथ मारीन, पण त्या द्रोणांच्या दारात हात जोडून मी कसा उभा राहू? कर्ण एक वेळ मरण पत्करील; पण आपला स्वाभिमान, आपलं 'कर्णपण' तो कधीच मरू देणार नाही! कसल्या विचित्र अडचणीत गुरफुटून टाकलं आहेस तू मला? काय करू मी?''

''नाही! तुला इतक्या यातना होत असतील तर माझा तुला द्रोणांकडे जाण्यासाठी मुळीच आग्रह नाही. पण लक्षात असू द्या, 'अंगराज कर्ण,' दुर्योधन प्रेम करतो तसाच तो कठोर कटुताही जाणतो. यापुढं अंगराज कर्ण हे आर्यावर्तातील एक मान्यवर राजे म्हणूनच दुर्योधनापुढं येतील! मित्र म्हणून नव्हे! चलतो मी.''

''थांब युवराज, मी जायला तयार आहे! जे मी स्वत:साठी कालत्रयीही केलं नसतं ते केवळ तुझ्यासाठी मी करीन! मला नेहमीच उपेक्षेच्या खारट समुद्रात प्राण घुटमळेपर्यंत बुडविणाऱ्या द्रोणांच्या दारातही एक शिष्य म्हणून उभा राहीन! केवळ तुझ्यासाठी! तुझ्या-माझ्या मैत्रीसाठी! आजच राजज्योतिष्यांना बोलावून घे आणि जाण्यासाठी सुमुहूर्त शोधून काढ. ते ब्रह्मास्त्र आहे, मंगल घटिका पाहून गेलेलं बरं!''

''शाब्बास कर्ण!'' त्यानं माझा हात हातात घेऊन तो आनंदातिशयानं दाबला. त्याच्या त्या पकडीतून त्याची माझ्याबद्दलची भावना तीव्रतेनं प्रकट होत होती. त्याचे डोळे आनंदानं चमकत होते. माझ्याकडे तो भारावून एकटक पाहत होता. त्याच्या घाऱ्या डोळ्यांतून मी पूर्वी कधीही पाहिल्या नव्हत्या; अशा कृतज्ञ भावना प्रकट होत होत्या.

माझ्या मनाच्या गाभाऱ्यात आता केवळ 'ब्रह्मास्त्र! ब्रह्मास्त्र!' हेच शब्द फेर धरून उलट-सुलट नाचू लागले. ते अस्त्र भयंकर मानवसंहारक आहे, असं मी अश्वत्थाम्याकडून ऐकलं होतं. माझं मन उलट-सुलट विचारांच्या तडाख्यात सापडलं. हे ब्रह्मास्त्र कशासाठी निर्माण झालं असावं? ते नुसतंच मानवसंहारक नव्हतं, तर त्या

अस्त्रामुळे सगळ्याच दृश्य वस्तूंची अक्षरश: राख होणार होती! नि:शब्द वायूबरोबर केविलवाणी सळसळ करीत ती राख मानवांच्या मूर्खपणाची चर्चा करणार होती. विधात्याच्या या रमणीय जगाच्या निर्मितीला किती लक्षावधी वर्षं लागली असतील! पण या ब्रह्मास्त्रामुळे ते जग क्षणार्धात होत्याचं नव्हतं होणार होतं! समाधानानं जगता यावं, यासाठी निसर्गानं मानवाला इतर प्राण्यांहून श्रेष्ठ अशी बुद्धी दिली की – की स्वत:च्या विनाशासाठी तिचा भयानक उपयोग करण्यासाठी ती दिली? ब्रह्मास्त्र वापरणाऱ्या त्या अचाट मानवाला 'ते मी वापरलं!' यापेक्षा खरोखरच दुसरं कोणतं समाधान मिळणार होतं? 'असलं ब्रह्मास्त्र कुणी मिळवावं तरी काय?' असा प्रश्न मला विचारला गेला असता तर त्याला 'नाही!' असंच उत्तर मी दिलं असतं! कारण माझा मूळ स्वभावच शांतताप्रिय होता! आपण जगावं – मानानं जगावं आणि इतरांना सन्मानानं जगवावं हीच माझी खरी विचारसरणी! प्रसंगी वेळ पडल्यास मी स्वत:चं मरण स्वीकारलं असतं, पण केवळ स्वार्थासाठी जगायचंच म्हणून इतरांना पायदळी तुडविणं हे मला कधीच पटणारं नव्हतं! शांततापूर्ण सहअस्तित्व हा माझा मूळ स्वभाव होता! पण –

पण माझ्या इच्छेचा प्रश्न आता बाकी राहिलाच नव्हता! ते अस्त्र अर्जुनाकडे होतं! मला नेहमीच डिवचणाऱ्या प्रतिस्पर्ध्याकडं होतं! मी ते मिळवलं नसतं तर? माझ्या प्रतिस्पर्ध्याला कसा थोपविणार होतो मी? जीवनातल्या सर्वच गोष्टींचा निर्णय काही तत्त्वज्ञानाच्या निसटत्या भूमीवर उभं राहून नाही घेता येत! त्यासाठी काही-काही वेळा व्यवहाराच्या कठीण काळ्या पाषाणावर उभं राहावं लागतं! माझ्यासाठी आता केवळ एकच एक असा अटळ मार्ग उरला होता आणि तो म्हणजे ब्रह्मास्त्र प्राप्त करून घेणं! माझी इच्छा असो वा नसो – आजूबाजूच्या परिस्थितीनंच मला ते भाग पाडलं होतं! काळानंच मला तयार केलं होतं! काळ हा नेहमीच एखाद्या क्रूर व्याघ्रासारखा असतो. मानवजातीची अनेक रम्य-रम्य स्वप्नं तो नेहमीच सहजपणे आपल्या पाठीवर सावजासारखी टाकून सुसाट धावत असतो! काय निघणार आहे त्या ब्रह्मास्त्रातून? खरोखरच काय उपयोग आहे या विध्वंसक अस्त्रांचा? पण कोण उत्तर देणार याचं? सगळेच काळाचे दास! कुणाचं कल्याण साधलं जाणार या अस्त्रानं? जिथं सगळंच जळून खाक होणार तिथं कशाचं सुख? आणि शांतता तरी कशाची?

माझं मन अशा या प्रश्नांच्या सततच्या ससेमिऱ्यानं अगदी कातावून गेलं. दुर्योधनाला होकार देण्यात आपण काही चूक तर केली नाही ना? हजार वेळा हा प्रश्न मी स्वत:ला विचारला, पण एकदाही समाधानकारक उत्तर काही नाही मिळालं! मला अश्वत्थाम्याची अत्यंत आवश्यकता भासू लागली! त्याच्या तोंडातून अमृतात घोळलेले चार शब्द बाहेर पडलेले ऐकले की, एक अवर्णनीय आगळं असं समाधान मिळत असे. मनाच्या द्विधा अवस्थेत त्याचं सहजस्फूर्त तत्त्वज्ञान मला नेहमीच धीर देत आलं होतं. मनुष्य भावनांवर जगतो हे सत्य असेल, पण तो केवळ भावनांवरच जगत नाही. तत्त्वज्ञान हा त्याला प्रसंगी अटळ म्हणून स्वीकारावा लागणारा मार्ग आहे! मी ब्रह्मास्त्रप्राप्तीचा घेतलेला निर्णय हा तत्त्वज्ञानाचाच एक भाग नव्हता काय? व्यवहार की तत्त्वज्ञान? काही समजत नव्हतं! मी डोक्यावरचा राजमुकुट काढला. अंगावरची राजवस्त्रं उतरली. एक साधं वस्त्र नेसून, खांद्यावर उत्तरीय टाकून अश्वत्थाम्याकडे म्हणून युद्धशालेच्या मार्गानं पायीच निघालो. मी राजाच्या वेषात नव्हतो आणि रथही जोडायला सांगितला नव्हता, हे पाहून दासदासी माझ्याकडे आश्चर्यानं पाहत होते.

विचारांच्या तंद्रीतच चालत केव्हा युद्धशालेपाशी आलो तेच मला समजलं नाही. आतल्या आवारात तीन-चार पर्णकुटचा होत्या. त्यांत अश्वत्थामा, गुरू द्रोण आणि काही ऋषिकुमार राहत होते. तसा मी अधूनमधून अश्वत्थाम्याच्या पर्णकुटीत जात-येत असे, पण प्रसंगवशात! अशा वेळी तो नेहमीच हसतमुखानं माझं स्वागत करी. भुईचंपकाच्या फुलासारखा त्याचा स्वभाव चोहोबाजूंना आनंद निर्माण करणारा होता. गुरू द्रोण नेहमीच एकटे एका पर्णकुटीत राहत. त्यांची ती पर्णकुटी मध्यभागी होती. त्यांच्या शेजारची पर्णकुटी अश्वत्थाम्याची होती.

नेहमीप्रमाणं मी त्याच्या पर्णकुटीसमोर उभा राहिलो. तिथलं ते जिवंत दृश्य पाहून ब्रह्मास्त्राबद्दलचे माझे अनेक किचकट विचार वाऱ्यानं मेघ पांगावेत तसे कुठच्या कुठं दूर पांगले गेले.

समजायला कठीण अशा जीवन, मुक्ती, आत्मा, संयम अशा विषयांसंबंधी सदैव बोलणारा, मला नेहमीच आकाशासारखा विशाल वाटणारा अश्वत्थामा एखाद्या लहान मुलासारखा आठ दिवसांपूर्वी जन्मलेल्या एका गोंडस वासराबरोबर बोबडे बोल बोलत स्वत:ला विसरून गेला होता! त्या वासराची गोंडेदार शेपटी तो मधूनच आपल्या नितळ गालांवरून फिरवीत होता! मला पाहताच तो गंभीरपणे पणे त्या वासराला म्हणाला, “वृषभपुत्रा, आपल्याकडे कोण आलंय पाहिलंस काय? वचनपूर्तीसाठी देवराज इंद्राला कवच-कुंडलांचं दान देणारे, हे हस्तिनापुरातले सर्वश्रेष्ठ धनुर्धर आहेत! सूर्यदेवांचे लाडके शिष्य आहेत. दारी आलेल्या कुणाही अतिथीचं ते स्वागत करतात. तूही त्यांचं स्वागत कर. नुसतं कोरडं स्वागत करून भागणार नाही बाबा! तुझ्या वाटणीतलं अर्धं गरम-गरम दूध आज तुला त्यांना द्यावं लागणार! आहेस ना तयार?” त्यानं त्या वासराच्या कानाजवळ आपलं तोंड नेत त्याला विचारलं.

त्या वासरानंही आपले बोरासारखे टपोरे डोळे माझ्यावर रोखत क्षणभर कान टवकारले. शेपटीचा नाजूक गोंडा वर उचलून त्याला एक लाडिक झटका दिला आणि ते “हम्माऽऽ” म्हणून मोठ्यानं हंबरलं. अश्वत्थाम्याची भाषा त्याला जशी काय समजलीच होती! त्याला त्याचा होकार होता! अश्वत्थामा त्याच्या हंबरण्यानं अतिशय प्रसन्न झाला. त्यानं त्याच्या कपाळावरची नाजूक कोवळी लव एकदम आपल्या लांबसडक बोटांनी क्षणभर खाजविली. मी त्या दोघांकडे मुग्धपणे पाहत राहिलो! चैतन्याची विलोभनीय अशी दोन रूपंच वाटली मला ती! क्षणभर वाटलं मीही ऋषिकुमार झालो असतो तर माझं जीवन असंच झालं नसतं का? अश्वत्थाम्यासारखं!

त्याच्या पर्णकुटीत मृगाजिनावर बसून आम्ही अनेक विषयांवर गप्पा मारल्या. बोलताना मी सहज ब्रह्मास्त्राचा उल्लेख केला तेव्हा तो झटकन अतिशय गंभीर होत म्हणाला, “कर्ण, जीवन हे काही केवळ काळ्या-पांढऱ्या पट्टचांनी चितारलेलं वस्त्र नाही. त्यावर राकट रंगाच्या काही गर्द छटाही आहेत!” मला तो काय म्हणाला ते नीटसं कळलं नाही, पण मी माझी उत्सुकता वाढू दिली नाही. त्यानं दिलेलं दूध पिऊन त्याचा निरोप घेऊन पर्णकुटीबाहेर पडलो. बाहेर टिपूर स्वच्छ चांदणं पडलं होतं. राजवाडचाकडे जाता-जाता मला वाटलं – ‘जीवन हे केवळ काळ्या-पांढऱ्या रंगांच्या पट्टचांनी चितारलेलं वस्त्र नाही. केव्हा-केव्हा त्यावर राकट रंगाच्या गर्द छटा असतीलही, पण या वस्त्राची किनार मात्र निश्चितच रुपेरी-चंदेरी असली पाहिजे!’ कारण त्या नितळ, शीतल चांदण्यात सगळ्या चराचराला सुंदर चंदेरी झालर चढली होती! धरतीचं बालक

चांदण्याच्या सरोवरात मनसोक्त डुंबत होतं.

धीमी पावलं टाकत, चांदण्याचा मनसोक्त आनंद लुटत बऱ्याच कालानंतर राजवाडयाच्या महाद्वाराजवळ आलो, द्वारपालानं मला न ओळखताच हटकलं, “कोण ते?”

मान वर करून मी त्याच्याकडे पाहिलं. माझ्या कानांची छेदलेली पाळं हलली. ती पाहताच मात्र त्यानं मला पटकन ओळखलं. काय होतंय ते समजायच्या आतच त्यानं माझ्या पायांवर सरळ लोळणच घेतली! तो कळवळत म्हणाला, “अंगराज, क्षमा असावी. आपल्या आजच्या वेशामुळे मी आपणाला ओळखलंच नाही!”

काहीच न बोलता त्याच्या दंडाला धरून मी त्याला वर उठविलं. शेजारी पडलेला त्याचा भाला त्याच्या हातात पुन्हा दिला. त्याचा खांदा क्षणभर थोपटून मी महाद्वारातून आत पाऊल टाकलं. मला उगाच जाणवलं. ‘जीवन हे केवळ काळ्या-पांढऱ्या रंगांच्या पट्टयांनी रंगवलेलं वस्त्र नसतं, कधी-कधी त्यावर राकट रंगाच्या गर्द छटाही असतात, त्याला चंदेरी किनारही असते आणि अशा किनारीचा एखादा उसवलेला धागा उगाचच बाहेर लोंबत असतो! त्या वेडया द्वारपालासारखा!’

सकाळी मला शोणाकडून समजलं की, ब्रह्मास्त्रप्राप्तीसाठी गुरू द्रोणांच्याकडे जाण्याचा सुमुहूर्त राजज्योतिष्यांना विचारून युवराज दुर्योधनानं शोधून काढला होता. सुदैवानं तो आदित्यवारच होता. संध्याकाळच्या गोरज मुहूर्तावर मला त्यांच्याकडे जायचं होतं. आता कदाचित यापुढं गुरू द्रोणांसमवेत युद्धशालेतच मला राहावं लागणार होतं. माझ्या पश्चात अंगदेशाची सर्व राज्यव्यवस्था दुर्योधनानं पाहायचं ठरविलं होतं. आमची ही योजना मी, दुर्योधन आणि शोण यांशिवाय अन्य कुणालाच माहिती नव्हती.

**

# दोन

रविवारचा दिवस उजाडला. भल्या पहाटेपासून मी गंगेच्या पाण्यात उभा होतो. सकाळपासून दुपारपर्यंत माझं तोंड पूर्वेकडे होतं. दुपारनंतर मी ते पश्चिमेकडे वळविलं. दुपारनंतर सूर्यदेव खाली ढळू लागताच शांतपणे डोळे मिटून घेतले. मिटल्या डोळ्यांपुढं तेजस्वी किरणांचा अफाट समुद्र पसरला होता. सगळीकडे नुसता प्रकाशच प्रकाश होता. तेजस्वी आणि नि:शब्द नीरवता. या अफाट जगातील दोनच गोष्टी मला सत्य वाटत होत्या. एक अनंत काळ आपल्या दिव्य प्रकाशानं चराचर उजळणारे सूर्यदेव आणि त्यांच्या प्रकाशकिरणांनी जिचा अणुरेणू आजपर्यंत फुलला होता ती असंख्य स्वरूपात नटलेली पुरातन धरती! सूर्यदेव आणि धरती... धरती आणि सूर्यदेव! या दोहोत मी कोण होतो? दोहोंना सांधणारा एक प्रकाशकिरण, की धरतीवरचा केवळ एक मातीचा कण? विचारांची चक्रं फिरत होती. जीवनाची निर्मिती कशासाठी आहे ते शोधीत होती!

डोळ्यांपुढचा तो तेजस्वी प्रकाश धूसर होतो आहे असं वाटताच मी डोळे उघडले. पश्चिम क्षितिजावर डोंगरकडांच्या पलीकडे परशूच्या आकाराची एक कोर आकाशात उभी होती. काठावरच्या ओलसर वाळूत माझी वाट पाहत दुर्योधन उभा होता. तो केव्हा आला होता आणि किती वेळ उभा होता कोण जाणे! त्याच्या हातांत फळांनी भरलेलं एक तबक होतं. त्यात दुधाची एक उंच गळ्याची चरवी होती. त्याला पाहताच माझं मन मित्रप्रेमानं भरून आलं. माझ्यासाठी हातांत फळाचं तबक घेऊन उभा राहणारा तो हस्तिनापूरचा राजपुत्र आहे हे कुणालातरी कधी खरं वाटलं असतं काय? किती सावध आणि तत्पर होता तो! आमचा दोघांचा हा ब्रह्मास्त्रप्राप्तीचा प्रयत्न इतर कुणालाही कळू नये, यासाठी त्यानं फळांचं तबक घेण्यासाठीसुद्धा एखादा दास बरोबर आणला नव्हता! त्याच्या त्या निर्भेळ प्रेमाला साक्षीदार कोण होतं? नुसती गंगाच!

पाण्याबाहेर आलो. काठावर ठेवलेलं कोरडं वस्त्र वाऱ्यानं उडून दूर गेलं होतं! जवळ जाताच दुर्योधन माझ्या हातांत तबक देत म्हणाला, ‘‘कर्ण, अगोदर फलाहार करून दूध घे, सकाळपासून तू काहीच खाल्लेलं नाहीस!’’

मी त्याच्या हातांतून तबक घेतलं. एक मित्र म्हणून तो मला वटवृक्षासारखाच विशाल वाटला. एक कुरुश्रेष्ठ वीर एका य:कश्चित सूतपुत्रासाठी हाती फळांचं तबक घेऊन घटकान्‌घटका गंगेच्या निर्जन तटावर तिष्ठत उभा राहिला होता! दुर्योधनाला वाईट म्हणणारे लोक शतमूर्ख आहेत! खऱ्या अर्थानं तो वीर आहे अन् मित्र तर आहेच आहे. थोडी फळं खाऊन दूध घेतलं. तेवढ्यात माझं दूरवर गेलेलं वस्त्र दुर्योधनानं आणलं! मला झटकन शोणाची आठवण झाली.

अंगावरचं ओलं वस्त्र बदललं. दुर्योधनानं आपल्या खांद्यावरचं उत्तरीय माझ्या खांद्यावर टाकलं, मी न राहवून त्याला म्हणालो, ‘‘युवराजा, तू आता परत जा. मी ब्रह्मास्त्र मिळवीनच. विश्वास ठेव, हा कर्णाचा शब्द आहे.’’

त्यानं एकदा माझ्याकडे पाहिलं. त्याच्या दाट भुवया क्षणकाल तिथल्या तिथंच

स्फुरल्या. मावळत्या सूर्यदेवांचा एक चुकार किरण त्याच्या मुखावर पडला होता. त्यात त्याची रक्तवर्णी मुद्रा एका वेगळ्याच आनंदानं उजळली होती. त्यानं आपल्या भरगच्च तळहातांनी माझे खांदे घट्ट पकडले. क्षणभर ते गदागदा हलवून काही एक न बोलताच तो परतला, पण त्याचे पाणीदार डोळे स्पष्टपणे मला सांगत होते. 'जा, माझ्या शुभकामना तुझ्याबरोबर आहेत.' तो फिरला आणि राजवाड्याच्या दिशेनं चालू लागला. खालच्या वाळूत भक्कम पाय रोवीत. धीरगंभीरपणे! वाळू दूरवर चरचर वाजत गेली.

राजवाड्याच्या मार्गानं त्याची उंच धिप्पाड आकृती पश्चिमेकडे हळूहळू लहान-लहान होत गेली. भक्कम पायांची एक स्पष्ट चाकोरी दूरवर खालच्या ओलसर वाळूत उमटत गेली. मी स्वत:शीच पुटपुटलो, "दुर्योधना, कर्ण ज्या दिशेनं चालतो ती आपलीच करून टाकतो! निर्धास्त अस!" गुरू द्रोणांच्या पर्णकुटीच्या दिशेनं मी पाऊल उचललं. मन शांत आणि खंबीर होतं. आकाशातून कारंडव पक्षयांची चुकार-मुकार जोडगोळी कलकलत काठावरच्या बच्च्यावरच्या घरट्याकडे परतत होती. सगळीकडे संध्याछाया पसरली होती. मी युद्धशालेच्या दिशेनं द्रोणांच्या पर्णकुटीकडे जात होतो. तो मार्ग अनेक नागमोडी वळणांनी युक्त होता. जीवन ही अशीच वळणांची पायवाट आहे असंच मला वाटलं! माझ्या जीवनातील आजचं हे वळण सर्वांत महत्त्वाचं होतं. दुर्योधनासाठी मी शिष्य म्हणून द्रोणाचार्यांच्या दारात उभा राहणार होतो! खरोखरच जीवनाच्या वाटचालीत कुठल्या वळणावर कुणाची कशी गाठ पडेल काहीच सांगता येत नाही! आणि या भेटीगाठींतून काय- काय निघेल हे तर कधीच सांगता येत नाही! चार दिवसांपूर्वी, इंद्राची गाठ पडेल आणि तो कवच-कुंडलांचंच दान मागेल, याची तरी कल्पना कोणी कधी केली होती? पण तेही घडलं होतं. त्या घटनेमुळेच आज मला गुरू द्रोणांच्या दारात उभं राहावं लागत होतं!

विचारांच्या तंद्रीतच गुरू द्रोणांच्या पर्णकुटीसमोर आलो! संध्याकाळची नीरव अन् नि:शब्द शांतता सगळीकडे पसरली होती. युद्धशालेभोवतीच्या दगडी तटाच्या फटीत कुठंतरी रातकिडे लयीत किरकिरत होते. काही चुकार पक्षी अजूनही घरट्याकडं परतत होते. पर्णकुटीत शांतता होती. एका कोपऱ्यात अग्निकुंड होतं. त्यातून उडणाऱ्या तप्त ठिणग्या पर्णकुटीच्या विरल कुडामुळे बाहेरून स्पष्ट दिसत होत्या. थोडा वेळ बाहेरच उभा राहिलो. मला तो आखाड्याचा दिवस स्पष्ट आठवला! तो जीवघेणा अधिक्षेप अजूनही माझ्या मनाच्या कुंडात कुठंतरी तसाच पडून होता! तो आता क्षणाक्षणाला उफाळून वर येऊ लागला. माणूस एकवेळ सौख्याचे आणि आनंदाचे क्षण विसरू शकतो, पण दु:खाचे आणि विशेषत: अपमानाचे क्षण तर त्याला प्रयत्न करूनही कधीच विसरता येत नाहीत. अपमानित मन म्हणजे अखंड तडफड! ज्या गुरू द्रोणांनी एकदा कळत नकळत का होईना; पण मला सहस्त्रावधी नगरजनांसमोर अक्षरश: लाथाडलं होतं, त्यांच्याकडं परत लाचार होऊन जायचं काय? स्वभिमानाला बळी देऊन खोटं-खोटं हसायचं काय? छे, जीवन हे एक लहरी बालकच; नाहीतर दुसरं काय? बालक हातातील खेळणं हवं तसं गरगर फिरवतं. जेव्हा लहर लागेल तेव्हा फेकून देतं! जीवनही माणसाला तसंच हवं तसं गोल गरगर फिरवतं! हवं तिथं फेकून देतं! ज्याच्या हाती स्वत:च्या जीवनाची संपूर्ण स्वाधीनता आहे असा एक तरी मनुष्य या जगात असेल काय? शक्यच नाही! माणूस जगात पराधीन आहे. तो नक्की कुणाच्या अधीन आहे, हे सांगता येणार नाही; पण तो कुणाच्या ना कुणाच्यातरी अधीन आहे नक्की. माणसांची ही बाहुली

कोण फिरवितो कोण जाणे! आणि ही अखंड नि अविरत धडपड कशासाठी चालली आहे तेही काही सांगता येत नाही. ती केवळ जगण्यासाठी चालली आहे काय? असेलही! पण माणसाला जगण्याची तरी इतकी तीव्र ओढ का? मी गुरू द्रोणांच्या दारात उभा होतो तो या ओढीपोटीच काय? छे! मी स्वत:साठी आलो नव्हतो! मला माझ्या परमप्रिय मित्राचे मनोरथ पूर्ण करायचे होते! स्वत:साठी मी मुळीच आलो नव्हतो. कधी आलोही नसतो. स्वत:साठी जगतो तो माणूस कसला? दुसऱ्याच्या सुखासाठी मला माझा स्वाभिमान आज खंबीर मनानं होमायचा होता. अपमान हा कधी-कधी बाजूला सारावा लागतो. तो संपूर्णपणं बाजूला सारणं शक्य नसेल, तर काही काळ तो मुकाट गिळावा लागतो!

निर्धार करून पर्णकुटीचं बंद कवाड डाव्या हातानं आत लोटून मी पर्णकुटीत पाऊल टाकलं! या पर्णकुटीत येण्याचा माझ्या आयुष्यातला हा पहिलाच प्रसंग होता.

गुरू द्रोण एका व्याघ्रचर्मावर डोळे मिटून पद्मासन घालून शांत बसले होते. माझ्या पावलांचा आणि कवाडाचा आवाज ऐकून त्यांनी हळुवारपणे डोळे उघडले. मी झटकन पुढं होऊन त्यांना वंदन केलं. कसेही असले तरी ते माझे आता गुरू होणार होते.

"कोण ते?" पर्णकुटीतल्या मातीच्या पणतीतील अंधूक प्रकाशात माझी मुद्रा नीट न दिसल्यामुळे त्यांनी मान उंचावून विचारलं.

"मी कर्ण आहे!" मी मान नमवून उत्तर दिलं. माझे हात जोडलेलेच होते. अंतर्यामी असंख्य यातना होत्या. परिस्थितीनं घेरलेल्या – जीवनानं समोर ठेवलेल्या लाचारीच्या!

"कर्ण! अशा अवेळी?"

"मला ब्रह्मास्त्रविद्या शिकायची अतीव इच्छा आहे. आपल्या चरणांजवळ राहून ती मी शिकावी म्हणतो."

"ब्रह्मास्त्रविद्या? ती विद्या केवळ क्षत्रियांसाठी आहे, हे तुला माहीत नाही काय?" त्यांच्या समोरच्या यज्ञकुंडातील ठिणग्या तडतडल्या!

"मीसुद्धा आता क्षत्रियच आहे. मी अंगदेशाचा अभिषिक्त राजा आहे. दिग्विजयी वीर आहे! माझ्या कवच-कुंडलांचं दान मी प्रत्यक्ष देवराज इंद्राला केलं आहे गुरुदेव!"

"तू क्षत्रिय नाहीस! अंगदेशाचा राजा झालास म्हणून स्वत:ला क्षत्रिय समजतोस की काय? व्याघ्राचं कातडं पांघरल्यानं गर्दभाला कुणी व्याघ्र म्हणत नाही!"

"सगळे नगरजन मला 'क्षत्रिय' म्हणूनच आता मानतात. 'दिग्विजयी' म्हणून नमतात. 'दानवीर' म्हणून आदर करतात!"

"ते तुला मुळीच मानत नाहीत! दुर्योधनाच्या राजदंडाला मानतात ते! तू दुर्योधनाच्या दृष्टीनं क्षत्रिय असशील; पण जगाच्या दृष्टीनं तू एक सूतपुत्र आहेस! हीन आहेस! क्षुद्र आहेस! गावच्या चौकात राहून ओरडणाऱ्या सारमेयानं वनराजाचा आव कधीच आणू नये! जा."

त्यांचा एक-एक शब्द शूलाग्रासारखा माझ्या अंत:करणात घुसत होता. काटेफडच्यानं झोडपल्यासारखं माझं मन आक्रंदत होतं. कोण सिंह आणि कोण सारमेय? त्याची कसोटी काय? केवळ कुल! कुलाच्या श्रेष्ठतेचा तोच तो पुरातन कळकट ध्वज आजही हाती नाचवीत हे लोक कुणाकुणाला पायदळी तुडविणार आहेत? माझी नसन्नस

सरसर तापू लागली. तरीही संयमानं स्वत:ला सावरीत मी म्हणालो, ''मी सूतपुत्र आहे हा काय माझा दोष आहे? कुठल्या कुलात जन्माला यावं हे काय मानवाच्या हातात आहे? मी एक शिष्य म्हणून आपल्या चरणांपाशी सदैव राहीन. ब्रह्मास्त्रासाठी आपण सांगाल ते महान दिव्य करीन. शिष्य म्हणून आपली सेवा करीन!''

''तू सूतपुत्र आहेस. तुझ्या हाती ब्रह्मास्त्र म्हणजे वानराच्या हाती वडवाग्री!'' त्यांनी पुन्हा डोळे मिटून घेतले.

त्यांच्या त्या अहंतेने भरलेल्या क्रूर शब्दाघातांनी माझ्या ध्येयवादी मनाच्या शतश: चिंधडया झाल्या. कुणीतरी खड्गाच्या एकाच फटक्यात माझं मस्तक धडावेगळं केलं असतं; तरीही मला एवढं दु:ख झालं नसतं. इतक्या असह्य यातना झाल्या नसत्या. सहनशीलता हा सद्गुण असेलही, पण लाचार स्तब्धता हा दुर्गुणच नाही काय? माझ्या तप्त मस्तकावरची धमनी थडथड उडू लागली. डोळ्यांत यज्ञकुंड पेटल्यासारखं वाटू लागलं. सर्व शक्ती एकवटून मी कसातरीच ओरडलो, ''गुरू द्रोण, कुणाला बोलता तुम्ही? मी सूतपुत्र आहे हेच तुम्हाला पुन:पुन्हा ओरडून सांगायचं आहे काय? तर मग मीच आजपासून कंठरवानं गर्जुन जगाला सांगेन की, 'मी सूतपुत्र आहे! मी सूतपुत्र आहे!!' जन्माला येणं हे दैवाच्या हाती आहे, पण पुरुषार्थ माझ्या दंडात आहे, दंडात! मला तुमच्या ब्रह्मास्त्राची मुळीच आवश्यकता नाही आणि भासलीच तर मी ते एक सूतपुत्र म्हणूनच मिळवीन! स्वतंत्रपणे! तुमच्याशिवाय!''

पर्णकुटीचं कवाड लाथेनं ढकलून मी तिडिकेनं बाहेर पडलो. अश्वत्थामा कुटीबाहेर येऊन केव्हातरी उभा राहिला होता. आमचं हृदयभेदक संभाषण त्याच्या कानांवर गेलं असावं. तो आपले दोन्ही हात विस्तारून मला आडवा झाला. मी त्याचे हात झिडकारून दिले. आता – आता कुणाचंही तत्त्वज्ञान ऐकायचं नव्हतं मला!

''कर्ण, थांब! कर्ण, थांब!'' म्हणून तो आर्त स्वरात ओरडत होता. त्याचे शब्द नुसते माझ्या कानांत घुसत होते. त्यांचा अर्थबोध मला काहीच होत नव्हता. अपमान! अपमान! अपमान! मन आक्रोशत होतं. माझं जीवन म्हणजे केवळ अपमानच आहे की काय? कर्ण, 'सूतपुत्र, सूतपुत्र' म्हणून तुझा घोर अधिक्षेप करून जग तुला कोंडून ठार मारणार की काय? जगाकडून 'सूतपुत्र, सूतपुत्र' म्हणवून घेण्यासाठीच का तुझा जन्म आहे? छे, मी सूतपुत्र आहे तर मग मला हे शब्द काळजात बाण घुसल्यासारखे का खुपतात? मी एकदा अपमान सहन केला त्याचा जगानं अर्थ तरी काय लावला आहे? मला केव्हाही डिवचता येईल, केव्हाही मला काय वाटेल ते बोलता येईल, असंच जगाला वाटतं की काय? कर्णाबद्दलच्या जगाच्या आज कल्पना तरी काय आहेत? तो हीन आहे, क्षुद्र आहे, त्याला स्वाभिमान असा नाहीच. स्वत:चं असं स्थान नाही, असंच सर्वांना वाटतं की काय? माझ्या मस्तकात प्रश्नांचे असंख्य रथ हवे तसे दौडू लागले. अंगातलं रक्त सरसरून तापलं होतं. काळजात बाण लागलेल्या काळविटासारखा मी सुन्न मनानं राजवाड्याकडे झपाझप चाललो होतो.

सगळीकडे अंधकार होता! जीवनावरचा विश्वास उडविणारा अंधकार! प्रकाशाचे असंख्य किरण पचवून उरणारा काळाकुट्ट अंधकार! आपल्या हाती काळाच्या काळ्या सुया घेऊन काळ्या वस्त्रांची, काळ्या धाग्यांनी अखंड काळीकुट्ट निर्मिती करणारा काळाकुट्ट अंधकार! माझ्या उरात अपमान होता, सभोवती काळाकुट्ट अंधकार होता. अंधकार आणि अपमान! अपमान आणि अंधकार! माझा जीव प्रत्येक क्षणक्षणाला

गुदमरू लागला! सभोवती रात्रीच्या अंधाररूपी सम्राटाचे हस्तक होऊन रात्रकिडे बेंबीच्या देठापासून ओरडत होते. ते काळे ओंगळ प्राणी! क्षुद्र किडे! तेसुद्धा आज मला 'सूतपुत्र! सूतपुत्र!' म्हणून डिवचत होते.

आज जगच उलटं झालं होतं की काय? प्रत्येकानं कर्णाला शक्य असेल तेवढं डिवचायचाच विडा उचलला होता की काय? अपमानाचा खरा कळस केव्हा होतो? तो पहिल्या प्रथमच सहन केला जातो तेव्हाच! ज्यानं कोणत्याही कारणासाठी एकदा अपमान सहन केला, त्यानं आपल्या व्यक्तिमत्त्वाच्या जिवंत मरणाच्या सरणाचा पायाच घातला! भविष्यात त्यानं कितीही पराक्रमाचे पर्वत उभे करावेत, जगाच्या दृष्टीनं त्याची किंमत शून्य! जग त्याच्याकडे अवमानित, क्षुद्र, टाकाऊ म्हणूनच पाहत असतं. छे! कुठं जावं? काय करावं? ही हृदय जाळणारी व्यथा सांगावी तरी कुणाला? अपमान! अपमान! पदोपदी अपमान! मी हा सहन कसा करू शकलो? खरोखरच मी जिवंत आहे की प्रेतवत झालो आहे?

शब्दांचे आणि विचारांचे घणाघात चोहोबाजूंनी माझ्या मेंदूवर आदळत होते. अंतरात्मा व्याकूळला होता. मस्तक सुन्न झालं होतं. काहीच सुचत नव्हतं. समोरचं काही दिसत नव्हतं. मागं वळून पाहवत नव्हतं! अंगावरची वस्त्रं पेटलेला माणूस भांबावलेल्या अवस्थेत नाकासमोर कसातरीच धावत सुटतो, तसाच मी नाकासमोर झपाझप चालत होतो. माझं मन पेटलं होतं. माझं कुल मला असाहाय्य करीत होतं. मी सूतपुत्र आहे! कशाला झालो मी सूतपुत्र? त्यापेक्षा, त्यापेक्षा जन्मलो नसतो तर काय बिघडलं असतं? अरे, हे काय जीवन आहे जे घेऊन येतं घोर कलंक? हा जीवनेतिहास शून्य नसता का राहिला जर विधीने टाकले नसते अंक! कशाला मी सूताच्या घरात जन्माला आलो?

बरं, आलो तो आलो – मला घोडा आणि प्रतोद यांचं आकर्षण वाटण्याऐवजी या शस्त्रास्त्रांचं का वाटावं? मी अंगराज तरी कशाला झालो! या हस्तिनापुरात आलो तरी कशाला? अरे, हे काय वीरांचं नगर आहे? हे काय न्यायान्यायाची चाड असलेलं नगर आहे? गुरू द्रोणासारख्या वृद्ध खोंडाकडून मनाच्या कसल्या मोठेपणाची अपेक्षा आता करायची? काळाच्या विशाल पुरुषाचे असंख्य फटके खाऊन-खाऊन शुष्क झालेली यांची वृद्ध मनं जगाला आता काय ज्ञान देणार? माझ्या पेटलेल्या मनातून भडक विचारांच्या ज्वाळा कशातरीच बाहेर पडत होत्या. पायांखालचे खडे फोडीत मी राजवाड्याकडे चाललो होतो. मी दिग्विजयी नव्हतो, एक सर्वमान्य योद्धाही नव्हतो. होतो एक सूतपुत्र! क्षुद्र सूतपुत्र! रथावरची धूळ आणि सूतपुत्र सारखेच!

जीवनाला श्रीफळाची गोंडस उपमा देणारा अश्वत्थामा आता मला महामूर्ख वाटू लागला! जीवन श्रीफळासारखं कधीतरी असेल काय? ते मी नेहमी म्हणत आलो त्याप्रमाणं समरांगणही नाही! कारण समरांगणात झालं तरी केवळ सामर्थ्याला किंमत असते. वेड्या अश्वत्थाम्या, ते तू म्हणतोस तसं दवबिंदूसारखं तर नाहीच नाही! जीवन म्हणजे केवळ एक वणवा आहे! कुणीतरी पेटवलेला! कसातरी पेटणारा! कुणालातरी जाळून काढणारा! आणि केव्हातरी असाच आपोआप विझणारा!! मला तो वणवा आज होरपळून काढतो आहे! कवच-कुंडलं हरवलेल्या माझ्या या विशाल देहाची मूठभर राख होणार! नाही, ते शक्य नाही! मी दग्ध होणार नाही! नष्ट होणार नाही! मी ब्रह्मास्त्र मिळवीनच मिळवीन!

चवताळलेल्या साळुंक्यांनी नागसर्पांचा करावा तसे सुसाट विचार माझा पाठपुरावा करीत होते. त्या अवस्थेतच मी राजवाड्याच्या महाद्वारात आलो. दुर्योधन अजूनही माझी वाट पाहत महाद्वारात उभा होता. त्याला पाहताच माझं मन सुन्न झालं. कोणतं उत्तर मी त्याला देणार होतो? त्यानं मला थांबवून उत्कंठेनं विचारलंच, ''कर्ण, काय झालं? इतक्या लवकर का परतलास?''

''युवराजा, आर्यस्त्री आपलं वैधव्य आपल्याच तोंडानं सांगत नसते. सैनिकयोद्धे आपला अपमान आपल्याच तोंडानं सांगत नसतात. जाऊ दे मला.'' मी त्याचाही हात झिडकारला! मला आज कुणाविषयीच काहीही वाटत नव्हतं! पाण्याच्या गरगर फिरणाऱ्या भोवऱ्यात सापडलेल्या वाळक्या तृणपात्यासारखं मन एकाच विचाराभोवती सारखं फिरत होतं. सूतपुत्र! अपमान! सामर्थ्याची परीक्षा, ब्रह्मास्त्र!

''अपमान? कर्ण, तुझ्यासारख्या बलदंड आणि दिग्विजयी वीराचा अपमान कुणी आणि का केला?'' माझे दंड घट्ट पकडून ते गदागदा हलवीत, भुवयांची कमान ताणत त्यानं विचारलं.

''तुम्हा कौरवांच्या वंदनीय गुरुदेवांनी! द्रोणांनी! का केला, कसा केला, मला काही-काही विचारू नकोस. जगातल्या कटू सत्यांनी माझा जीव आता गुदमरला आहे. या वेळी तू मला असाच एकटा सोड.'' त्याच्या हातांची पकड मी बोटांनी सोडविली.

''तुझ्या यातना मला कळतात, पण त्यासाठी तुला उद्विग्न होऊन नाही चालणार. ज्या ब्रह्मास्त्रासाठी द्रोणांनी तुझा अपमान केला ते त्यांच्या नाकावर टिच्चून तुला मिळवावंच लागेल. कर्णाचं 'कर्णपण' केवळ त्यातच आहे हे लक्षात ठेव.'' माझा हात हातात घेऊन तो म्हणाला.

''ते मी मिळवीनच. त्याच्यासाठी साक्षात भगवान परशुरामांच्याकडे मी महेंद्रपर्वतावरही जाईन!''

''मला त्याचा विश्वास आहे.''

''भगवान परशुरामांचा निवास सध्या महेंद्रावर आहे. उद्याच मी महेंद्रावर जाईन. आता मात्र एक पळभरही मला इथं थांबवू नकोस. माझ्या मन:क्षोभाचं मला वर्णनही करता येत नाही. सोड मला.'' मी माझा हात सोडवून घेतला आणि राजवाड्याच्या पायदंड्या झपाझप चढू लागलो. चढताना खांद्यावरचं उत्तरीय घरंगळून खाली पायदंड्यांवर पडलं. पण मला ते उचलून घ्यावं असंही वाटलं नाही! पायांचे तळवे तापले होते. त्यांना पायदंड्यांचा थंडगार स्पर्श जाणवत होता. तप्त तळपाय त्या गुळगुळीत दगडांच्या थंड-थंड स्पर्शानं क्षणकाळ तरी निवत होते, पण माझं पेटलेलं मन? छे, पेटलेलं कसलं? भडकलेलं! ते कशानं शांत होणार होतं? कोण त्याचं सांत्वन करणार होतं?

मी कक्षात आलो. दार लावून घेतलं. मला पूर्ण एकान्त हवा होता. तोच एकटा आता मला शांत करणार होता. पण खरोखरच का त्यानं तरी मनाला शांतता मिळणार होती? अवमानित मनाचं स्वास्थ्य एकान्तात पारच उद्ध्वस्त होऊन जातं. अस्वस्थ मनाच्या नगाऱ्यावर तडतडणाऱ्या भरकटलेल्या विचारांच्या टिपऱ्या क्षणाक्षणाला मला अशांत करू लागल्या. विचाराच्या अखंड मंथनातून केवळ एकच एक निर्णय पक्का होत होता, दृढ होत होता. ब्रह्मास्त्र! महेंद्रपर्वत! भगवान परशुराम! ब्रह्मास्त्र मिळविलेला समर्थ कर्ण! शक्तिशाली कर्ण! सूतपुत्रच, पण सामर्थ्यशाली सूतपुत्र कर्ण!

परशुरामांचा शिष्य कर्ण!

**

# तीन

दुसऱ्या दिवशीच कुणाचीही भेट न घेता शोणाला सांगून वायुजितावरून हस्तिनापुरातून निघताना माझ्या मनात केवळ परशुरामांविषयीच विचार घोटाळत होते. कसे असतील ते? अनेकांच्या तोंडून ऐकलेला त्यांचा वृत्तान्त जीव थरकविणारा होता. क्षत्रियद्वेष्टे, शीघ्रकोपी आणि लहरी असंच सर्वांनी त्यांचं वर्णन केलं होतं. श्रीकृष्णानं मामाचा वध केला होता तो अन्यायी होता म्हणून! पण परशुरामांनी प्रत्यक्ष आपल्या मातेचा – रेणुकेचा वध केला होता! पित्याची आज्ञा म्हणून! ते पितामहांचे तर धनुर्वेदाचे गुरू होते! आणि एकवीस वेळा, कार्तवीर्यांच्या शंभर पुत्रांचा नाश करण्यासाठी त्यांनी हैहेय राजांना सरळ धूळ चारली होती! शेवटी- शेवटी एवढा पराक्रम करून धारण केलेलं राज्य आपले गुरू कश्यपऋषी यांच्या चरणांवर दुंदुभीच्या टिपरीसारखं फेकून ते महेंद्रपर्वतावर आश्रम स्थापून स्थिरावले होते! अशा, ऐकतानाच भयावह वाटणाऱ्या, महापुरुषाकडे मी चाललो होतो. मन त्यांची काल्पनिक मूर्ती रेखाटत होतं, पण ती काही नीटशी जमत नव्हती! घोडा महेंद्राकडे धावत होता.

जाताना लागणारे मार्ग दिग्विजयात पायांखालून गेलेच होते म्हणून कुठलाही सांगाती न घेता मी एकटाच निघालो होतो. मार्गात पांचाल, काशी, पूर्व दशार्ण अशी राज्यं लागणार होती. कुठल्याही देशाच्या राजनगरात थांबण्याची आता इच्छा नव्हती! कुठल्याही मंदिरात उतरायचं, विश्राम घ्यायचा आणि वाटचाल करीत शक्य तितक्या लवकर प्रथम महेंद्रपर्वत गाठायचा असं मी ठरविलं! महेंद्रपर्वत कलिंग राज्यात असल्यामुळे मला अधिक पेच पडला होता! राजा भानुमंतासह सर्व नगरजन मला तिथं पूर्ण ओळखू शकले असते! म्हणूनच संध्याकाळच्या धूसर समयी मी त्यांच्या राज्यात प्रवेश करणार होतो. एखादा विश्वासू नगरजन बघून वायुजिताला त्याच्या स्वाधीन केल्याशिवाय महेंद्र चढता येणं मला शक्य नव्हतं!

प्रवासाच्या अशा योजना आखीतच मी पांचालांच्या राज्यात आलो. कांपिल्य-नगरातील सुदामनची गंगेकाठची समाधी मला मोहवू लागली, पण जर कुणीही मला तिथं पाहिलं असतं तर, पांचालराज द्रुपदाला वार्ता देऊन माझा पुढचा प्रवास थांबविला असता! त्यांचं स्वागत आणि आदरातिथ्य स्वीकारण्याइतकाही आता मला अवसर नव्हता! मन महेंद्रपर्वताच्या दर्शनासाठी नुसतं आसुसलं होतं! ब्रह्मास्त्रासाठी तळमळत होतं, म्हणूनच कुणालाही चाहूल न देता मी पांचालदेश सोडणार होतो. तरीही काही चिकित्सक पांचाल संशयी दृष्टीनं माझ्याकडे टवकारून पाहत होते. कानांची छेदलेली पाळी पाहून नकारदर्शक मान डोलवून जात होते! अंगावरची राजवस्त्रं इतरांचं लक्ष वेधून घेणार म्हणून ती एका संन्याशाला देऊन मी त्याची वस्त्रं मागितली! आपली भगवी वस्त्रं माझ्या हाती देताना तो म्हणाला, "या वस्त्रातही कुठंतरी माझी आसक्ती अडकून राहिलेली आहे की काय याची परीक्षा घेण्यासाठीच परमेश्वरानं तुला माझ्याजवळ धाडलं आहे! घे, ही वस्त्रं घे आणि तुझी ती मौल्यवान राजवस्त्रं गंगेला अर्पण कर! जा!" त्यानं भिक्षेच्या झोळीचं वस्त्र लज्जारक्षणासाठी कटीभोवती गुंडाळून

माझ्या हाती आपली भगवी छाटी दिली! ती अंगावर धारण करताना माझं मन त्याच्या उदात्त विचारांनी दबून गेलं. त्याचा आदर राखण्यासाठी म्हणून कांपिल्यनगर सोडताना मी माझी राजवस्त्रं गंगेला खरंच अर्पण केली! आता मनात कसलीही खळबळ नव्हती! कसलाही उद्रेक नव्हता. अंगावर भगवी वस्त्रं होती! वर निळं आकाश होतं! समोर महेंद्राचा मार्ग होता!

कांपिल्यनगर सोडून काशीराज्याकडे चालू लागलो. आता मी दिग्विजयी सेनापती नव्हतो. माझ्या मागून लक्ष-लक्ष योद्धे नव्हते! हत्ती-घोड्यांची चीत्कारणारी, खिंकाळणारी पथकं नव्हती! इतकंच काय; पण भारभूत झालेली कवच-कुंडलंही आता माझ्या देहावर नव्हती! होय – मी दानवीरही नव्हतो! होतं भगवं वस्त्र! शांत मन! माथ्यावरचं निळं आकाश!

काशीराज्याच्या सीमेतील प्रयाग आलं! हे वृषालीचं नगर होतं! पण मी नगरात जाणार नव्हतो. वायुजिताला पाणी पाजण्यासाठी म्हणून गंगा, यमुना आणि शरयू यांच्या त्रिवेणीसंगमावर त्याला आणलं! परतताना नेमका त्याच ठिकाणी वायुजित थांबला जिथं वृषालीची पहिली भेट झाली होती! तिथं वृषाली नव्हती, शोण नव्हता, फुटलेला घडा नव्हता! माझ्या मनातही तिला प्रथम पाहताना निर्माण झालेली ती अबोध भावनेची अद्भुत खळबळ नव्हती! सगळं कसं शांत होतं. नाही म्हणायला एकच विचार प्रकर्षानं मनात डोकावून गेला! वृषालीच्या त्या फुटक्या घड्याचा तो तुकडा माझ्याजवळ असता, तर मी तो जिथून उचलला त्याच जागी त्रिवेणी संगमाला प्रणाम करून, हळुवार हातानं पुन्हा तसाच ठेवून टाकला असता!

स्मृतीची सर्व कवाडं बंद करण्याचा मी यत्न करीत होतो, पण ते जमत नव्हतं. त्यांच्याशी झुंजत-झुंजत काशीराज्य सोडलं.

पूर्व दशार्ण देश मागं टाकताच महानदीपलीकडील पूर्व सागराच्या सान्निध्यात बसलेला कलिंगदेश आला. सुप्रियेचा देश म्हणून एरवी त्याची ओढ वाटायला हवी होती; पण ती वाटत नव्हती. सर्व नगरी बाजूला टाकून जवळच्या मार्गानं एका दिवशी सूर्यास्ताच्या प्रशान्त समयी महेंद्राच्या पायथ्याशी आलो. त्याच्या निळ्या शिखरांच्या दर्शनानं मन पुलकित झालं. मस्तकातील विचारांचं थैमान थांबलं! आता सर्व विसरायचं! तो आखाडा, ते स्वयंवर, ते द्यूत, तो दिग्विजय, ते दानसत्र, ती कवच-कुंडलं! सर्व विसरायचं. मनाचा निर्धार केला. शिष्य म्हणून परशुरामांच्या आश्रमासमोर उभं राहण्यासाठी! त्या निर्धारानं, पण विनम्रपणे पर्वतशिखर चढायचं होतं!

खांद्यावर नांगर टाकून परतणाऱ्या एका कृषिजनाच्या दर्शनानं वायुजिताचा प्रश्न मिटणार म्हणून माझं मन निर्घोर झालं. पायथ्याशी शेती करून राहणाऱ्या त्या कष्टकऱ्यानं वायुजिताची व्यवस्था चांगली राखली असती. भोवतीच्या लुसलुशीत गवतात चरायला सोडून त्याच्यावर दृष्टी ठेवली असती. त्याला खरारा केला असता.

''कृषिवरा, मी येईपर्यंत माझा हा अश्व तू जतन करशील काय?'' मी त्याला थांबवून वायुजिताच्या पाठीवर थाप मारीत प्रश्न विचारला. वायुजिताची धवल पाठ क्षणभर थरथरली. भरगच्च केसांची शेपूट वळवळली.

''कोण तू?'' कृषिवरानं माझ्या भगव्या वस्त्रांकडे आणि तुटक्या कानांकडे पाहत विचारलं.

''मी वैकर्तन! माझ्या या तुटक्या कानांमुळे तू मला सहज पुन्हा ओळखशील!''

‘‘संन्यासी आहेस! आण तुझा घोडा. मी जतन करीन!” त्यानं वायुजिताचे वेग आपल्या हाती घेतले. प्रामाणिकपणे साथ देणाऱ्या त्या एकनिष्ठ जनावराची पाठ मी दोन वेळा थोपटली. त्याच्या आयाळीचे शुभ्र केस बोटं घालून चाळवताना माझ्या निर्धारी मनाचं पाणी होऊन डोळ्यांत उभं राहिलं.

‘‘जा! सुखानं राहा!” मी त्याचाही निरोप घेतला.

सूर्यास्ताच्या दीर्घ सोनेरी किरणांत महेंद्राची उभट चढण चढू लागलो. शाल, किंशुक, पुन्नग, तमाल, सांतवण, डंडणी या वृक्षांवरची आपली घरटी गाठण्यासाठी चित्तर, सारंग, धनछडी, चंडोल, चक्रवाक यांचे थवे पंख फडफडत, कोलाहल करीत होते. उतरणीवर गुरं चारून परतणारे गोपाल गायींच्या घंटानादांबरोबर बासरीवर आलाप घेत होते! सगळं चराचर कसं विश्रामासाठी आसुसलं होतं.

‘‘संन्याशा, थांब!’’ मागून कुणीतरी मलाच हाक घालीत होतं म्हणून थांबलो. माझ्यासारखीच भगवी वस्त्रं परिधान केलेली एक मानवी आकृती हळूहळू पुढं सरकत होती.

‘‘कुठं चाललास तू?” जवळ येताच त्या व्यक्तीनं विचारलं. तो एक आश्रमशिष्य असावा. माझ्यापेक्षाही वयस्क होता तो!

‘‘आश्रमाकडे! भगवान परशुरामांच्या!” परिचय नसताही साद घालणाऱ्या त्या आश्रमशिष्याकडे आश्चर्यानं पाहत मी उत्तरलो.

‘‘मीही तिकडेच चाललो आहे, त्यांचाच शिष्य आहे मी! अकृतव्रण माझं नाव! चल, मिळूनच जाऊ आपण!” त्यानं माझ्या कानांकडे पाहत सांगितलं.

आम्ही दोघंही चढण चढू लागलो.

‘‘कशासाठी आला आहेस आमच्या आश्रमाकडे तू? भगवानांच्या दर्शनासाठी?” त्यानं चढता-चढता विचारलं.

‘‘नाही! केवळ दर्शनासाठीच नाही! अध्ययनासाठी आलो आहे मी! शिष्य म्हणून!’’

‘‘शिष्य म्हणून? तू ब्राह्मणकुमार आहेस ना? भगवानांची प्रतिज्ञा आहे. ब्राह्मणकुमाराशिवाय कुणालाही शिष्य करवून घेत नाहीत ते! पण तू कोणती विद्या शिकण्यासाठी आला आहेस?”

‘‘ब्रह्मास्त्र!’’ मी उत्तर दिलं; पण माझ्या आकांक्षेवर पाणी पडणार काय? असा प्रश्न मनात घोटाळत होता. मी ब्राह्मणकुमार नव्हतो.

‘‘ब्रह्मास्त्र! मग तर तू निश्चितच ब्रह्मकुमार असला पाहिजेस! उगाच विचारला मी तुला प्रश्न! पण – पण तुझ्या कानांची पाळी कशानं तुटली?” त्यानं पुन्हा प्रश्न केला!

त्याला तसाच तिथं टाकून धावत चढण उतरून पुन्हा वायुजितावर आरूढ होऊन तडक हस्तिनापूर गाठावं असं क्षणभर मला वाटलं. पण – पण मी ब्रह्मास्त्राशिवाय परत हस्तिनापूरला परतणं आता शक्यच नव्हतं!

‘‘स्वर्गाची खिंडारं बुजविण्यासाठी कानांचं मांस एका भिक्षुकाला दिलं आहे मी!’’ त्याच्या प्रश्नाचं उत्तर देणं भागच होतं म्हणून मी म्हणालो.

‘‘मला नाही समजलं.” तो आश्चर्यानं म्हणाला.

‘‘समजणारही नाही.” मी त्याचं सांत्वन करू शकत नव्हतो. भगवान परशुरामांनी

विचारलं, तर त्यांना कोणत्या कुलातील ब्राह्मणकुमार आहे म्हणून सांगणार होतो मी? मन मार्ग शोधीत होतं. काही सुचत नव्हतं.

परिस्थितीनं माझ्याकडून एका असाहाय्य अबलेच्या लज्जेवर तोंडसुख घेण्याचं पाप करवून घेतलं होतं. आता ती माझ्याकडून असत्य बोलण्याचं पापही करवून घ्यायला तयार झाली होती! साक्षात परशुरामांसमोर उभं राहून असत्य बोलायचं की आल्या मार्गानं ब्रह्मास्त्र न घेता रिक्त हस्तानं परत फिरायचं? पुन्हा संभ्रम! पुन्हा जीवनाची घुसमटविणारी कोंडी!

इंद्राला कवच-कुंडलांचं दान देऊन मिळालेलं पुण्य परशुरामांशी असत्य बोलताना दग्ध होऊन जाणार होतं! पुन्हा मी सूतपुत्रच राहणार होतो! आहे तसा! महेंद्राच्या पर्वतशिखरावरून कोसळणाऱ्या धबधब्यासारखे विचार माझ्या अंतर्मनावर कोसळू लागले! काय करावं? परत फिरावं? होय परत फिरावं!

"चलतो मी परत!" मी मध्येच थांबून अकृतव्रणाला धक्का दिला.

"का? घाबरलास? भगवान परशुरामांच्या आश्रमात शिरताना सिंहाचं काळीज पाहिजे! केवळ भृगू कुलातील ऋषिकुमारासारखी गोल चर्याच घेऊन आला होतास की काय?" तो आश्रमशिष्य असल्यामुळे निर्धोकपणे बोलून गेला!

'भृगू' कुल! सिंहाचं काळीज! काही नाही. ब्रह्मास्त्र घेतल्याशिवाय परत जायचं नाही! परशुरामांची प्रतिज्ञा भंग करण्याचं सामर्थ्य एका सूतपुत्रात आहे हेही जगाला आता दिसून येईल! काय करतील कोपिष्ट परशुराम असत्य बोलणाऱ्या कर्णाचं! जाळून रक्षा! करोत! पण ती रक्षाही सांगेल की, ब्रह्मास्त्रासाठी तळमळणाऱ्या एका सूतपुत्रानं परशुरामांनाही आपली प्रतिज्ञा भंगायला लावली!

मनाचा एक कोपरा 'नको!' म्हणून आक्रोशत असतानाच मी पुन्हा चढण चढू लागलो! परशुरामांनी तुझं कुल कोणतं म्हणून विचारलंच तर ते 'भृगू' म्हणून सांगायचं! नाव काय विचारलं तर 'भार्गव' म्हणून सांगायचं, असं स्वत:ला बजावलं.

आता चांदण्यात निथळणारा महेंद्र भयावह वाटू लागला. कारण भक्षय शोधण्यासाठी बाहेर पडलेली श्वापदं गर्जना करीत चांदण्यालाही थरकापवू लागली.

महेंद्रावरील अकृतव्रणाच्या पर्णकुटीसमोर आम्ही दोघं उभे राहिलो तेव्हा पूर्व रात्र उलटली होती. सर्व आश्रम अनेक लहान-मोठ्या पर्णकुट्यांनी भरून गेला होता. आवाराभोवती संरक्षणासाठी गोलाकार असं काटेरी वेलींचं भक्कम कुंपण होतं. सर्व दिशांकडून आश्रमस्थानाच्या मध्यभागी येईल असं एक भव्य यज्ञकुंड होतं. मी पाहिलेल्या सर्व यज्ञकुंडांत एवढं भव्य यज्ञकुंड मला अन्यत्र कुठंही आढळलं नव्हतं! एका कोपऱ्यात गायींचा लांबलचक गोठा तटस्थ उभा होता. महेंद्रावर चरून थकलेल्या गायी त्या गोठ्यात संथपणे रवंथ करीत असाव्यात! कारण मधूनच येणाऱ्या त्यांच्या गळ्यातील घंटांचा तुटक-तुटक अशा आवाजानं भयाण शांततेचा भंग होत होता! सर्व पर्णकुट्या पाय दुमडून विसावलेल्या हत्तींच्या कळपासारख्या दिसत होत्या. शिष्यगण निद्राधीन झाल्यामुळे कुठंही समईचासुद्धा प्रकाश नव्हता. चंद्राच्या चंदेरी रसाचा घट आकाशाचा महापुरुष पृथ्वीच्या सर्वांगावर ओतत होता! आश्रमाभोवतीच्या कुंपणातील गचपणात रातकिडे लयबद्ध किरकिरत होते!

केवळ एकाच पर्णकुटीच्या कुडातील तडतडणाऱ्या ठिणग्या बाहेरून स्पष्ट दिसत होत्या! पुटपुटल्यासारखे अस्पष्ट मंत्रोच्चार ऐकू येत होते. मध्यरात्र झाली तरीही

कुणीतरी जागृत होतं! ध्यानपूर्व तयारी करीत होतं.

"कोण आहे त्या पर्णकुटीत?" मी अकृतव्रणाला त्याच्या मागून त्याच्या पर्णकुटीत शिरताना विचारलं.

"भगवान! उद्या पौर्णिमा आहे. त्यांचं वरुणव्रत पूर्ण करण्यासाठी त्यांना दर पौर्णिमेला आणि अमावस्येच्या आदल्या रात्री असं यज्ञकुंडासमोर बसून सवितृ मंत्राचं गायत्री छंदात अखंड पुरश्चरण करावं लागतं! मग दुसऱ्या दिवशी ते महेंद्र उतरून कलिंगराज्यात खाली जातात. पूर्वसागराच्या फेसाळणाऱ्या कटीभर पाण्यात उभं राहून सूर्याला दिवसभर अर्घ्यदान देतात! त्यांचं दर्शन घेण्यासाठी पौर्णिमेला आणि अमावस्येला कालिंगांची गर्दी सागरकिनारी लोटलेली असते! अनेक वेळा मीही त्यांच्यासह सागरकिनारी गेलो आहे! तुलाही ती संधी एखाद्या वेळी मिळेल!" दर्भाच्या दोन पथाऱ्या अंथरून त्यांवर दोन कांबळी टाकताना अकृतव्रण म्हणाला.

सत्यसेन, शोण, अश्वत्थामा, दुर्योधन अनेक व्यक्ती माझ्या जीवनक्रमात होत्या. त्यांतच अकृतव्रणाची भर पडली. फलाहार करून दर्भाच्या त्या थंडगार शय्येवर शरीर विसावताना माझ्या मनात एकच एक प्रश्न रेंगाळत होता. परशुरामांनी उद्याच आपल्याला कलिंगांच्या राज्यात चल म्हटलं तर? काय उत्तर द्यायचं त्यांना? सर्व कलिंग तर आपणाला पूर्ण ओळखतात! कसं जायचं त्यांच्यासह कलिंगांच्या राज्यात? विचार करता-करताच निद्राधीन झालो! कक्षातल्या मऊ शय्येवर लागली नसती इतकी शांत होती ती परशुरामांच्या आश्रमातील पर्णुटीतील – पहिल्या रात्रीची निद्रा!

**

# चार

पहाट झाली. ''ॐऽऽ ईशावास्यामिदं सर्वंऽऽऽ'' शिष्यगणांच्या मुखातून बाहेर पडणाऱ्या प्रार्थनेच्या मधुर आलापांनी मी जागृत झालो. आन्हिकं आटोपून सर्वांसमवेत परशुरामांच्या पर्णकुटीसमोर ओळीत उभा राहिलो. सूर्योदय झाला आणि गुहेतून आयाळधारी सिंह बाहेर पडावा तसे दाढीधारी परशुराम पर्णकुटीच्या बाहेर आले! त्यांच्या खांद्यावरच्या परशूचं धारदार भव्य पातं चमकन झळाळलं! दानसत्राच्या आणि दिग्विजयाच्या वेळी तसे मी अनेक ऋषी पाहिले होते. पांडवांच्या राजसूय यज्ञात तर धौम्य, धनंजय, सांदिपनी, कण्व, ब्रह्मगार्ग्य यांसारखे महान तपस्वी दिसले होते. कोपिष्ट म्हणून विख्यात असलेलया दुर्वासांचीही भेट झाली होती, पण खांद्यावर तळपणारा परशू टाकणारा काळ्याभोर दाट दाढीचा एवढा भव्य ऋषी मी आज प्रथमच पाहत होतो! कैलास सोडून जणू दाढी-जटाधारी महेशच त्या पर्णकुटीतून बाहेर पडल्याचा भास मला झाला! या महेशानं मस्तकावरची चंद्रकोर काढून ती त्रिशूलदंडात गोवून परशूच्या रूपानं आपल्या बळकट आणि विस्तीर्ण स्कंधावर टाकली होती! नेत्र विश्वाचा भेद करण्याइतके तेजस्वी होते. बरेचसे श्रीकृष्णाच्या नेत्रांसारखे दिसत होते!

पूर्वसागराकडे जाण्यासाठी म्हणून मंद-मंद पदक्षेप टाकीत ते चालू लागले. पुष्पांची ओंजळ त्यांच्या चरणांवर अर्पून त्यांचे श्रद्धावान शिष्य धडाधडा त्यांच्यापुढं लोटांगण घेऊ लागले! सर्वांत शेवटी मी उभा होतो!

समोर येताच मी त्यांच्या चरणांना हात लावून त्यांची चरणधूली मस्तकी लावली. अतिशय भाग्याचा वाटला मला तो क्षण व तो स्पर्श.

''कोण तू?'' गदेवर गदा आदळावी तसा होता त्यांचा आवाज!

''मीऽऽ मी भार्गव! भृगू कुलातील!'' माझं अंतर्मन रथाच्या चक्राखाली सापडलेल्या रक्ताळलेल्या हातासारखं लज्जेनं काळवंडलं होतं. खोलवरचा कुठलातरी सत्यप्रिय कर्ण कळवळत होता!

''इथं कशासाठी आलास?''

''ब्रह्मास्त्र शिकण्यासाठी!''

बराच वेळ आश्चर्ययुक्त नजरेनं माझ्याकडे पाहत गुरुदेवांनी आपले नेत्र मिटून घेतले. क्षण, दोन क्षण जाताच पुन्हा तीव्र नजर रोखीत म्हटलं, ''आश्रमाच्या नियमांचं पालन काटेकोरपणे करावं लागेल! करशील?''

''आज्ञा गुरुदेव!''

''ठीक आहे! जा, प्रवासानं मलिन झालेलं वस्त्र स्वच्छ धुऊन घेऊन तयार राहा. मी परत येताच आजच्या शुभमुहूर्तावर तुला ब्रह्मास्त्रापूर्वीच्या नमनाचे मंत्र शिकवीन!''

धीरगंभीर पदक्षेप टाकीत तो विशालदेही जमदग्निपुत्र आश्रमाबाहेर पडला. तळपणारा परशू परावर्तित किरणांची वलयं फेकीत सर्वांच्या दृष्टिआड होऊ लागला. सोबत अकृतव्रणही काही आश्रमबंधूंसह चालू लागला! त्यांच्या पाठमोऱ्या आकृतीकडे

पाहताना माझ्या मनात कुठंतरी खोलवर पराभवाची जाणीव सलत असल्याचा मला भास झाला! जीवनात पहिल्या प्रथमच! कुठंतरी काहीतरी भयानक चुकत होतं! जीवन जिद्म बाणासारखं वाकडंतिकडं चाललं आहे असंच वाटू लागलं!

**

# पाच

दिवसांमागून दिवस जात होते. राजवाड्यातील योद्धयाचं जीवन अंगवळणी पडलं नव्हतं एवढ्या लवकर आश्रमातील शिष्यजीवन आता अंगवळणी पडलं. कुणाचीही स्मृती माझ्या मनाला प्रक्षुब्ध करू शकत नव्हती. ब्रह्मास्त्राचे महामंत्र अर्धेअधिक पाठ झाले. त्याचा परिणाम म्हणूनच की काय; पण मन शांत होत गेलं. राजवाड्यात परतावं असंही वाटत नव्हतं. जीवनमुक्तीसाठी धडपडणाऱ्या असंख्य सहकाऱ्यांच्या सहवासात घटका आणि पळं उजळून निघत होती. अकृतव्रणाचा सहवास तर अचूक अश्वत्थाम्याचीच आठवण करून देणारा होता! जीवनातल्या सर्व अंगांचा त्याचा सखोल अभ्यास ऐकताना मला काळाचं भान राहत नव्हतं.

महिन्याकाठी एक दिवस असा असे की, त्या दिवशी सर्व शिष्यगणाला गुरुदेवांना कोणताही प्रश्न विचारण्याची संधी देण्यात येई. जीवनाची वाटचाल करताना मनुष्य केवळ स्वत:च्याच बुद्धीच्या जोरावर सर्व निर्णय अचूकपणे करील असं नाही! त्यासाठीच अशा दिवशी अनेक विषयांवर मनमुक्त चर्चा होई. शंका विचारल्या जात.

जे काही मी आजवर शिकलो नव्हतो ते अशा चर्चांमधून नव्यानं शिकायला मिळालं.

अशाच एका नियुक्त दिवशी मीही भगवान परशुरामांना प्रश्न विचारला, ''भगवन, सर्वांत श्रेष्ठ आनंद कोणता?''

''तुझ्या कल्पनेनं कोणता श्रेष्ठ? प्रथम तूच सांग भार्गवा!'' त्यांनी उलट मलाच प्रश्न टाकला.

''दानाचा!'' माझ्यापुढं कवच-कुंडलं दानाचा प्रसंग उभा राहिला.

''नाही! दानातही मी कुणालातरी दान केलं ही अहंपणाची जाणीव मागं राहतेच! त्यासाठी प्रथम सर्वांत श्रेष्ठ काय हे पारखून घेतलं पाहिजे. भार्गव, सर्वांत उंच पर्वत कोणता?''

''हिमालय, गुरुदेव!'' मी म्हणालो.

''नाही! सर्वांत उंच पर्वत मनाचा! मनाच्या उंचीसमोर हिमालयही ठेंगणा आहे! म्हणूनच मन हे सुदृढ पाहिजे! असं सुदृढ मन बलवान शरीरातच असू शकतं. बलवानाला सर्वांत श्रेष्ठ आनंद प्राप्त होतो. बलहीनाला आनंद नाही, सौख्य नाही, मुक्ती नाही! म्हणूनच आपल्या आश्रमात शस्त्रास्त्रांचंही शिक्षण देण्यात येतं. हे ज्ञान मानवतेच्या संहारासाठी नाही, पण शस्त्रास्त्रांचं हे ज्ञान मानवतेच्या उद्धारात अडथळा आणणाऱ्या क्रौर्याचा संहार करण्यासाठी मात्र आवश्यक आहे. तुला मी ब्रह्मास्त्रविद्या शिकवतो आहे तीही यासाठीच!''

''गुरुदेव, मानवता तरी जगात कशासाठी अस्तित्वात पाहिजे? केवळ कोट्यवधी वर्षं जगण्यासाठी? तसं नसावं! म्हणूनच मला जीवनातला सर्वश्रेष्ठ अंतिम आनंद कोणता हे जाणून घ्यायचं आहे. आपण म्हणता तो मनाचा आनंदच अंतिम आहे काय?''

''नाही! त्याहीपेक्षा श्रेष्ठ असा आनंद आहे. तो अंतिमच नव्हे; तर अखंडही

आनंद आहे! तो आनंद मनाच्या वेष्टनात अवगुंठून बसलेल्या आत्म्याचा आहे! आपण कोण आहोत! या विश्वात का आलो? कुठं जाणार? हे चराचर विश्व कुठल्या सूत्रात गुंफलं आहे? आपल्या आश्रमातील ही गायींची गोंडस पाडसं का बागडतात? एक दिवसाचंच ज्याचं जीवन आहे ती फुलापाखरं नि फुलंही वेलीच्या डहाळीवर वायुलहरींबरोबर हसत-हसत का डोलतात? मेघ का गर्जतात? वारे कशामुळे वाहतात? पाऊस कुणामुळे पडतो? सगळ्या विश्वाचा कणन्कण चैतन्याची प्रणवगीतं गात अविरतपणे कसा काय गतिमान राहू शकतो? अफाट जीवनसृष्टीचा हा अखंड नंदादीप कुठला जीवनरस घेऊन सतत तेवत असतो? हे सर्व जाणण्यासाठी, हे सर्व पाहण्यासाठी एक अद्‌भुत, सुप्त असा नेत्र आपल्या या शरीरातच आहे! ‘आत्मा ’ हे त्याचं नाव आहे! इच्छाशक्तीच्या बलावर हा नेत्र ज्या वेळी आपण उघडू शकतो त्या वेळी सर्वच समस्या मिटलेल्या असतात! सगळं विश्व एक दिसू लागतं! महाभयानक वाटणाऱ्या विध्वंसनानं दु:ख होत नाही! महान निर्मितीची रूपं पाहून वाटणारा खोटा आल्हादही उरत नाही. उरतो केवळ प्रकाश! सूर्यकिरणांसारखा तेजस्वी प्रकाश! म्हणूनच आत्मानंद हाच सर्वश्रेष्ठ आनंद आहे!” त्यांनी आपले विशाल नेत्र बोलतानाच एकदम मिटून घेतले! जणू त्या प्रकाशाच्या साम्राज्यात जाण्याची त्यांना तीव्रतम ओढच लागली होती. त्यांनी नेत्र मिटले की, प्रश्न थांबविण्याचा तो त्यांचा संकेत आहे हे आम्हाला परिचित झालं होतं.

सर्वांनी हात जोडले. “ॐऽऽ ईशावास्यम्ऽऽ इदम्ऽऽऽ” प्रार्थनेचे धीरगंभीर ध्वनी पुन्हा आश्रमाच्या आवाराबाहेर पडून महेंद्राच्या कडेकपाऱ्यांत घुमू लागले.

**

# सहा

एक वर्ष केव्हा निघून गेलं ते समजलंही नाही. भगवान परशुरामांच्या सहवासात राहण्याचं भाग्य इतकं मोठं होतं की, मी एक दिग्विजयी सेनापती आहे, एक दानवीर आहे या मनाच्या धुंद करणाऱ्या कल्पना केव्हाच अस्पष्ट झाल्या. मी एक आज्ञाधारक, नम्र शिष्य झालो. एक यात्रिक झालो. झळाळतं ते सुवर्ण नसतं हे मला कळून चुकलं. केवळ पराक्रम हाच जीवनाचा अर्थ नसतो. डोळस चिंतन असावं लागतं हे मला उमगलं!

लवकरच मी गुरुदेवांचा प्रिय शिष्य झालो. इतर शिष्यांना माझा हेवा वाटावा असं वातावरण निर्माण झालं! आश्रमातील प्रत्येक दिवस, माझ्या पूर्वजन्मीच्या पुण्याईमुळे परशुरामांच्या सहवासात उजळून निघत होता! अनेकदा गुरुदेव मला कलिंगांच्या राज्यात येण्यासाठी आग्रह करीत! पण काहीतरी निमित्त सांगून ते मी टाळी. तसं करताना अर्थात मला यातना होत आणि दुसरं मोठं शल्य डाचत राही ते असत्य सांगितलेल्या कुलाचं! कधी-कधी त्या जाणिवेनं भोवतीच्या पर्णकुटया खायला उठल्यासारख्या वाटत! मनाची घोर कुचंबणा होई! कुठल्यातरी सांदीकोपऱ्यात आपण रगडले जातो आहोत असं वाटे! अशा वेळी मनाला विरंगुळा मिळावा, कुठंतरी एक-दोन घटकांसाठी ते गुंतलेलं असावं, या कल्पनेनं धनुष्य घेऊन मी मृगयेसाठी महेंद्राच्या दाट अरण्यात एकसारखा फिरत राही! झालेल्या मगृया एका भिल्लाला देऊन मस्तकावरचा घाम टिपत पुन्हा चढण चढून आश्रमात परतत असे. मनसोक्त भटकल्यामुळे तो दिवस उल्हासात जाई! पुन्हा नव्या हुरूपानं आश्रमजीवन सुरू होई.

असाच एकदा, मनाची अस्वस्थता पाठपुरावा करू लागली म्हणून, धनुष्य उचलून आश्रमाबाहेर अरण्यात निघालो! दोनप्रहर टळून गेला होता. फांदीवर फांदी घासून पडलेल्या ठिणगीनं, दूरवर कुठंतरी धुमसणाऱ्या वणव्याच्या धुराचा लोळ मला महेंद्राच्या एका कड्याच्या बाजूला स्पष्ट दिसत होता! त्या उष्णतेमुळे पक्षिगण निवारा गाठून शांत झाले असावेत. संध्यासमयापर्यंत खूप भटकूनसुद्धा एकही श्वापद आढळलं नाही. मन त्यामुळे उदास झालं. खिन्नपणे परतून महेंद्राची चढण, आश्रम गाठण्यासाठी म्हणून चढू लागलो. कानांच्या छेदलेल्या पाळ्यांवरून घामाचे बिंदू लवकर खाली ठिबकत नव्हते! दोन टोकांमुळे ते दोन्हीकडे विभागून वारंवार अर्धवट तसेच थांबत होते! ते हातांनी निपटण्याची आता मला सवय झाली होती! तसे ते एकदा निपटले!

"सर्रर्रऽऽऽ खसऽऽ खस!" कुठलंतरी श्वापद निवाऱ्याची जागा सोडून बाहेर पडत असावं! त्याच्या हालचालीनं मार्गाकडेची एक झुडपांची जाळी खसखसू लागली. आवाजाचा लक्षयभेद करण्याची ही फार दिवसांची सुसंधी चालून आली होती! धनुष्य उचलून मी एक अमोघ बाण चढविला. प्रत्यंचा कानापर्यंत खेचून आवाजाच्या दिशेनं तो झटकन सोडून दिला! अंगठ्याच्या स्पर्शानं कानाची भग्न पाळी पुन्हा हलली! सूँऽऽऽ असा आवाज करीत बाण पर्णझडीत शिरला! तो अर्थातच चुकणार नव्हता!

"हऽऽ म्माऽऽ!"

बाणाच्या मर्मभेदानं रानश्वापदाऐवजी एका गायीचा प्राणांतिक हंबरडा माझ्या

कानांवर आदळला! क्षणात शरीरावर सरसरून रोमांच उभे राहिले! हातांतील धनुष्य आपोआप गळून पडलं! सगळं शरीरच कंप पावू लागलं! भोवतीचे लतावृक्ष गरगर फिरताहेत असं वाटलं. असं कसं झालं?

"शुऽऽ भऽ दे" कुणीतरी मोठमोठ्यानं दुरून हाका देत होतं. झुडूप एकसारखं खसखसत होतं. हाका क्षणाक्षणाला वाढत होत्या.

धावत जाऊन झुडपाची दाटलेली पर्णझडी हातांनी दूर सारताच पलीकडचं दृश्य पाहून सगळं शरीरच थंड पडतं की काय, असा भयानक भास मला झाला! एक शुभ्रवर्णी गाय आपले खूर झाडीत तळमळत खाली पडली होती! माझा अमोघ बाण तिच्या मस्तकात कितीतरी खोलवर रुतला होता! एका वेलीत अडकलेली शिंगं काढून घेण्याचा तिचा यत्न तसाच राहिला होता! ती वेलीत तशीच अडकलेली होती. सगळं झुडूप उद्ध्वस्त झालं होतं. सारं विचित्र दिसत होतं. झुडपावरून उडी घेऊन मी तिच्या मस्तकातील बाण काढण्याचा व्यर्थ प्रयत्न करू लागलो. पण तो तिच्या कवटीत खोलवर रुतला होता! बाणाच्या हालचालीमुळे होणाऱ्या यातनेनं ती इतकी हृदयभेदक हंबरडा फोडू लागली की, त्यामुळे माझ्या तुटलेल्या कानांच्या आतील सुरक्षित असलेले पटलही फाटून जाताहेत की काय; असाच क्षणकाल मला भास झाला! जीभ लांब काढून, ती मृत्यूशी निकरानं झुंजताना भयानक आचके देऊ लागली! गुडघे टेकून मी मटकन खालीच बसलो. शरीराचा पाषाण झाला आहे असंच क्षणभर वाटलं! सगळं विश्वमंडल गरगरतं आहे की काय? ज्या बाणांनी माजलेल्या उन्मत्तांची शिरं तोडावीत त्यातीलच एक त्या कुवेळी गायीच्या मस्तकात होता!

"शुऽऽ भऽ दे! शुभदे!" हाका जवळ-जवळ येत होत्या. काही पळांतच एक वृद्ध ब्राह्मण माझ्यासमोर उभा ठाकला, अंगावर कोसळणाऱ्या कड्यासारखा!

आपल्या गायीच्या मस्तकात बाण घुसलेला पाहून एकदम तो केवढ्यातरी मोठ्यानं किंचाळला. त्याच्या आक्रोशानं, रणांगणातील वीरांचे आणि वाद्यांचे हलकल्लोळ पचविणारं माझं खंबीर मनही थरकलं. मी डोळे घट्ट मिटून घेतले.

"शुभदे, कुठल्या चांडाळानं तुझ्या मर्मावर हा प्राणांतिक बाण सोडला?" पुढं होऊन गायीच्या मस्तकातील बाण उपसून काढण्याचा तोही निष्फळ यत्न करू लागला. त्या यातनांनी ती अधिकच तडफडू लागली! गगनभेदी हंबरडा फोडू लागली. खूर झाडून डोळे वासू लागली. तिच्या तोंडातून फेसाची अखंड धार लागली. "आता माझ्या कुटुंबाचा भार कुणावर टाकू? तुझ्या दुधावर पोसलेलं हे शरीर कशाला जिवंत ठेवू?" तो वृद्ध गायीचं तोंड कुरवाळीत स्फुंदू लागला. एवढं काळजाला छेदून जाणारं गर्भकारुण्य सत्य मी कधीच पाहिलं नव्हतं. माझ्या मृगयेमुळंच ते निर्माण झालं होतं. ज्या आवाजाच्या लक्षयभेदाच्या कलेनं एकवार मला आखाड्यात गौरवाच्या शिखरावर चढवलं होतं, तीच कला आज मला रौरव नरकाच्या खोल गर्तेत गाडून टाकीत होती! मी कर्ण, दिग्विजयी सेनापती, दानवीर, परशुरामांचा पट्टशिष्य – छे, मी म्हणजे केवळ एक गोहत्यारा होतो! महान पापी होतो! अनिवार्य घटनांनी लाथाडलेलं निर्माल्य होतो!

प्राणांतिक यातनांनी तडफडून, खूर झाडून गायीनं शेवटचा आचका दिला! श्वेतकमलासारखं गोल मस्तक लुळं होत फेसाळलेली जीभ लडबडत तिचा प्राण गेला! तिच्या डोळ्यांच्या निष्प्राण कवड्या, मामांच्या द्यूताच्या कवड्यांहूनही कितीतरी भयानक वाटल्या मला! क्षणात तिच्या प्रेताला हस्तगत करण्यासाठी रानमाशांनी

तिच्याभोवती घोंगावयाला सुरुवात केली. मी माझं मुख लज्जेमुळं... विदारक यातनांनी ओंजळीत झाकून घेतलं!

“संन्याशा, तुला काय देऊ मी? मीच आज लुटलो गेलो!” त्या वृद्धानं माझ्या खांद्यावर हात ठेवून उद्गार काढले! माझ्या सर्वांगाचं त्या स्पर्शानं तर पाणीच पाणी झालं. मी त्याच्या गायीचा वध केला असेल, असं माझ्या वस्त्रामुळे त्याला चुकूनही वाटलं नसावं! वाकून त्याच्या चरणांवर हात ठेवून मी कळवळत म्हणालो, “ब्रह्मन, क्षमा असावी. आपली शुभदा... आपली गाय, माझ्या – माझ्याच बाणानं प्राणाला मुकली! मृगया करताना चुकून, श्वापद समजून आपली गाय, माझ्या – माझ्याच बाणानं प्राणाला मुकली! मृगया करताना चुकून, श्वापद समजून मी तिच्यावर अनवधानानं बाण टाकला! मला क्षमा करा. मी आपणाला पाच गाई देईन!”

जीवनात प्रथमच मी याचक झालो! दीन झालो! लाचार झालो!

“दूर हो!” त्यानं मला तसंच लोटून दिलं. क्षणापूर्वी आपल्या गायीसाठी बालकासारखा रडणारा तो वृद्ध, क्षणात यज्ञकुंडासारखा संतप्त झाला! त्याचे ओठ थरथरत होते. डोळे आग पाखडत होते. “संन्यासी असून मृगया करतोस? अंगावरची भगवी वस्त्रं जाळून का टाकीत नाहीस? एका गायीसाठी पाच देणाऱ्या गोहत्याऱ्या, तुझी एक माता गतप्राण झाली तर जगातल्या पाच स्त्रियांना तू माता म्हणशील काय? तुझ्या संन्यासी तपस्येपेक्षा माझं ब्रह्मतेज प्रखर असल्याचं आज मी तुला दाखवून देईन!”

“नकोऽऽ! मी – मी संन्यासी नाही! मी एक योद्धा आहे! परशुरामांचा शिष्य आहे!” मी पुन्हा त्याचे चरण धरले!

“दूर हो! तुझा स्पर्शसुद्धा गोहत्येइतकाच भयानक आहे! ‘योद्धा-योद्धा’ म्हणून धुंदपणे गायीवर बाण टाकणाऱ्या अधमा, तुझ्या रथाचं चक्रही ऐन युद्धाच्या समयी भूमीत रुतून बसेल!! या गायीच्या मस्तकात रुतलेल्या तुझ्या बाणासारखं! कितीही जीव तोडून आटापिटा केलास तरी ते कधीही बाहेर निघणार नाही! चालता हो!” तो थडाथड पाय आदळत अनावर संतापानं स्वत:च निघून गेला. आपल्या गतप्राण शुभदेला तसाच टाकून! माझं जीवन शापदग्ध करून! माझा लक्ष्यभेद करून! माझी मृगया करून!

त्याच्या शापानं माझं मन सुन्न अन् बधिर झालं. अंगावरची भगवी वस्त्रं, वस्त्रं नसून चोहोकडून हव्या तशा भडकलेल्या अग्निज्वाळाच आहेत असं वाटू लागलं! सगळं जीवनच समस्यांचे पलिते घेऊन माझ्याभोवती आता फेर धरून नाचत होतं! कुठं जाणार होतो मी?

शरीराचं ओझं उचलून आश्रमाकडे चालताना शापित मन नैराश्यानं पार पोखरून गेलं होतं. आज क्रूर दैवानं माझ्यातील वीर कर्णाची मर्मभेदी मृगया केली होती! त्या शापानं सगळं जीवनच कुठंतरी खोलवर रुतून बसलं आहे असंच मला वाटू लागलं! मन त्या गायीसारखं तडफडत होतं – आक्रोशत होतं! मूकपणं! नि:शब्दपणं आतल्या आत!

ज्या भिल्लाला रोजची मृगया देत होतो, त्याला गायीचा मृतदेह पुरून टाकायला सांगून त्याच्या हाती अभद्र धनुष्य विसर्जित करून त्याला म्हणालो, “आजपासून मृगया संपली!”

महेंद्राची चढण चढताना पोटऱ्याचे स्नायू कधी नव्हे ते दाटून आले!

आश्रमाच्या आवारात पाऊल टाकताना गायींच्या गोठ्यातील मंजूळ घंटा नेहमीप्रमाणं मला मधुर वाटल्या नाहीत! स्मशानवाद्यासारख्या भयानक भेसूर वाटल्या त्या! काही न खाताच, प्रार्थनाही न म्हणता तसंच दर्भाच्या पथारीवर शरीर झोकून दिलं! निद्रेची आराधना करावी असंसुद्धा वाटेना! मृत्यूलाही लाजविणारी शुष्कता मनाला घेरून टाकत होती! आश्रमाभोवतीच्या कुंपणातील रात्रकिडे कर्कशपणे किरकिरतच होते!

**

# सात

त्या एकाच घटनेनं, कवच-कुंडलं विलग करताना शरीराला झाल्या नव्हत्या, एवढया सखोल यातना माझ्या मनाला झाल्या! आश्रमात ते दु:ख कुणाजवळ बोलताही येणं शक्य नव्हतं! काही-काही दु:खंच अशी असतात की, ती ज्याची त्यालाच मूकपणं सहन करावी लागतात. स्मृतीच्या अशा दु:खांचे काळे वस्त्र उसवून धागे काढून टाकण्यात कोणीही कधीच यशस्वी होऊ शकत नाही. तरीही त्यांचा काळेपणा कमी करण्याचा यत्न मन करीत असतं! यालाच जीवन म्हणायचं! आनंदाची वृद्धी नसली तरी दु:खाची तीव्रता कमी करणं याचंच नाव जीवन!

त्या मन:स्थितीत अकृतव्रणाचं साहाय्य अमोल लाभलं. अल्पावधीतच त्याचे माझे स्नेहसंबंध दृढ झाले होते. माणूस जिथं राहतो, तिथल्या सर्व वस्तूंबद्दल त्याला एक अबोध आकर्षण वाटत असतं. जवळीक वाटत असते. महेंद्रपर्वताबद्दल मला तशीच जवळीक वाटू लागली. समिधा गोळा करण्यासाठी त्याच्या दऱ्याशिखरांतून फिरताना कधी-कधी कुरणातील तृणपात्यांवर दाटलेले झळकणारे दवबिंदू पाहिले की, ‘जीवन दवबिंदूसारखंच असतं,’ असं म्हणणाऱ्या अश्वत्थाम्याची आठवण होई. त्यानं अनेक प्रसंगी ऐकविलेले दिव्य विचार मनातून उफाळून येत. ‘कर्ण, तू कोण आहेस हे आत्मपरीक्षणानं जाण! आपल्या अंतररंगाचं ऐक्य साध! खंबीर हो!’ त्याचे विचार माझ्या दृष्टीनं अविस्मरणीय नव्हते काय?

तशीच कधीतरी पर्वतावरील एखादी सतेज रानकेळ वृषालीची आठवण करून देई! घायपाताचा उभा दंड पाहताना निरामय प्रेमाचा शोण डोळ्यांसमोर उभा राही! डेरेदार वटवृक्ष पाहिला की, मन पितामहांच्या जीवनाची त्याच्याशी तुलना करण्यात गढून जाई! महानदीचं शांत पात्र मातापित्यांची स्मृती जागृत करी. त्या पात्रातील पाण्याचा भोवरा पाहताना मात्र युवराज दुर्योधनच त्यात मला दिसे! एखादं काटेफडं पाहिलं की, गुरू द्रोणांची आणि पाणथळलेल्या जागेतील हिरवं शेवाळं पाहिलं की, हटकून शकुनीमामांची मूर्ती डोळ्यांपुढं उभी राही! स्मृती या स्वत:च्या छायेसारख्या असतात! त्या अविरतपणे मनाचा हा असाच पाठपुरावा करतात. भगवान परशुरामांना पाहिलं की, श्रीकृष्णाची स्मृती होई. डोळ्यांसमोर शिशुपालवधाचा प्रसंग स्पष्ट उभा राही. त्या दिवसांनंतर एकदाही कृष्ण मला भेटला नव्हता!

असं हे आश्रमजीवन काळाच्या हातात हात घालून चाललं होतं. रात्री निद्राधीन होताना बालपणापासून घडलेल्या प्रसंगांचं दर्शन घेऊन थकलेलं मन, भवितव्याचा वेध घेण्याची धडपड करी; पण तसा तो कुणालातरी कधी अचूकपणे घेता आला आहे काय? अज्ञात भवितव्यात काय-काय लपलेलं आहे हे माणसाला कळलं असतं तर – तर जीवनाचा अहारोत्र चाललेला संघर्ष, कोलाहल, धडपड सर्व केव्हाच थांबलं असतं! पण असं काही होत नसतं. प्रत्येक जण आशेवर जगत असतो. मीही तशीच आशा उराशी धरून ब्रह्मास्त्राची आराधना करीत होतो! हस्तिनापूर सोडून आता दोन वर्षांचा काळ लोटला होता. ब्रह्मास्त्राचे दिव्य मंत्र संपत आले होते. या अस्त्रामुळे

सूर्यकिरणांवरही विजय मिळविता येणार होता. दिव्य आणि दीप्तिमान प्रकाशझोत सोडून कोणतीही कठीण वस्तू त्यात वितळून टाकता येणार होती! सर्व अस्त्रांमधील श्रेष्ठतम असं अस्त्र होतं ते!

आणि अशी सामर्थ्यशाली विद्या भगवान परशुरामांनी एका पौर्णिमेला अभिचाराच्या मंत्रांसह, संपूर्णपणे माझ्या स्वाधीन केली! आचमनाचं पाणी माझ्या हातावर सोडताना ते गंभीरपणे म्हणाले, ‘‘भार्गव, ही ब्रह्मास्त्रविद्या आहे! दुर्बल आणि नि:शस्त्र यांच्यावर ती कधी सोडू नकोस! तसा प्रयत्न करशील तर ती तुझ्यावरच उलटेल! सामर्थ्याचा अर्थच दुर्बलाच्या हक्कांचे संरक्षण हा आहे!’’

‘‘आज्ञा भगवन्!” मी मातापित्यांव्यतिरिक्त प्रथमच एका दिव्य महापुरुषाच्या चरणांवर श्रद्धेनं माझं मस्तक टेकविलं! जीवन धन्य झालं असंच वाटलं मला. माझ्या डोळ्यांतील धन्यतेचे अश्रू त्यांच्या पुण्यवान चरणांवर ओघळले.

‘‘आणि तुझ्या सुदैवानं आजच माझं वरुणव्रत संपतं आहे! त्याची सांगता म्हणून मी आज पूर्वसागरात दिवसभर उभा राहणार आहे! रात्रभर गायत्री मंत्राचं पुरश्चरण करून-करून डोळे ताठरले आहेत! गेले चार दिवस उपोषणात गेले! तेव्हा तूच आज माझ्याबरोबर कालिंगराज्यात चल! थोडा थकवा आहे शरीरात!” त्यांनी व्याघ्रचर्मावरून उठताना मला आज्ञा केली!

माझ्यासमोर यक्षप्रश्न उभा राहिला! मनाचा निर्धार करून मी होकारार्थी मान डोलविली. टाळाटाळ केली नाही. महेंद्र सोडून जाताना, त्यांची ही शेवटची आज्ञा निमित्त सांगून टाळू नये असंच मला वाटलं! शिष्यगणांच्या जयजयकाराच्या घोषणातच आम्ही दोघं आश्रम सोडू लागलो. अकृतव्रणाचा निरोप घेताना माझा हात थरथरू लागला!

पहिल्या प्रहराची सुरुवात होत असतानाच आम्ही आश्रमाचं कुंपण ओलांडलं! कवच नसल्यामुळे अलीकडे मला उन्हाची तिरीप जाणवत होती! तरीही गुरुदेवांसमवेत महेंद्राची चढण उतरताना मन कसं समाधानानं भरून आलं होतं! ब्रह्मास्त्राच्या प्राप्तीमुळे सामर्थ्याची जाणीव सुखवीत असावी!

‘‘भार्गव, तुला कधीच विचारला नाही – पण आज एक प्रश्न विचारण्याची इच्छा होते आहे!”

‘‘विचारा गुरुदेव! यथामती उत्तर देईन!” मीही त्यांना विनयानं म्हणालो.

‘‘तुझ्या कानांची पाळी कशामुळे तुटली आहेत?” त्यांच्या परशूचा आघात मस्तकावर झाल्याचा मला भास झाला.

‘‘एका वृद्ध ब्राह्मणाला माझ्या कानांतील कुंडलं हवी होती! कान कापल्याशिवाय ती देता येणं शक्य नव्हतं. म्हणून ती मी कापून दिली!” मी सत्य सांगून टाकलं!

‘‘छान! भृगुकुलाला शोभेल असंच तुझं वर्तन झालं! तुझ्या हाती माझी ब्रह्मास्त्रविद्या सुरक्षित आहे असं मी मानतो!” त्यांच्या परशूचं पातं तळपत होतं! माझा कंठ शुष्क झाला होता! आता त्यांनी त्या ब्राह्मणाचं नाव विचारलं तर? पण ते काहीच बोलले नाहीत!

चालत-चालत आम्ही शेवटी एका विशाल वटवृक्षाखाली आलो. उतरण उतरताना होणाऱ्या त्रासामुळे घामाघूम झालो होते. वटवृक्षाखाली गर्द छाया

विश्रांतीसाठी मोहवीत होती.

"भार्गव, फार थकवा आला! थोडा विश्राम घेऊ या वटवृक्षाखाली आणि मगच पुढं जाऊ!" गुरुदेवांनी आज्ञा केली. चार दिवसांच्या उपोषणानं ते श्रांत झाले होते, आवाज क्षीण होता. वृक्षाच्या छायेत अंगावरचं व्याघ्रचर्म पसरून त्यावर ते पहुडले! उपोषण, जागरण आणि पर्वत उतरताना होणारे श्रम यांनी ते पार थकले होते. त्यांच्या वरुणव्रताचा आजचा शेवटचा दिवस होता. "भार्गव, मस्तकाखाली आधारासाठी एखादा पाषाण आण!" ते डोळे मिटून घेताना मला म्हणाले.

मी आवतीभोवती पाषाण शोधला. तो मिळाला नाही. ज्यानं मला ब्रह्मास्त्रविद्या दिली त्या महान तपस्व्याची एवढी क्षुल्लक मागणीही पूर्ण करता येत नाही, हे पाहून माझं मन कष्टी झालं.

झटकन पुढं होत खाली बसून त्यांचं जटाधारी विशाल मस्तक श्रद्धेनं उचलून घेत मी माझ्या मांडीवर ठेवलं! मांडीवरच्या भगव्या वस्त्राच्या स्पर्शानं त्यांनी डोळे उघडून माझ्याकडं अभिमानानं पाहत सांगितलं, "भार्गव, हीच तुझी गुरुदक्षिणा मानतो मी! पण निद्रा पूर्ण झाल्याशिवाय मला उठवू नकोस! निद्रा आणि वचन कधीच अपूर्ण राहू देऊ नयेत!"

तो महान योद्धा, दिव्य तपस्वी, जमदग्निपुत्र, वीरांतील वीर, माझ्या... सूतपुत्र कर्णाच्या... मांडीवर शांतपणे निद्रा घेऊ लागला! माझ्या भाविक मनात भावनांचा हलकल्लोळ दाटला! अनेकांनी माझ्यावर फुलं उधळली होती, माझा जयघोष केला होता! पण एवढा परमोच्च भाग्याचा दिवस अखंड जीवनात मी कधीच अनुभवला नव्हता! महान-महान क्षत्रियांनासुद्धा थरकविणारं, क्षात्रतेज माझ्या मांडीवर विसावलं होतं!

त्यांची दाढी तळपत होती. श्वास मंदगतीनं चालला होता. माझी विचारचक्रं मात्र वायुगतीनं धावत होती. जीवनाच्या कृतार्थतेचा तो दिवस होता. धन्यतेचा होता!

एक घटका संपली आणि वटवृक्षाच्या फांद्या चुकवून काही प्रखरं किरणं त्यांच्या दाढीधारी सतेज मुद्रेवर पडली! त्यांची निद्रा चाळवली जाण्याची लक्षणं दिसताच मी दोन्ही हातांचं छत्र त्या प्रखर किरणांना थोपविण्यासाठी मध्ये धरलं! गुरुदेवांचा श्वास पूर्ववत मंदपणे लयबद्ध चालू झाला!

किरणांचे चटके हातांवर झेलत मी नि:श्वास सोडला!... वाटत होतं की, गरगर धावणारी नियती इथंच कुठंतरी अशीच थांबावी. अन्यायी आणि अत्याचारी नराधमांना आपल्या परशूनं कंठस्नान घालणारा तो वीर योद्धा माझ्या मांडीवर तसाच शांत निद्रा घेत पहुडावा! अनंत काळ!

त्यांनी शेजारी ठेवलेल्या परशूच्या धारदार पात्यावर श्रद्धेनं मी दृष्टी टाकली. त्यावर एक तीक्ष्ण दातांचा काळा कीटक आपल्या पायांची वळवळ करीत फिरत होता! त्याच्या शरीर रचनेवरून तो लाकडं पोखरणारा तीक्ष्ण दातांचा 'अलर्क' कीटक होता हे मी ओळखलं! करमणूक म्हणून मी त्या क्षुद्र कीटकाच्या हालचाली बसल्याबसल्याच एकटक न्याहाळू लागलो. परशूच्या पात्यावर त्यानं एक-दोन मंडलं सहज घेतली! ती पाहताना मला वाटलं प्रत्येक माणसाचं जीवन हे त्या कीटकासारखंच असतं! जगाच्या परशूवर ते अशीच मंडलं घेत असतं!

एकाएकी तो अलर्क परशूच्या धारेवरून खाली घसरला! मी भगवान

परशुरामांच्या मस्तकाखाली दिलेल्या माझ्या मांडीच्या रोखानंच हळूहळू सरकू लागला! हातांनी त्याला तसाच दूर उडवून लावावा असा एक विचार आला; पण त्यामुळे माझं शरीर हललं असतं आणि वरची प्रखर किरणं निसटून गुरुदेवांच्या मुखावर पडली असती. त्यांचा निद्राभंग झाला असता! 'निद्रा आणि वचन कधीच अपूर्ण राहू देऊ नयेत! तुझी, मी हीच गुरुदक्षिणा मानतो!' हे त्यांचे उद्गार कानांत घुमत होते! तसाच निश्चल बसून राहिलो! येईल त्या प्रसंगाला तोंड देण्याच्या खंबीर निर्धारानं!

हळूहळू अलर्क सरळ माझ्या अगदी मांडीखाली आला! भगवी वस्त्रं कुरतडून त्यानं आपले तीक्ष्ण दात माझ्या मांडीच्या कातडयात कचकन घुसविले! असह्य वेदनेची एक तीव्र सणक मांडीतून सर्रकन तरळून मस्तकापर्यंत गेली! या वेळी अंगावर अभेद्य कवच असतं तर किती बरं होतं, असंही क्षणभर प्रकर्षानं वाटलं, पण तो विचार मी झटकून टाकला! यापुढचं सर्व जीवन मला केवळ कर्ण म्हणून धैर्यानं जगायचं होतं! स्वत:च्या पराक्रमावर! असं असतं तर आणि तसं नसतं तर असं रडगाणं गायचं नव्हतं! अलर्क मांडीची एकलगीनं नसन्नस कुरतडू लागला. रक्तप्रवाहानं भगव्या वस्त्रांचा वर्ण रक्ताळ झाला! वेदनेचे असंख्य बाण मांडीकडून निघून क्षणाक्षणाला मस्तकात घुसू लागले! कवच दान करताना झाल्या नव्हत्या एवढ्या त्या यातना भयाण होत्या! डोळे मिटून, ओठ दातांखाली रगडत त्या सहन केल्याशिवाय गुरुदक्षिणा पूर्ण होणार नव्हती! भ्रमरानं वृक्षाची फांदी पोखरावी तसा तो अलर्क कणाकणांनी माझी मांडी पोखरत होता! जे रक्त वारणावताच्या घनदाट अरण्यातील क्रूर वाघाला पिता आलं नव्हतं, ते तो क्षुद्र कीटक मनसोक्त पीत होता! सूतभरही हलता येत नव्हतं! मनाचा निर्धार आणि शरीराच्या वेदना यांची एवढी घनघोर स्पर्धा माझ्या जीवनात प्रथमच सुरू झाली होती! हा सत्वपरीक्षेचा क्षण होता! निर्धाराचा क्षण होता! सहनशीलतेची परीक्षा बघणारा क्षण होता! मनाच्या समतोलाचा क्षण होता! मांडीची नसन्नस फोडून रक्ताचा जीवनरस पीत अलर्क कणाकणांनी पुढं-पुढंच सरकत होता.

तीव्र यातनांनी रक्ताचं पाणी होऊन घामाच्या रूपात माझ्या कपाळावर दाटलं! ते निपटण्यासाठीसुद्धा हात हलविता येत नव्हते! घाम आणि रक्त! त्या दोहोंशिवाय गुरुदक्षिणा म्हणून भगवान परशुरामांना मी अधिक मौल्यवान असं काय देऊ शकलो असतो? ते विचारण्यासाठी म्हणूनच रक्ताचा एक लोट सरळ वाहत-वाहत परशूच्या पात्याच्या धारेपर्यंत गेला! क्षणात त्यानं परशूचं पातं माखून टाकलं! धार अदृश्य झाली! अलर्कानं माझी मांडी पूर्णपणे पोखरून माझ्या भवितव्यालाच एक छिद्र पाडलं! छिद्रातून मांडीवर येऊन तो भगवानांच्या दाढीच्या केसांत वळवळू लागला! आता त्यांचा निद्राभंग होणार म्हणून माझे ओठ थरथरू लागले! तो अलर्क त्यांच्याही शरीरावर चाल करणार होता की काय? एक क्षुद्र कीटक दोन जिवांचा जिव्हाळा पोखरणार होता की काय? त्यानं गुरुदेवांच्या शरीराला स्पर्शू नये म्हणून आकाशाकडे पाहत मी सर्वशक्तिमान सूर्यदेवांना प्रार्थू लागलो! एकाएकी माझ्या मांडीतून वाहणाऱ्या उष्ण रक्ताच्या स्पर्शानं गुरुदेव खडबडून जागे झाले!

आपल्या दाढीत वळवळणारा तो अलर्क त्यांनी झटकून टाकला! माझ्या मनात भावनांचं एवढं प्रचंड आंदोलन चाललं होतं की, ते साकार करणारे शब्दच मला सुचेनात! आता भगवान म्हणणार होते की, "भार्गव, जगात अनेक शिष्य झाले, होतीलही! पण तुझी गुरुदक्षिणा धन्य आहे!" पण – पण तसं काहीच घडलं नाही!

गुरुदेवांच्या लक्षात सारा प्रकार क्षणार्धात आला असावा. रक्तात माखलेला आपला परशू उचलताना त्यांनी भुवयांचे केस जटेत मिसळतील इतकं कपाळाचं कातडं ताणून विचारलं, ‘‘इतकी सहनशीलता? एवढं आत्मसंयमन? भार्गव, बोल! तू कुठल्या कुलातील आहेस?”

“भृगूऽ!” मी रक्ताच्या थारोळ्यातून मांडी उचलताना उत्तर दिलं! रक्ताळलेल्या मांडीपेक्षा ते उत्तर देताना माझं मन रक्ताळलेलं होतं!

‘‘असत्य! तू ब्रह्मकुमार नाहीस! एवढी हिमगिरीची सहनशीलता ब्रह्मकुमारात असूच शकत नाही! कुठल्या क्षत्रिय कुलातील आहेस तू? सांग! खरं बोल!”

‘‘मी... मी क्षत्रियकुलातील नाही! मी कर्ण आहे! सूतपुत्र!” मांडी पोखरली जात असताही केला नव्हता एवढा निर्धार करून मी बोललो. काय व्हायचं असेल ते होईल! परशूची धार मस्तकावर कोसळेल! प्राणाचं पाखरू शरीराचा पंजर सोडून निघून जाईल! क्रुद्ध परशुराम परशूचा प्रहार मस्तकात घालतील! भाग्याचा मृत्यू परशूच्या धारेनं स्वर्गाची वाट दाखवील.

‘‘कर्ण, हस्तिनापूरचा कवच-कुंडलधारी तो तूच कर्ण काय? इंद्राला कवच-कुंडलांचं दान करणारा तो तूच कर्ण?”

‘‘होय! आता कवच नाही अन् कुंडलंही नाहीत. इंद्राला मी ती देऊन टाकलीत अलर्कानं मांडी फोडावी म्हणून!”

‘‘दानात सम्राट ठरलेल्या कर्णा, या परशुरामाच्या आश्रमात येण्याचं धैर्य कसं काय केलंस तू? असत्य का बोललास तू? बोल! नाही तर जाळून भस्म करीन तुझं इथं आणि फेकून देईन पूर्वसागराच्या फेसाळत्या लाटांत!” त्यांचे नेत्र आरक्त झाले होते. क्रोधाग्नीचा वर्षाव करीत होते.

‘‘भगवान, मृत्यूच्या भयानं कर्ण कधीच विव्हल होत नाही! ब्रह्मास्त्रासाठी मी गुरू द्रोणांच्या द्वारात गेलो, त्यांनी मला मी क्षत्रिय नाही म्हणून नाकारलं! तुमच्या द्वारी उभा राहिलो, तुम्ही ब्रह्मकुमाराशिवाय कुणालाही ब्रह्मास्त्र देण्यास तयार नाही! मग – मग आम्ही सूतांनी कुठं जावं? सत्य आणि असत्य काय? ते काय उच्च कुलातील लोकांच्या गोठ्यात बांधून ठेवलेलं जनावर आहे? सांगा, मी असत्य कसा?’’

‘‘कर्णा, तू आणि तूच समोर आहेस म्हणूनच मी माझा सात्त्विक क्रोध सावरतो आहे! लक्षात ठेव असत्य ते असत्यच! ज्या ब्रह्मास्त्रासाठी तुला, मलाही असत्य सांगण्याची दुर्बुद्धी झाली ते ब्रह्मास्त्र तुला ऐन युद्धप्रसंगी स्मरणार नाही! जा, चालता हो! महेंद्राच्या सीमा सोडून परशुरामाच्या क्रोधाग्नीच्या कक्षेबाहेर जा! चालता हो!’’

त्यांनी पायथ्याकडे बोट उचलून मला आज्ञा केली. आपल्या हातातील परशूवरचे रक्ताचे डाग पुसण्याचा ते प्रयत्न करीत होते, पण ते जात नव्हते! जाणार नव्हते!

रक्ताळलेली मांडी आणि कोंदटलेलं मन घेऊन जखमी व्याघ्रासारखा मी महेंद्राची उतरण उतरू लागलो! कोणत्या कल्पनेनं हस्तिनापूर सोडून मी इथं आलो होतो आणि काय हस्तगत करून परतत होतो? जीवन हे एक अराजक आहे! कीटकाच्या रूपानं आज त्यानं कर्णाच्या दिग्विजयाला, दानशूरत्वाला पोखरलं नव्हतं काय? मांडीतून ठिबकणाऱ्या रक्ताची मला शुद्ध नव्हती! अंगावरच्या मळकट माखलेल्या भगव्या वस्त्रांची शुद्ध नव्हती! महेंद्राची निळी शिखरं दुरूनच साजरी होती! ती मागं पडताहेत

म्हणून खेद होत नव्हता! विचारांचे अश्व मनाच्या पटांगणावर उधळले होते! महेंद्राची उतरण केव्हा उतरलो ते समजलंही नाही! ज्या कृषिजनाकडे वायुजिताला सोपविला होता त्याच्या पर्णकुटीसमोर उभा राहून वायुजिताला हाती घेताना त्यानं माझी कानांची पाळी निरखून पाहिली म्हणून मांडीतील छिद्र त्याला दाखवून म्हणालो, ‘‘ही एक खूण आणखी लक्षात ठेव हवी तर, पण माझा घोडा दे सत्वर!’’

‘‘संन्याशा, थांब! तुझ्या जखमेवर औषधी वनस्पतीचा रस सोडू या!’’ तो भाबडा कृषिजन हात उंचावून विनवीत होता. त्याचे शब्द माझ्या कानांत घुसतच नव्हते. हस्तिनापुराकडे उधळलेल्या वायुजिताच्या खुरांखाली उडणारी धूळ मांडीवरच्या जखमेवर साचत होती!

**

# आठ

शापित विद्या आणि भग्न हृदय घेऊन हस्तिनापुरात शिरताना मनाची तयारी केली. संकटाशिवाय, प्रतिकूलतेशिवाय कुणाच्याही पराक्रमाची परीक्षा होत नसते. या अवस्थेतही अर्जुनाला चीत करीनच करीन, ही मनाची उभारी सुटली नव्हती. आपल्या संकटांचं अरण्यरुदन करून काय उपयोग? वीर असतात ते प्रतिकूल अवस्थेतही निष्प्रभ होत नाहीत! संकटांच्या माथ्यावर पाय देऊन उभे राहू शकतात!

पुढं होऊन वायुजिताचे वेग हाती धरताना सत्यसेन डोळे विस्फारून माझ्याकडं पाहत होता. नगरातील कुणीही मला, अंगावरच्या भगव्या वस्त्रांमुळे ओळखू शकत नव्हता! दोन वर्षांनंतर हस्तिनापुरात प्रवेशत होतो! जाताना राजवस्त्रं होती, आता मात्र काषाय वस्त्रं घेऊन परत आलो होतो!

"सत्यसेन, युवराज दुर्योधन नगरात आहेत काय? असल्यास त्याला मी आल्याचं सांग!" पायदंड्या चढतानाच मी त्याला आज्ञा दिली. माझं रक्त राजवास्तूच्या पायदंड्यांना पहिल्यानंच लागत होतं.

आता मला सगळं विसरायचं होतं! जीवन मागं वळून बघणाऱ्यांच्या समोर नेहमी दऱ्या निर्माण करतं! कुठल्याही प्रसंगांचे ठसे आता हृत्पटलावर नको होते! भूतकालात मी कोण होतो, काय होतो याचा विचारही मला करायचा नव्हता! मी आज कसा आहे? पुढं कसा राहीन? हे ठरविण्याचा काल येऊन ठेपला होता! निकरानं झुंजण्याचा!

भगवी वस्त्रं उतरून राजवस्त्रं परिधान केली! वृषालीनं कसलीतरी वनस्पती आणवून घेऊन तिचा रस मांडीच्या जखमेवर ओतला. चोथा तसाच मांडीवर थापला. अंगावरच्या अंशुकाच्या पदराचा शेव झटकन फाडून त्या पट्टीनं मांडी बांधली! नेहमीसारखं "जखम कसली!" असं चौकसपणानं तिनं विचारलं नाही! ती सुज्ञ पत्नी होती. प्रवासानं थकलेल्या पतीला डोळाभर पाहूनच समाधान मानावं, हे ती वयाच्या अनुभवानं आता शिकली होती! किती प्रौढ दिसत होती ती! तिची सोबत माझ्या जीवनातल्या अनेक जखमांना अशीच पट्टी बांधत आली होती! तीन तपांची वाटचाल, मी तिचा हात हातात धरून केली होती! येईल त्या दु:खाचा पलिता मी तिच्या प्रेमाच्या चषकात बुडवून विझविला होता.

"वृषाली, माता-पिता, शोण, पुत्र-स्नुषा सर्व कुशल आहेत ना?" तिनं मला जखमेबद्दल काही विचारू नये म्हणून मीच तिला विचारलं!

"होय! सर्वांना आपल्याच कुशलतेची चिंता होती! वृषसेन, सुषेण, सुशर्मा यांना तर आपण ओळखणारच नाही इतके ते या दोन वर्षांत वाढले आहेत! आणि – आणि वृषकेतु तर आपल्यासारखाच नित्यनेमानं गंगाकिनारी जातो! अर्घ्यदानासाठी!" माझ्या हाती दुधाचा चषक देत ती म्हणाली.

"वृषाली, माता घडवील तेच पुत्राचं जीवन असतं! या दुधासारखं! शर्करा टाकावी अमृत होईल त्याचं! पण क्षार टाकला तर – तर नासेल ते! आपल्या पुत्रांचं संगोपन तुझ्यासारखी प्रेमळ माता करताना ते शूर आणि विजयी नाही झाले तरच

नवल!'' मी दुधाचा चषक रिता केला. इतक्यात सत्यसेनाचा संदेश मिळालेला दुर्योधन हातावरून घसरणारं उत्तरीय सावरीत झपझप चालत कक्षात आला.

''प्रणाम वहिनी!" त्यानं वृषालीला अभिवादन केलं. ते स्वीकारून वृषाली निघून गेली.

''अंगराज, ब्रह्मास्त्र?" त्यानं पहिलाच प्रश्न केला!

''युवराज, ब्रह्मास्त्र प्राप्त केल्याशिवाय मी कसा परतेन!" त्याला आधार देताना माझं अंतरंग खोलवर कुठंतरी सलत होतं.

''जय हो! साधू! आता पांडवांचा नक्षा उतरवायला अधिक काल लागणार नाही! आजपासूनच बारा वर्षांचा वनवास संपवून ते एक वर्षाच्या अज्ञातवासावर निघाले आहेत!"

''मग – मग तुझे गुप्त हेर त्यांच्याभोवती आजपासून पेरून टाक! या वर्षात त्यांना शोधून काढलं की, पुन्हा बारा वर्षांचा वनवास येईल त्यांच्या वाट्याला!" माझ्यासमोर इंद्राला पुढं करून, अर्जुनाला सरंक्षण देणाऱ्या पांडवांच्या कुटिल राजनीतीचा अनुभव जिवंत होता. जीवन तत्त्वज्ञानावर कधीच चालत नसतं, त्यासाठी व्यवहाराची कास धरावी लागते.

''कर्ण, आपल्या सेनेतील सर्व कुशल गुप्त दूत केव्हाच चोहोदिशांना गेलेले आहेत! प्रत्येक राज्यात, अरण्यात, वृजनात, नगरात, तीर्थक्षेत्रात इतकंच काय; पण गुहेतसुद्धा पांडवांना शोधून काढण्यासाठी ते जिवाचं रान करतील! पांडवांचा पाठपुरावा करण्यासाठी मी तळमळतो आहे, पण – पण घरभेद्यांनी त्यांना पाठीशी घातलं आहे! पितामह, महामंत्री विदुर, अमात्य आणि गुरू द्रोण हे सर्वच दिसतात तसे नाहीत! इथली सर्व वार्ता दररोज पांडवांना अचूक कळत असली पाहिजे! ' '

''युवराज, फार तर काय होईल? पांडव प्रकटतील! युद्धाचं आव्हान देतील! ते स्वीकारण्याचं सामर्थ्य ह्या दंडात असताना कोणीच तुझं अनिष्ट करणार नाही!"

''अंगराज, तुझ्या सामर्थ्यावरच तर मी उभा आहे! तसा प्रसंग आलाच, तर तूच कुरूंचा पहिला सेनापती होण्यास सर्वथैव योग्य ठरशील!''

''बस्स, याच निर्धारानं वाग! तुला दिलेलं वचन मीही पूर्ण करीन! अर्जुनाला वधिल्याशिवाय मी कधीही माझे पाय धुणार नाही!"

''चलतो मी. तू विश्रांती घे." तो उठला आणि हत्तीच्या मत्त चालीनं कक्षाबाहेर गेला. मला अंगराज करून माझ्या जीवनात क्रांतिमय बदल करणारा तो वीर योद्धा होता.

अज्ञातवासाचं एक वर्ष! गवाक्षातून गंगेच्या पात्राकडे पाहत मी विचार करू लागलो. सहा कारंडव पक्षयांचा एक थवा पात्रावरून आकाशात उडाला! पूर्व दिशा धरून झेपावू लागला. मात्र त्यातील एक मध्येच मागं रेंगाळला! फडफडत चोच वळवून तो सरळ राजवाड्याच्या दिशेनं पश्चिमेची बाजू धरून उलट गतीनं झेपावत येऊ लागला! थव्यातील पाचांपासून तो प्रत्येक क्षणाक्षणाला उलट गतीनं दूरदूर येत होता! मी गवाक्षाचं कवाड लोटून घेतलं!

अज्ञातवासाचं एक वर्ष! तसं पाहिलं तर प्रत्येकाचं जीवन हाच एक अज्ञातवास असतो! दुःखापासून दूर जाण्यासाठी पत्करलेला! पण अधिक प्रभावी दुःखांनी घेरलेला! माझं जीवनही तसंच होतं. पंचाहत्तर वर्षांचा हा दीर्घ पट्टा घटनांची, भावनांची,

उत्कर्षापकर्षाची किती अवघड वळणं घेऊन आला होता! कशाची कशाला संगती लागत नव्हती. पुढं तरी कधी ती लागणार होती की नाही? कोण जाणे!

**

# नऊ

महिन्यांमागून महिने जात होते; पण पांडवांचा शोध कुठल्याच गुप्त दूतांना काही लागत नव्हता. भीमाच्या जाणिवेनं दुर्योधन तर अस्वस्थ झाला होता. कांबोज, काश्मीर, गांधार, पंचनद, सिंध, कुलिंद, तंगण, विदेह, पांचाल, कोसल, किरात, वंग, मगध, चेदी, दशार्ण कलिंग, विदर्भ, अवंती, द्वारका, सुराष्ट्र, आनर्त, मथुरा, विराट अशा सर्व राज्यांतील पूर्वीच्या गुप्त दूतांना मदत म्हणून त्यानं अनेक पथकांनी नवे दूत देशोदेशी धाडले. वेष पालटून ते त्या-त्या राज्यात पांडवांचा कसून शोध घेत होते. नकाराचं कटू निवेदन दर सप्ताहाला राजवाड्यावर येऊन थडकत होतं! दुर्योधनाची अस्वस्थता वाढतच होती. संदेहाचे मेघ दाटत होते.

द्वारकेत तर काही दूतांनी श्रीकृष्णाच्या कक्षातील सेवकांची जागासुद्धा हस्तगत केली होती! त्यांच्या गुप्त निवेदनानुसार गांधारपर्यंत स्वत: दुर्योधन जाऊन आला होता! त्याला एवंढही समजू शकलं नाही की, श्रीकृष्ण त्याची दिशाभूल करणं शक्य होतं.

एकदा तर द्वारकेच्या दूताकडून निवेदन आलं की, पांडव विराटराज्यात विराटनगरातच कुठंतरी लपले आहेत! त्याप्रमाणं दुर्योधन त्यांच्या शोधासाठी तिकडे जायला निघालाही! विराटांचा मत्स्यदेश तर हस्तिनापूरच्या सर्वांत नजीकचा देश होता. तिथं राहायचा धोका पांडव पत्करू शकले नसते! केवळ यमुना पार केली की, विराटाचं राज्य असताना तेवढं धैर्य कसं करतील? माझा कयास होता की, पांडव हिमालयात कुठंतरी लपले असावेत! निर्जन, थंड गुहेत! त्यासाठी हिमालयातील दरीखोरी, गुहा धुंडाळण्यात आल्या. धर्मारण्य, नैमिषारण्य, वारणावत, सर्व अरण्यं पालथी घालण्यात आली. सोम, पारियात्र, विंध्य, निषाध, गोवर्धन शुक्तिमत, मेकल, ॠक्ष, मल्ल, गंधमादन सर्व पर्वतांवर भटकून दूत थकले. गौतम, जन्हू, दुर्वास, वाल्मीकी वसिष्ठ, घोर आंगिरस, कश्यप, भृगू, च्यवन, हरित आणि ॠष्यशृंग या ॠषींच्या नावांवर चाललेल्या आश्रमांत, शिष्यगणांत कुठंतरी पांडव लपले असतील, या कल्पनेनं ते-ते आश्रमही कसून धुंडाळण्यात आले. कुठंच पांडवाचा शोध लागत नव्हता! अर्जुनासाठी कवच-कुंडलांचं दान मागायला येणाऱ्या देवेद्रांनं भयामुळे त्यांना स्वर्गात तर लपवून ठेवलं नसेल ना, अशी शंका मनाला स्पर्शून जात होती!

हस्तिनापुरात प्रभंजन तर विदुरांच्या पर्णकुटीवर दृष्टी ठेवून ठाण मांडूनच बसला होता! आपल्या राजमातेला भेटण्यासाठी म्हणून केव्हातरी पांडव येतील, काही नाही तरी एखादा संदेश कुणाकरवी धाडतील! पण तेही घडत नव्हतं! ते नष्ट तर झाले नसावेत? असं वाटावं इतका संशय निर्माण झाला! अज्ञातवासाचं वर्षही संपत आलं. एक-दोन दिवस राहिले आणि सर्वांना धक्का देणारी वार्ता विराटनगराच्या गुप्त दूतानं हस्तिनापुराकडे पाठविली. विराटांचा सेनापती कीचक याचा कुणीतरी मुष्टियुद्धात नुसत्या बुक्क्यांनीच वध केल्याची ती वार्ता होती! अविश्वसनीय वाटणारी ती वार्ता ऐकताच मत्स्यदेशी दिग्विजयात माझ्याशी लढलेला धिप्पाड कीचक डोळ्यांसमोर उभा राहिला! त्याला मारण्याचं सामर्थ्य एकट्या भीमातच काय ते होतं? भीम विराटनगरातच

असला पाहिजे! आणि अर्जुनही! – विचारांची चक्रं भराभर धावू लागली!

दुर्योधनानं तत्काळ तातडीची राजसभा बोलाविली. अश्वत्थाम्यासह सर्वांना कुरूंच्या अन्नाला जागण्याचं भावनामय आवाहन करण्यात आलं. सर्वांनुमते विराटांच्या गौळीवाड्यातील शेकडो गायी हरण करण्याच्या निमित्तानं विराटनगरावर चढाई करण्याचा निर्णय घेण्यात आला. गायींसाठी पांडव अज्ञातवास विसरूनही प्रकट झाले असते. ते मग वचनभंगाच्या कैचीत सापडणार होते! पुन्हा त्यांना वनवासावर जावं लागणार होतं!

एकाएकी रणवाद्यं वाजू लागली. कुरूंचं लक्ष-लक्ष सैन्य राजवाड्यासमोरच्या भव्य पटांगणात एकत्र झालं. पूर्वी माझ्याबरोबर दिग्विजयासाठी धावणारं ते सैन्य आज गोहरणासाठी धावायला सिद्ध झालं होतं! काहीतरी चुकत होतं! माझ्या मनाचा सखोल कप्पा संभ्रमित झाला होता! जीवनाची नौका कुठंतरी डगमगत होती! भटकत होती! आम्ही कुठं जाणार हे दुर्योधन आणि मी याशिवाय कुणालाही माहीत नव्हतं.

"विराटनगर!" सेनापती दुर्योधनानं आपले हात उंचावून सैन्याला आक्रमणाची दिशा दाखवली. लाखो घोड्यांचे वेग हिसकले गेले! शंखांचे ध्वनी निनादले.

"युवराज दुर्योधनांचाऽऽ!"

"विजय असो!" गगनभेदी आरोळ्या निनादू लागल्या. त्या किती उंच गेल्या आहेत हे ताडण्यासाठी मी वायुजितावरून मान उंचावली! राजवाड्याच्या शुभ्र सौधावर एक शुभ्रकेशांकित वृद्ध सचिंत उभा असलेला मला दिसला! पितामह भीष्म हनुवटीला हात टेकवून उभे होते! आकाशाच्या कधीही न पाझरलेल्या पोकळीकडे पाहत! आपल्या शब्दाला कुरूंच्या राजसभेत कवडीमोलाचंही स्थान आता न राहिल्याची खंत करीत!

अश्वत्थामा, मामा, दुःशासन, शोण आणि मी सर्व जण एक-एक सेनापथकाच्या अग्रभागी राहून विराटनगराच्या दिशेनं दौडू लागलो. सर्वांच्या पुढं खड्ग उपसून दुर्योधन होता! पितामहांचं वृद्ध नेतृत्व आता कुणालाच मान्य नव्हतं! शालवृक्षासारखा दुर्योधनच त्यासाठी योग्य होता!

आपल्यावर आक्रमण होईल याची कल्पनाही नसलेले विराट असावध होते! आपल्या दैनंदिन जीवनक्रमात गढले होते. दुःशासनाची अश्वसादसेना, ती संधी साधून, बाणासारखी विराटांच्या गौळीवाड्याकडे घुसली! हजारो गायींच्या कंठातील कंठबंध कचाकच तोडण्यात आले! घोड्यांच्या खुरांच्या टपटपीनं भेदरलेल्या सहस्त्र-सहस्त्र गायी हंबरडा फोडत, दुःशासनाचे सैनिक हाकतील तशा, शिंगावर शिंग आपटत गौळीवाड्यातून कुंपणं तोडून बाहेर पडल्या! पांढऱ्या, काळ्या, राकट, ताम्रट अनेक वर्णांच्या भरदार पुष्ट कासंडीच्या त्या सहस्त्र गायी सभोवतीनं घेरून दुःशासनाचं अश्वसैन्य विराटांच्या सीमेबाहेर पडलं! त्यांच्या खुरांखाली कुरणंच्या कुरणं उद्ध्वस्त होऊ लागली.

आपलं गोधन हरण केलं जात आहे, हे पाहून विराटांनी कलकलत सैन्याची जमवाजमव केली होती! शंख, आनक, नगारे यांचे ध्वनी गर्जू लागले. आमचा पाठपुरावा करीत विराट मागून धावू लागला.

एका कुरणातील एक विशाल शमीचा वृक्ष मागं टाकून आम्ही विराट आणि हस्तिनापूर यांच्या सीमा दाखविणाऱ्या युमनेच्या तीरावर आलो! आता यमुना ओलांडली की हस्तिनापूर होतं! केवळ एक नदीच मध्ये होती!

एकाएकी वळीव पावसानं आकाश भरून यावं तसे शेकडो बाण आमच्या सैन्याच्या मागून झेपावत येऊन चित्ररथ पक्षयासारखे यमुनेच्या किनाऱ्यावर अचूक उतरू लागले! सगळ्या किनाऱ्याला घेरणारं एक भक्कम कुंपणच त्या बाणांनी क्षणात समोर उभं केलं! ते कुंपण पाहून, धावून-धावून थकलेल्या गायी बिथरल्या आणि तोंड वळवून पुन्हा उलट दिशेनं विराटांच्या नगराकडेच धावू लागल्या! आमचे सर्व सेनाप्रमुख त्यांना थोपविण्यासाठी त्यांच्यामागून पुन्हा परतले. समोर विराटांचं सैन्य उभं होतं! अग्रभागी निळसर वर्णाचा एक सारथी उभा होता! तो सारथी होता की सेनापती हेच कळत नव्हतं! एकसारखे अनवरत बाण तो फेकत होता! मी त्याला निरखून पाहिलं. तो अर्जुनच होता! तेरा वर्षांनंतर माझ्यासमोर उभा ठाकलेला माझा शत्रू!

अर्जुन! माझ्या जीवनसरितेला जागजागी बांध घालणारा! माझ्या सुदामनच्या कोवळ्या देहाला चिरणारा! नीलकमलांची माला स्वत:च्या कंठात घालून मिरवणारा!

"अर्जुना, थांब!"

धनुष्य सरसावून मी त्याच्यावर धावलो! डाव्या हाताकडून शोण आणि उजवीकडून अश्वत्थामा मला संरक्षण देत पुढं सरसावले! बाणाला बाण भिडले! ठिणग्यांचे तारे दिवसा चमकू लागले! एक घटका मागं पडली. दोन्ही सैन्यांच्या रणधुमाळीमुळे गोंधळलेल्या गायी इतस्तत: पांगून शेजारच्या अरण्यात आश्रयासाठी निघून गेल्या होत्या. युद्धाचा निर्णय लागत नव्हता. सूर्यदेव तळपतच होते.

एकाएकी आमच्या सर्व सैन्याच्या दिशेनं गुंगी आणणारा मादक असा सुगंध असलेले वारे वाहू लागले! सैनिकांच्या नाकांत ते शिरताच उभ्यानंच ते धडाधड खाली कोसळू लागले! तो अर्जुनानं सोडलेल्या संमोहास्त्राचा परिणाम होता. संमोहास्त्र! गुंगी आणणाऱ्या मादक वायूचा मारा करणारं अस्त्र! लाकडी नलिकांमध्ये ठासून भरलेल्या मोहाच्या फुलांच्या चूर्णाचा फुंकर घालून अर्जुन पर्जन्य वर्षावत होता. त्यावर कुठलं अस्त्र योजावं हे आठवू लागलो. माझ्या भोवतीचं विश्वही गरगरू लागलं! हातातील धनुष्य गळून पडलं. रथनीडावर मस्तक आदळत मीही धाडकन खाली कोसळलो! जाणीव नष्ट झाली!

जेव्हा जागृत झालो तेव्हा अश्वत्थामा माझ्या मुखावर पाण्याचा शिडकावा करताना समोर प्रथम दिसला. ताडकन उठून मी सभोवार दृष्टी फेकली. माळरानावर पाषाण इतस्तत: पडावे तसे सहस्त्रावधी कुरुसैनिक निश्चेष्ट पडले होते! सर्वांच्या अंगांवरची विविधवर्णी उत्तरीयं कुणीतरी हिसकावून घेतली होती! माझ्या अंगावरही माझं निळं उत्तरीय नव्हतं! चिखलात रुतलेल्या हत्तीसारखा वीर दुर्योधन विराटांच्या सीमेतील कुरणावर पालथा पडला होता! अश्वत्थामा सर्वांच्या मुखावर शिरस्त्राणातील पाण्याचा शिडकावा करून त्यांना जागृत करण्याचा यत्न करीत होता! अपमानाच्या, अपयशाच्या, मार्गच्युत जीवनाच्या जाणिवेनं माझं हृदय तीळ-तीळ तुटू लागलं. अश्वत्थाम्यानं मला जागृत केलं नसतं तर? मूर्च्छितावस्थेतील अबोध नीरवतेत मी तसाच पडून राहिलो असतो तरी बरं होतं! अपयशापेक्षा मूर्च्छा बरी! तिथं जाणिवेचे कटू अंकुश नसतात!

एकाएकी हातातील यमुनेचं पाणी भरलेलं शिरस्त्राण फेकून देत, अश्वत्थामा हृदय फाडण्यासारखं किंचाळला! शेपूट तुटलेल्या शार्दूलासारखी ती आर्त किंकाळी होती!

“कर्णऽऽ धाव!”

काय झालं? भीतीचं खड्ग कंठावरून फिरल्याचा मला भास झाला! आत्म्याच्या अमरत्वाचं तत्त्वज्ञान वेळोवेळी मला ऐकविणारा तो प्रज्ञावंत, गुरुपुत्र, अश्वत्थामा असा का किंचाळला? शरीराचं नश्वरत्व सांगणारा तो बुद्धिमंत का कळवळला?

मधल्या सैनिकांच्या मूर्च्छित देहांवरून पटापट उड्या घेत मी त्याला गाठलं. समोरचं दृश्य पाहून माझ्या शरीरातील रक्ताचा कणन्कण थंड पडतो की काय असंच मला वाटू लागलं! संमोहास्त्र नसतानाही मूर्च्छा येऊ लागली! धरतीचा विशाल पटल बाणाच्या पात्याएवढा क्षुल्लक वाटू लागला! माझ्या प्राणप्रिय बंधूचं ‘वसुदादा वसुदादा’ म्हणणारं मुखकमल अर्जुनानं धडापासून विलग करून धुळीत फेकलं होतं!! जीवनाच्या सुखदु:खांचा तो माझा एकमेव साथीदार अचेतन झाला होता! कवच-कुंडलांचं अन्यायीपणे नेलेलं आपल्या दादाचं धन पुन्हा प्राप्त करण्यासाठी स्वर्गाची दारं ठोठावत होता!

आता वसुदादाचा जैत्ररथ कोण हाकणार होतं? ‘मला सोडून कुठं चाललास? ’ म्हणून रथामागून हात उंचावीत कोण धावणार होतं? ‘वहिनी, वहिनी’ म्हणून वृषालीमागून अजाण बालकासारखं नित्य कोण घोटाळणार होतं? गंगेवर विसावलेलं माझं उत्तरीय रणरणत्या उन्हातून जाऊन आता कोण आणणार होतं? दानाच्या वस्तू हसतमुखानं कोण माझ्या हाती देणार होतं? राधामातेच्या डाव्या कुशीत आता कोण बिलगणार होतं? अपूपांचा आग्रह करून कोण माझ्या सांगाती भोजन घेणार होतं? मेघमाला आणि मीनाक्षी यांना वसुदादाचं प्रेम कोण पटवून सांगणार होतं? ‘दादा, तुझी कुंडलं निस्तेज पडलीत!’ असं कळवळून मला कोण सावध करणार होतं? माझ्या पायांना हातांचा घट्ट विळखा घालून ‘दादाऽ, नको की रे करूस दान कवच- कुंडलं’ असं कोण म्हणणार होतं? क्षणापूर्वी घोड्यावर बसून खड्ग फिरविणारा माझा शोण खुरांखालच्या धुळीत पडला होता! टळटळीत प्रकाश असूनही मला घनघोर अंधारल्यासारखं वाटू लागलं! डोळ्यांवर विश्वासच बसत नव्हता. मुख शुष्क झालं होतं. मस्तक बधिर झालं होतं.

“अश्वत्थामन्, शोण गेला!” गुरुपुत्राच्या खांद्यावर मस्तक टेकवून असाहाय्यपणे मी स्फुंदू लागलो! माझ्या जीवनाच्या रथाचं एक चक्रच उखडून गेलं होतं! आता खुरडत, रखडत चलायचं! जगण्यासाठी जगायचं!

‘दादा, तू जाशील का रे गरुड पक्षयासारखा उंच-उंच? ’ असं म्हणणाऱ्या शोणा, आज तूच कुठं उंच गेलास? कधीही न दिसण्यासाठी!

“कर्ण, शांत हो!” गुरुपुत्र आपले डोळे निपटत माझं सांत्वन करण्याचा व्यर्थ प्रयत्न करू लागला!

या नगरातच दिग्विजयाच्या प्रसंगी शोणाचं शिरस्त्राण खाली पडलं होतं! एका हत्तीच्या पायाखाली सापडून दामटलं होतं, या जाणिवेनं तर हृदयाच्या चिंधड्या होऊन विखुरताहेत, असं मला वाटू लागलं! त्याचं गोल गौरवर्णी शिर पक्व कोकम फल गळून पडावं तसं कसंतरीच धुळीत पडलं होतं! निष्प्राण धड लाकडाच्या ओडक्यासारखं धुळीला कवटाळीत पडलं होतं!

खाली वाकून हळुवार हातांनी मी त्याचं मस्तक उचलून घेतलं! अश्रूंचा लोट माझ्या नेत्रांतून पाझरू लागला. त्याच्या विशाल कपाळाचं आवेगानं अवघ्राण करून

मी कळवळत म्हणालो, "शोण, एकदा... एकदाच मला 'वसुदादा ' म्हणून हाक मार! स्वर्गाची द्वारं फोडून मी तुला परत आणीन!" पण तो बोलत नव्हता. बोलणार नव्हता. त्याच्या शरीरात थोडी जरी धुकधुक असती तरी, 'दादा, वायुजिताच्या खुरांवर नित्य औषधी रस सोडत जा! तुझा तो दिव्य मुकुट भूषणागारात सुरक्षित आहे! राधामातेला सांभाळ! वृषालीवहिनींना माझा शेवटचा प्रेमपूर्ण प्रणाम सांग! गंगामातेच्या काठी मी गोळा केलेले माझे बालपणीचे शिंपले, मीनाक्षीच्या पुत्राला दे! आणि... आणि दुसऱ्या कुणालाही सारथी म्हणून आपल्या रथावर नेमू नकोस! मी तुझ्या सेवेला येणार आहे वऽसुऽदाऽदाऽ प्रणाऽम!' असं म्हणत अखेरचा श्वास त्यानं सोडला नसता काय? पण... पण ते कधीच घडलं नव्हतं! घडणारही नव्हतं! जीवनभर सुखदु:खांच्या गोष्टी बोलणारे आम्ही बंधूबंधू त्याच्या अखेरच्या निर्वाणीच्या क्षणी तेवढे एकमेकांना भेटूसुद्धा शकलो नव्हतो! आता वृषालीला कोणता भावोजी देणार होतो मी? राधामातेचे अश्रू कोणत्या सांत्वनाच्या वस्त्रानं टिपणार होतो मी? मेघमालेच्या मस्तकावरचा कुंकुमतिलक कुठल्या धैर्यानं पुसणार होतो? कुणाच्या हाती कुरूचा दिग्विजयी राजध्वज देणार होतो? कुणाशी जीवनातील सुखदु:खांची बोलणी करणार होतो? 'शोण, लहानांनी आज्ञा करायच्या नसतात, ' असं कुणावर रागावणार होतो? 'शोणऽऽ शोणऽऽ!' ग्रीष्मातल्या चातकासारखं माझं मन आक्रोशत होतं. आज खऱ्या अर्थानं मी एकाकी पडलो होतो. जीवन म्हणजे नश्वरतेचा महासागर वाटत होता. अर्थशून्य कलहाचा अनंत अर्णव वाटत होता. आकाशाएवढ्या विशाल पोकळीचा खड्डा पोटात पडला होता! पंचप्राणांचा महापूर अश्रूंच्या रूपानं डोळ्यांच्या कडा फोडून वाहत होता! कवच-कुंडलं दान करताना, महेंद्रावर मांडी पोखरली जाताना एवढं रक्तही शरीरातून पाझरलं नव्हतं माझ्या.

त्याचे अर्धवट उघडलेले नेत्र मी तर्जनीनं कायमचे पूर्ण मिटून टाकले. आपलं अशुभ, अभद्र, असमर्थ शरीर त्यानं पाहू नये असंच मला वाटलं. एरवी सुंदर दिसणारं हे क्रूर जग पुन्हा त्याच्या दृष्टीलासुद्धा पडू नये म्हणून मी त्याचे नेत्र मिटवून टाकले! माझ्या निस्तेज पडणाऱ्या कुंडलांबरोबरच भाव पालटत नेहमी काळे पडणारे त्याचे भावपूर्ण विशाल नेत्र मिटवून टाकले!

'जा शोण, नि:संकोच जा. जगानं तोंड फिरविलेल्या या कर्णाकडे शेवटी तूही तोंड फिरविलंस! तरीही नि:संकोच जा! ' मनोमन पुटपुटत त्याचं तुटलेलं मस्तक तसंच धडाला जोडून ठेवलं! त्याचं मुख आच्छादण्यासाठी माझ्याजवळ वस्त्र नव्हतं! जगाला तलम, उंची वस्त्रं दान देणारा मी! माझ्या बंधूच्या मृत शरीरावर टाकायला माझ्याजवळ वस्त्र नव्हतं! मन आक्रंदत होतं!

अश्वत्थामा आपला पण मोडून आपल्या मस्तकावरचं वस्त्र त्याच्या मुखावर आच्छादण्यासाठी वस्त्राची गाठ सोडू लागला! त्याचा हात सावरून मी वायुजिताच्या पाठीवरच्या पालाणाचं वस्त्र फाडून घेऊन त्याचा मृतदेह झाकला! त्या अपुऱ्या वस्त्रातून माझ्या प्रिय बंधूचा एक हात बाहेर डोकावत होता! त्या हातात त्यानं मरतानाही घट्ट धरलेलं खड्ग तसंच होतं! खाली वाकून महत्प्रयासानं त्याच्या मुठीतून मी ते कसंतरी सोडविलं! वर उठून ते हातात उंचावीत केवढ्यातरी मोठ्यानं ओरडलो, "शोणाऽऽ! जगात एक कर्ण किंवा अर्जुन जिवंत राहील! एकच!" अर्जुनाच्या स्मृतीनंसुद्धा शरीरात विष भिनल्यासारखं होत होतं. सर्वांग संतापानं थरथरत होतं. शोक,

क्रोध या विरोधी भावनांनी देहाचा भाता तडकणार की काय, असं वाटत होतं.

मी प्रतिज्ञा केली; पण काय उपयोग? अर्जुनाला ठार मारून शोण परत येणार होता थोडाच! तो या जगात नाही हे सत्य, कटू असलं तरी सत्यच होतं. हातातील खड्ग फेकून शोणाचा मृतदेह आच्छादलेल्या वस्त्रावर कोसळून मी ढसढसा रडलो! मी अंगराज नव्हतो. दिग्विजयी सेनापती नव्हतो. दानवीर नव्हतो, परशुरामांचा शिष्य नव्हतो. इतकंच काय; पण मी कर्णही नव्हतो! आपल्या प्रिय बंधूच्या क्रूर वधानं विव्हल झालेला, तळमळणारा, क्रंदणारा मी एक बंधू होतो! केवळ माणूस होतो! एक माणूस!

**

## दहा

शोणाचा पार्थिव देह यमुनातीरावर दहन करून परतताना माझं मन सुन्न झालं होतं. जिव्हाळ्याचे तेवढे सांगाती जीवनाच्या यात्रेत मध्येच असे का सोडून जातात? काय आहे जीवन म्हणजे? केवळ दोन घटकांचा खेळ! काहीच समजत नव्हतं, सुचत नव्हतं, शोणाच्या मृत्यूनं नैराश्याचं जाळं विणलेलं मन घेऊनच हस्तिनापुरात परतलो. त्याच्या आत गाठीसारखा एकच भाव दृढ होता. अर्जुनाचा प्रतिशोध! माझ्या सख्ख्या बंधूचा वध करणाऱ्या पक्क्या शत्रूचा वध!

घडल्या घटनेची वार्ता कुणीतरी पूर्वीच राजवाड्यावर पोहोचविली होती. राधामाता, वृषाली आणि मेघमाला यांचा विलाप असह्य झाला. "माझा शत्रुंतप कुठं आहे?" म्हणणाऱ्या राधामातेला द्यायला मजजवळ उत्तर नव्हतं. "भावोजी, माझं सर्वस्व कुठं आहे हो?" असं विचारणाऱ्या मेघमालेचं सांत्वन करायला शब्द नव्हते. "भाऽवोऽजी! भाऽवोऽजी!" म्हणून छाती पिटणाऱ्या वृषालीकडे तर पाहवत नव्हतं.

पंधरा दिवस गेले तरी शोण आपल्यात नाही, हे कुणालाच सत्य वाटत नव्हतं. कार्तिकाच्या थंडीनं राजवाड्याचे पाषाण गोठले होते. शोणाच्या मृत्यूनं आम्हा सर्वांची मनं गोठली होती, पण हे कुठंतरी थांबायला पाहिजे होतं. कुणाच्याही उष्ण अश्रूंनी विरघळायला मृत्यूचं मन काही हिमाचं नसतं! ते कठीण पाषाणाचं असतं! दु:खाचा जेवढा विचार करावा तेवढं ते अधिकच वाढत जात असतं. विस्मृती हा एकमेवच उपाय त्यावर परिणामकारक ठरतो! विस्मृती ही निसर्गानं मानवाला दिलेली सर्वांत श्रेष्ठ देणगी आहे! ती नसेल तर? विविध स्मृतींच्या ससेमिऱ्यानं माणूस वेडा होऊन जाईल!

मनाचं संयमन करून मी स्वत:ला सावरलं. मला जगायचं होतं. शोणाच्या कंठनालाचा छेद घेणाऱ्या अर्जुनाच्या गळ्यात धनुष्य अडकवावयाचं होतं! सगळं जीवन भावनांची उलथापालथ पाहण्यात, अनुभवण्यात गेलं होतं. आता एकच भाव उरला होता! प्रतिशोधाचा! अर्जुनवधाचा! यासाठी पडेल ते मोल द्यायची तयारी मी मनोमन केली होती. मिळेल तेथून शोधून काढून मी अर्जुनाला ठेचणार होतो!

त्यासाठीच "सैन्य सुसज्ज ठेव" असं सांगावं म्हणून मी दुर्योधनाच्या कक्षात आलो. "युवराज, मी सांगेन तेव्हा मला सैन्य पाहिजे! कशासाठी ते विचारू नकोस!"

"अंगराज, माझं सैन्य काय पराक्रम करू शकतंय ते मीच काय सारा आर्यावर्त जाणतो... तरीही मी चिंताग्रस्त आहे!" तो भुवया आक्रसत म्हणाला.

"का? कसली चिंता?"

"आजच द्रुपद राजाकडून सचिव येऊन गेला. पांडवांना अर्धं राज्य देऊन समेट करा, असा प्रस्ताव घेऊन तो आला होता! मला त्याची कल्पना मान्य करावीशी वाटते!"

"नाही! समेट नाही, संधी नाही! तुला शक्य नसेल तर मी एकटा पांडवांशी लढेन; पण शरणागती नाही!" मला त्याचा चंचलपणा काहीच कळेना. विराटनगरातल्या पराभवामुळे तो भेदरला असावा.

"नाही कर्ण, पांडवांकडून संधीचा प्रस्ताव घेऊन पुन्हा श्रीकृष्ण येणार आहे! विराटनगरातून बाहेर पडून पांडव उपप्लाव्य नगराला येऊन राहिले आहेत. श्रीकृष्ण उपप्लाव्य नगराला आला आहे. पांडवांचं सामर्थ्य वाढत आहे."

"युवराजा, जीवनभर मी तुझं ऐकत आलो! आता यापुढं माझं ऐक! पांडवांशी सरळ-सरळ युद्ध करायला मी केव्हाही तयार आहे! त्यांना युद्धाचं आव्हान दे!"

"कर्ण, मलासुद्धा पांडवांना काही द्यावं असं वाटत नाही! पण एकट्या अर्जुनानं आमची विराटनगरात जी शोभा केली ती पाहून त्या पाचांशी कसं काय तोंड देणार आपण, याची काळजी मला वाटते!"

"मी दिग्विजयात पादाक्रांत केलेले सर्व राजे आपल्याला साहाय्य करतील. आजच त्यांना संदेश धाड. पाच काय; पन्नास पांडवही आपल्यापुढं टिकाव धरू शकणार नाहीत. अर्थात ते जर नीतीनं लढले तर!"

"ठीक आहे. तशी मदतीची आशा असेल, तरच पांडवांना अंगावर घेण्यात काहीच चुकणार नाही! मी सर्वांना पत्रं धाडीन... पण ती तुझ्या नावाची असतील! त्यांनी होकार दिला, तरच मी श्रीकृष्णाच्या संधीच्या प्रस्तावाला ठोकरून देऊ शकेन."

"पाठव दूत!" मी त्याला माझ्या नावे देशोदेशींच्या राजांना पत्र पाठवायला मान्यता दिली. केवळ एकच शंका मनाला ग्रासत होती... श्रीकृष्णाची!

**

# अकरा

दुर्योधनानं देशोदेशी धाडलेले दूत परत आले. अवंती, चेदी, मगध, संशप्तक, सिंध अनेक बलाढ्य देशांच्या राजांनी आम्हाला ससैन्य पाठिंबा देण्याची तयारी दर्शविली.

उपप्लाव्याहून श्रीकृष्ण प्रस्ताव घेऊन येणार असल्याची कुणकुण सर्वांना लागलीच होती. त्याप्रमाणं त्याचे पुरोहित ब्रह्मगार्ग्य ऋषी एकदा हस्तिनापुरात येऊन विदुर आणि पितामहांची भेट घेऊन गेलेही. त्यांची काय-काय बोलणी झाली कुणालाच कळलं नाही. श्रीकृष्ण कोणत्या दिवशी येणार हे मात्र समजलं. कार्तिकातील पौर्णिमा धरून तो येणार होता. पांडवांच्या राज्यातील अर्धा राज्यभाग तो मागणार होता. त्याला नकार देण्याची कल्पना कुरू योद्धयांनी उचलून धरली होती. शोणाच्या वधाचं सलणारं दु:ख एकटच्या मलाच नव्हे; तर सर्व कुरू योद्धयांना पोळून काढत होतं. माझ्या मनाचा गरुड तर संतापाच्या शिखरावर चढून बसला होता! एकच निर्धार कायम होता! पांडवांशी युद्ध! निर्णायक आणि अंतिम युद्ध! अर्जुनाला कंठस्नान! जरी हा निर्धार कायम होता; तरीही इतरांप्रमाणंच मला प्रस्ताव घेऊन येणाऱ्या श्रीकृष्णाबद्दल आदर होता.

कार्तिकी पौर्णिमेचा दिवस धुक्याचं पटल फाडीत उजाडला! जे-जे नगरजन श्रीकृष्णप्रेमी होते त्यांनी आपल्या निवासांसमोर अशोक आणि आम्रवृक्षांच्या पर्णशाखांच्या वेशी उभारल्या होत्या. अंगणं सुगंधी जलानं सिंचून, संमार्जून त्यांवर ठिकठिकाणी सुदर्शनाच्या आकाराच्या नानाविध मोरपंखाच्या रांगोळ्या चितारल्या होत्या. गुढ्या, तोरणं पुष्पमालांनी मढवून उंच उभारली होती. एका श्रद्धाळू श्रीकृष्णभक्तानं तर आपल्या स्त्रीकडून अंगणात शिशुपालवधाचा प्रसंग रांगोळीत चितारून घेतला होता. प्रत्येक उंबरठ्यावर सुवर्णकलश गंगेच्या जलानं भरून ठेवले होते. सुस्नात सुवासिनी निरांजनं उजळण्यात गढून गेल्या होत्या. महामंत्री विदुरांनी कुरूंचा खास राजध्वज कळसावर चढविला. आज हस्तिनापूरकरांना फार दिवसांनी श्रीकृष्णाचं दर्शन घडणार होतं! पांडवांकडून संधीचा प्रस्ताव घेऊन येत होता, तरी मला श्रीकृष्णविषयी अनादर मुळीच वाटत नव्हता. माझं वैर पांडवांशी होतं. त्यांनी केलेल्या माझ्या घोर उपेक्षेशी होतं. माझा एक पुत्र आणि प्राणप्रिय बंधू वधणाऱ्या निर्दय अर्जुनाशी होतं! एका सूतपुत्राचं एका क्षत्रियाशी होतं! ते श्रीकृष्णाशी नव्हतं! प्रत्येक वस्तूत मला शोण आणि सुदामन दिसत होते. म्हणूनच अर्जुनाचं नावही ऐकवत नव्हतं.

उपप्लाव्याहून निघून श्रीकृष्णानं गंगेकाठच्या वृकस्थल उपनगरात येऊन तळ टाकला. नगरजनांनी तेथपर्यंतचा मार्ग सजवून घेतला. सूर्योदयाची सर्वस्पर्शी कोवळी किरणं हस्तिनापूरला बिलगली आणि सीमेवरील अगणित वाद्यांचा गजर नगरातल्या राजवाडयावरही स्पष्ट ऐकू येऊ लागला. श्रीकृष्ण सीमेवर आल्याचा तो सरळ संकेत होता. अश्वत्थाम्याला समवेत घेऊन मी त्याला सामोरा जाण्यासाठी सीमेपर्यंत गेलो. वृकस्थल सोडून तो आता हस्तिनापुरात प्रवेशत होता.

चार पांढऱ्याशुभ्र घोडयांच्या सुवर्णमंडित गरुडध्वज रथात बसलेली चार माणसं

होती! युयुधान, ब्रह्मगार्ग्य, श्रीकृष्ण आणि सारथी दारुक! श्रीकृष्णाचं नीलवर्णी सर्वांग त्याच तेजानं झळाळत होतं. जसं ते इंद्रप्रस्थात मी कितीतरी वर्षांपूर्वी पाहिलं होतं! ते पाहताना आपल्या शरीरावर आपलं नित्याचं कवच नाही, या जाणिवेनं माझं मनं विषण्ण झालं! कमतरतेची जाणीव हृदय कुरतडू लागली. माझ्याकडे पाहून यादवराज श्रीकृष्ण मंद हसला! हस्तिदंतासारखे त्याचे शुभ्र दात सोनेरी सूर्यकिरणांत झळाळले! मी त्याच्या मस्तकावरच्या मुकुटाकडे निरखून पाहिलं. तो माझ्या भूषणागारातल्या त्या मुकुटाच्या घडणीसारखाच असलेला पाहून मला आश्चर्य वाटलं!

"प्रणाम यादवराज!" उत्तरीय सावरीत मी त्याला वंदन केलं. त्याला माझ्यावरच्या अर्जुनानं केलेल्या अन्यायाचं काहीच का वाटत नव्हतं? "जयतु कर्ण!" तो हळुवार पुटपुटला.

पितामह, विदुर, वृषवर्मा, द्रोण यांनी वेढलेला त्याचा रथ हस्तिनापुरात शिरू लागला! वाद्यांचा गजर राजमार्गावरील दुथडीच्या वृक्षांची पानं थरथर हलवू लागला.

नगरजन भक्तीनं सुगंधी पुष्पांचा आणि कुंकुमाचा त्याच्यावर वर्षाव करू लागले. हात जोडून, सुहास्य वदनानं तो सर्वांच्या प्रेमाचा स्वीकार करू लागला. दारुकाची वस्त्रं माखून गेली. त्याला श्रीकृष्णाला वाहून नेणारा रथ नीट हाकताही येईना, कारण घोड्यांचे डोळे कुंकुमानं भरून गेले आणि त्यातूनच शेकडो नगरजन त्यांच्या खुरांवर, श्रीकृष्णापुढं म्हणून धडाधड लोटांगणं घेत होते! अर्ध्या एका घटकेच्या अवधीत त्याचा रथ काही हातच पुढं सरकू शकला होता! घोड्यांच्या खुरांवर सुवासिनींनी ओतलेल्या जलकुंभांनी त्यांनीच कष्ट घेऊन चितारलेली रांगोळी धुऊन जाऊ लागली! सूर्यदेव माथ्यावर चढू लागले.

"यादवराज भगवान श्रीकृष्णऽऽ!" शोणाचा हृदय पिळवटणारा अंत विसरून वेडावलेले नगरजन गर्जत होते. "जयतु! जयतु!!" कुणाच्याही जयजयकारानं पूर्वी दुमदुमलं नसेल, असं आज हस्तिनापूर दुमदुमू लागलं. पांढऱ्या वर्णाचे घोडे कुंकुमामुळे रक्तवर्णी दिसू लागले. श्रीकृष्णाचं पीतांबर पीतवर्णाचं आहे हे स्वतः त्यालाही सांगता आलं नसतं, इतकी कुंकुमाची पुटं त्याच्या पीतांबरावर चढली होती. सगळ्या राजमार्गावर पुष्पांचा सडाच सडा पडला होता. शांत चित्तानं त्या राजयात्रेतून वायुजितावरून जाताना मला क्षणभरच भास झाला की, मी स्वर्गाच्या साम्राज्यातच आहे. मात्र त्या एवढ्या चैतन्यमय हर्षोन्मादात दुर्योधन कुठंच दिसत नव्हता!

दोन प्रहरच्या रसरसत्या उन्हात श्रीकृष्णाचा पुष्पांनी आच्छादलेला आणि कुंकुमानं माखलेला 'गरुडध्वज' हस्तिनापूरच्या पुरातन राजवाड्याच्या महाद्वारात उभा राहिला. सर्वांगावरील कुंकुम झटकत, उत्तरीय सावरीत तो शांतपणे रथातून खाली उतरला. इतर स्त्रियांबरोबर वृषालीनं पंचारतीनं त्याला ओवाळलं. कुंकुमाचा एक तिलक थरथरत्या हातानं तिनं त्याच्या विशाल भाली चढविला. तिच्या जीवनातील, श्रीकृष्णाला पाहण्याचा तो पहिलाच योग होता!

राजवाड्याच्या कळसावरच्या त्रिकोणी, भगव्या राजध्वजाकडे पाहत त्यानं महाद्वाराचा उंबरठा ओलांडला. कुणीतरी म्हणालं, "राजवास्तू आज पावन झाली!"

"राजा, मला इतरत्र कुठंच येण्याची इच्छा नाही! सरळ सभागृहात चल!" स्वागतासाठी उभ्या असलेल्या महाराज धृतराष्ट्रांच्या मिटलेल्या ओलसर पापण्यांकडे पाहत तो घंटेसारख्या स्वरात म्हणाला.

"चला यादवराज," आवाजाच्या रोखानं मान हलवीत महाराजांनी त्याला अनुमती दर्शविली. सर्व कुरुयोद्धयांसह तो सभागृहाकडे निघाला. राजवाड्याच्या पायदंडया चढताना तो नेमकी एकच पायदंडी उरली असताना एकशे पाचाव्या पायदंडीवर अचूक थांबला! माझ्या कानांतील तुटक्या पाळ्यांकडे पाहून हसतच त्यानं एकशे सहाव्या आणि शेवटच्या पायदंडीवरही पाय दिला! मला आता त्या पायदंडयांचं काही औत्सुक्य राहिलं नव्हतं. शक्य असलं तर त्या सर्वच ढासळून देऊन त्यांनी मी शोणाची समाधी बांधली असती!

राजसभागृहात शिरताच श्रीकृष्णानं त्या पुरातन सिंहासनाला मान नमवून प्रणाम केला. कुरूंचं मानचिन्ह असलेल्या चंद्रदेवांच्या ओतीव रजत्प्रतिमेकडे पाहत-पाहतच तो अमात्य वृषवर्मांनी दाखविलेल्या आसनावर शांतपणे विराजमान झाला! सर्वांनी आपापली आसनं घेतली. महाराज धृतराष्ट्र आणि महाराणी गांधारीदेवी राजसिंहासनावर स्थानापन्न झाले. ही निर्वाणीची, कदाचित शेवटची अशीच राजसभा होती! कृष्णाच्या दर्शनासाठी वेडावलेल्या योद्धयांनी सभागृह तुडुंब भरून गेलं होतं. माझ्या आसनावर बसून मी माझ्या पायांकडे पाहू लागलो. ते निमुळते का असावेत, याचं कोडं जीवनाच्या या प्रदीर्घ धावेत अद्याप मला कधीच सोडविता आलं नव्हतं!

अमात्य वृषवर्मा यांनी सभेचं प्रयोजन सांगून, श्रीकृष्णाचं कुरूंच्या वतीनं रसभरीत वाणीत स्वागत केलं. खाली बसताना ते म्हणाले, "...आता यादवराज भगवान श्रीकृष्ण आपल्या आगमनाचं प्रयोजन स्वत:च सांगतील. सर्व कुरूंनी त्याचा शांतपणे विचार करावा. समय निर्वाणीचा आहे! अटीतटीचा आहे!"

उत्तरीय सावरीत श्रीकृष्ण आसनावरून शांतपणे उठला! त्याच्या उत्तरीयाच्या सुरकुत्यांत साचलेलं कुंकुम त्याच्या त्या हालचालीनं पीतांबरावरून ओघळत खालच्या पायघडीवर पडलं! कणीदार भेदक स्वरात तो बोलू लागला. त्याचे दीर्घ ओठ फडफडू लागले, भेदक नेत्र सभागृहावर मंडलाकृती गरगरू लागले!

"दिग्विजयी कर्ण, पितामह भीष्म, महाराज धृतराष्ट्र, द्रोण, कृप, विदुर, अश्वत्थामा, शकुनी, जयद्रथ, दु:शासन आणि दुर्योधन! इथं उपस्थित असलेल्या कुरू योद्धयांनो, मी यादवराज म्हणून आज तुमच्या राजनगराला आलो नाही! पांडवांचा आतेबंधू म्हणूनही आलो नाही! श्रीकृष्ण म्हणूनही आलो नाही! एका न्याय्य पक्षाचा कैवारी म्हणून या पुरातन राजसिंहासनाकडे आज न्याय मागण्यासाठी आलो आहे! कारण या सिंहासनाची ख्याती न्यायदानासाठीच अखिल आर्यावर्तात तळपते आहे!

"चांद्रप्रतिमेचं मानचिन्ह मानणाऱ्या प्राणप्रिय वीर कुरूंनो! पांडवांना तुम्ही न्याय देणार आहात काय? मी संधीचा प्रस्ताव घेऊन आलो नाही. सत्याचा वज्रपट घेऊन आलो आहे! आजपर्यंत पांडवांच्या सहनशीलतेची सत्त्वपरीक्षा तुम्ही मर्यादेपलीकडे ताणली आहे! राजमाता कुंतीदेवींसह पांडवांना लाक्षागृहात दग्ध करण्याचं युद्धशास्त्र आपणाला कुणी शिकविलं हे युवराज दुर्योधन आज मला सांगेल काय? पितृछत्र हरवलेल्या पांडवांना खांडववनाचं काटेरी लतावृक्षांनी दाटलेलं, रानश्वापदांनी आपल्या गर्जनांनी दणाणून सोडलेलं लोकविलक्षण साम्राज्य देणारे शकुनीमामा आपल्या राज्याची... गांधार देशाची राजनगरी सोडून मी त्यांना दंडकारण्याचं राज्य दिलं, तर तिथं जाऊन नव्यानं राजनगर वसवून दाखवतील काय? माझं द्वारकेचं राज्य पणाला लावून मी आज द्यूत खेळायला बसलो, तर गांधार देश पणाला लावून माझ्याशी

आज द्यूत खेळतील काय? आपली पत्नी पणाला लावून ती हरली, तर रज:स्वला असली तरी तिला या सभागृहात सर्वांसमक्ष खेचून आणण्याची संमती मला ते देतील काय? तेरा वर्षांच्या यातनामय वनवासभर अनवाणी राहतील काय? विराटनगरातून गोहरण करण्यासाठी सर्व कुरुयोद्धे या नगराबाहेर पडले तसे मथुरा- द्वारकेतील सर्व यादवयोद्धे आणि पांडव हे या नगरात गोहरणासाठी घुसले तर ते तुम्हाला चालेल काय? तुम्हा प्रत्येकात शाश्वत असा एक शुद्ध ध्वनी आहे. त्याला साक्ष ठेवून सांगा, कोणता न्याय तुम्ही पांडवांना आजपर्यंत दिला आहे? न्याय म्हणजे काय हे आज तुम्हाला माहीत तरी आहे काय?

"तरीही तुम्ही आणि पांडव मी एकच मानतो! सर्वांना कुरू मानतो. म्हणूनच आज भूतकालातल्या कटू कृत्यांना अग्नी देऊन मी सांगत आहे की, राजा धृतराष्ट्रा! पांडवांना त्यांचं अर्धं राज्य देऊन भवितव्यातील विध्वंसनाचा विराट वणवा विझवून टाक! वास्तविक सम्राट पांडूंनी 'विश्वस्त' म्हणून रक्षणार्थ स्वाधीन केलेलं हे राज्य जसंच्या तसं अखंडच तू त्यांच्या पुत्रांना परत केलं पाहिजे. बोल, तू तयार आहेस काय या न्यायदानाला?"

आसुडाच्या प्रहारासारख्या त्याच्या शब्दाघातांनी सर्वत्र भीतिदायक शांतताच शांतता पसरली. त्याला उत्तर देण्यासाठी महाराज उठत नव्हते! कुणीच काहीच हालचाल करीत नव्हतं!

"सांगा, कुणीही सांगा. तुमचा अंतिम निर्णय आहे तरी काय?" तो पुन्हा सभागृहावर गरगर दृष्टी फिरवीत सर्वांना उद्देशून म्हणाला. त्याच्या कणीदार, नादमय आवाजाची तीव्रता विलक्षण ताणली गेली होती.

"मी सांगतो! तुझ्या अफाट वक्तव्यानं गारठून गेलेल्या कुरुयोद्धयांचा अंतिम निर्णय मी आज तुला स्पष्ट शब्दांतच सांगतो! पांडवांना अर्धं राज्यही मिळणार नाही!" दुर्योधन ताडकन उठून भुवया उडवीत, आपली आखूड; पण पुष्ट बोटं डोलवीत म्हणाला!

"का नाही?"

"त्यांचा या राज्याशी काहीच संबंध नाही! ते महाराज पांडूंचे पुत्र असले; तरीही नाही! राज्याचं आजचं विभाजन उद्या त्याचे शत आणि परवा सहस्र तुकडे पाडील! राज्य म्हणजे दहा आश्रमकुमारांनी वाटून घ्यावं असं एक श्रीफल वाटतंय की काय पांडवांना?"

"अर्धं राज्य नसेल तर नसू द्या – पण खांडववनातील इंद्रप्रस्थाचं, त्यांनी वसविलेलं, भरभराटीला आणलेलं त्यांचं राज्य तरी त्यांना परत देऊन टाकाल काय? जे न्याय्य आहे, सत्य आहे त्याला दुराग्रहात कोंडू नको दुर्योधना!"

"नाही! त्यांनी ते द्यूतात हरवलेलं राज्य आहे! ते तर त्यांना कधीच परत मिळणार नाही!" दुर्योधन गदेचा प्रहार केल्यासारखा बोलत होता! ठिणग्यांना ठिणग्या स्पर्शत होत्या. सर्वसंहारक वणव्याला आमंत्रण देत होत्या.

"आश्रयासाठी निवारा म्हणून या विशाल हस्तिनापूर राज्यातील पाच ग्राम तरी त्या पाच बंधूंना द्यायला तू तयार आहेस काय?" हाताची पाची बोटं एकत्र करून श्रीकृष्णानं पाचांचा आकडा दर्शविला. सर्व सभासद-योद्धयांची हृदयं हेलावली. कुजबुज सुरू झाली. ती वाढू न देताच दुर्योधन वरच्यावर तडकाफडकी म्हणाला,

"नाही! नाही! नाही! त्रिवार, त्रिकाल नाही! पाच ग्रामंच काय; पण सुईच्या

अग्रावर थरथरत उभा राहणाऱ्या धुलीच्या कणाएवढाही भाग या राज्यातून पांडवांना कधीच युद्धाशिवाय मिळणार नाही! इतकंच काय; पण हा नकार घेऊन परत जाणाऱ्या तुझ्या पायांना चिकटून येणारे धूलिकणसुद्धा पांडवांच्या हाती पडू नयेत म्हणून मी सेवकांकरवी ते झाडून घेतले असते, पण – पण भगवान म्हणवून घेणाऱ्या चेटक्या आणि ढोंगी श्रीकृष्णा, त्या निमित्तानंसुद्धा माझ्या सेवकांचेही हात तुझ्या गाईंच्या मलमूत्रानं बरबटलेल्या, अमंगल पायांना लागू नयेत, अशी माझी इच्छा आहे!! जा, तुझ्या संधीच्या प्रस्तावाची लोंबती लक्तरं पीतांबरावर लपेटून घेऊन तू हस्तिनापूरच्या सीमेबाहेर जा! नाहीतर....”

“दुर्योधनऽऽ!” श्रीकृष्णाचे ओठ थरथरू लागले. नेत्र आरक्त झाले! सर्व सभागृह क्षणापूर्वीचा त्याचा झालेला स्वागतसोहळा स्मरून ‘हाय! हाय!’ म्हणून हळहळलं! कित्येक तर विजेचा चटका बसल्यासारखे उठून उभेच राहिले. माझे कान सुन्न झाले. डोळे मिटले गेले. माझ्या कानांशी आपले ओठ आणून दुर्योधन धुंदपणे पुटपुटला, ‘‘कर्ण, सर्व उलथापालथींचं मूळ असलेल्या या गवळ्यालाच मी आज बद्ध करणार आहे! नगरजनांचा स्वागत-सोहळा आठवत-आठवत मथुरेच्या कारागृहात जन्मलेला हा गवळी कुरूंच्या कारागृहातल्या अंधारातच नष्ट झाला पाहिजे! तीच त्याची योग्य जागा आहे!!” त्याचे शब्द माझ्या कानांत तप्त लोहरसासारखे शिरले! वळवळणाऱ्या विषारी भुजंगासारखे ते माझ्या मस्तकाला डंख मारू लागले. कधी नव्हता तो विरोध दर्शवीत मी त्याच्यावर ओरडलो, ‘‘दुर्योधना! तू शुद्धीवर आहेस काय? कुणाला बद्ध करण्याची स्वप्नं पाहतो आहेस तू?’’

‘‘कर्ण, त्याच्या राज्यात असतील तेवढे साखळदंड आणून सामर्थ्य असेल तर मला बद्ध कर म्हणावं!” श्रीकृष्णानं क्षणात आपले विशाल नेत्र मिटून घेतले. क्षणभर माझं मन हरपलं. मला भास होऊ लागला की, उतू जाणाऱ्या दुधासारखं त्याचं शरीर कणकणांनी स्फुल्लिंगू लागलं आहे. क्षणार्धात त्याच्या मुकुटाचा शिरपेच सभागृहाच्या थेट छताला जाऊन भिडला. त्याचं ते विशालरूप धारण केलेलं शरीर पुन्हा एकदा दिव्य तेज:कणांनी ओतप्रोत भरलं! वादळी वाऱ्यालाही मागं टाकतील असे ते तेज:कण चरणांपासून मस्तकापर्यंत कितीतरी प्रचंड गतीनं नुसते गरगर फिरू लागले! सभागृहातील पाषाणाचे कोरीव स्तंभ त्याच्या दिव्य शरीरातून निघणाऱ्या असह्य प्रकाशवलयांनी वितळतील की काय; असंच मला वाटू लागलं! सर्व कुरुयोद्धे, ऋषिमुनी, सेवक-सेविका भयग्रस्त होऊन त्या विराट देहापुढं लोटांगण घेऊ लागले. अंगावर कवच नसल्यामुळे त्याच्या तेज:स्वरूपाची झळ आता मलाही पोहोचत होती! सोसवत नव्हती. कुंभासारख्या गोलाकार असलेल्या त्या तेजस्वी मुखातून शब्दसुद्धा तेजाचं रूप घेऊनच बाहेर पडू लागले. सभागृहाच्या छताला छेदू लागले... मी भानावर आलो त्या वेळी श्रीकृष्णाचे शब्द माझ्या कानांवर पडले....

‘‘युद्ध! युद्धानं कुणाचेही प्रश्न मिटणार नाहीत! युद्ध हा मानवी क्रौर्य उखडून काढण्यासाठी योजावा लागणारा, पण तेवढाच कठोर अंतिम उपाय आहे! युद्धामुळे मानवजातीचं कधीही कल्याण होणार नाही! कारण ते जीवनाचं अंतिम ध्येय नव्हे! जीवनाचं अंतिम ध्येय आहे प्रकाश! ज्ञानाचा, विज्ञानाचा, आत्म्याचा प्रकाश! तुम्हा सर्वांना तो प्रकाश युद्धातील मृत्यूतच मिळणार असेल, तर मीही पाहिजे तसलं भयाण महायुद्ध पेटवीन! ज्या मातीतून तुम्ही जन्माला आलात, जिच्या अंतरंगातून रस घेतलेलं

धनधान्य खाऊन वाढलात, त्या मातीतच तुमचं उत्तान शरीर चैतन्यहीन करून मिसळून टाकीन! हे युद्ध जगाला तुमचा अहंकार, मार्गच्युतता, कपट, क्रौर्य, सूड या राक्षसी विकारांचीच कथा पिढ्यान्‌पिढ्या ऐकवीत राहील! म्हणूनच लक्षात ठेवा, या युद्धात मी स्वत: हाती शस्त्र धरणार नसलो; तरीही धरतीला भारभूत झालेली तुमची माजलेली, उन्मत्त शरीरं तिच्याच मातीत एकरूप करीन!!"

वाचा बंद झाल्यासारखे सर्व जण नि:शब्द झाले होते! एकट्या महाराज धृतराष्ट्रांना दृष्टी नसल्यामुळे राजसभेत काय प्रकार घडतो आहे, त्याची नीट कल्पनाच आली नसावी. सिंहासनावरून उठून ते भयग्रस्त आवाजात म्हणाले, "यादवराज, आजचं भोजन वाड्यावर घेऊन जा!" ते ऐकून त्या राजाच्या घनघोर अंधत्वावर हसावं की रडावं हे कुणालाच कळेना.

"राजा, आज मी हस्तिनापुरातच भोजन घेणार आहे! पण तुझ्या या न्यायभ्रष्ट राजवाड्यावर नाही – तर ते विदुराच्या पर्णकुटीत! राजमाता कुंतीदेवींच्या हातचं!" तो आपलं आसन सोडून, ज्या शांत चालीनं सभागृहात आला होता त्याच शांत चालीनं बाहेर निघाला. त्याला निरोप देण्यासाठी म्हणून पितामह, द्रोण, कृप, अश्वत्थामा सर्व जण त्याच्या मागोमाग राजवाड्याच्या महाराद्वारापर्यंत खेचल्यासारखे सरसावले! ते भयभीत झाले होते! व्याकूळ झाले होते! मनोमन पार हादरले होते!

श्रीकृष्ण कोण असावा? एक गोपाल? एक योद्धा? यादवराज? पांडवांचा मामेबंधू? की – की दुर्योधन म्हणाला तसा चेटक्या? माझ्या मस्तकात प्रश्नांचे घणाघात बसू लागले.

छे! श्रीकृष्ण निश्चितच असामान्य आहे! ईश्वरी अंश असलेला आहे! विचारांचे अचूक बाण शंकांचं मस्तक फोडत होते!

मीही उठून सर्वांसमवेत त्याला पोहोचविण्यासाठी महाराद्वापर्यंत आलो. उंबरठा ओलांडताना तो क्षणभर थांबला. मागं वळून त्यानं सर्वांना प्रणाम केला. मीही माझे हात जोडले. घडू नये ते घडलं होतं – आणखी घडणार होतं.

"कर्ण, ये!" त्यानं उजव्या हाताची बोटं मुडपून मलाच जवळ बोलाविलं! जवळ जाताच एकदम माझा हात त्यानं आपल्या हाती घेतला! अननुभूत संवेदनांची एक शिरशिरीच त्याच्या त्या दिव्य स्पर्शामुळे माझ्या सर्वांगात क्षणात तरळून गेली. त्यानं सर्वांतून मला एकट्यालाच का जवळ बोलवावं? राजसभेत भाषणाच्या प्रारंभी सर्वप्रथम माझाच निर्देश का करावा? काही समजेना!

एका हाती माझा हात घेत, दारुकाला मागं बसण्याचा संकेत करून, त्यानं दुसऱ्या हातानं आपल्या चपळ घोड्यांचे वेग आखडले! मागं वळूनही न पाहता तो आपल्या धवलवर्णी चार घोड्यांचा गरुडध्वज रथ पिटाळू लागला. मागच्या बैठकीत युयुधान, ब्रह्मगार्ग्य आणि दारुक बसले होते. माझं मन संमिश्र भावनांनी गोंधळून गेलं! त्यानं सर्वांना सोडून मला एकट्यालाच का आपल्या समवेत स्वहस्ते रथात चढवून घेतलं होतं? कुणाचाही हात हाती न घेणाऱ्या श्रीकृष्णानं एकट्या माझाच हात आपल्या हाती आज का घेतला होता? त्याच्या रथचक्रांबरोबर माझी विचारचक्रं धावत होती. कडेच्या एका डेरेदार आम्रवृक्षाच्या गर्द पर्णझडीतून एक कोकीळपक्षी सप्तसुरांतील तान घेत आमच्या रथावरून झेपावत सर्रकन पश्चिमेकडे गेला. त्याच्याकडे पाहताना मला मावळतीच्या सूर्यदेवाचं दर्शन झालं! 'आजचं संध्याकाळचं अर्घ्यदान राहिलंच!' मी

स्वत:शीच पुटपुटलो! कडेचे कदंब, अशोक, आम्र, पिप्पल, वटाचे कितीतरी वृक्ष तीरासारखे सरासर धावत मागं पडत होते. रथ नगराबाहेर जाण्यासाठी धावतच होता! माझ्या जीवनाचा राजरथही त्याच्या सहवासात कीर्तीच्या राजमार्गावरून सुसाट धावत होता! श्रीकृष्णाच्या रक्तवर्णी, मृदुल, उबदार हातात हात गुंफून! वायूबरोबर फरफरणारं त्याचं पीतांबर माझ्या मांडीला सतत घासत होतं! वळणं घेताना कललेलं त्याचं नीलवर्णी शरीर माझ्या शरीरावर नि:शंकपणे पुन:पुन्हा रेलत होतं!

जिथून विदुरांची पर्णकुटी स्पष्ट दिसेल, अशा एका गर्द वटवृक्षाजवळ येताच त्यानं वेग आखडत रथाची गती कमी केली. नगराच्या सीमेजवळ आम्ही केव्हाच आलो होतो. समोरचं शेकडो वर्षं जलदान करीत वाहणारं गंगेचं पात्र दूरवर मावळतीच्या प्रदीर्घ सुवर्णकिरणांत झळाळत होतं. गरुडांचा एक थवा कितीतरी उंचावरून आपले भक्कम पंख फडफडवीत मैनाक पर्वतावरच्या आपल्या निवासस्थानाकडे परतत निघून गेला. हे पाहताच मला शोणची आठवण झाली. एकदा त्यानं विचारलं होतं, 'दादा, तू जाशील का रे गरुड पक्षयासारखा उंच-उंच?' आज शोण नव्हता. होत्या त्याच्या हृदय हेलावणाऱ्या स्मृती! एकदम वेग आखडले गेले. रथ थांबला. माझी विचारचक्रंही थांबली. नगराबाहेरची सीमा संपली होती.

''चल कर्ण!'' त्यानं मला एका डेरेदार वटवृक्षाच्या दाट छायेखाली चलण्याचा संकेत केला. रथ मार्गावर तसाच सोडून तो माझा हात हाती घेत त्या विशाल वृक्षाच्या एका गर्द शाखेखाली आला. एका काळ्या पाषाणावरची दाटलेली धूळ आपल्या उत्तरीयानं झटकत तो यादवांचा तेजस्वी नायक त्यावर बसला! शेजारी जागा असूनही मी त्याच्या चरणांजवळ बसलो. कलिंगदेशात महेंद्रावर अशाच एका वटवृक्षाखाली भगवान परशुरामाचं मस्तक मी आपल्या मांडीवर घेतलं होतं, तो दिवस मला आठवला! आज माझा हात श्रीकृष्णाच्या हाती होता! तसाच वटवृक्ष माथ्यावर होता! सूर्यास्ताच्या तिरकस सोनेरी किरणांत श्रीकृष्णाचं निळं शरीर तळपत होतं. कंठातील पुष्कराज, माणिक, मौक्तिक, हिरे, वैदूर्य यांचे गुंफ त्याच्या श्वासोच्छ्वासाबरोबर मंद लयीत वरखाली होत होते. मस्तकावरचा सोनेरी मुकुट परावर्तित प्रकाशवलयं फेकत होता. मी बसलेल्या हिरवळीवरचा एक चपळ मातकट कीटक त्याच्या कुंकुममय पीतांबरावर चढत असलेला मला स्पष्ट दिसू लागला!

''कर्ण, तुला प्रचंड धक्का देणारं एक सत्य सांगण्यासाठी मी आज तुला सगळ्यांमधून एकटयालाच नगराबाहेर आणलं आहे! ते मावळतीचं तेज बघ आणि मी काय सांगतो ते नीट ऐक.'' दोन डोंगरकडांत रेंगाळणाऱ्या सूर्यदेवाकडे बोट दाखवून तो हे जिव्हाळ्यानं म्हणाला. त्याचा आवाज मुरलीसारखा मधुर होता.

''सांग, यादवराज, धरतीची उलथापालथ झाली तरी मला आता कोणताही धक्का बसणार नाही!'' मी त्याच्या धारदार नाकाकडे पाहत म्हणालो.

''कर्ण – कर्ण, तू सूतपुत्र नाहीस राधा आणि अधिरथ यांचा पुत्र नाहीस तू!'' माझ्या डोळ्यांत खोलवर उडी घेऊन त्यानं माझ्या मनाचं सरोवर पार घुसळून टाकलं. ताडकन उठून मी कितीतरी मोठयानं किंचाळलो, ''काय म्हणतोस? मी सूतपुत्र नाही? राधामातेचा पुत्र नाही? नाही! यादवराज हे असत्य आहे! असत्य आहे!! एकवेळ तुझं सुदर्शन चालव, पण हे असं जिभेचं खड्ग नको चालवूस.''

''मी सांगतो आहे ते सत्य आहे! तू क्षत्रियांचाही क्षत्रिय शोभशील, अशा एका

दिव्य कुलातील आहेस! तू – तू राजमाता कुंतीदेवींचा प्रथम पुत्र आहेस! पश्चिम क्षितिजावर – तुला तुझं कुल सांगण्यात माझी काही चूक तर होत नाही ना! – हे काटेकोरेपणे पाहणाऱ्या साक्षात सूर्यदेवांच्या हिरण्यगर्भाचा तेजपुत्र आहेस तू!" त्यानं पश्चिम क्षितिजाकडे बोट उंचावलं. माझ्या सर्वांगातल्या रक्ताचे कण कसे त्याच्या शब्दांबरोबर उधळू लागले. हर्ष, अभिमान, महानतेची जाणीव यांनी मनाचा कोश फुटून नेत्राच्या पन्हाळीतून सरसर पाझरू लागला! "मी सूर्यपुत्र आहे! मी सूर्यपुत्र आहे!" म्हणून आनंदानं ओरडत धुंद होऊन थयथय नाचावं असं वाटू लागलं. माझ्या जीवनाचं राजवस्त्र सामाजिक संकेतांच्या, स्वार्थाच्या, अहंमन्यतेच्या धुळीत तपन्तप निर्दयपणे तुडविणाऱ्यांना गर्जून सांगावंसं वाटत होतं की, "मी सूर्यपुत्र आहे! मी सूर्यपुत्र आहे! तेजाचा पुत्र आहे! हीन नाही! क्षुद्र नाही!"

"कर्ण, तू राधेय नाहीस, कौंतेय आहेस! म्हणूनच पांडवांचा सख्खा बंधू आहेस! थोरला!" पाषाणावरून उठत श्रीकृष्णानं माझ्या खांद्यावर हात ठेवला. त्याच्या शब्दांपेक्षा त्याचा स्पर्श शीतल होता!

"श्रीकृष्णा, सत्य काय आणि असत्य काय तेच मला समजेनासं झालं आहे! मी कौंतेय आहे तर कुंतीदेवींपासून दूर कसा? पांडव आहे तर पांडवांपासून अलग कसा? सूर्यपुत्र आहे तर अंधाराच्या साम्राज्यात चाचपडत असलेला कसा?"

"ती एक महान कथा आहे! जगातल्या कोणत्याही पाषाणहृदयी मानवाचंही अंत:करण पाझरावं अशी करुणामय आहे! समाजाच्या संकेतांच्या क्रौर्याची! एक मातेच्या मूक क्रंदनाची!"

"कुंतीदेवीला कौमार्यावस्थेत दुर्वास ऋषींच्या दिव्य मंत्रामुळे तू सूर्यापासून प्राप्त झालास! त्या वेळी ती भोजपूर राज्यात होती. कौमार्यावस्थेत पुत्रप्राप्ती ही समाजाच्या दृष्टिकोनातून राजकन्येला कलंकित करणारी गोष्ट ठरणार होती. तुला घेऊन ती कधीच जगली नसती! जगानं तिला जगूच दिलं नसतं! आणि ती जगली नसती तर – तर तूही अस्तित्वात राहिला नसतास! म्हणून मनावर हिमालयाएवढा पाषाण ठेवून त्या महान स्त्रीनं तुझा अश्वनदीत त्याग केला! जन्मलास त्या दिवशीच! अश्वनदीतून, चर्मण्वती, यमुना आणि गंगा असा पेटिकेतून प्रवास करीत तू एका प्रभाती अधिरथाला गंगेत सापडलास! तेव्हापासून आतापर्यंत तू सारथी स्वत:च्या दिव्य कुलाचा वारसा माहीत नसल्यामुळे दुर्दैवाच्या चक्रात सापडलास! कर्ण... कर्ण, तू सारथी नाहीस! दुर्योधनाच्या अन्यायी पक्षाला उभा राहू नकोस!

"जगात कुणालाही नसतील असे तीन पिते आणि तीन माता तुला लाभल्या आहेत! सूर्यदेव, महाराज पांडू आणि अधिरथ यांचं पितृछत्र तुझ्यावर आहे! कुंतीदेवी, राधा आणि गंगा यांचं मातृत्व तुझ्यासाठी तळमळतं आहे! कर्ण, आजचा एकच दिवस तुझ्या जीवनाला आमूलाग्र वळण देण्याचा आहे! तुझं कुल श्रेष्ठ आहे! तुझा वारसा दिव्य आहे! पांडव तुझे सख्खे बंधू आहेत! तू सर्वांत पहिला पांडव आहेस! ज्येष्ठ कौंतेय आहेस!"

त्याच्या प्रत्येक शब्दाशब्दाबरोबर भावनेची एक-एक प्रचंड लाटच माझ्या मनाच्या किनाऱ्यावर घोंगावत, गर्जत आदळू लागली. क्षणातच, जेव्हा चंपानगरीहून हस्तिनापुरात आलो त्या दिवसापासूनचं माझं जीवन, त्याच्या विराट रूपातल्या उजव्या हाती धरलेल्या सुदर्शनासारखं डोळ्यांसमोर गरगरू लागलं! घटनांचे असंख्य तीक्ष्ण आरे

उरात सलू लागले! साक्षात तेजाचा पुत्र असूनही या दीर्घ जीवनक्रमात अपमान, वंचना, अवहेलना, उपेक्षा यांशिवाय मी दुसरं काय अनुभवलं होतं! कुठून मी कुठं आलो होतो? जीवनाचा अर्थ तरी काय? कुणाच्यातरी अपराधाची हृदय पिळवटणारी एवढी महान शिक्षा दुसऱ्या कुणालातरी मिळावी हेच जीवन आहे काय? साक्षात सूर्यपुत्र असूनही नियतीच्या क्रूर थपडा खात आलं होतं माझं आयुष्य! की – की ज्या अग्निमध्यातून मी जन्माला आलो, त्या अग्नीचा कधीच विसर पडू नये म्हणूनच नियतीनं ही जीवनाची आग मुक्त हस्तानं माझ्या सुवर्णमस्तकावर ओतली होती!

सूतपुत्र! छे! सूर्यपुत्र! राधेय! छे! कौंतेय! एकशे एकावा कुरू! छे! पहिला पांडव! माझं मलाच नीट समजेना की मी कोण आहे? कुठून आलो? कुठं जाणार? श्रीकृष्ण सांगत होता म्हणूनच ते मी सत्य मानू शकत होतो! नाहीतर....

"कर्ण अज्ञानानं तू आजपर्यंत कौरवांसाठी सतत झिजलास! व्यर्थ झिजलास! पांडवांचा द्वेष करीत आलास. सख्ख्या बंधूंचा अज्ञानानं दुस्वास करीत आलास! आता सत्य समजल्यानंतरही तू तसाच राहणार आहेस काय? लक्षात ठेव, विकास आणि वाढ हीच जीवनाची लक्षणं आहेत! आजपर्यंत तू कोंदटलेला राहिलास, कीर्तीनं असामान्य झालास; तरीही मनानं जखडलेलाच राहिलास! मी – मी तुझा मामेबंधू या नात्यानं तुला आज आवाहन करतो आहे! चल, परत आपल्या घरकुलात चल! रक्तात चल! पांडवात – आपल्या बंधूंत चल!" तो उपप्लाव्याच्या दिशेनं तर्जनी उंचावून बोलत होता.

मला ते ऐकताना माझ्या जीवनाचा आम्रवृक्ष क्रूर काळानं काटेफडचात का लावावा ते समजेना. एकदम मन बधिर झालं! अगदी ऐन निर्वाणीच्या प्रसंगी विश्वासघात करून कुरूंना सोडायचं काय? सारथ्यांच्या दलदलीत पडलेलं माझं जीवनकमल आपल्या हातांनी एका रात्रीत राजसिंहासनावर चढविणाऱ्या दुर्योधनाच्या पाठीत खड्ग खुपसून पांडवांकडे चालतं व्हायचं काय? जिनं माझ्या सुखदु:खांना आपल्या सख्ख्या पुत्राच्या सुखदु:खापेक्षा श्रेष्ठ मानलं होतं, त्या राधामातेला धिक्कारून कुंतीदेवीला मिठी मारायची काय? नाही! नाही! मी कौंतेय नाही, मी राधेय आहे! नाही! मी सूर्यपुत्र नाही! मी सूतपुत्रच आहे! संस्कारांनी घडविलं तेच माझं जीवन आहे! नियतीनं दाखविली तीच माझी दिशा आहे!!

"कर्ण, असा संभ्रमात पडू नकोस! चल, माझ्यासमवेत रथारूढ हो आणि सरळ उपप्लाव्याला चल! धर्मशास्त्राप्रमाणं तू पांडू राजाचा कानिन पुत्र! ज्येष्ठ पांडव आहेस. वेदवेत्त्या ब्राह्मणांत राहून तू आपलं धर्मज्ञान वाढविलं आहेस. ब्रह्मचर्य आणि अर्घ्यदान, आत्मसंयमन, दानसत्र यांनी तू महत्पदाला पोहोचला आहेस! प्रत्येक पांडव एकेका गुणात श्रेष्ठ आहे, तू तर सर्व गुणांनी युक्त आहेस! 'पहिला पांडव' हे सार्थ नामाभिधानच तुला शोभण्यासारखं आहे. चल, कर्ण अजूनही शाश्वत मार्गाकडे चल! समय गेलेला नाही! माझं म्हणणं मान्य कर!

"चल, चिरविरह सोसणाऱ्या आपल्या कुंतीमातेकडे चल. बंधुप्रेमासाठी उत्सुक असलेल्या बांधवांकडे चल. या सर्व राज्याचा अभिषेक वडील बंधू म्हणून पांडव तुलाच करतील. हातामध्ये पांढरीशुभ्र चवरी घेऊन युधिष्ठिर ती तुझ्या मस्तकावर विनयानं जीवनभर ढाळीत राहील! तू रथात चढल्यानंतरच पारिचारक म्हणून तुझ्यामागून तो रथात चढेल! सामर्थ्यशाली भीमसेन तुझ्या मस्तकावर विनयानं छत्र धरील आणि ज्याला तू अज्ञानानं आजपर्यंत शत्रू मानत आलास तो तुझाच बंधू धनुर्धर अर्जुन तुझ्या

रथाचं सारथ्य करील! नकुल, सहदेव, द्रौपदीचे पाच पुत्र, धृष्टद्युम्न सारे-सारे तुझ्या निग्रही – अनिंद्य नेतृत्वाचे अनुचर होतील! वज्रासारख्या एकमार्गी वचनाचे विनयशील दास होतील! तुझ्या वायुजिताला खरारा करतील! तुझ्या जैत्ररथाचं प्राणपणानं रक्षण करतील!

"इतकंच नाही तर – तर वृष्णी आणि अंधक कुलांतील सर्व पराक्रमी योद्धयांसह प्रत्यक्ष, स्वत: मीही तुझा अनुचर होईन! उद्धव, बलिराम, सात्यकी, उग्रसेन, पांडवराज म्हणून सारे-सारे तुझ्यासमोर आदरानं नतमस्तक होतील! प्रद्युम्न, चारूदेष्ण, सुदेष्ण, चित्रगू, भानुसेन हे माझे पुत्र तुझ्या आज्ञांकित राहण्यात स्वत:ला धन्य मानतील. वीर अभिमन्यू तुझ्या चरणांना स्पर्श केल्याशिवाय कधीही रथारूढ होणार नाही! आणि सुगंधी शरीराची शामल आर्या द्रौपदी, पती म्हणून तुझ्या तळपायांना चंदनमिश्रित गंधित उटणं चोळील! चल, गेली तपन्तपं अखंडपणे पुत्रवियोगाच्या दारुण यातनांनी होरपळून गेलेल्या तुझ्या जन्मदात्या मातेचं हृदय, तुझे दोन अश्रुबिंदू तिच्या वृद्ध चरणांवर ओघळताच कृतार्थतेच्या जाणिवेनं शांत होईल! राजा वसुषेण म्हणून तुझ्या कीर्तीच्या डिंडिमानं आर्यावर्ताचेच नव्हे; तर त्रैलोक्याचेही दिक्कोन दुमदुमून जातील! सम्राटांचा सम्राट म्हणून आर्यांच्या येणाऱ्या पिढ्यान्‌पिढ्या तुझं शुभनाम सुप्रभाती मुखातून उच्चारतील!

"नाहीतर – नाहीतर कौरवांच्या अन्यायी पक्षाला साथ देऊन अहंपणे साऱ्या आर्यावर्ताला युद्धाच्या खाईत लोटणारा, खोट्या आदर्शांना उराशी कवटाळीत स्वत: जळून इतरांना दग्ध करणारा, तेजाचा पुत्र असून अंधारात अंत पावलेला अशाच तुझ्या स्मृती कोटी-कोटी आर्यांची मनं लक्ष-लक्ष वर्षं अनुकंपेनं सदैव पोखरत राहतील! चल, माझ्यासमवेत रथारूढ हो!" माझा हात धरून त्यानं मला रथाच्या दिशेनं ओढलं.

निग्रहानं धरतीत पाय रोवून मी म्हणालो, "नाही मधुसूदना, कुणाच्या स्मृती कशा राहतील यांच्याशी मला काहीच कर्तव्य नाही! केवळ आजची ही स्मृती मात्र मी जीवनभर नाही विसरणार. कधीच नाही विसणार. मेघश्यामा, माझा हात तुझ्या मृदुलतम हातात आहे! मी सूर्यपुत्र आहे या जाणिवेनं तो थरथरतो आहे! जीवनाच्या धन्यतेचा अन्य कोणताच अर्थ मला मान्य नाही! तूच सांग, मी सूर्याचा पुत्र आणि ज्येष्ठ कौंतेय असताना त्या दिव्य कुलाला शोभेल असा वागू की पदभ्रष्ट होऊ? सूर्याचा किरण कधीतरी वक्र गेला आहे काय? एकदा धरली ती दिशा, ती बाजू, तो पक्ष! त्रैलोक्याचं राज्य, संपत्ती, कीर्ती, प्रेमबंध कोणताही पाश सूर्यकिरणांना बद्ध करू शकत नाही! तू राज्य दिलंस तर तेही मी दुर्योधनाच्याच चरणांवर घालीन! पांडव माझे अनुचर झाले तर त्यांना सेवक म्हणून राजा दुर्योधनाच्या सभागृहात उभे करीन! कर्ण आणि पांडव या जन्मानं निगडित अशा जीवनरेषा असतील, पण – पण माधवा, दुर्योधन आणि कर्ण या पूर्वजन्मानं निगडित अशा जीवनरेषा आहेत! सांग, एकाच डहाळीवर उमलेली सर्वच पुष्पं गोपालांनी तुझ्या तरी चरणांवर कधी अर्पण केली आहेत काय? ज्याच्या निर्भेळ स्नेहावर मी तपन्तपं अखंडपणे समुद्रवलयांकित राज्यसुखाचा आजवर अमित उपभोग घेतला त्या दुर्योधनाला विश्वासघाताच्या खोल गर्तेत लोटून स्वार्थापोटी आणि प्रेमापोटी पांडवांचा पक्ष कसा स्वीकारू? सूर्यपुत्राला ते शोभा देणारं आहे काय? ज्या वृषालीनं सारथिकन्या असूनही – द्रौपदीनं कधी दिली नसती अशी – भावगंधित साथ मला जीवनभर दिली आहे त्या माझ्या पत्नीला केवळ द्रौपदीच्या सुगंधी सौंदर्यासाठी

लाथाडू? कौंतेयाला ते कीर्तिप्रद होईल काय? जिनं माझं मलमूत्र काढतानासुद्धा 'वसू, वसू' म्हणून माझ्या मस्तकाचं प्रेमानं पुत्र म्हणून अवघ्राण केलं आहे, त्या राधामातेला केवळ जन्माचं दान देऊन नाळही न तोडता मला अश्वनदीच्या घोंगावणाऱ्या पात्रात सोडणाऱ्या भ्रांतचित्त मातेसाठी – कुंतीदेवीसाठी दूर लोटू? नाही! हृषिकेशा, ते शक्य नाही! प्रत्यक्ष मृत्यूचा मुक्त वर्षाव माझ्या मस्तकावर झाला तरीही चालेल; पण स्वत्वाचं एवढं घनघोर मरण मी कधीच पत्करणार नाही!!

"आजच्या या प्रसंगी एका विचित्र योगायोगाचं मात्र मला नवल वाटतं आहे! तू एका क्षत्रिय कुलात जन्मलास आणि दुर्भाग्यानं गोकुळातल्या गोशाळेत वाढलास! यशोदामातेनं तुझं संगोपन केलं! मीही एका दिव्य कुलात जन्मलो आणि दुर्वशात चंपानगरीत अश्वशालेत वाढलो! राधामातेनं माझं संगोपन केलं! तत्त्व म्हणून आपला मामा कंस याच्यावर तुला मुष्टिप्रहार करावा लागला! मलाही तत्त्व म्हणून उद्या बंधूंवर प्रहार करावा लागणार आहे! पण – पण –"

"पण – काय कर्ण? बोल, स्पष्टपणे बोल!" तो माझ्या डोळ्यात पुन्हा खोलवर पाहत म्हणाला.

"वासुदेवा, तू यशोदामातेचा केलास तसा मी राधामातेचा त्याग नाही रे करू शकत! तू गोकुळातल्या गोपालांना भुललास तसा मी कधीही चंपानगरीतील सारथ्यांना नाही भुलू शकत!

"आर्यावर्ताला युद्धाच्या खाईत लोटणारा, स्वत: जळून इतरांना दग्ध करणारा, तेजाचा पुत्र असून अंधकारात अंत पावणारा अशा कटू स्मृतींनी आर्यांची कोटी कोटी मनं लक्ष-लक्ष वर्षं माझ्यासाठी कधीच सलत राहणार नाहीत! मात्र ती सलत राहतील तुझ्यासाठी! माझ्यासाठी कुठल्या न्याय्य पक्षाच्या संधीचा प्रस्ताव घेऊन आज तू आला आहेत? 'बारा वर्षांचा वनवास आणि एक वर्षाचा अज्ञातवास पांडवांनी भोगला' म्हणून कळवळून सांगणाऱ्या श्रीकृष्णा, त्यासाठी ते द्यूत खेळले होते हे तरी तू नाकारत नाहीस ना? पण – पण कोणतंही द्यूत न खेळता मी जीवनभर जो घोर, घृणामय अज्ञातवास पत्करला आहे, त्यासाठी तुझ्या न्यायप्रिय मनाला कुठंतरी तीव्र यातना होतात काय? त्या झाल्या असत्या तर – तर तू मला पांडवांकडे येण्याचा आग्रह कधीच केला नसतास! घननीळा, एक राजकीय मुत्सद्दी म्हणून येऊनही तू मला भावनामय आवाहन आज करतो आहेस! केशवा, कटू असलं तरी हे सत्य आहे. स्पष्टपणे ते बोलतो आहे म्हणून मला उदार हृदयानं क्षमा कर. तू महान आहेस. दिव्य आहेस. माझ्या अंत:करणात तुजविषयी शब्दातीत असा नितान्त प्रेमादर आहे! म्हणूनच जो महायज्ञ तू पेटविणार आहेस त्यामध्ये माझ्या देहाची ही सुवर्णसमिधा मी नि:शंकपणे सहर्ष अर्पण करणार आहे. जगात कधी झाला नाही, पुढं कधीही होणार नाही असाच तो दिव्य महायज्ञ असेल! पुरुषोत्तमा, पांडवांच्या आणि कर्णाच्या समेटाचा समय केव्हाच निघून गेला आहे!

"जा, कृष्णा, मला पूर्ण माहीत आहे की, या महायज्ञाचा अध्वर्यू तूच आहेस! होता कपिध्वज अर्जुन आहे. सैनिक-योद्धयांचा तेजस्वी विक्रम हेच आज्य आहे. ब्रह्म, ऐंद्र, वरुण, अग्नी, पाशुपत या अस्त्रांच्या निक्षेपणाच्या वेळी योद्धयांनी उच्चारलेले महामंत्र हेच यज्ञमंत्र आहेत. अर्जुनाचं अक्षय बाणांनी युक्त गांडीव ही स्नुचा आणि त्याचा पुत्र अभिमन्यू यानं वीरांना चेतावणी देण्यासाठी उच्चारलेले सिंहनाद हेच त्या

यज्ञाचं सामगायन ठरणार आहे! गगनभेदी आवाजाचा भीम, उद्गाता धर्मपरायण युधिष्ठिर ब्रह्म, नकुल-सहदेव, शामित्र आणि तुझ्या यादव कुलातील विक्रमी सात्यकी त्यात उपअध्वर्यू ठरणार आहे! रणवाद्यांचे ध्वनी, गगनमंडल भेदणारे शंखांचे आवाज, वीरांच्या सिंहगर्जना ह्या त्या महायज्ञातील पवित्र ॠचा होणार आहेत! ध्वजदंड, रथनीड आणि हत्तींवरील अंबाऱ्या या पशुबली देण्याचे महान यूप होणार आहेत. गदा, खड्ग, बाण, त्रिशूल, तोमर, भाला, चक्र ही अस्त्रं दर्भ ठरणार आहेत. युवराज दुर्योधनानं आपली कुरुसेना ही पत्नी मानूनच या दिव्य महायज्ञाची आज तिच्यासह दीक्षा घेतली आहे....

...आणि – आणि या महायज्ञात मी माझ्या या सुवर्णशरीराची हेमसमिधा हसतमुखानं समर्पण करणार आहे! 'न भूतो न भविष्यति' असाच हा महायज्ञ होईल. शामसुंदरा, नियतीनं मला आज तुलाही नकार देण्याच्या घनघोर स्थितीवर आणून सोडलं आहे. म्हणूनच माझं – तुझ्या ह्या आतेबंधूचं अंतरंग आज अक्षरश: तीळ-तीळ तुटतं आहे. जा यादवराजा, शक्य असल्यास या दुर्दैवी कर्णाला त्यासाठी क्षमा कर! पांडवांच्या आणि माझ्या जीवनरेषा संपूर्ण भिन्न आहेत! आता त्या स्पष्टपणे एकमेकींना ग्रासणार आहेत. केंद्रबिंदूची कुंतीमाताही आता त्या कधीच सांधू शकणार नाही...."

"मनमोहना, फलामध्ये टिच्चून भरलेला रस असतो, आत काही बीजं असतात. रस असतो तो कुजून बीजांना खत पुरवावं म्हणून! मी – मी त्या रसासारखाच आहे! माझ्या आत्मार्पणावर पांडवांची बीजं अंकुरावीत, फोफावावीत असाच नियतीचा उद्देश असावा.

"जा, अश्वनदीच्या पात्रासारखा समेटाचा तो समय केव्हाच वाहून गेला आहे! आता कर्ण किंवा पांडव हे भवितव्य अटल आहे. मी मृत्यूच्या थरकविणाऱ्या अदय जवनिकेपलीकडे केव्हाच गेलो आहे! सूतपुत्र, अंगराज, दानवीर, दिग्विजयी, महारथी, धनुर्धर कर्ण यांपैकी कोणत्याच आवेशानं आता मी लढणार नाही! मी लढणार आहे अंधाराच्या सघन साम्राज्याचा उदरभेद करणाऱ्या प्रखर सूर्यकिरणासारखा! पिता सूर्य, माता कुंतीदेवी, मामेबंधू श्रीकृष्ण, बंधू पांडव या सर्वांच्या नात्याला शोभेल असा! वीर कर्ण म्हणून!!

"जनार्दना, इंद्राला कवच-कुंडलं दान करणारा कर्ण युद्धात योद्धयांचे हात, पाय आणि कवचभेद करणार आहे! सूर्यदेवांना जीवनभर अर्घ्यदान करणारा कर्ण रणांगणात वीरांना कंठस्नान घालणार आहे. जीवनभर राधामातेचे चरण धुणारा कर्ण युद्धात वीरांच्या रक्तानं आता या पुण्यपावन आर्यभूमीचे चरण धुणार आहे. जीवनभर शापित ठरलेला कर्ण सर्वांना स्वर्गाचं वरदान करणार आहे! जीवनभर अवमानित झालेला कर्ण संग्रामात सर्वांना गौरविणार आहे! जा, यदुकुलोत्पन्ना, शांत चित्तानं महायज्ञाच्या तयारीला लाग! आणखी एकच विनंती आहे. पांडवांना मी त्यांचा ज्येष्ठ बंधू आहे असं कधीच सांगू नकोस! मग ते माझ्याशी कधीही प्राणपणानं लढणार नाहीत! जा बंधुराजा, कर्णाचं राजरत्न पांडवांच्या राजमुकुटात कधीच बसू शकत नाही, हे त्यांना तुझ्या रसाळ वाणीनं पटवून सांग! आणि या सूतपुत्राचा हा निर्वाणीचा भावप्रणाम उदार अंत:करणानं मान्य करून घे! हृषिकेशा, तुला देण्यासाठी हा – हा एवढा भावप्रणामच आता माझ्याजवळ शिल्लक आहे!" मी त्याच्या चरणांना स्पर्श करण्यासाठी ओणावलो. माझ्या नेत्रांतून ओघळलेले दोन अश्रुबिंदू त्याच्या नितळ नील चरणांवर ठिबकले. क्षणभर थरथरले

आणि खालच्या मातीत एकरूप झाले! अदृश्य झाले!

"जयतु राधेय कर्णा!" त्यानं माझे खांदे धरून हळुवारपणे मला उठविलं आणि गाढ-प्रगाढ आलिंगन दिलं! धन्यतेच्या भावनेनं ओघळणारा माझ्या नेत्रांतील अश्रूंचा पूर त्याच्या निळ्या पाठीच्या रेखीव पन्हाळीतून पाझरू लागला! त्याचेही अश्रुबिंदू माझ्या मस्तकावर पडताच जीवनाचा दिग्विजय पूर्ण झाला असंच मला वाटलं! एवढा सौभाग्याचा, एवढा गौरवाचा, एवढा धन्यतेचा – कृतार्थ कळसाचा क्षण कोणताच नव्हता! कोणताच असणार नाही!

आपल्या हातातील माझा हात हळुवारपणे सोडून, पश्चिम क्षितिजावर एक दृष्टिक्षेप टाकीत, मंदपणे चालत तो रथारूढ झाला. वेग हाती घेऊन रथनीडावर उभा राहिला. आपल्या शुभ्र घोड्यांवर प्रहार करण्यासाठी त्यानं आसूड उंचावला, त्याची-माझी ही अंतिम भेट होती. मनाच्या भांडारात पडलेलं एक हृदय पोखरणारं शेवटचं दु:ख मला त्याच्या स्वाधीन करायचं होतं! सर्वांपासून पूर्णत: मुक्त व्हायचं होतं! वायूसारखं! सूर्यकिरणांसारखं!

"माधवा, थांब!" हात उंचावून त्याला मी साद घातली. आसूड तसाच उंच धरून तो आश्चर्यानं माझ्याकडे पाहू लागला. धावत जाऊन त्याच्या रथनीडावर हात ठेवून संथपणे त्याला म्हणालो, "मी कधीच तुझ्याकडे काही मागितलं नाही! आज मागतो आहे! माझं एक काम करशील काय? तू – केवळ तूच त्यासाठी योग्य आहेस!"

"सांग! कसलं काम राधेया?" त्यानं भुवया उंचावल्या.

"अच्युता, त्या विशालाक्षी, शामल भावगंधित द्रौपदीला सांग की – की कर्णाच्या अंत:करणाच्या वीणेची एक भग्न तार तुझ्या झाल्या – केल्या अवहेलनेच्या जाणिवेनं सदैव कर्कशपणे झणकारतच राहिली आहे! परंतु पाच पतींची पत्नी असूनही पातिव्रत्याच्या पवित्र कळसावर पोहोचलेल्या त्या एकमेव आर्येला – पांचालीला – सांग की – की शक्य असल्यास त्यासाठी या कर्णाला क्षमा कर!'

वेग उडवून त्यानं रथ विदुरांच्या पर्णकुटीच्या दिशेनं वळविला. चक्राखाली उडणारी धूल मला स्पष्ट दिसत होती! थोड्या अवकाशातच ती शांत झाली, पण माझ्या मनातील विचारांचा लोळ शांत झाला नव्हता. ज्या पर्णकुटीत राजमाता होती तिकडे पाठ फिरवून मी राजवाड्याकडे परतलो. राजमाता होती ती मला जन्म देणारी! राजवाड्यात राधामाता होती! जो काही मी होतो तो घडविणारी! मला निर्माण करणारी!

**

# बारा

श्रीकृष्ण निघून गेला. माझ्या जीवनाचा राजचषक आपल्या चरणांनी लवंडून! माझ्या भवितव्याचा त्यातील दुग्धरस कसातरीच ओघळावयास लावून. समाधान एकच होतं की, हा राजचषक त्याच्या पुण्यपावन चरणांनी लवंडला जात होता. माझं जन्मवृत्त मला त्याच्याकडून समजलं होतं.

माझ्या जीवनाचा रहस्यभेद करून त्याच सहजपणे तो रथातून निघून गेला होता; ज्या सहजतेनं गोकुळात तो गोपालांसह गायी चारण्यासाठी गोवर्धन पर्वताच्या उतरणीवर गेला असेल! मी मात्र संपूर्ण अस्वस्थ झालो होतो. एक राजकीय मुत्सद्दी म्हणून आलेल्या त्याच्या प्रलोभनांना बळी पडायचं नाही, यासाठी मी त्याला नकार दिला होता – पण – पण मीही एक माणूसच होतो! कुणाला आपल्या जीवनाची एवढी घोर विवंचना निस्पंद ठेवील? काय दोष होता माझा की, मार्ग चुकलेल्या रानव्याघ्रानं मेंढरांच्या कळपात वाढावं तसं मी जीवनभर वाढावं! मी सूर्यपुत्र असूनही जीवनभर लक्ष-लक्ष नगरजनांचे हृदय फोडणारे धिक्कार खाली मान घालून मला सहन करावे लागले होते! पेटत्या पलित्यासारखं मन घेऊन जीवनभर सुसाट धावत जगावं लागलं होतं! हिमालयात जन्म पावणाऱ्या गंगेचं मधुर जल सागराला मिळताच क्षारमय होऊन जातं; तसंच माझं जीवन नव्हतं काय? आता उगमस्थानाच्या धवल हिमालयाचा काय उपयोग होता? मी दिव्य कुलातील आहे, माझी परंपरा श्रेष्ठ आहे, माझे पूर्वज पराक्रमी होते, मान्यवर होते या ठिसूळ चंदनकाष्ठाला उगाळून मला आता काय मिळणार होतं? हस्तिनापुरातील राजचौकात उभं राहून कंठशोष करून जरी आज मी ओरडलो असतो की, ‘मीही क्षत्रियच आहे! मी हीन नाही, तुच्छ नाही, क्षुद्र नाही!’ तरीही त्यावर कुणाचा विश्वास बसला असता काय? माझ्या जीवनाच्या या फरफटीला उत्तरदायी कोण? अंतरंगात दाटलेले हे विफल जीवनाचे असह्य कढ कुणाला दाखवावे? कुणासाठी मी युद्धात उतरणार होतो? भवितव्याला भुलवीत खोट्या आदर्शांना उराशी कवटाळत कुठवर धावायचं? जुनं सर्व उधळलं होतं, नष्ट झालं होतं – जे काही नवं होतं ते सापडत नव्हतं! भलत्याच मार्गानं धावत जाताना माझ्या जीवनाची अश्वनदी आता संभ्रमाच्या निषाध पर्वताला थडकून मध्येच थांबली नव्हती काय? दाटणारी पाण्याची कोंडी क्षणाक्षणाला अधिकच दाटत नव्हती काय? केवळ मरेपर्यंत जगणं याशिवाय जीवनाला कसला अर्थ उरला होता?

उभ्या ठाकलेल्या पर्वतप्राय समस्यांना तोंड द्यायला ज्या वेळी आत्मनिर्भरपणे, सिंहाच्या धैर्यानं, सावध चित्तानं मी उभं राहावं, नेमक्या त्याचवेळी हे विचारवैविध्य मला पोखरू लागलं होतं! कुठला एकही भाव असा सापडत नव्हता की, जिथं अंतरंगातील संघर्ष मिटावा! सगळीकडे केवळ विचारांची साचलेली डबकी! तीच ती पुरातन! तीच ती माझी मलाच किळसवाणी वाटणारी! स्वत्वाला हरण करणारी! सामर्थ्यहीन, शक्तिहीन, विक्रमशून्य, आत्मविस्मृत, आत्मघातकी ठरणारी! द्रौपदीच्या घोर अवहेलनेची! पांडवांच्या द्वेषाची! अर्जुनवधाच्या प्रतिज्ञेची! काय करावं? कुठं जावं?

पश्चिम क्षितिजावर दृष्टी टाकून, जगाला कोटयवधी वर्षं उजळणारा माझा पिता तरी मला काही आत्मधैर्य देईल काय म्हणून मी डोंगराकडे पाहिलं! हस्तिनापुराला कवटाळणारी त्यांची तप्त किरणं मला स्पष्ट सांगत होती, 'कर्ण, धैर्य सोडू नको! धुळीत पडला तरी हिरा काही काळ्या अंधकाराची किरणं परिवर्तित नाही करत! तुझ्या शरीरात असलेलं माझं सुप्त तेज एक दिवस जगाला दिपवून टाकील! सर्वांचं नेतृत्व करीत मानानं तू मिरवशील. साक्षात श्रीकृष्ण तुझ्यासमोर नतमस्तक होईल! त्यासाठी एकच कर! आत्मसंभ्रम टाळ! द्विधा मन:स्थिती फेकून दे! तुझ्यासाठी एकचित्त होण्याचा केवळ एकच मार्ग आहे! कुरू म्हणून लढणं!'

झपाझप पावलं उचलीत राजवाड्याकडे परतताना माझ्या मनाचे सर्व विभ्रम शांत झाले. आपण सूर्यपुत्र आहोत ही एकच जाणीव सर्वांगावर हर्षाचे रोमांच फुलवीत होती. संध्याकाळ होत आल्यानं कडेच्या गर्द वृक्षाच्या पर्णझडीत रात्रकिडे किरकिरत होते, पण त्यांच्या किरकिरण्यामुळे आता मनाला अस्वथपणा जाणवत नव्हता. रात्रकिडेच काय; पण सारं जग उलटं उभं राहिलं तरी त्याची क्षिती आता उरली नव्हती.

प्रत्येक पावलागणिक गतजीवनातल्या ठळक प्रसंगांचा अर्थबोध होत होता. माझं शरीर अनेक प्रसंगी का तप्त झालं होतं, मला अर्घ्यदानाची ओढ का होती, अंगावर कवचं-कुंडलं का होती, संकटापूर्वी संकेत देण्यासाठी ती का निस्तेज पडत होती, सर्वांगाचा वर्ण हिरण्यमय कसा होता या सर्व रहस्यांचा भेद श्रीकृष्णाच्या मुखातून झाला होता. माझे पाय युधिष्ठिर का निरखीत होता, इंद्रप्रस्थातील राजवास्तूच्या भित्तीवर अर्थपूर्ण चित्र कुणाचं होतं, राजमाता कुंतीदेवींनी माझ्या विवाहात भेट का पाठविली ह्या सर्व घटनांची अर्थपूर्ण संगती लागत होती आणि तरीही जीवनाच्या घोर फसवणुकीनंही मनाचे तट त्यामुळे आता थरकत नव्हते! विव्हळत नव्हते! उलट सूर्यपुत्र या जाणिवेनं मृत्यूलाही पायदळी तुडवून त्याच्या मस्तकावर उभं राहण्याइतकं मन निर्धारी झालं होतं! आता संभ्रम नव्हता, किंकर्तव्यता नव्हती, गोंधळ नव्हता! एकच मार्ग! एकच दिशा! महायुद्धाला तोंड देणं!

राजवास्तूत येताच पाच सोनेरी कुंभ आनंदातिशयानं कवेत दामटून टाकले! सवयीप्रमाणं 'शोण' म्हणून हाक घातली. तो नव्हता. असता तर मी त्याला सांगितलं असतं, 'तुझी कवचं-कुंडलांसाठी असलेली तक्रार मी केव्हाच दूर केली आहे आणि आता तर नात्याचे बंध तोडूनही मी खराखुरा सूतपुत्र झालो आहे! मी सूतपुत्र आहे, सूर्यपुत्र आहे, कुरू आहे, पण – पण पांडव नाही! कर्ण आहे; पण कौंतेय नाही! शोणाऽ, तुझा बंधू कर्ण आहे.'

शोणाला घातलेली साद ऐकून, सेवेत तत्पर असलेली वृषाली मात्र कक्षात आली. "काय हवंय?" तिनं आपुलकीनं विचारलं.

"काही नको!" कुणाकडूनही मला आता खरोखर काहीच नको होतं. मन तृप्तीनं, कृतार्थतेनं, धन्यतेनं दुथडी भरून नुसतं ओसंडत होतं. त्या भाववर्षावात मी न्हाऊन, निथळून निघत होतो. एकच अडचण होती. घडलेल्या घटनेतील एक अवाक्षरही राधामाता, वृषाली, सुप्रिया, माझे पुत्र – कुणालाही सांगता येणारं नव्हतं. काही असीम आनंदाचे क्षणही असे विचित्र असतात की, जिवाला जीव देणाऱ्या जिवलगांनाही त्यांतील एक कणसुद्धा उचलून नाही देता येत!

"वृषाली, आज मला खूप-खूप अपूप खायचे आहेत! तुझ्या हातचे नाही!

राधामातेच्या!” मी तिला माझी इच्छा सांगितली. ती आश्चर्यानं माझ्याकडे पाहत म्हणाली, “का? आज एवढा कसला आनंद झाला आहे अंगराजांना?”

“तूच सांग, तुझा सुदामन जिवंत होऊन आता पुन्हा तुझ्यासमोर उभा राहिला तर केवढा आनंद होईल? मग तेवढाच आनंद झाला आहे मला! कशामुळे ते विचारू नकोस! राजकुमारी दु:शलादेवीनं तुला माझ्याविषयी विचारलेला प्रश्न जसा तुला कधी सांगता आली नाही, तसंच या आनंदाचं कारणही मला नाही सांगता येणार!” मी गवाक्षाहून बाहेर पाहत तिला म्हणालो. पौर्णिमेचा तोच टिपूर चंद्र आकाशात उभा होता. त्याच्या चंदेरी प्रेमाचं दान घेऊन गंगामातेचं पात्र तळपत होतं. किती अनंत काल ते तसं तळपत आलं होतं आणि पुढं तळपणार होतं याचा विचार करताना मला उत्तर सापडत नव्हतं.

अपूपांची तयारी करण्यासाठी वृषाली निघून गेली. जाताना इंगुदीचं तेल घालून कक्षातील सर्व समया तिनं स्वत: पलित्यानं उजळल्या होत्या. माझ्या जीवनाच्या भावकक्षाही तिनं अशाच, आयुष्यभर प्रेमाच्या पवित्र समया उजळल्या नव्हत्या काय? मी सूर्यपुत्र आहे, असं तिला मी कवेत घेऊन सांगितलं असतं तर – तर पतीच्या मानानं आपल्या हीनतेच्या जाणिवेनं त्या हळव्या स्त्रीचं हृदय भंग पावलं नसतं काय? तिनं एका सारथ्यावर प्रेम केलं होतं – सूर्यपुत्रावर नव्हे! काही वेळ मौन हेच किती महान कार्य साधतं!

अपूपांचं आकंठ भोजन करून सुप्रियेनं दिलेला तांबूल मुखात घालताना मन, शरीर सर्व कसं हलकं झालं होतं! जीवनाची कोंडी फुटली होती! वृषालीजवळ होतं ते अनेक रम्य स्मृतींचं साक्षीदार असलेलं माझं उत्तरीय तिच्याकडून मागून घेऊन ते अंगाभोवती लपेटीत चांदण्यात भटकण्यासाठी राजवाड्याबाहेर पडलो. दूरवर युद्धशालेच्या दिशेनं लोखंडी थाळीवर लाकडी दंडानं आघात करून रात्रीच्या सेवक द्वारपालानं पहिल्या प्रहराच्या घटकांचे दिलेले टोल स्पष्टपणे ऐकू येत होते. चांदण्यात निथळलेलं चंदेरी हस्तिनापूर शांत होतं. गजशालेतल्या कुठल्यातरी हत्तीचे सुळे आतल्या लाकडी खांबावर आपटल्यामुळे ऐकू येणारी खटखट, घोड्यांची चुकार फुरफुर आणि रवंथ करणाऱ्या गायींनी गवतातील कीटक मानेवर चढताच मानेला दिलेल्या झटक्यामुळे होणारी घंटांची अस्पष्ट खणऽ खणऽ याशिवाय कसलाच ध्वनी ऐकू येत नव्हता.

धावत जाऊन शोणानं जिथून एक मांजरीचं पिल्लू राजमाता कुंतीदेवींच्या रथाखाली सापडू नये म्हणून उचललं होतं ते ठिकाण आलं! आज शोण नव्हता, ते पिल्लू नव्हतं, राजरथही दुर्योधनानं उद्ध्वस्त केला होता! होतो आम्ही दोघं! राजमाता आणि मी! त्या विदुरांच्या पर्णकुटीत श्रीकृष्णाबरोबर आपल्या सुखदु:खाच्या गोष्टी करीत बसल्या असतील. गोपालांत राहिल्यामुळे कण्या खाण्याची आवड असलेल्या श्रीकृष्णानं आपल्या आतेला आज त्याच शिजविण्याला सांगितलं असेल! विदुर आग्रह करून त्या त्याला वाढीत असतील! सर्व चित्र माझ्या डोळ्यासमोर स्पष्ट उभं राहिलं, आज ते ज्याला ऐकवावं तो शोण सांगाती नाही ही उणीव फार प्रकर्षानं अस्वस्थ करू लागली!

राजमार्गावरून पुढं चालू लागलो. अशोक, आम्र, शाल, पिंपळ अशा अनेक वृक्षांनी चांदण्याला थोपवून धरून धरतीची उत्सुकता ताणली होती! काही झरोक्यांतून

निसटलेल्या गोल-गोल चंद्रकिरणांनी मात्र राजमार्गावर विलोभनीय रांगोळीच चितारली होती! ती पाहताना दिग्विजयाहून परतल्यावर नगरजनांनी केलेल्या प्रेमवर्षावाचा दिवस आठवला. पण त्यानं मन उचंबळून नाही आलं! येणारही नव्हतं! कीर्ती, प्रतिष्ठा, गौरव हे क्षणाचे बुडबुडे आता काही मन मोहवू शकत नव्हते. युद्धशाला आली. तिच्या द्वारात उभं राहताच आतील तो चौथरा दिसला! ज्यावर चढून हात उंचावून मी सूर्यदेवांना गुरू मानलं होतं! ज्या चौथऱ्याजवळ अर्जुनाच्या आणि माझ्यामध्ये एका भुजंगाचं वेटोळं पडलं होतं! ज्यावर असंच बसून एक पेंढा भरलेला पक्षी वृक्षाला टांगून शोणानं धरलेल्या पलित्याच्या प्रकाशात त्याच्या डोळ्यांच्या बाहुल्या बाणानं टिपल्या होत्या!

शेवटी नगराबाहेर आलो. ज्या ठिकाणी गुरू द्रोणांनी स्पर्धेचा आखाडा उभारला होता ते भव्य पटांगण आलं! क्षणभर तिथं थांबताना त्या स्पर्धेच्या दिवसाच्या स्मृतींची पाखरं मनात डोकावून गेली. ते अनेक शस्त्रास्त्रांचे आखाडे! ते प्रवेशद्वाराबाहेर तळमळत उभं राहणं! ते प्रेक्षकगणांचे हर्षोद्गार! अर्जुनाचा लक्षयवेध! टाळ्या! ते शोणाचं कळकळीचं सांगणं! तमाल वृक्षावरची ती पत्ररथ पक्षीण! पायदळी तुडविली गेलेली नीलकमलांची माला! सूतपुत्राच्या धिक्कारानं दुमदुमलेलं भावनाशून्य पोकळ आकाश! सगळं स्पष्ट दिसत होतं – पण मनावर ते कोणताही परिणाम आता करू शकत नव्हतं! असली भावचित्रांची रांगोळी कोरून घ्यायला मनाचं अंगण आता रिकामं नव्हतं! तिथं होतं दाटलेलं महायुद्ध!

मध्यान्ह रात्रीच्या समयी गंगाकिनारी आलो. आकाशात चंद्र ऐन माथ्यावर आला होता. गंगेच्या पात्रातील दुसरा चंद्र पाहून काळवंडलेल्या त्याच्या मुखावर काळा डाग दिसत होता! भुरके ढग मध्येच त्याला वेढीत होते.

एका पसरट पाषाणावर बसलो. राधामातेनं दिलेली दंडातील चांदीची पेटी काढून हलकेच ती गंगेच्या पात्रात सोडून दिली! ती चिमुकली पेटी जललहरींवर हिंदोळे खात दूर-दूर जाऊ लागली! दृष्टिपलीकडे! गंगेला ती विचारणार होती – 'सांग, तुझ्या जललहरींची संख्या अधिक आहे की माझ्या स्वामींच्या जीवनातील मी पाहिलेले भावप्रसंग अधिक आहेत?'

तिला हात उंचावून निरोप देऊन राजवाड्याकडे परतलो. शांत चित्तानं माझ्या सोमवंशीयांच्या प्राचीन वास्तूत गाढ झोपी गेलो!

**

# तेरा

हत्तींच्या अविरत चीत्कारांनी सकाळी जागृत झालो. तेव्हा गवाक्षातून बाहेर पाहताना चारी दिशांना देशोदेशींच्या विराट सेनांचे हस्तिनापुराभोवती पडलेले तळ दिसले, दुर्योधनाच्या तत्परतेचं आश्चर्य वाटलं! पांडवांच्या शोधासाठी पेरलेल्या दूतांना परस्पर तातडीचे संदेश पाठवून त्यानं देशोदेशींचे सैनिक आपल्या पक्षाला कुशलतेनं वळवून घेतले होते.

मगध, मद्र, चेदी, अवंती, कुलिंद, सिंध, कलिंग बहुसंख्य देशांचे ध्वज हस्तिनापुराभोवती मंडलाकृती उभे होते! त्यांत द्वारकेचा गरुडध्वज कुठंच दिसत नव्हता! दुर्योधनाला यादवांचं महत्त्व पटलेलं नसावं! त्याचा भ्रम दूर करून त्याला प्रथम द्वारकेला पाठवावा म्हणून तसाच कक्षाबाहेर पडलो.

अमात्य, पितामह, संजयकाका, दु:शासन, मामा, जयद्रथ सर्व आपापल्या कामात व्यग्र असलेले दिसले. दुर्योधनानं सर्वांना खाल्ल्या अन्नाला जागण्याचं आव्हान केलं होते. कुणीही टाळाटाळ करीत नव्हतं! भयग्रस्त दिसत नव्हतं!

"युवराज, महायुद्धाची तयारी पूर्ण करताना तू यादवांकडे कसं काय दुर्लक्ष केलं आहेस?" दु:शासनाला देशोदेशीहून आलेल्या सैनिकांना अन्नपुरवठा करण्याच्या सूचना देणाऱ्या दुर्योधनाला मी विचारलं.

"नाही! कर्ण, मी त्या कृष्णाकडे कदापिही जाणार नाही!" तो ताठ उभा राहत म्हणाला.

"आता तुझ्या इच्छेचा प्रश्न नाही! हस्तिनापुराभोवती एकत्रित झालेल्या या अफाट सेनेचा हा प्रश्न आहे! तुला द्वारकेला जावंच लागेल! दुर्योधन म्हणून नव्हे – या अफाट महायुद्धाचा नियोजक म्हणून!"

"कर्ण, हा –"

"हा – तो – तुझं मी काही ऐकणार नाही! या युद्धासाठी तुला माझी आवश्यकता असेल तर – तर तुला द्वारकेला जाऊन श्रीकृष्णाला आपल्या पक्षाकडे उभा केलाच पाहिजे! लक्षात ठेव, श्रीकृष्णाला – त्याच्या सात अक्षौहिणी अफाट सैन्याला नव्हे!"

"कर्ण, श्रीकृष्ण आपल्या पक्षाला येईल असं अजूनही वाटतं तुला?" तो भुवया उंचावत म्हणाला.

"होय! तू त्याच्यासमोर आजही नतमस्तक झालास तर! त्याची क्षमा मागितलीस तर!" मला श्रीकृष्णाच्या उदारतेची खात्री वाटत होती!

"शक्य नाही! तो येणार नाही, असं भासवून मी तुझी दिशाभूल करीत नाही! पण माझी खात्री आहे, मी त्याच्या चरणांवर मस्तक घासलं तरी तो येणार नाही! आणि ते मी कधी घासणारही नाही!"

"मग – मग एक तरी अवश्य कर! त्याला तटस्थ राहायला सांग! द्वारकेतच!" तोच एक निर्वाणीचा मार्ग होता.

"ठीक आहे! तुझ्या इच्छेसाठी मी द्वारकेलाही जाईन! श्रीकृष्णाला वळविण्याचा

यत्नही करीन! तू, पितामह, अश्वत्थामा युद्धभूमी तयार करवून घ्या! पितामहांना विचारून युद्धाचे नियम ठरवून घ्या! शस्त्रास्त्रं, रथ, लोहत्राणं, रणवाद्यं यांची तयारी ठेवा! आलेल्या सर्व सैनिकांना धनधान्य आणि सोमरस यांचा पुरवठा नित्यनेमानं काळजीपूर्वक करा!''

आपला सारथी प्रातिकामन याला आज्ञा देऊन द्वारकेला जाण्यासाठी त्यानं तत्काळ रथ जोडायला सांगितलं. मी सुटकेचा नि:श्वास सोडला. त्यानं श्रीकृष्णाला तटस्थ ठेवला तरी पुरेसं होतं! केवळ श्रीकृष्ण पाठपुरावा करीत होता म्हणून पांडव वीर गणले जात होते. नाहीतर एरवी ते समर्थांच्या राज्यातील भिक्षुक होते.

**

# चौदा

हस्तिनापुरात महायुद्धाची तयारी सुरू झाली! दुर्योधन द्वारकेला निघून गेल्यामुळे शस्त्रास्त्रं, युद्धभूमी, गजदलं, अश्वसेना या सर्वांची पाहणी मलाच करावी लागत होती. नेहमी मदतीला तत्पर असणारा शोण संगती नव्हता. त्याची जागा दुर्योधनाच्या आग्रहामुळे अश्वत्थाम्यानं भरून काढली होती. तो माझ्याबरोबर फिरत होता. एक आश्रमवासी म्हणून नव्हे – तत्त्वज्ञ म्हणून नव्हे, आता एक योद्धा म्हणून! राजनिष्ठ योद्धा म्हणून!

दु:शासन मल्लपथकं, आल्या सेनेची व्यवस्था, त्यांची संचलनं या गोष्टी स्वत: पाहत होता. शकुनीमामा, युद्धात भाग न घेणाऱ्या राजांना कौशल्यपूर्ण पत्रं धाडून त्यांना आपल्या पक्षात सामील करून घेण्यात मग्न झाले होते. महापुरातल्या सर्व नद्यांचा पाणलोट वायुगतीनं सागराकडचं धावतो तसे हस्तिनापूरच्या सभोवतीचे राजे चतुरंगदल सैन्यासह हस्तिनापूर गाठीत होते. गंगेच्या विशाल किनाऱ्यावर, सैनिकांच्या शिबिरांचे असंख्य तळ पडत होते!

बाण, भाले, खड्गं, त्रिशूल यांची लक्षावधी पाती तयार करण्यात गढून गेलेले लोहकार घणांवर घण घालून लोहशाला दणाणू लागले! ठिणग्या उडू लागल्या. घोडयांच्या पाठीवर पालाणं चढवून त्यांच्या तोंडी वेग देताना अश्वपाल थकू लागले. शेकडो घोडयांच्या खुरांना लोहनाल ठोकण्यात अश्वपाल गढून गेले. हंडयाहंडयांनी पाकशालेत अन्न शिजवताना पाकशालेच्या पालकांना निद्रा घेण्याइतकाही अवसर सापडत नव्हता. रथाची मोडतोड पुन्हा नीट करणारे रथकार अवजारं परजून मधमाश्यांसारखे अविरत कष्टत होते. अधिषणात कुटून टाकलेल्या सोमवल्लींचा चोथा मद्यशालेभोवती इतका दाटला होता की, दुरून तिच्या भित्ती ओळखू येणं शक्य नव्हतं! शिबिरं उभारण्यासाठी लागणारे पटल विणताना विणकऱ्यांच्या डोळ्यांभोवती जाळी तयार होण्याची वेळ आली! त्यांनी कुरूंचा, ठेवणीतील भगवा, त्रिकोणी राजध्वज काढून त्याच्या त्रिकोणी काठाभोवती तलम अशा निळ्या रेशमी धाग्यांची नक्षी विणून, मध्यभागी चंदेरी धाग्यात चंद्रप्रतिमा विणली होती! एका भल्यामोठ्या ढालीच्या आकाराएवढा तो मानध्वज महामंत्री विदुरांनी आपल्या हस्ते पितामह भीष्मांच्या स्वाधीन केला!

'युद्ध आपल्या विचारसरणीला कधीच मानवणारं नाही!' असं सांगणारे महामंत्री विदुर, कुणाचीही मनधरणी न ऐकता युद्धापूर्वी हिमालयात जाणार असं राखीव गोटात निश्चयपूर्वक बोललं जात होतं! जाण्यापूर्वी राजमाता कुंतीदेवींना ते उपप्लाव्याला पोहचतं करणार असल्याचंही मला प्रभंजनाकडून समजलं होतं. आयुधं परजताना होणारी खसखस, घोड्यांच्या खुरांची टपटप यांचं अविरत संगीत ऐकत युद्ध घाटत होतं! श्रीकृष्णाच्या अभूतपूर्व महायज्ञाची महान सज्जता होत होती.

आर्यावर्तातील कोणत्याही तीर्थक्षेत्रावर भावुक यात्रिकांची महायात्रा भरत नसेल एवढी मोठी संग्रामयात्रा हस्तिनापुराभोवती दाटलेली होती! त्यातील प्रत्येक

संग्रामयात्रिकाला स्वर्गाची गंजलेली महाद्वारं आपुल्या पुष्ट बाहूंनी ठोठावयाची होती! शस्त्रांवर शस्त्रं रचून त्या दिव्य सोपानानं स्वर्लोकांच्या साम्राज्यात मत्तपणे प्रवेश करायचा होता! उद्याच्या भीषण कालाची ती न्यायनिष्ठुर मागणी होती! ती पूर्ण करण्यासाठी एकत्रित झालेले आत्मनिर्भर आणि बलदंड असे लक्ष-लक्ष सैनिक राजनगराच्या सर्व राजमार्गावरून उन्नत छातीनं निर्भयपणे फिरताना मला राजवाडयाच्या सौधावरून रोज स्पष्ट दिसू लागले! नवीन येऊन मिळणाऱ्या सैनिक पथकांच्या असंख्य हत्ती, घोडयांनी घुसळल्यामुळे गंगेचं एरवी हिमासारखं दिसणारं पांढरंशुभ्र पात्र दरदिन अधिकच गढूळ होत होतं! आयुधागारांतील लक्षावधी आयुधं बाहेर काढून परजण्यात आली होती. कुरुक्षेत्राच्या युद्धभूमीभोवती समरांगणाची कक्षा दाखविणारी असंख्य छोटी-छोटी, पांढरी निशाणं उभारण्यात आली. देशोदेशींचे विविध वर्णांचे, विविध आकाराचे लहानमोठे शंख, शंखागारांत लाकडी बैठकींमध्ये रचून ठेवण्यात आले होते. नगरातील निवासा-निवासांमधील शयनगृहांतील दगडी समया कधी नव्हत्या त्या मध्यान्ह रात्रीपर्यंत जळत तेवत राहू लागल्या! महाराज हस्तींनी वसविलेल्या राजनगराच्या जीवनक्रमातील निर्वाणीचा समय येऊन ठेपला होता! मार्गशीर्षाच्या धुक्याचे दाट ढग राजवाडयाच्या तटाभोवती दाटू लागले!

महायुद्ध! माझ्या आयुष्यातील हे तिसरं महायुद्ध होतं! पहिलं पांचालीच्या स्वयंवरात अनेक राजांनी मिळून कांपिल्यनगरात मांडलेलं! दुसरं युवराज्ञी भानुमतीचं, युवराज दुर्योधनानं हरण केलं त्या प्रसंगी मला लढावं लागलेलं! ह्या दोन्ही महायुद्धांत अनेक देशांचे राजे होते. आता हे तिसरं महायुद्ध होतं! पूर्वीची दोन्ही महायुद्धं आमच्या देशापासून फार दूर – दुसऱ्या खंडात झाली होती! आम्हा कुरूंना त्याची प्रत्यक्ष झळ कधीच पोहोचली नाही! पण – पण हे तिसरं महायुद्ध आता दुसऱ्याच्या खंडात नव्हतं! ते आमच्या देशानजीक येऊन ठेपलं होतं! अगदी हस्तिनापुराजवळ! कुरुक्षेत्रावर! या वेळी अंतर्गत संघर्ष मिटवून मिळतील त्यांचं, मिळेल ते साहाय्य घेऊन उभं ठाकणं हेच सुज्ञपणाचं नव्हतं काय?? माझं मन त्याच निर्धाराच्या निर्णयावर येऊन ठेपत होतं! कोणत्याही कारणासाठी ते आता कधीच डळमळणार नव्हतं! परिस्थितीचं आव्हान स्वीकारून मी उभा ठाकलो होतो! इतरांना धैर्य देत होतो! प्रथम कुरूंच्या साम्राजाचा वृक्ष बळकटपणे धरतीत मुळे रोवून ताठपणे उभा राहिला पाहिजे! तरच त्यावरची कर्ण, दुर्योधन, अश्वत्थामा, महाराज धृतराष्ट्र, पितामह ही घरटी सुरक्षित राहू शकली असती! प्रथम देश, राष्ट्र, मग व्यक्ती आणि त्यांचा विचार! सहस्त्रावधी कुरू हातात हात गुंफून एकमनानं झुंजतील तर हिमालयच काय; पण त्याच्या पलीकडेही जे दुर्लंघ्य असेल, अजिंक्य असेल तेही पादाक्रांत करणं सहज शक्य होतं.

दूतांकरवी पांडवांशी विचारविनिमय करून पितामहांनी युद्धनियम ठरवून घेतले. अश्वत्थामा आणि दुःशासन, आपले परस्पर भिन्न स्वभाव विसरून ते नियम सहस्त्र योद्धांच्या सैनिकदलांना समजावून सांगत होते.

‘एकदा वापरून धरणीवर पडलेलं शस्त्र पुन्हा हाती घेऊन वापरू नका, निःशस्त्र, शरणागत, विरथ, मृत यांवर शस्त्र उचलू नका. प्रेत दहन करणारे, सोमरस पुरविणारे, अन्न शिजवणारे यांना वधू नका! पदातीनं पदाती, अश्वसादानं अश्वसाद, गजातीनं गजाती, गदाधरानं गदाधर, खड्गधारकानं खड्गधारक, रथ्यानं रथी असा एका एकाशीच संग्राम करा. सूर्यास्त होताच शस्त्र थांबवायला चुकू नका. ’ अशा अनेक

प्रकारच्या सूचना ते सैनिकांना देत होते. ते चुकू नयेत म्हणून त्यांच्याकडून प्रात्यक्षिक करवून घेत होते. ऐन मार्गशीर्षातील कडाक्याची थंडी असूनही राजनगरातील वातावरण तप्त झालं.

पांडवांकडून पांचालीचा बंधू धृष्टद्युम्न युद्धभूमी आखण्यासाठी कुरुक्षेत्रावर आला. पितामहही हस्तिनापुरातून गेले. कुरुक्षेत्र हस्तिनापूरहून थोडं दूर इंद्रप्रस्थालगत होतं! त्यावर सूर्य, ब्रह्म अशी अनेक सरोवरं होती. दृषद्वती, सरस्वती अशा नद्या होत्या. पंधरा-एक योजनांचा प्रशस्त भूप्रदेश युद्धभूमी ठरणार होता.

गज, अश्व, पायदळ आणि रथदळ यांची स्थानं निश्चित करवून घेऊन हस्तिनापुरात एक पळभरही न थांबता, जाता-जाता राजमातेला विदुरांच्या पर्णकुटीत भेटून धृष्टद्युम्न परस्परच उपप्लाव्याला निघून गेला. आखलेली युद्धभूमी पाहून आलेला सत्यसेन काळजीनं म्हणत होता की, दक्षिणेच्या दिशेनं ती उतरती होत गेली आहे! त्याची सत्यता पटवून घ्यावी म्हणून स्वत: मीच समरांगण पाहून आलो. तो म्हणाला ते सत्य होतं. कितीही भर घातली असती तरी युद्धभूमीवरील दक्षिणेकडील उतरण समपातळीत आणता आली नसती, कारण तिचं क्षेत्र अवाढव्य होतं.

युद्धभूमीची एक राहो, पण माझी जीवनाची उतरण आता कशानं समपातळीत येणार होती?

मार्गशीर्षातील पंचमी मागं पडली. थंडीचा कडाका थोडा कमी झाला. द्वारकेहून परतलेला दुर्योधन नगरात शिरताना त्याच्या रथात श्रीकृष्ण दिसतो काय म्हणून मी सौधावरून मोठ्या औत्सुक्यानं पाहिलं! त्याच्यामागून यादवांची सात अक्षौहिणी अफाट सेना नगरात घुसली! श्रीकृष्ण मात्र कुठंच दिसत नव्हता! युवराज दुर्योधनानं त्याला तटस्थ ठेवण्यात यश मिळविलं असावं. तसा तो किमयागार आहे, म्हणून मी त्याला सामोरा गेलो, पण तो अर्धवट यशस्वी – छे यशस्वी कसला – पूर्ण अयशस्वी होऊनच द्वारकेतून परतला होता! त्याच्या राजकीय धूर्तपणालाही श्रीकृष्णानं बाजू दिली होती. 'एकीकडे नि:शस्त्र मी आणि दुसरीकडे सशस्त्र अशी बलदंड सैनिकयोध्द्यांची सात अक्षौहिणी यादवसेना यांपैकी काय पाहिजे तुला?' असा मोह टाकणारा विचित्र प्रश्न श्रीकृष्णानं त्याला टाकला होता! माझ्या सर्व सूचना दूर सारून दुर्योधनानं शेवटी यादवसेनाच स्वीकारली होती!

'मला नि:शस्त्र, हात बांधलेला, अबोल कसाही केवळ तूच पाहिजेस – तसा तू येणार नसशील तर द्वारकेत स्वस्थ बसून राहा – मला तुझी यादवसेना नको!' असं श्रीकृष्णाला द्वारकेतच बद्ध करणारं तो काहीही बोलला नव्हता! उलट पंधरा लक्ष यादवसेना हस्तिनापुराकडे वळविण्यात आपण राजकीयदृष्ट्या किती यशस्वी झालो आहोत, ते सांगण्यासाठी तो दौडत वेगानं येऊन म्हणाला की, ''कर्ण, नि:शस्त्र श्रीकृष्ण आणि अर्जुनाच्या रथावरचा ध्वजदंड यांत कोणतं अंतर आहे? तो अर्जुनाचं सारथ्य करणार आहे! शस्त्राऐवजी वेग आणि आसूड हाती घेणार आहे! आपल्याकडे सारथी काय कमी आहेत! त्याला आणण्यापेक्षा त्याची पंधरा लक्ष सेना आणून मी कुरूंचं सेनासामर्थ्य बळकट केलं आहे, असं नाही तुला वाटतं?''

''युवराजा, युद्धात 'बुद्धी' नावाचं शस्त्र सर्वांत अधिक प्रभावी असतं, हे तुला माहीत नाही काय? अर्जुनाच्या रथाचं सारथ्य करणारा श्रीकृष्ण घोड्याचे वेग आखडील, पण जिभेचे सैल सोडील हे तुला कसं समजलं नाही? त्याला मूकपणे सारथ्य करण्याची

अट जरी तू घालतास तरी बरं होतं!" असं त्या राजनीतिकुशल म्हणणाऱ्या नरेशाला सांगावं, असं मला वाटलं – पण मी ते टाळलं. चुका मान्य करणं, त्या सुधारण्यासाठी धडपडणं, सर्वांना विश्वासात घेणं हे हस्तिनापुरासारख्या बलाढ्य देशाचं नेतृत्व करणाऱ्या त्या युवराजाच्या जीवनात आताशा कुठंच दिसत नव्हते! येऊ घातलेलं महायुद्ध, आवतीभोवतीच्या ज्वलंत समस्या, पितामह, गुरू द्रोण यांसारख्या वृद्धत्वानं निष्प्रभ झालेल्या कुरूंच्या हाती असलेली दीर्घकालची राज्यसूत्रं, निर्वाणीच्या प्रसंगी असाव्या लागणाऱ्या एकात्मतेचा अभाव ह्या साऱ्या अडचणींमुळे दूरदृष्टीचा मार्ग कुठंही सापडत नव्हता! कोळ्याच्या जाळ्यात सापडलेल्या कीटकासारखा युवराज जितका धडपडत होता, तितका अधिकच गुरफुटत चालला होता. मला हे स्पष्ट दिसत होतं! तो आणि त्यानं निवडलेला राज्यकारभाराचा मार्ग, सर्वच महान धोक्यात येत होतं! काही आशेचा किरण दिसतो काय, यासाठी मी तळमळत होतो.

मात्र आपण एकटेच सामर्थ्यशील आहोत, कुणीही आपल्यासमोर टिकाव धरू शकणार नाही, हस्तिनापूरचं प्राचीन राज्य करण्याची बुद्धिकुशलता केवळ आपल्या आणि आपल्या एकट्याच्या अंगीच एकवटली आहे, या विचित्र अहंगंडानं दुर्योधन इतका घेरला होता की, कुणालाही विश्वासात घ्यायला तो तयार नव्हता! माझी सूचना, माझा परामर्श हा एका आपल्यावर नितान्त प्रेम करणाऱ्या जीवन्मित्राचा विचार आहे, हेही त्याला पुरेसं पटत नव्हतं!

श्रीकृष्ण सोडून तो यादवसेना घेऊन आला होता!

एकूण सैन्यसंख्या आता अकरा अक्षौहिणींवर गेली होती! सेनापतीची निवड करून त्याच्या नेतृत्वाखाली सेनापथकांची योजना करण्याचा समय आला होता! एक-एक पथक हस्तिनापूर सोडून कुरुक्षेत्राच्या युद्धभूमीकडे मार्गस्थ झालं होतं. कुरुक्षेत्राच्या दक्षिणदिशेला सैन्याची शिबिरं पडली होती. राजनगर सुनं-सुनं भासत होतं! सैनिकांना निरोप देणाऱ्या स्त्रिया उंबरठे गृहागृहांत आपल्या कुलदैवताला आळवीत नंदादीप जाळत होत्या. पथकांची व्यवस्था पाहण्यासाठी मीही हस्तिनापूर सोडलं.

राजनगरातील सर्व वर्दळ कुरुक्षेत्राभोवती दाटली होती. मधाच्या पोळ्याला मधमाशा दाटीवाटीनं एकमेकींना पंख भिडवून चिकटलेल्या असतात तसे लक्षावधी सैनिक कुरुक्षेत्राच्या समरांगणाच्या पश्चिम दिशेला चिकटले होते.

अंग, अंगारक, अलब्ध, अंबष्टक, अलंबुस, आर्श्चर्श्रृंगी हे राक्षसराजे आपले विशाल देह सावरीत गजदलातील सहस्त्रावधी गजांना आखलेल्या जागेत उभे करण्यात मग्न झाले होते.

अनश्वस, अनुशाल्व, अपराजित, अचल, अरिष्टसेन, विंद, अनुविंद, अंगद अच्युतायू, अशोक, अश्वकेतू, आषाढ, आर्जव, इंद्रवर्मन, ईश्वर, उग्रतीर्थ, उग्रमन्यू, उलूक हे निष्णात अश्वतज्ज्ञ अश्वसादांना सूचना देऊन अश्वदलं एका-एका रांगेत उभे करण्यात स्वत:ला विसरले होते.

क्षेमधूती, क्षेमशर्मन, भगदत्त, कृतवर्मा, बृहद्बल, बाल्हिक, नीलध्वज, चिरवारस, दीर्घप्रज्ञ, नियुतायू, पौंड्रक, दीर्घायू हे विख्यात रथसम्राट आपापल्या रथ्यांना त्यांची नियुक्त स्थानं दाखवीत होते.

गुरू द्रोण, कृप, शल्य, शकुनीमामा, जयद्रथ, अश्वत्थामा, दुर्योधन, दु:शासन सर्व जण, महापुरातील गंगेसारख्या चोवीस लाख सेनेचं अनुशासन पाहत होते.

मगध, मद्र, बाल्हिक, गांधार, अवंती, निषाध, सिंध, कलिंग, चेदी सर्व देशांचे विविध आकारांचे, विविध वर्णांचे राजध्वज फरफरत होते. कुरुक्षेत्राला वळसा देऊन वाहणाऱ्या सरस्वतीचं व संथ दृषद्वतीचं पात्रही दिवसागणिक थरथरत होतं.

सैन्याची शिबिरं व्यवस्थित उभी राहिली याची खात्री होताच मी राजनगराकडे परतलो.

उपप्लाव्याहून मार्गशीर्ष मासातील वद्य द्वितीयेचा दिवस श्रीकृष्णाकडून नियुक्त झाला.

**

# पंधरा

श्रीकृष्णाकडून युद्धाचा दिवस निश्चित होऊन येताच कुरुसैन्यात सेनापतीच्या निवडीची चर्चा सुरू झाली. दुर्योधन सर्वांना माझंच नाव त्यासाठी आग्रहानं सांगत होता. अश्वत्थामा, दुःशासन, मामा, जयद्रथ, इत्यादींचा त्याला पाठिंबा होता. मला मात्र, ज्येष्ठ म्हणून पितामह भीष्मांनी सेनापतीपद स्वीकारावं असंच वाटत होतं, पण सर्वांनी मलाच आग्रह केला तर तो नाकारता येणं शक्य नव्हतं. त्यासाठी माझ्या पित्याला अर्घ्यदानासाठी ओंजळी अर्पून त्यांचा आशीर्वाद घेणं माझं कर्तव्य होतं. ही युद्धापूर्वीची अर्घ्यदानं होती. पिता, पुत्र, सखेसोबती, अशा कोणत्याच प्रेमपाशात मनाचा कोणताही धागा या वेळी अडकता कामा नव्हता! श्रद्धा, एकाग्रता यांशिवाय अन्य कोणताच भाव मनातून व्यक्त होता उपयोगी नव्हता.

असाच एका सुप्रभाती मी माझ्या भावसाधनेत व्यग्र होतो. सगळीकडे नीरव शांतताच शांतता होती. किनाऱ्यावरच्या विष्णुमंदिरातील घंटेच्या, कुण्यातरी भक्तानं निर्माण केलेल्या नादलहरी अधूनमधून कानांवर आदळत होत्या. माझ्या ओंजळीतील पाण्याचा प्रत्येक थेंब टप-टप असा आवाज करून गंगेला विचारीत होता की, 'तुला आठवतंय काय या कर्णानं आपल्या आयुष्यात आजवर किती ओंजळीनं दान केलं आहे?'

गंगा आपल्या असंख्य लहरींच्या नेत्रांनी वर मुख करून माझ्या पित्यालाच त्याचं उत्तर विचारीत होती. त्यांचा तो अबोल संवाद मला समजत होता. दोघांनाही एकमेकांना उत्तर देता येत नव्हतं म्हणून मीच त्यांना सांगत होतो, 'गंगामाते, तुझ्या जललहरींइतक्या आणि सूर्यदेव, तुमच्या प्रकाशलहरींइतक्या असंख्य अर्घ्यदानांच्या ओंजळी मी तुम्हांला अर्पण केल्या असतील! त्यांतच आणखी थोड्यांची आज ही भर घालतो आहे! त्यांनाही सामावून घ्या! उद्यानाला ताटव्यांचा, आकाशाला तारकांचा, आम्रवृक्षाला कमी-अधिक फुललेल्या मोहोराचा, मातेला आपल्या पुत्रांचा कधीतरी भार वाटला आहे काय? मग माझ्या या श्रद्धेनं, प्रेमानं आणि भक्तिभावानं काठोकाठ भरलेल्या ओंजळी तुम्हाला तरी कशा भारभूत वाटतील! तुम्हीच माझे मातापिता! गंगे, तू मला तारलंस; सूर्यदेव, तुम्ही मला धोक्याचे संकेत करून, चेतावणी देऊन उजवळलंत! मी तुमचाच पुत्र आहे! दुर्योधन, मामा, अश्वत्थामा, पितामह, विदुर, महाराज धृतराष्ट्र कुणाकुणाशी आता एकही शब्द बोलावासा नाही वाटत! जीवनाच्या यात्रेत माझ्याभोवती क्षणभर जमलेले हे असंख्य यात्रिक आहेत! तुम्ही मात्र, ज्यांच्यासाठी मी ही बिकट यात्रा चालून आलो ते साक्षात त्रिकालाचे परमेश्वर आहात! बोला, काहीतरी माझ्याशी बोला! सांगा, या यात्रेत काही प्रमाद माझ्या हातून घडला आहे काय? 'कर्ण' या नावातील कर्तेपणाला कुठं कालिमा लागला आहे काय? मी निवडलेला कौरवपक्ष माझ्या स्वार्थासाठी आहे काय? कौरव नसतानाही मी जे कुरूंसाठी केलं ते मातापिता असून तुम्ही माझ्यासाठी तरी कधी केलं आहे काय? सगळं हस्तिनापूर म्हणतंय की, कवच-कुंडलं नसलेला, शापदग्ध झालेला कर्ण निष्प्रभ आहे! त्यांना मी कसं पटवू की, ढगाळलं म्हणजे काही अंधकाराचं राज्य जगावर आलं असं होत नाही! सांगा,

कर्ण दुर्भागी आहे, सामर्थ्यहीन आहे असं म्हणण्याचा अधिकार कुणाला आहे काय? शेवटी भाग्य, सामर्थ्य, यश ह्यांना मोजण्याचा मापदंड तरी काय? संपत्ती? राज्य? कीर्ती? केवळ जगण्यासाठी जगलेलं शेकडो वर्षांचं दीर्घायुष्य? नाही! मी यांतला कोणताच पर्याय कधीही निवडला नाही. गंगे, तुझ्या लपलपणाऱ्या असंख्य जललहरींसारखंच माझं जीवन आहे! सूर्यदेव, चैतन्याचं लेणं घेऊन येणाऱ्या, तुमच्या सहस्र किरणांसारखंच माझं जीवन नाही काय? कधी-कधी पावसाची सर कोसळून जाते आणि तुमच्या किरणशलाकेतून पांढरा, हिरवा, निळा, जांभळा, असे सप्त वर्ण फेकणारं इंद्रधनुष्य तयार होतं! आखाड्याचा दिवस, पांचालीचं स्वयंवर, वृषालीशी विवाह, कवच- कुंडलाचं दान, श्रीकृष्णाला नकार हे माझ्या जीवनातील अनेक भावांचं प्रकटन करणारं तसंच इंद्रधनुष्य नाही काय?

जवळ-जवळ येत चाललेल्या महायुद्धात, तुमच्या नावाला आणि कुलाला शोभेल असं लढण्याचं सामर्थ्य मला द्या. माझ्या भावश्रद्धेच्या या ओंजळी मान्य करून घ्या.'

एक, दोन, पाच, दहा, पन्नास, शंभर माझ्या हातांतील पाण्याच्या ओंजळी गंगेच्या पात्रात एकरूप होत होत्या. भोवतीच्या जगाचं मला काहीही भानही नव्हतं. क्षणाक्षणाला मन अविचलपणे हिमालयासारखं स्थिरावू लागलं!

भर मध्यान्हीचा समय आला. सूर्यदेव माथ्यावर आले. गंगेकाठची वाळू तापून-तापून थकली असावी, कारण उष्ण-उष्ण वायूच्या लहलहणाऱ्या ज्वाळा माझ्या उघड्या दंडांना स्पष्ट जाणवू लागल्या! अर्ध्या शरीराला गंगेच्या पाण्याचा शीतल स्पर्श, तर अर्ध्याला तप्त वायूचा दाहक स्पर्श! जीवनातील सुखदुःखंही अशीच एकमेकांशेजारी पहुडलेली नसतात काय? गंगेचं शीतल पात्र आणि कडेची तप्त मरुभूमी पडलेली असते तशी! फार समय झाला म्हणून पात्राबाहेर पडण्यासाठी वळलो, कारण सेनापतीच्या निवडीची बैठक माझ्याशिवाय सुरू होणार नव्हती.

जिकडे अंगावरचं उत्तरीय ठेवलं होतं त्या नेहमीच्या कदंब वृक्षाच्या बाकदार फांदीकडे चाललो. मन स्थिर आणि अविचल होतं. पाण्याबाहेर पडताच तप्त वाळूचे चटके तळपायांना पोळू लागले! दुर्योधनानं सेनापतीपदाचा आग्रह माझ्यासाठी धरला तर! पितामहांचं महत्त्व सर्व योद्ध्यांना कसं पटवावं? त्यांनीच सेनापतीपद पत्करणं योग्य आहे हे दुर्योधनाचं मन न दुखविता त्याला कसं सांगावं? कितीही झालं तरी पितामह ज्येष्ठ आहेत! त्यांनी तपं नि तपं कुरूंचं नेतृत्व केलं आहे. तेच सेनापती होणं योग्य नाही काय? आपण त्यांच्या नेतृत्वाखाली लढावं. विचारांच्या तंद्रीतच कदंबाजवळ आलो. मान उंचावून त्याच्या शाखेवरील उत्तरीय वाऱ्यानं उडून गेलं की तसंच आहे, हे पाहण्यासाठी एक दृष्टिक्षेप टाकला!

समोर जे पाहिलं ते सत्य आहे की स्वप्न या साशंकतेने मनाच्या मरुभूमीवरचे स्मृतींचे असंख्य वालुकाकण भुरभुर स्वैर उडू लागले! मी पात्रात आहे, किनाऱ्यावरच्या तप्त वाळूत आहे, कर्ण आहे की अन्य कोणी आहे; काहीच समजेना! माझ्या जीवनात मला प्रचंड धक्के देणारे अनेक समरप्रसंग येऊन गेले होते. सद्भावाला साक्षी ठेवून, शक्य असेल तेवढ्या धीरोदात्तपणे मी त्यांना तोंड दिलं होतं, पण जे मी समोर पाहत होतो, ते माझा सर्वार्थानं कडेलोट करणारं होतं!!

माझ्या उत्तरीयाच्या छायेत, सूर्यदेवांपासून आपलं तोंड लपविण्यासाठी, कदंब

वृक्षाखालच्या तप्त वाळूत, शुभ्र केशांकित कुंतीदेवी सर्वांग अवगुंठून उभ्या होत्या.

त्यांच्या केवळ दर्शनानंच माझ्या जीवनाचं रथचक्र माझ्यासमोर गरगर फिरू लागलं! किती घटना! किती आरे! अश्वनदीचं पात्र! हिंदोळणारी लाकडी पेटिका! सारथ्यांच्या पर्णकुटीच्या जीर्ण कुडाचा आश्रय घेऊन वाढलेलं माझं पोरकं बालपण! 'सूतपुत्र, सूतपुत्र!' म्हणून लाथाडलेलं माझं एकाकी, कोंदटलेलं, अवमानित यौवन! भरकटलेल्या भग्न नौकेसारखं परिस्थितीच्या निर्दय, क्रूर, लाटांच्या अगणित थपडा खात आलेलं माझं संपूर्ण जीवन! मनाची जाणीवही ज्या वेळी मनाला नव्हती तेव्हापासून पुढं उभा ठाकलेला निर्दय अपमान!

ही स्त्री तीच होती, जिनं एका भक्कम पाषाणापासून सुडौल मूर्ती करण्याऐवजी त्याची सर्वांनी पायदळी तुडवावी अशी मळकट पायदंडी केली होती! हीच ती स्त्री होती, जिनं माझ्या जीवनाच्या राजवस्त्राची लक्तरं करून समाजाच्या काटेरी कुंपणावर निःसंकोच टांगली होती! ही तीच स्त्री होती, जिनं माझ्या आयुष्याचं राजकमल अश्वनदीच्या मळकट पाण्यात फेकून त्याचा कर्दम करण्याचा क्रूर कट केला होता! ही तीच स्त्री होती, जिनं राजमुकुटात बसवावं असं राजरत्न एका सारथ्याच्या कंठातील फुटक्या वैदूर्यात गुंफून टाकलं होतं! कशासाठी ती आज माझ्यासमोर उभी होती? स्त्री माता, मांगल्याचं महन्मंदिर, मातृत्वाचं मृदू माहात्म्य, महाकवींनी आणि ऋषिमुनींनी वर्णिलेलं पवित्र पूजास्थान, सिद्ध, साधक, गंधर्व, चारण, देव यांनी मस्तक नमविलेलं मुक्तिस्थान! माझ्यासमोर मात्र कोणत्या स्वरूपात ते उभं होतं? नुकतंच जन्मलेलं पिल्लू खाणारी व्याघ्रीण आणि समोरची स्त्री यांत कोणतं अंतर होतं? ती व्याघ्रीण आपल्या पिल्लाच्या असंख्य यातना त्याला खाऊन शेवटी आपल्या उदरात पुन्हा घेऊन मातृत्वाची लाज तरी राखते! पण या स्त्रीनं आपल्या प्रतिष्ठेच्या दातांनी माझी कोवळी मान मोडून मला अर्धवट मेलेल्या स्थितीतच अश्वनदीच्या जलमय अरण्यात टाकलं नव्हतं काय?

पायांखालच्या तप्त वाळूनं तळपाय पोळत होते, त्यापेक्षा तिच्या दर्शनानं माझं मन पोळू लागलं! सगळं ब्रह्मांडच गोल गरगर फिरत मला ओरडून सांगत होतं की, 'कर्णा, तू सूतपुत्र आहेस! तू सूतपुत्र आहेस!' त्यातच समोरची स्त्रीही आपला आवाज मिसळून तसंच ओरडत असल्याचा मला भास झाला! मस्तक दोन्ही तळहातांनी घट्ट धरून डोळे गच्च मिटून घेतले! आकाशातल्या सूर्यदेवांचा तप्त तेजोगोल माझ्या मस्तकावर कोसळून तो मला क्षणार्धात वितळून टाकील तर बरं होईल असंच वाटू लागलं! तरीही ती निर्दय स्त्री माझ्या वितळलेल्या शरीराच्या पाटावर पाय देऊन परत जायला मागं-पुढं पाहणार नाही, या कल्पनेनं मला वेड तर लागणार नाही? अशी भयंका मला व्याकूळ करू लागली. 'चालती हो!' म्हणून ओरडण्यासाठी मी डोळे उघडले! ती तशीच माझ्या उत्तरीयाच्या छायेत अवगुंठून उभी होती! तिची-माझी ही पहिलीच भेट होती! ही एकच संधी होती की, तिला 'सूतपुत्र' या शब्दाच्या हृदयाला क्षतं पाडणाऱ्या असह्य यातना मला ऐकविता येणार होत्या! सुदैवानं जीवनातील हा एकच फासा माझ्याकडून पडत होता!

"हा राधेय सूतपुत्र आपणाला वंदन करतो आहे वंदनीय, प्रातःस्मरणीय राजमाता!" पुढं होऊन तप्त वाळूत गुडघे टेकवून तिला मी वंदन केलं! आत्म्याला आत्म्यानंच शुद्धीवर आणावं लागतं!

" कर्णऽऽ! ऊठ – उठा!" तिनं दंडाला धरून मला उठविलं.

"मला आपण आदरार्थी संबोधू नका राजमाता! महाराज धृतराष्ट्रांच्या रथाचे घोडे हाकणाऱ्या, त्यांना खरारा करणाऱ्या सारथी अधिरथाचा मी पुत्र आहे! सुदैव नाही, नाहीपेक्षा आपल्याही राजरथाचे वेग हाती धरून मी आपलीही सारथ्यसेवा केली असती!"

"कर्ण, मला अहो-जाहो म्हणू नको! श्रीकृष्णानं सर्व सांगितलं असताही असं काळजाला घरं पाडणारं भेदक काही बोलू नकोस! पुत्रा, तू जाणतोस मी कोण आहे ते! तुला पूर्ण माहीत आहे की, तू कोण आहेस ते! सांग, माझ्या नेत्रातील अश्रू तरी तुला परिचयाचे वाटतात की नाही?" ती आपलं श्रांत मुख ओंजळीत घेऊन स्फुंदू लागली.

"अश्रू? अश्रूंनी भडकलेल्या हृदयाचे वणवे कधीच विझत नसतात! तुझे अश्रूच काय; पण मस्तक आपटून इथं रक्ताळलेलं कपाळही तू माझ्यासमोर धरलंस तरी त्या रक्ताचीही मला आता ओळख लागणार नाही! या तप्त मरुभूमीसारखं असलेलं माझं जीवन तुझ्या राजजीवनाच्या शीतल गंगापात्राला कधीच स्पर्शू शकत नाही! मी कोण? कुठला? तू राजमाता! पांडवांची भाग्यशाली जननी!"

"कर्ण! आपल्या मातेला राजमाता म्हणून तिच्या वृद्ध मनावर जळजळीत अंगार ठेवू नकोस! पुत्रा ये, मला आलिंगन दे!" तिनं आपले थरथरणारे हात विस्तारले. पाणावलेले डोळे फडफडविले.

"माता! माता म्हणवून घेणाऱ्या निर्दय स्त्रिये, खरोखरच एखादा धगधगीत अंगार तुझ्या हृदयावर कुणी धैर्यानं ठेवलाच, तर तोही गारठून तिथं राख होईल इतकं तुझं हृदय पाषाणी आहे!! माता म्हणवून घेण्याचा कोणता अधिकार गाजविण्यासाठी तू माझ्यासमोर उजळमाथ्यानं आज आली आहेस? आजच तुला मातृत्वाचा एवढा कळवळता पुळका का आला? नात्याची लटकी ढाल घेऊन येणाऱ्या निर्दये, माझी माता आहे अश्वनदी, चर्मण्वती, गंगा! मला आपल्या पर्णकुटीच्या जीर्ण कुडाखाली आश्रय देणारी राधामाता! आणि शेवटी आपल्या कुशीत चिरविश्राम देणारी ही माझी पुण्यपावन आर्यभूमी! 'माता' हा शब्द आपल्या कलंकित जिभेनं उच्चारून त्याचं पावित्र्य भ्रष्ट करण्याचं महापातक पुन्हा या कर्णासमोर करू नकोस!

"जा, पांडवांच्या पराक्रमी पंचकडीत रममाण हो! विदुरांच्या पर्णकुटीत पुण्य गाठीशी बांधण्यासाठी व्रतवैकल्यं कर! श्रीकृष्णाला कण्या खायला घालून दाताच्या कण्या होईपर्यंत सांग, 'अधिरथाचा पुत्र माजला आहे! त्याला भीमाच्या गदेनं ठेचूनच काढला पाहिजे!' जा, अश्वनदीवर सोडलेल्या माझ्या जीवननौकेला आता विश्वाच्या महासागरात थोपविण्यासाठी तुझ्या सुरकुतलेल्या हातांचं सुकाणू मुळीच समर्थ नाही! नाळही न कापता सोडलेलं बाळ आपल्या पुत्रांचा काळ होतं आहे, हे भाळी आलेलं पाहून मुकाट अश्रू ढाळ! जे मी जीवनभर सहन केलं आहे ते तू काही क्षणांसाठी सहन करून बघ! जा, कर्ण तुझा पुत्र नाही – तू त्याची माता नाहीस! वैरीसुद्धा करणार नाही एवढी अक्षम्य शिक्षा तू एका अजाण, अबोध, नवजात बालकाला केली आहेस!"

"कर्ण, कौरवांच्या सहवासात राहून दुर्योधन, दुःशासनासारखं बोलताना तू हे विसरतो आहेस की, तुझी महान दुःखं सहन करण्यासाठी तुला दैवानं पुरुषाचं खंबीर काळीज तरी दिलं आहे! पण मी? – अरे, मी सोसत असलेल्या यातना या मरणाहूनही भयानक आहेत! बालपणापासून दैव मला क्रूर थपडा देत हवं तिथं हाकारत आलं आहे!

मी केलेला तुझा त्याग हा एका मातेनं आपल्या पुत्राचा केलेला त्याग नाही! पुत्रप्राप्तीसाठी असंख्य स्त्रियांची मनं व्यथित होत असताना कोणती माता आपल्या पुत्राचा सुखासुखी त्याग करील? पण – पण तुझा जन्मच अशा प्रसंगी झाला की, तू आणि मी आपल्या दोघांनाही जीवनात मानानं जगण्याचा दुसरा कुठलाच मार्गच नव्हता! पुत्रा, तुझ्या वियोगानं गेली सहा तपं क्रंदणारं माझं मातृहृदय माझ्या पाच पुत्रांना कधीच दिसलं नाही. श्रीकृष्ण, विदुर भावोजी, पितामह यांना कळलं नाही आणि आज तू ते समजावून घ्यायला तयार नाहीस! तुझा वियोग, वैधव्य, पुत्रांचा वनवास, तुझी निर्भर्त्सना, द्रौपदीची विटंबना आणि आज तुम्ही बंधूबंधूंनी अज्ञानानं एकमेकांविरुद्ध थोपटलेलं दंड पाहताना एखाद्या स्त्रीला वेड लागल्याशिवाय राहील काय?

“जगाला उजळणाऱ्या, त्याला अंधकारातून मार्ग दाखविणाऱ्या तुझ्या त्या तेजवंत पित्यानं कधीतरी मला मार्ग दाखविला आहे काय? तुझं जीवन तरी उजळलं आहे काय? नाही! कर्ण, सामान्यांची दुःखं सामान्य असतात, असामान्यांची दुःखंही असामान्यच असतात! तुला ती डोळे मिटून, मूकपणे सहन केलीच पाहिजेत! तू ती केलीही आहेस! आता त्यांचा शेवट कर. चल, माझ्या पुत्रांत चल! सर्वांनी तुला राज्याभिषेक केलेला मला एकदा डोळाभर पाहू दे! चल, माझ्या नेत्रांची निरांजनं, अश्रूंची इंगुदी घालून तेवढ्यासाठीच मी गेली सहा तपं सतत तेवत ठेवली आहेत! पुत्रा, दुष्ट दुर्योधनानं तुझ्या मनात माझ्या पुत्रांविषयी, तुझ्या बंधूंविषयी द्वेषाचा अंगार, तुझी वेळोवेळी स्तुती करून, मनधरणी करून सदैव यज्ञकुंडासारखा धगधगतच ठेवला आहे!

“चल, तुझ्या बंधूंच्या आनंदाश्रूंनी तो शांत करून टाक! माझ्या आज्ञेसाठी एक पत्नी आपल्यात विभागून घेणारे माझे पुत्र, माझ्या शब्दासाठी तुझ्या चरणांवर आपली मस्तकं ठेवून ढसढसा रडत तुझी क्षमा मागतील! तुझ्यावर उगारलेला आसूड भीम आपल्या हातानं तुझ्या हाती देऊन आपली विशाल पाठ, त्याचे प्रहार सोसण्यासाठी तुझ्यापुढं ओणावून धरील! प्राण गेला तरी तो हुंकारही भरणार नाही! तुझ्यावरील प्रेम व्यक्त करण्यासाठी आपला अक्षय्य बाणांचा भाता आणि अजिंक्य गांडीव धनुष्य तुझ्या राज्याभिषेक समारंभाच्या समयी पेटत्या यज्ञकुंडात अर्जुन आपल्याच हातांनी टाकील! नेहमी तुझ्या निमुळत्या पायांचं वर्णन माझ्यासमोर करणारा तुझा बंधू युधिष्ठिर सर्व नद्यांचं पवित्र जल घेऊन त्यानं तुझे चरण धुवेल. सर्वांच्या सहवासात आयुष्य कंठलेली माझी विनयी स्नुषा द्रौपदी उर्वरित आयुष्य तुझ्याच सेवेसाठी वेचील! आणि – आणि तुझ्यासाठी केवळ तुझ्याचसाठी मनाच्या अंधाऱ्या गुहेत तळमळणारा माझा अंतरात्मा देहाचं अंशुक फेकून समाधानानं स्वर्लोकाची द्वारं ठोठावील! चल, कर्ण, आपल्या बंधूंत चल!” तिनं माझं दंड धरून मला गदागदा हलविलं!

“इंद्राला पुढं घालून माझी कवच-कुंडलं लुटणारे तुझे वीर पुत्र, सुदामन आणि शोण यांचा बळी घेणारा अर्जुन, ‘सूतपुत्र’ म्हणून मला लाथाडणारी तुझी स्नुषा, ‘सारथी’ म्हणून माझी प्रकट विटंबना करणारा भीम आणि भूक लागल्यानंतर ज्याला रडण्याशिवाय दुसरं काहीच माहीत नाही अशा अजाण, निष्पाप, निरागस आणि कोवळ्या अर्भकाला अश्वनदीच्या महापुरातील पात्रात लोटण्याइतकी जिची मातृप्रेमाची गंगा पवित्र आहे अशी तू... तुम्ही सर्व जण माझा परत बंधू, पती आणि पुत्र म्हणून स्वीकार करायला आज तयार असाल, तर खरोखरच तुम्ही महान ढोंगी

आहात! ढोंग हे सनातन आहे हे सिद्ध करण्यासाठीच मीही तुझ्याबरोबर येऊ काय? शक्य नाही! कपटी, दुष्ट, कुटिल आणि हृदयशून्य माणूससुद्धा ढोंगी माणसापेक्षा सहस्रपट श्रेष्ठ आहे! जा! संपत्ती, राज्य, प्रेमपाश यांनी विचार बदलता येणं तुला शक्य वाटत असेल, तर दिग्विजयातील सर्व संपत्ती मी तुझ्या चरणांवर घालतो. घालशील तू आपल्या पाची पुत्रांना या सूतपुत्राच्या चरणांवर? नसलेल्या पुत्रप्रेमाची कृतक ढाल या कर्णासमोर व्यर्थ धरू नकोस. ज्या हातांनी आसूड आणि राजदंड सारख्याच भावनेनं पेलले त्या या हातांनी तुला वंदन केलं यातच भाग्य मान आणि चालती हो!"

"नसलेलं पुत्रप्रेम! सांग, माझ्या रथाला सहा घोड्यांऐवजी पाचच जोडलेले तुला कधीच दिसले नाहीत काय? तुझ्या विवाहातील शालू आणि अंगुलित्राण तुला आठवत नाहीत काय? दिग्विजयाहून परतलास त्या वेळी ऋषिकन्येनं भाली चढविलेला कुंकुमतिलक तू इतक्यात विसरलास काय? राजसूय यज्ञाला आलास त्या वेळी तुझ्या पायांत सौधावरून पडलेलं माझ्या हातातील हस्तभूषण तुझ्या पुत्रासाठी – वृषसेनासाठी होतं हे तरी तुला सत्य वाटेल काय? इंद्रप्रस्थातील राजवास्तूच्या भित्तीवर चितारलेल्या चित्रातील करंदणारी राजस्त्री मीच आहे, हे त्या भित्ती तुला आजही सांगतील; त्यावर तरी तुझा विश्वास बसेल काय? आखाड्यातील तुझा पराक्रम पाहून तुझ्या वियोगानं दाटलेल्या दुधाच्या पान्ह्यामुळे भिजलेली माझी कंचुकी तुला ऐकून तरी माहीत आहे काय? सांग, तू माझा पुत्र आहेस असं या हस्तिनापूरच्या चौकाचौकांत मी आज गर्जून सांगितल्यानंतरच तुझा माझ्या मातृत्वावर विश्वास बसणार आहे काय? बोल, तशीच तुझी इच्छा असेल, तर मी त्यालाही आज तयार आहे!"

"तू खूप तयार असलीस तरी ते मान्य करण्याची आज जगाची तयारी आहे काय? आणि मला तर त्याची आज आवश्यकताही नाही! जन्मल्याबरोबर माझा त्याग करताना काहीही न बोलून तू मला अर्धवट मारलंस आणि – आणि नको त्या नेमक्या ऐनवेळी नको ते वारेमाप बोलून तू मला संपूर्ण ठार मारलं आहेस! केवळ आजचाच शुभमुहूर्त तुला माझ्यासमोर येण्यासाठी योग्य वाटला काय? सांग, या वेळी माझ्या ठिकाणी तुझा भीमच असता तर? हातातील गदेचा प्रहार, कसलाही विचार न करता तुझ्या या मस्तकावर करून तुझ्या रक्तानं पायांखालची मरुभूमी भिजविण्याचा विक्रम करायला तो विसरला असता काय? माझ्याऐवजी युधिष्ठिर असता तर –? राजवस्त्रं फेकून देऊन भगवी वस्त्रं पांघरून संन्यस्त म्हणून तुम्हा सर्वांना टाकून तो हिमालयात गेला नसता काय? तुझा प्राणप्रिय अर्जुन असता तर? आपलं गांडीव तुझ्या कंठात अडकवून त्यानं आज तुला गदागदा हलविलं नसतं काय? पण – पण मी मात्र तुला वंदन केलं आहे. उगाच लीनत्व पत्करून खोटा मान मिळवायचा म्हणून नव्हे – तर श्रीकृष्णानं सांगितलेल्या नात्याची जाणीव जागती ठेवली आहे म्हणून! मात्र तू मला काय दिलं आहेस? शत्रूही देणार नाही असे दु:खाचे कढ! डोळे फाडले तरी काहीही दिसणार नाही असा कोंदटविणारा संभ्रम! जा राजमाते, केवळ पुत्राला जन्म दिल्यानं कोणतीही स्त्री माता होत नसते. उलट जन्म न देताही संस्कारांनी एखाद्या मातीच्या गोळ्याची मूर्ती करता येते, हे एका राजस्त्रीला न जमलेलं महत्कार्य एका क्षुद्र स्त्रीनं – राधामातेनं करून दाखविलं आहे! जा, राजस्त्रिये, राजवाड्यात, अरण्यात कुठंही जा. तू एक भ्रांतचित्त माता होतीस आणि राहशील. रामासाठी तडफडून मरणारी कौसल्यामाता तुला कळली नाही! 'मातृत्व ' हा स्त्री म्हणून मिळालेला सर्वांत श्रेष्ठ वर तू शाप

म्हणून जीवनभर वागवलास! याचक म्हणून आली नसशील तर सत्वर इथून दूर जा! या गंगेच्या पवित्र किनाऱ्यावर क्षणभरही उभं राहण्याचा तुला कोणताच अधिकार नाही!!''

''नाही! मी जाण्यासाठी आले नाही. तुला नेण्यासाठी आले आहे! रामासाठी प्राण त्यागणारी कौसल्या राजकक्षात होती – तिचा कोणताही पुत्र रावणाला मिळाला नव्हता! मी पर्णकुटीत आहे! कशासाठी? राजमाता म्हणून मिरविण्यासाठी? नाही! पुत्रा, तुझ्या धवल जीवनावरचा कलंक धुऊन काढण्याची संधी कधीतरी मिळेल म्हणूनच निकरानं मी जिवंत राहिले आहे! आणि प्राणदंडानंच माझं मातृप्रेम तुला पटणार असेल, तर मी तेही करीन आत्ता – या क्षणी गंगेच्या साक्षीनं, ज्या गंगेत तुला सोडलं तिलाच स्वत:ला अर्पून! पण तू दुर्योधनाकडून लढू नकोस! आपल्या दाहक पराक्रमात आपल्याच बंधूंना दग्ध करू नकोस!'' ती तत्काळ तडक गंगेच्या पात्राकडे चालू लागली! स्वत:चा देह गंगेला समर्पित करण्याच्या निर्धारानं!

माझ्या देहाचा ध्वजदंड ढासळू लागला! अर्घ्यदानानं खंबीर केलेलं मनही डळमळू लागलं!

''थांब!'' मी तिला निक्षून सांगितलं. वेग आखडताच राजरथ थांबतो तशी ती थांबली. जवळ जात सौम्यपणे मी म्हणालो, ''सांग, तुझी काय इच्छा आहे? दुर्योधनाचा पक्ष न सोडता मी तुझ्यासाठी काय करू?''

''माझ्या पाची पुत्रांना अभय दे! त्यांना – आपल्या बंधूंना वधू नकोस. माता असूनही मी तुझ्याकडे पदर पसरून भिक्षा मागते! इंद्राला कवच-कुंडलं दिलीस, दीन-दलितांना धनधान्य, वस्त्रं दिलीस. मला – मला एवढं तरी दान दे! पाच जीवनांचं!'' आपलं थकलेलं मुख ओंजळीत घेऊन राजवाड्यावर सर्वांची माता म्हणून मान्यता पावलेली ती राजस्त्री स्फुंदू लागली. माझं अंतरंग तीळ-तीळ तुटू लागलं. माझ्या नशिबी आलेले एक-एक प्रसंग प्रत्यक्ष स्वत:च्या आयुष्यात पाहण्याचा प्रसंग प्रत्यक्ष त्या दैवावर तरी कधी आला होता काय? माझी जन्मदात्री मजसमोर स्वत:ला याचक समजत होती!

''दिलं! हे अभय या कर्णानं तुला दिलं आहे! युद्धात एका अर्जुनाशिवाय मी कुणालाच वधणार नाही! जा, अर्जुन मारला गेला, तर मला धरून तुझे पाच पुत्र जिवंत राहतील आणि मी मारला गेलो तर तुझे पाच पुत्र तसेच सुरक्षित राहतील! लक्षात ठेव, हे दान आहे असं मात्र कुणाला सांगण्याचा यत्न करू नकोस! हे अभय आहे, वचन आहे! विश्वाच्या या अफाट पसाऱ्यात कोण कुणाला आणि कसलं दान करू शकणार?

''जा, तुझ्या पुत्रांना राज्य, संपत्ती, सिंहासन आणि कीर्ती पाहिजे आहे. अमरत्वाचं लेणं घेऊन आल्यासारखं ते ती अखंड उपभोगणार आहेत, असंच तुलाही वाटतं! पण लक्षात ठेव, कर्णाला काय पाहिजे हे तुला समजलं नाही, हस्तिनापुरातील कुणालाच ते कधीही समजलं नाही! ऐक, त्याला पाहिजे आहे आर्यांच्या भावी पिढ्यांच्या कोटी-कोटी मनांचं अभंग, अतुल राज्य! पांडवांचा वडील बंधू म्हणून मी त्यांना अभय द्यायचं ते दिलं आहे, असं समज. शेवटचं हे कर्तव्य करताना मला कोणतंही दु:ख होत नाही. पांडवांचं जगणं हे माझ्या मरणाच्या पायावरच उभं राहणार असेल, तर तो पायथ्याचा पाषाण होणंही मी आनंदानं मान्य करतो! जा, युद्धात तुझ्या चार पुत्रांवर माझं 'विजय' धनुष्य, मर्मभेदी शरांचा वर्षाव कधीच करणार नाही! तुझा सर्वश्रेष्ठ पुत्र कोण हे कालच ठरवील!''

‘‘पुत्रा, तू धन्य आहेस! मातेच्या जीवनावरूनच सर्वश्रेष्ठ पुत्र कोण हे ठरणार असेल, तर माझ्या यातनांपेक्षाही सखोल यातना जीवनभर मुकाट साहणारा तूच माझा खरा सर्वश्रेष्ठ पुत्र आहेस! ये, तुझ्या यातना मला दे! माझ्या मिठीत ये! एक वेळ मला ‘माता’ म्हणून हाक मार! माझ्या वृद्ध कानांची रंध्रं आणि पटलं त्यासाठी आसुसली आहेत! कर्णा, एकदाच मला ‘माता’ म्हण! आलिंगन दे!’’

थरथरणाऱ्या वेलीसारखी ती भावनावेगानं लडलडू लागली. पण मला आज जगातील कोणतंच दृश्य विरघळवू शकत नव्हतं! उद्या कुरूंचा सेनापती होणारा मी आज पांडवांच्या मातेच्या मिठीत कसा काय शिरू शकणार होतो?

‘‘नाही! तो अधिकार केवळ राधामातेचा आहे! जा तू!” कदंबावरील उत्तरीय ओढून अंगावर घेत तर्जनीनं तिला मी विदुरांची पर्णकुटी दाखविली. कडेच्या तप्त वाळवंटाच्या उष्ण ज्वालांनी तिचे शुभ्र केश भुरभुरत थरारले. कसेतरीच!

मान डोलवत ती निर्धारानं म्हणाली, ‘‘माझंच चुकलं! यात तुझा काही दोष नाही. तुम्ही पुरुषांनी सदैव आपल्या पित्याचा आदर्श जपावा. तुझ्यासारख्या आकाशपुत्रांनं तर आपल्या आकाशपित्याचाच आदर्श जपावा! माझ्या पुत्रा, तुझ्या आकाशपित्याला तरी कुठं माहीत आहे, त्याच्या मातेचं नाव!! निघते मी.’’

ओघळणाऱ्या अश्रूंचा पूर न सावरता ती वळून वाळू तुडवीत चालू लागली. तिच्या पायांच्या ठशांची चाकोरी वाळूवर एकसर उमटत चालली! ती पाहताच मला शोणाची एकदम आठवण झाली! त्याच्या पायांची अशीच चाकोरी मी अनेक वेळा या गंगा किनाऱ्यावर पाहिली होती. शोण आज नव्हता, पण त्याच्या स्मृती माझ्या अंतरंगात जिवंत होत्या. ‘वसुदादा, वसुदादा’ म्हणणाऱ्या त्या सारथिपुत्राचा माझ्याशी तसा रक्तामांसाचा कोणता संबंध होता! तरीही निर्भेळ प्रेमाची बकुलफुलं त्यानं मला जीवनभर वाहिली नव्हती काय? तो गेला होता; तरीही सुकलेल्या बकुलफुलांचा सुगंध मागं रेंगाळतो तशा त्यांच्या आठवणींचा सुगंध माझ्या अंतरंगात आजही दरवळत होता. एक सारथी असूनही एका क्षत्रियावर निर्हेतुक प्रेमाचा वर्षाव त्यानं केला नव्हता काय? आणि – मी! मी मात्र माझा भार नऊ मास उदरात बाळगणाऱ्या माझ्या प्रत्यक्ष जन्मदात्रीला आज लाथाडीत होतो. तपातपांचा पुत्रवियोग सहन करणाऱ्या माझ्या मातेला ठोकरत होतो. बरं-वाईट कसंही असो, मला मिळालेलं हे जीवन तिच्यामुळेच अस्तित्वात आलं नव्हतं काय? या योद्धयांच्या जगात एक ‘सेनापती’ ही सर्वांनी लादलेली मोठेपणाची धुंदी घेऊनच पुढं जगायचं काय? तिनं स्वत:साठी माझ्याकडे असं काय मोठं मागितलं होतं? एकदा ‘माता’ म्हणून मी मारलेली हाक! जीवनभर सगळी कर्तव्यं काटेकोरपणे करणारा मी, पुत्रकर्तव्यापासून मात्र आज वंचित होत कुठंतरी चाललो होतो. ती मला पुन्हा भेटेलच असं कसं म्हणता येईल? सर्वांनी वंदिलेली ती राजमाता, एका पक्षिणीसारखी माझ्या उत्तरीयाच्या छायेत किती काल तिष्ठली होती, हेही मला कसं काय उमगू शकलं नाही? कीर्तीची आणि मोठेपणाची धुंदी मद्याच्या धुंदीपेक्षा अधिक असते हेच खरं नाही काय? कोण कुणाचा सेनापती? कसला योद्धा? कसला महारथी? जो आपल्या मातेला लाथाडतो त्याला कुठंतरी असलेल्या स्वर्गाच्या प्राप्तीची आशा करण्याचा काय अधिकार? मातृश्रद्धा हाच स्वर्ग! तेच मुक्तिस्थान! मातृॠण हेच सर्वश्रेष्ठ ॠण!

‘‘माते थांब!’’ दोन्ही हात उंचावून दूर गेलेल्या तिला मी काळीजदेठापासून हाक

घातली. अरण्यात मार्ग चुकलेल्या वासराच्या हंबरड्याचा हुंकार ऐकून एखादी गाय शेपटीचा गोंडा विस्फारून, कान टवकारून धावत सुटते, तशी ती आपलं वय, स्थान, वेळ, काळ सर्व विसरून माझा 'माते' हा शब्द ऐकताच धावत सुटली! तिच्या विरहाग्नीसमोर वाळवंटाच्या लहलहणाऱ्या ज्वाळासुद्धा मला फिक्या वाटल्या! जवळ येताच तिच्या चरणांवर लोटांगण घेत म्हणालो, "माते, क्षमा कर तुझ्या या कर्णाला! तुझ्या पाच पुत्रांना तुझ्यामुळे परमोच्च बिंदूचे क्षण मिळाले... आनंदाचे, लोकप्रियतेचे, वैभवाचे, गौरवाचे! त्यासाठी त्यांनी जीवनभर तुला शत-शत वार वंदनही केलं असेल! माते, तुझ्या प्रथम पुत्राचं हे तुला पुत्र म्हणून आज पहिलंच वंदन आहे! कदाचित-कदाचित ते शेवटचंही ठरेल! कशासाठी करतो आहे ते मी? यासाठीच की, तुझ्यामुळे... केवळ तुझ्यामुळेच मलाही एक परमोच्च बिंदूचा क्षण मिळाला... यातनांचा!" माझ्या नेत्रांतील अश्रूंची धार तिच्या चरणांवरचे वाळूकण धुऊ लागली! तिच्या नेत्रातून ओघळलेलं तिच्या पवित्र आत्म्याचं पाणी माझ्या मस्तकावर टपटपू लागलं! हा या कर्णाच्या जीवनातील भावदिग्विजयाचा सर्वश्रेष्ठ अभिषेक नव्हता काय? आता देहाची मूठभर वाळू होऊन खालच्या वाळवंटात विलीन झाली असती, तरी काय बिघडणार होतं?

"ऊठ!" माझ्या मस्तकावर हात फिरवून थरथरत्या हातांनी तिनं मला उठविलं. कापऱ्या स्वरात, भरल्या नेत्रांनी ती म्हणाली, "किती–किती उंच झालास रे तू! माझ्यापेक्षाही!" आवेगानं ओढून जवळ घेत तिनं मला आपल्या गाढ आलिंगनात कवटाळलं! तिच्या ठेंगण्या देहातील, हिमालयाच्या उंच शिखरांनाही लाजवील असं मातृहृदय पाहून माझं जीवन कृतार्थ झालं! नेत्रांतील कृतार्थतेचे, धन्यतेचे दवबिंदू तिच्या मस्तकावरील शुभ्र केसांवर पडून तिला सांगू लागले, 'माते, तुझ्या धवल केसांसारखंच तुझं जीवन धवल आहे, पवित्र आहे! शुचिर्भूत आहे, माझा त्याग केलास तरीही! मग जग काहीही म्हणो!'

क्षणभर तिनं आपलं मस्तक माझ्या छातीवर टेकविलं. माझ्या काळजाच्या धडधडीतून 'माते... माते!' अशी साद ऐकू येते काय, हे तर तिला ऐकायचं नसेल?

तिच्या आणि माझ्या संमिश्र अश्रूंनी पायाखालची तप्त वाळूही क्षणभर शांत झाली. सभोवतीच्या वाळवंटाला कोण आनंद झाला होता! तेजाच्या पुत्राचं त्याच्या तेजस्वी मातेशी झालेलं हे पुनर्मीलन सूर्यदेवांना सांगण्यासाठी तप्त वाळवंटाशिवाय तिथं दुसरं होतं कोण? त्यातून वळवळत निघणाऱ्या तप्त झळा उंच-उंच जाऊन गगनमंडलात माझ्या पित्याला सांगणार होत्या, 'तुझ्या चिरविरही पुत्राला त्याची चिरविरहिणी माता आज भेटली!'

"ही तुझी मी जपलेली आठवण!" तिनं अंशुकाच्या शेवात बांधलेली, मी दिग्विजयाहून परतताना आश्रमकन्येच्या करंडकात टाकलेली माझीच अंगठी माझ्या तर्जनीत चढविली! तिच्यातील पुष्कराज तळपू लागला!

"येतो मी!" पुन्हा एकदा तिच्या चरणांना वीरासनी स्पर्श करून मी वाळू तुडवीत चालू लागलो. तीही पर्णकुटीच्या दिशेनं मार्गस्थ झाली! आता मात्र दिवस खरोखरीच मालवू लागला!!

**

# सोळा

"दानशूर, दिग्विजयी अंगराज महाराजऽऽऽ कर्ण!" घोषकारानं घोषणा दिली तसे शिबिरातील नीलध्वज, जलसंघ, भगदत्त, सहदेव, समितिंजय, महौजस, हेमकंपन, सायंमनी, विपाट, रुचिपर्वा, वीरधन्वा, वसुमित्र, जयवर्मन, जयद्रथ, प्रताप, सुतंजय, दरद, सुनामन – सर्व सेनाप्रमुखांनी उभं राहून मला प्रेमाची साथ दिली. सेनापतीची निवड करण्याचा प्रस्ताव अश्वत्थाम्यानं विशेष बैठकीत मांडला. चर्चेला सुरुवात झाली.

दुर्योधनानं ताडकन उठून माझं नाव सेनापतीपदासाठी सुचविलं. अनेकांनी आपले हात उडवून त्याला उत्स्फूर्त साथ दिली. ते विसरत होते की, साक्षात परशुधारी परशुरामांचा पराभव करणारे पितामह आपल्यात आहेत! म्हणून मीच उठून उभा राहिलो. सर्वांना वाटलं, मी सेनापतीपद स्वीकारण्यासाठीच उभा आहे!

"आपल्या कुरुसेनेचं सैनापत्य परशुरामांचाही पराभव करण्याचं सामर्थ्य अंगी असलेल्या पितामहांनी स्वीकारावं अशी माझी स्पष्ट इच्छा आहे!" मी सर्वांचा भ्रम दूर केला. एकमुखानं सर्वांनी पितामहांचा सेनापती म्हणून जयकार केला. त्यात केवळ दुर्योधनानंच काय तो आपला आवाज मिसळला नव्हता. मला सेनानायक करावं, या त्याच्या कल्पनेला मीच धक्का दिला म्हणून! पण सर्व योद्ध्यांपुढं त्याला काही बोलता येत नव्हतं!

पितामहांनी आसनावरून उठून सेनापतीपद स्वीकारल्याची घोषणा केली. राजपुरोहितांनी त्यांच्या मनगटात धवलपुष्पांची माला बांधून त्यांना अभिषेकानं सालंकृत केलं. कुरूंचे सेनापती युद्धाची योजना सेनाप्रमुखांना ऐकवू लागले.

"लक्षात ठेवा, युद्धनियमांचा भंग कोणीही केल्यास युद्धाला भलतीच दिशा लागते! तुम्ही योद्धे आहात. केवळ हत्यारे नव्हे! तुमच्या धैर्यशाली साहाय्यावर मी प्रतिज्ञा करतो की, श्रीकृष्णाला शस्त्र हाती धरायला लावीनच. सेनानायक म्हणून मी ज्या-ज्या पथकप्रमुखांची त्यासाठी नावं सांगतो आहे, त्यांनी त्यांनी आपापली स्थानं कोणत्याही सूचनेशिवाय सोडायची नाहीत. 'आज्ञापालन' हाच विजयाचा आत्मा आहे."

"सारथिदलाचा प्रमुख प्रातिकामन राहील. तो मद्रराज शल्याच्या नेतृत्वाखाली सारथ्यांचं वाटप करील. त्यानं हे लक्षात ठेवलं पाहिजे की, आपली रथसंख्या दोन लक्ष, चाळीस सहस्त्र आहे! कुठंही सारथी कमी पडणार नाहीत, याची दक्षता शल्य आणि प्रातिकामन घेतील!

"गजदलाचं नेतृत्व दु:शासन करील. त्याला अलंबुस, अलायुध, अंगारक हे राक्षसराज मदत करतील. रथदलाएवढ्या संख्येच्या गजदलातील प्रत्येक गजावर अंबारी चढवून घेण्याच्या तयारीला ते आजच लागतील.

"अश्वदलाचं नेतृत्व शकुनी करील. त्याला संजय, क्षेमधूर्ती, चिरवासस, अश्वत्थामा हे मदत करतील. सात लक्ष, एकवीस सहस्त्र एवढं अश्वदल त्यांच्या आज्ञेशिवाय कधीच हलणार नाही.

"पायदलाचं नेतृत्व दुर्योधन करील. त्याला जयद्रथ, समुद्रसेन, इंद्रवर्मन

साहाय्य करतील. बारा लक्ष, तीन सहस्त्र इतकं पायदल कधीही आपल्याच गजदलासमोर येणार नाही याची ते काळजी वाहतील.

"चोवीस लक्ष, पाच सहस्त्र, सातशे इतकी सैन्यसंख्या असलेलं आपलं सैन्य चार प्रमुख विभागांत विभागलेलं असेल. रथ, हत्ती, घोडे आणि पायदळ! कोणतंही दल कितीही निर्वाणीचा प्रसंग आला तरी एकमेकांत मिसळून अराजक निर्माण करणार नाही, याची दक्षता त्या-त्या दलनायकांनी काटेकोरपणे घ्यायची आहे!

"पत्ता, सेनामुख, गुल्म, गण, वाहिनी, पृतना, चमू, अनाकिनी यांची शासनबद्ध हालचाल करीत प्रत्येक अक्षौहिणी विजयाकडे वाटचाल करील! या महायुद्धात सर्वांत अधिक पराक्रम रथदलावर अवलंबून आहे! म्हणून रथदलातील महारथी, अतिरथी, अर्धरथी, रथी यांची नियुक्ती मी आता करणार आहे. द्रोण, कृप हे महारथी सदैव सर्व सैन्यावर देखरेख ठेवतील.

"अश्वत्थामा, जयद्रथ, शकुनी, दुर्योधन, विकर्ण, शल्य, चित्रसेन, विविशंती, दु:सह, जय, सत्यव्रत, पुरुमित्र हे महारथी आहेत! ते केव्हाही रथदलाचं नेतृत्व करू शकतील.

" क्षेमधूर्ती, लक्ष्मण, विंद, अनुविंद, अपराजित, उलूक, सहदेव, भगदत्त हे अतिरथी त्यांच्या मागून पुढे सरसावीत त्यांना बळकटी आणतील.

"कुहर, करकाक्ष, अंबष्टक, आर्जव, क्रथ, गवाक्ष आणि कर्ण हे 'अर्धरथी' आहेत!! कर्णाला मी 'अर्धरथी' म्हणतो आहे, याचा सर्वांना विस्मय वाटेल, पण कवच-कुंडलहीन आणि शापदग्ध असा आजचा कर्ण अर्धरथ्याहून अधिक योग्यतेचा नाही!"

ते ऐकताच अंगाची लाही झालेला दुर्योधन अनावर संतापानं ताडकन उठला, पण तेवढ्याच तत्पर आवेगानं मी त्याला खाली खेचलं. शांतताच शांतता क्षणैक कोंदटली. सर्वांत ज्येष्ठ, निरपेक्ष, न्यायनिष्ठुर आणि सत्यप्रिय मानला गेलेला कुरूंचा योद्धा सेनापतीपदाची सूत्रं हाती येताच बुद्धिभ्रंश झाल्यासारखा माझा निर्देश 'अर्धरथी' म्हणून करू लागला! हस्तिनापूरच्या सीमांबाहेर काय आहे, हे ज्याच्या पराक्रमाला कधी माहीत नव्हतं, तो एखाद्या मद्यप्यासारखा दिग्विजयी सेनापतीला अर्धरथी म्हणून त्याचा सर्व ज्येष्ठ योद्धयांसमोर लोकविलक्षण गौरव करीत होता! एके काळी माझ्यासमोर धडधडीत शरणागती पत्करलेल्या शत-शत योद्धयांसमोर माझ्याबद्दल झालेला हा उद्धार ऐकून मला संभ्रम पडला की, त्याच्या मस्तकावरचे केश वयाच्या अनुभवानं पांढरे झाले होते की सूर्यकिरणांनी? थरथरणाऱ्या शरीराबरोबर त्याची बुद्धीही हादरत होती की काय? वासंतिक आखाड्यात माझा अजिंक्य धनुर्धर म्हणून गौरव करणारा तो न्यायप्रिय, वीर योद्धा हाच होता काय? क्षणापूर्वी ज्याची सेनापती म्हणूनही नियुक्ती करण्यासाठी सर्वांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला होता, त्यालाच लगेच 'अर्धरथी' म्हणताना याला चळ लागला होता की काय? माझ्या मस्तकावर अनेकांनी ठेवलेल्या अवहेलनेच्या अंगारांत काहीतरी कमी पडलं होतं म्हणूनच ऐन युद्धापूर्वी तो हे पवित्र कर्म आज स्वत: करीत होता की काय? जगातील सत्य ज्याच्या स्वरूपात अजूनही जिवंत आहे असं मानणाऱ्या मला तोच ते माझं मानणं असत्य आहे, हे माझेच कान पिरगळून सर्वांना पटवून देत होता की काय? मला लाथाडणाऱ्यांत कोणताही वृद्ध पाय आजवर नव्हता, ही उणीव तो आज सर्व योद्धयांसमक्ष मला अर्धरथी म्हणून लाथाडून पूर्ण करीत होता की काय? भीष्म! गंगापुत्र, परशुरामशिष्य, शंतनुपुत्र, श्रीकृष्णभक्त भीष्म! एका सेनापतीच्या

योग्यतेच्या, दिग्विजयी वीराचा एक क्षुद्र अर्धरथी म्हणून आज निर्देश करीत होता! छे! जगात थोडंसुद्धा सत्य अस्तित्वात राहिलं नसावं, असं मला प्रकर्षानं वाटून गेलं.

कानांची रंध्रं सरासर तापू लागली. कंठाच्या धमन्या ताठर झाल्या. डोळ्यांचे चंद्र-सूर्य संतप्त झाले. आज या मानभावी वृद्धाचं दानही त्याच्या झोळीत घालावंच लागणार तर! तो गंगेत उभा राहून तप करणारा सूर्यभक्त असूनही त्याला प्रत्यक्ष सूर्यपुत्राची ओळख काही आज पटत नव्हती! त्याला ती आज पटवावीच लागणार तर! ठीक आहे! कर्तव्य करताना श्रद्धा आणि जिव्हाळा यांना इतक्या कठोरपणे दूरच सारावं लागणार असेल तर मी त्यालाही तयार आहे! ढोलीत बसलेलं दिवाभीत आणि अधिकाराच्या बैठकीला चिकटलेला औचित्यशून्य दांभिक वृद्ध यांत कोणतंही अंतर नसतं! दोघंही अंधच होतात! अज्ञानानं किंवा आत्मश्रद्धेनं त्यांना जगात काय चाललं आहे ते कधीच दिसत नाही! ते त्यांचे डोळे उघडून त्यांना दाखविण्याचा समय आला होता! मी ताडकन उठलो!

"पितामह, मी अर्धरथीच काय; पण साधा अंशरथीही नाही! मी आहे केवळ एका सारथ्याचा पुत्र! पण लक्षात ठेवा, तुमच्या अहंभावी नेतृत्वाखाली एक साधा स्वाभिमानी पदाती सारथिपुत्रही कधीच मुळीच लढू इच्छित नाही, हे या सर्व विक्रमी योद्धयांना मला आज दाखवून द्यायचं आहे! जोपर्यंत अर्जुनाच्या अमोघ बाणांनी तुम्ही महारथी म्हणवून घेणारे सेनानायक, रथ्याला आणि महारथ्याला सारख्याच योग्यतेनं आपल्या उराशी कवटाळणाऱ्या समरभूमीच्या या धरतीवर, घायाळ होऊन पतन पावणार नाही, तोपर्यंत हा कर्ण हाती शस्त्र धरणार नाही! जा, तुमच्या नेतृत्वाचे असतील तेवढे पैलू पणाला लावून एकातरी पांडवाला कंठस्नान घालण्याचा विक्रम करून मगच या कर्णाला तुमच्या महारथिपदाचं गौरवगान ऐकवा! पांडवांची री ओढण्यात खर्ची पडलेलं तुमचं हे उभं आयुष्य तो विक्रम करण्यास असमर्थ आहे.

"कुरूच्या सेनाप्रमुखांनो, मला क्षमा करा! मी तुम्हाला एकाकी टाकून जातो आहे! पण आज सगळंच उलटं झालं आहे! हिमालयाच्या शिखरातूनही ज्वालामुखीचा उद्रेक होतो आहे! कंठातली पुष्पमाला भुजंग होऊन कुरूच्या कंठनाळालाच आज डंखते आहे! म्हणूनच सावधानतेचा संकेत देतो आहे! सांभाळा! या दंभी आणि मानभावी वृद्ध सेनापतींचं पतन होताच मला हाकारा. मी सेवेला तत्पर आहे! वचनाला जागरूक आहे! शब्दाला एकनिष्ठ आहे! आज मात्र मला क्षमा करा. पृथ्वी डळमळून सर्वनाश झाला; तरीही या अहंमन्य सेनापतीच्या नेतृत्वाखाली मी कदापिही लढू शकत नाही. मी रणांगणाच्या भयानं पाठ फिरवून पलायन करतो आहे असा अध्यारोप करण्याचं धैर्य कुणीही करू नये, कारण मी रणांगण सोडणार नाही! युद्धभूमीवरचं माझं शिबिर सोडून मी कारणाशिवाय राजनगरात जाणार नाही!"

कुणाचीही प्रतिक्रिया काय होते न पाहता मी तडक तेथून बाहेरच पडलो. खवळलेल्या महासागरात लाटांबरोबर झुंजता-झुंजता थपडा खाल्लेला शुष्क लाकडी ओंडका शेवटी सागरकिनाऱ्यावर येऊन निश्रेष्ट पडतो, तसं माझं मन भावशून्य आणि संज्ञाहीन होऊन शरीरात कुठंतरी निश्चेष्ट झालं होतं.

युद्धभूमीच्या किनाऱ्यावर राहून इतरांच्या पराक्रमाचं वर्णन ऐकण्यापेक्षा आता मला काही-काहीच करता येणार नव्हतं.

आता पितामह भीष्म घायाळ होऊन पडले नाहीत तर? केवळ त्या विचारानंच

मन अधिकच सुन्न, उद्विग्न झालं!

**

# सतरा

माझ्या शिबिरातून युद्धभूमीचं विशाल पटांगण समोर स्पष्ट दिसत होतं. सत्यसेनाशिवाय शिबिरात कुणीही नव्हतं. दुर्योधन आणि अश्वत्थामा यांशिवाय कुणालाही प्रवेश देऊ नकोस, अशी कडक आज्ञा मीच त्याला दिली होती. तो सैन्यातील महत्त्वाच्या वार्ता रोज मला ऐकवीत होता. विदर्भाहून आलेल्या धैर्यशाली रुक्मीराजाला दुर्योधनानं आपल्या सैन्यात सामावून घेतलं नाही. तो पांडवांना ऐनवेळी साहाय्य करील याचं त्याला भय वाटत होतं. मात्र नकुल-सहदेवांचा सख्खा मामा असलेला मद्रराज शल्य त्यानं स्वीकारला होता! इतकंच काय; पण सारथ्याचं दल त्याच्या स्वाधीन करून आपल्या सेनेचं सुकाणू पितामहांनी पांडवांच्या आप्तेष्टांच्या हातीच दिलं होतं!

रुक्मी, भूरितेजस आणि भूमिपाल हे राजे दोहोंकडून तटस्थांत समजले गेले. दोन्ही सैन्यांत त्यांचे ध्वज कुठंच दिसत नव्हते. पांडवांची शिबिरं पूर्वेला धरून कुरुक्षेत्राभोवती तळ टाकू लागली. मत्स्य, पांचाल, राक्षस यांचे ध्वज समोर फरफरताना दिसू लागले. त्यांची सैन्यसंख्या फारच कमी दिसत होती. पंधरा लक्षांच्या आसपास असलेलं त्यांचं सैन्य कुरूंच्या धडकेसमोर टिकाव धरू शकणार नाही, असा सत्यसेनाचा कयास होता. पांडवांकडून धृष्टद्युम्नाला सेनापती म्हणून नियुक्त केल्याची वार्ता कुरुसेनेत पसरली.

माझ्यासमोर अर्जुनाचा नंदीघोष रथ माथ्यावर कपिध्वज घेऊन डौलात उभा होता! मात्र माझा जैत्ररथ माथ्यावर, हत्तीच्या साखळदंडाचं चिन्ह असलेला ध्वज घेऊन रथदलात तसाच पडून होता! पितामहांनी त्याची चक्रं उखडून टाकली होती! का? आयुष्याच्या शेवटी-शेवटी एवढं महान पातक त्या वृद्धानं कशासाठी केलं होतं? अर्जुनावरच्या प्रेमासाठीच काय? आसनावर बसून शिबिराच्या भुरक्या छताला मी असंख्य प्रश्न विचारीत होतो. एकाचंही उत्तर मिळत नव्हतं! रात्री जळणाऱ्या पलित्यासारखं मन जळून रात्रींना जागवत होतं. राधामाता, अधिरथबाबा, वृषाली, सुप्रिया, सत्यसेन, मेघमाला, माझे सात पुत्र, मीनाक्षी हीच तेवढी माझी खरी माणसं नव्हती काय? पण प्रतिज्ञेमुळं त्यांना राजनगरात जाऊन भेटता येणं शक्य नव्हतं.

वृषसेन, चित्रसेन, सुदामा, प्रसेन, सुशर्मा आणि भानुसेन हे माझे सहा पुत्र योद्ध्याच्या वेषात मजसमोर उभे राहिले. ते काहीच बोलत नव्हते. मी प्रश्न विचारताच सर्वांत ज्येष्ठ वृषसेन धैर्यानं म्हणाला, "महाराज, आपण रणांगणात उतरणार नाही तर आम्हीही हे वेष उतरून स्वस्थ बसणार!" त्यांच्या विचारांनी मला धक्काच बसला. पित्याशी एकनिष्ठ राहताना ते राजनिष्ठा पायदळी तुडवीत होते.

"माझ्या पुत्रांनो, लक्षात असू द्या, तुम्ही माझे पुत्र असलात तरी कुरूंचे योद्धे आहात! तुमचा सेनापती देईल तीच आज्ञा तुम्ही सदैव शिरसावंद्य मानली पाहिजे! आपल्या मातेचे, महामातेचे आणि बाबांचे आशीर्वाद घेऊन सेनापतीमागून समरांगणात उतरा! जा, ही तुमच्या पित्याची तुम्हाला आज्ञा आहे!" मी शिबिराच्या जाळीदार गवाक्षातून बाहेरच्या दृषद्वतीच्या पात्राकडे पाहत त्यांना आज्ञा दिली.

‘‘आज्ञा तात!’’ ते मला वंदन करून निघून गेले. त्यांच्यात वृषकेतु कुठंच दिसत नव्हता!

‘‘वृषू कसा नाही आला मला भेटायला?’’ मी काहीसा स्वत:लाच प्रश्न विचारला!

‘‘तो तुमच्यावर रुष्ट आहे! आपण राजनगरात यायला तयार नाही म्हणून!’’ सत्यसेनाला वाटलं मी त्यालाच काहीतरी विचारलं असावं म्हणून त्यानं तत्परतेनं पुढं होत उत्तर दिलं.

‘‘सत्यसेन, जा त्या अल्लडाला काहीही सांगून शिबिरापर्यंत आण! त्याची समजूत मला घातलीच पाहिजे.’’

**

# अठरा

कुरुक्षेत्राभोवतीच्या तळातील शिबिरं चांदण्यात निथळत शांत उभी होती! माझ्या जीवनाच्या शिबिरावर प्रेमाचं चांदणं वर्षवणारी माझी माणसं राजनगरातील कक्षात होती. मी कुरुक्षेत्राच्या किनाऱ्यावर शिबिरात शय्येवर पडून न येणाऱ्या निद्रेची उगाच मनधरणी करीत होतो!

फार वर्षांपूर्वी हस्तिनापुरात शोणासह येताना कुणीही मला सांगितलं असतं की, तुझ्या भावी जीवनात अशा अशा घटना घडणार आहेत, तर माझा त्यावर त्या वेळी कधीच विश्वास बसला नसता. आज ते-ते घडलं होतं! अनपेक्षित, विस्मयजन्य, जिव्हा बाणासारखं नागमोडी! आता त्यांतील अनेक वळणं नीट आठवतसुद्धा नव्हती! जी काही विसरावीशी वाटत होती ती काही केल्या विसरली जात नव्हती! माझ्या शिबिराभोवती तळ टाकून पहुडलेल्या असंख्य शिबिरांसारख्या माझ्या आठवणीही असंख्य होत्या! आकाशात चंद्राबरोबर चमचमणाऱ्या तारकांसारख्या त्या अगणित होत्या! दृषद्वतीच्या लाटांसारख्या त्या मोजता येत नव्हत्या! त्यांच्या जाणिवेनं निद्रा माझ्यावर संतुष्ट होत नव्हती! म्हणून शय्येवरून उठून चांदण्या माथ्यावर घेत युद्धभूमीवर आलो! पांढऱ्याशुभ्र रक्षेचे पट्टे अंगावर घेतलेलं ते समरांगण पाहून एकदम मामांचा द्यूताचा पटच आठवला! या धरतीच्या पटावर उद्यापासून असंख्य जिवांच्या जीवनांचं द्यूत खेळलं जाणार! मृत्यू टाकेल तो फासा प्रत्येकाला स्वीकारावा लागणार! मूकपणं! एका-एका स्थानाला नियतीनं किती पुण्यपावन केलेलं असतं! या भूमीवरच महाराज कुरूंनी असंख्य महायज्ञ केले होते. उद्यापासून इथं जीवनयज्ञ सुरू होणार! ओणवून एक मूठभर माती हाती घेऊन मी ती मस्तकी लावली. माती! दुर्योधनाची राजनीती, अश्वत्थाम्याचं आत्म्याचं सखोल तत्त्वज्ञान, मामांचं कपट, दु:शासनाचा अविचार, पितामहांची विवश तटस्थता, गुरू द्रोणांची सामाजिक आदर्शाची भ्रांत कल्पना, महाराज धृतराष्ट्रांच्या अंध डोळ्यांआड लपलेला डोळस स्वार्थ, विदुरांचा अयशस्वी संन्यास, माझा जीवनभरचा संभ्रम, पांडवांचं माझ्याविषयीचं अज्ञान, कुंतीमातेचं हृदय पिळवटणारं दु:ख, गांधारीदेवींचे ठरवून मिटलेले नेत्र, राधामातेची पाषाणालाही पाझर फोडील अशी अबोल, मूक ममता, शोणाचा निरलस प्रेमभाव, वृषाली-सुप्रियेची शालीन स्त्री–हृदयं, माझ्या पुत्रांचा आज्ञाधारकपणा, कुरूंच्या आणि पांडवांच्या सेनांतून शस्त्र हाती घेऊन उभ्या ठाकलेल्या प्रत्येक सैनिकाची असीम राजनिष्ठा, मित्रनिष्ठा वा तत्त्वनिष्ठा, श्रीकृष्णातून प्रकट पावलेलं अद्वितीय क्षात्रतेज हे सर्व-सर्व या मातीतूनच निर्माण होऊन वाढलं नव्हतं काय!

मी ती मूठभर माती माझ्या उत्तरीयांच्या शेवात श्रद्धेनं बांधून घेतली. चांदण्यात उठून दिसणारे रक्षेचे पट्टे उद्या अस्तित्वात राहणार नव्हते. नेहमी पावसाच्या वर्षावाशिवाय कशानंही न भिजणारं हे कुरुक्षेत्र उद्या रक्त, घाम आणि अश्रू यांनी भिजणार! द्रवाला द्रव मिळणार, पंचमहाभूतांना मूलतत्त्व मिळणार, आत्म्यांच्या अमर ज्योती परमात्म्याच्या तेजोनिधीला मिळणार! या युद्धभूमीचे निनाद पुढं युगानुयुगं

आर्यभूमीत उमटत राहणार! चाळीस लक्ष योद्धयांच्या ऐंशी लक्ष बाहूंचे पराक्रम वर्णन करताना भावी पिढ्यांचे कोटच्यवधी हात थकणार! त्यांचं गुणगान करताना कोटिकोटी मुखं श्रांत होणार! सरस्वतीचं धवल पात्र असंच वाहत राहणार! या युद्धभूमीवरचे अबोल, नीरव, नि:शब्द धूलिकण सूर्यप्रकाशात अनंतकाळ असेच तळपत राहणार!

'हे पुण्यपावन आर्यभूमी प्रणाम!'

दोन्ही हात जोडून मी त्या संग्रामभूमीला मस्तक नमवून प्रणाम केला. शिबिरात येऊन शय्येवर पडताच मला गाढ निद्रा लागली!

**

# एकोणीस

श्रीकृष्णानं नियुक्त केलेला वद्य द्वितीयेचा दिवस सुवर्णकिरणांचं लेणं घेऊन उजाडला!

शिबिराबाहेर येऊन मी सभोवती दृष्टी फिरवली. वारुळातून मुंग्या बाहेर पडाव्यात तसे लोहत्राणं घातलेले सैनिक-योद्धे एकामागून एक पटापट आपापली शस्त्रं पेलत शिबिरातून अविरतपणे बाहेर पडू लागले. नंदक, निकुंभ, द्रुमसेन, प्रभंकर, रुचिपर्वा, ललित्थ, वसुचंद्र, सेनाजित, सुधनू, भूरिश्रवा, जयरात, रुक्मरथ, सिद्धार्त, भानुदत्त, गोवासन, शाल्व, जयत्सेन, दमन, शतचंद्र, शुक्रदेव, धृतायुध, विभू, वज्रहस्त, सोमदत्त, संयमन सर्व जण आपापली पथकं रचू लागले.

दोन लक्ष चाळीस सहस्र रथदलाच्या महासागरात निवडक रथी, अतिरथी, आणि महारथी समाविष्ट झाले! शिबिरं ओस पडली. सात लक्ष करडी, पांढरी राकट, काळी आणि ताम्रवर्णी सशक्त घोडी खांद्याला खांदे भिडवून पालाणं मिरवीत रांगा धरून उभी ठाकली! त्यांना आवरणारे वेग वळवळू लागले. हजारो शेपट्यांचे पिसारे फुलले. कानांची अग्रं टवकारली. अडीच लक्ष हत्तींचा काळा महासमुद्र पाठीवर अंबाऱ्यांचे घुमट घेऊन स्पंदू लागला. फडफडणाऱ्या, पसरट काळ्या कानांच्या लाटा त्यावर उमटू लागल्या. मध्येच एखाद्या देवमाशांच्या कळपातील असंख्य मासे जलपृष्ठाच्या वर उमळावेत तशा पुष्ट, काळ्या, घणसर सोंडी राजहंसाच्या तिरकस मानेसारखी ढंगदार वळणं घेऊन उमळू लागल्या! बारा लक्ष पायदलांतील अर्धेअधिक पदाती त्यांना मैरेयक मद्याचे हंडे पाजू लागले! पत्ती, सेनामुख, गुल्म, गण, वाहिनी, पृतना, चमू, अनाकिनी आणि अक्षौहिणी साकार होत राजदंडाच्या आकाराची सैन्यरचना करू लागल्या. त्यांच्या हालचालीत थरारणाऱ्या बाण, भाले, त्रिशूल, खड्ग, तोमर यांच्या पात्यांवरून परावर्तित झालेले तळपणारे किरण, आकाशाच्या अनंत पोकळीत स्वर्गाचं साम्राज्य कुठं लपलं आहे त्याचा शोध घेऊ लागले! पितामह, गुरू द्रोण, कृपाचार्य, अश्वत्थामा, जयद्रथ, मामा, दुर्योधन, दुःशासन, भगदत्त, विकर्ण, कृतवर्मा, सोमदत्त, सहदेव, केतुमत, विंद, अनुविंद हे महारथी शिरस्त्राणं चढवून चतुरंगदलात फिरत सैन्यरचना करू लागले.

तो दिवस उजाडत होता ज्याची जीवनभर मार्गप्रतिक्षा करण्यात मी क्षण-क्षण वेचला होता – पण शिबिराच्या द्वारात उभं राहून, जीवनाचं तांडवनृत्य पाहणाऱ्या एका त्रयस्थ प्रेक्षकाशिवाय मी या वेळी तरी काही करू शकत नव्हतो!

"कर्ण चलतो आम्ही!" दुर्योधन आणि अश्वत्थामा मला आलिंगन देऊन पदक्षेप टाकीत आपल्या शस्त्रास्त्रांनी ठासून भरलेल्या ध्वजमंडित महारथांवर आरूढ झाले. माझ्या सहा पुत्रांनी माझी चरणधूली मस्तकावर घेतली.

"आपल्या मातांचा, राधामातेचा, बाबांचा, सत्यसेन-मेघमालेचा आशीर्वाद घेतलात काय? शोणकाकांच्या समाधीवर सुगंधी पुष्पं चढवून आलात काय? आपल्या पत्नींची मस्तकं अंगठ्यातील उष्ण रक्तानं सौभाग्यित केलीत काय?" अशा प्रकारे मी

त्यांना अनेक प्रश्न विचारले.

"सर्वांचे आशीर्वाद घेतले! आपले हवेत!" कमरेचं खड्ग म्यानातून उपसून ते आडवं धरीत गुडघे टेकलेला वृषसेन मान नमवून म्हणाला. तो सर्वांत ज्येष्ठ होता. माझी उणीव भासू देणार नव्हता.

"जा, माझ्या वीर पुत्रांनो, एकनिष्ठेनं लढा!" मी त्या सहांनाही दोन्ही भुजा पसरून एकदमच कवेत घेतलं! माझ्या पित्यानं मला जीवनभर हवं तसं गरगर फिरवलं असलं, तरी मला माझ्या पुत्रांना पितृत्वापासून क्षणभरही वंचित करायचं नव्हतं! त्यांचे खांदे थोपटून, बोट उंचावून त्यांना सांगितलं, "जा, कर्ण युद्धात नाही ही उणीव कोणत्याच सैनिकाला भासता कामा नये! आणि – आणि रणांगणावर पाऊल टाकण्यापूर्वी दृषद्वतीच्या नितळ पात्रातून पाच-पाच ओंजळींचं अर्घ्यदान प्रथम सूर्यदेवांना द्यायला विसरू नका! जा."

ते शांत चित्तानं सेनेत समाविष्ट झाले. रणभेरी, आनक, गोमुख, दुंदुभी, मृदंग, नगारे आणि डिंडिम या रणवाद्यांचा गगनभेदी संमिश्र कल्लोळच कल्लोळ उठताच अर्धवट झोपेत असलेली पाखरं, घरटी सोडून भेदरट कलकलाट करीत मैनाक पर्वताकडे दूऽर उडून गेली! हत्तींचे भेदक चीत्कार, घोड्यांच्या प्रेरक खिंकाळ्या, कुरुयोद्ध्यांनी महाराज धृतराष्ट्रांच्या नावे केलेल्या कर्कश रणगर्जना ह्यांनी दृषद्वतीच्या चंचल जललहरीसुद्धा भेदरून अधिक थरथरू लागल्या. प्राजक्ताच्या पुष्पांचा दाट सडा पडावा तसे सैनिक दाटले होते!

काषाय वर्णाचा, उंच ध्वजदंडाच्या माथ्यावर फरफरणारा कुरूंचा त्रिकोणी पूर्ण विकसित चांद्रचिन्हाचा राजध्वज पितामहांनी आपल्या 'गंगौध' नावाच्या राजरथावर धारण केला! त्याची फडफड निळ्या आकाशाला थपडा मारू लागली! दोन्ही हातांच्या पोकळीत वळणदार, सुलक्षणी, 'ब्रह्मचेतस' नावाचा शुभ्र शंख घेऊन सेनापती भीष्मांनी गालांचं कातडं तट्ट फुगवून दाढीचे दाट, धवल केश ताणीत तो केवढ्यातरी मोठ्या अवसानानं फुंकला! त्याचे लोमहर्षक निनाद सर्व आसमंतात पसरले. वीरांचे बलदंड बाहू क्षणात स्फुरले.

'आऽऽरूऽऽढ! आऽऽरोऽऽह!! आऽक्रऽम!!! ' दोन्ही हात उंचावून त्यांनी धनुष्य पेलत आज्ञा केल्या! कुरूंची पंचवीस लक्ष सेना पुढं राजदंडाचा आकार ठेवून रक्षेचे पट्टे उल्लंघून कुरुक्षेत्राच्या समरांगणावर, वर्षाऋतूच्या पूर्वीचे गर्जणारे मेघ दाटीवाटीनं आकाशमंडलात सरसावतात तशी पुढं सरसावली! मी अपार असह्यतेनं क्षणभर नेत्र मिटते घेतले! ज्यांच्यासाठी मी माझ्या बंधूंचं, मातेचं नातं झुगारून कर्तव्य म्हणून कुरूंना चिकटून राहिलो ते माझ्यावर जीवापाड प्रेम करणारे शूर योद्धे आज माझ्याशिवाय लढणार होते! ज्यांना रणगर्जना करून चेतावणी द्यावी तो मी, त्यांचे पराक्रम दूर बसून इतरेजनांकडून श्रवण करणार होतो! जीवनभर पाठपुरावा करणारं क्रूर दैव इथं तरी माझ्याशी हातमिळवणी कसं करणार?

ज्यांचा राजदंड जिवाचा पण लावून मी आर्यावर्तात ऐश्वर्यानं मिरविला होता त्यांचं आज निर्वाणीच्या समयी माझ्यावाचून कुठंच काहीही अडत नव्हतं! व्यक्ती, मग ती कितीही श्रेष्ठ असो, त्यागी असो, योजनाकुशल असो तिच्यासाठी समाज कधीच थांबणार नाही! समाजाची अखंड गंगा वाहतच राहणार! आतील जलबिंदू बदलतील, आजचे जातील, उद्या नवे येतील, गंगा तशीच वाहत राहील. मी तरी माझं जीवन एवढं

मोलाचं का मानावं? कुठल्याही व्यक्तीनं ते तसं कधीच मानू नये, असंच ती कुरूंची अवाढव्य सेना मला सांगत होती. स्थिर भावानं त्या संग्रामोत्सुक शूर वीरांकडे पाहताना मी स्वत:ला, स्वत:च्या सुखदु:खांना, जीवनाच्या कल्पनांना, कुटुंबीयांना – सर्वांनाच विसरून गेलो.

जीवन-मृत्यूच्या स्पर्शरेषा किती सहजपणे कुरुक्षेत्राभोवती एकवटल्या होत्या! त्या शूर वीरांना एकत्र पाहताना आकाशातील असंख्य तारेच इथं कुणी पसरलेत असंच कुणालाही वाटलं असतं! पर्वतांच्या सलग रांगांसारखे धिप्पाड देहाचे महारथी प्रचंड संख्येनं रथारूढ झाल्याचं हस्तिनापुरातील राजवाड्याच्या कळसानं कधी पाहिलं होतं? बाल्हिक, सिंध, कुलिंद, मद्र, कांबोज, गांधार, मत्स्य, अवंती, दरद, आनर्त, दशार्ण, चेदी, द्वारका, काशी, पांचाल, मगध, विदेह, कोसल, अंग, कलिंग, वंग कोणत्या देशाचा राजध्वज कुरुक्षेत्राला मंडल देऊन त्याला मानवंदना द्यायला आला नव्हता? केवढ्या भाग्याचा, संस्मरणीय दिवस कुरूंची राजनगरी आज पाहत होती.

श्रीकृष्णाच्या पांचजन्य शंखाचा आकाशाचं वितान भेदणारा ध्वनी ऐकताच माझी तंद्री भंग पावली. अर्जुनाचा कपिध्वज धारण केलेला नंदीघोष रथ पंधरा लक्षांची सेना पाठीशी घेऊन समोरून पुढं सरसावला! धुळीचे लोळ उठू लागले. त्याच्या रथावरचा नीलवर्णी सारथी श्रीकृष्ण मात्र हसत होता. पंधरा लक्ष सेना पांडू महाराजांचा जयघोष करीत होती. तीत अमितौजस, विक्रांत, द्रुपद, कुंतिभोज, वार्धक्षेमी, दंडधार, बृहत्क्षत्र, धृष्टद्युम्न, सात्यकी, अभिमन्यू, काशिराज, क्षत्रंजय, चेकितान, विराट, युधामन्यू, श्येनजित आणि युयुधान हे महारथी होते. बभ्रू, अदिन, प्रतिविंध्य, पुरुजित, श्रेणीमान, शतानिक हे अतिरथी होते. सिंहचंद्र, सुक्षत्र, शैब्य, रोचमान, रथसेन, युगंधर, मणिमान, महाओजस, मित्रवर्मन, ब्रह्मदेव, तपन, सुपाश्च, जनमेजय, सुदामा, सुतेजस, चित्रकेतू, उग्रसेन असे कितीतरी राजे त्यांच्यामागून पुढं सरसावत होते. अर्जुन, युधिष्ठिर, भीम, नकुल, सहदेव, सात्यकी, युयुधान, धृष्टद्युम्न हे अग्रभागी होते. सुदर्शनचक्राच्या आकाराची रचना केलेली त्यांची सेना गरगरत समोरून पुढं सरसावू लागली. राजदंडाच्या आकाराची रचना करून उभ्या असलेल्या पितामहांनी हात उंचावून कुरूसेनेला शंख फुंकीत 'चाली'ची आज्ञा केली. पांडवांनीही आपआपले शंख फुंकले. रणवाद्यांच्या संमिश्र निनादानं भेदरलेली घोडी खिंकाळू लागली, हत्ती चित्कारू लागले. खड्ग, बाण, भाले, शूल यांची अगणित पाती तळपू लागली. रथांची चक्रं घरघरू लागली. देशोदेशींचे राजध्वज फरफरू लागले. स्वर्गाची गंजलेली महाद्वारं करकरू लागली. धुळीच्या लोळानं आकाशाचं निळं वितान काळं पडू लागलं. आवतीभोवतीच्या वृक्षांची पानं, तृणपाती अंग झटकून थरथरली! वर्षानुवर्षं मनाच्या भात्यात कोंडलेले भावनेचे बाण एकमेकांना मुक्तहस्तानं दान करण्यासाठी उद्युक्त झालेले दोन्ही सेनांतील चाळीस लक्ष योद्धे समोरासमोर उभे ठाकले! दोन महा सेनासागर योद्धयांच्या लाटा उफाळीत गर्जू लागले!

शिबिराच्या द्वारात उभं राहणं मला असह्य होऊ लागलं. जीवनभर कुरूंचं नेतृत्व करणारा मी पाषाणमूर्तिवत दूर उभा राहून तो रणसंग्राम कसा पाहणार? माझी जीवनभराची सूतपुत्र म्हणून झालेली कोंडी एवढी कधीच असह्य वाटली नाही, एवढा समोरचा महासंग्राम दूर उभा राहून पाहणं असह्य झालं होतं! शरीराची लोहधाव तापून-तापून रसरसली होती. रक्तबिंदू उधळले होते. उभं राहणं अशक्य होतं म्हणून आत येऊन

आसनावर बसलो. मस्तक दोन्ही हातांनी घट्ट पकडलं तरी रक्ताची सळसळ काही थांबत नव्हती. विचारांच्या ठिणग्या लुप्त होत नव्हत्या. सुदामन! शोणाचं उद्ध्वस्त शिरस्त्राण! प्रतिज्ञेचं पालन! अर्जुनाचे प्राण! त्याला पितामहांनी मध्येच वधला तर! मी वचनभ्रष्ट होणार! खिन्नपणे पायांकडे पाहताना कितीतरी दिवस ते न धुतल्यामुळे साचलेली धूळ स्पष्ट दिसू लागली! उरात, डोळ्यांत, मस्तकात सलू लागली! बाहेरच्या वाद्यांचा कल्लोळ शिबिराच्या पटलावर आदळतच होता. कानांची रंध्रं सुन्न झाली. जाणिवेपेक्षा धुंदी बरी! अशा असाहाय्य जीवनापेक्षा आता गुरफटणारी मूर्च्छा बरी!

"सत्यसेन!" मी केवढ्यातरी मोठ्यानं ओरडलो.

"अंगराज – आज्ञा!" बाणासारखा आत घुसून तो माझ्यासमोर उभा राहिला.

"जा, सोमरसाचा कुंभ भरून आण!"

"अंगराज, सोमरसाचे सर्व हंडे रिते झालेत! दोन थेंबही सोमरस आता शिल्लक नाही!" तो तसाच शांत उभा होता.

त्याला काहीही सांगण्यासाठी मी जीभ उचलली; इतक्यात एकाएकी सर्व रणवाद्यांचा निनाद थांबला! सगळीकडे शुकशुकाट झाला. नीरवता, नि:शब्दता पसरली! भयाण शांतता!

"का – काय झालं सत्यसेन? जा, पांडवांनी शरणागती स्वीकारली काय पाहून ये!" सोमरस विसरून मी युद्धभूमीकडे बोट उचलून त्याला आज्ञा दिली.

घोडा उधळीत सत्यसेन निघून गेला. अनेक शंकांनी माझ्या मनात काहूर उठविलं. रणवाद्यं एकाएकी का थांबावीत? युद्धाला कोणती दिशा मिळाली असावी? काय झालं?

दोन घटका निघून गेल्या; तरीही सत्यसेन माघारी फिरला नाही. माझं मन विचारांची गदा फिरवून-फिरवून शेवटी श्रांत झालं! तडक समरांगणावर जावं आणि काय झालं हे पाहून यावं, असा एक अनावर विचारही मनात तरळून गेला, पण पितामहांच्या पतनाशिवाय युद्धभूमीवर युद्धात उतरणार नाही, ही माझी प्रतिज्ञा फेर धरून डोळ्यांसमोर नृत्य करू लागली! असह्य अस्वस्थता सतावू लागली.

टप्ऽ टप्ऽ टप्ऽ टप्ऽऽ सत्यसेनाचा करडा घोडा शिबिराकडे येताना शेवटी जाळीदार गवाक्षातून झळकला! ताडकन उठून बाहेर जात मी त्याचे वेग हाती धरून त्याला थोपविलं.

"काय झालं सत्यसेन? रणवाद्यं का थांबली? युद्धाचं काय झालं? कोण शरण आलं?" मी प्रश्नांचे अनेक बाण त्याच्यावर फेकले!

"विशेष काही झालं नाही महाराज! अर्जुनानं आपले गुरू, काका, मामा, बंधू, पितामह, सुहृद यांना समोर पाहून प्रेमावेगापोटी हातातील 'गांडीव' त्यक्त करून रथ सोडला! 'आप्तजनांशी युद्ध खेळण्यापेक्षा तीर्थक्षेत्रावर भिक्षा मागून जगलेलं काय वाईट?' असा प्रश्न त्यानं श्रीकृष्णाला विचारला. श्रीकृष्णानं त्याला काहीतरी अद्वितीय बोध दिला म्हणूनच तो आता पुन्हा रथारूढ झाला आहे! पितामहांना आणि द्रोणाचार्यांना वंदन करून त्यानं धनुष्य सावरलं आहे!" त्यानं निपटलेल्या घामाची सर खाली कोसळली!

पुन्हा रणवाद्यांचा कल्लोळ उठला. शंखांचे ध्वनी निनादले. क्षणार्धात कुरुक्षेत्राचं भव्य समरांगण बाणफेकीनं झाकाळून गेलं. धुळीचे लोळ, आकाशाचा निळेपणा सत्य

आहे की असत्य ते पाहण्यासाठी स्वैरपणे उधळले! घोषणा, गर्जना, चीत्कार, वाद्यांचे निनाद, रथांची घरघर यांचं रौद्र संगीत विश्वकर्त्याला जागृत करू लागलं!

"जा, सत्यसेन तूही युद्धभूमीवर जा!" शिबिरात शिरताना मी त्याला सूचना केली. तरीही मी एकाकी राहणार म्हणून तो तसाच रेंगाळला. मजवरील प्रेमामुळे तो हळवा झाला होता.

"ही आज्ञा आहे सत्यसेन!" मी तर्जनी उंचावून त्याला युद्धभूमी दाखविली. शतघ्नीच्या दंडासारखा तो झेप घेऊन आपल्या घोड्यावर आरूढ झाला. वेग उडवीत, टप्ऽ टप्ऽ आवाज काढीत निघून गेला. मी एकटाच मागं राहिलो! सभोवतीची निर्विकार शिबिरं, समोरचा जू जमिनीवर टेकलेला माझा जैत्ररथ, सुवर्णमंडित विजय धनुष्य, दिग्विजयात साथ करणारा उंच वायुजित यांशिवाय दुसरं मला कोण सोबत करणार होतं?

शिबिरात बसणं असह्य होतं, अशक्य होतं! गंगेचं पात्र दूर-दूर राहिलं होतं. आता पितामहांच्या पतनापर्यंत दृषद्वतीचा सहवास! साधनेची कास! मस्तकावरील लोहशिरस्त्राण उतरून साध्या वेषात प्रकाशाचा अंतिम सखोल ध्यास! शेवटच्या अर्घ्यांच्या ओंजळी दृषद्वतीतून!

माझी पावलं तिच्या पुण्यपावन पात्राकडे आपोआप वळली. वाद्यांचा कलकलाट अस्पष्ट होत होता. प्रकाशाच्या साम्राज्यात शिरण्यासाठी ओढग्रस्त झालेलं माझं मन शांत होऊ लागलं.

'ॐ भूर्भुवः स्वः तत्सवितुर्वरेण्यं भर्गोदेवस्य धीमहि धियो यो नः प्रचोदयात!' सवितृ मंत्रब्रह्माचं गायत्री छंदातील अमृत घेऊन ओंजळीतील दृषद्वतीचं हिमवत शुभ्र जल पुन्हा तिच्याच पात्रात पडू लागलं! आवतीभोवती शुभ्र, धवल, प्रकाशच प्रकाश दाटू लागला. पाठ तापू लागली. गोठणाऱ्या दुधासारखं मन क्षणाक्षणाला निग्रही, खंबीर आणि निर्धारी होऊ लागलं!

**

# वीस

नऊ दिवस झाले. या दीर्घ कालात समरांगणावर काय घडलं, काय नाही याचा साग्र वृत्तान्त प्रत्येक दिवशी संध्याकाळी सत्यसेनाकडून समजत होता. आपला करडा घोडा चतुरंगदलात मुक्तपणे गरगर फिरवून डोळ्यांनी टिपलेली क्षणचित्रं रोज संध्याकाळी शिबिरात माझ्यासमोर विनयानं उभा राहून तो मला ऐकवीत होता. ती क्षणचित्रं डोळ्यापुढं उभी राहताच सर्वांगाची लाही-लाही होत होती.

गुरू द्रोण, कृपाचार्य, जयद्रथ, अश्वत्थामा, शल्य, शकुनीमामा, जरासंधाचा वीर पुत्र सहदेव, कृतवर्मा, बृहद्बल, बाल्हिक, भगदत्त, भूरिश्रवा, क्षेमधूर्ती, दुर्योधन, दु:शासन, पितामहांचे सर्व महारथी समरांगणावर होते, पण मत्स्य आणि विराट यांच्या लक्षावधी सेनेला मारण्यापेक्षा त्यांना कुठल्याही पांडव-योद्ध्याला इतक्या दिवसांत कंठस्नान घालता आलं नाही! पराक्रमाची सीमारेषा ओलांडता आली नाही.

आपल्या गुरुला– साक्षात जामदग्न्य परशुरामांनाही पराभवाचा काळा कलंक पत्करायला लावणारे पितामह भीष्म सेनापती म्हणून असताना पांडवापुढं ते कसे काय निष्प्रभ झाले? केवळ वृद्धत्व हेच त्याचं कारण नव्हतं! केवळ श्रीकृष्णाचे रणकुशल डावपेच हेही त्याचं उत्तर नव्हतं! त्यांना प्रेमाचे कोमल पाश तोडवतच नव्हते! प्रेमाच्या आसक्तीची, व्यक्तिव्यक्तीला घेरून राहिलेली लोचट बंधनं क्षत्रिय असून रणांगणावरही त्यांना सोडवत नव्हती! श्रीकृष्णानं ती तोडली होती; पण त्याचा भक्त म्हणवून घेणाऱ्या पितामहांच्या महारथाबरोबर मात्र ती समरांगणात त्यांच्या छायेसारखीच त्यांचा पाठपुरावा करीत होती. प्रेम! प्रेम ही प्रसंगी महान ठरणारी प्रेरकशक्ती कधी-कधी आणि नेमकी ऐन निर्वाणीच्या प्रसंगी पितामहांसारख्या शूर योद्ध्यालाही दुर्बल करीत होती. पितामहांच्याबाबत हे रोज ऐकायला मिळत होतं! मन पांडवांकडे आणि शरीर कुरुसैन्यात अशा द्विधा मन:स्थितीतच ते लढत होते! युद्धारंभी किंकर्तव्य झालेला अर्जुन श्रीकृष्णाच्या उपदेशानंतर सावरला होता. मात्र संभ्रमित पितामह तसेच राहिले. आपल्या वध्य मामाला मारणाऱ्या श्रीकृष्णाचा आदर्श ते विसरले होते! पित्याच्या आज्ञेसाठी आपल्या मातेचं – रेणुकेचं मस्तक धडावेगळं करणाऱ्या आपल्या प्रत्यक्ष गुरूचा – परशुरामांचा आदर्श ते विसरले होते! जीवनभर उचललेली पांडवांची तळी ते लक्ष-लक्ष कुरुसैनिक भीमाच्या गदेला आणि अर्जुनाच्या बाणांना पणाला लावून युद्धातही उचलून धरीत होते! हेच त्यांना करायचं होतं, तर महामंत्री विदुरांसमवेत त्यांनीही हिमालयाची वाट का धरली नाही? पितामहांनी आपलं धवल चारित्र्य केवळ प्रेमापोटी कळंजून का घ्यावं, तेच मला समजत नव्हतं! कुरू म्हणून पितामह श्रेष्ठ ठरले, जीवनभराच्या अलांछन ब्रह्मचर्यानं महत्पदाला चढले, पण सेनापती म्हणून? पांडवांशी सौम्य युद्ध करून कुरूंची दिशाभूल करण्याऐवजी ते सरळ-सरळ पांडवांकडूनच लढले असते, तरी एक योद्धा म्हणून मी त्यांचं स्वागत करून त्यांचे चरण धरले असते. ज्या-ज्या वेळी युद्धाची महान विषारी बीजं अंकुरत होती त्या-त्या वेळी एका तटस्थ आणि हतप्रभ त्रयस्थाची भूमिका घेऊन रंगविलेल्या शोकान्त

नाट्याचा हा शेवटचा अंकही ते त्याच तटस्थतेनं पार पाडीत होते!

त्यांची न्यायप्रियता आखाड्यासारख्या काही अटीतटीच्या प्रसंगी मला स्पष्ट दिसली होती म्हणूनच त्यांच्याविषयी नितान्त आदर असलेलं माझं मन विचारीत होतं, 'पितामह असे का वागतात?' सत्यसेनानं कथन केलेली क्षणचित्रं स्वस्थ बसू देत नव्हती. रात्रीच्या दाटलेल्या अंधारातही निद्रेला पारखी झालेली डोळ्यांची पाखरं शिबिराच्या छताला रोज टोचा मारीत होती! समरांगणाच्या प्रत्येक दिवसाची चित्रं त्यावर कोरीत होती.

पहिल्या दिवशीच्या ऐन उत्साहपूर्ण युद्धात सात्यकी विरुद्ध कीर्तिवर्मन, विराटपुत्र उत्तराला कंठस्नान घालणारा शल्य, इरावान आणि श्रुतायु यांचं घनघोर युद्ध, कुंतिभोजाला घेरणारे विंदानुविंद, द्रुपदावर धावून जाणारा जयद्रथ, बृहद्बलाला घायाळ करणारा अभिमन्यू, अश्वत्थाम्यानं पिटाळलेला शिखंडी इत्यादी सर्व स्पष्ट दिसत होतं. मन मात्र एकाच वीराभोवती त्या रात्री रेंगाळलं होतं! पांचालराज श्वेताभोवती! पांडवांकडून लढताना त्या वीरानं पहिल्या दिवसाच्या अविरोध नायकत्वाचा मान पटकावला होता! पितामहांना संत्रस्त करून त्यानं सहस्त्रावधी सैंधव, गांधार, कलिंग आणि कुलिंद कापून काढले. भयग्रस्त सेना पितामहांच्या नावे आक्रोशत त्यांच्या महारथाचा आश्रय घेऊ लागली, तेव्हा पितामहांनी श्वेताला सरळ आपल्या अंगावर घेतला आणि त्याच्या श्वेत नावाला शोभणारा कंठभेद करून त्याच्या धवल कीर्तीचा मार्ग सुलभ करून दिला. संध्याकाळी युद्ध थांबलं तेव्हा सर्व सैनिक-योद्धयांची झुंबड श्वेताचं चेतनाहीन शरीर पाहण्यासाठी एकवटली होती. पहिल्या महान दिवसाचा शेवट श्वेतानं श्वेतपूर्ण केला!

मार्गशीर्ष वद्य तृतीया या दिवशी पितामहांनी केलेली सारंग पक्षयासारखी सैन्यरचना निष्प्रभ करावी म्हणून पांडवांच्या सेनापती धृष्टद्युम्नानं आपली सेना क्रौंच पक्षयाच्या आकारात उभी केली! तो स्वत: अग्रभागी उभा राहून आपल्या पित्याला – द्रुपदाला पराभूत करणाऱ्या गुरू द्रोणांना आपले रक्तवर्णी अग्नीसारखे नेत्र विस्फारून अथक शोधत होता! सूर्योदय होताच हात उंचावून सिंहासारखी गर्जना करीत तो अश्वत्थाम्यावर तुटून पडला. शल्य शंखाला भिडला. पितामहांनी पांचालांची सेना बाणांनी झाकून टाकली. अभिमन्यू लक्ष्मणावर चालून गेला. धुळीचे लोळ उठले. आपला कोण आणि परका कोण, कुणाचा कुणाला मेळ लागला नाही. सात्यकीच्या झंझावाती गर्जनायुक्त भ्रमणानं दुसरा दिवस निनादला. पितामहांचा सारथी ठार करून त्यानं आपल्या वृष्णी कुलाची खरी ओळख सर्वांना करून दिली! प्रेतांचे ढिगारे हिमालयाची उंची मोजू लागले! नाराच, बस्तिक, पद्म, सूची, गोमुख, गवास्थी या फेकलेल्या असंख्य बाणांचे पर्वत झाले!

वद्य चुतर्थीचा तिसरा दिवस उजाडताच पितामहांनी ठेवणीतील गरुडाकार सैन्यरचना आखली! तिला ग्रासण्यासाठी अर्जुनानं अर्धचंद्राकार सैन्य उभं करून उजव्या हाताशी रथाचा चक्ररक्षक म्हणून भीमाला घेतला. पक्षयांच्या किलबिलाटांत खड्गांचा खणखणाट मिसळत त्यांनी कौरवांचा मध्यान्हकालापर्यंत क्रूर पाठपुरावा केला. कोसल, केकय, गांधार, संशप्तक, त्रिगर्त यांच्या सेनापथकांतील शेकडो अश्वसाद, रथी आणि पदाती निपटले. त्यांना थोपवायला कुणीच समर्थ नव्हतं! भयग्रस्त होऊन 'वाचवा, वाचवा!' म्हणत कुरुसैन्य दुर्योधनाच्या आश्रयाला धावलं. सेनापती

झालेल्या पितामहांवर सौम्य युद्ध खेळल्याबद्दल दुर्योधन प्रचंड खवळला! त्याच्या मर्मभेदक वाक्ताडनानं संतप्त होऊन भीष्मांनी पांडवसेना इतकी मागं पिटाळली की, ती आता रणक्षेत्राबाहेर पळून जाणार असं दिसू लागलं. ते पाहताच हाती शस्त्र न धरण्याची प्रतिज्ञा केलेल्या श्रीकृष्णानं अर्जुनाचा नंदीघोष रथ टाकून धरतीवर झेप घेतली! कुठल्यातरी रथाचं उखडलेलं चक्र हाती पेलून तो सरळ पितामहांवर सरसावून धावला! दहा पावलं तो पुढं सरसावला नसेल, तोच अर्जुनानं रथातून खाली झेपावत त्याला थोपविला. तिसरा दिवस धरतीवर अंधाराचे काळे दाणे पेरत श्रीकृष्णाची प्रतिज्ञा भंगून निघून गेला! मला पुन:पुन्हा वाटत होतं की, पितामहांना भेटावं, त्यांना असाच निकरानं संग्राम करीत राहण्याची विनंती करावी! पण ते शक्य नव्हतं. एक अर्धरथी – एका महारथ्याच्या – एका सेनापतीच्या शिबिरात कसा जाणार?

चौथ्या दिवसापासून अंधार वाढायला सुरुवात झाली! त्या दिवसापासूनच कलेकलेनं क्षय पावणाऱ्या चंद्रासारखी सेना निष्प्रभ होऊ लागली! तो दिवस भीम आणि घटोत्कच यांनी आपल्या हाती घेतला होता! खवळलेल्या भीमानं महासागरासारखी आपली विशाल काया फुलवीत सिंहनाद करताच हत्तींच्या अंगावरील केशसुद्धा ताठ उभे राहिले! वृषपर्व्याकडून मिळालेली आपली गदा पेलत तो गजदलात धुमाकूळ घालून कुरूंचे हत्ती कुरूंवरच उलटवून लावीत होता! वर्षाॠतूतील पाणलोटासारखा आवतीभोवतीच्या सैन्याचे तट ढासळीत होता. ‘तो भीम नाही, यम आहे’ म्हणत कुरुसैन्य सैरावैरा धावू लागलं. त्या सैरभैर झालेल्या सैन्याला अधिकच गोंधळून टाकण्यासाठी घटोत्कच मोठमोठे वृक्ष उखडून त्यांचे मार्ग रोखीत होता! भीमासमोर उभं राहण्याचं सामर्थ्य एकाच गदावीरात आहे, हे जाणून सर्वांनी दुर्योधनाला त्याच्यावर सोडला. खवळलेल्या दोन हत्तींसारखे ते एकमेकांना भिडले. प्रहारावर प्रहार करून ठिणग्यांचे स्फुल्लिंग वर्षवू लागले. युद्ध सोडून सैनिक त्यांची गरगरणारी, वेध घेणारी मंडलं पाहू लागले! दुर्योधनानं मस्तकाजवळ एक मर्मभेदी प्रहार करताच हिमालयाचा कडा कोसळला तसा भीम उन्मळून खाली पडला! धरती हादरली! कुरुसेनेनं दुर्योधनाचा गगनभेदी जयजयकार केला. पण – पण घडीभरात पुन्हा उठलेल्या भीमानं शुक्रदेव, केतुमान, सत्य, सत्यदेव, सेनापती, भानुमान, जलसंध, उग्र, वीरबाहू, दुर्लोचन या दुर्योधनबंधूंना विदीर्ण केलं. उपाशी व्याघ्रासारखे, पलित्याप्रमाणं असलेले रक्तवर्णी नेत्र गरगर फिरवीत झंझावातासारखा तो चतुरगंदलात अविरोध भ्रमण करून सापडेल त्याला आव्हान देऊन अंगावर घेऊ लागला. आपल्या अवजड गदेनं अनेक बलदंडांना छिन्नविछिन्न करून अंगी मृत्यू संचारल्यासारखा सोमरसाचे कुंभच्या कुंभ रिचवीत “दु:शासन दाखवा! दु:शासन दाखवा!” म्हणत थयथय नाचला!

वद्य षष्ठीच्या, पाचव्या दिवशीच्या युद्धात आमच्या सेनेनं केलेल्या मकराकृतीवर अर्जुनाची श्येन पक्षयाकृती पांडवसेना चालून आली. सर्व कुरुक्षेत्राभोवती अंकुश, दंड, पालाणं, खंडित पाती, भग्न रथचक्रं यांचे ढीग साचले होते. हात, पाय, मस्तक, धड यांचे पर्वत उभे होते. मैनाक पर्वतावरील गृध, कुकर, कुररी ह्या मांसभक्षक पक्षयांचे थवेच थवे युद्धभूमीभोवती उतरायला सुरुवात झाली होती. पाचव्या दिवसाचा नायक होता भूरिश्रवा! त्यानं सात्यकीच्या दहा पुत्रांना यमसदनाला धाडून पुन्हा सात्यकीला अंगावर घेतलं होतं! अभिमन्यू आणि लक्ष्मण यांतील श्रेष्ठ कोण ते ठरत नव्हतं!

सारंगपक्षयाच्या आकाराची कुरुसेना सहाव्या दिवशी रणांगणावर उतरली तेव्हा

समोर पांडवसेनेचा विशाल मकर पाहून पितामहही थरकले असावेत, कारण त्यांच्या समक्ष रथातून खाली उतरून हाती गदा घेतलेला भीम क्रोधानं द्रोण, अश्वत्थामा, शल्य यांचे रथ एकामागून एक उलटे करून उचलून सरळ दूर फेकू लागला! त्याचं धैर्य धोकादायक ठरू नये म्हणून धृष्टद्युम्नानं त्याला थोपवून पुन्हा रथारूढ केला! त्यानं मूर्च्छित केलेल्या दुर्योधनाला समरांगणाबाहेर काढण्यासाठीही अश्वत्थाम्याला मार्ग सापडत नव्हता, असे कुरुसैनिक धृष्टद्युम्न, भीम आणि अर्जुन यांच्या आक्रमक हल्ल्यांना घाबरून स्वैर पळत होते!

युद्धाचा निर्णय दूरच राहो, पण सैन्याला एकत्र बांधण्याची साधी हातोटीही पितामहांकडे नव्हती असं कोण म्हणू शकलं असतं? पण काही घडत नव्हतं! कधीच घडणार नव्हतं. सातवा दिवसही निघून गेला. पराभवाची दाट छाया माझ्याच काय; पण सर्वच योद्धयांच्या मनाभोवती दाटू लागली! पंचवीस लक्षांची अफाट सेना आणि अनुभवी सेनापती असून युद्ध कुरूंच्या दृष्टीनं एक पाऊलसुद्धा पुढं सरकत नव्हतं. का सरकत नव्हतं? आठव्या दिवशी रात्री संत्रस्त आणि चिंतामग्न झालेले शकुनीमामा आणि दुर्योधन माझ्या शिबिरात आले!

''कर्ण, हाती शस्त्र घे! श्रीकृष्णाची प्रतिज्ञासुद्धा आता भंग पावली आहे! चल, तुझ्या नेतृत्वाखाली पितामहांना अर्धरथी म्हणून लढायला भाग पाडीन मी!'' दुर्योधनाचा शब्दन्शब्द त्याच्या हृदयाची असाहाय्य व्याकूळता स्पष्ट व्यक्त करीत होती. मृत्यूच्या द्वारात माणसाच्या दोनच प्रतिक्रिया होत असतात! एक पराकोटीच्या क्रौर्याची किंवा पराकोटीच्या हळवेपणाची! तो हळवा झाला होता. कर्ण म्हणजे केव्हाही युद्धात रथाला जुंपावा असा जणू घोडा वाटत होता त्याला!

''मित्रा, सर्वांच्या प्रतिज्ञा भंगतील, धरतीचं उदर भंगेल, कर्णाची प्रतिज्ञा मात्र कधीच नाही भंगणार! तुला जर खरोखरच माझी सेनापती म्हणून आवश्यकता वाटत असेल, तर पितामहांना शस्त्र टाकून दूर व्हायला सांग!'' मी दुर्योधनाला वाटेला लावलं.

कुरूंची दहा लक्ष सेना कामी आली होती. पितामहांचं क्रूर द्यूत काही थांबत नव्हतं. त्यांना मोहाचे-प्रेमाचे पाश तोडता आले नव्हते!

माझ्या शिबिरातून बाहेर पडलेला दुर्योधन तडक पितामहांच्या शिबिरात शिरला असं मला कळलं. त्यांची काय बोलणी झाली हे मला कळलं नाही, पण दुर्योधनानं त्यांना स्पष्टपणे सेनापतीपदाचा त्याग करायला सांगितलं असावं, कारण नवव्या दिवशी सर्वतोभद्र आकारात सैन्यरचना करून पितामहांनी पांडवांना संत्रस्त करून टाकलं. शतानिकासारखा महारथी ठार करून आशेचे नंदादीप उजळले. आता काहीतरी घडेल, अशी आकांक्षा निर्माण झाली. दशमीची चंद्रकोर माथ्यावर घेऊनच त्या रात्री निर्धास्त कुरूंची शिबिरं विसावली होती! दृषद्वतीचं पात्र खळाळत धावतच होतं! त्याचा धवल वर्ण युद्धभूमीवरची रक्तगंगा मिळाल्यानं लाल झाला होता! नियती गरगरत होती. चांगले नऊ दिवस!

वद्य एकादशीचा दिवस आला! युद्ध सुरू झाल्यापासून दहावा दिवस उजाडत होता. नेहमीपेक्षा थंडीचा कडाका थोडा अधिक जाणवू लागला. युद्धभूमी धुक्याचं पटल सोडायला तयार नव्हती! आकाशही झाकोळलं होतं. सूर्योदयाबरोबर प्रलयध्वनी ऐकण्याचा सराव झाल्यामुळे दृषद्वतीला किनाऱ्यावरची शांतता पाहून काहीतरी

चुकल्यासारखं वाटत होतं. मलाही काहीतरी चुकल्यासारखंच वाटू लागलं, कारण समोर उभा राहिलेला दुर्योधन जे सांगत होता, त्यावर कसा विश्वास ठेवावा हेच समजत नव्हतं.

"काल रात्री पितामहांच्या शिबिरात युधिष्ठिर येऊन गेला! त्यांच्या संवादात वारंवार शिखंडीचा निर्देश होत होता!" दुर्योधनाचे शब्द माझं मस्तक सुन्न करीत होते. सेनापती असताना पितामहांनी युधिष्ठिराची एकान्तात भेट घेतलीच का? त्याच्याशी घटकाभर विवाद केलाच का? आणि इतकं करून पुन्हा सर्वांना अंधारात का ठेवलं? कोणत्या योजना आखण्यात आल्या? शिखंडीचा त्यात काय संबंध? काहीच अर्थसंगती लागत नव्हती!

"युवराज दुर्योधना, आज माझ्या सहनशीलतेचा खरोखरच कडेलोट होतो आहे! आज पांडवांपैकी एक तरी विख्यात महायोद्धयाला पितामहांनी पाडलं नाही, तर स्वत:चं पतन स्वीकारावं! मी हाती शस्त्र धरीन! जर आज यांपैकी काहीच घडलं नाही तर... नाही तर तू माझ्या शिरी चढविलेला राजमुकुट तुझ्या पायांशी टाकून मी चंपानगरीचा मार्ग स्वीकारीन! दहा दिवस रणवाद्यांचे आणि शस्त्रास्त्रांचे ध्वनी दुरून ऐकून-ऐकून आता मला काहीच ऐकू येईनासं झालं आहे! माझा रणांगणप्रिय वायुजित दिवसेंदिवस थकत चालला आहे! जैत्ररथाबरोबरच माझ्या कीर्तीवर धूळ साचते आहे! जा, पितामहांना सांग की एकतर युद्धाची कोंडी फोडा नाहीतर कर्णाचा कंठनाळ फोडा!" दुर्योधनाला रणांगणावर धाडताना, निर्वाणीचा संदेश देताना अगतिकेची पोकळी लपविणं मला शक्य नव्हतं. तो तरातर निघून जाताच मी वायुजितासह आणखी चार शुभ्र घोडे जैत्ररथाला जुंपले. ज्यानं जीवनभर माझ्या सुखदु:खांचा वाटा स्वत:चाच म्हणून सहर्ष उचलला होता त्या शोणाच्या समाधीवर पुष्पमाला चढविण्याचं कर्तव्य मागं राहू नये, ही तीव्र मनीषा होती. कुरुक्षेत्र सोडून, राजनगर एका हाती टाकून विराटांच्या सीमांवर असलेल्या त्याच्या समाधीकडे माझा रथ धावू लागला. रणवाद्यांचे कलकलाट मागं पडले. संध्याकाळपर्यंत परतणंच भाग होतं. दोहो बाजूस दोन-दोन साथीदार घेऊन, मला नेहमी शोणासारखाच वाटलेला वायुजित शेपटीचा पिसारा फुलवीत दौडू लागला. त्याच्या शेपटीच्या झुपक्यातील अगणित दाट अशा शुभ्र केशांसारख्याच शोणाच्या आठवणी असंख्य होत्या, शुभ्र होत्या!

यमुनेच्या तीरावर उभ्या असलेल्या शोणाच्या नि:स्तब्ध समाधीचे दगड दृष्टिक्षेपात येताच मला हात उंचावून बोलावू लागले. 'वसुदादा, ये! क्रूर आणि अन्यायी जगाला तुझं मन कधीच कळलं नाही! सांग, तुला काय सांगायचं असेल ते माझ्या कानात सांग! हा सारथी आपली सुख-दु:खं उरात जतन करून ठेवणार नाही असं का वाटतंय तुला! मी जिवंत असतो तर सूर्यपुत्रा, तुझ्या रथाच्या घोड्यांचे वेग मी वागविले असते! तुझं लोहत्राण तुझ्या देहावर चढविलं असतं! पण – पण उलट आज तूच माझ्यावर फुलं चढविणार आहेस! कशाला आणली आहेस ती पुष्पमाला! लहानांना कोणी कधी फुलं अर्पीत नसतात!'

यमुनेचा शांत – गंभीर प्रवाह आणि त्याची समाधी सगळं-सगळं माझ्याप्रमाणंच अबोल होतं – पण अबोलपणाचा बोलका जिव्हाळा मी अनुभवीत होतो.

यमुनेच्या स्वच्छ पात्रात हस्तमुखक्षालन करून हातांतील पुष्पमाला समाधीवर वाहताच मन शांत झालं! पात्राकडे पाहताना अश्वत्थाम्यानं असेच कधीतरी ऐकविलेले

उद्‌गार मनश्चक्षूंसमोर उभे राहिले. ‘जीवन ही जन्म-मृत्यूच्या तासातून वाहणारी नदी आहे!’

‘येतो शोण!’ गुडघे टेकवून मी समाधीला वंदन केलं. मावळतीची सौम्य किरणं पाठीवर घेत वायुजित पुन्हा कुरुक्षेत्राकडे धावू लागला. आता कसलीच चिंता नव्हती. पायांत अडखळणारं काही नव्हतं! मागं वळायचं कारण नव्हतं! तो पुरा दिवस दौड करीत, युद्ध थांबविण्याचा संकेत करणारं रणशिंग वाजत असतानाच मी रथ माझ्या शिबिरासमोर आणला. सगळं कसं शांत-शांत भासत होतं. नेहमी एकमेकांच्या पराक्रमाचं तोंडभर वर्णन एकमेकांना ऐकवीत परत शिबिराकडे फिरणारे सैनिक मला कुठंच दिसेनात! इतकी नीरव, भयाण शांतता का? युद्ध थांबलं असूनही सैनिक मागं का फिरकत नाहीत? काय झालं? भयंकेची तीव्र सणक सावरतच मी वायुजिताला रथापासून मोकळं केलं.

एक टिटवी दृषद्वतीच्या काठानं कर्कशपणे केकाटत पळाली. तिची किंकाळी मला कशीतरीच वाटली! संध्याछायेचा धूसर प्रकाशही अस्पष्ट होत होता! वद्य एकादशीचा सघन काळोख दोन्ही सेनांच्या शिबिरांभोवती दाटत होता! पलिते उजळूनही तो दूर करता येणं शक्य नव्हतं!

सूर्यास्त होऊन एक घटका झाली तरी सत्यसेन शिबिराकडे माघारी का येत नाही? की, कुणीतरी त्यालाच आजच्या युद्धात अचूक घेरलं काय?

शिबिराच्या द्वाराचा पटल हाताच्या मनगटाभोवती गुंडाळून-गुंडाळून फाटण्याच्या घाईला आला! अंधाराचा भेद करून कुरुक्षेत्रावर रोधलेले माझे डोळे पार थकले! काय झालं होतं? काय घडलं होतं आज? शेवटी टप्ऽ टप्ऽ टप्ऽ टप्ऽ टापा कानी आल्या. सत्यसेनाचा घोडा नित्याच्या ऐटदार लयीत येत नव्हता! त्याची दौड चुकतमाकत होत होती.

“अंगराज, पितामह पडले!” तो माझ्यासमोर येताच घोड्यावरून कसातरीच खाली येत म्हणाला.

अंगावर हिमालय कोसळल्याचा भास मला झाला. “कुणी केला हा दिव्य पराक्रम!” मी त्याचे खांदे गदागदा हलवून त्याला चीत्कारत विचारलं.

“अर्जुनानं! षंढ असलेल्या शिखंडीला पुढं घालून!”

“व्याकूळ असलेल्या पितामहांना सर्व जण भेटून गेले. तरीही तळमळत ते अजून कुणाचीतरी वाट पाहताहेत! आणि – आणि,” मध्येच अडखळत तो म्हणाला.

“आणि काय सत्यसेन?”

“आपला भानुसेन गेला... आपल्या हस्ते अग्नी देण्यासाठी त्याचं शव सर्वांनी थांबविलं आहे!” त्यानं मान फिरवून आपल्या डोळ्यांना अधरीयाचा शेव लावला.

“भानुसेन गेला? सत्यसेन, जा, त्याला अग्निसंस्कार द्या. तुम्ही द्या! माझ्यासाठी थांबू नका!”

वायुजितावर आरूढ होऊन मी तसाच युद्धभूमीकडे निघालो! मनात विचारांचं थैमान होतं. भोवती अंधार होता. पितामह पडले! कुरूंचा राजदंड पडला! त्यांचे आणि आपले मतभेद आहेत. एका सारथ्यापेक्षा ते आपणाला अधिक मानत नाहीत! त्यांच्या मनी एका अर्धरथ्यापेक्षा अधिकसं आपणाला मोल नाही! तरीही मन त्यांच्याकडे का ओढ घेत होतं? ही आत्मवंचना आहे काय? नाही! नाही! जो योद्धा मृत्यूच्या दारात घायाळ होऊन पडला आहे त्याची भेट घेताना कसली आलीय वैयक्तिक स्पर्धा? कसला

मानपान? कोणते मतभेद? आता काही क्षणांचीच सोबत करणाऱ्या त्या महापुरुषाचे प्रमाद मनात तसेच उगाळीत बसायचं की काय? इतर कुणाला ते शक्य असेल. कर्णाला नाही! त्यांची भेट घेतलीच पाहिजे! पुत्राचं दहन बाजूला ठेवून!

माझ्या मनीचे भाव जाणून दाटलेल्या गर्दीजवळ वायुजित आपोआप एका शिबिरासमोर थांबला! पलित्यांचा प्रकाश, अंधार उजळण्याऐवजी त्याला अधिकच भेसूर करीत होता. म्लान चर्येच्या सैनिकाचं कडं कुरूच्या, शरपंजरी पडलेल्या सेनापतीचं दर्शन घेण्यासाठी दाटलं होतं! राजकक्षात सुखशय्येवर निद्रा घेणारा तो वीर, शरांच्या – तृणपात्यांच्या शय्येवर पडला होता! दाढीच्या शुभ्र केसात दोन- तीन शुष्क शराच्या तृणकाठ्या अडकल्या होत्या! मस्तकावरचा गौरवशाली मुकुट दिसत नव्हता! ठायी-ठायी शरीरात रुतलेले बाण तसेच होते! डोळ्यांभोवती काळ्या सुरकुत्यांची वलयं दाटली होती! त्यांच्या शरीराखालचं तृण धन्य झालं होतं! पावन झालं होतं! ज्याच्यावर त्यांची निस्सीम भक्ती होती त्या गुरुतुल्य शंपाक ब्राह्मणानं त्यांचं मस्तक सावरलं होतं.

"महाबाहो भीष्म!" भावनावेगात पितामहांऐवजी 'भीष्म' हे शब्द ओठातून निसटल्याचं मला जाणवलं; पण ते केव्हाच त्यांच्या कानापर्यंत जाऊन पोहोचले होते! परता घेता येत नव्हते.

पापण्यांच्या सुरकुत्यांआड लपलेले तेजस्वी नेत्र किलकिलले. दीर्घ ओठांची अस्पष्ट हालचाल झाली. तोच, पाषाणावर बाणाचं पातं आदळताच होतो तसा कणीदार आवाज त्या वृद्ध, श्रांत आणि मृत्युशय्येवरील जर्जर शरीरातूनही पुन्हा उमाळून आला. भावनांची आणि आपुलकीची वलयं घेऊन.

"कोण? कर्ण! ये... असा जवळ ये!" दोन्ही हात हलवून भोवतीच्या सेवक आणि सैनिकांना दूर जाण्याचा संकेत झाला. ढणढणत जळणाऱ्या पलित्याशिवाय भोवती कुणीही उभं राहिलं नाही. मस्तक सोडून शंपाकही निघून गेला. "होय मी कर्णच आहे! सूतपुत्र अर्धरथी कर्ण! कसा जवळ येऊ? का येऊ?" माझ्या स्वाभिमानाचा घोडा कुठंतरी अडखळत होता.

"कर्ण, कोण सूत? कोण क्षत्रिय? कोण रथी, अर्धरथी नि कोण महारथी? सगळ्या असत्य कल्पना! ये माझ्याजवळ – अगदी जवळ ये! एक योद्धा म्हणून तरी अस्तंगत सेनापतीची आज्ञा पाळ!"

मी जवळ गेलो. हिमालयाच्या उभ्या कड्याचा शेवटी आडवा विंध्याद्री झाला होता! इतका हळुवार ध्वनी! इतका जिव्हाळा कधीच अनुभवला नव्हता! ज्या रीतीनं आयुष्यभर त्यांनी सत्याला कवटाळलं होतं; तशाच आपुलकीनं एक हात विस्तारत एकदम जवळ ओढून त्यांनी मला कवटाळलं! पुन्हा सर्वांगावर रोमांचाची शिरशिरी तरळली. परशुराम, श्रीकृष्णानंतर झालेला हा तिसरा दिव्य आणि अविस्मरणीय स्पर्श होता!

"कर्ण, तू सूतपुत्र नाहीस! तू राजमाता कुंतीचा सर्वांत प्रथम पुत्र आहेस!" क्षणभराची शांतता पलित्यांची फुरफुर स्पष्ट ऐकवू लागली. त्यांना वाटत होतं की, त्यांनी सांगितलेले सत्य प्रथम त्यांच्याच तोंडातून मला ऐकायला मिळत असावं. मला आता त्याचं कुतूहल नव्हतं. मी सूतपुत्र नाही – कुंतीपुत्र नाही – सूर्यपुत्रही नाही – मी एक जिवंत माणूस आहे – येईल त्याला निर्धारानं तोंड द्यायला उभा ठाकलेला एक सैनिक आहे! एवढीच माझी कल्पना होती!

"का? हे ऐकून तुला काहीच कसं वाटलं नाही?" त्यांच्या छातीवरचे रुतलेले बाण बोलताना मंद स्पंदत होते.

"नाही! हे सत्य मी पूर्वीच ऐकलं आहे!"

"मग – मग मी तुझा ठायी-ठायी अधिक्षेप केला, अवमान केला म्हणून मजविषयी तुझं मनं तिरस्कारानं, क्रोधानं भरून गेलं असेल – पण पुत्रा, तसं नाही रे! तुझी अवहेलना करावी हा माझा हेतू कधीच नव्हता! तुला अर्धरथी म्हणून युद्धापासून दूर सारण्यात तू – तू नात्याच्या अज्ञानानं आपल्या सख्ख्या बंधूंशी लढू नयेस एवढाच पवित्र उद्देश मी उराशी बाळगला होता! वृद्धांची मनं ही ऐरणीसारखी असतात! तप्त लोखंड माथ्यावर घ्यायचं आणि वर घणाचे आघातही! इतकं करून जगाला ऐकायला मिळतात ते लोखंडाचे आणि वर घणाचे टणत्कार! ऐरण मात्र नि:स्तब्ध असते! त्यासाठीच तिचा जन्म असतो! तू भेटीला आलास हे कल्याणकारकच झालं! मजविषयीचे सर्व किंतू मनातून काढून टाक! तू अर्धरथी नव्हेस; तर महारथ्यांचाही महारथी आहेस!!" मरणप्राय यातनांनी विव्हल होऊन ते क्षणभर थांबले.

एक दीर्घ नि:श्वास सोडून त्यांनी डोळे उघडले.

"पितामह!" कंठ दाटून आल्यानं मलाही काही बोलवेना.

"कर्ण, काशीराज्यात भानुमतीचं हरण करणाऱ्या दुर्योधनावर कोसळलेल्या देशोदेशींच्या राजांना तू एकटयानं थोपविलंस हे कोण विसरणार? जरासंधाला तू चारलेली धूळ मगधांनाच काय मलासुद्धा स्तिमित करणारी होती! तुझ्या संपूर्ण आर्यावर्ताच्या दिग्विजयाचा डिंडिम अजूनही माझ्या कानात घुमतो आहे! शस्त्रास्त्रांत, बाहुबलात तू अर्जुनाहून श्रेष्ठ आहेस! आणि कौंतेया, गेली अनेक तपं तू जगून दाखविलेलं जीवनाचं तत्त्वज्ञान युधिष्ठिराला खाली पाहायला लावील असंच आहे! तुझा बाहुकंटक भीमाचे प्राणही कोंडून टाकील इतका प्रभावी आहे! पुत्रा, तू-तू साक्षात श्रीकृष्णासारखा देदीप्यमान आहेस! जा, आपल्या बंधूत जा! जिनं दु:खाशिवाय अन्य काहीच पाहिलं नाही, राजमाता असून एका योगिनीचं खडतर जीवन जिच्या वाटयाला आलं, तुझ्या दर्शनासाठी जिच्या नेत्रांचे आतुर पक्षी जीवनभर फडफडत राहिले, मूक हृदय आक्रंदत राहिलं; त्या तुझ्या कुंतीमातेच्या चरणांशी जा! माझ्या मृत्यूबरोबरच हा वैरत्वाचा विनाशी वणवा विझू द्या! तू गेलास की, दुर्योधन प्रत्यंचा तुटलेल्या धनुष्यासारखा निष्प्रभ होईल! लक्ष-लक्ष योद्धयांचे अकारण प्राण वेचणारं हे महायुद्ध इथंच थांबेल! जा, पांडवांकडे जा!" त्यांच्या नेत्रकडांजवळच्या सुरकुत्या पाणावल्या होत्या. माझ्या पाठीवरचा हात स्पंदत होता. उरातील बाण थरथरत होते. पुन्हा तीच मोहाची कर्तव्यच्युत करणारी मंडलं माझ्याभोवती गरगरत होती! पुन्हा निर्धारानं काहीतरी ऐकवायला पाहिजे होतं.

"पितामह, हीच कल्पना श्रीकृष्णानं माझ्यासमोर अशाच भावपूर्ण शब्दांत मांडली होती – एक राजकीय कुशल पेच म्हणून! राजमातेनंही हाच मोह माझ्यासमोर उभा केला होता – आपल्या पुत्रांना माझ्याकडून अभय मिळावं म्हणून! मात्र तीच योजना तुम्ही मांडताहात आणि किती सत्यार्थानं! मृत्युशय्येवर राहून मला तुम्ही हे सांगाताहात, यात तुमचा मजवरचा नितांत जिव्हाळाच स्पष्ट होतो आहे, पण – पण माझा मार्ग चुकला आहे! आता तो तसाच चालत जाणं याशिवाय माझ्या हाती काही नाही! जसा पांडवांना वासुदेव आहे तसाच मी कौरवांना साहाय्यकारी होईन. माझं धन,

शरीर, आप्तजन, तशीच कीर्ती मी दुर्योधनासाठी सोडून दिली आहे. वायू अग्नीला करतो तसाच मी अर्जुनासह सर्व पांडवांना संतप्त करीन. क्षमा करा – पण मोहाच्या महासंभ्रमात आता मला पुन्हा टाकू नका! मला काही देणारच असाल, तर केवळ आशीर्वाद द्या!"

"कर्ण, धन्य आहेस! कुंतीचा पहिला पुत्र म्हणवून घेण्याची पात्रता तुझीच आहे! जा वैरभाव टाकून कुरूंचा सेनापती म्हणून हाती धनुष्य घे! एक क्षत्रिय म्हणून निरहंकारी वृत्तीनं सेनेचं नेतृत्व कर! देवादिकांचा वैभवशाली लोक तुझ्या उच्च अंतरात्म्याला प्राप्त होईल! जा, माझे आशीर्वाद तुझ्या पाठीशी आहेत! सदैव आहेत!" त्यांच्या नेत्रांचा हिमालय, शरांची शय्या सिंचण्यासाठी वितळू लागला. त्यांच्या देहात घुसलेले बाण माझ्या उरात सलू लागले.

उठून त्यांना अभिवादन करून प्रदक्षिणा घालताना सावरलेला मनाचा कुंभ तडकला! अखंड ब्रह्मचर्यव्रत पाळलेल्या, सत्यभाषी अशा पितामहांनाही मृत्यू वेढू शकतो तर मग जगात शाश्वत तरी काय आहे? कशासाठी अर्जुनानं, कटिखांद्यावर खेळविलेल्या पितृतुल्य महामानवाचा असा लाकडी ओंडका करून शरांच्या तृणांवर फेकला होता?

माझ्या नेत्रांतून निसटलेल्या अश्रूंची मौक्तिकं त्यांच्या पुण्यपावन चरणांवर टपकली! हात उंचावून त्यांनी आशीर्वाद दिला 'जयतु कर्ण!' जीवनभर सूर्यदेवांना अर्घ्य देणारा, वृद्ध शरीरात सुदृढ मन वागविणारा तो सेनापती सूर्यदेव उत्तर आयनात येईपर्यंत मृत्यूलाही थोपविणार होता! सूर्य उत्तर आयनात जाताच आपल्या देहाच्या कटिखालच्या अपवित्र आयनातील पंचप्राण मस्तकातील ब्रह्मरंध्राच्या पावन उत्तरायनात, योगबळावर आणून, सूर्यदेवांच्या हिरण्यगर्भी केंद्रात ते विसर्जन करणार होता! त्यांच्या अंतिम साधनेत व्यत्यय नको म्हणून मी शिबिराकडे परत चाललो, भोवतीचे पलिते भकभकतच होते. दाटलेल्या अंधाराला साथ देत रातकिडे तालबद्धपणे कर्कश ओरडत होते!

मनाच्या वीणेची एकच तार देहाच्या गहन गंभीर गाभाऱ्यात दूरवर सखोल कुठंतरी अजूनही छेडली जात होती! राधामातेचा आशीर्वाद घ्यायला मिळाला नव्हता! बाबांचे चरण मस्तकी लावून घेण्याची संधी सापडली नव्हती! वृषालीची भेट झाली नव्हती! सुप्रियेची वार्ता समजू शकत नव्हती! राजवाड्यावर राहिलेला एकटा वृषकेतु कोणत्या कल्पना करीत असेल सांगवत नव्हतं! सेनापतीच्या निवडीच्या प्रसंगी घडलेल्या आकस्मिक घटनांमुळे राजनगरात पाऊलही टाकलं गेलं नव्हतं! कशी भेट होणार सर्वांची? उद्या तर समरांगणावर उतरायचं आहे!

**

# एकवीस

भानुसेनाला अग्निसंस्कार देण्यासाठी म्हणून गेलेला सत्यसेन परतला नव्हता. माझ्या मृत पुत्राचा आत्मा; त्यासाठी मी आलो नाही म्हणून मजवर रुष्ट होणार नव्हता याचा मला विश्वास होता! संग्रामात वीराचं मरण पत्करणाऱ्या त्या शूराला माहीतही नव्हतं की, ज्या भीमाकडून त्याचा वध झाला तो त्याचा चुलताच आहे! अज्ञानाच्या पोटी म्हणून का होईना; पण भीमानं माझ्या एका पुत्राचा बळी घेतला होता! श्रद्धेचे, मायेचे, नात्याचे उरलेसुरले अंकुरही माझ्या मनातून त्यामुळे होरपळून गेले होते. मन बधिर होतं! शरीर सुन्न होतं! मधूनच पितामहांची विकलांग मूर्ती शिबिराच्या पटलापटलांवर दिसत होती. 'वैरभाव न ठेवता युद्ध कर – निरहंकारी नेतृत्व कर!' त्यांचे निर्वाणीचे बोल फेर धरून डोळ्यांसमोर नाचत होते. डोळे मिटून आसनावर बसलो होतो. बैठकीची मऊ शय्या काटेरी भासत होती!

''अंगराज, बाहेर आपल्या भेटीसाठी कोण आलं आहे पाहा!" वायूची झुळूक नकळत आत शिरावी तसा सत्यसेन केव्हा शिबिरात शिरला तेच समजलं नाही.

''सत्यसेन, जा, आता कर्णाच्या भेटीसाठी मृत्यूशिवाय कुणीच येऊ शकत नाही! मला कुणाचीही भेट घ्यायची नाही! समरांगणात अर्जुनाशिवाय!" तिडिकेनं मी शिबिराच्या द्वाराकडे बोट उंचावून त्याला बाहेर जायला सांगितलं.

''नाही अंगराज, जी व्यक्ती बाहेर उभी आहे तिला पाहताच आपण मृत्यूलाही घडीभर तसाच थांबवाल! बाहेर वृषाली उभी आहे!''

सत्यसेन बंधू म्हणून आपलं कर्तव्य करीत होता की एक कुटुंबवत्सल म्हणून पत्नीला आणून पतीशी भेटवत होता – की उद्या सेनापती होणाऱ्या नायकाची मन:स्थिती जाणणाऱ्या सैनिकाचं कर्तव्य पार पाडीत होता? माझ्या भोवतीच्या या सर्व माणसांनी काही हातचं न राखता माझ्यावर एवढ्या निर्हेतुक प्रेमाचा वर्षाव का करावा? मी खरोखरच त्या पात्रतेचा आहे काय?

''वृषाली? मग तिला बाहेर का उभी केलीस सत्यसेन?" मी शिबिराबाहेर पाहत त्याला विचारलं.

''तिची कल्पना आहे की, युद्धापूर्वी एका सेनाप्रमुखाच्या शिबिरात त्याची स्त्री पाहून उद्या सैनिक म्हणतील की, 'आमच्या साऱ्यांच्या स्त्रिया अशाच शिबिरात आल्या तर चालेल काय?' महाराज त्यांना काय उत्तर देतील? म्हणूनच ती बाहेर उभी आहे! आपण दर्शन द्यावं अशी तिची तीव्र मनीषा आहे महाराज, माझीही! म्हणूनच अंधाराला न मानता मी हस्तिनापुराहून तिला आणलं आहे! तिचा बंधू म्हणून!" तो भारावला होता. त्याचा प्रत्येक शब्द मला विनवीत होता.

"चल." मी त्याच्यावाचून शिबिराबाहेर आलो. पलित्याच्या धूसर प्रकाशात माझी पत्नी उभी होती! भानुसेनाच्या मृत्यूची वार्ता तिला सत्यसेनानं सांगितली नसावी, म्हणूनच ती शांत होती. माझ्या जीवनाची साथीदारीण युद्धभूमीवरही मला साथ देणार होती काय?

"वृषाली, आत ये!"

"अंगराज – " ती संकोचत होती.

"ये वृषाली, कुठलाही कुरुसैनिक तुझ्या आगमनानं कपाळ्याला आठ्या घालणार नाही! आदर्श – आदर्श म्हणून मी उराशी कवटाळलेल्या सर्व कल्पना समाजाच्या दृष्टीनं कवडी मोलाच्या ठरल्या आहेत – आता कसला आदर्श तू पाळते आहेस? संकोचू नकोस." मस्तकावर लपेटलेलं अंशुक सावरीत ती शिबिरात आली. मी सांगितलं असतं, तर ती पेटत्या वणव्यातही शिरली असती!

"वृषाली, तू एकटीच आलीस?" मला अधिक काहीच बोलवत नव्हतं!

"माताजी आणि मामंजी आता फार थकलेत. ते इथपर्यंत येऊ शकत नाहीत. सुप्रिया भानुसेनासाठी शोक करणाऱ्या वृषकेतूला सांभाळण्यासाठी मागं राहिली आहे – मीच तिला ठेवलं आहे!"

"म्हणजे तो गेल्याचं तुला समजलं? कुणाकडून?"

भानुसेन गेला तरी ती शांत कशी काय राहू शकत होती? कर्णपत्नी हे ब्रीद ती किती निर्धारानं पार पाडीत होती!

"सत्यसेनदादाकडून! आणि – आणि आपण त्याच्या दहनविधीला गेला नाहीत हेसुद्धा सर्वांना समजलंय!" दु:खावेगानं तिनं मान खाली टाकली. अंशुकाचा पदर डोळ्यांना लावला.

"वृषाली – " मला काय बोलावं ते सुचेना.

"मला माहीत आहे अंगराज, माझ्यासारख्या एका क्षुद्र सारथिकन्येशी संसार करण्यात आपलं जीवन व्यर्थ गेलं आहे! पण आपण आपल्या माता-पित्यांना कसे विसरलात? त्यांचं दर्शन घ्यावं असंही आपणाला का वाटलं नाही? का आला नाहीत राजनगरात?"

"कुणी – कुणी सांगितलं तुला मी सारथी नाही म्हणून?"

"राजमाता कुंतीदेवींनी! गंगेकाठी तुम्ही त्यांना दिलेलं वचन घेऊन दुसरं कुणीही निर्धास्तपणे परत गेलं असतं – पण त्या मलाही भेटल्या. एवढ्यासाठीच की – "

"कशासाठी?"

"अजूनही त्यांचं मन तुमच्यासाठी तळमळतं आहे यासाठी! पत्नी म्हणून मीही तुम्हाला काहीतरी सांगावं म्हणून! महाराज, तुमच्याविषयीच्या त्यांच्या प्रेमाला बंध माहीत नाहीत. आमच्यासाठी नाही – पण त्यांच्यासाठी तरी तुम्ही हे युद्ध थांबवा!"

"वृषाली, तुलाही असंच वाटतंय का की, माझं जीवन तुझ्याशी संसार करण्यात व्यर्थ गेलं? नाही! नाही! नाही! तुमच्यासाठीच मी श्रीकृष्णाला नकार दिला आहे, राजमातेला परत पाठविलं आहे, पितामहांची अंतिम इच्छा दूर सारली आहे! मी सारथी होतो आणि तसाच आजही आहे! अगतिकतेनं नव्हे; तर अभिमानानं मी कुणालाही सांगेन की, मी राधामातेचा आणि अधिरथबाबांचा पुत्र आहे! आणि तू पहाटेपर्यंत थांबशील तर उगवत्या सूर्यदेवांनाही तुझ्यासमक्ष सांगेन की – "

"काय?"

"की वृषालीसारखी पत्नी लाभणार असेल तर एकच काय शत जन्मही मी सूतपुत्र म्हणून स्वीकारीन! पण – पण युद्धाविषयी काहीच बोलू नको! ते आता थांबणार नाही."

"अंगराज, हीच आशा उराशी बाळगून राजमाता भेटून गेल्यापासून मी आपला फुटक्या घड्याचा तुकडा गेले पंधरा दिवस अश्रूंच्या पुष्पांनी पूजते आहे! आपण आमचेच आहात – आम्हाला अंतर देऊ नका!" तिच्या गोल गौरवर्णी मुखाचं श्वेतकमल अश्रूंच्या दवबिंदूंनी डवरलं! पुढं होऊन तिनं माझ्या चरणांना ओणवून हस्तस्पर्श केला. माझं मन अभिमान, प्रेम, जिव्हाळा या भावलहरींनी तुडुंब भरून आलं.

"वृषाली, ऊठ, शंतनूमहाराजांनी मत्स्यगंधेला कधी अंतर दिल्याचं तू आजवर राजनगरात कुणाकडूनही ऐकलं आहेस काय? ययाती महाराजांनी शर्मिष्ठेला दूर लोटल्याचं कधी तुला कुणी सांगितलं आहे काय? मी त्याच नगरात, त्याच राजवास्तूत वाढलो आहे. पतिपत्नी हे पूर्वजन्मानं एकत्र जोडलेल्या दोन देहांतील एकाच आत्म्यासारखे असतात! समाज, धर्म, नीती कुणी-कुणी त्यांना विलग नाही करू शकत. खोटी प्रतिष्ठा त्या पवित्र बंधनाला तोडू शकत नाही. ऊठ! शांतपणे नगरात जा आणि शक्य असल्यास त्या घड्याच्या तुकड्यातील अर्धा सुप्रियेलाही दे! तू सुज्ञ आहेस. ज्येष्ठ आहेस. ऊठ!" तिच्या दंडांना धरून मी थरथरत्या हातांनी तिला वर उठविलं. वृक्षाला वेल बिलगते तशी एकदम ती मला कडकडून बिलगली. तिच्या दाट कुरल केशपाशावरून फिरणारा माझा हात तिला सांगत होता, 'वृषाली, जगलो वाचलो तर पुन्हा गंगेचा किनारा आहेच! यमुनेच्या जललहरी आहेत – नाहीतर स्वर्गंगेकाठी पुन्हा भेट!'

"येते मी." तिनं आमच्या विवाहात राजमाता कुंतीदेवींनी दिलेलं अंगुलित्राण आपल्या अंशुकाच्या शेवातून काढून माझ्या उजव्या हाताच्या अंगठ्यावर चढविलं. तिच्या अंगावर तोच सोनेरी ठिपक्यांचा निळा शालू होता! दोन्ही वस्तू तिनं राजमातेच्याच निवडल्या होत्या.

"ये – आणि उद्या सूर्योदयापूर्वी दर्शन आणि आशीर्वादासाठी वाड्यावर येतो आहे असं राधामातेला सांग!" मी म्हणालो. अंशुक मुखाभोवती लपेटून शिबिराचा विणलेला पटल दूर सारीत ती बाहेर पडली. बाहेरच्या सत्यसेनाचे डोळे आनंदात चमकत असल्याचं मला पलित्याच्या प्रकाशात स्पष्ट दिसलं. कितीतरी तत्परतेनं एका हाती पलिता घेऊन तो रथनीडावर चढला. वृषाली रथात बसताच त्यानं वेग आखडले. जाणिवेची एक सूक्ष्म तार माझ्या मनात कुठंतरी छेडली गेली! एक महत्त्वाचा संस्कारविधी मी पती असूनही विसरून गेलो होतो!

"सत्यसेन थांब!" शिबिराच्या द्वारातून हात उंचावून मी त्याला थोपविला. जे वृषालीला द्यायला पाहिजे होतं ते मी पार विसरूनच गेलो होतो. एका हाती तीक्ष्ण पात्याचा सर्पबाण घेऊन रथाकडे जवळ-जवळ धावतच गेलो. ते दोघेही स्तिमित होऊन पाहत होते.

"वृषाली, तुझं सौभाग्यलेणं राहिलं!" हातातील बाण डाव्या अंगठ्यात टोचून त्यावर तरळलेला एक टपोरा रक्तबिंदू मी उजव्या अंगठ्यानं तिच्या विशाल भाली चढविला! ती त्या कुंकुमतिलकानं कितीतरी सुंदर दिसत होती! शुचित दिसत होती! इंद्राला कवच-कुंडलं दान करण्यात कर्ण चुकला म्हणणाऱ्यांना काय कळणार की, या वेळी अंगावर अभेद्य कवच असतं तर – तर मी वृषालीच्या भाली तसला मंगल तिलक लावण्याच्या भाग्याला मुकलो असतो.

सत्यसेनानं वेग झटकले, घोडे उधळताच त्याच्या हातातील पलित्याची ज्योत

फरफरत राजनगराकडे धावू लागली. दूरवरच्या वळणाआड ती अदृश्य होईपर्यंत मी एकटक तिच्याकडे पाहत होतो.

**

# बावीस

उद्या पेटणाऱ्या महायुद्धात माझ्यासमोर एकच पर्याय होता. लढणं! आपल्या परंपरेला शोभेल असं. कीर्तीला नेईल असं कुरूसाठी लढणं. कुरूच्या भूमीसाठी!

कुणी माझी फसवणूक केली हे कारण कधीच सांगता येणार नव्हतं! दुर्योधनानं इतक्या वर्षांच्या दीर्घ कालात काय केलं ते मी कुणाला सांगितलं असतं तरी ते पटलं असतं काय? शकुनीमामा, दु:शासन, महाराज धृतराष्ट्र कोणत्याही राजकीय व्यक्तीसाठी उद्याचं महायुद्ध नव्हतंच. ते केवळ आणि केवळ मलाच लढावं लागणार होतं! असेल त्या शस्त्रास्त्रांनिशी! असेल त्या आयुधानिशी! त्यातच माझं 'कर्णपण' होतं! त्यातच माझ्या परंपरेची प्रतिष्ठा होती! कुरूची होती! कुरूच्या भूमीची होती!

ही भूमी! या भूमीसाठी कुणी-कुणी आणि किती महान दिपवणारी बलिदानं केली आहेत! हस्तिनापूरच्या राजसिंहासनाचं रक्षण करण्यासाठी किती नरवीरांनी, बालक-बालिकांनी, स्त्री-पुरुषांनी आपली जीवनकमलं त्या महान यज्ञात सहास्य अर्पण केली आहेत! आसमंतात भ्रमण करणाऱ्या त्यांच्या आत्म्यांशी एकनिष्ठ राहण्यासाठीच मला उद्या लढायचं होतं! अंतर्गत भावनांचं माजलेलं विडंबन मी वेळीच थांबिवलं नाही तर?... नाही तर काय होईल ते मलाही सांगता येणारं नव्हतं!

जीवनभराचा हा अरण्यात वाट चुकलेल्या प्रवाशासारखा संभ्रम आता कुठंतरी थांबवायलाच पाहिजे होता!

तसा तो थांबवून, शांतपणे मनाची बांधणी करून मी निद्राधीन झालो.

# श्रीकृष्ण

# एक

मला माहीत होतं की, युद्ध हे काही कधीच अंतिम सत्य ठरू शकत नाही. युद्धामुळे कधीच समस्या मिटत नाहीत, प्रश्न सुटत नाहीत. उलट युद्धातील विराट विध्वंसनानं मानवजात अश्रद्ध होण्याचाच भयाण धोका असतो. समाज पतनशील होण्याचं भय असतं. राष्ट्राचा सांस्कृतिक पायाच उखडला जाण्याची शक्यता असते. मानवजातीनं पिढ्यान्‌पिढ्या आपल्या उराशी कवटाळलेली रम्य स्वप्नं भग्न होऊ शकतात. जीवनाचा मूलभूत अर्थ शोधताना संभ्रमाची काळी-काळी पुटं तिच्या बुद्धीला घेरू शकतात. तरीही मी कुरूंचं आणि पांडवांचं महायुद्ध पेटविलं होतं! लक्ष-लक्ष योद्धयांचा बली चढविणारा मृत्यूचा महायज्ञ मांडला होता! मनामनांच्या कोंडीत साठलेल्या सुप्त क्रौर्याचा मुक्त विस्फोट करणारा रोमांचक खेळ मांडला होता! कणाकणांतील ज्या चैतन्यामुळे विश्व संचलित होतं त्या तेजस्वी कणकणांचा लोमहर्षण संघर्ष मांडला होता! का? कशासाठी? मी काय एक पाषाणहृदयी वधिक होतो म्हणून? जगात कोणीच जिवंत असू नये, असं मला वाटत होतं म्हणून? क्रौर्याचं, अश्रद्धेचं, अराजकतेचं, स्वैराचाराचं साम्राज्य आर्यावर्तावर यावं म्हणून? मुळीच नाही!

युद्ध पेटविलं होतं मी, हातातील गांडीव धनुष्य टाकून नात्यांच्या प्रेमात संभ्रमित झालेल्या, कंठ सुकलेल्या अर्जुनाला पुन्हा धनुष्य हाती पेलायला प्रवृत्त करून! स्वत: त्याचे घोडे वागविण्यासाठी हाती त्याच्या नंदीघोष रथाचे वेग धरून! युद्धाच्या तिसऱ्या दिवशीच, हाती शस्त्र न धरण्याची प्रतिज्ञा भंगण्याची तमा न बाळगता! का केलं होतं मी हे सर्व? कशासाठी? द्रौपदीच्या अकलंक चारित्र्याची घोर विटंबना करणाऱ्या दुर्योधन-दु:शासन यांना केवळ शासन देण्यासाठी? शकुनीमामांच्या कपटाच्या राजकारणाला कायमचं उखडून काढण्यासाठी? भीष्म-द्रोणांच्या मूक विवशतेला आणि असमर्थनीय तटस्थतेला वाचा फोडण्यासाठी? धृतराष्ट्राच्या अंध डोळ्यांत सत्याचं झणझणीत अंजन घालण्यासाठी? कर्णाच्या मार्गच्युत, पथभ्रष्ट आणि अखंड संभ्रमित जीवनाला स्वर्गाचा सुयोग्य मार्ग दाखविण्यासाठी? नाही! केवळ असाच काही माझा हेतू असता तर माझं कार्य सोपं होतं. विशिष्ट हेतूपुरता विशिष्ट उपाय योजून मी ते पूर्ण केलं असतं. या प्रत्येकाला एकएकटं गाठून निखंदणं काय अशक्य होतं मला? केवळ दोन राजसिंहासनांचाही प्रश्न माझ्यापुढं नव्हता. मग कशासाठी मांडला होता हा थरारक महायज्ञ मी? का?

माझ्यापुढं प्रश्न होता, अखिल मानवजातीचा! प्रश्न होता चिरंतन अशा अंतिम सत्याचा! प्रश्न होता शरीरा-शरीरांचे विविधढंगी आणि अगणित कुंभ धारण करून राहणाऱ्या अमर आत्मतत्त्वाचा!

जगातील अंतिम आणि कधीही न बदलणारं शाश्वत सत्य आहे प्रकाशमय अमर चैतन्य! कुणालाही त्याचा अनुभव आपल्या विलासी रंगमहालात राहून कधीच नाही घेता येणार! केवळ जगायचंच, या शुद्ध लोचट आसक्तीला, पाण्यातील हत्तीला मगर चिकटतो तसं चिकटून त्याचा प्रत्यय कुणालाही कधीही नाही घेता येणार!

त्यासाठी, दिवसामागून रात्र असते तसा जीवनामागून मृत्यू असतो; याचा शरीरातील पेशीपेशींना दाट आणि अमळ परिचय व्हावा लागतो! मन, शरीर, बुद्धी, सर्व निकोप, आत्मनिर्भर व्हावं लागतं. मग सत्य कुणीच दुसऱ्यानं सांगावं लागत नाही, पटवावं लागत नाही. ते आपोआपच शरीरा-शरीरांतूनच प्रकटन पावू लागतं. मुक्ती किंवा सर्वश्रेष्ठ आत्मानुभव ही कधीही भिक्षा मागून मिळणारी वस्तू नव्हे! दुसऱ्यांनी अन्न खाऊन आपली भूक कधीच शमत नाही, दुसऱ्यांनी पाणी प्राशल्यानं आपली तृष्णा कधीच तृप्त होत नाही. अगदी तसंच कुणाच्याही केवळ उपदेशामुळे कुणाचाही कधीच उद्धार होत नाही. होणारही नाही! जिथं-जिथं जीवन असतं तिथं-तिथं प्रकटनाचीही अनावर ओढ असते – मुक्तीची तळमळ असते. बाहेरून ती दिसत नसेल, पण आतून अखंडपणे हेच कार्य चाललेलं असतं. 'जीवन' म्हणजे प्रकटन!

कधी-कधी या प्रकटनाचा प्रलयकारी देखावा मानवजातीपुढं यावा लागतो! कारण ग्रंथ, उपदेश, नीतितत्त्वं यांपलीकडे जाऊन ती आसक्त झालेली असते! खुशालवादी झालेली असते! जगात दृश्य वस्तूंच्या पलीकडे आणखी काही सूक्ष्म जगत् आहे हे पाहायलाही तिला अवसर नसतो! त्या वेळी घटकाभर तिला कुठंतरी थांबवावं हे लागतंच! आणि त्यासाठी युद्धासारखा दुसरा अन्य प्रभावी असा मार्गच असत नाही! मी युद्ध पेटविलं होतं ते यासाठी! केवळ यासाठीच!!

**

# दोन

युद्ध दहा दिवस भयंकरपणे घुमलं होतं! गर्जलं होतं! माझा प्राणप्रिय भक्त असलेल्या अर्जुनाच्या नंदीघोष रथाच्या रथनीडावर बसून त्याच्या गतिमान रथाचे पांढरेशुभ्र घोडे सावरत ते मी मुक्तपणे चतुरंगदलांत भ्रमण करीत पाहिलं होतं. ते पाहताना ज्या पांडवपक्षाचा पाठपुरावा करण्यासाठी सारथी म्हणून का होईना मी कुरुक्षेत्रावर उतरलो होतो; त्या पांडवांच्या विजयाची निश्‍चिती पहिल्या दिवसापासूनच ठामपणे वाटत होती. कारण – कारण अर्जुनासह पाची पांडवांना कृतान्त काळासारखा वाटणारा, असीम विक्रमी, सूर्यपुत्र कर्ण समरांगणात भीष्माचं पतन होईपर्यंत उतरणारच नव्हता! त्याच्यासारखा अखंड साधनेनं शुचिर्भूत, योजनाकुशल, जाळत्या पराक्रमाचा, दिग्विजयी सेनानायक दोन्ही पक्षांत दुसरा कोणीच नव्हता! म्हणूनच शिष्टाईसाठी हस्तिनापुरात गेलो असताना त्याला त्याच्या दिव्य कुलाची स्पष्ट जाणीव देऊन पांडवांकडं परतविण्याचा आटोकाट प्रयत्न मी केला होता, पण महासागरासारख्या त्याच्या निर्धाराला परतविण्यात सुदर्शन धारण करणारे माझे हातही अयशस्वी ठरले होते! माझ्या सत्य कथनामुळे त्याचा थोडा काही तेजोभंग होईल काय म्हणून हस्तिनापुराहून निघताना मी विचार केला. तसं होणं शक्यच नव्हतं. जे भंग पावतं ते तेजच नसतं; हेच त्यानं सिद्ध केलं होतं! उलट आपण सूर्यपुत्र आहोत, हे समजताच त्याची झालेली प्रतिक्रिया सर्वांना दिपविणारी होती. माझी भेट घेऊन परतल्यावर 'मी सूर्यपुत्र आहे! मी सूर्यपुत्र आहे!' असं आनंदानं धुंदपणे गर्जत त्यानं पाच सोनेरी जलकुंभ नुसते कवेतच दामटून टाकले; असं नंतर विदुराकडून मला कळलं होतं! असा हा कर्ण, भीष्माचं पतन होईपर्यंत समरांगणात पायच टाकणार नव्हता! इंद्रानं पूर्वीच त्याची कवच-कुंडलं आपल्या पुत्रासाठी, अर्जुनासाठी म्हणून दानाच्या मिषानं कौशल्यानं त्याच्यापासून हस्तगत केलीच होती. परशुरामांनी, 'तुला ऐन युद्धप्रसंगी ब्रह्मास्त्र स्फुरणार नाही' असा मर्मभेदी शाप त्याला दिला होता. महेंद्रपर्वतावरच्या ब्राह्मणाचे 'तुझ्या रथाचं चक्र भूमीही युद्धात अशीच रुतवून ठेवील!' हे उद्गार कोणीही विसरू शकत नव्हतं. कुंतीदेवीला तर त्यानं चार पुत्रांचं अभय पुत्रकर्तव्यापोटी दिलं होतं! कर्ण! सूर्यपुत्र असून, पहिला पांडव असून, ज्येष्ठ कौंतेय असून माझ्या इतकीच – म्हणजे एका सारथ्याएवढीच त्याची आता पात्रता नव्हती काय??

पण खरोखरच हे असं होतं का?

युद्धाचा अकरावा दिवस उजाडला! गुरू द्रोण कौरवांचं नेतृत्व करण्यासाठी, कुरूंचा त्रिकोणी भगवा राजध्वज पेलून निग्रहानं आमच्यासमोर उभे ठाकले! द्रोण! द्रोण म्हणजे सर्व शस्त्रास्त्रांचा साक्षात चालता बोलता शस्त्रवेद होता! भीष्माच्या दहाव्या दिवशीच्या पतनामुळे रात्रभर विकल झालेली कुरुसेना द्रोणांना सेनापतीच्या वेषात पाहून पुन्हा रणोत्सुक होऊन, आवेशानं चेतून गर्जना करू लागली. कुरुक्षेत्राचा मुक्त आसमंत त्यांच्या गगनभेदी अखंड जयजयकारानं दुमदुमू लागला!

आज पहिल्याप्रथमच द्रोणांच्या नेतृत्वाखाली प्रचंड रथदलाचा प्रमुख

म्हणून कर्ण समरांगणात उतरला होता! लतावेलींनी सुशोभित केलेल्या, तळपत्या शुद्ध सुवर्णानं मंडित अशा आपल्या जैत्ररथावर तो, हिमालयावर कैलासपर्वताचं उत्तुंग शिखर शोभून दिसतं तसा सर्वांत उंच असल्यामुळे शोभिवंत दिसत होता. हत्तीच्या साखळदंडाचं सुचिन्ह असलेल्या त्याच्या रथावरचा काषायवर्णाचा तलम राजध्वज इतका फरफरत होता की, त्या फरफरण्यामुळे त्याला धारण करणारा अणकुचीदार टोकाचा सुवर्णी ध्वजदंड लडलड हलत होता!

सर्वांगावर लोहत्राण परिधान केलेला कर्ण म्हणजे राखेत झाकाळलेल्या तप्त, धगधगीत अंगारासारखाच होता. त्याच्याजवळ कवच-कुंडलं नव्हती; त्याचं जीवन शापदग्ध होतं; तरीही तो अंगारासारखाच दाहक होता! शापदग्ध असला तरी तो साक्षात सूर्यपुत्र होता! कितीही लहान झाला तरी अग्नीचा स्फुल्लिंग सदा स्फुल्लिंगच असतो! मला पूर्ण माहीत होतं की, ताज्या दमाच्या कर्णापुढं अर्जुनाला आणण्यात काहीच सुज्ञपणा ठरला नसता! म्हणूनच शिबिरात भरलेल्या रात्रीच्या बैठकीत कर्णाच्या भयामुळे चिंताक्रांत होऊन पुन:पुन्हा 'त्या सूतपुत्र राधेयाचं काय?' म्हणणाऱ्या युधिष्ठिराला मी पटवून दिलं होतं की, जीवनभराच्या जाळणाऱ्या अवहेलनेनं, ठायी-ठायी झालेल्या मानभंगामुळे पेटलेल्या कर्णाच्या झंझावातापुढं अर्जुन जीर्ण पर्णकुटीसारखा क्षणात धाडकन केव्हाही कोसळून जाईल! त्याला थोपविण्याचं सामर्थ्य एकातच होतं. पर्वतकाय एकट्या भीमात! म्हणूनच प्रथम भीमाला कर्णावर सोडण्याचा निर्णय पांडव शिबिरात सर्वानुमते आम्ही घेतला होता. वचनप्रिय असलेला अमर्षी कर्ण कुंतीदेवीला दिलेल्या वचनाचं कधीच विस्मरण होऊ देणार नव्हता! भीमाला वधणार नव्हता! अर्जुनाशिवाय कुणावरही प्राणांतिक हल्ला करणार नव्हता. दात पडलेला भुजंग आणि नखाग्र छाटलेला सिंह यांसारखाच आता त्याचा विक्रम होता!

भीष्माच्या नेतृत्वाखाली निकराच्या द्वैरथ, द्वंद, संकुल आणि पाषाणफेकीच्या युद्धात पांडवांचे पाच लक्ष योद्धे कामी आले होते. भीम, श्वेत, सात्यकी, अर्जुन, धृष्टद्युम्न, युयुधान यांनी कौरवाचे दहा लक्ष योद्धे यमसदनाला धाडले होते. तरीही कौरवांची सैन्यसंख्या अद्याप अधिक होती. कर्ण आणि द्रोण यांना मुखाशी ठेवून पंधरा लक्षांचा सैनिक महासागर एकसारखा खवळत होता. आमच्या नंदीघोषामागं दहा लक्ष सेना उभी होती.

सूर्योदय झाला तसं, आपल्या खांद्याइतकं उंच आणि विविध आभूषणांनी सुशोभित असं पुष्पमाला व सुवर्णमंडित, नावाप्रमाणंच 'विजय' असलेलं आपलं अवजड धनुष्य रथदलाचा प्रमुख म्हणून कर्णानं खूप उंचावून गरगर फिरविलं. आपला 'हिरण्यगर्भ' नावाचा शुभ्रधवल टपोरा शंख त्यानं आपल्या सतेज कंठाच्या, घोड्यांच्या वेगासारख्या दिसणाऱ्या, टपटपीत, रक्तमय धमन्या फुगवीत कितीतरी मोठ्यानं फुंकला!! कुणाच्याही शंखाचा नव्हता इतका त्याचा नाद गगनभेदी होता. नाकासमोर धावणाऱ्या आपल्या सहस्ररश्मी पित्याला तो शंखनाद ऐकवून जसा काही तो सांगत होता, 'अंधकाराला जाळणाऱ्या तुमच्या किरणशलाकेसारखेच माझे अमोघ असे नाराच, सर्पमुख, सुवर्णपंख, सूची, जिद्म, बस्तिक, गजास्थी, गोमुख, चंद्रपत्ती, गृधपत्र असे विविध बाण आज अर्जुनाला त्याच्या सेनेसह दग्ध करतील! माझ्या राजध्वजावरील हत्तीच्या साखळदंडात त्याच्या ध्वजावरील कपि- वानर मी आज करकचून आवळून टाकीन!' पुन:पुन्हा हिरण्यगर्भाचा, योद्धयांच्या अंगावरील केश ताठ करील असा भेदक

शंखनाद करून त्यानं आपल्या विराट रथदलाला पुढं सरसावण्याची भेदक अशी चेतनामय आरोळी दिली! 'आऽऽरूऽढ! आऽऽक्रऽम!!' त्याचे निळसर डोळे क्रोधामुळे गर्द-गर्द निळे दिसू लागले. सेनापती द्रोण आहेत हे विसरून त्याला अनुसरणाऱ्या हजारो महारथ्यांनी 'अंगराज कर्णऽ जयतु! जयतु! जयतु!!' असा त्याच्या नावाचाच अविरत कल्लोळ माजविला.

वणव्यात पेटलेल्या निषाध पर्वतासारखा दिसणारा तो पहिला पांडव पाहताना सूर्यच दुसरं रूप धारण करून पांढऱ्या घोडयाच्या वेगवान रथावर आरूढ झाला आहे की काय; असा भास प्रत्येक पांडवयोद्धयालाच काय; पण मलाही क्षणैक झाला!! पर्वकालातील महासागरासारखा, पुन:पुन्हा आपलं विजयधनुष्य उंचावून तो गर्जत होता. नदीच्या डोहात शिरणारा विशालकाय मगर सरासर पाणी कापत पुढं धावतो तसा तो क्षणातच पांडवसैन्यात बाणासारखा घुसला! त्याचे क्रुद्ध डोळे एकसारखे अर्जुनाच्या रथावरच्या ध्वजाचाच वेध घेत होते, पण – पण अर्जुनाला वेढत माझ्या संकेतानुसार पुन:पुन्हा भीमच त्याला सामोरा जाऊ लागला! मी कौशल्यानं अर्जुनाचा नंदीघोष क्षणार्धातच कर्णापुढं न येऊ देता द्रोणापुढं आणला!

केवळ एका रथात बसून, गरगर भ्रमण करीत दिग्विजयात समग्र आर्यावर्त पादाक्रांत करणारा, दान, साधना, धैर्य, शुचिता यांनी तप्त लोखंडासारखा दिसणारा तो पहिला कौंतेय आणि बकासुर, हिडिंब, किरमिर, जरासंध, यांसारख्या धिप्पाडांना वधणारा बलाढ्य मल्ल भीम एकमेकांसमोर उभे ठाकले!

दोन मत्त वनगजांसारखे ते एकमेकांवर तुटून पडण्यापूर्वी क्षणकाल थांबून परस्परांचा मर्मवेध घेऊ लागले. क्षणातच त्यांच्या चित्तथरारक, लोमहर्षण संघर्षाला सुरुवात झाली. बाणांवर बाण टक्करले! क्रुद्ध भुंजगांसारखे उष्ण नि:श्वास टाकत बाणफेकीनं त्यांनी पळात सगळं अवकाश झाकाळून टाकलं. मृगातल्या अविरोध पर्जन्यासारख्या बाणांच्या एकलग सरींवर सरी कर्णाच्या धनुष्यातून सुटून भीमाच्या पथकात लढणाऱ्या विराट, मत्स्य, पांचाल यांना संत्रस्त करू लागल्या. माथ्यावरच्या सूर्यानं वाळवंटातील वाळूचा कणन्कण सडकून तापवावा, तसे त्याचे दाहक अग्निबाण पांडवसैन्याला पोळून काढू लागले. त्याच्या बाणांनी वेढला जाणारा भीम इतका अस्वस्थ झाला की, त्यानं हातातील धनुष्य टाकून प्रथम मैरेयक मद्याचे कुंभच्या कुंभ पोटात रिचवून घेऊन आपल्या रक्ताचा बिंदून्बिंदू फुलवून घेतला! गुंजेसारखे लालेलाल डोळे गरगर फिरवीत तो आवेशानं अशा चेतनेत कर्णावर तुटून पडला की, त्यानं सतत आठ वेळा त्याच्या 'विजय' धनुष्याची बळकट प्रत्यंचा तडातड तोडून टाकली. पाच वेळा त्याचे रथ उद्ध्वस्त करून त्याला विरथ केला. सारथी सत्यसेनाला घायाळ केला. सत्यसेन रथनीडावरून कोसळताच कर्णानं हातातील धनुष्य फेकून दिलं. सत्यसेनाचं थरथरणारं मस्तक मांडीवर घेऊन तो त्याला सावरू लागला. 'सत्यसेनऽऽ सत्यसेन' म्हणत त्याची मूर्च्छा घालवू लागला. एवढ्यात क्रुद्ध भीमानं सरळ आपल्या रथातून त्याच्या रथावरच उडी घेऊन त्याच्या भक्कम रथाचं चूर्ण-चूर्ण केलं.

सत्यसेन पडला; तरीही कर्ण अतिशय सौम्यपणे लढत होता! मातेला दिलेल्या वचनाला जागत होता! भीमाचे त्वेषाचे आघात नुसतेच थोपवीत होता! पण मैरेयक मद्य अंगी भिनलेला भीम समुद्रवाऱ्यासारखा अनावर होताच कर्णानं आपले गर्द निळे डोळे क्रोधाने विस्फारले! वैशाखाच्या पेटणाऱ्या रणरणीत उन्हासारखा मिळेल त्याला जाळत

तो भीमावर असा तुटून पडला की, क्षणातच गंगेचं विशाल पात्र दाट धुक्यानं झाकाळून टाकावं, तसा विशालकाय भीम त्यानं आपल्या अमोघ बाणांच्या संतत वर्षावात क्षणात पार झाकाळून टाकला! शरीरात जागजागी मर्मभेदी बाण घुसलेला भीम, डेरेदार, शाखाश्रीमंत शालवृक्ष उन्मळून पडावा तसा रथातून धाडकन खाली कोसळला! धरती हादरली! वायुपुत्र भीम मूर्च्छित झाला! झोपतानासुद्धा धरतीला कधी पाठ न देणारा अजिंक्य मल्लयोद्धा भीम उताणा झाला!

डोळ्यांतून विजयानंदाच्या ठिणग्याच ठिणग्या वर्षवत आपल्या रथातून सरळ खाली उडी घेऊन कर्ण वायुगतीनं त्याच्या मूर्च्छित देहाकडे धावला! त्याला रोधण्याचं सामर्थ्य कुणातही नव्हतं!

काही क्षणातच सावध होऊन रक्तवर्णी नेत्रांची किलकिलत उघडझाप करीत उठणाऱ्या भीमाच्या कंठात आपल्या विख्यात विजय धनुष्याच्या प्रत्यंचेचा विळखा, कंठबंधासारखा घालून त्यानं त्याला गदागदा हलवीत, 'सूतपुत्र', म्हणून भीमानं आखाड्यात सर्वांत प्रथम निर्दयपणे हेटाळलेला तो सूर्यपुत्र उपहासानं म्हणाला; कितीतरी मोठ्यानं –, "अरे, अमाप खादाडा! हातात आसूड घेऊन आज तुझ्या माजलेल्या पाठीचा कातडी लोंबेपर्यंत, सारथी म्हणून खरारा करू काय? जा, माझ्यासमोरून चालता हो! जिथं पंचपक्कात्रांचे हंडे उतरले असतील त्या पाकगृहात जाऊन आपल्या चंचल जिभेचे चोज पुरव! विराटांच्या बल्लव आचाऱ्या! तेच तुझं योग्य स्थान आहे! सूतपुत्राच्याही पात्रतेचा नाहीस तू! पुन्हा कधीच या कर्णासमोर येण्याचं धाडस करू नकोस! जा! चालता हो!!"

लज्जित भीम मान खाली टाकून जिवाचं दान त्या विख्यात दानवीराकडून घेत माघारी फिरला! आज पहिल्यानंच भीमाचं संपूर्ण गर्वहरण होत होतं!

भीमानं वधलेल्या दुर्मुख, दुर्जय, विकर्ण या दुर्योधनबंधूंची प्रेतं कुरूंनी कशीतरी रणक्षेत्राबाहेर काढली! विकर्णाला मारताना भीमाच्या डोळ्यांसमोर द्यूतानंतरचा वस्त्रहरणाचा प्रसंग उभा राहिला. रथातून खाली उतरून त्यानं मुकुट काढून घेत विकर्णाच्या मृतदेहाला वंदन केलं. कर्णाच्या विराट विक्रमाची धास्ती घेतलेला युधिष्ठिर सरळ-सरळ युद्धसमाप्तीची – समेटाची भाषा बोलत होता. भीमाचा अहंभाव हरण करून अकरावा दिवस मावळत होता. शिबिरात युधिष्ठिराला मात्र झोप येत नव्हती! बाराव्या दिवशी, सैन्यरचनेत कुशल असलेल्या राजनिष्ठ द्रोणांनी शंखाच्या आकाराची सैन्यरचना करून पहिल्या प्रहरापर्यंतच चेकितान, दृढसेन, पुरुजित, ध्वजकेतू, वीरकेतू, वृक, शंख, मणिमान, सुचित्र, अंशुमत आणि विख्यात द्रुपदराजाला कंठस्नान घातलं! तसं काही काळ युद्ध थांबलं! पाचही पांडव आपल्या श्वशुराच्या कलेवराभोवती एकवटले. सगळेच शोकमग्न झाले. मी सर्वांना सावरलं, पण शिष्य प्रेमापोटी अर्जुनाशी मात्र द्रोण सौम्य युद्ध खेळत होते. निष्ठा डळमळत होती! शेवटी प्रेम हे दुबळंच असतं!

अचल, उग्रमन्यू, दीर्घायू, वष्ट, सौश्रुती हे विख्यात रथी अर्जुनानं कोसळविले. सात्यकीनं अश्वत्थामा, दु:शासन, शकुनी यांना संत्रस्त करून टाकलं. दोन-दोन प्रचंड पाषाण एकमेकांवर आदळताच त्यावर रांगणाऱ्या कितीतरी असंख्य मुंग्याच्या पंक्ती चेंगरूनच ठार होतात तसे प्रत्येक पथकातील किती-किती सैनिक कामी आले ह्याची गणती करणं अशक्य झालं! युद्धाच्या कल्लोळात हत्ती, घोडे, रथ यांखाली सापडून प्राणांतिक किंकाळ्या फोडत अनेकांनी देह टाकले! युद्धभूमीवर तुटलेल्या सोंडा, हात,

पाय आणि मुकुटमंडित मस्तकं यांचा खचच खच पडला होता.

क्रुद्ध सिंहासारखा खवळलेला कर्ण चतुरंगदलात अर्जुनाला गाठण्यासाठी विमुक्तपणे गरगर फिरत होता, पण अर्जुनाच्या रथाचे वेग माझ्या हाती होते! कर्णाच्या रथावरील साखळदंडाच्या ध्वजाकडे एकटक बारीक लक्ष ठेवून मी शक्यतो अर्जुनाला त्याच्या विरुद्ध दिशेला नेत होतो! त्याचा कोंदटलेला पराक्रम किती दग्ध करणारा होता, हे भीमाला त्यानं दिलेल्या जीवनदानावरून कोणालाही समजलं असतं! अर्जुन कुठंच दिसत नाही हे पाहून अधिकच खवळलेला कर्ण, युधिष्ठिर, नकुल, सहदेव यांना पुन:पुन्हा गाठून विरथ करून त्यांच्या कंठात आपलं धनुष्य अडकवून क्रुद्ध नेत्रांनी अग्नीचा वर्षाव करीत त्यांना संतापून विचारीत होता – ''सांगा, माझ्या सुदामन आणि शोणाला डंख करणारा तो निळा सर्प कुठं आहे?'' काही न बोलता ते विरथ पांडव आपल्या पराजयाचं शल्य पचवीत क्षणभरही त्याच्यापुढं न थांबता लज्जित होऊन सरळ धावत होते!

राजमातेच्या वचनात सापडलेला तो सूर्यपुत्र अगतिकतेनं उष्ण नि:श्वास टाकत पांचाल, विराट, मत्स्य, राक्षस यांची पथकंच्या पथक कापणीच्या हंगामात एखाद्या कृषिवरानं उभ्या पिकाची कणसं तोडावीत तशी कापत चोहोकडे विजेसारखा मन मानेल तसा तळपत होता. एकदा तर त्यानं युधिष्ठिराला मूर्च्छित करून सरळ त्याचा रथ उचलून दूर फेकून दिला! सैनिक-योद्धयांनी त्याला समरांगणाबाहेर नेऊन शुद्धीवर आणला. कर्ण म्हणजे धुमसणाऱ्या ज्वालामुखीचा अग्निरस ओतणारा प्रलयकारी विस्फोट होता! गर्जणारा प्रभंजन होता! कुणीही त्याच्यासमोर क्षणभरही टिकाव धरू शकत नव्हतं. गरगरणारा बारावा दिवसही संपला! प्रत्येक दिवशी युद्धभूमीवर इतक्या प्रेतांचा खच पडत होता की, रोज समरांगण बदलावं लागत होतं!

अजून एकही पांडव युद्धात पडत नाही हे पाहून त्या दिवशी रात्री, नात्याची सर्व बंधनं झुगारून देऊन दुर्योधन सेनापती द्रोणांवर कठोर शब्दांत उखडला, ''बारा दिवसांत बारा लक्ष कुरुसेना कामी आली तरी एकही पांडव मात्र गतप्राण होत नाही! माझे चोवीस बंधू भीमानं नष्ट केले तरी एकही पांडव नष्ट होत नाही! हे युद्ध आहे की, दिग्विजयी सेनेनं आनंदाप्रीत्यर्थ मांडलेलं भोजन? गुरू द्रोण, पांडवांना कंठस्नान घालण्यासाठी तुमचं धनुष्य असमर्थ असेल तर तुमच्या राजरथावरचा राजध्वज उद्या कर्णाच्या हाती द्या!'' त्याचा प्रत्येक शब्दन्शब्द द्रोणाचं हृदय अवहेलनेनं फोडीत होता! ज्यानं आपली शस्त्रविद्या अहोरात्र कष्ट करून जीवनभर कुरू-पांडवांना निष्ठेनं शिकविली त्या त्यांच्या शिष्यगणांपैकी कुणीही त्यांच्या भावनांची आज क्षिती करीत नव्हता! त्यांना आपला अंगठा तोडून देणारा, कटीभोवती राकट वल्कलं बांधणारा, निषाध पर्वताच्या घनदाट रांगेत वणवण फिरणारा, काळ्या शरीराचा, पण धवल अंत:करणाचा एकलव्यच क्रूर काळानं गुरू द्रोणांचा एकमेव निष्ठावान शिष्य ठरविला होता! सामाजिक संकेतापेक्षा त्याग आणि निष्ठा ही केव्हाही श्रेष्ठ असते.

सर्वांच्या प्रेमाला आपल्या विशाल भात्याच्या पोकळीत कोंबून गुरू द्रोण निर्धारानं उभे ठाकले. शुभ्र दाढी क्षणकाल थरथरली!

''माझ्या पराक्रमाची विवेकशून्य शंका घेणाऱ्या दुर्योधनाला उद्याच मी दाखवून देईन की, एक ना एक सर्वश्रेष्ठ पांडवाचं चक्रव्यूहात पडलेलं कलेवर पाहिल्याशिवाय उद्याचा सूर्य मावळणारच नाही!'' तरातरा चालत ते बैठकीतून निघूनही गेले!

**

# तीन

आमच्या गुप्तदूतानं बैठकीतला सर्व वृत्तान्त ऐकला तसा येऊन आमच्यासमोर निवेदन केला. अर्जुनासह सर्व जण पुन्हा चिंताक्रांत झाले. चक्रव्यूह! भेदनाला सर्वांत किचकट सैन्यरचना! कुणाला द्यायचं उद्याचं सेनापतीपद? कोण भेदणार चक्रव्यूह? सचिंत पांडवांना काय-काय सुचतं ते स्तब्ध राहून मी अर्धा घटका नुसतं ऐकलं! सर्व जण भीमाला पुढं घालण्याचीच योजना बोलत होते. कितीही पराक्रमी असला तरी भीम चक्रव्यूहाचा भेद कधीच करू शकणार नव्हता! त्याला चक्रव्यूह भेदनासाठी धाडणं म्हणजे त्याला गमावणं होतं. त्याच्याशिवाय पांडवांना संरक्षणासाठी ढाल दुसरी कुठली होती?

मी एका सेवकाकडून अभिमन्यूला बोलावून घेतलं. बैठकीच्या शिबिरात येताच त्याला मी म्हटलं, "अभिऽ!" नेहमीसारखं अभिमन्यू न म्हणता 'अभि' म्हणताच शब्दातील जिव्हाळा त्या अर्जुनपुत्रानं तत्काळ अचूक जाणला! त्याच्या धारदार नाकाखालच्या दीर्घ ओठांमागचे उल्कांसारखे धवल दात क्षणभर चमकले. झटकन पुढं होत विनयानं मला वंदन करीत तो संयत स्वरात म्हणाला, "आज्ञा मामाऽ"

त्याचा विनय आणि समज पाहून, यादव आणि पांडव यांच्या रक्ताची एकमेव लसलसती खूण असलेल्या, एका वर्षापूर्वीच विवाहित झालेल्या त्या सोळा-सतरा वर्षांच्या युवकाला उद्या पणाला लावावा लागणार म्हणून क्षणभर मीही संभ्रमित झालो! काही क्षण काहीच बोलवेना.

सर्वांची स्तब्धता पाहून तोच म्हणाला, "आपण सर्वच असे स्तब्ध का? चिंताक्रांत का?"

"उद्या गुरू द्रोण चक्रव्यूहाची अवघड सैन्यरचना करणार आहेत. ती फोडण्याचं कार्य – " मला त्याला काहीच स्पष्ट सांगता येईना! त्याच्या गर्भवती पत्नीचं – उत्तरेचं विमल मुख डोळ्यांआड करता येईना.

"ते कार्य माझ्यावर पडणार असेल तर माझं ते सौभाग्य आहे! आपले सर्वांचे आशीर्वाद असतील तर ते मी आनंदानं स्वीकारीन!" सर्वांना श्रद्धेनं अभिवादन करून, ज्येष्ठ आणि वडीलधाऱ्यांत बसण्याची संस्कारहीनता माहीत नसलेला तो सुभद्रापुत्र, यमुनेवरून परतणाऱ्या घोड्यांच्या शांत चालीनं शिबिराबाहेर पडलाही. सर्वांची मनं हेलावली. युद्धभूमीवर त्याच्याएवढ्या कोवळ्या वयाचा कोणताही योद्धा नव्हता!

वद्य चतुर्दशीचा दिवस उजाडला. युद्धातील तेरावा दिवस होता तो. गुरू द्रोणांनी चक्रव्यूहाची रचना पहाटेच्या पहिल्या प्रहरापासूनच, सैनिक शिबिराबाहेर काढून शुक्राच्या अंधूक प्रकाशात मांडली होती! मुखावर ते स्वत: उभे होते. गुहेच्या द्वारावरच्या सिंहासारखे!

दुसरा अर्जुनच वाटणाऱ्या अभिमन्यूनं पांडवसेनेचं नेतृत्व करीत शंख फुंकून रणघोष दिला, 'आऽऽरोऽह! आऽऽचलं!' भीम, नकुल, सहदेव, युयुधान त्याला संरक्षण देत त्याच्यामागून पुढं सरसावले.

पलांडूवरचे पापुद्रे उचकटावेत तशी सेनेची एकामागून एक कडी फोडत अभिमन्यू कौरवसेनेत शिरला. द्रोण, शकुनी, दु:शासन, जयद्रथ, कृतवर्मा, कृप, अश्वत्थामा, दुर्योधन सर्वांना घायाळ करीत तो सेनेची मंडलांमागून मंडलं फोडत, वारुळात भुजंग घुसावा तसा कुरुसेनेत घुसला! क्षणाक्षणाला मागं राहिलेल्या भीमात आणि त्याच्यात अधिक-अधिक अंतर पडत चाललं! पण बाहू स्फुरण पावलेला, फुललेला, स्वत:ला विसरलेला वीरश्रीमत्त अभिमन्यू मागं वळूनही न पाहता चक्रव्यूहाच्या केंद्रबिंदूकडे बाणासारखा चालला! हजारो रथी, गजाती, अश्वसाद यांना कंठस्नान घालीत तो एकटाच सात मंडलं भेदून केंद्रस्थानाच्या आठव्या मंडलातही घुसला! त्याच्या आवतीभोवती नुसते लक्ष-लक्ष कुरुसैनिक होते! तरीही एकाकी लढत त्यानं शत्रुंजय, तक्षक, सत्यश्रवस, चंद्रकेतू, जयत्सेन आणि मेघवेग यांसारखे अतिरथी धरतीवर धडाधड कोसळविले!!

संध्याकालचा प्रहर आला तरी अभिमन्यू काही हटत नाही हे पाहून बारा दिवसांत कधी लागला नसेल असा घोर काळिमा युद्धाला लागला! केंद्रस्थानावर एकाकी सापडलेल्या त्या सुभद्रापुत्रावर द्रोण, कृप, कृतवर्मा, अश्वत्थामा, बृहद्बल आणि कर्ण हे सहा महारथी एकाच वेळी चालून गेले! त्यांत कर्णही होता! जीवनभरचा संभ्रम आता त्याला कुठंही खेचून नेऊ शकत होता! त्या सर्वांनाही अभिमन्यू शरण गेला नाही. शेवटी दुर्योधनपुत्र लक्ष्मण आणि त्याचं घनघोर गदायुद्ध चक्रव्यूहाच्या नेमक्या केंद्रबिंदूच्या स्थानी जुंपलं! एकमेकांवर एकाच वेळी मर्मभेदी प्रहार करून दोघेही पाठोपाठ मूर्च्छित झाले.

प्रथम लक्ष्मण सावध झाला, त्यानं कसलाही विचार न करता आपल्या गदेचा एक मर्मभेदी क्रूर प्रहार निश्चेष्ट, मूर्च्छित अभिमन्यूच्या मस्तकावर उतरविला!! रक्तवर्णी कमल पुष्पांसारखं दिसणारं त्याचं मुख छिन्नविच्छिन्न झालं! मृत्यूपूर्वी जाणिवेची एक अस्फुट तार त्याच्या मुखातून छेडली गेली, “काऽऽका भीम काऽ...का!” ती ऐकताच सर्वांची खंबीर मनंही क्षणभर पाझरली, पण एकटा जयद्रथ दैत्यासारखा पुढं झाला नि तो खरोखरच मृत झाला आहे की नाही, याची खात्री करून घेण्यासाठी, धरतीकडे मुख करून पडलेल्या अभिमन्यूचं निश्चेष्ट कलेवर त्यानं तसंच उलटं करण्यासाठी उन्मत्तपणे लाथेनं ढकललं! लक्ष्मणाच्या गदेच्या सखोल प्रहारानं अर्धअधिक धरतीत रुतलेलं त्याचं छिन्नभिन्न मस्तक तसंच धरतीत राहिलं! नुसतं धडच उलटं झालं! त्या विक्रमी अर्जुनपुत्राला आपलं तेजस्वी मुखकमल कोणत्याही कौरवयोद्धयाच्या दृष्टीलासुद्धा पडू नये, असं वाटत होतं म्हणूनच त्यानं ते सर्वोदार धरतीत लपविलं होतं! चक्रव्यूहाच्या अचूक केंद्रबिंदूवर त्याचं विच्छिन्न कलेवर तसंच पडलं होतं!

जयद्रथाच्या क्रौर्याचा वृत्तान्त अर्जुनाला कळताच त्यानं आपले विशाल नेत्र विस्फारून गांडीव धनुष्य उंचावीत घोर प्रतिज्ञा केली, “माझ्या प्रिय पुत्राच्या कलेवरावर लत्तेचा प्रहार करणाऱ्या संस्कृतिहीन, रानटी जयद्रथाला उद्या सूर्यास्तापूर्वीच कंठस्नान घालीन. नाहीतर स्वत: अग्निप्रवेश करून माझं पितृछत्र स्वर्गात अभिमन्यूवर धरीन!”

अभिमन्यूच्या प्रेताभोवती स्फुंदत प्रदक्षिणा घालणाऱ्या पार्थाला पाहतच तेरावा दिवस पश्चिमेच्या रंगकक्षात घोड्यांचे वेग आखडत निघून गेला! या तेरा

दिवसांत कुरुक्षेत्राच्या तेरा विशाल पटांगणांची समरभूमी झाली होती! प्रेतांचा खच पडला होता. मूळ समरांगण आता कितीतरी मागं पडलं होतं!

रात्री शिबिरात कुणालाही न घेता मी एका राजज्योतिष्याला बोलावून घेतलं. भूर्जपत्रावर अंक मांडून, बोटं घालीत तो गणित करू लागला. मध्यरात्रीला त्यानं आपली मान वर उंचावली. कानांवर ओघळणारी कानटोपी सावरीत तो म्हणाला, ''यादवराज, आहे! उद्याच्या अमावास्येला खग्रास सूर्यग्रहण आहे! तिसऱ्या प्रहरानंतर!'' मी माझ्या कंठातील मौक्तिकांची माला त्याच्या अंगावर फेकीत त्याला हस्तिनापुरात त्याच पावली परतण्याची सूचना केली! वंदन करून घनदाट अंधारात तो अदृश्य झाला.

युद्धाचा चौदावा दिवस उगवला! तिसऱ्या प्रहरापर्यंत अर्जुनाचा नंदीघोष मी कुरूंच्या पथका-पथकातून फिरवून आणला, पण जयद्रथ कुठंच दिसत नव्हता! दिसणारही नव्हता. कुरूंनी त्याला समरांगणात आणलाच नव्हता! सहस्र योद्धयांनी रक्षण दिलेल्या एका भक्कम शिबिरात तो तळावरच बसला होता! जयद्रथ सापडत नाही हे पाहून भडकलेला, विवश अर्जुन नियुतायु, मित्रदेव, दंडधार यांना कोसळवीत पथकामागून पथकं हत करीत 'जयद्रथ दाखवा! जयद्रथ दाखवा!' म्हणत विजेसारखा समरांगणभर तळपला. युद्धमग्न असलेल्या सैनिकांना एकाएकी तिसऱ्या प्रहरानंतरच आकाश कसं काय झाकाळून आलं ते समजलंही नाही!

काही पळांतच सूर्य संपूर्ण ग्रासला गेला. सगळीकडे धूसर अंधार पसरला. तसे कलकलणाऱ्या पक्षयांचे थवे घरट्यांकडे परतले. रातरकिडे कर्कशपणे करकरू लागले. कुरुक्षेत्राचा आसमंत शेकडो पलित्यांनी उजळला गेला! सर्वांना वाटलं दिवस ढळला!

प्रतिज्ञाभंग झालेल्या अर्जुनासाठी पांडवसेनेकडून चिता रचण्यात आली. सर्वांना ती स्पष्ट दिसावी म्हणून कुरूंच्या आणि पांडवांच्या शिबिरांच्या मध्ये मोकळी असलेली प्रशस्त जागा त्यासाठी निवडण्यात आली! भ्रांतचित्त, लज्जित अर्जुनानं मला, युधिष्ठिराला, भीमाला आणि आपल्या वृद्ध मातेला अश्रुपूर्ण नेत्रांनी वंदन केलं आणि आज आपल्याबरोबरच आपल्या गांडीव धनुष्याचा पराक्रमही संपला म्हणून ते भात्यासह शरीरावर तसंच ठेवून तो त्या आठ हात उंचीच्या भव्य चितेवर अवमानित नतमस्तक होत अग्निप्रवेशासाठी चढला! हात जोडून त्यानं नेत्र मिटले 'ॐ भूर्भुवःस्वः तत्सवितुऽऽ ॐ... ' सवितृचा धैर्यपूर्ण मंत्र पुटपुटत तो मृत्यूला सन्मुख झाला! एका सेवकानं थरथरत्या हातानं चितेला पलित्याची ज्योत भिडवली. मी आवतीभोवती कुठं जयद्रथ दिसतो का ते पाहतच होतो. उत्तरीयाचा शेव, स्त्रिया घेतात तसा मुखाभोवती लपेटून घेऊन तो दुर्योधनामागं येऊन गुपचूप अर्जुनाचा अग्निप्रवेश पाहून आपल्या क्रूर डोळ्यांची आग शांत करण्यासाठी आला होता!

एकदम सूर्यग्रहणाचे वेध सुटले! फुटलेल्या घड्यातून पाण्याची एक-एक सर बाहेर पडते तशी किरणांची एकेक सलग शलाका बाहेर पडली! समरांगणावरच्या पलित्यांना हसत-हसत पश्चिम क्षितिजावर सूर्यदेव पूर्ववत् उभे ठाकले! पक्षी कलकलत, पुन्हा घरटी सोडून चरायला रानात निघून गेले! रातरकिड्यांची कर्कश करकर एकाएकी थांबली!

''पार्था, तो पहा सूर्य आणि तो पहा जयद्रथ!'' मी उजव्या हाताची तर्जनी सूर्याकडे आणि डाव्या हाताची जयद्रथाकडे उंचावीत तो लपलेली जागा त्याला अचूक

दाखविली. माझ्या डाव्या बोटाचं अग्र अचूक पकडत, आवाजाचाही लक्षयभेद करण्यात पारंगत असलेल्या अर्जुनानं, हातात पेललेल्या गांडीवावरचा जिद्म बाण क्षणार्धातच असा फेकला की, अनेक नागमोडी वळणांमागून वळणं घेत, मधल्या सर्वांना सरासर चुकवीत तो अचूक जयद्रथाचाच कंठनाल भेदून गेला! काय आणि कसं घडलं ते प्रत्यक्ष अर्जुनालाही कळलं नाही!!

अर्जुनासाठी रचलेल्या त्या भव्य चितेवर कुरुसैनिकांनी चढविलेलं जयद्रथाचं प्रेत जळत असलेलं पाहतच चौदावा दिवस सूर्यग्रहणाची हूल देऊन मावळत होता! आता युद्धात काय होईल कुणालाही सांगवत नव्हतं!

संतप्त दुर्योधनानं तत्काळ आपल्या शिबिरात सर्व पथकप्रमुखांना बोलावून घेतलं. क्षणापूर्वीच घडलेल्या चित्तथरारक नाट्यमय घटनेनं सर्वच भांबावले होते. त्यांच्या परामर्शाच्या बैठकीत कधी नव्हती एवढी फुटीरता, उद्वेगजन्यता प्रथमच जन्माला आली. पांडवांच्या दृष्टीनं मला हवं तेच घडत होतं!

अर्जुनानं वधलेल्या आपल्या भगिनीच्या सौभाग्यासाठी हळहळणाऱ्या दुर्योधनाला धैर्य देण्यासाठी कर्ण म्हणाला, ‘‘युवराजा, कार्तिकेयानं इंद्राला मिळवून दिला तसा विजय मी तुला मिळवून देईन. इंद्रानं दिलेली अमोघ वैजयंतीशक्ती अर्जुनावर फेकून पांडवांच्या सामर्थ्याचं मूळ मी निखंदून टाकीन. ’’

कृपाचार्यांना कर्णाची ती कल्पना हास्यास्पद वाटली. ताडकन उठून ते म्हणाले, ‘‘सूतपुत्रा, तुझा सर्व जन्म केवळ गगनभेदी प्रतिज्ञा आणि वल्गना करण्यातच गेला आहे! त्यांतील एक तरी पूर्ण करणं तुला कधीतरी शक्य झालं आहे काय? चित्रसेन गंधर्वाबरोबरच्या युद्धात, विराट नगरातील गोहरणाच्या युद्धात, भीमाबरोबरच्या द्वैरथ युद्धात तू सदैव पलायनच केलं आहेस! पलायन हाच तुझा जन्मभराचा धर्म आहे! किरात रूपातल्या शंकराला जिंकणाऱ्या, अमित सामर्थ्यवान आणि श्रीकृष्णासारखा पाठीराखा असणाऱ्या अर्जुनाला जिंकण्याचं सामर्थ्य कुणातही नाही!’’

कृपाचार्यांचा तो मर्मभेदी आघात ऐकताच भरल्या बैठकीतच कर्ण त्यांच्यावर खड्ग उपसून धावला. ‘‘पदोपदी माझा भेदक अवमान करू पाहणाऱ्या विप्रा, आज तुझी उच्छृंखल जीभच शाकटून टाकतो!’’ म्हणत त्यानं आपलं खड्ग सरळ त्यांच्या कंठावर धरलंही. दुर्योधनानं मध्यस्थी करून ते मागं घ्यायला लावलं. त्या घटनेनं एक घडू नये ते सत्य मात्र साकारलं.

आपल्या मामाचा – कृपाचार्यांचा तो योद्धयांच्या भर बैठकीतला अवमान, मानी अश्वत्थामा कसा काय सहन करू शकणार? त्यानंही आपलं खड्ग उपसलं! कर्णावर!! आपल्या प्राणप्रिय मित्रावर! ‘‘माझ्या मातुलाचा घोर अपमान करणाऱ्या बढाईखोर कर्णा, अर्जुनाच्या अगोदर तुझाच कंठनाल छेदला पाहिजे. ’’ म्हणत तो कर्णावर सरळ-सरळ धावला! जीवनभर मन, बुद्धी, आत्मा या जीवनाच्या सखोल अंगांचा विचार करणारे ते एकमेकांचे प्राणप्रिय सखे होते हे त्या बैठकीत कुणालाही सत्य वाटलं नसतं! पटलं नसतं! म्हणूनच सत्य हे कधी-कधी कल्पनेपेक्षा भयानक असतं! दुर्योधनानं कौशल्यानं अश्वत्थाम्यालाही शांत केलं, पण नेहमी शांत असणारा माणूस जेव्हा-केव्हा एकदा खवळतो तेव्हा त्याचा संताप त्याच्याच मर्यादेबाहेर जातो! अध्यात्मवाद्याचा तर जातोच जातो!

‘‘या सूतपुत्राचं पुनश्च तोंडही पाहणार नाही!’’ असं निर्धारानं बैठकीतल्या

सर्वांना निक्षून सांगून तो गुरुपुत्र अश्वत्थामा तरातरा चालत शिबिराबाहेर निघूनही गेला! महानदीकाठचं स्नेहमंदिर उद्ध्वस्त झालं! जिवापाड स्नेह करणाऱ्या अश्वत्थाम्यानं आज आपला अज्ञानानं – सूतपुत्र म्हणूनच निर्देश करावा, या असह्य दु:खानं कर्णानं मान खाली घातली!

जयद्रथाच्या आकस्मिक वधानं द्रोण, कृप, कर्ण अश्वत्थामा सर्वच खवळले होते. कधी नव्हती ती आता रात्रीच्या युद्धाला सुरुवात झाली! शेकडो पेटत्या पलित्यांच्या टळटळीत प्रकाशात गुरू द्रोण शिबी राजावर चालून गेले. सोमदत्त सात्यकीवर धावला. पुन्हा घनघोर संग्रामाला सुरुवात झाली. रात्रीच्या वेळी उंच पर्वतावरचं वेळूचं बेट पेटताच तडातड वेळू फुटावेत तसे गर्जत शस्त्रांचे खणखणाट दृषद्वतीच्या पात्राला भिववू लागले. शिबी, बाल्हिक यांना कंठस्नान घालीत गुरू द्रोण पांडवसैन्याची धूळदाण करू लागले. पाची पांडवांनी एकाच वेळी चोहोकडून घेरलेला कर्ण सर्वांना आपल्या बाणांच्या सरीत झाकाळू लागला. त्यानं पिटाळलेला पराभूत युधिष्ठिर द्रोणासमोर उभा ठाकला! नकुल शकुनीला सामोरा गेला. प्रथमच अर्जुन-कर्णाची गाठ पडली!

रात्रीयुद्धाचा सराव असलेला कर्ण अर्जुनाला पुन:पुन्हा विद्ध करू लागला. तापत्या रसरशीत लोखंडाच्या रसाचा एक महानदच त्याच्या रूपानं पांडवसैन्यात पाहिजे तिकडे मुक्तपणे फिरू लागला! आता त्याला मागं खेचणारे कसलेच बंध उरले नव्हते! केकय, पांचाल, महारथ यांची पथकांमागून पथकं तुडवीत त्याचा वायुजित नावासारखाच स्वैर भ्रमण करू लागला. क्रुद्ध सिंहानं गर्जना करीत मृगांचे कळपच्या कळप उधळून लावावेत तसा तो अमित सामर्थ्यवान कर्ण पांडवसेनेतील सहस्र-सहस्र योद्धयांना रणांगणातून पलायन करणं भाग पाडू लागला. झंझावाती प्रभंजनानं महासागर घुसळून काढावा तसा त्यानं समोर दिसेल तो सेनाविभाग घुसळून काढला! आपला पिता – सूर्य आकाशात आता नाही हे जाणून त्याचं कुरुक्षेत्राला पोळण्याचं कार्य पुत्र म्हणून रात्रीच्या वेळी तोच निष्ठेनं करू लागला! सात्यकी, धृष्टद्युम्न, युयुधान, भीम, युधिष्ठिर, नकुल-सहदेव, अर्जुन कोणीही – त्या तेजाच्या महानदीच्या महापुरात कुणीच टिकाव धरू शकत नव्हतं! सकाळपर्यंत 'हा राधेय आमची थोडीतरी सेना मागं ठेवणार की तिचं दृषद्वतीसारखं केवळ एका रक्तमय नि:शब्द नदीत रूपांतर करणार?' असा प्रश्न भयभीत युधिष्ठिर प्रत्येक वीरयोद्धयाला गाठून विचारू लागला. कर्णाला थोपविला नाही, तर उद्याचा दिवस पांडवसेनेला दिसणारच नाही, असा बिकट समय आला! काय करावं? हा प्रश्न पांडवांसमोर उभा ठाकला!

त्यासाठी एकच योद्धा आता पात्र होता. मायावी युद्ध खेळणारा घटोत्कच! भीम आणि हिडिंबेचा पुत्र! भीमाकरवी मी त्याला बोलावून घेतलं. आपल्या पराक्रमाला कुठंच वाव न मिळालेला तो धिप्पाड भीमपुत्र सर्व पांडवांचे आशीर्वाद घेऊन कर्कश शीळ घालणाऱ्या अरण्यवाऱ्यासारखा कौरव सेनेवर आपल्या राक्षसपथकांसह तुटून पडला. प्रचंड शिळा, विशाल वृक्ष आणि चक्रं, परिघांसारखी अवजड शस्त्रं, कुलिंद, सैंधव, यादव, गांधार, मद्र, अवन्त्य यांच्या पथकांवर गर्जना करीत फेकू लागला! बकासुराचा बंधू अलायुध आणि त्याचं एक घटका घनघोर राक्षसी क्रौर्याचं युद्ध झालं. अनवधानानं कित्येक वेळा त्यांनी आपलेच सैनिक चिरडून मारले!!

शेवटी मध्यरात्री अलायुधाचा, घटोत्कचानं अंगावर रोमांच उभे करणारा,

थरकविणारा असा वध केला. भयभीत कुरुसैन्य, 'दिग्विजयी, सेनापती कर्ण, वाचवा! अंगराज, वाचवा!' म्हणत मार्ग दिसेल तिकडे धावू लागलं! त्याला प्रत्येक मार्गावर थोपवून कर्ण घटोत्कचाला तोंड देण्यासाठी निर्धारानं पुढं सरसावला!! भरतीच्या खवळलेल्या सागरासारखे ते एकमेकांवर कोसळले! सर्व सैनिक अवाक होऊन त्या सूर्यपुत्राचा आणि भीमपुत्राचा मृत्यूला थरकविणारा महासंग्राम स्वत:चं युद्ध विसरून प्रेक्षकांसारखे पाहतच राहिले!

क्षणात आकाशात; तर क्षणात धरतीवर अशी कर्णाला मायावी हूल देत घटोत्कच मेघासारखा गुरगुरत प्रचंड पाषाण, उखडलेले वृक्ष, अवजड गदा, रथांची चक्रं आणि मृत हत्तींची प्रेतं यांचा त्याच्यावर दोन घटका अविरत नुसता वर्षाव करीत होता, पण गैरिकपर्वतावरून धातुस्त्रावासारखे पाझरणारे असंख्य व्रण अंगावर हसत झेलत पलाश वृक्षासारखा तसूभरही न हलता कर्ण त्याच्यावर अनेक दिव्यास्त्रं फेकत होता. पुन:पुन्हा सूर्यस्तोत्र म्हणत गोल गरगर फिरत बाणांचे प्रपात अखंड वर्षवत होता! हजारो कुरुसैनिक घटोत्कचाच्या दिङ्मूढ करणाऱ्या मायावी युद्धात गतप्राण होत होते. प्राणांतिक किंकाळत होते. खवळलेल्या कर्णानं घटोत्कचाच्या रथावरील सारथी विरुपाक्ष याला एकाच मर्मभेदी बाणानं खाली कोसळविला. चिंताक्रांत दुर्योधनानं मध्येच कर्णाच्या रथाजवळ येऊन त्याला हात उंचावून सूचना केली! "कर्ण, इंद्रानं दिलेली वैजयंतीशक्ती या घटोत्कच राक्षसावर सोड! नाहीतर उद्याचा दिवस कुरुसेनेला दिसणारच नाही! अंगराज, वैजयंती सोड!"

"नाही दुर्योधन! मुळीच नाही. वैजयंती अर्जुनासाठीच जतन केली आहे. तेवढा एकच फासा जीवनभरच्या द्यूतातून आता माझी लज्जा राखण्यासाठी माझ्या हाती आहे!" दुर्योधनाच्या कानठळ्या बसाव्यात इतक्या मोठ्यानं ओरडून कर्णानं निकराचा नकार दिला!

घटोत्कचानं भयभीत केलेले कुरुसैनिक गुडघे टेकत लक्ष-लक्ष मुखांनी केविलवाण्या स्वरात ओरडले, "दानवीर अंगराज कर्णऽ, वैजयंती सोडा! आमचे प्राण वाचवा! घटोत्कचाला वधा, आम्हाला प्राणांचं दान द्या! प्राणदान – अंगराज – दानवीर प्राणदान द्या!!"

दान! तो दोन अक्षरी शब्द त्याला जीवनभर सदैव मोहवीत आला होता! त्या शब्दाशी कणाकणांनी निगडित असलेला त्याचा उच्चात्मा क्षणात द्रवला! डोळे मिटून त्यानं क्षणभरच चिंतन केलं आणि आपल्या भात्यातील, इंद्रानं, संतुष्ट होऊन भेट दिलेली, वैजयंतीशक्ती – एकमेव हाती उरलेली अंतिम शक्तीही घटोत्कचावर फेकली! आता त्याचं जीवन अक्षरश: रिक्त भात्यासारखंच झालं होतं!

आकाशाचं छतच कोसळून अंगावर पडत आहे असंच वाटावं इतका विशाल देह धारण करून मायावी घटोत्कच कसातरीच अक्राळविक्राळ ओरडत, केकाटत खाली कोसळला, अशोकवृक्ष कोसळताच त्याखाली वारुळातील अगणित मुंग्या चेंगरून ठार व्हाव्यात तसे नुसते चेंगरूनच कित्येक कुरुसैनिक त्याच्या विराट, अवजड देहाखाली ठार झाले!

रात्रीयुद्ध संपलं!

कर्णाला वैजयंती विरहित म्हणजे निकामी करण्याचं घटोत्कचाचं जीवितकार्यही संपलं! कुठंतरी दूरवर एका रानकोंबड्यानं सूर्योदयाची बांग दिली. पंधरावा रोमांचक

दिवस उजाडला! शुद्ध प्रतिपदेचा अविस्मरणीय दिवस होता हा!

**

# चार

पद्माकर सैन्यरचना करून गुरू द्रोण अग्रभागी उभे ठाकले. रात्रीच्या अविश्रांत युद्धामुळेसुद्धा थोडंही न थकलेले दोन्ही सेनांचे योद्धे पुन्हा एकमेकांसमोर उभे राहिले. इंगुदी संपलेल्या जागजागच्या पलित्यांमधून नुसताच कडवट धूर बाहेर पडत होता! अर्जुनाचं नायकत्व लाभलेली पांडवसेना कुरूंना भिडली. कुरुक्षेत्रावरच्या सेना जसजशा क्षीण होत होत्या तसतशा सरस्वती आणि दृषद्वती मात्र वीरांच्या उष्ण रक्तांचे पाट घेऊन फुगत होत्या! सगळ्या युद्धभूमीवर रक्त, मांस आणि धूल यांचा कर्दम साचला होता! दक्षिणेकडची बाजू उतरती असल्यामुळे दररोज तो हळूहळू सरकत दक्षिणेकडे साचत चालला होता! धडधडणाऱ्या चितांची प्रतिबिंबं दृषद्वतीच्या रक्तमय पात्रात भेसूर दिसत होती. युद्धभूमीवर ना पांडवांचं राज्य होतं, ना कुरूंचं. अदय, विकराल मृत्यूच तिथला अनभिषिक्त सम्राट झाला होता. हवा त्याला मुक्तपणे कवटाळत होता. दिग्विजयाचे घोडे धावडीत होता! अन्य सर्वांचे दिग्विजय, नगण्य म्हणून त्यानं निकालात काढले होते!

दोन प्रहरापर्यंत गुरू द्रोण निकरानं लढले, पण एकाएकी कुणीतरी 'अश्वत्थामा पडला! अश्वत्थामा पडला!' अशी मायावी आरोळी ठोकली. वास्तविक अश्वत्थामा नावाचा एक हत्ती मालव प्रांताच्या इंद्रवर्मा या राजाचा होता. तो ठार झाला होता.

सत्यासत्याची परीक्षा पाहण्यासाठी द्रोणांनी सगळ्या समरांगणातून फिरवीत आपला रथ शेवटी सत्यप्रिय युधिष्ठिराच्या रथाजवळ आणला, "युवराज युधिष्ठिरा, सर्व जण आक्रोश करताहेत की, 'अश्वत्थामा पडला!' खरोखरच माझा प्रिय अशू गतप्राण झाला काय! सांग, या गुरू द्रोणाची गुरुदक्षिणा म्हणून तरी सत्य काय ते सांग! माझा तुझ्या सत्यप्रियतेवर विश्वास आहे!"

"गुरुदेव, अश्वत्थामा पडला हे सत्य आहे! पण तो मानवांतील की हत्तींतील ते मला माहीत नाही!!" युधिष्ठिर जीवनात प्रथमच असत्य बोलला! दुसरं वाक्य अस्पष्ट, तोंडातल्या तोंडातच त्याला स्वत:लाही ऐकू न येईलसं बोलला!

तसं हातातील धनुष्य फेकून पुत्रवियोगाच्या दु:खानं विव्हल झालेल्या द्रोणांनी रथातच पद्मासन घालून ध्यान धरलं. त्या नव्वद वर्षं वयाच्या, दृढ मनाच्या वृद्धाची जीवनावरची श्रद्धाच भंग पावली. मिटल्या डोळ्यांनी देहाच्या अंधाऱ्या गुहेत आत्म्याची ज्योत कशी प्रकाशत असते, हे पाहण्यासाठी त्यानं मनाचे नेत्र उघडले. इतक्यात आरक्त नेत्रांचा धृष्टद्युम्न कोसळणाऱ्या विजेसारखा आपल्या रथातून खाली उतरला! कमरेचं खड्ग उपसून धावला. पांडव, 'थांब, थांब' म्हणून ओरडत मागून धावत असतानाच द्रोणांच्या रथावर एका झेपेतच चढला. कुणाला काही समजायच्या आतच, मस्तकावर एकत्र बांधलेले त्या वृद्धाचे, पांढऱ्या घोड्याच्या दाट शेपटीसारखे विपुल केश, मुठीत घट्ट धरून एका प्रहारातच त्याचं धड मस्तकावेगळं करताना तो डोळे विस्फारत ओरडला, "माझ्या पित्याचे हात बांधून त्याची धिंड काढायला लावणाऱ्या, त्याचा वध करणाऱ्या अधमा, अश्वत्थामा गज की नर हे आता स्वर्गातल्या इंद्राच्या

ऐरावतालाच विचार!'' आणि हातातील मस्तक दोन्ही सेनांच्या मध्ये त्यानं सरळ धुळीत फेकून दिलं!! सर्वांनी हृदयविदारक यातनेनं डोळे मिटून घेतले. 'ॐईशावास्यम् इदम् सर्वम्'चा दिव्य संदेश वर्षानुवर्षे हस्तिनापुरातील शेकडो युवकांना शिकविणारं, शुभ्र कमलासारखं सतेज मुखकमल रक्तानं माखलेल्या धुळीत पडलं! मनामनांवर प्रेमाचं राज्य करणारा गुरुश्रेष्ठ धुळीत पडला होता. शेवटी कर्णाला पदोपदी नाकारणाऱ्या द्रोणांनाही अदय मृत्यूनं नाकारण्याचा दिवस उगवला होता.

अफाट सेनेतील गर्जणारं युद्ध 'द्रोण पडले!' हे ऐकताच, आपोआप थांबलं, दोन्ही सेनांतील कित्येक योद्धे दाटलेल्या कंठांनी त्यांच्या रथाभोवती जमले! अश्वत्थाम्यानं अश्रूंचं सिंचन करीत आपल्या पित्याचं मस्तक पुन्हा धडावर बसविलं! साक्षात धनुर्वेद शांत झाला होता.

जीवनभर द्रोणांनी लाथाडलेला कर्णही पाझरला! पुढं होऊन त्यांच्या अचेतन चरणांना हस्तस्पर्श करताना त्याच्या डोळ्यांतून ओघळलेले अश्रू द्रोणांच्या अमर आत्म्याला म्हणाले असतील, 'गुरुदेव, जीवनभर तुम्ही मला कधीच ओळखलं नाहीत! कधीच नाही!'

काहीच न बोलता त्यानं प्रेमभरानं अश्वत्थाम्याच्या खांद्यावर आपला हात ठेवला! सर्व विसरून! अंगभूत स्नेहानं!

पित्याच्या दयनीय अंतामुळे खवळलेल्या अश्वत्थाम्यानं नारायणास्त्राचा प्रयोग केला. अश्वत्थाम्याच्या नारायणास्त्रानं हजारो पांडवसैनिक जाळून-पोळून काढले गेले. शेवटी मी स्वत:च पुढं होऊन ते दिव्य अस्त्र शांत केलं!

संध्यासमयाची भीषण छाया कुरुक्षेत्रावरच्या शिबिरा-शिबिरांभोवती दाटत होती. गुरू द्रोणांच्या पेटत्या चितेकडे पाहताना दुर्योधनाचं अंतरंग पेटत होतं. शोकविव्हल झालेल्या अश्वत्थाम्याचं दु:ख किती गहन गंभीर असावं याचा विचार आणि गुरुपुत्राचं समाधान करण्याचंही भान त्याला राहिलं नाही. झपाझप पावलं उचलीत, मनगटावरून उत्तरीयाला वारंवार झटके देत, जखमी हत्ती नदीच्या पात्रात घुसतो तसा तो द्वारावरचा जाळीदार पटल दूर फेकत अश्वत्थाम्याच्या शिबिरात घुसला. काय बोलावं, कसं बोलावं तेच त्याला सुचत नव्हतं. एखादं घनदाट अरण्य अविचारानं पेटविणारा मनुष्य त्याच्या भडकलेल्या वणव्यात स्वत:च सापडावा तशी त्याची अवस्था झाली होती! तो काहीच बोलत नाही हे पाहून, पित्याच्या धवल वस्त्रात लपविलेलं आपल मुख थोडंसुद्धा वर न उंचावता अश्वत्थामाच त्याला कातर स्वरात म्हणाला, "युवराजा, माझ्या पित्याच्या क्रूर वधाचा तितकाच क्रूर प्रतिशोध मी घेईन! उद्याच्या युद्धासाठी... उद्याच्या युद्धासाठी तळपत्या विक्रमाच्या, दिग्विजयी सूर्यभक्त कर्णालाच सेनापतीपद दे!''

त्याच्या मनातील कर्णाच्या मित्रप्रेमाचा झरा आटणं कसं शक्य होतं?

त्याच्या शिबिरातून तसाच बाहेर पडलेला दुर्योधन मध्यरात्र टळेपर्यंत कर्णाच्या शिबिरातच होता. पंजाची नखं शाकटून टाकलेल्या व्याघ्रासारखा तो इकडून तिकडे फेऱ्या घेताना पुन:पुन्हा कर्णाला म्हणत होता, ''अंगराज, पितामह आणि गुरू द्रोण यांनी कुरूंच्या अफाट सेनेचं सेनापतीपद भूषवावं, असं मला मनापासून कधीच वाटलं नव्हतं! माझा विश्वास आहे की, तुझ्या सेनापतीत्वाखाली एकवार दिग्विजयाचा डिंडिम मिरविणारी कुरुसेना उद्या पुन्हा कुरुक्षेत्रालाही पादाक्रांत करील. कर्ण, अर्घ्यदानासाठी

तुझ्या ओंजळीतून खऱ्या निष्ठेनं गंगेच्या पवित्र पाण्याचं लक्ष-लक्ष थेंबांचं अर्घ्यदान सूर्यकिरणांत तळपत पडलं असेल, तर उद्या लक्ष-लक्ष पांडव सैनिकही मृत होऊन स्वर्गप्राप्तीसाठी तुझ्या चरणांवर पडतील! अर्जुनाचं निळं शरीर तुझा जैत्ररथ समोर उभा ठाकताच काळं-निळं पडेल! त्याचं नाव ऐकताच माझ्या सर्वांगाचा तप्त लोहरस होतो आणि ज्याने माझ्या बंधूंना निर्दयपणे वधलं अशा क्रूर भीमाचं शरीर तुझ्या अमोघ बाणांनी त्याच्या आरक्त नेत्रासारखंच रक्तवर्णी होईल! तुझ्या निमुळत्या चरणांकडे पाहण्यासाठी वारंवार खाली जाणारी युधिष्ठिराची मान, सेनापती म्हणून तुझा उद्याचा पराक्रम पाहताना कायमची खाली जाईल! तुझ्या वायुजिताच्या टवकारलेल्या कानांचं द्वय पाहताना नकुल-सहदेव या बंधुद्वयाला अंगावर प्रभंजन आल्याचा भास होईल आणि – आणि सर्व कलहाची सूत्रं किनाऱ्यावर उभा राहून हलविणारा तो, तो मथुरेचा चेटक्या... तो काळा गवळी प्राणदानाच्या याचनेनं अर्जुनाचा रथ सोडून याचक म्हणून तुझ्या रथाकडे दीनवाणा होऊन हात पसरत धावेल!! कर्ण, उद्याचा सेनापती तूच राहशील. मित्रा, तूच राहशील!" तो बोलत होता, कण्यातून सुटलेलं रथचक्र लडबडत हवं तसं धावतं तसा!

पण कर्ण शिबिराच्या जाळीदार गवाक्षातून समोरच्या दृषद्वतीच्या किनारी दिसणाऱ्या, धडपडत पेटणाऱ्या गुरू द्रोणांच्या चितेकडे अचलपणे पाहत नुसताच नि:शब्द बसून होता! दुर्योधनाचे कोणत्याही चेतावणीचे शब्द आता त्याच्या कानांत शिरतच नव्हते. शिरले तरी क्षणभरही तिथं स्थिर होत नव्हते! शेवटी तो एवढंच म्हणाला, "युवराजा, तुला विजय मिळवून देण्यासाठी मी पंचप्राणही पणाला लावीन. मला सारथ्याचा सम्राट करणाऱ्या सन्मित्रा, संपूर्ण स्नेहभावानं तुझ्या सहवासात घालविलेलं जीवन समरांगणातही तुझ्या सहकार्यासाठीच सार्थकी लागेल. जा, निद्रा आणि वचन कधीच अपूर्ण राहू नयेत!" निद्रेची आवरणं पांघरत रात्र ढळू लागली. पलित्यांची शरीरं आता स्वत:च्याच तिरस्कारानं जळू लागली!

**

# पाच

सोळाव्या दिवशीची पहाट सुवर्णकिरणांच्या प्राजक्तफुलांचा सडा कुरुक्षेत्रावर शिंपत उजाडत होती. शुद्ध द्वितीयेचा दिवस होता तो!

सर्व देवादिकांनी असुरांच्या नाशासाठी स्कंदाला केला तसा सर्व कुरुसैन्याला एकत्र करून दुर्योधनानं सेनापतीपदाचा अभिषेक कर्णाला केला. ज्या मूळस्थानावर युद्धाला सुरुवात झाली होती ते स्थान आता तीन कोस उत्तरेकडे राहिलं होतं! रोज समरांगणं बदलली जात होती. दक्षिणेकडे सरकत होती.

क्षौमवेष्ठित औदुंबराच्या आसनावर बसलेल्या कर्णाच्या उजव्या मनगटावर दुर्योधनानं धवलपुष्पांची निशिगंधाची सुगंधी माला करकचून बांधली आणि आपल्या कमरेचं धारदार खड्ग उपसून अवकाशात ते गरगर फिरवीत त्यानं कंठरवानं घोषणा केली, ''कौरव-सेनानायक दिग्विजयी अंगराज कर्णऽऽ!''

''जयतु! जयतु! जयतु!!'' हातातील विविध वर्णांची सुगंधी पुष्पं आपल्या सेनानायकावर उधळताना कौरवसैनिक भीष्म-द्रोणाचं पतनही क्षणभर विसरले! ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व क्षुद्र सर्वच सेनापतीचं तळपतं मुख क्षणभर तरी दृष्टीला पडावं म्हणून दाटीवाटी करू लागले. पुरोहित व बंदिजनांनी त्याच्या सोनेरी कुरल केशांवर सुगंधी तेलं सिंचली. मुहूर्ताची घटिका दाखविणारं छिद्रमय पात्र पाण्यानं भरलेल्या हंड्यात डुब्बऽऽऽ असा ध्वनी करीत बुडालं तसा दुर्योधनानं तबकातील सेनापतीचा विख्यात किरीट त्याच्या मस्तकावर चढविण्यासाठी उचलला. त्याला हातानं थोपवीत, कौंतेय असूनही 'राधेय' म्हणून स्वत:ला धन्य मानणाऱ्या त्या महारथ्यानं शेजारी उभ्या असलेल्या पुत्राकडे – वृषसेनाकडे सहेतुक पाहिलं. वृषसेनानं लागलीच एक तबक विनयानं पित्यासमोर धरलं. त्यावरचं तलम वस्त्र हळुवार हातानं दूर सारीत सूर्यपुत्रानं त्या तबकावरील एक दुसराच सोनेरी किरीट, दुर्योधनानं त्याला हात लावण्यापूर्वी स्वत:च उचलून आपल्या मस्तकावर धारण केला!

तो किरीट अचूक माझ्या किरीटाच्या बांधणीच्या आकारासारखाच होता!

पूर्व क्षितिजावर आकाशाचा सम्राट सवितृ आपल्या किरणांचे सहस्र घोडे उधळीत उभा राहिला. तित्तिर, चक्रवाक, सारंग, धनछडी, रानराघू आणि चकोर पक्षयांनी त्याचं स्वागत करण्यासाठी घरटी सोडून आकाशात झेपा घेतल्या. दवबिंदूंची मौक्तिकं तृणपात्यांवर झमझम तळपू लागली. वायुलहरींबरोबर क्षणातच कुरुक्षेत्राच्या सर्वोदार भूमीत विरू लागली. सगळं चराचर नवचैतन्यानं नाचू लागलं.

सेनापती झालेल्या कर्णानं 'कर्णटिला' नावाच्या एका उंच टेकडीवर चढून आपल्या सैन्यरचनेसाठी सोयीची जागा हेरली. कौरवसेना एका विशाल मगराचा आकार धरून युद्धसंमुख उभी ठाकली.

त्या मगराच्या नेत्रभागाची स्थानं शकुनी व उलूक यांनी घेतली होती. मस्तकाची जागा संतप्त अश्वत्थाम्यानं स्वीकारली होती. डाव्या पायाच्या स्थानी कृतवर्मा आणि उजव्या पायाच्या स्थानी गौतम उभा ठाकला होता. मागचा पायाच्या

जागी मद्रराज शल्य उभा होता आणि या मगराच्या मधोमध लाखो कुरूंच्या वेढ्यात दुर्योधनाला लपवून स्वत: कर्ण मुखाग्रावर उभा होता! त्याचं सुवर्णमंडित विजय धनुष्य सूर्याच्या सोनेरी किरणांत तळपत पांडवसेनेला जणू सांगत होतं, 'मी आज बाण फेकणारच नाही! फेकणार जळजळीत तप्त किरण!' त्याच्या रथाचे शुभ्र घोडे कान टवकारून, काही क्षणांतच बसणारा वेगाचा हिसका स्वीकारण्यासाठी जबडे तयार ठेवून उतावळेपणे पायांच्या खुरांनी कुरुक्षेत्राला उकरीत होते. त्याच्या जैत्र या सर्वांत उंच रथावरच्या उल्कांसारख्या श्वेतपताका, फरफरणाऱ्या साखळदंडाचं चिन्ह माथ्यावर मिरविणाऱ्या, काषायवर्णाच्या तलम ध्वजाला चोहोबाजूंनी घेरीत वाऱ्यावर डुलत होत्या. लहान-लहान सुवर्णघंटा ध्वजदंडाबरोबर मंद-मंद लडलडताना मधुर किणकिणत होत्या. पट्टिश, शूल, तोमर, चक्र, वरुथ, गदा, शतघ्नी, खड्ग, त्रिशूल, भाले व परशु यांनी रथाचा पृष्ठभाग, ठासून भरला होता. असंख्य प्रकारच्या बाणांना पोटी वागवताना शंभरावर भाते अपुरे ठरत होते. सर्व रथांवर चट्टयापट्टयांची व्याघ्रचर्मे, आच्छादली होती!

मगराच्या मध्यातून दुर्योधनानं 'दु:सह ' नावाचा शंख फुंकून चढाईचा संकेत करताच कर्णानं आपल्या हातातील पुष्पमालांनी सुशोभित विजय धनुष्य उंचावून गरगर फिरवलं. आपला हिरण्यगर्भ शंख आपल्या कंठाच्या, घोड्याच्या वेगांसारख्या टपटपीत दिसणाऱ्या, रक्तमय, धमन्या टरारून फुगवीत इतक्या मोठ्यानं फुंकला की, समरांगणाभोवती आशाळभूतपणे रेंगाळणारे तित्तिर, गृध, वाग्गुद यांसारखे धटिंगण मांसभक्षक पक्षीही भेदरून आकाशात उडाले! हत्तीच्या अंगांवरील केश ताठ झाले. तो शंखनाद नव्हताच – जणू आपल्या अवमानित राजमनाचे तपान्तपाचे साचलेले उष्ण नि:श्वासच तो पहिला कौंतेय भुजंगासारखे फेकत होता!

'आऽऽरोऽह! आऽ क्रऽम!' लोहत्राणातील आपल्या पिळदार बळकट भुजा खूप उंच उंचावीत त्यानं कुरुसैन्याला आज्ञेची गगनभेदी आरोळी दिली. कुरुसेनेचा विशाल मगर कर्णाचा जबडा करून पांडवांना गिळण्यासाठी पुढं सरपटला! कलकलणारा! गर्जणारा! वेडावलेला! रणमत्त!

अर्जुनाच्या सेनापतीत्वाखाली आज पांडवसेना अर्धचंद्राचा आकार धरून पुढं सरसावली. मी हाती वेग धरलेल्या अर्जुनाच्या नंदीघोष रथाच्या उजव्या हाताला धृष्टद्युम्न उभा होता. डाव्या हाताला, एका हत्तीवर आरूढ होऊन गजपथकाचं नेतृत्व करण्यासाठी लाल नेत्रांचा भीम सरसावला होता. शेजारी युधिष्ठिर उभा होता. कर्णाला समोर पाहताना त्याचं मन भीतीनं थरकत होतं. हात उंचावून अर्जुनानं क्षणभर आपल्या सेनेची सोनेरी चंद्रकोर थोडी मागं घेतली आणि देवदत्त शंख फुंकून एकदम मगरावर सुसाट सोडली! त्याच्या रथाचे घोडे धावडवताना मला वाटलं, अर्जुनाला आपण कुणाशी लढतो ते माहीत नसल्यामुळे आणि कर्णाला ते माहीत असल्यामुळे त्यांच्या युद्धाचं स्वरूप किती फसवं – विचित्र झालं होतं!

समोरून शुभ्र घोड्यांच्या उधळलेल्या रथातून सिंहनाद करीत येणाऱ्या कर्णाला पाहताच पांडवसेनेला कळेना की, डोंगरमाथ्यावर तळपणारा सूर्य आकाशात आहे की समोरच्या सोन्यानं संपूर्ण मढविलेल्या तळपत्या उंच रथात आहे? कधी नव्हतं इतकं त्याचं मुख किरणांत तळपणाऱ्या सुवर्णकुंभासारखं झळाळत होतं. पुष्ट खांद्यांवर रुळणाऱ्या कुरल केशांचा भरगच्च बटा रथाच्या चक्राला हबका बसताच क्षणभर

खांद्यापासून विलग होत होत्या, पुन्हा खांद्यांवर रुळत होत्या! तो वृषस्कंध येत होता, अरण्यवाऱ्याचं विकराल रूप घेऊन! पर्वकालच्या खवळलेल्या महासागरासारखा! समोर दिसेल त्याला जाळून भस्म करण्यासाठी उतावीळ झालेल्या ज्वालामुखीसारखा! त्याचे निळे डोळे गरगर फिरत कपिध्वजाचा वेध घेत होते. आज मी एक शहाणपणा केला होता. नेहमी समोरच्या सेनेला स्पष्ट दिसेल असा फरफरणारा आमच्या रथावरचा ध्वज परतून असा लावला होता की, त्यावरचं कपीचं चिन्ह केवळ पांडवसेनेलाच दिसेल! दोन्ही सेना गर्जत एकमेकींना भिडल्या.

कपिध्वज कुठंच दिसत नाही हे पाहून क्षणभर गोंधळलेल्या राधेयानं आपला रथ सरळ आमच्या प्रचंड गजदलाकडे वळविला! अग्रांना विष लावलेले असंख्य बाण तो मृगधारेसारखे इतके सलग फेकत होता की, पहिल्या एका प्रहरातच त्यानं प्रचंड गजदल सरळ उधळून लावलं. विष अंगात भिनलेले हत्ती झेंडू फुटताच परतले आणि हजारो पांडवसैनिकच पायांखाली रगडत वाट फुटेल तिकडे धावू लागले! गतप्राण होऊन खाली कोसळताना कशीतरी तग धरून जिवंत राहण्यासाठी धडपडणाऱ्या घायाळ योद्धयांना चेंगरू लागले.

कर्णानं चालविलेला हत्तीचा क्रूर संहार थांबवावा म्हणून क्रोधानं धावणाऱ्या भीमाला अश्वत्थाम्यान मध्येच थोपविलं. त्यांचा संग्राम म्हणजे दोन क्रुद्ध व्याघ्रांची पंजेफाड होती. सात्यकी विंद-अनुविंदाशी भिडला होता. धृष्टद्युम्न कृपाला घेरत होता. श्रुतकीर्ती मद्रराज शल्यावर धावून गेला. सहदेव आणि दु:शासनाची बाणफेकींची झुंज जुंपली होती. दुर्योधनानं मगराचं केंद्रस्थान सोडून आपला रथ सरळ युधिष्ठिरापर्यंत आणताच युधिष्ठिराच्या संरक्षणासाठी मी अर्जुनाचा रथ त्याच्याजवळ नेऊन भिडविला. सूर्य वर चढू लागला तसतसे धुळीचे लोळ आकाशमंडलाला झाकाळून टाकू लागले. हत्तींच्या एकलग चीत्कारांनी शस्त्रांचे खणखणाटही ऐकू येईनासे झाले. अर्जुन कुठंच दृष्टीला पडत नाही हे पाहून खवळलेल्या कर्णानं पांचाल व मत्स्य यांची पथकं आपल्या जैत्ररथाखाली सरळ रगडून टाकली. जसजसा सूर्य क्षितिजापासून वर वर सरसरत होता तसतसा त्याचा रथ अधिकच गतिमान होत होता. कधी शूल, कधी तोमर, कधी गदा यांचे हात बदलताना तो कानांच्या पाळ्यांवर घामाचे बिंदू निपटण्यासाठीच तेवढा एक लवभर काय ते थांबत होता!

सूर्य माथ्यावर आला आणि भीमानं क्षेमधूर्ती या समर्थ योद्धयाला रथावरून खाली कोसळविला. संशप्तकाशी भिडलेल्या अर्जुनानं दंड व दंडधार या राजांना कंठस्नान घातलं म्हणून अश्वत्थाम्यानं चवताळून त्याच्यावर झेप घेतली. ज्या पांचाल-पथकात कर्ण घुसला होता तिथं सरळ-सरळ संकुलयुद्धाला सुरुवात झाली होती. समोर दिसेल त्याला पक्ष विचारून लढण्याचं आव्हान देत प्रत्येक योद्धा तिथं युद्धाची मदिरा अंगी भिनल्यासारखा भानरहित झाला होता.

मत्स्य आणि पांचाल यांचे वीर पथकप्रमुख कर्णासमोर धडाधड कोसळताहेत हे पाहून त्याला बांध घालवण्यासाठी मी माझ्या पांजजन्य शंखातून विशिष्ट स्वरातील सांकेतिक बोल काढून नकुलाला पुन:पुन्हा सांगत होतो. ‘नकुलऽऽ! नकुलऽ! कर्णाकडे रथ वळव!’ माझा संकेत नकुलाला त्या घनघोर धुमश्चक्रीत अर्ध्या घटकेनंतर कसातरी समजला! दोन प्रहर टळत असताना त्यानं आपलं सैन्यदल आपल्या मागं घेत मत्स्यांच्या पथकात प्रवेश केला आणि पुढं होत सरळ कर्णाला अंगावर घेतलं.

पण त्यानं अंगावर घेतलेला सेनानायक म्हणजे शीतल पाण्याचा प्रपात नव्हता. तो होता विजेचा लोळ! तो नकुलाचे बाण सहज परतवीत त्याला पुन:पुन्हा विरथ करून हसत हसत त्याची त्रेधा पाहू लागला. शेवटी आपला उंच रथ त्याच्या रथाजवळ भिडविताना नि:शस्त्र केलेल्या नकुलाला तो म्हणाला, “जा, आपल्या ज्येष्ठ बंधूला – त्या अर्जुनाला माझ्यासमोर पाठवून दे! त्यासाठीच तुला हे जीवनदान देतो आहे!”

लज्जित नकुल मान खाली घालून त्याच्यासमोरून परतला तेव्हा त्याला स्वत:लाच माहीत नव्हतं की, त्याच्या माद्रीमातेनं पतीसह सती जाताना कुंतीदेवींच्या हाती दिलेलं त्याचं जीवनपुष्प तो पहिला कौंतेय ज्येष्ठबंधू या नात्यानं जतन करतो आहे! राजमाता कुंतीदेवीला दिलेलं वचन सर्वांगातील रक्तकण युद्धाच्या सर्वग्राही वणव्यात पेटून राख व्हायची वेळ आली होती, तरीही तो राधेय निष्ठेनं पार पाडीत होता! संध्याकाळच्या वेळी युधिष्ठिरपुत्र प्रतिविंध्य यानं चित्रराजाला कंठस्नान घातलं!

संध्याकाळची तिरपी सौम्य किरणं कुरुक्षेत्राभोवती उंच वृक्षांच्या लांबट पडछाया पसरवीत असतानाच मी अर्जुनाचा नंदीघोष रथ पहिल्यानंच कर्णाच्या उंच जैत्ररथासमोर आणला! एकमेकांना समोर पाहताच ते भयानक बिथरले! वाऱ्याला पाहून वणवा खवळतो तशा त्या दोघांच्या मुद्रा संतप्त झाल्या! ते दोघेही कितीतरी मोठ्यानं एकमेकांवर ओरडले! त्यांच्या आरोळ्यांनी गांगरलेले आवतीभोवतीचे हत्तीसुद्धा देहधर्म करू लागले. एकमेकांचा वेध घेत त्यांनी आपापल्या अवजड धनुष्यांतून बाणांची अशी अनवरत फेक केली की, क्षणात आकाश मृगातील मेघांनी झाकाळून टाकावं तसं त्यांनी आकाश झाकाळून टाकलं. एक घटकाभर त्यांचे अमोघ, वेगवान, नादमय बाण भयानकपणे एकमेकांशी टक्करले. त्यांच्या लोखंडी अग्रांतून ठिणग्याच ठिणग्या उफाळत होत्या. रात्र होण्यापूर्वीच, संध्यासमय असूनही त्या ठिणग्यांमुळे आकाशाचा भव्य घुमट तारकांनी डवरल्यासारखा दिसत होता. त्या ठिणग्यांनी कर्णाचा सारथी सत्यसेन पोळून काढला. अर्जुनाच्या बाणांनी तो मृत झाला!! कर्णार्जुनांनी बाणफेकीनं झाकाळून टाकलेलं त्या दिवशीचं, कुरुक्षेत्रावर छत्रचामर ढाळणारं आकाश पुन्हा निवळलंच नाही! कारण रात्रीच्या मायावी योद्धयानं अंधाराच्या काळ्या किरणांचे बाण फेकून त्याचे बाणही क्षणात झाकाळून टाकले! शुद्ध द्वितीयेचा बिकट असा सोळावा दिवस कसातरी संपला.

**

# सहा

रात्र घनदाट अंधाराची अथांग आवरणं कुरुक्षेत्राभोवती लपेटू लागली. सगळीकडे काळाकुट्ट अंधार होता. नाही म्हणायला त्या अंधाराला घटकाभर उजळून गेली ती दृषद्वतीच्या शांत आणि नि:शब्द किनाऱ्यावर तडतडत पेटणारी सत्यसेनाची चिता!!

सत्यसेन हा केवळ कर्णाच्या रथाचे वेग वागविणारा सारथी नव्हता, केवळ पत्नीचा बंधू नव्हता, नुसता कुरूंचा एकनिष्ठ सेवक नव्हता, तर कर्णाच्या राजकीय जीवनात अनिवार्य परिस्थितीमुळे धोक्यात आणणाऱ्या अनेक समर प्रसंगांच्यावेळी त्याला सावधानतेचे संकेत करणारा चौघडा होता! डोळस हितकर्ता होता. म्हणूनच स्वत:ला हरवून तो सत्यसेनाच्या चितेकडे पाहत एकाकी होऊन दृषद्वतीच्या काठी बसला होता.

अंधाराच्या काळ्याकुट्ट हत्तीला एकलग चाटणाऱ्या सत्यसेनाच्या चितेतील पिवळसर अग्निज्वाला पाहताना त्याला प्रत्येक ज्वालेत सत्यसेनच दिसत होता. अपरात्री खांद्यावर घडा घेऊन गंगेच्या नीरव काठी गाठ पडलेला!

कवच-कुंडलं दान करून, अनेक मर्मभेदी अभिशापांची मरणप्राय अवजड गाठोडी पाठीशी मारून, वचनांचं मुक्त दान करीत, साक्षात तेजाची खाण असूनही केवळ अतिसामान्य जिणं साहत जगत तो येथवर आला होता. हाती राखलेली शेवटची – निर्वाणीची वैजयंतीशक्तीही घटोत्कचावर फेकून तो आता पुरता रिकामा झाला होता. एकाकी झाला होता!

पण या एकाकीपणातही त्याच्या उभारीच्या जातिवंत वीर मनाची, साधना आणि सूर्याराधना, यांनी उजळून निघालेल्या दिव्य आत्मिक तेजाची एक अजोड आणि अशरण ऊर्मी त्याला सतत धैर्य देत आली होती!! ही ऊर्मी हेच त्याचं संपूर्ण जीवन होतं. जेव्हा-जेव्हा तो चापातून सुटलेल्या बाणासारखा झेपावत गेला तेव्हा- तेव्हा या एकाच आत्मिक ऊर्मीच्या जोरावर! आपण कुठल्यातरी महान तेजाशी निगडित आहोत, आपल्या अंतरंगात सुप्तपणे काहीतरी दिव्य प्रेरणा देत आहे ही इतर कुणालाही न लाभलेली दुर्मीळ जाणिवेची तार त्याच्या जीवनाचं संगीत गुंफत आली होती. खरोखरच तो समजावून घ्यायला अतिशय अवघड होता. त्याच्या जीवनाचे दोन स्पष्ट भाग होते. सूर्यकेंद्राशी गूढ जाणिवेच्या सूक्ष्म धाग्यांनी निगडित असलेला त्याचा उच्चात्मा! आणि भोवतीच्या सामाजिक जगाशी दैनंदिन निगडित असलेलं त्याचं शरीर आणि मन! कधी-कधी या दोन भागांचं अतर्क्य असं अकल्पित मिश्रण होई. त्यातूनच त्याचं जीवन इतकं संघर्षमय, इतकं संभ्रमपूर्ण आणि पराकोटीचं गूढ आणि रहस्यमय वाटे.

त्याचा सारथी – सत्यसेन हाही आता कधी न संपणाऱ्या अनंताच्या प्रवासाला निघून गेला होता. त्याला पूर्ण माहीत होतं की, महारथ्याचं अर्धअधिक यश हे त्याच्या कुशल सारथ्यावरच अलवंबून असतं! तो नेईल तीच त्याची दिशा असते, तीच गती असते. त्याचा नेहमीचा सारथी गेल्यामुळे आतापर्यंत पांडवांच्या चतुरंगदलात मुक्तपणे

भ्रमण करणारा व्याघ्रचर्मांकित आजेय जैत्ररथ आता कुरुक्षेत्रावर साचलेल्या दलदलीत केव्हाही रुतून बसू शकला असता!

शून्य मनानं, डोळ्यांच्या पापण्याही न हलवता सत्यसेनाच्या लहलहणाऱ्या चितेकडे एकटक पाहत तो दृषद्वतीच्या नीरव किनारी एकटाच उभा होता. ग्लानी आल्यासारखा? बधिर? आत्मविस्मृत? की – की इंद्रियातीत झाल्यासारखा? आपण होऊन क्षितिजाच्या सर्व धूसर कडा छेदून पार गेल्यासारखा? माझ्याशिवाय ते कुणालाच कळू शकत नव्हतं!

मला पूर्ण माहीत होतं की, त्याचा पराक्रम मोठा होता, त्याग मोठा होता, लोकप्रियता मोठी होती आणि या सर्वांहून त्याची सूर्याराधना मोठी होती. त्याची साधनेनं लाभलेली शुचिता मोठी होती – पण – पण पांचालीच्या धवल पावित्र्यावर त्यानं भरसभेत उडविलेल्या राळीत ते सर्व-सर्व माखून गेलं होतं. सर्व जण म्हणत होते की, दुर्योधनानंच कर्णाचं जीवन हे असं अनुकंपनीय केलं – पण – पण कुणालाही माहीत नव्हतं की पांचालीमुळेच त्याचं जीवन खऱ्या अर्थानं अनुकंपनीय झालं होतं. मानवतेचा अवमान एकवेळ क्षम्य ठरू शकतो – पण ज्या स्त्रीच्या कुशीतून मानवता जन्म घेते त्या स्त्रीत्वाचा एवढा निर्घृण अवमान कधीच क्षम्य नसतो. ज्या समाजात आणि राष्ट्रात स्त्रीत्व लज्जित होतं तो समाज आणि ते राष्ट्र विनाशाच्या खोल गर्तेच्या काठावर आपसूक जाऊ शकतं!

तरीही त्याच्या विक्रमाचं भय पांडवसेनेला आहे हेही मला ज्ञात होतं, कारण पांचालीच्या स्त्रीत्वाचा त्यानं केलेला अपमान राजमाता कुंतीदेवीच्या स्त्रीत्वाचा गौरव करून त्यानं काहीसा धुऊन टाकला होता. कुंतीशी असलेलं स्वत:चं नातं त्यानं जगाला जर उघड करून सांगितलं असतं, तर पांडव कौरवांविरुद्ध उभेच राहू शकले नसते. अगदी पांचालीच्या विटंबनेचा सूड घेण्यासाठी म्हणूनसुद्धा ते कौरवांवर उठू शकले नसते!

स्वत:च्या पुत्राचा जन्मत:च अश्वनदीत त्याग करणाऱ्या त्या मातेच्या लौकिकाचा ती वैभवाच्या शिखरावर असताना खरा जर कोणी सांभाळ केला असेल, तर तो कर्णानं आणि तोही स्वत:ची सर्व प्रकारची शारीरिक, मानसिक आणि आत्मिक कोंडी पत्करून! भरसभेत पांचालीची विटंबना करून ओढवून घेतलेलं पाप त्यानं कुंतीसारख्या महान स्त्रीचा गौरव याप्रकारे राखून अंशत: धुऊन काढलं नव्हतं काय?

पांचालीच्या पातिव्रत्याची अक्षम्य मानखंडना आपल्याकडून झाली आहे याची जाणीव कर्णानं स्वत:च्या दिव्यात्म्याशी जीवनभर सतत वागविली होती. माझ्याजवळच त्यानं पांचालीसाठी आवर्जून निरोप दिला होता – 'शक्य असल्यास मला क्षमा कर म्हणावं!'

हिरण्मयीनं सांगितलेली पांचालीची कर्णाबद्दलची मोहकामना आणि दोन-दोन महिन्यांची सहा जणांची वाटणी त्यानं वृषालीच्या तोंडून ऐकली नव्हती काय? तरीही तो कौरवांच्या पक्षाकडून समजून-उमजून समरांगणात उतरला होता. प्राणाचं मोल देणार होता. एका अर्थानं हा पांचालीचा विशेष प्रकारचा गौरव नव्हता काय?

आणि म्हणूनच मी जाणून होतो की, अशा या कर्णाचं शौर्य पांडवांना या स्थितीतही भीतिदायक होतं!

काहीसा निर्धार करून कर्ण पाषाणावरून उठला. अंधारातून न दिसणाऱ्या पूर्व

क्षितिजाकडे त्यानं उगाच लवभर एकटक पाहिलं! एक दीर्घ नि:श्वास सोडू तो आपल्या शिबिराकडे, शांतपणे निद्राधीन होण्यासाठी वळला. इतक्यात... 'दाऽऽदा' अशी एक हृदय थरकवणारी आर्त किंकाळी दृषद्वतीच्या पात्रासह सभोवतीच्या सघन अंधाराला चराचर चिरत गेली! ती ऐकून सत्यसेनाच्या चितेतील ज्वालासुद्धा क्षणकाल थरथरल्या! ती वृषाली होती! सत्यसेनाची बहीण! कर्णाची पत्नी!

सत्यसेन पडल्याची वार्ता अश्वसाद पाठवून अश्वत्थाम्यानं तिला हस्तिनापुरात कळविली होती. ती ऐकताच कुणाचीही वाट न पाहता, सारथ्यकर्मात निपुण असलेली ती सारथी-स्त्री आपल्या बंधूच्या या अंत्यदर्शनासाठी बांध फुटलेल्या नदीसारखी स्वतःच रथ घेऊन सुसाटपणे हस्तिनापुराहून निघाली होती.

अंगावरचं वस्त्र पेटल्यासारखी ती सत्यसेनाच्या पेटत्या चितेकडे सुसाट धावत होती. तिला न पाहताही तिच्या केवळ किंकाळीवरूनच तिला सहज ओळखलेल्या कर्णाचं स्मृतीचं सरोवर एकदम उसळलं गेलं असावं. एकच एक विचाराचा भोवरा त्याच्या मस्तकात आवर्त घेत भ्रमण करीत असावा... 'सूतपुत्र! सूतपुत्र!'

त्याचा अबोल अचलपणा, नि:शब्द नि:स्तब्धपणा, सर्व-सर्व तिला पाहताच क्षणात कुठच्या कुठं दूर पळालं!

आवेगानं पुढं होत, सुसाट धावणाऱ्या आपल्या भानरहित प्रिय पत्नीला, त्यानं आपल्या भक्कम बाहूंच्या बळकट कवेत घेतलं!! कितीतरी विविध भावनांची थरथर त्या मिठीत सामावली होती!!!

'अंगराज – अंगराज' म्हणत ती आपलं कुंभासारखं गोल मुख त्याच्या विशाल छातीवर थडाथड आपटू लागली. खऱ्या अर्थानं ती कर्णपत्नी होती, कुटुंबवत्सल होती, प्रेमळ होती – इतरांसाठी तळमळणारी होती, त्यागी होती.

श्रमश्रांत झालेलं मस्तक तिनं त्याच्या विशाल छातीवर विसावलं.

त्यांचं ते विचित्र मानसिक अवस्थेतील गाढ आलिंगन पाहायला भोवतीच्या काळ्याकुट्ट अंधारालाही डोळे फुटले होते! दृषद्वतीच्या संथ लाटाही उसळत होत्या! कुरुक्षेत्राचं समरांगण सजग होत होतं!

तरी तो मात्र काहीच बोलत नव्हता! तिच्या टपोऱ्या डोळ्यांतून पाझरणारी अश्रूंची संतत धार त्याच्या थंड पडलेल्या – शांत झालेल्या – क्षितिजावर गेलेल्या मनाला पुन:पुन्हा पेटवीत होती.

चितेच्या ज्वालांत क्षणकाल तळपून पुन्हा अदृश्य होणारे त्या दोघांचे गदेच्या शिरोभागासारखे गोलच गोल चेहरे एकच एक झाले होते! एकमेकांत विरून गेले होते – लय पावले होते! एकरूप झाले होते!

त्याच्या थडाथड उडणाऱ्या रक्तमय धमन्यांचं स्पंदन तिला अबोध सांत्वन देत असावं. 'उद्या एक तर अर्जुन या सर्वोदार कुरुक्षेत्राला कायमचा कवटाळील... नाहीतर – नाहीतर तुझा पती सूर्यबिंबाचा सुयोग्य सन्मार्ग स्वीकारील!'

जीवनभराची निर्लोभ साथ देणाऱ्या आपल्या प्रिय पत्नीला, आपल्या जैत्ररथात बसवून त्यानं स्वत: हस्तिनापुरातील कुरूंच्या राजकक्षावर पोहोचतं केलं.

**

# सात

वाडयातून बाहेर पडता-पडता तो चौकातील पेंगुळणाऱ्या राजहंसांकडे मात्र पाहायला चुकला नाही!! पलित्यांच्या धूसर प्रकाशात त्या तलावात पडलेली त्या ऐटदार राजपक्षयांची लांबट प्रतिबिंब पाण्यात खळखळ माजवून विरवून टाकावीत असं त्याला वाटलं. झटकन हातातील पुष्कराज मणी धारण करणारी अंगठी काढून त्यानं ती तलावात फेकली! बिंबं थरारली! पडछाया हेलावल्या! पेंगुळलेले ते पक्षी क्षणात घाबरून जागे झाले! इतस्तत: पायांची वल्ही मारू लागले! तलावात लाटा निर्माण करू लागले! त्यांच्या धावपळीकडे पाहताना तो क्षणभर स्वत:शीच हसला!

झपाझप पावलं उचलीत शिबिराकडे येण्यासाठी कुरूंच्या त्या भव्य राजकक्षाच्या प्राकाराचं प्राचीन महाद्वार ओलांडू लागला! महाद्वारात क्षणकाल थांबून त्यानं वृषालीच्या कक्षावर दृष्टी टाकली. एका गवाक्षात त्याच्या सर्वांत लहान पुत्राला – वृषकेतूला घेऊन वृषाली उभी होती! तो एकटाच कर्णपुत्र युद्धाच्या वणव्यापासून दूर हस्तिनापुरात होता! आपला हात उंचवावा म्हणून त्यानं क्षणकाल चाळवाचाळव केली आणि राजवाडयासमोरच्या शुभ्रवर्णी आणि एकलग सलग वर चढत गेलेल्या पायदंडयांवर एकवार दृष्टी खिळवून त्यानं हात न उंचावताच महाद्वार ओलांडलं! निग्रहानं आणि अबोध निर्धारानं! सरोवरातून बाहेर पडणाऱ्या हत्तीसारखा तो राजवाडयाबाहेर आला! मनात निग्रह बांधून – उंबरठयात नाती टाकून!!

मध्यान्ह रात्रीनंतर तो आपला रथ घेऊन आपल्या शिबिरासमोर कुरुक्षेत्रावर आला. त्याच्या शिबिराच्या दारात उत्कंठेनं वाट पाहत दुर्योधन उभाच होता!

आपला उद्याचा सेनापती चंपानगरीला तर गेला नाही ना या शंकेनं दुर्योधन त्रस्त झाला होता! पण कर्णाला समोर पाहताच त्याचं मुख पुन्हा उजळून गेलं. शिबिराच्या दारातून बाणासारखा पुढं सरसावत त्यानं स्वत:च कर्णाच्या रथाचे घोडे थोपविण्यासाठी त्याच्या वायुजिताच्या पाठीवरील पालाणाची कातडी गुंफण आपल्या भक्कम मुठीत पकडली. धापावणारे घोडे थांबले. फेस पाझरू लागला. उष्ण नि:श्वास विरू लागले.

त्याला रथातून खाली उतरण्याएवढीही उसंत न देता दुर्योधनानं त्याला पुढं होत विचारलं, "अंगराज, तुझा सत्यसेन पडला. उद्या तुझ्या रथाच्या सारथ्याचं काय?" दुर्योधनाचं धारदार नाक पलित्याच्या धूसर प्रकाशातही स्पष्टपणे तरारलेलं दिसत होतं.

"युवराजा, मला एक कुशल असा प्रामाणिक सारथी दे, म्हणजे उद्या माझा रथ वाऱ्याचाही गर्व हरण करणाऱ्या गतीनं समरांगणावर स्वैर धावताना तुला दिसेल!"

"कुशल सारथी? प्रामाणिक सारथी?" आपल्या निरुंद, उबऱ्या कपाळावर आठयांची रांगोळी रेखीत डाव्या गुबगुबीत उजव्या हाताची वळलेली भक्कम मूठ दोन – तीन वेळा थडाथड आपटत दुर्योधन विचारमग्न झाला. त्याच्या आठयांच्या जाड पन्हाळीत घामाचे पाट दाटले होते. वक्र नि जाड भुवया अधिकच वक्र झाल्या. पलित्यांच्या तांबसर, पिवळट प्रकाशात त्याचं रक्तवर्णी मुख अधिकच उग्र दिसत होतं.

भेसूर दिसत होतं. घारे टपोरे डोळे भवितव्याचा वेध घेण्यासाठी संकुचित होऊन मेंदूचे कानेकोपरे धुंडाळीत होते. त्याच्या निग्रही चर्येवरसुद्धा सूक्ष्मपणे पाहणाऱ्याला चिंतेची काळी छटा स्पष्ट जाणवली असती.

कर्णाच्या रथाचं सारथ्य कुठल्या समर्थ योद्धयाच्या हाती द्यावं; या एकाच विचारात तो आपली असंख्य वळणं घेत आलेली जीवननौकाही पार विसरून गेला होता. त्याच्या भक्कम बाहूवरून नेहमी घरंगळू पाहणारं तलम वीणेचं, उंची राजवस्त्र, कुरूचं मौल्यवान उत्तरीय घरंगळून केव्हाच खाली पडलं!! नेहमीसारखा भक्कम झटका देऊन ते सावरण्याचं भानही त्याला राहिलं नव्हतं!

ते दोघेही क्षणकाल शांतच उभे राहिले. कुरूच्या राजकक्षातील पाषाणमूर्तीसारखे!

"अंगराज, खेद मानणार नसशील तर असा एकच योद्धा मला सुचवावासा वाटतो, जो आज सर्व दृष्टींनी तुझ्या रथाचं सारथ्य करण्यासाठी एकटाच योग्य आहे!" दुर्योधनाची पाषाणमूर्ती बोलकी झाली.

"कोणता?" कर्णानं शिरावरचा मुकुट आणि अवजड लोहत्राण काढून ते तबकात ठेवलं. त्याचे कुरल, दाट सोनेरी केश शरदातल्या पक्षयांसारखे विमुक्त विखुरले, भरगच्च मानेला, लोहत्राण ठेवताना तीच मोहक वळी पडली.

"मद्रराज शल्य!" दुर्योधनानं आपला बळकट उजवा हात त्याच्या विशाल खांद्यावर चढविला!

"शल्य? राजा, तू विसरतोस की शल्य हा पांडवांचा मामा आहे! राजमाता माद्रीदेवींचा सख्खा बंधू आहे! हे युद्ध द्यूतातून निर्माण झालं असलं तरी या निर्वाणीच्या वेळी तू द्यूताचं युद्ध आता पुन्हा खेळू नकोस!" त्यानं आपले कानांकडे निमुळते होत गेलेले निळे डोळे ताणले. सोनेरी कपाळावर आठयांचे वेग आखडले!

"कर्ण, शल्याला या युद्धापूर्वीच मी सर्व राजांहून वेगळी अशी मानाची वागणूक दिलेली आहे. मद्र देशाहून तो कुरुक्षेत्राकडे जायला निघाला होता ते वास्तविक पांडवांना मिळावं म्हणूनच! पण जागजागी त्याच्या मार्गावर वेशी उभारून, राजदूत ठेवून, त्याला बहुमोल देणग्या देऊन मी त्याला आपल्या पक्षाकडे वळवून घेतलं आहे. युद्धात कुरूशी एकनिष्ठ राहण्याची त्यानं मर्दिनीची प्रतिज्ञा घेतली आहे. गेले सोळा दिवस तो प्राणपणानं, निष्ठेनं आपल्यासाठी लढला आहे, वारंवार भीमाला अंगावर घेऊन त्यानं अनेकांना आपलं समर्थ संरक्षण दिलं आहे. विश्वास ठेव, शल्य आता कधीच मागं परतणार नाही. क्षत्रिय पश्चात्ताप करीत नसतात. परतत नसतात – प्रसंग पडल्यास पावन होण्यासाठी मृत्यूलाही कवटाळतात. तुला माहीतच आहे. नाती ही सामान्यांसाठी असतात, राजांच्यासाठी निराळीच नाती असतात, ती असतात – वचन – एकनिष्ठा – रणांगण!" त्यानं कर्णाच्या उत्तराची वाटही न पाहता एक जोरदार टाळी दिली. क्षणातच प्रभंजन शिबिरात घुसला.

"प्रभंजन, जा, मद्रराज शल्यमहाराजांना पाचारण कर!" त्यानं शल्याच्या शिबिराच्या दिशेनं बोट उंचावले.

क्षणातच शल्य त्या दोघांसमोर उभा ठाकला. त्याची अपेक्षा होती की, एकटा दुर्योधनच शिबिरात असेल, फार तर अश्वत्थामा असेल, शकुनी असेल, पण समोर कर्णाला पाहताच त्याच्या कपाळावर आठया चढल्या! त्याला काहीच माहीत नव्हतं की, कर्ण खऱ्या अर्थानं त्याचा कोण होता ते! शिवाय, दिग्विजयातील कर्णानं त्यांची केलेली

जीवघेणी होलपटही तो विसरला नव्हता. त्याच्याकडे उपहासानं पाहून शल्यानं उत्तरीयाचा शेव उगाच झटकला. त्या सूर्यपुत्राला शल्याच्या त्या दांभिक क्षत्रियत्वाचा राग वाटला नाही, तिरस्कार वाटला नाही, खेद वाटला नाही! तो अचल होता, स्तब्ध होता!

''मद्रराज, एका महत्त्वाच्या निर्णयासाठी मी तुम्हाला या अवेळी पाचारण केलंय!'' दुर्योधनानं दाटलेली कोंडी फोडली.

''कोणता निर्णय कौरवराज?'' शल्यानं कर्णाकडे पाठ फिरवीत आपले डोळे दुर्योधनावर रोखले.

''उद्याच्या दिवसाचं सर्व यश आता केवळ तुमच्याच हाती आहे!'' घारे डोळे रोखत दुर्योधनानं शल्याला घेरलं.

''माझ्या? ते कसं काय?'' शल्यानं बोलण्याचा रोख न कळल्यामुळे आठ्या वाढवीत विचारलं.

''मद्रराज, उद्या... उद्या कुरूंच्या सेनापतीच्या महारथाचं सारथ्य... केवळ तुम्हीच करू शकता!'' दुर्योधनानं बळकट हात शल्याच्या खांद्यावर चढविला आणि त्याच्या मनाचा अंत घेण्यासाठी त्याच्यावर घारे डोळे रोखले!

''युवराजाऽऽ...!'' ही दोनच अक्षरं मोठ्यानं उच्चारून शल्य क्षणभर शांत झाला. क्षणात कर्णाकडे तोंड वळवून, तो सारथ्यानं घोड्याच्या शेपटीतील विरूप दिसणारे केश तटातट उपसावेत, तसे शब्द ओतू लागला –

''या सूतपुत्रानं माझ्यावर सूड उगविण्याचा हा एवढा घोर अन् नीच मार्ग तुला शेवटी सुचविला की काय? पांडवांवर न उगविता आलेला प्रतिशोध तो तुझ्या मध्यस्थीनं आता माझ्यावर उगवू पाहतोय काय? कौरवश्रेष्ठा, एका सारथ्याच्या रथाचं सारथ्य करायला तू एका उच्च कुलस्थ क्षत्रियाला सांगतो आहेस!! ज्यानं आमच्या रथाचे घोडे वागवावेत, त्यांना अश्वखाद्य चारावं, त्याच्या घोड्यांचे वेग मी हाती घेऊ? आम्ही असताना तू याला सेनापती केलंस हेच मुळात चूक आहे – अवास्तव आहे!'' शल्य कडाडला.

तरीही तो राधेय स्तब्ध होता! अविचल होता!! जाळीदार गवाक्षातून एकटक बाहेरच्या अंधाराकडे पाहत होता!

''मद्रराज, ज्या कुरूंच्या वतीनं लढण्यासाठी तुम्ही आज आला आहात त्या कुरूंनी अंगराज कर्णाला क्षत्रियत्वाचा बहुमान सर्व नगरजनांसमोर एकमुखानं अर्पण केला आहे – राज्याभिषेक करून त्यांना सेनापतीपद दिलं आहे! शिवाय कुरूंच्या वतीनं लढण्यासाठी आलेले सर्व राजे दिग्विजयी अंगराजाचे मांडलिक आहेत हे विसरू नका. मला संधी आणि सत्ता असती, तर अंगराज कर्ण पहिल्याच दिवशी कुरूंचा सेनापती झालेला तुम्हाला दिसला असता! मला स्वत:ला सारथ्यकर्म कुशलतेनं करता आलं असतं, तर मीच त्याच्या रथाचे घोडे आनंदानं आरोळ्या देत वागविले असते! निर्णय तुमच्या हाती आहे! कुरूंचा ज्येष्ठ युवराज म्हणून लक्ष-लक्ष योद्धयांच्या प्राणांशी निगडित अशा तुमच्या सारथ्यकलेला, माझं या निर्वाणीच्या वेळी हे आवाहन आहे!'' दुर्योधनानं शेवटचा गदेचा हात फिरविला!

उफाळलेला शल्य क्षणात विचारमग्न झाला. कर्णाच्या निमुळत्या पायांकडे एकटक पाहू लागला. डोळे बारीक करू लागला. कपाळावर आठ्यांची जाळी विणू

लागला आणि थोड्या वेळानं विचारपूर्वक म्हणाला, "कौरवराज, मी तयार आहे!" शिबिराबाहेर पडताना शल्यानं आपल्या उत्तरीयाचा शेव उपहासानं उडविला नाही!

तो बाहेर जाताच दुर्योधनानं आवेगानं पुढं होत कर्णाचे पुष्ट दंड आपल्या हातात धरले....

"अंगराज, जे पितामहांना शक्य झालं नाही, गुरू द्रोणांना शक्य झालं नाही ते तूच उद्या शक्य करू शकशील. तुला आठवतोय वासंतिक आखाड्यातल्या नीलकमलांच्या माळेखाली चिरडला गेलेला धनुर्धर कर्ण? आठवतोय तुला कांपिल्यनगरातील स्वयंवर – मंडपातील तलावात काळं पडलेल्या मुखाचं प्रतिबिंब पाहणारा वीर कर्ण? आठवतोय – सुदामनच्या चितेचा गंगेकाठचा भडका तुला? आठवतोय – शोणाच्या शिरस्त्राणाचा भुगा? आठवतोय ना तुला पितामह, गुरू द्रोण, शोण आणि सत्यसेन यांच्या तडफत्या पराक्रमाचा आक्रोश? अंगराज, उद्या अर्जुनाच्या धनुष्याची प्रत्यंचा अशी तुटली पाहिजे की, प्रत्यक्ष तिच्या तुटल्या बंधाचा विळखाच पाशासारखा अर्जुनाच्या निळ्या गळ्याभोवती करकचून आवळला गेला पाहिजे! त्याच्या रथावरच्या निळ्या सारथ्याला कळताही कामा नये की, अर्जुन काळा – निळा होऊन एकाएकी कसा कोसळला. बोल, अंगराज बोला!" त्यानं त्याचे दंड गदागदा हलविले. त्याचे घारे डोळे कर्णाच्या विशाल कपाळावर आपलं भविष्य वाचण्यासाठी भिरभिरत होते!

"कौरवश्रेष्ठा, तुला विजय मिळवून देण्यासाठी मी प्राणही पणाला लावीन, जा, पण भोवतीच्या नगरातील याचकांना उद्या मुक्तदान मिळेल अशी दवंडी फिरव!!" त्यानं दुर्योधनाला धैर्य दिलं.

घरंगळलेलं उत्तरीय आनंदानं पुन्हा सावरून त्याचे पीळदार, पुष्ट दंड थोपटून दुर्योधन त्याच्या शिबिरातून बाहेर पडला. भोवतीच्या पलित्यांतील एक पलिता हाती घेऊन प्रभंजन त्याला मार्ग दाखवू लागला. दोघांच्याही आकृत्या दुर्योधनाच्या शिबिरात शिरून लय पावल्या. सोळाव्या दिवसाची – शुद्ध द्वितीयेची रात्र, उद्याच्या पोटात काय आहे याचा कानोसा घेत, मांडीवरच्या कुरुक्षेत्राला झोपविण्यासाठी दृषद्वतीच्या काठच्या थंड वायूचे हात करून त्याला थोपटीत होती. तरीही कुरुक्षेत्राला झोप काही येत नव्हती!! येणार नव्हती!!!

दूतानं सर्व इतिवृत्तान्त धावत येऊन आम्हाला निवेदन केला. तो ऐकताना कुणीतरी एक हास्यास्पद कल्पना मांडली. "मद्रराज शल्याच्या पांडवांशी असलेल्या नात्याच्या रेशमी धाग्यांची आठवण देऊन फोडण्यासाठी नकुल – सहदेवांना त्याच्या शिबिरात पाठवावं! ते शक्य झालं नाही तर – निदान शल्याला असं सुचविलं जावं की उद्याच्या युद्धात सारथ्य करताना कर्णाला मर्मभेदी बोलून शल्यानं वारंवार त्याच्या हीन कुलाची त्याला जाणीव करून देऊन कर्णाचा तेजोभंग तरी करावा!" किती विचित्र कल्पना होती ही!

ती मांडणाऱ्यांना याची जाणीवही नव्हती की, शल्यासारखा मानी राजा आपल्या धवल क्षत्रियत्वाला कलंक लावणारं असं काहीही कृत्य करण्यास कधीही तयार झाला नसता! नात्याच्या लोभापोटीसुद्धा!! तसं त्याला वाटलं असतं, तर सोळा दिवस सतत गर्जणाऱ्या, घुमणाऱ्या युद्धात त्यानं कौरवांचा केव्हाच विश्वासघात केला असता! कौरवांकडून लढणं त्याला मान्य झालं नसतं, तर आपलं विशाल सैन्य घेऊन तडक तो

पुन्हा मद्रदेशाला माघारी निघून गेला नसता काय?

आजवर युद्धात वीरांना एक वेळ क्षम्य असलेलं क्रौर्य दिसलं होतं – विश्वासघात नव्हे!!

आणि शल्यानं खूप मनात आणलं असतं तरी कर्णाचा तेजोभंग होणं कधीतरी शक्य होतं काय?

आपल्या जन्मदात्या मातेकडून पांडवांशी आपलं कोणतं नातं आहे हे ऐकूनही कौरवांच्या बाजूनंच लढण्यासाठी जो समरांगणात उतरला होता – तो कर्ण आता काही झालं तरी अधिक संहारकच ठरणार होता. मरणाच्या दारातील पितामह भीष्मांनी सांगितलेला सल्ला ज्यानं वचनपूर्ततेसाठी कवच-कुंडलांसारखा क्षणात दूर सारला होता तो कर्ण आता, आपण सूर्यपुत्र आहोत हे त्याला कळल्यावर शल्यासारख्याकडून कसा काय तेजोहीन होणार होता?

तसं काही शक्यच नव्हतं. शल्याकडून आणि कर्णाकडूनही!!

मी सर्वांना शांतपणे झोपी जायला सांगितलं! मला माहीत होतं, अमावस्या संपली असली तरी आता येणाऱ्या रात्री अधिक अंधाऱ्या होत्या!

युद्धाचा सतरावा दिवस उजाडला. शुद्ध तृतीयेचा दिवस होता तो! दोन्ही पक्षांकडील सैन्यसंख्या आता अर्ध्याहून अधिक कमी झाली होती! अनेक शिबिरं आत योद्धे नसल्यामुळे तशीच सुनी होती. घोडे काढलेल्या अश्वशालेसारखी!

पहाटेच्या संधिप्रकाशात कौरवांचा सेनापती झालेला तो पहिलाच पांडव, 'कर्ण किल्ला' नावानं गेले सोळा दिवस त्याची सैन्याची हालचालींच्या टेहळणीची जागा म्हणून सर्वपरिचित झालेल्या टेकडीवजा किल्ल्यावर उभा राहिला. ती सर्व टेकडी दवंडी दिली गेलेली असल्यामुळे कुरुक्षेत्राभोवतीच्या नगरांतील याचकांनी घेरली होती! निरनिराळ्या आकारांची सुवर्णतबकं हिरे, माणकं, वैदूर्य, मोती, प्रवाळ यांनी काठोकाठ भरून त्याच्या सभोवती मांडली होती. दिग्विजयात मिळविलेल्या अलोट संपत्तीतील उरलासुरला धनभागही तो आज मुक्त हस्तानं सर्वांना दान करणार होता!

त्याच्या मस्तकावर माझ्या मुकुटाच्या आकाराचाच मुकुट होता. मनगटात निशिगंधाच्या माला होत्या!

राजपुरोहितानं सुचविलेल्या पहाटेचा सुमुहूर्त येताच त्यानं आपले गुलाबी तळवे हिरेमाणकांच्या ठासून भरलेल्या तबकांत खुपसले. मुठी भरभरून तो समोर येणाऱ्या प्रत्येक याचकाला दान करून पुन्हा दोन्ही हात जोडून विनयानं वंदन करीत होता. त्याचं जे मस्तक जरासंधासमोर नमलं नव्हतं, शल्य, शीघ्र, रुक्मरथ या मानी राजांसमोर नमलं नव्हतं, विक्रमी पांडवांसमोर नमलं नव्हतं, एखाद-दुसरा प्रसंग सोडून कधी माझ्या समोरही नमलं नव्हतं, कसोटीचा प्रसंग येताच जमदग्निपुत्र परशुरामासमोरही नमलं नव्हतं; तेच पुष्ट, गोल, हिरण्यवर्णी सूर्यफुलासारखं मस्तक तो कानटोप्या घातलेला कृश याचकांसमोर मात्र प्रत्येक वेळी आदरानं नमवीत होता!! का? कशासाठी? मी ते समजू शकत होतो, कारण... सामान्यांच्या निर्लेप शुभेच्छा कोणत्याही आशीर्वादापेक्षा अधिक श्रेष्ठ असतात! तो आता सामान्यांचे आशीर्वाद घेत होता. एक अशरण योद्धा म्हणून!

त्याचं दानसत्र पूर्ण होत आलं तरी नेहमीसारखा सूर्यकिरणांच्या सोनेरी प्राजक्तफुलांचा सडा काही कुरुक्षेत्रावर पडला नाही! आकाशाचं निळं छत पांढरट भुरक्या ढगांनी झाकाळलं होतं!! नेहमी सूर्योदयाबरोबर चित्रविचित्र आवाजांचा

कलकलाट करणारे कुरुक्षेत्राभोवती उभ्या असलेल्या कदंब, किकर, मधुक, किंशुक या हिरव्या डेरेदार वृक्षांवरचे पक्षिगण उगाच चोचीतल्या चोचीत घुमत होते. एरवी सूर्योदयाबरोबरची तरतरणारी कुरुक्षेत्रावरची जाड तृणपाती माना टाकून तशीच अर्धवट झोपल्यासारखी मलूल होती. त्यांच्यावरचे शारदीय दवबिंदू चमकत नव्हते! चमकणार नव्हते!! कारण वातावरण कुंद होतं!

**

# आठ

आजचं रणक्षेत्रं ‘अमीन’ नावाच्या एका अतिशय उंच टेकडीच्या पायथ्याजवळ निवडण्यात आलं होतं! पूर्वेकडून कुरूंची आणि पश्चिमेकडून पांडवांची सेना रणभूमीजवळ दाटत होती.

मद्र, मगध, मत्स्य, मथुरा, मालव, वत्स, वंग, विदेह, विदर्भ, कुलिंद, किरात, काशी, कोसल, कांबोज, कामरूप, निषाध, आभिर, गांधार – आर्यावर्तातील सर्व – सर्व देशांचे युद्धोत्सुक योद्धे युद्धाचा शेवट काय होणार या साशंकतेने कुरुक्षेत्राभोवती दाटले होते. एकनिष्ठेने लढण्यासाठी सिद्ध झाले होते. शाकल, गिरिव्रज, विराटनगर, अवंती, प्रयाग, ताम्रनगर, कुसुमपूर, कुंडिनपूर, चंदनावती, काष्ठमंडप, वाराणसी, अयोध्या, चंपावती, महिष्मती, पुष्करावती सर्व राजनगरांचे विविध रंगांचे वेगवेगळ्या आकाराचे सर्व राजध्वज रणक्षेत्राला मानवंदना देत डोलू लागले.

आज कुरुसैन्यानं सूर्यबिंबासारखा गोलाकार आकार घेतला होता!! कितीतरी योजनं घेराचा हा गोल, सेनापती कर्णाच्या जैत्ररथाच्या मागं पसरला होता! त्या राधेयानं आपल्या जैत्ररथाला वंदन करून प्रदक्षिणा घातली. डोळे मिटून तो सूर्यस्तोत्र म्हणत होता.

मृत्युदेव यमाचं वाहन असलेल्या महिषासारखा आकार घेऊन पांडवांचं सैन्य अर्जुनाच्या नंदीघोष रथामागं आज उभं होतं! त्याचं शेवटचं पथक सरळ अमीन टेकडीच्या पायथ्याशी जाऊन भिडलं होतं.

मनगटांत निशिगंधाच्या टपोऱ्या कळ्यांच्या माला करकचून बांधलेला कर्ण, शूल, तोमर, पट्टे, गदा, दिव्यास्त्रं, खड्ग, चक्र, भीदिपाल, शतघ्नी आणि असंख्य प्रकारच्या बाणांच्या भात्यांनी ज्याचा पार्श्वभाग ठासून भरला आहे अशा, साखळदंडांकित ध्वज माथ्यावर मिरविणाऱ्या आपल्या जैत्ररथात आपला उजवा पाय पायदंडीवर ठेवून चढला! त्याच्या भारानं कचलेल्या रथावरच्या घंटा लडलडताना किणकिणल्या, पुष्पमाला डोलल्या, माथ्यावरच्या हत्तीच्या साखळदंडाचं सुचिन्ह अंगावर असलेला ध्वज क्षणभर कचून पुन्हा ताठ झाला! तो वीर सेनापती रथारूढ होताच त्याचा सारथी शल्य रथनीडावर झेपावला. त्यानं त्याच्या हस्तिदंतासारख्या शुभ्रधवल दिसणाऱ्या उंच, पुष्ट घोड्यांचे वेग हाती घेतले. त्यांतला एक घोडा खूप उंच होता. व्याघ्रचर्मानं वेढलेल्या घुमटात खोचलेला प्रतोद उपसून शल्यानं हातात घेतला.

शल्य – पांडवांचा मामा – सारथी! मी स्वत:शीच हसलो. काळानं शल्यावर फार मोठा सूड उगविला होता!

पांडवसैन्याच्या अग्रभागी उभ्या असलेल्या अर्जुनाला मी रथारूढ व्हायला सांगितलं, पण तो तसाच उभा राहिला. मी रथारूढ होऊन हाती वेग व प्रतोद घेतल्याशिवाय तो आज नंदीघोषावर चढणारच नव्हता. क्षणभर हसून मीही नंदीघोषावर पाय ठेवला. जाणीवपूर्वक डावा! हातात आसूड पेलून त्याचा अवकाशात दमदार आवाज काढला.

रथारूढ होऊन मी माझ्या शुभ्र पांचजन्य शंखातून युद्धप्रेरक बोल काढताच अर्जुनही रथारूढ झाला. आपल्या देवदत्त शंखातून तो माझ्या बोलांचं स्वरन्स्वर अचूक अनुकरण करू लागला!

आज पहिल्यानंच आमच्या सेनेनं आमच्या दोघांच्या नावांचा जयघोष करून कल्लोळ माजविला. त्या जयघोषांचे आवाज अमीन टेकडीच्या भक्कम भित्तीला थडकून पुन्हा पांडवसेनेत घुमू लागले. कुरुक्षेत्राचा परिसर निनादून गेला.

आकाश अजूनही कोंदटलेलंच होतं! कुरुक्षेत्रावरच्या निळ्या छताला भेदून जाणाऱ्या नेहमीच्या जयघोषांच्या तुमुल आवाजानंच ते आता कधीतरी निवळलं तर निवळणार होतं!

पांडवसैन्यातील जयनाद ऐकताच कुरूंचा तो सेनापती सरसरत फुलणाऱ्या सूर्यफुलासारखा एकदम फुलून निघाला – आता तो केवळ कर्ण नव्हता, राधेय नव्हता, कौंतेय नव्हता, नाती तर त्यानं कवच – कुंडलांसारखी केव्हाच दूर सारली होती. तो होता केवळ सेनापती – केवळ जाळता सूर्यपुत्र! त्यानं क्षणभर पूर्वेकडच्या कोंदटलेल्या क्षितिजाकडे पाहिलं.

आपला टपोरा, शुभ्र 'हिरण्यगर्भ' शंख दोन्ही हातांच्या विशाल पोकळीत घट्ट पकडून त्यानं मागं पसरलेल्या कुरुसैन्याच्या गोलाकृतीवर एकदा दृष्टी टाकली. दुसऱ्याच क्षणी पुष्ट हत्तीच्या पायासारखा दिसणारा त्याचा कंठभाग स्फुरून निघाला. रक्तमय धमन्या ताठरल्या. आपल्या विशाल छातीत आवतीभोवतीची हवा कोंडून तो तिचे योद्धयांच्या अंगावर रोमांच उभे करणारे, प्रत्यक्ष मलाही अपरिचित असलेले, कसलेतरी दिव्य बोल मान गगनगामी उठवीत आपल्या हिरण्यगर्भ शंखातून एकलग बाहेर काढू लागला! दुंदुभी, नगारे, मृदुंग, डिंडिम या रणवाद्यांचा आवाज भेदूनही त्याच्या शंखाचे बोल मला पांडवसेनेपर्यंत स्पष्ट ऐकू येत होते! ते ध्वनी नव्हतेच – सळसळणाऱ्या आवेगी प्रकाशलाटाच होत्या त्या!!

आपल्या उजव्या हातातील विजय धनुष्य पुन:पुन्हा उंच उंचावीत, 'आऽऽरोऽऽह, आऽऽक्रम' अशी घोषणा देत तो पर्वकालातील खवळलेल्या समुद्रासारखा गर्जना करीत येऊ लागला! येऊ लागला, पिसाट अरण्यवाऱ्याचं मृत्युगीत बरोबर घेऊन! येऊ लागला, विजेचा लोळ बनून सभोवतीचा भूभाग जाळणारा ज्वालामुखी बनून! येऊ लागला, झाकाळलेल्या सूर्याचं कुरुक्षेत्राला पोळण्याचं कार्य पुत्रकर्तव्य म्हणून स्वत: पार पाडण्यासाठी, प्रतिसूर्य होऊन!!

त्या तेवढ्या अफाट कौरव – पांडव सैन्यात माझ्याशिवाय एकालाही माहीत नव्हतं की, तो साक्षात सूर्यपुत्र आहे!! कुरूंचे सैनिक 'अंगराज ' म्हणून त्याचा जयघोष करीत होते. पांडवांचे सैनिक 'राधेय ' म्हणून त्याच्या पराक्रमाची आपणाला काहीच धास्ती नाही, अशी स्वत:ची वेडी समजूत घालीत होते. कोणी – कोणीही त्याला 'सूर्यपुत्र' म्हणत नव्हतं!!! तरीही आता स्वत:ला पूर्ण जाणून घेतलेला तो सूर्यपुत्र अडग, अच्युत, अमित वीर्यवान, अमर्षी, अशरण दानवीर चालून येत होता!

त्याला संरक्षण देत त्याचे पुत्र वृषसेन व चित्रसेन, अश्वत्थामा, शकुनी, दु:शासन, कृप, दुर्योधन, कृतवर्मा, सर्व अतिरथी, कौरवयोद्धेही त्वेषानं पांडवसेनेवर चालून येत होते.

मी नंदीघोषातून पुन्हा खाली उतरलो. शिबिरात जाऊन रथकण्याला

लावण्याच्या वंगणाची काष्ठनलिकापात्र घेऊन आलो! आमच्या नंदीघोषाला संरक्षण देत भीम, सात्यकी, उत्तमौजा, धृष्टद्युम्न, नकुल, सहदेव, युयुधान यांचे रथ दौडू लागले. धुळीचे प्रचंड लोळच – लोळ अवकाशात झेपावू लागले. रणवाद्ये, जयघोष, हत्तींचे चीत्कार, घोड्यांचं खिंकाळणं, रथचक्रांची घरघर, ताणलेल्या प्रत्यंचांचे टंकार या सर्वांचा मिळून तयार झालेला एक विचित्र संमिश्र आवाज अमीन टेकडीच्या तटबंदीला थडकत घुमून प्रतिध्वनित होऊ लागला. रणभूमीवरच्या खाचखळग्यांतून दौडणाऱ्या ध्वजदंडांवरील ध्वजपताका हबके घेऊ लागल्या. आसुडाच्या फटकाऱ्यांचे आवाज घोड्यांच्या खिंकाळण्यांत विरू लागले. गरुड पक्षयांचे दोन एकमेकांविरुद्ध दिशेनं येणारे नवे थवे क्रोधानं एकमेकावर पंखांची थरकाविणारी सणकारती फडफड करीत भयानकपणे आदळावेत तसे दोन्ही सैन्यांचे योद्धे, बाण फेकीत एकमेकांवर भयंकरपणे आदळले. सैन्याला सैन्य भिडलं! युद्धाला तोंड फुटलं!

रथातून फेकलेले मैरयक मद्याचे रिकामे कुंभ कुरुक्षेत्रावर घरंगळत इतस्त: धावू लागले! त्यावरून झेपावताना कित्येक रथांचा तोल जाऊन आणि त्यातच मागचे अश्वसाद अंगावर आल्यामुळे अनेक रथांचा चुराडा झाला!

कर्णाचा जैत्ररथ धरतीला भयानक हादरे देत त्याच्या हंसवर्णी पाच पांढऱ्या घोड्यांनी असा खेचून आणला की, क्षणापूर्वी युद्धभूमीच्या एका कडेवर समोर उभा असलेला तो अरिंदम महावीर, पांडवसेनेतील पांचालाच्या हत्ती, घोडे, पायदळ ह्या तिन्ही विभागांनी ठासून भरलेल्या आघाडीच्या फळीत केव्हा घुसला हे कळलंही नाही! तो अभय सेनापती कंठरवानं असा आरोळ्या देत होता की, रथांतून व घोड्यांवरून कोसळलेले कुरुसैनिक, त्याला निसटताही बघताच पुन्हा चेतावून उठत होते. मिळेल त्या वाहनावर आरूढ होऊन पांचालांवर झेपावत होते. समुद्राला मिळणाऱ्या महानदानं स्वत:बरोबर असंख्य लाटांचं तांडव नृत्य घेऊन गर्जत यावं तसा तो मद्य व रणमस्ती अंगात भिनलेली कुरूंची घोडे, हत्ती व पदाती यांची भानरहित, उफाळलेली शेकडो पथकं घेऊन आला होता. त्याच्या उजव्या व डाव्या बाजूला चित्रसेन व प्रसेन आणि त्याच्या पाठीमागून वृषसेन असे त्याचे तीन विक्रमी पुत्र त्रिदळी बिल्वपत्रासारखं त्याला संरक्षण देत दौडत आले होते.

किरणांसह सूर्यबिंब अंगावर झेपावून आलं आहे की काय; असा भास त्यांना एकत्र येताना पाहून पांडवसेनेला झाला.

त्याला तसा समोरून येताना पाहून आमच्या मागून उधळलेली इंद्रप्रस्थाची पथकं थोडा वेळ थांबवावीत म्हणून अर्जुनाचा रथ मी मध्येच थांबविला, कारण मला माहीत होतं की, माझा रंग आपल्या निळ्या डोळ्यांनी अचूक निरखून तो अर्जुनावरच चालून येत होता. त्याच्या चपळ हालचालीच ते सांगत होत्या.

तो जवळ-जवळ येताच आमच्या थोडंसं पुढं गेलेलं डाव्या हाताचं, धृष्टद्युम्नाचं पांचाल सैन्य एकदम आडवं घुसून आमच्या सेनेसमोर उभं ठाकलं! धृष्टद्युम्नाला पहिल्या प्रहराची ही चाल मी रात्रीच नीट समजावून सांगितली होती. त्यानं ठरल्याप्रमाणे आमच्या समोर आपली पांचाल सेना घुसवून त्या ज्वालामुखीला अंगावर घेतलं! अचानकपणे पांचालांची पथकं समोर पाहून घायाळ क्रुद्ध हत्ती सरोवरात घुसतो तसा तो सरळ पांचालांच्या पथकात घुसला. हातातील विजय धनुष्य उंच उंचावीत, गोल गरगर फिरत, विषारी बाणांच्या संतत मृगधारेसारख्या, सरींवर सरी पांचालांच्या अफाट

गजपथकावर वर्षवू लागला. विष अंगी भिनलेले हत्ती खवळून इतस्तत: सैरावैरा धावू लागले. त्यांच्या कर्कश चीत्कारांनी पांचालांच्या पथकात काय – काय चाललं आहे, हे कुणालाच समजेना! धुळीचे लोट कोंदटलेल्या आकाशाला कोंदटून टाकू लागले!

ज्या पांचाल योद्धयांनी द्रौपदीच्या स्वयंवराच्या वेळी त्याची झालेली भर मंडपातील अवहेलना हास्याची खसखस पिकवत पाहिली होती, त्यांना आता तो सूर्यपुत्र मृत्यूचं रूप घेऊन प्राणभयानं चीत्कारायला लावीत होता. रसरसलेलं यज्ञकुंड समिधांच्या मोळ्यांची जाळून राख करतं तसे त्याचे अग्निबाण पांचालवीरांना जाळून काढीत होते. तांबड्या फुलांनी फांद्याफांद्यावर डवरून गेलेला पलाश वृक्ष त्यावर तांबसर सारंग पक्षयांचे थवेच्या थवे उतरताना जितका रक्तवर्णी व भडक दिसेल तितका तो संतप्त राधेय भयावह दिसत होता. पायथ्याजवळ दाट कुरणात भडकलेला वणवा सरसरत अरण्याकडे धावतो तसा तो निर्भयपणे पांचालांच्या संरक्षणाच्या फळ्यांवर फळ्या फोडत, आपल्यामागून येणाऱ्या वीरांना चेतावणी देत पुढं – पुढंच धावत होता.

जीवनभर अंगी भिनलेला संभ्रम त्यानं आता दूर सारला होता. आता त्याच्या अंगी केवळ युद्धाची सहजासहजी न उतरणारी एकमेव मदिरा भिनली होती. तो दौडत आला होता. कुरणात चरणाऱ्या रानघोड्याच्या कळपात एखादा क्रुद्ध, उपाशी सिंह डरकाळ्या फोडीत घुसावा तसा तो पांचालांच्या पथकांत घुसला होता.

केवळ अर्ध्या घटकेतच त्यानं पांचालांची आघाडीची सर्व पथकं उधळून लावली. टोळधाडींसारखेच त्याचे बाण होत. मृगाच्या सतत कोसळणाऱ्या पावसाच्या थेंबांसारखे ते एकमेकांचे शेपूट पकडत अखंड कोसळत होते. हाताच्या चारी बोटांच्या खोबणीत पाच-सहा मिळतील तेवढे बाण एकदम घेऊन तो एका – एका फेकीतच ते सारे अचूक फेकीत होता. डोळ्यांचं पातं लवतं न लवतं तोच अशा असंख्य फेकी त्याच्या अवजड धनुष्यातून चारी दिशांना दौडत होत्या. भात्यातून बाण केव्हा काढून, तो ते केव्हा प्रत्यंचेवर चढवून, त्यांची फेक केव्हा साधत होता तेच कळत नव्हतं. नदीच्या ओघातील लव्हाळं पाण्याच्या धारेबरोबर एकसारखं लडलड हलत राहतं तसे त्याचे दोन्ही हात आणि डोळे फेक करताना सतत हलत होते! क्षणाक्षणाला पांचाल पटापट खाली कोसळत एक-एक पाऊल मागं – मागं सरकू लागले! फळी दुभंगत होती. पांचालांचा नायक धृष्टद्युम्न माघार घेऊ लागला.

पांचालाची माघार थोपवावी म्हणून चेदी, सात्यक व इंद्रप्रस्थाची पांडवपथकं त्यांच्या साहाय्यासाठी धावली, पण बाहेरच्या ओढ्याचं पाणी अंगावर घ्यायला तयार नसलेल्या भरतीच्या समुद्रासारखा तो दीर्घबाहू, पहिला पांडव त्यांना परतवून लावू लागला. चेदींच्या गजदलात घुसून त्यानं असा काही कल्लोळ माजविला की, चेदींना आपला कोण आणि शत्रू कोण हेही कळेना! पहिल्या घटकेतच कर्णानं भानुदेव, चित्रसेन, सेनाबिंदू, तापन आणि शूरसेन या विख्यात पांचालवीरांना कंठस्नान घातलं. शेकडो हजारो चेदिवीर आणि सात्यक त्याच्या उंच रथाखाली रगडले गेले. विजेचा अनिर्बंध लोळ कडाडत गगनमंडलात स्वैरसंचार करतो तसा तो चतुरंगदलात 'हाणा... मारा... ' असं ओरडत फिरू लागला!

मी पांचालांमागूनची अर्जुनाची पथकं हळूच काढून ती संशप्तकांच्या सेनेला भिडविली. अर्जुनाचे अमोघ बाण माझ्या माथ्यावरून सूँऽ सूँऽऽ असा सलग आवाज करीत उधळत होते, संशप्तक वाट फुटेल तसे धावत होते. अर्जुनाची सेना त्यांना पाठलाग करून गाठू लागली. बाणफेकीनं टिपू लागली.

**

# नऊ

आघाडीची रणफळी फोडून आत घुसलेल्या कर्णाची आणि युधिष्ठिराची गाठ पडली! धर्मप्रिय युधिष्ठिराचा रथ समोर दिसताच त्यानं पहिल्याच बाणात त्याच्या रथावरची श्वेतपताका सरळ खाली पाडली. तुरा कापून टाकलेल्या मोरासारखा त्याचा रथ कर्णापासून बचावण्यासाठी चपळाईनं हालचाली करीत होता, पण प्रत्येक मुखावर त्याला कर्णच सामोरा जात होता! प्रत्यक्ष अंगावर बाण न फेकता रथाच्या दंडांत आणि लाकडी भात्यांच्या तोंडावर कर्ण असे बाण रुतवीत होता की, हातात धनुष्य असूनही त्या रुतलेल्या बाणांमुळे युधिष्ठिराला काही हालचालच करता येत नव्हती! बराच काळ युधिष्ठिराची अशी त्रेधा करून शेवटी त्यानं त्याचा सारथी इंद्रसेन याला रथावरून कोसळविला. इंद्रसेन क्षणातच गतप्राण झाला.

एकाकी पडलेल्या युधिष्ठिराला साहाय्य करण्यासाठी धृष्टद्युम्न, सात्यकी, द्रौपदीचे पाची पुत्र, शिखंडी, भीम व नकुल – सहदेव धावले. त्यांचं भोवती पडलेलं कडं तो राधेय असा भेदीत होता की, त्यांना एकवटून हल्ला करण्याची संधीच मिळत नव्हती.

पहिला प्रहर संपत आला तशी आकाशातील अभ्रं आता निवळून निघाली. कुरुक्षेत्राची भूमी उजळून निघाली. आपल्या किरणांनी सर्व चराचरांत चैतन्य ओतणारा आकाशाचा सम्राट सवितृ पूर्वेला उभा ठाकला! त्याचे उबदार किरण, दंडाला स्पर्शताच कर्णानं एक क्षणभरच आपलं विजय धनुष्य थांबविलं. डोळ्यांचं मुख करून तो त्या तळपत्या सूर्यबिंबातील तेजोरस घटाघटा पिऊ लागला. त्याची तीच मदिरा होती. त्याचं धनुष्य थांबलेलं पाहून त्याचा सारथी शल्य 'सूतपुत्र, सूतपुत्र' म्हणून त्याला सावधानतेचा संकेत करू लागला! शल्याला सत्य माहीत नव्हतं – आणि असतं तरी ते आकलनीय नव्हतंच नव्हतं!

सूर्यदर्शन होताच शरीराबरोबर त्या महावीराचं मनही फुलून निघालं. समोरची युद्धभूमी त्या सोनेरी आकाशवीराला कस्पटासमान वाटू लागली. क्रौंच पक्षयाच्या पिसांसारखे रंगीत बाण फेकत तो प्रभद्रक, चेदी आणि पांचाल यांच्या पथकांत शार्दूलासारखा गर्जना करीत घुसला.

तो युद्धात गुंतला आहे ही संधी साधून महापराक्रमी भीम कौरवसेनेतील मद्र, गांधार, सैंधव यांच्या पथकातील हजारो सैनिक, भरतीच्या समुद्रानं धुंदपणानं किनारा तोडावा तसे तोडीत चालला, आपल्या शक्तिशाली पुत्राचा – घटोत्कचाचा अंत कर्णानं केला याचं शल्य मनात रुतलेला वायुपुत्र भीम समरांगणावर कुठं कर्णाचा पुत्र आपल्या भक्कम बाहूंच्या विळख्यात कवटाळायला मिळतो काय; याची भिरभिरत्या डोळ्यांनी संधी पाहत होता आणि त्याला ती संधी मिळाली!

संकुलयुद्धाच्या धुमाळीत कर्णापासून क्षणाक्षणाला दूर होत चाललेला प्रसेन; त्याच्या दुर्दैवानं नेमका भीमासमोरच आला! हिमालयाच्या लांबरुंद आणि उंच शिखरासमोर निषाधपर्वताचं टेकाड उभं असावं तसा तो भीमासमोर दिसत होता, पण निषाधपर्वताच्या भक्कमपणानंच तो भीमासमोरही उभा ठाकला! तो विक्रमी कर्णपुत्र

भीमाशी अर्धा घटका लढला, पण – पण शेवटी भीमानं फेकलेल्या एका चंद्रमुख बाणानं घायाळ होऊन धरतीवर कोसळला. तडफडून गतप्राण झाला.

'प्रसेन पडला! प्रसेन पडला! भीमानं पाडला.' ही वार्ता कर्णोपकर्णी होत शेवटी कर्णाच्या कानांवर पडली.

चेदी, पांचालांची पथकं दूर सारीत तो भीमाच्या ध्वजावर लक्ष ठेवीत आपल्या गतप्राण पुत्राजवळ आला. त्याचं निश्चेष्ट कलेवर पाहून त्याच्या हातातील विजय धनुष्य थरथरलं आणि क्षणातच हातातून खाली कोसळलं.

'प्रसेना, प्रसेना' म्हणत तो रथावरून धरतीवर झेपावला. आपल्या पालथ्या पडलेल्या प्रिय पुत्राचा मृतदेह सरळ करून त्याचं धुळीत माखलेलं मुख त्यानं ओंजळीत घेतलं! त्याच्या डोळ्यांतून ओघळणाऱ्या अश्रूंच्या सरींनी त्या मुखावरची धूळ थोडी वाहून नेली! काही जळजळीत तप्त अश्रू कुरुक्षेत्राच्या भूमीत विरले!

वर उठून त्यानं क्षणभर आकाशाकडे पाहिलं! त्याच्या उंच, विशाल देहाच्या छायेत पडलेला त्याच्या पुत्राचा महानिद्रा घेणारा देह कौरवांच्या प्रेत उचलणाऱ्या पथकप्रमुखांनी उचलला. त्यानं निग्रहानं पाठ फिरविली! जीवनातील सत्य वाटणाऱ्या आभासांकडे! योद्ध्याला ठायी-ठायी महापाशात बद्ध करणाऱ्या मायावी जगाकडे! हत्तींच्या गंडस्थळावर सिंहानं झेप घ्यावी तशी तरातर चालत येत त्यानं पुन्हा आपल्या उंच रथावर झेप घेतली. कण्यांची घरघर चालू झाली. ठिकठिकाणी असलेले खाचखळगे पार करताना रथाला बसणाऱ्या हादऱ्यांनी त्याच्या रथचक्रातील डाव्या चक्रावरची लोखंडी काढणी आता झिजत आली होती! पण त्याकडे लक्ष देण्याएवढा समयही त्याला आता नव्हता. क्रोधाग्नी ओकणारे त्याचे डोळे भीमाला शोधीत होते! तो कडाडला, "मद्रराज शल्याऽ भीमाला गाठ." शल्याचा आसूड कडाडत पांढऱ्या घोड्यांच्या उन्हात तळपणाऱ्या तजेल पाठींवर उडू लागला!

समरांगणाच्या डाव्या दिशेला त्याचा ज्येष्ठपुत्र वृषसेन आणि नकुल यांची अंगावर रोमांच उभारणारी पंजेफाड जुंपली होती. नकुलासारख्या कसलेल्या पांडवयोद्ध्यालाही तो ज्येष्ठ कर्णपुत्र कुठंच हार जात नव्हता. उलट आपल्या पराक्रमाला वाव मिळणारी ही संधी एकनिष्ठेनं उपयोगात आणीत होता. नकुलाला संत्रस्त करीत होता. 'मी कर्णपुत्र वृषसेन!' म्हणून नकुलाला डिवचून अंगावर घेत त्यानं त्याला एक प्रहरापर्यंत बाणफेकीनं पूर्ण घेरून ठेवलं. जसं कर्णापुढून केलं तसं वृषसेनापुढून पलायन करण्याशिवाय दुसरा मार्गच नसलेला, विरथ नकुल आपल्या साहाय्यासाठी इकडे-तिकडे उत्कंठेनं पाहत होता, पण अर्जुनासह तीनही पांडव संकुलयुद्धात कुठं-कुठं लढताहेत हे त्याचं त्यालाही कळेना! त्यानं शंख फुंकून मदतीची आर्त हाक देणारे करुण बोल काढले. ते ऐकताच पांडवांखालोखाल सैन्यात ज्याचा अग्रक्रम लागत होता तो महापराक्रमी, यादव सेनापती सात्यकी नकुलाच्या मदतीला धावला.

सात्यकी आणि वृषसेन यांचं घनघोर युद्ध जुंपलं, पण अर्ध्या एक घटकेतच सात्यकीनं एक विषारी लिप्त बाण मारून वृषसेनाला मूर्च्छित केलं. लढून – लढून थकलेला तो ज्येष्ठ कर्णपुत्र, शिखरावरून पाषाण कोसळावा तसा धाडकन उभ्यानंच रथात कोसळला. चपळाईनं पुढं होत दु:शासनानं त्या मूर्च्छित वीराला समरांगणाबाहेर आणलं. विशेष प्रेमामुळे नव्हे! तर दु:शासनाला भीमापासून दूर जायचं होतं म्हणून!!

चेदींच्या कशातरी सावरलेल्या गजदलावर नरगज कर्ण पुन्हा तुटून पडला. उरले – सुरले हत्तीही सोंडांची वळवळ करीत आता चीं ऽ चीं ऽ चीत्कारत सैरावैरा धावू लागले. धृष्टद्युम्न, उत्तमौजा, सात्यकी, युयुधान – कोणताही पांडववीर त्या अग्नीच्या महानदाच्या महालोळापुढं टिकाव धरू शकत नव्हता! आजचा अमर्षी कर्ण सर्वांनाच अनावर झाला होता.

वासात्य, निषाद आणि सैंधव यांच्या चतुरंगदलसेनेचा आपल्या गदेनं चुराडा करीत थयथय नाचून भीम, 'दु:शासन दाखवा! दु:शासन दाखवा!' अशा कर्णकर्कश आरोळ्या देत होता.

सुशर्म्याच्या नेतृत्वाखाली लढणाऱ्या संशप्तकांच्या सेना रगडीत आमचा नंदीघोष कौरवसेनेचा सूर्यगोल अर्धाअधिक पार करून पुढं आला होता!

अमीन टेकडीच्या पायथ्याशी संमिश्र आवाजांच्या आघातांनी निनादून गेलेल्या कुरुक्षेत्रावर केवळ तीनच वीर सर्व सेनेत अनिर्बंध फिरत होते – कर्ण, अर्जुन आणि भीम! ते तिघेही कौंतेय होते. एकमेकांचे बंधू होते. त्यांच्याशी लढणाऱ्या सेना माघार घेत धावू लागल्या.

ठिकठिकाणी संकुलयुद्धाची मधाची पोळी फुटली होती! वसंतऋतूतील फळांनी लडलडलेल्या पिप्पल वृक्षावर पक्षयांचे थवेच्या थवे झेपावेत तसे दोन्ही सैन्यांतील योद्धे पथका-पथकांनी एकमेकांवर आवेषानं कोसळत होते. कोण कुठं लढतो आहे, याची दाद उंच रथावरील पांडव व कर्णादी योद्धे सोडले तर आता कुणालाच लागत नव्हती.

**

# दहा

आपल्या पराभवाचा प्रतिशोध घेण्यासाठी अस्वस्थ झालेला युधिष्ठिर द्राविड आणि निषाद यांची राखीव पथकं घेऊन पुन्हा समरांगणात कर्णासमोर उभा राहिला! पण आपल्या पुत्राच्या वधामुळे क्रोधानं भडकून गेलेल्या त्या महारथ्यानं पहिल्या धडकेतच युधिष्ठिराच्या दंडधार व चंद्रदेव या चक्ररक्षकांना धरतीवर धाडकन लोळविलं! स्वत:च्या पराक्रमावर स्वत:च चिडलेला युधिष्ठिरही निकरानं त्याच्या रथाला भिडला. या सतरा दिवसांत युधिष्ठिर एवढा खवळलेला कधीच दिसला नव्हता!

"सूतपुत्र – सूतपुत्र!" म्हणत त्यानं बाणफेकीनं कर्णाचा रथ झाकाळून टाकला.

"निष्क्रिय, नाममात्र क्षत्रिया!" म्हणत कर्णानं त्याचं बाणाचं आवरण क्षणात उधळून लावलं.

नाराच, सर्पमुख, कंकमुख, जिद्म, सन्नतपर्व, निशित, बस्तिक जे हाताला लागतील ते बाण केवळ त्यांच्या शेपटचांच्या निसटत्या, स्पर्शानं अचूक ओळखून आवश्यक तेवढेच प्रभाव देऊन तो युधिष्ठिरावर ते असे फेकू लागला की, धुक्याच्या जाड थरांनी हिमालयाचं शिखर वेढून टाकावं तसं त्यानं त्याला वेढून टाकलं! त्याच्या मदतीसाठी धावलेले सात्यकी, युयुत्सू कोणीही त्या कौरवांच्या अजेय सेनापतीला तोंड देऊ शकत नव्हते.

त्याची बाणफेक असह्य होताच युधिष्ठिर, सात्यकी आणि युयुत्सू एकाच रथात चढले आणि पुन्हा समरांगणाबाहेर पळू लागले! जाता-जाता युधिष्ठिरानं फेकलेला एक सूची बाण त्या राधेयाच्या उजव्या कानाजवळच्या मर्मस्थानावर अचूक बसला. मूर्च्छित होऊन तो खाली कोसळतो आहे, हे वळून पाहण्यासाठीसुद्धा त्या तिघांपैकी एकही मागं थांबला नाही! कर्ण मूर्च्छित होऊन कोसळला.

शल्यानं रथात कोसळलेल्या कर्णाच्या मस्तकातून बाण काढला. रथात ठेवलेल्या चामडी पिशवीतील थंड पाण्याचा शिडकावा त्याच्या मुखावर करताच तो पुन्हा थोड्या अवधीनंतर शुद्धीवर आला. त्याच्या मनात भिनलेली युद्धाची मदिरा एका अंशानंही उतरली नव्हती! उतरणार नव्हती!

कर्णासमोरून पळालेला युधिष्ठिर रणांगणाच्या बाहेर जाऊन शिबिरात स्वस्थ बसून राहिला होता. त्याचं काही बरंवाईट झालं की काय; या भयानं साशंक झालेल्या अर्जुनाचे वेध चुकू लागले. त्याला युधिष्ठिर सुखरूप आहे, हे पटल्याशिवाय तो स्थिरचित्त होणारच नव्हता. नंदीघोषाची गती मंद – मंद करीत मी अर्जुनाला सेनेबाहेर काढलं. त्याचा रथ युधिष्ठिराच्या शिबिरासमोर आणला. रथचक्रांचा आवाज ऐकून युधिष्ठिर धावतच बाहेर आला. त्याला वाटलं की, पुन:पुन्हा आपला पराभव करणाऱ्या सूतपुत्राला ठार मारूनच त्याचा प्रिय पार्थ ती वार्ता सांगण्यासाठी आला आहे!!

अर्जुनानं आपणाला कर्ण अजून समरांगणात भेटलाच नाही, असं खाली मान घालून त्याला सांगताच तो संयमी आणि शांत म्हणून सर्वांनी गौरविलेला भूमिपुत्रही खवळला.

"हातातील गांडीव धनुष्य कुरुक्षेत्रावरच्या सूर्यकुंडात फेकून का देत नाहीस तू अर्जुना?" असं त्यानं अर्जुनाला भान सोडून क्रोधानं म्हणताच, युद्धात लढून ज्याच्या सर्वांगातील रक्तकण, रसरसून तापले होते असा अर्जुन आपलं गांडीव धनुष्य उंचावून, जीवनभर पितृवत मानलेल्या आपल्या प्राणप्रिय ज्येष्ठ बंधूवरही सरळ धावून गेला! जेवढ्या क्रोधानं अश्वत्थामा कर्णावर धावला नव्हता तेवढा अर्जुनाचा आवेश होता!

काही – काही प्रसंग माणसाच्या संयमाचे बांध फोडण्यासाठी नियतीनं योजलेले असतात. आज ती नियती युधिष्ठिर-अर्जुन यांच्यामध्ये उभी ठाकली.

मी मध्ये होऊन त्या दोघा कौंतेयांचा समेट घडविला. "कर्णाला वधल्याशिवाय शिबिराकडे परतणारच नाही!" अशी घोर प्रतिज्ञा करून अर्जुन पुन्हा रथारूढ झाला! मी स्वत:शीच हसलो! नित्याच्या सवयीप्रमाणं!

तिकडे रणात कर्ण आणि सात्यकी यांची गाठ पडली होती! अनुभवानं समृद्ध सात्यकी आणि विक्रमानं अशरण असलेला कर्ण एकमेकांवर वळीव पाऊस घेऊन येणाऱ्या निळ्या मेघासारखे टक्करले होते. आजवरच्या सोळा दिवसांत सात्यकीनं कुणापुढंही हार खाल्ली नव्हती. सात्यकी म्हणजे पांडवांच्या संरक्षणाचं यादवी भक्कम कवच होतं. जो सात्यकी भीष्म-द्रोणांना पराजित करता आला नव्हता; तो कर्णापुढं मात्र आज निष्प्रभ झाला होता!

नकुल, सहदेव व धृष्टद्युम्न यांनी दुर्योधनाला घेरलं होतं. युद्धातील प्रत्येक फासा उलटा पडत चालला होता; तरीही तो घायपाताच्या उंच दंडासारखा अहंमन्य दुर्योधन आपले घारे डोळे विस्फारीत त्या तिघांशी निकरानं झुंज देतच होता! पांचालीच्या विटंबनेची शल्यं मनात सलणारा धृष्टद्युम्न, आपल्या भगिनीच्या अवहेलनेचा जाब विचारण्यासाठी नैमिषारण्यातील रानसावजाच्या सुळ्यासारखी दोन्ही हातांत दोन खड्गं घेऊन त्याच्यावर धावला! उमाळी घेऊन सारथी प्रातिकामन याचा क्षणात कंठभेद करून तो दुर्योधनाला टिपण्याचीच संधी पाहत त्याच्या रथाभोवती फेऱ्या घालू लागताच, सर्व विनाशाचं मूळ असलेल्या त्या अहंतेच्या महान वटवृक्षानं कर्णाला मदतीची हाक देणारा शंख फुंकायला सुरुवात केली! "अंगराज, कर्णाऽ! धाव!" कारण तो एकटाच त्याचा आधार होता!

शेवटच्या श्वासापर्यंत त्याची पाठराखण करण्याची प्रतिज्ञा घेतलेला तो वचनप्रिय, दानवीर सात्यकीला तसाच सोडून दुर्योधनाच्या मदतीसाठी निकडीनं धावला!

त्याची आणि दुर्योधनाची रणात सांगड जमू नये, म्हणून त्याला आडव्या आलेल्या व्याघ्रकेतू, सुशर्मा, चित्र, उग्रायुध, जय, शुक्ल, रोचमान, सिंहसेन या आठ विख्यात रथ्यांना त्या सूर्यपुत्रानं जीवनमुक्तीचं सहज दान दिलं!

त्याच्या रथाच्या पांढऱ्या घोड्यांचा, पांढऱ्या वस्त्रासारखा एक सलग पट्टा दिसावा इतके त्याचे घोडे गतिमान होऊन धावत होते. क्षणात पूर्वेकडून पश्चिमेकडे; तर क्षणात दक्षिणेकडून उत्तरेकडे असा तो, मन मानेल तशा आकाशात भराऱ्या मारणाऱ्या गरुड पक्षयासारखा समरभूमीवर झेपावत होता.

दुर्योधनाभोवती माजलेल्या संकुलयुद्धात प्रलयकारी रणधुमाळीत त्यानं जिष्णू, जिष्णुकर्मा, देवापी व दंड या वीरांना रथांतून खाली कोसळविलं. आता पांडवसैन्याला कर्ण कोठून येऊन केव्हा आपल्यावर कोसळेल याची काहीच शाश्वती राहिली नव्हती. शरदात येणाऱ्या समुद्रपक्षयासारखे त्याचे बाण अनपेक्षितपणे येऊन कोसळत होते!

गती, शक्ती, आकार, प्रभाव व दिशा हे सर्व – सर्व त्याचे दास झाले होते! रथचक्रांची अखंड घरघर बरोबर घेऊन तो वाळवंटातल्या वादळासारखा येत होता! पावसाळ्यात कावेच्या खडकातून वाहणाऱ्या रक्तासारख्या लाल पाण्याचे पाट अंगावर झेलणाऱ्या गौरिक पर्वतासारखा तो शरीरावर रक्त वाहविणाऱ्या असंख्य जखमा झेलत येत होता! त्याच्या तुटलेल्या कानांच्या पाळ्यावरून वाहणारे घामाचे ओघळ अंगावरच्या जखमांतून वाहणाऱ्या रक्तात मिसळत होते. रथातून ओघळ कुरुक्षेत्रावर टपऽ टपऽ विरत होते. बाणफेक करताना मस्तकावर दाटलेले घामाचे बिंदू निपटतानासुद्धा शल्याला पटत नव्हतं की, तो सर्वश्रेष्ठ क्षत्रिय आहे!! तो त्याला 'सूतपुत्र, सूतपुत्र!' म्हणत चढाईची दिशा विचारीत होता! सूर्य आकाशात जसजसा वर – वर चढत होता तसतसे कर्णाचे पुष्ट बाहू गतीनं हालत होते.

आता सूर्य ऐन माथ्यावर आला होता. एरवी हलू देणाऱ्या योद्धयांच्या पडछाया आता त्यांच्याच तळपायांखाली आल्या! जखमी होऊन पडलेले, घायाळ सैनिक उन्हाची तिरीप साहवत नसल्यामुळे अर्धवट चुराडा झालेल्या रथांखाली आश्रयासाठी रखडत-रखडत जाऊ लागले. रक्तमांसाच्या रटरटलेल्या चिखलात पडलेल्या घोड्यांच्या शेपट्या, हत्तींच्या तुटक्या सोंडा, योद्धयांचे हातपाय वळवळून जीवनाची आसक्ती किती चिवट असते हे दाखवू लागले! आतापर्यंत कर्णानं पांडवसेनेची महान हानी केली होती.

शुद्धीवर आलेल्या वृषसेनाला घेऊन दु:शासन पुन्हा कौरवसैन्याच्या खवळलेल्या महासागरात पाणलोटासारखा घुसला! येऊ नये तिथं नेमका दुर्योधन, कर्ण, शकुनी यांच्याबरोबर भीम, नकुल, सहदेव व धृष्टद्युम्न यांच्या संकुलयुद्धाच्या जागीच आला! वाघासमोर – पाणवठ्यावर जाणाऱ्या काळवीटासारखा!

त्याला समोर पाहताच विषारी भुजंगाला पाहून क्रोधानं अंगावरील केश पिसकारून चीत्कारत उंच उमाळी घेणाऱ्या मुंगुसासारखा भीम काखा फुगवून रथातच उंच उमाळी घेताना गगनभेदी स्वरात ओरडला! त्याची आरोळी इतकी भेदक, कर्णकर्कश होती की, क्षणभर काय झालं म्हणून सर्वच योद्धयांनी हातांतील शस्त्रं तशीच थांबिवली. प्रत्यक्ष भीमाच्याच रथाचे सशक्त आणि घामात निथळणारे, तांबडे घोडे त्या भयाण आवाजानं घाबरून पाय मुडपून क्षणभर गपकन खालीच बसले! त्याचा सारथी विशोक खाली उतरला व त्यानं चुचकारून पुन्हा त्यांना कसंतरी उभं केलं! अगोदरच लाल असलेले भीमाचे डोळे मैरेयक अमाप प्याल्यामुळे अधिकच गुंजलाल दिसत होते. तशात दु:शासन समोर पाहताच त्याच्या भिरभिरणाऱ्या रक्तामुळे तर ते भयानक लाल दिसू लागले! त्याच्या भरदार मिशांचे केस एकदम स्फुरण पावले! टपोऱ्या नाकाच्या गोल नाकपुड्या विस्फारल्या! कुंभासारख्या गोल गरगरीत मुखावर घामाचे थेंब तरारून दाटले! आपला विशाल जबडा ताणून तो चीत्कारत होता, "नीचा, थांब!"

आपल्या अंगावर कर्ण, शकुनी, कृप, धृष्टद्युम्न यांच्या रथांतून आलेली चित्रविचित्र शस्त्रं कुठंतरी मर्मस्थानावर बसतील याचं भानही न राहिलेल्या क्रुद्ध भीमानं विशोकाला दूर सारून आपल्या रथाचे वेग स्वत:च आपल्या हातांत घेतले!

मध्ये-मध्ये येणाऱ्या आपल्या आणि कौरवांच्या सैनिकांना सरसहा आपल्या रथाखाली चिरडत त्यानं क्षणात दु:शासनाला गाठलं! मनातील सूडाची भावना अनावर झालेला तो वायुपुत्र आकाशवाऱ्यासारखा गदगदून विकटपणे मोठ्यानं हसला! त्याच्या

त्या विकट हास्यानंच दु:शासन थिजून गेला! अंगावर कोसळणारा पर्वताचा कडा चुकविता आला तर चुकवावा म्हणून आपल्याच घरटयात अंग चोरणाऱ्या श्येन पक्षयासारखा रथात अंग चोरू लागला. झंझावातापुढं कशीतरी तग धरून असलेल्या, ढासळू पाहणाऱ्या बुरुजासारखा तो दिसत होता! द्यूतानंतरच्या वस्त्रहरणात रानघोडयासारखा खिंकाळणारा दु:शासन, आत रानमांजरासारखा अंग चोरत होता! त्याच्या अंगावर, शेतात घुसणाऱ्या वृषभासारख्या धावून जाणाऱ्या भीमाला रोधण्याचं सामर्थ्य भोवतीच्या कुठल्याही कौरवयोद्धयात नव्हतं! भीमाच्या सर्वांगाचा आता वादळी वारा झाला होता! मृत्यूलाही थरकापायला लावील अशी – "दु:शासना, नीचा!" अशी कर्कश आरोळी ठोकीत तो दु:शासनाच्या रथाला सरळ भिडला!

रथाच्या भक्कम दंडाला धरून खाली उतरायला तयार नसलेल्या दु:शासनाला त्याच्या रथात चढून भीमानं बळानं खाली खेचलं!

गवताच्या गंजीतून पेंढिका खेचावी तसं दु:शासनानं द्रौपदीला सर्व राजस्त्रियांसमक्ष राजसभेत खेचलं होतं. आता सर्व कौरवयोद्धयांसमक्ष महासामर्थ्यशाली भीमानं त्याला, भरल्या पिकात तोंड खुपसणाऱ्या खोंडाला दक्ष शेतकऱ्यानं कंठबंधाला धरून बांधाबाहेर खेचावं तसं रथातून खाली खेचलं! त्याची रथातून घरंगळलेली गदा धुंद भीमानं लाथेनंच उडवून त्याच्या अंगावर फेकली. धडपडणाऱ्या दु:शासनानं कशीतरी ती पेलली!

सर्वांच्या अंगावर शहारे आणणारे त्यांचे तुमुल गदायुद्ध जुंपलं! 'ठण्णऽऽ ठण्णऽऽ'! एकमेकांवर आदळणाऱ्या त्यांच्या गदांमधून अग्नीच्या ठिणग्याच ठिणग्या उडू लागल्या! एकमेकांचा प्राणघातक मर्मवेध घेणाऱ्या त्यांच्या क्रुद्ध डोळ्यांतून क्रोधाग्नीच्या ठिणग्याच ठिणग्या वर्षू लागल्या! मर्मस्थानाचा वेध घेण्यासाठी ते एकमेकांवर डोळे रोखून, क्षणभर थांबून शक्य त्या सावधपणे एक – एक पाऊल उचलत संधी मिळताच 'ठऽण्ण ठऽण्ण' अशा भक्कम प्रहारांच्या विजाच विजा एकमेकांवर कोसळवू लागले! प्रथम-प्रथम दु:शासन आक्रमक वाटला! चित्त्यासारखे पाय रोवून तो अचूक झेप घेण्याचा प्रयत्न करीत होता, पण एरवी बोजड दिसणारा भीम गदायुद्धात गदेच्या आवाजानं वायुलहरीपेक्षाही चपळ होतो ते त्याला माहीत नव्हतं!

अर्धा एक घटका त्यांना एकमेकांशिवाय कुरुक्षेत्रावरच्या इतर लाखो योद्धयांचं भानच नव्हतं!

शेवटी भीमानं एका भक्कम प्रहारानं त्याला खाली पाडलं. सावरीचा काटेरी वृक्ष, वादळात उन्मळून पडावा जसा तो अविचारी धिप्पाड दु:शासन खाली कोसळला! भीमानं हातातील गदा फेकून दिली! त्या वायुपुत्रानं चपळाईनं पुढं धावत, गर्जत, त्यानं गदा पेललेला त्याचा उजवा हात आपल्या दोन्ही हातांच्या भक्कम पकडीत पकडला! हत्तीच्या पायासारखा आपला जडशीळ उजवा पाय त्यानं दु:शासनाच्या उजव्या स्नायुपुष्ट काखेवर दाबून ठेवला. त्या वेळेचा भीम म्हणजे तिसऱ्या 'लोका'वर पाय देऊन तो झाकून टाकणाऱ्या वामनासारखा भयावह दिसत होता. दु:शासनाच्या हातातील गदा भयंकेनं गळून पडली.

एक-दोन वेळा भीमानं दु:शासनाचा बाहू वेध घेण्यासाठी सांध्यातून खालीवर हलकेच हलवून पाहिला! दुसऱ्या क्षणी "पांचालीच्या पवित्र प्रावरणाला स्पर्श करणारा हा पापी बाहू मी मुळासकट उखडून हा असा आकाशात फेकून देतो आहे! जयऽ

अंबिके!!” असं डोळे मिटून मोठ्यानं ओरडत, त्या अचाट शक्तीच्या गदावीरानं दु:शासनाचा बाहू, किरातानं रानपलांडूचा भरगच्च गड्डा भूमीतून उपटून काढावा; तसा एका दमदार झटक्यातच खांद्याच्या सांध्यातून मुळसकट उखडून काढला!! रक्ताच्या फवारत्या चिळकांड्याच चिळकांड्या भीमाच्या अंगभर सपकारल्या!धुंदपणानं आकाशाकडे पाहत त्यानं तो विविध आभूषणांनी भूषविलेला निर्दय रक्तरंजित बाहू गरगर गोल फिरवून, योद्ध्यावर गदा फेकावी तसा, दिशाहीन कुठंतरी दूर फेकून दिला!! सर्व योद्ध्यांच्या अंगावर रोमांच तरारले!

तेवढ्यानंही त्या भानरहित भीमाचं समाधान काही झालं नाही! दु:शासनाचीच, हातातून निसटलेली गदा त्यानं उचलली! आपल्या डोक्याच्याही वर ती खूप उंच उंचावून त्यानं तिचा एक भक्कम आघात विव्हळणाऱ्या दु:शासनाच्या उद्धत वक्षावर घालून, एखाद्या मदमस्त हत्तीनं पायाखालचं मुंग्यांचं वारूळ फोडून टाकावं तसं त्याचं उन्मत्त वक्ष छिन्नविच्छिन्न करून टाकलं! गगनभेदी आर्त अंतिम चीत्कार फोडून दु:शासन शांत झाला! रक्ताची कारंजी उफाळली! अश्रूंची तळी फुटली! रोमांचक चीत्कार उमटले!

हातातील गदा फेकून देऊन भीम गुडघे टेकून खाली बसला! “या! कोणात सामर्थ्य असेल तर या रानसावजाचं रक्त पिणाऱ्या पांडुपुत्र वनराजाला थोपवा!” भोवती दूरवर उभ्या असलेल्या दुर्योधन, शकुनी, कृप, अश्वत्थामा आणि कर्ण या सर्व – सर्व कौरव-योद्ध्यांना उद्देशून तो भयानक ओरडला. त्याचे लाल डोळे त्याहून लाल क्रोधाग्नीचा पाऊस पाडत होते.

तहानलेल्या वाघानं पाणवठ्यावर ओढ्यात तोंड खुपसावं तसं दु:शासनाच्या छातीतून वाहणाऱ्या रक्ताच्या पाटात आपलं वाघासारखं गोल गरगरीत तोंड खुपसून दु:शासनाचं उष्ण – उष्ण रक्त तो कंठाचं टपोरं हाड मागं – पुढं हलवीत, मैरेयक मद्याचे कुंभ प्यावेत तसं यथेच्छ घटाघट प्यायला!! सर्वांच्या अंगावर काटाच काटा उभा राहिला!

सर्वांनी डोळ्यांवर हात ठेवले! कित्येक मूर्च्छित झाले! माझ्या हातांतील नंदीघोषाचे वेग थोडंसुद्धा डगमगले नाहीत!

मैरेयकापेक्षाही दु:शासनाच्या रक्ताची नशा भीमाला अधिक चढली! आपले रक्तमय हात उंच नाचवीत तो समरांगणातून शिबिराच्या दिशेनं ‘पांचाली... पांचाली!’ म्हणत ओरडत पळत सुटला. आज पहाटेच त्यानं आपल्या शिबिरात पांचालीला आणून ठेवलं होतं! आपली घोर प्रतिज्ञा पूर्ण करून तिचा काळा केशसंभार दु:शासनाच्या रक्तानं तो सावरणार होता! वस्त्रहरणापासून मुक्त सोडलेले तिचे विपुल दाट केश सावरून तो आज स्वत: दंतवणी हाती घेऊन एवढ्या वर्षांनंतर तिची केशभूषा करणार होता! भीम धुंद होऊन समरांगणातून बाहेर पळाला तसे आवतीभोवतीच्या योद्ध्यांनी सुटकेचे नि:श्वास सोडले!!

**

# अकरा

आता युद्धभूमीवर काय आणि कसं घडेल ते सांगता येत नव्हतं. भय, क्रौर्य, शौर्य – सर्व स्वैर भावनांचा विस्फोट केव्हा होईल ते सांगता येत नव्हतं. आता युद्धाच्या यज्ञकुंडाचं सर्वग्राही वणव्यात रूपांतर झालं होतं.

भीम, कर्ण, अर्जुन या तिघांनीच लाखो योद्धे यमसदनाला धाडले होते. जिथं-जिथं ते तिघे समोर दिसत, तिथं-तिथं सैनिक सैरावैरा धावू लागले!

रणभूमीवरचा रक्तामांसाचा चिखल योद्धयांच्या, हत्ती-घोड्यांच्या पायांखालून आणि रथचक्रांच्या धावांखालून सरकत ओघळत क्षणाक्षणाला दक्षिणेकडच्या उतरत्या भागाकडे साचत चालला होता! त्या भागावर एक दलदलीचा पट्टाच तयार झाला होता! कोणताही दक्ष व कुशल सारथी आपला रथ त्या भागाकडे न्यायला तयार नव्हता!

उजव्या बाजूला चाललेलं नकुल व कर्णपुत्र वृषसेन यांचं युद्ध आता निकराला पोहोचलं होतं! कुणीच कुणाला शरण जात नव्हतं!

पांचालीची वेणी सावरून परतलेल्या क्रुद्ध भीमाची आणि कर्णाची गाठ पडली!!

एकमेकांना पाहताच त्यांनी शतशृंगावरच्या दोन मदमस्त हत्तींनी हत्तिणीच्या प्राप्तीसाठी मांडावी तशी झुंज मांडली!! दोघेही अमित सामर्थ्यवान, निडर, युद्धकुशल आणि भयावह होते. कर्णाचं सोनेरी शरीर सूर्यकिरणांसारखं उजळून निघालं होतं, भीमाचं रक्तवर्णी शरीर ग्रीष्मातील तांबड्या फुलांनी डवरलेल्या पलाशवृक्षासारखं पेटून निघालं होतं! दोन प्रचंड महानद एकमेकांविरुद्ध येऊन आदळावेत तसे ते एकमेकांवर कोसळले, भीमाच्या मनात शल्य होतं घटोत्कचाचं! कर्णाच्या मनात आखाड्यातील आसुडाचं! भीमानं वधलेल्या पुत्राचं!

आकाशातले महातारे निखळून पडताना एकमेकांवर अवकाशातच आदळावेत तसे ते एकमेकांवर भयानक आघात चढविण्यासाठी आदळू लागले. शूल, तोमर, चक्र, गदा, खड्ग मिळेल ते शस्त्र हाती घेऊन, मर्मस्थानाचा वेध घेऊन, सलग फेकू लागले. अनेक वेळा कर्णाला भीमावर प्राणांतक बाण फेकण्याची संधी येत होती. तरीही तो जाणीवपूर्वक आपल्या अचूक बाणांची चवड त्याच्या केवळ दंड आणि मांडीच्या मांसल भागावरच करीत होता! मधून-मधून ते दोघेही मर्मभेदी आघात होताच मूर्च्छित होत होते. शुद्धीवर येण्यासाठी औषधी वनस्पतीची लाकडी नलिका सारथ्यानं नाकावर धरताच झोपेतून उठलेल्या वनराजासारखे क्षणात ताठ उभे राहून गर्जत शस्त्रफेक करीत होते. त्याच्या युद्धकक्षेत जाण्याची छाती कुणालाही होत नव्हती. एक घटका ते महाग्रहासारखे दिसणारे दोन महारथी अथक लढले! कोणीच कुणाला हटेना! टक्करणाऱ्या लोहशस्त्रांच्या ठिणग्या थांबेनात! अटीतटीचा संग्राम संपेना!!

एवढ्यात रथ उधळत आलेला अश्वत्थामा कर्णाच्या रथाला भिडला! "अंगराज, तुझा पुत्र वृषसेन अर्जुनाच्या बाणांच्या जाळ्यात पाणघोड्यासारखा घुटमळतो आहे! धाव! त्याला संरक्षण दे!" मागं वळूनही न पाहता माथ्यावरचं फरफरणारं वस्त्र सावरीत तो वृषसेनाला संरक्षण देण्यासाठी उधळला! उरल्या-सुरल्या दहा-पंधरा दुर्योधनबंधूंनी

पुढं होऊन भीमाला सरळ आपल्या अंगावर घेत कर्णाला मोकळं केलं.

रणांगणाच्या दक्षिणेकडील चिखलाच्या पट्टयाला घासून कसातरी शल्यानं त्याचा जैत्ररथ वृषसेनाभोवती भिडलेल्या पांडवांच्या कड्याजवळ आणला! पार दक्षिणेकडे!

आता समरांगणाचे सरळ – सरळ दोन भाग पडल्यासारखे झाले होते. उत्तरेकडे भीम, सात्यकी, धृष्टद्युम्न, सहदेव, युधिष्ठिर यांच्याशी लढणारे दुर्योधनबंधू, कृप, सैंधव यांचा भाग व दक्षिणेकडे वृषसेन, अश्वत्थामा, शकुनी, दुर्योधन यांच्या कड्यातून अचूक वृषसेनाला टिपण्यासाठी टपलेल्या अर्जुन, नकुल, उत्तमौजा यांचा दुसरा भाग! या दुसऱ्या भागात अमीन टेकडीचा पायथा धरून वृषसेनाभोवती पडलेल्या कड्यापर्यंत तो दलदलीचा पट्टा पसरला होता. तिकडे कुणीही सरकत नव्हतं.

आपल्या पुत्राला अर्जुनाच्या बाणजालातून वाचविण्यासाठी आलेला कर्ण कसातरी प्रयासानं वृषसेनाभोवती दडलेल्या कड्यापर्यंत येऊन थडकला! एवढ्यात शकुनी, अश्वत्थामा, दुर्योधन यांना आव्हान देणाऱ्या अर्जुनानं नुकत्याच समोर उभ्या ठाकलेल्या कर्णालाही, "सूतपुत्रा! हा तुझा पुत्र वृषसेन आज तुम्हा सर्वांच्या समक्ष ठार करतो आहे! जसा तुम्ही माझा प्रिय 'अभि' मारलात तसा!!" असं मोठ्यानं ओरडून एक चंद्रमुख बाण असा फेकला की, पूर्वीच बाणांच्या कुंपणात रथात खिळलेल्या, पण सांबरासारख्या ऐटदार दिसणाऱ्या वृषसेनाचं मस्तक क्षणात धाडकन धरतीवर कोसळलं!!

असंख्य जिभा दातांखाली आल्या! ज्येष्ठ कर्णपुत्र वृषसेन पडला.

पांडवसैन्यानं आमच्या रथामागं रणवाद्यांचा कल्लोळ केला! अर्जुनासमोर थांबणं नको म्हणून जीव घेऊन धावणारे कुरुसैनिक दिशाहीन झाले!

आपला पुत्र पडला हे पाहून कर्णानं आपल्या जीवनात कधीही घातली नव्हती ती प्रत्यक्ष समरांगणात मान खाली घातली! वृषसेनाच्या मृत देहाजवळ आणून शल्यानं त्याचा रथ थांबविला. धनुष्य फेकून रथातून तो खाली उतरला. आयाळ कापलेल्या सिंहासारखा! आपल्या निळ्या नेत्रांतून धावणाऱ्या उष्ण अश्रुधारा त्या महावीरालाही थांबविता आल्या नाहीत! दूर उडालेलं वृषसेनाचं मस्तक त्यानं उचललं! सूर्याला अर्घ्यदान करणाऱ्या, याचकांना धनधान्य दान करणाऱ्या, विजय धनुष्य उंचावून पेलणाऱ्या, त्याच्या ओंजळीत आज त्याच्या प्रिय आणि जीवनाची सर्व – सर्व आशा – आकांक्षा असलेल्या त्याच्या ज्येष्ठ पुत्राचं शिरकमल होतं!!

वृषसेनाचं शिर त्याच्या धडावर पुन्हा बसविताना त्या सूर्यपुत्राचा धरतीवरच्या क्षुद्र, आशा – आकांक्षांच्या दलदलीवरच्या प्रेमाचा विश्वासच उडाला! धरतीच्या पाठीवर साचलेल्या कुलाकुलाच्या उच्चनीचतेचा, अहंभावी सामर्थ्याचा, आभासमय मित्रत्वाचा तो मनाच्या निर्धारानं, कणाकणानं त्याग करून उभा राहिला!

मृतपुत्राच्या देहाला त्यानं स्फुंदत एक प्रदक्षिण घातली. आता त्याच्या सर्वांगाचा धूमकेतू झाला होता! कोणत्याही नात्याचे पायांत अडखळणारे पाश आता त्याला मोहवू शकतच नव्हते! कीर्तीचे व प्रीतीचे कसलेही धागे त्याला आता थोपवू शकत नव्हते! आता त्याचं नातं एकाशीच होतं – असीम, अमर्याद, अनंत अशा निळ्या आकाशाशी! माथ्यावरच्या तप्त, शाश्वत सूर्यकेंद्राशी!!

खाली वाकून वृषसेनाच्या कपाळाचं एकदा दीर्घ अवघ्राण करून उठताच त्यानं कंठभाग फुलवून गगनभेदी आरोळी ठोकली – 'आऽऽक्रम!'

**

# बारा

अर्जुनाच्या पराक्रमानं भयभीत होऊन धावणारे कुरुसैनिक खिळ्यासारखे जागच्या जागी थांबले! थांबले ते परतून पांडवसैन्यावर प्राणाचा पण लावून हल्ला चढविण्यासाठी!

कुरूंचं उरलंसुरलं सर्व सैन्य एकत्र बांधून तो आता आमच्या नंदीघोषाकडे समुद्रवाऱ्यासारखा येत होता! आता तिसरा प्रहर सुरू झाला होता!

दक्षिणेकडच्या चिखलाच्या दलदलीत त्याचा रथ उतरविल्याशिवाय शल्याला त्याचा रथ आमच्या रथासमोर उभाच करता येणार नाही, अशा मोक्याच्या जागी मी नंदीघोष उभा केला!! कुशल शल्यानं त्या दलदलीच्या पट्टयात चार हात तरी कोरडी जागा मिळते काय हे पाहण्यासाठी त्याचा रथ त्या पट्टयाभोवती कितीतरी वेळ गरगर फिरविला! शेवटी निरुपायानं थांबून तो कर्णाला म्हणाला, "राधेया, आजचा दिवस अर्जुनाशी युद्ध करण्यासारखा नाही! या दलदलीत रथ घालण्यात धोका आहे!!"

तो हसला! नुसताच हसला! काही न बोलता त्यानं दलदलीच्या पट्टयाच्या मध्ये रथ नेण्यासाठी बोट उंचावून शल्याला आज्ञा केली!

आमचा आणि त्याचा रथ आता प्रथमच एकमेकांसमोर उभे ठाकले!!

झटकन खाली उतरून मी वंगणाचा एक जाड लेप आमच्या रथाच्या दोन्ही बाजूंच्या चक्रांना सगळीकडे दिला! न जाणो त्याच्या रथाचा पाठलाग करताना आम्हाला आमचाही रथ त्या दलदलीत घालावा लागेल! अशा वेळी वंगणाच्या सुळसुळीत लेपामुळे तो हाडामांसाच्या चिखलात फसण्याची शक्यता नव्हती! वंगणाच्या काष्ठनलिका घेऊन मी पुन्हा नंदीघोषावर चढलो! वाकाच्या जाळीदार विणीत त्या पुन्हा होत्या तशा बसवून आसूड हातात घेतला.

वेडावलेल्या दोन्ही सेनांतील सैनिकयोद्धयांनी आपल्या रथांवरच्या, युद्धामुळे अर्धवट तुटलेल्या पुष्पमाला संपूर्ण तोडून, जयघोष करीत त्यांचा आपापल्या सेनानायकावर गर्जत वर्षाव केला. कुणीतरी वेध साधून फेकलेली एक सूर्यफुलाची माला समोरच्या रथातील राधेयाच्या कंठात अचूक पडली! मी माझ्या कंठातील नीलकमलांची टपोरी माला रथनीडावरूनच अर्जुनाच्या निळ्या कंठात चढविली! आज माझीही परीक्षा होती! होय परीक्षाच! चतुरस्त्र सारथ्याची!!

आदर्शवादाला प्राणापलीकडे जपणारा पहिला कौंतेय जिवंत ठेवायचा की व्यवहारवादाची सरळ-सरळ कास धरून पाच कौंतेय वाचवायचे, अशी ती अतिशय बिकट सत्त्वपरीक्षा होती! माझं मन अधिकाधिक व्यवहाराकडेच झुकत होतं!! कारण एकटा अर्जुन ढासळला की, इतर पांडवही आपोआपच ढासळणार होते! पांडवहीन इंद्रप्रस्थ काय किंवा हस्तिनापूर काय कवडी मोलाचंच नव्हतं काय?

प्रत्यक्ष मामाला वधताना माझे बाहू मुठीचा प्रहार करताना थरथरले नव्हते! दंतवक्र, विदुरथ, शतधन्वा, शृगाल, शाल्व, पौंड्रक यांना शासताना माझ्या छातीचे ठोके कधीही वाढले नव्हते! शिशुपालासारख्या आतेबंधूवर तर सुदर्शन फेकताना कधी

माझ्या नेत्रकडा पाणावल्या नव्हत्या! पण – आज – आज हातातील नंदीघोषाचे वेग मंद-मंद स्पंदताहेत हे स्पष्टपणे मला जाणवत होतं! कारण – कारण मला माहीत होतं की, आपली निर्घृण अवहेलना झाली म्हणून त्या दानवीरानं जरी भीष्म, अर्जुन, भीम या सर्वांना आणि प्रत्यक्ष द्रौपदीलाही तितक्याच प्रबळ निरोधानं प्रसंगी छेडलं असलं तरी मजविषयी असलेली त्याची अबोल, मूक निरामय भक्ती त्याच्या-माझ्या भेटीच्या वेळी त्याच्या असाहाय्य नेत्रांतून माझ्या पाठीच्या पन्हाळीवर ओघळलेल्या अश्रूंतून मला पूर्ण कळून चुकली होती! त्याच्यासाठी अंत:करणाच्या राजवस्त्राची क्षणाक्षणाला चाळण करणारी, जिला मी माझी माताच मानली त्या राजमाता कुंतीदेवींची आणि त्याची अबोल, मूक, सोशिक नाती मला पूर्ण कळून चुकली होती! माझ्या जीवनयात्रेत ज्यांच्या मूक भक्तीला, त्यागाला आणि प्रेमाला तोड नव्हती अशी माझी म्हणून खरी चारच माणसं होती. माता देवकी, राजमाता कुंतीदेवी – कर्ण – आणि – आणि गोकुळातील राधा!!

विचारांची आवर्तं थांबावीत म्हणून मी माझा 'पांचजन्य' आवेगानं फुंकला! कितीतरी मोठ्यानं!!

चंदनउटी लेपलेले आपले भक्कम, पुष्ट, मांसल दंड सावरून कर्णार्जुनानी आपापले शंख शिरा ताणून प्राणपणानं फुंकले! दोन्ही सैन्यातील रणवाद्यांनी शेजारची टेकडी थरथरू लागली! हिमालयाच्या दोन धवल आणि उन्नत शिखरांसारखे ते एकमेकांसमोर उभे राहिले! त्यांच्या डोळ्यांच्या पाणीदार बाहुल्या एकमेकांच्या बाहूंवर खिळल्या. हातांची थोडीशीसुद्धा हालचाल अचूक हेरून समोरचा योद्धा आता कुठलं शस्त्र फेकणार याचा कयास ते अचूक करू लागले! आणक, दुंदुभी, गोमुख, मृदंग, डिंडिम या रौद्र रणवाद्यांचा तुमुल संमिश्र आवाज क्षणाक्षणाला वाढू लागला. क्षणभर डोळे मिटून कर्णानं सूर्यस्तोत्र म्हटलं. अर्जुनानंही माझी प्रार्थना करणारे श्लोक डोळे मिटून पुटपुटायला सुरुवात केली! हातातील शंख त्यांनी लाकडी खोबणीत होते तसे पुन्हा ठेवले! शस्त्रफेकीसाठी आपले दीर्घ बाहू सरसावले.

एका क्षणाचीच शांतता पसरली आणि मग त्यांनी एकदम कानठळ्या बसविणाऱ्या रणआरोळ्या फोडीत एकमेकांवर अविरत बाणांची भयानक फेक सुरू केली! त्यांचे बाण अवकाशातून असे सुटत होते की, तारकामंडलासह आकाशच कोसळून अंगावर पडलं आहे की काय; असा भास दोन्ही सैन्यांना झाला! गेल्या सोळा दिवसांत अशी चित्तथरारक बाणफेक प्रत्यक्ष मीही पाहिली नव्हती! भीष्म, द्रोण, अभिमन्यू यांनी केलेल्या संग्रामापेक्षा त्यांचा संग्राम सर्वसंहारक होता. सर्वांच्या अंगावर रोमांच उभे करणारा होता! तिन्ही लोक दोलायमान करणारा होता!

टोळधाडीसारखे त्यांचे बाण अगणित होते. कोंडलेल्या खुराड्यातून विविधरंगी घोडे, दार उघडताच स्वैर उधळावेत तसे ते भात्यातून क्षणात प्रत्यंचेवर स्वार होऊन उधळत होते! त्यांच्या तीक्ष्ण टापांखाली असंख्य योद्धे जीवनाचे अंतिम श्वास वेचू लागले! ग्रीष्मात वितळणाऱ्या हिमालयासारख्या दोन्ही सेना क्षीण होऊ लागल्या.

मानस सरोवराभोवतीचा तुटलेल्या बर्फाचा कडा सरोवरात कोसळून पडताच पांढऱ्याशुभ्र अशा लाखो राजहंसांचे थवेच्या थवे जीव घेऊन वर उधळावेत तसे त्यांचे पांढरे जिद्म बाण त्यांच्या विशाल धनुष्यांवरून मुक्तपणे उधळू लागले! सूंसाट नागमोडी वळणं घेत एकमेकांवर टकरू लागले. त्यांच्या धावेत क्षणभर झाकाळलेलं

आकाश त्यांची टक्कर होताच फुलणाऱ्या तारकांसारख्या स्फुल्लिंगांनी एकदम लख्खकन उजळून निघू लागलं!

शेकडो, हजारो कपिश बाण आकाशात फेकून ते त्यांतून मृगधारेसारखा शत्रूवर पाऊस पाडू लागले. त्यातूनच पांढऱ्या जिद्म बाणांची विजेसारखी असंख्य नागमोडी वळणं रेखून त्या जिद्म बाणांनी एक-एक पथकाचा प्रमुख अचूक टिपून परस्परांची सेना क्षीण करू लागले! सामर्थ्य कमी करू लागले! सैनिकांना कळेना की, बाण कोठून येताहेत! वारुळातून मुंग्या बाहेर पडाव्यात तसे त्यांचे बाण होते! शतशृंग पर्वताच्या धारदार कडा आपला बळकट नखाग्रांनी पकडून उभी असलेली राकट गरुडपक्षयांची रांग माथ्यावरच्या, मेघांनी दाटलेल्या आकाशात विजेचा भयंकर गडगडाट होताच पंख फडफडवीत एकदम उधळावी तसे त्यांचे राकटवर्णाचे असंख्य कपिश बाण उधळत होते! क्षणात गगनमंडल झाकाळून टाकीत होते! धर्मक्षेत्र कुरुक्षेत्राला थरकावीत होते!!

त्याच्या रथाचा सारथी निर्बल करण्यासाठी अर्जुन माझ्या माथ्यावरून त्याच्या घोड्याच्या दिशेनं बाणांची चवड फेकू लागला, पण – पण शल्य खरोखरच कुशल सारथी होता. आपल्या हातांतील वेगांना झटके देऊन क्षणात तो पाचही घोड्यांना गुडघ्यात पाय मुडपून खाली बसवीत होता, क्षणात मागील पायांच्या भक्कम खुरांवर पाचही घोडे ध्वजदंडाच्या पायथ्याइतके उंच फेकीत होता! काही-काही वेळा तर उंच धिप्पाड घोड्यांसह त्याचा शस्त्रास्त्रांनी ठासून भरलेला अवजड रथ तो एकदम गर्रकन असा वळवीत होता की, त्याच्या लोखंडी पार्श्वभागावर थडाथड आदळणारे अर्जुनाचे बाण वेध चुकल्याच्या क्रोधानं ठिणग्या फेकीत खालच्या चिखलात टपाटप निष्प्रभ होत कोसळून पडावेत!!

आता रथाभोवतीचा चिखल अधिकच रटरटू लागला! आपापल्या सेनानायकाला प्रोत्साहन आणि चेतावणी देण्यासाठी भोवतीचे योद्धे त्यांच्या नावांचा अखंड जयघोष करू लागले. आता तो आवाज कोणत्याही आवाजापेक्षा क्षणाक्षणाला जास्तजास्तच गगनभेदी होत चालला होता! एक घटकाभर त्यांनी वेडावल्यासारखी नुसती परस्परांवर बाणफेकच केली. त्यांच्या अंगावरची भक्कम लोहकवचं असंख्य बाणांच्या तीक्ष्ण टोकांना दाद देत नव्हती! मात्र दोघांच्याही उघड्या दंडांवरच्या जखमांतून उष्ण रक्ताचे पाट वाहू लागले. तिकडे लक्ष देण्याइतका अवसरही त्यांना नव्हता! त्या रक्ताचा परस्परांशी नाजूक नातेसंबंध आहे, हे फुललेल्या कर्णाच्या आता लक्षातही राहिलं नव्हतं!!

मत्स्य, पांचाल, सैंधव, गांधार यांच्या दलांतील शेकडो सैनिक डोळ्यांदेखत पिकल्या औदुंबर फळांसारखे टपाटप खाली कोसळताहेत हे पाहून दोन्ही सेनांतील भयभीत योद्धयांनी आपल्या हातातील शस्त्र थांबिवली!! त्या दोघांसाठी संपूर्ण समरांगण खुलं सोडून ते विस्फारलेल्या डोळ्यांनी केवळ प्रेक्षक झाले! डोळे ताणून त्या दोघांचा प्रलयकारी संग्राम पाहू लागले!

आता ते दोघेही प्राणाच्या मोलानं, अतीव कष्ट करून प्राप्त केलेली दिव्यास्त्रं एकमेकांवर फेकण्यासाठी सज्ज झाले. या वेळी त्यांना जन्म देणारी राजमाता – प्रत्यक्ष कुंतीदेवी जरी समरांगणात आली असती तरी तिनंसुद्धा ते दोघे एकमेकांचे बंधू आहेत हे मान्य केलं नसतं! जीवनाच्या दोन परस्परविरोधी ध्रुवांच्या अगदी कडेवर जाऊन ते आता उभे राहिले होते! त्यांच्यापुढं एकच एक दृश्य दिसत होतं – समोरच्या योद्धयाचं निष्प्राण कलेवर!! त्यासाठी ते आसुसलेले होते! स्वत:ला संपूर्ण विसरले होते!

चंदनाच्या चूर्णात ज्याचं अग्र सतत मुरत ठेवलं होतं असा सोनेरी भात्यातील एक सर्पमुख असा दिव्य अजस्त्र बाण त्यानं अर्जुनावर फेकण्यासाठी बाहेर काढला! त्याला नकळतच त्या बाणावर एका नागशक्तीनं संचार केला होता! अर्जुनाच्या कंठाचा वेध घेऊन त्यानं मंत्र पुटपुटत, तो भयानक बाण डोळे विस्फारून सोडला! तो बाण आपल्या कंठाचा वेध घेत वायुवेगानं येतो आहे; याचं अर्जुनाला थोडंसुद्धा भान राहिलं नव्हतं.

मी हातातील वेग चपळाईनं आखडून एक असा झटका घोड्यांच्या पाठीवर दिला की, पाचही घोडे एकदम पाय मुडपून गपकन खालीच बसले! अर्जुनाच्या कंठाचा प्राणघातक वेध कसातरी चुकला! रथ खाली झुकल्यामुळे त्याच्या मस्तकावरच्या किरीटावर खणकन आदळलेल्या त्या भयानक गतिमान बाणानं त्याचा सोनेरी मुकुट उधळून लावला. खणखणत तो कुरुक्षेत्राच्या भूमीवर कोसळला! त्याखाली असलेलं गोलाकार शिरस्त्राणही घरंगळून रथात पडलं. अर्जुनानं सुटकेचा दीर्घ नि:श्वास टाकला! त्याचे काळे, कुरळे केश विखुरले. त्याच्याकडे पाहून मी हसलो!

कमरेभोवती लपेटलेला पांढराशुभ्र शेला काढून अर्जुनानं आपल्या विपुल केशांभोवती तत्परतेनं गुंडाळला! नियतीचं आव्हान आता तर अधिकाधिक उग्र होऊ लागलं!

हिमालयावरून कोसळणाऱ्या गंगोत्रीसारखा पांढऱ्या बाणांचा ओघ वर्षवून अर्जुनानं त्याच्या सारथ्याला – शल्याला पिंजऱ्यातील श्येन पक्षयासारखा एकाजागी कोंडून टाकला! आता त्या कुशल सारथ्याला इकडे-तिकडे हलताच येईना! समोरचा गजशृंखला – ध्वजांकित जैत्ररथ आता एका जागी स्थिर झाला!!

कर्णाचे निवडक बाण माझ्या किरीटावरून धनछडी पक्षयांच्या थव्यासारखे सूँऽ सूँऽ असा आवाजाचा पट्टा रेखत धावत होते! या घटकाभराच्या घनघोर युद्धात त्यानं कधी चुकूनसुद्धा एकही बाण माझ्या दिशेनं काही फेकला नाही!

संतप्त झालेल्या अर्जुनानं मनाच्या निर्धारानं मस्तकावरचं ओघळणारं वस्त्र सावरून आग्रेयास्त्रापूर्वीचे सूचक मंत्र पुटपुटायला सुरुवात केली! अंजनीच्या फुललेल्या वृक्षदंडासारखाच आता तो फुलून निघाला होता! एक प्रकारचं अतीव दिव्य तेज त्याच्या मुद्रेवरून ओसंडू लागलं! लालभडक पिसांचे भरगच्च तुरे माथ्यावर मिरविणारे हजारो कारंडव पक्षी दृषद्वतीच्या पात्रावर एकदम झेपावावेत तसे अर्जुनाच्या गांडीव धनुष्यातून सुटलेले अगणित अग्निबाण माझ्या डोक्यावरून आग ओकत फरफरत धावू लागले! सगळ्या आकाशमंडलाचं यज्ञकुंडच झालं आहे की काय; या भयानं कौरवसैनिक भयभीत होऊन धावू लागले! सूर्यबिंब फुटून त्यातून तप्तरसच अंगावर कोसळतो आहे, या विचित्र भयानं अनेक मूर्च्छित झाले! अर्जुनाचे बाण अग्नीचा पाऊस पाडू लागले!

अर्जुनाच्या अग्निबाणांना निष्प्रभ करण्यासाठी कर्णानं गुडघे टेकून वरुणास्त्राचे दिव्य मंत्र डोळे मिटून आळविले! त्याच्या ओंजळीतून अर्घ्यदान करताना पडलेलं पाणीच आज्ञाधारक सेवक म्हणून त्याच्या साहाय्यासाठी काळ्या मेघांबरोबर विजांचं अनिर्बंध तांडवनृत्य घेऊन धावलं! त्यानं फेकलेल्या, शेपटाला हत्तीच्या कानासारखे चामडी पंख जोडलेल्या अमोघ बाणांची संख्या इतकी होती की, कुरुक्षेत्रावरची हवेची पोकळी त्यांनी क्षणात समूळ हलवून टाकली! गगनमंडळातील सभोवतीचे काळे ढग

क्षणातच रणभूमीवर दाटले! गडगडत मुसळधार पावसाचा वर्षाव करून त्यांनी अर्जुनाच्या अग्निबाणांच्या मागं लपलेली त्याच्या मनाची आगही विझवून टाकली! त्या पाण्याच्या दानानं त्या दानवीरानं अर्धवट मेलेल्या जखमी वीरांनाही पुन्हा जीवनाचं दान केलं!

पण – पण त्याला माहीत नव्हतं की, त्याच्याच वरुणास्त्रानं त्याच्या रथचक्राभोवती चिखल अधिकच दाटत चाललाय!!

कर्णाच्या वरुणास्त्राचे वर्षणारे मेघ परतवावेत म्हणून अर्जुनानं निवारक अशा वायव्यास्त्राची कुशल योजना केली! सुसाट, घोंगावत धावणाऱ्या वाऱ्यानं आकाशात दाटलेली मेघांची कोंडी उधळून लावली! कुरुक्षेत्र पुन्हा सूर्यकिरणांनी उजळून निघालं! अर्जुनाच्या वायव्यास्त्रानं अनेक रथांवरच्या ध्वजपताका खेळणी म्हणून उडवून लावल्या. आनंदित झालेल्या अर्जुनानं जयनाद करीत वज्रास्त्राचं अभिमंत्रण करून ते असंख्य तीक्ष्ण शस्त्रं घेऊन धावणारं अस्त्र कर्णावर फेकलं! आपल्या दिशेनं चित्रविचित्र आकारांची शस्त्रं गतीनं येताहेत हे पाहूनही कणभरही न चळलेल्या त्या कर्णानं प्रत्युत्तर म्हणून महेंद्रपर्वतावर प्राप्त केलेल्या भार्गवास्त्राची योजना केली! दोन्ही अस्त्रातील दिव्य आणि संहारक शस्त्रं भयानक खणखणाट करीत एकमेकांवर टक्करली! स्फुल्लिंग वर्षवून धरतीवर निष्प्रभ होत कोसळली.

अर्जुनानं फेकलेल्या दिव्य अशा सर्वनाशी ब्रह्मास्त्राचंही निवारण त्यानं निर्धारानं केलं! एवढंच काय; पण त्याच्या अचूक बाणांनी आमच्या नंदीघोषावर फरफरणारी ध्वजपताकाही ठिकठिकाणी फाटून निघाली! रथधावेचा आधार घेऊन तो बाण फेकीत होता! वळून ते आमच्या रथात घुसत होते! पिनाक, पाश, तोमर, भिंदीपाल, चक्र, त्रिशूल सर्व-सर्व प्रकारची शस्त्रं त्यांनी एकमेकांवर फेकली! कोणी थकत नव्हतं! युद्धाचा निकाल लागत नव्हता! तिसरा प्रहर संपवून सूर्य पश्चिमेकडे कलू लागला!!

इंद्र आणि बली, नहुष आणि इंद्र, जरासंध आणि भीम ह्या सर्वांहून त्यांचा संग्राम अति भयानक होता! चित्तथरारक होता! क्षणाक्षणाला उग्र होत होता!

निशित, नाराच, जिद्म, सन्नतपर्व, कंकपुंख, बस्तिक, रुक्मपुंख, क्षुर अशा असंख्य बाणांचा जाळीदार खचच खच संपूर्ण समरांगणावर पडला होता! त्यांची इच्छा नसतानाही त्यांनी फेकलेल्या दिव्य अस्त्रांनी असंख्य योद्धे कामी आले! दोन्ही सेनांतील वीर आता केवळ हजारांनी मोजता येतील एवढा भयानक संहार त्या दोघांनी केला होता! दोघेही हटत नव्हते! क्षणभरही थकत नव्हते! सोळा दिवसांत झालेल्या युद्धापेक्षा त्यांचं एक दिवसाचं युद्ध आता कुरुक्षेत्रालाही पाहवत नव्हतं! ते धर्मक्षेत्रही भेदरलं होतं!

निर्वाणीचं म्हणून त्यानं अति कष्ट करून महेंद्रपर्वतावर प्राप्त केलेलं परशुरामाकडील अथर्वण अस्त्र अर्जुनावर फेकलं! त्याचा वेध चुकविण्यासाठी मी सर्व घोडे गर्रकन गोल फिरविले! एक-दोन कासरे नंदीघोष असा मागे घेतला की, तो आता चिखलाच्या पट्टयात उतरला! रथचक्रांना वंगणाचा लेप मी एवढ्याचसाठी दिला होता! अथर्वण अस्त्राचा मारा चुकला!

आमचा रथ त्याच्या रथाच्या दिशेनं पाठमोरा होऊन येत असलेला पाहून शल्य दात-ओठ खात हलण्याचा यत्न करू लागला – पण बाणांच्या पिंजऱ्यात जखडून टाकला गेल्यामुळे त्याला लवभरही हालता काही येईना! तरीही घोड्यांना चेतावणी देण्यासाठी

शिरा ताणून हाकारा देत त्यानं हातातील वेग फटाफट पांढऱ्या घोडयांच्या पाठीवर आदळले! घोडयांनी खर रुपवून सर्व सामर्थ्यानिशी वळविण्यासाठी जिवाची शर्थ केली पण - पण एक सूतभरही तो रथ काही हलला नाही!! आता तो हलणार नव्हता!

अर्धा-एक घटका एका जागीच दलदलीत खिळलेला तो रथ सूर्यकिरणांनी ती दलदल तापवून-तापवून घट्ट केल्यामुळे धरतीनं घट्ट पकडून ठेवला होता! त्याच्या रथचक्राभोवतीची दलदल सूर्यकिरणांनी तापवून घट्ट केली होती! आता आपल्या पुत्राची अधिक कोणतीही मानखंडना करू द्यायला प्रत्यक्ष त्याचा पिता सूर्यच तयार नव्हता! तो त्याला त्याच्या चिरंतन निजधामाकडे घेऊन तर जाणार नव्हता!!

थकलेल्या शल्यानं रथातील बाणभाते सोडून सर्व अवजड शस्त्रं खाली फेकण्याची कर्णाला सूचना केली! तो भराभर सर्व शस्त्रं बाहेर फेकू लागला. निसरडया रणभूमीवर पुन:पुन्हा पायांचे खूर नेटानं रुपवून-रुपवून रथ उद्धरताना घोडयांच्या तोंडाला फेस आला! तरीही रथ एक कणभरही पुढं सरकला नाही! त्याच्या रथाचं डावं चक्र रणभूमीत फसलं होतं!! महेंद्रपर्वताच्या चिखलात वाट चुकलेला खोंड फसतो तसं!!

मी अर्जुनाचा नंदीघोष त्याच्या रथाभोवती प्रथम मंडलाकृती गरगर फिरवू लागलो! तरीही तो बाण फेकीतच होता!

"अंगराज, रथ हलत नाही! डावं चक्र धरतीनं गिळलं आहे!" शल्य भयाकुल स्वरात कसातरीच ओरडला.

"माद्रेया थरकू नकोस! रथचक्र बाहेर खेचतो!" पाठीवरचा भाता आणि हातांतील अखंड बाणफेक करणारं विजय धनुष्य सावरीत तो रथातून एका झेपेतच खाली उतरला! खाली! पश्चिम क्षितिजाचा सोपान उतरणाऱ्या सूर्यासारखा!

माझ्या मनात विचारांचं काहूर उठलं! तो – रथातून खाली!

सूतपुत्र – अंगराज – सेनापती – दिग्विजयी – दानवीर – अजिंक्य धनुर्धर कर्ण – की – की ज्येष्ठ कौंतेय – पहिला पांडव!!

त्यानं उजवा हात डाव्या रथचक्राच्या एका भक्कम आऱ्याला घालून ते उद्धरण्यासाठी सर्व सामर्थ्य एकवटलं! त्याच्या दंडाचे भक्कम, पिळदार, चिवट स्नायू टरारले! ताणलेल्या कपाळावर घामाचे थेंबच थेंब दाटले! एक दमदार झटका बसला! रथचक्र हललं नाही! रथचक्राचा तो भक्कम आराच खळकन त्याच्या हाती आला!

त्याच्या हातात धनुष्य पाहून अर्जुन बाण फेकीतच होता! ते बाण त्याच्या उघडया दंडात रुपू लागले! तो खाली बसला! रुपेल तितकं धनुष्य धरतीत खाली रुपवून त्यानं ते स्थिर केलं! आता त्यानं बाणफेकीचा बैठा पवित्रा घेतला.

डाव्या हातानं आपल्या पाठीवरचे बाण काढून तो त्या एकाच हातानं ते विजय धनुष्यावर चढवू लागला! दाताच्या भक्कम पकडीत प्रत्यंचा पकडून ती ताकदीनं खेचून दातांनी अचूक बाणफेक साधू लागला! उजव्या हातानं रथचक्र उद्धरण्यासाठी निकरानं झुंजू लागला!! आणखी एक-दोन भक्कम आरे निखळले, पण रथचक्र काही हललं नाही!! हलणार नव्हतं!! त्यानं एका हातानं फेकलेल्या एका मर्मभेदी बाणामुळे अर्जुन मूर्च्छित झाला! कोसळला! ते पाहून निर्धारानं त्यानं हातातील विक्रमी विजयी धनुष्यही खाली ठेवलं! चिखलात दोन्ही हात खुपसून सर्व-सर्व सामर्थ्यानिशी रथचक्र बाहेर काढण्यासाठी!!

सकाळपासून हा एकच एक क्षण असा येत होता की, त्याच्या हातातील धनुष्य दूर होत होतं! एकच क्षण! निर्वाणीचा एकच क्षण!! हा चुकला तर – तर??

मी लाकडी नळीतील औषधी वनस्पती अर्जुनाच्या नाकासमोर धरली. तो क्षणात सावध होऊन पुन्हा उभा राहिला.

त्याला नि:शस्त्र पाहून मात्र अर्जुनानं आपलं गांडीव धनुष्यही खाली घेतलं!! नि:शस्त्रावर शस्त्रफेक कशी करायची म्हणून!

गोकुळातील कुरणात अंगाला अंग घासत घुसणाऱ्या गायींच्या कळपासारखे, माझ्या मनाच्या प्रांगणावर विचार उधळले! नंदीघोषाच्या पाच घोड्यांचे हातातील वेग मी थडाथड त्यांच्या पाठीवर एकलग आदळू लागलो. काही-काही सुचत नव्हतं! महत्त्वाचा एकच क्षण नाहीतर – नाहीतर रथचक्र उद्धरून तो आकाशवीर पुन्हा जैत्ररथावर झेपावणार होता. मग अर्जुनाचं खरोखरच काहीही खरं नव्हतं!

माझ्या हातांत वेग पाच होते! आसूड मात्र एकच! एक की पाच? वेग की आसूड? आसूड की वेग? पाच की एक? छे! काही-काही कळेना. एवढ्यात विचाराचा एक प्रकाशकिरण तरळून गेला! अतिशय व्यावहारिक? अतिशय निर्विवाद!

वेगामुळे घोडे आवरले जातात!! आसुडामुळे घोडे उधळले जातात!! क्षणात मी उजव्या हातातील आसूड रथावरच्या व्याघ्रचर्माच्या पोकळीत खुपसून ठेवला! वेग उंच उडविले! उजव्या हाताची तर्जनी त्या रथचक्र उद्धरण्यासाठी झुंजणाऱ्या ज्वालामुखीवर रोखून अर्जुनाला म्हणालो, “अर्जुना, अर्धचंद्राकृती अंजलिक बाण!!”

‘‘पण – तो नि:शस्त्र आहे! पदस्थ आहे! मी रथारूढ आहे!!” अर्जुन चाचरला. पुन्हा संभ्रमित झाला!

“अर्जुना, ही आज्ञा आहे.” माझा स्वर कठोर झाला, धारदार झाला! डोळे विस्फारले!

आज्ञाधारक अर्जुनानं अंजलिक बाण सरकन भात्यातून खेचून, प्रत्यंचा ठीक आहे की नाही हे पाहण्यासाठी ती चिमटीत धरून तिचा एकदा टंकार केला! तेवढा – अगदी तेवढा सूक्ष्म आवाज ऐकूनही त्यानं रथचक्रावरचे आपले डोळे आमच्याकडे गर्रकन फिरविले! अर्जुनानं फेकीसाठी सावरलेलं धनुष्य पाहून डावा तळहात विस्फारून तो मनगटातून गदागदा डोलवीत तो ओरडला –

“अर्जुना, थांब! मी नि:शस्त्र आहे! पदस्थ आहे! नि:शस्त्र पदस्थावर शस्त्र फेकणं हा युद्धधर्म नाही!! तू वीर आहेस! क्षत्रिय आहेस!!’’ तेवढ्यात त्यानं महेंद्रावर प्राप्त केलेलं ब्रह्मास्त्र आठवण्याचा प्रयत्न केला असावा. ते त्याला काही केल्या स्मरेना!

मला माहीत होतं – तो मरणाला कधीच भिणार नव्हता! केवळ ज्या शस्त्रावर त्यानं जीवनभर जिवापाड प्रेम केलं ते शस्त्र हाती असताना येणारा मृत्यूच त्याला पाहिजे होता! – पण तोही आता त्याला मिळणार नव्हता! ते योग्य नव्हतं – आणि आता तर ते शक्यही नव्हतं!

त्याचे भेदक उद्गार ऐकून अर्जुनही भांबावला! चलबिचल झाला! त्याच्या हातातील सावरलेलं धनुष्य, पुन्हा हळूहळू खाली येऊ लागलं! निर्धार डळमळू लागला! त्याचे ओठ पुन्हा सुकले.

आता त्या राधेयाला जीवनाची एकही घटका देण्यात अर्थ नव्हता – कारण –

त्याचं सत्य जीवन कोणालाही पेलवणारं नव्हतं! त्यासाठी अर्जुनाच्या मनाची भक्कम तयारी करण्यासाठी व्यवहाराचं गोंडस तत्त्वज्ञान मलाच पुन्हा कर्णाला ऐकविणं भाग होतं! तो आव्हानत होता तो धर्मच त्याच्या अंगावर उलटवून मला आता अर्जुनाला गतस्मृतींची आठवण देऊन खंबीर करायचं होतं! ढासळलेला, संभ्रमित अर्जुन मला आता पुन्हा ताठ उभा करायचा होता! माझ्या मुखातून शब्दांची यमुना धावू लागली – फेसाळणारी – महापुरासारखी.

"धर्म! राधेया, धर्माचा अर्थ तुला माहीत तरी आहे काय? सूतपुत्रा, कुरूंच्या प्राचीन सभागृहात पांचालीला वारांगना म्हणताना तुझा हा दिव्यधर्म कुठं गेला होता? पाचही पुत्रांसह वनात अनवाणी जाणाऱ्या कुंतीदेवीला पाहताना तुझा धर्म कुठं लपला होता? लाक्षागृहात पांडवांची राख झाली ही वार्ता ऐकताना तुझा धर्म का आक्रोशला नाही? सोळा वर्षांच्या कोवळ्या अभिमन्यूला तुम्ही सहा जणांनी घेरलात तेव्हा, हे सूतपुत्रा, तुला तुझा आता आठवणारा धर्म त्या वेळी का आठवला नाही? अर्जुना, वेध साध!" मी तर्जनी कर्णाच्या कंठाच्या दिशेनंच अचूक रोखली!

तरीही तो हसला! त्यानं दोन्ही हात जोडले! कुणालाही विनंती करण्यासाठी नाही – मला केवळ मलाच वंदन करण्यासाठी!! मी – केवळ मीच ते समजू शकत होतो! त्याचं रणांगणावरचं अंतिम वंदन! मूक, अबोल डोळ्यांतून ओसंडणारं.

अर्जुनाच्या धनुष्यातून झंकारत निघालेला सुसाट अंजलिक बाण त्याच्या भरगच्च कंठावर असलेल्या लोह-कवचाचाही भेद करून त्याचा कंठनाल अर्धवट छेदून कचकन रुतून बसला! तो महारथी रथचक्राजवळ चिखलात कोसळला! विजयधनुष्य दूर उडालं. त्याचं अधरीय रथचक्र उद्धरण्याच्या झटापटीत चिखलात माखून गेलं होतं! झिजलेली डाव्या रथचक्राची काढणी त्यानं यातनेचा एक मर्मभेदक झटका देताच तटकन तुटली! रथचक्र कण्यातून उखडलं! 'कर्ण घायाळ होऊन पडला!!' ती वार्ता ऐकताच दोन्ही सैन्यातील सैनिकांनी शस्त्रं टाकली! ती वार्ता कोणालाच सत्य वाटत नव्हती. जो-तो आवतीभोवतीच्या योद्धयाला 'काय झालं? काय झालं?' म्हणून विचारू लागला.

हा कठोर निर्णय घेण्यासाठी त्याला निर्वाणीच्या वेळी सूतपुत्र म्हणताना ज्या असंख्य यातना मला झाल्या त्या माझ्या मलाच माहीत! हातातील वेगही मी खाली टाकले! समाजरचनेसाठी उभारलेली मनाची, तत्त्वनिष्ठेची उभारीही ढासळली!

मी रथावरून खाली उतरून त्याच्या घायाळ देहाकडे 'राधेया!' म्हणत हात उंचावून सुसाट धावू लागलो! त्याच्यावर जिवापाड प्रेम करणारा अश्वत्थामा तर केव्हाच त्याच्या रथाजवळ येऊन पोहोचला होता! तो पडला ही वार्ता ऐकून दुर्योधन मूर्च्छित झाला. युद्ध थांबवून रथातच कोसळला! उन्मळून पडणाऱ्या तीक्ष्ण काठाच्या कड्यासारखा!

अश्वत्थाम्यासह पाच धिप्पाड योद्धयांनी आपल्या सेनापतीचा जखमी देह शिबिराजवळच्या कोरड्या जागेवर आणला. रक्ताची त्याच्या कंठातून लोहत्राणावर उधळली.

त्याचे अर्धवट मिटलेले निळे डोळे एकटक निळ्या आकाशाकडंच पाहत होते! अश्वत्थाम्यानं आपलं मुख त्याच्या डोळ्यांपुढे नेताच त्यानं निकरानं डोळे उघडले! "गुरुपुत्राऽ...!" अश्वत्थाम्याच्या मस्तकावरच्या वस्त्राकडे पाहत तो तुटक पुटपुटला!

त्याचे ओठ स्फुरत होते.

सर्व विसरून अश्वत्थामा धावला या आनंदात कर्णाला काहीच बोलवेना! अश्वत्थाम्यानं त्याचे भाव अचूक जाणले! झटपट मस्तकावरच्या हनुवटीखालची गाठ उचकटून त्यानं ते वस्त्र खालच्या धुळीत फेकून दिलं. त्याच्या माथ्यावर कर्णाच्या मांसल कुंडलासारखाच एक जन्मजात लालवर्णी मांसल मणी होता!! त्या दोघांशिवाय कोणालाही त्या दिव्य देणग्या मिळाल्या नव्हत्या!

त्या अंतिम श्वास मोजणाऱ्या महारथ्याचा उजवा हात हळुवार उचलून तो अश्वत्थ्याम्यानं दाटल्या नेत्रांनी आपल्या माथ्यावरच्या मांसल मण्यावर ठेवला!! त्या मण्याचा दिव्य स्पर्श होताच त्याला आपल्या दूर-दूर गेलेल्या कुंडलांची स्मृती झाली! त्याचे निळे डोळे सताड उघडले गेले! त्या दोघांच्याही तोंडून एकही शब्द फुटत नव्हता! अश्वत्थाम्याचे अश्रू त्याच्या अश्रूंत मिसळत होते! त्यानं फेकलेल्या वरुणास्त्रातील पावसाचे काही थेंब दूरवर दृषद्वतीच्या काठी दवबिंदूंसारखे चमचमताना मला स्पष्ट दिसत होते! चमचमणारे दवबिंदू! आता क्षणातच एक वायुलहर येईल आणि ते भूमीत विरतील!

युधिष्ठिर अर्जुनासह – पाचही पांडव आणि सर्व योद्धे यांनी त्याच्याभोवती मुंगीही शिरणार नाही, असं दाट कडं केलं होतं!

त्याचा पुत्र चित्रसेन त्याच्याजवळ अश्रुपूर्ण नेत्रांनी बसला होता! सगळेच स्तब्ध होते. त्याचे क्षणात मिटणारे; क्षणात अर्धवट उघडणारे डोळे सर्वांवर गरगर फिरू लागले! तो बहुधा दुर्योधनाला पाहू इच्छित असावा! तो त्याला भोवती कुठंच दिसत नव्हता!

माझ्याकडे पाहताच त्या तशा स्थितीतही त्याच्या मुखावर हास्याची एक अस्फुट लकेर स्पष्ट चमकून गेली! निकरानं त्यानं पुन्हा आपले डोळे संपूर्ण उघडले! अवजड वाटणारे दोन्ही हात हळूहळू वर उचलीत त्यानं आपल्या मस्तकावरचा मुकुट काढून तो माझ्या चरणांवर हळुवार हातांनी ठेवला!

राजसूय यज्ञाच्या दिवशी तो अनावृत मस्तकानं यज्ञमंडपात बसलेला पाहून मीच तो अश्वत्थाम्याकरवी त्याच्या मस्तकावर ठेवला होता! आता तो मुकुट तेवढ्याच अबोलपणे तो माझ्या चरणांवर ठेवीत होता! गाढ भक्तीनं!

त्यानं चरणांवर ठेवलेला तो मुकुट मी खाली वाकून वर उचलला! कधी नव्हे ते माझ्या डोळ्यांतही दोन अश्रुबिंदू तरळले!! आता त्याचा त्या मुकुटावर काहीच अधिकार नव्हता! मी पीतांबरानं त्यावरची धूळ पुसली! पांडवांसह सर्व योद्धे ते पाहताना विस्मित झाले! त्यांना काय कळणार होतं? कसं कळणार होतं, तो कोण होता हे! सगळीकडे शांतताच पसरली! आपल्या डोळ्यातील आत्मजल रोखीत चित्रसेन त्याच्या मुखात पवित्र नद्यांचं जल घालू लागला! श्वास रोखून, आपल्या अर्धवट तुटलेल्या कंठाखाली ते जल घोटताना त्याला होणाऱ्या असंख्य यातना प्रत्येक जण डोळ्यांत प्राण आणून पाहू लागला! गंगेत अर्घ्यदान करणारा तो भक्त गंगेचं पवित्र जल पीत होता!

**

# तेरा

“अरेऽऽ कोणीतरी दानवीर या धरतीवर आज शिल्लक आहे काय?” थरथरणारे वृद्ध बोल कुठूनतरी आले. भोवतीच्या शांततेला चिरत गेले. सर्वांनी एकदम माना वळविल्या! पराकोटीच्या आश्चर्यानं!

एका वृद्ध ब्राह्मणानं युद्धात कामी आलेल्या आपल्या पुत्राचं प्रेत शोधून काढलं होतं – पण – पण – त्याचा दहनविधी करण्यासाठी लागणारंही धन, निर्धन अशा त्या एकाकी वृद्धाजवळ नव्हतं! तो आर्तपणे चीत्कारत भेटेल त्या जिवंत, जखमी योद्धयाला गाठून आपला सुरकुतलेला हात पसरत समरांगणावर गरगर फिरला होता! युद्धाच्या वणव्यात माणुसकी होरपळून निघाल्यामुळे एकही योद्धा त्याच्या आक्रोशाकडे लक्ष द्यायला तयार नव्हता! गर्दी पाहून आशेनं तो आम्ही उभे होतो तिथं आला होता! योद्धयाच्या कड्यात कोणता महावीर अंतिम श्वास मोजतो आहे वगैरे काहीच माहीत नसल्यामुळे तो बाहेरूनच ओरडत होता!

“अरेऽऽ कोणीतरी दानवीर या धरतीवर आज शिल्लक आहे काय?” त्याची मान लडलडत होती, हातातील आधाराची काठी थरथरत होती!

त्याचे थरथरणारे कातर बोल जखमी कर्णाच्या जडशीळ होणाऱ्या कानांत शिरताच ‘दानवीर’ या शब्दाशी निगडित असलेला त्याचा दिव्यात्मा क्षणात पाझरला! त्याचं संपूर्ण शरीर एकदम कसंतरीच थरथरलं! साथ न देणारे कंठाचे धागेही त्यानं क्षणात नमवून टाकले! चित्रसेनाकडे पाहत तो बोलला – अगदी स्पष्ट –

“चिऽ त्रऽसेऽन - याऽ चऽक!”

चित्रसेन तत्काळ उठला. लगबगीनं कड्याबाहेर जात त्यानं त्या वृद्ध ब्राह्मणाच्या हाताला धरून त्याला आत आणून पित्यासमोर उभं केलं! त्या वृद्धाचे भुरके पांढरे केस विखुरले होते! सुरकुत्यांच्या जाळ्यात डोळे गुरफटले होते! मान लडलडत होती.

“बोऽ ल, ब्रह्मऽ वरा इच्छा काय?” समोर हात पसरलेल्या त्या वृद्धाला पाहताच त्या जखमी सेनापतीचे ओठ थरथरले!

त्या महावीराच्या कंठातून ओघळलेले दाट रक्ताचं थारोळं पाहून तो वृद्ध स्वतःच्या पुत्रनिधनाचं भयानक दुःखही विसरला! आर्जवानं म्हणाला – “काही नाही! अंगराज, काही नाही!!” त्या वृद्धानं अनेक वेळा त्याच्याकडून दान घेतलं होतं! तो अशा घायाळ स्थितीत, एकाकी, मरणोन्मुख स्थितीत त्याच्याकडे आता काय मागणार होता?

ही आणि हीच वेळ भोवतीच्या पांडवांना खरा ज्येष्ठ कौंतेय कसा आहे हे दाखविण्याची होती! पांडवांना लौकिक आणि त्याला पारलौकिक श्रेष्ठत्व देण्याची होती.

मी पुढं होत त्याच्या कानाजवळ जात म्हणालो, “या वृद्धाजवळ युद्धात कामी आलेल्या पुत्राचा अंत्यसंस्कार करण्यासाठी लागेल एवढंही धन नाही! तो त्यासाठी एखादा दानवीर शोधत आहे!”

‘दाऽऽ नवीऽर!’ तो स्वतःशीच अस्फुट पुटपुटला. एकदम त्यानं आपले डोळे

गपकन मिटले! इतस्तत: हातपाय हलवून तो तळमळू लागला! असाहाय्यतेनं मुठी वळू लागला! त्या याचकाला कोणतं दान द्यावं ते त्याला सुचेना! त्याची कोंडी फुटेना! छातीवरचं लोहत्राण लपलप खालीवर होऊ लागलं!

काय करणार होता तो आता? त्याचं दानशूरत्व आता या अंतिम क्षणी कळंजून जाणार होतं! लोखंडी शस्त्र आणि लोहत्राण यांशिवाय भोवतीच्या कुठल्याही योद्धयाच्या अंगावर एक साधा फुटका मणीही नव्हता! सोनेरी किरीट उरले होते; पण ते पांडवांच्या मस्तकांवर!!

त्याचे तळमळणारे हातपाय एकदम एकाएकी थांबले! कसल्यातरी निर्धारानं त्यानं पुन्हा आपले निमुळते डोळे उघडले! त्यांतून एक अनावर, अद्‌वितीय तेज नुसतं ओसंडून चाललं होतं!

"चिऽऽत्र से न, पाऽऽषाऽऽण!" त्यानं चित्रसेनला आज्ञा केली. आपल्या पित्याची आज्ञा पाळणारा चित्रसेन उठला. त्यानं दूरवर जाऊन एक पाषाण खंड आणला! चित्रसेनाला समोर पाहताच त्याचे निळे डोळे एका विलक्षण, अबोध अशा तेजानं तळपू लागले!

तो धडाधडा बोलू लागला – सर्व शक्ती एकवटून!

"चित्रसेन... त्या – पाषाणानं... माझ्या मुखातील... सोनेरी दात – दात – पाडून ... ते – ते – याचकालाऽऽ!" ताण पडल्यानं तो क्षणभर थांबला. कंठातील बाणांमुळे होणाऱ्या तीव्र यातनांना थोपविण्यासाठी त्यानं डोळे घट्ट मिटले!

चित्रसेन उभ्या-उभ्याच थरथरू लागला! त्याच्या पित्यावर त्याचं नितान्त प्रेम होतं! या अंतकाळी त्याच्या चरणांवर फुलं उधळायची सोडून - प्रत्यक्ष त्याचे दात पाडायचे हे कठीण – महाकठीण कर्म तो कसा काय करू शकला असता? त्या पंचविशीतल्या उभारीच्या तरुणाच्या अंगाला कंप सुटला – कपाळावर घामाचं थारोळं साठलं!

"चित्रसेन!" त्याच्या आवाजाला धार आली. लोहत्राणावर आदळणाऱ्या बाणाच्या पात्यासारखा त्याचा आवाज होता!

"तुला... तुला कुरूंच्या सेनापतीची... ही... ही आज्ञा आहे!! चिऽत्रसेऽन!" त्याच्या आवाजात अधिकाराची विलक्षण धार होती! त्याची आज्ञा भोवतीच्या कुठल्याही वीराला मोडता येणार नव्हती. भोवतीच्या योद्धयांच्या कानावर विश्वास बसत नव्हता!

सर्वांचे डबडबलेले डोळे चित्रसेनावर खिळले. तो थरथर कापतच होता. दिवसभर रणांगणात सिंहासारखा लढणारा तो वीर आता सशासारखा थरथरत होता! एका जागी संवेदनाहीन झाल्यासारखा खिळला होता. त्याच्या कपाळावरचे घामाचे थेंब हातातल्या पाषाणावर टपकले!

"चित्रसेनऽऽ!" त्याचे ओठ आता थरथरू लागले. डोळे आग पाखडू लागले. तो क्रोधानं आपल्या पुत्राकडे पाहू लागला! अवज्ञा करणाऱ्या सैनिकाकडे सेनापतीनं पाहावं तसं!

अंगावर वीज पडल्यासारखा चित्रसेन झटकन पुढं झाला! तो कितीही झालं तरी त्याचाच अंकुर होता! चित्रसेनाला पुढं झालेला पाहताच त्याचे डोळे आनंदानं चमकले. क्षणातच त्यानं ते घट्ट मिटून कंठाभोवतीच्या वेदनांहून आता दातांच्या मुळांतून येणाऱ्या असह्य वेदना सहन करण्यासाठी आपल्या हातांच्या भक्कम मुठी वळल्या.

निमुळत्या डोळ्यांभोवतीचं सोनेरी कातडं संकोचलं. नेहमी सूर्यस्तोत्राचे पावन मंत्र उच्चारणारं आपलं विमल मुख त्यानं विस्फारलं! पूर्ण उमललेल्या टवटवीत सूर्यफुलासारखं सूर्यफुलातील परागदंडासारखेच दाटावाटीनं बसलेले शुभ्र दात चमकले! त्यांतील दोन दात सुळ्यासारखे संपूर्ण सोन्यानं मढविले होते! ते पिवळी सतेज किरणं फेकू लागले! सूर्यतेजात तळपू लागले!

उरातून उफाळणारा उमाळा निकरानं गळ्यातचं थोपवून चित्रसेनानं हातातील पाषाण उंचावला! अनेकांनी डोळे मिटून घेतले! कोणत्याही युद्धभूमीवर साकारलं नसेल असं सत्य कुरुक्षेत्रावर साकारत होतं!

'खाऽड! खाऽड!' दोन आवाज कुरुक्षेत्राच्या भूमीत विरले! हातातील पाषाण फेकून अनावर झालेला हुंदका आपल्या वीर पित्याला ऐकवणार नाही, कधीही मानवणार नाही म्हणून चित्रसेन तीरासारखा भोवतीचं कडं फोडून स्फुंदत-स्फुंदत बाहेर धावला! शक्तिपात झाल्यासारखा!

या दानवीराचे सुंदर सोनेरी दात निखळून त्याच्याच तोंडात पडले!! त्या दातांच्या मुळांतून उफाळलेलं रक्त गालावरून ओघळत त्याच्या कंठावरच्या जखमेच्या रक्तात मिसळू लागलं! टपऽ टपऽ कुरुक्षेत्रावर ठिबकू लागलं. भोवतीच्या योद्धयांचे अश्रूही पाझरू लागले. त्यानं मोठ्या कष्टानं तोंडातील दात हातात घेतले! आता त्याचे डोळे विलक्षण असाधारण तेजानं तळपत होते! कधीमधी उमटणारी खळी गालावर उमटत होती!

तो थरथरत तुटकपणे बोलू लागला – "याचका, हे दान... रक्तानं माखलेलं हे अपवित्र दान – कसं... कसं – तुझ्या पवित्र – हातावर ठेवू?" पुन्हा सर्वांच्या अंगावर काटा उभा राहिला! त्याची जीवनाची अचूक कल्पना काय होती हेच माझ्याशिवाय भोवतीच्या कुणालाही समजू शकत नव्हतं! समजलं तरी ते कधीही पचू शकत नव्हतं!

हातातील दातांवरचे रक्ताचे डाग कसे घालवावेत, हे न समजल्यानं पुन्हा असाहाय्य झालेल्या त्याच्या तळपणाऱ्या नीलवर्णी डोळ्यांतून अश्रूंची संतत धार पाझरू लागली! डबडबत्या नेत्रांनी त्यानं अमीन टेकडीकडे कलत चाललेल्या आकाशातील आपल्या पित्याकडे क्षणभर पाहिलं! एकटक! अविचल!

दुसऱ्याच क्षणी जाणिवेची एक अद्‌भुत, गूढ, सूक्ष्म तार त्याला चेतावणी देऊन निघून गेली! जीवनभर जे-जे अतर्क्य होतं ते-ते असाच तो करीत आला होता.

डोळ्यांतून पाझरणाऱ्या अश्रूंच्या धारेत त्यानं हातातील रक्तमय दात धरले!! अविरतपणे, अखंडपणे डोळ्यांतून अश्रू पाझरत राहावेत म्हणून तो अविचलपणे, एकटकपणे सूर्यबिंबाकडे पाहतच राहिला! त्याच्या अथांग मनात भावनांचा कसला महाभयानक कल्लोळ माजला असेल त्याची कल्पनाही करता येत नव्हती! प्रत्यक्ष मलाही!

त्याच्या सोनेरी दातांवरचं रक्त त्याच्या विशुद्ध अश्रूंत वाहून गेलं! दात स्वच्छ झाले! सूर्यकिरणांत चमचम तळपू लागले! परावर्तित किरणं फेकू लागले! त्याहून त्याचे डोळे आनंदाच्या विलक्षण समाधानाच्या ऊर्मीनं तळपू लागले.

मनगटातील अर्धवट तुटलेल्या निशिगंधाच्या मालेतील एक फूल उपटून त्यानं ते दातांवर ठेवलं! ते दान आपल्या भव्य कपाळाला लावून त्यानं हसत-हसत हात उंचावला! याचकाला दान देण्यासाठी! आता ते दान सर्व विधींनिशी पूर्ण शुचित दान झालं

होतं!

जगात अनेकांनी दान केलं असेल पण – पण मरणाच्या दारातील एवढं चित्तथरारक, उत्तुंग एकनिष्ठ, अजोड दान तो एकटाच करू जाणत होता – पहिला पांडव! ज्येष्ठ कौंतेय!! सूर्यपुत्र!! अजोड दानवीर.

सभोवतालच्या असंख्य मुखांतून सहजोद्‌गार बाहेर पडले – "साधुऽ साधुऽ! धन्य! धन्य!"

थरथरणारा वृद्ध ब्राह्मण पुढं झाला! आता ते दान स्वीकारणंच भाग होतं! थरथरत्या ओंजळीत त्यानं ते दान घेतलं! त्याच्या वृद्ध डोळ्यांतून पाझरलेले कृतज्ञ अश्रू त्या दोन सोनेरी दातांवर आणि अर्धवट तुटक्या निशिगंधाच्या फुलांवर पडले! त्या वृद्ध याचकाला वंदन करण्यासाठी तो मान झुकविण्याचा प्रयत्न करू लागला. कंठातील बाणानं त्याला ते शक्य होईना! तो वृद्ध न राहवून बोलला, "दानवीर कर्ण! जिनं तुला जन्म दिला ती माता धन्य आहे! ज्या भूमीनं तुझा देह पोसला ती ही भूमी धन्य! दानवीर कर्ण, आर्यावर्तात तुझ्यासारखा एकनिष्ठ दानवीर झाला नाही - भविष्यात कधीही होणार नाही!!" ते बोल तळमळीचे होते.

थरथरणारी मान आणि ओघळणारे अश्रू सावरीत तो वृद्ध ते अजोड दान घेऊन आपल्या पुत्राच्या मृत देहाकडे जाण्यासाठी वळला. तो वृद्ध ब्राह्मणवेषात आलेला प्रत्यक्ष सूर्यदेव तर नव्हता?

त्याला समाधानानं परतताना पाहून क्षणाचाच सोबती असलेल्या त्या दानवीराच्या मुखावर एक अस्पष्टशी हास्याची लकेर तरळून गेली! कोणतं समाधान होतं त्या हास्यात? सर्वांनाच ते समजू शकत नव्हतं!

अर्जुनाच्या हातातील धनुष्य आणि भीमाच्या खांद्यावरील गदा आता थरथरत होती! एवढी अचाट सहनशक्ती पाहूनही त्यांना कळत नव्हतं की, तो सूतपुत्र नव्हता – नाही!

तो सूर्यपुत्र होता – कौंतेय होता – त्यांचा – त्यांना शोभून उरणारा ज्येष्ठ बंधूच होता! पण त्यांना ते अद्याप माहीत नव्हतं!

त्याचे समाधानी डोळे अजूनही भिरभिरत कुणालातरी शोधतच होते!... दुर्योधनाला!

शुद्धीवर आलेला दुर्योधन पळत धापावत आला! मगरानं पाणी फोडावं तसं भोवतीचं कडं फोडून आत घुसला! "महाबाहोऽ मित्रवर, अंगराजऽऽ!" तो त्याला पाहताच कितीतरी भेदकपणे चीत्कारला! आयुष्यात कधी – कधी नव्हते ते त्याच्या घाऱ्या डोळ्यांतही अश्रू तरळले! त्याचे सख्खे ऐंशी बंधू ठार झाले होते – पण– त्यांच्यासाठीसुद्धा तो कधीही एवढा विरघळला नव्हता! कळवळला नव्हता!

त्यानं दुर्योधनाला डोळ्यांच्या संकेतानंच आपल्या जवळ बोलावलं. आता तो अगदी शेवटचं दान करू इच्छित होता! शेवटचं आणि महत्त्वाचं दान – विचारांचं दान!

"मित्रवर, माझ्या... माझ्या मृत्यूबरोबरच हे... हे विनाशी युद्ध... युद्ध थांबव!!" त्याचे थरथरणारे ओठ पाहताना सर्व हळहळले! खरोखरच त्याचं अंतरंग अथांग होतं.

"नाहीऽऽ! अंगराज – मित्रा, तुझ्यासारख्या महापराक्रमी वीरानं माझ्यासाठी बलिदान पत्करावं आणि – आणि मी मात्र मृत्यूच्या भयानं समेट करावा हे मला लांच्छनास्पद आहे! जर मृत्यू पितामहांना, गुरू द्रोणांना आणि आज तुलाही घेरू

शकतो, तर – तर मी काय आणि कुणीही काय चिरंजीव नाही! तुझ्यासाठी – तुझ्यासाठीच ते चालू राहील.” दुर्योधनानं एक जळजळीत कटाक्ष माझ्यावर आणि अर्जुनावर फेकला! दुसऱ्याच क्षणी गुडघे टेकून त्याचा दीर्घबाहू हातात घेऊन तो एवढा निग्रही कौरवनेता स्फुंदू लागला! चित्रसेनाहून भयानक! कर्णानं दुसऱ्या हातानं थोपटून-थोपटून दुर्योधनाला शांत केलं! आता तो कणाकणांनी पृथ्वीचा त्याग करू इच्छित होता! दात आणि कंठ यांतून झालेल्या अविरत रक्तस्त्रावानं त्याला आता वारंवार ग्लानी येऊ लागली! अश्वत्थाम्यानं पुढं होत त्याचं मस्तक प्रेमभरानं आपल्या मांडीवर घेतलं! रक्तस्त्रावानं आता त्याच्या डोळ्यांवर एकसारखी झापड येऊ पाहत होती!

मला वाटलं होतं की, दुर्योधन त्याला या अंतकाळी त्याची अंतिम इच्छा काय आहे म्हणून विचारील! पण – पण दु:खावेगानं त्याला तेवढं भानच राहिलं नव्हतं! दुर्योधनाचं जीवन आता कण्यांतून निखळलेल्या रथचक्रासारखं झालं होतं! दिशाहीन!

त्या दानवीराचे श्वास आता अडखळू लागले! अर्धवट झापडलेले डोळे सूर्यबिंबाशी एकरूप होऊ लागले! लय पावू लागले! त्याचा सुंदर देह अचल होत होता! त्याच्या दमदार श्वासोच्छ्वासाबरोबर लयीत वरखाली होणारं विशाल छातीवरचं लोहत्राण आता मंद-मंद स्पंदू लागलं!

त्याची अंतिम इच्छा विचारण्याचं सर्व-सर्व नैतिक उत्तरदायित्व आता केवळ एकटच्या माझ्यावर येऊन पडत होतं! केवळ एकटच्या माझ्यावरच!!

झटकन मी पुढं झालो! त्याच्या पाळं तुटलेल्या कानांजवळ तोंड नेत हळूच पुटपुटलो. “कौंतेया, तुझी अंतिम इच्छा?”

त्यानं झापडणारे निमुळते डोळे निर्धारानं पुन्हा उघडले! दोन अश्रुबिंदू त्याच्या डोळ्यांत तरळलेले मला स्पष्ट दिसत होते! कसले होते ते! दु:खाचे? पश्चात्तापाचे? छे; धन्यतेचे!! कृतार्थतेचे!! मी – स्वत: मी त्याला ‘कौंतेया ’ म्हटलेलं ऐकून धन्य झाल्याचे! तोही हळूहळू पुटपुटू लागला, “द्वारकाधीशा... माझी अंतिम इच्छा! इच्छा की... तू – तूच माझा अंत्यसंस्कार... एका... एका... कुमारी-भूमीवर करावा!! कुमारी-भूमी!!” त्याचा आवाज अत्यंत क्षीण झाला होता.

“कुमारी-भूमी!! म्हणजे?” त्याला अचूक काय पाहिजे होतं ते मला नीटपणे कळलं नाही म्हणून मी पुटपुटलो.

“होय... कुमारी! ज्या भूमीवर... कधी – कधीच... तृणांकुरसुद्धा... उगवले नसतील... उगवणार नाहीत! माझी दु:खं... ती... ती पुन्हा - पुन्हा या मर्त्य भूमीवर – कधीच – कोणत्याही रूपात उगवू नयेत!!! म्हणून... ही – ही पंचमहाभूते... कुमारी-भूमीत – लय – लय...!”

त्याचा आवाज आता अत्यंत क्षीण व अस्पष्ट होत चालला होता. त्याची ती धक्का देणारी विलक्षण अंतिम इच्छा ऐकून मीही स्तिमित झालो! तो अर्धवट बोलत होता. त्याला आणखी काही सांगायचं तर नसेल म्हणून मी माझे कान त्याच्या अगदी ओठांजवळ नेले. टवकारून ऐकू लागलो. एकचित्तानं!

तो अस्पष्ट अर्धवट शब्द उच्चारत होता –

“ली... ली... माता... माता... ण... न!”

तो काय म्हणू इच्छित होता ते माझ्याशिवाय कुणालाच स्पष्ट सांगता आलं नसतं! तो वृषाली म्हणत होता की पांचाली! तो कुंतीमाता म्हणत होता की राधामाता!!

शोण म्हणत होता की अर्जुन!!! मी ताडलं - तो दोन्हीही म्हणत होता!!!

आता त्याच्या तोंडातून अस्पष्ट शब्दही बाहेर पडेनासे झाले! सूर्यबिंबावर खिळलेल्या निळ्या बाहुल्या कणभरही नव्हत्या! त्याच्या ओठांच्या हालचालींवरून तो काय म्हणत होता ते मी ओळखू शकत होतो! अर्घ्यदान करणाऱ्या एका एकनिष्ठ सूर्यपुत्राचे ते शेवटचे शब्द होते. ओठांच्या हालचालींवरून नक्कीच सवितृ मंत्राचे, गायत्री छंदातले ते दिव्य बोल होते!!

"ॐ भूर्भुवः स्वः तत्सवितुर्वरेण्यंऽऽऽ!" एकाएकी त्याच्या ओठांची तीही हालचाल क्षणात थांबली! सर्वांनी श्वास रोखले! त्याचा आकाशदत्त श्वास पूर्ण थांबला! छातीवरचं स्पंदणारं लोहत्राण आता शांत झालं! स्थिर झालं.

महान तेजस्वी असा, डोळे दिपविणाऱ्या एका प्रखर तेजाचा प्रचंड स्त्रोत क्षणात सर्वांसमक्ष त्याच्या हृत्कमलातून बाहेर पडून आकाशमंडलातील पश्चिम क्षितिजावर अमीन टेकडीच्या माथ्यावर रेंगाळणाऱ्या विशाल अशा लाल-लाल सूर्यबिंबाकडे प्रचंड गतीनं झेपावला! क्षणात त्या रसरशीत तप्त हिरण्यगर्भात लय पावला!! त्या जात्या महान तेजानं सभोवतीच्या सर्वांचे डोळे दिपले! अंधारले!

त्या मृत्युंजय महावीराचं महानिर्वाण झालं!!!

**

# चौदा

कर्ण पडला तेव्हा टेकडीच्या माथ्यावरचा मावळणारा सूर्य क्षणभर एकाएकी सतेज होऊन परशूचा आकार घेत दुसऱ्या क्षणासाठीही न रेंगाळता पटकन क्षितिजापार झाला. सारी पश्चिम अंधूक दिसू लागली. वायुलहरींत चमचमणारे दवबिंदू खाली पडून विरले. चारी दिशा प्रकाशहीन झाल्या. धरती दीन झाली.

अश्वत्थाम्यानं आवेगानं पुढं होऊन कर्णाच्या भव्य कपाळाचं दीर्घ अवघ्राण केलं. दुर्योधनानं त्याचा हात घेऊन स्वत:च्या कपाळाला लावला. चित्रसेन त्याच्या त्या निमुळत्या – नितळ चरणांवर कोसळला!

कर्णाचा दिव्यात्मा ज्या चिरंतन देदीप्यमान प्रकाशकेंद्रातून आला होता त्या तेजोनिधीत परत विराम पावला. तरीही त्याची कुडी सप्राण दिसावी इतकी सतेज दिसत होती. थोड्या वेळापूर्वी कर्णानं चरणार्पण केलेला मुकुट मी उचलला आणि पुनरपि त्याच्या दाट सोनेरी केसांवर हळुवार हातानं बसविला.

कुरूंचा तिसरा सेनापती चिरनिद्रा घेत होता.

अश्वत्थाम्यानं त्याच्या कंठात रुतून बसलेला तो अंजलिक बाण बाहेर उपसून टाकला आणि स्वत:च्या मस्तकावरील त्या नित्याच्या धवल वस्त्रानं त्याचं सूर्यबिंबासारखं गोल मुख आच्छादून टाकलं.

पांडवांना घेऊन मी शिबिराकडे वळलो. सारं आसमंत भयानक अन् भेसूर दिसत होतं! सारेच अबोल होतो. कुठंतरी लांबवर टिटवी अशुभ झाल्याचं कर्कशत होती. दूर लांबवर एक उंचसा पांढरा घोडा थकून जाऊन चिखलपट्टीत खाली बसलेला दिसत होता. जिवंत घोडा आणि बसलेला! मला आश्चर्य वाटलं.

पांडवासमवेत मी अर्जुनाच्या शिबिरात आलो त्या वेळी मूक झालो होतो. दारात राजमाता उभी पाहताच माझं मुख अधिकच शुष्क पडलं. अर्जुनाला वाटलं, आपण कर्णाला आज समरांगणात कंठस्नान घातलं तेव्हा आपलं कौतुक करायलाच ती येथवर शिबिरापर्यंत धावत आली असावी.

"माते, आशीर्वाद दे!" झटकन पुढं होऊन त्यानं आपल्या मातेच्या चरणांना वंदन केलं आणि अभिमानानं आशीर्वादाची मागणी केली.

मातेच्या मुखातला अंशुकाचा बोळा त्याला दिसावा इतका उजेड भोवती नव्हता; तेवढं भानही अर्जुनाला नव्हतं आणि दिसून तरी आता त्याचा काय उपयोग होता?

मी राजमातेच्या थरथरणाऱ्या पाठीवर हात ठेवून तिला शिबिराच्या आतील दालनात नेण्याच्या मिषानं तो प्रसंग सावरला. क्षणमात्रच मी, ती आणि पांडव एकत्र आलो, पण युद्धवस्त्र बदलण्याच्या निमित्तानं पांडव बाहेर पडले. शिबिरात केवळ मी आणि कुंतीदेवीच उरलो आणि मग मात्र त्या महान स्त्रीचा मनोनिग्रह बांध फोडून स्फुंदू लागला.

"केशवा, ...अरे त्याचं अखेरचं दर्शन तरी!"... दाटून आलेल्या उमाळ्यामुळे तिला अधिक बोलावलं नाही. ओंजळीतलं मुख वरसुद्धा करवलं नाही!

"वीर जननी राजमाते, शोक आवर! एक तर आता गेलाच आहे, हातचे पाच घालवू नकोस! आज मध्यरात्री मी तुला त्याचं दर्शन घडवीन. या क्षणी तरी गौप्य – गौप्यच राहावयास हवं!"

तिनं नेत्रकडा टिपल्या.

अनेक विटंबना, असंख्य समरप्रसंग पाहिलेली ती निग्रही वीरमाता मध्यरात्री कर्णाच्या प्रत्यक्ष कलेवराजवळ आली त्या वेळी मात्र वादळात सापडलेल्या एखाद्या कवंडाळीच्या वेलीसारखी थरथर कापू लागली. जमिनीशी खिळलेली तिची पावलं पुढं पडता पडेनाशी झाली. मी तिचा हात धरून तिला बळेच तिच्या सूर्यपुत्राजवळ आणलं. ओंजळीत झाकलेलं आपलं मुख वर करण्याचं धैर्यच तिला होईना.

अश्वत्थात्म्यानं आच्छादलेलं वस्त्र मी कर्णाच्या शिरावरून दूर केलं. वरची फुलं इतस्तत: विखुरली गेली. कर्ण कसा झोपल्यासारखा शांत-शांत दिसत होता! त्याचा सोनेरी मृतदेह पलित्याच्या धूसर प्रकाशातही तळपत होता!

मोठ्या निर्धारानं ओंजळ दूर करून तिनं नेत्र वर उचलले मात्र आणि दुसऱ्याच क्षणी –

"पुत्रा –!" असा टाहो फोडून ती संवेदनाशून्य होऊन खाली कोसळू लागली –

मी तिला सावरली. हो, आता मीच एकटा तिला जीवनभर सावरणारा होतो.

**

# पंधरा

युद्धाचा अठरावा दिवसही संपला. भीमानं दुर्योधनाची मांड चिणून आपली प्रतिज्ञा पूर्ण केली. पांडवांचा निर्विवाद विजय प्रस्थापित झाला. एकोणिसाव्या दिवसाच्या मावळतीच्या लांबट पडछाया रणक्षेत्रावर अस्ताव्यस्त पसरल्या होत्या. समरांगणभर प्रेतांचा खचच खच पडला होता! अमीन टेकडीच्या थेट पायथ्यापर्यंत अशी वीतभरसुद्धा जागा मोकळी नव्हती की, तिच्यावर प्रेत पडलेलं नव्हतं! दूरवर एक शुभ्र अश्व दिसत होता. होता मात्र बसलेला.

माझं कुतूहल जागृत झालं आणि मी त्या घोड्याच्या दिशेनं चालू लागलो. केव्हाचातरी मी कर्णाचं कलेवर धुंडाळत होतो. घोड्याजवळ येताच मला आश्चर्याचा धक्का बसला. माझी शंका खरी ठरली. तो कर्णाचा वायुजितच होता आणि धन्याच्या शवाजवळ अद्याप बसून होता! शेपटाची चवरी धन्याच्या मुखावर ढाळीत! माझा ऊर भरून आला. पाझरलेल्या डोळ्यांनी मी त्या मूक जनावराला पाहून घेतलं. पांडवांच्या विजयाचं उरलंसुरलं समाधानही आता नाहीसं झालं होतं. वाटत होता तो नियतीचा अनाकलनीय विस्मय!

उजव्या हातातला आसूड डाव्या हातात घेत मी पुढं झालो. प्रेमभरानं त्या जनावराला थोपटलं तसं त्याचं शुभ्र कातडं शरीरभर थरारलं. सारथी म्हणून असलेल्या माझ्या अनुभवाचा उपयोग झाला!

'चकचक' करून संकेत करताच ते जातिवंत जनावर उमगलं आणि खूर जमिनीवर बळानं रोवून पटकन उठून उभं राहिलं!

त्याच्या धन्याचा सोनेरी मृत देह मी अलगद उचलून त्याच्या विशाल पाठीवर आणून ठेवला. धन्याची अखेरची दौड नीट सांभाळून न्यावयास हवी, या काळजीनं तो वायुजित अश्व आता मंद-संथ चालू लागला. आम्हांला अमीन टेकडी चढून जायचं होतं.

वाटेत मी कृपाच्या शिबिरातून जळणारा पलिता बरोबर घेतला.

मी आणि वायुजित टेकडी चढून वर आलो त्या वेळी अंतर्धानीच्या सूर्यनारायणाची अस्पष्ट कोर क्षितिजावर डुबली!

टेकडीच्या या माथ्यावर एक विस्तीर्ण काळा कातळ पसरलेला होता. अग्निसंस्काराचं साहित्य अगोदरच तिथं तयार ठेवण्याची व्यवस्था मी केली होती. त्या कुमारी- भूमीवर चंदनाच्या मोळ्यांची चिता रचलेली होती.

वायुजिताच्या पुष्ट पाठीवरून मी माझा कर्ण उचलला आणि सरणावर ठेवला. पलिता हातात घेऊन मी क्षणभर त्याचं मुख न्याहाळण्याचा यत्न केला. थरथरत्या हातानं पलित्याची ज्योत लाकडांच्या चवडीला भिडवली. थोड्याच वेळात ज्वालांचे पिवळे, तांबडे अग्निपक्षी आकाशात झेपावू लागले. अग्निकेंद्रातून जन्माला आलेला तो आकाशपुत्र जीवनभरची आग पचवून आता शेवटी अग्निमय होणार होता. तसा वायुजित खिंकाळून थयथयाट करू लागला. मी हातातील पलिता खिन्नपणे चितेत फेकला आणि त्या जनावराजवळ आलो. त्याला सांभाळावयास हवं होतं! मी त्याला

चुचकारलं आणि त्याची आयाळ कुरवाळू लागलो. मलाही त्याची सोबत हवीशी वाटू लागली. माझं मन सुन्न-सुन्न होतं. बधिर मनानं मी चितेकडे बघत होतो आणि वायुजिताची आयाळ पुन:पुन्हा कुरवाळीत होतो.

एकाएकी तो श्वेत अश्व फुरफुरला आणि कान टवकारून आम्ही आलो होतो त्या वाटेकडे मान वळवून पुन:पुन्हा पाहू लागला. शुभ्र वस्त्र धारण केलेली एक स्त्री हळूहळू पुढं येत होती. मी चरकलो; ती – ती वृषाली होती!

एकटक, अचल डोळे, अंगावरची वस्त्रं ओली! एक-एक धीमं पाऊल टाकीत ती येत होती! आकाशकन्येसारखी!! तिचे दोन्ही हात जोडलेले होते. इकडे-तिकडे कुठंच न पाहता ती थेट चितेजवळ जात होती. पांढऱ्या पाषाणाच्या चालत्या मूर्तीसारखी! खांद्यावरचं अंशुक पडून गेल्याचं भानही तिला नव्हतं. माझ्या समोरून ती पुढं-पुढं गेली आणि तडक समोरच्या चितेत शिरली!! मी स्तंभित झालो!

भान आल्यावर मी वृषालीला मनोमन आशीर्वाद दिला. आसुडाच्या दंडानं तिचं अंशुक चितेत टाकण्यासाठी उचललं. पदराला गाठ पाहून ते मी चितेत न झोकता आश्चर्यानं मागं घेतलं.

अग्निप्रवेश करून पतीला चिरालिंगन देण्यास निघालेल्या सतीला हा मोह तरी कशाचा? शंकेनं मी गाठ सोडली. खापराचा तुकडा! फुटक्या घड्याचा एक तुकडा! मी संभ्रमित झालो.

कर्णाचा अंत्यसंस्कार आणि वृषालीचं आत्मसमर्पण यांची स्मृती म्हणून जवळ राहू द्यावा, या इच्छेनं मी तो तुकडा चितेत फेकून देण्यासाठी उंचावलेला हात तसाच खाली घेतला आणि तो तुकडा माझ्या पीतांबराच्या शेवात बांधून घेतला.

आसूड खांद्यावर टाकून वायुजिताचा कंठबंध पकडून मी परत निघालो. टेकडीची उतरण उतरू लागलो. त्या वेळी माझ्या शोधात असलेले पांडव चितेच्या ज्वाला पाहून टेकडीवर धावत येत असलेले मला स्पष्ट दिसत होते, कारण फरफरणाऱ्या पलित्यांची संख्या पाच होती! ते पांडवच होते!!

पण आता उशीर झाला होता; फार-फार उशीर झाला होता!!

■

वातावरणनिर्मितीसाठी या कादंबरीत काही कठीण शब्द योजावे लागले.
त्यांचा सुलभ शब्दार्थ

| | | | |
|---|---|---|---|
| कंठबंध | दावे | अधिषण | सोमवल्ली कुटून सोमरस तयार करावयाचे दगडी सखोल पात्र |
| ईषादंड | ध्वजदंड | | |
| पलांडू | कांदा | पुरश्चरण | एकच मंत्र पुन:पुन्हा म्हणणे |
| ओदन | शिजवलेला भात, भाताचे रोप वा बियाणे | प्रतोद | चाबूक |
| पायदंडी | पायरी | अंगुलिबाण | बाण सोडताना कातडी सोलली जाऊ नये म्हणून बोटावर चढवावयाचे आवरण |
| काषायवर्ण | भगवा रंग | | |
| संगघडी | फरसबंदी | | |
| लोहत्राण | चिलखत | तर्जनी | हाताचे पहिले बोट |
| पालाण | जीन | भृशुंडी शतघ्नि | दगडफेकीच्या लाकडी बैठकी |
| वेग | लगाम | अश्वसाद | घोडेस्वार |
| अपूप | वडे, घारगे, अनारसे | गजाती | हत्तीस्वार |
| प्राकार | तट किंवा कोट | नवनीत | लोणी |
| इंगुदी | प्राचीनकाली दिव्यात वापरावयाचे ‘इंगुद’ बियांचे तेल | रथनीड | सारथी बसतो ती रथावरची जागा |
| अकला | घोड्यांच्या खुरांचा रोग | चरणासन | सिंहासनासमोर राजाने आपला उजवा पाय ठेवावा म्हणून केलेली गोलाकार लहान बैठक |
| अकूर | | | |
| उत्तरीय | खांद्याभोवती लपेटायचे वस्त्र | अधरीय | कमरेभोवती परिधान करावयाचे वस्त्र |
| कटिवस्त्र | अधरीयाभोवती बैठकीवर लपेटायचे वस्त्र | हिरण्यगर्भ | सूर्याचे केंद्रस्थान |
| | | पेंढिका | गवताची पेंढी |
| अंशुक | स्त्रियांचे वस्त्र | रानपलांडु | रानकांदा |

# संदर्भ ग्रंथांची यादी

ही कादंबरी साकार करण्यासाठी खालील ग्रंथ आणि पुस्तकांचा संदर्भ मार्गदर्शक ठरला. म्हणूनच कर्णाच्या मनाचे अतिशय गुंतागुंतीचे धागे इतक्या सूक्ष्मपणे उकलू शकलो. यासाठी त्या-त्या ग्रंथकर्त्यांचा मी सदैव ऋणी आहे.

| | |
|---|---|
| प्राचीन चरित्रकोश | सिद्धेश्वरशास्त्री चित्राव |
| महाराष्ट्रीय ज्ञानकोश | डॉ. श्री. व्य. केतकर |
| महाभारताचा उपसंहार | श्री. चिं. वि. वैद्य |
| महाभारत | बापटशास्त्री व देवस्थळी |
| श्रीमन्महाभारत | आप्पाशास्त्री राशिवडेकर |
| नीलकंठी महाभारत | |
| भारतवर्षीय प्राचीन ऐतिहासिक कोश | कै. र. भा. गोडबोले |
| कर्ण (हिंदी खंडकाव्य) | श्री. केदारनाथ मिश्र (प्रभातकुमार) |
| रश्मिरथी | श्री. रामधारीसिंह (कवी दिनकर) |
| व्यासपर्व | दुर्गा भागवत |
| कर्णायन | श्री. गो. नी. दांडेकर |
| महाभारतावरील व्याख्याने | बाळशास्त्री हरदास |
| श्रीकृष्ण | बाळशास्त्री हरदास |
| कर्णाची उत्कट तत्त्वनिष्ठा | श्री. ना. ताडपत्रीकर |
| पहिला पांडव (नाट्य) | शि. म. परांजपे |
| श्रीमन्महाभारताचे भाषांतर | उपासनी व अभ्यंकर |
| आर्याभारत | मोरोपंत |
| हा जय नावाचा इतिहास आहे | आनंद साधले |
| हिमालयाच्या कुशीत | स्वामी अखंडानंद |
| वेद धरातल | गिरीशचंद्र आवस्थी |
| प्राचीन महाराष्ट्र (कुरुयुद्धापासून) | श्री. व्यं. केतकर |
| महाभारत कथाभाग आणि शिकवण | ज. स. करंदीकर |
| सुबोध पांडव चरितम् | दिगंबर शर्मा |
| कौंतेय | कुसुमाग्रज |
| टाकलेलं पोर | प्रबोधनकार ठाकरे |

## Reference Books


| | |
|---|---|
| The Mahabharata | Prakashchandra Roy |
| Ancient India | Mookirji |
| An Index to be names in the Mahabharata | S. Sorensen |
| Kurukshetra-Past & Present | S.P. Singhsud. |
| Report of Tours in the Gangetic Provinces | Alexander Cunningham |
| Historical Geography of Ancient India | B.C. Law |
| Geographical and Economic Studies in the Mahabharata | Dr. Motichandra |
| The Philosophy of Mahabharata | |
| Indian Education in Ancient Times | |
| Educational System in Ancient India | |
| Ancient Indian Education | |
| Classical Age | |

## 'मृत्युंजय'चे अन्य भाषांतील अनुवाद

- **हिंदी :** भारतीय ज्ञानपीठ, १८ इन्स्टिट्युशल एरिया, लोधी रोड, नवी दिल्ली - ११०००३.
  अनुवादक - प्रा. ओम शिवराज, एस.व्ही. ए. कॉलेज, मांट (मथुरा – उ.प्र.)
- **इंग्लिश :** रायटर्स वर्क शॉप, १६२/९२, लेक गार्डन्स, कलकत्ता – ७०००४५
  अनुवादक - पद्मश्री, प्रा. पी. लाल व डॉ. नंदिनी नोपाणी.
- **कन्नड :** अमित प्रकाशन, बेळगाव (कर्नाटक).
  अनुवादक - प्रा. अशोक नीलगार, श्री. दामोदर कॉलेज, मडगाव (गोवा).
- **गुजराथी :** आर. आर. शेठ आणि कंपनी, प्रिन्सेस स्ट्रीट, मुंबई – ४००००२.
- **मल्याळी :** डी. सी. बुक्स
  प्रकाशक - डी. सी. किझाकेमुरी, गुड शेफर्ड स्ट्रीट, डी. सी. बी. कॉम्प्लेक्स, कोट्टायम - ६८६००१.
  अनुवादक - डॉ. पी. के. चंद्रन व डॉ. टी. आर. जयश्री. कालिकत, विश्वविद्यालय, कालिकत – ६७३६३५ (केरळ) - १९९५.
- **बंगाली :** रायटर्स वर्क शॉप, १६२/९२, लेक गार्डन्स, कलकत्ता – ७०००४५.
  अनुवादक - सौ. सुब्रतो भट्टाचार्य, कलकत्ता.

## 'मृत्युंजय' या पुस्तकाला मिळालेले पुरस्कार व सन्मान

- महाराष्ट्र राज्य शासन पुरस्कृत - उत्कृष्ट वाङ्मय पुरस्कार (१९६८-६९).
- दै. केसरी-मराठा संस्था, पुणे पुरस्कृत - साहित्यसम्राट न. चिं. केळकर पुरस्कार (१९७२).
- ललित मासिक मुंबई, पुरस्कृत – 'ललित मासिक' पुरस्कार (१९७३).
- विवेक संस्थान, कलकत्ता पुरस्कृत - पुनमचंद भुतोडिया (बंगाली) पुरस्कार (१९८६).
- गुजराथ सरकार पुरस्कृत - गुजराथी अनुवादाला 'गुजराथ राज्य सरकार साहित्य अकादमी पुरस्कार' (१९९०).
- केंद्रीय साहित्य अकादमी, दिल्ली पुरस्कृत - गुजराथी अनुवादाला 'केंद्रीय

साहित्य अकादमी पुरस्कार' (१९९२).

- भारतीय ज्ञानपीठ, नवी दिल्ली - ११०००३ पुरस्कृत.
  '१२वा मूर्तिदेवी पुरस्कार' (१९९४-९५).
  दि. ६ फेब्रुवारी,१९९६ रोजी सन्माननीय उपराष्ट्रपती डॉ. के. आर. नारायणन यांच्या हस्ते दिल्लीत प्रदान.

## शिवाजी सावंत यांना मिळालेले साहित्यिक पुरस्कार

- गुजरातमधील बडोदा येथील 'बडोदा मराठी साहित्य संमेलन' - अध्यक्ष (१९८३).
- भारतीय ज्ञानपीठाद्वारे विद्याभवन मुंबई येथे भरविण्यात आलेल्या अ.भा. भाषा परिसंवादात मराठी सदस्य म्हणून सहभाग (१९८५). या परिसंवादाचे अध्यक्ष डॉ. शिवराम कारंत यांनी भूषविले होते
- नागेवाडी, शिवणी, विटा या प्रादेशिक साहित्य संमेलनांचे अध्यक्षस्थान भूषविले (१९८५ ते ९०).
- दक्षिण महाराष्ट्र साहित्य संमेलन, बेळगांव - उद्घाटक (१९८६).
- पेडणे साहित्य संमेलन, (गोवा) - अध्यक्ष (१९८९).
- ४०वे विदर्भ साहित्य संमेलन, दर्यापूर - उद्घाटक (जि. अमरावती) (१९९६).
- महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे - उपाध्यक्ष (१९९६).

# शिवाजी सावंत यांचा परिचय

हिरण्यकेशी नदीच्या तीरावर वसलेल्या, कोल्हापूर जिल्ह्यातील आजरा या निसर्गसुंदर व छोटेखानी, टुमदार गावात एका शेतकरी कुटुंबात, ३१ ऑगस्ट १९४० साली शिवाजीराव सावंत यांचा जन्म झाला. तिथंच व्यंकटराव प्रशालेतून ते शालान्त परीक्षा प्रथम वर्गात उत्तीर्ण झाले. परिस्थितीमुळे महाविद्यालयीन शिक्षणाला एफ.वाय.बी.ए. नंतर रामराम ठोकून त्यांना वाणिज्य विषयाच्या लघुलिपी आणि टंकलेखन यांचा अभ्यासक्रम पूर्ण करावा लागला. कोल्हापुरातील राजाराम प्रशालेमध्ये त्यांनी अध्यापक म्हणून वीस वर्षे सेवा केली. तेथून परसेवेवर पुण्यात येऊन महाराष्ट्र शासनाच्या शिक्षण खात्याच्या 'लोकशिक्षण' मासिकामध्ये त्यांनी सहा वर्षे काम पाहिले.

भारतीय जीवन आणि संस्कृती याबद्दल सावंतांना प्रारंभापासूनच सार्थ अभिमान होता. 'माझा भारत म्हणजेच महाभारत,' हे समीकरण एकदा मनात रुजल्यानंतर अभ्यासूवृत्तीमुळे त्यांचा महाभारताचा सखोल व्यासंग सुरू झाला. अस्मिता विसरू पाहत असलेल्या भारतीय समाजपुरुषाला सूर्यपुत्र, 'मृत्युंजय' कर्ण आपत्तीतही धैर्यशाली व तेजस्वी बनवील, असे उत्तर त्यांना गवसले. मग प्रदीर्घ संदर्भशोधन, सखोल व उलट-सुलट चिंतन, मनन आणि डोळस प्रवासाने टिपलेले प्रत्ययकारक निरीक्षण यातूनच या प्रदीर्घ व रससंपन्न कादंबरीचा जन्म झाला.

महाराष्ट्र शासन, केसरी-मराठा संस्थेने न. चिं. केळकर: तसेच कोल्हापूरच्या 'ललित' आणि पुणे महानगरपालिका यांनी पारितोषिक देऊन 'मृत्युंजय'चा गौरव केला. सर्वांत लक्षणीय गोष्ट म्हणजे मर्मज्ञ आणि गुणज्ञ बंगाली वाचकांच्या 'विवेक संस्थान' या कलकत्त्यातील संस्थेने वीस वर्षांनंतर १९८६ साली 'पूनमचंद भुतोडिया' हा सर्जनशील साहित्याचा पुरस्कार देऊन 'मृत्युंजय'चा सन्मान केला होता. दिल्लीतील भारतीय ज्ञानपीठ या संस्थेने १९९५सालचा १२वा 'मूर्तिदेवी पुरस्कार' भारताचे उपराष्ट्रपती डॉ. के. आर. नारायणन यांच्या हस्ते दिल्लीत प्रदान करून त्यांना सन्मानित केले होते.

१९७४ सालीच दिल्लीतील भारतीय ज्ञानपीठ या विख्यात प्रकाशन संस्थेने 'मृत्युंजय'चे हिंदीत भाषांतर प्रकाशित केले. मृत्युंजयची कन्नड - १९९०, गुजराथी - १९९१ व मल्याळम - १९९५ अशी भाषांतरे प्रसिद्ध झाली आहेत. १९८९मध्ये 'मृत्युंजय'चे कलकत्त्यातील प्राध्यापक पी. लाल यांनी इंग्लिशमध्ये भाषांतर प्रसिद्ध करून ही मूळ मराठी कर्णगाथा आता आंतरराष्ट्रीय साहित्यात नेण्याचे ऐतिहासिक कार्यही केले आहे. गुजराथी भाषांतराला अहमदाबाद येथे त्या राज्य शासनाने आपला 'साहित्य अकादमी' हा पुरस्कार देऊन १९९०मध्ये गौरविले आहे. १९९२मध्ये याच भाषांतराला 'केंद्रीय साहित्य अकादमी'चा पुरस्कारही प्रदान करण्यात आला.

१९८० साली सावंतांनी छत्रपती संभाजीराजांच्या जीवनावरील 'छावा' ही कादंबरी लिहून वाचकांसमोर ठेवली. तिचाही हिंदी अनुवाद ज्ञानपीठाने प्रसिद्ध केला आहे. ही कलाकृतीही महाराष्ट्र राज्य पुरस्काराची मानकरी ठरली.

सावंतांनी १९७५ साली लिहिलेले 'मृत्युंजय' हे नाटक मोहन वाघांच्या चंद्रलेखा या नाटयसंस्थेने मराठी रंगमंचावर पुरे एक तप सादर केले. 'छावा' नाटकही

त्यांनीच सादर केले.

१९८३ साली सावंत बडोदा साहित्य संमेलनाचे अध्यक्ष होते. १९८६मध्ये बेळगावला द. महाराष्ट्र साहित्य संमेलनाचे उद्घाटन त्यांनी केले होते. तसेच ते महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे या संस्थेत उपाध्यक्षही होते.

१९८६ साली ऑगस्टमध्ये सावंतांनी महाराष्ट्राच्या कृषि-औद्योगिक आघाडीवर आद्य जनकाचे काम करणाऱ्या पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील यांची 'लढत' नावाची द्विखंडात्मक चरितकहाणी वाचकांना सादर केली. त्यांची 'संघर्ष' ही गोदी व माथाडी कामगारांचे झुंजार नेते भाई मनोहर कोतवाल यांच्यावरील चरितकहाणी प्रकाशित झाली आहे.

विविध पैलूमय जीवन लाभलेल्या व भारतीयांना सदैव प्रेरक आदर्श असलेल्या योगयोगेश्वर श्रीकृष्णाच्या चरित्रग्रंथावर 'युगंधर' ही कादंबरी त्यांनी सिद्ध केली. रामकृष्ण मिशनच्या हरिद्वार मठाच्या प. पू. स्वामी अकामानंद यांच्या हस्ते पूजन विधी होऊन 'युगंधर' शनिवार दि. २९ जुलै, २००० रोजी समारंभपूर्वक प्रकाशित झाली.

२००२मध्ये त्यांची माननीय पी. के. अण्णा पाटील यांच्यावरील 'पुरुषोत्तम नामा' ही चरित्रकहाणी प्रकाशित झाली. याच वर्षी भारतीय ज्ञानपीठाने 'युगंधर'चा हिंदी अनुवादही प्रकाशित केला.

सावंतांचा एकसष्टी समारोह बालगंधर्व रंगमंदिर येथे शनिवार, दि. ३० डिसेंबर, २००० रोजी प्राचार्य शिवाजीराव भोसले यांच्या शुभहस्ते व ज्येष्ठ साहित्यिक भा. द. खेर यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला.

७६वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन कऱ्हाड येथे संपन्न होणार होते. त्यासाठी अध्यक्षपदाच्या उमेदवारीच्या प्रचारार्थ सावंत दौऱ्यावर असताना त्यांना दि. १८ सप्टेंबर, २००२ रोजी मडगाव-गोवा येथे आकस्मिक तीव्र हृदय आघातामुळे वैद्यकीय उपचार प्रयत्न करूनही मृत्यू आला.

सावंतांच्या मागे त्यांच्या पत्नी मृणालिनी, कन्या कादंबिनी धारप व मुलगा अमिताभ असा परिवार आहे.

संपर्क : ए-९०२, द गेटवे, भारती विद्यापीठ शाळेजवळ,
बालेवाडी, पुणे – ४११०४५.
९६२३२५५२९५ / ९८५०७९७२८५

■

# कर्ण






# कुंती


कर्ण


दुर्योधन

# वृषाली







# कर्ण




श्रीकृष्ण

कर्णमंदिर (हस्तिनापूर)



या ठिकाणी उभे राहून कर्ण याचकांना दान देत असे.

कुरुक्षेत्रावर पूर्वी सात नद्या होत्या



आज फक्त सरस्वतीच उरली आहे.

कुरुक्षेत्र



समरभूमीचा काही भाग

सूर्यकुंड (कुरुक्षेत्र)



कुरुक्षेत्रावरील सर्वांत मोठे सरोवर

कर्णघाट (हस्तिनापूर)



कर्णाच्या स्नानाचे व दानसत्राचे ठिकाण

महारथी कर्णाचे रथचक्र अखेरीस जेथे गरगरले...





...आणि धरतीत फसले ते ठिकाण.

कुमारीभूमी (अमीन टेकडी)

सन्नेथकुंड (कुरुक्षेत्र)



कर्णाचा अंत्यसंस्कार येथे झाला.



पांडवांच्या स्नानाची जागा

कर्णाचा किल्ला (कुरुक्षेत्र)



सैन्याच्या हालचालींची टेहळणी करण्याचे कर्णाचे मोक्याचे ठिकाण.
इतरत्र कोठेही न आढळणारे शेंदरी रंगाचे साप
आजही येथे अधून-मधून आढळतात.